मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(जिल्हा वाचनालय)

मासिकाचे नांव — नाट्यकथार्णव

संपादक —

मासिक क्रमांक — श. १८०२

अंक —

(महिने) १ ते १२

मराठी ग्रंथसंग्रहालय

ठाणें.

वा. मा. १६/२

॥ श्री ॥

नाट्यकथार्णव.

[illegible]भत्र लोकचरितं नानारसं दृश्यते ।
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधा ह्येकं समाराधनम् ॥
मालविकाग्निमित्रे श्रीकालिदासः

स्फुरत्कलालापविलासकोमला करोति रागं हृदि कौतुकाधिकम् ।
रसेन शय्यां स्वयमभ्युपागता कथा जनस्याभिनवा वधूरिव ॥
कादंबर्यां बाणः

पुस्तक २. चैत्र शुद्ध १ शके १८०२. अंक १.

NÁṬYA-KATHÁRṆAVA,

A MONTHLY MAGAZINE

Comprising a series of Marathi Dramas, Novels &c. &c.

विषय. अनुक्रमणिका. पृठ.

जगन्नाथरायकृत रतिमन्मथ नाटक ३९
अतिप्रौढचरित नाटक ४९
शिलादित्य ५५
मथुरा (आत्मवृत्तकथन) ६१

मुंबई.
"इंदुप्रकाश" छापखान्यांत छापिला.
(सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधी सर्व प्रकारचे
हक्क मालकानीं स्वाधीन ठेविले आहेत.)
किंमत ६ आणे.

अगत्याची सूचना.

☞ या महिन्याचे शुद्ध प्रतिपदेस आमच्या 'अर्णव' बालकास दुसरें वर्ष लागलें, व या वाढदिवसाच्या निमित्तानें त्या बालकाचे अंगावर अष्टपृष्ठभित अलंकार पहिल्या वर्षापेक्षां अधिक घालण्यांत आले आहेत. हे अलंकार असेच सदोदित अधिक अधिक घालण्याचें सामर्थ्य आमचे अंगीं यावें एतदर्थ या 'अर्णवा'च्या लालनकारांनीं आपणाकडील वर्षासनाचें द्रव्य मेहेरबानीनें त्वरित पाठविण्यास आळस करूं नये. ज्या दिवशीं या बालकाचें जनन झालें त्याच दिवशीं जोशीबोवांनीं याजबद्दल असें भाकीत केलेलें सर्वांस स्मर[illegible] असेल कीं, 'हें बालक जसजसें मोठें होत जाईल, तसतसें हें अधिक अधिक पराक्रमी निपज[illegible] सांप्रत आपल्या रंगभूमीची दुःस्थिति झाली आहे ती जाऊन तिच्या ऐवजीं उत्तरोत्तर सुस्थिति होण्यास हें बालक कारणीभूत होईल; कादंबरीनाटचादिकांविषयींच्या भ्रमांचें निरसन करून व त्यांचें वास्तविक स्वरूप व त्यांची वास्तविक योग्यता सर्व जगापुढें आणून हें बालक सर्व जनांची सदभिरुचि जागृत करील; व तद्द्वारा संसारकार्यांच्या त्रासांमुळें खिन्न झालेल्या लोकांच्या अंतःकरणाची प्रवृत्ति काव्यामृतरसास्वादाकडे साहाजिक वळवून, धर्म, नीति इत्यादिकांचीही सुधारणा केल्याचें श्रेय या बालकास मिळेल.' या जोशीबोवांच्या भाकितापैकीं आज मितीला किती भाग सिद्धीस गेला आहे हें पहाणें सुज्ञांचें काम आहे. यास्तव त्याबद्दल प्रस्तुतस्थळीं कांहीं लिहिणें नको. तथापि या स्थळीं इतकें सांगणें अवश्य वाटतें कीं, या बालकाचें संगोपन करण्याचें व त्यास प्रौढ करण्याचें काम ज्या लालनकारांचें आहे त्यांजकडून आपला कार्याचा वांटा नेहमीं पार पडत जाईल, ह्मणजे त्यांजकडील वर्षासनाचें द्रव्य नियमित काळीं व नियमित रीतीनें आह्मांस मिळेल, तर जोशीबोवांचें भाकीत खरें ठरून त्यांच्या मुखांत अल्प अवकाशानेंच शर्करा पडेल हें निःसंशय आहे. यासाठीं या बालकाच्या प्रस्तुतच्या लालनकारांचा आश्रय सदोदित अबाधित राहून नवीन अधिक लालनकार मिळतील, तर या बालकाकारितां अधिक अधिक अलंकार घडविण्याचें काम उत्तरोत्तर अधिक हौसेनें व एकानिष्ठपणानें करण्यास आह्मांकडून बिलकूल आळस होणार नाहीं.

वर्गणीची पोंच.

	रु.	आ.
रा. सा. चिंतामण शिवराम गोखले (१८०२ बद्दल)	३	६
,, आबाजी विष्णु काथवटे	३	६
रा. ब. महादेव गोविंद रानडे	३	६
,, जनार्दन सखाराम गाडगीळ	३	६
,, आर. रघुनाथराव यांचे प्रायव्हेट सेक्रेटरी	३	६
डा. गोविंद दिपूजी बडोदें	३	६
रा. रा. रावजी गोपाळ दांडेकर	३	६
,, गोपाळ बळवंत दांडेकर (१८०२ बद्दल)	१	१४
,, आनंदराव आचार्य	३	
,, दादाजी रघुनाथ	३	
,, पांडुरंग हरिचंद्रजी	१	

ना.मा.१५/२

पाहुनि त्यांचे विवाहवेश, अपुला विवाह व्हाया होस
वाटुनि होई तव मानस, उत्कंठित भारी.
येतां हें मग अमुच्या ध्यानीं, आह्मीं बोलूं विनोद करूनी
ऐकुनियां तें तूं लाजोनी, खालिं सखे बघशी!
असशी कोठें ती तूं बाई?, आह्मां सोडुनि गेलिस काई
तुझिया चित्तीं दया नाहीं, आह्मांविषयीं कीं?

(सर्वजण मूर्छित होऊन पुनरपि सावध होतात.)

राग—(स्मरण होऊन)

श्लोक.

बाळे! सोंगडणी निजा मिळवुनी संसार तूं मांडिशी,
दांपत्योचित भाषणें बहुविधें तूं त्यासवें बोलशी!
येतां मी इतुक्यांत, लाजुनि, तसा संसार तो टाकुनी
मातेमागुनि जाशि, तें विसरणें व्हावें कसें मन्मनीं!

मुदिता—हायहाय गे वत्से!

श्लोक.

कौतुकें तुला पूरुषापरी,
सजवुनी "तुझी कीरवैखरी
अंगना!" असें बोलतां तुला,
बाइ! संभ्रम स्वांतिं जाहला!

सख्या—

श्लोक.

तूं माडीवरती अहा प्रियसखी! वातायनीं बैसशी;
मार्गें मन्मथवीर जात असतां तूं त्याप्रती पाहशी;
तेणें लाज तदा स्वकीय गमली जाणोनियां अंतरीं,
त्याचीही अधिका मनांत उपजे लज्जा तुझ्या सुंदरी!

(सर्वजण पुनरपि मूर्च्छा पावतात.)

पुरो०—महाभागा! आतां हा मोह पुरे करावा! संकटकालीं धैर्याचें अवलंबन करावें!

(सर्वजण सावध होतात.)

राग—(चिंतायुक्तपणें) हायहाय! त्या असुराधमाच्या मागून माझा सखा इंद्र गेला त्याजकडीलही वृत्तांत कांहीं कळत नाहीं!

(इतक्यांत आकाशमार्गानें चारण येतो.)

१. नवऱ्याबायकोस योग्य. २. कीरवाणी. हें सखीचें नांव. ३. मनांत. ४. देवांतील एक प्रकार.

चारण—(वाटेनें जात असतां आपल्या गृहाच्या गच्चीवर राग बसलेला पाहून आपणाशीं) याचें दर्शन घेतल्याशिवाय जाणें हें योग्य नव्हे. (असें बोलून जवळ जाऊन) हे आर्य! मी आपणास वंदन करितों!

राग—बाबारे, तूं त्वरेनें जात आहेस यावरून तूं **महेंद्रा**कडील वृत्तांत कुमार **जयंतास** निवेदन करण्याकरितां जात आहेस असें वाटतें!

चार०—हे आर्य! आपण ह्मणतां तें खरें आहे!

राग—पण बाबा! कांहीं आनंदाचा वृत्तांत आहे का?

चार०—हे आर्य! आह्मांला कळूं न देतां वत्से रतीला आपल्या रथांत घालून तो दैत्याधम गडबडीनें पळूं लागला असतां ज्यावेळीं **यम, वरुण, कुबेर, वसु, रुद्र, आदित्य** आणि **मरुत्** यांसहवर्तमान महाराज **देवेंद्र** युद्धार्थ सिद्ध झालेली देवसेना बरोबर घेऊन त्याचे मागून जाऊं लागला, त्यावेळीं **शंबरासुरा**कडचे **शूरपद्म, सिंहास्य, तारक**प्रभृति दानवपति मोठ्या सैन्यासहवर्तमान येऊन त्यांनीं देवसेनेला अर्ध्या वाटेंत आडविलें. (सर्वजण दुःखी होतात.)

राग—बरें पुढें?

चार०—तदनंतर महाराज! देव आणि दानव यांची सैन्यें, फार दिवसांपासून वाढत आलेल्या वैरामुळें ज्यांचा क्रोधाग्नि वृद्धिंगत होत आहे अशीं होत्सातीं, एकमेकांशीं युद्ध करूं लागलीं. इतक्यांत काय चमत्कार झाला पहा.

श्लोक.

जो पृष्ठी शिखिच्या बसे; निजकरीं बारांहि उग्रा अशा
खड्गालागुनियां धरी, सरभसें सेनाधिभू तो तशा

१. मोराच्या. २. सेनानी=कार्तिकेय.

घेऊनि सत्वेत आत्मपृतना आला प्रसंगीं तिथें,
शत्रूनीं अवरोधिला वसतसे स्वामी सुरांचा जिथें.

राग—(समाधान पावून) कुमार **कार्तिकेय** योग्य कालीं प्राप्त झाला यांत संशय नाहीं. बरें मग पुढें ?

चार०—तदनंतर उभयसां सैन्यें एकमेकांवर तुटून पडलीं. तीं इतकीं कीं, त्या सैन्यांतील मोठ्या मोठ्या उंच घोड्यांच्या टापा लागून जी चौंहीकडे धूळ उडाली. तिच्या योगानें उभयपक्षांकडील वीरांना कोठें काय आहे हेंच दिसेनासें झालें. इतक्यांत सैन्यावरोबरच्या उन्मत हत्तींच्या गंडस्थळांतून गळणाऱ्या दानोदकानें तो सर्व धुराळा बसून गेला; आणि सर्व समरभूमीवर चिखलच चिखल होऊन, त्यांत रथांचीं चांकें बुडून जाऊन ते चालेनातसे झाले. तेव्हां उभयपक्षांकडील वीर एकमेकांच्या अंगावर शस्त्रें फेंकीत, तीं एकमेकांवर आपटून खणखण आवाज होऊं लागले. व अशा प्रकारें युद्ध चालत असतां.

दिंडी.

स्कंदशक्ती लागतां शूरपद्म
त्वरें सेवितसे प्रेतराजसद्म;
खालिं पडला सिंहास्य ओणवा तो;
तारकासुरही नष्टचक्षु होतो.

(सर्वजण हर्षयुक्त होतात.)

राग—कार्तिकेयानें त्रैलोक्याचें हें शल्यच दूर केलें यांत संशय नाहीं.

चार०—आतां कुमार **जयंता**कडे जाण्याची मला आज्ञा असावी.

राग—अरे, पण माझ्या कन्येस चोरून नेणाऱ्या त्या दैत्याची खबर कशी काय आहे ?

चार०—महाराज! या प्रकारें करून युद्धाची गर्दी चालू असतां तो बाणाच्या टप्याच्या आंत दिसत असतां असतां अतिशय वेगवान् रथांत बसून फार लांब जाऊन कोणीकडे दिसेनासा झाला. (असें बोलत बोलतच निघून जातो.)

(सर्वजण पुनरपि मूर्च्छागत होऊन भूमीवर पडतात.)

पुरो०—(खेदयुक्त संभ्रमानें सैन्याच्या पात्रांतील पाणी सर्वांच्या अंगावर शिंपडून) हे महाभाग ! हा अत्यंत मोह आतां टाकून द्यावा आपण! महाराज! सावध व्हा! सावध व्हा ! (सर्वजण सावध होतात.)

राग—हा वत्से! एकाद्या घातकी कसाबाच्या हातीं बिचारी बकरी पडावी त्याप्रमाणें तूं त्या दैत्याच्या हातीं पडली आहेस. आतां तूं कसची जिवंत राहणार!

मुदि०—हायहाय! वत्से! तूं मज मंदभागिनीच्या उदरीं जन्म घेतलेंस तें असली ही दुःखकारक स्थिति अनुभविण्याकरितांच काय ?

सख्या—हायहाय! प्रियसखी! तुझी पुढें अशी स्थिति होणार होती, तर तुझें आमचें प्रेम तरी कशाला जडलें बरें ?

पुरो०—हे महाभागा! **कार्तिकेया**नें प्रबल शत्रूचा नाश करून टाकिला आहे, आतां तो दैत्याधम **इंद्रा**च्या हातून सुटून कोठून जागार आहे ? कारण भगवती **परदेवते**नें केलेला प्रसाद कदापि व्यर्थ व्हावयाचा नाहीं!

(इतक्यांत मयूरिका येते.)

मयू०—(हर्षयुक्त त्वरेनें) अहो तात! अहो अंब! मी आपणास एक प्रिय सांगतें!

राग—(उत्कंठित होऊन) सांग सांग पाहूं! माझी

---

१. आपलें सैन्य. २. प्रेतराज=यम, त्याचें सद्म=गृह अर्थात् यमलोक.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे.

वत्सा **महेंद्रानें** परत आणिली काय?

मयू०—अहो तात! भगवतीनें परत आणिली काय असें विचारा!

राग—हें कसें काय झालें बरें?

मयू०—अहो तात! राजकन्येला चोरून नेलें ही वार्ता सांगण्याकरितां आपल्या आज्ञेवरून मी भगवतीकडे गेलें तों त्या ठिकाणीं माझ्या दृष्टीस आपली कन्या पडली!

मुदिता आणि **सख्या**—असा सुदिन उगवेल काय?

राग—चेटी! खचित ही तुला भ्रांति झाली आहे.

मयू०—महाराज! एकून आपणाला मी खेटें सांगतें वर! महाराज! भगवतीनें आपल्या योगसामर्थ्यानें आपल्या कन्येप्रमाणेंच थेट दिसणारी अशी एक **मायावती** नामक स्त्री निर्माण केली आहे, ती कोणी एकानें कोणास नकळत **शंबराच्या** रथांत ठेवून आपल्या कन्येला त्यानें सोडविलें म्हणून **वशिनीनें** मला सांगितलें!

(सर्वजण अत्यानंदभरित होतात.)

राग—(पुरोहितास) भगवन्! हा काय प्रकार आहे कांहीं समजत नाहीं!

पुरो०—हे महाभागा! यांत आश्चर्य तें कोणतें? भगवतीचें सामर्थ्यच तसें आहे! पहा.

श्लोक.

शोषोनी सिंधु वापीपरि लघु करण्या; वापिकेच्या पर्यातें
विस्तारूनी तया वा उदकानिधिचिया आणण्या योग्यतेतें;
अद्रीचें साम्य लोष्ठा, गिरिसही अथवा लोष्ठसादृश्य द्याया;
भूचा स्वर्लोक, किंवा त्रिदशवसतिची भूमि तेही कराया;
दूरस्थातें समीपस्थितिहि, जवळिंच्या दूरगामित्व द्याया;
आहे त्यालागिं नाहींपण, नचि असत्या होपणा भासवाया;
एकीच्या वस्तु नाना, बहुविध असुनी वस्तु एका तयांची
ऐशा गोष्टी कराया; क्षम सतत असे योगसिद्धीच साची.

१. स्वर्गाची.

मुदि०—(आनंदाश्रु पुसत) माझी प्रियसखी **सर्वार्थसाधिका** हिनें या प्रसंगीं अपत्यवत्सलताच प्रकट केली यात संशय नाहीं!

मयू०—अहो तात! आपणाला आणि मातुश्रींना झालेल्या क्लेशांचा वृत्तांत माझ्या तोंडून ऐकून भगवती राजकन्येसहवर्तमान इकडेच यावयास निघाली असून तिनें मला पुढें पाठविलें. त्याप्रमाणें मी पुढें निघून **वसंताच्या** द्वारप्रदेशापर्यंत आलें, तों **कैलासाहून** अगोदरच **कोकिलक** दूत आला होता तो परत कुमार **मन्मथाकडे** जाण्यास निघाला होता. त्याच्या तोंडून मला अशी खबर कळली कीं, महाभाग **मन्मथासही शंकर** आणि **पार्वती** यांनीं आज्ञा दिली असून, तो इकडेच येण्यास निघाला आहे.

राग—हेंही आम्हांस प्रियच आहे! पण कायगे चेटि! तूं वत्सा परत आणल्याचा वृत्तांत **कोकिलकाला** नाहीं सांगितलास?

मयू०—नाहीं मी बाई अतिशय आनंदाच्या भरांत तसें करायलच विसरलें.

(शारिका येते.)

शारि०—अहो तात! ही पहा भगवती आपल्या अलिंदप्रदेशीं प्राप्त झाली आहे!

राग—(त्वरेनें) तर उठाउठा सगळेचजण भगवतीस सामोरे जाऊं. (इतर सर्वांसह निघून जातो.)

(तदनंतर रथांत बसलेले मन्मथ आणि सारथि येतात)

मन्म०—(रतीचें स्मरण होऊन दुःखानें आपणाशीं.)

श्लोक.

होतें व्यग्रचि होउनी पहुडलें माच्चित्त कार्यांतरीं,—
झाकीलया घटि पाक—तत्सम तया झाली स्थिती तोंवरी;
जातां मात्र ममप्रियाविरह तो येवोनियां अंतरीं,
त्याँची दुर्विषहा, न जी वदयते, ऐशी अवस्था करी!

१. दारावाहेरचा प्रदेश, देवडी. २. अंतराची, मनाची. ३ सहन करण्यास कठीण.

हायहाय! ज्याप्रमाणें प्रियेच्या विरहामुळें मला अत्यंत ताप होत आहे, त्याचप्रमाणें माझ्याही वियोगामुळें माझ्या प्रियेला अनिवार ताप होत असेल असेंच मला वाटतें. कारण मागें ज्यावेळीं ताताज्ञेवरून देवकार्यार्थ मी त्वरेनें **अमरावनीहून** निघून **राग** महाराजांच्या दाराशीं आलों, त्यावेळीं माझ्या प्रियेची काय स्थिति झाली होती?

साक्या.

गात्रें सर्वहि गलित जाहलीं; व्याकुळ नेत्रहि झाले;
अश्रू बाहिर पडूं पाहती, परि ते[1] निरोधियेले;
बाष्पभरानें कंठ भरोनी येउनियां, अधरांची
निःश्वासाच्या योगें कांती विनष्ट झाली सांची;
मान करूनी उंच उभी ती राहे चवडग्यावरती;
सख्या तियेच्या तिज बाजूनें अर्थलंबनें देती;-
ऐशा परिनें सौधाग्रावरि तन्वी ते उभि होती,
परी तियेचें चित्त सकलही राहे मजसांगातीं.

(स्मरण झालेंसें करून) हायहाय! ही गोष्ट तर माझ्या मनांत अगदीं रुपूनच गेली आहे जशी, ती ह्मणून कांहीं तेथून जात नाहीं! ती ही कीं, ज्यावेळीं आपल्या मातुश्रीच्या आज्ञानुरोधास्तव ती **नंदन**वनांतून परत जाऊं लागली, त्यावेळीं

श्लोक.

कांहीं चालुनि पावलें, वधुनियां मार्गीं वळूनी तसें,
नेत्रीं आणुनि अश्रु ती मजकडे प्रेमें विलोकीतसे;
साभिप्राय तशी रसालतरूच्या[2] बोले मिषें मत्प्रिया,
"तूझें दर्शन हो कदा पुनरपी नेत्रोत्सवा व्हावया!"

तीच आतां

श्लोक.

धैर्यातें धरि काय? काय करिते? कैशी तियेची स्थिति?
दीर्घा मद्विरहापुढें प्रियसखी जीवंत कां राहती?

१. टेंका. २. आम्रवृक्षाच्या.

हा! माझ्या स्मरूनी प्रयाणसमयीं झाली तियेची दशा,
माझें सव्यथ होउनी मन, तया येतात शंका अशा!

(अपशकुन झालासें दाखवून खेदानें)

श्लोक.

डावें नेत्र, तसाचि वाम भुजही, दोन्ही स्फुरों लागती;
हा माझा स्वर बैसला; तनु तशी प्रस्विन्न झाली अती;
शंका येऊनियां अनिष्टविषया सोत्कंप झालें मन;
तीची संतत दे स्मृती बहुतसा संताप त्याजागुन!

(पुढें पाहून) हा दूत घाबऱ्यां घाबऱ्यां इकडे येत आहे, तो **कोकिलक**च आहेसा वाटतो!

(इतक्यांत कोकिळक येतो.)

कोकि०—महाराजांचा जयजयकार असो! जयजयकार असो!

मन्म०—**कोकिलका**! तूं नुकताच आलेला दिसतोस, आणि तुझें हृदयही स्वस्थ नाहींसें दिपतें! तर तूं मी येणार ह्मणून मंत्री **वसंतक** यास, व तद्द्वारा माझे ज्येष्ठ तात यांस, कळविलें नाहींस?

कोकि०—(भयपावून) महाराज! अमात्याची स्वारी **अमरावती** येथें नाहीं!

मन्म०—(संशययुक्त होऊन)याचें काय बरें कारण?

कोकि०— कंठ सद्गदित होत्साता) महाराज! **शंबरासुराच्या** मागें लागून भगवान् **जंभारि** गेले आहेत, त्यांच्या बरोबर तेही सकल सैन्यासहवर्तमान गेले आहेत.

मन्म०—(रोषानें) अरे, असें काय करतोस? नीट स्पष्टपणें कां बोलत नाहींस?

कोकि०—(थरथर कांपूं लागतो.) महाराज! बोलतों! अभय असावें!

मन्म०—तुला अभय आहे. बोल काय असेल तें!.

कोकि०—महाराज! त्या दैत्याधमानें राजकन्या **रति** हरण करून नेली!

१. जाण्याचे वेळीं. २. व्यथित. ३. धर्मयुक्त ४. अनिष्टविषयीं. ५. इंद्र.

चंद्रा०—तें खरें, पण तूं त्यांच्या पदरचा सोदा गुलाम आहेस, ह्मणून मी तुला अशीच वागविणार!

सुद०—प्रिये, तुझ्या अक्काकडून आलेल्या पत्रांत ज्या दांडग्या लोकांबद्दल मजकूर लिहिला आहे, त्यांच्यापैकींच हा एकआहे यांत संशय नाहीं.—काय रे, ए, आणला कारे खोडा ? (चाकर खोडे आणितात.)

चंड०—सरकार! माझी हात जोडून आपणास अशी विनंती आहे कीं आपण मनांत आणलेली गोष्ट करूं नये. यानें अपराध मोठा केला आहे खरा, तथापि त्याला जी कांहीं शिक्षा करणें असेल ती त्याला **अतिपीड**राजे स्वतःच करतील. आपण याला जी हलकेपणाची शिक्षा करीत आहां ती अशाप्रकारची आहे कीं, ती राज्यांतील अतिशय नीच व अतिशय दुष्ट अशा लोकांनीं चोऱ्यामाऱ्या केल्या किंवा दरोडे घातले, तर त्यांसच योग्य. कसें झालें तरी हा **अतिपीड**महाराजांकडून आलेला दूत आहे, याकरितां त्याचा अपमान करून त्यास प्रतिबंधांत ठेविलें असतां त्यांना फार वाईट वाटेल यांत संशय नाहीं.

सुद०—खुशाल वाटूंद्या, त्याचा जबाब मी देईन!

चंद्रा०—वाटेना वाईट वाटलें तर! आहे काय त्यांत? बाबांच्या चाकराला खोड्यांत घातलें ह्मणून त्यांना वाईट वाटेल, पण अक्काचा चाकर तिचेंच काम करीत असतां त्याला शिव्या बसल्या, मार बसला, याबद्दल तिला जास्ती वाईट वाटेल! हें कांहीं उपयोगी नाहीं! कांहीं होवो. या मेल्याला खोड्यांत अडकावाच! (कांतिवर्म्या सह खोड्यांत घालितात.) अस्सा! राहूंद्या मेल्याला असाच इथें पडून! (सुदर्शनाकडे पाहून) ऐकिलेंका आतां चलायचें होतें आंत! (चंडवर्मा व कांतिवर्मा याशिवाय सर्व जातात.)

चंड०—गड्या, तुझी अशी अवस्था पाहून मला फार वाईट वाटतें. पण आमच्या **सुदर्शन** राजाचा तापट स्वभाव जगजाहीर आहे. त्यानें एकदा अमुक गोष्ट करायची ह्मटलें कीं मग ह्यापुढें कोणाचा कांहीं इलाज चालायचा नाहीं! तरी, पण मी आतां आंत गेलों ह्मणजे त्याला आणखी नीट समजावून सांगेन.

कांति०—महाराज! आपण त्या त्रासांत पडूं नका. मी फार लांबून चालून आलों आहें, तेव्हां बराच वेळ मी खुशाल निजून राहीन! बाकीचा वेळ खुशाल गात बसेन! नाहींतर आपला शीळ फुंकीत राहीन! माझ्याबद्दल तुह्मीं वाईट वाटून घेऊं नका! आमचेंच नशीब फिरलें त्याला तुह्मीं काय कराल?

चंड०—कांहीं असो. पण आमच्या **सुदर्शन**रावाचें हें करणें कांहीं आपल्याला योग्य वाटत नाहीं. हें आमच्या महाराजांना खचित आवडायचें नाहीं. (निघून जातो.)

कांति०—हायहाय! हे **अतिपीड**राजा! अरे, **सूर्यनारायणा**प्रमाणें तूं तेजस्वी, त्या तुझी अशी अवस्था व्हावी ना? असो. देवाची मर्जी! हे भगवंता सकलभुवनैकप्रकाशका **सूर्यनारायणा**! तूं यावेळीं आपल्या **अरुण** सारथ्यास त्वरेनें पुढें पाठवून दे, ह्मणजे हें पत्र वाचून मी आपल्या जिवाचें समाधान करून घेईन.—हें पत्र **मृगांक**मालेकडचें आहे हें तर खचित. तिला मीं

हें वेड्यांतर केलेलें कळलें आहे यांत कांहीं संशय नाहीं. तेव्हां याचा केव्हांना केव्हां तरी उपयोग झाल्यावांचून राहणार नाहीं!— ठीक आहे. आतां डोळे जड झाले आहेत, तेव्हां हें ह्या दुष्टाचें घर पहात रहाण्यापेक्षां खुशाल घोरत पडावें हें बरें! आतां आपलें नशीब केव्हां उदयास येईल तें येवो! (निजतो, व झोंप लागते.)

(पडदा पडतो.)

प्र. ३ अरण्य.

(मधुकरराव येतो.)

मधु०—माझ्या नांवाची दवंडी पिटलेली मीं ऐकिली, व त्यावेळींच पकडलों गेलों असतो, परंतु सुदैवानें मला दडून बसायला एक झाडाची ढोल सांपडली होती म्हणून बचावलों! एक बंदर कीं एक दार देखील खुलें नाहीं! जिकडे जावें तिकडे मला पकडण्याकरितां खडा आणि जागता पहारा रात्रंदिवस उभा आहेच! याकरितां जोंपर्यंत मी कोणाच्या हातांत पडलों नाहीं, तोंपर्यंतच आपलें रक्षण करण्याची मला तजवीज केली पाहिजे! पुष्कळ वेळ याबद्दल मी मनाशींच विचार केला, अखेर आपला वेश पालटून, दारिद्र्यामुळें एकादा भिकारी अतिशय ओंगळवाणा व घाणेरडा असा राहूं लागून व मनुष्यस्थितीचा त्याग करून पशुतुल्य अवस्थाच अनुभवूं लागतो, तद्वत् मीही तीच अनुभविण्याचा विचार केला आहे. आतां मी आपल्या तोंडाला आणि हातापायांला चिखल माखून घेणार; कंबरेभोंवती अतिशय घाणेरडें, मळकट आणि फाटकें तुटकें असें कांबळ्याचें रकटें गुंडाळून घेणार; माझ्या डोकीच्या या केसांत झाडांचे चीक आणि गोंद घालून त्यांच्या चिकट जटा करून त्यांची वेडीवांकडी गुंतागुंत करून टाकणार; आणि हें सर्व शरीर रात्रंदिवस उघडेंच ठेवून थंडी, वारा, ऊन्ह जें काय येईल तें चैनीनें सोशीत राहणार! आमच्या या प्रांतांत असे पुष्कळ भिकारी मीं पाहिले आहेत कीं ते वेडे वांकडे ओरडतात; आपल्या अंगांत सुया, सुऱ्या, नखें, लांकडाच्या ढलप्या भोंसकून घेऊन तें रक्तबंबाळ करून टाकितात, आणि पोटावर हात जोरानें मारून घेऊन खेड्यापाड्यांतून, धनगरांच्या खोपटयांतून, शेतांतून, गरीब लोकांच्या गोंठ्यांतून भिक्षा मागत फिरतात; आणखी लोकांनीं लौकर भिक्षा घातली नाहीं, तर अंगांत सुऱ्या मारून घेऊन प्राणत्याग करण्यास तयार आहोंसें दाखवून त्यांपासून भिक्षा उपटतात. तशांतलाच कांहीं प्रकार मीही करण्याचें मनांत आणिलें आहे! हायहाय! इतःपर मी **उदासदुर्गाचा** अधीं मालक **मधुकर** नसून माझी आतां उंदरांघुशींत गणना होणार, आणि आतां हे राजश्री भिकारडा **उंदऱ्या** बनून खरोखरीच मधुकरी मागत फिरणार! असो. चलावें आतां. (निघून जातो.)

प्र. ४.—उदासदुर्ग. कांतिवर्मा खोड्यांनच आहे.

(अतिपीड राजा, खुषमस्कऱ्या, एक गृहस्थ आणि सरदार येतात.)

अति०—तीं दोघेंही आपल्या घरून निघून गेलीं, आणखी त्यांनीं माझ्या दूतालाही परत पाठवून दिलें नाहीं हें मोठेंच आश्चर्य!

गृह०—असें तर खरें, पण तीं निघून जायच्या आदल्या दिवशीं कांहीं त्यांचा जायचा बेत नव्हता.

कांति०—अहो महाराज ! मी आपला नम्र सेवक आपणास दुरूनच वंदन करितों !

अति०—आं—हा कोणरे ? अरे मूर्खा ! तुझी अशी बेअब्रू झाली असतांही तूं चैनानें हंसतो आहेस याची तुला लाज नाहीं वाटत ?

खुष०—अरे ! वाहवारे वाहवा ! यानें तर लांकडी जोडा पायांत चढविला आहे, आणि त्यांत आपणाला खिळवून घेतलें आहे !—कां महाराज ! हा चमत्कार पाहिला का ? घोड्याला डोक्याशीं बांधितात; कुत्रे आणि आस्वलें यांना गळ्याशीं बांधितात; माकडें आणि वानरें यांना कंबरेशीं बांधितात; आणखी या गुलामासारखे धट्टेकट्टे जवान यांना पायांशीं बांधितात !

अति०—कायरे ! तूं प्रत्यक्ष माझा नोकर असतांही तुझी अशी दशा रे कोणीं केली ?

कांति०—महाराज ! दोघांनींही ! त्यांनीं आणि तिनें ! आपल्या जावई बोवांनीं आणि आपल्या लेकीनें !

अति०—भलतेंच ! असें कधीं व्हावयाचें नाहीं !

कांति०—महाराज ! मी भलतें सांगत नाहीं. खरोखरी असेंच झालें.

अति०—तूं खोटें बोलतोस !

कांति०—नाहीं सरकार ! मी खरेंच बोलतों.

अति०—फिरून आपलें तेंच ! कारे तुला एकदाना मीं सांगितलें, कीं त्यांच्या हातून ही गोष्ट व्हावयाची नाहीं ?

कांति०—सांगितलें महाराज ! पण त्यांच्याच हातून ही गोष्ट झाली !

अति०—आः—देवाशपथ तूं म्हणतोस असें नाहीं !

कांति०—सूर्यनारायणाशपथ मी म्हणतों असेंच आहे !

अति०—आं—काय म्हणतोस त्यांनीं—त्यांनीं—असें केलें ? आः—काय छाती लागली आहे त्यांची कीं तीं अशी गोष्ट करतील ! छेछे ! अशी गोष्ट त्यांच्या हातून कधीं होणार नाहीं ! अशी गोष्ट तीं कधीं करणार नाहींत ! काय ? काय म्हणतोस ? समजून उमजून तीं माझा असा अपमान करतील ? मलतेंच ! अशी गोष्ट करणें म्हणजे प्रत्यक्ष माझा जीव घेण्याच्याही पलीकडे आहे ! बोल ! मला एकदा नीट ऐकूंदे ! तूं माझा चाकर असतांना तुझ्या हातून काय घडलें किंवा त्यांनीं तुला कशाकरितां म्हणून शासन केलें ? बोल !

कांति०—ऐकावें महाराज ! पहिल्या प्रथम त्यांच्या वाड्यांत मी गेलों, आणि तीं उभयतां मंदिरांत असतां तेथें जाऊन त्यांना सलाम करून त्यांच्या पुढें आपण लिहिलेलें पत्र ठेविलें. तें घेऊन फोडून यांनीं अर्धें मुर्धें वाचलें असेल नसेल, इतक्यांत दुसरा एक दूत अगदीं घाबराघूम झालेला असा खूप जलदीनें आला, आणखी त्यानें माझें पत्र वाचून त्याचा निकाल होण्याची वाट न पहातां एकदम सलाम ठोकून **शशिकलाबाई**कडचें पत्र **चंद्राननाबाई**च्या हातांत टाकिलें. तें ताबडतोब वाचून ती आपल्या नव-याच्या कानांत कायसें कुजबुजली, त्याबरोबर तीं दोघेंही एकदम तेथून उठलीं, आणि पागेवरच्या अधिकाऱ्यांना हाक मारून एकदम तेथून निघण्याचीच तयारी केली, आणखी मला होय नाहीं कांहींएक जबाब न देतां "आमच्यां मागून ये ! याचा

सावकाश जबाब. मिळेल!" ह्मणून मला सांगितलें! तीं उभयतांही माझ्याकडे रागावलेल्या मुद्रेनें पाहूं लागलीं! असो. इतकं झालें, मग मी इकडे निघून आलों तों तो **शशिकलाबाई**चा दूत—ह्मणजे महाराजांशीं उर्मटपणानें वागल्याबद्दल महाराजांनीं ज्याला खूप बडविलें तो—त्याचीन् माझी गांठ पडली. त्यावेळीं आपला एकमार्गी कारखाना, आपल्याला हें तें कांहीं कळत नाहीं, तेव्हां आपल्याच्यानें कांहीं रहावेना, न् आपण उसपली तरवार, तेव्हां तो भिऊन जाऊन त्यानें "धांवा! धांवा!" ह्मणून मोठ्या मोठ्यानें आरोळ्या ठोकल्या, तेव्हां आपले जावईबोवा आणखी आपली लेक हीं दोघें तेथें आलीं, आणखी त्यांनीं आपण आतां पहात आहां ही मला शिक्षा केली!

खुष०—खाशी खाशी! या सटव्यांची अशीच दशा असायची!—कां स्वारी! मी ह्मणतों तें खरें का खोटें?

दिंडी.

असे पैसा जोंवरी त्यापाशीं
प्रेम दाविति तोंवरी मुलें त्याशीं;
तोचि पैसा संपोनि सर्व जातां,
मुलें मानिति कसपटापरी ताता.

हं महाराज! आतां याचा खुशाल चांगला अनुभव घ्या!

पद.

गुडगुड मावशा, तशा तुझ्या पोरी,
तुडतुड हुडहुड, करिति चटोरी.
अतां रहा तुम्हीं, मुकाट्या सोसून,
त्याच् तुमच्या सास्वा, तुम्हि त्यांचि सून.

आनि०—आः काय करूंरे! यावेळीं देहाला कसा चोंहींकडून विस्तव लागल्यासारखा झाला आहे! आः दुष्टे! कारटे!—आः—अरे, ही माझी कारटी—आः कारटी—पावेळीं कुठें आहेरे?

कांति०—महाराज! येथेंच मागल्या माडीवर जांवईबोवा आणि ती बसलीं आहेत!

अति०—ठीक आहे! तुम्हीं कोणी माझ्या मागून येऊं नका. असेच येथें असा. (निघून जातो.)

गृह०—(कांतिवर्म्यास) अरे, तूं आतां बोललास यापेक्षां कांहीं जास्ती अपराध केला नाहींस?

कांति०—नाहीं. पण मला एक सांगा. महाराजांच्या बरोबरचे सरदार इतके कमी कसे झाले?

खुष०—हा मूर्खा! हा प्रश्न केल्याबद्दलच जर तुला कोणीं खोडचांत घातलें असतें तर तें योग्यच झालें असतें!

कांति०—मूर्खा! तेरे क़सें?

खुष०—अरे, उघडच आहे. हें शिकण्याकरितां तुला मुग्यांच्या शाळेंत घातलें पाहिजे, ह्मणजे त्याच तुला सांगतील कीं, हिंवाळा आला ह्मणजे सर्व उद्योग बंद करावे. आमच्या राजाचा भरभराटीचा उन्हाळा गेला, त्याच्या मागून रडण्याचा पावसाळा. आणि त्याच्या मागून मनांतल्या मनांत चुरमुरे खात बसण्याचा हिंवाळा हीं यायचींच! अरे वेड्या! आंधळे लोक खेरीज करून बाकीचे जे कोणी आपल्या नाकासमोर जातात, ते जातांना आपल्या डोळ्यांचा उपयोग करितात. बहुशः सर्व लोकांना घाण कोठें आहे हें समजतें. नाहीं समजत असे लोक थोडे. वेड्या! आणखी असें पहा, एकादें मोठें चाक एकदा उतरणीवरून खालीं गडबडत जाऊं लागले, ह्मणजे त्याला धरून

ठेवण्याचा यत्न करूं नये, केला तर मान मोडल्याशिवाय कधीं रहायची नाहीं. ज्याच्या अंगांत शक्ति असेल त्यानें अगोदर डोंगरावर चढावें आणखी मागून पाहिजे तर चाक ओढावें. ऐकलेंस रे? माझा उपदेश तर बाबा. असा आहे. हा उपदेश मी मूर्ख लोकांनाच करीत असतों, आणि त्याप्रमाणें वागायचें तें त्यांनींच वागावें. सध्यां हा मी तुला उपदेश करितों, यापेक्षां चांगला उपदेश करणारा तुला मिळाला कीं माझा आपला उपदेश मला परतही चालेल! कारण काय म्हणशील तर ऐक.

गाणें.

जो पैशासाठीं करी, कुणाचि चाकरी,
मिळवि भाकरी, सोडि लौकरी
पैसा जातां, नसे धन्याचि चिंता चित्ता ॥
खुशाल त्या निघुन जाउं द्या, आज कीं उद्यां,
चोरुनियां मुद्या; पार नदनद्यां
तो भला जातां, हित त्यापुन् नये बा हंता॥१॥
अहिं आपुले इमानी गडी, आहों सौंगडी,
राखुनियां घडी, वॉपरूं घांगडी,
एके जागिं राहूं, सुखा दुःखाला बोलूंच हूं ॥
पर ज्याला, असेल् मुख हवें, त्याने पाहवें,
दूर राहवें, खुशाल नाहवें,
करावें हूं हूं, धन्यॉपाशीं नयेचिं राहूं ॥२॥

कांति०—कायरे गडचा! हें गाणें रे तुला कोणीं शिकविलें? कोणीं वेड्यानें वाटतें!

खुष०—असेल! पण तुझ्यासारखें खोड्यानें न०हे!

(अतिपीडराजा चंडवर्म्यासह परत येतो.)

अति०—काय? काय? या वेळेस भेट होत नाहीं म्हणतात? काय म्हणतात काय? आम्हीं आजारी आहों, दमलों भागलों आहों. रात्रभर वाट चालून दमलों आहों! छत्, हीं सारीं कांहीं तरीं सोंगें आहेत! यांत कांहीं अर्थ नाहीं! त्यांना माझी आज्ञा पाळायची नाहीं, हाच याचा अर्थ! चला, परत चालते व्हा! मला हें अंसलें उत्तर उपयोगी नाहीं!

चंड०—महाराज! माफी असावी! **सुदर्शनरावाचा** तापट स्वभाव आपल्याला माहित आहेच, त्यानें एकदा कोणचीही गोष्ट नाहीं म्हटलें म्हणजे तो **ब्रह्मदेवालाही** बधायचा नाहीं!

अति०—आः दुष्ट—आः काय करूंरे!—आः—या वेळीं माझ्या सर्वांगाची पण कशी आग होऊन गेली आहे! काय काय म्हणतां, तो तापट—तापट आहे! चला, एकदम माझ्या समोरून चालते व्हा, आणि **सुदर्शनराव** आणि माझी बया यांच्याशीं मला आत्तांच्या आत्तां बोलायचें आहे म्हणून सांगा!

चंड०—जशी आपली आज्ञा. पण महाराज! मीं पहिल्यानें तरी असेंच त्यांच्या कानावर घातलें होतें!

अति०—काय काय? कानांवर घातलें होतें? कोणाच्या? माझ्या जावयाच्या आणि लेकीच्या? गृहस्था! तुम्हीं हें कोणापुढें बोलत आहां याचें कांहीं तुम्हांला स्मरण आहे?—चला आतां या पावलीं परत जा, आणखी तुम्हांला आत्तांच्या आत्तां उठून आलें पाहिजे म्हणून माझा हुकुम त्यांना सांगा! नीट समजलांत?

चंड०—समजलों सरकार!

अति०—नीट ऐकून घ्या! मी **अतिपीडराजा** बाहेर आलों आहे, व मला माझ्या जांवयाची आतांच्या आतां गांठ घ्यायची आहे; तसेंच माझी प्रियकन्या, तिलाही पण मला भेटायचें आहे, यासाठीं दोघांनाही सांगा,

तुम्हांला असाल तशीं एकदम उठून बाहेर आलें पाहिजे! काय? ही गोष्ट तुम्हीं त्यांना कळविली होती म्हणतां? आणि ती कळली असूनही तीं आलीं नाहींत? आः—आणखी कसें कसें म्हणतां? माझा जांवई तापट आहे? त्याचा स्वभाव तापट आहे? कांहीं चिंता नाहीं! जा त्याला एकदम जाऊन सांगा—पण नका नका! तीं दोघें दमलीं भागलीं असतील हेही खरें आहे, आणि त्यामुळेंच त्यांच्यानें येववत नसेल. निजूं द्या, त्यांना खुशाल निजून राहूं द्या. प्रकृतीपुढें कांहीं कोणाचा इलाज नाहीं! मनात पुष्कळ गोष्टी करायच्या असतात, पण प्रकृति दुरुस्त नसली तर सर्व बेत व्यर्थ जातात! असो. मी उगीच तापलों होतों. बरें, अंमळशानें तीं निजून उठलीं म्हणजे पडेल गांठ.—(कांतिवर्म्यावर दृष्टि जाऊन) अरे! पण हें मी काय पहातों आहें? आः—खचित खचित, हीं सारीं त्या दुष्टांचीं सोंगें आहेत! त्यांच्या मनांत मला भेटायचें नाहीं हेंच खरें! कायहो! या माझ्या चाकराची अशी दशा कोणीं केली? जा अगोदर जान् त्यांना उठवाच, नच जर उठतील तर मला येऊन सांगा म्हणजे त्याचा कसा काय विचार तो मी पाहीन! मी त्यांच्या दाराशीं जाऊन खडबड करून त्यांना उठविल्याशिवाय कधीं कधीं रहाणार नाहीं!

चंड०—जातों महाराज! इतक्या पल्ल्यावर गोष्ट न येईल तर बरें. (निघून जातो.)

अति०—हायहाय! या वेळीं माझ्या हृदयाची पण काय स्थिति झाली आहे कांहीं सांगतां येत नाहीं! जिवाची पण अशी काहिली होऊन गेली आहे कीं काय करूं? इलाज नाहीं! हायहाय!

खुष०—वाः जी वाः! गडचा! **साळूबाईनें** मारला डल्ला, उपटून नेला सारा गल्ला. यजमानीन रडते करूं तरी काय, **साळूबाई** म्हणते करा' हायहाय, त्यांतली आज तुझी स्थिति झाली आहे हें आतां आलें का प्रत्ययाला?

(इतक्यांत सुदर्शन, चंद्रानना, व चाकर यांसहित चंडवर्मा परत येतो.)

अति०—यावें, कां झाली का एकदाची झोंप आटपली?

मुद०—मामा! वंदन करितो. (चाकरास खूण करितो तीसमजून चाकर कांतिवर्म्यास खुला करितात.)

चंद्रा०—बाबा! नमस्कार करितें.

अति०—बाई! कोण तूं? माझी **चंद्रानना** होय? कल्याण! बाळे! आतां तुजवांचून मज म्हाताऱ्याच्या जिवाला सुख दुसरें कोण देणार आहे? आतां तूंच मात्र जर मला सुख न देशील, तर मग मात्र तूं माझ्या पोटची नसून जारिणीच्या पोटची असें मला म्हणावें लागेल! (कांतिवर्म्याकडे पाहून) कायरे, तूं झालास का मोकळा? बरें, त्याचा अंमळशानें विचार करीन! हायहाय! बाळे **चंद्रानने**! तुला कायं सांगूं? तुझी बहीण जखीण महादुष्ट गे निपजली! तिनें दुष्टपणानें मला वाग्बाणानें ताडन केलें! कर्कोटक नागाच्या विषापेक्षांही तीव्र वाग्विष तिनें माझ्या विद्ध झालेल्या हृदयांत या—या—इथें असें—असें ओतिलें! आतां बाळे! तुला सांगितलें असतां खोटें वाटेल, पण तुझ्या त्या नष्ट बहिणीनें माझा जो कांहीं अपमान केला आहे, तो—

चंद्रा०—बाबा! पण तुम्हीं अंमळ शांत व्हाल का? अक्का आपलें कर्तव्यकर्म विसरली हें म्हणण्यापेक्षां, तुम्हांलाच तिच्या खऱ्या गुणांची परीक्षा झाली नसावी असें मला वाटतें!

अति०—हं हं? तें कसें कसें बरें?

चंद्रा०—अक्का आपण होऊन तुमच्याशीं वाईट रीतीनें वागेल हें मला कांहीं खरें वाटत नाहीं. आतां तुमच्या तैनातींतील लोकांचे दंगे तिनें बंद केले असतील; पण त्यांत कांहीं मला वावगें वाटत नाहीं! तिनें केलें तें बऱ्याकरितांच केलें असेल, याकरितां तुम्हीं तिला दोष नका देऊं!

अति०—त्या दुष्टेला मी निरंतर शापच देईन! तिनें—

चंद्रा०—बाबा! तुम्हीं माझें म्हणणें ऐका! तुम्हीं आतां म्हाला आहां म्हातारे, तुमचीं सर्व गात्रेंही आतां शिथिल होऊन गेलीं आहेत, यासाठीं तुम्हांला दुसरें माणूस जसें सांगेल तसें तुम्हीं ऐकून त्याप्रमाणें वागावें हेंच योग्य! म्हातारपणामुळें तुम्हांला एकादी गोष्ट भलतीच वाटते, पण तसें उपयोगी नाहीं! दुसऱ्या माणसाला आपल्यापेक्षां कांहीं तरी अधिक कळत असेल यासाठीं तुम्हीं आपलें त्याचें ऐकाल तें बरें! म्हणून बाबा! मी तुम्हांला सांगतें असें करा, तुम्हीं आपले अक्काकडे आलां तसे परत जा! तिच्याविषयीं तुमचा भलताच ग्रह झाला आहे!—

अति०—**चंद्राननें**! काय—काय म्हणतेस? मी तिजकडे परत जाऊन तिची क्षमा मागूं? मी चुकलों म्हणून तोंडांत मारून घेऊन तिच्या पायां पडून (चंद्राननेच्या पायां पडून) तिला असें बोलून दाखवूं कीं, "मुली! मी थेरडा झालों, ही गोष्ट खरी. मी थेरडा झालों नसतों तर बरें झालें असतें. याकरितां आतां माझी तुझ्या पायांपडून तुला एवढीच विनंती आहे कीं, कसें तरी करून मला पोटाला अन्न आणि निवाऱ्याला वस्त्र दे"? **चंद्राननें**! सांग मी अशी गोष्ट करावी हें तुला आवडतें का?

चंद्रा०—बाबा! हें तुम्हीं भलतेंच काय करितां? हें असलें मला नाहीं आवडत! तुम्हीं आपले उठून एकदम अक्काकडे चालते व्हा!

अति०—(उठून) **चंद्राननें**! तूं म्हणतेस ही गोष्ट कदापि व्हावयाची नाहीं! त्या दुष्टेनें—त्या कृतघ्न कारटीनें—माझी निंमे तैनात कमी करून टाकिली! वज्रापेक्षांही कठीण अशा वाग्वज्रानें माझ्या हृदयावर निर्दयपणें प्रहार केले! तिनें सर्पिणीप्रमाणें माझ्या हत हृदयास दंश करावयासही कमी केलें नाहीं! यासाठीं परमन्यायी परमेश्वर तिचें कधीं कधीं बरें करणार नाहीं! तिच्या कृतघ्नपणाबद्दल तिच्या सर्वांगाला किडे पाडल्याशिवाय तो कधीं कधीं रहाणार नाहीं!

चंद्रा०—बाबा! हें तुम्हीं असें वेड लागल्यासारखें काय बोलतां?

अति०—काय म्हणतेस? मी वेड लागल्यासारखें बोलतों? नाहीं नाहीं! **चंद्राननें**! मी तुला खचित खचित सांगतों, मला कांहीं वेड लागलें नाहीं! मी अगदीं खरें खरें तेंच बोलतों आहें! मी बोलतों हें खरें का खोटें हे तो सर्वसाक्षी परमेश्वर पहातो आहे! तो त्या कृतघ्नेच्या मस्तकावर प्रचंड विद्युत्पात करून तिला दग्ध करील, किंवा तिच्या सांप्रतच्या सर्व सौंदर्याचें हरण करून तिला कुरूप आणि जखड केल्याशिवाय कदापि राहणार नाहीं!

चंद्रा०—आतां मात्र तुम्हीं बरळूं लागला असें मला वाटतें. तुमची चित्तवृत्ति जाग्यावर नाहींशी झाली म्हणजे तुम्हीं मला देखील असेंच म्हणायला चुकणार नाहीं!

अति०—नाहीं, बाळे **चंद्रानने**! मी बरळत नाहीं, आणि तुझ्याबद्दल असे वाईट शब्द माझ्या तोंडून कधीं निघावयाचे नाहींत! तूं स्वभावतःच सुकुमार आणि कोमल मनाची आहेस, तेव्हां तुझ्या हातून त्या दुष्टेसारखें निष्ठुर वर्तन कदापि होणार नाहीं! तिच्या नुसत्या नेत्रांकडेच पाहिलें कीं ती क्रूर आहे अशी तत्काळ मनाची खातरी होते, पण तुझी गोष्ट तशी नाहीं. तुझे नेत्र सौम्य आणि प्रेमानें भरलेले आहेत, त्यांकडे पाहिल्याबरोबर चित्त शांत होतें. माझ्या चित्ताला ज्या गोष्टीच्या योगानें सुख होईल ती गोष्ट करण्याला तूं कधीं कमी करणार नाहींस. तूं माझा पेशा कमी करणार नाहींस, किंवा मी दाराशीं आलां असतां दार बंद करून मला आंत येऊं द्यावयाचें नाहीं ही गोष्ट तुझ्या हातून कदापि होणार नाहीं. अपत्यप्रेम म्हणजे काय, मुलांनीं आपल्या पित्याच्या आज्ञा पाळाव्या, सर्वांचा यथोचित आदरसत्कार करावा, कृतघ्नपणा करूं नये, या गोष्टी तूं पूर्णपणें जाणत आहेस. तुला मी आपलें अर्धें राज्य दिलें ही गोष्ट तूं कांहीं विसरायची नाहींस.

चंद्रा०—बाबा! हें तुमचें पाल्हाळ बोलणें पुरे! तुमचें म्हणणें काय आहे तेवढें मला कळूं द्या कसें.

अति०—या माझ्या चाकराला खोड्यांत कोणीं घातलें?

(इतक्यांत पडद्यांत शिंगांचा व तुताऱ्यांचा आवाज ऐकूं येतो.)

मुद०—हीं शिंगें कोणाचीं ऐकूं येतात?

चंद्रा०—मी सांगतें. मला ठाऊक आहे. अक्का इकडे यायची आहे म्हणून मूळ माझ्या पत्रांतच आहे. त्याप्रमाणें तीं आलीं यांत संशय नाहीं! (इतक्यांत अश्वसेन येतो त्यास) कायरे, अक्का आली कारे?

अति०—अरे, ह्याच तो चोर! त्या दुष्टेच्या पुढें पुढें करणारा भामट्या! हरामखोरा! चल निघ माझ्या पुढें उभा राहूं नको! तोंड काळें कर!

सुद०—महाराज! आपला भावार्थ मी समजलों नाहीं!

अति०—माझ्या चाकराला खोड्यांत कोणीं घातलें? **चंद्रानने**! ही गोष्ट तुला समजून झाली नसावी असें मला वाटतें!—आं, अरे ही कोण? (शशिकला आंत येते.) अरे! हीच ती दुष्ट कृतघ्न कारटी! हे **पुराणपुरुषा नारायणा**! जर तुला मजसारख्या वृद्ध मनुष्यांच्या दुःखाची कींव येत असेल, जर तुझ्या न्यायी राज्यांत वडिलांची आज्ञा पाळावी म्हणून कांहीं असेल, आणि जर तुझ्या "**पुराणपुरुष**" नांवाप्रमाणं तूं खरोखरीच पुराणपुरुष असशील, तर तूं मज वृद्धाचा पक्ष घे! (शशिकलेस) हा दुष्टे! निर्लज्जे! कृतघ्ने! तुला या माझ्या पांढऱ्या केसांचीही अशी स्थिति पाहून कांहीं लज्जा नाहीं वाटत?—शिवशिव! बाळे **चंद्रानने**! तूं या चांडाळणीच्या अपवित्र देहास आलिंगन देऊन आपल्या पवित्र देहास विटाळवून घेतेस?

शशि०—कां वरें? मी चांडाळीण कशी ठरलें? एकादा थेरडा वेड लागून भलतं भलतें बडबडूं लागला म्हणजे तेवढ्यानेंच कोणाच्या

अंगीं चांडाळपण थोडकेंच येतें? कावळ्याच्या शापानें ढोरें थोडींच मरतात!

अति०—हायहाय! हे दुष्ट हृदया! सुजवर यी दुष्टेचा असा वाग्वज्रप्रहार होत असतांही तूं फुटत नाहींस, तेव्हां तूं वज्राहूनही काठिण आहेस!—आः—बोला बोला! माझा हा चौंकर खोड्यांत कसा पडला?

मुद्द०—त्याला खोड्यात मीं घातलें. परंतु त्याच्या अपराधांच्या मानानें त्याला झाली शिक्षा ही कांहींच नाहीं.

अति०—बस बस! मला जास्ती ऐकायला नको! याला खोड्यांत कोणीं तुम्हीं घातलें?

चंद्रा०—बाबा! आतां मात्र तुम्हीं माझें ऐकाच! तुम्हांला लागत चाललें आहे खूळ, तर तुम्हीं लोकांला तसेंच वाटवा! तुम्ही अगोदर आपले सरदार मानकरी अर्धे काढून टाकून हा महिना खपेपर्यंत अक्काजवळ जाऊन रहा, आणि मग माझ्याकडे रहायला या! आतां या वेळीं मी कांहीं आपल्या घरीं नाहीं, यामुळें तुमची यथास्थित बरदास्त ठेवायचें इथें कांहीं जमायचें नाहीं!

अति०—काय म्हणतेस? माझे पंनास मानकरी काढून टाकिलेले राहून मी तिजकडे परत जाऊं काय?—ही गोष्ट कदापि व्हावयाची नाहीं! ही गोष्ट कबूल करण्यापेक्षां मी एकून एक घरादारांचा त्याग करून प्रत्यक्ष अरण्यांतही उन्हाळा, थंडी, किंवा पावसाळा यांत उघडा फिरण्याचीही जरूर पडली तरी तसा फिरेन! कधीं डगावयाचा नाहीं! अरण्यांत खाण्यास भक्ष्य मुळींच न मिळतां लांडगे, चित्ते, तरस इत्यादिकांमध्यें जरी रहावयाचें पडलें तरी राहीन!—काय? या दुष्टेबरोबर तिच्या घरीं परत? नांव नको! ही गोष्ट करण्यापेक्षां मी सौराष्ट्राचा राजवाहनराज, ज्यानें आंदणाची बिलकूल अपेक्षा न धरितां मृगांकमालेचा स्वीकार केला, त्याच्या दाराशीं जाऊन भिक्षाही मागण्याचा प्रसंग आला तरी चिंता नाहीं! परंतु ही गोष्ट मी कदापि करणार नाहीं!—काय? या दुष्टेबरोबर मीं जावें? धिक्कार असो. धिक्कार असो. यापेक्षां (अश्वसेनाकडे बोट दाखवून) हा गुलाम हरामखोर, याच्या घरीं भांडींही घांसायला रहायची पाळी आली तरी मला पत्करेल!

शशि०—फार चांगलें! तुम्हांला तसें आवडत असलें तर तसें होऊं द्या खुशाल! त्याला माझ्याकडून कांहीं ना नाहीं!

अति०—हायहाय! शशिकले! तूं असें बोलून मला उगीच वेड लावूं नको! मी तुझ्या पायां पडतों! इतःपर एकमेकांना एकमेकांचे दर्शन देखील घडणार नाहीं! तथापि कसें झालें तरी तूं माझ्या पोटचा गोळा आहेस, व माझ्या रक्तापासून तुझें जनन झालें आहे. आतां माझ्याच रक्तांत कांहीं दोष झाल्यामुळें त्या गोळ्याला रक्तदोष झाला असेल, किंवा त्याला त्यायोगें कांहीं भयंकर व्याधि जडली असेल, कांहीं असलें तरी तूं माझ्या पोटचा गोळा आहेस ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं, याकरितां आतां मी तुला कांहीं वाईट म्हणणार नाहीं! याबद्दलची शरम तुला केव्हां वाटणार असेल ती असो, पण माझ्या तोंडून त्याबद्दल एक चकारशब्द निघणार नाहीं! मी तुझ्याबद्दल त्या न्यायी व सर्वसाक्षी परमेश्वरापुढें गाऱ्हाणें कदापि सांगणार नाहीं! तूं अशीच राहून

जेव्हां आपोआप सुधारशील तेव्हां सुधार, मी तोंपर्यंत खुशाल वाट पहात आपल्या शंभर मानकऱ्यांसहवर्तमान **चंद्राननेक**डेच राहीन!

चंद्रा०—पण ही गोष्ट मी बरी कबूल करीन! तुमची मुदत अजून लांब आहे, याकरितां तुम्ही इतक्यांत याल असें मला वाटलें नव्हतें. आणखी शिवाय तुमच्या बरदास्तीची तयारीही करायला मला फावलें नाहीं! म्हणून बाबा! मी तुम्हांला सांगतें, तुम्हीं अक्का म्हणते तें मुकाटयानें ऐकून त्याप्रमाणें वागा. कारण तुमचा हा जो प्रकार चालला आहे तो पाहून कोणीही सहज तुम्हाला म्हातारचळ झाला आहे असेंच म्हणेल. यासाठीं तुमच्यापेक्षां अक्काला अधिक समजतें, म्हणून तुम्हीं तिचेंच म्हणणें ऐका!

अति०—**चंद्राननें**! हें तूं अगदीं मनापासून बोलतेस?

चंद्रा०—म्हणजे? होयच! मला कशाला आंतून एक आणि बाहेरून एक असें पाहिजे? तुम्हींच पहा, तुम्हांला पन्नास मानकरी जवळ ठेवायला सांपडतात, यांत तुमचें तें काय वाईट होतें आहे? खरें पुसलें तर तुम्हांला पन्नास किंवा इतके तरी लोक ते कशाला पाहिजेत? कारण इतके लोक घरांत वाळगल्यामुळें खर्चही विनाकारण जास्ती, आणखी त्यांच्यामुळें दंगाही होण्याची भीति! एकाच घरामध्यें दोघांचा हुकूम पाळणारीं माणसें एक चित्तानें रहावींत कशीं याचा तुम्हींच विचार करा. माझी तर खात्री आहे ही गोष्ट कधींही पण व्हावयाची नाहीं!

शशि०—तें सगळें राहिलें, पण मी इतकेंच पुसतें कीं जीं माझीं किंवा ताईचीं चाकरमाणसें आहेत तींच तुमच्या तैनातीला आहेत असें तुम्हीं कां नाहीं समजत?

चंद्रा०—होय. हेंही खरें. मला देखील असेंच वाटतें! आणखी यांत एक गोष्ट विशेष आहे ती ही कीं, जर तुम्हांला तीं चाकरमाणसें आवरलीं नाहींत, तर त्यांना आवरणारीं आम्हीं बसलोंच आहोंत कीं नाहीं? बाबा! अक्काच्या बोलण्यावरूनच आतां मला भय वाटूं लागलें आहे, यासाठीं तुम्हांला सांगतें, जर तुम्हीं माझ्याकडे रहायला याल, तर बरोबर पंचवीस माणसें घेऊन या! जास्ती आलीं तर त्यांना मी कांहीं आपल्या घरांत रहायला जागा द्यायची नाहीं!

अति०—पोरींनो! मीं तुम्हांला आपलें सर्वस्व ना दिलें?

चंद्रा०—मग? त्याला कोणीं नाहीं म्हटलें आहे? पण त्याचें आतां काय? ती वेळ निराळी न् ही वेळ निराळी.

अति०—पोरींनो! मी तुम्हांला आपलें सर्वस्व देऊन माझें पाळण करण्याचें काम सर्व तुमच्याकडे दिलें, त्याच वेळेस मजबरोबर शंभर सरदार मानकरी रहायाचा नव्हता का ठराव केला? **चंद्राननें**! एकून तुमकडे रहायला यायचं झालें, तर मी पंचविसांनिशीं यावें अं? **चंद्राननें**! हें तूंच का पण बोललीस?

चंद्रा०—होय होय. मीच मीच बोललें. आणखी दहादा विचारलें तरी तुम्हांला हेंच उत्तर मिळेल! आतां तुम्हीं मला जास्ती कांहीं एक विचारूं नका.

अति०—हायहाय! या दोन्ही कारट्या दुष्ट

निघाल्या, तरी यांच्याहूनही दुसरे अधिक दुष्ट आहेत, तेव्हां त्यांपेक्षां या बऱ्याच ह्मणावयाच्या ! असो. **शशिकले** ! चल मी तुंजबरोबर येतों, कारण तूं मजबरोबर पन्नास मानकरी ठेवायला तरी कबूल आहेस, आणि ही दुष्ट ह्मर नुसते पंचवीसच ठेवूं देईन ह्मणते ! तूं एवढ्याला तरी कबूल आहेस तेव्हां तुझें हिच्या दुंपटीनें तरी मजवर प्रेम आहे तेवढें बस आहे.

शशि०—बाबा ! तुह्मीं माझें ह्मणणें नीट ऐकून घ्या. माझ्या घरांत चाकरांला कांहीं कमी आहे असें नाहीं. तुह्मीं आपले पन्नास लोक बरोबर ठेवायचे ह्मणतां, पण त्यांच्या दुप्पट तिप्पट लागले तरी माझे सेवक तुमच्या सेवेंत तत्पर राहतील, तेव्हां तुह्मांला स्वतांचे पंचवीस, दहा किंवा पांच इतक्यांची तरी काय जरूर आहे ?

चंद्रा०—हो, पण मी ह्मणतें यांना एक तरी चाकर कशाला पाहिजे ?

अति०—**चंद्रानने** ! मला कितीची जरूर आहे आणि कितीची नाहीं, याबद्दलचें बोलण्यांत काय बरें अर्थ आहे? या राज्यांत अतिशय भिकारी दरिद्री जे आहेत, त्यांच्या जवळ देखील अतिशय भिकार भिकार पदार्थांची एकादे वेळीं समृद्धि असते. मनुष्याच्या प्राणधारणाला जेवढ्या वस्तु आवश्यक आहेत, तेवढ्याच जर त्याला मिळत गेल्या, तर त्याच्यांत आणि पशूंच्यांत अंतर तें काय राहिलें ? हेंच पहा, तूं आहेस, तुला थंडीवाऱ्यापासून पीडा व्हायला नको आहे, आणि कसें तरी पोट भरलें ह्मणजे झालें, तर तेवढ्याच पुरती तजवीज राखली ह्मणजे पुरे आहे, मग तुला हीं इतकीं उंची वस्त्रें, हे दागिने, हे इतके चाकर, इत्यादिकांची खटपट ती कशाला पाहिजे ? तुला दररोज कोरडी भाकरी मिळाली तरी चालण्यासारखें आहे, मग तुला दररोज नव्या नव्या पक्वान्नांचीच काय जरूर? गुरांपुढचा वाळलेला कडबा पसरूनही निजलें असतां तुझें चालणार नाहीं असें नाहीं, मग तुला उंच उंच पलंग, गाद्या, सतरंज्या, रजया, ह्या जिनसा कशाला पाहिजेत? तेव्हां तात्पर्य काय, मनुष्याला जरूरीचे तेवढेच जिन्नस द्यायचे हें ह्मणणें व्यर्थ आहे.—आः—अरे पण काय हा माझा अविचार ! मी इतःपर व्यर्थ यांच्याशीं कशाकरतां बोलतों आहें? मला पाहिजे आहे तें मला या दुष्ट कारट्यांपासून मिळायची आशाच व्यर्थ आहे! देवादेवा! काय ही माझी स्थिति ! या माझ्या उतार वयांत आणि मजवर काय अघोर हा प्रसंग! देवा **नारायणा** ! तुझ्यापाशीं माझें दुसरें कांहीं मागणें नाहीं! मजवर जीं जीं संकटें येणार असतील, तीं खुशाल येऊं दे, परंतु तीं सोसण्यापुरतें माझ्या अंगीं धैर्य मात्र राहूं दे ! तसेंच या कारट्या आपला अपत्यधर्म विसरून जाऊन कृतघ्नपणानें माझ्यावर जे गहजब आणीत आहेत ते नुसते मुकाट्यानें सोशीत बसण्यापेक्षां त्यांजबद्दल यथायोग्य सूड घेण्याचें सामर्थ्य तूं मला दे!—संकटकाळीं रडत बसणें हें पुरुषांचें काम नव्हे, बायकांचें आहे!—आः—दुष्ट अमानुष जखिणींनो! तुह्मीं काय समजलां आहां ? तुमच्या या निष्ठुर व क्रूर आचरणाबद्दल तुह्मां दोघींचा असा कांहीं भयंकर सूड घेईन कीं तो पाहून व ऐकूनच सर्व लोक तोंडांत बोटें घालून

थक्क होतील! हा सूड कोणच्या प्रकारचा असेल हें या वेळीं माझ्यानें सांगवत नाहीं; परंतु हा सूड मी उगवीनच! कधीं कधीं सोडणार नाहीं! तुह्मांला वाटत असेल कीं, हा काय ह्मातारा, हा फार फार तर रडत बसेल, पण माझ्या नेत्रांतून एकही अश्रु-बिंदु बाहेर यावयाचा नाहीं! मला रुदन करण्याला कारणें भरपूर आहेत, तरी पण डोळ्यांतून एक अश्रुबिंदु बाहेर निघण्याच्चे अगोदर या माझ्या हृदयाचे लक्षशः तुकडे होतील!—(खुषमस्कऱ्याकडे पाहून) हायहाय रे गडचा हायहाय! ह्या दुःखाच्या असह्यतेमुळें मला खचित खचित वेड लागेल! हायहाय!

(अतिपीड, चंडवर्मा, कांतिवर्मा, खुषमस्कऱ्या व सरदार जातात.)

(त्याबरोबर मेघांचा गडगडाट ऐकूं येऊन वादळ सुरू होतें.)

मुद०—चला आतां आंत जाऊं या. आज वादळ कडाक्याचें होईल असें दिसतें.

चंद्रा०—असें खरें, तरी पण हें घर लहान आहे, त्यांत त्या थेरड्याचीं आणि त्या त्याच्या बरोबरच्या लोकांची कांहीं सोय होण्याजोगी नाहीं.

शशि०—हा सगळा त्या थेरड्याचाच अपराध आहे! त्याला हा इतका उपद्व्याप सांगितला आहे कोणीं? गप्प बसलें तर नाहीं का चालणार?—पण नाहींच तें!

चंद्रा०—बाबा जर घरांत येऊन एकटे रहायचें कबूल करितील, तर त्यांना एकट्यांना मी खुशाल घरांत राहूं देईन! पण त्यांच्या बरोबर एका देखील अधिक कोणाला घरांत पाय नाहीं ठेवूं द्यायची!

शशि०—मीहीं पण असेंच करणार आहें!—सगळें खरें, पण **चंडवर्मजी** कोठें दिसत नाहींत? ते आतां इथें होते.

मुद०—ते त्या थेरड्याच्या बरोबर गेले होते, पण हे आले पहा. (चंडवर्मा परत येतो.)

चंड०—**अतिपीडराजे** तर काय अगदीं अतिशय संतापून गेले आहेत!

मुद०—त्यांचा बेत पुढें कोणीकडे जायचा आहे?

चंड०—ते आपल्या चाकरांला घोडे तयार करायला सांगत होते. पण त्यांचा बेत पुढें कोणीकडे जायचा आहे कांहीं कळत नाहीं!

मुद०—ठीक आहे. त्यांना आपल्या मर्जीप्रमाणेंच चालूं द्या. त्यांना कांहीं कोणीं सांगून परिणाम नाहीं लागायचा.

शशि०—ऐकलें का **चंडवर्मजी**! तें सगळें कसें जरी असलें तरी त्यांना तुह्मीं परत या ह्मणून कांहीं ह्मणूं नका!

चंड०—बाईसाहेब! तुह्मीं असें ह्मणतां, पण अजून पुरते दोन प्रहरही झाले नाहींत तोंच पहा रात्रीसारखी काळोखी येत चालली आहे! वारा काय घोंघावतो आहे, आणखी चोंहीकडे रेती उडत असून तिचे स्तंभ गगनासही सांभाळून धरितात काय असें वाटत आहे! अशा प्रसंगीं बाईसाहेब! राजेसाहेबांनीं बाहेर तरी कोणीकडे कसें फिरावें? कोठें झाडांचा आसरा धरून बसेन ह्मटलें तरी, या किल्ल्याच्या आसपासची दलदल खेरीज करून चार चार पांच पांच कोसपर्यंत एकादं झुडूपही मिळायची भ्रांति आहे!

चंद्रा०—कांहीं जरी असलें, तरी त्यांना आपल्या शहाणपणाचा मोठा डौल आहे, याकरितां अशींच जेव्हां खेटरें खातील, तेव्हांच आले

हेर दाराशीं घोड्यांचा टांपा ऐकूं आल्या आणि तत्क्षणींच दार उघडून **वसुभद्राचार्या**चा चाकर आंत घाबऱ्याघाबऱ्याच येऊन मोठ्यानें "आले ! आले!" म्हणून ओरडला.

"कोण कोण-कोतवाल- ?" **शिलादित्य** घाईनें विचारितो.

वसुभद्राचार्याचा चाकर उत्तर करितोः- "ते एकटेच नाहींत, त्यांचे सगळे साथीही त्यांच्या बरोबर आहेत ! कांहीं जण खंदकावर फळ्या टाकताहेत; कांहीं फळ्यांवरून उतरून पुढें येताहेत; कित्येकजण घोड्यावर बसले आहेत. आणि मला त्यांमध्यें कोतवालची पण स्वारी ओळखतां येतेशी वाटते. त्यांनीं मला पाहिलें आणि ते याच अंगाला जलदीनें येत आहेत!"

त्याचे हे शब्द बोलून होताहेत, इतक्यांत बाहेरल्या अंगाकडून कोतवालांच्या शिपायांनीं मोठ्यामोठ्यानें आरोळ्या ठोंकल्या त्यांचे आवाज एकदम ऐकूं आले. ते ऐकल्याबरोबर **जरत्कर्ण** घाबरून निराश होत्साता बोललाः-"हाय हाय ! आतां खचित खचित घात झाला !"

शिलादित्य बोलतोः-"**भदंतजी** ! आपण असे निराश होऊं नका ! प्रभु **अर्हत्** आपल्या सत्यमार्गी भक्तांस संकटसमयीं कदापि सोडणार नाहीं !"

इतक्यांत **वसुभद्राचार्य** बोलतोः-"हां- आतां येथें बोलत राहण्याची ही वेळ नव्हे! जर तुह्मांला त्यांच्या हातून निसटून जायचें असेल तर एकदम घोड्यांवर बसा! चला ! निघा ! पहा त्यांच्या आरोळ्या मोठ्या मोठ्यानें ऐकूं येत आहेत ! चला ! पहा ! तुमचे शत्रु अगदीं थोड्या वेळांत तुह्मांला गांठतील!"

"**त्रिवेणी** !" **शिलादित्य** बोलतोः-"त्रिवेणी! कसें काय ? तूं आमच्या बरोबर पळून जायला तयार आहेस ?"

ती उत्तर करितेः-"त्या मेल्या दुष्टांच्या तावडींत सांपडण्यापेक्षां दुसरी पाहिजे ती गोष्ट मी करीन ! पण मला त्या मेल्यांचा सहवास नको!"

याप्रमाणें तिचें उत्तर ऐकिल्याबरोबर **शिलादित्य** तिला एकदम उचलून घेऊन अगदीं जवळच्या घोड्यावर तिजसुद्धां उडी मारून बसला. त्याची ती कृति पाहून **वसुभद्राचार्य** ताबडतोब दुसऱ्या घोड्यावर बसला, व त्यानें अंमळ ओणवें होऊन **जरत्कर्ण** जतीचा हात धरून त्याला घोड्यावर आपणामागें बसविलें. हा प्रकार इकडे होत आहे तों तिकडे **वसुभद्राचार्या**च्या चाकरानें घरांत शिरून आपणामागें दाराला कडी लावून घेतली.

त्यावेळीं चांदणें पिठासारखें शुभ्र पडलें होतें, यामुळें दोन्ही पक्षांकडील लोकांस एकमेकांची हालचाल जरा झाली कीं ती लागलीच समजण्यास अडचण पडत नसे. **शिलादित्या**नें एक वेळ चोंहोकडे नजर फेंकिल्याबरोबर शत्रूनीं आपणास चोंहोंकडून वेढिलें आहे असें त्याच्या लक्षांत आलें. तथापि तो जात्या धिराचा व निश्चयी होता यामुळें त्याला आपणा स्वतःबद्दल यत्किंचितही धास्ती वाटली नाहीं, तरी पण त्याच्या बरोबर **त्रिवेणी** होती तिच्याबद्दल मात्र त्याचें हृदय धागधुग करूं लागलें. अशा प्रसंगीं पुढें काय करावें याविषयीं तो विचार करितो आहे, इतक्यांत मागून **वसुभद्राचार्या**नें मोठ्यानें ओरडून त्यांस डाव्या अंगाच्या वाटेनें वळण्यास सांगितलें, आणि आपणही त्या वाटेनें वळला. **शिलादित्या**नें **त्रिवेणी** पुढें घोड्यावर बसली होती तिला आपल्या डाव्या हातानें बळकट संभाळून

धरिलें, व तरवारउपसून आणि आणीनें टोंचून घोडचास इशारत करून आपणही **वसुभद्राचार्या**चे मागोमाग भरधांव जाऊं लागला. इकडे कोतवालाकडील लोकांनीं मोठमोठचा आरोळ्या ठोंकूं लागून त्यांस अडवून धरण्याकरितां चोहींकडून यत्न करण्यास आरंभ केला. **भद्रमणी**च्या तबेल्यांतील एका चपल जनावरावर स्वतः कोतवाल बसला असून त्याच्या शिपायांनींही तेयलेच घोडे पटकाविले होते, व असे सर्वजण मिळून वेगानें उजव्या बाजूकडून घोडे भरधांव फेंकीत आले. त्यांच्या व **मणिचसतरु** गांवाची वाट ज्या वेशीखालून जात असे त्या वेशीच्या दरम्यान पुष्कळ हत्यारबंद शिपाई पायींच नाकीं धरून उभे होते. मागच्या बाजूनें शिपायांच्या आरोळ्या चालूच होत्या, व पुढच्या अंगानें हातांत भाले घेतलेले असे कित्येक शिपाई रस्ता रोंखून उभे होते. असो; याप्रमाणें हीं चौघें माणसें चोंहींकडून वेढिलीं जाऊन इतक्या लोकांच्या हातून तीं निसटून जाणेंच अशक्य आहे असें वाटूं लागून शत्रूकडील शिपाई मोठचा जोराजोरानें आरोळ्या ठोंकू लागले. तथापि त्यांना यत्किंचित्ही न भितां आमच्या दुहेरी घोडे स्वारांनीं वेशीचीच वाट रोंखिली. त्या वेळीं वेशीबाहेर कांहीं कारणानें दुसरीकडे धराधरी करण्याकरितां पाठविलेले लोक नुकतेच परत आले होते, व त्यांच्याकरितां वेशीचा दरवाजा उघडलेला अद्यापि लागला नव्हता, हें पाहून त्यांनीं तडक वेशीजवळच्या लोकांच्या अंगावर चाल केली, त्याबरोबर तेही लोक पुढें सरसावून उभयपक्षांची एकदम मारामारी जुंपली. याप्रमाणें मारामारी जुंपली असतां शत्रूकडील एका शिपायानें **त्रिवेणी**वर वार करण्याकरितां हात हुगारला. तो वार लागला असता तर **त्रिवेणी** तत्काळ प्राणासच मुकती, परंतु सुदैवानें **शिलादित्या**नें त्वरा करून तो घाव अंगावर पडण्याच्या पूर्वीच तो करणाऱ्या शिपायास तरवारीनें भोंसकून खालीं पाडिलें. हा प्रकार होतो न होतो इतक्यांत बरचीवाल्या शिपायांतून एक जण त्वरेनें पुढें येऊन त्यानें बरचीस आंकडा होता त्याचे योगानें त्याच्या घोडचाचा लगाम अडंकवून ओढून धरण्याचा यत्न केला, परतु **शिलादित्या**नें **त्रिवेणी**स संभाळून त्या बरचीवाल्यावर असा कांहीं वार केला कीं त्याच्या योगानें बरचीची काठी अर्ध्या ठिकाणींच तुटून अवसानाचा एकदम घात झालासा होऊन तो बरचीवाला तोंडावरच खालीं पडला, व त्याच्या तोंडांतून भळभळां रक्त वाहूं लागले. असो. याप्रमाणें या लोकांच्या हातून आपली सुटका करून घेतल्यावर **शिलादित्य** त्याच झटेनें पुढें निघून जाणार, इतक्यांत दुसरीकडे **वसुभद्राचार्या**स दोघां शिपायांनीं अडविलें असून ते त्याला घोडचावरून खालीं ओढीत आहेत, वयामुळें त्याजवर प्राणसंकट गुजरलें आहे, असें पाहून तो त्याजकडे घोडा भरधांव उडवीत गेला, आणि मोठचा कुशलतेनें व नेमानें त्या शिपायांवर हल्ला करून त्यानें त्यांस ताबडतोब पळावयास लाविलें. याप्रमाणें प्रकार झाला तेव्हां मात्र आमच्या या चार दुहेरी स्वारांस पळून जाण्यास कोणच्याही प्रकारची अडचण न राहतां त्यांनीं खुशाल भरधांव मार्गक्रमण करण्यास आरंभ केला.

हा प्रकार चालू असतां कोतवाल मागाहून येत होता त्यांच्या दृष्टीस तो पडून तो अतिशय संतापून जाऊन त्यानें आपल्या शिपायांस शिव्या देण्यास व धमकी देण्यास आरंभ केला, व अखेर या चौघा चोरांस पकडल्याशिवाय

आज विश्रांति ह्मणून घ्यावयाची नाहीं ह्मणून शपथा वाहून त्यानें त्यांचा पाठलाग करण्याविषयीं आपल्या बरोबरच्या स्वारांस हुकूम केला, व तें सर्वजण या चौघांच्या पाठीस लागले. इकडे **वसुभद्राचार्य, शिलादित्य** वगैरे चौघेजण वेशींतून पार पडून पुढें कांहीं अंतरावर गेल्यावर **वसुभद्राचार्यास** त्या प्रदेशाची पूर्ण माहिती होती यास्तव तो पुढें झाला, व सुमारें दोनशें तीनशें पावलें पुढें गेल्यावर, त्यानें एकदम एका बाजूला ओढ्याच्या पात्रावरून एक लहानसें सांकव होतें त्यावरून पलीकडच्या बाजूस जाऊन पलीकडे उघड्या मैदानांत घोडा फेंकिला, व **शिलादित्या**नेंही त्याच्या मागून आपला घोडा भरधांव काढिला. हा वेळपर्यंत **त्रिवेणी**नें तोंडांतून एक चकारशब्द सुद्धां काढिला नव्हता. आपण सांप्रत कोणच्या संकटांत आहों याची तिला शुद्ध नव्हती असा जरी प्रकार नव्हता, तरी मनाचा मोठा धीर करून प्रत्यक्ष आपणावर वार होत असतांही ती शांत राहिली, व पुढें मात्र तात्कालिक संकटांतून आपण मुक्त झालों अशी जेव्हा तिची खात्री झाली तेव्हां **शिलादित्या**चे आपणावर उपकार मोठे झाले अशा अर्थाचे कांहीं शब्द तिच्या तोंडांतून बाहेर पडले.

तिचें भाषण ऐकून **शिलादित्य** बोलतो:—"या असल्या कठीण प्रसंगींही तुझें हें धैर्याचें वर्तन पाहून हल्लींच्या या भयंकर प्रसंगाचें खरें स्वरूप तुजपासून चोरून ठेवणें हें मला योग्य वाटत नाहीं. आपल्या शत्रूंनीं आपली अगदीं लगट केली असून त्यांचे घोडेही दमदार आहेत, याकरितां कांहीं तशीच युक्ति करून त्याच्या हातून निसटण्याची तजवीज झाली नाहीं, तर यांचे पुढें आपला निभाव लागेलच अशी खातरी बाळगतां येत नाहीं."

इतक्यांत **वसुभद्राचार्य** संशययुक्त मुद्रेनें मागें वळून पाहून ओरडला:—"ते पहा! अगदीं एका हांकेच्या अंतरावर इतके जवळ येऊन ठेपले आहेत. ते **भद्रमणी**च्या अतिशय चपल घोड्यांवर बसले असून खुद्द कोतवालही हजार वाटेनें तुझ्या आवडत्या घोडीवरच बसून दवडत आहेसें मला वाटतें!"

"काय? काय? माझ्या **जयंती**वर कोतवाल बसला आहे ह्मणतां?" **त्रिवेणी** घाबरून बोलते:—"हायहाय! हें जर खरें असेल तर आपला घात खचित होणार! या सगळ्या **पुनर्मल्लीं**त माझ्या जयंतीला जोड नाहीं ह्मणून बाबा नेहमी सांगत असतात!"

हे शब्द ऐकून **शिलादित्य** हळूच सांकेतिकपणें तिला बोलतो:—"कांहीं चिंता नाहीं! तूं भिऊं नको! तिजवर बसलेला तो कोतवाल तिच्यासुद्धां एकटाच जर पुढें येईल, तर त्याचें तत्क्षणींच कांडात काढीन! काळजी करूं नको!"

कर्मधर्मसंयोगें, **शिलादित्या**च्या मनांत ज्यावेळीं ही कल्पना आली, त्याच वेळीं कोतवालाच्याही मनांत तीच कल्पना आली. नुकताच **शिलादित्या**वर आपल्या शिपायांनीं हल्ला केला असतां त्यानें मोठ्या शौर्यानें त्यांचा पराभव केला ही गोष्ट त्याच्या दुरून दृष्टीस पडली असल्यामुळें असल्या प्रचंड योद्ध्यावर एकटेंच तुटून पडणें हें त्याचें त्यालाच साहस वाटूं लागलें; व तो ज्या जनावरावर बसला होता तें जनावर अतिशय चपळ व उमदें जवान असल्यामुळें कदाचित् फार वेळ न लागतां तें आपणावर भयंकर प्राणनाशाचा प्रसंगही आणून घालण्याला चुकावयाचें नाहीं अशी त्याची

खातरी होऊन, त्यानें अगोदरच शहाणपणाने ट्या घोडीवरून उतरून आपणास आवरण्याजो ग्या अशा दुसऱ्या घोडयावर बसण्याचा विचार केला, व तदनुरूप त्यानें आपल्या एका शिपा यास जवळ बोलावून त्याच्या आणि आपल्य घोडयांची अदलाबदल केली. यामुळें जो कांहीं वेळ व्यर्थ गेला तो आमच्या या चौघांजणांस चांगलाच साह्यकारी होऊन तितक्या अवकाशां त त्यांना आपल्या शत्रूंपासून बरेंच दूर जाण्यास सांपडलें. इतक्या अवकाशात ते लांबच्या एका अरुंद वाटेस लागून त्या वाटेला वळसा घेऊन पलीकडे नदी होती तिच्या खडकाळ दरडीच्या बाजूपर्यंत येऊन पोंचले होते. पुढें त्या दरडीच्या बाजूनेंच नागमोडीसारखी एक अरुंद वाट होती त्या वाटेनें सुमारें पावकोस गेल्यावर त्यांना एक भोंवरीच्या वेलांचें बेट लागलें. त्या ठिकाणीं आल्यावर **वसुभद्राचार्या**नें त्यांस या ठिकाणीं पाण्याचा उतार आहे म्हणून सांगितलें.

इतकें झाल्यावर **वसुभद्राचार्य** व **शिलादित्य** यांनीं आपले घोडे पाण्यांत घातले, व त्या प्रवाहांतून पार जात असतां पुढें पुढें पाणी वेगानें वाहत जात असून तें घोडयांच्या पोटापेक्षांही अंमळ वर इतकें चढलें. इतक्यांत ज्या दरडीवरून ते नुकतेच खालीं उतरले होते त्या दरडीवरून घोडयाच्या फुरफुरण्याचा आवाज ऐकूं आला, तेव्हां **त्रिवेणी** मागें वळून पहातें तों तिचीच आवडती **जयंती** घोडी त्या उंच दरडीवर असलेली तिच्या दृष्टीस पडली. ज्या वेळीं कोतवालानें **जयंती**वरून खालीं उतरून आपल्या शिपायास तीवर बसण्यास सांगितलें त्यावेळींच त्यानें मनांत तर्क केल्याप्रमाणें, तो शिपाई आपल्या बरोबरच्या सर्व सोबत्यांस मागें टाकून बराच पुढें आला होता, व त्यानें घोडी या उंच दरडीवर आणून उभी केली याचें कारण त्याचा विचार त्या जागेवरून **शिलादि**त्याच्या अंगावर गोंफणीचा धोंडा नेमून मारण्याचा होता. त्यानें त्याप्रमाणें धोंडा मारला, परंतु त्यापासून **शिलादित्यास** यत्किंचित्ही इजा न होतां तो बाजूनें एका हाताच्या अंतरावरून जाऊन पुढें पाण्यांत पडला. परंतु तिकडे गोंफण फेंकल्याच्या योगानें त्या बिचाऱ्या शिपायास मात्र विनाकारण प्राणसंकटांत पडावें लागलें. गोंफण शिपायाच्या हातून सुटली त्या वेळीं धोंडयाचा जो मोठयानें गुंगू असा आवाज झाला तो कानीं पडताच **जयंती** एकदम दचकल्यासारखी होऊन तिनें आपणावर बसलेल्या स्वारासुद्धां पाण्यांत उडी घेतली, आणि त्या स्वारास पाण्यांत पाडून आपण पलीकडच्या तीराकडे पोंहत जाऊं लागली. इकडे तो बिचारा शिपाई पाण्याच्या जोरानें खालीं वहात जाऊन त्यानें एक दोन बुंचकळ्या खाल्ल्या व लगेच राम म्हटलें. **जयंती** जी पलीकडे पोंहत गेली ती **शिलादित्य** व **वसुभद्राचार्य** याचे घोडे कांठास जाऊन पोंहचत आहेत तोंच. आपणही तेथें जाऊन पोंहचली, व आपल्या धनिणीचा आवाज ऐकिल्यावरोबर जागचे जागींच उभी राहिली. तेव्हां **वसुभद्राचार्या**नें किंचित् ओणवें होऊन तिचा लगाम पकडला, व **त्रिवेणी**नें हिजवर बसूनच तुमच्या बरोबर येतां येण्यापुरता माझ्या अंगांत दम आहे असें सांगितलें. **शिलादित्या**सही ही व्यवस्था झाली असतां तिच्या सुरक्षितपणास बरी असें वाटलें, व शिवाय तसल्या अवघड प्रसंगीं **जयंती** अकल्पित रीतीनें आपल्या मदतीस आली हा भगवान् **अर्हंता**चा आपणावर अनुग्रहच सम-

जला पाहिजे असेंही त्यास वाटलें. आणि त्यानें बेतानें त्रिवेणीस खालीं उतरून व जयंतीच्या पाठीवरचें खोगीर पाण्यानें अगदीं भिजलें होतें तें तसल्या घाईच्या प्रसंगीं जितकें पिळतां आलें तितकें पिळून त्रिवेणीला हात देऊन घोडीवर चढाविलें, आणि मग आपणही परत आपल्या घोड्यावर चढून बसला.

हा प्रकार नदीच्या या अंगाला चालूच होता, तों तिकडे कोतवाल व त्याचे शिपाई यांनीं नदींत आपले घोडे घालून नदी उतरण्यास आरंभ केला होता. जयंतीनें पाण्यांत उडी घातल्यामुळें त्या बिचाऱ्या शिपायाचा नाश झाला ही गोष्ट कोतवालानें दुरून पाहिली होती, व जरी तो इतर शिपायांशीं त्याबद्दल बोलत असतां आपणास फार वाईट वाटलें असेंच बाह्यात्कारीं बोलून दाखवीत होता, तरी आपण शहाणपणा करून आपणावर येणारें मरण दूरदृष्टीच्या योगानें टाळलें याबद्दल तो मनांतल्या मनांत आपल्यास शाबासकी देत होता. इतक्यांत पहातो तों त्या शिपायावर आलेला अपघात आपल्या शत्रूंच्या पथ्यावर पडला, तेव्हां मात्र ताबडतोब त्याचा तो आनंद कोणाच्या कोणीकडेच जिरून गेला.

तो आश्चर्यमुद्राकरून बोलला:— " काय द्वाड जनावर पहा! तिला तबेल्यांतून आणण्याची बुद्धि खचित कोणी ब्रह्मराक्षसानें माझ्या मनांत भरवून दिली! अरे अरे! ही द्वाड घोडी— हीच जर मरून जाती आणि तो बिचारा दक्षवर जगला असता, तर नसतें बरें झालें ! ही घोडीच मेली असती तर मग पाहिली असती ती भद्रमणीची पोरगी माझ्या हातांतून कशी निघून जाती ती ! बरें असो; झालें तें झालें ! आतां तरी दो दुष्ट जती जरठकर्ण आणखी तो कोण मराठी बाण्याचा शिपाई— त्याचें नांव मला ठाऊक नाहीं—हे दोघे जर सांपडतील तर दोघांनाही पण उद्यां सकाळीं सुळावर चढविल्याशिवाय तोंडसुद्धां धुवायचा नाही ! तो मराठा चोर त्या जतीला पळवून लावतो आहे ! ठीक ठीक ! काय चिंता आहे, पाहून घेईन ! "

या प्रकारें व अशाच दुसऱ्या प्रकारें चडफडत चडफडत व शिव्या देत देत, तो आलीकडल्या कांठास येऊन पोंचला. परंतु तो त्या ठिकाणीं येऊन पोंचण्याच्या पूर्वी बराच वेळ शिलादित्य वगैरे चौघेजणें त्यास दिसेनाशीं झालीं होतीं. नंतर तो नदीच्या बाजूच्या दरडीवर चढला, तेव्हां पुढें बऱ्याच अंतरावर एक जंगल असून चोंहीकडे चांदणें पडलें होतें त्यांतून तीं सर्वजण भरधांव दौडत असतांना त्याच्या दृष्टीस पडलीं; त्याबरोबर त्याचा खचलेला धीर परत येऊन तो मोठ्या आवेशानें शिपायांस " चला चला लौकर ! " म्हणून ओरडून हुकूम करून आपण घोडा उडवीत पुढें निघाला.

तिकडे आपली आवडती घोडी अकस्मात् आपणास मिळाली, तेव्हां प्रभु अर्हन् आपला पाठीराखा खचित आहे असें त्रिवेणीस वाटून तिलाही ताबडतोड हुशारी आली, व ती आपली घोडी मोठ्या हिंमतीनें उडवीत उडवीतच चालली. तिच्या बरोबर शिलादित्य आपला घोडा चालवीत असून तो वारंवार चिंतातुरपणें मागें वळून शत्रु अजून किती मागें राहिले आहेत हें पाही, तथापि त्यानें भीतीचा किंवा कशाचा उद्गार म्हणून तोंडांतून बिलकूल काढिला नाहीं. वास्तविक पाहिलें तर बहुतेक पळण्यास आरंभ केल्यापासून आतांची वेळपर्यंत त्याची नेहमींची गंभीर व मौनपणाची वृत्ति काय-

मच होती असें झटल्यास चिंता नाहीं; कारण **वसुभद्राचार्य** आपणास घेऊन जातो आहे खरा पण तो कोठें हेंही त्यानें त्यास विचारिलें नाहीं, किंवा अमुक ठिकाणीं "या वाटेनें नको या वाटेनें जाऊं" असें देखील तो एकदा सुद्धां बोलला नाहीं. मधून मधून **वसुभद्राचार्य** त्याला इकडचे तिकडचे प्रश्न करी, पण त्यांना देखील "हूं", किंवा "हं" किंवा "होय, नाहीं" यां-च्या पलीकडे झणून फारसें कांहीं त्याच्या तोंडांतून निघालें नाहीं. एकंदरींत त्याची त्या वेळची ती वृत्ति पाहिली असतां कोणासही असें वाट-ल्यावाचून राहिलें नसत कीं, ह्या गृहस्थाला जिवाची किंवा कशाचीही परवा नाहीं, एवढेंच नव्हे, तर तो आपल्या स्वतःच्याही कृती-चा मालक नसून कोण्या तरी अचिंत्य अदृश्य शक्तीच्या ताब्यांत असून ती नेईल तिकडे तो मुकाटचानें चालला आहे !

असो; हा ह्या वेळचा प्रकार झाला, एवढ्या-वरून तो नेहमीं असा मौन धरूनच असे असा प्रकार बिलकुल नव्हता. प्रस्तुतचा प्रसंग प्राप्त न होतां दुसऱ्या एकाद्या वेळीं जर तो या प्रदेशांत आला असता, तर आपल्या आसपासचे ते उंच सखल प्रदेश, त्यांमधून निरनिराळ्या झाडांचीं वेटींचीं वेटें लागून गेलेलीं, अरण्यांत-ल्या त्या एकीमेकींत गुंतागुंत झालेल्या अशा नानाविध लता, व त्या वृक्षांच्या ढोलींतून व लतादिकांच्या अवकाशांतून संतत चालू असलेले विहगवृंदांचे ते नानाविध मधुर ध्वनि इत्यादिक प्रकार पाहून त्याचें अंतःकरण रममाण झालें नसतें असें नाहीं; परंतु प्रस्तुतचा तो प्रसंग, व तत्साहचर्यें करून त्याच्या हृदयांत ज्या कांहीं एका गोष्टीबद्दलचा विचार घोळत होता त्या गोष्ट, या दोहोंच्या मिश्रणानें त्याची वृत्ति कांहीं उदासवाणी, कांहीं गंभीर, कांहीं मौन-पणाची, अशी त्रिविध झाली होती, व त्यामुळें ज्या प्रदेशांतून तीं सर्वजण चाललीं होतीं, त्याचें सौंदर्य पहाण्याचें त्याच्या गांवींही नव्हतें !

अस्तु. आतांसांगितल्या प्रकारचा तो रमणीय प्रदेश भगवान् अमृतरश्मीच्या किरणजालाच्या योगानें विशेष रमणीय भासणें साहजिक. अस-तांही, त्यापासून **शिलादित्या**च्या चित्तवृत्तींत यद्यपि एवढा देखील फरक पडला नाहीं, तथापि त्याच्या तिघां सोबत्यांच्या चितवृत्तींवर त्या प्रदे-शाच्या दर्शनाचा परिणाम व्हावयाचा राहिला नाहीं. विशेषतः **त्रिवेणी**च्या अंतःकरणवृत्तीवर त्याच्या दर्शनाचा अनुकूल परिणाम होऊन, व त्या वेळीं आसपास बहुतेक सर्व ठिकाणीं शांततेचाच संचार झालेला पाहून, क्षणमात्र सांप्रत आपण कोणच्या संकटांत आहों हें ही ती विसरून गेली. त्या वेळीं वायु मंद व सुगंध-मिश्रित असा वहात असल्यामुळें तिच्या चि-त्तास शांतता येऊन ती त्या वेळच्या सुखाति-शयाच्या भरांत आपल्या आसपासचा प्रदेश, त्याचा विस्तार, व समोर क्षितिजाजवळच्या अस्पष्ट पर्व-तादिकांवर अवलंबमान अशा मेघमाला, यांज-याजकडे पहाण्यांतच चूर होऊन गेली. इतक्यांत मागाहून कोतवालाच्या बरोबरच्या लोकांची आरोळी ऐकून ती दचकून एकदम सावध झाली, व किंचित् मागें वळून आपल्या हरिणीप्रमाणें कातर नेत्रांनीं पहात तीं ज्या नदीच्या दरडीजवळून आपण थोड्याच वेळा-पूर्वी निघालों होतों, त्याच्या अंमळ आली-कडे कोतवाल व त्याचे शिपाई हे आपणा-मागें लागून घोडे उडवीत येतांना तिच्या दृष्टीस पडले. व त्या वेळचा त्यांच्या घोड्यांचा वेग पाहून ते आपणास गांठूं शकतील असेंही

तिला वाटून ती आपल्या **जयंती**स अंमळ अधिक वेगानें चालण्याची इशारत करणार, इतक्यांत **वसुभद्राचार्या**नें तिनें तसें न करावें एतदर्थ तिच्या घोडीचा लगाम हातानें ओढून धरून, तिला झटलें:—"**त्रिवेणी** ! आपण चढतों आहों या टेंकडीच्या माथ्यावर जाऊन पोंचेपर्यंत **जयंती** आतां चालते आहे अशीच चालूं दे! आतां आपणाला कांहीं येथून फारसें लांब जायचें नाहीं !"

"कसें झटलें ?" **त्रिवेणी** विचारितेः—"तर मग आपणाला जायचें आहे कुठपर्यंत?"

तो उत्तर करितोः—"तें आता इतक्यांतच तुझ्या दृष्टीस पडेल."

याप्रमाणें बोलणें झाल्यावर तीं सर्वजण कांहीं वेळानें टेंकडीच्या माथ्यावर येऊन पोंचलीं, तेव्हां तिच्या पलीकडे खालीं खिंडींत समोंवतून बहुतेक लहान लहान टेंकड्यांच्याच रांगा असून मध्यंतरीं सांचलेल्या पाण्याचा निकाल होऊन जाण्याची चांगलीशी सोय नसल्यामुळें बरीच लांब रुंद अशी दलदलीची जमीन होती तिजकडे बोट दाखवून **वसुभद्राचार्य** तिला सांगतोः—"हें पहा, आपणाला त्या तेथें जावयाचें आहे."

त्रिवेणीच्या बापाचा कोणी आप्त **पुनमल्ली**पासून दहा वारा कोशांवर **चतुर्मषी** नांवाच्या एका लहानशा खेडेगांवांत रहात असे, त्या ठिकाणीं **त्रिवेणी** बापाबरोबर यापूर्वी दोन चार वेळां आली गेली होती, व त्या गांवचा रस्ताही या दलदलीच्या बाजूनेंच असल्यामुळें ही दलदल **त्रिवेणी**ला पूर्वीपासूनच ठाऊक होती. यामुळें तिला **वसुभद्राचार्या**च्या भाषणाचें आश्चर्य वाटून ती बोललीः—"**वसुभद्राचार्य**! मला फसवून संकटांत पाडणें ही गोष्ट तुमच्या हातून कालत्रयींही होणार नाहीं अशी माझ्या जिवाची खात्री आहे तेवढी नसती, तर खचित यावेळीं तुम्हीं कांहीं तरी सांगून मला फसवूं पहात आहां, किंवा माझी उगीच थट्टा करीत आहां, असें मला वाटल्यावांचून कदापि राहिलें नसतें. यासाठीं तुम्हांला विचारितें, खरेंच सांगा, तुम्हीं बोट दाखविलें ती **चांडमुंडी**ची दलदल, जिच्यामध्यें सांपडल्यामुळें आजपर्यंत हजारों लोक प्राणांस मुकले आहेत, तीच ही नव्हे का ?"

वसुभद्राचार्य शांतपणें उत्तर करितोः—"**त्रिवेणी**! मी तुला फसवीन किंवा तुझी थट्टा करीन ही गोष्ट तूं कालत्रयीं देखील मनांत आणूं नको ! मी खरेंच सांगतों, आपण आतां **चांडमुंडी**च्या दलदलींतूनच जाणार!"

हें त्याचें भाषण ऐकून **त्रिवेणी** किंचित् उपरोधवाणीनें त्यास बोलतेः—"वाहवा ! एकून जर आपणाला या दलदलींतून जायचें, तर अगोदर या खालच्या जमिनीचीच आपोआप घट्ट होऊन आम्हांला वाट दाखविण्याविषयीं प्रार्थना केली पाहिजे असें मला वाटतें !"

वसुभद्राचार्य उत्तर करितोः—"माझ्यावर विश्वास ठेव, मी तुला सुरक्षित पार पाडून नेईन."

त्रिवेणी बोलतेः—"हें कांहीं बाई माझ्या हातून व्हायचें नाहीं. या दलदलींत शिरून प्राणांस मुकण्याची पाळी आणण्यापेक्षां मला त्या कोतवालाच्याच ताब्यांत जायचें पडलें तरी तें मला पत्करेल."

इतक्यांत हा इतका भाषणाचा प्रकार ऐकून **शिलादित्य वसुभद्राचार्या**स दरडावल्यासारख्या शब्दानें विचारितोः—"काय हो, कसें—कसें झटलेंत ? आम्हां सर्वांना तुम्हीं नवीन संकटांत घालूं पहात आहां याचा अर्थ काय ? **त्रिवेणी**चें

ह्मणणें मला खरें वाटतें, व मला स्वतःलाही असल्या दलदलींचा अनेक प्रसंगीं अनुभव आला आहे, यावरून खचित तुम्हीं करितां आहां हा वेडेपणा किंवा साहस आहे असेंच मला वाटतें."

शिलादित्याचे हे शब्द ऐकून **वसुभद्राचार्य** रागावल्यासारख्या वाणीनें बोलतोः–तुला-ला त्याची काळजी ? मी करितों आहे, यांत प्राणनाश होण्याची वेळ येणार, असली, तर ती माझ्यावर अगोदर येईल, कारण यावेळीं मीच आपला स्वतःचा घोडा सर्वांच्या पुढें काढणार आहें. तुह्मांला या दलदलीचें भय वाटतें हें मला कबूल आहे; तथापि तुमचा बचाव ह्हायला पाहिजे असला तर तो या दलदलीच्याच योगानें होऊं शकेल, एरवीं नाहीं. या दलदलींतून पार निघून जाण्याची एक आडवाट मला ठाऊक आहे, तिनें तुह्मीं माझ्या मागून मुकाटयानें आपले घोडे जपून चालवा ह्मणजे झालें. जरा का घाई किंवा कांहीं कराल, तर घोडयाचा पाय भलतीकडे निसटून जाऊन निःसंशय प्राणास मुकाल. कोसवाल आणि त्याचे शिपाई आपल्या मागं लागून या दलदलींत शिरतील, तर त्यांचे प्राण गेल्याखेरीज कदापि रहावयाचे नाहींत हें तुह्मीं पक्कें समजा. तुह्मांला पाहिजे असेल तर तुह्मीं खुद **त्रिवेणी**लाच विचारा कीं मी उगीच कांहीं तरी वेडेपणा करून तिचा जीव धोक्यांत घालीन कीं नाहीं घालणार !–तुह्मांला मी खात्रीनें सांगतों कीं तुमचा या लोकांपासून बचाव होण्याची मी सांगितली हीच काय ती एक युक्ति आहे."

हें भाषण ऐकून **जरठकर्ण** जती बोलतोः– "**वसुभद्राचार्य** बोलतात हेंच खरें, ते ह्मणतात ती वाट मींही ऐकिली आहे; आणखी जर त्यांना ती वाट चांगली माहित असून ते आपणाला संभाळून घेऊन जातील तर आपण शत्रूंच्या बापाच्याही हातीं ह्मणून सांपडावयाचे नाहीं !"

जतीचे हे शब्द ऐकून **त्रिवेणी वसुभद्राचार्या**स ह्मणालीः–"रागावूं नका. तुमच्या बोलण्याचा अर्थ मला बरोबर कळला नाहीं त्यामुळें मला हा संशय आला होता. असो; आतां त्याचा कांहीं विचार नको, आतां तुह्मीं मला न्याल तिकडे तुमच्या मागून येण्याला मी तयार आहें."

"ठीक आहे. चला असे या वाटेनें चला!" असें **वसुभद्राचार्य** बोलल्यावर तीं सर्वजण उतरणीवर घोडे फेंकीत पुढें चालून जातां जातां टेंकडीच्या पायथ्याशीं नदीच्या कांठीं आलीं. वस्तुतः पहातां **जयंती**नें नदींत उडी घेतली ती नदी आणि ही नदी एकच, असून या टेंकडीच्या खालीं उतरून आल्यावर ही नदी परत उतरून जाणें भाग पडत असे. याचें कारण पलीकडच्या बाजूस अतिशय दाट व दुर्गम असें रान लागून गेलें होतें, व त्यामुळें घोडयावरून प्रवास करणाऱ्या लोकांस दोन वेळां नदी उतरून जाणें हेंच विशेष सोईचें वाटण्याजोगें होतें. असो. टेंकडीखालीं उतरल्यावर 'आमच्या चौघां प्रवाशांनीं आपले घोडे पुनरपि नदींत घातले; व ते नदी उतरून एकदा पार गेले असतें, ह्मणजे वर सांगितलेल्या दलदलीच्या अगदीं कांठासच्च ते येऊन पोंचले असते. परंतु पलीकडच्या कांठीं जाऊन पोंचण्यास सारा दोन चार हातांचा अवकाश राहिला होता, इतक्यांत कर्मधर्मसंयोग **जयंती**चें पाऊल नदींतील एका शेवाळलेल्या धोंडयावरून घसरलें, व त्यायोगें **त्रिवेणी**स एकदम धक्का पोंचून ती खालती नदींत पडली.

धक्का दिल्याबद्दल माझी माफी मागण्याकरितां ते असें बोलले याबद्दल माझ्या मनांत काडी-मात्र शंका राहिली नाहीं; कारण ते तसें न बोलतें, बर कदाचित् झालेला प्रकार मी आपल्या धनिनीशीं बोलेन याचें त्यांना भय होतें. आतां खुद्द माझ्याच संबंधानें पाहिलें, तर ही गोष्ट खरी असूनही **ताराबाई**सारख्या स्वभावाच्या आपल्या धनिनीपुढें मला ती काढण्यास पंचाईतच होती. कारण जरी मनाचा मोठा धीर करून मीं ही गोष्ट तिजजवळ बोललें असतें, तर तिनें मला शाबासकी द्यायची गोष्ट तर एका आंगासच राहती, पण मलांच तसली गोष्ट हवी म्हणून मीच होऊन बुध्या **जानराव**च्या जवळ गेलें म्हणून तिनें माझा उलटा धिंडवडा काढायलाही कमी केलें नसतें !

असो. इतका प्रकार झाल्यावर **जानरावां**नीं स्नान केलें, व त्यांनीं थोडीं आचमनें घेतल्यानंतर जेवायची तयारी झाली. एका अंगाला भिंतीला लागूनच दोन पाट मांडिले होते, त्यांवर **संभाजीराव** व **जानराव** हे दोघे जेवायला बसले, व दुसऱ्या अंगाला एका पाटावर **ताराबाई** फतकुली घालून जेवायला बसली; व सैपाकघरांत मुलांना जेवायला घालीत बसण्यापुरती जागा नव्हती, यामुळें निरुपायास्तव मीही **ताराबाई**जवळच कोपऱ्यांत मुलांना जेवूं घालीत बसलें. जेवतां जेवतां आरंभीं कांहीं वेळ तिघांच्या इकडच्या तिकडच्या गोष्टी चालल्या, व पुढें जीं भाषणें झालीं त्यांपैकीं माझ्या कथानकाला पुढील भाग उपयोगी आहे याकरितां तेवढाच सांगतें.

"थांबा अं"–**संभाजीराव** बोलतातः–"कसें कसें बरें ? तुमची आमची गांठ पड-ल्याला आठ नऊ वर्षांवर वर्षें होऊन गेलीं, पण त्या वेळीं तुमचें नशिबि इतकें उदयाला येईल हें तुमच्या स्वमींही पण नव्हतें !"

"नव्हतें खरेंच ! आणखी खरें पाहिलें तर कसें बरें असावें? कारण **महाराज सरकारां**कडून तो गांव जप्त झालेला **भीमरावजीं**च्या नांवानें मूळ सुटला. आणखी तोही त्यांच्या मागें त्यांच्या औरस संततीलाच चालू असावा, म्हणून मूळच्या सनदेंत लेख होता. तेव्हां अर्थातूच आमची डाळ शिजायचा कांहीं संभव नव्हता. तथापि कर्मधर्मसंयोग, **भीमरावजी** तर निपुत्रिकच मरण पावले, आणि **महाराजसरकारची** स्वारी **गंगादर्शना**करितां **माहुलीस** गेली असतां त्या ठिकाणीं **महाराजां**चें दर्शन होऊन प्रत्यक्ष भेटीचाही योगायोग अकल्पित घडून आला. तेव्हां सहज ही गोष्ट त्यांच्या कानावर घातली, तेव्हां त्यांनीं ठीक आहे, '**पुण्यास श्रीमंतां**कडे आज्ञापत्र पाठवितों' म्हणून अभिवचन दिलें; व **पुण्या**च्या दरबारांतही माझी थोडी पत होती यामुळें **भीमरावजीं**चा गांव माझ्या नांवें सुटण्याचा हुकूम झाला. हा हुकूम अजून माझ्या हातीं पडला नाहीं, पण लौकरच पडेल असा अजमास आहे. त्याप्रमाणें लौकरच जमलें, तर तोंपर्यंत रजाही संपते आहे, परत नोकरीवर रुजू होऊन तनख्याचे पैसे हातीं पडले कीं लागलीच राजीनामा देऊन मोकळें होण्याचें मीं मनांत आणिलें आहे. पहावें पुढें कसें काय होतें तें !"

"असो; तें होईल म्हणा, त्याला कांहीं आतां अडचण उरली आहेसें मला वाटत नाहीं. पण कसें काय हो ? तुम्हांला कसें वाटतें **भीमराव**जी अपघातानें मेले का त्यांनीं आत्महत्या केली?" **संभाजीरावां**नीं विचारिलें.

"ते अपघातानें मेले यांत संशय नाहींच ! कारण आत्महत्या त्यांनीं करण्याला त्यांना हेतु कांहीं दिसत नाहीं."

"नसेल. पण एकूण तुमची अशीही पण खातरी आहे झणा कीं, त्यांना कोणी बुद्धया दुष्टाव्यानें पार करून टाकिलें नाहीं ? बरें पण अशा प्रकारचा कोणाला संशय तरी आला होता ?"

जानराव उत्तर करितातः—"छत् ! तसा बिलकुल प्रकार झाला नाहीं. त्यांच्या मृत्यूबद्दल पंचनामा व्हायचा त्या रीतीनें झाला. पण तुम्हीं झणतां अशांतला संशय कोणालाही आला नाहीं. पण त्याचें कारण पहा अगोदर तें प्रेत भुंइजेस लागलेलें सांपडलें, त्यावेळींच तें अगदीं कुजून गेलें होतें व अर्धें मुर्धें माशांनीं खाऊनही टाकिलें होतें. यामुळें तें अगोदर कोणाला ओळखलेंच नाहीं, परंतु त्यांच्या कंबरेला कांचा आवळून बांधिला होता, व त्याचे अंत ते आपल्या पातळपानी तरवारीची गुंडाळी करून नेहमीं बांधून ठेवीत असत, ती शोध करितां अकस्मात दृष्टीस पडली. तेव्हां तिच्यावर त्यांचें नांव खोदलेलें होतें त्यावरून मग पुढें ओळख पटली कीं हे गृहस्थ अमके. ती तरवार जर न सांपडती तर सगळीच पंचाईत झाली असती."

ह्यावर **संभाजीराव** बोलले:—"ही गोष्ट आम्हांलाही पहिल्यानें ठाऊक नव्हती, पण गेल्या भाद्रपद मासांत **ओझर्डे, धोम** वगैरे ठिकाणीं द्वारें करण्याकरितां लोक गेले होते, ते परत आले तेव्हां त्यांच्या तोंडून आम्हांला ही हकीकत कळली."

ताराबाई मध्येंच बोलूं लागतेः—"खरेंच बाई मला जेव्हां ही हकीकत इकडून सांगायची झाली, तेव्हां तर बाई माझ्यानें दोन दिवस तोंडांत अन्न घालवलें नाहीं. आमच्या सासूबाई होत्या, त्यांचा **भीमरावजी**वर फार लोभ असे, त्यामुळें ते केव्हां केव्हां सासूबाईंना भेटायला येत असत. तेवढेच कायते ते मला माहित. सासूबाई त्यांना नेहमी झणत असत कीं तुम्हीं लग्न करीत नाहीं हें कांहीं चांगलें नाहीं." पण त्यांचा आपला नेहमी एकच जवाब, कीं, "माझी बायको लहानपणीं मेली तेव्हांपासून मनाला वैताग आला आहे तो कांहीं केल्या जायचा नाहीं. आपल्याला लग्नच करून काय कर्तव्य आहे ? आहे देवानें भाकरी दिली आहे तेवढी खाऊन खुशाल **हरि हरि** झणत असावें !—बरें, पण सगळें खरें, तुमच्या मुलांमाणसांचें कसें काय तें नाहीं तुम्हीं मला सांगितलें ?"

जानराव उत्तर करितातः—"त्यांत सांगण्याजोगें कांहीं नाहीं, कारण सगळ्यांचा निकाल होऊन चुकला आहे. आमचें कुटुंब सालगुदस्तच खपलें, व मागून दोन महिन्यांचे आंतच एकुलता एक मुलगा होता त्यानेंही राम झटलें! पण काय चमत्कार असेल तो असो, आज आमच्या कुळांतले एकासारखे एक सात पुरुष मी पहातों, त्या सगळ्यांचीं आपलीं लहानपणींच कुटुंबें निवर्तलेलीं! इतकेंच कीं कुटुंबामागें कोणाकोणास एकादा मुलगा असला तर असला, नाहीं तर कांहीं नाहीं ! पण त्यांत विशेष चमत्कार झणायचा तो हा कीं, त्या सातांनीं पहिलें कुटुंब निवर्तल्यावर दुसऱ्यानें विवाह झणून केला नाहीं !"

ताराबाई बोलतेः—"तें सगळें असो. त्या सातांची गोष्ट त्यांची त्यांना लागू. तुम्हीं तसला कांहीं वेडेपणा करूं नका. आज तुमची योग्यता

मोठी, सुदैवानें तुमच्या नांवानें **महाराज सरकारां**तून गांवही सुटला आहे, तेव्हां तुम्हीं असे एकटे न रहातां लग्न कराल तें बरें. या जगांत काय जें आहे तें कुटुंबसुखच आहे. "

हे शब्द ऐकल्याबरोबर **संभाजीरावां**ची वृत्ति एकदम कांहीं चमत्कारिकच झाली. त्यांना कसेंसेंच वाटूं लागून त्यांनीं पाण्यानें भरलेला पेला पाणी पिण्याकरितां उचललेला खालीं ठेवला, आणि तोंडानें हुश्श का कायसा चमत्कारिक शब्द केला. तो ऐकून **ताराबाई**नें त्यांचा भाव ताबडतोब ताडला, व नरी ती वरकांतीं त्यांच्याकडे प्रेमानें पाहून त्यांशीं बोलूं लागली, तरी नेहमीच्या राबत्यांतल्या माणसाला त्या प्रेमाचा खरा अर्थ कळण्यास अडचण पडली नसती. असो. नवऱ्याची ती स्थिति पाहून **ताराबाई** मोठ्या प्रेमानें बोलली:—" अं—काय—काय झालें ? भाजींतल्या मिर्चीनें तोंड भाजलें वाटतें ! थोडें पाणी तरी पिऊन पहायचें होतें ! "

आपल्या बायकोचें अशा प्रकारचें भाषण चाललें आसतां **संभाजीरावां**चा जो कांहीं चमत्कारिक चेहरा झाला होता त्याचें वर्णनही करितां येणें कठीण. **ताराबाई**च्या व त्यांच्या प्रेमाची स्थिति ज्याला ठाऊक नाहीं अशा कोणीं जर त्यांचा त्या वेळचा चेहरा पाहिला असता, तर त्यास त्यांचेबद्दल वाईट वाटण्यापेक्षां हंसूंच विशेष आलें असतें. असो. बायकोचें हें प्रेमाचें भाषण ऐकून **संभाजीराव** बोलूं लागले:—" अंहं—मिर्ची—मिर्चीनें तोंड नाहीं—नाहीं—भाजलें, पण—पण—तूं कायसेंसें कुटुं—कुटुंबसुखाविषयीं बोलत होतीस, पण—मला तर वाटतें कीं,— "

याप्रमाणें **संभाजीराव** बोलत असतां त्यांच्या तोंडांतून नीट अक्षरेंही बाहेर पडेनात अशी स्थिति झाली. तथापि जेमतेम खटपट करून " कसचें कुटुंबसुख " का " लांबवेल तितकें लांबवावें " असें कायसेंसें ते बोलले. तें ऐकून **जानरावां**सही त्यांच्या भाषणाचें परम आश्चर्य वाटलें, व **ताराबाई**ही आपल्या नवऱ्याकडे वर सांगितलेल्या चमत्कारिक प्रकारानें पाहूं लागली. सरतेशेवटीं तिच्यानें तसल्या प्रसंगीं जितक्या रीतीनें हंसवलें तितक्या रीतीनें हंसून ती बोलूं लागली, परंतु त्या हंसण्यांत देखील लहान पोराच्या " उंउऊं " चाच भाग विशेष भासण्यासारखा होता. ती म्हणाली:— " ऐकलेंका **जानराव** ! आमच्या येथें आतां मात्र असें उगीच वरपांगीं म्हणायचें, पण तुम्हांला आपला कुटुंबसुखाचा एक थोडका प्रकार सांगतें, इकुडची जेव्हां पहिली वायको **यमाजीभास्करा**नें नेली, तेव्हां दुसरें लग्न करण्याची पण मेली कोण घाई करायची कीं कांहीं अतोनातच ! "

ताराबाई इतकें बोलली तरी त्यापासून **जानरावां**चें समाधान न होतां त्यांनीं पक्कें ताडलें कीं या ठिकाणीं कांहीं तरी गोम असून पाणी पक्कें भुईत मुरतें आहे, यासाठीं हा विषयच अजीबात टाकून भाषण दुसरीकडे न्यावें हेंच बरें, व तशा समजुतीनें ते बोलले:—" होय. तुम्हीं बोललां असेंच मलाही वाटतें, आणखी आमच्या या रावसाहेबांनाही कुटुंबसुखाचा पुरता अनुभव आला आहे! बरें तें असो.—अरे थोडीशी कढनि् वांग्याची भाजीरे!—बरें **संभाजीराव** ! आतां आज तर मी जातोंच, आणखी—हां हां, भाजी फार झाली. बरें थोडें मीठ आण पाहूं—आणखी मघां ठरल्याप्रमाणें आणखी आठ चार दिवसांनीं परत नोकरीवर रुजू होण्याकरितां जाईन, तेव्हां जातांना तुमच्या येथें सग-

ह्या सामानासुद्धां दोन चार दिवस रहाण्याच्या उद्देशानेंच येईन. कदाचित् माझ्याबरोबर माझे दुसरे एक लेही फौजेतच असतात, त्यांचीही रजा खलास होत आली आहे, ते आले तर त्यांनाही घेऊन येईन !"

ताराबाई उत्तर करितेः-"ठीक ठीक ! त्यांना आमंत्रणाच हो. विसरूं नका पण ! मी पण तुमच्या येण्याची वाटच पहात राहीन अं !"

इतकें बोलणें होतें आहे तों तिघांचीं जेवणें उरकलीं. जेवणें उरकल्यावर पानसुपारी आटपून **संभाजीराव** शेजारच्या बागेंत कांहीं काम होतें म्हणून तिकडे निघून गेले, व **जानराव** "आतां घटकाभर वामकुक्षि करितों" असें बोलून तेथेंच पालावर निजले. नंतर तेथलीं तीं उष्टीं निघालीं तेव्हां मग मी जेवायला बसलें. मधें मधें पाणी म्हणून प्यायला सहज तोंड वर करावें तों केव्हां केव्हां **जानराव** माझ्याकडे कांहीं चमत्कारिक रीतीनें एकसारखे टक लावून पहात असल्याचा मला भास होई, त्यामुळें तर मला बाई कसेंसेंच वाटूं लागून माझ्यानें धड जेववेना देखील ! असो. याप्रमाणें सुमारें दोन घटिका लोटल्यावर सर्वांची परत निघायची तयारी झाली तेव्हां मात्र माझ्या जिवांत जीव आला. असो. सगळी तयारी होऊन सामानाची एक गाडी भरून झाल्यावर दुसऱ्या एका गाडींत **संभाजीराव** व **ताराबाई** हीं थोरल्या दोघां मुलांसकट बसलीं. **जनकू** तर जेवी जेवी तोंच झोंपीं गेला होता, तेव्हां त्याला कडेवर घेतलेली तशीच मी गाडीकडे गेलें. इतक्यांत **जानराव** त्या ठिकाणीं येऊन "हं—हलके हलके चढ, नाहीं तर मुलाला एकादा धक्का बिक्का लागेल" असें बोलून पुढें पुढें करून मला गाडींत चढायला हात देऊं लागले, त्याबरोबर मीं त्यांना पण चांगलेंच झाडलें. त्याबरोबर एकदम एवढेंसें तोंड करून ते आपल्या घोड्यावर जाऊन बसले, व सर्वांचा निरोप घेऊन **वांई**च्या वाटेनें निघून गेले. इकडे आमची गाडीही शेतांतल्या वाटेनें आमच्या **पांचवड**च्या घराकडे वळली, व गाडींत बसल्यापासून तों गाडी घराच्या दाराशीं येऊन थांबेपर्यंत, कुटुंबसुखाची **जानरावा**पुढें निंदा केल्याबद्दल **ताराबाई**नें बिचाऱ्या **संभाजीरावा**वर यथेच्छ तोंडसुख घेतलें.

प्रकरण ७.

त्या दिवशीं दोन्ही वेळ गाडींतून गेल्या आल्या कारणानें, व गाडीवाट खडकाळ जमीनींतून असून सर्वांनाच अतिशय धक्के खावे लागले होते यामुळें, घरीं येतों तों आम्हीं सर्वजण अगदीं दमून गेलों होतों. या कारणानें घरीं आल्यावर कांहीं वेळ इकडे तिकडे होतो आहे तोंच सर्वांची आटपाआटप होऊन जीं तीं निजायच्या तयारीला लागलीं. अशीं सुमारें पांच सहा घटका रात्र झाली. तेव्हां माझे धनी आणि धनीन अशीं दोघेंही वरच्या माडीवर निजायला गेलीं. मुलेंही सगळ्या दिवसाचीं दमलेलींच होतीं, तींही घरीं आल्याबरोबर निपचीत घेरतच पडलीं. त्यामुळें मलीही बराच विसावा सांपडून थोडी वारासार करायला वेळ फांवला, व ती झाल्यावर आतां रात्रीं बराच वेळ स्वस्थ झोंप येईल अशा समजुतीनें मी अंथरुणावर पडलें, आणि उशाला डोकें टेंकिलें मात्र, तोंच मला गाढ झोंप लागली.

यांप्रमाणें मी निजलें असतां मला कितीवेळ झोंप लागली याची कांहीं आठवण नाहीं. पण एवढें बरोबर आठवतें कीं घरांत एकाएकीं

मोठ्या मोठ्यानें आरोळ्या झालेल्या ऐकून मी एकदम दचकून जागी झालें. त्यावेळीं माझ्या सर्वांगाला कंप सुटला असून मला दरदरावूंन घाम आला, आणि एकादा नगारा मोठ्या मोठ्यानें वाजत रहावा त्याप्रमाणें माझी छाती दडदड उडूं लागली. तथापि तशा स्थितींतही आपला दम अगदीं कोंडून मी कोठें काय आहे म्हणून कान देऊन ऐकूं लागलें, इतक्यांत पूर्वी "चोर ! चोर !" म्हणून माझ्या कानीं आरोळ्या पडल्या होत्या, त्याच पुनरपि ऐकूं आल्या. या आरोळ्या दुसऱ्या कोणाच्या नसून खुद्द माझे धनी व धनीन यांच्याच होत्या. इतक्यांत ऐकतें तों वरच्या मजल्यावर कोठीच्या ठिकाणीं घरचे दोन चाकर निजत होते, ते "आलों आलों" म्हणून हाका देऊन दडदड खालीं उतरून गेलेले मला ऐकूं आले, व त्या वेळीं घरांत जिकडे तिकडे धांव पळ आणि आरोळ्या चाललेल्या ऐकून इकडे माझें हृदय पण अगदीं दणाणून गेलें. मी निजलेली उठून बसलें होतें त्या ठिकाणाहून एक हातभरसुद्धां सरकण्याची माझी छाती होईना, व जरी क्षणभर झाली असती, तरी खोलींत चोंहीकडे अगदीं दाट काळोख असल्यामुळें व माझ्या मनांत त्यावेळीं हजारों प्रकारचे हजारों तरंग येऊं लागले होते यामुळें, माझ्यानें तेवढेंसुद्धां सरकवलें नसतें.

असो; या स्थितींत बसलें होतें, इतक्यांत मी ज्या खोलींत निजलें होतें, तिच्या बाहेरल्या जिन्याच्या बाजूनें कोणी घासटत घासटत वर येत असल्याचा मला आवाज ऐकूं आला, व पहातें तों तो आवाज माझ्या खोलीच्या दरवाज्यापाशीं येऊन थांबला, त्याबरोबर घाबरून माझी जी कांहीं स्थिति झाली तिचें वर्णनही करतां येणें कठीण. अंमळशानें ऐकतें तों बाहेरून कोणी तरी माझ्या खोलीचें दार लोटीत आहे असा मला भास झाला; व ज्या अर्थी दररोज निजतेवेळीं दाराला कडी लावून निजण्याचा माझा संप्रदाय कधींच नव्हता, त्या अर्थी तें उघडून आंत येण्यास कोणासही पंचाईत पडण्याजोगी नव्हती. असो. इतक्यांत पहातें तों दार खरोखरीच उघडून कोणी तरी मुकाट्यानें आंत शिरलेलें मीं प्रत्यक्ष पाहिलें, व त्यानें आंत आल्यावर आपल्या मागें दार लावून कडीही लावून घेतली हेंही मला पक्केपणीं समजलें. परंतु इतका प्रकार होतो आहे तोंच अतिशय भीतीच्या योगानें मी बेशुद्ध खालीं पडलें व यापुढें काय प्रकार झाला तो मला मुळींच कळला नाहीं. या स्थितींत मी किती वेळ पडून होतें याचें मला कांहीं स्मरण नाहीं, परंतु इतकें मात्र खरें कीं, ज्या वेळीं पुनरपि सावध होऊन हा काय प्रकार आहे याचें हळूहळू स्मरण झालें, त्या वेळीं मी अतिशय गर्भगळित जागी होऊन माझी वाचाही बंद झाल्यासारखी झाली. मला असें वाटूं लागलें कीं माझ्या खोलींत कोणी तरी चोरटा दडून राहिला आहे, व कोणीं सांगावें तो माझ्या उशाशींच कशावरून नसेल ? अहाहा ! त्या वेळच्या त्या भयंकर प्रसंगाचें वर्णन कोण करूं शकेल ? त्या ठिकाणीं माझे हातपाय ताठून मी प्रेतवत् पडलें होतें; व जरी वाचा बंद झाली होती, तरी इतर प्रकारांनीं मी अगदीं सावध होतें ! व तो सावधपणा मनांत येऊन माझी मलाच अतिशय भीति वाटूं लागली ! खोलींत चोंहीकडे अंधारगुडुप होतें यावरून अद्यापि रात्र आहे याविषयीं मला बिलकुल संशय नव्हता ! त्यावेळीं घरांतही चोंहीकडे सामसूम झालें

होतें, तें इतकें कीं त्या वेळीं कोठेंही एवढासा वारा किंवा काहीं कशाचा अगदीं बिलकूल संचार होत नव्हता !

ही स्थिति चालू असतां एकाएकीं माझ्या मनांत अशी कल्पना आली कीं, कदाचित् अजीर्णामुळें किंवा कशामुळें तरी मला कांहीं तरी भयंकर स्वप्न पडलें असून, माझे धनी आणि धनीन यांचा आरडा ओरडा, तो ऐकल्याबरोबर वरून चाकरांनीं ओ देऊन त्यांचें खालीं दडदड धांवत जाणें, तसेंच माझ्या खोलींत कोणी तरी चोरून शिरलें हें, ह्या सर्व गोष्टी मला स्वप्नांतच कशावरून दिसल्या नसतील ! ही कल्पना मनांत आल्यानंतर मी तिजबद्दल जसजसा अधिक विचार करूं लागलें तशतशी ती कल्पनाच खरी असावी असें मला वाटूं लागलें. कदाचित् हा सगळा स्वप्नाचाच प्रकार असेल तर स्वप्नांत माझी वाचा बंद झाल्याची मला आठवण होती, त्याकरितां मी कांहीं थोडे शब्द पुटपुटण्याचा यत्न केला, व तो सिद्धीसही गेला. तेव्हां हें सारें स्वप्नच अशी माझ्या मनाची खातरी होऊन माझ्या जिवांत जीव आला, व त्याबरोबर मनाचा धडा करून मी आंथरुणावर उठून बसलें; व आसपास चांचपून पाहिलें तों मुलें जेथल्या तेथें स्वस्थ निजून आहेत ! त्यायोगानें तर माझ्या मनाची अधिकच खातरी झाली, मग हळूच जाग्यावरून उठून दाराजवळ जाऊन पहातें तों तें नेहमीप्रमाणेंच नुसतें लोटिलेलें आहे. त्यायोगानें मला अधिक धीर येऊन मी चकमक झाडून थोडासा कापूस पेटविला, व त्याला सनकाडी लावून पेटवून त्यायोगानें दिवा लावून चोंहीकडे पाहिलें, तों आंत मी आणि मुलें यांखेरीज दुसरें कोणी नसून खोलींतले सर्व जिन्नस जेथल्या तेथें जसेच्या तसेच कायम आहेत. तेव्हां तर पडलें हें स्वप्नच अशाविषयीं माझ्या मनाला बिलकुल संशय राहिला नाहीं. इतका प्रकार झाल्यावर मी दिवा मालवून पुन्हां आंथरुणावर पडलें, व मला झोंप लागली. परंतु ही झोंप चांगली स्वस्थपणें न येतां स्वप्नावर स्वप्नें पडूं लागलीं, व त्या स्वप्नांत आतां सांगितलेलें चोरीचे प्रकार पुनरपि प्रत्यक्षवत्च घडलेले दिसले. एकंदरींत त्या रात्रीं माझ्या झोंपेची अतिशय धांदल होऊन व स्वप्नांवर स्वप्नें पडत राहून पहाटेची मी जागी होऊन उठलें ती कपाळ ठणकत असून किंचित् तापही आला आहे अशीच उठलें. तोंडाची चव अगदीं नाहींशी झाली असून उलटी मला मळमळच अधिक सुटली. असो. मग अंमळशानें मुलांना उठवून त्यांचें परसाकडे तोंडधुणें करण्याकरितां त्यांना खालीं घेऊन गेलें, तों परसांत राजाऊ कुळंबीण नुकतीच निजून उठत होती, ती मला भेटली, व मी तिच्याशीं कांहीं बोलायच्या पूर्वीच ती मला म्हणाली:—" बरी ग बाई तूं दैवाची, रात्रीं घरांत एवढा दंगा झाला, पण तूं म्हणून कांहीं जागी झाली नाहींस ! "

हे तिचे शब्द ऐकून मला जो विस्मय झाला त्याला तर पारावारच नाहीं; व कांहीं वेळापूर्वीं ज्याला मी स्वप्न समजत होतें, तें स्वप्न नसून कदाचित् तसा प्रकार खरोखरीच झाला असेलसें मला वाटूं लागलें, व मीं तिला आश्चर्यपूर्वक विचारलें:—" बाई ! हें तुम्हीं काय बोलतां ? रात्रीं काय झालें म्हणतां ? "

तीं उत्तर करितेः—" वाः-एकून तुला यांतलें कांहींच माहित नाहीं ? धन्य ग तूं बाई ! तुला म्हणून इतका दंगा चालला असतां स्वस्थ

झोंप आली ! आलीकडे चार पांच महिने मी खालीं निजतें, पण असा कधीं दंगा आपल्या नव्हता दृष्टीस पडला ! काय तुला सांगूं! जेव्हां का घरांत "चोर चोर!" म्हणून ओरडूं लागून सगळ्यांनीं एकच दंगा माजविला तेव्हां मी तर बाई भयानें लटलट कांपूं लागलें! माझ्या सर्वांगाला कांपरें भरलें! व अजूनही त्या दंग्याची आठवण झाली कीं फिरून माझी कायनू न् बायनूच दशा होऊन जातें ! पण **मथुरे** ! हें तर कांहींच नाहीं ! अशी मध्यान्ह खळून गेली होती न् घरांत कोठें तरी चोर दडाला आहे म्हणून जेव्हां संशय आला, तेव्हां तुला खोटें वाटेल, माझी खरोखरी बोबडीच वळली !"

याप्रमाणें ती जें जें कांहीं बोले, त्यावरून आदल्या दिवशीं रात्रीं मला भीति ज्या कारणावरून वाटली तें कारण खरें असल्याविषयीं अधिकाधिक खातरीच होत चालली हें पाहून मी तिला बोललें:—"बाई बाई ! तुलीं हें बोलतां आहां तरी काय ? मला एकूं द्या तरी काय झालें तें !"

त्यावर ती उत्तर करितेः—"ऐक. कालरात्रीं आपल्या घरांत चोर शिरले होते न् त्यांनीं इथें बराच उपटा मारिला. आपल्या अंधेराच्या खोलींतल्या पेटींत कांहीं किरकोळ रुप्याचीं ताटें, वाट्या होत्या त्या सर्व नेल्या. तसेंच त्या पेटींत कांहीं किरकोळ खतपत्रांचा रुमाल होता, तो सगळाचा सगळा गेला. आमचे धनी काल चोरी उमगली तेव्हां बोलत होते कीं" मला रुप्याच्या वाट्या, ताटें हीं गेल्याबद्दल कांहीं वाटत नाहीं, पण तेवढा रुमाल राहिला असता तर मला खेद वाटला नसता. या रुमालांत अगदीं थोडक्यांत थोडकीं झाडलीं तरी सव्वा का दीड हजाराचीं खतें होतीं. ते रुपये हा रुमाल न सांपडला तर अगदीं ठार झाले.- तसेंच त्या रुमालांत एक दोन-कसलींशीं पत्रें होतीं, तीं गेल्यामुळें देखील सवातीन हजारांचें नुकसान झालें !" नगदी माल फारसा गेला नाहीं, परंतु जो गेला तो चोरांस त्याचा फारसा उपयोग करून घेतां येण्याजोगा नाहीं. पण **मथुरे** ! तुला चमत्कार काय सांगूं ? ते चोर मेले पण धीट कांहीं विलक्षणच ! त्यांनीं गोंटयाच्या बाजूच्या बोळाच्या भिंतीकडून घर फोडलें, आणि घरांतले तुला सांगितले हे जिन्नस तर नेलेच, पण आपले धनी आणि धनीनही दोघें निजली होतीं त्या खोलींतही, पण आपले बेधडक शिरले. आणखी तिसें वाटतें कायशी खडबड झाली, त्याबरोबर पहिल्यानें **ताराबाई** जागी झाली, आणि तिनें आरडा ओरडा करण्यास आरंभ केला. त्याबरोबर आपले धनीही जागे झाले. तों त्या गडबडींत त्या चोरांनीं पोंबारा काढला. पण त्या वेळीं घरांत चोहींकडे अंधार असल्यामुळें चोर किती होतेन् काय होतें याचा मुळींच अजमास कळला नाहीं. तरी पण निदान तीन चोर तरी होते ह्यांत कांहीं संशय नाहीं. झालें, याप्रमाणें गडबड झाली, आपले धनी आणि धनीन मोठ्या मोठ्यानें ओरडूं लागलीं, तेव्हां जिकडून तिकडून चाकर माणसें धांवून वरती जाऊं लागलीं, त्यांना आपल्या बाजूनें कोणीं निसुटतें निघून वर जिन्यानें चढून गेल्याचा भास झाला पण जवळ दिवे नाहींत न् तिकडे तर **ताराबाईचा** ओरडण्याचा सपाटा चालला, तेव्हां कसचें काय न् कसचें काय, सगळीं चाकरमाणसें दडदड वर धनी साहेबांच्या खोलींत गेलीं. मग दिवे बिवे लागले तेव्हां चोंही-

कडे झडती होण्यास सुरवात झाली. घरांतला सोपा, ओटी, माजघर, परसांतल्या सगळ्या खोल्या, सैंपाकघर, दोन्ही माडया, इकडे तिकडे सगळ्या ठिकाणीं शोध केला. मात्र एक तुझी खोली शोधायची राहिली. पण त्याचें कारण होतें. सगळीं माणसें शोध करीत करीत तुझ्या खोलीजवळ आलीं, आणि पहातात तों दार आंतून लागलेलें, तेव्हां तुला आन् मुलांना झोंपा लागल्या असतील याकरितां कुणाला उठवूं नका म्हणून आपले धनीसाहेब बोलले. तेव्हां तेवढी मात्र खोली सोधायची राहिली. असो. इतकें जेव्हां झालें तेव्हां चोर माडीवर कोठें लिकून राहिला वगैरे हा संशय व्यर्थ कांहीं तरी उगीच असा सर्वांचा विचार ठरला. पण बाई! ही गोष्ट तुला ऐकायला आणि मला सांगायला आतां इतकी कठीण वाटत नाहीं, पण काल रात्रीं जेव्हां का चोर घरांत शिरले, तेव्हां माझी जी काय स्थिति झाली ती एका भगवानाला मात्र ठाऊक!"

राजाऊ याप्रमाणें चोरीची हकीकत सांगत असतां माझें सर्व लक्ष तीं ऐकण्यांत अतिशय गढून गेलें होतें, व त्याबरोबर माझ्या अंतःकरणाची वृत्ति साश्चर्य चकित झाली होती, यामुळें तो बोलत असतां माझ्या तोंडून एक अक्षरही न निघतां मी ती तशीच ऐकत होतें. सरतेशेवटीं तिचें बोलणें आटपल्यानंतर मीं तिला झालेला सर्व प्रकार सांगून आपल्या वेळेस मी कशी मूर्च्छित होऊन पडलें तेंही सांगितलें. तेव्हां अर्थातूच माझ्या बोलण्यावरून रात्रीं चोर माझ्याच खोलींत दडून राहिला होता, व जिकडे तिकडे पुन्हां सामसूम झालें तेव्हां तो मुकाटयानें बाहेर निघून चालता झाला हें उघडच सिद्ध झालें. असो; आह्मीं याप्रमाणें बोलत होतों तों पुढचें अंगण झाडणारा गडी तेथें येऊन सांगूं लागला कीं, "रात्रीचा सगळा दंगा आटपल्यावर पला पक्की आठवण आहे कीं, मी पुढच्या दाराला चांगलें बळकट कुलूप घातलें आणि मग निजलों, पण आतां उठून पहातों तो दाराचें कुलूप कोणीकडे नाहींसें होऊन दाराला कडी नाहीं न् कांहीं नाहीं, न् दार मात्र ओढून घेतलेलें!" ह्या हकीकतीवरून मीं सांगितलेल्या गोष्टीचा खरेपणा अधिकच सिद्ध होऊन माझ्या खोलींत दंडून राहिलेला चोर अखेरीस कोणच्या रीतीनें घरांतून पार पडून गेला हेंही उघड झालें.

असो. हा इतका प्रकार झाल्यावर मुलांचीं तोंडधुणीं वगैरे आटपलीं, इतक्यांत **संभाजीराव** व **ताराबाई** हीं खालीं उठून आलीं, तेव्हां मी निजलें असतांना वगैरे जो प्रकार घडला तो सर्व त्यांना सांगितला. तो सगळा ऐकून घेतल्यावर **संभाजीराव** बोलले:—"असो; झालें तें बरेंच झालें. देव पावला, नाहीं तर भलतीच एकादी गोष्ट झाली असती आणि तुज बिचारीच्या प्राणावरही येऊन एकादे वेळीं बेतती!"

"हो! बरी होईल बिचारी!" **नाटिकाबाई** तिरसटपणें बोलते:—"बरें तर बरें, नाहीं तर ही गाढवी अशी बेशुद्ध होऊन पडली तेव्हां त्या चोरटयांनीं माझी चकुली मकुलीच नसती का उचलून नेली असती?—"

इतक्यांत नवरा तिचें शांतवन करण्याच्या उद्देशानें बोलूं लागतो:—"तें सगळें खरें, पण तूं असें पहा कीं चोर जो **मथुरे**च्या खोलींत शिरला तो दुसरीकडे दडायला वाट सांपडेना म्हणून पहिल्यानेंच जें दार उघडें सांपडलें त्यांतून शांत शिरला, तेव्हां त्याला चोरी क-

रा. रा. रामचंद्र गोविंद राजाध्यक्ष १
" दामोदर विद्याधर गोखले ..... ३— ६
" नारायण विनायक साठे ..... ३— ६
" शांताराम नारायण वकील ३
" रामकृष्ण सखाराम (१८०२ अखेर) ..... ४— ४
" नारायण दाजी गुप्ते ३
" हरि लक्ष्मण गोखले, सावशी ..... ३— ६
" कृष्णाजी बिस्टो बिळगीक्कर (१८०२ बद्दल) ..... ३— ६
" लल्लुभाई गोवर्धनदास (१८०२ बद्दल) ३
" गोविंद विठ्ठल करगुप्पी (१८०२ बद्दल) ३
" कृष्णाजी विष्णु गोखले ३
" विष्णु गंगाधर फडके ..... ६—१२
" रामचंद्र नारायण (प. व. से.) २
" रामचंद्र महादेव गांवसकर ..... ३— २
" विठ्ठल लक्ष्मण कवठेकर ..... ३— ६
" रौळोबा तात्या कोटणीस ..... ३— ६
" बाळकृष्ण नारायण पेणसे ..... ३— ६
" रावजी विश्वंभर शास्त्री जडे ..... ३— ६
" विनायकराव रामजी दीक्षित ..... ३— ६
" रघुनाथ प्रभाकर आपटे (१८०२ बद्दल) ..... ३— ६
" चिंतामण रामचंद्र केळकर ३
" महादेव बाबाजी परांजपे, इचलकरंजी ..... ३— ६
" गोविंद कृष्ण मराठे ..... ३— ६
पेण लायब्ररी ..... १— ८
कोचीन मराठी नेटिव्ह लायब्ररी (१८०२ अखेर) ..... ३— ८
बेळगांव ने. ज. लायब्ररी ..... ३— ६

वर्गणीदारांस व इतरांस सूचना

चालू सालाकरितां पुढील गृहस्थांस एजंट नेमिलें आहे त्यांजकडे वर्गणीदारांनीं वर्गणी भरावी:—

रा. रा. विष्णु गणेश जोशी, घर नं. २७० बुधवार पेंठ ..... पुणें.
" भास्कर दिनकर बाळ, डा. माळचंद्र कृष्ण भाटवडेकर यांचे घरीं, बडोदें.
" चिंतामण रामचंद्र केळकर, प्रमोदसिंधु छापखाना ..... अमरावती.
" बाळाजी अनंत वेलणकर, सदूभाऊ गोरे यांच्या घरीं ..... रत्नागिरी.

☞ पुढील खेपेपासून "**मनोरंजक चुटके**" या सदराखालीं प्रस्तुतकालीन गोष्टीसंबंधानें नाटचादिपद्धतीचा विनोदात्मक मजकूर घालण्याचा विचार आहे.

नाट्यकथार्णव.

प्रस्तुतकालीं 'नाव्हल्स' व 'नाटकें' यांचे संबंधानें जो लोकांचा भ्रांतिमूलक समज झाला आहे त्याचा निरास होऊन, या अत्यंत अनुपम मनोरंजनसाधनाचें वास्तविक स्वरूप व त्याची वास्तविक योग्यता हीं त्यांचे मनांत पूर्णपणें ठसावींत, व तेणेंकरून सदभिरुचिं जागृत होऊन काव्यामृतरसास्वादाविषयीं त्यांच्या अंतःकरणाची साहजिक प्रवृत्ति व्हावी, हा ह्या पुस्तकाचा मुख्य उद्देश असून, यांत संस्कृत व इंग्लिश या भाषांत रचलेल्या उत्तम उत्तम नाट्यकथादिक ग्रंथांच्या आधारें आपल्या महाराष्ट्र वाणीस जुळतील अशा प्रकारचीं अनेक 'नाव्हल्स' व 'नाटकें' यांचा संग्रह यथावकाश होणार आहे, व प्रसंगविशेषीं स्वकपोलकल्पित सदुपदेशपर कथानकें व नीतिवादाचे चुटके यांचाही समावेश होईल. या पुस्तकांत अश्लीलता नीतिभंगादि दोष न येऊं देतां हें पुस्तक सर्व सभ्य व कुलीन स्त्रियांस वाचण्याजोगें करण्यांत येईल. या पुस्तकाच्या वर्गणीचे दर खालीं लिहिल्याप्रमाणें ठेविले आहेत:—

	रु.	आ.
अगाऊ वर्षास	३	०
मागाहून वर्षास	४	८
किरकोळ दर प्रतीस	०	६
टपाल हंशील वर्षाचें अगाऊ	०	६

अगाऊ वर्गणी पुस्तक घेतल्यापासून दोन महिन्यांच्या आंत भरली पाहिजे. पोस्टाचीं तिकिटें पाठविणें झाल्यास अर्ध्या आण्याचीं असावीं, व रुपयास अर्धा आणा याप्रमाणें वर्तवळा पाठवावा.

या पुस्तकाचीं आजपर्यंत **प्रतिमासीं २४च** पत्रें काढण्यांत येत होतीं, परंतु **चालू अंकापासून ८ पृष्ठें अधिक मजकूर वाढविण्यांत आला आहे.** किंमत आहे तीच कायम राहील, व नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं आपलीं नांवें त्वरित पाठविण्याची मेहेरबानी केल्यास व प्रस्तुतचे आमचे वर्गणीदारांनीं आपणाकडील बाकीचा त्वरित उलगडा केल्यास हें पुस्तक इतक्याच किंमतींत लौकरच दुप्पट करण्यांत येईल.

कांदेवाडी, मुंबई.

शंकर मोरो रानडे बी. ए.
नाट्यकथार्णवाचे कर्ते व मालक.

॥ श्री ॥

नाट्यकथार्णव.

त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते ।
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधा ह्येकं समाराधनम् ॥
मालविकाग्निमित्रे श्रीकालिदासः

स्फुरत्कलालापविलासकोमला करोति रागं हृदि कौतुकाधिकम् ।
रसेन शय्यां स्वयमभ्युपागता कथा जनस्याभिनवा वधूरिव ॥
कादंबर्यां बाणः

पुस्तक २. वैशाख शुद्ध १ शके १८०२. अंक २.

NÁṬYA-KATHÁRṆAVA,

A MONTHLY MAGAZINE

Comprising a series of Marathi Dramas, Novels &c. &c.

विषय. **अनुक्रमणिका.** पृष्ठ.

अतिपीडचरित नाटक ५७
प्रहसनसंग्रह.
डाक्तर व वैद्य प्रहसन (संपूर्ण) १-२४

मुंबई.
"इंदुप्रकाश" छापखान्यांत छापिला.
(सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधी सर्व प्रकारचे हक्क मालकानीं स्वाधीन ठेविले आहेत.)
किंमत ६ आणे.

अगत्याची सूचना.

☞वर्गणीदारांनीं मागील व चालू सालाबद्दलची वर्गणी त्वरित पाठवून देण्याची मेहेरबानी करावी. पुस्तकाचीं पृष्ठें वाढल्यामुळें खर्चही वाढला आहे, व केवळ या अडचणीस्तव च वर्गणी-करितां तसदीनें लिहिणें भाग पडतें याबद्दल सुज्ञ वाचकांची माफी असावी.

वर्गणीची पोंच.

	रु.	आ.	पै.
श्री. माधवराव गणेश उर्फ दादासाहेब ओझे	६		
रा. ब. विनायकराव गोविंद देव	६	१२	
रा. सा. जयसत्य बोधराव त्रिमळराव	३		
,, दामोदर गोविंद घारपुरे	३		६
,, गणेश वेंकटेश लिमये (१८०२ बद्दल)	३		६
रा. रा. शिवराम विठ्ठल भांडारकर	३		
,, बाबुराव शामशेट पावसकर	१	८	
,, हिरासिंग (मुंबई, पोष्ट आफिस)	३		
,, वासुदेव बी. लोटलीकर	१	१३	
,, गणेश नरसिंह जोशी (१८०२ बद्दल)	३		
,, नारायण गणेश चंदावरकर	३		
,, हरी महादेव बर्वे (१८०२ बद्दल)	३		
,, नारायण गोपाळ फाटक (१८०२ बद्दल)	३		
,, जनार्दन दामोदर कोल्हटकर	३		
,, मोरो बाळकृष्ण करमरकर (१८०२ बद्दल)	३		
,, बाळकृष्ण केरोबा डी.	३		
,, नानाभाई कानविंदे	३		
,, गंगाधर आत्माराम	३		
,, गोविंद विष्णु भिडे	२		
,, आत्माराम आपाजी	२		
,, वासुदेव रामचंद्र थत्ते (१८०२ बद्दल)	३		
,, आनंदराव रामकृष्ण (१८०२ बद्दल)	३		
,, शिताराम विष्णु प्रभु (१८०२ बद्दल)	३		
,, रावजी विष्णु भावे	३		६
,, बापु दामाजी	३		
,, नारायण गणेश थिटे	३		
,, माधवराव जनार्दन	३		
,, रामचंद्र विष्णु भाटे	३	११	६
,, गोकुळदास देवा गंगाधर (१८०२ बद्दल)	३		
,, माधवराव रंगराव चिटणीस	३		

कांहीं शुद्धिवर तर येतील! हं—आटपा! तुमचीं दारें बिरें चोंहीकडून बंद करा! त्याच्या बरोबर ते मेले दुष्ट लोक आहेत त्यांनीं त्यांचे कान अगोदरच भरून ठेविले आहेत, यासाठीं इतका प्रकार झाल्यावर त्यांना आंत म्हणून येऊं देतां उपयोगी नाहीं.

सुद्र०—चंडवर्मजी! माझी प्रिया म्हणते ही गोष्ट मलाही पण खरी वाटते, याकरितां तुम्हीं दारें बंद करून टाका.—अरे! हा वारा तर अनर्थच करून टाकणार, यासाठीं अगोदर आंत चला, मग पुढें काय बोलायचें तें बोलूं!

(सर्व जातात.)

अंक ३.

प्र० १—माळरान.

(वादळ चालूच आहे, कांतिवर्मा व एक सरदार समोरासमोर येतात.)

कांति०—अरे, अशा वादळाच्या वेळीं हारे कोण बाहेर?

सर०—आहे असाच कोणी तरी दुःखित प्राणी. त्याला वादळ काय आणि दुसरें काय, दोन्ही सारखींच.

कांति०—आं—कांहीं चिंता नाहीं.—मी आपणांला ओळखतों. बरें पण, आपल्या राजेसाहेबांची स्वारी कोठें आहे?

सर०—(उसासा टाकून) शिव शिव! राजे साहेबांची स्थिति विचारूं नको. हें वादळ इतकें भयंकर चाललें आहे तरी त्याची कांहीं परवा न करितां ते तसेच इकडे तिकडे फिरत आहेत! त्यांचें त्यांनाच देहभान न राहून ते जिकडे तिकडे सैरावरा धांवत आहेत, आणि मोठ्या मोठ्यानें ओरडून पाहिजे तसें बरळत सुटले आहेत. त्यांना अद्यापि आपण राजेच आहों असें वाटूनच काय ते वाऱ्याला म्हणतात कीं "तूं वाहतो आहेस यापेक्षां सहस्रपटीनें जोरानें वहा, आणि ही पृथ्वी समुद्रांत बुडवून टाकून तिला समुद्रवसना कर", तसेंच ते समुद्राला अशी आज्ञा करितात कीं, "या सर्व जगताची रहाटी बदलावी किंवा मुळीं जगत्च नाहींसे व्हावें, एतदर्थ तूं आपला लहरीरूप आपसरून हें सर्व जगत् एकदम गिळून जा." मस्तकावर मंदील वगैरे कांहीं नसून ते उघडे बोडकेच भ्रमण करीत आहेत, त्यायोगानें त्यांच्या टक्कल पडलेल्या मस्तकावर जे कांहीं थोडे बहुत केंस आहेत ते वादळावरोबर भुरु भुरु उडत आहेत, परंतु त्याचा आमच्या राजेसाहेबांना त्रास वाटून वादळाच्यानेंही आपले केंस उपटत नाहींत, यासाठीं ते स्वतः आपण होऊनच उपटून टाकीत आहेत. मस्तकावर झिमि झिमि एकसारखा पाऊस गळत आहे व मधें मधें तर पावसाच्या मोठमोठाल्या सरी कोसळत आहेत अशा प्रसंगीं त्यांच्याजवळ कोरडें वस्त्र शपथेलाही नाहीं अशी त्यांची अत्यंत दुःखदायक स्थिति झाली आहे! ही वेळ म्हणजे कोण भयंकर, कीं या वेळेस व्याघ्रसिंहादि मांसाहारी हिंस्रपशु त्यांची ही पण आपलीं जाळीं सोडून बाहेर पडण्याचीं छाती होत नाहीं; परंतु तशी वेळ आणि तशांतून ही काळोखी रात्र, यांची क्षणभरही परवा न करितां ते चोंहीकडे भ्रमणच करीत आहेत!

कांति०—हरहर! राजे साहेबांची ही स्थिति ऐकून आपलें तर बोवा अंतःकरण फाटून

गेलें!—बरें पण, त्यांच्याबरोबर त्यांचे सरदार तरी आहेतना ?

सर०—भलतेंच ! कोठले सरदार आणि कोठलें काय घेऊन बसला आहेस?**चंद्राननाबाईं**नीं त्यांना आणि त्यांच्या बरोबरच्या सर्व लोकांना घालवून दिल्यावर आपण सर्वजण किल्लयाखालीं उतरलों, आणि जेमतेम तळाशीं पोंचलों मात्र, तों वारा अधिक अधिक जोरानें घोंघावूं लागून पावसाच्या सरींवर सरी येऊं लागल्या. त्या धांदलींत सर्वांची पण अगदीं दाणादाण होऊन गेली. तशांतून काळोख तर काय जसा मीच म्हणतो आहे, डोळ्यांत बोट घातलें तरी कोठें कांहीं दिसत नाहीं, अशी स्थिति होऊन ज्याला जिकडे वाट मिळाली तिकडे तो गेला, व सगळ्यांची चुकामुक होऊन एकमेक एकमेकांस हाका मारूं लागले असतां एकाएकीं मेघांचा भयंकर गडगडाट, व त्याबरोबर त्याचा प्रतिशब्दच काय असें वाऱ्याचें घोंघावणें, त्यांच्या आवाजानें सर्व आकाश पातळ एकच नादित होऊन जाऊन कोणाची हाक कोणाला ऐकूं येईना अशी स्थिति झाली. तथापि तशा स्थितींतही राजेसाहेब, त्यांचा खुष. मस्कऱ्या आणि मी असे तिघे बराच वेळ एक ठिकाणीं होतों परंतु अखेर माझीही चुकामुक झालीं, व आतां तूं मला पहातो आहेस असा मी मोठ्या कष्टानें कोणीकडे तरी फिरत आहें ! हाय हाय ! माझी चुकामुक व्हायच्या अगोदर तो बिचारा खुषमस्कऱ्या मात्र एकटा राजेसाहेबांशीं बोलत होता, आणि थट्टामस्करी, काय सुचेल तें, करून त्यांना या भयंकर प्रसंगींही आपल्या दुःखाचा विरगळा पडावा यासाठीं आपणाकडून करवेल तितकी खटपट करीत होता.

कांति०—बरें तें असो. महाराज ! आपण मला ओळखीत नाहीं, तरी मी आपणाला पक्कें ओळखतों. व आपल्या इमानीपणाविषयीं माझ्या मनाची खातरी आहे याकरितां तुम्हांला एक अगदीं गुप्त गोष्ट सागतों. हल्लीं अद्यापपर्यंत वरून वरून सर्व शांत दिसतें आहे, तरी पण राजे साहेबांचे जांवई **खलदर्शन**राव आणि **सुदर्शन**राव यांची आपआपसांत कांहीं परस्परांविषयीं मनें शुद्ध नाहींत. त्यांना राजेसाहेबांनीं जो समाईक प्रदेश दिला आहे, तो प्रत्येकाला वाटतें कीं आपणाकडे असावा. ही सगळी आंतली बातमी **सौराष्ट्रा**चे **राजवाहन**राज यांना कळली आहे; व जरी या दोघां जांवयांना त्याबद्दल कांहीं माहिती नाहीं, तरी या उभयतांच्या आसपास जीं चाकरमाणसें आहेत, त्यांतले पुष्कळ लोक **राजवाहन**राजांच्या पक्षाला मिळाले आहेत, व ते त्यांना एकूनएक बातम्या कळवितात. यामुळें **शशिकला**बाईच्या घरीं राजसाहेबांची जी स्थिति झाली ती सर्व **राजवाहन**राजांस कळली आहे, व तेथें जी त्यांची स्थिति झाली तीच **चंद्राननाबाई**कडे होणार हें त्यांना अगोदरच कळून चुकलें आहे. अजून बाहेरून म्हणाल तर जिकडे तिकडे सर्व शांत आहे, परंतु तुम्हांला आंतली बातमी सांगतों, सौराष्ट्रराजाच्या सैन्यांतील पुष्कळ लोक निरनिळ्या वेषांनीं गुप्तपणें आपल्या या राज्यांतील मोठमोठ्या शहरीं येऊन राहिले आहेत. त्यांना संकेत होण्याचा मात्र अवकाश, तो झाला कीं एकदम हे लोक

ज्या शहरांतून उतरले आहेत, त्यांतून कोठें बाहेर वगैरे न पडतां तीं शहरें काबीज करून घेणार, इतक्यांत स्वतः **सौराष्ट्रराज, मृगांकमाला** वगैरे आपल्या सर्व सैन्यासह येऊन दाखल होताहेतच. याकरितां तुह्मांला सांगतों एवढें तुह्मीं कराच. मीं तुह्मांला सांगितलें इतक्यावर जर तुमचा भरंवसा पटत असेल तर तुह्मीं **करश्री**बंदरीं चालते व्हा. त्या ठिकाणीं गेल्यावर तुमची कोणाएकाची गांठ पडेल. त्यांना या दुष्टांनीं आपल्या राजेसाहेबांची केलेली ही स्थिति सर्व सांगा, ह्मणजे पुढें काय तजवीज व्हावयाची ती त्यांकडून होईल. हें काम वास्तविक मोठ्या जबाबदारीचें व इमानाचें आहे, तथापि तुमच्या इमानीपणाविषयीं माझी पूर्वीपासून खातरी आहे याकरितांच तें तुह्मांला सांगत आहें.

सर०—कांहीं चिंता नाहीं. पण मला तुह्मांला आणखी कांहीं थोडें विचारावयाचें आहे.

कांति०—तुह्मीं अशांत उगीच वेळ घालवूं नका. तुह्मांला मी कोण आहें हें माहित नाहीं, तरी पण मी दिसतों याहून निराळा आहें ह्याबद्दलची खातरी पाहिजे असेल तर ही पैशाची थैली घ्या. ही सर्व तुमचीच असें समजा. तेथें गेल्यावर **मृगांकमाला**बाईसाहेबांची गांठ हरयुक्तीनें घ्या, आणि त्यांना ही मी आंगठी देतों एवढी दाखवा, ह्मणजे त्याच तुह्मांला मी कोण आहें हें सांगतील.—अरे, काय या वादळानें तर अगदीं त्रासच दिला आहे!—बरें असो. मी जातों आणि राजे साहेब कोठें असतील त्यांचा शोध करितों.

सर०—तुमचें ह्मणणें मला कबूल आहे. बरें तुह्मांला आणखी कांहीं सांगावयाचें आहे?

कांति०—कांहीं फार नाहीं, पण एवढें लक्षांत असूं द्या. तुह्मीं आणि मी आतां निरनिळ्या वाटांनीं जाणार, याकरितां राजे साहेबांचा जर तुह्मांला अगोदर पत्ता लागला, तर तुह्मीं मला ओरडून सांगा. हें काम जर तुह्मांकडून होईल तर तुह्मांला आणखी ही एक थैली बक्षीस!

(दोघे निरनिराळ्या वाटांनीं जातात.)

प्र० २.—माळरानाचा दुसरा भाग.

(वादळ चालूच आहे.)

(अतिपीड आणि खुषमस्कऱ्या येतात.)

अति०—हे प्रलयमारुतांनो! घोंगावा! घोंगावा! याहीपेक्षां प्रचंडपणें घोंगावत राहून हें सर्व भूपृष्ठ दगाणून सोडा! हे पुष्करावर्तकादिक प्रलयमेघ हो! या वेळचे तुमचे दायाद हे मारुत, ह्यांच्याशीं झगडतांना अत्यंत क्षुब्ध होऊन तुह्मीं असेच गर्जा! याहूनही सहस्रगुणित प्रचंड अशा वाणीनें गर्जना करा! हे ऐरावताच्या उरःप्रदेशावरील चपल सुवर्णरज्जूंचा क्षणमात्र भास देणाऱ्या चपलांनो! तुमच्या प्रचंड तेजाच्या चकचकाटानें यावज्जीवमांत्रांचे नेत्र अंध होऊन जाऊं द्या! हे विस्तीर्ण नदनद्यांनो! धबधब्यांनो! तुह्मीं आपल्या गिरिजनकाच्या मांडीवरून खालीं धडाधड उड्या घेऊन त्यायोगानें ही सर्व भूमि विदारून टाका, आणि आपल्या अत्यंत दुर्विषह वेगानें सकल चराचरांचे एकदम प्राणनाश करून टाका! हे समुद्राच्या गर्भांत वास करणाऱ्या वाडवानला! तूं समुद्राच्या खोलींतील आपलें दडावयाचें स्थान सोडून मनोवेगापेक्षांही अधिक वेगानें

उदकाबाहेर येऊन हें सर्व भूतल एकदा खाक करून सोड ! म्हणजे त्यायोगानें तरी या जगतांतील कृतघ्नपणाचें बीज नाहींसें होऊन जाईल !

खुष०—गड्या ! ह्या पावसाच्या झडींत आर्द्र अंधेरांत थंडीनें कुडकुडत रहाण्यापेक्षां एका द्या निवाऱ्याच्या जागीं लोकांनीं हडहड केलें तरी तें सोसूनही रहाणें बरें ! याकरितां तूं माझें ऐक, आणि परत किल्ल्यांत जाऊन आपल्या लेकींच्या पायां पड ! आजची रात्र तर कांहींची कांहींच भयंकर दिसते! आजच्या अनर्थांतून आपला कांहीं बचाव होईल असें वाटत नाहीं !

अति०—आः—काळमेघांनो ! चालूं द्या ! तुमच्या गर्जना अशाच चालूं द्या ! तुमच्या उदरांतील अग्नि सर्व विद्युद्रूपानें या धरणीवर कोसळूं द्या ! आणि तुमच्या अखंड वृष्टीनें सर्व पृथ्वी जळमय होऊन आकाश आणि पाताळ सर्व एकच होऊन जाऊं द्या त्यांबद्दल मी तुमच्यावर कधीं कधीं रोष करणार नाहीं ! तुमचें नंदन माझ्या पोटास झालें नाहीं, यासाठीं तुमच्या क्रूर आचरणाबद्दल मी तुम्हांस कदापि दोष देणार नाहीं ! तुम्हीं माझ्या आज्ञेचे कांहीं बांधलेले नाहा, याकरितां तुम्हांला माझी जी जी दुरवस्था करावयाची असेल ती खुशाल करा ! मीं तुम्हांला राज्य दिलें नाहीं, किंवा तुम्हांला माझीं अपत्यें म्हटलें नाहीं, यासाठीं या दीन, अनाथ, वृद्ध, व सर्वांनीं तुच्छ करून सोडलेल्या म्हाताऱ्याच्या डोक्यावर तुम्हीं हवें तितकें ताडन करा ! मी तुमचा या वेळीं गुलाम बनलों आहें ! यासाठीं तुम्हीं माझा हवा तितका छळ करा ! तो मी मुकाट्यानें सोशीन ! त्याबद्दल मी तुम्हांला कदापि दुष्ट म्हणणार नाहीं! तथापि एका गोष्टीबद्दल मात्र मी तुम्हांला दुष्ट म्हणन तो ही कीं, तुम्हीं मज अनाथ म्हाताऱ्याच्या दुःखांकडे बिलकूल लक्ष न देतां माझ्या त्या दोघी कृतघ्न दुष्ट कारट्या यांजकडे मिळून मला त्रास देत आहां ! असो. मर्जी तुमची !

खुष०—गड्या ! हें असलें बडबडणें काय बरें उपयोगी ? चल तूं परत निवाऱ्याला रहाशील तो बरा. तुझ्याकडून मसलत अगोदरच फसली, त्याचाच हा परिणाम ! चल असा भलताच हट्ट धरून बसूं नको ! हट्ट धरणें हें बायकांचें काम, यापासून तुझ्या जिवाला कधीं कधीं सुख व्हायचें नाहीं !

अति०—कांहीं चिंता नाहीं ! मला कितीं दुःख झालें तरी तें मी मुकाट्यानें सोशीन ! त्याबद्दल एक चकारशब्द सुद्धां तोंडांतून काढणार नाहीं !

(कांतिवर्मा येतो.)

कांति०—(मोठ्यानें ओरडतो.) ओः ! तें तेथें कोण आहे हो ?

खुष०—अरे (आपणही मोठ्यानें ओरडतो.)ओः! अरे आलीं येथें दोघे आहेंत, एक शहाणा आणि एक मूर्ख!

कांति०—(पुढें येतो, व विजेच्या प्रकाशांत राजास ओळखून) काय महाराज ! आमचे **अतिपीड** महाराज तेच आपण काय ? हरहर! महाराज ! अशा या भयंकर वेळीं प्रत्यक्ष निशाचरांचा देखील बाहेर संचार होत नाहीं ! एकवेळ मेघांचा गडगडाट व विद्युल्लतांचा कडकडाट झाला कीं छाती दडपून जाऊन त्यांना आपलें स्थानही सोडून जावत नाहीं अशी त्यांची स्थिति होऊन जाते!

महाराज ! आपणाला काय सांगूं ? माझ्या वयाला इतकीं वर्षें झालीं, परंतु असले प्रचंड विद्युत्पात, अशा भयंकर मेघगर्जना, व वारा अत्यंत जोरानें घोंगावत राहून पर्जन्याच्या अशा मुसळधारा, माझ्या जन्मांत आजच काय त्या प्रथम दृष्टीस पडल्या ! महाराज ! अशा प्रसंगांतून आपला निभाव कसा लागावा कांहीं समंजत नाहीं !

अति०—अहाहा ! हे भगवंता **वज्रधरा इंद्रा** ! तूं या वेळीं आपल्या दुष्प्रसह सामर्थ्यानें या जगांत जेवढे म्हणून पापी असतील त्या सर्वांना बाहेर काढ !—हे भगवंता **दंडधरा यमधर्मा** ! तूं आपल्या **चित्रगुप्त** लेखकास बोलावून आणून या दुष्टांच्या पापांबद्दल त्यांस यथायोग्य दंड कर !—आः दुर्मनुष्यांनो ! आतां ही न्यायमूर्ति प्रत्यक्ष पाहून तुम्हीं थरथर कांपत रहा !—आः दुष्टा ! तुझा हात खुनानें विटाळला आहे, तो तूं या न्यायमूर्तीपुढें झांकूं पहात आहेस कांय?—आः पापा अधमा ! तूं पंचमहापातकांचें आचरण केलें आहेस, त्याबद्दलची आतां निष्कृति तुला मिळते आहे ती घेण्यास तयार हो !—आः अनृतभाषी शठापसदा ! विश्वास दाखवून केंसानें गळा कापणारा तो तूंच कांय ? आः दुष्टांनो ! काय बडबडतां ? मीही तुमच्यासारखाच पापी असेन म्हणतां ? आः चांडाळांनो ! निर्लज्जांनो ! या **अतिपीडा**च्या अंगावर पापाचरणाचा डाग आजपर्यंत कोणीं तरी पाहिला आहे काय ? मूर्खांनो ! या तुमच्या भाषणांबद्दल तुमच्या जिव्हा शतखंड विदीर्ण होतील ! हायहाय ! हे **यमधर्मा** ! मी कसा आहें हें सर्वसाक्षी तूं सर्व जाणतच आहेस ! माझा कांहीं दोष नसतां हे सर्व दुष्ट माझा कसा छळ करीत आहेत हें तूंच पहात आहेस !

(पुनरपि मेघांच्या गर्जना होऊन विजा कडकडतात.)

कांति०—हरहर ! महाराज आज काय ही आपली स्थिति झाली ? महाराज ! आपल्या अंगावरील सर्व वस्त्रें अगदीं कशीं भिजून चिंब झालीं आहेत, आणि आपण मस्तक उघडें टाकिलें आहे त्यावरून बांधण्यासाठीं आपला शेला देखील जवळ राहिला नाहीं ! महाराज ! मी आपल्या पायां पडतों ! आपण माझी विनंती ऐकावी ! या येथून जवळच एक पडकें जुनें देऊळ आहे तेथपर्यंत आपण याल तर हा कडाका नाहींसा होईपर्यंत त्या ठिकाणीं आपणास आश्रय मिळेल ! त्या ठिकाणीं आपण जाऊन विश्रांति घ्या ! मी तेथेंच ओटचावर कसा बसा तरी पडून राहीन ! मी पावसांत भिजत राहिलों तरी त्याची मला पर्वा नाहीं ! परंतु महाराज ! आपण या ठिकाणीं क्षणभरही न रहातां त्या देवळांत चलावें ! मी आपला शोध करीत आतांच त्या देवळापर्यंत गेलों होतों, आणि पुष्कळ हाका मारल्या, पण त्याचें दार लाविलें असून मला कोणीं दार उघडलें नाहीं. परंतु महाराज ! आपण तेथें जाल तर आपलें नांव सांगितल्याबरोबर कोणी तरी खचित दार उघडून आपणास आंत घेतील ! याजकरितां मजबरोबर चलावें महाराज !

अति०—हायहाय! मज **अतिपीडराजा**वर असा प्रसंग यावा काय?—गडचा ! मला संभाळून धर ! या वेळीं माझें मस्तक फिरूं लागलें आहे ! अरे ! तूं रे कोण ? अरे ! थंडीनें

कुडकुडून गेल्यामुळें तुझ्यानें कांहीं बोलवत नाहीं ! चल चल ! मलाही थंडी वाजूं लागली आहे, आणि थोडक्याच वेळांत मला हुडहुडें भरून येईलसें वाटतें ! अ–अ–अ अ– ! ग–ग–ग–ग–गडया ! कुठें–कुठें आहे तें दे–दे–देऊंळ ? आतां हें दे-ऊळच कां–कां–कांहीं वेळ आम्हांला रा–रा–रा–राजवाडयाच्या ठिकाणीं होणार ! असो नशीब ! मला स्वत:ब–ब–बद्दल नाहीं फारशी पंचाईत वाटत. परंतु मजमुळें तुझी ही स्–स्–स्–स्थिति पाहून मला फार दु:ख होतें ! च्–च्–च्–चल चल !

(दांत खडखड वाजतात.)

खुष०–(गात गात.)

पद.

हाच् आतां आमचा वाडा,
वाडाहो वाडाहो, हाच्० ॥ ध्रु० ॥
घोंघों कर्तो भारी वारा,
ढगें ओरडती डर्डरां,
विजॉ कडडड–धडडड–सुरा,
अलॉ प्रसंग अवघड बडा,
ओर्डा हो ओर्डाहो, हाच्० ॥ १ ॥
आतां गेलाहो राजमनसुभा,
काळ कटीण टाकला उभा,
आतां उपॉसॉलॉ देउं या मुभा,
चलॉ जाउं या भिक्षागडा,
ओर्डाहो ओर्डाहो, हाच्० ॥ २ ॥

अति०–गडया ! तूं म्हणतोस तेंच खरें !– (कांतिवर्म्यास) अरे, चल तूं म्हणतोस तिकडे चल ! च्–च्–च्–च्– चल !

(सर्व जातात.)

प्र० ३.–उदासदुर्गांतील एक दिवाणखाना.

(चंडवर्मा आणि मद्रुस्सेन येतात.)

चंड०–छेः हें फारच वाईट ! **सुदर्शनराव**ांचें हें वर्तन आपल्याला निवळ क्रूरपणाचें वाटतें. मघां मी त्यांच्याकडे गेलों, आणि त्यांनीं आपल्या श्वशुरांशीं असें निष्ठुरपणानें वागूं नये म्हणून त्यांना सांगूं लागलों, तों इतक्यांत ती कृत्या **चंद्रानना** आंत आली, आणि दोघांचे कांहीं नेत्रसंकेत होऊन, त्यांनीं मला एकदम बेजबाब उत्तर केलें कीं," बस बस, हें घर तुमचें नव्हे, आमचें आहे. याकरितां खबरदार तुम्हीं इत:पर त्या म्हातारडयाबद्दल कांहीं बोलाल, किंवा त्याकडे जाऊन त्याला परत यायला सांगाल, किंवा त्याची कोठें खाण्यापिण्याची, निजण्या बसण्याची सोय कराल, तर प्राणांलाच मुकाल!" काय हें ? हें का बोलणें झालें ? आपल्याला तर बोवा त्यांचें हें कृत्य अत्यंत कृतघ्नपणाचें वाटतें !

मधु०–कृतघ्नपणाचें म्हणून काय विचारावें ? खचित मला तर हें कृत्य अगदीं अमानुषपणाचें आणि निंद्य असेंच वाटतें !

चंड०–असो. कसेंही असो. त्याबद्दलचीं फळें ते भोगतील. पण तुला एक गुप्त गोष्ट सांगतों. हल्लीं **खलदर्शनराव** आणि **सुदर्शनराव** यांचीं मनें परस्परांविषयीं कांहीं शुद्ध नाहींत. हें एक, आणखी दुसरें याहूनही वाईट आहे तें असें कीं,–याबद्दल काल संध्याकाळींच मजकडे एक पत्र आलें. कोठें कोणाशीं बोलायची कांहीं गोष्ट नाहीं, तें पत्र मी आपल्या थोरल्या पेटींत बंदोबस्तानें दडवून ठेवलें आहे.–आपल्या **अतिपीडराजां**ची **शशिकले**ल्या घरची स्थिति **सौराष्ट्र**राजाला कळली आहे, आणि त्यानें याबद्दलचा पूर्ण सूड उगविण्याचा निश्चय केला आहे; आणि त्याचें कांहीं लष्करही

या प्रांतांत येऊन गुप्तपणें राहिलें आहे. तेव्हां लढाईचा आलाच प्रसंग, तर आपणाला अतिपीड महाराजांचा पक्ष उचलला पाहिजे समजलास ? यासाठीं आतां मी जातों, आणि गुप्तपणें त्यांच्या खाण्यापिण्याची तजवीज करितों. तूं मात्र सुदर्शनराचांकडे जाऊन त्याला बोलण्यांच्या नादांत माझें कसें तरी स्मरण न होई असें कर. तशांतून झालेंच स्मरण, तर मी आजारी असून कपाळ फार दुखतें म्हणून निजलों आहें असेंच सांग. मी काय करितों हें जर बाहेर कळलें तर माझे प्राण गेल्याशिवाय कधीं रहावयाचे नाहींत; तरी पण काय पाहिजे ते होवो, मी आमच्या महाराजांना मदत ही करणारच. सध्यांचा प्रसंग मोठा बिकट आहे, याकरितां फार सावधगिरीनें राहून काय करायचें तें कर, समजलास?

(निघून जातो.)

मरु०—फार चांगलें ! मी काय करायचें तेंच करीन ! बाबा आतां बोलले हें पत्र माझ्या चांगलेंच पथ्यावर पडेल ! मी याबद्दलची सगळी हकीकत अगोदर सुदर्शनराजाला जाऊन सांगतों म्हणजे आपतेंच काम होईल! जगांतून एक थेरडा कमी झाला तर झालें! त्यांत कांहीं मोठें नाहीं ! थेरडा गेला कीं तरुणा पुढें सरसावला असा सृष्टीचा क्रमच आहे !

(निघून जातो.)

प्र०. ४—माळरान, देवळाच्या पुढची जागा.

(अतिपीड, कांतिधर्मा आणि सुषमस्कन्धा येतात.)

कांति०—महाराज ! मी म्हणत होतों तें हें देऊळ ! कृपा करून आंत चलावें ! आपण असे उघड्यांत राहिलां तर त्यापासून आपल्या प्रकृतीला इजा पोंचेल ! इतका त्रास आपणाला सोसायचा नाहीं !

(विजांचा लखलखाट एकसारखा चालू आहे.)

अति०—(देवळाकडे कांहीं वेळ एकसारखा पहात रहातो.) अरे, चल तूं चालता हो ! मला इतःपर त्रास देऊं नको ! मी येथें अस्सा एकटा उभा रहाणार !

कांति०—आज्ञा महाराज! मी आपणाला त्रास नाहीं देणार, पण आपण आंत चलावें !

अति०—हा मूर्खा ! मी कोण हें तूं विसरलास वाटतें ! मी राजा असून तूं मला असल्या देवळांत शिरायला सांगतोस, कांहीं शरम नाहीं वाटत ? हायहाय ! ह्या देवळाकडे पाहून माझी छाती फुटूं पहाते !

कांति०—शिवशिव ! महाराज ! आपण असे अभद्र शब्द मुखांतून काढूं नयेत ! आपली ही स्थिति पाहून महाराज ! माझें काळीज खचित फुटेल ! तें फुटल्याची मला परवा नाहीं, पण कृपा करून आपण आंत शिरावें एवढीच माझी आपणास विनंती आहे !

अति०—(हंसून) हा वेड्या ! तूं किती भित्रा आहेस ! तुला असें वाटतें काय, कीं हें वादळ माझ्या जिवाला त्रास करील ? तूं चुकतोस. यापासून मला काडीमात्र इजा व्हावयाची नाहीं. यापासून झाली तर तुलाच इजा होईल. परंतु माझ्या काळजांत—या—इथें—असा प्रचंड आगीचा भडका झाला आहे, कीं त्याच्या धगीपुढें वादळाला मी जुमानीत नाहीं. खवळलेल्या समुद्रांत उडी घालण्यापेक्षां वाघाच्या अंगावर चालून जाणें बरें, तशांतली झाली आहे माझी स्थिति ! माझें अंतःकरण दुःखानें अगदीं करपून गेलें आहे ! त्याच्यावर हा बाहेरचा वारा

आणि पाऊस लागेल, तरच त्याला कांहीं गारवा आला तर येईल ! हाय हाय ! काय दुःख हें ? आणि या सर्व दुःखास कारण त्या दोघी कृतघ्न कारट्या अं ? हाय हाय !— अरे, पण मी केवढा मूर्ख ? मी बायकांसारखा शोक करीत हां काय बसलों ? मी याबद्दल पुरता सूड उगवीन ! कधीं शोक करणार नाहीं !—सूड ! सूड ! कशाकरितां ?—आः कारट्यांनो ! या अशा वादळाच्या सपाट्यांत तुह्मीं मला घराबाहेर घालवून दिलें काय ?—हं—हे भगवंता मेघराजा ! चालूं दे, तुझी ही धाराशरवृष्टि माझ्या विद्ध हृदयाला अशीच अधिक अधिक विद्ध करूं दे ! मी ती मुकाट्यानें सोशीन !— काय ? अशा रात्रीं आणि बाहेर ? धिक्कार असो ! धिक्कार असो ! हाय हाय गे पोरींनो ! हे शशिकले ! अगे चंद्रानने ! तुह्मीं माझ्या पोटच्या, मी तुमचें किती प्रेमानें लालन केलें, तुमच्या बाहेरच्या सद्गुणांस भुलून मीं तुह्मांला सर्वस्व अर्पूनही बसलों— हां—हेंच—माझ्या वेडाचें कारण तें हेंच ! अरेरेरे—डोकें फिरूं लागलें ! (खालीं पडूं लागतो, त्यास कांतिवर्मा सांवरून धरितो.)

कांति०—महाराज !—महाराज ! अशानें आपला निभाव कसा लागणार ? आपण अगोदर येथून आंत चलावें !

अति०—(रागावतो.) आः मूर्खा ! तूं मला फिरफिरून त्रास देतोस ? चल मी येथें अस्सा पावसांतच उभा रहाणार ! तुला पाहिजे असेल तर तूं आंत जाऊन खुशाल निज ! मी इथेंच राहिलों ह्मणजे त्या योगानें तरी त्या दुष्ट कारट्यांची मला आठवण होणार नाहीं ! चल जा, निज आंत !—आः— आः कारट्यांनो !

कांति०—सरकार ! आपणास ह्या अवस्थेंत सोडून जाणें ही गोष्ट मजकडून कालत्रयींही होणार नाहीं ! महाराज ! चलावेंच आपण आंत !

अति०—(गहिंवरून) अरे, तूं असा विचित्र प्राणी आहेस तरी कोण ? तुझें नांव मला अजून कळलें नाहीं, पण खचित तूं माझ्या दोघीं कारट्यांपैकीं कोणी नव्हेस ? सांग तुझें नांव सांग पाहूं.

कांति०—महाराज ! आपण अगोदर आंत चलावें, मग मी आपणास आपलें नांव सांगेन !

अति०—परमेश्वरा ! काय हा चमत्कार ! त्या कारट्या कोणीकडे आणि हा ममताळू माझा चाकर कोणीकडे ! बरें चल तूं कोणी अस ! मी आंत येतों.—(खुषमस्कऱ्याकडे पाहून) अरे, तूं अगोदर पुढें हो ! तुला घर ना दार, तुझी मला फार कींव येते, तर चल तूं अगोदर आंत शिर, मी तुझ्या पाठोपाठ आंत शिरतोंच ! —हाय हाय ! कठिण कठिण ! ही विपत्ति कठिण ! आह्मीं श्रीमंत नेहमी श्रीमंती थाटांतच रहातों, या गरीबांचीं खरी स्थिति आह्मांला कशानें कळावी ? आह्मींच दुष्ट या गरीबांचे हाल मनांत आणून त्यांना सुख देत नाहीं, यामुळें बिचाऱ्या दयाघन परमेश्वराला लोक वृथा दूषणें देतात ! पण खरोखरी पाहतां. याबद्दलचे खरे दोषी आह्मींच आहोंत ! (पुनरपि मेघ गडगडतात, आणि विजांचा लखलखाट होतो.) (खुषमस्कऱ्याकडे पाहून) अरे, तूं अजून आंत शिरला नाहींस ? (खुषमस्कऱ्या दार जोरानें आंत लोटूं लागतो, तों तें कुजलेलें असल्यामुळें कडाकड मोडून पडतें.)

मधु०—(आंतून किंकाळतो.) अयी—यी—यी !

प्रहसनसंग्रह.

सूचनाः—या प्रहसनांतून जेथें एका पेक्षा आधिक इंग्रजी शब्द ओळीनें आले आहेत, तेथें त्या शब्दांच्या दोन्ही बाजूंस [ ] खूण केली आहे, व टिपेचा आंकडा या खुणेच्या आंत अक्षरांचें माथ्यावर कोठें तरी दिला आहे. ही टीप केवळ शब्दशः नसून इंग्रजीचा अर्थ न सुटतां तिचे ऐवजीं महाराष्ट्र भाषेंत शोभेल अशी योजिली आहे.

डाक्तर व वैद्य प्रहसन.

अंक १.

प्र० १.—एक दवाखाना.

(एक डाक्तर व त्याचे कल्याण येतात.)

डा०—कसें कायेर, आज सभा भरायची टाइम[1] जाहिरातींत किती वाजतांची लिहिली आहे?

क०—तीन वाजतां. (जाऊं लागतो.)

डा०—[ऑल् राइट्[2]! वेल् मि-आय् से, कम्[3] हियर्!]

क०—[हियर्[4] सर्.]

डा०—आज काय असेल तें असो. [आय्[5] डोन्ट् फील् ऑल् राइट्.] बॉय्लॉं सोडावाटरची बाटली आणायला सांग.

क०—[व्हेरि वेल्[6] सर्.] (चाकराकडून सोडावाटर आणवितो, डाक्तर तें पिऊन हुश्श करूं लागतात.) (इतक्यांत एक दमेकरी विधवा काठी टेंकीत टेंकीत येते.)

वि०—खों[7] खो खो ! (खुर्चीवर येऊन बसते.)

डा०—[ऑय् से, यू,—व्हेयर् इज्?—नो नो. आय् से. ओडांटॉलजीचें] बुक घेऊन ये.

क०—[यस् सर्.] (निघून जातो.)

वि०—खो, खो, खो! डाक्तरसाहेब! खो, खो, खो!

डा०—(आपल्याच नादांत) [यस् दॅट्स् गूड्! आय् से ! कम्[8] हियर् !]

वि०—(पुढें येऊन) डाक्तरसाहेब ! मजकडे पहा, मला दम्यानें फार त्रास दिला आहे. रातसार झोंप देखील येत नाहीं.

डा०—(तिजकडे पाहून) बाई ! तुम्हीं कोण ? मीं तुम्हांला नाहीं हांक मारली ![आय् से—]

वि०—तें खरें, पण डाक्तरसाहेब ! मला कांहीं अवशद द्या ! खो, खो, खो !

डा०—तुम्हांला काय होतें आहे ?

वि०—खो, खो, खो ! दुसरें कांहीं नाहीं ! हा दमा फार त्रास देतो ! रात्रीं तर बिलकुल झोंप येऊं देत नाहीं!

डा०—ठीक आहे! (कागद लेखणी हातांत घेतात.) [नंबर्[2] थ्री सेव्हंटि नाइन्.] बाई, तुमचें नांव?

वि०—भक्काबाई !

डा०—(घाबरून) काय? भक्काबाई?(मनांत)एकूण आमचा आजचा प्लॅन्[3] फसणार कीं काय कांहीं समजत नाहीं ! (तिचें नांव लिहितात.) बरें, काय तुम्हांला दमा करितो? ठीकआहे. हा दमा किती दिवसांचा आहे ?

वि०—आज साडे सात महिने झाले !

डा०—आणखी इतके दिवस तुम्हीं कुणाचें औषध घेतलें नाहीं ?

वि०—नाहीं. बाबा, असल्या ज्ञाताऱ्यांना कुठलं अवशद न् कुठलं काय ! चाकरीला राहिलें

---

१. वेळ. २. अच्छा. बरें. ए—इकडेये. ३. हा आलों. ४. कसेसेंच वाटतें. ५. चाकराला. ६. हुकूम. ७. बरें ए—ते कुठें आहे—नाहीं नाहीं—ए—दंतशास्त्राचें. ८ हुकूम. ९. हें ठीकच आहे. बरें ए—इकडे ये.

१. ए—२. नंबर तीनशें एकुणऐंशी, ३. बेत.

आहे तिथून मेली सुटका होईल तेव्हांना अवशाद घ्यायचं ? तें मेलं कुणाला वनतं आहे! खो, खो, खो !

डा०—बाई! तुम्हीं पण पुरी साडेसाती काढलीं ! पण ही फार [एक्स्ट्रीम् केस्. यर्ड् स्टेज्ला] जाऊन पोंचली आहे. बरें, तुमचा हात पाहूं. (हात वाचपतात.) बाई ! इतके दिवस तुम्हांला वेळ मुळींच नाहीं फावला औषध घ्यायला ? सगळ्या रात्रंदिवस तुम्हीं कामांतच चूर होतां एकूण ?

वि०—होय. बाबा! काय सांगूं तुम्हांला?—खो, खो, खो!—सकाळपासून तो रात्रीं दहा वाजेस्तोंवर खर्कटीं न् उष्टीं खर्कटीं न् उष्टीं, खो, खो, खो. हें मेलं सगळा वेळ चाललं असतं, त्याखालीं-च नाकीं नळ येतात. मग कस्चं काय न् कस्चं काय? मेल्यासारखी पडून रहातें, झालें!

डा०—चमत्कार आहे !—[ओय् से]—बाई! मग तुम्हांला आज बरें इकडे यायला फावलें ?

वि०—आज तरी काय ?. बाहेरची आहे म्हणून इतकं तरी फावलें, खो, खो, खो !

डा०—काय बाहेरची ? येरडे ! अगोदर कां नाहीं बोललीस ? म्हणजे मी शिवलों तरी नसतों ! आतां विटाळ झालाना ?

वि०—तुम्हा डाक्तरांना विधिनिषेध नाहीं म्हणून तर मी इकडे आलें. नाहीं तर हरभट चरबटे ते म्हणाले होते मी अवशाद देतों.

डा०—छेः छेः, बाई ! तुम्हीं इकडे आलां तेंच बरें केलें! अहो. हे गांवठी वैद्य कुचकामाचे ! बरें, असो. मलां तुमची पाठ आ-आणखी जरा गळ्याखालीं तपासलें पाहिजे.

वि०—काय ? माझ्या अंगाला तुम्हीं हात लावणार! जा मेल्यांनो मला नकोच तुमचं अवशाद! ते हरभट चरबटे बरे दुरून अवशाद देतात. (जाऊं लागते.)

डा०—बाई, तसलें कांहीं चालायचें नाहीं. माझी फी मला मिळाली पाहिजे, नाहीं तर कोडतांत जावें लागेल !

वि०—तुम्हांला लागेल तिकडे जा! कोडांत जां कीं कोड्तांत जा!(निघून जाते.) (इतक्यांत एक न्हावी येतो.)

डा०—(आपणाशीं) हाच तर चमत्कार! मी या बाईला आपणाकडून धमकी दिली, पण मला कोठें कोर्टापुढें जाण्याला तोंड आहे ? कोर्टानें जर मला विचारिलें, तुम्हीं या बाईच्या घरीं गेलां होतां ? तर त्यावर मी काय जवाब देऊं ! घरीं रोगी आला तर आम्हीं फी घेत नाहीं ही गोष्ट ज्याला त्याला माहित, तेव्हां कोर्टाकडून फीच्या रिकव्हरीची आशा अगदीं यूस्लेस ! त्या बाईनें औषध घेतलें असतें, तर दोन पैशांच्या औषधाचे एकदम बारा आणे चार्ज केले असते, त्यांत आमची फी निघाली असती. आतां तिनें हरभटाचें औषध घेतलें तर तेवढी आमची पोटगी बुडालीच कीं नाहीं ?—हां—हेंच तें ! याचकरतां आम्हांला कायदा पाहिजे! सरकारानीं आम्हांला [प्रोटेक्शन्] दिलेंच पाहिजे तें यासाठीं! अहाहा! (तोंडावर हुशारी येते) (इतक्यांत न्हाव्याकडे पाहून) अरे, कोणरे तूं! खंड्या ! कोरें आलास ?—[आय् से यू !] (कल्याण दडदड माडीवरून धावत येतो.)

कल्या०—[हियर् सर् !]

डा०—कायरे, बुक कोठें आहे !

क०—बुक वरच्या कपाटांत कोठें सांपडत नाहीं!

१. भयंकर केस. तिसरे अवस्थेला. २. ए.—

१. वसुलातीची. २. व्यर्थ. ३. धंद्याचें रक्षण. ४. ऐकिलें का ए— ५. हा. आलों.

डा०—गध्धा ! तुला वरच्या कपाटांत पहायला कोणीं सांगितलें ? जा माझ्या उशाकडे असेलतें घेऊन ये !

क०—[व्हेरि वेल् सर् !] (निघून जातो.)

डा०—खंड्या ! आव इदर आव[1] !

खं०—जी. साब! आज येक काम आहे, त्यवडं—

डा०—बोलशील तर खरा ! हं आटप आटप! आज मीटिंगचें[2] काम आहे. बोल झटझट!—

खं०—जी. साब ! आज मायजींच्ये सासूनं माजीवर लय घुसा केला आन् झंगती तुज्येवर पोलिसांत करतें फिर्याद.

डा०—कां तूं कशाला तिकडे गेला होतास ?

खं०—साब ! मी गेलों होतों तिच्या पोराची डुई करायला, तवां ह्या वस्ताऱ्यानं त्येच्या डोकींतल खवड कुट कांपल न् त्येतून निगालं रगुत. इक्तंच.

डा०—(आपणाशीं) मग बरोबरच तो फिर्याद करते! या गुलामांना शस्त्रविद्या झणजे काय हेंच मुळीं ठाऊक नाहीं, तेव्हां यांच्यावर फिर्याद व्हावी हें नीटच. (उघडपणें) कसें झणतोस ? तूं या वस्ताऱ्यानें त्या मुलाचें डोकें कापलेंस ?

खं०—नाहीं.साब. खवड कापल.

डा०—गुलामा, तुला मुळीं हजामतच करायला सांगितलें होतें कोणीं? तुला चांगलें शस्त्र वापरतां येत नव्हतें, तर तूं आमच्यापैकीं एकाद्या डाक्तराला कां नव्हतें नेलेंस मदतीला? काय नुसती पांच रुपये फीच पडली असती एवढेंच कीं नाहीं?

खं०—कसं कसं झंटलं रावसाब! हजामती करायला डाक्टर न्येवं झंगतां?

डा०—[ऑफ्[3] कोर्स!] थांबा गुलामांनो. आजची मीटिंग तर होऊंद्या, झणजे उद्यां झालाच कायदा झणा. त्यांतलें पहिलें कलम हें. न्हाव्यांना हाजामती करितां येत नाहींत या करितां त्यानीं अगोदर डाक्तरी परीक्षा द्याव्या तेव्हांच त्यांना हजामती करायला परवानगी मिळावी.

खं०—झजी लय खासं रावसाब! येकुन आपुन आमा गरीबांच्ये पोटावर पाव आननार झना!

डा०—[नॉट् एक्झॅक्टिट्[2]ली!] पण यांत[पब्लिक्[2] गुड्चा] विचार आहे. तूंच विचारकर. तुला नीट वस्तारा वापरतां येत नाहीं, तुला शास्त्रांतील रुधिराभिसरण, रुधिरप्रस्रवण—

खं०—रावसाब! आपुन येद झंगतां व्हय? आमा न्हाव्यांस्नी कशाला व्होवा येद!

डा०—हेंच तें! तुमचें अज्ञान तें हेंच! मी इंद्रियविज्ञानाचीं गोष्ट सांगूं लागलों. त्याला तूं वेद झणतोस! आण गुलामा तो वस्तारा इकडे, आणि जा कोठें तरी भिक्षा मागायला!

खं०—बरं बाबा, त्यें न्हायलं. अमी चुकलों. मी तुमच्या उंदिरविंदानाला येद समजलों.

डा.—गद्धा अदमी![यू[3] फूल् ! आय् से इंद्रियविज्ञान, एँड् यू कॉल इट् उंदिरविंदान! स्टॉप् आय् मस्ट् प्रासिक्यूट् यू फॉर धिस्! आय् से कल्याण ! ह्वॅन्ह् मी ए पीस ऑफ् फूल्स् क्पाप्!]— (न्हाव्याकडे पाहून) हा पहा गुलामा तुला पोलिसांत पाठवितों.

खं.—त्यें कशापाईं? (घाबरतो.)

डा०—गप्प बस. जास्ती बोलूं नको. नाहीं तर टाक पांच रुपये फी. तुझ्याबरोबर (घड्याळावर पाहून) माझा एक तास मोड.

---

१. हुकूम. २. सभेचें. ३. अर्थात्.

---

१. असेंच कांहीं केवळ नाहीं. २. सार्वजनिक कल्याणाचा. ३. गद्धा. मीं इंद्रियविज्ञान झटलें त्याला तूं उंदरविंदान झणतोस! थांब याबद्दल तुला फौजदारीतच घातलें पाहिजे ! ए-कल्याण ! थोडा फुलिसकेप घेऊन ये.

आहे तिथून मेली सुटका होईल तेव्हांना अवशाद घ्यायचं ? तें मेलं कुणाला बनतं आहे! खो, खो, खो !

डा०—बाई! तुम्हीं पण पुरी साडेसाती काढलीं ! पण ही फार [एक्स्ट्रीम् केस्. थर्ड् स्टेज्ला] जाऊन पोंचली आहे. बरें, तुमचा हात पाहूं. (हात चाचपतात.) बाई ! इतके दिवस तुम्हांला वेळ मुळींच नाहीं फावला औषध घ्यायला ? सगळ्या रात्रंदिवस तुम्हीं कामांतच चूर होतां एकूण ?

वि०—होय. बाबा! काय सांगूं तुम्हांला?—खो, खो, खो!—सकाळपासून तो रात्रीं दहा वाजेस्तोंवर खर्कटीं न् उष्टीं खर्कटीं न् उष्टीं, खो, खो, खो, हें मेलं सगळा वेळ चाललं असतं, त्याखालीं-च नाकीं नळ येतात. मग कसूचं काय न् कसूचं काय? मेल्यासारखी पडून रहातें, झालें!

डा०—चमत्कार आहे !—[ओय् से]—बाई! मग तुम्हांला आज बरें इकडे यायला फावलें ?

वि०—आज तरी काय ?. बाहेरची आहें म्हणून इतकं तरी फावलें, खो, खो, खो !

डा०—काय बाहेरची ? येरडे ! अगोदर कां नाहीं बोललीस ? म्हणजे मी शिवलों तरी नसतों ! आतां विटाळ झालाना ?

वि०—तुम्हा डाक्तरांना विधिनिषेध नाहीं म्हणून तर मी इकडे आलें. नाहीं तर हरभट चरबटे ते म्हणाले होते मी अवशाद देतों.

डा०—छेः छेः, बाई ! तुम्हीं इकडे आलां तेंच बरें केलें! अहो, हे गांवठी वैद्य कुचकामाचे ! बरें, असो. मला तुमची पाठ आआणखी जरा गळ्याखालीं तपासलें पाहिजे.

वि०—काय ? माझ्या अंगाला तुम्हीं हात लावणार ? जा मेल्यांनो मला नकोच तुमचं अवशाद! ते हरभट चरबटे बरे दुरून अवशाद देतात. (जाऊं लागते.)

डा०—बाई, तसलें कांहीं चालायचें नाहीं. माझी फी मला मिळाली पाहिजे, नाहीं तर कोडतांत जावें लागेल !

वि०—तुम्हांला लागेल तिकडे जा! कोडांत जां कीं कोड्तांत जा !(निघून जाते.) (इतक्यांत एक न्हावी येतो.)

डा०—(आपणाशीं) हाच तर चमत्कार ! मी या बाईला आपणाकडून धमकी दिली, पण मला कोठें कोर्टापुढें जाण्याला तोंड आहे ? कोर्टानें जर मला विचारिलें, तुम्हीं या बाईच्या घरीं गेलां होतां ? तर त्यावर मी काय जवाब देऊं ? घरीं रोगी आला तर आम्हीं फी घेत नाहीं ही गोष्ट ज्याला त्याला माहित, तेव्हां कोर्टाकडून फीच्या रिकव्हरीची आशा अगदीं यूस्लेस ! त्या बाईनें औषध घेतलें असतें, तर दोन पैशांच्या औषधाचे एकदम बारा आणे चार्ज केले असते, त्यांत आमची फी निघाली असती. आतां तिनें हरभटाचें औषध घेतलें तर तेवढी आमची पोटगी बुडालीच कीं नाहीं ?—हां—हेंच तें ! याचकरतां आम्हांला कायदा पाहिजे! सरकारानीं आम्हांला [प्रोटेक्शन्] दिलेंच पाहिजे तें यासाठीं! अहाहा! (तोंडावर हुशारी येते) (इतक्यांत न्हाव्याकडे पाहून) अरे, कोणरे तूं? खंड्या ! कां रे आलास ?—[आय् से यू !] (कल्याण दडदड माडीवरून धावत येतो.)

कल्या०—[हियर् सर् !]

डा०—कायरे, बुक कोठें आहे ?

क०—बुक वरच्या कपाटांत कोठें सांपडत नाहीं!

१. भयंकर केस. तिसरे अवस्थेला. २. ए.—

१. वसुलातीची. २. व्यर्थ. ३. धंद्याचें रक्षण. ४. ऐकिलें का ए— ५. हा आलों.

डा०—गध्धा ! तुला वरच्या कपाटांत पहायला कोणीं सांगितलें ? जा माझ्या उशाकडे असेल तें घेऊन ये !

क०—[व्हेरि वेल् सर्[1] !] (निघून जातो.)

डा०—खंड्या ! आव इदर आव[2] !

खं०—जी. साब! आज येक काम आहे, त्यवडं—

डा०—बोलशील तर खरा ! इं आटप आटप! आज मीटिंगचें काम आहे. बोल झटझट!—

खं०—जी. साब ! आज मायजींच्ये सासूनं माजीवर लय घुसा केला आन् लंगती तुज्येवर पोलिसांत करतें फिर्याद.

डा०—कां तूं कशाला तिकडे गेला होतास ?

खं०—साब ! मी गेलों होतों तिच्या पोराची डुई करायला, तवां ह्या वस्ताऱ्यानं त्येच्या[3] डोकींतल खवड कुट कांपल न् त्यें-तून निगालं रगुत. इक्तंच.

डा०—(आपणाशीं) मग बरोबरच तो फिर्याद करते! या गुलामांना शस्त्रविद्या म्हणजे काय हेंच मुळीं ठाऊक नाहीं, तेव्हां यांच्यावर फिर्याद व्हावी हें नीटच । (उघडपणें) कसें म्हणतोस ? तूं या वस्ताऱ्यानें त्या मुलाचं डोकें कापलेंस ?

खं०—नाहीं साब. खवड कापल.

डा०—गुलामा, तुला मुळीं हजामतच करायला सांगितलें होतें कोणीं? तुला चांगलें शस्त्र वापरतां येत नव्हतें, तर तूं आमच्यापैकीं एकाद्या डाक्तराला कां नव्हतें नेलेंस मदतीला? काय नुसती पांच रुपये फीच पडली असती एवढेंच कीं नाहीं?

खं०—कसं कसं म्हंटलं रावसाब! हजामती करायला डाक्टर न्येवं म्हंगतां?

डा०—[ऑफ्[2] कोर्स!] थांबा गुलामांनो. आजची मीटिंग तर होऊंद्या, म्हणजे उद्यां झालाच कायदा म्हणा. त्यांतलें पहिलें कलम हें. न्हाव्यांना हाजामती करितां येत नाहींत या करितां त्यानीं अगोदर डाक्तरी परीक्षा द्याव्या तेव्हांच त्यांना हजामती करायला परवानगी मिळावी.

खं०—म्हजी लय खासं रावसाब! येकुन आपुन आमा गरीबांच्ये पोटावर पाव आननार म्हना!

डा०—[नॉट्[2] एक्झॅक्टिट्ली!] पण यांत[पब्लिक्[2] गुड्चा] विचार आहे. तूंच विचारकर. तुला नीट वस्तारा वापरतां येत नाहीं, तुला शास्त्रांतील रुधिराभिसरण, रुधिरप्रस्रवण—

खं०—रावसाब! आपुन येद म्हंगतां व्हय? आमा न्हाव्यांस्नी कशाला व्होवा येद!

डा०—हेंच तें! तुमचें अज्ञान तें हेंच! मी इंद्रियविज्ञानाची गोष्ट सांगूं लागलों. त्याला तूं वेद म्हणतोस! आण गुलामा तो वस्तारा इकडे, आणि जा कोठें तरी भिक्षा मागायला!

खं०—जरं बाबा, त्यें न्हायलं. अमी चुकलों. मी तुमच्या उंदिरविंदानाला येद समजलों.

डा.—गद्धा अदमी![यू[3] फूल् ! आय् से इंद्रियविज्ञान, एँड् यू कॉल इट् उंदिरविंदान! स्टॉप् आय् मस्ट् प्रासिक्यूट् यू फॉर धिस्! आय् से कल्याण ! ह्वॅन्ह् मी ए पीस ऑफ् फूल्स् क्याप्[2]!]— (न्हाव्याकडे पाहून) हा पहा गुलामा तुला पोलिसांत पाठवितों.

खं.—त्यें कशापाईं? (घाबरतो.)

डा०—गप्प बस. जास्ती बोलूं नको. नाहीं तर टाक पांच रुपये फी. तुझ्याबरोबर (घड्याळावर पाहून) माझा एक तास मोड.

---

१. हुकूम. २. सभेचें. ३. अर्थात्.

---

१. असेंच काहीं केवळ नाहीं. २. सार्वजनिक कल्याणाचा. 3. गद्धा. मीं इंद्रियविज्ञान म्हटलें त्याला तूं उंदरविंदान म्हणतोस! थांब याबद्दल तुला फौजदारींतच घातलें पाहिजे ! ए-कल्याण ! थोडा फुलिसकेप विकून ये.

आहे तिथून मेली सुटका होईल तेव्हांना अवशाद व्हायचं ? तें मेलं कुणाला वनतं आहे! खो, खो, खो !

डा०—बाई! तुम्हीं पण पुरी साडेसाती काढलीं ! पण ही फार [एक्स्ट्रीम् केस्. यर्ड् स्टेज्ला] जाऊन पोंचली आहे. बरें, तुमचा हात पाहूं. (हात चाचपतात.) बाई ! इतके दिवस तुम्हांला वेळ मुळींच नाहीं फावला? औषध व्यायला ? सगळ्या रात्रंदिवस तुम्हीं कामांतच चूर होतां एकूण ?

वि०—होय. बाजा! काय सांगूं तुम्हांला?—खो, खो खो!—सकाळपासून तो रात्रीं दहा वाजेस्तोवर खर्कटीं न् उष्टीं खर्कटीं न् उष्टीं, खो, खो, खो हें मेलं सगळा वेळ चाललं असतं, त्याखालीं च नाकीं नळ येतात. मग कस्चं काय न् कस्चं काय? मेल्यासारखी पडून रहातें, झालें

डा०—चमत्कार आहे !—[ओय् से]—बाई! मग तुम्हांला आज बरें इकडे यायला फावलें ?

वि०—आज तरी काय ?. बाहेरची आहें म्हणून इतकं तरी फावलें, खो, खो, खो !

डा०—काय बाहेरची ? येरडे ! अगोदर कां नाहीं बोललीस ? म्हणजे मी शिवलों तरी नसतों ! आतां विटाळ झालाना ?

वि०—तुम्हा डाक्तरांना विधिनिषेध नाहीं म्हणून तर मी इकडे आलें. नाहीं तर हरभट चरबटे ते म्हणाले होते मी अवशाद देतों.

डा०—छेः छेः, बाई ! तुम्हीं इकडे आलां तें बरें केलें! अहो, हे गांवठी वैद्य कुचकामाचे ! बरें, असो. मला तुमची पाठ आणखी जरा गळ्याखालीं तपासलें पाहिजे

वि०—काय ? माझ्या अंगाला तुम्हीं हात लावणार ? जा मेल्यांनो मला नकोच तुम

१ भयंकर केस. तिसरे अवस्थेला. २. ए—

अवशाद! ते हरभट चरबटे बरे दुरून अवशाद देतात. (जाऊं लागते.)

डा०—बाई, तसलें कांहीं चालायचें नाहीं. माझी फी मला मिळाली पाहिजे, नाहीं तर कोडतांत जावें लागेल !

वि०—तुम्हांला लागेल तिकडे जा! कोडांत जा कीं कोडतांत जा !(निघून जाते.) (इतक्यांत एक न्हावी येतो.)

डा०—(आपणाशीं) हाच तर चमत्कार! मी या बाईला आपणाकडून धमकी दिली, पण मला कोठें कोर्टापुढें जाण्याला तोंड आहे ? कोर्टानें जर मला विचारिलें, तुम्हीं या बाईच्या घरीं गेलां होतां ? तर त्यावर मी काय जवाब देऊं ! घरीं रोगी आला तर आम्हीं फी घेत नाहीं ही गोष्ट ज्याला त्याला माहित, तेव्हां कोर्टाकडून फीच्या रिकव्हरीची आशा अगदीं यूस्लेस ! त्या बाईनें औषध घेतलें असतें, तर दोन पैशांच्या औषधाचे एकदम बारा आणे चार्ज केले असते, त्यांत आमची फी निघाली असती. आतां तिनें हरभटाचें औषध घेतलें तर तेवढी आमची पोटगी बुडालीच कीं नाहीं ?—हां—हेंच तें ! याचकरतां आम्हांला कायदा पाहिजे! सरकारानीं आम्हांला [प्रोटेक्शन्] दिलेंच पाहिजे तें यासाठीं! अहाहा! (तोंडावर हुशारी येते) (इतक्यांत न्हाव्याकडे पाहून) अरे, कोणरे तूं! खंड्या ! कोंरे आलास ?—[आय् से यू !] (कल्याण दडदड माडीवरून धावत येतो.)

कल्या०—[हियर् सर् !]

डा०—कायरे, बुक कोठें आहे ?

क०—बुक वरच्या कपाटांत कोठें सांपडत नाहीं!

१. वसुलातीची. २. व्यर्थ. ३. धंद्याचें रक्षण. ४. ऐकिलें का ए— ५. हा आलों.

डा०—गध्धा ! तुला वरच्या कपाटांत पहायला कोणीं सांगितलें ? जा माझ्या उशाकडे असेलं तें घेऊन ये !

क०—[व्हेरि वेल् सर्[1] !] (निघून जातो.)

डा०—खंड्या ! आव इदर आव[2] !

खं०—जी. साब! आज येक काम आहे, त्यवडं—

डा०—बोलशील तर खरा ! हं आटप आटप! आज मीटिंगचें काम आहे. बोल झटझट!—

खं०—जी. साब ! आज मायजींच्ये सासूनं माजीवर लय घुसा केला आन् लंगती तुज्येवर पोलिसांत करतें फिर्याद.

डा०—कां तूं कशाला तिकडे गेला होतास ?

खं०—साब ! मी गेलों होतों तिच्या पोराची डुई करायला, तवां ह्या वस्ताऱ्यानं त्येच्या डोकींतल खवड कुट कांपल न् त्येतून निगालं रगुत. इक्तंच.

डा०—(आपणाशीं) मग बरोबरच ती फिर्याद करते! या गुलामांना शस्त्रविद्या म्हणजे काय हेंच मुळीं ठाऊक नाहीं, तेव्हां यांच्यावर फिर्याद व्हावी हें नीटच । (उघडपणें) कसें म्हणतोस ? तूं या वस्ताऱ्यानें त्या मुलाचें डोकें कापलेंस ?

खं०—नाहीं साब. खवड कापल.

डा०—गुलामा, तुला मुळीं हजामतच करायला सांगितलें होतें कोणीं? तुला चांगलें शस्त्र वापरतां येत नव्हतें, तर तूं आमच्यापैकीं एकाद्या डाक्तराला कां नव्हतें नेलेंस मदतीला? काय नुसती पांच रुपये फीच पडली असती एवढेंच कीं नाहीं?

खं०—कसं कसं म्हंटलं रावसाब! हजामती करायला डाक्टर न्येवं लंगतां?

डा०—[ऑफ्[3] कोर्स!] थांबा गुलामांनो. आजचो मीटिंग तर होऊंद्या, म्हणजे उद्यां झालाच कायदा म्हणा. त्यांतलें पहिलें कलम हें. न्हाव्यांना हाजामती करितां येत नाहींत या करितां त्यानीं अगोदर डाक्तरी परीक्षा द्याव्या तेव्हांच त्यांना हजामती करायला परवानगी मिळावी.

खं०—म्हजी लय खासं रावसाब! येकुन आपुन आमा गरीबांच्ये पोटावर पाव आननार म्हना!

डा०—[नॉट् एक्झॅक्टिट्[2]ली!] पण यांत[पब्लिक्[2] गुड्चा] विचार आहे. तूंच विचारकर. तुला नीट वस्तारा वापरतां येत नाहीं, तुला शास्त्रांतील रुधिराभिसरण, रुधिरप्रस्रवण—

खं०—रावसाब! आपुन येद म्हंगतां व्हय? आमा न्हाव्यांस्नी कशाला व्होवा येद!

डा०—हेंच तें! तुमचें अज्ञान तें हेंच! मी इंद्रियविज्ञानाची गोष्ट सांगूं लागलों. त्याला तूं वेद म्हणतोस! आण गुलामा तो वस्तारा इकडे, आणि जा कोठें तरी भिक्षा मागायला!

खं०—बरं बाबा, त्यें न्हायलं. अमी चुकलों. मी तुमच्या उंदिरविंदानाला येद समजलों.

डा.—गद्धा अदमी![यू[3] फूल् ! आय् से इंद्रियविज्ञान, एँड् यू कॉल इट् उंदिरविंदान! स्टॉप् आय् मस्ट् प्रासिक्यूट् यू फॉर धिस्! आय् से कल्याण ! ह्वॉट् मी ए पीस ऑफ् फूल्स् क्पाप्!]— (न्हाव्याकडे पाहून) हा पहा गुलामा तुला पोलिसांत पाठवितों.

खं.—त्यें कशापाईं? (घाबरतो.)

डा०—गप्प बस. जास्ती बोलूं नको. नाहीं तर टाक पांच रुपये फी. तुझ्यावरोबर (घड्याळावर पाहून) माझा एक तास मोड.

---

१. हुकूम. २. सभेचें. ३. अर्थात्.

---

१. असेंच कांहीं केवळ नाहीं. २. सार्वजनिक कल्याणाचा. 3. गद्धा. मीं इंद्रियविज्ञान म्हटलें त्याला तूं उंदरविंदान म्हणतोस! थांब याबद्दल तुला फौजदारींतच घातलें पाहिजे ! ए—कल्याण ! थोडा फुलिसकेप घेऊन ये.

लान् मीटिंगचें अतिशय अर्जंट[1] काम तसेंच—!

खं०—रावसाब ! माफ करा ! पन मी आपलं ह्मंगनं समजलों नाहीं.

डा०—बरें असो. तुला आतांची वेळ माफ करतों. हा उद्यांचा आक्ट तर होऊं दे ह्मणजे न्हाव्यांना सर्टिफिकिटें द्यायला आह्मींच बसूं. मग पाहूं आह्मांला फी दिल्याशिवाय तुमचा धंदा कसा चालतो तें. अरे गुलामांनो, कालेजांत शिकल्याशिवाय हजामती करतां, नाहीं ? बरें तें राहिलें. इथें आला होतास कशाला ?

खं०—दुसऱ्ये कशाला न्हाईं, आपुन् त्या वाईला वळकतां, त्यंव्हां त्यवडं तिला सांगूनशी काइ व्हईल, तर गरीबाचं उगीच नुसकान व्हनार न्हाईं ह्मून ह्मंगतों.

डा०—टीक आहे. तर टाक या वेळीं एक रुपया फी, ह्मणजे करतों तेवढें काम.

खं०—(धोंकटी चांचपून) साब ! आज समद्या दिसांत कायती येक्‌डुई गावली, आन् ती बी वसरीवरची न्हाईं, त्येच्यां समद्या दोन दिडक्या धोकटींत हायता, व्होत्या तर ह्या द्येतों.

डा०—तसलें कांहीं उपयोगी नाहीं. तूं माझीच हजामत कर ह्मणजे तुझें काम करतों.

खं०—साब ? असं कसं बरं ? अशानं माजं गरीबाचं दोन दिडक्या नुकसान व्हतं.

डा.—[नेव्हर्[2] माइंड्.] बरें आतां जा, आणखी रविवारीं मी असा बारावर एक दोन वाजतां जेऊन खाऊन मोकळा होईन, तेव्हां ये हजामत करायला.

खं.—जी. बरं तर मग त्या मायजीचं कसं का?

डा०—त्याची तुला नको काळजी, चल चालता हो कसा.(खंड्या राम राम करून निघून जातो.)

१. जरूरीचें. २. कांहीं चिंता नाहीं.

काय अनर्थ हा! ह्या आजच्या आज दोन केसेस् पाहिल्या! अशा प्रत्येक डाक्टराच्या समोर दररोज हजारों घडत असतील, तेव्हां' यांचा सरकारमार्फत कायदेशीर बंदोबस्त झालाच पाहिजे. असो. याचा विचार मीटिंगमध्येंच करूं.

(इतक्यांत कल्याण एक बुक घेऊन येतो.)

क०—हें बुक. (डाक्टरांच्या हातांत देतो.)

डा०—(बुकावरील नांव वाचून) गद्धा । [ओंडा. टाळजीचें] बुक आणायला कोणीं सांगितलें? मीं तुला ब्रिटिश [स्टॅटचूटचें] जव्हतें का सांगितलें बुक आणायला ?

क०—(घाबरून)[यस्[3] सर्!—नो सर्!—नो नो यस् सर्!] उं—उं—आपण हें बुक आणायचें बो—

डा०—[फूल्[4]! बी क्वाएट्!] सॉयॉय् ! जाव उपर और— और— [स्टॅटचूटका] किताब लाव ! (कल्याण व शिपाई जातात.) (आपणाशीं) खरें पाहिलें असतां,[आय् ऍम् नॉट् सुपर्स्टिशियस्, बट् वट्—नो नो ! धिस् वेंट् डू !]—पण, काय असेल तें असो, आज मीटिंगच्या कामाला विघ्नें फार येताहेत, कां कांहीं समजत नाहीं ! (पेन उगीच शाईत बुचकळून आंगठ्यावर कांहीं तरी लिहित बसतात.)

(इतक्यांत एक अंग भाजलेला रोगी येतो.)

रोगी०—(हात झाडीत) डाक्टरसाहेब ! हाय हाय ! कांहीं दवा द्या. सगळें अंग भाजून गेलें आहे न् फार त्रास होतो आहे.

डा०—टीक आहे. भाजून वेळ कितीसा झाला?

रो०—अर्धी घटका झाली.

डा०—(कागदावर लिहितात.)ओएंटि.-नांव काय?

रो०—काळेश्वर !

१. दंतशास्त्राचें. २. कायदे संग्रहाचें ३. होय—न्न्—न् नाहीं. ४. गद्धा. गप्प बस. ५. कायदे संग्रहाचा. ६. मी कांहीं देवभोळा नाहीं. पण—छे—हें उपयोगी नाहीं. ७. तीनशें ऐंशी.

डा०—(धावरून आपणाशीं) [दॅयर् अगेन् ! धिस् इज् रियालि समथिंग् डिस्गास्टिंग् ! आय् ऍम् अफ्रेड् टुडे'ज् मीटिंग् वुइल्—वुइल्—वी वट् ए कियास्को!] (कागदावर त्याचें नांव लिहितात.) बरें हें प्रिस्क्रिप्शन् आंत कंपौंडरकडे घेऊन जा म्हणजे तो दवा देईल. (काळेश्वर प्रिस्क्रिप्शन् घेऊन जातो.) काय चमत्कार ? एकाच दिवसांत दोन विघ्नें, अक्काबाई आणि **काळेश्वर** ! काय करावें ! कांहीं सुचत नाहीं! या मीटिंग्ची आज ऑफिस् होते कीं कांहीं समजत नाहीं! दुश्चिन्हें तरतशा प्रकारचीं होऊं लागलीं आहेत!

(इतक्यांत काळेश्वर आणि कंपौंडर परत येतात.)

काळे०—(कंपौंडरास) अरे, पण, तूं कां उगीच ताणीं तोडतोस ? मीच सांगतों डाक्तरांना काय आहे तें! हें पहा डाक्तरसाहेब! तुमच्या या-माणसाला ओगदाचे पैसे किती द्यायचे म्हणून मीं विचारिलें, तों हा म्हणतो याचे आठ आणे. डाक्तरसाहेब ! तुमचा हा आम्हां गरीब लोकांना लुटायचा धंदा आहे कीं कसें काय ? यानें तुमचा कागद पाहिला, आणखी एका सुरीनें एका बाटलींतलें एवढेंसें औषध बाहेर काढिलें, आणखी तें एका गंलासांत कालिवलें, एवढ्याबद्दल आठ आणे म्हणजे मोठा जुलूम आहे! तुलीं मजकडे पहा. मी गरीब ब्राह्मण आहें. आचाऱ्याचें काम करीत असतों. सारे जेऊन खाऊन दोन रुपये मिळतात. त्यांतले जर एका खेपेलाच आठ आणे खर्च केले, तर सगळ्या महिन्याचा पगार चार दिवसांतच संपून जाईल ! मागें एक बाप्पकोन् एक मुलगा इतक्यांचीं पोटें आहेत.

१. फिरून ! हा बोवा मोठा त्रास झाला आहे. आजच्या सभेचा बाजा वाजतो कीं कांहीं समजत नाहीं.

डा०—बस बस ! तुला आठ आणे दिलेच पाहिजेत ! तूं गरीब हें अगोदरच कां नाहीं सांगितलेंस? म्हणजे तुला एकदम जायलाच सांगितलें असतें. [नो नो! यू मस्ट् पे!]

काळे०—(तोंड वेंगाडून) साहेब, असें नका करूं कांहीं मज गरीबाच्या धंद्याकडे पहा!

डा०—बस! मूला ठाऊक आहे तुझा धंदा! तूं आचारीपणाचा धंदा करितोस, नाहीं! ठीक ठीक! या करितांच तुझ्यापासून मी जास्ती पैसे घेणार! तूं हा धंदा करितोस त्याची तुला शरम नाहीं वाटत ?

काळे०—महाराज! त्यांत शरम कशाची? घरचे गरीब, पैसे जवळ नाहींत. तेव्हां पोटाकरितां.—

डा०—[येस्. आय् नो दॅट्!] पण तुला केमिस्ट्री[3], बॉटनी[4] यांची माहिती नसून तूं या धंद्यांत पडलास, याबद्दल तुला मॉजिस्ट्रेटाकडेच पाठविलें पाहिजे होतें, परंतु काय करावें ! तसा कायदा अजून झाला नाहीं, तो थोड्याच दिवसांत झाला म्हणजे तुला त्याचें सुख समजेल ! मूर्खा ! तुला हें कसें कळलें नाहीं आचाऱ्याचा धंदा करायच्या पूर्वी या दोन सायन्सेसचा पुरा अभ्यास झाला पाहिजे!

काळे०—डाक्तरसाहेब ! माझा बाप गरीब, त्यानें मला शिकाविलें नाहीं.

डा०—म्हणून आम्हीं तुला शिकविणार! आजची मीटिंग् याबद्दचा कायदा करण्यासाठींच ! अच्छा ! लाव आठ आना.

काळे०—मजजवळ फक्त चार आणे आहेत, तेवढे पाहिजे तर द्या. नाहीं तर मी आपला जातों. तुम्हांला वाटेल तर मला तुरुंगांत पाठवा. पण मजजवळ काय ती एवढी पुंजी आहे.

१. बस बस, लाव पैसा लाव. २. होय. तें मला ठाऊक आहे. 3. रसायनशास्त्र ४ वनस्पतिशास्त्र. ५. शास्त्रांचा.

(जाऊं लागतो.) (डाक्टर व कंपौंडर एकमेकांच्या तोंडाकडे पाहूं लागतात.)

डा०—[दि डेव्हिल् ही इज्. हौएव्हर् लेट् हिम् गो.] —अरे, चल आण चार आणे! तुला म्हणून पैसे सोडले.—

काळे०—तें कांहीं म्हणा. (डाक्तरांस पावली देऊन चालता होतो.)

डा०—असो. चोराच्या हातची लंगोटी, आपलें इथें थोडेंच खर्चलें आहे. फार तर एक पैसा! असो. जा तूं आंत. (कंपौंडर जातो.)

(इतक्यांत एक बाल्या घाबऱ्या घाबऱ्या धांवत येतो.)

बा०—दाक्तर साब! दादाजीज्नू तुमास्नी बुलावलांय.

डा०—कोरे? काय झालें काय?

बा०—कोणास बा ठावां. कांयसांसां झालांय्. तथां जवां धाकलीं वयनी पडली आय्, अन् सम्दीं मानसां रडतांन्! दादाजीज्नू मला सांगितलान् दाक्तरास घ्याउनशी ये. म्हणूनशी मी आलां.

डा०—अरे पण कांहीं सिकब्रीक होती?

बा०—नांय, दादाजी कायसंसं करीत होते न् नाकांत घात्लां, आन् मग धाकलीबाय पडली!

डा०—(आपणाशीं) गेलेंच पाहिजे. [ही इज् माय् पर्सनल् फ्रेंड्!] गाडीवाला! गाडी!—जारे तूं हो पुढें. हा मी आलोंच म्हणून सांग. (सर्व जातात.)

प्र० २. दादाजीचें घर.

गर्भाधानाचा होम मांडला आहे. धाकलीबाय. बेशुद्ध होऊन पडली आहे, तिला दुसऱ्या दोघीं तिघींनीं सांवरून धरली आहे. दादाजी, भटभिक्षुक व इतर मंडळी आसपास घाबरी होऊन गेली आहे.

सोनाबाय—धाकले! आं—हेङ्ग का! अशी घाब-

१. भांचोद. हें एक शिवाचच आहे. बरें असो. जाऊंद्या याला. २. तो माझा जीवश्च कंठश्च स्नेही आहे.

रतेस कणाला? बग लोकां हसतान् का नांय!

(धाकली बायच्या तोंडावरून हात फिरवितेः)

बेनाबाय—ग सोना! तूं तशीच धर तिला! बोलूं नको! हलूं देऊं नको! आत्तां दाक्तर येतीन्! काय बा या दादाजीला म्हणावां, नाकांत रस पिळावाचा तो काय ईतका ओतीला पायजे? त्याजून् एकदम धरीला आणि पिळीला! त्याशी ती घाबरी झाली!—**ग धाकले!** आतां इतकं निवाला कशाला पायजे?

(इतक्यांत डाक्तरांची स्वारी येते.)

डा०—[गुड् मार्निंग्] दादाजी! [व्हॉट्स् दि मॅटर्?]

दा०—आज गर्भाधान सेरिमनी चालली आहे, तें भटजींनीं दूर्वांचं कायसंसं नाकांत घालायला सांगितलं, तें काय झोंबलं का काय झालं कांहीं समजत नाहीं, एकदम घाबरी होऊन पडली.

डा०—(धाकलीबायकडे पाहून) घाबरूं नका. मी आतां बरी करितों—गाडीवाला! लाव्! बाक्स लाव! (गाडीवाला गाडींतून पेटी घेऊन) येतो. डाक्तर आतून बाटली काढून तिच्या नाकाशीं धरतात, व ती हळूहळू सावध होते) [वेल् देयर शी इज् ऑल् राइट् नौ.—गिव्ह् हर् आ कप् आफ् टी ऑर (किंचित् हंसून) समथिंग् एल्स् इफ् शी इज् यूस्ड टू—]

दा०—[ओ यस्!] (बेनाबायच्या कानाशीं लागून कांहीं सांगतो, बाया सर्व बाया धाकलीबायला आंत घेऊन जातात.)

डा०—[इट्'स् व्हेरि स्ट्रेंज्] दादाजी! तुमीं आमच्या समाजाचे मेंबर म्हणवितां, आणखी आजून

१. नमस्कार. २. काय झालें आहे काय? ३ समारंभ. ४. ठीक. आतां झाली बरी. तिला थोडा पेलाभर चहा किंवा त्या दुसऱ्या—हं—ची संवय असली तर ती द्या प्यायला. ठीक ठीक. ६. हें मोठें आश्चर्य आहे. ७. सभासद.

तुमच्या सुपर्स्टिशन्स्[1] जात नाहींत! ह्म होम काय, हे वोडके भट काय बसले आहेत, आणखी तें नाकांत काय घालतां ! अहो, हे भट बोलून चालून आपस्वार्थी,[इन्टरेस्टेड[2] फोक्स्,] यांच्या काय नादाला तुम्हीं लागतां?

डा०—खरें, पण ह्या [ओल्ड्[3] मेन्] मुंढे आपलें कांहीं चालत नाहीं, सब्मिट्[4] व्हावें लागतें.

डा०—[यस्[5] यॅस्!] पण हेच भटोरे पहा. हे काय पाहिजे तें सांगतात, स्वतःला पदार्थविज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र, यांची कधीं बापजन्मांत देखील ओळख नाहीं. आणि चाललें सांगायला पंचगव्य घ्या, दूर्वांचा रस नाकांत घाला, पण या मूर्खांना या पासून काय आकांत होतात हें कुठें कळतें आहे? नो, वंडर्[6] डों'च्यू थिंक् दि प्रेझेन्स् आफ् डॉक्टर्स इज् इनडिस्पेन्सेबल इन् सच् सेरेमनीज् ? आय् ऍम् गोइंग् टु मुव्ह् फॉर् दिस् इन् टुडेज् मीटिंग् ! वेल् आय् ऍम् गोइंग्!] (दोन पावलें जाऊन थांबतात.)

डादा.—[आय्[7] से डाक्टर् प्लीज् एक्सक्यूज् ! मी स्तराला आपलें बिल खचित देईन !

डा.—[ओ नेव्हर्[8] माइंड्. (पाय हपटीत हपटीत चालूं लागतात व आपणाशीं) हेंच तें! या भटांची दक्षणा आतां कशी ताबडतोब चुकवून देईल, पण डाक्टराच्या फीची मात्र नेहमी हीच रडारड! नो[9] नो!] याबद्दल कायद्यांत [स्पेशल प्रोव्हिजन्[10]] केलीच पाहिजे !

(पडदा पडतो.)

१. देवभोळेपणे. २- आडाणी लोक. ३. म्हाताऱ्यांचे. ४. कबूल. ५.. तें खरें. ६. पण तुम्हांला नाहीं वाटत असल्या समारंभांत डाक्टर जवळ असणें अगदीं जरूर आहे ? आजच्या सभेंत मी याबद्दल सूचना करणार आहें. बरें मी जातों. ७. डाक्टर साहेब, अंमळ माफ करा. ८. अहो, त्याची पंचाइत नका करूं. ९.नाहीं नाहीं. १०. मुद्दाम तजवीजीचें कलम.

अंक २.

प्रवेश १ समुद्रतीर.

(दोन गृहस्थ सामोरासमोर येतात.)

१ गृ०[हॉल्डो[1] **रामाजीपंत**! हौ डू यू डू ?] आलोकडे तुम्हीं तर काय अगदीं उंबराचें फूलच बनलां आहां !

रामा०—आप्पखी तुम्हीं काय कमी आहां ! तुम्हीं तर पिंपळाचें फूलच बनलां आहांत जसे! गृहस्था ! आज सहा महिन्यांत एकदा तरी दर्शन द्यावयाचें होतेंस ! बरें पण आज तुम्ही इकडेसे ? तुमची नेहमी ह्मटली ह्मणजे आफिसांत दिवे जाळून काम करायजी संवय !

१ गृह०—तें खरें. पण आतांशा मी तीन महिन्यांच्या [सिकेलीव्हयर[2]] आहें.

रामा०—कां बरें ! तुमची प्रकृति नेहमीं ह्मटली ह्मणजे सदृढ असायची. असें असून हें आजच काय तुमच्या पाठीमागें लागलें आहे?

१ गृह०—हे बुवा आपलें नशीब. गेलों होतों **सोलापुरा**कडे [फ्यामिनडयूटीवर[3]]. तिथें काय आठ आठ दिवस अन्न पाणी मिळण्याची भ्रांत, वास्तविक ह्मटलं ह्मणजे खायला कमी होतें असें नाहीं—पण [ड्यूटीज्[4] फार ट्रबलसम् अॅण्ड ओनरस्] त्याखालीं पण अगदीं पक्षी उडून गेली.

रामा०—बरें पण **विसाजी**! आतांशा[मेडिसिन[5]] कोणाचें चाललें, ?

विसा०—तें कांहीं विचारूं नका. आहेत असेच कोणी दोन शिंगांचे डाक्टर! दररोज गृहस्थाचें आठ आणे दहा आणे बिल् कांहीं चु.

१. कसें काय, रामाजीपंत कसें काय? २. आजारीपणाच्या रजेवर. ३ दुष्काळाच्या कामावर. ४. काम फार त्रासाचें आणि जबाबदारीचें. ५. औषध.

कत नाहीं, पण गुण जर ह्मणाल तर [नॉट्[1] ए बिट्] आज दोन महिने एकसारखीं प्रिस्क्रिप्[2]शनांवर प्रिस्क्रिपशनें चाललीं आहेत. चाळीस रुपये खर्च झाले. अगदीं जिकींरीस आलों आहें. आणि पंगार मिळणार सारातीस रुपये! असो चाललेंच आहे. बरें, पण **रामाजीपंत**! तुह्मांला प्रमो[3]शन मिळायचें होतें ह्मणून ऐकत होतों त्यांचें कसें काय झालें?

रामा०—अहो कसचें प्रमोशन घेऊन वसलं आहां! साऱ्या पांच रुपडया वाढल्या.

विसा०—आज तुमचें ऑफिस बंद केव्हांसं झालें? ह्मटलें ह्मणजे तुमची सुटायची टाईम सहा वाजतांची.

रामा०—तें खरें, पण आज साहेब गेला आहे शिकारीला, तेव्हां आज साडे तीन वाजतांच सुट्टी झाली.

विसा०—तर मग तुह्मांला आजचे डेलीज्[4] पहा. यला सांपडलेच असतील. त्यांत कांहीं आहे का कमजास्ती [वॉर्[5]न्यूज्]?

रामा०—जळली नेहमींचीच रडकथा आहे. शत्रूचे ७०० लोक मेले आणखी इकडचे दोन मेले आणि तीन जखमी झाले.

विसा०—बरें, आणखी कांहीं याशिवाय बातमी?

रामा०—बातमी काय, डाक्टरांचें एक कसलेंसें बिल् छापलें आहे, पण मला होती [क्लॉथ्-मार्केट]कडे यायची घाई, तेव्हां नुसतें हेडिंग[6] पाहिलं आणि तसाच निघालों.

विसा०—एकूण तुह्मांला पक्कें नाहींच समजलें त्यांतलें?

१ एवढासुद्धां नाहीं. २. औषधाचे कागद. ३. पगाराची बढती ४. दररोजचीं वर्तमानपत्रें. ५. लढाईची खबर. ६. कापडी बाजार. ७. विषयाचें नांव.

रामा०—असें खरें. पण हें पहा **वासुदेवराव ढेंकणे** आले. हे तुह्मांला बरोबर सांगतील काय तें. हे वस्ताद [न्यूजपेपररीडर्[1]] आहेत. यांनीं पेपर हातांत घेतला ह्मणजे वरच्या नांवापासून तों शेवटल्या [प्रिंटेड् ऑट्[2] धि सो ॲण्ड् सो प्रेस्] पर्यंत एक अक्षरही सुटायचें नाहीं. (इतक्यांत वासुदेवराव ढेंकणे येतात.)

विसा०—आहेत बुवा फॉच्युनेट्[3], साहेबाच्या नाकांतले बाल! पाहिजे तेव्हां ऑफिसांतून निघून चालतें व्हावें. त्याची गोष्ट आपल्याला कशाला पाहिजे? कां कसें काय **वासुदेवराव**! आज डॉक्टरांच्या बिलांत काय मजकूर आहे?

वासु०—अहो मजकूर काय विचारतां? गेलें, सगळें बुडालें. आतां फिरून कांहीं आमच्या वैद्यांना पोथ्या सोडायची जरूर नाहीं राहिली.

विसा० व रामा०—(आश्चर्यानें) ह्मणजे[4] याचा अर्थ काय?

वासु०—अर्थ काय, तुह्माला सांगितला तोच! डॉक्टरांची नोंद करायची,[5] आणखी या देशांत पैसे आहेत नाहींत ते सगळे डाक्टरांच्या घरांत ओतायचे हा याचा अर्थ.

विसा०—ह्मणजे डॉक्टरांशिवाय दुसऱ्या कोणाला! [प्रॉक्टिस[6]]च करू द्यायचें नाहीं वाटतें!

वासु०—अहो **तुकोबाची** मेख तर इथेंच आहे काय ती! त्या बिलांत वैद्यांनीं किंवा हाकीमांनीं प्रॉक्टिस् करूं नये असें स्पष्ट तर लिहिलेंच नाहीं, परंतु आतलें इंगित सगळें हें.

१. वर्तमान पत्राचे वाचक. २. अमक्या अमक्या छापखान्यांत छापिलें. ३. नशीबवाले. ४. औषधक्रिया

रामा०—तुलीं मोठे चमत्कारिक दिसतांहो ? बिलांत तसे शब्द घातले नाहींत असें. आपल्याच तोंडानं ह्मणतां, आणि फिरून त्याचा अर्थ तोच असंही ह्मणतां हें कसें ?

वासु०—अहो त्याची गंमत आहे अशी कीं, प्रॉक्टिस करतांना देशी वैद्यांचा हात तर धरावयाचा नाहीं. पण त्यांच्या हातून एकादा रोगी जर मेला तर त्याच्या [ड्वेथ्ची रिस्पॉन्सिबिलिटी] वैद्यांच्या बोडक्यावर !

विसा०—ह्मणजेएकूण डॉक्टरांच्या हातून पेशंट मेला.तर त्याचें रिस्क कांहीं त्यांच्यावर नाहीं ! त्यांनीं खुशाल चैन भोगावी आणि लॉर्ड्स् सारखें रहावें असेंच कीं नाहीं तुमचें ह्मणणें ?

वासु०—हो असेंच.

विसा०—पण कायहो डाक्तरांचा असें बिल करण्याचा हेतु तरी काय बरें असावा ?

वासु०—अहो हेतु ह्मणजे देशी वैद्यक बुडवावें, आणखी सगळा देश धुवून आपल्या घरांत घालावा. ते ह्मणतात काय, बाकी सगळीं वैद्यकें खोटीं, आणखी त्यांचें तेवढें वैद्यक खरें. चमत्कार पहा काय आहे तो ! देशी किंवा युनानी वैद्यकं प्रॅक्टिस करणारे लोक सगळे ढोंगी, भोंदू, वंचकशिरोमणि, आणखी [ट्रूथ्, ऑनेस्टी] हीं सगळीं काय तीं यांच्यांच अंगीं भरलीं आहेत. परवां एक आह्मांला शहाणे डॉक्टर भेटले होते, त्यांच्याशीं सहज एका वैद्याची गोष्ट बोलत बसलों होतों, तेव्हां बोलतां बोलतां त्यांनीं हळूच आपलें उग्ररूप केलें प्रगट.

१. वैद्यक्रिया. २. मृत्यूबद्दल जबाबदारी. ३. रोगी. ४ जोखीम. ५. राजे लोकासारखें. ६. सत्यता, प्रामाणिकपणा.

रामा०—तें कसें काय कळूं द्या तर खरें.

वासु०—अहो तें कसचें काय सांगून पुरवायचें नाहीं. त्यांनीं देशी वैद्यांवर [राइट् ऍंड् लेफ्ट्] शिव्यांचा भडिमार केला, आणखी ह्मणाले, "देशी वैद्य तितके इथून तिथून सारे चोरांचे वव्हाडी, त्यांच्या तावडींत रोगी सांपडला तर हटकून मरायचा !" त्यांना त्याविळीं एक स्फुट श्लोक कसलासा आठवला तो त्यांनीं मला ह्मणून दाखविला तो मी त्याच्यापासून उतरूनसुद्धां घेतला आहे.

विसा०—तो कुठें आतां आहेका जवळ ?

वासु०—पहातों. असला तर असेलही. (खिशा चाचपून एक कागद बाहेर काढितो.) हा पहा तो श्लोक

रामा०—(कागद घेऊन श्लोक वाचतात.)

श्लोक.

चितां प्रज्वलितां दृष्ट्वा वैद्यो विस्मयमागतः ।
नाहं गतो न मे भ्राता कस्येदं हस्तलाघवं ॥

अर्थ:—चिता पेटलेली पाहून वैद्याला आश्चर्य वाटलें कीं, मी गेलों नाहीं, माझा भाऊ पण गेलों नाहीं, असें असतां मनुष्य मेला एवढें हस्तचातुर्य कोणाचें ?

विसा०—ह्मणजे, इकडे द्या बरें जरा तो कागद ! (कागद हातांत घेऊन वाचतो) आणखी हें हो काय **वासुदेवराव** ! हें आणखी खालीं पेन्सलीनें काय लिहिलें आहे ? हे बोवा तुमचें तुह्मींच वाचून दाखवा.

वासु०—कशाला तें मला पाठ आहे. ती आमचीच विद्वत्ता आहे.

श्लोक.

सोलापुराख्ये डिस्ट्रिक्टे दुष्काळे घोर आगते ।
गलुच्यां कुच्यां च रस्त्यायां पतितानि शवानि हि ॥

१. वाटेल त्या प्रकारानें.

असंख्यातानि दृष्ट्वा तु डाक्तरा विस्मयाकुलाः ।
नास्माभिर्मारिता लोकाः कस्येदं हस्तलाघवं ॥

विसा०—(अंगावर शहारे येऊन) खरें बोवा. तुम्हीं म्हणतां हेंच खरें. आपल्याला तिकडचा अनुभव आहे. त्यांचे अन्न खातों तेव्हां त्यांच्या विरुद्ध बोलूं नये, पण मला खचित वाटतें, ह्या डाक्तरांनींच तिकडचे लोक केवळ अन्नावांचून मारले !

वासु०—असेलही. आपण कांहीं आर्ग्युमेंट्[1]नेस् नाहीं, तेव्हा काय सांगावें म्हणा, पण आजचें हे बिल वांचून तर आपल्याला डाक्तरांच्या खाबूपणाबद्दल कांहीं विलक्षण आश्चर्य वाटलें.

(इतक्यांत एक पाटलोण घातलेला मुलगेलासा मनुष्य येतो.)

वासु०—(त्यास पाहून) यावें आंग्लोव्हर्नाक्युलर[2] पोशाखाचे तुम्हीं !—हे गृहस्थ यंदा एल् एम्. एस् व्हायचे आहेत.

रामा०—तर मग त्यांना आजच्या डाक्तरी बिलाची माहिती असेलच !

पाटलो०—(येऊन बसतो) कसें काय वासुराव ! ठीक आहे ?

वासु०—आतांपर्यंत तरी ठीक आहे. उद्यां डाक्तरी कायदा पास झाला म्हणजे पुढें काय होईल न् कांहीं नाहीं तें कांहीं आतांच सांगवत नाहीं.

पाटलो०—तुम्हीं बोवा आहां पहिल्या प्रतीचे स्कॉफर्[3]. काय हवें तें का बडबडांना ? अखेर 'सत्यमेव जयते' हें कांहीं कुठें चुकायचें नाहीं.

वासु०—अहो, तें आम्हीं तरी कधीं नाहीं म्हटलें आहे ? पण, त्याचें आज काय ? त्याचा जप करायचा आदितवारीं मंदिरांत गेल्या. वर ! बरें, पण तें सगळें राहूं द्या. तुम्हांला एक गोष्ट विचारायची आहे. हें नवें बिल तुम्हांला ठाऊक असेलच, तेव्हां त्याचा हेतु तुम्हांला काय असावासा वाटतो ?

पाट०—तुमचें इंटरप्रेटेशन[1] कळलें, म्हणजे मग सांगेन तें खरें का खोटें आहे तें.

वासु०—आपल्याला तर बोवा वाटतें आमच्या वैद्यांचे धंदे बुडवायकरितां हें बिल केलें आहे.

पाट०—भलतेंच. त्या बिलांत वैद्यांनीं धंदा करूं नये असें कोठेंच लिहिलें नाहीं.

वासु०—तर मग नाद करायची तींत आमच्या वैद्यांचींही नावें घालायचीं असा कांहीं विचार आहे का !

पाट०—तो कशाकरितां ? नाद करायची ती फक्त वैद्यशास्त्र शिकलेल्यांची. तुमचें वैद्यक म्हणजे बायाबापड्यांचीं औषधें आणि बाडें. त्याला शास्त्र म्हणतो कोण ?

रामा०—(आश्चर्यानें) काय ? आंग्लोव्हर्नाक्युलरराव ! आमचें वैद्यक शास्त्रच नाहीं ?

पाट०—अर्थात् ! अहो ज्यामध्यें मनुष्य आजारी पडलें असतां देवाला नवस करावा म्हणून सांगितलें आहे त्याला शास्त्र हें नांव शोभेल तरी कसें ?

वासु०—वाहवाहो शहाणे. वैद्यकाचा आणि नवसाचा काय संबंध ? नवस कला म्हणजे औषध नको असें कोणत्या लेखकानें कोठें सांगितलें आहे ? नवस करायचे, देवाची प्रार्थना करायची हें सगळें बाहेरचें मनाला समाधान वाटून घेण्याकरितां सोंग आहे ! तुमच्याच वाटतें समाजिस्टांनीं प्रिन्स् आफ वेल्स

---

१ डोळ्यानें प्रत्यक्ष पाहिलेले. २. इंग्रजी मराठी मिश्रित. ३. निदक.

१, अर्थ.

आजारी पडला होता तेव्हां देवाची प्रार्थना केली होती, त्या प्रार्थनेंत डाक्तरही पुष्कळ होते, एवढ्यावरून डाक्तरी शास्त्र खोटें असें ह्मटलें तर कसें चालेल ?

पाट०—तें खरें, पण नवस करावे असें आमच्या डाक्तरी शास्त्रांत कोठेंही सांगितलें नाहीं, आणखी तुमच्यांत सांगितलें आहे, एवढ्याचकरितां तुमचें वैद्यक हें शास्त्र नव्हे !

वासु०—बरें बोवा ! तुमची मर्जी ! पण मला हें सांगा, तुह्मीं देशी वैद्यांचीं नांवें कांहीं नोंदणार नाहीं, तेव्हां अर्थात् त्यांच्या [व्हिजिटिंग् फीज्[1], प्रोफेशनल् ऍडव्हाईसेस्] यांच्या रिकव्हरीबद्दल[2] त्यांस कोर्टामार्फत कांहीं मार्ग राहूं नये, आणि डाक्तरांना मात्र मार्ग रहावा, असें तुमचें ह्मणणें !

पाट०—हें तर आहेच.

विसा०—एकेक गोष्ट ऐकावी तेवढी नवी, कायद्यांत तुह्मीं ह्मणतां हें कलम घातलें आहे?

वासु०—यांत काय संशय? पणएवढ्यानेंच कुठें आटपलें आहे! नसलें नांव नोंदलें तर कोर्टाकडून औषधाचे पैसेसुद्धां रिकव्हर करतां येण्यास मार्ग ठेविला नाहीं ! कां ऑग्लोव्हर्नाक्युलरराव ! मी ह्मणतों हें खरें का खोटें ? तुमच्या कायद्यांतील १० व्या व ११ व्या कलमांचा हाच अर्थ कीं कांहीं निराळा आहे ?

पाट०—(पुटपुटतो, पण आवाज ऐकूं येत नाहीं.)

रामा०—वाः ही मात्र खाशी युक्ति! तोंड धरून बुक्यांचा मार ! कोर्ट जर पैसे देवविणार नाहीं, तर वैद्यांचे पैसे तरी देत बसणार कोण ? आणि वैद्यांनीं तरी मग धंदा चालवावा कसा ?

वासु०—अहो न चालवीनात ? त्यांत डाक्तरांचें थोडकेंच जाणार आहे ? त्यांचा धंदा बुडवायचा हा या कायद्याचा उद्देशच आहे !

विसा०—बरें तुह्मीं मघां ह्मणालां कीं रोगी वैद्यांचे हातून मेला तर त्याचें रिस्क् फक्त वैद्यांवर, त्याच्याबद्दल कायद्यांत कांहीं लिहिलें आहे ?

पाट०—(अस्तन्या मागें सारून व मिशांवर ताव देऊन) ही बहुतकरून या स्वारींच्या खिशांतली ताजी लोणकढी गप्प दिसते ! कां स्वारी! याबद्दल कायद्यांत कलम आपणाला कुठेंसें आढळतें आहे सांगा पाहूं ? उगीच बाता झोंकून लोकांस भ्रमांत पाडणें ही निवळ फॉली[1] आहे.

वासु०—तुह्मीं चमत्कारिक आहां ! डॉक्टर्स् तेवढे कांपीटंट्[2], ह्मणूनना त्यांचे पैसे कोर्टाकडून देवविणार ? आणि वैद्य लोक इन्कांपीटंट्[3] ह्मणूनना त्यांचे पैसे तुह्मीं बुडविणार ? तेव्हां वैद्य जर इन्कांपीटंट् तर त्यांनीं औषधें दिलेलीं खोटीं, आणखी रोगी मेला तर तो त्यांनींच मारला असाच कीं नाहीं याचा अर्थ ?

पाट०—(डोकें खाजवीत) असा अर्थ होतो खरा, पण कायद्यांत याचा कोठें स्पष्ट उल्लेख केलेला नाहीं !

वासु०—अहो याचेंच नांव पोलिटिक्यालिटि[4]! डौल घालायचा फिलांथ्रोपिस्ट्स्[5]चा, आणि इकडे हा असा केसांनीं गळे कापायचा धंदा करायचा !

विसा०—मला या रिस्क्ची जराशी फोड करून

१. घरीं आल्याबद्दलची फी, उपाय करावा किंवा कसें वगैरे सांगणें याबद्दलची फी. २. वसुलातीबद्दल.

१. मूर्खपणा. २. क्रियाकुशल. ३. अकुशल. ४. मसलत, राजकारण. ५. लोकहित काणाऱ्यांचा.

सांगा. समजा, वैद्याचे हातून रोगी मेला, तर तो त्यांनीं मारला असा अर्थ करायचा झणतां, पण माजिस्ट्रेटापुढें वैद्यांनीं अमका अमका रोग झाल्या होता त्यावर अशीं अशीं औषधें दिलीं झणून सांगितलें झणजे ते नाहींत का सुटायचे ?

वासु०—अहो, सुटतील, पण केव्हां ! माजिस्ट्रेटाला स्वतः वैद्यक समजत असेल तेव्हां ! हल्लीं माजिस्ट्रेटांना वैद्यकाचें बिलकुल ज्ञान नाहीं, तेव्हां त्यांनीं [मेडिकल् ओपिनियन् सीक्] करायचें झणजे अर्थात् डाक्तरांचें ! तेव्हां ते कशाला वैद्यांचें झणणें कबूल करताहेत ?

पाट०—तुमचे तर्कच बोवा कांहीं विलक्षण! आपल्याला त्यावर जबाब नाहीं सुचत !

वासु०—त्यांला विलक्षण झणा किंवा सात विलक्षण झणा, पण ते खोटे का खरे एवढें सांगा !

पाट०—(डोटें खाजवीत गप्प बसतो.)

रामा०—झालें, एकूण आमचे वैद्य तर इन्कांपीटंट् ठरलेच, तेव्हां त्यांच्या हातून रोगी मरायचेच यांत संशय नाहीं! पण काय हो, डॉक्टर लोक मोठे कांपीटंट्, असें असून त्यांच्या हातून रोगी मरतात तेव्हां कसें ? ते का बुध्यां मारतात असें झणायचें?

वासु०—अहो उघड आहे. कांपीटंटांच्या हातून एरवीं रोगी मरायचाच नाहीं.

पाट०—(हंसून)कबूल आहे. पण **वासुदेवराव!** तुझांला एक गोष्ट सांगतों, मरायची जरी पाळी आली, तरी शहाण्यांच्या हातून मरावें, पण मूर्खांच्या हातून मरूं नये. देशी वैद्यांचे हातून रोगी मरतात, ते त्यांच्या अज्ञानामुळें.

१. वैद्यक जाणणारे काय झणतात याचा शोध अगर पृच्छा.

पण डाक्तरांची गोष्ट तशी नाहीं ! त्यांनीं रोगी मारलेच तरी ते प्रिन्सिपल्[1]वर मारतील; उगींच नाहींत.

वासु०—झणजे माणसें मारण्यांत देखील कांहीं प्रिन्सिपल् असतें ?

पाट०—हें काय विचारावें ? ही [नाइंटीन्थ् सेंचरी. इट्[2]'स् ऍन् एज् ऑफ् साएन्सेन्स्, ऍंड साएन्सेस् कॅन् नेव्हर् एक्झिस्ट् विदाउट् प्रिन्सिपल्स् !]

वासु०—असेल, झणा. पण तुमचें प्रिन्सिपल् तर ऐकूं द्या एकदाचें ?

पाट०—अहो, प्रिन्सिपल् झणजे इतकेंच. तुझांला **माल्थस्**[3]ची थियरी ऐकून ठाऊक असेल त्याप्रमाणें या देशाची स्थिति झाली आहे. या देशांतील भूमीचे अंगीं जेवढी पोषकताशक्ति आहे, तिजपेक्षां लोकसंख्या अधिक होत चालली आहे, याकरितां केवळ या देशाच्या कल्याणाकरितां हा [कंट्री डीपॉप्युलेट्[4]] केलाच पाहिजे.

रामा.—एकूण प्रिन्सिपल्वर लोक मारायला डांक्तरी औषधांचा प्रचार जास्ती होणें जरूर आहे ?

पाट०—असें खरें.

विसा०—तें कांहीं असो. पण देशीं वैद्यांच्या हातून रोगी हटकून मरतात हें अगदींच खोटें. तरी पण या देशांमध्यें उत्तरोत्तर दारिद्र्य वाढत चाललें आहे या गोष्टीकडे बिलकुल लक्ष न पुरवितां देशी वैद्य रोग्यांस स्वतः औषधें देऊन त्यांस जगूं देतात हा त्यांचा अत्यंत अधमपणाच समजला

१. योग्य कारण पाहून. प्रिन्सिपल् झ. (शब्दशः) मूलतत्व.२. एकोणिसावें शतक. याला शास्त्रज्ञानाचें युग झटलें असतां ही चालेल. आणि शास्त्रें झटलीं झणजे त्यांत मूलतत्वें असावयाचींच. ३. सिद्धांत. ४. देश नष्टप्रज. (देशांतील सर्व लोक मारूनच टाकले पाहिजेत.)

पाहिजे नाहीं ?

रामा०—आणखी याकरितां तीं औषधें देण्याचें बंद करून महागाईचीं औषधें देऊन लोकांचें द्रव्य सर्व हरण करून घेतल्याशिवाय गत्यंतरच नाहीं. असेंचना पाटलोणराव ?

पाट०—द्रव्यहरणाचाहो काय संबंध ?

वासु०—संबंध ? संबंध म्हणजे असा. रोगी प्रिन्सिपलवर मारायचे तेव्हां त्यांच्यापाशीं द्रव्य राहूं देऊन काय करायचें आहे ? ते पुढें वायांच जाणार कीं नाहीं ? अहो; द्रव्यहरणामागून प्राणहरण हें होईलच आपोआप, हें का सांगायला पाहिजे ?

विसा०—आणखी हें द्रव्यहरण व्हावयाचें तें डाक्तरांकडूनच झालें पाहिजे, असेंचना ? तरीच डाक्तरांचीं पिलें अधिक अधिक प्रसवण्याविषयीं यूनिव्हर्सिटी आईचा प्रत्यहीं यत्न चालूच असून ती प्रतिवर्षीं अगदीं नाहीं तरी दहा वीस अधीं कच्चीं कशीं तरी पिलें बाहेर टाकीतच आहे ! आतां समजलों, ज्या कोणाला या देशाविषयीं अंतःकरणांतून प्रीतीचे व कळकळीचे कढ येत असतील, त्यांनीं या पिलांना अधिकाधिक द्रव्यप्राप्ति होत गेलीच पाहिजे ही गोष्ट कबूल करणें अगदीं जरूर आहे! परंतु वर्तमानकाळीं तसें घडत नाहीं, यामुळें त्यांचा स्वार्थ साधत नाहीं व एवढ्यासाठींच या वैद्यांचा मूळ रूपभेदच केला पाहिजे!

पाट०—विसाजी ! ही आज मराठी व्याकरणाचो उजळणी चालली आहे आहे वाटतें ! कांहीं असो. पण आज तुम्हीं फार फाजीलपणानें बोलायला लागलां आहां, पण पुरता विचार करा, तुम्हीं आजारी आहां, फार गमजा कराल, तर तुम्हांला इन्व्हॅलिड् करून चाकरीवरून केव्हांच उडवून देऊं समजूं सुद्धां देणार नाहीं !

विसा०—एकूण हा देखील उपकार आपण करायला चुकणार नाहीं ? शाबास धन्य आहे बोवा तुमची !

वासु०—हो बरें आठवलें. या इन्व्हॅलिडिंग्वरून मला डाक्तरांच्या सर्टिफिकिटाची आठवण झाली! कायद्यांत एक कलम घातलें आहे तेव्हां कीं अजारपणाचीं वगैरे सर्टिफिकिटें द्यायचीं तीं नोंदलेल्या डाक्टरांचींच पाहिजेत ! उद्यांपासून तुमचा धाकटा **नान्या** मराठी दुसरी यत्ता शिकते त्याला पडसें खोंकला येऊन तो शाळेंत गेला नाहीं, तर तुम्हीं बुध्यां आपलीं सगळीं कामें बुडवून नोंदीव डाक्तरांच्या घराचा तपास करीत फिरत जा बरें का !

रामा०—आतां आमचे **पाटलोणराव** डोक्यांत धूळ घालून घ्यायच्या बेतांत आले आहेत, त्यांना उगीच अधिक चिडवूं नका !

वासु०—तुम्हीं तरी चमत्कारिकच आहांहो **रामाजीपंत**! यांना कोण चिडवायला बसलें आहे ? हें कांहीं आजून एल्. एम्. झाले नाहींत, तेव्हां यांनीं आतांच काय म्हणून रागावावें ? होतील तेव्हांची पुढची गोष्ट! तिची पंचाईत आज कशाला पाहिजे !

पाट०—तुम्हीं आज आमची फारशी कुचाळी चालविली आहे ? तुम्हांला ह्या स्टिंकूचा प्रताप माहित नाहीं वाटतें? ऐशी लगावीन—

वासु०—लगावणार कोण तुम्हीं? (खो खो हंसतो.) गृहस्था ! अगोदरच अभ्यासानें डोळे खोल गेले आहेत, तरी अजून इतकी अंगांत धमक उरली आहे का!

---

१. चाकरीस अयोग्य.

१. यष्टीचा.

पाट०—तें कांहीं असो. तुम्हीं आपल्या पुरता विचार करा !

वासु०—हो. विचार तोच चालला आहे. आम्हांला औषध पाणी ह्मणें नको लागतें, तेव्हां तुम्हीं लौकर डाक्तर व्हा ह्मणजे झालें. तुम्हीं अभ्यासी आहांच, तेव्हां गुळाचा गणपति आणि गुळाच नैवेद्य व्हायला कांहीं फारशी अडचण नाहीं पडायची ! पण बावा एक—तुम्हीं आमचे स्नेही, तेव्हां तुम्हांला एक खुबी सांगून ठेवतों. भपका केला ह्मणजे प्रॅक्टिस् वाढते हें तुमच्या डाक्तरी शास्त्राचें मूळतत्व आहे, तेव्हां त्याकरितां तुम्हीं आपल्या दवाखान्याच्या पुढें चित्रविचित्र रंगांच्या कांचांच्या आडून चंद्रजोती जाळाल, आणखी आपल्या [बोटॅनिकल् गार्डन्] मध्यें दहा वीस तऱ्हेचीं अळवें लावून ठेवाल, तरच आम्हीं तुमच्याकडे येऊं. नाहीं तर नाहीं यायचे !

रामा०—आणखी दुसरें—तुम्हीं आपल्या दवाखान्यांत कंपौंडर ठेवाल तो तुमच्यापाशीं कांहीं थोडे दिवस राहून तुमच्या औषधाच्या मसलती सगळ्या शिकून घेईल, आणि मग तुमच्याशीं भांडून जाऊन डाक्तर या नांवानें नवीन दवाखाना ओपन्[२] करील, याकरितां कंपौंडराशिवायच प्रॅक्टिस चालवा !

वासु०—अहो, हा कायदा झाला ह्मणजे त्याची फारशी काळजी नको. त्याचा बंदोबस्त कायद्याच्या योगानें आपोआप होणारच !

रामा०—हूँ—

पाट०—करा बोवा थट्टा. देवानें तुम्हांला दिलीं आहेत तोंडें, तेव्हां त्याचा करा यथेच्छ उपयोग. तुम्हीं ह्मणतां याप्रमाणें आम्हीं विल तर करून चुकलों आहों खरें, आतां बोलून काय उपयोग ?

(इतक्यांत एक गुजराथी भडभुंजा डोकीवर पाटी घेऊन येतो.)

गुज०—(गातो) चणा ले जी चणा, चणा लेवोजी!
गजवामांथी दोडी निकलो आलो अमने जी!
चणा लिंबू लिंबू चणा भजिया चटणी जी!
चणा ले जी चणा, चणा लेवोजी !
ले रे गरमागरम मसालेदार !

रामा०—कां **वासुदेवराव**! कांहीं आहे का मर्जी, भजीं चटणी खायची ?

वासु०—आपल्याला कशाची हरकत नाहीं. बोलवा त्याला.

रामा०—भजीवाला ! आव इइआं आव !

भजी०—(पुढें येऊन) गजवामांथी दोडी निकलो अमने आलो जी, गजमांथी दोडी निकलो मने आलो जी !

रामा०—कायरे कशी दिली भजी ?—काय घेऊं का दोन आण्याची ?

विसा०—आपल्याला मुळींच नको बोवा. आपण आहों आजारी.

वासु०—भलत्याचें भलतेंच. डाक्तरी औषधें घेणाऱ्यांना कसलें कुपथ्य न् कसलें काय ? एक फ्लास्क् उडविला की चट सगळ्या कंप्लेंट्स्[३] जातात ! कां असेंचना आंग्लोव्हर्नाक्युलरराव !

पाट०—करा हवी तितकी थट्टा करा ! आपण इतःपर अगदीं बोलायचें नाहीं ह्मणून नेम केला आहे.

वासु०—करा बोवा, तुमची मर्जी ! बरें पण थोडी भजी सांगू का घ्यायला ?

पाट०—भलतेंच ! तुम्हांला **वासुदेवराव** ! का

१. औषधिसंग्रह केलेल्या बागेत. २ .सुरू.

१ बाटली. १. रोग.

वेड लागलें आहे ? या [डॅम्ड[1] फूल्स्ना कुकिंग्चीं प्रिन्सिपल्स्] मुळींच माहित नाहींत, यामुळें हे केव्हां पॉइझन्[2] करितील याचा नेम नाहीं! आपण तर असल्या जिनसांना मुळीं शिवत देखील नाहीं ! •

वासु०—तर मग तुम्हीं कसल्या जिनसांना शिवतां? बहुशः [मटन् चॉप ब्रदर्स[3] किंवा ब्रांडी ऍंड को]कडेच आपण दररोज जात असाल नाहीं ?

पाट०—तें दररोज कुठलें मिळायला म्हणा ! अहो, त्याला पैसे पुष्कळ पडतात, तेव्हां बहुशः खाणावळींतल्या जेवणावरच समाधान मानून घेतों.

वासु०—एकूण पैसा असला म्हणजे मीं आतां म्हटलेल्या ठिकाणीं जायला कांहीं हरकत नाहीं ?

पाट०—कांहीं नाहीं. त्यांत कसली आली आहे हरकत ? समाजाच्या मताप्रमाणें आम्हांला कशाची नड नाहीं.

वासु०—पण कसें कायहो ? तुमच्या खाणावळींतली बाई डाक्तरीण आहे नाहीं ? मला वाटतें तिची एल्. एम्. ची परीक्षा झाली आहे. तरीच ती सैंपाक करिते ! नाहीं तर तिला भाजीशास्त्राची न् फोडणीशास्त्राची माहिती कोठली ?

पाट०—हेंच तें चमत्कारिक. तुम्हीं कोणची ही गोष्ट अगदीं एक्सट्रीमला[4] नेऊन पोंचवितां ! मीं कधीं म्हटलें खाणावळींत जेऊं नये ? पण जेवण चांगलें मिळावें इतकेंच.

वासु०—तर मग त्याला सायन्सेस्चीं प्रिन्सिपल्स्च शिकत बसण्याची नाहीं फारशी जरूर. तीं सवईनें आपोआप बसतात. तीं बसायला डाक्तरी ज्ञानच नको. गुदस्तां का तिगस्तां एका डाक्तरानें एका वीस वर्षांच्या मनुष्याला म्हटलें, तुला फिजिऑलाजी[1] किंवा अनॅटेमी[2] याचें ज्ञान नाहीं, तेव्हां तूं आपल्या विवाहित स्त्रीशीं संभोग करूं नको ! कां आहे कीं नाहीं तान् ! अहो, युक्ती दहा बारा दिवसापूर्वी डाक्तरांची गुप्त मीटिंग् व्हावयाची होती, त्या दिवशीं सकाळीं एका डाक्टराच्या घरीं आमचा खंडया न्हावी गेला होता. त्यानें कुठें एका पोराचे खवडे कांपले होते, ते डाक्तरांना समजलें, तेव्हां त्यानीं न्हाव्याला खूप दम भरला, आणि म्हणाले, " थांबा गुलामांनो ! आतां न्हाव्यांविरुद्ध यंव कायदा करवितों, त्यंव कायदा करवितों ! न्हाव्यांचा धंदा करतां येण्यास डाक्तरी परीक्षाच दिल्या पाहिजेत "! असे कांहीं कांहीं नाताल नासूर बडबडत होते. तो न्हावी मला ही नक्कल सांगतांना एकसारखा पोट धरधरून हंसत होता. असो. पण चमत्कार पहा, हें जें नवीन बिल आज छापलें आहे, त्यांत याबद्दल देखील मागण्याचा त्यांचा विचार होता !

रामा०—मग तो बेत रहित झाला कशानें ?

भजी०—दादा! मारी शूं करवा खोटी करोछ? लेवुं हशो तो लेवोनी ! (रामाजीपंत भजी घेऊन त्याचे पैसे चुकवून देतात.) चणा लेजी चणा, चणा लेवोजी !

(इत्यादि प्रकारें गातगात निघून जातो.)

रामा०—हो आपलें बोलणें कुठपर्यंत आलें होतें?

वासु०—तुम्हीं विचारलेंत न्हाव्यांविरुद्ध कायदा करण्याचा बेत कशानें रहित झाला ?—

---

१ गद्ध्यांना सैंपाक शास्त्राचीं मूलतत्वें. २. विष (घालतील.) ३. इंग्रजी फराळाचीं दुकानें. ४. कडेला.

१. शारीररचनाशास्त्र. २. आंतर रचनाशास्त्र.

हो मघां तुह्मांला तो श्लोक ह्मणून दाखविला, त्या डाक्तरांच्या घरीं याबद्दल सहज गोष्ट निघाली होती, तेव्हां ते ह्मणत होते की हें प्रपोजल[1] करण्याचें डाक्तर ज्ञ नीं नाकारिलें

विसा०—त्या वेळीं तुमचे डाक्तर काय ह्मणत होते ?

वासु०—ते काय ? हें असेंच वेडेंवांकडे कांहीं तरी ! पण त्या वेळीं गंमत काय विचारतां ! माझें तोंड तें, जेव्हां का एक नामावळी जपली तेव्हां डाक्तर पोट धरधरून हंसले !

विसा०—ती नामावळी आह्मांला तरी ऐकूं द्या

वासु०—तेव्हांची गंमत कांहीं आतां यायची नाहीं. तथापि तुह्मांला मी काय ह्मटलें ते थोडक्यांत सांगतों. मी ह्मटलें. "खरें आहे डॉक्टर साहेब! याबद्दल कायदा जरूर पाहिजे. पण एवढ्यानेंच पुरे व्हावयाचें नाहीं डाक्टरांच्या धंद्याशीं साक्षात् रीतीन विरोध करणाऱ्या वैद्यांच्या धंद्याविषयीं तर कायदा होतोच आहे, पण त्यासा इतर धंद्यांविषयींही पाहिजे. न्हावी, परीट, चांभार, भंगी सुतार, गवंडी, सोनार, माळी, आचारी, पाणके, भटुरडे इत्यादिक हरएक धंद्यांत जे लोक आहेत ते सारे चोर असून त्यांस पदार्थविज्ञानशास्त्र, शारीरशास्त्र रसायनशास्त्र, वनस्पतिशास्त्र, भूगर्भशास्त्र शस्त्रक्रिया इत्यादिकांची बिलकुल माहिती नसून हे चोर ज्या धंद्यांची मोनॉपेली तुमच्या लोकांची असणें जरूर आहे ते धंदे आपण स्वतःच करतात, व त्यायोगानें तुमची पोटगी बुडते. न्हाव्यांना शस्त्रक्रिया ठाऊक नसते. परटांना वस्त्राचें शोधन ह्मणजे काय याची कल्पनाही नाहीं. चांभारांना पायाचा तळवा व त्याच्या आसपासचे भाग यांची शास्त्रीय रीतीची संगति अवगत नाहीं. भंग्यांना तारतखाने साफ ठेवण्याचे प्रिन्सिपल्, ते साफ न ठेविल्यापासून होणारे परिणाम, यांचा गंधही नाहीं. सुतार, गवंडी या लोकांना घराचीं कामें करतांना सॅनिटरी[2] शास्त्राच्या खुब्या कोणत्या याचें बिलकुल ज्ञान नाहीं. माळी व आचारी यांनीं वनस्पति व भाजीशास्त्रांचें मुळींच अध्ययन केलें नाहीं. तसेंच आचाऱ्यांना आणि पाणक्यांना रसायनशास्त्राचे निरनिराळे व्यापार, ऑक्सिजन् व हायड्रोजन् वायूपासून जलोत्पत्ति, इत्यादिकांचीं बिलकुल ओळख नाहीं. भटुरडे यज्ञयागादि कर्मांत शास्त्राच्या अज्ञतेमुळें नानाप्रकारचे अनर्थ करून सोडतात. तेव्हां या इतक्या सर्वांचा अवश्य बंदोबस्त झालाच पाहिजे. तसेंच बुचर ह्मणजे खाटिक लोक, यांना शस्त्रविद्या, पशुादिशास्त्र, यांची बिलकुल ओळख नसते. यामुळें मोठ मोठाले अनर्थ होतात.—

सर्व०—(पोट धरधरून हंसतात.)

रामा०—असो. त्याचा अजमास समजला. चला आतां उशीर होत चालला. भजी खाऊन लौकर जाऊं या.

(भजी खातात. इतक्यांत डाक्तर ज्ञ न्या वाटेनें येतात.)

डा० ज्ञ—(पाटलोणवाल्याकडे पाहून) कायरे घरीं जायची नाहीं का वेळ झाली!

पाट.—झाली कीं. पण सहज आजच्या छापील बिलाबद्दल गोष्टी बोलत बसलों होतों. (नम्रपणानें) डाक्तर साहेब! आपणाला कसें काय वाटतें,

१. सूचना. २. अमक्यांशिवाय दुसऱ्या कोणीं तो धंदा करूं नये असा नियम.

१. प्रकृतिसंरक्षण.

तें बिल पसार होईल ?

डा० ज्ञ०—चला इथें थाबलांका? वाटेनें जातां जातां बोलूं.—मलानाहीं वाटत तें बिल पास होईलसें. कारण आर्य वैद्यक कितीही अपूर्ण असलें तरी साधारण रोगी बरे करण्याच्या कामीं त्याच्या पुढें म्लेंच्छ वैद्यकाच्यानें टिकाव धरवणार नाहीं. शिवाय औषधांकरितां डाक्तरांना आरबी समुद्राकडे तोंडें करून बसावें लागतें यामुळें औषधांचे चार्जेस् जबर होतात, पण ते देण्यास लोकांचे अंगीं सामर्थ्य नाहीं. आणखी घटकाभर तें आहे असें मानिलें तरी लोकसंख्येच्या मानानें डाक्तरांची संख्या फारच अल्प आहे. याकरितां निदान सांप्रतकाळीं तरी हा कायदा करून देशीवैद्यक बुडविणें हा अधर्म होईल असें मी समजतों.

(सर्वजण बोलत बोलत निघून जातात.)

अंक ३.

प्र० १. एक देशी वैद्यकशाळा.

(एका अंगास एक पाळ हंतरलें असून त्यावर काहीं विद्यार्थी पोथ्या व वुकें घेऊन बसले आहेत. व दुसरे भिंतीशीं लोडाशीं टेंकून दोन तीन वैद्य वं शास्त्री बसले आहेत.)

१ वि०—गुरुजी, हा श्लोक नीट समजला नाहीं, किरून सांगा.

१ वैद्य—समजलाच पाहिजे. नाहीं समजला कसा. वाच पाहूं श्लोक एकदा.

१ वि०—(श्लोक वाचतो.)

श्लोक.

हेतुव्याधिविपर्यस्तविपर्यस्तार्थकारिणाम् ।
औषधान्नविहाराणामुपयोगं सुखावहम् ॥
विद्यादुपशयं व्याधेः स हि सात्म्यमिति स्मृतः ।
विपरीतोऽनुपशयो व्याध्यसात्म्यमिति स्मृतः ॥

१ वैद्य—मग यांत काय कटीण आहे ? सर्व बरोवरच आहे. चल पुढला श्लोक वाच.

१ वि०—पण शास्त्रीबाबा ! या ठिकाणीं समास बरोबर समजत नाहीं.

१ वैद्य—चालूं दे. यांवूं नको. आतां उशीर होत चालला. होऊं दे पुढला श्लोक. हं.

१ वि०—नाहीं, पण, एवढा समास सांगाच शास्त्रीबोवा !

२ वैद्य—कोण मूर्ख आहेसरें तूं ? आह्मांला समास विचारतोस ते आह्मीं वैय्याकरणी थोडकेच आहों. व्याकरण ह्मणजे तें शास्त्र काय, त्यांतले ग्रंथ केवढे, त्याची योग्यता केवढी, त्यांतलीं नुसतीं पहिलीं चौदा सूत्रें सांवाच्या ढक्केंतून निघालीं! 'नृत्यावसाने नटराजराजो ननाद ढक्कां नवपंचवारं!' हं चालूं दे पुढचा श्लोक.

२ वि०—शास्त्रीबोवा ! पतन् आणि तरुः याचा संधि काय होतो ?

१ शास्त्री—तुझ्या बुकांत काय लिहिलें आहे?

२ वि०—तेंच नीट समजत नाहीं. यांत 'त'वर कसलासा अनुस्वार दिला आहे.

१ वैद्य—तें बरोबरच असेल. तूं तसेंच पाठ कर ह्मणजे झालें.

२ वि.—तें खरें, पण हा संधि बोलूं कसा शास्त्रीबोवा? पहायला पाहिजे तर हेंच्या बुक.

१ शास्त्री—बुक नको. आह्मीं बुकाला शिवत नसतों. तशांतून आज मी आरशी आणायला विसरलों. नाहीं तर कदाचित् पाहून सांगितलें असतें.

सर्व वि०— (हंसूंलागतात) शास्त्रीबोवा! आरशी तर ती नाकावरच आहे !

१ शास्त्री—(रागावून) गप्प बसा पोरांनो! तुह्मांला तोंडाची टर मात्र कशी तेव्हांच उडवितां

येते. बाकी लक्षपूर्वक शिकण्याच्या नांवानें अर्जुनवाद्य ! अरे आह्मीं कसे झालों तरी वैद्य, आह्मांला लिहितां वाचतां येण्याची मुळींच जरूर नाहीं! प्राचीन काळापासून आमचीं कामें तोंडपाठ करायचीं ! तेव्हां कोण लेक कशाला वाचायला शिकतो आहे? तरी पण अगदींच तसें बोलायचें नाहीं म्हणून आरशी नाहीं म्हणून झटलें, पण चावनट पोरें तुह्मीं, तुह्मांला तेवढें देखील खपलें नाहीं.—चालूं देरे वांच पुढचा श्लोक!

१ वि०—पण शास्त्रीबोवा ! समास तसाच सांगायचा राहिला. त्याचा बरोबर अर्थ कळला नाहीं.

१ शास्त्री—फिरून तेंच !—अरे, सगळें त्यांतल्या त्यांतच बरोबर आहे. हं पुढें !

१ वि०—अरें शास्त्रीबोवा ! हा समास उद्यां सांगालना ?

२ शास्त्री—तूं मूर्ख आहेस. असून संस्कृत पहिलें पुस्तक संपलें नाहीं, इतक्यांत चालला समास विचारायला.

३ वि०—हो, गुरुजी ! बरी आठवण झाली, काल व्याख्यान झालें त्यांत त्यांनीं स्थितिस्थापकताधर्माबद्दल कायसेंसें सांगितलें, आणखी उदाहरणेंही दिलीं. पण तीं मला बराबर कळलीं नाहींत.

१ वैद्य—अरे, त्यांत कांहीं अर्थ नाहीं. तें अगदींच सोपें आहे.—हं तूंरे—तुझें चालू दे पुढें.

३ वि०—पण शास्त्रीबोवा ! तुह्मीं मला नाहीं सांगितलें ? स्थितिस्थापकतेचें एकादें उदाहरण सांगाल तर बरें होईल.

३ शास्त्री—अः त्यांत काय आहे? मी एक सोडून पन्नास उदाहरणें देईन ! ऐक. स्थितिस्थापकता म्हणजे नूतन आगंतुक स्थिति जाऊन आदिम स्थिति येणें. याचें उदाहरण. तूं फार लठ्ठ झाला आहेस. कशानें ? अंगांत रक्त फार झालें आहे त्यामुळें. तेव्हां तुला ताप आला, आणि त्याच्या दाहानें रक्त जळून गेलें, म्हणजे तूं बारका होतोस. त्याचें नांव स्थितिस्थापकता. पाहिजे तर दुसरें उदाहरण घे. आपलें घरचें मीठ असतें हें, त्यांत पाणी घातलें म्हणजे तें होतें पातळ. झाल पातळ म्हणजे तापवावें, म्हणजे पाणी जळून जाऊन खालीं फिरून मीठच्या मीठ कायमच रहातें ! कां समजलास?

३ वि०—समजलों. पण त्यांनीं रबराचें उदाहरण दिलें होतें, तें नाहीं नीट समजलों.

३ शास्त्री—अरे, तें इंग्रजी मतांतलें उदाहरण आहे. तें आपल्या उपयोगाचें नाहीं. तें हत्तीच्या वृषणापासून केलेलें असतें, म्हणून अशुद्ध! त्याचा ब्राह्मणांनीं उच्चारही करूं नये !

१ वि०—कशाचा उच्चार ब्राह्मणांनीं करूं नये शास्त्रीबोवा ?

३ शास्त्री—अरे, हत्तीच्या वृषणाचा !

१ वि०—आणखी शास्त्रीबोवा! तुह्मीं केलात तो!

(सर्व विद्यार्थी खदाखदा हंसूं लागतात.)

(इतक्यांत अरेराव सकटताडी व शिपाई येतात)

अरे०—शास्त्रीबोवा नंबर२! तुह्मांला मंडळीकडून एक रुपया, या शिपायाला आठ आणे, आणि या पगारी विद्यार्थ्यांना चार चार आणे याप्रमाणें दंड करण्यांत आले आहेत.

२ शास्त्री०—तें कां बरें ?

अरे०—मघांशीं ते आपल्या मंडळीचे कुबेर इथें आले होते न् मी कुठें आहे म्हणून विचारीत होते, त्या वेळीं मी बाहेरच्या खोलींत बसलों होतों. असें असून तुह्मीं कोणींच त्यांना मी तिथें आहें म्हणून सांगितलें नाहीं, त्याबद्दलचा दंड पगार वाटण्याच्या वेळीं

कांपून घेण्यांत येईल !

शि०—राव्हसाब ! त्यें खरं, पन मास्नी का टावं तुमी तर्त हां त्यें ! मी ह्मंगालो, तुमी रोज-च्याच वानी कुटं गांवामंदी भटक्या मारायाँ ग्येलांसाल ! मास्नी का टावं ?

अरे०—बस बस ! तोंड आटप, फार बोलशील तर शेटकडून तुला डिचार्ज दिला जाईल.

(इतक्यांत विज्ञशास्त्री येतात.)

विज्ञ०—कां शास्त्रीबोवा ! आज दंगासा चालला आहे ?

२ शास्त्री—तें या अरेरावांना विचारा. हे या या पोरांदेखत आह्मांला भलभलतें बोलतात, काढून टाकीन ह्मणून धमकी देतात, अशानें पोरांवर आमचें वजन तें कसें रहावें?—विज्ञशास्त्री ! तुह्मींच विचार करा, जसे हे तसेच आह्मीं, यांना आह्मांला काढून टाकण्याचा अधिकार कोणीं दिला आहे ? आंह्मीं लोकांसारखे दोनशें अडीचशें रुपये पगार थोडकाच मागतों. साऱ्या पंचवीस नाहीं तर तीस रुपडया पगारावरच रात्रंदिवस मेहनत करितों. ह्मणन आंह्मांला कांहींच का मान नसावा?—शास्त्रीबोवा! तुह्मींच याचा विचार नीट करा, नाहीं तर या गुरमीचा परिणाम फार वाईट होईल !

विज्ञ०—शास्त्रीबोवा ! ऊं:—त्यांत कांहीं अर्थ नाहीं, बोलेल तें करील काय न् गर्जेल तें पडेल काय ही ह्मण तुह्मांला ठाऊक आहेच. त्यांतलीच ही स्थिति ! तुह्मीं स्वस्थ रहा. त्यांच्यानें कांहीं व्हायचें नाहीं.

अरे०—विज्ञशास्त्री ! आज तुह्मींही यांच्याच नादाला लगून हवें तसें बोलूं लागलां वाटतें ! बरें असो. पाहून घेतां येईल—! शास्त्रीबोवांची स्वतःची विद्वत्ता किती आहे ती मला ठाऊक आहे. रिकमेंडनें लागले ह्मणून लागले. बाकी " रामो हरी करी भू भू " तरी पुरतें येत असेल कीं नाहीं कुणाला ठाऊक! तथापि दांत आपले आणि ओंठ आपलेच अशा समजुतीनें यांच्या विद्वत्तेवर पांघरूण घालून आह्मीं कांहीं बोलत नाहीं. बाकी काय ?

विज्ञ०—(हंसून) वाः अरेराव ! एकून तुह्मांला रुपावळी फार चांगली शुद्ध पाठ आहे !

अरे०—तुह्मीं आमचें सोडून द्या. आह्मीं सकटताडो, वैद ! आह्मांला रुपावळी घेऊन काय करायची आहे ? विद्येचा आणि आमचा संबंध नाहीं, ह्मणून तर आह्मीं आपल्या नांवापुढें " डाक्तर " लिहितों !

विज्ञ०—तें तुह्मीं काय पाहिजे तें करा, परंतु तुह्मीं या कामांत अगदीं वेडे आहांत, आपल्या अंगीं विद्वत्ता नाहीं तर दुसऱ्याशीं उगीच भांडूं तरी नये !

अरे०—विज्ञशास्त्री ! तुह्मीं मला ह्मणतां, पण तुह्मीं स्वतः कितीसे विद्वान आहां ?

विज्ञ०—अरेराव ! आह्मीं खरोखरी नांवाचे शास्त्री कांहीं थोडें वैद्यक पाहिलें आहे इतकेंच. अहो, ही गृहच्छिद्राची गोष्ट आहे ह्मणून बोलूं नये, पण मला खरोखरीच सांगा, आज आपल्या लोकांत जितके वैद्यकीचा धंदा करणारे लोक आहेत, त्यांमध्यें खरोखर पढिक असे कितीसे निपजतील ? आज आमच्या वैद्य लोकांत असे कित्येक लोक सांपडतील कीं त्यांनीं चरक, सुश्रुत, वाग्भट ही नांवें सुद्धां ऐकिलीं नाहींत. कित्येकांना फार फार झालें तर वैद्यजीवन ग्रंथ कांहीं थोडा

१. शिफारस (रिकमेंडेशन्.)

ठाऊक असतो. बाकी बाडें जमा करून त्यांवरच त्यांची वैद्यक्रिया चालते. आत या जाडांत ह्मणजे सर्वच गप्पा असतात असा प्रकार नाहीं, तरी पण ती वैद्यकी पक्की नव्हे, कच्ची ! असो. चाललेंच आहे. त्याबद्दल आपआपसांत तंटा करण्यांत अर्थ नाहीं.—बरें पण हो, आतां बरी आठवण झाली. आज धन्वंतरींचें व्याख्यान व्हायचें होतें नव्हे का ?

अरे०—होय. पण आज त्यांची कसलीशी एक डोळ्याच्या रोग्याशीं मारामारी झाली त्यामुळें आजचें व्याख्यान तहकूब आहे.

विज्ञ०—काय ? आपल्या धन्वंतरींनीं रोग्याशीं मारामारी केली ? असा रोगी तरी बोव कोण आणि मारामारी तरी कशाकरितांझाली ?

३ वैद्य—जाऊं द्याहो. त्याची कुणाला पंचाईत कशाला पाहिजे? बरें कसें काय? आजवर्तमानपत्रांत कांहीं कमजास्त मजकूर आहे का? मागच्या खेपेला त्या पुण्यजनांच्या पत्रांत देशी वैद्यांची पुष्कळच निंदा छापली होती !

अरे०—त्याचा यथेच्छ पूजा कालच्याच चंद्रोजेड पत्रांत केली आहे. ती आतां वाचून दाखविली असती, पण तें पत्र आपले देवशास्त्री घेऊन गेले आहेत.

विज्ञ०—बरें असो. तें पत्र मला संध्याकाळीं जरूर वाचायला पाठवून द्या बरका. विसरूं नका.

अरे०—ठीक आहे.

विज्ञ०—बरें, पण त्याचें कसें काय झालें? डाक्तरांनीं असाध्य ठरविलेले रोगी देशी वैद्यांनीं देशी औषधांनीं बरे केल्याचीं उदाहरणें मागें एकदा वर्तमानपत्रांत पुष्कळशीं छापलीं होतीं त्यांपैकीं कोणाला बक्षिसें पिळाल्याचें कांहीं लिहिलें आहे ?

अरे०—छे शास्त्रीबोवा ! ते कसलें बक्षीस देतात ? न् तुम्हीं काय उगीच भ्रमांत पडलां आहां ? अहो, तुम्हांला ठाऊक नाहीं, त्यांनीं पर्वांच्या पत्रांत 'असाध्य' शब्दाचा अर्थच फिरवून टाकला आहे !

विज्ञ०—तो कसा काय ऐकूं द्या तर खरा.

अरे०—त्यांचें तें लिहिणें मला देखील नीटसें समजलें नाहीं, पण ते कायसेंसें साध्यकोटि आणि असाध्यकोटि असें ह्मणतात. हो, आणखी हा एक नवीन चमत्कार ऐकलात का ? ते ह्मणतात रोग मुळींच औषधापासून बरे होत नाहींत !

विज्ञ०—आह्मांला तरी खरें काय माहित आहे ह्मणा. पण एकूण बक्षिसें देण्याचा अखेर बाजाच वाजला !

२ वैद्य—अहो, तें तसें व्हायचें हें आह्मांला अगोदरच ठाऊक होतें !

विज्ञ०—बरें झालें, एवढ्यांतच कळलें, नाहीं तर माझ्या कराचीच्या भाचाचें उदाहरण मी उद्यां पत्रांत छापविणार होतों.—पण काय हो, तुम्हीं काल कायशीशी एक क्यामिटी भरायची बातमी आणली होती, तिचें कसें काय !

अरे०—अहो ती कसची क्यामिटी ? तींत अर्थ काय ? तिच्यांत वैद्यांचें किंवा डाक्तराचें मुळींच नांव नाहीं. दहा वीस असामी असेच गोळा करून न्यायचे. एकालाही डाक्तरगिरीचें किंवा वैद्यकीचें ज्ञान नाहीं, न् त्यांच्या समोर डाक्तरांनीं अमुक रोगी असाध्य ह्मणून सांगायचें, आणि मग देशी वैद्यांना ह्मणायचें करा हा रोगी बरा. पण गंमत काय आहे पहा, वैद्यांनीं तो

रोगी बरा केला अगर न केला, तर त्याचें ज्ञान या कमिटीला होण्याच्या नांवानें शून्य. मग डाक्तरांनीं खुशाल यस्फयस् करावें आणि म्हणावें रोगी बरा नाहीच झाला!

विज्ञ०—असें खरें. त्या आंगठ्याच्या रोग्याची अशीच गंमत नाहीं का झाली?—बरें अगोदर आतां वाजले किती?

अरे०—पांच वाजून गेले. चला जारे पोरांनो तुम्हीं! तुम्हांला सुट्टी! (*विद्यार्थी जातात.*)

२ शास्त्री—बरें पण, ही अैरेरावी अशीच का पुढें चालायची?

अरे०—शास्त्री नं० २! तुम्हीं गमजा करूं नका. तुम्हांला त्या रिकमेंडचा जोर वाटत असेल, पण तुम्हीं खूप समजून असा एक हुकूम लिहीन तर तुम्हांला अध्यक्ष उपाध्यक्षांसुद्धां मंडळींतून उडवून देईन.

३ शास्त्री—त्या गप्पा राहूं द्या. स्वारी! फार गमजा कराल तर तुम्हांवरच मंडळीच्या बाहेर जाण्याची पाळी येईल.

अरे०—ठीक आहे. येऊं द्या. आलोच तर मी नवीन वैद्यांची सभा काढीन. मग ह्या हल्लीं जमलेल्या पैशाच्या नांवानें घण घण घंटा!

विज्ञ०—**अरेरव!** तुम्हीं चुकतां. हल्लीं हा वैद्य आणि डाक्टर यांबद्दलचा वाद निघाला आहे, अशा प्रसंगीं आपणच जर आपआपसांत भांडूं लागलों, तर त्यापासून लाभ न होतां उलटा तोटा मात्र होईल. दादाचं बळ बहिनीला माहित, त्यांतली झाली आहे आमची स्थिति. आम्हीं डाक्तरांना दूषणें देतों, परंतु त्यांचें सगळेंच म्हणणं अयथार्थ आहे असें नाहीं. आतां त्यांच्या मंडळांत असतील कित्येक काजील, ते धाडसानें म्हणतील, देशी वैद्यक हें वैद्यकच नव्हे, त्याला शास्त्राची योग्यता नाहीं, तर खुशाल म्हणोत. आपणाला त्यांशीं कर्तव्य नाहीं. परंतु आपल्या बिजारीला आपणच ठिगळ लावून घेतलें पाहिजे. आपल्या शास्त्रांतील प्राचीन ग्रंथांचें यथोचित परिशीलन आपण करावें हाच मार्ग उत्तम. हे डाक्तर आमच्या लोकांस दूषणें देतात, पण त्यांनीं तीं दिल्यापासून एका अर्थानें आपल्या शास्त्राचा जीर्णोद्धारच होत आहे म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं, व याबद्दल त्या डाक्तरांचे सर्वांनीं उपकारच मानिले पाहिजेत.

अरे०—(*मनात कांहीं पुटपुटतो.*) बरें बरें चला शास्त्रीबोवा! उशीर होत चालला.

विज्ञ०—ठीक आहे. उद्यां गांठ पडेलच. काढा तुमच्या पासली वर्तकी तबकीर!

(*सर्वजण तबकीर ओढून शिकादेत देत निघून जातात.*

प्र० २.—डाक्तरराजांचें घर.

(*डाक्तरराज एकटेच विचार करीत बसले आहेत.*)

डाक्त० रा०—(*आपणशीं*) कटीण! आपलें नशीबच खोटें! सरकारांतून अखेर कायदा होत नाहींम्हणून रेझोल्यूशन देखील झाला म्हणून ऐकतों—!असो; पण एवढ्यानेंच काय झालें आहे? जरी वर्तमानपत्रकर्त्यांनीं आम्हांला चोहींकडून अगदीं मंडावून सोडलें आहे, तरी त्या आमच्या प्रेषितानें अज्ञानोजेडांत चांगली गर्दी उडवून दिली आहे, एवढ्यानेंच आम्हीं संतुष्ट आहों. तरी पण त्यानें लिहिण्यांत एक मोठी चुकी केली. पहिल्या बिलांत वैद्यांविरुद्ध किंवा त्यांच्या वैद्यकाविरुद्ध साक्षात् लेख नसून तो बुळ्यां मुग्धच ठेविला होता, तो त्या बेटग्यानें लिहिण्यांत घसरून अगदीं उघडकीस

१. ठराव.

आणिला. त्यामुळें आमचें वजन आपोआप कमी झालें. त्याला इलाज नाहीं. असो. आजपर्यंत उभयपक्षांचा लेखी वाद चाल-ल्यामुळें विरुद्धपक्षानें बाजू जिंकली, पण आज समक्ष गांठ पडली ह्मणजे 'असाध्य' शब्दाच्या अर्थाच्या गोत्यांत आणल्याशिवाय बिलकुल सोडीत नाहीं. ते बोलून चालून वर्तमानपत्रकर्ते, त्यांच्याकडे वैद्यांनीं वारंवार जाऊन त्यांचें डोकें फिरवून टाकिलें आहे, परंतु आज त्यांना 'असाध्य' शब्दाच्या अर्थाच्या नागमोडींत गोंधळून टाकिल्शिवाय नाहींच रहात ! (मिशावर ताव देऊन) कायरे, कोण आहे तिकडे ! धांदले ? (धांदल्या आत येतो.) कायरें, या यादींत लिहिलेल्या सर्वांना आमंत्रणें बरोबर केलीं आहेत ?

धांद०–होय. केलीं आहेत.

डा० रा०–ठीक. आज मंडळी जमायची टाईम केव्हांची लिहिली आहे ?

धांद०–अशी तीन साडे तीन वाजतां.

डा० रा०–[व्हॉट्'स् दि टाइम् प्रे ?]

धांद०–[इट् इज्[1] –पाहून सांगतों–[इट् इज् थ्री मिनिट्स् पास्ट् ट्वेंटिसेव्हन् !]

डा० रा०–(रागावून) कायरे, शुद्धीवर आहेसका ?

धांद०–[नो–नो[4]–सर्] ट्वेंटिसेव्हन् मिनिट्स् पास्ट् थ्री.]

डा० रा०–चल, चालता हो. रिपोर्टरला बोलाव.

(धांदल्या हमालाला घेऊन येतो.)

धांद०–हा पोर्टर आणला !

१. किती वाजले? २. वाजले.– ३. सत्तावीस वाजून तीन मिनिटें झालीं. ४. चुकलों चुकलों. तीन वाजून सत्तावीस मिनिटें झालीं. ५. लिहून घेणाराला.

डा० रा०–(हातपाय हालवीत) फूल ! रिपोर्टरला बोलाव. [आय् डोंट वांट पोर्टर्.] (हमाल जातो, व रिपोर्टर बुक घेऊन घेऊन रिपोर्ट घेण्याकरितां बसतो.)

(इतक्यांत कांहीं गृहस्थ येऊन बसतात.)

१ गृह०–कां डाक्टरसाहेब ! आज इतक्या मंडळीना कुणीं बोलावलेंसें ?

डा० रा०–काम अशांतलाच कांहीं प्रकार नाहीं. सहज गप्पा झोंकीतच बसायचें, पण विषय मात्र हल्लींचा डाक्टरी व वैद्यांचावद.

२ गृह०–ठीक आहे. पण याचा उद्देश कळला ह्मणचे बरा.

डा० रा०–असें आहे. वर्तमानपत्रांतून वैद्यांनीं असाध्य रोगी बरे केले ह्मणून लेख आले आहेत, तें खोटे इतकेंच ठरवावयाचें आहे.

१ गृह०–तर मग त ठरवायला ते रोगी प्रत्यक्ष आणून तपासले पाहिजेत. त्याशिवाय हा निकाल लागायचा नाहीं.

डा० रा०–छे हो. त्या रोग्यांबद्दलच्या उगीच बाता आहेत. त्यांना डाक्टरांनीं कधींच असाध्य ठरविलें नसेल, आणि तशांतून तसें ठरविलेंच असेल, तर ती ठरविणारांची इंडिव्हिज्युअल् चूक आहे. युरोपियन शास्त्राची नव्हे, हेच खचित.

६ गृह०–ह्मणजे हा मोठाच चमत्कार ! डाक्टरांनीं असाध्य ह्मटलें असतां त्यांच्या चुकीचा बोजा जर व्यक्तीवर घातला, तर लोकांनीं डाक्टरांच्या असाध्य ह्मणण्यावर विश्वास तरी कसा ठेवावा !

डा० रा०–अहो, त्यांतलें वर्म फक्त इतकेंच आहे, कीं वॉर्डांत पेशंट असतात, त्यांना वाटतें आपण तोंवडतोंव बरें व्हावें, त्याप्रमाणें ते

१. मूर्ख! २. मला पोर्टर (हमाल) नको. ३. व्यक्तिमात्राची. ४. रुग्णालयांत (रोगिशाळेंत). ५. रोगी

लोकर बरे न झाले, झणजे डाक्टरांवर विनाकारण रागावतात, तेव्हां डाक्टरही संतापून झणतात, जा तूं बरा होणार नाहींस, तूं असाध्य आहेस. हें कायतें यांतलें वर्म आहे. दुसरें कांहीं नाहीं.

२ गृह०—कबूल. पण हें झणणें केव्हां शोभेल, रोगी वाडींत थोडके दिवस राहिला असेल तेव्हां. पण पुष्कळ दिवस, पुष्कळ वर्षे, रोगी डाक्टरांच्या केयर्[1] खालीं असूनही बरा होत नाहीं, तर मग त्याला असाध्य न झणावें तर कसें ?

डा० रा०—कांहीं झालें, तरी आह्मीं डाक्तर त्यास असाध्य झणून कधीं झणणार नाहीं.

८ गृह०—हें झणणें दुराग्रहाचें दिसतें. बरें, पण डाक्तरसाहेब ! आपल्या शास्त्राप्रमाणें प्रकृत 'असाध्य' शब्दाचा अर्थ तरी काय ?

डा० रा०—त्याचा अर्थ इतकाच, कीं शरीरांतील एकादा अवयव रोगानें गळून गेला असतां तो औषधानें पुनरपि उत्पन्न करितां येत नाहीं, झणून त्याला आह्मीं असाध्य झणतों, व तो जर औषधानें परत उत्पन्न करितां आला तर त्यास आह्मीं साध्य झणूं.

७ गृह०—एकूण डाक्तरसाहेब ! देशीवैद्यांकडे असाध्य रोगी द्यावयाचा तो अशाच प्रकारचा वाटतें ! झणजे उदाहरणार्थ एकाद्याचे कान सडून गेले असतां देशीवैद्यांच्या औषधांनीं ते फिरून नव्यानें आंतून फुटले पाहिजेत असें आपलें झणणें!

डा० रा०—तें तर उघडच आहे.

४ गृह०—पण ही गोष्ट प्रत्यक्ष सृष्टिकर्त्या ब्रह्मदेवाच्या तरी हातून होऊं शकेल असें तुह्मांस वाटतें?

डा० रा०—नाहीं. आणि त्याकरितांच तिला आह्मीं असाध्य झणतों.

१ कृमि०—आपला हाच जर अर्थ खरा असेल, तर निदान वर्तमानपत्रकर्त्यांनीं तरी हा इतका लांबचा अर्थ मनांत आणिला नसेल असें मला वाटतें.

डा० रा०—नसेल झणून आह्माला तसें मानण्यास प्रत्यवाय कोणता ?

२ गृह०—एकूण ही गोष्ट आपल्या खुषीची आहे असें आपलें झणणें !

डा०रा—होय. पण तसें कशाला ? ते वैद्यांचा पक्ष घेऊन भांडतात तेव्हां त्यांच्याच "शास्त्र" झटलेल्या शास्त्रांत रोग तीन प्रकारचे झणून झटलें आहेः-साध्य,असाध्य आणि कृच्छ्रसाध्य, तेव्हां डाक्तरांनीं सोडलेले रोगी वैद्यांनीं बरे केले असें आह्मीं नाहींच मानणार. तथापि घटकाभर मानलें, तरी आमचें झणणें हें कुठें चुकतें आहे कीं वैद्यांनीं असाध्य झणून झटलेले रोगी बरे केले, तें मूळचेच साध्य कोटींतले, किंवा फार तर कृच्छ्रसाध्य कोटींतलेच होते झणून बरे झाले ?

४ गृह०—तें खरें, पण आर्य वैद्यक ग्रंथांतून असाध्य झटलेले रोगी बरे करण्यास देशी वैद्य मुळींच धजत नाहींत, व कदापि धजणारही नाहींत. त्यांच्या हातून रोगी बरे होतात ते त्यांच्या शास्त्रोपकीं साध्य किंवा कृच्छ्रसाध्य या दोन कोटींपैकींच कोणच्या तरी कोटींतले असतात. असें असून ते असाध्य रोगी बरे करितात असें झणणें, त्याचा इतकाच अर्थ समजावयाचा कीं, जे रोगी आर्य वैद्यकशास्त्राप्रमाणें साध्य किंवा कृच्छ्रसाध्य असूनही डाक्तरांस असाध्य असतात, तेच ते कधीं कधीं बरे करितात!

१. लक्ष, नजर.

डा. रा०–(तोंड वाईट करून.) एकूण आजपर्यंत नुसत्या असाध्य शब्दावर जोर देऊन आम्हीं भांडलों तें व्यर्थच ? [आं मां!]

४ गृह०–अर्थात् ! 'असाध्य' याच्या ठिकाणीं 'डाक्तरांस असाध्य' असें समजावयास पाहिजे होतें म्हणजे सर्व संगति जमली असती.

डा. रा०–(डोकें खाजवीत.) हायहाय ! एकूण आर्य वैद्यकापेक्षां आमचें डाक्तरी शास्त्र कमी योग्यतेचें ठरलें काय? [गुड्[1] ग्रेशस्[2]!]

१० गृह०–डाक्तरसाहेब ! आपण यांत विवाद मानण्याचें बिलकुल कारण नाहीं. वस्तुतः आपलें शास्त्र कमी योग्यतेचें असेंच कांहीं मानायला नको. दोन्ही शास्त्रेंच आहेत, व दोन्हींची योग्यता वस्तुतः सारखीच आहे एवढाच कायतो यांतला अर्थ असावा. फार तर एवढाच अर्थ यांत असूं शकेल कीं. कांहीं ठिकाणीं आर्य वैद्यकाची योग्यता विशेष ठरेल, व कांहीं ठिकाणीं आपल्या वैद्यकाची योग्यता जास्ती अरेल. याकरितां आपल्या सारख्यांनीं या बबदचा वृथाभिमान बाळगून वैद्यांची व त्यांच्या शास्त्राची अवहेलना करीत बसावें हें कांहीं मला प्रशस्त वाटत नाहीं.

डा. रा०–आपण म्हणतां ती गोष्ट खरी, परंतु आम्हीं जर तसें करूं लागलों, तर हीं वर्तमानपत्रेंच उद्यां आमची टर उडवून टाकतील याबद्दलची वाट काय म्हणतां?

४ गृह०– भलतेंच. वर्तमानपत्रांना तुमची उगीच टवाळकी करीत बसण्याशिवाय जसें कांहीं दुसरें कामच नाहीं! डाक्तरसाहेब! ही गोष्ट मूळ आपल्या मंडळाकडूनच चुकली, त्याचाच हा परिणाम आहे! वाकरितां इतःपर तरी हा वृथाभिमान टाकून दिला तर हींच वर्तमानपत्रें उद्यां आपले स्तुतिपाठ गाऊं लागतील !

डा० रा०–हेंही तुमचें म्हणणें खरें आहे तरी पण एकदा ही गोष्ट आम्हीं बोलून चुकलों, आतां–

२ गृह०–याचेंच नांव आपण चुकलां. असो. इतःपर आपण या गोष्टीबद्दलचा नाद सोडाल तितकें बरें.

४ गृह०–[जंटलमेन! इट्'स् क्वार्टर् पास्ट् फाइव्ह] आटपा लौकर.

२ गृह०–माझ्याकडून हरकत नाहीं. मला फक्त एकच गोष्ट विचारायची आहे. हा वाद ज्या कायद्यावरून उपस्थित झाला, त्या कायद्यावरून देशी वैद्यक बुडेल किंवा कसें, याविषयीं आपलें काय म्हणणें आहे ?

डा० रा०–देशी वैद्यक बुडविण्याचें कलम कायद्यांत मुळींच नाहीं.

४ व ७ गृह०–प्रत्यक्ष कलम नसलें म्हणून काय झालें ? त्याचा इंडिरेक्ट्[3]ली हाच परिणाम व्हायचा यांत संशय नाहीं.

डा० रा०–(मनात) असें मलाही वाटतें, पण तसें कबूल केलें तर आमच्या सुपीरियर्सचा[3] त्यांत अपमान होईल याकरितां तसें कबूल तर नाहींच करितां येत !

११ गृह०–तेव्हां अर्थात् हा कायदा करूं पहाणें म्हणजे निवळ अन्यायाचें आहे हें उघडच झालें !

८ गृह०–नुसतें अन्यायाचेंच कां म्हणतां ? आपस्वार्थाचेंही म्हणा.

(पडदा पडतो.)

समाप्त.

१. धिक्कार असो ! २. देवा देवा !

१. सवा पांच वाजले. २. अप्रत्यक्ष रीतीनें. ३. वरिष्ठांचा.

,, विश्राम रामजी घोले (१८०२ बद्दल)	३— ६
,, बळवंत नारायण गोखले (१८०२ बद्दल)	३— ६
,, नारायण बाळकृष्ण, सब. ओव्ह. हिपरगी	६— ८
,, लिंबाजी सदाशिव पानशी	१
,, कृष्णाजी काशीनाथ ओक	३— ६
,, हरिश्चंद्र नारायण समेळ	३
,, केशव दयाराम भट	१
,, यशवंत लिंगशेट वकील	३— ६
,, परशुराम बल्लाळ जोशी	३— ६
,, वामन गणेश पंडित	३— ६
,, नारायण रामराव पिपळे	३— ६
,, बापुजी गोपाळ केकरे	६—१२
,, दुर्गाप्पा कृष्णाप्पा (१८०२ बद्दल)	३
,, व्यंकटेश आत्माराम	३
,, विनायक रामचंद्र पटवर्धन	३
,, शिवशंकर मोरोबा	१
,, मुकुंद रामचंद्र (अनंतऋषीची वाडी)	३
,, आर्. रामचंद्रराव, कुंभकोण, तंजावर	३
,, शेषगिरराव रामचंद्र, चिकोडी	३— ६
,, श्रीधर बाळकृष्ण आपटे (१८०२ बद्दल)	३— ६
,, आपाजी राजाराम व कृष्णाजी विठ्ठल काळे	६— ६
,, गोविंद बाळकृष्ण रानडे	६— ८
,, दिनकर रामचंद्र उकिडवे (१८०२ बद्दल)	३
,, विनायक धोंडजी के.	२
मि. धनजीभाई फ्रामजी	३
नेटिव जनरल लायब्ररी, रत्नागिरी	३— ६
पेण लायब्ररी (१८०२ बद्दल)	१—१४
रीडिंगरूम धारवाड ट्रेनिंग कालेज	१—१५

विक्रीस तयार. (नाट्यकथार्णव आफिसांत)

डाक्तर व वैद्य प्रहसन (अलाहिदा पातळ कागदावर छापिलेलें फारच स्वस्त)	किं.	२ आणे,	ट. हं.	६	पै.
अद्भुतठकबाजी	,,	१२ ,,	,,	६	,,
बोधरत्नावली भाग १	,,	६ ,,	,,	६	,,
हुन्नरसंग्रह भाग २	,,	६ ,,	,,	६	,,

नाट्यकथार्णव.

प्रस्तुतकालीं 'नाव्हल्स' व 'नाटकें' यांचे संबंधानें जो लोकांचा भ्रांतिमूलक समज झाला आहे त्याचा निरास होऊन, या अत्यंत अनुपम मनोरंजनसाधनाचें वास्तविक [illegible] वे त्याची वास्तविक योग्यता हीं त्यांचे मनांत पूर्णपणें ठसावींत, व तेणेंकरून [illegible]चि जागृत होऊन काव्यामृतरसास्वादाविषयीं त्यांच्या अंतःकरणाची साहजिक प्रवृत्ति व्हावी, हा ह्या पुस्तकाचा मुख्य उद्देश असून, यांत संस्कृत व इंग्लिश या भाषांत रचलेल्या उत्तम उत्तम नाट्यकथादिक ग्रंथांच्या आधारें आपल्या महाराष्ट्र वाणीस जुळतील अशा प्रकारचीं अनेक 'नाव्हल्स' व 'नाटकें' यांचा संग्रह यथावकाश होणार आहे, व प्रसंगविशेषीं स्वकपोलकल्पित सदुपदेशपर कथानकें व नीतिवादाचे चुटके यांचाही समावेश होईल. या पुस्तकांत अश्लीलता नीतिभंगादि दोष न येऊं देतां हें पुस्तक सर्व सभ्य व कुलीन स्त्रियांस वाचण्याजोगें करण्यांत येईल. या पुस्तकाच्या वर्गणीचे दर खालीं लिहिल्याप्रमाणें ठेविले आहेत:—

	रु.	आ.
अगाऊ वर्षास	३	०
मागाहून वर्षास	४	८
किरकोळ दर प्रतीस	०	६
टपाल हंशील वर्षाचें अगाऊ	०	६

अगाऊ वर्गणी पुस्तक घेतल्यापासून दोन महिन्यांच्या आंत भरली पाहिजे. पोस्टाचीं तिकिटें पाठविणें झाल्यास अर्ध्या आण्याचीं असावीं, व रुपयास अर्धा आणा याप्रमाणें वर्तवळा पाठवावा.

चालू वर्षापासून या पुस्तकांत पूर्वापेक्षां ८ पृष्ठें मजकूर वाढविण्यांत आला आहे. किंमत पूर्वीचीच कायम आहे. नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं आपलीं नांवें त्वरित पाठविण्याची मेहेरबानी केल्यास व प्रस्तुतचे आमचे वर्गणीदारांनीं आपणाकडील बाकीचा त्वरित उलगडा केल्यास हें पुस्तक इतक्याच किंमतींत लौकरच दुप्पट करण्यांत येईल.

कांदेवाडी, मुंबई. } शंकर मोरो रानडे बी. ए.
नाट्यकथार्णवाचे कर्ते व मालक.

॥ श्री ॥

नाट्यकथार्णव.

त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते ।
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधा ह्येकं समाराधनम् ।
मालविकाग्निमित्रे श्रीकालिदासः

स्फुरत्कलालापविलासकोमला करोति रागं हृदि कौतुकाधिकम् ।
रतेन शय्यां स्वयमभ्युपागता कथा जनस्याभिनवा वधूरिव ॥
कादंबर्यां बाणः

पुस्तक २. ज्येष्ठ शुद्ध १ शके १८०२. अंक ३.

NÁṬYA-KATHÁRṆAVA,

A MONTHLY MAGAZINE

Comprising a series of Marathi Dramas, Novels &c. &c.

विषय. अनुक्रमणिका. पृष्ठ.

अनिर्भिडचरित नाटक ६१
शिलादित्य ६३
मथुरा (आत्मवृत्तकथन) ६९

मुंबई.
"इंदुप्रकाश" छापखान्यांत छापिला.
(सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधी सर्व प्रकारचे हक्क मालकांनीं स्वाधीन ठेविले आहेत.)
किंमत ६ आणे.

अगत्याची सूचना.

☞ आ क्षपर्यंत आमच्या पुस्तकाचे दुसऱ्या वर्षापैकीं तीन अंक वाचकांच्या हातांत पडले असून, अद्याप बऱ्याच वर्गणीदारांकडून मागील सालाबद्दलची म्हणजे १८०१ बद्दलचीही फेड करण्यांत आली नाहीं, व चालू सालाबद्दल वसूल पुष्कळच ग्राहकांकडून होणें राहिला आहे, त्यामुळें पुस्तक वेळचे वेळेवर निघण्यास अडचण पडते. शिवाय सांप्रत आमच्या पुस्तकाचीं पृष्ठेंही वाढविण्यांत आलीं आहेत, यामुळें पुस्तक छपाईचा व इतर खर्च पुष्कळच वाढला आहे. यास्तव केवळ या अडचणीकडेच लक्ष पोंचवून वर्गणीदार मागील साल व चालू वर्ष या दोहोंबद्दलची आपल्या वर्गणीची फेड मेहेरबानीनें लौकर करितील अशी आशा आहे. आतां लिहिल्याप्रमाणें वर्गणीदारांनीं त्वरित मेहेरबानी केल्यास मागसलेले सर्व अंक वाचकांच्या हातीं त्वरितच देण्यास आह्मांस उमेद येईल. इकडे वर्गणीदारांनीं अवश्य लक्ष पुरवावें, व वर्गणीवसुलातीकरितां विनाकारण निराळा टपालखर्च करण्याचें आह्मांस भाग न पडावें एवढीच त्यांस आमची सविनय सूचना आहे.

वर्गणीची पोंच.

		रु.	आ.
श्री. राजेसाहेब, जव्हार संस्थान		६	१२
रा. रा. सीताराम बाबाजी वैशंपायन (१८०२ बद्दल)		३	६
,,	विष्णु आपाजी दाबके	३	६
,,	नारायण गणेश मंडलिक	१	८
,,	नारायण वामनाजी तिरावडेकर	६	६
,,	गोविंद कृष्ण रानडे (१८०२ बद्दल)	३	
,,	शिवराम शिताराम वागळे (१८०२ बद्दल)	३	
,,	बरमणगौडा बिन परसनगौडा	५	
,,	भिकाजी गणेश आटवले	२	६
,,	गोविंद विष्णु भिडे	१	
,,	चिंतामण बल्लाळ (१८०२ बद्दल)	३	
,,	लक्ष्मणसिंग नि. पोष्ट आफिस मुंबई (१८०२ बद्दल)	३	
,,	शामराव गणपतराव तळपादे (१८०२ बद्दल)	३	
,,	शिवराम त्रिबक ठाकूर देसाई (१८०२ बद्दल)	३	
,,	नारायण हरि नि. बिक्नेल कं. (१८०२ बद्दल)	३	
,,	गणेश गोपाळ भट (१८०२ बद्दल)	३	
,,	दामोदर रघुनाथ धुमे (१८०२ बद्दल)	३	
,,	रावजी भवानराव पाटगे	३	

उंदल्या उंदल्या छूः ! घूस घूस ! वुई—

खुष०—(घाबरून परत धांवत येतो) अरे—पळा पळा ! आंत—आंत—भू—भू—भूत द—द—दडून बसलें आहे ! पळा पळा ! वुई—

अति०—(त्याला धरून) अरे ! काय झालें कांय ! असा घाबरलास कशाकरितां ?

खुष०—वुई ! भु—भु—भूत. द—द—द—दडलें आहे !—उंदल्या छूः उंदल्या—ऊः— (किंकाळ्या ठोंकूं लागतो.)

अति०—(कातिवर्म्यास) अरे याला संभाळून चल मजबरोबर आंत घेऊन चल.—(पुढें जातो.) अरे—ए—आंत कोण आहेरे ? या पडक्या भिंताडाच्या आड कोण लपून बसला आहे रे—ए—

(वेड्या भिकाऱ्याचें सोंग घेतलेला मधुकर दृष्टीस पडतो)

अति०—कापरे, तूं आपलें होतें नव्हतें तें सर्व आपल्या पोरींना देऊन बसलास, आणि आपली अशी दशा करून घेतलीस !

मधु०—अलेलेलेलेलेले, या भिकाल्याला कुनी कांबलून तली द्याले ! उंदल्या ! तूं असाच गुलामा थंड लागून मल ! ल्येकाच्या सामिंदानं तल आज जनुं भंडावडा मांडलाया !—अले, कुनी कांबलून ले ! थंड लईंच लईंच मालतीया ! हुडूडूडूडूडूडू—द्यो सामिंद मगापासन अंगाला क्वालित लावितो, छत्रेतीवल म्हाट्ट घलाट टिवूनशी घला घला गडडतो, सम्द्या सामिंदलांत फेंकीन झनूशी भ्या पन दावितो ! आं—ओः—ओः (भ्यालासें करून किंकाळी ठोंकतो.) अले, न्हाय न्हाय, तोंडांत ध्येतों भालून, चुकलों !—अले थंड थंड ! अले तुज्या पायां पडतों ! थंड लईच थड !—अले, घलाट लईच पन गडाडतया ! (मेघांचा गडगडाट ऐकूं येतो.) अले, कांबलूनले ! हुडूडूडूडूडू—डूडू ! ल्येकाची झाप पन यइना ! अले घूस घूस ! उंदल्या छूः ! घूस घूस !

अति०—हरहर ! एकून तुझी अशी दशा तुझ्या पोरींनींच केली अं ? फार वाईट ! अरे, पण तूं सगळें आपल्या पोरींनाच देऊन बसलास, आणि जवळ कांहींच ठेविलें नाहींस ?

खुष०—नाहीं कसें, त्यानें आपणापाशीं फाटकें तुटकें पण रकटें राखून ठेविलें आहे ! तेवढें का नसतें झणजे मग येथून तेथवर सारे आपण बोरे फकीर बनलों असतों !

अति०—एकून तुझ्या पोटच्या कारट्या अत्यंत दुष्ट निघाल्या अं ? परमेश्वर त्यांचें कधीं बरें करणार नाहीं ! त्यांच्या पापाबद्दल त्यांसर्वांला किडे पडून त्या झडतील !

खुष०—गड्या ! तूं झणतोस तसें होईल, पण याला पोरी मुळींच नाहींत !

अति०—गप्प बस. तूं खोटें बोलतोस ! ह्याला कारट्या आहेतच, आणि त्यामुळेंच ह्याची अशी दशा झाली आहे ! काय चमत्कार ! आलीकडे जिकडे पहावें तिकडे कारट्या तितक्या एकनएक अशाच बेताल झाल्या आहेत !

मधु०—(घेडगुजरी गाणें गाऊं लागतो.)

गाणे.

आया जी बेताल्, आया जी बेताल्.
आ चोल् हमाला जी कल् देता है हाल् ॥ ध्रु० ॥
अंग सल्गाते गंधकूमे डाल्ते,
अंगकु लगा देते जळाकि कोल्तें ॥ १ ॥
पानीका हंडा शिल्पल् लेकल्,
अमकु भिजाते जी माल्ता है टोकल् ॥ २ ॥
अनाजमें कांटा लख देते ताटा,

कलूतॉ हमालापल् जुलुम ह्यो मोठा ॥ २ ॥
पानीमें डालते मुत्तल् कुत्तेका,
पिनेकु बि नहिं देतॉ अफ्सोस् वैसा इन्का ॥४॥

खुष०—हाहाहा ! आजची ही रात्र आणि ही थंडी, हीं आपणा सर्वांना पण बेताल दिवाणे करून टाकतील यांत संशय नाहीं.

मधु०—अले, नगले बा त्ये येतालाचं नांव नग घ्याऊ, आपल्या बाचं ह्मननं ऐक, पल्-मानीकपनं लहा, कुनाशींपन तंटा नग करू, ल्वोकांच्ये अस्तुलीला आइ मन ह्मन, आन् त्ये येतालाच्या वाट बी नग जाऊं ! हुडूडूडूडूः—अले, थंड वाजली ले ! ह्ये मिकाल्याला कुनी कांबलुन द्याले ! हुडूडुडूडूः—!

अति०—अरे, तुझी अशी दशा व्हायच्यापूर्वीं तूं कोठें होतास ?

मधु०—छे, त्यें तल लईच वंगाळ, त्येचं इच्यालनं नग बगा ! पन् सांगतो हां—आज सात बलसं जालीं मी व्हतों लई खुसमोज्या, धा अस्तुल्या क्येल्या, ईस तीस लांडांचा भडवा पन व्हतो, चोल्या कलीत व्हतो, सूल प्येऊनशी गटालांतबी पन लोळत् व्हतो. ह्मप पैसा व्हता बापाचा माल, चंगाळ व्हती न् काय ? लोज लोज मिशीला इर्क तूप माकीत व्हतो. पगडी पन् हां—ज्येचं नांव त्ये. आन् त्येचंच ह्ये कलूम लागलया पाटीशी. आतां नशीब ! अले, थंड वाजलीले ! अले वाला लई जोलशी लागतोले ! सूः—! अले ! कांबलून तली द्याले !—सूः—थंड—(कुडकुडूं लागतो.)

(वादळ कडाक्याचें चालूच आहे.)

अति०—अरेरे ! ह्या असल्या स्थितींत हाल काढीत रहाण्यापेजां प्रत्यक्ष मृत्युही आलेला बरा ! कायरे गडचा, एकूण तुझी अशी स्थिति आहे अं ?—नाहीं, पण असें नाहीं ! मीच चुकलों ! गडचा ! खरोखरीच तूं मोठा धन्य आहेस ! तुला कोणाची गरज लागत नाहीं. लोंकरीकरितां मेंढराचें, किंवा रेशमाकरितां किडचाचें, किंवा कस्तूरीकरितां कस्तूरिका मृगाचें, तुला आर्जव करावें लागत नाहीं ! शाबास शाबास ! नाहीं तर हे आह्मीं तिघे ! हीं आमच्या अंगावर ओझीं आहेत, यांपैकीं एवढासुद्धां जिन्नस आमचा स्वतःचा नसून पशु, पक्षी, मृग, कीटक इत्यादिकांपासूनच उसना घेतलेला आहे ! धिक्कार असो ! तुझा मात्र खरा बाणा, बाकीचे आह्मीं सारे ढोंगी आहों. आमच्या अंगावरचे हे कपडे बिपडे जर सर्व काढून टाकिले तर आह्मींही तुजसारखेच होऊं.—हा पहा आतां मी तुझ्यासारखा होतों !—अरे तूं—ए—तूं—एवढी गांठ सोड पाहूं ! (आपल्या अंगावरील कपडे फाडूं लागतो.)

खुष०—(त्याचा हात धरून) हां हां गडचा ! हा असा वेडेपणा काय करितोस ? ही रात्र कोण थंडीची, या वेळीं असला वेडेपणा काय उपयोगी ? (मागें पाहून) अरे, हा पाहिलासका चालता बोलता विस्तवच इकडे येत आहे !

अति०—कोण तो ? कोण तो ? (त्याजकडे पहात राहतो.)

(इतक्यांत हातांत पेटविलेला कंदील संभाळून धरलेला चंडवर्मा येतो.)

मधु०—(त्यास दुरून पाहून भ्याल्यासारखें करून) अले ह्योच त्यो आग्यायेताळ, म्या मगाशीं समिंद ह्मटलेला आग्यायेताळ त्यो ह्योच ! ह्योच गुलाम ह्ये येवळाप लातसाल हिंडत्यो न् असा मधलातीच्या वखत माजा भिका-

ल्याचा भंडावडा मांडीत्यो! मांत्या घशांमदी काट कोंबूनशी मस्नी खा कलत्यो न मी न्हाय ह्मंटलं कीं ह्मपर योक योक डोळा पन अक्शी यवडा यवडा कलतो. वाव्वाव्! हुट्! चल् बे हलामखोल, पीछे हट्!

कांति०—महाराज! आतां आपणाला येथें कांहीं निवारासा वाटतो?

अति०—अरे, हा कोण बरें इकडेच येत आहे? हा आग्या वेताळ तर नसेल?

कांति०—(मोठ्यानें ओरडून) अहो तें कंदील घेऊन कोण चाललें आहेहो? तुह्मांला कोण पाहिजेहो?

चंड०—आं—हा आवाज कोठून बरें येतो? या पडक्या देवळांतून तर नसेल? बरें चला पाहूं या तर खरे. (देवळांत येतो.) अरे, येथें तीन चार जण दिसतात!—अरे, तुह्मीं कोण कोण आहां, सांगा पाहूं—तूंरे कोण? तूं येथें काय करीत असतोस?

मधु०—कोन? मी कोन? उंदल्या छूः—दलदलीमंदी गवासलल ब्येडूक, कुजलेल्या-मातीमंदल काडू, मुताच्या छतल्या, ज्यें 'गवसल त्यें खातो आन् ह्ये नासकवनी प्येतो. कुट असली बलसात, तल ह्ये द्येवळामंदी पडूनशी काइबी माशा, मुलकुटं, घुंगुलटं मालूनशी खातो नू सवास्त इवाप तानतो. त्यो समिंद आग्यायेताळ आयला ह्मजी मातर त्येवडी येळ व्हती लटलट लटलट!

चंड०—तूं येथें किती दिवसांपासून आहेस?

मधु०—मी व्हय? इथें व्हय? कुना ल्येकाला ठावं? न्हाई न्हाई, पण असत्याल लई दिस—पन—पन— !—अले—ओः—ऊः—ऊः—तुज्या पायां पडतों.—समिंद समिंद! उंदल्या छूः! उळूळुळूळुळुळू! वू—वू—अले लई थंड लागतीयाले! अले, कुनी कांबलून तलीले!

चंड०—(अतिपीडास न्याहाळून पाहून आनंदानें) अरे, हेच आमचे राजेसाहेब, आणि हे त्यांचे दोन चाकर!—(राजाच्या पायांपर धाडकन घालून घेतो व डोळ्यांत अश्रु आणून) महाराज! काय ही आपली अवस्था झाली आहे! महाराज! आपण या असल्या ठिकाणीं या तुफान रात्रीं येऊन पडलां आहां काय? हायहाय! महाराज! आपणाला या खुळ्या वेड्याशिवाय दुसरें कोणी सोबतीला नाही? हायहाय!

मधु०—(मोठ्यानें हंसून) वेड्या वेड्या! चेड्या, धेड्या, लेड्या, वेड्या, गोचेड्या छूः! छूः—वेड्या वेड्या छूः!

चंड०—महाराज! आपली ही स्थिति पाहून माझ्या जिवाला जें कांहीं होतें आहे तें बोलून दाखवितां येत नाहीं! आलीकडचा मनुच कांहींचा बाहीं बदलून गेला आहे! या काळांत प्रत्यक्ष पोटच्या गोळ्यांचीही ममता आपल्या जनकांवर बिलकूल नाहीं!

मधु०—अले—लईच लईच थंड लागतीयाले! अले या भिकाल्याला कुनी तली अंगुस्तल द्याले!

चंड०—महाराज! आपण मजबरोबर चलावें! मी आपला एकनिष्ठ सेवक आहें. आपली दुष्ट कन्या आपणावर फिरली, तथापि मी तिची बिलकूल परवा न करितां आपल्याच सेवेंत तत्पर आहें! त्या दुष्टेनें मीं आपल्याला मदत केली तर माझा जीव जाईल ह्मणून मला दहशत घातली आहे, आणि या भयंकर वादळांत सांपडून यांतच आपला अंत व्हावा अशी तिची इच्छा आहे,

तथापि मी आपल्या कर्तव्यास जागण्यास चुकावयाचा नाहीं ! तिनें आणि तिच्या बाइलबुध्या नवऱ्यानें माझे प्राण घेण्याची मला भीति घातली आहे, तथापि महाराज ! या अशा रात्रीं अंधेरांतून रानोमाळ आपलाच शोध करीत हा वेळपर्यंत एकसारखा फिरत आहें ! महाराज ! आपण मजबरोबर चलावें, येथून जवळच माझ्या एका विश्वासु सेवकाचें घर आहे तेथें जागा निवाऱ्याची असून आपल्या खाण्यापिण्याची तजवीज सर्व यथास्थित करून ठेविली आहे. याकरितां चलावें आपण !

अति०—तुमचें म्हणणें मग ऐकेन. मला अगोदर या मुनिश्रेष्ठांशीं कांहीं बोलायचें आहे. हे मुनिश्रेष्ठा ! आज ह्या मेघगर्जना होत आहेत याचा हेतु काय बरें असावा ?

कांति०—महाराज ! हे **चंडवर्मजी** आपणास कांहीं बावगी गोष्ट सांगत नाहींत, याकरितां आपण चलावें यांच्याबरोबर !

अति०—बसबस ! मी अगोदर या पंडितवर्यांजवळ भाषण करीत बसणार ! पंडितराज ! मला आपणास एक गोष्ट विचारावयाची आहे. आपण या ठिकाणीं राहून काय काय उद्योग करितां ?

मधु०—नासकवनी खातों, ब्येडुक प्येतों, आन् गोचेडचा काडू तोंडास्नी लावतों, समिंदाच्या वाटला जात न्हाई, न् ह्ये घानीमंदल्या किडबिड चट सम्द पायाशीं तुडवुनशी टाकतों इक्तंच.

अोत०—हां समजलों. आपलें म्हणणें अगदी बरोबर आहे. पण आपणाला एक गुप्त गोष्ट विचारावयाची आहे.

कांति०—चंडवर्मजी ! तुम्हीं कसेंही करून आमच्या महाराजांना आपल्या बरोबर घेऊन चलाच ! आतां तर त्यांच्या बुद्धीला खरोखरच भ्रंश होऊं लागला आहे.

(वादळ चालूच आहे.)

चंड०—हरहर ! गड्या, तूं खरें बोलतोस. पण यांत त्यांच्याकडे तरी काय दोष आहे ? त्यांच्या पोरी त्यांच्या प्राणनाशाविषयीं उद्युक्त झाल्या आहेत. हायहाय ! महाराजांनीं विनाकारण त्या बिचाऱ्या **कांतिवर्म्याला** हद्दपार केलें. त्यानें हें असेंच भाकित केलें होतें. असो, नशीब ! तूं काय म्हणतोस ? महाराजांच्या बुद्धीला भ्रंश होऊं लागला आहे ? गड्या, तुला एक जीवींची गोष्ट सांगतों. महाराजांप्रमाणें माझ्याही बुद्धीला भ्रंश होऊं लागला आहे. माझा एक पुत्र होता, त्याचा आणि माझा आतां कांहीं संबंध राहिला नाहीं. त्यानें नुकताच—अगदीं नुकताच—मला ठार मारण्याचाच बेत केला होता ! गड्या ! तुला काय सांगूं ? त्याच्यावर माझें जितकें प्रेम होतें तितकें कोणाचेंही आपल्या पुत्रावर नसेल !—पण अखेर काय ? त्या प्रेमाचा हा असा परिणाम झाला ! त्यायोगानें माझें हें मस्तक कसें एकसारखें भवंडतें आहे !—अरेरे ! कोण ही रात्र !—महाराज ! मी आपल्या पायां पडतों, आपण माझी एवढी विनंती ऐकावीच !

अति०—तुम्हीं अंमळ गप्प बसा कसे.—हे यतिराज ! आपण मजसमागमें थोडें भाषण करावें !

मधु०—अले ! थड लागतीले ! उंदल्या थंडीशीं मलतोले ! अले कुनी कांबलूनले ! हुडूडूडुडूः—

(दांत खडखड वाजवितो.)

चंड०—अरे ए खुळ्या, निज या आपल्या रकटशांत गुरगुटून घेऊन निज ! महाराज ! आपण चलावें.

अति०—नाहीं. आपण सगळेच इथून जाऊं या कसे.

कांति०—महाराज ! असें या वाटेनें यावें.

अति०—नाहीं. मी एकटा येणार नाहीं.मी या योगींद्रांना आपणाबरोबर घेऊन जाणार !

कांति०—**चंडवर्मजी** ! आपण महाराजांच्या नादानादानेंच ध्याल तें बरें. येऊं द्या, या भिकाऱ्यालाही बरोबर येऊं द्या.

चंड०—ठीक आहे, चल तूं त्याला घेऊन चल.

कांति०—गडचा उंदऱ्या—ए—चल आमच्या बरोबर चल.

अति०—चलावें, मुनिवर्या ! चलावें.

(सर्वजण चालूं लागतात.)

चंड०—हां, आतां गपाचिप चला ! कोणी बोलूं नका ! चला चला !

(सर्व जातात.)

प्र० ५—उदासदुर्गांतील एक दिवाणखाना

(सुदर्शनराव आणि मरुत्सेन येतात.)

सुद०—मी या घरांतून निघून जाण्याचे पूर्वीच याबद्दलचा सूड उगविल्याशिवाय कधीं राहणार नाहीं !

मरु०—सरकार ! मी ही गोष्ट चरणांजवळ विदित केली ती केवळ स्वामिभक्तीस्तव विदित केल्याशिवाय माझ्यानें रहावेना म्हणूनच केली ! परंतु या कामीं प्रत्यक्ष माझे जनक, त्यांच्यावर मी शस्त्र उचलल्यासारखें झालें आहे. आतां बाबांना हें तोंड तरी कसें दाखवावें कांहीं समजत नाहीं !

सुद०—समजलों. आणखी आतां ही एक गोष्ट माझ्या लक्षांत येऊं लागली आहे, तीं अशी कीं हा धेरडा अगोदरपासूनच असा कपटी आणि मतलबी होता, म्हणूनच **मधुकर**-**रावाचें** आणि त्याचें नीट जमलें नाहीं ! **मधुकररावा**नें त्याला ठार मारण्याचा बेत केला होता तो याकरितांच !

मरु०—तें कांहीं असो. मला त्याचें मुद्दलच ज्ञान नाहीं ! पण अरेरे! कोण दुर्धर हा प्रसंग! मी यावेळीं न्यायानेंच वागतों आहे, तरी पण मला त्याबद्दल पस्तावा होत आहे! असो. नशीब! बाबा बोलत होते तें पत्र हें, आणि यावरून बाबांना **सौराष्ट्रराजा** येणार वगैरे बित्तंबात मजकूर ठाऊक असल्याचें उघड होतें आहे! हायहाय ! काय करावें? बाबा या घोटाळ्यांत मुळींच न पडते, तर मजवर तरी असें वर्तन करण्याचें कशाला आलें असतें ?

सुद०—असो. झालें तें सर्व नीटच म्हणा. बरें चला तुम्हीं मजबरोबर माझ्या प्रियेकडे चला.

मरु०—सरकार! या पत्रांतली हकीकत जर कदाचित् खरी ठरली, तर आपणावर कार्यभार मात्र पुष्कळच पडेलसें दिसतें.

सुद०—असो. त्याचा कांहीं विचार करायला नको. हा प्रकार सगळा खरा ठरो अगर खोटा ठरो, इतःपर **उदासदुर्गा**चे मालक तुम्हींच झालां याविषयीं तुम्हीं बेफिकीर असा ! आतां तुम्हीं एवढें एक काम करा, त्या थेरड्याचा अगोदर शोध लावा, म्हणजे त्याला कैद करायला ठीक पडेल !

मरु०—(आपणाशीं) **अतिपीडराजा**चें समाधान करतांना जरकरितां बाबा सांपडतील, तर त्यांच्यावरचा संशय अधिकच दृढ होईल यांत संदेह नाहीं! (उघडपणें) सरकार! आतां प्रत्यक्ष माझ्या पित्याला मी पकडून देऊं काय ? हरहर! असो. नमस्कार असो या स्वामिभक्तीला ! सरकार ! आपली आज्ञा मला शिरसा वंद्य आहे !

मुद०—तुमच्यावर माझा पूर्ण भरंवसा आहे ! हा थेरडा दुष्ट मेला तरी चिंता नाहीं, मीच तुह्मांला प्रत्यक्ष पित्याच्या ठिकाणीं होईन !

मरु०—(आपणाशीं) ठीक ठीक ! ह्मणजे मी आयताच तुझ्या कुटुंबाचा वहिवाटदार होईन!

(दोघे जातात.)

प्र० ६—उदासदुर्गाच्या पायथ्याजवळच्या एका घरांतील जागा.

(एका कोपऱ्यांत खाटेवर अतिपीड निजला आहे, व जवळ चंडवर्मा, कांतिवर्मा, खुषमकऱ्या व मधुकर हे आहेत.)

चंड०—गडचा ! उघडचा हवेपेक्षां ही जागा पुष्कळ बरी आहे. महाराजांच्या पोटांत फारसें अन्न गेलें नाहीं, तरी पण थोडा आल्याचा रस पोटांत गेला आहे, तेवढचानें त्यांना कांहीं तरी बरें वाटेल. येथें अडचण तर खरीच, तरी पण त्यांनीं आजची रात्र कशी तरी या खाटेवर पडून काढली पाहिजे. आतांच वैद्य आणिला पाहिजे होता, परंतु ते दुष्ट किल्लचांत आहेत त्यांपुढें माझा नाइलाज आहे. असो. महाराजांना आतां झोंप येईल तितकी बरीच ! बरें असो. मी इकडे आल्लेला कोणाला ठाऊक नाहीं, या करितां एकवार किल्लचावर जाऊन ताबडतोब परत येतों !

कांति०—महाराजांच्या तापट स्वभावामुळेंच हा त्यांच्या बुद्धीस भ्रंश पडला आहे. असो, आपले त्यांच्यावर अगणित उपकार झाले आहेत, त्यांबद्दल परमेश्वर आपलें कल्याण करो !

(चंडवर्मा जातो.)

मधु०—हुल्यो हुल्यो ! उंदल्याला येताळ भियाला न् उंदल्याला गावली भाकल! गुलाम गलीब उंदल्याफुड खा कलीत व्हता ! वुई—छूः ! हुल्यो हुल्यो !

खुष०—अरे अंमळ हलक्यानें बोल. महाराजांची झोंपमोड होईल !—कसली—झालीच!

अति०—(जागा होऊन) अरे त्या दोघी दुष्ट कारट्या येथें आल्या होत्या त्या कोठें आहेत ? आत्तां आत्तां माझ्या डोळ्यांसमोर होत्या, आणि माझ्या हृदयावर लत्ताप्रहार करून त्या कोणीकडे दडून बसल्या आहेत? अरे, तुह्मीं येथें काय करीत आहां ? माझ्या कारट्या कोठें गेल्या ?

कांति०—सरकारांनीं असें संतापूं नये. येथें आपल्या या इमानी सेवकांशिवाय दुसरें कोणी आलें नाहीं सरकार !

अति०—तूं खोटें बोलतोस ! त्यांनीं आत्तां या इथें लत्ताप्रहर केला आणि नाहीं कसें ?

मधु०—अले! येताळ माज्या पाटीला डसलाले ! येताळ डसलाले ! अइइइ—

खुष०—गडचा ! हा खुळेपणा आता टाकून दे. तुला मी पहिल्यापासूनच नव्हतों का सांगत कीं ह्या दांडग्या पोरी बोलून चालून लांडग्या, त्यांच्यावर तूं विश्वास ठेवूं नको ? मी तुझ्या कानीं कपाळीं किती वेळ ओरडलों असेन, कीं असल्या दुष्ट स्त्रियांना पकडून त्यांजवर एवढीही दया न करितां त्यांस अखेरची वाट दाखवावी ?

अति०—ठीक ठीक ! तुझ्या ह्मणण्याचा मला आतां उमज पडला ! या कारट्यांना मी आतां जबर शासन करितों पहा! अरे, तुह्मीं रे कोण ? तुरुंगावरले अधिकारी होयना ? हां, या कृतघ्न कारट्यांना येथेंच हात पाय बांधून माझ्यापुढें उभ्या करा!—(मधुकररावाकडे पाहून) हे महामुने! आतां मला या दुष्टांचा न्याय कर्तव्य आहे, या ठिकाणीं मी तर राजा आहेंच, हे तुह्मीं तिघे सभ्यस्थानीं

बसा. आणखी चालूं द्या न्याय !—कायगे कृतघ्न कारट्यांनो ! बोला मी विचारितों याचें मला उत्तर द्या !

मधु०—अले वाव्वाले वाव्वा ! ही तर अक्शी भाटीवानीच वलडती या जनुं--मियांउ फुस्-मियांउ फुस् !

खुष०—गड्या! अंमळसा शुद्धीवर तर येशील खरा!

मधु०—मियांउ फुस् ! मियांउ फुस् ! अूले ही म्यांव म्यांव कलते ! अग पन ए, हतच पडल्याती फाका, चल शुक् ! भाइल खा' घुस् ! उंदल्या! उंदल्या-उंदल्या घुस् !

कांति०—सरकार ! हे अतिश्रम आपणास कामाचे नाहींत, आपण उशाशीं टेंकून चार घटिका स्वस्थ झोंप ध्याल तीं बरी !

अति०—खबरदार रे ! तू कोण मधें बोलणार? मी या कारट्यांचा न्याय करीन तेव्हांच निजेन ! आतां सभ्यहो ! या दुष्टांचा यथायोग्य न्याय करा ! चालूं द्या ! हां—

मधु०—हांइहींहींहींहींः—खिळया पाइं नाल ग्येला, नाला पाइं घोला ग्येला, घोल्या पाइं सवाल ग्येला, इक्का अनुल्त खिल्यानं क्येला. कांम ये मांजली! फुस् फुस् लइ मांडलीया जनुं!

अति०—हां हीच माझी थोरली कारटी ! इचें नांव **शशिकला** ! सभ्यहो ! श्रवण करा! या दुष्टेनें मी राजा बिचारा तिचा बाप असून मला लाथ मारिली !

खुष०—अग ए सटवी ! अशी पुढें ये ! तुझें नांव **शशिकलाच** काय ?

अति०—अर्थात् तेंच तिचें नांव! दुष्टे! इथें तुझी कांहीं गडबड नाहीं चालायची ! बोल, खरें बोल ! तुझेंच नांव **शशिकला** ?

खुष०—हात् त्याच्या ! मी तर हिला दिवलीची कळाच समजलों होतों, जशी आमची अवकळा ! हः हः हः हः ! अरे, गड्या! तूं कोठली **शशिकला** घेऊन बसला आहेस ? अरे ही दिवली !

अति०—(तिकडे लक्ष न देऊन) तशीच ही दुसरी कारटी, इचें नांव **चंद्रानना** ! या दुष्टेला आपल्या कर्माबद्दल लाज वाटून हिनें पहा आपल्या तोंडावरून काळा बुरखा घेतला आहे !

खुष०—शाबास ! शाबास ! गड्या ! आज तर तूं फारच मौज करूं लागला आहेस ! तुझी **चंद्रानना** कोणती ही वाटतें !

अति०—होय होय ! हीच ती दुष्ट कृतघ्न कारटी !

खुष०—वाः जी वाः! ही तर या वेड्या खुळ्याची फाटकी घोंगडी आहे ! आणि हिलाच का **चंद्रानना** म्हणून तूं उगीच तनाना चालविल्या आहेस ?

अति०—(संतापून) काय काय ? त्या दोघीही कारट्या येथून पळून गल्या काय?—आः हरामखोर गुलामांनो ! तुम्हांला येथें दरबारांत बंदोबस्ताकरितां ठेविलें असून तुम्हीं असाच बंदोबस्त ठेवितां काय ? अरे पहातां काय ? पकडा पकडा ! काय ? या हरामखोरांनीं मधें लांच खाऊन त्या दोघींना पळवून लाविलें काय!—काय रे ए गुलामांनो!

(बाकीच्या तिघांस मारीत सुटतो.)

मधु०—अले म्येलोंले म्येलोंले म्येलों (बळेंच ओरडूं लागतो.)

कांति०—महाराज! आपण नेहमी म्हणत असतां मी शांतवृत्तिच धारण करीन म्हणून, मग ती शांतवृत्ति याच प्रसंगीं कोणीकडे गेली?

मधु०—(आपणाशीं) हायहाय! या राजाची ही दुःस्थिति पाहून आपणाला खरोखरीच रडूं

येऊं लागून या माझ्या सींगाचा रंगही धुवून जाईल याची मला मोठी भीति वाटते!

अति०—काय! एकून या गांवातलीं लहान मोठीं कुतरीं देखील मजवर भोंकूं लागलीं अं!

मधु०—गडचा ये—ए—योक मंतर ह्मंगतों मंतर, ह्मजी पा हीं सम्दीं कशीं आक्शी पलूनशी जातीला!

गाणें.

मोत्या मोगऱ्या छूः— हंबिल्या छूः
हडडड हडडड डडडड छूः
वॉव्वाव् वॉव्वाव् वॉव्वाव् वॉव्वाव् हडडड भोः—
उंदूल्या सुंदूल्या कंदूल्या चंदूल्या वांदूल्या फोः—
वाव्वाव् वाव्वाव् (वेड्या वाकड्या किंकाऱ्या ठोकतो.) हात् गुलामांनो! तुमचं हत का बाचं टिवलंया पुरूनशी! का कुट जतूला बितूला न्हाईता का कुट? हड!—अले, घसा कोलडा पलडाले! अले कुनी पानीले!

अति०—अरे, एकून येथें इतकीं कुतरीं जमलीं आहेत ह्मणतोस? ठीक आहे! या कुत्र्यांकडून या दुष्टे चंद्राननेचें काळीज काढून काढीव, ह्मणजे त्या ठिकाणीं काय आहे तें आपोआप समजेल! (मधुकरास) अरे, माझे शंभर मानकरी आहेत, त्यांत तुलाही एक मानकरी करतों. तूं माझ्या बरोबर असत जा पण गडचा! मला हा तुझा पोषाक नाहीं आवडत! तूं कदाचित् हा अमक्या तमक्या देशातला आहे ह्मणून सांगशील, पण हा तुला माझ्याकरितां काढून टाकिलाच पाहिजे!

मधु०—(आपणाशीं) असा सुदिन केव्हां येईल तेव्हां येवो!

कांति०—महाराज! आतां आपण असेच कांहीं वेळ पडून झोंप घ्या! आम्हीं सर्वजण आपणाजवळ जागत राहतों!

अति०—अरे, आतां कोणी बोलूं नकारे! अरे—माझ्या अंगाला कस्तुरी लावायला सांग!

हां—अरे आज पलंग अंगाला रुततो आहे! अशी मच्छेंरदाणी घे नीट सारून! अशी! उद्यां चित्याच्या शिकारीला जायचें ह्मणून वरदी असूं दे! (पडतो व झोंप लागते.)

खुष०—तूं चित्याची शिकार करायची गोष्ट लांब राहिली, पण अगोदर त्या दोन वाघिणी मात्र खरोखरीच तुझी शिकार करीत आहेत!

(सर्वजण चिंतायुक्तपणें राजाकडे पहात रहातात.)

(इतक्यांत चंडवर्मा परत येतो.)

चंड०—कायरे गडचा! महाराजांना झोंप लागली आहे वाटतें!

कांति०—होय, पण त्यांना उठिवतां उपयोगी नाहीं! त्यांना खचित चळ लागला आहे!

चंड०—हें वघ गडचा! तूं महाराजांना अलगत उचलून घे. मी आतांच किल्ल्यांत गेलों, तों तेथें महाराजांना ठार मारण्याची वाटाघाट चाललेली मला आडून ऐकूं आली. याकरितां त्वरा कर. बाहेर मेण तयार आहे, त्यांत त्यांना घालून एकदम करश्री बंदराची वाट सुधार! तेथें गेल्यावर तुह्मांला आश्रय मिळून तुमचा आदरसत्कार चांगल्या प्रकारें होईल. हां चल आत्ताच्यां आत्तां महाराजांना उचल. जर का घटका अर्धी घटका इकडे तिकडे करशील, तर त्यांचे, आपले, आणखी त्यांना जेवढे ह्मणून मदत करतांना सांपडतील तेवढचा सगळ्यांचे, प्राण धोक्यांत पडले ह्मणून समज! चल, उचल उचल! चल मजबरोबर! मी तुझी लौकर जायची तजवीज लावून देतों. चल! उचल!

कांति०—हरहर ! आमचे महाराज इतका वेळ एकसारखे हालच काढीत असून अतिश्रमांमुळें त्यांना आतां कोठें नुकती झोंप लागली आहे ! अशा वेळीं त्यांना येथून हलविणें झणजे निवळ वेडेपणा आहे ! परंतु उपाय काय ? आतां झोंप लागली आहे, अशीच झोंप उद्यां सकाळपर्यंत व्यावयास सांपडती, तर त्यांपासून पुष्कळ उपयोग झाला असता ! असो नशीब ! (खुषमस्कऱ्याकडे पाहून) गडयां ! चल ये, महाराजांना दोघेही उन्चलून नेऊं ! तुझा येथें राहून कांहीं निभाव लागायचा नाहीं!

चंड०—चला चला.(मधुकररावाशिवाय सर्व जातात.)

मधु०—काय चमत्कार! ह्या राजाची ही स्थिति दृष्टीस पडण्याचे पूर्वी मला वाटत होतें कीं. या जगांत मजसारखा दुःखित प्राणी दुसरा कोणी नाहीं ! परंतु आतां याची स्थिति प्रत्यक्ष पाहून तिजपुढें माझें दुःख कांहींच नाहीं असें मला वाटतें. मजवर संकटावस्था आली, त्यावेळीं जगातील सर्व सुखें मी एकटाच आंचवलों असें मला वाटलें होतें, परंतु यां महाराजांचें व त्यांच्या सोबत्याचें दुःख प्रत्यक्ष नेत्रानें अनुभवून तें वाटणें कोणीकडच्या कोणीकडे नाहींसें होऊन गेलें आहे! मला एक माझ्या बापानें टाकलें आहे, परंतु या राजाचा तर त्याच्या दोघीही पोरींनीं त्याग केला आहे ! असो. इतःपर मजवर कसेंही संकट कोसळलें, तरी मी यत्किंचित्ही डगणार नाहीं ! आज मी उंदल्याछूः बनलों आहें, व हे हाल काढीत आहें, परंतु आतां जो मेघांचा कडकडाट ऐकूं आला तो, मोठ्या प्रचड वाणीनें, माझ्या पित्याचा केवळ गैरसमजामुळें मजवर रोष झाला आहे असें मला सांगूनच काय, माझें जणों समाधान करीत आहे ! असो. आतांच्या या भयंकर प्रसंगीं कितीही अनर्थ झाले तरी होवोत, परंतु त्यांतून महाराजांचा मात्र बचाव होवो झणजे झालें!—उंदल्या उंदल्या, हुळूहुळूहुळूहू! लहा ल्येकाच्या लपूनशी लहा—छूः—ळुळुळू!(जातो.)

प्र० ८. उदासदुर्गांतील एक दिवाणखाना.

(सुदर्शनराव, चंद्रानना, शशिकला व मरुत्सेन बसले आहेत, व चाकर बाजूस उभे आहेत.)

सुद०—शशिकलाबाई ! तुम्हीं आतांच्या आत खलदर्शनरावांकडे निघून जाऊन त्यांना हें पत्र द्या, कारण राजवाहनराजाचें बहुतेक सैन्य या देशांत येऊन पोंचल्याची खबर मला आतांच कळली आहे.—कायेर, तो थेरडा दुष्ट चंडवर्मा कोठें आहे त्याचा शोध करून त्याला पकडून घेऊन या.

(कांहीं चाकर जातात.)

चंद्रा०—त्या मेल्याला फाशींच चढविलें पाहिजे.

शशि०—मला वाटतें त्या मेल्याचे डोळेच काढून टाकावेत.

सुद०—तें असो. त्याला शासन द्यावयाचें त्याचा विचार मी करीन! मरुत्सेनराव ! तुमच्याकडे एक कामगिरी आहे. तुम्हांला शशिकलाबाईंच्या बरोबर त्यांना पोंचवायला गेलें पाहिजे. तुमच्या पित्याच्या विश्वासघाताबद्दल मी त्याला जबर शासन करणार आहें तें पहाण्यास तुम्हीं जवळ नसलेले बरें असें मला वाटतें. आतां तुम्हीं खलदर्शनरावांकडे जाऊन त्याना ताबडतोब तयारी करण्यास सांगा. आतां अवकाश फार थोडकाच उरला आहे. याकरितां त्वरा झाली पाहिजे. घटके घटकेला स्वारांचें दगाल

धांवडविण्यास आळस करूं नका.–शशिकलाबाई!–यावें. मरुत्सेनराव! रामराम! इतःपर उदासदुर्गाचे मालक तुम्हीं आहां, तेव्हां तुम्हीं आमचे सरदार झालां हें ध्यानांत असूं द्या. (इतक्यांत अश्वसेन येतो त्यास) कायरे, तो थेरडा राजा कोठें आहे ?

अश्व०–सरकार ! चंडवर्मजींनीं त्याला पळवून लाविलें आहे! त्याच्या बरोबरचे सुमारें पस्तीस चाळीस सरदार घोडयावर बसलेले त्याचा शोध करीत फिरत असतां त्यांची आणि चंडवर्मजींची किल्लयाच्या पायथ्याशीं गांठ पडली. ते सर्व मानकरी व कालच्या वादळांत सांपडून वाट चुकलेले दुसरे आठ दहा सरदार, असे चंडवर्मजींच्या सांगण्यावरून करश्री वंदराकडे रवाना झाले. त्यांच्या बोलण्यावरून त्यांस तेथें मदत मिळेल असें दिसतें.

सुद०–ठीक आहे. तूं आतां शशिकलाबाईंबरोबर त्यांचे घरीं जा, वाटेंत त्यांना नीट संभाळून ने. समजलास ?

अश्व०–(लवून सलाम करितो.)

शशि०–सुदर्शनराव ! आतां मी येतें. ताई ! येतें अं, तुझी आणि माझी लौकरच गांठ पडेल.

चंद्रा०–ताई! चाललीस?–अग कोण आहे ग तिकडे ? कुंकवाचा करंडा घेऊन ये.

शशि०–ताई, अग, या घाईच्या वेळीं कसलें कुंकू आणि कसचें काय घेऊन बसली आहेस ? जातें मी.

चंद्रा०–अशी काय पण ताई अगदींच उतावेळ करावी ! बायकांचें सौभाग्य तें! (एक दासी कुंकू घेऊन येते. चंद्रानना शशिकलेस कुंकू देते, व शशिकला, मरुत्सेन आणि अश्वसेन जातात.)

सुद०–अरे,पाहतां काय त्या थेरडयाला गांठून त्याच्या मुसक्या बांधून त्याला मजपुढें घेऊन या. (आणखी कांहीं चाकर जातात.) या वेळीं लोक वाईट म्हणतील म्हणून मितां उपयोगी नाहीं. मी या प्रांताचा सार्वभौमराजा आहें, माझें कोण काय करणार आहेत ? मी या दुष्टाला जबर शासन देणारच !–अरे, काण आहे रे तिकडे ? तो बेरड सांपडला कायरे ?

(इतक्यांत दोन तिन चाकर चंडवर्म्याच्या मुसक्या बांधून त्यास घेऊन येतात.)

चंद्रा०–हाच तो मेला कृतघ्न, सगळ्या मुलखाचा खोटा.

सद०–अरे पहातां काय ? याला करकरून आंवळा !

चंड०–सरकार ! बाईसाहेब ! आपण हें करतां आहां तरी काय ? आपण या वेळीं आहां कोठें, आपलें व माझें नातें कोणतें आहे, याचा कांहीं तरी विचार करा ! मला असा छळूं नका !

सुद०–अरे, तुम्हीं त्याजकडे काय पहातां? टाका त्याला चांगला कचकून आवळून !

चंद्रा०–अहारे मेल्या ! कृतघ्न कोल्हा तोतूंच नव्हे का ?

चंड०–बया, तूं म्हणतेआहेस काय मला कांहीं समजत नाहीं ! जन्मादारभ्य आजपर्यंत कृतघ्नपणा म्हणजे काय तो मला मुळींच ठाऊक नाहीं !

सुद०–आः दुष्टा ! अधमा !–अरे, पाहतां काय ? त्याला असा घ्या खेंचून आणि टाका आंवळून या खांबाशीं ! चोरा ! तूं कृतघ्न नाहींस? (चंद्राननाः पुढें येऊन त्याच्या मिशा ओढिते.)

चंड०–परमेश्वरा ! काय हा अपमान ! या दुष्टेनें माझ्या मिशा उपटाव्या, यापेक्षां

मरण देखील बरें !

चंद्रा०—थेरड्या ! तुझे कैंस पिकले, तोंड करून बोलतोस तुला लाज नाहीं वाटत ? ह्मणें, माझ्या मिशा! थांब मेल्या ! तुझ्या मिशाच जाळून टाकतें !

चंड०—कृत्याबाई ! या वेळीं मी आडकून पंडलों आहें अशा वेळीं तूं काय करशील आणि काय न करशील ? परंतु **सुदर्शनराव** ! तुह्मीं नीट विचार करा ! तुह्मीं माझ्या येथें पाहुणे आलां असून तुह्मीं माझ्या आदरसत्कारांवर अशा आचरणानें पाणी घालतां हें नीट नव्हे ! बोला ! तुमचें ह्मणणें तरी काय आहे ?

सुद०—तुझ्या गप्पा पुरे कर! तोंड आटप! बोल **सौराष्ट्र**हून तुला एकादें पत्र आलें होतें कीं नाहीं ?

चंद्रा०—मेल्या ! काय असेल तें उघड बोल. चोरून कांहीं नको ठेवायला. आह्मांला आंतलें सगळें इथून तिथून कळलें आहे !

सुद०—आणखी त्या दुष्ट **राजवाहन**राजाचें लष्कर या देशांत येऊन उतरलें आहे, त्यांत तुझें कांहीं अंग आहे कीं नाहीं बोल!

चंद्रा०—आणखी तसेंच त्या खूळ लागलेल्या थेरड्या राजाला तूं कोणीकडे पाठवून दिलें आहेस ?

चंड०—आपल्या मनांत हे भलतेच संशय काय भरले आहेत ? मी एवढें कबूल करितों कीं, माझ्याकडे एक पत्र आलें आहे त्यांत असा प्रकार होण्याचा रंग आहे ह्मणून अजमासानें मजकूर लिहिला आहे. आणि तो लिहिणारा तरी कोणी शत्रुपक्षाकडचा नसून त्याला आपला आणि **सौराष्ट्र**राजाचा दोघांचेही पक्ष सारखेच वाटतात.

सुद०—चोर !

चंद्रा०—तूं महा ठक आहेस! मेल्या! खोटें बोलतोस !

सुद०—बरें, तूं **अतिपीडराजाला** कोणीकडे रवाना केलेंस ?

चंड०—**करश्री** बंदरीं.

सुद०—पण **करश्री** बंदरींच काय ह्मणून? त्याचा मला अगोदर जबाब मिळाला पाहिजे.

चंड०—मला अगदीं करकोंचून आंवळून बांधलें आहे ! अ—हाय !

चंद्रा०—कायरे, मेल्या! तुला ऐकूं येतें कीं नाहीं? तूं त्या थेरड्याला **करश्री** बंदरींच काय ह्मणून पाठविलेंस ?

चंड०—तुह्मीं दोघी लांडग्या त्यांच्या पाठीमागें लागून त्यांचे डोळे फोडून टाकाल, किंवा त्यांचा पोटाळा फाडून बाहेर काढाल, ह्मणून तें तुह्मांला करतां येऊं नये यासाठीं मी त्यांना तिकडे पाठवून दिलें ! अहाहा ! निर्लज्जांनो ! तुह्मांला कांहीं तरी शरम वाटूं द्या! महाराज येथून बाहेर पडल्यावर सगळे दोन प्रहर आणि सगळी रात्र एकसारखे पाण्यानें निथळत होते ! पाऊस एकसारखा पडत राहून वारा कोण सोसाट्याचा वहात होता! अशा वेळेस त्यांना निवाऱ्याला एक बोटभर सुद्धां कोरडी जागा नव्हती ! कालच्या सारख्या भयंकर प्रसंगीं प्रत्यक्ष एकादा व्याघ्र जरी दारासीं येऊन गुरगुरला असता, तरी त्याला देखील दार उघडून आंत घेण्याची ती वेळ, आणि तसल्या प्रसंगीं महाराजांना तुह्मीं दोघींनीं तसली विपत्ति भोगावयास लाविलें ! कांहीं तुह्मांला शरम नाहीं वाटली ? दुष्टे हो ! या तुमच्या अमानुष

आचरणाप्रमाणें प्रत्यक्ष हिंस्र श्वापदाचेही आचरण अमानुष नसेल !—काय दुष्टे ! माझें बोलणें ऐकून तुला हंसूं येतें ? असो. अजून काय झालें आहे ? देव जर दयाळु न्यायी असेल तर तो तुझा पुरता सूड उगल्याशिवाय कधीं रहाणार नाहीं, आणि तो सूड मी याच डोळ्यांनीं पाहीन !

सुद०—बच्चंपेरी, त्या गोष्टीचें तर नांवच सोडून द्या. दुष्टा ! तुझे डोळेच फोडून टाकतों, मग पहा सूड कसा पहातोस तो! अरे, याला धरारे बळवट !

चंद्र०—(दीन वाणीनें)अरे, येथें तुम्हीं इतके जण आहांत, यांमध्यें पापभीरु धर्मात्मा कोणीच नाहीं काय ? जर असाल, तर यावेळीं मदत करारे !(सुदर्शनराव त्याचा एक डोळा फोडतो.) अय्—य्—य्—य् ! हायहाय ! परमेश्वरा ! हा अन्याय तुला पहावतो काय ?

चंद्रा०—हें असलें कांहीं उपयोगी नाहीं. एक डोळा फुटला तर त्याबद्दल दुसऱ्या डोळ्याला उगीच बाईट वाटेल. याकरितां तोही फोडून टाकला पाहिजे !

सुद०—कायरे दुष्टा! तूं डोळ्यांनीं सूड पाहणार, नाहीं ? (दुसरा डोळा फोडण्याकरितां पुढें जाऊं लागतो.)

१ चाक०—महाराज ! आटोपून धरा ! मी लहानपणापासून आपली चाकरी करीत आलों, परंतु आपलें इमान जागविण्याची अशी संधि मला कधींच फांवली नाहीं. महाराज! मी आपणाला बजावून सांगतों, आपण आपला हात आटोपा !

चंद्रा०—मेल्या ! गप्प बस ! तुला कोणीं मधें चोंबडेपणा करायला सांगितला आहे ?

१ चाक०—बया, तूं गप्प रहा ! यावेळीं जर तुला मिशा असत्या तर त्या मी खचित उपटून टाकल्या असत्या !

सुद०—कायरे हरामखोरा ! तूं माझाच चाकर असून असें बेजबाब उत्तर देतोस ? थांब. गुन्हामा! तुझाच अगोदर समाचार घेतों. (दोघे लढूं लागतात.)

१ चाक०—होऊं देच तर ! तुला दाखवितों तरवारीचे दोन हात ! स्वारी आपण काय समजलां आहां? आपणाला पाणी पाजल्याशिवाय कधीं सोडीत नाहीं !

चंद्रा०—काय हा हरामजादा आपल्याच धन्यावर उठतो! —आण, देरे तुझी तरवार मला. (दुसऱ्या चाकराच्या हातची तरवार घेऊन पहिल्या चाकरावर मागाहून वार करितें.)

१ चा०—अरे मेलों रे मेलों !—**चंडवर्मजी** ! आपला अद्यापि एक डोळा शिलक आहे, तेवढ्यानेंच या दुष्टाला झालेली जखम तुम्हांला पहातां येईल !—अरे—मेलों रे मे———(मरून पडतो.)

सुद०—हा डोळा शिलक राहिला तर, आणखी कांहीं कमजास्ती पाहिल्यावांचून राहणार नाहीं! यासाठीं तोही फोडिला पाहिजे ! (दुसरा डोळा फोडतो.) कांरे, अधमा ! आतां सूड खुशाल पहा ! आतां समोर उजेडाऐवजीं सगळें येथून तेथें उजाड !

चंड०—(विव्हळत)आतां काय पाहूं ! हायहाय! आतां हें सर्व जगत् मला शून्य आणि अंधकारमय झालें आहे ! हायहाय ! ह्यावेळीं माझा प्रियपुत्र **मरुत्सेन** कोठें बरें आहे? **मरुत्सेना** ! **मरुत्सेना** ! तुझ्यामध्यें जर कांहीं पितृवात्सल्य म्हणून असेल, तर यावेळीं येथें येऊन तूं माझ्यावद्दलचा सूड या दुष्टांवर घे ! हायहाय !

चंद्रा०—रड ! मेल्या ! बस असाच हायहाय

करीत ! विश्वासघात करतांना वरं गोड वाटलें ? घे हें त्याचें फळ ! आतां तुझ्या-बद्दल सूड उगवायला **मरुत्सेन** सावकाश येईल ! थूः तुझ्या तोंडावर ! जो तुझा मनापासून द्वेष करितो, त्यालाच तूं आपला पुत्र म्हणून म्हणतोस! त्यानेंच तर तुझ्या विश्वासघाताची आम्हांला ही खबर दिली ! धे, आतां त्याचा खेटर अडला आहे तुझ्यावद्दलचा सूड उगवायला !

चंड०—हायहाय! मी केवढा मूर्ख! एकून माझ्या **मधुकराचा** खोटा छळ झालाना ! हाय हाय! **देवा नारायणा!** तुला डोळे आहेत! त्या माझ्या बाळाचें संरक्षण कर एवढंच तुजपाशीं मागणें आहे ! हायहाय! **मधुकरा ! मधुकरा!** बाळा **मधुकरा !**—

चंद्रा०—अरे—ए—तूं या मेल्याला किल्ल्याच्या दरवाज्या बाहेर ढकलून ! जाऊं दे यांला आतां **करश्री** बंदराची वाट सोधीत! (एक चाकर चंडवर्म्यास घेऊन जातो.)(नवऱ्याकडे पाहून) पण अग बाई बाई ! हें काय! आपलें तोंड असें कशानें झालें ?

सुद०—प्राणप्रिये ! मला जखम लागली आहे. चल मजबरोबर.—या आंधळ्याला ह्या किल्ल्याबाहेर घालवून द्या आणि या प्रेतालां खालीं दलदलींत फेंकून द्या !—प्राणप्रिये ! रक्त जोरानें वाहूं लागलेंसें वाटतें ! हाय हाय ! हा वार या वेळींच लागला ही फार वाईट गोष्ट झाली! प्रिये! मला तुझा हात दे. (चंद्राननाचा सुदर्शनास संभाळून घेऊन जाते.)

२ चाक०—खचित, या दुष्टाचें देव कधीं बरें करणार नाहीं ! जर करील तर मी खचित दरवडे घालीन, खून करीन, काय पाहिजे तें दुष्कर्म करण्यास कधीं मागें पुढें पहाणार नाहीं !

२ चाक०—खरोखर ही **कृत्या** जर पुष्कळ दिवसपर्यंत जगली तर हिचें उदाहरण पाहून सगळ्या बायका एकून एक अशाच कृत्या होतील!

२ चाक०—तें राहूं दे आतां. चल आपण **चंडवर्मजींच्या** मागोमाग जाऊं, आणि काल त्या दलदलीच्या अंगाला आपणाला एक वेडा भेटला तो, त्याच्या स्वाधीन त्यांना करूं. तो गुलाम वेडा तर खरा, पण तर्कबाजही आहे. तो त्यांना कोणीकडे पाहिजे तिकडे घेऊन जाईल.

३ चाक०—बरं, तूं जा. त्यांचें तोंड सगळें रक्तानें भरून गेलें आहे, त्यावर लावायला एक कडकं आणखी अंड्याचा बलख घेऊन मीही तुझ्या मागोमागच येतों !—आपला उपाय तर आपण करूं, पुढें देवाची मर्जी !

(पडदा पडतो.)

अंक ४.

प्र० १—माळरान.

(मधुकरराव येतो.)

मधु०—हें फार चांगलें. लोकांनीं मनांतून आपला तिरस्कारच करीत असून आपण मात्र हांजीहांजी करून घेत असावी त्यापेक्षां, ते आपला तिरस्कार करितात हें कळलेलें फार चांगलें! दुर्दैववशेंकरून अत्यंत नीच स्थितींत जो मनुष्य जन्मतो त्याला ती स्थिती जाऊन चांगले दिवस येण्याची आशा असून त्याला कोणापासून भीति तरी मानावयास नको असते ! परंतु आरंभीं मनुष्य सुखांत असून मागाहून त्यानें विपत्तिपाशांत पडावें यासारखी दुसरी वाईट स्थिति

जगांत नाहीं. पण आतां त्याबद्दल विचार करावयाचाच नाहीं. जो दिवस येईल तो भाग्याचाच असें समजून वर्तन करावयाचें हाच निश्चय !–आं–अरे, पण हें कोण इकडे येत आहे ?

(एक मातारा मनुष्य चंडवर्म्याचे हात धरून त्यास घेऊन येतो.)

मधु०–(पाहून) काय ! हे बाबाच इकडे येत आहेत ? आणि त्यांचे बरोबर एवढीच सैनात काय ? परमेश्वरा ! काय हा संसार ! किती क्षणभंगुर यांतील सुखें ! धिक्कार असो ! धिक्कार असो !

म्हा०–महाराज ! आपण असें म्हणूं नये ! माझ्या वयाला आज साठांवर वर्षें होऊन गेलीं; इतके दिवस मी आपल्या व आपल्या तीर्थरूपांच्या आश्रयानें आहें. महाराज ! आजपर्यंत मी आपलेंच अन्न खात आलों आहें.

चंड०–तूं आतां निघून जा तें कांहीं असो. मला सुख वाटावें म्हणून तूं कितीही खटपट केलीस तरी ती व्यर्थ आहे, त्याजपासून माझ्या मनाला उलटा त्रास होतो !

म्हा०–महाराज ! आपण म्हणतां तें खरें, पण आपल्याला डोळ्यांनीं कांहीं दिसत नाहीं, त्यामुळें आपल्याला वाट समजेल तरी कशी?

चंड०–बाबारे, आतां माझी वाटच संपली, याकरितां मला डोळ्यांची कांहीं जरूर नाहीं. मला दिसत होतें, तेव्हांच मी अडखळून पडलों ! बाबारे ! दृष्टीचा नेहमींच उपयोग होतो असें समजूं नको ! हजारों वेळ असें घडून येतें कीं आपलीं व्यंगेंच आपल्या उपयोगी पडतात.–हाय रे बाळा **मधुकरा** ! म्यां दुष्टानें व्यर्थ तुजवर कोप करून तुला संकटांत पाडिलें ! हायहाय ! आतां माझा बाळ मला डोळ्यांनीं दिसण्याची आशा राहिली नाहीं, तथापि मी जिवंत राहून जर एक वेळ त्याचा अंगस्पर्श होईल,तर तेवढ्यानेंच मला डोळे आले असें मी समजेन ! हायहाय !

म्हा०–अरे, तोँ कोण आहेरे तिकडे ?

मधु०–(चंडवर्म्याची ती स्थिति पाहून मनांत) हरूहर ! एवढा वेळ माझ्या दुःखावस्थेचा कळस झाला असें मी मानीत होतों, परंतु तें खोटें ! हायहाय ! परमेश्वरा ! माझ्या नशीबीं आणखी कोणचीं दुःखें तूं लिहिलीं असतील तीं असोत !

म्हा०–अरे, हा खुळा **उंदऱ्या** !

मधु०–(आपणाशीं) हायहाय ! मी आपणाला **उंदऱ्या** म्हणवितों, पण उंदरापेक्षांही यावेळीं माझी वाईट स्थिति झाली आहे !

म्हा०–ए **उंदऱ्या** ए ! अरे ! चाललास कोठें?

चंड०–(ऐकून) कायरे कोणी भिकारी आहे वाटतें ?

म्हा०–महाराज ! हा भिकारी आणि खुळा दोन्ही आहे.

चंड०–हां तरी त्याला कांहीं थोडी अक्कल आहे यांत संशय नाहीं. कारण अक्कल नसती तर तो भीकच न मागता. काल रात्रींच्या वादळांत मी फिरत असतां मलाही एक भिकारी खुळा भेटला होता, त्याची ती स्थिति पाहून त्याच्या पेक्षां अत्यंत क्षुद्र कृमि कीटक तेही बरे असें मला वाटलें होतें. हायहाय ! त्याच वेळीं माझ्या बाळा **मधुकरा**ची गोष्ट माझ्या मनांत आली, तरी पण त्याविषयीं माझें मन यावेळीं जसें निर्मळ आहे, तसें त्यावेळीं नव्हतें. पण घरीं गेल्यावर मीं कांहीं निराळाच प्रकार

ऐकिला ! हरहर ! असो. नशीब! त्याच्या-पुढं कांहीं कोणाचा इलाज नाहीं ! तें ठेवील तसें राहिलें पाहिजे !

मधु०—(आपणाशीं) अरे हें कसें काय झालें असेल बरं ? हायहाय ! केलेल्या कर्मांचा मागाहून पस्तावा होणें ह्यासारखें दुसरें दुसरें दुःख जगांत नाहीं! असो. (उघडपणें) अलेलेले—थंड लय लागतीले!—**उंदल्याला** कुनी कांबलून तली द्याले। अलेलेले—कुड-कुडकुडकुड !—सू—:!

चंड०—अरे, काल रात्रीं देवळांत मी उघडाबोडका एक जण पाहिला तोच हा काय ?

ह्या०—होय, महाराज ! तोच—

चंड०—तर कांहीं चिंता नाहीं. तूं आतां जाच. मी या भिकाऱ्याला बराबर घेऊन पुढें जातों. मी आजपर्यंत तुझा धनी होतों याकरितां तूं माझें एक ह्मणणें ऐकच. तें कोणचें ह्मणशील तर मी आतां **करश्री** बंदराकडे जाणार आहें त्याच्या वाटेवर तूं आह्मांला गांठून थंडीनें कांकडलेलें शरीर झांकण्याकरितां ह्याला एकादें धोतर किंवा घोंगडी कांहीं तरी आणून दे.

ह्या०—महाराज ! आपण ह्मणतां खरे, पण ह्याला वेड लागलें आहे. हा खुळा आहे.

चंड०—बाबारे, हा त्याचाच दोष नव्हे. पर्वाच्या ग्रहणापासून सगळा मनुच बदलला आहे. याकरितां जा आतां आणि मी सांगितलेलें काम कर. अगर तुझी नसली मर्जी तर नकोही करूं, पण तूं येथून निघून चालता होच कसा !

ह्या०—महाराज ! आपण मजविषयीं कांहीं काळजी करूं नये. कांहीं झालें ह्मणून चिंता नाहीं. मी याला धोतर घोंगडी कांहीं तरी आणून देतों. (निघून जातो.)

चंड०—अरे बाबा ! असा मजकडे ये पाहूं.

मधु०—(आपणाशीं) इलाज नाहीं. गेलेंच पाहिजे. (जवळ जाऊन) अलेले ! पण ह्यें का झालं जी? तुमच्ये ह्ये डाल्यांतून लगुत लय वावतं हाये जी ! लगुत लगुत !

चंड०—वाहूं दे. पण तुला **करश्री**ची वाट टाऊक आहे ?

मधु०—व्हय जी. माज्ये मागं समिंद लागलाया त्यो मास्ती लोज लोज हिंडाया लाविल्यो. त्येशी हाय टावं मस्ती! पण डोकूशी लय मिली मिली कलती !—

चंड०—ठीक आहे. पण मला नीट आठवून सांग, तुला **करश्री** बंदर टाऊक आहे ?

मधु०—**किळमुळी** बंदुल? व्हय! व्हय व्हयजी! **किळमुळी** व्हय ! हांजी. माज्ये नाकावल समिंद हाये त्यो समदं दावित्यो ! **जोखाई**च वालं वायलं ह्मजी डोल्यांला समद्याची पन घान येती ! ह्ये जिभली जिभलीनं समदं ऐकाया गावतं !—**उंदल्या** छूः! समिंद **जाखाई जोखाई** व आवू !—!! मिलूलू—चलां दावितों तुमास्ती **किळमुळी** बंदुल ! मिलूलू—! वाव् !

चंड०—अरेरे ! तुझ्या दुर्दैवानें तुझी फारच नागवण करून सोडली आहे, तर हे घे तुला मी पैसे देतों. मला कशाची जरूर उरली नाहीं, याकरितां या पैशांचें कांहीं खायला घे. हायहाय ! परमेश्वरा ! संपत्ति तूं निर्माण केलीस ती सगळ्यांनाच सारखी वाटून दिली असतीस तर किती बरें बरें झालें असतें ! अरे, कायरे, तुला बंदराच्या बाजूचें टंकाड माहित आहे ?

मधु०—व्हय व्हय. जी व्हय व्हय !

चंड०—मी सांगतों हें नीट समजून घे.हें टेंकाड आहे त्याला एक मोठा कडा आहे, त्याच्या पायथ्याशीं खालीं समुद्राचें पाणी **सिंधु** नदाच्या पाण्यांत कालवून खूप खळखळाट होत असतो. त्या कडयाच्या अगदीं वरच्या टोंकावर मला नेऊन उभा कर, म्हणजे माझ्याजवळ कांहीं द्रव्य व दागिने आहेत, ते सगळे तुझ्या स्वाधीन करून मी आपल्या दुःखांचा अंत करून टाकीन, ! तेथपर्यंत मला नेऊन पोंचविलेंस म्हणजे पुढें मला वाटाडयाची गरज रहाणार नाहीं !

मधु०—व्हय व्हयजी ! पन मास्नी कांबलून द्येल न्हव का? व्हय व्हयजी ! धला माजा हात ! अस्सा! मी तुमास्नी ततंच न्येतों! **उंदल्या!** भुल्-ल्-ल् ! पल ल्येका वाल्यावानी भुल्-ल्-ल् ! **उंदल्या** ! भुल्-ल्-ल् !

(निघून जातात.)

प्र० २.—खलदर्शनरावाच्या नगरी-बाहेरील बाग.

(शशिकला व मरुत्सेन समोरासमोर येतात.)

शशि०—म्हटलें म्हणजे जोशीबोवांनीं गांवांत शिरायला चार घटकांनीं मुहूर्त आहे म्हणून सांगितलें, त्याबरोबर मी आलें आहें म्हणून कळवायला **अश्वसेना**ला पुढें पाठविलें, त्याला दोन घटका अधिक झाल्या. इतक्या वेळांत तो पोंचून स्वारी म्हटलें म्हणजे एव्हांना आपल्याला घरीं न्यायला इकडे यावी, पण कां आली नाहीं कांहीं कळत नाहीं ! (इतक्यांत अश्वसेन परत येतो.) कसें कायरे बाबा ! परत यायला उशीरसा लागला ? तिकडचें कसें काय ? त्यांना सगळें सांगितलेंस ?

अश्व०—सांगितलें बाईसाहेब ! पण काय सांगावें, धनी साहेबांची वृत्ति आज कांहीं फारच चमत्कारिक दिसली. शत्रु देशांत येऊन उतरला आहे म्हणून' सांगितलें, तें ऐकून जसा कांहीं त्यांना आनंदच झाला अशा प्रकार ते हंसले ! आपली स्वारी परत आली आहे म्हणून कांठिवलें, त्यावरोबर त्यांनीं म्लान वदन केलें आणि म्हणाले " फार वाईट झालें! " **चंडवर्मजीं**नीं राजद्रोह केला, व त्यांचं चिरंजीवांनीं स्वामिभक्ति संभाळली म्हणून मीं म्हटलें, तेव्हां त्यांनीं उलटें मलाच मूर्ख ठरविलें आणि म्हणालेः—" तूं मूर्ख आहेस, कांहीं तरी भलतेंच बडबडतोस " ! तात्पर्य काय, त्यांना जी आनंदाची म्हणून गोष्ट सांगायला जावें, ती त्यांना वाईट वाटते, व जीपासून वाईट वाटवें तिलाच ते चांगली समजतात!

शशि०—समजलें. ठीक आहे. जा, बागेच्या दारांतच अस. स्वारी बहुशः इकडे येईल तर आली म्हणजे मला येऊन कळीव. (अश्वसेन जातो) (हंसून) ऐकिलें त ? काल रात्रीं मी आपणाला सांगितलें तें हेंच ! अखेर निदानाला आलेंच ! माझें लग्न झालें तेव्हांपासून ही दळी भागुबाई मीं ओळखून टेविली आहे ! बर, तें असो. **मरुत्सेनराव** ! ते एक शेंपुट घालून बसले, तरी याप्रसंगीं आपण कंबर बांधून उभें राहिलें पाहिजे. तुम्हीं आतां याच पावलीं परत ताईच्या गोटांत जा, आणखी जलदी करून तिच्या नवऱ्याचें सगळें सैन्य गोळा करा. मी इकडची सर्व व्यवस्था करतें. आणखी घरांत " राम हरी ! राम हरी ! " करीत बसायला हातान चिपळ्या

ती तशीच पाण्याच्या ओवाऱ्यावर खालीं वाहून गेली असती, परंतु इतक्यांत **शिलादित्या**नें त्वरा करून पाण्यात उडी टाकून ती बुडूं लागते इतक्यांत तिला वर उचलून धरलें. इकडे **जयंती** घाबरलेली खोलाच्या अंगून एका अंगास सरकून. मलतीकडेच पोहून जाऊं लागली, तथापि शाबास **वसुभद्राचार्या**ची, त्याच्या पाठीमागें **जती** बसला असल्यामुळें त्यास पुष्कळच अडचण झाली होती तरी धीर न सोडतां त्यानें वरची लांबवून. **जयंती**-चा लगाम अडकवून आपणाकडे ओढिला. नंतर दहा पांच पळांत सर्वजण नदीबाहेर आले, आणि **त्रिवेणी**ला पुनरपि घोडीवर बसविलें. त्यावेळीं मागाहून कोतवालाचे शिपाई येऊन त्यांनीं गांठण्याच्या भीतीमुळें तिचें लुगडें पाण्यानें ठिबकत होतें तें पिळण्यासही अवकाश नव्हता, यामुळें सर्वजण घोडे दौडांत पुढें जाऊं लागले इतक्यांत पाठीमागून एकदम पाणी कांपल्यासारखे सळसळ आवाज ऐकूं येऊं लागले, व आरडा ओरडा व धामधूम खूप झाली, यावरून कोतवाल व त्याचे शिपाई यांनीं आपले घोडे पाण्यांत घातले असें त्यांच्या लक्षांत आलें.

इतक्यांत समोर दलदलीच्या बाजूस लहानसा टेकडीसारखा एक उंचवटा होता त्याच्याकडे नजर देऊन **वसुभद्राचार्य त्रिवेणी**स ह्मणतोः—"आतां आपण या टेकडीच्या पलीकडे गेलों ह्मणजे त्याचे कडेनें आपली वाट चालते, त्या वाटेनें आपण गेलों कीं शत्रूंच्या बापालाही आपला ठमग पडणार नाहीं."

त्रिवेणी कांपत कांपत उत्तर करितेः—"**अर्हत्**! **अर्हत्**! काय होईल तें खरें! निदान या टेकडीच्या आड आपण गेलों ह्मणजे काहीं वेळ तरी आपण त्या मेल्यांच्या दृष्टीस पडणार नाहीं! पण—पण—मला बाई या वाटेनें कांहीं आपली धडगत वाटत नाहीं! असो, **अर्हत्**!"

इतक्यांत **जरठकर्ण** जती बोलतोः—"बाळे **त्रिवेणी**! तं अगदीं भिऊं नको. ज्या दीनदयाळ **अर्हत्प्रभू**नें आपलें इतका वेळ रक्षण केलें तोच आपला निरंतर पाठीराखा होईल! तोच जर दया करील तर आतां आपण जशा टणक जमिनीवरून चालतों आहों तशीच त्या दलदलींतलीहीं जमीन टणक होईल!"

इकडे **शिलादित्या**चें मन स्वस्थ नसून त्याचें सर्व लक्ष वर डोंकीवर आभाळाकडे लागलें होतें, व तो ह्मणालाः—"कसेंही असो. पण आजचें लक्षण कांहीं नीट दिसत नाहीं. कारण त्या टेंकडीला वळसा घालायला लागूं इतक्यांत चंद्र ढगांआड जाईल, आणि आपण अंधारांत गडप होऊन जाऊं. असल्या अंधारांत दलदलींतून कसे निभावून जाऊं कांहीं समजत नाहीं! का तुह्मांला कसें काय वाटतें?"

तो तरुण व्यापारी **त्रिवेणी**स ऐकूं न जाई अशा हलक्या स्वरानें उत्तर देतोः—"कसेंही असलें तरी त्याला दुसरा इलाज नाहीं. तथापि एका अर्थानें हा अंधेर आपणाला उपयोगीच आहे. कारण जर अशा प्रसंगी उजेडांत खालची वाट दृष्टीस पडूं शकेल, तर कदाचित् ते त्या नेमक्या वाटेनें आपल्या मागून येण्याचा संभव आहे. अंधेरांत चालणें हें आपणास कदाचित् धोक्याचें होईल ही गोष्ट खरी. तथापि त्यायोगानें आपल्या शत्रूंना मृत्युमुखांतच पडावें लागेल यांत संशय नाहीं. यासाठीं आतां होईल तितकी त्वरा केली पाहिजे. कारण या वेळीं एक एक क्षणाची योग्यता लाख लाख रुपयांहूनही अधिक आहे!"

वसुभद्राचार्य याप्रमाणें बोलल्यानंतर सुमारें पाव घटिका तीं सर्वजण मुकाट्यानें पुढें चाललीं, तों इतक्यांत वरील आकाशमंडपांत मध्येंच जीं कित्येक लांबचलांब अशीं काळीं ढगें रेड्याच्या जाड कातड्यांप्रमाणें पसरलीं होतीं, त्यांचे आडून चंद्रराजाची स्वारी जाऊं लागून त्या सर्व प्रदेशावर अधिकाधिक काळिमा येऊं लागली, व अखेर संपूर्ण चंद्रबिंब ढगांच्या आड जाऊन दिसेनासें झालें. तथापि त्याचे किरण त्या ढगांच्या पलीकडल्या अवकाशांत चोंहोकडे आडवे तिडवे पसरले होते, त्यांच्या तेजांतील कांहीं थोडा अंश भूपृष्ठावर परावर्तित झाला होता, व आसपास गगनमंडलांतही अल्प स्वल्प तारका दूरदूर अंतरांवर डोळे मिचकाविल्याप्रमाणें चमकत होत्या, यामुळें त्या तसल्या अंधकाराच्या प्रसंगीं त्या प्रदेशाचें तें भयंकर स्वरूप अंशतः तरी प्रेक्षकांच्या मनांत उतरण्यास त्या वेळचा अंधकपणा फारच सहायकारी होण्याजोगा होता. आमचे हे चार वाटसरू सांप्रत ज्या ठिकाणीं होते, त्या ठिकाणाहून समोर पुढें पाहिलें असतां क्षितितलावर लांबचलांब अंधकाररूपी समुद्र पसरला आहे काय असाही क्षणमात्र भास झाल्यावांचून राहत नसे. त्या भाससृष्टींतून मनुष्य जागें होऊन पुनरपि पाहूं लागे, तों त्यास त्या तसल्या निबिड अंधारांत खालीं कृष्णवर्ण भूवस्त्रच पसरल्याचा भास होत असे. तथापि त्यावरून कोठें एवढी पाऊलवाट किंवा जवळ लांब कोठें तरी एवढेंसें खोंपट याचा मागमामूसही कळून येत नसे. एकंदरींत त्या प्रदेशाचा त्या वेळचा देखावा अत्यंत भयानक असून प्रत्यक्ष पर्वताप्रमाणें अत्यंत धैर्यशाली पुरुषाच्याही अंतःकरणांत भीतीचें जनन करण्याजोगा होता. तेव्हां तो तसला देखावा डोळ्यांसमोर असतां त्रिवेणीच्या मनाची कशा प्रकारची स्थिति झाली असावी याची कोणासही सहज कल्पना करिता येईल. तथापि ती जात्याच मनाची धीट आणि दुःखाविषयीं पुष्कळच कंटक होती, यामुळें जरी ती आपल्या घोडीवर बसलीं असून तिच्या सर्वांगास इतकें कांपरें सुटलें होतें कीं त्याच्या भरांत ती एकदे वेळ घोडीवरून खालींही पडती, तरी तिनें आपल्या बरोबरच्या लोकांस आपणास झणजे भीति वाटते आहे याचा एवढा देखील संशय वाटूं दिला नाहीं. असो. अशा रीतीनें तीं सर्वजण पुढें जातां जातां त्या दलदलीच्या प्रदेशांतील अतिशय खराब व अतिशय भयंकर अशा भागीं येऊन पोंचलीं. या ठिकाणीं खालची जमीन इतकी मऊ व भिसभिशीत होती कीं, तिजवर एकादा लहानसाच पक्षी हलकेच येऊन बसला तरी त्याच्यासुद्धां भारानें ती ओघळून जाऊन खालून पाणी वर येण्याचा संभव होता: तथापि तशा अडचणीच्या जागेंतून **वसुभद्राचार्य** एकाद्या अगदीं पटाईत माहितगाराप्रमाणें पुढें, व मागाहून बाकीचीं माणसें, याप्रमाणें तीं पुढें जाऊं लागलीं त्या प्रसंगीं त्यांच्या घोड्यांच्या टापांनीं हदळून गेल्यामुळें खालची जमीन करकर वाजूं लागली, त्या आवाजाबरोबर आसपास जलसंचारी अशा अनेक विहगवृंदांच्या घरट्यांतून भीतित्रस्त असे विहग बाहेर पडून पंख फडफडावीत व क्रयां क्रयां इत्यादि प्रकारचे शब्द करीत त्या घरट्यांसभोंवतीं मंडळाकार भ्रमणें करूं लागले. सर्वांच्या तोंडांतून दीनवाणे व विलापयुक्त ध्वनि निघून त्यांच्या कलकलाटानें एवढा विस्तीर्ण प्रदेश पण चोंहीकडे नादित होऊन गेला. तथापि या प्रकाराकडे बिलकुल लक्ष न देतां आमचे

घोडेस्वार वेगानें पुढेंच जात चालले. मागाहून सुमारें एका हांकेच्या अंतरावर कोतवाल आणि त्याचे शिपाई यांचे घोडे दौडत येत असून त्यांच्या टापांचे ध्वनि व त्या शिपायांच्या मोठमोठ्या आरोळ्याही कानीं पडत होत्या. अशा. या रीतीनें अर्धी घटिका मार्ग क्रमण केल्यानंतर **वसुभद्राचार्या**नें त्यांस हलक्या स्वरानें उजव्या अंगानें वळण्यास सांगितलें.

तो ह्मणाला—"हां, जपून जपून चला. असे एकेक माझ्या मागून या. जर, का एक कैसभर इकडे किंवा तिकडे पाऊल पडलें, तर प्राणांवरही गुदरण्याचें भय आहे." इतकें बोलून तो **जरठकर्ण** जतीस ह्मणालाः—"**भदंतजी**! आतां तुह्मीं माझ्या मागून उतरून **शिलादित्या**चे मागें बसा. **त्रिवेणी**ची घोडी मजमागून चालूं द्या. मी पुढें होतों. परंतु एक गोष्ट पक्की ध्यानांत ठेवा, जरकरितां माझें पाऊल घसरून भलतेंच कांहीं झालें, तर तुह्मीं एक पाऊलही पण पुढें टाकूं नका. टाकाल तर प्राणांस मुकाल!"

इतकें झाल्यावर **जरठकर्ण** जती खालीं उतरून **शिलादित्या**च्या मागें घोडयावर बसला, आणि मग तीं सर्वजण एक अरुंद व करकर वाजून हलणाऱ्या वाटेनें सावकाशपणें पुढें चालूं लागलीं. खालीं जमीन इतकी हदळत होती, व त्यांच्या घोडयांचे खूर त्या दमटसर जमिनींत इतके खोल बुडून जात होते, कीं सरतेशेवटीं **त्रिवेणी**चा जीव घाबरल्यासारखा होऊन तिनें **वसुभद्राचार्या**स "तुह्मीं वाट तर चुकलां नाहींना?" ह्मणून विचारलें.

वसुभद्राचार्य उत्तर करितोः—"**त्रिवेणी**! तूं ही शंका देखील मनांत आणूं नको. मी जर चुकून गेलों असतों, तर एव्हांपूर्वी केव्हांच आपण या दलदलींतल्या डबक्यांत घोडयासकट बुडूनही गेलों असतों!"

"अगबाई! हीं डबकीं इतकीं का खोल आहेत?" **त्रिवेणी** घाबरून विचारिते.

परंतु **त्रिवेणी**च्या या प्रश्नास उत्तर मिळण्याच्या पूर्वीच मागच्या अंगानें एकदम कोणी पाण्यांत पडल्याचा, व मागाहून तोंडांतून भयंकर किंकाळी बाहेर पडते आहे नाहीं इतक्यांत तोंडांत पाणी जाऊन गुदमरून गेल्याचें, असे दोन आवाज ऐकूं आले, त्यांवरून आपला पाठलाग करणाऱ्यांपैकीं कोणी तरी एकजण आपणा मागून येण्याचा यत्न करीत असतां मेला ह्मणून सर्वांनीं अनुमान केलें.

तो प्रकार मनांत येऊन **त्रिवेणी**स त्या मृत मनुष्याबद्दल फार कींव वाटली, आणि ती ह्मणालीः—"अग आई! बिचारा फुकट प्राणांस मुकला! **वसुभद्राचार्य**! सावधगिरीनें चला बरें, नाहीं तर—"

तो उत्तर करितोः—"**त्रिवेणी**! तूं मजविषयीं यत्किंचित्ही काळजी करूं नको. जर हरयुक्तीनें तुझ्या जीवाचा बचाव होणार आहे, तर मागाहून माझ्या जिवाचें कांहीं झालें ह्मणून भीति नाहीं! तुझा आणि माझा विवाह होण्याचें परमेश्वराच्याच मनांत नाहीं, तेव्हां मला जगून तरी काय कर्तव्य आहे?"

इतक्यांत सर्वांच्या मागून **शिलादित्य** येत होता, तो मोठ्यानें ओरडून बोललाः—"हां, पाय जलदी उठवा! कोतवालाच्या लोकांना आपली वाट सांपडली आहे, व ते आपणामागें लागून येत आहेत!"

तो तरुण व्यापारी उत्तर करितोः—"त्यांना खुशाल येऊं द्या. ते आले तरी त्यांच्या हातून तुमचें काडीइतकेंही वांकडें होणार नाहीं!"

"चोरटचा गुलामा! तें तर नांवच सोडून दे!" अशी इतक्यांत एकाएकीं मागाहून कोतवालाच्या एका शिपायाची आरोळी ऐकूं आली, व तीबरोबर त्या शिपायानें **वसुभद्राचार्यास** लागावी अशा धोरणानें गोफण झुगारली, तिचा धोंडा गुं आवाज करीत वेगानें येऊन त्यास न लागतां त्याच्या घोडचाच्या बरगडीवर जोरानें आपटला. त्याबरोबर घोडा एकदम मागच्या दोन पायांवर उभा राहूं लागला, तों तोल जाऊन त्याचें सगळें ओझें बाजूला दलदलीच्या पाण्यांत गडपदिशीं बुडून गेलें. मात्र त्यांत चमत्कार एवढा झाला कीं घोडा उभा राहूं लागतांक्षणीं **वसुभद्राचार्यानें** लगाम सैल सोडून मागच्या मागंच खालच्या वाटेवर उडी घेतली, त्यामुळें तो मात्र बचावला.

त्या घोडचानें यात्रमाणें गचकळी खाल्लेली एकून तिकडे त्या शिपायास त्यावरील स्वारच मेला असें वाटलें, व तो मोठचा आनंदानें ती गोष्ट ओरडून ओरडून आपल्या साथीदारांस सांगूं लागला. परतु हा त्याचा आनंद फार वेळ टिकला नाहीं. कारण **शिलादित्या**जवळही एक गोफण होती, त्या गोफणीनें त्यानें एक धोंडा नेमून त्या शिपायाच्या डोक्यावर मारला. त्याबरोबर स्वारी घेरी येऊन घोडचावरून खालीं घसरली ती खालीं पाण्यांत गेली; व त्यानें घोडचाला आपणामागें खालीं ओढल्यामुळें त्याचे मागोमाग त्या खाडचांत त्याच्या अंगावर पडून घोडाही बुडून गेला.

इतक्यांत **वसुभद्राचार्य शिलादित्यास** ओरडून सांगतोः—"ऐकिलंतका, गोफणीनें लढाई खेळण्याच्या नादाला तुम्हीं मुळींच नका लागूं! कारण ही दलदलच आपणाकरितां तें काम करणार आहे!" इतकें बोलून तो **त्रिवेणीस** हणालाः—"माझा घोडा गचावला याबद्दल मला वाईट वाटतें, पण त्यांत एक बरें झालें कीं, मी आतां आहे असा पायीं चालला असतां तुझ्या घोडीला नीटपणें संभाळून नेऊं शकेन."

असें बोलून तो **जयंती**चा लगाम हातीं धरून अधिक जलदीनें परंतु अतिशय सावधगिरीनें तिला चालवू लागला. याप्रमाणें कांहीं वेळ चालत असतां बरेच दूर जमिनीच्या सपाटीवर कंदिलाच्या उजेडासारखा उजेड उत्पन्न होऊन तो आपणाकडे येतांना त्यांच्या दृष्टीस पडला.

तो पाहण्याबरोबर **त्रिवेणी**च्या तोंडांतूनें एकदम "**अर्हत्प्रभु** धन्य आहे! **अर्हत्प्रभु** धन्य आहे!" असा उद्गार निघाला, व ती हणालीः—"खचित कोणाला तरी आपला आवाज ऐकूं गेला आहे, व आपणाला मदत देण्याकरितां कोणी तरी येत आहे."

वसुभद्राचार्य उत्तर करितोः—"छत्! भलतेंच! हा कंदिलाचा दिवा नव्हे! ही **वेताळा**ची दिवटी आहे! इच्या उजेडावर भरंवसा ठेवून जर मनुष्य जाऊं लागेल, तर तो एकादवेळ दलदलींतील अतिशय भयंकर डबक्यांतही जाऊन पडेल."

याबरोबर आपलें खरें स्वरूप **त्रिवेणी**स कळविण्याकरितांच काय, जी दिवटी इतका वेळ एकाद्या मेणबत्तीप्रमाणें स्वच्छ व अगदीं संथपणें जळत होती, ती एकाएकीं चोंहींकडून वाढूं लागलीसें दिसूं लागलें, व त्या वेळीं तिचा तो पीतवर्ण बदलून तिची ज्वाळा कांहीं रक्तवर्ण व कांहीं नीलवर्ण अशी भासली, व सरतेशेवटीं तिच्यांतून लक्षावधि ठिणग्या निघूं लागून ती त्या मैदानावर मोठचा वेगानें इकडून तिकडे धांवूं लागली.

"पाहिलेंस **त्रिवेणी** !" तो तरुण व्यापारी बोलतोः—"आता या दिवटीच्या वाट दाखविण्याचा काय नेम समजावा, आणखी त्यावर विश्वास तरी कसा ठेवावा ?"

इकडे **त्रिवेणी** आपल्या मनांत **अर्हता**चा जप करूं लागली, आणि शेवटीं ह्मणालीः—"खचित, ही कांहीं तरी भुताटकी आहे !"

तो उत्तर करितोः—"छेः, ही आपली उगीच समजूत आहे! झाडें बिडें पाण्यांत कुजून पडलीं असलीं, ह्मणजे असा प्रकार वारंवार दृष्टीस पडतो !—ही पहा, ह्या दिवट्यांची तर आतां लाखोलीच चोंहीकडे नाचायला लागली आहे !"

त्रिवेणी समोरल्या अंगास पहाते, तों हा प्रकार खराच. त्या दलदलींतून सहसा मनुष्याचा किंवा जनावरांचा संचार कधीं होत नसे, त्या ठिकाणीं सगळी जमीन हदळून गेल्याकारणानें एकदम चोंहींकडून दिवट्यांची रांग चमकूं लागली. ह्या दिवट्यांपैकीं कांहीं दिवट्या दूर दूर धांवत जाऊं लागत, व कित्येक तर आमच्या वाटसरांच्या अंगावरच जणों चालून येत आहेत अशा भासत. त्या मध्येंच एकदम थांबत, किंवा एकदम हवेंत उड्डाणही करीत. आतां पहावें तों त्या विजून जाऊन त्यांचें शरीर अणुपरिमाण वाटूं लागे, परंतु फिरून क्षणभऱ्यानें पहावें तों त्यांचीं शरीरें विस्तार पावूं लागून मोठा प्रचंड डोंबाळाच पेटल्यासारखा वाटे. परंतु या सर्वांत चमत्कार ह्मणावयाचा तो एवढाच होता कीं, त्या दिवट्या त्या वाटसरांपासून तीन चार हातांच्या अंतरावर यथपर्यंत नाचत नाचत जवळ येत, व लागल्याच अति आश्चर्यकारक त्वरेनें उडत उडत दूर निघून जात.

हा चमत्कार अवलोकन करून **त्रिवेणी** ह्मणालीः—"हा पण बाई मोठाच चमत्कार आहे! पण यापासून एकादेवेळीं मोठाले अनर्थ नाहींत का होत ?"

वसुभद्राचार्य उत्तर करितोः—"तें काय असेल तें असो. या दिवट्यांबद्दल लोकांची अशी समजूत आहे कीं एकादी कांहीं भयंकर लढाई किंवा कांहीं व्हावयाची असली ह्मणजे ह्या दिवट्या पुष्कळशा दिसूं लागतात!"

"**अर्हत्** तसा प्रसंग न आणो !" **त्रिवेणी** ह्मणाली.

"ही आपली लोकांची समजूत आहे. तींत कांहीं अर्थ नाहीं." इतकें बोलून तो हलक्या स्वरानें बोलूं लागला, आणि त्या वाटेच्या बाजूला एक अर्धें कांपलेलेंच झाडाचें खोड बहुशः खुणेकरितां राहूं दिलें होतें, त्याजजवळ थांबून तो ह्मणालाः—"आपली वाट या ठिकाणीं वळते. आतां जर ही वाट आपल्या शत्रूंना ठाऊक नसेल, तर आपण त्यांच्या हातून खात्रीनेंच सुटून गेलों ह्मणायला कांहीं हरकत नाहीं ! मात्र आतां आपण इतकी सावधगिरी ठेविली पाहिजे कीं, आपण या वाटेनें जात आहों हें एवढ्यासुद्धां आवाजावरून कोणास कळतां उपयोगी नाहीं !"

इतकें बोलून त्यानें त्या भयंकर जागेवरून **त्रिवेणी**ची घोडी आडव्या वाटेनें सुरक्षित ठिकाणीं आणिली, व त्याचे मागून **शिलादित्या**नेंही हुशारी राखून त्याच वाटेनें आपला घोडा काढिला, व आवाज जितका कमी करवेल तितका कमी करून तीं सर्वजण कांहींशीं पुढें गेलीं. या ठिकाणची वाट पहिल्यापेक्षांही अरुंद असल्याकारणानें ती अधिक धोक्याची होती. असो. त्या ठिकाणीं **वसुभद्राचार्या**नें त्या सर्वांस थांब

विलें, आणि नुसता श्वासोच्छ्वास चालण्याचाही आवाज न होऊं देतां तो आपले शत्रु मागाहून पुढें येत होते त्यांचा कानोसा घेत उभा राहिला. परंतु त्याचें भाकीत खरें ठरण्यास पुरी पाव घटकाही लागली नाहीं. **वसुभद्राचार्य** व **शिलादित्य** हे पुढें निघून गेल्याचे आवाज त्या मागच्या शिपायांच्या कानांवर पडले होते, परंतु ते कोणच्या वाटेनें पळून गेले याची त्यांस माहिती नव्हती, यामुळें आपली शिकार आपल्या हातून निसटून जाते असें वाटून त्यांस पकडण्याकारितां त्यांनीं आपले घोडे अधिक वेगानें काढले. परंतु ही त्यांची मोठी चूक झाली. त्या शिपायांपैकीं चार शिपाई व कोतवाल असे पांच असामी शिलक राहिले होते. पैकीं एक जणास त्याचा सोबती "घोडा उगीच भरधांव काढूं नको." ह्मणून सांगत होता. परंतु त्याचें ह्मणणें न जुमानतां त्या शिपायानें घोडा वेगानें काढलाच. परंतु त्याला झाडाच्या खोडाची ती खूण ठाऊक नव्हती यामुळें त्याचा घोडा पुढें जाऊन, जादूच्या योगानेंच काय, तो एकदम घोडयासुद्धां पाण्यांत बुडाला. ही गोष्ट इतक्या त्वरेनें झाली कीं मागच्या शिपायाला नुसतें हां हां ह्मणून ओरडून सांगण्याचीही त्याला फुरसत मिळाली नाहीं. त्यामुळें मागच्या शिपायाला पाण्यांत आवाज ऐकूं आला तरी घोडा आंवरून धरण्यापुरता अवकाश न मिळाल्या कारणानें त्यानेंही पहिल्याप्रमाणेंच जळसमाध घेतली. त्याच्या मागून तिसऱ्या शिपायाची ही तीच वाट झाली. मात्र चौथ्या शिपायानें घोडा आंवरून धरण्याचा यत्न केला, परंतु त्या खटपटींत घोडा उभ्याचा आडवा झाल्यामुळें तो मागच्या पायीं स्वारासुद्धां **वरुण**देवतेच्या स्वाधीन झाला. असो. याप्रमाणें त्या चारी शिपायांची तर वाट लागली. रहातांपैकीं एक कोतवाल राहिला. तो पहिल्यापासूनच दूरदृष्टि असून कदाचित् अपणावर संकटाचा प्रसंग येईल या समजुतीनें त्यानें अगोदरपासूनच आपला घोडा सर्वांच्या मागून चालविला होता. तो हा सर्व भयंकर प्रकार पाहून इतका कांहीं घाबरून गेला, कीं तो आपल्या शत्रूंसच मोठ्या दीनवाणी स्वरानें हांका मारूं लागून त्यांस इतकें देखील ह्मणाला कीं "बाबांनो, जर कारितां तुह्मीं या संकटांतून सोडवून मला एकाद्या सुरक्षित ठिकाणीं नेऊन पोंचवाल, तर मी तुह्मांला कध्धीं कध्धीं फिरून त्रास द्यायचा नाहीं!" परंतु या त्याच्या बरळण्याला विचारतो कोण? तो मात्र आपल्याकडून मोठ मोठ्यानें ओरडत सुटला, व त्या तसल्या प्रसंगीं त्यानें आजपर्यंत आपल्या अधिकाराच्या जोरावर जीं असंख्य क्रूरकर्में केलीं होतीं, त्यांची त्यास एकसमयावच्छेदकरून आठवण होऊन, त्यास **यमराजा**नें आपणास नरकाच्या खाईंतच लोटिलें आहे काय असें वाटून, अतिशय पस्तावा झाला. खरोखर पहातां त्याच्या त्या वेळच्या स्थितीमध्यें आणि **यमधर्मा**च्या न्यायासनापुढें पातकी मनुष्य उभा असतो त्याच्या स्थितीमध्यें फारसें अंतर नव्हतें. असो. त्याच्या साथीदारांपैकीं जे शिपाई घोडयांसुद्धां पाण्यांत बुडाले होते, त्यांपैकीं दोन असामींनीं दोन चार गटंगळ्या खाऊन वर तोंडें काढिलीं होतीं, व जरी ते आपणाकडून "मदत करा! मदत करा!" ह्मणून ह्मणण्याविषयीं हवी तितकी खटपट करीत होते, तरी त्यांच्या नाकातोंडांत पाणी भरपूर गेलें असल्यामुळें त्यांची ती खटपट सर्व व्यर्थ झाली. दलदलींत बुडालेल्या जनावरांचीही त्या स्वारांप्रमाणेंच स्थिति झाली

होती, मात्र त्यांना पाण्याबाहेर निघतां येईना तरी त्यांच्या नाकातोंडांत झणण्यासारखं पाणी गेले नव्हतें यामुळें त्यांनीं मोठ्या भयंकर रीतीनें खिकाळण्यास आरंभ केला ! हरहर ! या वेळच्या भयंकर प्रसंगाचें वर्णन कोण करूं शकेल ? दलदलींत चोंहीकडे अंधार पसरलेला, तशा वेळीं हे मनुष्य प्राणी व हे पशु अशा अवस्थेत सांपडलेले, तेव्हां त्यांच्या दुःखास पारावार कोठून असणार ! बिचाऱ्यांच्या जिवास भीतीचें हुडहुडें भरून आलें असून कांहींना नीट ओरडण्याची सुद्धां मारामार झालेली ! असो. अशा त्या भयंकर प्रसंगीं त्यांच्या म्लान झालेल्या मुद्रेचें अवलोकन करावें अशी शत्रूच्यानें ही इच्छा करवली नसती ! परतु नशीब कोणाचें कोणाला चुकलें आहे ? या बिचाऱ्यांची दुःखावस्था पहावी लागेल या भीतीनेंच काय, अगोदरच उडुगणांचा स्वामी जो चंद्रमा त्यानें आपणापुढें कृष्णवर्ण व घनविस्तर अशा मेघमालांची जवनिकाच सोडून घेतली होती. परंतु दैवाच्याच मनांत असें कीं त्या तसल्या स्थितींतही त्यांच्या त्या म्लान झालेल्या व शोकाकुल मुद्रा ह्या जीवंत प्राण्यांच्या दृष्टीस पडाव्या यास्तव त्याच्याच आज्ञेनें वर सांगितल्या प्रकारच्या वेताळाच्या दिवट्या त्या ठिकाणीं सहस्रशः निर्माण होऊन त्यांच्या तोंडाभोंवती गरगर नाचूं लागल्या; व त्यांच्या त्या भयानक तेजांत त्या दुर्दैवी प्राण्यांची ती भयंकर अवस्था **त्रिवेणी, शिलादित्य** वगैरे सर्वांच्या पूर्णपणें नजरेस पडली. त्या बिचाऱ्यांची ती अवस्था पाहून **त्रिवेणीस** अतिशय गहिंवर लोटला, व त्याच्या भरांत ती त्यांना बाहेर काढावें झणून **वसुभद्राचार्यास** विनवणी करूं लागली. परंतु जेव्हां तो आपलें झणणें ऐकत नाहीं असें तिनें पाहिलें तेव्हां तिनें **शिलादित्यासही** तीच विनवणी केली.

"त्यांना माणसांची मदत कांहीं उपयोगी पडायची नाहीं." **शिलादित्यानें** उत्तर केलें.

इतक्यांत "**अलिहंता**[1] ! धम्मसंचओ होदु ! धम्मसंचओ होदु !" असा त्या जतीनें मुखावाटे उद्गार काढिला.

इतका प्रकार झाल्यावर **त्रिवेणीच्यानें** त्या हतभाग्य प्राण्यांकडे पहावेना. त्या भयंकर स्थितीच्या दर्शनानें तिच्या अंतरात्म्यास अत्यंत विषाद उत्पन्न होऊन त्या स्थितींतच ती कांहीं वेळ स्तब्ध राहिली. इतक्या अवकाशांत दलदलीच्या पाण्यांत पडलेल्या लोकांपैकीं दोघे पाण्यांत बुडून जाऊन दिसेनासे झाले होते. तिसऱ्यानें ओढाताण करून घोड्याच्या रिकिबींतून आपला पाय मोकळा केला होता, व त्याच्या मुखावाटे भयंकर शोकाच्या आरोळ्या चालू असून त्यानें दहा पांच पळेंपर्यंत जेमतेम आपलें डोकें पाण्यावर राहूं देण्याविषयीं प्रचंड यत्न केला. परंतु त्यापासून कांहीं उपयोग न होतां **त्रिवेणी** वगैरे माणसें उभीं होतीं ती जागा त्याच्या नजरेस पडून मोठ्या वेगानें त्यांजकडे पोहत येण्याविषयीं यत्न करूं लागला असतां भीतीमुळें त्याचे पाय जड होऊन जाऊन तो नाकाच्या जवळ जवळपर्यंत बुडाला. त्या वेळीं त्याच्या तोंडासभोंवती वेताळाच्या दिवट्या नाचत राहून त्यांच्या अंधुक, अस्पष्ट व भयंकर उजेडांत त्यांच्या तोंडावर प्रेतकळा आलेली दृष्टीस पडून तिचें कोणासही भय वाटल्यावाचून राहिलें नसतें. असो.

त्याची ही स्थिति पाहन जती मोठ्या दुःखानें झणाला:--

१. "अर्हत् ! धर्मसंचयो भवतु! धर्मसंचयो भवतु !" झ. "अर्हत् ! धर्मसंचय होवो ! धर्मसंचय होवो !"

विलें, आणि नुसता श्वासोच्छ्वास चालण्याचाही आवाज न होऊं देतां तो आपले शत्रु मागाहून पुढें येत होते त्यांचा कानोसा घेत उभा राहिला. परंतु त्याचें भाकीत खरें ठरण्यास पुरी पाव घटकाही लागली नाहीं. **वसुभद्राचार्य** व **शिलादित्य** हे पुढें निघून गेल्याचे आवाज त्या मागच्या शिपायांच्या कानांवर पडले होते, परंतु ते कोणच्या वाटेनें पळून गेले याची त्यांस माहिती नव्हती, यामुळें आपली शिकार आपल्या हातून निसटून जाते असें वाटून त्यांस पकडण्याकरितां त्यांनीं आपले घोडे अधिक वेगानें काढले. परंतु ही त्यांची मोठी चूक झाली. त्या शिपायांपैकीं चार शिपाई व कोतवाल असे पांच असामी शिलक राहिले होते. पैकीं एक जणास त्याचा सोबती "घोडा उगीच भरधांव काढूं नको." ह्मणून सांगत होता. परंतु त्याचें ह्मणणें न जुमानतां त्या शिपायानें घोडा वेगानें काढलाच. परंतु त्याला झाडाच्या खोडाची ती खूण ठाऊक नव्हती यामुळें त्याचा घोडा पुढें जाऊन, जादूच्या योगानेंच काय, तो एकदम घोडयासुद्धां पाण्यांत बुडाला. ही गोष्ट इतक्या त्वरेनें झाली कीं मागच्या शिपायाला नुसतें हां हां ह्मणून ओरडून सांगण्याचीही त्याला फुरसत मिळाली नाहीं. त्यामुळें मागच्या शिपायाला पाण्यांत आवाज ऐकूं आला तरी घोडा आंवरून धरण्यापुरता अवकाश न मिळाल्या कारणानें त्यानेंही पहिल्याप्रमाणेंच जळसमाध घेतली. त्याच्या मागून तिसऱ्या शिपायाची ही तीच वाट झाली. मात्र चौथ्या शिपायानें घोडा आंवरून धरण्याचा यत्न केला, परंतु त्या खटपटींत घोडा उभ्याचा आडवा झाल्यामुळें तो मागच्या पायीं स्वारासुद्धां **वरुण**देवतेच्या स्वाधीन झाला. असो. याप्रमाणें त्या चारी शिपायांची तर वाट लागली. रहातांपैकीं एक कोतवाल राहिला. तो पहिल्यापासूनच दूरदृष्टि असून कदाचित् अपणावर संकटाचा प्रसंग येईल या समजुतीनें त्यानें अगोदरपासूनच आपला घोडा सर्वांच्या मागून चालविला होता. तो हा सर्व भयंकर प्रकार पाहून इतका कांहीं घाबरून गेला, कीं तो आपल्या शत्रूंसच मोठ्या दीनवाणी स्वरानें हांका मारूं लागून त्यांस इतकें देखील ह्मणाला कीं "बाबांनो, जर कारितां तुम्हीं या संकटांतून सोडवून मला एकाद्या सुरक्षित ठिकाणीं नेऊन पोंचवाल, तर मी तुम्हांला कध्धीं कध्धीं फिरून त्रास द्यायचा नाहीं!" परंतु या त्याच्या बरळण्याला विचारतो कोण? तो मात्र आपल्याकडून मोठ मोठ्यानें ओरडत सुटला, व त्या तसल्या प्रसंगीं त्यानें आजपर्यंत आपल्या अधिकाराच्या जोरावर जीं असंख्य क्रूरकर्में केलीं होतीं, त्यांची त्यास एकसमयावच्छेदकरून आठवण होऊन, त्यास **यमराजा**नें आपणास नरकाच्या खाईंतच लोटिलें आहे काय असें वाटून, अतिशय पस्तावा झाला. खरोखर पहातां त्याच्या त्या वेळच्या स्थितीमध्यें आणि **यमधर्मा**च्या न्यायासनापुढें पातकी मनुष्य उभा असतो त्याच्या स्थितीमध्यें फारसें अंतर नव्हतें. असो. त्याच्या साथीदारांपैकीं जे शिपाई घोडयांसुद्धां पाण्यांत बुडाले होते, त्यांपैकीं दोन असामींनीं दोन चार गटंगळ्या खाऊन वर तोंडें काढिलीं होतीं, व जरी ते आपणाकडून "मदत करा! मदत करा!" ह्मणून ह्मणण्याविषयीं हवी तितकी खटपट करीत होते, तरी त्यांच्या नाकातोंडांत पाणी भरपूर गेलें असल्यामुळें त्यांची ती खटपट सर्व व्यर्थ झाली. दलदलींत बुडालेल्या जनावरांचीही त्या स्वारांप्रमाणेंच स्थिति झाली

होती, मात्र त्यांना पाण्याबाहेर निघतां येईना तरी त्यांच्या नाकातोंडांत ह्मणण्यासारखें पाणी गेलें नव्हतें यामुळें त्यांनीं मोठ्या भयंकर रीतीनें खिंकाळण्यास आरंभ केला ! हरहर ! या वेळच्या भयंकर प्रसंगाचें वर्णन कोण करूं शकेल? दलदलींत चोंहीकडे अंधार पसरलेला, तशा वेळीं हे मनुष्य प्राणी व हे पशु अशा अवस्थेंत सांपडलेले, तेव्हां त्यांच्या दुःखास पारावार कोठून असणार ! विचाऱ्यांच्या जिवास भीतीचें हुडहुडें भरून आलें असून कांहींना नीट ओरडण्याची सुद्धां मारामार झालेली ! असो. अशा त्या भयंकर प्रसंगीं त्यांच्या म्लान झालेल्या मुद्रेचें अवलोकन करावें अशी शत्रूच्यानें ही इच्छा करवली नसती ! परतु नशीब कोणाचें कोणाला चुकलें आहे ? या बिचाऱ्यांचीं दुःखावस्था पहावी लागेल या भीतीनेंच काय, अगोदरच उडुगणांचा स्वामी जो चंद्रमा त्यानें आपणापुढें कृष्णवर्ण व घनविस्तर अशा मेघमालांची जवनिकाच सोडून घेतली होती. परंतु दैवाच्याच मनांत असें कीं त्या तसल्या स्थितींतही त्यांच्या त्या म्लान झालेल्या व शोकाकुल मुद्रा ह्या जीवंत प्राण्यांच्या दृष्टीस पडाव्या यास्तव त्याच्याच आज्ञेनें वर सांगितल्या प्रकारच्या वेताळाच्या दिवट्या त्या ठिकाणीं सहस्रशः निर्माण होऊन त्यांच्या तोंडाभोंवती गरगर नाचूं लागल्या; व त्यांच्या त्या भयानक तेजांत त्या दुर्दैवी प्राण्यांची ती भयंकर अवस्था **त्रिवेणी, शिलादित्य** वगैरे सर्वांच्या पूर्णपणें नजरेस पडली. त्या बिचाऱ्यांची ती अवस्था पाहून **त्रिवेणीस** अतिशय गहिंवर लोटला, व त्याच्या भरांत ती त्यांना बाहेर काढावें ह्मणून **वसुभद्राचार्यास** विनवणी करूं लागली. परंतु जेव्हां तो आपलें ह्मणणें ऐकत नाहीं असें तिनें पाहिलें तेव्हां तिनें **शिलादित्यासही** तीच विनवणी केली.

" त्यांना माणसांची मदत कांहीं उपयोगी पडायची नाहीं. " **शिलादित्यानें** उत्तर केलें.

इतक्यांत "**अलिहंता**[1] ! धम्मसंचओ होदु ! धम्मसंचओ होदु ! " असा त्या जतीनें मुखावाटे उद्गार काढिला.

इतका प्रकार झाल्यावर **त्रिवेणीच्यानें** त्या हतभाग्य प्राण्यांकडे पहावेना. त्या भयंकर स्थितीच्या दर्शनानें तिच्या अंतरात्म्यास अत्यंत विषाद उत्पन्न होऊन त्या स्थितींतच ती कांहीं वेळ स्तब्ध राहिली. इतक्या अवकाशांत दलदलीच्या पाण्यांत पडलेल्या लोकांपैकीं दोघे पाण्यात बुडून जाऊन दिसेनासे झाले होते. तिसऱ्यानें ओढाताण करून घोड्याच्या रिकिबींतून आपला पाय मोकळा केला होता, व त्याच्या मुखावाटे भयंकर शोकाच्या आरोळ्या चालू असून त्यानें दहा पांच पळेंपर्यंत जेमतेम आपलें डोकें पाण्यावर राहूं देण्याविषयीं प्रचंड यत्न केला, परंतु त्यापासून कांहीं उपयोग न होतां **त्रिवेणी** वगैरे माणसें उभीं होतीं ती जागा त्याच्या नजरेस पडून मोठ्या वेगानें त्यांजकडे पोहत येण्याविषयीं यत्न करूं लागला असतां भीतीमुळें त्याचे पाय जड होऊन जाऊन तो नाकाच्या जवळ जवळपर्यंत बुडाला. त्या वेळीं त्याच्या तोंडासभोंवती वेताळाच्या दिवट्या नाचत राहून त्यांच्या अंधुक, अस्पष्ट व भयंकर उजेडांत त्यांच्या तोंडावर प्रेतकळा आलेली दृष्टीस पडून तिचें कोणासही भय वाटल्यावाचून राहिलें नसतें. असो.

त्याची ही स्थिति पाहून जती मोठ्या दुःखानें ह्मणाला:--

१. "अर्हत् ! धर्मसंचयो भवतु! धर्मसंचयो भवतु !" ह्म. " अर्हन् ! धर्मसंचय होवो ! धर्मसंचय होवो ! "

"तुअं ज्जेव णिव्वाणो होसि एक्को
बउद्धाअणो सच्चधम्मोऽलिहंतो[1]! "

जती यां प्रकारें बोलत आहे तों **वसुभद्राचार्यानें त्रिवेणी**च्या घोडीचा लगाम धरिला, आणि तिला पुढें चालवूं लागून ह्मणालाः—"चला. आतां काय सगळें आटपलें. इतःपर आपणाला शत्रु मागून यायची भीति राहिली नाहीं!"

इतक्यांत **त्रिवेणी** मागें पाहूं लागून ह्मणालीः—"पण एक शिलक राहिला आहे."

तें ऐकून **शिलादित्य** रागानें बोलतोः—"हांतो—चोर—कोतवाल अजून उरला आहे. कांहीं चिंता नाहीं. तो माझ्या गोफणीच्या आटोक्यांत आहे." असें बोलून त्यानें आपल्या गोफणगुंडयास हात घातला.

त्रिवेणी करुणास्वरानें बोलतेः—"दया करा! दया करा! मी तुमच्या पायां पडतें! तुह्मीं त्याला मारायच्या भरांस पडूं नका! आतांपर्यंतच बाई चार पांच जण मेले! आतां पुरे करा! मला भय वाटतें!"

गोफण परत ठेवण्याचें **शिलादित्या**स आवडेना. तथापि त्यानें ती परत जागचे जागीं ठेविली व ह्मणालाः—"तें खरें, पण हा सगळा दंगा होण्याचें कारण तोच आहे, व त्यास जर जगूं दिलें तर तो जिवंत राहून तुला आणि तुझ्या बापाला त्रास देण्यास चुकणार नाहीं!"

"पण मला नाहीं असें वाटत!" **त्रिवेणी** उत्तर करिते. "पण कसेंही असो. तुह्मीं कांहीं त्याला मारूं नका माझें एवढें ऐकाच!"

शिलादित्य उत्तर करितोः—"बरें तुझी मर्जी! पण मी एक त्याला सोडिलें, तरी ही दलदल त्याला जिवंत सोडील असें कांहीं वाटत नाहीं!"

इतकें भाषण झाल्यावर तीं सर्वजण पुढें हळू हळू मार्ग क्रमूं लागलीं. तीं सर्व निघून गेलीं हें इकडे कोतवालाच्या कानीं पडतांच तो अधिक अधिक मोठ्यानें रडून ओरडून करुणा भाकूं लागला. व जरी त्याला तेथून सोडवावें ह्मणून **त्रिवेणी**नें दोन तीन वेळां विनवण्या केल्या, तरी तिच्या सोवळ्यांस त्याची दया न येतां ते त्यास मदत केल्याशिवायच पुढ चालते झाले.

याप्रमाणें कांहीं वेळ ते सर्व जण मुकाटयानें आणखी दुसरें कांहीं संकट आल्याशिवाय पुढें गेले. जातां जातां मार्ग अधिक अधिक अवघड लागला. परंतु या वेळीं इतकें बरें झालें कीं एवढा वेळ जो चंद्रमा ढगांच्या आड जाऊन चोंहीकडे अंधार पसरला होता, तो सुदैवानें त्यांतून बाहेर पडला, व त्यायोगानें आमच्या ह्या प्रवासी लोकांस अधिक कोणत्याही प्रकारें त्रास न होतां सुरक्षितपणें मार्ग क्रमण करण्यास सांपडलें. अशा प्रकारें एक घटिकाभर मार्गक्रमण झाल्यानंतर खालची जमीन अधिक अधिक दडस लागूं लागली, व वाटही रुंदावत चालून त्यांस घोडे अधिक जलदीनें चालवितां येऊं लागले; व याप्रमाणें पुढें अर्ध घटिका चालून गेल्यावर ते सर्व दलदलीच्या पश्चिमेकडील कांठावर सुरक्षित पोंचले. त्याबरोबर **त्रिवेणी** हर्षयुक्त होऊन तिनें **अर्हत्प्रभू**नें आपणास संकटांतून सोडविलें ह्मणून मनांत स्तुतिपाठाचा जप केला, व अखेर "**अर्हन्!** ते बिचारे मरून गेले त्यांनाही तूं निर्वाणास ने" ह्मणून त्याची प्रार्थनाही केली. असो. कांहीं वेळानें तें सर्व प्रवासिमंडळ एका दगडांच्या

---

[1] त्वमेव निर्वाणदो भवस्येको
बौद्धायनः सत्यधर्मोऽर्हत्!
अर्थः—हे अर्हत्! तूं बौद्धायन असून तुझा धर्म सत्य आहे. व तूं एकटाच निर्वाण ह्मणजे मोक्ष देणारा आहेस.

रायला कुठचें बरें फांवणार ? आणखी तशांतून चौंहीकडे अंधार, तेव्हां—पण काय ग मथुरे ! तुझ्या खोलींत त्या वेळीं दिवा मुळींच नव्हता ? "

"होय. दिवा जळत ठेवते आहे ! मी ब्बरी दिवा ठेवूं देईन ! " **ताराबाई** बोलते:—"पण—पण—तुम्ही कसें म्हणता, तो चोर अंधारांत या गाढवीच्या खोलींत शिरला ? हां, तरीच माझ्या बाबीचें गोजिरवाणें तोंड त्याच्या दृष्टीस पडलें नाहीं ! नाहीं तर अग बाई बाई ! माझी बाबी—माझी बाबी-माझी चकु—"हें बोलत असतां **ताराबाईचा** घसा भरून येऊन तिच्यानें पुढें बोलवेना अशी तिची स्थिति झाली, मग ही स्थिति कितपत खरी असेल ती असो.

संभाजीराव बोलतातः—"जाऊं दे झालें गेलें त्याचें काय आतां राहिलें आहे ? आणखी शिवाय, चोर जे घरांत शिरतात ते कांहीं मुलें चोरून न्यायला येत नाहींत—ते येतात ते दुसऱ्या— "

इतक्यांत **ताराबाई** कांहीं भ्यालेली व कांहीं रागावलेली अशा प्रकारें मध्येंच बोललीः—"तर तर ! घाला चुलींत तुमचें तें ब्रह्मज्ञान ! आग लावा त्याला ! तर तर ! तेव्हां जर का माझी बाबी दचकून जागी झाली असती, न् रडूं लागली असती, तर त्या मेल्या कसायानें तिचा तेव्हांच नसताका फडशा करून टाकला ! नको नको ग बाई तो तसला प्रसंग !—माझ्या बाबी—आं—फडशा—बाई ! माझें तर— " इतकें बोलत असतां **ताराबाईची** कांहीं विलक्षणच स्थिति होऊन ती घेरी येऊन खालींही पडण्याच्या बेतांत आली.

तेव्हां **संभाजीराव** पुढें होऊन तिला संभालून धरायला लागले, त्याबरोबर **ताराबाई** एकदम दचकल्यासारखें करून मोठ्यानें ओरडली:—" काय मेला अगदींच ताळ सोडला ! मेलें जिवाला पण कांहींच कसेंबाटेनासें झालें ! इतक्या लोकांच्या देखत माझ्या अंगावर हात टाकायचें कांहींच पण कसें नाहीं वाटत ? "

संभाजीराव म्हणतातः—"बरें, तें सगळें राहूं दे कशी ! आपलें नुकसान कांहीं फार झालें असें नाहीं. गेले कांहीं कागदपत्र तर जाऊं दे, याहून आणखी कांहीं जास्ती झालें नाहीं एवढेंच आपणाला पुष्कळ आहे ! "

" होय. बरें पुष्कळ असेल ! काय म्हणे आणखी कांहीं जास्ती झालें नाहीं !—आणखी—आणखी— ! "

असो. हा इतका प्रकार झाला, तेव्हां आतां आपलें इथें काहीं काम राहिलें नाहीं असें समजून आलीं कोणीही ह्या प्रेमळ जोडप्याचा कलह पाहण्यास तेथें न राहतां जिकडचीं तिकडे आपआपल्या कामाला गेलीं. झालें, मग **संभाजीरावांनीं** लोहार गंवडी वगैरे बोलावून आणून घराची डागडुजी केली. भिंती नीट घालविल्या. फडश्या, कोयंडे, आडसर जेथल्या तेथें सर्व नीट नेटकें केलें. आणि **पांचवडास** व आसपासच्याही गांवीं लिहून जो कोणी या चोरीचा थांग लावून देईल, त्याला पन्नास रुपये इनाम देऊं म्हणून दवंडीही पिटविली, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं, व चोराचा बिलकुल पत्ता लागला नाहीं.

येथपर्यंत सांगितलेला प्रकार होऊन पुढें आठ चार दिवस झाले. एके दिवशीं असा सोमवार का मंगळवार होता, त्या दिवशीं नित्याच्या नियमाप्रमाणें मी मुलांना घेऊन घराच्या मागच्या शेतांत गेलें, व तेथें खुशाल इकडे तिकडे मुलांस फिरवीत होतें. इतक्यांत अक-

स्मात् मी कुंपणाच्या बाजूनें फिरत असतां दोन घोड्यांवर बसलेले दोन गृहस्थ व त्यांच्यापुढें पायीं चालणारा मोतद्दार असे कुंपणाबाहेरच्या वाटेनें येतांना सावकाशपणें दृष्टीस पडले. ते येतां येतां मी आणि मुलें ज्या ठिकाणीं होतों त्या ठिकाणाजवळ आल्याबरोबर त्यांनीं एकदम आपले घोडे थांबविले, व त्यांपैकीं एकानें मला विचारिलें:—"**संभाजीराव मोहिते** रहातात त्यांच्या घराची वाट कोणची ?"

ह्या विचारणांचा स्वर मला एकदम ओळखीचासा वाटला, व वर तोंड करून पहातें तों माझा संशय खरा ठरला कारण हा घोड्यावर बसलेला गृहस्थ दुसरा कोणी नसून **जानराव घाडगेच** होता. मी वर तोंड केल्याबरोबर त्यानेंही मला ओळखिलें, आणि तो मोठ्यानें बोलला "काय ?—अरे, ही **संभाजीरावा**चीं मुलें राखणारी फक्कड कुळंबीण ! तुझांला मघां सांगितली तीच ही !"

जानरावांचे हे शब्द ऐकून मला एकदम लाज वाहून त्याबरोबर रागाचा झटकाही आला; व मी लाल झालेल्या मुद्रेनें **जानरावां**कडे पाहून फिरून खालीं पाहूं लागणार, तों इतक्यांत त्यांच्या सोबत्याकडे माझी दृष्टि गेली. त्याचें वय त्या वेळीं फार तर अठरा किंवा एकोणीस वर्षांचें असावें असें मला वाटलें.

इतक्यांत **जानराव** फिरून बोलूं लागले:—"अग मुली ! असें काय करतेस ? तूं चांगली दिसतेस. मी विचारतों तेवढें मला सांग. मला खचित वाटतें, तूं अजून **संभाजीरावां**च्या घरींच चाकरीला आहेस. कशावरून म्हणशील तर **संभाजीरावां**चीं हीं 'राजबिंडीं' मुलें माझ्या पक्क्या ओळखीचीं आहेत !"

मी **जानरावां**च्या या शेवटल्या भाषणाकडे फारसें लक्ष न देतां त्यांना वोटानें वाडग्याच्या पुढच्या दाराची वाट सांगून आपल्या वाटेनें पुढें चालूं लागणार होतें, इतक्यांत **जानराव** फिरून बोलले:—"अग मुली ! अशी जायची घाई कां करितेस ? मला हीं मुलें फार आवडतात." इतकें बोलून ते आपल्या सोबत्यास म्हणाले:—"पहा मुलें कशीं राजबिंडीं आहेत ! अगदीं एकासारखीं एक ! मला वाटतें डुकरंही कांहीं यांपेक्षां वाईट दिसत नसतील!"

इतक्यांत **जानरावां**चे सोबती बोलले:—"**जानराव**! हें तुमचें बोलणें कांहीं मला चांगलें नाहीं वाटत ! अहो, मुलें कुरूप निपजतात हा कांहीं त्यांचा दोष नव्हे. तें सारें असो. पण अशा या वेळीं आपण त्या बिचारीला उगीच उभी करीत आहों हें मला नीट वाटत नाहीं."

हे शेवटले शब्द माझ्या कानीं पडूं नयेत म्हणून ते गृहस्थ बुध्यां हलक्या स्वरानें बोलले, तथापि ते मला ऐकूं आल्यावांचून राहिले नाहींत, व ते ऐकल्याबरोबर त्यांजविषयीं माझ्या मनांत कृतज्ञताबुद्धि उत्पन्न होऊन मनांत इच्छा नसतांही सहज माझी दृष्टि पुनरपि त्यांजकडे गेली.

"बरें तर मुली ! जा तूं आतां" असें **जानराव** मला बोलले, आणि मग तें दोघेजण व मागून तो मोतद्दार असे तिघेही जण आपल्या वाटेनें निघून गेले, व मीही मुलें घेऊन आपल्या वाटेनें चालूं लागलें. तथापि तशा प्रसंगीं **जानरावां**च्या त्या स्नेह्याचें तें दयेचें वर्तन व ते सौम्य व वीराग्रमाणें गंभीर असे शब्द हीं माझ्या मनांत आल्यावाचून राहिलीं नाहींत. त्या दोघांचेही पोशाख साधेच होते, तरी मागें एकदा **जानराव** आमच्या बागेंतल्या

बंगल्यांत आले होते तेव्हां आपण आणि फौजेंतले आपले स्नेही असे **संभाजीरावा**च्या घरीं उतरायला येऊं असें ते बोलले होते, यावरून ते दोघेही फौजेंत एकाच ठिकाणीं चाकरीस असावे अशी माझ्या मनांत सहज कल्पना येऊन गेली.

असो. नंतर कांहीं वेळानें मी परत घरीं आल्यावर मला वाटलें होतें तें खरेंच असें समजलें. **जानरावां**च्या सोबत्यांचे नांव **जयवंतराव** असून ते **जानरावां**च्या पलटणींतच कोणच्याशा हुद्यावर होते. आजपर्यंत जेवढे म्हणून पुरुष मी पाहिले होते, त्यांमध्यें यांच्यासारखे सुंदर सुरूप माझ्या कोणीच पाहण्यांत आले नव्हते. ते शरीरानें उंच असून सडपातळ होते. त्यांच्या वरच्या ओंठावर मिशा फार तर दोन तीन वर्षेंच येऊं लागल्या होत्या, तथापि त्यांचीं रचना मोटी सुबक असून त्यांच्या दोन्ही बाजूस कल्ले राखले होते, त्यायोगानें त्यांचें मुख फारच शोभिवंत वाटे. त्यांचे नेत्र विशाल असून पाणीदार होते. पहाणी मनोहर असून उद्धटपणाची नसे. व नुसतें त्यांच्या मुखश्रीकडे अवलोकन केलें तर त्यांची ती मुद्रा म्हणजे सद्बुद्धि आणि सद्गुण यांचा केवळ आरसाच आहे काय अशी वाटे. घरचीं चाकरमाणसें म्हणत, हे गृहस्थ फार श्रीमान असून ते आपल्या वडिलांचे द्वितीय चिरंजीव होते. असो.

आतां सांगितल्याप्रमाणें पाहुणे घरीं आल्यावर मग **ताराबाई**च्या स्वभावांत व वागण्यांत बाहेरून किती फरक पडला असेल हें सांगत बसण्याची फारशी जरूर नाहीं. पाहुणे घरीं आल्यापासून **ताराबाईनें** दररोज नवीं लुगडीं नेसावीं, नव्या चोळ्या घालाव्या, हा एकसारखा सपाटा चालविला होता. नेहमी नटत राहून घरांत होते नव्हते तेवढे सर्व दागिने ती आपल्या अंगावर घालून इकडून तिकडे मिरवी. त्यामुळें ती रूपान जरी मेंसुर होती, तरी ती घरांत थाटानें इकडे तिकडे वावरूं लागलीम्हणजे तोंडाचा तेवढा भाग शिवायकरून बाकी ही कोणी देवीच असावी असा भास होई. पाहुणे घरांत असतां तिनें आपणाकडून होईल तितकें चाकर माणसांवर जळजळाट करण्याचें टाकून दिलें होतें, व नेहमी सर्वांशीं बोलतां चालतां ती प्रायशः हंसतमुखच असे. असो. पाहुणे आल्यापासून माझें मात्र वस्तान बिघडून गेलें, आणि संध्याकाळीं मुलें फिरावयास न्यावयाचीं तीं देखील जितकीं टळतील तितकीं मी टाळूं लागलें. कारण मी कोठें गेलें तरी माझे मागें **जानरावां**ची स्वारी येण्याची मला एकसारखी भीति वाटत असे. दिवसांतून एक दोन वेळां मला खालीं परसांत यावें लागे, त्या वेळीं त्या ठिकाणीं **जानराव** असले म्हणजे ते मजकडे अशा कांहीं चमत्कारिक मुद्रेनें पहात, कीं त्यायोगानें मी अगदीं गोंधळून जाऊन मला परत वर माडीवर केव्हा जातें असें होऊन जाई.

असो. अशा प्रकारें आठ दिवस लोटले, व हे पाहुणे येथून निघून कधीं जातील म्हणून मी आपल्या मनांत घटिका पळेही मोजूं लागलें. असें करण्याचें कारण इतकेंच होतें कीं. **लिंबा**स माझ्या दोघी बहिणी व **वाईस** माझे दोघे भाऊ होते त्यांना मी कधीं भेटेन असें मला झालें होतें, व या कामाकरितां पाहुणे गेले म्हणजे दोन तीन दिवसांची रजा देईन म्हणून **ताराबाईनें** मला सांगितलें होतें. असो, असें होतें तरी पाहुण्यांचा एक एक दिवस लांबतच चालला. सरतेशेवटीं पाहुणे घरीं आल्याच्या दहाव्या का अकराव्या दिवशीं

आकाश अगदीं निरभ्र होतें. वारा थंडगार वहात होता, तथापि अंगाला लागल्याबरोबर झोंबावा असा, कांहीं तो नव्हता. बागेंतील पुष्पांचा सुगंधही वाऱ्याबरोबर वाहून येऊन मनास फार आल्हाद देत होता. अशा सुमारास तिसरा प्रहर लोटून सुमारें चार घटिका झाल्या होत्या, तोंच **ताराबाई** माडीवर माझ्या खोलींत आली, आणि मुलांना बागेंत हिंडवायला न्यायची कांहींच तयारी नव्हती असें पाहून एकदम संतापून तिनें आपलें विश्वरूप प्रगट केलें, आणि मनास वाटतील तशा खांडगळ्या शिव्या देऊं लागून अखेर ती म्हणाली:- "रांढवी! तुझा मला काडीइतका देखील उपयोग नाहीं. मेली अळसुटली सगळ्या मुलखाची, हिचा मुरळीच्या डोक्यावरची **अंबाबाई** उचलण्याचा देखील उपयोग व्हायचा नाहीं!" **त्राटिकाबाई**च्या तोंडचे हे मुरळीच्या **अंबाबाई**बद्दलचे शब्द ऐकून मला फार आश्चर्य वाटलें; परंतु तिच्यापुढें जबाब देण्याची माझी प्राज्ञा नसे, यामुळें मी आपली गप्प राहिलें व माझें मलाच तेथून उठून केव्हां मुलांना हिंडायला घेऊन जाईन असें झालें. सरते शेवटीं मुलांचे पोशाख करून मी त्यांना घेऊन बागेंत निघून चालती झालें, व त्या दिवशीं गांवांत कोणालासें नहाण आलें होतें तिकडे **ताराबाई** हळदकुंकवाला निघून गेली. बागेंत गेल्यावर तेथून मी शेतांत गेलें; आणि तेथें पुरी अर्धी घटिका असेन नसेन, इतक्यांत मागें कांहीं अंतरावर पाय वाजल्याचा मला भास झाला, व मागें वळून पहातें तों **जानराव**ांची स्वारी माझे मागन येतांना दृष्टीस पडली. त्याबरोबर माझा जीव चरकल्यासारखा झाला, व ही मूर्ति माझ्यामागून कशाला आली असें मला वाटलें. इतक्यांत पहातें तो **जानराव** मजपासून सुमारें चार पांच हातांच्या अंतरावर आले, आणि जसे कांहीं मी त्यांच्या एकदम त्यावेळेसच दृष्टीस पडलें असें दाखवून ते बोललेः—"काय ? तूं इकडेच आहेस ? वाहवा वाहवा ! आज घरांत बोलायचाला. यला कोणी फारसें नव्हतें, आणखी हवाही चांगली गार सुटली आहे, म्हणून झटलें असें जरा फिरून यावें, म्हणून घराबाहेर पडलों. पण तुझी या अंगाला गांठ पडेल हें माझ्या स्वप्नींसुद्धां नव्हतें ! असो; आतां तूं भेटलीस फार चांगलें झालें! मला तुझी भेट व्यायचीच होती, व ती व्यायला सांपडावी म्हणून मी येथें आल्यापासून संधि पहात होतों, ती आज आयतीच सांपडली !—"इतकें बोलून घराच्या भिंतीकडे व सभोवतीं चोहोंकडे निरखून पाहून, सर्वांगाला कंप सुटलेला, व डोळे एकदम तरतरलेले, अशी कांहीं त्यांची चमत्कारिक स्थिति होऊन ते मजकडे पाहूं लागले. त्यांची ती स्थिति पाहून माझी कांहीं ना बाहींच स्थिति होऊन गेली, व आतां त्यांच्या हातून सुटून जाण्याला तरी काय युक्ति करावी अशा विचारांत मी क्षणभर पडलें; व आतां यांचे हातून माझी सुटका होत नाहीं असें वाटून माझी निराशाही झाली. त्यावेळीं, माझे बाबा व आई यांच्या घरीं मी असतां मी किती सुखी होतें, व आतां तीं नाहींत यामुळें दीन झालेली मी पोटभर अन्नाकरितां दासीपणा पत्करून राहिलें, त्यामुळें आतां संकटसमय प्राप्त झाला असतां मला कोणीच त्राता राहिला नाहीं, हे दुःखकारक विचार मनांत येऊन माझ्या नेत्रांतून अश्रुही येण्याची वेळ आली. तथापि तशा त्या स्थितींतही स्त्रीजातीचा तो स्वाभाविक कठोरपणा व

संकटकाळीं महावीराच्यानेंही नै होऊं शकणारें तें लोकोत्तर धैर्याचें अवलंबन, या दोन वृत्ति माझ्या अंतःकरणांत एकदम जागृत होऊन क्षणमात्र मी आपली स्त्रीजातिही विसरून गेलें, व त्याबरोबर माझें मलाच आश्चर्य वाटूं लागावें अशा प्रकारचें स्फुरण माझ्या अंगीं अलें. तथापि तें यथाशक्ति आंतल्याआंत आवरून मी त्यांस सौम्यपणानें उत्तर केलें:—"मी ऐकावें असें तुह्मांला माझ्याशीं कांहीं बोलायचें नाहीं मला ठाऊक आहे. याकरितां तुह्मीं आपल्या वाटेनें चालतें व्हा कसे!" इतकें बोलून मी मुलें घेऊन पुढें चालूं लागलें, इतक्यांत पहातें तों **जानराव** आपले माझ्यापुढें येऊन उभे राहिले आणि मला ह्मणाले:—"**मथुरे**! मी तुला वाईट वाटावें ह्मणून कांहीं आलों नाहीं. याकरितां तूं माझें ह्मणणें एक क्षणभर तरी ऐकून घेच. मी तुझ्या कल्याणाचीच गोष्ट सांगत आहें. **मथुरे**! तुला काय सांगूं? तुला पाहिल्यापासून माझ्या मनाची जी स्थिति झाली आहे अशी स्थिति आजन्मांत मला कधीं झालेली ठाऊक नाहीं!"

जानरावांच्या तोंडांतून इतकेही शब्द निघण्यास फुरसत न मिळती, परंतु ते दांडगाईनें माझ्या समोर उभे राहून कांहीं चमत्कारिकच बोलूं लागले त्यामुळें, व भीतीनें, क्षणभर माझ्या तोंडांतून अक्षरही निघेना अशी माझी स्थिति झाली. तथापि ताबडतोब फिरून शुद्धीवर येऊन माझ्या जवळच मुलें आह्मां दोघांकडे टकमक पहात उभीं होतीं त्यांकडे पाहून मी ह्मणालें:—"हें पाहिलेंत? आतां हीं मुलें येथें आहेत तीं हें तुमचें वर्तन पाहून घरीं जाऊन सांगतील त्यांत माझी गरीबाची कदाचित् विनाकारण अब्रू जाईल. याकरितां तुह्मांला हात जोडून सांगतें, जर तुमच्यांत कांहीं मोठेपणा ह्मणून असेल, तर तुह्मीं मला त्रास न देतां येथून एकदम निघून जाल, तें बरें!"

तें ऐकून **जानराव**ांची वृत्ति विशेषच खवळल्यासारखी होऊन ते बोलले:—"**मथुरे**! तूं मला जायला सांगतेस, पण मी कधीं जाणार नाहीं. माझ्यानें येथून एक पाऊल देखील काढवत नाहीं. तुला काय सांगूं? देवाशपथ मी तुला सांगतों, तुजवर माझें अत्यंत प्रेम बसलें आहे—"

मी **जानराव**ांच्या भाषणाकडे लक्ष न देतां तशीच मुलांकडे वळलें, व त्यांना ह्मणालें:—"बाळांनो! चला आपण घरींच परत जाऊं!" असें बोलून मीं त्यांचे हात धरले, आणि जलदीनें त्यांस परत घराकडे घेऊन जाऊं लागलें.

त्यावेळीं **जानराव**ांचा स्वर अगदीं खोल गेल्यासारखा होऊन ते पुटपुटत ह्मणाले:—"**मथुरे**! तूं फारच क्रूर आहेस! तूं इतकी निर्दय असशील असें मला वाटलें नव्हतें! पहा, मी तुझ्याशीं किती नम्रपणानें व मर्यादेनें बोलतों आहे, असें असून तूं माझा असा धिक्कार करितेस हें तुला योग्य नाहीं!"

हें ऐकून निदान धोरल्या मुलीला तरी असें पक्केपणीं कळावें कीं या कामीं **जानराव** आपण होऊनच मला त्रास देत आहेत, मी होऊन कांहीं त्यांच्या वाटेस गेलें नाहीं, या विचारानें मीं **जानराव**ांच्या वरील ह्मणण्यावर मोठ्यानें उत्तर केलें:—"तुह्मीं ह्मणतां त्याप्रमाणें मीही नम्रपणानें व मर्यादेनेंच तुह्मांला एकवार सांगतें, तुह्मीं आपले मला त्रास न देतां मुकाट्यानें येथून चालतें व्हावें."

"बरें, तुझी मर्जी! आतां नाहीं, मी तुझ्याशीं आणखी एकादेवेळीं बोलेन!" असें

बोलून ते एका अंगास सरकून तडक परत घरच्या वाटेनें निघून गेले.

त्यावेळीं **मन्याबा** मला विचारतोः—" कांगे लांढवे ! ते बोवा तुज्यापाशीं कायगे मागत होते ? तूं मना तांग ह्मंजे घलीं गेल्यावल तगळं तांगेन आईला, ह्मंजे ती तुला अच्ची लागं मलेल, आंकी मग मी तुइया फुडें अच्चा हतेन ! तांगतेत कीं नाहीं का काढं तुला विक्कुले ?" हे मुलाचे अजूनही बोबडे प्रेमाचे शब्द ऐकून मीं त्याला ह्मटलेंः—" बाळा ! तें कांहीं मागत नव्हते. पण ते फार दांडगे आणि उर्मट आहेत, ते वळेंच माझ्याशीं बोलायला पहात होते. पण घरांत माई आहेत त्या आपणाला कोणाशीं बोलूं द्यायच्या नाहींत, आणखी माझ्याही मनांत त्यांच्या बरोबर चालत जायचें नाहीं."

इतका प्रकार होत आहे तों मुलांचें लक्ष दुसऱ्या कशाकडे गेल्यामुळें तीं ही हकीकत सर्व विसरून जाऊन नेहमीप्रमाणें इकडे तिकडे खेळूं लागलीं. मांग सांगितल्याप्रमाणें बागेंत किंवा शेतांत मुलांस हिंडवायचें ह्मटलें ह्मणजे, बहुशः दररोज कोणीना कोणी तरी मलतीकडेच पळून जाई. तसें झालें ह्मणजे मला त्याला धरून आणण्याकरितां त्याच्या मागें धांवत जावें लागे. तिकडे धांवून जावें तों इतक्यांत इकडे कोणी आंढ्याचीं किंवा कशाचीं तरी झाडें लावण्याकरितां लहान मोठे खाडे खंटले असत त्यांतच जाऊन पडे, तेव्हां तितक्या तारांबळीनें परत येऊन खाड्यांतून मुलांस वरती ओढून काढावें लागे. असो. सदरहू प्रकार होत अततां एकादे वेळीं मुलांस कोठें खरचटलें किंवा दुसरी कांहीं कोठें इजा झाली, कीं लागलेंच मुलाचें ओयो करून रडणें व त्याबरोबर खांडगळ्या शिव्या देणें सुरू होई. तथापि त्या शिव्यांकडे लक्ष न देतां त्यांस उगें करितां करितां माझ्या जिवाची पण अगदीं त्रेधा होई. असो. हाच प्रकार या प्रसंगीही झाला, व अखेर संध्याकाळीं मी मुलें घेऊन घरीं परत आलें; व जेव्हां माझे पाय वरच्या माझ्या खोलीला लागले, तेव्हां एकदाचा माझ्या जिवांत जीव आला. नंतर कांहीं वेळानें **राजा**ऊची माझी गांठ पडल्यावर तिला शेतांत झालेली सर्व हकीकत सांगितली. मला पहिल्या प्रथम वाटलें होतें कीं, माझी ही हकीकत ऐकून **राजाऊस** मजप्रमाणेंच वाईट वाटेल, परंतु तसें कांहीं न होतां उलटी ती हंसूंच लागली, आणखी तिनें उलटा मलाच उपदेश केला. ती ह्मणालीः—" अग बाई ! असं कधीं कुठें झालं आहे ? हात् त्याच्या, त्यांत ग काय आहे ? तुइया जागीं जर मी असतें, आणखी **जानराबा**सारख्या देखण्या पुरुशानं मला कांहीं एकादं विचारलं असतं, तर मी बाई एकदम लाजून मुरका मारला असता, आणखी त्याच्याकडे खुस्कन् अस्सं पाहिलं असतं, अन् त्याला एकदम विचारलं असतं कीं 'करतां का माझ्याशीं लगीन ?' **मथुरे** ! अग त्यांत तें काय मेलं कठीण आहे? या बायकापुरुशांच्या गोष्टी. या क्षुल्लक कुणीकडे होऊन जाव्या कीं कुणाला कळूं दिखील देऊं नयेत. त्यांच्याबद्दल ग इतकी तक्रार कशाला ? आहे ह्मण, तुझं अजून कांहीं वय गेलं असं नाहीं, तरी पण तुला आपली सांगून ठेवतें, आपलं कधीं कुठें कोणीं विचारलंच, तर नाहीं ह्मणूं नये. आपलं हूं ह्मणावं न् हं—! ! ! " असो. **राजा**ऊनें माझें बोलणें संगळें थट्टवरच नेलें हें पाहून मला फार वाईट वाटलें, तथापि त्यांतल्या त्यांत जिवाला समाधान एवढेंच वाटलें

कीं, मी ती सगळी हकीकत **राजाऊ**ला कळविली यावरून निदान मी होऊन तरी **जानराव**च्या वाट्टेस गेलें नाहीं, व त्याचें ह्मणणें मला आवडलें नाहीं. एवढी गोष्ट तिला समजली. असो.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं **संभाजीराव**चा एक चुलतभाऊ कोणी **जगदेवराव** ह्मणून होता तो कांहीं कामानिमित्त **पांचवडास** आला. **जगदेवराव संभाजीराव**चें घरीं महिन्यांतून एक दोन वेळां येऊन जात असे, व आला तरी फार तर चार सहा घटिका राहून, लागलाच ह्मतु चार पांच कोसांवर कोणचेंसें गांव आहे त्या गांवीं निघून परत जात असे. तो आला ह्मणजे **मन्याबा** बहुतेक त्याच्याशींच फार खेळे. व **जगदेवराव**ही आला ह्मणजे बुऱ्यां त्याला जवळ बसवून खाऊचा पुडा देत असे. त्या योगानें **जगदेवरावा**चें रहाणें जरी **पांचवडास** फार वेळ होत नसे, तरी **मन्याबा**चें वय बरेंच जाणतेपणाचें झालें होतें यामुळें तो **जगदेवराव** आले ह्मणजे तेवढ्या खाऊची टुक धरून राही. असो. नुकतेंच सांगितल्याप्रमाणें **जगदेवरावा**ची स्वारी त्या दिवशीं **पांचवडास** आली, व त्यांनीं नेहमीच्या क्रमाप्रमाणें **मन्या**बाला जवळ घेऊन खाऊचा पुडा दिला, तथापि काय कारण असेल तें असो, त्या दिवशीं **मन्या**बानें "मी तुमच्या बब्बल येतों" ह्मणून हट्ट घेतला. तो कांहीं केल्या सुटेना. तेव्हां **जग**-**देवराव** आपण होऊनच त्याला आपले बरोबर गांवीं घेऊन जातों, व चार पांच दिवसांनीं परत आणून पोंचवीन ह्मणून घरांत सांगून त्यास घेऊन गेला. तेव्हां अर्थात् घरांत दोन मुलें राहिलीं. त्यापैकीं आदले दिवशीं **ताराबाई** हळदकुंक-वाला ज्या घरीं गेली होती, त्या घरींच वाढण्या-बरोबर **चिमाला** घेऊन जाण्याचा **ताराबाई**-चा बेत होता, यामुळें माझ्याबरोबर यायला एकटा **जनकू**च राहिला. यामुळें व मला आदले दिवसा-ची पुरी आठवण होती यामुळें, त्या दिवशीं बागेंत न जावें असें माझ्या मनांत आलें, व **चिमा**च्या नव्या परकराला नाडी शिवायची राहिली होती ती शिवीत मी बसलें. इतक्यांत **ताराबाई** अकस्मात् माझ्या खोलींत **चिमास** नेण्याकरितां आली, व अद्यापि **चिमा** परत्र चोळी नेसून तयार नाहींसें पाहून तिनें मजवर पुष्पवृष्टीचा भरणा केला. तथापि मीं एक चकारशब्द उत्तर न देतां खालीं मान घालून नाडी शिवली, व नंतर **चिमा**ची तयारी करून तीस **ताराबाई**चे स्वाधीन केलें; व पुढें दुसऱ्या उद्योगास लागणार तों इतक्यांत **ताराबाई**नें मला **जनकू**ला बागेंत घेऊन जा ह्मणून सांगितलें, व त्यामुळें माझा अ-गदीं नाइलाज होऊन मी **जनकू**ची तयारी करून त्यास बागेंत घेऊन गेलें. बागेंत जाऊन तेथें अंमळशी इकडे तिकडे होतें, तथापि मागून **जानराव** बागेंत येतील ह्मणून मला एकसारखें धस्स होऊं लागलें, तेव्हां कसेंसेंच वाटूं लागून मी **जनकू**ला शेतांत घेऊन गेलें. तथापि मागून **जानराव** येण्याची भीति होतीच. याकरितां मी नेहमी शेतांत ज्या अंगाला जात असें, त्या अंगाला न जातां अगदीं निराळ्याच अंगाला लांब आंब्यांचीं व इतर झाडांची गर्दी होती तिकडे गेलें. जातां जातां पोटांत धस्स होत असूनच मी वरचेवर मागें वळून पाहीं, परंतु माझ्या मागें लागून कोणी येतांना दृष्टीस पडलें नाहीं. त्यायोगानें म-नास बराच धीर वाटूं लागला, व तेथें इमार-तीचें कांहीं काम करण्याकरितां एक मोठें आंब्याचें झाड तोडून पाडलें होतें त्याच्य आडव्या पडलेल्या खोडावर अमळ टेंकून

बसलें. समोर पाला बिला पडला होता, व कांहीं लहान मोठ्या काटक्या ही पडल्या होत्या, त्यांत **जनकू** खुशाल मौजेनें खेळूं लागला. त्यामुळें मला थोडी फुरसत सांपडून माझें सर्व मन विचारात गढून गेलें, व इतःपर माझी स्थिति तरी काय होणार या गोष्टीकडेच माझें सर्व लक्ष लागलें. अशा स्थितींत मी किती वेळ होतें याचें मला बरोबर स्मरण नाहीं. परंतु इतकें खचित आठवतं कीं कांहीं वेळ तशा स्थितींत गर्क होऊन गेलें असतां, एका एकीं जवळ पाल्यामध्यें कांहींसें मोठ्यानें खसबसल्याचा आवाज कानीं पडून माझा जीव एकदम धस्स झाला, व पुढें कोणता अनर्थ गुदरणार याची एकदम माझ्या मनांत कल्पना येऊन गेली. नंतर ज्या अंगानें आवाज ऐकूं आला होता त्या अंगाला वळून पहातं, तों **जानराव**ांची स्वारी माझ्या दृष्टीस पडली, व इतक्यांत हां हां म्हणतां ते अगदीं मजजवळ येऊन ठेंपले.

ते म्हणालेः—"प्राणप्रिये **मथुरे** ! कां मी बोललों होतों तें खरें का खोटें आणखी एकदा तरी तुझी गांठ घेईनच म्हणून ? तरी पण ती गांठ इतक्या लौकर पडेल असें मला वाटलें नव्हतें. बरें तें असो. आतां माझें म्हणणें तूं नीटपणें ऐकून घे.—हां—हें बीं कांहीं उपयोगाचें नाहीं. तुला ऐकलेंच पाहिजे, व मी तुला ऐकायला लावीनच. तें घाणेरडें पोर तिकडे खेळायच्या नादांत गुंतलें आहे, आणखी तीं दुसरीं ओंगळ पोरेंही कांहीं आज येथें नाहींत, तेव्हां तुझ्या माझ्या बोलण्याला अशी अनुकूल वेळ दुसरी मिळावयाची नाहीं. तुला खचित सांगून ठेवितों, जर तूं मजपासून पळून जाण्याचा यत्न करशील तर मी तुझ्या अंगावर एकदम हात टाकून तुला पकडून धरीन, जाऊं देणार नाहीं; आणखी ओरडूं बिरडूं लागशील तर तुझ्या या चिमुकल्या तोंडावर एकदम अस्सा हात टेवून तुझें तोंड बंद करीन. कधीं सोडणार नाहीं. याकरितां तुला सांगतों, तूं आपला नीट विचार कर. यावेळीं माझें अंतःकरण दगडापेक्षांही कठिण झालें आहे, व माझा निश्चय कदापि फिरावयाचा नाहीं. व कांहीं झालें, तरी माझें म्हणणें मी तुला ऐकावयास लावीनच !" हें बोलत असतां **जगनराव** अतिशय आवेशास चढून कांहीं विलक्षण हातवारे करूं लागले, त्यायोगानें मला भीति व आश्चर्य वाटून कांहीं वेळ माझ्या सर्वांगाचे व्यापार बंदच झाल्यासारखे झाले. अखेरीस त्यांचें भाषण संपलें तेव्हां एकदम देहभानावर येऊन माझ्या तोंडांतून "देवा देवा !" असा उद्गार बाहेर पडला, व मी म्हणालेः—देवा! हा गृहस्थ जो माझ्यापुढें बोलतो आहे, याला आपल्या भ्रूचा किंवा योग्यतेचा कांहींच चाड वाटत नाहीं? देवा !—**जानराव** ! मी तुमचा कांहीं एक अपराध केला नाहीं, असें असतां तुम्हीं माझ्याशीं असे दांडगेपणाचें वर्तन करितां हेंच का तुमचें सामर्थ्य आणि धैर्य ? तुम्हीं आपणाला मोठे शूर म्हणविता, पण गरीब बिचाऱ्या बायकांशीं असली दांडगाई करणें याला कांहीं कोणी शूर नाहीं म्हणत ! याला भागूबाईच म्हणतात !"

हे माझ्या तोंडचे शब्द ऐकून **जानराव**ांचा एकदम स्वर बदलला. तो इतका कीं तो ऐकून मला त्यावेळीं अत्यंत आश्चर्य वाटलें. ते म्हणालेः—"**मथुरे** ! तुला काय सांगूं ? तूं मला भागूबाई म्हटलंस, परंतु माझें तुझ्यावर अतिशय प्रेम बसलें आहे त्यापुढें माझा नाइलाज आहे. तसें नसतें, आणि जर का तुझ्या

रा. रा. रामचंद्र केशव बागाईतकर (१८०२ बद्दल)... ... ... ३
" रामचंद्र कृष्णराव लाड... ... ... ३
" केशव आत्माराम भैंदरगी ... ... ३— ६
" मोरेश्वर काशीनाथ खारकर (१८०२ बद्दल) ... ... ३— ६
" भास्कर रामचंद्र डुगल (१८०२ बद्दल)... ... ... ३
" गोविंद गोपाळ शेरे... ... ... ३
" गोपाळ नारायण कोंणूरकर... ... ... ६—१२
" माधवराव मल्हार... ... ... ३— ६

चुकीची दुरुस्ती:—गेल्या अंकांतील पोंचींत रा. रा. शेषगिरराव रामचंद्र या नांवाच्या ऐवजीं रा. रा. शेषगिरराव राघवेंद्र असें वाचावें.

वर्गणीदारांस व इतरांस सूचना

चालू सालाकरितां पुढील गृहस्थांस एजंट नेमिलें आहे त्यांजकडे वर्गणीदारांनीं वर्गणी भरावी:—

रा. रा. विष्णु गणेश जोशी, घर नं. २७० बुधवार पेंठ... ... ... पुणें.
" भास्कर दिनकर बाळ, डा. माळचंद्र कृष्ण भाटवडेकर यांचे घरीं, बडोदें.
" चिंतामण रामचंद्र केळकर, प्रमोदसिंधु छापखाना... ... ... उमरावती.
" बाळाजी अनंत वेलणकर, वैद्य, संदुभाऊ गोरे यांच्या घरीं ... रत्नागिरी.

विक्रीस तयार. (नाटयकथार्णव आफिसांत)

डाक्तर व वैद्य प्रहसन (अलाहिदा पातळ कागदावर छापिलेलें फारच स्वस्त)... ... ... किं. २ आणे, ट. हं. ६ पै.
अद्भुतठकबाजी... ... ... " १२ " " ६ "
बोधरत्नावली भाग १ ... ... " ६ " " ६ "
हुन्नरसंग्रह भाग २ ... ... " ६ " " ६ "
श्री अक्कलकोटस्थ स्वामी महराजांचें चरित्र, भाग १ ला.
(महाराजांची साधारण स्थिति आणि त्यांजविषयीं लोकांचे अभिप्राय)... ... ... " ८ " " ६ "
कित्ता भाग २ रा. (महाराजांनीं दाखविलेले अद्भुत चमत्कार) " ८ " " ६ "

नाट्यकथार्णव.

प्रस्तुतकालीं 'नाव्हल्स' व 'नाटकें' यांचे संबंधानें जो लोकांचा भ्रांतिमूलक समज झाला आहे त्याचा निरास होऊन, या अत्यंत अनुपम मनोरंजनसाधनाचें वास्तविक स्वरूप व त्याची वास्तविक योग्यता हीं त्यांचे मनांत पूर्णपणें ठसावींत, व तेणेंकरून सदभिरुचि जागृत होऊन काव्यामृतरसास्वादाविषयीं त्यांच्या अंतःकरणाची साहजिक प्रवृत्ति व्हावी, हा ह्या पुस्तकाचा मुख्य उद्देश असून, यांत संस्कृत व इंग्लिश या भाषांत रचलेल्या उत्तम उत्तम नाट्यकथादिक प्रबंधांच्या आधारें आपल्या महाराष्ट्र वाणीस जुळतील अशा प्रकारचीं अनेक 'नाव्हल्स' व 'नाटकें' यांचा संग्रह यथावकाश होणार आहे, व प्रसंगविशेषीं स्वकपोलकल्पित सदुपदेशपर कथानकें व नीतिवादाचे चुटके यांचाही समावेश होईल. या पुस्तकांत अश्लीलता नीतिभंगादि दोष न येऊं देतां हें पुस्तक सर्व सभ्य व कुलीन स्त्रियांस वाचण्याजोगें करण्यांत येईल. या पुस्तकाच्या वर्गणीचे दर खालीं लिहिल्याप्रमाणें ठेविले आहेत:-

	रु.	आ.
अगाऊ वर्षास	३	०
मागाहून वर्षास	४	८
किरकोळ दर प्रतीस	०	६
टपाल हंशील वर्षाचें अगाऊ	०	६

अगाऊ वर्गणी पुस्तक घेतल्यापासून दोन महिन्यांच्या आंत भरली पाहिजे. पोस्टाचीं टिकिटें पाठविणें झाल्यास अर्ध्या आण्याचीं असावीं, व रुपयास अर्धा आणा याप्रमाणें वर्तवळा पाठवावा.

चालू वर्षापासून या पुस्तकांत पूर्वापेक्षां ८ पृष्ठें मजकूर वाढविण्यांत आला आहे. किंमत पूर्वीचीच कायम आहे. **नवीन वर्गणीदार होऊं इच्छिणारांनीं आपलीं नावें त्वरित पाठविण्याची मेहेरबानी केल्यास व प्रस्तुतचे आमचे वर्गणीदारांनीं आपणाकडील बाकीचा त्वरित उलगडा केल्यास हें पुस्तक इतक्याच किंमतींत लौकरच दुप्पट करण्यांत येईल.**

कांदेवाडी, मुंबई.

शंकर मोरो रानडे बी. ए.
नाट्यकथार्णवाचे कर्ते व मालक.

॥ श्री ॥

नाट्यकथार्णव.

त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते ।
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधा ह्येकं समाराधनम् ॥

मालविकाग्निमित्रे श्रीकालिदासः

स्फुरत्कलालापविलासकोमला करोति रागं हृदि कौतुकाधिकम् ।
रसेन शय्यां स्वयमभ्युपागता कथा जनस्याभिनवा वधूरिव ॥

कादंबर्यां बाणः

पुस्तक २. आषाढ शुद्ध १ शके १८०२. अंक ४.

NÁṬYA-KATHÁRṆAVA,

A MONTHLY MAGAZINE

Comprising a series of Marathi Dramas, Novels &c. &c.

अनुक्रमणिका.

विषय.	पृष्ठ.
जगन्नाथरायकृत रतिमन्मथ नाटक	४३
प्रहसनसंग्रह.	
व्याघ्रांबरी प्रहसन	२९
अतिपीडचरित नाटक	८१
शिलादित्य	७१
मथुरा (आत्मवृत्तकथन)	७७

मुंबई.

"इंदुप्रकाश" छापखान्यांत छापिला.

(सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधी सर्व प्रकारचे हक्क मालकांनीं स्वाधीन ठेविले आहेत.)

किंमत ६ आणे.

अगत्याची सूचना.

☞ आजपर्यंत आमच्या पुस्तकाचे दुसऱ्या वर्षापैकीं चार अंक वाचकांच्या हातांत पडले असून, अद्यापि बऱ्याच वर्गणीदारांकडून मागील सालाबद्दलची म्हणजे १८०१ बद्दलचीही फेड करण्यांत आली नाहीं, व चालू सालाबद्दल वसूल पुष्कळच ग्राहकांकडून होणें राहिला आहे, त्यामुळें पुस्तक वेळचे वेळेवर निघण्यास अडचण पडते. शिवाय सांप्रत आमच्या पुस्तकाचीं पृष्ठेंही वाढविण्यांत आलीं आहेत, यामुळें पुस्तक छपाईचा व इतर खर्च पुष्कळच वाढला आहे. यास्तव केवळ या अडचणीकडेच लक्ष पोंचवून वर्गणीदार मागील साल व चालू वर्ष या दोहोंबद्दलची आपल्या वर्गणीची फेड मेहेरबानीनें लौकर करितील अशी आशा आहे. आतां लिहिल्याप्रमाणें वर्गणीदारांनीं त्वरित मेहेरबानी केल्यास मागसलेले सर्व अंक वाचकांच्या हातीं त्वरितच देण्यास आह्मांस उमेद येईल. इकडे वर्गणीदारांनीं अवश्य लक्ष पुरवावें, व वर्गणीवसुलातीकरितां विनाकारण निराळा टपालखर्च करण्याचें आह्मांस भाग न पडावें एवढीच त्यांस आमची सविनय सूचना आहे.

वर्गणीची पोंच.

		रु.	आ.
श्री. रा. रा.	बापूसाहेब कुरुंदवाडकर	६	१२
रा. सा.	नारायण विष्णु बापट	३	
डा.	सखाराम अर्जुन	३	
रा. रा.	केशव गोविंद परांजपे	१०	
,,	विठ्ठल रामचंद्र	३	
,,	रामचंद्र आत्माराम देसाई	३	
,,	गणेश बाबाजी साटले	३	
,,	नारायण रामचंद्र गोगटे	६	१२
,,	लालजी नारायण	३	
,,	नारायण त्रिंबक वैद्य	३	
,,	काशीनाथ दाजी रेगे	३	
,,	महादेव शिवराम आपटे	३	६
,,	दत्तात्रय कृष्ण दामले	३	६
,,	नरहर रंगाचार्य कानडे	३	
,,	मोरेश्वर रामचंद्र ठोंसर	६	
,,	जनार्दन दामोदर कोल्हटकर	३	
,,	वामन नारायण राहुरकर	३	
,,	गोविंद केशव साबदे	३	
,,	रामचंद्र पुरुषोत्तम कामत	३	
,,	रामचंद्र भिकाजी गुंजीकर	३	
,,	नारायण गणेश बेलिफ	३	

मन्म०–(नेत्रांतून अश्रु आणून) हायगे प्रिये ! आतां तूं कशाची वांचतेस ! (रथांत मूर्छित होऊन पडतो.)

सार०–आयुष्मंता ! सावध हो सावध हो !

मन्म०–(सावध होऊन दुःखानें) हायहाय !

साक्या.

मम हृदयाचें हृदयचि केवळ; चक्षू मच्चक्षूंचें;
प्राणांचाही प्राणचि माझ्या; सौख्यनिधान सुखाचें;
मत्प्रेमाचें प्रेमस्थानचि; जीहुनि या विश्वांत
मजलागूनी कदापि न गमे वस्तु दुजें प्रिय कांहीं;
प्रियतम रमणी हायहाय ती हस्तीं देवरेणूच्या
पडली निसर्गकातर धेनू जैशी का व्याघ्राच्या !
त्याच्या हातुनि जीवन तीचें राहिलहो कोठोनी ?
काय करूं मी? प्राणसखे! कशि गेलिस मज सोडोनी?

सार०–आयुष्मंता ! हा शोक करीत बसण्याचा समय नव्हे, याकरितां पुढील उपायांचें चिंतन करावें.

मन्म०–सूता ! मी तरी काय करूं ? पहा या वेळीं माझी कशी स्थिति झाली आहे ती !

श्लोक.

झाला नष्ट विवेक; तें सहजेंही धीरत्व गेलें लया;
लज्जा हे खिळुनी मना, विनयही सोडोनि गेला तया;
हा वृद्धीप्रति पावतो मम मनीं व्यामोह, संताप दे;
निर्मर्याद असा विकार हृदयीं रोंवीतसे स्वें पदें !

सार०–आयुष्मंता ! तूं म्हणतोस खरें. परंतु या प्राप्त प्रसंगीं शत्रूला दंड करण्याविषयींचा उत्साह बाळगणें हेंच तुला उचित आहे.

मन्म०–(धैर्यानें) शाबास सूता शाबास !

आर्या.

बोलोनि मधुर वाणी आश्वासाया समर्थ बहु असती,
परि हितकारक सुयशोदायक वदते जगीं विरळ दिसती.

कोकिलका ! जा आणि तातास निवेदन कर, कीं तुला सर्वांना माझीच शपथ आहे, तुम्हीं अमरावती शृंगारावी, व मी एकटाच त्या चौर्यकर्म करणाऱ्या असुराच्या गर्वाचें खंडन करितों !

कोकि०–जशी महाराजांची आज्ञा. (निघून जातो.)

मन्म०–सूता ! इंद्रपुरीकडे जाणाऱ्या मार्गानें घोडे चालूं दे !

सार०–(त्याप्रमाणें करितो, आणि चोहींकडे पाहून) आयुष्मंता! हे काय उत्पात होत आहेत पहा!

श्लोक.

कलुषित मुख झालें हें दहाही दिशांचें,
सकल लपुनि गेलें बिंब तेजोनिधीचें,
अतिरययुत झंझावात हे वाहतात,
जणुं सकल जगाचा आज होणार अंत !

मन्म०–(हर्षानें) सूता ! अरे पहा काय चमत्कार होत आहे तो !

श्लोक.

धनूच्या गुणाचा टणत्कार केला
नसोनीच, मौर्वी करी निःस्वनाला.
मुखांतूनि भात्याचिया बाण हेही
अपोआप बाहेर येताति पाहीं.

सार०–(मन्मथास अधिक उत्तेजन देतो.) आयुष्मन् !

श्लोक.

होती हे अतिमात्र दारुण असे सर्वत्र उत्पातकें,
चिन्हाला सुखदार्थ हे शकुनही होती शुभाशंसकें,
तेणें, संगर घोर होउनि तयीं होणार अस्मज्जय,
विश्वातें सगळ्याहि हर्ष, गमतो ऐसा मला निश्चय !

(दक्षिण दिशेकडे पाहून) आयुष्मंता! पहा पहा!

श्लोक.

होतो दुंदुभिनाद मंथनगिरित्रस्तांबुधीच्या परी,

---

१. सुंदर. २. स्वभावतःच भितरी ३. प्राण. ४. स्वाभाविक.

१. गढुळलेलें, काळवंडलेलें. २. तेजाचा सागर= सूर्य. ३. रय=वेग. ४. उत्पात. हें स्वार्थी रूप आहे. यामध्यें शब्दाच्या शेवटीं 'क' प्रत्यय लागल्यानें अर्थभेद होत नाहीं. ५. शुभ सूचविणारे. ६. युद्ध. ७ मंथनगिरि ह्म. मंदराचल, ज्यानें त्रासविलेला असा समुद्र.

कल्पांताभ्रततीपरी[1] पसरली धूली महा अंबरीं,
विद्युत्संनिभ हेमकांतिरुचिरा तेथा पताका भ्रमें
नृत्या दाविति, . शत्रुसैन्य जवळी मार्गींच आहे गमे

मन्म०—(धैर्यानें) असें आहे, तर आतां धनुष्य स बाण जोडून तो मारण्याचीं ही वे आपोआप जवळ आली ! वाहवा वाहवा

सार०—(चिंतायुक्त होऊन) आयुष्मंता ! आप साहाय्य करावयास एक धनुष्य मात्र आपण पाशीं आहे, आणि शत्रूचें सैन्य तर फा मोठें आहे, यामुळें आपण त्या दैत्याशीं द्वाचा उपक्रम करण्याविषयीं माझ्या चित्ता शंका वाटते !

मन्म०—(गर्वानें) अंः—सूता ! अरे, तूं अ बोलतोस तो तूं आजपर्यंत माझ्या बाहूं पराक्रम पाहिला नाहींस काय ? अरे, तूं सांग पाहूं !

श्लोक.

लंकेमाझारि पूर्वी गमन करि जईं पुत्र तो अंजनीचा,
तत्साहाय्या कराया क्षम मदितर तें जाहला कोण साचा
तोक्ष्यें नेतां हिरूनी अमृत, सुरचमू त्याजमागूनि धावे
तीलागीं साह्य द्याया वद कवण दुजा तेधवां वीर पावे!
आले कौरव सर्व एकवटुनी धेनू हरायास्तव,
तें पार्थाप्रति कोण सांग दुसरा साहाय्य दे सुस्तव ?
ऐसा मी असतां पराक्रमपटू शत्रूंसि निर्दाळिता,
माझें साह्य करावया मज कुणी व्हाया कशा तत्वतां ?

सार०—(पुढें पाहून) आयुष्मंता! आपल्या रथाच अलंकारच असा जो आपला ध्वजस्थित मकर त्याच्या दर्शनानें, आपण पाठलाग करीत आलों आहों हें शत्रूस समजून आलें आहे व तो आपलें सैन्य मध्यें घालून आपण एकटाच रथांत बसून दूर पळून जात आहे असें वाटतें !

मन्म०—(वेगानें) असें आहे काय ? तर तूं हें शत्रुसैन्य, डावें घालून माझा रथ त्या असुराधमाच्या रथाच्या अग्रभागीं घेऊन चल !

सार०—(घोड्यांस चाबुक मारून त्यांस वेगानें चालवितो, व मन्मथाच्या आज्ञेप्रमाणें रथ सांगितल्या ठिकाणीं आणतो.)

(इतक्यांत रथांत बसलेला शंबरासुर येतो.)

शंब०—(मन्मथाकडे पाहून अवज्ञेनें) अरे हा पंचबाण **मदन** प्रत्यक्ष माझ्या हातीं सांपडलेल्या स्त्रीस परत नेण्याची इच्छा धारण करून कुलिंग पक्ष्याचें अनुकरण करितो काय ?

मन्म०—(शंबराच्या रथांत असलेली मायावती पाहून दुःखानें आपणाशीं) हर हर !

श्लोक.

मेरुप्रांतामाजी स्थलकमलिनी रम्य न दिसे;
तैरक्षूच्या संगें न तरलदृशा एणि विलसे;
तनू राहुग्रस्ता उडुपतिचि शोभे नचि कदा;
प्रिया माझी तैशी जवळि असुराच्या न रसदा[2] !
आणखी हा पण काय चमत्कार !

श्लोक.

पाहे नेत्रीं. परंतू न मज रथें बघे पूर्णचंद्रानना हे!
मच्चापाच्या गुणाचा परिसुनिहि टणत्कार हे हृष्ट नोहे !
मत्त्रासानें रिपूचे पळति भट, तरी हर्षि संतोष नाहीं !
अन्या ही काय कोणी?उरलि न अथवा चेतना हीस कांहीं!

(शंबरास उद्देशून क्रोधानें) अरेरे ! कन्याहरण करणाऱ्या चोरा !

---

१ प्रळयकाळची अभ्रताति ह्म. मेघमाला. २.. भूळ. ३. अंजनाचा पुत्र मारुति. ४. माझ्याहून निराळा. ५.. गरुडानें. ६. चांगला स्तव ह्म. स्तुति करण्याजोगें. ७. मासा. मदनाच्या ध्वजावर मासा असतो, यावरूनच त्यास 'मीनकेतन' हें नांव मिळालें आहे.

१. कुक्कड कोंबा. २. जलहनि प्रदेशांत=मारवाडांत. ३. तरसाच्या. ४. चंचल दृष्टीची. ५.. हरिणी. ६. उडु ह्म. नक्षत्रें, त्यांचा पति चंद्र. ७. रस=गोडी, आनंद, त्यातें देणारी, आनंदकारक.

श्लोक.

मूढा! दंष्ट्रेंत[1] कैसा कर शिरकविशी क्रुद्ध देवींकराच्या ?
रे द्रपाँधा! सैटातें उपटुं बघशि का कुंजराच्या रिपूच्या[2] ?
जिव्हेनेंतीक्ष्णधाराअँसिचिहि करिशीका रेंहा चाटण्यातें?
तन्वीतें या हरूनी उगिच बघशि,का मृत्यु संपादण्यातें ?

शंब०—(उपहासानें) अरेरे पुष्पधन्व्या **मदना** ! कन्या झटली झणजे सर्वांना साधारण आहे. ती अमक्याची आहे आणि अमक्याची नाहीं असा कांहीं प्रकार नाहीं. यास्तव अशा कन्येकरितां तूं मज **शंबरासुराशीं** वैर बांधून आला आहेस, तेव्हां तूं किती शहाणा आहेस हें स्पष्टच झालें! अरे, तुझें शौर्य झटलें झणजे स्त्रिया आणि पुरुष यांच्या एकांतीं होणाऱ्या युद्धाच्या उपयोगीं! याकरितां तूं हा युद्धाचा नाद सोडून आपला दूर निघून जाशील तें बरें ! तथापि असलीच इच्छा युद्ध करण्याची, तर चल युद्धास योग्य अशा ठिकाणीं जाऊन तेथें युद्ध करूं !

मन्म०—(रोषपूर्वक हंसून) अरे दुर्मुखा ! तुझ्या वल्गना पुरे कर ! तूं बोलण्यांत मोठा चतुर आहेस, याकरितां तुला मी आपल्या बाणांनींच काय उत्तर देणें तें देईन, आणि कलहप्रिय **नारद**मुनींचें युद्धदर्शनाविषयींचें कौतुकही पूर्ण करीन. (सर्व जातात.)

(तदनंतर विमानांत असलेला नारद शिष्यासहवर्तमान येतो.)

नार०—(आनंदानें नाचत नाचत आणि वीणा वाजवीत)

श्लोक.

सुधार्थ[3] दैत्य चापपाणि घोर युद्ध मांडिती,
निंतांत[4] अद्भुता अशांचि साहसांसि दाविती,
सदैव त्यांसि पाहतों; अणी उमारमापति-
पवित्रनामकीर्तनें सुखासि पावतों अति !
अशा पवित्र या जपें भवाचें[5] सर्व बंधनें
तुटोनि जाउनी, अहा! परत्र[6] भद्र तें मनें
मुमुक्षु सेवण्यासि शक्त होति, मीहि यास्तव
तया करीत हिजतों मनीं धरूनि उत्सव !

शिष्य— (आश्चर्यानें) भगवन् ! आपण कोणचीं कोणचीं अद्भुत युद्धसाहसें अवलोकन केलीं आहेत ?

नार०—(मान डोलवून) वत्सा ! फार योग्य प्रश्न केलास. ऐक सांगतों.

श्लोक.

मायेनें नरसिंहरूप धरूनी श्रीविष्णु दैत्येश्वरा-
लागूनी नखरीं[7] विदारित तईं म्यां पाहिली तत्त्वरा !,
संरंभें[8] त्रिपुरप्रदाहन करी तो जेधवां भ्रूजेटी[9],
त्याचा तो सगळा पराक्रम तदा म्यां देखिला दृग्पुटीं[10] !
हस्तीं घेउनि वज्र, कोपवश त्या देवेश्वरें धावुनी
मारीता बलदैत्य, विक्रमहि तो म्यां पाहिला लोचनीं!
संग्रामोद्यत[11] देव दैत्य अवघे प्राप्त्यर्थ तारेचिया[12]
होती, तें अवलोकिलें प्रतिभयां[13] युद्धास मीं त्यांचिया !

असेच आणखी मोठमोठाले वीर युद्धांत मरतांनाही म्यां पाहिले आहेत !

शिष्य—भगवन् ! तें खरें, पण ज्या दिवशीं नेत्रांस सुख देणारें अस युद्ध कोठेंच पाहण्यास सांपडत नाहीं, त्या दिवशीं आपण आपल्या जिवाची कोणच्या उपायानें कर्मणूक करितां ?

नार०—वत्सा ! तुझी बुद्धि फार चांगली आहे. सांगतों श्रवण कर.

श्लोक.

दंपत्यें अनुरक्तही असुनि तीं कोण्या मिषें भांडती,
भक्ष्यार्थी लघु बालकोंहि अथवा भांडावया लागती,
किंवा उन्मद[14] उक्ष[15] युद्ध करण्या येती चव्हाटेवरी,

---

१. सापाच्या. २. सिंहाच्या मानेवरील आयाळ. ३. कुंजर=हत्ती, त्यांचा शत्रु सिंह. ४. खड्गाची[5] इच्छा. ६. अमृत आहे अंध (अंधस्)=हा. अन्न ज्यांचें असे देव. ७. अत्यंत.

१. परलोकींचें. २. संतोष. ३ त्वेष. ४ त्रिपुरासुराचें जाळणें. ५. नेत्रपुटांनीं. ६. युद्धार्थ उद्युक्त. ७. भयंकर. ८. उन्मत्त झालेले. ९. बैल.

त्यांतें पाहुनि तुष्ट होउनि सदा मी हिंडतों भूवरी.

शिष्य— (हंसून) एकून कोणाचाही मूळचा स्वभाव घालवितां येत नाहीं ह्मणतात तें खरें!

नार०—असो. आजपर्यंत सर्व भुवनांत एकशूर असे जे **शूरपद्म** आदिकरून असुर, त्यांस शरजन्मा[1] जो **कार्तिकेय**, त्यानें आपल्या शराचे विषय करून परलोकास पाठविलें, त्या योगानें माझ्या नेत्राचें पारणें तर फिटलेंच; आतां असंख्य सैन्याचें डंबर बरोबर घेऊन आलेला जो **शंबर** दैत्य त्याच्याशीं भगवान् विष्णूचा पुत्र जो **मदन**, तो युद्ध करील, तेणेंकरून माझा मनोरथ परिपूर्ण होईल यांत संशय नाहीं.

शिष्य०—भगवन्! साखरेचें खाणार, त्याला दैव देणार, हें तर खरेंच आहे. परंतु **शंबराजवळ** एक सहस्र मायां[2] आहेत, त्यांमुळें तो दुर्जय आहे, एवढ्याकरितांच तो **मदनास** कसा जिंकितां येईल याचाच माझ्या जिवास फार संशय वाटतो.

नार०—काय ह्मणतोस? **मदनास शंबर** कसा जिंकितां येईल? हा वेड्या!

श्लोक.

पशू, पक्षी, किंवा दनुज सुरही, मानव तसे,
तयांही सर्वांच्या सतत मति जो मोहवितसे,
स्मराच्या[3] त्या माया अमित असती, त्यांजपुढती
तया दैत्येंद्राच्या दशशतमिता व्यर्थ असती!

(पुढें पृथ्वीकडे पाहून) अहो, **मन्मथाचा** रथ तर **शंबराच्या** मार्गास आडवून उभा आहे, व त्याजसभोंवती हें सर्व सैन्य वेढा घालीत आहे, त्याचा हा केवढा हो आडंबर[4]!

१ शर ह्म. दर्भ, त्यांपासून जन्मलेला. २. कपटविद्या. ३. मदनाच्या. ४. विस्तार.

श्लोक.

दानांचीं उदकें गळोनि करिती भूपृष्ठ जे पंकिल[1];
मोठाल्या परिबृंहणें[2] करिति जे प्रोन्नाद[3] दिङ्मंडल;
अत्यंतोच्च निजां करां[4] उभवुनी तच्चालनाच्या मुळें
मोडीती गगनावकाशि फिरत्या यानांप्रती[5] जे बळें;
हे अंभोद[6] नभोंतरीं[7] बहुतसे सर्वत्र संचारती,
हाणोनी निज वक्रदंत रभसें[8] त्यांलागि जे फोडिती;
माहात्म्यें तनुच्या जणों शिखरिसे[9] जे प्रेक्षकां भासती;
वप्रक्रीडनसक्त[10] होउनिच कीं ते हे करी गर्जती!

शिष्य—भगवंता! आपण हें इकडे पहावें.

श्लोक.

खुरांनीं अश्वांच्या सकल धरणी फाटत असे,
धुळी व्यापी द्यावा[12] धरणि मधलें अंतर तसें;
हयांच्या[13] हे पृष्ठावरति चढनी सादि[14] असले,
तयें मोठे हेषाध्वनि[15] कुतुकदाते[16] उपजले!

नार०—तसेच हेही पहा.

श्लोक,

मार्गीं ज्या अनुकूलचंक्रमपटू[17] सद्धोट[18] हे जोडले,
स्वच्छायांतुरगांस[19] जे जितुं जणो वेगें क्रमूं लागले,
ज्यांची केतुलता[20] जणों अडविते भास्वद्रथातें[21] निकें,
ते हे स्यंदन[22] नेत्ररम्य चलती; तद्घोष[23] हा आयकें.

शिष्य—भगवन्! त्याहीप्रमाणेंच इकडे अवलोकन करावें.

श्लोक.

पादन्यासें करूनी नमविति धरणी; फोडिती दिक्तटांते
स्वीया क्ष्वेलाबलानें[24]; करधृत असिनें वारिताती रिपूंतें;

१. चिखलानें भरलेलें. २. हत्तीचें ओरडणें. ३. अत्यंत नादित. ४. कर ह्म. सोंड. ५. विमानांस. ६. मेघ. ७. आकाशांत. ८. वेगानें. त्वेषानें. ९. मोठेपणानें. १०. पर्वतासारखे. ११. डोंगराशीं टक्कर घेण्यांत मग्न झालेले. १२. स्वर्ग. १३. घोड्यांच्या. १४. स्वार. १५. घोड्यांच्या खंकाळण्याचे आवाज. १६. कौतुक देणारे, मनास गोड लागणारे. १७. पाहिजे त्या प्रकारें चंक्रम ह्म. चालणें, त्यांत निष्णात. १८. चांगले घोडे. १९. आपल्याच सावलींत जे घोडे पळतांना दिसतात, त्यांस जिंकण्याकरितांच काय? २०. ध्वजरूप लता. २१. सूर्याचा रथ. २२. रथ. २३. त्यांचा घडघड आवाज. २४. उड्या.

व्याघ्रांबरी प्रहसन.

अंक १.

प्र० १.–हैबतराव सरदेशमुख यांच्या वाड्यामागील बाग.

(कांहीं माळी व मजूर बागेंतील निरनिराळीं कामें करीत आहेत. कांहीं झाडांच्या तोडून पाडलेल्या फांद्या गोळा करीत आहेत. व तेथून कांहीं अंतरावर हैबतराव आणि मुधोजीराव बोलत बसले आहेत. व कांहीं मजूर लोक दुसऱ्या बाजूस न्याहारी खात बसले आहेत. काम करणारे मजूर गातात. एकजण एक एक ओळ सांगतो, बाकीचे त्याचें ऐकून त्याजप्रमाणें एकदम म्हणतात.)

मजूर–(गातात.)

गाणें.

आन् ऐका मरंद् आसामि वं
हाये जांवर् तुम्ची जवानि वं
काम झट्दिन् करुन्शि वं
बसुं खान्यापं न्ह्येरि वं ॥ १ ॥ आन्.

काम् क्येल्या वगर अमां
क्रोन् द्येया सुजला दामा
काम करावं ह्वावं धिमा
भाकर् पिठ्लं लय् चम्चमा ॥२॥ आन्.

सूर्य्ये नारायन् धा कासरा
हान्नं चढ्लाय् तावूतो जरा
भुका कर्त्येत् काव् काव् सुरा
चला आट्पूं काम् भर्भरां ॥ ३ ॥ आन्.

हैब०–(तिकडे काम नीट चाललेलें पाहून) **मुधोजीराव** ! मी म्हणतों तें हेंच. कोणाशीं बोलायची गोष्ट नाहीं. पण तुम्हांला म्हणून सांगतों. घरीं असलों म्हणजे आपली कायशीशीच गाळण होतें. आमच्या घरकरणीचा स्वभाव तुम्हांला ठाऊकच आहे. ती समोर असली म्हणजे काय असेलतें असो, माझे पायच कसे अगदीं लटपटून जातात. कांहीं इलाज चालत नाहीं. फार तर काय सांगूं, घरांत असलें म्हणजे आपल्या जिवाला करमत नाहीं तर नाहीं, पण अन्न खाल्लेलेंही गोड लागत नाहीं. याकरितां आपला सकाळीं उठलों म्हणजे शौच मुखमार्जन आटोपून कांहीं तरी निमित्त काढून बागेंत उठून येऊन बसतों, म्हणजे कांहीं तरी थोडीशी विश्रांति मिळते. ती तरी नेहमी मिळतेच असें नका समजूं. एकादे वेळीं आमच्या घरकरणीची लहर लागली तर ती इथें देखील माझ्या पाठीस लागून येते, आणखी आमच्या डोकीला बहुत करून केंस उरूं देत नाहीं !

मुधो०–तें मी इकडे आल्यापासूनच पहातों आहे. पण मला राहून राहून चमत्कार वाटतो, तुम्हीं दोघं नवरा बायलें, तुमचें सगळ्या दिवसांत एक घटकाभर देखील कसें तें पडत नाहीं ! छेः, मी येथें आल्यापासून पहातों, तुमच्या जिवाला अर्ध घटका देखील सुख कसें तें माहित नाहीं !

हैब०–छेहो, तें कांहीं विचारूं नका. जिवाला त्रास म्हणजे इतका कांहीं आहे कीं कांहीं बोलून सोय नाहीं. फार लांब कशाला, दोन वेळ पोटभर खायचें तेंही पण नीट. पणें खाऊं देत नाहीं ! दररोज घरांत दहा तरी चपात्या भाजतात, पण माझ्या वांटणीस मोजून एक येते, आणि आपण मात्र चापून पांच सहा खाते, व बाकीच्या **सकवारबाई**ला खाऊ घालते ! असें झालें म्हणजे मग काय, बाजरीच्या भाकरी आणि कुळथवणी यांवर आमचें बाकीचें जेवण होतें !

(इतक्यांत दुसरीकडे अंतरावर म्हाळसाबाईचा आवाज ऐकूं येतो.)

म्हाळ०–(केंकाटत ओरडते.) कायरे मेल्यांनो !

केवढ्यानें रे ओरडतां ? तुमच्या ओरडण्यानें माझ्या कानठळ्या देखील बसल्या ! तुह्मांला माझ्यासारखें हलकं नाहीं बोलतां येत ?

हैब०—ऐका ! हलकें कोंवळें भाषण तें हें ! आहीं नवरे, पण आमच्याशीं देखील नेहमी शृंगार हा असा !

मुधो०—कठीण ! मी स्वभावानें इतका गरीब आहें, तरी मी खचित आपल्या बायकोच्या तोंडचीं अशीं बेजबाब उत्तरें ऐकून घ्यायचा नाहीं. आणखी तुह्मांला खचित सांगतों, माझ्या शिक्षेखालीं जर बायको सहा महिने राहील, तर तिला अगदीं माझ्या मनाप्रमाणें वागायला लावीन !

हैब०—पाहूं, अजून तुमचें लग्न व्हायचें आहे तें झालें ह्मणजे तुह्मीं आपल्या बायकोला कसें वागवितां तें पाहून साधला तर तोच कित्ता आपणही गिरवूं !—(आपणाशीं) पण साधेल तर !—

ह्माळ०—(अंतरावर) मेल्यांनो ! तुमचे कान फुटले वाटतें ! अगदीं हलक्यानें ओरडा— नाहीं तर—कायरे तुमच्या कामावर देखरेख कोण करतें आहे ? आमचें मऊ लोणी कुणीकडे तोंड दडवून बसलं आहे ?

मजूर—(हलक्यानें गातात, व काम करितात.)

ह्माळ०—मेल्यांनो ! तुह्मांला लाज नाहीं वाटत? असे बारक्या किनरीसारखे हलक्यानें गाऊं लागलां, तर मेल्यांनो तुह्मांला काम करायची हुशारी तरी कशी येईल? आणखी मेल्यांनो ओ येस्तोंवर पोटांत भाकरी भरल्या आहेत त्या तरी कशा जिरतील ? गा मोठ्यानें मला ऐकूं द्या ! गा तर तर खरे च मारतें कीं नाहीं पहा !

मुधो०—(हंसून) वाः वाः ! एकदा ह्मणते हलक्यानें गा, आणखी आतां फिरून मोठ्यानें ह्मणा ह्मणून आपणच त्यांच्या पाठीस लागली आहे !

हैब०—बाबा, तुह्मीं आजकालचे नवे आलां आहां, ह्मणून तुह्मांला याचें इतकें आश्चर्य वाटतें, पण आमचीं मनें नेहमींच्या घासाधिशीनें अगदीं सपशेल निरढवून गेलीं आहेत. तिच्या पुढें कोणाचा कांहीं एवढासुद्धां बोलण्याचा उपयोग नाहीं. तिच्या मनास वाटेल तें ती करणार ! आलीकडे दोन चार महिने तिला तिसरा प्रहर झाला ह्मणजे कोणी एक नवीन जटाधारी पुराणिक आला आहे त्याचें पुराण ऐकायचा नाद लागला आहे. दहा पांच वेळां मी तिच्या तावडींत सांपडलों, तों तिनें आपलें मला पुराण ऐकायला बसविलेंच ! पण चमत्कार काय सांगूं, त्या पुराणांत देवांच्या किंवा पांडवांच्या कथा तिला नकोत ऐकायला! तिला रामाची आई **कैकेयी** आणखी तिची दासी **मंथरा** यांचीच गोष्ट जेव्हां तेव्हां ऐकायला पाहिजे. तो पुराणिक चांगला पाढिक वक्ता दिसतो. तो पुष्कळ भारूड सांगत बसतो, मग त्यांतलें पुराणांत खरोखरी किती लिहिलें असेल आणि किती नाहीं, याचा आपल्याला उमज पडत नाहीं.

मुधो०—(हंसून) मला वाटतें, ही सगळी तुमची थट्टा करण्याकरितां तिनें युक्ति काढिली आहे. बाकी तुह्मीं जवळ नसलां ह्मणजे ती दुसऱ्या कथा ऐकत नसेल असें नाहीं.

हैब०—असेल. तसेंही असेल.—हां तरीच ! मी एकदा तिला न कळतां आडोशाला कशालासा उभा होतों, तेव्हां **राधा** आणखी दुती

असे कायसेसे शब्द त्याच्या तोंडांतून पडले होते खरे.

मुधो०—वाः, मग तर अगदींच उघड झालें! बरें, पण पुराण ऐकायला एकटी बसते का आणखी कोणी तिच्याजवळ असतें?

हैब०—तुमचें म्हणणें समजलों. पुराण ऐकायला तिच्याजवळ **सकवारबाई** असते कीं नाहीं हेंच तुम्हांला ऐकायला पाहिजे, असेंचना?

मुधो०—होय.

हैब०—तर मग कांहीं अगदीं पुसूंच नका! ती **सकवारबाईला** पुराण ऐकायला बसविते पवढेंच नाहीं, तर पुराणांत कोठेंसें एक ठिकाणीं "व्याघ्रांबरी" म्हणून नांव आलें होतें, तें तिनें **सकवारबाईचें** नांव ठेविलें आहे, आणखी जेव्हां जेव्हां म्हणून **सकवारबाईला** हाक मारायचें मला काम पडतें, तेव्हां तिला **व्याघ्रांबरी** या नांवानेंच हाक मारली पाहिजे म्हणून माझे मागें घरांतून एकसारखी टोंचणी लागलेली असते. तें नांव इतकें कठीण आहे कीं तें नीट पाठ व्हायला मला पुरा महिना लागला!

मुधो०—तें कांहीं असो. **सकवारबाईचें** एकदा माझ्याशीं लग्न लावून द्या, म्हणजे मग पहातों ती व्याघ्रांबरीच रहाते का मांजरांबरी होते.

हैब०—होय, या साऱ्या तोंडच्या गोष्टी. पण **सकवारबाईचें** लग्न करायचें माझ्या हातांत असेल तर ना? माझ्या मनांत ती तुम्हांला पुष्कळ द्यावीशी येते, पण कांहीं इलाज चालत नाहीं! ती राहून राहून पोरीला सांगत असते कीं तुला **चंद्रराव फांकड्याला** द्यायची, आणखी ती पोर तिनें सांगितलेलें मुकाट्यानें ऐकून घेते!

मुधो०—असें काय! तर तुम्हीं युक्ति करा.—काय हो पण हे **चंद्रराव फांकडे** कुठले? यांचें नांव मी या प्रांतांत पूर्वी कधीं ऐकिलें नव्हतें!

हैब०—ते का! त्यांचे तीर्थरूप आपले **रायगडचे शिवाजी** महाराज, यांचे बंधु **व्यंकोजीराव भोंसले** हे **कर्नाटकांत** गेले तेव्हां त्यांचे बरोबर गेले होते. त्यांचे चिरंजीव **चंद्रराव** हे तिकडेच त्यांच्याबरोबर होते. तिकडे असतांना **कोचीन, मल्याळ** वगैरे ठिकाणीं ते पुष्कळ हिंडले; आणि तिथल्या बायका सुद्धा संस्कृत बोलतात, तेव्हां त्या बायकांच्या नादानें ते संस्कृत बोलायला बरेच शिकले आहेत. मग शुद्ध अशुद्ध किती हें कांहीं आपल्याला कळत नाहीं. पण त्यांचें बोलणें एकदा मीं ऐकलें, तों त्यांच्या भाषणांत अवघड शब्दांची पण एकसारखी गर्दी दृष्टीस पडली! पण अर्थ म्हणाल तर—एक शब्द सुद्धां कळला नाहीं

मुधो०—बरें याबद्दल आणखी एकादे वेळीं बोलूं, सध्यां तुम्हां आम्हांला दोघांनाहीं तोंडें बंद केलीं पाहिजेत. कारण—

(इतक्यांत म्हाळसाबाई येते.)

म्हाळ०—(रागानें) झालें, अखेर मी म्हणत होतें तसेंच झालें! मला असें व्हायचें हें ठाऊकच होतें!

हैब०—(नम्रतेनें) अग पण असें रागावायला काय झालें? मला सांग तर खरी!

म्हाळ०—जळलें तुमचें नेहमी नेहमी तेंच! आपण सगळ्या मुलखाचे ऐदी, दररोज खंडीभर चुका करायच्या, आणखी मी कांहीं बोलूं लागलें म्हणजे मला जेव्हां तेव्हां म्हणायचें "अग सांग तर खरी!" यांचीं कांहीं तरी लाज वाटूं द्या. दररोज मेलें दिव-

सांगावें लिखवावें, तरी तुमचें आपलें पहिलें तें कायमच ! तुह्मांला मी कालचे नाहींका बजावून सांगितलें कीं, हें आपल्या बागेंत काम चाललें आहे त्याच्यावर नीट देखरेख करा ह्मणून ? पण इथें काय, पालथ्या घागरीवर पाणी ! तिकडे ते मेले मजूर रिकामटेकडे न्याहारी खात बसतात, कामकसें तें मुळींच करीत नाहींत, इकडे आहे का कांहीं लक्ष ? आपले उठले सुटले बसले गोष्टी बोलत ! लाज कशी ती तुमच्या गांवींच नाहीं ! तुह्मांला त्या मजुरांच्या कामावर देखरेख करायला सांगितलें, का इकडे असे ढेलपोटचासारखें बसून रिकाम्या चकाटचा पिटायला सांगितलें ?

हैब०—अग, असें काय ह्मणतेस ? ते मजूर लोक आपआपलीं कामें करायचीं त्याप्रमाणेंच नाहींत का करीत ? मग कां बरें अशी उगीच बोलतेस, आणखी माझ्यावर उगीच संतापतेस ?

ह्याळ०—काय काय? मीच मात्र उगीच बोलतें आणखी उगीच संतापतें ? आणखी तुह्मीं मात्र त्या मेल्यांवर देखरेख ही अशी चांगली करितां आहां ? अहाहा ! दिवे ओवाळावेत ! काय मेलें जिवाला देखील कांहीं वाटत नाहीं ! आणखी मीच बोलतें आणि मीच संतापतें ! अहाहा ! कांहीं डोळे आहेत, का झालें इतक्यांतच खोबरें ? मीच बोलतें आणि मीच संतापतें, नाहीं ? मेली भी एवढी सरदेशमुखीण बायको मनुष्य असून सगळा दिवस हें कर, तें कर, हें पहा, तें पहा करीत असतें, त्याचें एवढें तरी स्मरण आहे का ? मेली आणिकशी कोणी असती तर जा मेल्या ह्मणती, आणखी पाटावर फत्या बसून आपली जेवती, नाहीं तर झोंप घेती ! पण मला कोठें तसले धंदे टाऊक आहेत ? मी आपली मेली स्वभावानें शांत, गरीब, कधीं भांडायची नाहीं, कीं कुणाला एवढी दिखीत रागें भरायची नाहीं, त्या मला न् हें असलें ह्मणणें शोभतें का ? अहाहा ! मी उगीच अशी तशी नाहीं ! ह्मटलें माझ्यासारखी बायको मिळायला सात जन्म पुण्याई खर्च केली पाहिजे !

हैब०—अग, मी तें उगीच ह्मटलें. तूं खरोखरी तशीच आहेस, आणखी माझी जबरदस्त पुण्याई, ह्मणूनच मी तुझ्या पदरीं पडलों आहें ! खरोखरी तूं फार चांगली बायको आहेस, आणखी तुझ्या अंगीं एवढासुद्धां दुर्गुण नाहीं! पण एक—तूं अंमळ अधिक बोलतेस, तेवढें न बोलशील, किंवा तुझें बोलणें ऐकायला मला कान नसते, ह्मणजे तुझ्या माझ्यासारखें सुखी जोडपें या आपल्या सगळ्या सरदेशमुखींत दुसरें नसतें !

ह्याळ०—काय काय ? मी अधिक बोलतें ?—आतां इथें तर बाई माझा उपायच हरला ! एकून सगळ्या मुलखांत दुष्ट, मूर्ख, वेडी काय ती मी अं?—बरें असूं द्या, आलें आहे नशीबीं पत्करून व्या !—काय काय ? ह्मणे मी अधिक बोलतें ! आहा ! आणूं का आतां मशाली, आणखी तुमच्या तोंडापुढें ओंवाळूं? मेलें तुमच्याशीं मीं लगीन केलें तें एवढें ह्मणून घेण्याकरितांच वाटतें ? कां कांहीं आहे का आठवण ? तुमच्याशीं लग्न करायचें ह्मणून मी मोठमोठाल्या राजांच सुद्धां मागण्या बापाकडून परतविल्या ह्मणखी तुह्मांलाच वरलें ! झालें, त्याचीं

देतें, आणखी स्वतः मर्दानी पोशाख करून सेनापति होतें, म्हणजे पुढची व्यवस्था करायला नीट पडेल. हा अश्वसेन माझा इमानी चाकर आहे, हा तुमच्याकडे येत जात जाईल, त्याच्याबरोबर काय निरोप पाठवायसंवरायचे असतील ते खुशाल पाठववेत. आतां या सगळ्या गोष्टींचा मदार संभाळणें तुमच्याकडे आहे. तेवढी तुम्हीं संभाळाल, तर फार काय सांगूं, हा देहही या चरणीं झिजवीन. आपण इकडे यायला निघालों, तेव्हांपासून मला कसेंसेंच वाटूं लागून हजारदां आपल्याशीं त्या गोष्टींबद्दल बोलायचें मनांत आणिलें, पण बोलायची मेली लाज वाटली ! तरी पण नेत्रसंकेतानें मीं आपलें मनोगत तुम्हांस कळविलेंच । इतःपर बोलल्यावांचून माझ्यानें रहावत नाहीं. इतःपर या देहांचा वियोग होणें बाई कसें अगदीं जिवावर येतें, पण काय करावें उपाय नाहीं !

मरु०—अहाहा राजकन्ये! काय चमत्कार सांगू-वा ! तुझ्या मनांत इतका वेळपर्यंत जी गोष्ट घोळत होती तीच माझ्याही मनांत घोळत होती,पण तुझ्याचप्रमाणें माझ्याही मनाची स्थिति झाली होती. असो. आतां आपणा उभयतांचें प्रेम उभयतांसही विदित झालेंच आहे, याकरितां परमेश्वर करो आणि यांत बिघाड कधींही न पडो ! (उभयतां एकमेकांस मिठ्या मारतात.)

(पडदा पडतो,)

प्र० ६.—स्थळ तेंच.

(अश्वसेन बागेच्या दाराशीं बसला असतां खलदर्शनराव येतो.)

खल०—कायरे हरामखोरा ! इथें बसून माशा कसल्या मारीत आहेस ?

अश्व०—सरकार ! बाईसाहेबांनीं आपली वाट पहात बसायला सांगितलें आहे, म्हणून आपलीच वाट पहात बसलों होतों.

खल०—कोणाची ? माझी ? बरें पण, तुझी धनीन आतां कसल्या उद्योगात आहे ?

अश्व०—कसें कसें म्हटलें ? बाईसाहेब उद्योगांत होय सरकार ? त्या—

खल०—गुलामा ! तुला विचारल्यावरोबर नीट उत्तर देतां येत नाहीं ? (त्याच्या खाडकन तोंडात मारतो.) बोल. तुझ्या धनीनीचा काय उद्योग चालला आहे ?

अश्व०—(गाल चोळीत) म—म—महा—स—स—सरकार ! महाराज !—

खल०—फिरून तेंच ! गुलामा ! चोरा ! (अश्वसेनास आणखी बडवितो.)

अश्व०—ओ, अरे—धांवा ! मे—मे—मेलों ! खू—खू—खून खून ! (मोठ्यानें ओरडूं लागतो. (इतक्यांत शशिकला येते.)

शशि०—(मधें शिरून अश्वसेनास सोडविते.) कां—पण--पण झालें तरी कायं ? आपल्याला असें हें काय झालें आहे ? वाटेचा दमून आलें होतें त्यामुळें अंमळ कोठें मेला डोळा लागत होता, इतक्यांत हें पण काय बाई ? आपली स्वारी केव्हांशी आली ? आणखी या बिचाऱ्या **अश्वसेना**ला असें मारायला तें काय झालें ?

खल०—चल. गप्प बस. मधें तोंड घालूं नको! दुष्टे! तूं चांडाळीण आहेस! माझ्या अंगाला स्पर्श देखील करूं नकोस !

शशि०—तें कां बरें ? मी आजच इतकी अस्पर्श ती कशानें झालें ? काय मेला चमत्कार आहे! आज आपल्या जिवाला झालें आहे तरी काय? (अश्वसेनास खूण करिते, अश्वसेन निघून जातो.) इतका संताप तो कशानें झाला?

सांतून पन्नास वेळां सांगावें शिखवावें, तरी तुमचें आपलें पहिलें तें कायमच ! तुह्मांला मी कालच नाहींका बजावून सांगितलें कीं, हें आपल्या बागेंत काम चाललें आहे त्याच्यावर नीट देखरेख करा ह्मणून ? पण इथें काय, पालथ्या घागरीवर पाणी ! तिकडे ते मेले मजूर रिकामटेंकडे न्याहारी खात बसतात, कामकसें तें मुळींच करीत नाहींत, इकडे आहे का कांहीं लक्ष ? आपले उटले सुटले बसले गोष्टी बोलत ! लाज कशी ती तुमच्या गांवींच नाहीं ! तुह्मांला त्या मजुरांच्या कामावर देखरेख करायला सांगितलें, का इकडे असे ढेलपोटचासारखें बसून रिकाम्या चकाटचा पिटायला सांगितलें ?

हैब०—अग, असें काय ह्मणतेस ? ते मजूर लोक आपआपलीं कामें करायचीं त्याप्रमाणेंच नाहींत का करीत ? मग कां बरें अशी उगीच बोलतेस, आणखी माझ्यावर उगीच संतापतेस ?

ह्माळ०—काय काय? मीच मात्र उगीच बोलतें आणखी उगीच संतापतें ? आणखी तुह्मीं मात्र त्या मेल्यांवर देखरेख ही अशी चांगली करितां आहां ? अहाहा ! दिवे ओवाळावेत ! काय मेलें जिवाला देखील कांहीं वाटत नाहीं ! आणखी मीच बोलतें आणि मीच संतापतें ! अहाहा ! कांहीं डोळे आहेत, का झालें इतक्यांतच खोबरें ? मीच बोलतें आणि मीच संतापतें, नाहीं ? मेली मी एवढी सरदेशमुखीण बायको मनुष्य असून सगळा दिवस हें कर, तें कर, हें पहा, तें पहा करीत असतें, त्याचें एवढें तरी स्मरण आहे का ? मेली आणिकशी कोणी असती तर जा मेल्या ह्मणती, आणखी पाटावर फत्या बसून आपली जेवती, नाहीं तर झोंप घेती ! पण मला कोटें तसले धंदे ठाऊक आहेत ? मी आपली मेली स्वभावानें शांत, गरीब, कधीं भांडायची नाहीं, कीं कुणाला एवढी दिखात रागें भरायची नाहीं, त्या मला न् हें असलें ह्मणणें शोभतें का ? अहाहा ! मी उगीच अशी तशी नाहीं ! ह्मटलें माझ्यासारखी बायको मिळायला सात जन्म पुण्याई खर्च केली पाहिजे !

हैब०—अग, मी तें उगीच ह्मटलें. तूं खरोखरी तशीच आहेस, आणखी माझी जबरदस्त पुण्याई, ह्मणूनच मी तुझ्या पदरीं पडलों आहें ! खरोखरी तूं फार चांगली बायको आहेस, आणखी तुझ्या अंगीं एवढासुद्धां दुर्गुण नाहीं! पण एक—तूं अंमळ अधिक बोलतेस, तेवढें न बोलशील, किंवा तुझें बोलणें ऐकायला मला कान नसते, ह्मणजे तुझ्या माझ्यासारखें सुखी जोडपें या आपल्या सगळ्या सरदेशमुखींत दुसरें नसतें !

ह्माळ०—काय काय ? मी अधिक बोलतें ?—आतां इथें तर बाई माझा उपायच हरला ! एकून सगळ्या मुलखांत दुष्ट, मूर्ख, वेडी काय ती मी अं?—बरं असूं द्या, आलें आहे नशीबीं पत्करून घ्या !—काय काय ? ह्मणे मी अधिक बोलतें ! आहा ! आणूं का आतां मशाली, आणखी तुमच्या तोंडापुढें ओंवाळूं? मेलें तुमच्याशीं मीं लगीन केलें तें एवढें ह्मणून घेण्याकरितांच वाटतें ? कां कांहीं आहे का आठवण ? तुमच्याशीं लग्न करायचें ह्मणून मी मोठमोठाल्या राजांच सुद्धां मागण्या बापाकडून परतविल्या ह्मणखी तुह्मांलाच वरलें ! झालें, त्याचीं

देतें, आणखी स्वतः मर्दानी पोशाख करून सेनापति होतें, ह्मणजे पुढची व्यवस्था करायाला नीट पडेल. हा **अश्वसेन** माझा इमानी चाकर आहे, हा तुमच्याकडे येत जात जाईल, त्याच्याबरोबर काय निरोप पाठवायसंवरायचे असतील ते खुशाल पाठवावेत. आतां या सगळ्या गोष्टींचा मदार संभाळणें तुमच्याकडे आहे. तेवढी तुम्हीं संभाळाल, तर फार काय सांगूं, हा देहही या चरणीं झिजवीन. आपण इकडे यायला निघालों, तेव्हांपासून मला कसेंसेंच वाटूं लागून हजारदां आपल्याशीं त्या गोष्टींबद्दल बोलायचें मनांत आणिलें, पण बोलायची मेली लाज वाटली ! तरी पण नेत्रसंकेतानें मीं आपलें मनोगत तुम्हांस कळविलेंच । इतःपर बोलल्यावांचून माझ्यानें रहावत नाहीं. इतःपर या देहांचा वियोग होणें बाई कसें अगदीं जिवावर येतें, पण काय करावें उपाय नाहीं !

मरु०—अहाहा राजकन्ये! काय चमत्कार सांगूवा ! तुझ्या मनांत इतका वेळपर्यंत जी गोष्ट घोळत होती तीच माझ्याही मनांत घोळत होती,पण तुझ्याचप्रमाणें माझ्याही मनाची स्थिति झाली होती. असो. आतां आपणा उभयतांचें प्रेम उभयतांसही विदित झालेंच आहे, याकरितां परमेश्वर करो आणि यांत बिघाड कधींही न पडो ! (उभयतां एकमेकांस मिठ्या मारतात.)

(पडदा पडतो,)

प्र० ६.—स्थळ तेंच.

(अश्वसेन बागेच्या दाराशीं बसला असतां खलदर्शनराव येतो.)

खल०—कायरे हरामखोरा ! इथें बसून माशा कसल्या मारीत आहेस ?

अश्व०—सरकार ! बाईसाहेबांनीं आपली वाट पहात बसायला सांगितलें आहे, ह्मणून आपलीच वाट पहात बसलों होतों.

खल०—कोणाची ? माझी ? बरें पण, तुझी धनीन आतां कसल्या उद्योगांत आहे ?

अश्व०—कसें कसें ह्मटलें ? बाईसाहेब उद्योगांत होय सरकार ? त्या—

खल०—गुलामा ! तुला विचारल्यावरोबर नीट उत्तर देतां येत नाहीं ? (त्याच्या खाडकन तोंडांत मारतो.) बोल. तुझ्या धनीनीचा काय उद्योग चालला आहे ?

अश्व०—(गाल चोळीत) म—म—महा—स—स—सरकार ! महाराज !—

खल०—फिरून तेंच ! गुलामा ! चोरा ! (अश्वसेनास आणखी बडवितो.)

अश्व०—ओ, अरे—धांवा ! मे—मे—मेलों ! खू—खू—खून खून ! (मोठ्यानें ओरडूं लागतो.

(इतक्यांत शशिकला येते.)

शशि०—(मधें शिरून अश्वसेनास सोडविते.) कां—पण—पण झालें तरी काय ? आपल्याला असें हें काय झालें आहे ? वाटेचा दमून आलें होतें त्यामुळें अंमळ कोठें मेला डोळा लागत होता, इतक्यांत हें पण काय बाई ? आपली स्वारी केव्हांशी आली ? आणखी या बिचाऱ्या **अश्वसेनाला** असें मारायला तें काय झालें ?

खल०—चल. गप्प बस. मधें तोंड घालूं नको! दुष्टे! तूं चांडाळीण आहेस! माझ्या अंगाला स्पर्श देखील करूं नकोस !

शशि०—तें कां बरें ? मी आजच इतकी अस्पर्श ती कशानें झालें ? काय मेला चमत्कार आहे! आज आपल्या जिवाला झालें आहे तरी काय? (अश्वसेनास खूण करिते, अश्वसेन निघून जातो.) इतका संताप तो कशानें झाला?

(त्याचा हात धरावयास जाते.)

खल०—खबरदार दुष्टे ! इतःपर माझ्या अंगाला हात लाविशील तर ! तूं महादुष्ट राक्षसी आहेस ! तुला माझी स्त्री म्हणावयाचीही मला लाज वाटते ! दुष्टे !—

शशि०—आज आपल्याला खचित कांहीं तरी भूतबाधा झाली आहे ! आपल्याला असें भूत तरी कोणचें लागलें बाई ?

खल०—निर्लज्जे ! अजून मजपुढें तोंड करून बोलतेस, तुला लाज नाहीं वाटत ? दुष्टे ! मला दुसरें तिसरें कोटलें भूत लागलें नसून तूंच प्रत्यक्ष माझ्यापुढें भूत उभी आहेस ! तूं या वेळीं मला शुद्ध हडळीप्रमाणें दिसत आहेस !

शशि०—(आपणाशीं) आजचें लक्षण कांहीं नीट दिसत नाहीं. (उघडपणें) मी कशीही दिसत असेन, पण आपण **अश्वसेना**ला कशाकरितां मारिलें ? त्यानें असा अपराध तरी काय केला होता ?

खल०—आः—दुष्टे—तुला या वेळीं काय म्हणावें कांहीं समजत नाहीं. तूं खचित अमानुष कृत्या आहेस ! प्रत्यक्ष तुझा पिता जो इतका वृद्ध झालेला, व जो इतका मायाळु कीं त्यानें तुला आपलें अर्धें राज्यही आंदण देऊन टाकिलें, त्याजवरच तूं कृतघ्नपणें शस्त्र उचलण्यास कमी केले नाहींस,—

शशि०—अगबाई ! हेंचका कायतें आपल्या रागाचें कारण ? त्या थेरड्याकरितां का आपल्याला इतकें वाईट वाटलें तें ?—पुरे पुरे—आतां समजली अक्कल ! मेली आटवण देखील का आतां राहिनाशी झाली ! अहाहा ! दिवे ओवाळावे ! त्या थेरड्याबरोबर ते मेले लढे पोळ इतके भाराभर होते त्यांनीं आपल्या घरांत एकसारखा उच्छाद आणिला होता, आणखी त्या मेल्यांना पहिल्यापासून त्या थेरड्याची फूस होती, हें आपल्याला आठवेनासें का झालें ? हा तर बाई मोठाच चमत्कार ! मी ताईकडे गेल्यावर मागें कांहीं भांगबिंग तर नाहींना खायची संवय केली ?

खल०—(दांत ओंठ खात) होय होय दुष्टे ! आलीकडे मी भांगच खात असतों ! निर्लज्ज नाहीं तर ! दुष्टे ! निर्लज्जे ! तूं आपल्या बहिणीकडे निघून कोणाच्या हुकुमानें गेलीस ?

शशि०—काय ? हुकुमानें ? अग बाई, ताईच्या घरीं जायचें असलें तर हुकुम का मागावा लागतो ? मला नव्हतें बाई हें असलें कांहीं टाऊक ! पण—पण बाई हुकुम तरी कोणाचा मागायचा ? हिकुडचा का ? आणखी तो कशाकरितां ? तुमच्या घरांत एवढें राज्य घातलें तें का असल्या क्षुल्लक गोष्टींत हुकूम मागण्याकरितां ?

खल०—हा ! दुष्टे ! तुझ्या तोंडाला हाड नाहीं ! अधमे ! हें ब्रह्मज्ञान तूं कोठें शिकलीस ? पण तें असो ! तुम्हीं दोघींनीं त्या बिचाऱ्या वृद्ध पित्याचा छळ काय म्हणून केला ? तूं एक माझ्या घरांत राज्य आणून घातलेंस, म्हणून तुला माझा हुकुम लागेनासा झाला, त्याप्रमाणें तुझ्या पित्यानें तुला अर्धें राज्य दिलें असतां त्याचा हुकुम तो कां चालूं नये ? दुष्टे ! तूं अत्यंत कृतघ्न आहेस ! तुझ्या अंगीं माणुसकी कशी ती एवढी देखील नाहीं ! तुझी ती दुष्ट वहीण तिचाही तुझ्यासारखाच मासला आहे ! शिव शिव ! ज्या राजमूर्तीची तुम्हीं निरंतर सेवाच करावी, त्या राजमूर्तीची तुम्हीं अशी दशा केली हें पाप तुम्हीं कोणत्या नरकांत जाऊन फेडणार ? जो वार्धक्यानें सर्वांग

वांकलेली मूर्ति पाहून प्रत्यक्ष व्याघ्रादि हिंस्र पशूंनींही तिजपुढें नमावें, तिची तुम्हीं दुष्टांनीं अशी दशा करावी काय ? आणखी तुम्हीं अशी दशा करीत असतां तुम्हां दोघींना **सुदर्शनराव** कांहींच बोलले नाहींत ? आणखी त्यांनीं तुम्हांला हवें तसें वागूं दिलें ? मोठें आश्चर्य आहे !

शशि०—कां त्यांत आश्चर्य तें कशाचें ? मीं त्या थेरड्याला आपल्या घराबाहेर घालवून दिलें, त्यावेळीं माझा हात तरी कोणीं धरला होता ? कां आहे का आठवण ? त्यावेळीं आपली स्वारी नव्हती का जवळ ? तुम्हीं एकवेळ विसरलां असाल, पण मी नाहीं हो विसरायची! मला पक्की आठवण आहे !—वरें पण, हें आतां असेंच का चालायचें ? मेला प्रसंग आला आहे कोण, तिकडे इतकें सुद्धां मन नाहीं, आणखी 'हें असें कां? हेंचकां?' असेंच का आतां भागूबाईसारखें विचारीत बसायचें? सरहद्दीवर **राजवाहना**चें सैन्य येऊन उतरलें आहे, तें आतां येऊन नरडीशीं धरील तेव्हां डोळे उघडतील. तोंपर्यंत नाहीं उघडायचे ! कां असेंच का ?

खल०—दुष्टे ! मला तुझें बोलणें ऐकायला नको ! चल जा एकदाचें तोंड काळें कर !

शशि०—मी कध्धीं नाहीं करायची ! तुम्हांला हवें तर तुम्हींच करा ! आतां तुम्हांला चिपळ्या नाहीं तर टाळ आणून देतें, आणखी बसा "रामकृष्ण हरि ! रामकृष्ण हरि !" करीत! आणा ती तुमच्या हातांतली तरवार द्या इकडे ! पहा आतां मीच पुरुष होतें !

खल०—आः दुष्टे ! तुझा हा निर्लज्जपणा पाहून तुझे तिळा तिळा एवढे तुकडे करावेंसें वाटतें ! परंतु काय करूं ? तूं कशीही राक्षसी असलीस तरी बाहेरून मानुषीदेह धारण केला आहेस, त्यामुळेंच मात्र तूं वांचली आहेस !

शशि०—अहाहा ! इतका दयाळुपणाचा डौलच नको कांहीं घालायला ! तुमचा पराक्रम किती आहे तो मी ओळखून आहें. पण तसें कशाला ? तुम्हीं मोठे पुरुष म्हणतां, तर पाहूं द्या तर खरा पराक्रम एकदाचा!

(इतक्यांत एक दूत येतो.)

खल०—कायरे, काय खबर ?

दूत—सरकार ! **सुदर्शनराव** मेले ! ते **चंडवर्मजीं**चा दुसरा डोळा फोडूं पहात असतां आपल्याच एका चाकराच्या हातून मेले !

खल०—काय ? दुसरा डोळा ! एकून एक डोळा अगोदरच फोडिला होता ? बोलबोल! हा कसा काय प्रकार झाला बोल पाहूं ?

दूत—महाराज! **चंडवर्मजीं**नीं **अतिपीडराजां**ना मदत केल्याबद्दल त्यांचे डोळे फोडायची शिक्षा द्यायचें ठरलें, त्याप्रमाणें **सुदर्शनरावां**नीं एक डोळा तर फोडिलाच, व दुसरा फोडूं लागलें, इतक्यांत एका चाकराला तें पहावेना, म्हणून त्यानें **सुदर्शनरावां**वर तरवार उपसली, तें पाहून तें रागावले, आणखी त्याच्याच अंगावर धांवून जाऊन त्यांनीं त्याला ठार मारिलें, पण त्या झटपटींत त्या चाकरानेंही एक वार केला, त्या योगानें **सुदर्शनरावां**चा अंत झाला !

खल०—अहाहा ! परमेश्वरा ! एकून तूं धन्य आहेस ! या वेळीं तूं आपला न्यायीपणा जागविलास खचित—! अरेरे ! पण बिचारा **चंडवर्मा** !—कायरे, त्याचा दुसराही डोळा त्या दुष्टानें फोडिला ?

दूत—होय सरकार ! (शशिकलेकडे पाहून) बाई-

साहेब ! हें आपल्याकरितां ताईसाहेबांनीं पत्र दिलें आहे, व त्याचा आत्तांच्या आत्तां जबाब मागितला आहे !

शशि०—(आपणाशीं) एका अर्थानें हें बरेंच झालें. परंतु **चंद्राननेचा** पति मेला अशा वेळीं माझा प्राणवल्लभ **मरुत्सेन** तिच्याजवळ आहे हें कांहीं नीट नाहीं! मला या माझ्या बावळ्याचा तर मनापासून तिटकारा आला आहे, यासाठीं यास वाटेनिराळें करून माझ्या प्राणवल्लभ **मरुत्सेनरावां**समागमें खुशाल राज्यसुख भोगण्याचा माझा विचार होता, तो कदाचित् आतां फसण्याचा संभव आहे. (उघडपणें) ठीक आहे. आण पत्र इकडे. वाचून तुला जबाब आणून देतें. (पत्र घेऊन निघून जाते.)

खल०—कायरे, त्याचे डोळे फोडिले त्यावेळीं त्याचा पुत्र कोठें होता ?

दूत—बाईसाहेबांना पोंचवायला इकडे आला होता.

खल०—तर मग तो येथें कोठें दिसला नाहीं तो?

दूत—सरकार ! तो येथपर्यंत येऊन परतसुद्धां गेला ! तो परत जात असता वाटेंत मला आढळला.

खल०—पण त्याला **सुदर्शनरावा**चें हें दुर्वर्तन माहित आहे काय ?

दूत—होय सरकार ! त्यानेंच तर मूळ **चंडवर्मजी**च्या विरुद्ध बातमी सांगितली, आणि त्यांना शासन करावयाचें तें यथास्थित करितां येण्यास कांहीं अडचण पडूं नये याकरितां तर मुद्दाम तो इकडे निघून आला होता.

खल०—कांहीं चिंता नाहीं. **चंडवर्मजी**! तुम्हीं धन्य आहां, व तुम्हींच आपली स्वामिभक्ति जागविली ! आतां त्या दुष्टानें तुमचे डोळे फोडिले, त्याबद्दलचा मात्र सूड घेणें राहिला आहे, तें काम आतां मी पुरें करणार ! असो. गड्या, चल आंत आणि मला सगळें इत्थंभूत वर्तमान कळीव.

(दोघे जातात.)

प्र० ४ करश्री बंदरानजीक सौराष्ट्रराजाच्या सैन्याचा तळ.

(कांतिवर्मा आणि एक गृहस्थ येतात.)

कांति०—रामराम ! रामराम ! यावें, मी आपल्याच शोधांत होतों.

गृह०—रामराम ! मीहीं तुझ्याच येण्याची वाट पहात होतों.

कांति०—ठीक आहे. बरें पण मी **मृगांकमाला** बाईसाहेबांना देण्यासाठीं तुमच्याजवळ पत्र दिलें होतें, त्याचें काय झालें ?

गृह०—तें मी खुद्द त्यांच्याच हातांत नेऊन दिलें, आणखी त्यांनीं तें माझ्या समक्ष उघडून वाचलें.

कांति०—फार उत्तम. बरें पण कसें काय ? तें वाचून त्यांना कांहीं वाईट तरी वाटलें ?

गृह०—हें काय विचारावें ? त्या तें पत्र वाचीत असतां त्यांचे नेत्र एकदम पाण्यानें भरून आले, आणि पुढें वाचवेना अशी त्यांची स्थिति झाली. पोटांतून वारंवार दुःखाचे कढ येऊं लागून हातचें पत्र गळून खालीं पडण्याचीही वेळ आली. तथापि त्या मोठ्या धीर स्वभावाच्या, त्यांनीं आपणाकडून आपणास होत असलेलें दुःख माझ्या समजुतीस न यावें म्हणून पुष्कळ प्रयत्न केला, परंतु अखेर मायापाशानें त्यांस गांठलेंच. तरी पण त्यांनी तोंडानें हाय हुश्श एवढा देखील शब्द बाहेर काढला नाहीं !

कांति०—वाहवा ! वाहवा! एकून तें पत्र वाचून

त्यांच्या चित्तास द्रव आला! बरें पण पत्र वाचणें झाल्यावर त्या कांहीं रागाचे वगैरे शब्द बोलल्या ?

गृह०—राम! ज्याचें नांव तें! त्यांची त्यावेळची स्थिति पाहून त्यांचें धारिष्ट आणि दुःख या दोहोंतून अधिक कोणतें होतें, याचा आपल्याला कांहीं पुरता उमग पडला नाहीं. ऊन्ह पडलें असतां त्यांतच पाऊस पडतांना आपण कधीं कधीं पहातों, पण त्या ठिकाणीं मी जो प्रकार पाहिला तो त्याहूनही मनोरम ! त्यांच्या त्या रक्तवर्ण अधरप्रवालांची कांति अणुमात्रही कमी झाली नसून, त्यांचें स्वाभाविक स्मित अक्षय्य चालत आहेसें वाटे, तथापि त्यांच्या नेत्रांकडे अवलोकन केलें असतां तद्विपरीत भावनाच मनांत येई ! अहाहा ! त्यांच्या त्या सौम्य सुहास्यशोभित कपोलांवर ते नयनांतून गळून पडत असलेले मौक्तिकबिंदु किती मनोहर दिसत होते म्हणून सांगूं? त्यांचें माझ्यानें देखील वर्णन होणें कठीण ! असो. तुम्हांला थोडक्यांत सांगतों असें मनोरम दुःख आपण पाहिलें असें याच मावलीनें !

कांति०—तें असो. पण त्यांनीं तुम्हांला कांहीं इकडचे तिकडचे प्रश्न विचारिले ?

गृह०—छे हों. एक दोन वेळां मात्र त्यांच्या मुखांतून "बाबा बाबा !" असा उद्गार निघाला. पण तो तरी कसा? जसा कांहीं तो वाहेर पडला हें त्यांच्या जिवावरच आलें होतें ! त्या वेळीं मात्र त्यांच्या तोंडांतून एवढे कायसेसे शब्द आपल्याला ऐकूं आले:— "अक्का ! ताई ! धिक्कार असो तुम्हांला !— धन्य—**कांतिवर्मजी** धन्य!—बाबा! हायहाय! काय ? अशा वादळांत ? आणि तेंही अंधाऱ्या रात्रीं ? हायहाय! " इतकें कायसेंसें त्या बोलल्या, आणि नेत्रांतून अश्रु गाळीत त्या तशाच तेथून उठल्या, आणि आपल्या गोटांत एकटयाच जाऊन वसल्या !

कांति०—कांहीं चिंता नाहीं ! देव आपला पाठीराखा आहे, आणि त्याला आपली दया आली यांत संशय नाहीं ! पण केवढा हा चमत्कार ! या साऱ्या आमच्या महाराजांच्याच ना मुली, पण पहा त्या दोघी कृत्या कोणीकडे, आणि ही सुशील राजकन्या कोणीकडे ! बरें तें असो. त्यांची आणि तुमची त्यापुढें आणखी कधीं गांठ पडली होती ?

गृह०—नाहीं.

कांति०—असो. **मृगांकमाले**च्या चित्ताला पूर्ण गहिंवर आला आहे यांत संशय नाहीं. आमचे **अतिपीडराजे** यांना आह्मीं या ठिकाणीं तर घेऊन आलों आहों, परंतु त्यांची आणि **मृगांकमाले**ची गांठ कशी पडेल यांच्या विचारांत मी आहें. आमच्या राजेसाहेबांस तर बहुतेक वेडच लागलें आहे, तथापि एक दोन वेळां ते चांगले शुद्धीवर आले होते, त्यावेळीं त्यांनीं माझ्या मनांतला सगळा बेत जाणला. मी त्यांना पुष्कळ समजावून सांगितलें, परंतु ते 'तिला मी आपल्या डोळ्यांसमोर येऊं देणार नाहीं, म्हणून एकसारखा हट्टच घेऊन बसले !

गृह०—तें कां बरें ?

कांति०—अहो याचें कारण उघडच आहे. वस्तुतः पहातां **मृगांकमाले**चा तिळमात्र अपराध नसतां राजेसाहेबांनीं केवळ अविचारानें तिचा त्याग केला, आणि जो राज्यभाग न्यायरीतीनें तिच्याच वांटणीस यावयाचा, तो तिच्या त्या दुष्ट व कृतघ्न बहिणींस देऊन टाकिला. या गोष्टीचें राजेसाहेबांस वारंवार

स्मरण होतें, व त्यामुळें आतां **मृगांकमाले**-कडे कोणच्या तोंडानें पाहूं अशी त्यांची त्यांनाच अतिशय लाज वाटते. ती कांहीं केल्या जात नाहीं.

गृह०—हरहर ! कोण भयंकर हा प्रसंग !

कांति०—बरें, तुम्हांला **खलदर्शनराव** आणि **सुदर्शनराव** यांच्या सैन्यांकडची कांहीं हकीकत कळली आहे ?

गृह०—कांहीं लगण्यासारखी नाहीं. परंतु दोन्ही सैन्यें कुच करूं लागून उभयतां लौकरच एकत्र मिळतील अशी उडत उडत वार्ता आली आहे.

कांति०—ठीक आहे. बरें चला आतां दोघेही राजेसाहेबांकडे जाऊं. तुमचे मजवर मोठे उपकार झाले आहेत, तथापि आणखी एका गोष्टींत तुम्हीं मजवर अनुग्रह केलाच पाहिजे. मी बाहेरून दिसतों त्याहून निराळा आहें हें तुम्हांला सांगितलेंच आहे. तथापि मला एकदम आपल्या खऱ्या स्वरूपानें त्यांच्यापुढें प्रगट होण्यास अडचण आहे-याकरितां मला कांहीं दिवस येथून बाहेर रहावें लागेल, तोंपर्यंत तुम्हीं राजेसाहेबांजवळ राहून त्यांच्या सेवेंत लेशमात्र अंतर पडूं देऊं नयेएवढेंच तुम्हांपाशीं माझें मागणें आहे. माझें काम आटपलें आणखी मी आपल्या खऱ्या स्वरूपानें बाहेर पडलों, म्हणजे हे तुमचे उपकार मी कदापि विसरणार नाहीं. चला.

(दोघे जातात.)

प्र० ५—स्थळ तेंच.

(एका भव्य तंबूंत राजवाहनराज, मृगांकमाला, आणि राजवैद्य सरदार वगैरे यथोचित स्थानीं बसले आहेत आसपास शिपाई पहारा करीत आहेत.)

मृगां०—(डोळ्यांतून अश्रु गाळीत) होय रे बाबा तेच तेच माझे बाबा ! कसें कसें झटलेंस? ते रागानें अगदीं खवळून गेले आहेत, हवेतसे मोठ मोठ्यानें ओरडत सुटतात, रस्त्यांतून सैरावैरा धांवत जाऊन जंगलांत कोठें तरी लपतात, आणि रानांतल्या वेलींचें ओझें अंगभर घेऊन "पोरींनो! पोरींनो!" असे मोठमोठ्यानें तोंडांतून उद्गार काढितात ? हाय हाय ! आई **अंबाबाई** ! दया कर, आणि माझ्या बाबांच्या जिवाला समाधान वाटूं दे, आणि त्यांची आणि माझी गांठ पडूं दे. म्हणजे मी तुझ्या चरणांवर लक्ष पुतळ्यांची रास आणून घालीन, सतत वर्षभर ब्राह्मण. भोजनें घालून अन्नसंतर्पण करीन, स्वतः उपवास करीत राहून आपल्या देहाचीं काडें करीन, परंतु त्यांना मात्र गुण येऊं दे. (नवऱ्याकडे वळून) ऐकिलेंना हें ? हेच माझे बाबा खचित. मी त्यांना पक्कें पक्कें ओळखिलें. त्यांना बाहेर राहूं देऊन कांहीं निभाव लागावयाचा नाहीं, याकरितां आत्तांच्या आत्तां दहा वीस लोक जंगलाकडे पाठवावेत आणि बाबांचा शोध लावून त्यांना येथें आणवावें असें मला वाटतें.

राज०—प्रिये, मी तुझ्या इच्छेविरुद्ध नाहीं. हे सर्व परिजन सभोवती हात जोडून उभे आहेत, यांतून पाहिजे त्यांस आज्ञा कर! तुझ्या आज्ञेचा भंग कोणीही करणार नाहीं! फार तर काय, पण प्रत्यक्ष मी, त्या मलाही तूं अमुक एक करावयास सांग, तें करावयास मी मागें पुढें पहाणार नाहीं! आपण या देशांत इतकें सैन्य गोळा करून आलों आहों, त्याचा उद्देश राज्यप्राप्ति व्हावी असा नसून बिचाऱ्या तुझ्या प्रिय पित्याच्या अनन्वित क्लेशांचा परिहार व्हावा व त्या दुष्टांस यथोचित

शासन व्हावें एवढाच आहे.(एका सरदाराकडे पाहून) तुम्हीं–तुम्हीं आपल्याबरोबर पांच पंचवीस लोक घेऊन जा, आणि माझ्या प्राणप्रियेनें आतां सांगितलें त्याप्रमाणें तिच्या पित्याचा शोध करून त्यास न दुखवितां सौम्य उपायांनींच येथें घेऊन या.

सर०–आज्ञा. (उभयतांस वंदन करून कांहीं लोकांनिशीं जातो.)

मृगां०–वैद्यराज ! दूतानें सांगितलेली हकीकत तुम्हीं ऐकिलीच आहे, तर मला सांगा! मला आपली धर्मकन्या समजून मजपासून कांहीं चोरून ठेवूं नका! तुम्हांला सुचेल त्या युक्तिप्रयुक्तीनें माझ्या बाबांना बरे करा. मी तुम्हांला जन्माचे अभर करून सोडीन.

वैद्य–बाईसाहेब ! आपण आमच्या स्वामिनी आहां, यास्तव जें आपणास दुःख तेंच आम्हांसही दुःख आहे. याकरितां आपण त्याजबद्दल बिलकुल चिंता करूं नये. आपला इष्ट हेतु साधण्यास मणि, मंत्र आणि औषधें या तिहींचेही उपाय मला अवगत आहेत. मीं आपल्या परमपूज्य वडिलांच्या रोगाची परीक्षा पूर्णपणें केली आहे. त्यांना आपल्या दोघी भगिनींनीं अनन्वित क्लेश दिल्यामुळें त्यांचें मस्तक फिरून जाऊन अतिशय पित्तप्रकोप झाला आहे, व तेव्हांपासून हा वेळपर्यंत त्यांच्या जिवास निद्रासुख म्हणजे काय याचा अनुभव घडला नाहीं. याकरितां प्रथम उपाय म्हटला म्हणजे त्यांस गाढ निद्रा आणण्याची योजना झाली पाहिजे. बाईसाहेब ! आपण डोळ्यांतून असे अश्रु ढाळूं नयेत. मी त्यांना खात्रीनें बरे करितों.

मृगां०–देव करो, आणि तुमच्या तोंडांत साखर पडो !–आई **अंबाबाई** ! या वैद्यराजांच्या हाताला यश देणारी तूंच आहेस!–वैद्यराज! झालें तर मी आतां निश्चित रहातें, पण माझ्या बाबांना लौकर बरे करण्यास आळस करूं नका बरें ?

वैद्य–(नम्रतेनें) बाईसाहेब ! आजपर्यंत मीं आपलेंच अन्न खात आलों आहे, आपण मजविषयीं अगदीं काळजी करूं नये.

(इतक्यांत एक दूत येतो.)

दूत–(सलाम करून) सरकार ! शत्रूंचीं दोन्हीं सैन्यें एकत्र गोळा होऊन **करश्री**कडे येण्यास निघालीं !

राज०–चिंता नाहीं, आपणाकडून तयारी आहे.

(सर्व जातात.)

(पडदा पडतो.)

प्र० ६.–उदासदुर्गांतील दिवाणखाना.

(चंद्रानना आणि अश्वसेन बोलत बोलत येतात.)

चंद्रा०–तें सारें खरें, पण तिकडच्या सर्व सैन्याची सिद्धता आहेना ?

अश्व०–होय बाईसाहेब !

चंद्रा०–बरें पण **खलदर्शन**रावांचें कसें काय?

अश्व०–त्यांना हा युद्धप्रसंग मुळींच आवडत नाहीं. तथापि मोठ्या जुलुमानें ते सैन्यावरोबर यावयास निघाले आहेत. पण बाईसाहेब! आपल्याला काय सांगूं ? स्त्रीजात होऊन आमच्या बाईसाहेबांची नवऱ्यावर कांहीं विलक्षण कडी आहे ! त्या त्यांचें एवढेंसुद्धां चालूं देत नाहींत !

चंद्रा०–अरे, तें तर मला पहिल्यापासूनच ठाऊक आहे. बरें पण **मरुत्सेन**रावांची आणि माझ्या शालकांची गाठ पडली होती ?

अश्व०–नाहीं बाईसाहेब !

चंद्रा०–चिंता नाहीं, पण माझ्या अक्कानें त्यांना पत्र लिहिलें आहे तें कशाबद्दल तुला कांहीं

ठाऊक आहे ?

अश्व०—नाहीं बाईसाहेब !

चंद्रा०—तुला ठाऊक नाहीं तरी मला ठाऊक आहे. पण त्यांची आणि तुझी आतां लौकर गांठ पडावयाची नाहीं, कारण यावेळीं ते कांहीं जरुरीच्या कामाकरितां गेले आहेत. त्यांच्या बापाचे डोळे फोडल्यावर आपण त्यास पुढें जगूं दिलें ही मोठीच चूक झाली असें आतां वाटूं लागलें आहे. कारण तो थेरडा ज्या ज्या ह्मणून ठिकाणीं जातो, त्या त्या ठिकाणीं त्याची ती स्थिति पाहून तेथील सर्व लोक आह्मांशीं एकदम बिथरून जातात. याकरितां त्या ह्माताऱ्याची एकदा वाट लावावी, आणि शत्रूच्या सैन्यांचाही अजमास काढावा ह्मणून **मरुत्सेनराव** येथून गेले आहेत.

अश्व०—तर मग मला आत्तांच्या आत्तां निघून जाऊन त्यांना गांठलें पाहिजे.

चंद्रा०—तूं असा वेडेपणा करूं नको. आमचें सर्व सैन्य उद्यां चालूं लागणार आहे. याकरितां तूं आमच्या येथेंच रहा आणि आमच्याबरोबरच चल. हल्लीं वाटा फार धोक्याच्या झाल्या आहेत ह्मणून ह्मणतें.

अश्व०—बाईसाहेब! आपण ह्मणतां तें खरें, परंतु मला तसें करितां येत नाहीं. कारण आमच्या बाईसाहेबांनीं याबद्दल मला अगदीं दोन वेळ तीन वेळ बजावून सांगितलें आहे !

चंद्रा०—(हंसून) अग बाई, इतकेंका जरुरीचें तें काम आहे ? हंहं—तरीच तें पत्र तिनें लिहून दिलें आहे. **अश्वसेना**! खरेंच सांग, त्या पत्रांत काय मजकूर आहे ? कदाचित् मला वाटतें तसा—पण बाई तसें तरी कशावरून ह्मणावें ?—**अश्वसेना** ! तुला मी मोठ्या योग्यतेस चढवीन, मला तेवढें पत्र एकदा वाचून पाहूं दे.

अश्व०—बाईसाहेब ! माफी असावी. तेंवढें—

चंद्रा०—(हंसत हंसत) पुरे पुरे ! मला तूं कांहीं आजकालचा ठाऊक नाहींस, आगखी अक्काही कांहीं मला अगदी नवी नाहीं. तिची मला एकून एक माहिती आहे, आणखी तिचें आपल्या नवऱ्यावर कितपतसें प्रेम आहे तेंही मला ठाऊक आहे. एवढें कशाला ? ती इथें माझ्या घरीं होती, तेव्हांच तिनें **मरुत्सेनरावांस** चोरून डोळे मारलेले मला प्रत्यक्ष ठाऊक आहेत. ते तूंच कांहीं नको मला सांगायलां ? मेल्या ! मला पक्कें ठाऊक आहे तूं पहिल्या प्रतीचा चोंवडा आहेस. तुला तुझ्या धनिनीच्या अगदीं आंतल्यासुद्धां एकून एक बातम्या ठाऊक आहेत !

अश्व०—काय बाईसाहेब ! मला ठाऊक आहेत ह्मणतां ? मला ?

चंद्रा०—होय मेल्या ! तुला तुलाच ! ह्यां असल्या गोष्टीं तूं माझ्यापासून का चोरून ठेवणार आहेस ? पण मी बऱ्या तुला चोरूं देईन ? हें बघ, मी सांगतें ऐकून घेच. तूं मला मुकाटयानें अक्काचें तेवढें पत्र दे. अक्काचें आणि **मरुत्सेना**चें सूत जमायचें हें मला अगोदरपासून ठाऊक आहे ! तथापि मी त्याची आजपर्यंत फारशी पंचाईत बाळगली नव्हती, पण आतां ती सगळी स्थिति फिरली. आजपर्यंत मी कांहीं एकटी नव्हतें. पण दुर्दैवानें त्यांचें तें तसें झालें, आतां मला तरी कोणी पाहिजेच कीं नाहीं? सगळा जन्म तर असाच नाहींना घालवायचा? **मरुत्सेनराव** इथें परत आल्यावर त्यांचा अंत मीं काढिला, आणखी त्यांना वशही

राजीजवळ आलें, व तथून उजवेकडे वाट फुटली त्या वाटेनें जाऊं लागलें, तों समोर कांहीं अंतरावर पुष्कळ झाडांची गर्दी असून त्या ठिकाणीं कांहीं घरें होतीं तीं त्यांच्या दृष्टीस पडलीं. सरते शेवटीं त्या घरांचे नजीक आल्यावर त्यांपैकीं एका घरांत **वसुभद्राचार्या**ची ओळख होती यास्तव त्यानें त्या घरापाशीं सर्वांना आणून आंतील यजमानास हाक मारून उठविलें. तथापि यजमान जागा होऊन बराच वेळ गेला, तेव्हां त्यानें आंतून कोण काय वगैरे चौकशी केल्यानंतर दार उघडलें, व हे सर्व प्रवासी खालीं उतरल्यानंतर यजमानानें आपल्या एका चाकराकरवीं तीं दोन जनावरें परसांत नेऊन बांधिवलीं, व नंतर कांहीं वेळानें तशा अपरात्रींच या प्रवाशांची थोडयाशा फराळाची सोय जमून त्यांस पाणी पिण्यापुरता आधार झाला. नंतर यजमानानें **त्रिवेणी**स निजण्याकरितां जागेची व आंथरुणाची तजवीज लावून दिल्यानंतर ती जाऊन निजली, व **वसुभद्राचार्या**नेंही आपल्या घरांत जती येऊन राहिला आहे ही गोष्ट कोणापाशींही बोलू नको म्हणून त्यास बजावून सांगून त्याच्या हातांत बरींच मौल्यवान अशीं त्या वेळचीं नाणीं टाकलीं, तीं घेऊन यजमान हर्षानें उडया मारीतच दारांबिरें बद करून निजावयास गेला, व आमच्या प्रवाशांनींही इतके श्रम झाल्यानंतर सहजच घडून येणारें जें निद्रासुख तें अनुभविण्यास आरंभ केला. सकाळीं सर्व माणसें निजून उठल्यावर **वसुभद्राचार्या**नें यजमानास व त्याच्या चाकरांस बोलावून आणून त्यांस आणखी कांहीं द्रव्य देऊन संतुष्ट केलें, व एका चाकरास कातवालाचा व त्याच्या बरोबरच्या शिपायाचा पोशाख वगैरे सर्व खाणाखुणा सांगून त्यांची काय स्थिति झाली, याची चौकशी करावयास पाठवून दिलें. दोन प्रहरचे सुमारास तो चाकर परत आला, व त्याच्या सांगण्यांत कोतवालाचा कांहीं कोठें पत्ता लागला नाहीं परंतु दलदलींत झुडुपें वगैरे तोडण्याकरितां गलेले कित्येक लोक भेटले होते त्यांच्या बोलण्यांत अशा अशा प्रकारचा एक सरकारी कामदार उजाडण्याचे सुमारास दलदलींतून बाहेर पडलेला दिसला होता खरा, व तो बाहेर पडल्यावर **पुनमल्ली** शहराकडे वळला म्हणून खबर समजली. असो. नंतर सगळ्यांचीं जेवणें बिवणें होऊन आमचें प्रवासिमंडळ आतां पुढें काय करावें म्हणून बराच वेळ विचार करीत बसलें, व सरते शेवटीं परत **पुनमल्ली**सच जावें, व त्या ठिकाणीं **वसुभद्राचार्या**नें त्या सर्वांची गुप्तपणें रहावयाची सोय करावी म्हणून ठरलें त्याप्रमाणें रात्रीं जेवणें आटपल्यानंतर जास्ती जनावर मिळेना सबब **त्रिवेणी** व **शिलादित्य** एका घोडयावर, व **वसुभद्राचार्य** आणि जती **जयंती** घोडीवर, असे बसून सर्वजण **पुनमल्ली**कडे चालते झाले, व ते प्रहर अधिक रात्रीचे सुमारास कोणा **सत्यग्रीव** नांवाच्या मनुष्याच्या घरीं जाऊन पोंचले. त्या ठिकाणीं **सत्यग्रीवा**च्या दृष्टीस तो जती पडल्यामुळें तो कांहीं वेळपर्यंत बुचकळ्यांतच पडला, परंतु अखेर तो **वसुभद्राचार्या**सचांगला ओळखीत असे, व त्याचें दरबारांतही बरेंच वजन आहे हें त्यास ठाऊक होतें, यामुळें त्यानें फारशी कुरकुर न करितां सर्वांस घरांत घेतलें, व त्यांची योग्य रीतीनें बरदास्त ठेविली.

प्रकरण ६.

त्या रात्रीं आमच्या पाहुण्यांपैकीं कोणासच जेवणाखाण्याची जरूर नव्हती, यामुळें **सत्य-**

ग्रीवाच्या घरांत शिरल्यावर तीं सर्वजण कांहीं वेळ गोष्टी बोलत बसलीं. बोलतां बोलतां **वसुभद्राचार्यानें सत्यग्रीव** चांगला विश्वासू माणूस आहे म्हणून बाकीच्या सर्वांची खातरी केली; व काल रात्रीपासून आपण घरीं गेलों नाहीं, यामुळें आपणाकरितां आपलीं घरचीं माणसें काळजींत पडलीं असतील याकरितां एक वेळ घराकडून जाऊन येतों म्हणून गोष्ट काढिली. ती ऐकून **सत्यग्रीवा**च्या विश्वासुपणाबद्दल **त्रिवेणी** आणि जती यांची खातरी **वसुभद्राचार्यानें** केली असल्यामुळें त्यांनें त्याच्या म्हणण्यास एकदम रुकार दिला, तेव्हां लागलीच **वसुभद्राचार्यानें सत्यग्रीवास** बोलावून आणून त्याजकडून **त्रिवेणी**करितां एक आणि जती व **शिलादित्य** यांच्याकरितां एक अशा दोन खोल्यांत आंथरुणांची तजवीज करविली, आणि त्यांस निजावयास जा म्हणून सांगून आपण घरीं जाण्याकरितां उठला. इतका वेळ पर्यंत **शिलादित्य** हा आपल्याच मनांत कांहीं एका गोष्टीबद्दल विचार करीत होता, त्यानें **वसुभद्राचार्यास** मलाही आपणाबरोबर थोडेसे बाहेर यायचें आहे" म्हणून सांगितलें. त्याचें तें भाषण ऐकून त्या ब्राह्मण व्यापाऱ्यास मोठें आश्चर्य वाटलें, आणि त्यानें इतक्या अपरात्री बाहेर काय काम आहे म्हणून विचारिलें. त्यावर **शिलादित्या**नें एकच जबाब दिला कीं "माझें काम फारगुप्त आहे, तें एव्हांशींच माझ्यानें कांहीं सांगवत नाहीं. तरी पण मला बाहेर फार तर दोन घटिका लागतील, तेवढ्या वेळांत काम आटपलें म्हणजे मी लगेच परत येईन!" त्याचें तें भाषण ऐकून बाकीचीं सर्व माणसें आतां कसें करावें म्हणून मोठ्या विचारांत पडलीं, इतक्यांत **सत्यग्रीवा**नें त्यांस म्हटलें:— "कांहीं चिंता नाहीं, तुम्हीं बाहेर जाऊन या. मी तुमच्याकरितां जागत बसतों." इतकें झाल्यावर घरांत चोंहीकडे निजानिज झाली, व **वसुभद्राचार्य** आणि **शिलादित्य** दोघेही घराबाहेर पडले. बाहेर पडल्यावर **शिलादित्या**नें आपल्या सोबत्यास **मनचरु** गांवच्या स्मशानाकडे जाण्याची जवळची वाट कोणची म्हणून विचारिलें, तेव्हां **वसुभद्राचार्यां**स त्याच्या त्या विचारण्याचें कांहीसें आश्चर्य वाटलें; तथापि त्यानें तें बोलून न दाखवितां आपण त्या अंगालाच जातों आहों, याकरितां त्याची वाट फुटली म्हणजे मी तुम्हांला सांगेन म्हणून सांगितलें. इतकें झाल्यावर ते दोघेही एकमेकांशीं चकारशब्द न काढितां मुकाट्यानें पुढें चालूं लागले.

याप्रमाणें अर्धी घटिका वाट चालल्यावर आमचे प्रवासी एका मोठ्या झाडाजवळ आले. त्या ठिकाणीं तीन रस्ते फुटले असून त्यापैकीं एक रस्ता **मनचरु** गांवाकडे जात होता. त्या वेळीं चांदणें स्वच्छ पडलें असून वाराही बराच गार वहात होता, व त्यायोगानें तशा आल्हादकारक वेळीं दुसरा कोणी मनुष्य रस्त्यांतून फिरत असता तर त्याच्या मनाला त्या वेळच्या त्या अत्यंत रमणीय भूप्रदेशाच्या दर्शनानें निरतिशय प्रसन्नता आली असती यांत संशय नाहीं. परंतु आमचे दोघे मित्र **वसुभद्राचार्य** आणि **शिलादित्य** या उभयतांचीही मनें अनेक प्रकारच्या विचारांनीं व्यापृत झालीं असल्यामुळें त्यांचें लक्ष सृष्टिसौंदर्याकडे मुळींच नव्हतें. ते ज्या उभे होते तेथून पूर्वेकडे लांबवर असत **पुनमली** शहराचा तुरुंग दृष्टी तुरुंगाच्या सभोंवती कांहीं अंतरा झाडें लाविलीं असल्यामुळें तुरुंगाच्या

वहुतेक सावलींतच बुडाल्यासारख्या वाटत, तरी त्यांकडे नीट निरखून पाहिलें असतां मधून मधून तुरुंगावरील रक्षक पहारेकरी हातांत कंदील घेऊन त्या भिंतींतल्या जंग्यांवरून कैद्यांची देखरेख करीत हिंडत, यामुळें ते दिवे तसल्या अंधारांत क्रुद्ध झालेल्या महिषाच्या कृष्णचर्म-वेष्टित नेत्रांप्रमाणें चमकल्यासारखे भासत. इकडे त्या तुरुंगाच्या समोरासमोर दुसऱ्या अंगास पाहिलें असतां **मनचरु** गांवचें स्मशान दृष्टीस पडे. या स्मशानभूमीच्या सभोंवती सरासरी पुरुषभर उंचीचा असा तट बांधला असून आंत शिरण्यास दोन अंगांनीं दोन दारें ठेवण्यांत आलीं होतीं, व तीं दारेंही रात्रंदिवस उघडींच असत. **पुनमल्ली** शहरांतही एक स्मशान होतें, परंतु त्यांत **हिंदु** लोकांशिवाय अन्य कोणाच्याही प्रेतांचा संचार होऊ नये म्हणून राजशासननानें प्रतिबंध केला होता, व तेव्हांपासून **पुनमल्ली** येथील **जैन** लोकांच्या प्रेतांची अंत्य व्यवस्था करण्यास दुसरी सोईची जागा जवळ आसपास नसल्यामुळें, त्या लोकांस कसाही अडचणीचा प्रसंग असला तरी प्रेतें **मनचरु** गांवच्या स्मशानांतच घेऊन जावें लागे. तसेंच **पुनमल्ली** येथील तुरुंगांत जे राजापराधी मरत, किंवा जे तुरुंगांत जाण्याच्या पूर्वीच राजशासननानें बाहेरच मृत्यु पावत, त्या सर्वांची अंत्यव्यवस्थाही याच स्मशानांत होत असे. असो. आमचे प्रवासी वर सांगितलेल्या झाडाजवळ आले, तेव्हां **वसुभद्राचार्यानं शिलादित्यास** स्मशानाची वाट दाविली, व तो पुढें कांहीं बोलणार, इतक्यांत त्या दोघांचीही दृष्टि त्या स्मशानाकडे जाऊन कोणी तरी दोन मनुष्यें कोणाच्या दृष्टीस न पडावें म्हणून मागें पुढें पहात स्मशानाकडे जातांना त्यांच्या दृष्टीस पडलीं. त्या दोघांनींही त्या वेळीं काळे पोशाख केले असून ते आपणाकडून होईल तितकें करून झाडांच्या सावलीखालूनच जाण्याचा प्रयत्न करीत होते. हें पाहून **शिलादित्यास** किंचित् विस्मय वाटला, आणि त्यानें **वसुभद्राचार्यास** ते दोघे कोण असावे म्हणून प्रश्न केला.

वसुभद्राचार्य उत्तर करितोः—"त्या दोघांतून पुढें चालला आहे तो या **पुनमल्ली** प्रांतांत नांवाजलेला **दीक्षितदत्त** ! तो मूळचा **सिंहल** द्वीपचा रहाणार असून तो चीन, **ब्रह्म, सुह्म, कांबोज** वगरे पुष्कळ देशांत हिंडलेला आहे म्हणतात ! त्याच्या सारखा ज्योतिषी या आपल्या सगळ्या प्रांतांतही कोणी नाहीं, आणखी कित्येक तर तो महान पंचाक्षरीही आहे म्हणतात. मग खरें खोटें काय असेल कोणास ठाऊक !"

"हं हं ! " त्याचें भाषण ऐकून **शिलादित्य** आश्चर्यानें विचारितोः—" काय काय ! **दीक्षितदत्त दीक्षितदत्त** म्हणतात तोच हा ?"

तो तरुण व्यापारी उत्तर करितोः—"होय. आणखी त्याच्या मागून चालला आहे तो, तो त्याचा पट्टशिष्या **वरदकाल** ! "

"फार उत्तम.—अहो, ते पहा स्मशानांतच शिरले! कांहीं चिंता नाहीं. मी चाललों त्यांचे मागून. "**शिलादित्य** बोलतो.

वसुभद्राचार्य म्हणतोः—"गड्या ! माझें ऐकशील तर तूं या साहसांत पडूं नको. या **दीक्षितदत्ता**बद्दल लोकांत तर फारच भयंकर गोष्टी सांगतात. न जाणों त्यांपैकीं एकादी गोष्ट प्रत्यक्ष पहाण्याची वेळ आली तर प्राणांवरही बेतायची ! "

वसुभद्राचार्य याप्रमाणें त्यास न जाण्याविषयीं सांगत होता परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं, व त्याचें हें भाषण पुरें व्हावयाच्या

पूर्वीच **शिलादित्य** कोणीकडच्या कोणीकडे दिसेनासा झाला होता. त्यामुळें काळजींत पडून **वसुभद्राचार्यानें** कांहीं वेळ चोंहीकडे दृष्टि देऊन पाहिलें. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. सरते शेवटीं **वसुभद्राचार्य** मनांतल्या मनांत चुरमुरे खात आपल्या वाटेनें **पुनर्मल्लीकडे** निघून गेला.

इकडे **शिलादित्य** जो दिसेनासा झाला तो लपत छपत त्या श्मशानाचें धोरण राखून तेथपर्यंत गेला, व तेथून पुढें पहातो तों आंतल्या अंगाला पडक्या देवळांची एक रांगच रांग होती तिच्या सावलींतून **दीक्षितदत्त** आणि **वरदकाल** हे दोघेही मुकाट्यानें पुढें चालले आहेत. हें पाहून **शिलादित्यही** आपलें पाऊल न वाजवूं देतां श्मशानांत प्रवेश करून त्या देवळांच्या आश्रया आश्रयानेंच चालूं लागला. मधें एकादे वेळीं आपलें करणें कोणी पहात नाहींना याविषयीं खातरी करून घेण्याकरितां ते दोघेही मागें उलटून पहात, अशा वेळीं **शिलादित्यही** सावधगिरीनें देवळाच्या खांबाआड लपून ते पुढें चालूं लागले म्हणजे आपण त्यांचे मागून चालूं लागे. असें एक दोन वेळ झाल्यावर **दीक्षितदत्त** आणि त्याचा शिष्य हे दोघे तडक एका कांटेऱ्या झाडाजवळ गेले, व त्या ठिकाणीं **दीक्षितदत्त** बोटानें कायसेंसें करीत राहिला, व **वरदकाल** बरेंच पुढें एका पडक्या देवळांत जाऊन तेथून एक कुदळ, एक खोरें व एक कसलीशी पाटी इतकें सामान घेऊन आला. पूर्वी या श्मशानांत **जैनांचा** व इतर लोकांचा पाहिजे त्या वेळीं संचार होत असे; परंतु आलीकडे जतींचे दंगे फार सुरू होऊन मध्यरात्रींपासून तों सकाळीं सूर्योदय होईपर्यंत कोणीही जाऊं नये म्हणून राजाज्ञा झाली होती, यामुळें **दीक्षितदत्त** व त्याचा शिष्य यांना आपली कृति कोणाच्या दृष्टीस पडेल असा संशयही वाटला नाहीं; व ते दोघेही आपलें काम करूं लागले. **दीक्षितदत्तानें** वस्त्राआडून कंदील बाहेर काढून तो चकमकीनें पेटविला, आणि त्याच्या उजेडांत त्यानें एक नेमकी जागा दाखविली तेव्हां **वरदकालानें** त्या ठिकाणीं खणण्यास आरंभ केला.

इकडे **शिलादित्य** त्वरा करून तेथून कांहींसें आलीकडे दुसरें एक झाड होतें त्याचे आड जाऊन तेथून त्या दोघांचें एकून एक वर्तन पहात राहिला. **वरदकालाचें** वय दिसण्यांत सुमारें पन्नास वर्षांचें होतें, त्या मानानें त्यानें खालची जमीन खूपच जलदीनें खंटली, आणि खोऱ्यानें खाड्यांतील माती बाहेर ओढूं लागला. सरते शेवटीं माती काढून झाल्यावर तो ओणवा होऊन आंतून कायसेंसें बाहेर काढूं लागला. परंतु तो अगोदरच दमला होता यामुळें त्याच्यानें एकट्यानें तें बाहेर निघेना, तेव्हां **दीक्षितदत्तानें** आपला हातचा कंदील खालीं टेवून त्यास हात लाविला, व दोघांनीं मिळून त्या खाड्यांतून स्त्रीच्या आकृतीसारखी एक आकृति बाहेर काढली. या आकृतीच्या अंगावर जिवंतपणचे कपडे कायम होतेसें दिसत होतें, यावरून त्या ठिकाणीं तें प्रेत नुकतेंच पुरलेलें असावें असा **शिलादित्यानें** तर्क बांधिला, व त्या बरोबर त्याच्या मनांत एक भयंकर संशय उत्पन्न झाला. तेव्हां कांहीं झालें तरी होवो, या संशयाची फेड करावयाचीच असा निश्चय करून तो एकदम धांवत पुढें आला, व पहातो तों ती भयंकर व अत्यंत कृश झालेली आकृति दुसऱ्या कोणाची नसून ती

आमच्या वाचकांच्या ओळखीची दुर्दैवी भविष्यवादिनी **अंमाच** होती असें त्यास समजल !

प्रकरण. ७.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें हकीकत होऊन **शिलादित्यानें अंमेचें** प्रेत ओळखल्याबरोबर तो **दीक्षितदत्त** आणि **वरदकाल** या दोघांच्या अंगावर धांवून जाऊन मोठ्यानें ओरडला:—" अहारे दुष्टांनो ! अधमांनो ! तुम्हीं मेलेल्या मनुष्यास मृतपणींही लांडग्यांप्रमाणें त्रास देत आहां, याची तुम्हांस शरम नाहीं वाटत ?"॰

शिलादित्य याप्रमाणें बोलूं लागला असतां त्याचा तो मेघगर्जनेप्रमाणें खणखणीत आवाज ऐकून **दीक्षितदत्त** आणि **वरदकाल** दोघेही एकदम चपापले आणि आपल्या हातांतील प्रेत खालीं टाकून देऊन ते चार पावलें मागे सरले. **शिलादित्य** पुढें बोलतो:—" दुष्टांनो ! ज्ञानांत याहून दुसरे कमी निंद्य धंदे लक्षावधि करतां येण्यासारखे असून तुम्हीं प्रेतांस अशा प्रकारें त्रास देत आहां काय ? अधमांनो !—"

त्याचें भाषण ऐकून **दीक्षितदत्त** त्यास दरडावून विचारितो:—" आणखी दुष्टा! तूं रे कोण? आमच्या कर्माला विघ्न आणूं पहाणारा असा तूं कोण आहेस ? "

शिलादित्य त्यांच्या अंगावर चालून जाऊन त्यांस म्हणतो:—" मूर्खांनो ! मी कोणीही असेन, तुम्हांला तें विचारण्याची जरूर नाहीं ! तुम्हीं दोघेही कोण आहां हें मला ठाऊक आहे तेवढेंच मला बस्स आहे.—नीचा ! अधमा !—ज्योतिषीपणाचा आणि पंचाक्षरीपणाचा डौल धालणारा असा तूं तुझें नांव **दीक्षितदत्त**!आणखी तूं रे—तूं महा दुष्ट अधम असून या नीचाचा शिष्य म्हणवून घेणारा **वरदकाल** आहेस ! नीचांनो! मी तुम्हां दोघांस पक्के ओळखितों, एवढेंच नव्हे, तर तुम्हीं दुष्टांनीं जिचें प्रेत उकरून काढिलें आहे, ती ती हतभाग्य भविष्यवादिनी **अंमा** आहे हेंही मी जाणतों!—दुष्टांनो ! या क्षणीं तुम्हीं हें प्रेत जेथल्या तेथें परत पुरा, नाहीं तर तुम्हांला **पुनमल्ली** शहरच्या न्यायाधिकाऱ्यांकडे नेऊन दंड भोगावयास लावीन, कधीं सोडणार नाहीं ! नीचांनो ! तुम्हांला खात्रीनें सांगतों, जरकरितां तुमचें हें वर्तन येथल्या न्यायाधिकाऱ्यांस कळेल, तर ते तुम्हां दोघांलाही जिवंत जाळतील, कधीं कमी करणार नाहींत !"

त्याचें हें भाषण ऐकून **दीक्षितदत्त** उपरोधानें हंसून म्हणतो:—" वाहवा ! वाहवा ! एकून तुला इतकी तर अगदीं बरोबर माहिती आहे, हें जर खरें आहे, तर तुला आणखीही सांगतों ह्याचीही बरोबर माहिती करून घ ! मूर्खा ! वाचाळा ! तुला अद्यापि या **दीक्षितदत्ताचा** पराक्रम कसा तो माहित नाहीं, याकरितां तुला सांगतों, तुझ्या या गप्पा माझ्यापुढें बिलकुल चालावयाच्या नाहींत ! मूखा ! तूं इतकी बडबड केलीस, पण तुला पक्क ठाऊक असूं दे, तुझी या श्मशानाच्या बाहेर पडण्याचीही पुण्याई नाहीं ! फार कशाला, मी आज्ञा केल्याशिवाय तुझा एक अवयव देखील काडीइतका हलू शकावयाचा नाहीं ! "

दीक्षितदत्त हें बोलत असतां त्यानें आपल्या खिशांतून कसलीशी एक लहान कुपी बाहेर काढिली, आणि तींत कांहीं पातळ पदार्थ होता, त्यांतून थोडा त्यानें **शिलादित्या**च्या अंगावर शिंपडला. त्याबरोबर चमत्कार काय सांगावा ? **शिलादित्य** उभा होता त्याचे तेथल्या तेथें एकून एक अवयव ताठ होऊन गेले,

आहे. होय, असेंच ना ? "

"आपण बरोबर ताडिलें ! " **शिलादित्य** उत्तर करितो.

"अरे, कसें कळलें ह्मणून काय विचारितोस ? आमच्या गुरूपाशीं एक विद्या आहे तिच्या योगानें त्यांस पाहिजे तो गोष्ट समजत. "

दीक्षितदत्त बोलतोः—"फार कशाला, तुझ्या मनांत या वेळीं कसले विचार चालू आहेत, ते सुद्धां मला ठाऊक आहेत. त्याची तुला परीक्षाच पाहिजे असेल, तर तूं सांगावयाच्या पूर्वीच मी तुला ते सांगतों. तूं या वेळीं कांहीं एका कामाच्या भरां भरला आहेस, व त्या कामांत तुला यश येईल किंवा नाहीं हेंच तुला समजावयाला पाहिजे आहे. "

"असें खरें " **शिलादित्य** उत्तर करितो.

दीक्षतदत्त पुढें बोलतोः—"अरे, एवढेंच नव्हे, तर तूं हल्लीं ज्या एका कारस्थानांत शिरला आहेस, तें सर्व कारस्थान मला ठाऊक आहे, व त्यांत कोण कोण लोक आहेत, हें देखील मी तुला सांगूं शकेन. "

हे शब्द ऐकल्याबरोबर **शिलादित्याचा** स्वर एकदम बदलला आणि तो ह्मणालाः—"खचित ! खचित ! तुमचें ज्ञान अगाध आणि तुमचं सामर्थ्यही अजब आहे ! परंतु मला एका गोष्टीबद्दल खुलासा व्हायला पाहिजे आहे, तेवढा कृपा करून आपण कराल ? "

"हूं " **दीक्षितदत्त** पुटपुटतो.

दीक्षितदत्ताचं ह पुटपुटण ऐकून **शिलादित्य** त्यास ह्मणतोः—"महाराज ! मी एक गरीब शिपाई आह, माझ्यापाशीं येऊन जाऊन ह्मणण्यासारखी ही एक पुतळी आहे, ही माझ्या आईनें माझ्या गळ्यांत बांधला असून मी आजपर्यंत जतन करून ठेवली आहे, ही पाहिजे तर देतों, तेवढी घेऊन मी विचारतों तेवढ्या गोष्टीचा खुलासा कृपा करून करावा—"

दीक्षितदत्त धिक्कारपूर्वक हंसून बोलतोः—"हा मूर्खा ! तूं मला कोणा ढोंगी भोंदू पोटाकरितां जादूचे खेळ करणारा समजतोस काय ?

शिलादित्य नम्रपणें उत्तर करितोः—"महाराज ! माझ्या बोलण्याचा असा भावार्थ नव्हता, परंतु आपण माझ्या प्रश्नाचा खुलासा केला असतां आपले मजवर महत् उपकार होणार, त्याबद्दल आपली कृतज्ञता बुद्धि कोणत्या तरी रीतीनें प्रगट केल्यावांचून माझ्यानें रहावेना. "

"ठीक आहे. एवढंच जर तुझं ह्मणणें आहे, तर कदाचित् तुझं ह्मणणं मी कबूलही करीन. परंतु बाबारे, तुला अगोदरपासून मी बजावून सांगतों, तूं भविष्य जाणण्याच्या खटपटींत न पडशील तर फार चांगलें होईल. कारण एकवार तूं तींत पडल्यावर मग तुझी तुलाच परत मागें फिरण्याचीही पंचाईत पडेल, आणि उगाच पस्तावशील मात्र. "

"त्याबद्दल काळजी नको. कांहीं झालें तरी मी त्याला भिणार नाहीं. "

"पहा बरं, आपला नीट विचार कर आणि मग बोल. "

महाराज ! मी पूर्णपणें विचार करूनच बोलत आहें. "

"ठीक आहे. " **दीक्षितदत्त** बोलतोः—"ऐक तर सांगतों आतां. हें प्रेत या स्मशानांत प्रेतसंस्कार न होतांच पुरलें आहे, यामुळें त्याजवर माझा अंमल चालूं शकतो, व याकरितां कांहीं बार मंत्र जपून मी या भविष्यवादिनास कांहीं थोडावेळपर्यंत सजीव करून तिच्यापासून विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें काढून घेण्याचें माझे अंगीं समार्थ्य आहे. हें

तोंडांतून हा शब्द निघाला असता, तर तुझा द्वेषच करूं लागून मीं तुझी काय स्थिति केली असती तो माझ्यानें तुला सांगवत नाहीं. तें असो; परंतु प्राणप्रिये **मथुरे**! मी प्रत्यक्ष **गंगा**-**बाई**ची शपथ वाहून तुला सांगतों, कीं मला या जगांत ज्या त्या ठिकाणीं कायती एकटी तूं दिसत आहेस, व माझें सर्व अंतःकरण सर्वोपरी तुजवरच बसलें आहे, याकरितां तूं माझ्या बोलण्याचा राग मानूं नको. "

मीं उत्तर केलें:—"**जानराव**! तुमचें हें तें ह्मणणें कांहीं मला समजत नाहीं. तथापि, तुमच्या योग्यतेच्या व थोरवीच्या मनुष्यानें मजसारख्या गरीब दासीपणा करणाऱ्या स्त्रीशीं असें भाषण करावें हें तुह्मांला कांहीं योग्य नाहीं. " इतकें बोलून मी पुढें ह्मणालें:—"उगीच आरडा ओरडा करून दंगा माजवाल, किंवा लोकांनीं आपले तमाशे पहात बसावें, असें कांहीं माझ्या मनांत नाहीं. परंतु जर का तुह्मीं माझी वाट आडवून धराल, तर मी ह्मणून आरडाओरडा केल्याशिवाय कधींं रहायची नाहीं!" इतकें बोलून मी एकदम एका बाजूस वळलें, व त्या झाडांच्या गर्दीच्या बाहेरल्या अंगास येऊं लागलें.

इतकें झालें तरी **जानराव** शांत झाले नाहींत. मी दहा पांच पावलें दूर जातें तो ते पुनरपि माझ्या अगदीं जवळ आले, व त्यांनीं एका हातानें माझ्या कंबरेभोंवती विळखा घालून दुसऱ्यानें माझें तोंड गच्च दाबून धरिलें, व मला तशीच ओढीत ओढीत त्यांनीं परत त्या झाडाच्या खोडापर्यंत आणिलें आणि त्यावर धाडकन बसविलें. त्यांचा पहिला आवाज बदलून जाऊन एकदम घोगरा झाला, व ते निराशेच्या भरांत मला आवेशानें बोलले:—"**मथुरे**! तें कांहीं चालायचें नाहीं! देवाशपथ तुला सांगतों मी माझें ह्मणणें तुझ्याकडून ऐकवीनच!" हें बोलत असतां **जानरावां**चे हात माझ्या तोंडावरून व कंबरेहून निराळे झाले होते, व त्यांच्या मनाची जी कांहीं विलक्षण स्थिति झाली होती तिच्या आधीन होऊन ते एकसारखे थरथर कांपत होते.

ही **जानरावां**ची स्थिति झाली. इकडे मजवर असा अकल्पित प्रसंग येऊन गुदरला, त्यामुळें एक तर मनाला लाज वाटूं लागली; दुसरें, **जानरावां**च्या वर्तनाचा मला अतिशय संताप आला; आणखी शिवाय त्यांची ही अशा प्रकारची दांडगाई पाहून मी आश्चर्यानें थक्क होऊन गेलें होतें. या सर्व गोष्टींच्या योगानें माझ्या अंतःकरणाची त्या वेळीं काय स्थिति झाली होती ती एका परमेश्वराखेरीज दुसरा कोणी जाणत नाहीं. तथापि एवढें खरें कीं, त्या वेळीं मला जी भीति वाटली, तिच्या भरांत माझ्या तोंडास एकदम कोरड पडून माझ्यानें मोठ्यानें ओरडवेना देखील, अशी माझी स्थिति झाली. तिकडे **जानरावां**चेंही देहभान नाहींसें झाल्यासारखें होऊन संतापाच्या आवेशांत त्यांच्या तोंडून झराझर अक्षरें बाहेर पडूं लागलीं, व एकंदरींत त्यांची ती स्थिति अगदीं खरी असून तींत कृतीचें सोंग मुळींच नव्हतें. असो. **जानरावां**ची अशी स्थिति झाली असतां ते मला बोलले:—"होय होय! तुला माझें बोलणें ऐकलेंच पाहिजे! **मथुरे**! तुजवर माझें अत्यंत प्रेम जडलें आहे! मी श्रीमंत आहें, मला काणच्याही गोष्टीची वाण नाहीं; याकरितां जर तूं मला आपला पति होऊं देशील, तर तुला माझ्याकडून कांहीं कमी पडायचें नाहीं. तुला चाकर माणसें, मेणे, पालख्या, गाड्या,

घोडीं, काय पाहिजे तें मिळेल, रहायला उत्तम वाडा मिळेल, पण—"

जानराव या प्रकारें बोलताहेत तों मोठया प्रयत्नानें एकदम ओरडून मीं त्यांस झटलें:— "खबरदार ! मला तुम्हीं अशी धरून टेवाल तर ! मला एकदम मुकाटयानें निघून जाऊं द्या कशी !" माझ्या तोंडचे हे शब्द ऐकून मला फिरून पकडून धरण्याकरितां ते हात पुढें करूं लागले, इतक्यांत पुनरपि मी त्यांस ओरडूनच बोललें:—"मला तुम्हीं मुकाटयानें जाऊं देतां का नाहीं ?का—" इतके शब्द माझ्या तोंडांतून निघाले असतील नसतील, तोंच **जनकू** एका अंगाला कोणीकडे खेळत होता त्याचें बिलकुल स्मरण न होतां मी घराकडच्या वाटेनें धांवत सुटलें.

परंतु कसें झालें तरी मी अशक्त बायको, आणि ते तर अगदीं तरणे जवान, त्यांच्या पुढें मी आपल्या पायांनीं कितीशी जलदी पळूं शकणार? मी पळून जाऊं लागलेंसें पाहून **जानराव** माझ्या मागून दहापांच पळें न लागतांच आले, आणखी पूर्वीप्रमाणें त्यांनीं माझ्या कंबरेला हाताचा विळखा घातला. त्या वेळीं मात्र माझ्यानें उगेंच रहावलें नाहीं, व मी मोठ्यानें किंकाळीं ठोकली. तथापि तिचें यत्किंचित्ही भय न मानतां **जानराव** उलटे अधिकच वेडावल्यासारखे होऊन त्यांनीं मला जास्ती जास्ती वळकट धरण्याचा यत्न केला. मीही त्यांच्या हातून निसटून जाण्याविषयीं खटपट करूं लागलें, व किंकाळ्या ठोकूं लागलें, तथापि त्या झटापटीच्या प्रसंगीं माझ्यानें फार मोठ्यानें ओरडवेनाच. माझ्या घशाला पूर्वीपेक्षां अधिक कोरड पडली, ती इतकी कीं जणों कांहीं माझ्या घशांत कोणी राखच कोंबली आहे कीं काय असें मला वाटलें. सरतेशेवटीं अतिशय झटपटलें, तेव्हां एकदाचीं त्यांच्या हातून निसटून मी पळून जाऊं लागलें, तों तेही माझ्या मागोमाग धांवत आलेच, आणखी अशी मी त्या झाडांच्या गर्दीच्या वाहेर पडूं पहाणार तेंच मला गांठून ते मला फिरून धरूं लागले. त्याबरोबर भीतीनें मी अतिशय मोठ्यानें किंकाळी ठोकून धाडकन खालीं पडलें. त्या वेळीं माझ्या अंगांतली सर्व शक्ति कोणी कडे नाहींशी होऊन सर्व अंग कशीं अगदीं मेल्याप्रमाणें निःसत्व झालीं होती, व जरी माझ्यानें एक हात सुद्धां असा का असा करवत नव्हता, तरी मी बरीच सावध होतें, व माझी छाती मात्र दडदड उडत होती. मी या स्थितींत पडून एक दोन पळें होताहेत नाहींत, तोंच त्या ठिकाणीं कोणी एक तिसरें मनुष्य आल्याचा मला भास झाला; व त्याबरोबर रागाचे व निराशेचे असे कांहीं शब्द बाहेर पडून मागाहून बुक्या मारतांना व हाणामारी होतांना मला ऐकूं आलें, आणि इतक्यांत पहातें तों **जानराव** एका बाजूला पाय पसरून पडले असून त्या दुसऱ्या गृहस्थानें मात्र मला सांवरून धरल्याचा भास झाला, व त्याबरोबरच माझे नेत्र मिटले.

येथपर्यंत सांगितलेली हकीकत झाल्यावर त्या नवीन गृहस्थानें मला तसेंच उचललें, आणि वर सांगितलेलें झाडाचें खोड, ज्यावर **जानरावांनीं** मला धपकन् बसविलें होतें, त्यावर त्यानें मला हलकेंच बसतें केलें. नंतर कांहीं वेळानें मी चांगली सावध होऊं लागून दीर्घ श्वासोच्छ्वास टाकिला, आणि डोळे उघडून पहातें तों माझी सुटका करणारे ते उदार गृहस्थ दुसरे कोणी नसून **जयवंतरावच** होते असें मला समजलें. त्यांचे मी उपकार मानणार, इतक्यांत

जानराव धडपडून उठून आहीं होतों त्या ठिकाणीं आले. त्या वेळीं त्यांना अतिशय राग आला होता, परंतु तो झाडण्याचें अंगीं सामर्थ्य नाहीं, यामुळें त्यांचें तोंड लज्जेनें काळें ठिक्कर पडलें होतें, व ओंठ मात्र मनांतल्या त्वेषामुळें अतिशय जलद थरथरत होते. अशा स्थितींत ते **जयवंतरावां**कडे पाहून बोलले:—"**जयवंतराव**! तुम्हीं ही कांहीं चांगली गोष्ट केली नाहीं, व याबद्दल मला तुमचा अतिशय राग आला आहे, तो मी तुम्हांवर केव्हां तरी खचित काढीन! परंतु आतां त्याविषयीं मी कांहीं बोलत नाहीं. सध्यां मी या गांवांत पाव्हणा आलों आहें, याकरितां या ठिकाणीं मीं ही गोष्ट केली याबद्दल रिकामी गांवचर्चा माजवावी हें मला योग्य वाटत नाहीं. तथापि **जयवंतराव**! तुम्हांला एक गोष्ट सांगतों. आजपासून तुमचा आणि माझा स्नेहसंबंध तुटला असें समजा. निदान, यावेळीं तुम्हीं माझा अपमान केला आहे याबद्दलचा जाब तुम्हांपासून मी घेईन, तोंपर्यंत तरी मी तुमचा शत्रुच राहीन. ज्या स्त्रीवर मी बलात्कार करणार होतों—" या ठिकाणीं **जानराव**ांनीं क्रोधानें मजकडे वांकड्या दृष्टीनें पाहिलें, " ती तुम्हीं स्वतःकरितांच लाटली आहे, कांहीं चिंता नाहीं, पण आत्तांच्या आत्तां कांहीं तरी सबब सांगून मी **पांचवडा**हून निघून जाणार! तुम्हांला वाटेल तेव्हां तुम्हीं जा, पण एक गोष्ट तुम्हांला आवडल तर करा, ती एवढीच कीं तुम्हीं तुमच्या या माणुकाला मात्र याबद्दल एक अक्षरही बाहेर कोणाजवळ न बोलण्याविषयीं बजावून सांगा."

इतकें बोलून **जानराव** झपाट्यानें मागें उलटले, आणखी घराकडच्या वाटेनें थोडक्याच वेळांत दिसेनासे झाले. हा सर्व प्रकार होत असतां माझी जी कांहीं स्थिति झाली होती तिचें वर्णन कोण करूं शकेल? भीतीनें म्हणा किंवा लज्जेमुळें म्हणा, माझें सर्वांग लटलटां कांपत होतें, व अंगांतून एकसारखा घाम चाला होता. तथापि तशा स्थितींत वसल्या बसल्या मी अंमळ वर दृष्टि करून **जयवंतरावां**कडे पाहिलें, आणि धड तोंडानें अक्षरही निघेना अशा स्थितींतच त्यांचे उपकार मानण्याकरितां कायसेंसें बोलत आहें, तों इतक्यांत पुढें बोलवेना अशी स्थिति होऊन मला एकदम जबरदस्त रडें कोसळलें.

त्या वेळीं **जयवंतराव** सौम्यपणानें मजकडे पाहून म्हणाले:—"**मथुरे**! मी केलेंयांत वास्तविक उपकार मानण्यासारखं कांहींच नाहीं. मी ज्या स्थितींत तुला पाहिलें, त्याच स्थितींत दुसरी कोणीही स्त्री माझ्या दृष्टीस पडती, तरी त्या वेळीं अशा रीतीनें वागणें हा माझा धर्मच होता. **जानरावां**नीं जें वर्तन केलें तें अतिशय नीचपणाचें होतें, आणि त्या कामीं तुझ्याकडे बिलकुल दोष नाहीं."

तें ऐकून मीं म्हटलें—" मी देवाशपथ सांगतें माझा या कामीं अगदीं एवढासुद्धां दोष नाहीं. आणि माझ्या हातून अशी गोष्ट कधीं व्हायचीही नाहीं. कमनशीबामुळें मी जरी अशा दीन स्थितीत पडलें आहे, तरी अगदीं मोठमोठे आणि श्रीमंत लोक यांना जशा बऱ्या बाईट गोष्टी कळतात त्याप्रमाणें मलाही कळतात."

"तूं म्हणतेस तें खरें, तुझें म्हणणें मी बरोबर समजलों." **जयवंतराव** हे शब्द बोलले त्यावेळीं त्यांच्या त्या स्वरांतच कांहीं एक प्रकारचा स्वाभाविकपणा होता तो असा कीं, नुसतें त्यांचें भाषण ऐकिल्याबरोबर तेवढ्यावरूनच ह्या गृहस्थांना बाहेरून एक व आंतून निराळें कांहीं

नाहीं ह्मणून ऐकणाराची सहज खातरी व्हावी. असो. त्यांच्या भाषणावरून मी जरी अगदीं हलक्या धंद्यांत पडलें होतें तरी माझें मन शुद्ध आहे अशी त्यांची खातरी असल्याचें मला समजलें, व तेणेंकरून माझ्या मनाला एकापरी समाधान वाटलें. ते पुढें बोलले:—" आणखी काय असेल तें असो. पण मला तर खचित वाटतें कीं, लहानपणापासून तरी तूं या अस-ल्या हलक्या धंद्यांत पडावेंस असा तुझ्या आई बापांचा हेतु नव्हता. "

मीं उत्तर केलें:—" हेतु असो कीं नसो. पण माझी आईबापें गरीब पडलीं, तेव्हां मला याहून चांगला तो धंदा कोटून मिळणार होता?—"

त्यावर **जयवंतराव** उत्तर करितात:— " **मथुरे** ! तूं ह्मणतेस ती गोष्ट खरी, तरी पण तूं दिसतेस यापेक्षां तुजमध्यें कांहीं विशेष अलौकिक गुण आहे असेंच मला वाटतें. कारण तुझें भाषण—तुझी बोलण्याची पद्धति—तुझ्या— "

जयवंतराव याप्रमाणें बोलत आहेत तोंच मीं मध्यें बोललें:—" महाराज ! माझी गरीब बिचारी आई होती—" हे शब्द बोलत असतां मी लज्जेनें कांपूं लागून एकाएकीं माझ्या नेत्रां-तून टपटप अश्रुही गळूं लागले.

" पुरेपुरे ! **मथुरे** ! जास्ती सांगण्याची-च कांहीं जरूर नाहीं. तुझें ह्मणणें मी अक्षर-शः खरें मानितों. तुझी आई चांगली असून ममताळू होती आणि ती दुर्दैवानें तुला नाहींशी झाली, असेंच कीं नाहीं तुझें ह्मणणें ? " **जयवं-तराव** हे शब्द बोलत असतां त्यांना मजविषयीं वाईट वाटून त्यांच्याही डोळ्यांत पाणी आलें, आणि ते अत्यंत कोमल आणि दयाभूत दृष्टीनें मजकडे पाहूं लागले. **जानरावां**बरोबर ते प्रथमतः **पांचवड** मुक्कामीं आले त्यावेळीं **जान-राव** मजशीं कांहीं उद्धटपणानें बोलूं लागले असतां असें करणें चांगलें नाहीं ह्मणून **जयवंतराव** त्यांस बोलले होते, तेव्हांच त्यांचे विषयीं माझे मनांत कृतज्ञताबुद्धि उत्पन्न झाली होती, तथापि पुढें **जानराव** प्रत्यक्ष मजवर बलात्कार करूं पाहत असतां त्यांनीं मला सोडविल्यानंतर **जानराव** त्यांजवर रागावून निघून गेले, व त्यानंतर **जयवंतरावां**नीं मला सौम्यपणानें नुस्ती " **मथुरे** " या नांवानें हांक मारिली, ती हांक त्वा तसल्या प्रसगीं ऐकून माझी कृतज्ञताबुद्धि त्यांजविषयीं विशेषच वाढ-ली, व तेव्हांपासूनच माझ्या मनाची कांहीं विलक्षण प्रकारची स्थिति झाली होती; व त्या स्थितीचाच माझे मनावर अद्यापिही पगडा होता, यामुळें स्त्रीस्वभावास लज्जागुण साह-जिक असूनही केवळ कृतज्ञपणाचे भरांत त्या वेळीं **जयवंतरावां**च्या मुद्रेकडे पाहिल्यावांचून माझ्यानें राहवलें नाहीं, व त्या वेळची त्यांची ती मुद्रा पाहूनच त्यांच्या सर्वांगीं चांगुलपणच भरलें आहे असें मला वाटून अशा सद्गुणी उदार पुरुषाच्या कळवळ्यास मी पात्र झालें याबद्दल माझी मलाच कांहीं एक प्रकारची धन्य-ता वाटूं लागली. असो. माझ्या मनाची अशी प्रकारची स्थिति चालूच असतां **जयवंतराव** पुढें बोलले:—" **मथुरे**! मी तुला प्रथमतः पाहिलें तेव्हांपासूनच मला वाटत होतें कीं तूं कोणी तरी अद्वितीय स्त्री आहेस, आणि तुझी हकीकत-ही तशीच कांहीं तरी श्रवणीय असावी ! **मथुरे** ! मी बोलतों याचा मनांत राग आणूं नको, परंतु जर तुला सांगायला कांहीं हरकत नसेल, तर तुझी इत्थंभूत हकीकत एकवार ऐका-वी अशी मनाला फार फार उत्कंठा वाटत आहे.

मथुरे ! मी ही हकीकत तुला विचारितों ती तुझ्या मनाला उगीच दुखवावें, किंवा मी रिकामटेंकडा असून मला दुसरा काहीं उद्योग नाहीं' ह्मणून आपला काहीं तरी विचारितों अशाकारितां नव्हे, तर तुझी मला खरोखरीचें, कींव येते ह्मणून विचारितों." हें शब्द बोलत असतां **जयवंतराव** एकसारखे मजकडे पहात होते, व त्या वेळच्या त्यांच्या दृष्टींत प्रेम, अनुकंपा, इत्यादि अचिंत्य सौम्य मनोवृत्ति जणों काय प्रत्यक्ष उमटल्या आहेत असेंच वाटत होतें, व त्यामुळें ते मजकडे पहात होते याचा मला यत्किंचि-तूही विषाद वाटला नाहीं. अहाहा! **जयवंतरावां**ची त्या वेळची ती सौम्य आणि अनुकंपाविकसित दृष्टि कोणीकडे, आणि त्याचेच अगोदर विषयेच्छेनें वेडावलेल्या **जानरावां**ची आंतून विस्तवच बाहेर पडत आहे कीं काय अशा प्रकारची ती उग्र दृष्टि कोणीकडे ! असो. अशा प्रकारें मजकडे पहात असतां **जयवंतराव** पुढें बोलले:—"परवां सकाळीं मी येथून आपले चाकरीवर रुजू होण्याकरितां जाणार आहें. **जानराव** आजच निघून जाणार ह्मणून ह्मणाले आहेंत, त्याप्रमाणें ते गेले असतां मलाही त्यांचे प्रमाणेंच निघून जाणें जरूर होतें. तथापि उद्यां **संभाजीरावां**च्या येथें मेजवानी व्हायची आहे, तिजकरितां अगोदरच त्यांनीं आणि **ताराबाई**नीं उद्यांचा दिवस आग्रहानें राहून घेतलें आहे त्यापुढें माझा इलाज नाहीं. असो. तर उद्यां संध्याकाळीं जर तूं बागेंत फिरावयास येणार असलीस, तर मीही फिरत फिरत त्या वेळीं या अंगाला येईन, आणि मग तू मला आपली सगळी हकीकत एकवार काळीवच ! मथुरे ! तुला तुझ्या गळ्याचीच शपथ आहे. तूं माझें एवढें ह्मणणें ऐकावयास नाहीं ह्मणूं नको."

इतकें बोलून **जयवंतरावां**नीं पुनरपि एक वेळ मजकडे सौम्य व प्रेमळ दृष्टीनें पाहिलें आणि ते लगेच तेथून निघून आपल्या वाटेनें निघून गेले. त्यांनीं जातांना आणखी एक दोन वेळ मजकडे पाहिलें, व तेवढा वेळपर्यंत मीही त्यांच्याकडे पहातच राहिलें होतें. **जयवंतराव** दिसेनासे झाले, तेव्हां गेल्या घटके अर्ध घटकेंत झालेला तो सर्व प्रकार माझ्या मनांत पुनरपि मूर्तिमंत उभा राहिला, व मी त्यावरलच्या विचारांतच गर्क होऊन गेलें.

या स्थितींत मी किती वेळ तन्मय होऊन राहिलें होतें याची मला यावेळीं कांहीं बरोबर आठवण नाहीं, पण इतकें मात्र आठवतें कीं त्यावेळीं कांहीं उल्हास व कांहीं खेद अशा उभयविध वृत्ति माझ्या अंतःकरणांत घोंटाळत होत्या, व एकाएकीं कांहीं कर्कश किंकाळण्याचा आवाज ऐकून एकदम दचकून मी जागी झालें, आणि पहातें तों **जनकू** अगोदर खेळत होता तेथून दुसरीकडे गेला असून एका लहानशा खाडयांत पडून ओरडत होता. त्याची ही स्थिति पाहून मी त्याला इतका वेळ एकटें राहूं दिलें यावरल माझें मलाच व्हाईट वाटलें, व लागलीच जवळ जाऊन त्याला खाडयांतून बाहेर काढलें. नंतर त्याचें सगळें अंग माती लागून घाण झालें होतें, तें साफ करून व एक दोन ठिकाणीं कोठें थोडें खरचटलें होतें, त्या ठिकाणीं तोंडात ल्या वाफेनें त्यास अंमळसें शेकलें, व त्यास उगें करूं लागलें. पहिल्यानें त्याचें बराच वेळ किंचाळणें चाललें होतें, तें कांहीं केल्या थांबेना. तथापि सरतेशेवटीं त्याला खांद्यावर टाकून बराच वेळ इकडे तिकडे फिरत फिरत थोंपटलें, तेव्हां त्यायोगानें, व त्यावेळीं हळू हळू गार वाराही सुटूं लागला होता त्यामुळें,

कांहीं वेळानें त्याला माझ्या खांद्यावरच झोंप त्यामुळे कामाची हरकत झालेली पाहिली कीं मधून लागली तेव्हां त्याचें किंचाळणें एकदाचें थांबलें. मधून **त्राटिकाबाई**च्या कठोर वाक्पुष्पांचे वर्षाव नंतर तशीच त्याला घेऊन घरीं आलें, व होतांनाही राहून राहून ऐकूं येत होते. अगदीं परसाच्या वाटेनें आपल्या माडीवर चढण्याक- पहांटेच्या प्रहरींच एक दोन गडी मुद्दाम रितां वळलें, तों माजघरांत **ताराबाई** आणि गांवाबाहेरच्या मळ्यांत भाजीपाला, केळीचीं **जानराव** असून **जानराव** खरोखरीच पानें वगैरे आणण्याकरितां पाठविले होते, ते **ताराबाई**चा निरोप घेतांना मला ऐकूं परत येऊन पानें कांपण्याचा व भाज्या वगैरे आलें. तथापि मी तिकडे लक्ष न देतां तशीच चिरण्याचा घरांत सपाटा चालला होता. मेज- तडक वर गेलें, आणि मुलांचा भात व्हायला वानीस येणारे पाहुणे हे राजदरबारांत व दर- थोडासा अवकाश होता म्हणून हंतरूण उलग- बारच्या संबंधाच्या मोठमोठ्या मंडळींत वाग- डून त्यावर **जनकूला** हलकेंच निजवून त्यास- लेले, या कारणामुळें त्यांच्या बरदास्तींत कोण- थोंपटींत जवळ बसलें. च्याही प्रकारें न्यूनता पडूं नये, यासाठीं शेजा- रल्या **चिंधवली** गांवीं एक नामांकित आचारी असे त्याला बरेच पैसे देऊं करून मुद्दाम बोलावून आणलें होतें. त्यानें आल्यावाहेर सैंपा- कघरांत कोठें काय सामान आहे हें अगोदर पाहून नंतर हेंच हवें, तेंच नको, म्हणून एकसारखी धांदल व एकसारखा बोलण्याचा टकळा चालविला. त्या दिवशीं घरांत कमी- जास्ती कामकाजाकरितां मनुष्यांचें बळावळ पाहिजे म्हणून **ताराबाई**नें मुद्दाम **राजाऊ** कुळंबिणीस मुलांस संभाळण्यास सांगितलें, आणि मला खालीं कामाला बोलाविलें. मी खालीं येऊन पहातें तों त्या आचाऱ्यानें हा कांपचा केवढा काढिला, ही साखरच नीट निवडली नाहीं. हा गूळच काळा आहे, ही माती, हें मसण असें एकसारखें बडबडण्यास, आणि ज्या त्या चाकरमाणसावर तोंड सोडण्यास आरंभ केला. प्रथमतः **ताराबाई** गडबडींत होती त्यामुळें तिचें या गोष्टीकडे लक्ष गेलें नाहीं. परंतु जेव्हां पुढें तिनें हा सगळा दंगा ऐकिला, तेव्हां तिनें अतिशय रागावून त्यास आपलें तोंड आटोपून सैंपाकाकडे लाग म्हणून सांगितलें. त्याबरोबर

प्रकरण ८.

दुसरा दिवस उजाडला, व त्या दिवशीं घरांत चौहींकडे चाकर माणसांची कामें कर- ण्याची एकच गडबड उडून गेली. त्या दिवशीं मेजवानी व्हायचा बेत अकल्पित ठरला होता- यामुळें मेजवानीस लागणाऱ्या सामानसुमानाची तयारी करण्याकरितां मुद्दाम मोलकरणी बोला- वून जिकडे तिकडे झाडपाखड सुरू झाली- आदले दिवशीं **मन्याबा जगदेवरावा**च्या नादाला लागून घोडयावर बसून बाहेर गांवीं गेला होता त्याकरितां त्या दोघांनाही मुद्दाम परत मेजवानीकरितां आणण्यासाठीं रात्रींच्या रात्रीं- च एक गडी पाठविला होता, तो असा सकाळचा चार घटका दिवस येत आहे तोंच त्यांस घेऊन आला. जेवावयास येणारे पाहुणे कोणी **संभाजीरावां**चे नातलग असून ते **सातारा**च्या महाराजांचे आश्रित होते, यामुळें त्यांची बरदास्त नीट रहावी एतदर्थ तयारी अगदीं झपाट्यानें चालू झाली होती. मोल- करणी काम करतांना एकमेकींशीं बोलत बसत

त्या आचाऱ्यानें एकदम विश्वरूप प्रगट करून हातांत तेलाची वाटी होती ती रागाच्या सपाटचांत चूल पेटली होती तींत ओतली, आणखी चिरलेल्या आणि निसलेल्या भाजांचीं शिपतरें पुढें होतीं तीं लाथेनें झुगारून दिलीं, आणि त्या पावलीं पाय हापटीत हापटीत बाहेर येऊन डोकीवर पागोटें टेवून " मला चाकरीची जरूर नाहीं, मी आत्तां हा चिंधवलीस निघून जाणार " ह्मणून भय घालून खरोखरीच बाहेर निघून जाण्याचा आव आणिला. इतका वेळपर्यंत ताराबाईच्या जेवढया कांहीं गोष्टी सांगण्यांत आल्या आहेत, तेवढयांवरून हें कोणाच्याही सहज लक्षांत येण्याजोगें आहे कीं, ताराबाई स्वभावानें तापट आणि नुसडी तर खरीच, परंतु तिला आपल्या घरीं कोणी मोठे पाहुणे वगैरे आले असतां त्यांचें आगतस्वागत चांगल्या प्रकारें टेवणें ह्याचें फार अगत्य वाटत असे, व यासाठीं पाहुणे घरांत आले असतां तिचें वर्तन तिच्या इतर वेळच्या वर्तनाहून फारच निराळें असे. यावरून जेव्हां का तिनें आतां हा आचारी खास निघून जातो असें पाहिलें, तेव्हां तो गेला असतां आजच्या मेजवानीची मातीच झाली असें तिला वाटून तिनें लगेच आपल्या बोलण्याचा स्वर फिरवून त्यास बाबा बाई करून मोठया मिनतवारीनें राहून घेतलें. तथापि त्या आचाऱ्यानें तिला एकच गोष्ट सांगितली कीं " आजचा दिवस माझा आहे, मी पाहिजे तसा वागेन आणि पाहिजे तें करीन, त्यांत तुह्मीं मधें तोंड घालतां उपयोगी नाहीं. " तेव्हां त्याच्यापुढें ताराबाई अगदीं गोगलगाईसारखी गरीब होऊन तिनें त्याच्याशीं बोलणंच टाकून दिलें. तेव्हां मात्र त्या आचाऱ्यानें आपलें एकून एक काम संथपणानें चालवून सुमारें बारा घटका दिवस येण्याच्या सुमारास सर्व सैंपाक उरकून फक्त भात मात्र करावयाचा तेवढा टेविला.

इकडे ताराबाईनें असा प्रहर दिवस येण्याच्या सुमारास अंग बिंग धुवून आचाऱ्यानें पक्कान्नें तयार केलीं होतीं तीं थोडीं ताटभर वरती आपल्या खोलीत चाकरांकडून आणवून एकटीनेंच यथेच्छ खालीं, आणि पाणीबिणी पिऊन तळहीराम गार झाल्यावर तेथून उठली ती ओटीवरच्या माडीवर जाऊन तेथल्या पेटया उघडून सगळीं बासनें सोडून एक उत्तम लफ्याचा शालू, व नारिंगी जरीकांठी चोळी बाहेर काढून त्यांकडेच घटकाभर पहात बसली. त्याच माडीवर फडताळांत रुप्याचीं ताटें, वाटया व वाडगे होते ते सर्व बाहेर काढिले असून ते ती आपणासमक्ष मजकडून घांसवून घेत होती, त्यामुळें तिचें तें नटणें मुरडणें एकून एक माझ्या दृष्टीस पडत होतें. ताराबाईचें बराच वेळपर्यंत त्या शालूकडे आणि चोळीकडे पहाणें झाल्यावर, तिनें एका खणांत एक बराच मोटा हस्तिदंती चौकटीचा आरसा होता तो बाहेर काढून, घटका अर्धी घटका नाकच वांकडें कर, ओंठच पुढें फुगीव, नाकपुडयाच फुगीव, डोकीच्या केंसांवरूनच हात-फिरीव, कुंकवाचा आडवा मळवट बोटानें खालून वरून कोरीतच बस, व डोळे ताणून तोंड एकदम उभें लांबीव, अशी एकसारखी खटपट करीत ती आरशांत पहात बसली. नंतर तिला आपण चांगली फक्कड दिसूं लागलें असें वाटलें तेव्हां ती तेथून उठली, आणि थोरल्या पेटींतून दागिन्यांचा करंडा काढून दागिने घालीत बसली. त्या वेळींही हा दागिना घाल, आरशात पहा, मग दुसरा दागिना घाल, फिरून आरशांत पहा, असें एकसारखें आपली

सगळी लक्ष्मी पुरी सजेपर्यंत तिचें चालले होतें. मधें मधें एक दोन वेळां तिनें मीं काम करीत असतां मजकडे पाहिलें. आणखी मीं भांडीं जरी चांगलीं घासायच्या रीतीनें घासलीं होतीं, तरी याला कांहीं तरी नांव ठेव, त्यांत काहीं तरी चूक काढ, याला चिंचच कमी लागली म्हण, त्यावर राखेची बोटेंच शिलक राहिलीं आहेत म्हणून रागाव, असें करून करून तिनें मजकडून तीं सगळीं भांडीं फिरून फिरून दोन दोन तीन तीन वेळ घांसविलीं. इकडे तिचें वर सांगितलेलें नटणें मुरडणें चाललेंच होतें. सरतेशेवटीं दागिने घालून झाल्यावर वया एकदाची उठली, आणि तो लग्याचा शालू नेसूं लागली. तो नेसतांना त्याचीही वरल्याप्रमाणेंच धांदल झाली. सुमारें अर्धी घटिकापर्यंत शालूचा एक पदर अंगावर घेतला असून तो किती लांब कसा घेतला असतां आपण शोभूं याबद्दलचाच तिच्या मनांत निश्चय होत होता. सरतेशेवटीं एकदा शालू नेसणें झाल्यावर अंगांत जरीकांटी चोळी घालण्याचा समारंभ झाला, पण त्याला शालूपेक्षां कमी वेळ लागला. असो. याप्रमाणें सगळी तयारी आपल्या मनाप्रमाणें नीटनेटकी झाल्यावर, **ताराबाई** आणखी एक वेळ खालीं बसली, आणि काजळाची डबी काढून आरशांत पाहून तें डोळ्यांत घालूं लागली. इतकीं सगळीं कृत्यें आटपताहेत तों दोन प्रहर होऊन मेजवानीकरितां बोलाविलेले गृहस्थ हळू हळू जमूं लागले. तेव्हां त्यांच्या कानीं पडावें एवढ्याकरितां मोठ मोठ्यानें ओरडून **ताराबाईनें** " अग ए, त्या रुप्याच्या वाटच्या खालीं आणल्यास का?—म्हण्या ए—अरे—ती अगरबत्त्यांची गुंडाळी कोठें ठेविलीस ?—कारे तूं—ए—अरे पंगतींत मांडायला हस्तिदंताच्या थोरल्या सांमटचा काढल्यासका?—अरे, रांगोळ्या, पाट सगळें लौकर लौकर आटपारे—" असा मातीन् मसण एकसारखा ओरडा चालविला. इतक्यांत पुढच्या दारीं कोणी एक चाकर माणूस येऊन त्यानें ते **सातारचे गृहस्थ** यायला निघायच्या तयारींत आहेत म्हणून वरदी दिली. त्याबरोबर तिकडे आचाऱ्याला भाताचें भांडें चढविण्याविषयीं निरोप पाठविला, व मग आज काय घरांतली भरलेली लक्ष्मी एकटी आपणच अशा थाटानें ती घरभर झपाट्यानें वावरूं लागली. पण या सगळ्यांत सांगण्यासारखा चमत्कार हा होता कीं, ती इतर चाकरमाणसांवर हवी तशी राग भरे, पण त्या **चिंधवलीच्या** आचाऱ्यानें अमुक एक पदार्थ केला आहे किंवा नाहीं याची नुसती चौकशी करण्याकरितां ही तिनें त्याचे पाशीं चकारशब्द सुद्धां काढिला नाहीं. त्या आचाऱ्यानेंही ती वावरत असतां ती जशी काहीं घरांत आहे कीं नाहीं हें आपणास ठाऊकच नाहीं, अशा प्रकारें खुशाल मिंतीशीं टेंकून पायावर पाय टाकून डाव्या हाताच्या तळव्यावर चांगली मूठ अर्धी मूठ तंबाखू घेतली होती, व तिला चुन्याचें बोट लावून चोळून ती थोडी थोडी तोंडांत घालून जाळीवाटे बाहेर पचापच थुंकण्याचा सपाटा चालविला होता. तथापि **ताराबाईनें** त्याच्याकडे मुद्दामच मुळीं लक्ष पुरविलें नाहीं; व **मन्याबा, चिमा** आणि **जनकू** यांना खालीं बोलावून आणून मजकडून त्यांना आंघोळी घालविल्या, आणि त्यांचीं अंगें कोरडीं करणें झाल्यावर त्यांच्या अंगावर दागिने घालण्याकरितां त्यांना ओटीवरच्या माडीवर घेऊन ये म्हणून मला हुकूम करून आपण वर निघून गेली, व मी ही मागोमाग मुलांचीं अंगें पुसून झाल्यावर त्यांना घेऊन वर गेलें. तेथें गेल्यावर **ताराबाईनें**

केसरी.

स्थितिं मो रे दध्याः क्षणमपि मदांधेक्षण सखे
गजश्रेणीनाथ त्वामिह जटिलायां वनभुवि ।
असौ कुंभभ्रांत्या खरनखरविद्रावितमहा-
गुरुग्रावग्रामः स्वपिति गिरिगर्भे हरिपतिः ॥ जगन्नाथराय.

वरील नांवाचें वर्तमानपत्र निवळ महाराष्ट्र भाषेंत येत्या सालच्या आरंभापासून दर मंगळवारीं काढण्याचा विचार खालील मंडळीनें केला आहे. या पत्रांत एरवींच्या वर्तमानपत्रांप्रमाणें बातम्या, राजकीय प्रकरणें, व्यापारसंबंधी माहिती, वगैरे नेहमीचे विषय तर येतीलच; पण याखेरीज लोकस्थितीवर निबंध, नवीन ग्रंथांवर टीका, वगैरे विषयांचाही त्यांत समावेश केला जाईल. तसेंच विलायतेंत ज्या राज्यप्रकरणांची वाटाघाट होते ती इकडील लोकांस समजणें अवश्य असल्यामुळें त्यांचाही सारांशरूपानें यांत संग्रह करण्याचा बेत केला आहे. आजपर्यंत वरील तीन विषयांवर, म्हणजे देशस्थिति, देशभाषेंतील ग्रंथ, व विलायतेंतील राजकारण, या विषयांच्या संबधानें जसें यथास्थित उद्घाटन व्हावयास पाहिजे होतें तसें कोणत्याही वर्तमानपत्रांतून झालें नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. तर ही मोठी उणीव नाहींशी करून टाकण्याचें आह्मीं मनांत आणिलें आहे.

वरील वर्तमानपत्रांत प्रत्येक विषयाचें विवेचन जें करावयाचें तें केवळ निःपक्षपातबुद्धीनें व आह्मांस जें खरें वाटेल त्यास अनुसरून करावयाचें असा आमचा कृतसंकल्प आहे. आलीकडे बादशाही अंमलाच्या सुरुवातीपासून तोंडपुजेपणाचा प्रकार बराच वाढत चालला आहे यांत संशय नाहीं. हा प्रकार अत्यंत अश्लाघ्य असून देशाच्या हितास अपायकारक होत हें कोणीही प्रांजल मनुष्य कबूल करील. तर सदरील पत्रांतील लेख त्यास टेविलेल्या नांवाप्रमाणेंच येतील असें समजावें.

या पत्राचा सांचा सुबोधपत्रिकेसारखा धरण्यांत येईल. किंमतही त्याच मानानें अगदीं थोडी टेविली आहे. ती सालीना अगाऊ १ रुपया व खेरीज टपाल हंशील १।१० इतकी आहे. मागाहूनचा दर मुदलींच ठेवला नाहीं. सरतेशेवटीं आमच्या आर्यबंधूंस एवढीच विज्ञापना करण्यांत येते कीं त्यांनीं या लोकहिताच्या नवीन कृत्यास आपला उदार आश्रय द्यावा. तो जसजसा मिळेल तसतशी आह्मांस उमेद येऊन हें पत्करलेलें काम यथाशक्ति तडीस नेण्यांत आह्मांकडून बिलकुल कसर होणार नाहीं.

विष्णु कृष्ण चिपळुणकर आणि मंडळी.

उपयुक्त सूचना.

व्यवहारोपयोगी हुन्नरसंग्रह

(मासिकपुस्तक.)

चालू वर्षाच्या आगष्ट महिन्यापासून आह्मीं सदर्हू पुस्तक काढण्याचा सुरवात केली आहे, त्यांत ह्या देशांत व परदेशांत चालणारे अनेक प्रकारचे धंदे, रोजगार, विद्या व कळाकौशल्यें यासंबंधी अनेक प्रकारच्या युक्ति, कल्पना व हुन्नर यांचा संग्रह होत असतो.

सगळी लक्ष्मी पुरी सजेपर्यंत तिचें चाललें होतें. मधें मधें एक दोन वेळां तिनें मीं काम करीत असतां मजकडे पाहिलें. आणखी मीं भांडीं जरी चांगलीं घासायच्या रीतीनें घासलीं होतीं, तरी याला कांहीं तरी नांव ठेव, त्यांत काहीं तरी चूक काढ, याला चिंचच कमी लागली. ह्मण, त्यावर राखेची बोटेंच शिलक राहिलीं आहेत ह्मणून रागाव. असें करून करून तिनें मजकडून तीं सगळीं भांडीं फिरून फिरून दोन दोन तीन तीन वेळ घांसविलीं. इकडे तिचें वर सांगितलेलें नटणें मुरडणें चाललेंच होतें. सरतेशेवटीं दागिने घालून झाल्यावर बया एकदाची उठली, आणि तो लग्याचा शालू नेसूं लागली. तो नेसतांना त्याचीही वरल्याप्रमाणेंच धांदल झाली. सुमारें अर्धी घटिकापर्यंत शालूचा एक पदर अंगावर घेतला असून तो किती लांब कसा घेतला असतां आपण शोभूं याबद्दलचाच तिच्या मनांत निश्चय होत होता. सरतेशेवटीं एकदा शालू नेसणें झाल्यावर अंगांत जरीकांटी चोळी घालण्याचा समारंभ झाला, पण त्याला शालूपेक्षां कमी वेळ लागला. असो. याप्रमाणें सगळी तयारी आपल्या मनाप्रमाणें नीटनेटकी झाल्यावर, **ताराबाई** आणखी एक वेळ खालीं बसली, आणि काजळाची डबी काढून आरशांत पाहून तें डोळ्यांत घालूं लागली. इतकीं सगळीं कृत्यें आटपताहेत तों दोन प्रहर होऊन मेजवानीकरितां बोलाविलेले गृहस्थ हळू हळू जमूं लागले. तेव्हां त्यांच्या कानीं पडावें एवढ्याकरितां मोठ मोठ्यानें ओरडून **ताराबाईनें** " अग ए, त्या रुप्याच्या वाटच्या खालीं आणल्यास का?—ह्मण्या ए—अरे—ती अगरबत्त्यांची गुंडाळी कोठें टेविलीस ?—कारे तूं—ए—अरे पंगतींत मांडायला हस्तिदंताच्या थोरल्या सोंगट्या काढल्यासका?—अरे, रांगोळ्या, पाट सगळें लौकर लौकर आटपारे—" असा मातीन् मसण एकसारखा ओरडा चालविला. इतक्यांत पुढच्या दारीं कोणी एक चाकर माणूस येऊन त्यानें ते **सातारचे गृहस्थ** यायला निघायच्या तयारींत आहेत ह्मणून वरदी दिली. त्याबरोबर तिकडे आचाऱ्याला भांताचें भांडें चढविण्याविषयीं निरोप पाठविला, व मग आज काय घरांतली भरलेली लक्ष्मी एकटी आपणच अशा थाटानें ती घरभर झपाट्यानें वावरूं लागली. पण या सगळ्यांत सांगण्यासारखा चमत्कार हा होता कीं, ती इतर चाकरमाणसांवर हवी तशी राग भरे, पण त्या **चिंधवलीच्या** आचाऱ्यानें अमुक एक पदार्थ केला आहे किंवा नाहीं याची नुसती चौकशी करण्याकरितां ही तिनें त्याचे पाशीं चकारशब्द सुद्धां काढिला नाहीं. त्या आचाऱ्यानेंही ती वावरत असतां ती जशी काहीं घरांत आहे कीं नाहीं हें आपणास ठाऊकच नाहीं, अशा प्रकारें खुशाल भिंतीशीं टेंकून पायावर पाय टाकून डाव्या हाताच्या तळव्यावर चांगली मूठ अर्धी मूठ तंबाखू घेतली होती, व तिला चुन्याचें बोट लावून चोळून ती थोडी थोडी तोंडांत घालून जाळीवाटे बाहेर पचापच थुंकण्याचा सपाटा चालविला होता. तथापि **ताराबाईनें** त्याच्याकडे मुद्दामच मुळीं लक्ष पुरविलें नाहीं; व **मन्याबा, चिमा** आणि **जनकू** यांना खालीं बोलावून आणून मजकडून त्यांना आंघोळी घालविल्या, आणि त्यांचीं अंगें कोरडीं करणें झाल्यावर त्यांच्या अंगावर दागिने घालण्याकरितां त्यांना ओटीवरच्या माडीवर घेऊन ये ह्मणून मला हुकूम करून आपण वर निघून गेली, व मी ही मागोमाग मुलांचीं अंगें पुसून झाल्यावर त्यांना घेऊन वर गेलें. तेथें गेल्यावर **ताराबाईनें**

केसरी.

स्थितिं मो रे दृष्याः क्षणमपि मदांधेक्षण सखे
गजश्रेणीनाथ त्वामिह जटिलायां वनभुवि ।
असौ कुंभभ्रांत्या खरनखरविद्रावितमहा-
गुरुग्रावग्रामः स्वपिति गिरिगर्भे हरिपतिः ॥ जगन्नाथराय.

वरील नांवाचें वर्तमानपत्र निवळ महाराष्ट्र भाषेंत येत्या सालच्या आरंभापासून दर मंगळवारीं काढण्याचा विचार खालील मंडळीनें केला आहे. या पत्रांत एरवींच्या वर्तमानपत्रांप्रमाणें बातम्या, राजकीय प्रकरणें, व्यापारसंबंधी माहिती, वगैरे नेहमीचे विषय तर येतीलच; पण याखेरीज लोकस्थितीवर निबंध, नवीन ग्रंथांवर टीका, वगैरे विषयांचाही त्यांत समावेश केला जाईल. तसेंच विलायतेंत ज्या राज्यप्रकरणांची वाटाघाट होते ती इकडील लोकांस समजणें अवश्य असल्यामुळें त्यांचाही सारांशरूपानें यांत संग्रह करण्याचा बेत केला आहे. आजपर्यंत वरील तीन विषयांवर, म्हणजे देशस्थिति, देशभाषतील ग्रंथ, व विलायतेंतील राजकारण, या विषयांच्या संबधानें जसें यथास्थित उद्घाटन व्हावयास पाहिजे होतें तसें कोणत्याही वर्तमानपत्रांतून झालें नाहीं असें म्हणण्यास हरकत नाहीं. तर ही मोठी उणीव नाहींशी करून टाकण्याचें आह्मीं मनांत आणिलें आहे.

वरील वर्तमानपत्रांत प्रत्येक विषयाचें विवेचन जें करावयाचें तें केवळ निःपक्षपात-बुद्धीनें व आह्मांस जें खरें वाटेल त्यास अनुसरून करावयाचें असा आमचा कृतसंकल्प आहे. आलीकडे बादशाही अंमलाच्या सुरुवातीपासून तोंडपुजेपणाचा प्रकार बराच वाढत चालला आहे यांत संशय नाहीं. हा प्रकार अत्यंत अश्लाघ्य असून देशाच्या हितास अपायकारक होत हें कोणीही प्रांजल मनुष्य कबूल करील. तर सदरील पत्रांतील लेख त्यास टेविलेल्या नांवाप्रमाणेंच येतील असें समजावें.

या पत्राचा सांचा सुबोधपत्रिकेसारखा धरण्यांत येईल. किंमतही त्याच मानानें अगदीं थोडी टेविली आहे. ती सालीना अगाऊ १ रुपया व खेरीज टपाल हंशील १।१० इतकी आहे. मागाहूनचा दर मुदलींच टेवला नाहीं. सरतेशेवटीं आमच्या आर्यबंधूंस एवढीच विज्ञापना करण्यांत येते कीं त्यांनीं या लोकहिताच्या नवीन कृत्यास आपला उदार आश्रय द्यावा. तो जसजसा मिळेल तसतशी आह्मांस उमेद येऊन हें पत्करलेलें काम यथाशक्ति तडीस नेण्यांत आह्मांकडून बिलकुल कसर होणार नाहीं.

1 विष्णु कृष्ण चिपळुणकर आणि मंडळी.

उपयुक्त सूचना.

व्यवहारोपयोगी हुन्नरसंग्रह

(मासिकपुस्तक.)

चालू वर्षाच्या आगष्ट महिन्यापासून आह्मीं सदर्हू पुस्तक काढण्याची सुरवात केली आहे, त्यांत ह्या देशांत व परदेशांत चालणारे अनेक प्रकारचे धंदे, रोजगार, विद्या व कळाकौशल्यें यासंबंधी अनेक प्रकारच्या युक्ति, कल्पना व हुन्नर यांचा संग्रह होत असतो.

ह्यांत वागाईत व शेती, सुगंधी व आतारी, रंगारी, वैद्यकी, पाकशास्त्र, कुंभार-काम. कांचकाम, दारूकाम इत्यादि कामांसंबंधी अनेक प्रकारचे उपयुक्त पदार्थ करण्याच्या कृति, कोणत्याही पदार्थावरील सर्व प्रकारचे डाग काढण्याच्या युक्ति, उपद्रवकारक प्राण्यांचा नाश करण्याचे उपाय; लवकर नासणारे पदार्थ पुष्कळ दिवस जसेच्या तसे ठेवण्याच्या युक्ति; कोणत्याहि पदार्थावर पाहिजे त्या धातूचा मुलामा चढविण्याच्या कृति; फुटलेले पदार्थ सांधण्याकरितां लुकणें, सुगंधी व औषधोपयोगी तेलें व अर्क; अनेक प्रकारच्या साध्या व रंगीत शाई, आगकाड्या, साबू, मेणवत्त्या, लाख, वार्निशें, सरबतें, टूथपावडर्स, मिल्करोझिस, कोल्डक्रीम्स, प्यामेटम्स, फ्रेंचपालिश, टिंक्चर्स, एशन्स, आसिड्स कोल्डवाटर्स इत्यादि सर्वोपयोगी उपयुक्त पदार्थ करण्याच्या कृति, आणि सांकेतिक भाषा, कूटगणित, कूटकविता, कूटप्रश्न आणि अंकचत्कार यांचा संग्रह होत जाईल.

याची किंमत अगाऊ एक वर्षाची २ रुपये व टपालखर्च ६ आणे; किंमत पाठविणें ती मनीआर्डर करून पुस्तककर्त्याकडे खालीं लिहिलेल्या ठिकाणीं पाठवावी. प्रत्येक अंक डेमी अष्टपत्री २० पृष्टांचा निघतो. आगाऊ वर्गणी आल्याखेरीज पुस्तक सुरू केलें जाणार नाहीं.

ता. ८ आगष्ट सन १८८० इसवी.

गोविंद मोरोवा कार्लेकर.
हुन्नरसंग्रहकर्ते.

2 **पत्ता.**—नळावर पंचमुखी मारुतीची गल्ली, घर नंबर २६ मुंबई.

छापत आहे.

गारुडीविद्या

अथवा

गौडबंगाली जादूचे मनोरंजक खेळ.

कित्येक धूर्त व ठक लोक कांहीं युक्तीच्या साधनानें अनेक प्रकारचे चमत्कार करून लोकांस ठकवितात, याकरितां अशा लोकांच्या कृतीचें व कसबाचें ज्ञान सर्व लोकांस व्हावें या हेतूनें आह्मीं वरील नांवाचें पुस्तक तयार केलें आहे. त्यांत युरोपियन तमासगीर व एतद्देशीय जादूगीर मांत्रिक, देवऋषी, पंचाक्षरी, इलमी, सय्यद, भानामती, गारुडी, भुत्ये इत्यादि नांवांनीं प्रसिद्ध असलेले धूर्त, ठक, व ढोंगी लोक, आह्मीं जादू, भूत, प्रेत, पऱ्या, जीन, वेताळ, बीर, ह्यांच्या साह्यानें पाहिजे तें करूं शकतों असें सांगून गूढयुक्ति, हातचलाखी, लोहचुंबकशक्ति, विद्युत्प्रयोग, रसायणप्रयोग आणि वनस्पतींचे चमत्कारिक गुण इत्यादिकांच्या साधनानें अनेक प्रकारचे चमत्कार करून लोकांस कसकसे ठकवितात ह्याचें कृतींसह स्पष्ट रीतीनें दिग्दर्शन केलें आहे. ह्याचीं पृष्ठें डेमी द्वादशपत्री २०० होतील, व त्यांत निरनिराळ्या प्रकारच्या ७० पेक्षां जास्त खेळांची रचना गोष्टीरूपानें केली असून तत्संबंधी अवश्य लागणारीं चित्रें व आकृतिही जागजागीं घातल्या आहेत. याची किंमत तारीख

१५ नवेंबर पर्यंत देणारांस फक्त १ रुपया व मागाहून १॥ रुपया पडेल. आगाऊ वर्गणी देणारांचीं नांवें पुस्तकांत छापलीं जातील. किंमतीबद्दल पैसा पाठविणें तो पुस्तककर्त्याकडे खालीं लिहिलेल्या ठिकाणीं पाठवावा. पुस्तकें डिसेंबर महिन्यांत छापून तयार होतील. बाहेर गांवांचे लोकांस टपाल खर्चाबद्दल २ आणे जारत पडतील.

ता. २० आगस्ट १८८० इ०.

गोविंद मोरोबा कार्लेकर.

३ **पत्ता.**—नळावर पंचमुखी मारुतीची गल्ली. घर नंबर २६ मुंबई.

अपूर्व तर्ककौशल्य.

नवीन शोध ! नवीन शोध ! !

धि सेन्टीफोलिओ.

अथवा

एका मूळ प्रतीवरून थोडयाच वेळांत व स्वरेनें कापिईंग प्रेसांत दाबल्याशिवाय १०० प्रती काढून घेतां येण्याचा अति स्वस्त सांचा.

—o—

डाक्तर, वकील, मुत्सद्दी, सावकार, सराफ व इतर सर्व लोकांस उपयोगी पडणारें उपयुक्त व स्वल्प साधन.

—o—

एका फ्रेंच पालिश केलेल्या लांकडाच्या उथळ पेटींत एक जस्ताची उथळ पेटी असून तींत मऊ लवचिक मिश्रणाचा एक पदार्थ आहे. आणि ह्या सांच्यासोबत रसायन क्रियेनें तयार केलेली एका प्रकारची शाई मिळते. त्या शाईनें कोणत्याही कोऱ्या कागदावर पाहिजे तो लेख किंवा चित्र लिहून तें सुकल्यावर तो कागद लिहिलेल्या बाजूनें सांच्यांतील पदार्थावर टाकावा, आणि वरील कोऱ्या बाजूवर तळहात हळू हळू फिरवून तो कागद १ मिनिटपर्यंत त्या सांच्यावर तसाच राहूं द्यावा. नंतर त्या कागदाचा एक कोंपरा बोटांत धरून हळू काढावा. ह्मणजे पूर्वी कागदावर सदरील लेखाच्या नकला घेणें असतील ते कागद एका मागून एक सांच्यावर उठलेल्या लेखावर टाकून पूर्ववत तळहातानें हळू चोळून उचलीत जावें, ह्मणजे त्या कागदावर तो लेख उठत जाईल. याप्रमाणें ५० पासून ७५ पर्यंत चांगल्या प्रती उठतात, अशा रीतीनें पाहिजे तितक्या प्रती काढल्यावर सांच्यावरील लेख पाण्यांत भिजविलेल्या स्पंजानें पुसून टाकावा. ह्मणजे तोच सांचा दुसरें काम चालविण्यास उपयोगी पडतो.

ह्या सांच्यावर इतर प्रेसाप्रमाणें प्रत्येक प्रतीचे वेळीं शाई लावण्याची मुळींच गरज पडत नाहीं. मूळ प्रतीवर लिहिलेला लेख सांच्यावर उठतो त्यावरच ५०।७५ प्रती निघतात. पुन्हां शाई लावण्याचें अगत्य नाहीं. तसेंच यास कापिईंग प्रेसाप्रमाणें दाबण्याच्या प्रेसाचीही जरूरी नसून हा सांचा पाहिजे तेथें कांखेंत घेऊन जाण्याजोगा असून तो लहान मूल देखील चालवूं शकतें.

हा सांचा खासगी पत्रव्यवहार व हरएक प्रकारचें गुप्त व जोखमी लिहिण्याचें काम अनेक प्रतीनिशीं चालविण्यास फारच सुलभ व अत्यंत उपयोगाचा आहे. याकरितां याचा प्रत्येक मनुष्यानें अवश्य संग्रह करावा.

सांच्याचे दर.

(शाईची १ बाटली व स्पंज यांसहित)

व्रत	सांचा	किंमत रु.	वंगीखर्च रु. आ. पै.
१	मोठ्या अष्टपत्री सांच्याचा	१०	१
२	मोठ्या चतुष्पत्री सांच्याचा	२०	१–४
३	मोठा फुल्सक्याप सांच्याचा	२५	१–८
४	मोठा डबल फुल्सक्याप सांच्याचा	३५	२
	शाईच्या एका बाटलीची किंमत	१	०–५

याखेरीज पाहिजे तितकें मोठे सांचे तयार करून देण्यांत येतील व त्या मानानें त्यांची किंमत घेतली जाईल.

हे सांचे व शाई '**हुन्नरसंग्रह आफिसांत**' विक्रीस तयार आहेत. त्यांच्या किंमतीबद्दल पैसा मनी आर्डर करून खालीं सही करणाराकडे पाठविल्यास सांचे रवाना करण्यांत येतील. याविषयीं अधिक माहितीचा कागद सांच्यावरोबर पाठविला जाईल.

गोविंद मोरोबा कार्लेकर.
हुन्नरसंग्रह कर्ते.

4

अद्भुतचमत्कार.

अवश्य पहा ! अवश्य पहा ! ! अवश्य पहा ! ! !

ऐंद्रजालिक सर्प.

(अजब चीज.)

हा चमत्कारिक सर्प प्रत्येकानें अवश्य करून पहावा. रसायन क्रियेनें तयार केलेल्या कांडयांपासून हा सर्प उत्पन्न होतो. एक इंच लांब कांडीचा सुमारें २ हात लांब सर्प होतो आणि त्याचा रंग व आकृति वगैरे खऱ्या सर्पाप्रमाणें होते. ह्याच्या दोन प्रतींच्या डब्या आहेत. पहिल्या प्रतीच्या एका डबीची किंमत ३ रुपये व दुसऱ्या प्रतीच्या एका डबीची किंमत २ रुपये असून प्रत्येक डबीस वंगीखर्च ५ आणे पडतो. यांच्या किंमतीबद्दल पैसा मनी आर्डर करून खालीं सही करणाराकडे पाठविल्यास डब्या रवाना करण्यांत येतील. सर्प करण्याच्या कृतीविषयीं एकंदर माहितीचा कागद डबीबरोबर पाठविला जाईल.

5

गोविंद मोरोबा कार्लेकर.

,, शंकर बाळकृष्ण दीक्षित .. .. ३— ६
,, पांडुरंग विनायक दाणी .. .. ३— ६
,, आनंदराव हरिचंद्र जोशी ३
,, वासुदेव मोरेश्वर पोतदार ३
,, अवधूतराव केशव फडणीस .. .. ३— ६
,, विष्णु आत्माराम .. .. ३— ६
,, गंगाधर देवजी ३
,, विष्णु दाजी गद्रे ३
,, रघुनाथ मोरोबा साहाने ३
,, लक्ष्मण महिपत अशीरकर .. .. ३—६
,, भास्कर रामचंद्र सहस्रबुद्धे ३
,, रामचंद्र विष्णु सहस्रबुद्धे .. .. ३—६
,, विठ्ठल वासुदेव गुर्जर .. .. २—१०
,, नारायण लक्ष्मण हळबे .. .. ३—३
सेक्रेटरी नागपुर लायब्ररी .. .. ६— ८
सेक्रेटरी हुर्डा लायब्ररी ५

शालोपयोगी व इतर पुस्तकें.

अंकगणित (मराठी ५ व्या इयत्तेपर्यंत).—कापडानें बांधलेलें किं. ०।= आणे; प्याकिंग व टं. ख. ८—॥

मोडी वाचनसार भाग १ ला व २ रा—दर भागास किं. ८= व प्याकिंग व ट. ख ८—

हावर्डच्या इं. १ ल्या पुस्तकांतील मराठींत उच्चारार्थासहित शब्दसंग्रह—(इंग्रजी व्याकरणांतील व अंकगणितांतील मुख्य शब्द, संख्या, त्यांचीं स्थानें व कोष्टकें यांसहित) किं. ८—॥ व प्याकिं. व ट. ख. ८—

हावर्डच्या इं. २ ऱ्या पुस्तकांतील मराठींत उच्चारार्थासहितशब्दसंग्रह—(इंग्रजी भूगोलांतील व अंकगणितांतील मुख्य शब्द यांसहित) किं. ८=॥ व प्याकिं. व ट. ख. ८—.

भूगोलाच्या व्याख्या, मराठी १ ल्या व २ ऱ्या पुस्तकांतील कठिण शब्दांचा अर्थ व कवितांचा अन्वययुक्त अर्थ—किं. ८—॥ व प्याकिं. व ट. ख. ८—

एशिया व यूरोपखंडाचें संक्षिप्त वर्णन. किं. ८— प्याकिंग व ट. ख. ८॥-

आरतीसंग्रह सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी. किं. १ रुपया व ट. आणि प्याकिं. ख. ८=

पुस्तकें मुंबईंत खालीं सही करणाराकडे मिळतील. जास्त प्रती घेण्यांत ट. ख. त फायदा आहे.

वासुदेव मोरेश्वर पोतदार.
स्कूलमास्तर गिरगांव प्रायव्हेट स्कूल मुंबई.
ठिकाणा कांदेवाडी शांतारामची चाळ नंबर ४२.

नाट्यकथार्णव.

प्रस्तुतकालीं 'नाव्हल्स' व 'नाटकें' यांचे संबंधानें जो लोकांचा भ्रांतिमूलक समज झाला आहे त्याचा निरास होऊन, या अत्यंत अनुपम मनोरंजनसाधनाचें वास्तविक स्वरूप व त्याची वास्तविक योग्यता हीं त्यांचे मनांत पूर्णपणें ठसावींत, व तेणेंकरून सदभिरुचि जागृत होऊन काव्यामृतरसास्वादाविषयीं त्यांच्या अंतःकरणाची साहजिक प्रवृत्ति व्हावी, हा ह्या पुस्तकाचा मुख्य उद्देश असून, यांत संस्कृत व इंग्लिश या भाषांत रचलेल्या उत्तम उत्तम नाट्यकथादिक प्रबंधांच्या आधारें आपल्या महाराष्ट्र वाणीस जुळतील अशा प्रकारचीं अनेक 'नाव्हल्स' व 'नाटकें' यांचा संग्रह यथावकाश होणार आहे, व प्रसंगविशेषीं स्वकपोलकल्पित सदुपदेशपर कथानकें व नीतिवादाचे चुटके यांचाही समावेश होईल. या पुस्तकांत अश्लीलता नीतिभंगादि दोष न येऊं देतां हें पुस्तक सर्व सभ्य व कुलीन स्त्रियांस वाचण्याजोगें करण्यांत येईल. या पुस्तकाच्या वर्गणीचे दर खालीं लिहिल्याप्रमाणें ठेविले आहेत.—अगाऊ वर्षास ३ रु., मागाहून वर्षास रु. ४८८, व किरकोळ दर प्रतीस ८६. शिवाय टपाल हंशील वर्षाचें अगाऊ ८६.

अगाऊ वर्गणी पुस्तक घेतल्यापासून दोन महिन्यांच्या आंत भरली पाहिजे. पोस्टाचीं तिकिटें पाठविणें झाल्यास अर्ध्या आण्याचीं असावीं, व रुपयास अर्धा आणा याप्रमाणें वर्तवळा पाठवावा.

चालू अंकापासून या पुस्तकांत नियमितपणें येणाऱ्या मजकुराशिवाय हरएक प्रकारच्या लोकोपयोगी जाहिराती निराळ्या छापून पुस्तकास जोडण्याचा विचार केला आहे. नियमित मजकुराचे ज्याप्रमाणं प्रत्येक पृष्ठावर दोन रकाने (कालम) करण्यांत येतात, त्याप्रमाणें जाहिरातीचे दोन रकाने करण्यांत येणार नाहींत. जाहिरातीचे दर पुढें लिहिल्याप्रमाणें माफक ठेवण्यांत आले आहेत:—

	रु.	आ.
चार ओळींचे आंत	१	०
पुढें प्रत्येक ओळीस	०	४
दुसरे खेपेस प्रत्येक ओळीस ८३ आणे व तिसरीपासून प्रत्येक ओळीस	०	२
मुदतीच्या जाहिराती मक्त्यानें घेतल्या जातील.		
भाषांतर करणें असल्यास पहिल्या खेपेस दर ओळीस	०	४

कांदेवाडी, मुंबई.

शंकर मोरो रानडे बी. ए.
नाट्यकथार्णवाचे कर्ते व मालक.

॥ श्री ॥

नाट्यकथार्णव.

वैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते ।
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधा ह्येकं समाराधनम् ॥

मालविकाग्निमित्रे श्रीकालिदासः

स्फुरत्कलालापविलासकोमला करोति रागं हृदि कौतुकाधिकम् ।
रोग शय्यां स्वयमभ्युपागता **कथा** जनस्याभिनवा वधूरिव ॥

कादंबर्यां बाणः

पुस्तक २. श्रावण शुद्ध १ शके १८०२ अंक ५

NÁṬYA-KATHÁRṆAVA,

A MONTHLY MAGAZINE

Comprising a series of Marathi Dramas, Novels &c. &c.

विषय. अनुक्रमणिका. पृष्ठ

अभिनवचरित नाटक ८९
प्रहसनसंग्रह.
व्याघ्रांबरी प्रहसन २९
शिलादित्य ७९

मुंबई.
"इंदुप्रकाश" छापखान्यांत छापिला.
(सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधी सर्व प्रकारचे
हक्क मालकांनीं स्वाधीन ठेविले आहेत.)
किंमत ६ आणे.

वर्गणीची पोंच.

	रु.	आ.	पै.
रा. व. यशवंतराव मोरेश्वर केळकर	६		
रा. रा. रामचंद्र बल्लाळ उर्फ बाबासाहेब रानडे	३	—	६
,, विनायकराव माधवराव पितळे	३		
,, गोविंद हरी	३		
,, काशीनाथ त्रिंबक तेलंग	३		
,, विश्वनाथ हरी लोकरे	३	—	२—६
,, महादेव रघुनाथ देवल	३	—	६
,, श्रीराम परशुराम जठार	३	—	६
,, रामचंद्र धोंडदेव वेलणकर	६	—	६
,, वासुदेव केशव मावळणकर	६		
,, शामराव भास्कर	३		
,, मोरो बळवंत फणशे	५		
,, गणेश बळवंत लिमये	५		
,, नारायण महादेव परमानंद	३		
,, बाळकृष्ण श्रीकृष्ण नवलकर	३		
,, आनंदराव एस्. कोठारे	१		
,, रघुनाथ सखाराम बर्वे	३		
,, भगवंतराव वासुदेवजी	३		
,, रावजी भवानराव पावगे	३		
,, काशीनाथ कृष्ण लेले	६	—	१२
रा. रा. सीताराम बाबाजी गुर्जर	३		
,, धाकजी नानजी	३		
,, विनायक विठोबा धैर्यवान	२		
,, आबाजी रावजी नांदेडकर	३	—	६
,, बाबाजी केशव पटवर्धन, (इंदूर लायब्ररी)	३	—	६
,, नरहर बाबाजी सोनार	३	—	६
,, माधवराव वासुदेव देसाई	३	—	६
,, बाजी नारायण नाझर	३	—	६
,, चिंतांबर केशव गाडगीळ	३	—	२
,, भास्कर रामचंद्र सहस्रबुद्धे (बाकीपैकीं)			६
,, गंगाधर त्रिंबक कापशे	३	—	६
,, वासुदेव रामचंद्र पटवर्धन	३	—	६
,, पुरुषोत्तम नारायण दातार	३	—	६

करून घेतलें आहे. तेव्हां आतां तूं एवढें [illegible] हा नाद सोडून दे, आणखी परत जाऊन अक्काला नीट समजावून सांग, म्हणजे ती ऐकेल. वाटेनें जर तो थेरडा डांळेफुटका तुला कुठें दिसला, तर त्याला बेलाशक टार मारून टाक. म्हणजे मी तुला मोठें इनाम देईन.

अश्व०—हां, बाईसाहेब ! तेवढें मात्र माझें काम! तो थेरडा दृष्टीस मात्र पडला पाहिजे, त्याला पाणी पाजायचें काम माझें !

चंद्रा०—अरे पण ते पत्र ?—

अश्व०—बाईसाहेब ! आतां त्या पत्राशीं आपल्याला काय करावयाचें आहे ? आपणाला त्यांतील मजकूर कळलाच आहे.

चंद्रा०—बरें तर. जा आतां, पण तुला सांगितलें तेवढें मात्र ध्यानांत धर हो.

अश्व०—होय बाईसाहेब !

(दोघें जातात.)

प्र० ७.—करश्री बंदरानजीक सपाट मैदान.

(चंडवर्मा आणि शेतकऱ्यासारखा पोशाख केलेला मधुकरराव येतात.)

चंड०—कायरे, अजून टेंकडीच्या पायथ्याशीं यायला कितीसा अवकाश राहिला आहे ?

मधु०—काय पायथ्याशीं ? वाहवा ! आपण तर अर्धी पाऊण टेंकडी चढून देखील आलों, आणि आत्तां हां हां म्हणतां माथ्यावर जाऊन पोंचूं. हेंच पहाना, आपणाला चढतांना दम तरी हा किती लागला आहे !

चंड०—तूं कांहीं तरी म्हणतोस. मला तर वाटतें आपण सपाट जमिनीवरूनच चालत आहों!

मधु०—भलतेंच. हीं आतां दहा वीस पावलें चढून गेलों म्हणजे आपण आलोंच टेंकडीच्या माथ्यावर म्हणून समजा! (कांहीं वेळ चालून) हे पहा आपण टेंकडीच्या माथ्यावर आलों. पंथ वारा किती तरी जोरानें वाहत आहे ! मला वाटतें आपण याच्या जोरानें कोणीकडच्या कोणीकडे उडून देखील जाऊं! अणखी हें पाहिलें का ? अबाबाबा ! ह्या टेंकडीचा हा समुद्राच्या अंगचा कडा किती पण उभाच तुटला आहे ! हें पहा! नीट लक्ष देऊन ऐका ! ह्या समुद्राच्या लाटा जोरानें सिंधुनदाच्या पाण्यांत कालवत आहेत त्यांचा आवाज तुह्मांला ऐकूं येतो ना ?

चंड०—अरे, तूं हें काय बोलतो आहेस ? तूं वारा वाहण्याच्या आणि समुद्राच्या पाण्याचा आवाज होण्याच्या गोष्टी बोलतोस, पण मला दोहोंतून एकीचा देखील अनुभव येत नाहीं हें कसें ?

मधु०—हां हां—आतां समजलों—तुमचे डोळे नाहींसे झाले, त्याच्या विवंचनेंत तुमचीं स्पर्शाचीं आणि श्रवणाचीं इंद्रियेंही बधिर होऊं पहात आहेत हेंच खरें !

चंड०—अरे, तूं म्हणतेस तसेंही कदाचित् असेल! पण हें कसें कायरे ? मला तुझा आवाज बदलल्यासारखा वाटतो, आणखी तूं अगोदर बोलत होतास त्यापेक्षां निराळ्या तऱ्हेचें आणि चांगलें बोलत आहेससें मला वाटतें?

मधु०—म्हातार बाबा ! तुह्मीं चुकतां खचित! माझा एक पोशाख मात्र कायतो बदलला, त्याशिवाय मी पूर्वीचाच कायम आहे.

चंड०—तरी पण मला वाटतें, तुझी आत्तांची भाषा पूर्वीहून अधिक रसाळ आणि श्रवणीय आहे!

मधु०—म्हातार बाबा ! चला असे अंमळ पुढें या. हां—तुह्मीं मघां म्हणालां होतां ती जागा हीच ! अहाहा ! येथून खालीं पाहिल्याबरोबरच डोकें फिरूं लागतें ! सिंधुसंगमावर पात्रापासून उंच असे कित्येक मोठ-

मोठे पक्षी आकाशांत मंडलाकार भ्रमणें करीत आहेत, पण ते येथून पहा कसे अगदीं गोंगलगाईएवढे लहान वाटत आहेत! ते पुढें पहा खलाशी लोक आपआपल्या तारवांत बसून इर्ष्येनें इकडून तिकडे तारवें नाचवीत आहेत, परंतु ते या येथून तारवांत उंदीर किंवा घुशी असल्याप्रमाणेंच अगदीं लहान वाटत आहेत! आणखी एवढीं मोठीं तारवें पण काय अगदीं लहानशा होडक्यांप्रमाणें वाटत आहेत! खालीं समुद्राच्या तीरीं उभें राहिलें असतां तीरावर आपटणाऱ्या लाटांचा जेवढा मोठा खळखळाट ऐकूं येत असतो, त्याचा शतांश सुद्धां येथें उभा राहून ऐकूं येत नाहीं!--छेः--पण बोवा, आणखी खालीं पहात असतां एकादें चक्कर आलें, तर एकदम खालीं कोसळून गच्छंतीची मात्र पाळी येईल!

चंड०—बरें तर मग, तूं आतां आहेस त्या जागीं मला उभा कर.

मधु०—ठीक आहे. धरा माझा नीट हात धरा, आणखी येथें नीट जपून उभे रहा. टेंकडीचा तुटलेला कडा येथून सारा एका वितीच्या अंतरावर आहे. आपणाला कोणीं सर्व जग देतों येथून खालीं उडी टाक म्हणून म्हटलें, तरी आपली कांहीं खालीं उडी टाकण्याची छाती नाहीं व्हायची!

चंड०—हां—मी राहिलों उभा, आतां माझा हात सोड पाहूं. गडग्या! माझ्या खिशांत कायती एवढी पुंजी राहिली आहे, ती तूं घेच! नाहीं म्हणूं नको! परमेश्वर तुझें कल्याण करो! आतां तूं येथून लांब जा आणखी मी गेलों म्हणून मला ओरडून सांग! तूं जायला लाग पाहूं, तुझीं पावलें मला ऐकायला आलीं पाहिजेत.

मधु०—म्हातारे बाबा! हा मी चाललों, रामराम!

चंड०—रामराम!

मधु०—(आपणाशीं) बाबांची अशी दुःखावस्था झाली असूनही इतका वेळ मीं त्यांना भलतेंच सांगून फसविलें, तें त्यांच्या मनांत आत्महत्या करण्याचें वेड शिरलें आहे तें काढून टाकण्याकरितां! हे सर्वसाक्षी **सूर्यनारायणा**! तुलाच डोळे आहेत!

चंड०—(हात जोडून) हे चराचरनियामक ब्रह्मांडाधीश परात्पर भगवन्! कोटिसूर्यांपेक्षांही प्रदीप्त आणि उज्वल ज्याचे चक्षु, त्या तुझ्या दृष्टीसमोर मी आपल्या या हतजीविताचा त्याग करीत आहें याची मला क्षमा कर! हे दयाघन प्रभो! तूं सर्वांतर्यामी असून सर्वसाक्षी आहेस! तुला माझीं दुःखें अवगत आहेत, आणि तूं माझ्या जिवाचे क्लेश प्रत्यक्ष पहातच आहेत! तूं सर्वशक्तिमान् सर्वसह आहेस, परंतु हा तुझा नम्र सेवक निःशक्त आणि क्लेशाक्षम आहे. याकरितां त्याच्या पातकाचें क्षालन तूंच कर! परमेश्वरा! आतां मी तर चाललोंच, त्यापेक्षां तुला दुसरी विनंती ती काय करूं! एवढेंच कर, जर माझा प्रियपुत्र **मधुकर** अजून जिवंत असेल, तर त्याचें तेवढें कल्याण कर, एवढेंच तुजजवळ माझें नम्रपणानें अखेरचें मागणें आहे!—अरे—ए—गेलासकारे!

मधु०—(लांबून ओरडल्यासारख्या शब्दानें) होय गेलों, दूर गेलों!

चंड०—फार उत्तम!—परमेश्वरा! राम! राम!—(खालीं उडी टाकल्यासारखें करितो, त्याबरोबर घेरी येऊन पायांखालच्या सपाट जमिनीवर निश्चेष्ट पडतो.)

मधु०—हरहर! मी आपणाकडून तर बाबांना

वांचविण्याकरितां ही गोष्ट केली, पण तींत अखेर मीच फसलों काय? बाबा तुर अगदीं मेल्याप्रमाणें निश्चेष्ट होऊन पडले आहेत, आतां काय करावें?(त्यास वारा घालूं लागतो.) महाराज! बा—! महाराज! सावध व्हा! परमेश्वरा! काय माझें नशीब! अखेर बाबा मला नाहींसे झाले काय? हायहाय! (इतक्यांत चंडवर्मा हळू हळू सावध होऊं लागतो तें पाहून आनंदानें आपणाशीं) परमेश्वरा! तूं धन्य आहेस! माझ्या परमपूज्य पित्याचा प्राणदाता तूंच आहेस! (इतक्यांत चंडवर्मा चांगला सावध होतो त्यास) अहो महाराज! आपण कोण आहां? आपलें नांव—

चंड०—अरे, तूं रे कोण? चल येथून निघून जा! मी जीव देणार आहें, तूं माझ्या बेताआड येऊं नको! चलहो एकदम चालता हो कसा!

मधु०—(स्वर बदलून) महाराज! आपण कोणी विलक्षण पुरुष आहां असें मला वाटतें! आपलें शरीर कापसाहून किंवा पराहूनही हलकें आहे असें मला वाटतें! कारण तसें नसतें तर आपल्या शरीराच्या केव्हांच अगदीं चिंधड्या होऊन गेल्या असत्या! केवढा चमत्कार! आपण पंधरा वीस भाले उंचीवरून खालीं पडलां, असें असून प्रल्हाद बालकाप्रमाणें आपला श्वासोच्छ्वास कायमच आहे! आणखी आपल्या अंगावर कोठें एवढेंसुद्धां खरचटलें नाहीं कीं रक्त निघालें नाहीं!—महाराज! बोला बोला! आपण असें अद्वितीय पुरुष आहां तरी कोण!

चंड—मी कोणी असेन. पण एवढें सांग, मी खरोखरीच पडलों कीं नाहीं पडलों?

मधु०—हें काय विचारावें? महाराज! आपण आहां येथून वर टेंकडीच्या माथ्याकडे पाहिलें असतां दृष्टि देखील टरत नाहीं, आणखी तेथें असणाऱ्या घारी आणि इतर पक्षी पहा कसे शुद्ध चिमणी एवढे लहान दिसताहेत! महाराज! आपण एकवार डोळे वर करून पहा तर खरे!

चंड०—(उसासा टाकून) गड्या! मी दोन्ही डोळ्यांनीं अंध आहें!—हायहाय! किती दुर्भाग्य मी, कीं प्राण देऊन या दुःखांतून मुक्त होण्याचेंही मला सामर्थ्य नाहीं! असो. दुःखांत सुख एवढेंच मानावयाचें कीं तो दुष्ट माझ्या महाराजांचा जीव घेणार होता, त्याच्या हातून त्यांचे तरी प्राण मला वांचवितां आले!

मधु०—म्हातार बाबा! तुम्हीं माझा हात धरून उठा! अस्से! आतां तुम्हांला कसें काय वाटतें? उभें रहाण्यापुरती पायांत शक्ति आहेना? अस्से, असे नीट उभे रहा पाहूं.

चंड०—अरे माझ्या पायाला काय धाड झाली आहे? मी हा पहा चांगला उभा रहातों.

मधु०—हे बोवा मोठेंच आश्चर्य! पण काय हो, मघां मी वरती कड्याच्या माथ्याकडे पहात होतों, तों मला तुमच्या जवळून कोणसेंसें गेलेलें दिसलें तें कोण?

चंड०—तो एक गरीब हतभाग्य भिकारी होता.

मधु०—काय असेल तें असो. पण मी इथून पहात होतों, तों त्याचे डोळे मोठ्या पेटलेल्या होळीएवढे मोठे दिसत होते. त्याला शंभर दोनशें तरी नाकें होतीं, आणि एक एक नाक हत्तीच्या सोंडेपेक्षांही लांब होतें! खचित तो राक्षस किंवा पिशाच समंध ह्यांपैकी कोणी तरी होता! असो. तो तुम्हांला सोडून गेला आणखी तुम्हीं इतक्या उंचीवरून खालीं पडलां असतांही तुमचे

प्राण वांचले, यावरून तुमच्यावर ईश्वरानें दयाच केली असें मला वाटतें !

चंड०—हां—हां. आत्तां मला आठवतें. इतःपर मजवर कसलींही दुःखें कोसळलीं, तरी मी तीं सोशीन, आणि फिरून प्राणत्यागाची म्हणून गोष्ट काढणार नाहीं ! तूं आतां म्हणालास त्याला मी पहिल्यानें मनुष्यच समजलों होतों ! आतां पक्कें स्मरतें, तो समंध समंध म्हणून ओरडत होता खरा! आणखी त्यानेंच मला त्या कडयाच्या माथ्यावर आणून पोंचविलें !

मधु०—जाऊं द्या, आतां त्याचें फिरून नांव काढूं नका, आणखी होईल तितकें आपलें दुःख गिळून जा !—अरे, पण हें कोण इकडे आलें हें ?—(आपणाशीं) अरे ! आमचे **अतिपींड** महाराज तेच हे ! हाय हाय ! यांना खचित वेड लागलें आहे, व त्यांनीं त्या वेडांतच ह्या वेली आणि हीं फुलें यांचें अंगावर ओझें गुंडाळून घेतलें आहे !

(इतक्यांत आतां सांगितल्याप्रमाणें चित्रविचित्र वेषधारण केलेला अतिपींडराजा येतो.)

अति०—(भ्रमिष्टपणें धांवत धांवत) अरे, चोर मला बनावट राजा म्हणतात काय ? मूर्खांनो ! मी खराखुरा राजा आहें हें तुम्हांला ठाऊक नाहीं काय ?

मधु०—(आपणाशीं) हरहर ! या महाराजांची ही स्थिति पाहून आपलें काळीज तर जणों फाटूनच जात आहे.

अति०—अरेरे अधमांनो ! माझ्या मुखश्रीवर राजलक्ष्मीचें तेज विराजमान झालेलें तुम्हीं पहात नाहीं काय ?—हो हो हो ! भली भली गाजविली !—प्रधानजी ! याला दहा हजार मोहोरा आणि उंच पोशाख द्या !—अरे, छेः—यानें निशाण चुकाविलें! हा आपल्या तैनातींत उपयोगी नाहीं !—अरे कोणरे! माझ्या रत्नखचित किरीटावर नवीन राघू बसविला कारे ए—! अरे, पण—पण हा काय चमत्कार ! ही येथें घूस कुठून आली बरें?—आः दुष्टा विपक्षाधमा ! तूं या **अतिपींड** राजापुढें आपल्या शौर्याचें वर्णन करितोस काय ? चल मूर्खा ! युद्धांत तुझा निःपात करितों—अरे हो—प्रधानजी ! चला आत्तांच्या आत्तां शिकारीला जायचें म्हणून सर्व सिद्धता करा !—ओहो ! हा हा हा ! हुय्यो हुय्यो ! कसा बाण, नेमका लागला !—अरे तूं कोणरे ? येथेंच पहाऱ्यावर असतोस? खुणेचा शब्द बोलून दाखीव पाहूं!

मधु०—(मोठ्यानें) हांभळो सांभळो !

अति०—ठीक! तूं सावधगिरीनें पहाऱ्यावर अस!

चंड०—अरे ! हा पण काय चमत्कार ? हा स्वर मला ओळखीचासा वाटतो !

अति०—(चंडवर्म्याकडे पाहून) अहाहा! अरे, हीच ती माझी दुष्ट कन्या **शशिकला**! मला ओळखतांयेऊं नये म्हणून हिनें ही पांढरी दाढी लाविली आहे काय ? आः दुष्टे !—अरे पण हें कसें ? त्यांनीं माझ्या पुढें तोंडपुजेपणा केला काय ? माझ्या मस्तकावरील हे केंस काळे व्हायच्या पूर्वीच माझें केंस पांढरे होते म्हणून सांगितलें हें कसें काय बरें! गुलाम मी त्यांना इतकें खोदून खोदून विचारिलें, तरी त्यांचें होय, नाहीं, हेंच बहुतेक चाललें होतें ! गुलाम चोर ! त्यांनीं मला भलतेंच समजाविलें ! ज्या वेळीं मेघजलाच्या धारा अंगावर पडून मी अगदीं भिजून गेलों, थंडीमुळें माझें दांत कुडकुड वाजूं लागले, मेघांचे गडगडाट आणि वि-

द्युल्लतांचा चकचकाट यांची एकसारखी गर्दी उडाली, त्या वेळीं ते गुलाम मला भेटले आणखी त्यांनीं मला महासमर्थ ह्मणून ह्मटलें, पण हें अगदींच खोटें, कारण तसें जर ह्मणावें तर ही थंडी लागून माझे सांधे कां धरूं पहात आहेत ? मी त्यांना नको ह्मणून सांगत असतांही ते कां धरावयाचे रहात नाहींत ?

चंड०—अरे, हा स्वर मी खचित ओळखला ! कायरे, हे महाराजच नव्हेत काय ?

अति०—अरे, तूं मला ओळखलेंस? वरोबर! सिंधुदेशाधिपति **अतिपीड** महाराज ह्मणतात तो मीच !—तुला माझा दरारा माहित आहे आणि ह्मणूनच तूं मजपुढें थरथर कांपत आहेस ! चल, याकरितां तुझा गुन्हा तुला माफ करितों!—अरे माझे राजवैद्य कोठें आहेत ? हां हेच ते ! वैद्यराज ! माझी नाडी पहा, आणखी मला नीट औषध द्या! माझें कपाळ कसें या टिकाणीं ठणकतें आहे!

चंड०—महाराज ! हा आपलाच हात काय ? हाय हाय ! अश्रूंनो ! आतां स्वामिभक्तीच्या पवित्र झरींतून निघणारे तीर्थस्वरूपी तुह्मीं या महाराजांच्या **विष्णु**पदास स्नान घाला !

अति०—हां—अरे माझ्या पायाला एकदम स्पर्श करूं नको, कारण त्याला या नरकभूमीचा विटाळ झाला आहे !

चंड०—हायहाय ! काय हा संसार ! धिक्कार असो याला ! महाराज ! आपण या आपल्या हतभाग्य दासाला ओळखिलें काय ?

अति०—अगे, तुला पलीकडे हो ह्मणून ना ह्मटलें ? तुझे हे डोळे मी पक्के ओळखतों! खबरदार इतःपर मजवर आपले नयनकटाक्षबाण सोडशील तर ! मी अज्ञानें कधीं बधावयाचा नाहीं ! तूं स्त्रीरूपी **शूर्पणखा** आहेस, याकरितां तुझ्या अंगावर बाणानें हा लेख लिहून तुझी **अंतकपुरास** रवानगी करितों ! अललल !—दुष्टे ! माझी शरसंधानकरणी कशी आहे ती दृष्टीनें नीट अवलोकन कर !

चंड०—महाराज ! क्षमा असावी ! महाराज ! या वेळीं आपण मजपुढें प्रत्यक्ष द्वादश आदित्य आणून उभे केले, तरी मला एवढें सुद्धां दिसणार नाहीं !

मधु०—(आपणाशीं दुःखानें) शिव शिव ! या महाराजांची ही स्थिति जर मला कोणीं वर्णन करून सांगितली असती, तर ती मला खचित खचित मिथ्या वाटली असती! हायहाय ! यांची ही अशी स्थिति पहाणें नशीबीं यावें काय ? खचित खचित! यांच्या या दुःखदायक स्थितीच्या दर्शनानें आपली तर छाती फुटूनच गेली !

अति०—अरे, कायरे, तुला अवलोकन कर ह्मणूनना ह्मटलें ?

चंड०—हाय हाय ! महाराज ! आतां मी या डोळ्यांनीं अवलोकन करूं काय ?

अति०—अरे, काय तुला डोळे नाहींत ? तर मग तूं हें जग पहाणार कसा ?

चंड०—महाराज ! आतां मला कसचें पहातां येणार ? डोळे गेले, आतां एक स्पर्शेंद्रिय मात्र उरलें आहे !

अति०—अरे, तूं वेडा आहेस. चुकतोस. तुझ्या स्पर्शेंद्रियाशिवाय तुझें श्रवणेंद्रिय अद्यापि कायम आहे, त्यानेंही तुला पहातां येईल. तो पहा न्यायाधीश त्या चोराला शिक्षा सांगत आहे! हं—आतां यांतला न्यायाधीश कोणता तो सांग पाहूं !—कायरे गांवांतलीं कुतरीं एकाद्या

भिकाऱ्याच्या अंगावर भोंकतांना तूं कधीं पाहिलीं आहेस ?

चंड०—होय सरकार !

अति०—आणखी कुतरीं भोंकलीं ह्मणजे भिकारी पळून जातो हेंही तूं पाहिलें आहेस ?

चंड०—होय महाराज !

अति०—झालें तर मग. ह्याचें नांव सत्ता. कुतरीं जोंपर्यंत कामगिरीवर आहेत तोंपर्यंत त्यांची सत्ता चालते. याकरितां सत्ता पाहिजे. सत्ता चालायला तिच्या मानानें बाहेरच्यें सोंग असलें पाहिजे. अंगांत फाटका अंगरखा असला तर त्याचे आडून शरीरावरील दोष दिसतात, परंतु तेच वरून चांगले जाडी भपकेदार झगे घातले असतां दिसत नाहींसे होतात. ह्मणून भपक्यानें राहिलें पाहिजे. आणि हरयुक्तीनें लोकांस फसविलें पाहिजे. समजलास नीट ? मी सांगतों हें नीट ऐकून घे आणि त्याप्रमाणें वाग. तूं समजूं नकोस मला वेड लागलें आहे ह्मणून? माझी एक एक गोष्ट ऐकून घे. तुला डोळ्यांनीं दिसत नाहीं, पण तूं लोकांना तसें सांगत नको जाऊं. तूं आपल्या डोळ्यांत कवड्या बशीव, आणखी त्यांच्यावर शाईनें छान बुब्बुळें काढीव, ह्मणजे तुला डोळे नाहींत तरी लोक तुला डोळे आहेत असेंच समजतील आणखी फसतील.—अरे कोण आहे रे ? शिकारीला निघण्याची तयारी करा रे ए—अरे, माझी बरची रे—

मधु०—(आपणाशीं) हरहर ! महाराजांची कोण दुर्धर स्थितिही ! इला वेड ह्मणावें, तर मोठ मोठ्या समजुतीच्या गोष्टी सांगताहेत, तसें न ह्मणावें तर भाषणांत सगळाच विसंगतपणा भरला आहे ! हायहाय! नशिब !

अति०—अरे, तुला रडूं येतेंसें वाटतें, ठीक ठीक! तूं रडणार असलास, तर तुला मी आपले डोळे उसने देतों, ते घे आणि खुशाल रड!—अरे, तूं तर माझ्या पक्का ओळखीचा दिसतोस. तुझें नांव **चंडवर्मा** नव्हे काय ?

चंड०—होय सरकार ! आपला हतभाग्य सेवक **चंडवर्मा** तोच मी !

अति०—तरीच तुला नुकतें पाहिलेलें मला आठवतें! मला वाटतें, माझ्या त्या कृतघ्न कारटीच्या आणखी तिच्या नवऱ्याच्या जवळच तूं माझ्या दृष्टीस पडला होतास ! होय असेंचना ?—आः—अरर—कारटे !—दुष्टा!—थांबा तुझां दोघांचेही प्राण घेतों !

(इतक्यांत राजवाहन राजाचा एक सरदार कांहीं सेवकांनिशीं येतो.)

सर०—अरे, हेच ते **अतिपीड** राजे !—अरे, पहातां काय ? यांचे हात धरा ! अस्से!—महाराज! आपली प्रियतम कन्या आमच्या—

अति०—अरे, कायरे, हे मला कैद करितात काय ? काय, मला कोणीच सोडवीत नाहींत ? हायहाय ! एकून मजवर आज हा असा प्रसंग आला काय ? अरे, बाबांनो ! दया करून मला मुक्त करा! मी लागेल तो खंड तुह्मांला देईन ! अरे, माझ्या डोकीवर या इथें आणखी छातींत या टिकाणीं असें बाण लागून भयंकर क्षतें झालीं आहेत, याकरितां कृपा करून कोणा तरी राजवैद्याला मजकडे आणा !

सर०—महाराज ! आपल्या आज्ञेचा मात्र अवकाश, आपण ह्मणाल ती एका क्षणांत तयारी होईल. आपण कांहीं काळजी करूं नये. कृपा करून आपण आह्मांबरोबर चलावें.

अति०—अरे, कायरे, यांच्या हातांत मी एकटाच पडलों आहें ? मजबरोबर दुसरा कोणी

नाहीं ! धिक्कार असो, धिक्कार असो! आतां तर माझे डोळे अश्रूंनीं भरून येत आहेत, त्यांतून अश्रु ह्मणून कधींही खळायचे नाहींत !

सर०–महाराज ! आपण–

अति०–अरे गुलामांनो! तुह्मीं मला ओळखत नाहीं? चोरांनो! मी तुमच्या हातीं अशानें सांपडेन असें तुह्मीं समजतां नव्हे? हा मूर्खांनो! ज्याला महाराजाधिराज **अतिपीडराजे** ह्मणतात तोच मी आहें !

सर०–सरकार! आपण ह्मणतांही गोष्ट अक्षरशः खरी आहे. आपण आमचे धनी आहां. आज्ञा होईल तीप्रमाणें वागण्यास सेवक तयार आहेत!

अति०–हां हां–असें आहे तर मग कांहीं चिंता नाहीं ! एकून मी अद्यापि पहिल्याप्रमाणेंच राजा आहें!–फार उत्तम, तर हा पहा मी चाललों आतां शिकारीला ! (सेवकांच्या हातून निसटून पळून जातो. सेवक त्याच्या मागोमाग धांवत जातात.)

सर०–हरहर ! काय ही या महाराजांची दुःखावस्था ! यांच्या या स्थितीपेक्षां त्यांच्या राज्यांतील अतिशय हीनावस्थ भिकाऱ्यांचीही स्थिति बरी !–असें आहे, तथापि महाराज ! आपण अद्यापि धन्य आहांत, कारण आपल्या दोघी कन्या जरी दुष्ट निघाल्या आहेत, तरी आपली तिसरी कन्या परम सद्गुणी असून तीच आतां आपला सांभाळ करणार आहे !

मधु०–(पुढें येऊन)रामरामहो महाराज रामराम!

सर०–राम राम ! कायरे बाबा तुझें काय ह्मणणें आहे ?

मधु०–दुसरें कांहीं नाहीं. पण आतां लढाई व्हायची आहे तिच्याबद्दल तुह्मांला कांहीं खबर कळली आहे ?

सर०–अरे कळली आहे ह्मणून काय विचारतोस ? ती ज्याच्या त्याच्या तोंडीं अहे.

मधु०–तें खरें, पण शत्रूचें सैन्य अजून कितीसें लांब आहे ?

सर०–अरे लांब कशाचें? एक दोन दिवसांतच तें येऊन पोंचेल ह्मणून वातमी आली आहे. इकडे आमचे **राजवाहनराज** आणि **मृगांकमाला** बाईसाहेब यांच्याही सैन्याची संपूर्ण सिद्धता आहे. बरें असो. मी चाललों. रामराम !

मधु०–राम राम ! (सरदार निघून जातो.)

चंड०–हे दयाघना परमेश्वरा ! इतःपर तुझ्या इच्छेविरुद्ध मी कदापि जाणार नाहीं ! तुला वाटेल तेव्हां तूं माझा अंत कर, तोंपर्यंत मी मरणाची इच्छा धरणार नाहीं.

मधु०–आतां मात्र बाबा आपण बरोबर बोललां.

चंड०–आं–तूं रे कोण ?

मधु०–नाहीं बाबा, मी असाच एक कोणी तरी गरीब मनुष्य आहें. व या जगांत मी आजपर्यंत अनेक दुःखें अनुभविलीं असल्यामुळें मला दुसऱ्याच्या दुःखांबद्दलची फार फार कींव वाटते. चला. असा माझा हात धरा, मी तुह्मांला कोठें तरी घेऊन जाऊन तेथें तुमचा रहायची सोय करितों.

चंड०–हे दयाळु पुरुषा! तुझे मजवर मोठे उपकार आहेत. परमेश्वर तुझें कल्याण करो!

(इतक्यांत अश्वसेन येतो.)

अश्व०–आं हारे कोण ? अरे हा चतो आंधळा, ज्याच्या करितां **चंद्रानना** बाईनीं मला इनाम द्यायचें कबूल केलें आहे !–वाहवा ! एकून माझें नशीब आज फळफळणार खचित ! (पुढें येऊन) अरे ए आंधळ्या ! गुलामा ! फार चांगला मला आयताच

सांपडलास ! थेरड्या ! राजद्रोह करणारा तो तूंच काय ? दुष्टा ! हा पहा मेलास !

चंड०—अरेरे ! मज गरीब आंधळ्यावर हात कोणी उचलतो आहे काय ! अरे, गड्या, तूं तरी बाबा माझें संरक्षण कर !

(मधुकर अश्वसेनाच्या अंगावर चालून जातो.)

अश्व०—अरे ए गांवढळा ! हा थेरडा या देशाच्या राजाचा प्रसिद्ध शत्रु असून त्याचें संरक्षण तूं करण्यास प्रवृत्त होऊं नको ! चल चालतां हो, नाहीं तर या आंधळ्या थेरड्याबरोबर तुलाही मरण्याची पाळी येईल ! चल याचा हात सोड !

मधु०—(कच्छी भाषेंत) हूं चोसतां कें तोंका मारामारी करींदोवगर ना वेंदो ! (१)

अश्व०—हरामखोरा ! साड याला नाहीं तर हा पहा मेलास !

मधु०—ई सारा माडू ! व्यो बा, आ गरीब माडू आएं, इनके क्यो छड करींदोस ? छडी दे मंजी गाल. आजे आर् काल हूं मरींदोस; इ डोसो आएं इंजि छेड ना काढ बा! चल व्यो बा व्यो ! तूं मुके सारी जानजो हूं खराब माडू आएं. तोके हूं एच ठिकाणजों चित करेंजो, याद राखजो ! (२)

अश्व०—अरे जारे मूर्खा ! तुझी घडी भरली हेंच खचित! हा पहा मेलास. (दोघे लढतात.)

मधु०—हरामखोर! तारे बात्रीश आएंना, इ मळे उखळी नाखीश ! तोजो हत्यार हाएं इनकों हूं मिर्इनास, इ मळे खातर नाखजो ! (२)

(अश्वसेन पडतो.)

अश्व०—आं—अरे रे रे—दुष्टा ! घात केलास ! आज या थेरड्याला टार मारून आपणाला जन्माचा अमर करून घेण्याचा माझा घाट होता, तो तुंझ्यामुळें वायां गेला! हाय हाय! —असो नशीब! अरे ए गांवढळा! तूं कोणीही अस, आतां मी तर मरणोंच, पण एवढी माझी थैली तुला देतों ही घे, आणखी या लढाईंतून जर जगला वांचलास तर मला चांगल्या प्रकारें मूठ माती दे ! तसेंच माझ्या खिशांत हें एक पत्र आहे एवढें कसेंही करून **उदासदुर्गचे मरुत्सेनराव** यांच्या हातीं पोंचीव ! ते तुला एक दोन दिवसांत **सिंधु**राजाचा सैन्यांत भेटतील ! -अरे रे रे ! मी इतक्यांतच फुकट फुकट मेलों ! अरे—! अं—अं—अं—अरे मे—अं—मेलों—अं—मे—मे—

(मरून पडतो.)

मधु०—हा चोर गुलाम मला फार दिवसांपासून माहित आहे ! हरामखोर पहिल्या प्रतीचा भडवा !

चंड०—अरे बाबारे—ए—काय तो मेला होरे ?

मधु०—ह्यातार बाबा! तुह्मीं येथें खालीं स्वस्थ बसा. काळजी करूं नका. तोंपर्यंत याच्या खिशांत काय काय आहे तें पहातों. त्यानें खिशांत एक पत्र आहे ह्मणून सांगितलें आहें कोणीं सांगावें तें पत्र आपल्या उपयोगीं नाहीं पडायचें ह्मणून ? तो तर मेलाच, परंतु तो माझ्याच हातून मेला याबद्दल मला वाईट वाटतें. असो. (त्याच्या खिशांतून एक पत्र बाहेर काढतो.) हां हेंच तें पत्र. हें मी फोडूं

---

(१) तुला सांगतों मी तुला दोन हात दाखविल्याशिवाय जाणार नाहीं. (२) भल्या गृहस्था ! चल जा. या गरीबाला उगीच का त्रास देतोस ? तूं माझी गोष्ट सोडून दे. मी आज नाहीं उद्यां मरणार, पण तूं या ह्मातार्‍याला त्रास नको देऊं. चल निघून जा, नाहीं तर मी फार वाईट आहें. तुला येथल्या येथेंच चित करून टाकीन ध्यानांत असूं दे.

(१) हरामखोर! तुझी बत्तिशीच खालीं आणीन. तुझ्या तरवारीला मी भ्यायचा नाहीं. खूप यादराख.

कां ? दुसऱ्याच्या नांवचें पत्र फोडायचें वाईट वाटतें; परंतु **मरुत्सेनराव** बोलून चालून शत्रुपक्षाकडचा, आणि तशांतून ही लढाईची वेळ! तेव्हां कांहीं चिंता नाहीं, फोडतोंच!—

(पत्र फोडून वाचूं लागतो.)

श्री. :

" प्राणप्रिय विरहिणीमानसमराल

" बहुगुणमंडित श्री. रा. रा. मरु-

" त्सेनराव उदासदुर्गकर यांचे सेवेसि.

" चरणीं सदा लीन होणारी आज्ञाधारक

" प्रियतमा दासी, **शशिकला** इचीं अनेकवार

" नामस्मरणपूर्वक प्रीतिचुंबनें आणि प्रीत्या-

" लिंगनें. वि. वि. आपण या दासीला सोडून

" गेलां, त्या वेळच्या आपल्या अभिवचनाचें वि-

" स्मरण न व्हावें. तिकडे या जगांतून काढून

" टाकावयाची सवड आली असतां काय

" तजवीज करावयाची हें आपणास कळ-

" विणें नलगेच. जर त्यांना युद्धांत यश ये-

" ऊन ते जिवंतपणीं परत आले, तर मग

" माझा घात झाला असेंच आपण समजावें. कारण

" तसें घडलें असतां ते मला आपल्या मंदिरांत

" सदासर्वदा खिळून टाकतील, आणि मग तें

" बंदीदुःख माझ्यानें सोसवणार नाहीं. याक-

" रितां हरयुक्तीनें हा बंद अगोदरच काढून

" टाकण्याची तजवीज जरूर जरूर झाली

" पाहिजे. ती झाली म्हणजे मी जन्माची आ-

" पली धर्मपत्नी झालें असेंच समजावें. कळावें

" बहुत काय लिहिणें दासीचें रक्षण कीजे

" हे विज्ञापना. "

धिक्कार असो ! काय हा स्त्रियांचा घातकीपणा ! ही दुष्ट स्त्री आपल्या सद्गुणी पतीचा घात करून माझ्या भावाशीं व्यभिचारकर्म करूं इच्छिते काय ?—कांहीं चिंता नाहीं. मी हें दुष्ट पत्र असें या ठिकाणीं पुरून ठेवितों. योग्य संधि पाहून तें **खलदुर्जनरा**वाच्या हातीं पोंचवीन !

चंड०—अरेरे ! मी किती अधम आहें ! आमच्या राजे साहेबांस वेड लागलें असून त्याबद्दल कांहींच दुःख मनांत न आणितां आपल्याच दुःखांत चूर होऊन गेलों आहें ! त्यापेक्षां—(इतक्यांत लांब अंतरावर सैन्याच्या नगाऱ्यांचा आवाज ऐकूं येतो.)

मधु०—हं, म्हातार बाबा ! जलदी करून आतां आपणाला येथून गेलें पाहिजे. कारण हा पहा नगाऱ्याचा आवाज ऐकूं येत आहे. चला चला, माझ्या चांगल्या ओळखीच्या ठिकाणीं तुमची सोय करितों. चला चला !

(त्याला घेऊन जातो.)

प्र० ८.—सौराष्ट्रराजाच्या सैन्याचा तळ.

एका सुशोभित तंबूत मोठा बिछाना पसरला असून त्यावर अतिपीडराजा झोंपीं गेला आहे. अंतरावर कांहीं गवय्ये आणि वाजवय्ये बसले असून त्यांचें मधुर संगीत आणि वादन चाललें आहे. सेवक आसपास अंतरावर उभे आहेत.)

(इतक्यांत एका अंगानें मृगांकमाला, कांतिवर्मा आणि राजवैद्य येतात.)

मृगां०—**कांतिवर्मजी** ! आपले मजवर अगणित उपकार आहेत ते मजकडून कसे फिटतील ते फिटोत. मीं आपल्या कातडयाचे जोडे करूनही तुमच्या पायांत घातले, तरी देखील मी आपली उतराई होणार नाहीं.

कांति०—बाईसाहेब ! मीं केलें यांत दासधर्मापलीकडे कांहीं नाहीं. मीं महाराजांचें जन्मभर अन्न खाल्लें, त्याचे पुढें याची मातब्बरी मी मुळींच समजत नाहीं.

मृगां०—तें असो; पण **कांतिवर्मजी**! आपणाला

माझें एक सांगणें आहे तें आपण ऐकिलें पाहिजे. आपल्या ह्या वेशावरून आपण आजपर्यंत अनुभविलेल्या दुःखांचें विनाकारण वारंवार स्मरण होतें, याकरितां आपण हा काढून टाकावाचा !

कांति०—बाईसाहेब! माफी असावी. मीं ज्या हेतूनें हा वेश घेतला, तो हेतु हा वेश टाकून दिल्यानें विफल होईल. याकरितां आपणापाशीं मी एक गोष्ट मागून घेतों, ती ही च कीं, माझे सर्व बेत जमून येऊन मी आपण होऊन आपल्या स्वरूपानें बाहेर पडेपर्यंत आपण मला ओळखतां असें कोणासही दाखवूं नये.

मृगां०—असें आहे तर मर्जी आपली! (वैद्याकडे पाहून) बरें कसें काय? वैद्यराज ! बाबांची प्रकृति आतां कांहीं आहेना बरी ?

कांति०—बाईसाहेब! महाराजांना स्वस्थपणें झोंप लागली आहे.

मृगां०—आई **अंबाबाई** ! माझ्या बाबांच्या प्रकृतीला आराम पाडणारी आतां तूंच आहेस!

राजवैद्य—बाईसाहेब ! . महाराजांना निजून पुष्कळ वेळ झाला, आतां त्यांना जागें करावें असें मला वाटतें.

मृगां०—वैद्यराज ! या कामीं मी किनई अगदीं अडाणी गोळा आहें. मला यांतलें कांहीं कळत नाहीं. आपण सांगाल त्याप्रमाणें वागण्यास मी सिद्ध आहें.—बरें पण—कायरे बाबांच्या अंगावरचे पहिले कपडे काढून नवीन कपडे घातले ?

१ चा०—होय बाईसाहेब ! महाराजांना अगदीं गाढ झोंप लागली होती, तेव्हांच त्यांचे कपडे आम्हीं बदलले !

रा. वै०—फार उत्तम ! बाईसाहेब ! आतां आपण जवळ जावें. महाराज जागे झाले तरी ते आपणावर रागावणार नाहींत असें मला वाटतें.

मृगां०—मी जातें तर जवळ अं.

रा० वै०—चिंता नाहीं. चलावें आपण जवळ.—अरे, त्या वज्रवाद्यांना सांगा मोठ्यानें वाजवूं लागायला (गवई आणि वजवाद्ये मोठ्यानें गातात आणि वाजवूं लागतात.)

मृगां०—(राजाच्या जवळ जाऊन डोळ्यांत अश्रु येऊन) हायहाय ! बाबा ! आपण या दुखण्यांतून बरे होऊन एकवार तरी मजशीं बोला, आणि प्रेमानें मला आपली म्हणा ! (स्फुंदत स्फुंदत राजाच्या पायांस मिठी घालून त्याच्या तोंडाकडे पहात रहाते.)

कांति०—(आपणाशीं) अहाहा राजकन्ये ! आपल्या दोघी बहिणींपेक्षां तूंच मात्र धन्य खरी ! याचें नांव प्रेम !

मृगां०—बाबा ! काय ही आपली अवस्था झाली आहे ? बाबा ! जर आपण त्या दोघींचे जनक झालां नसतां, तर आपणावर हा प्रसंग आज कशानें येणार होता ? देवा देवा ! अरे किती दिव्य ही राजमुद्रा, आणि हिच्यावर अशीं दुःखाचीं पडळें येऊन पडावींतना ? ज्यांना वृद्धापकाळीं आम्हीं लेकींनीं सदासर्वकाळ सुखच द्यावें, आणि दुःख कसें असतें त्याचें स्वप्नही पडूं देऊंच नये, त्यांचीं ही अवस्था होऊन त्यांस थंडींतून वादळांतून उघडे बोडके हिंडण्याची, आणि पावसांत अगदीं भिजून जाण्याची पाळी यावीना ?—बाबा ! काय ही तुमची स्थिति ! त्या रात्रीं प्रत्यक्ष शत्रूकडील कोणी हलकासा मनुष्य देखील तशा वादळांत सांपडलेला आढळता, तरी त्याला देखील दरवाजा उघडून आंत घेण्याची ती वेळ, असें असतांना त्या चांडाळणींनीं

तुह्मांला नाहींना आंत घरांत येऊं दिलें? आणखी त्यामुळें तुह्मांला त्या तसल्या ओसाड मैदानांत थंडी वाऱ्यांत आणि पावसांत कुडकुडत बसावें लागलें अं? असो. देवा! माझें एवढें तरी मोठेंच भाग्य मी मानतें कीं, तशा स्थितींतूनही तूं बाबांना नीटपणें संभाळून त्यांना माझ्या दृष्टीस पाडलेंस! नाहीं तर तशा भयंकर प्रसंगांतून बाबा निभावून मला कसचे भेटणार होते?-वैद्यराज! आपण बाबांकडे नीट पहा बरें. बाबा जागे होताहेत. आपण त्यांच्याशीं कांहीं बोला.

रा० वै०—नको बाईसाहेब! आपणच बोला. कांहीं हरकत नाहीं!

मृगां०—बाबा! आपणाला आतां बरें वाटतें ना? आपण सावध आहांना?

अति०—अहाहा! हे स्वर्गदेवते! तूं मला स्वर्गलोकांतून काढून टाकितेस काय? सुंदरी! मजवर दया कर, आणि मला पुनरपि मृत्युलोकींचा वास दाखवूं नको. कारण तेथें मी गेलों, तर माझ्या नेत्रांतून कढत अश्रुजळ वाहत राहून **सृष्टी**च्या विश्वभ्रामक अग्निचक्राशीं मी बांधल्यासारखा होईन!

मृगां०—महाराज! मी कोण आपण मला ओळखिलेंस?

अति०—होय. तूं स्वर्गींची देवता आहेस. तुझ्या आकृतीवरून तुझा कांहीं दिवस मृत्युलोकीं वास झाला असावा असें मला वाटतें. सुंदरी! तुला मर्त्यलोक सोडून किती दिवस झाले?

मृगां०—(वैद्याकडे पाहून) हें काय हो? बाबा अजूनही शुद्धीवर नाहीं आले?

रा० वै०—बाईसाहेब! ते अजून पुरतेसे जागे झाले नाहींत. त्यांना कांहीं वेळ असेच राहूं द्या.

अति०—अरे, इतका वेळ मी होतों तरी कोठें? आणि आतां मी कोठं आहें बरें? अंरेरे! माझे नेत्र मला भलतेंच वाटवितात काय? अहाहा! इतक्यांत माझ्यापुढें जी दिव्य देवी मीं पाहिली, ती आणखी एक वेळ जर माझ्या दृष्टीस पडेल, तर त्याच वेळीं मी सुखानें राम ह्मणेन!—अरे, पण मी भ्रांतींत आहे हेंच खचित!—अरे. हे हात माझेच काय? नसतील, पण पाहूं बरें? (नखांनीं आपणास बोचून घेतो.) अरे, मी सावध आहें. भ्रांतींत नाहीं. अहाहा! माझी ही स्थिति खचित कायमची असेल, तर मग मला आणखी अधिक तें काय पाहिजे! (खडबडून मृगांकमालेच्या पायां पडूं लागतो.)

मृगां०—बाबा! तुह्मीं डोळे उघडून मजकडे पहा, आणखी माझ्या मस्तकावर वरदहस्त ठेवा! छे छे—बाबा! मी आपल्या पायां पडायचें तें एकीकडे राहून आपणच उलटे माझ्या पायां पडतां हें काय?

अति०—छे छे, तूं माझी थट्टा करूं नको. माझी साठी उलटून गेली आहे आणि माझ्या बुद्धीला भ्रंश पडल्याचा माझा मलाच संशय वाटतो. तरी पण तूं, आणखी हे गृहस्थ, दोघेंही माझ्या ओळखीचीं असावींत असें मला वाटतें. तरी पण माझी व्हावी तशी खात्री होत नाहीं. कारण मी आपल्याकडून स्मरण व्हावें ह्मणून पुष्कळ विचार करितों, परंतु माझ्या अंगावर हे उंची धड कपडे कोठून आले याचें कांहीं मला स्मरण होत नाहीं, किंवा काल रात्रीं मी कोणच्या ठिकाणीं वस्तीस होतों याचीही मला आठवण पडत नाहीं. कसेंही असो, मला तर खचित वाटतें कीं ही सुंदरी माझी कन्या **मृगांकमाला**च असावी!

माझें एक सांगणें आहे तें आपण ऐकिलें पाहिजे. आपल्या ह्या वेशावरून आपण आजपर्यंत अनुभविलेल्या दुःखांचें विनाकारण वारंवार स्मरण होतें, याकरितां आपण हा काढून टाकावाचा !

कांति०—बाईसाहेब! माफी असावी. मीं ज्या हेतूनें हा वेश घेतला, तो हेतु हा वेश टाकून दिल्यानें विफल होईल. याकरितां आपणापाशीं मी एक गोष्ट मागून घेतों, ती ही च कीं, माझे सर्व बेत जमून येऊन मी आपण होऊन आपल्या स्वरूपानें बाहेर पडेपर्यंत आपण मला ओळखतां असें कोणासही दाखवूं नये.

मृगां०—असें आहे तर मर्जी आपली! (वैद्याकडे पाहून) बरें कसें काय? वैद्यराज ! बाबांची प्रकृति आतां कांहीं आहेना बरी ?

कांति०—बाईसाहेब! महाराजांना स्वस्थपणें झोंप लागली आहे.

मृगां०—आई **अंबाबाई** ! माझ्या बाबांच्या प्रकृतीला आराम पाडणारी आतां तूंच आहेस!

राजवैद्य—बाईसाहेब ! महाराजांना निजून पुष्कळ वेळ झाला, आतां त्यांना जागें करावें असें मला वाटतें.

मृगां०—वैद्यराज ! या कामीं मी किनई अगदीं अडाणी गोळा आहें. मला यांतलें कांहीं कळत नाहीं. आपण सांगाल त्याप्रमाणें वागण्यास मी सिद्ध आहें.—बरें पण—कायरे बाबांच्या अंगावरचे पहिले कपडे काढून नवीन कपडे घातले ?

१ चा०—होय बाईसाहेब ! महाराजांना अगदीं. गाढ झोंप लागली होती, तेव्हांच त्यांचे कपडे आह्मीं बदलले !

रा. वै०—फार उत्तम ! बाईसाहेब ! आतां आपण जवळ जावें. महाराज जागे झाले तरी ते आपणावर रागावणार नाहींत असें मला वाटतें.

मृगां०—मी जातें तर जवळ अं.

रा० वै०—चिंता नाहीं. चलावें आपण जवळ.—अरे, त्या वज्रवाद्यांना सांगा मोठ्यानें वाजवूं लागायला (गवई आणि वजवाद्ये मोठ्यानें गातात आणि वाजवूं लागतात.)

मृगां०—(राजाच्या जवळ जाऊन डोळ्यांत अश्रु येऊन) हायहाय ! बाबा ! आपण या दुखण्यांतून बरे होऊन एकवार तरी मजशीं बोला, आणि प्रेमानें मला आपली म्हणा ! (स्फुंदत स्फुंदत राजाच्या पायांस मिठी घालून त्याच्या तोंडाकडे पहात रहाते.)

कांति०—(आपणाशीं) अहाहा राजकन्ये ! आपल्या दोघा बहिणींपेक्षां तूंच मात्र धन्य खरी ! याचें नांव प्रेम !

मृगां०—बाबा ! काय ही आपली अवस्था झाली आहे ? बाबा ! जर आपण त्या दोघींचे जनक झालां नसतां, तर आपणावर हा प्रसंग आज कशानें येणार होता ? देवा देवा !"अरे किती दिव्य ही राजमुद्रा, आणि हिच्यावर अशीं दुःखाचीं पडळें येऊन पडावींतना ? ज्यांना वृद्धापकाळीं आह्मीं लेकींनीं सदासर्वकाळ सुखच द्यावें, आणि दुःख कसें असतें त्याचें स्वप्नही पडूं देऊंच नये, त्यांची ही अवस्था होऊन त्यांस थंडींतून वादळांतून उघडे बोडके हिंडण्याची, आणि पावसांत अगदीं भिजून जाण्याची पाळी यावीना ?—बाबा ! काय ही तुमची स्थिति ! त्या रात्रीं प्रत्यक्ष शत्रूकडील कोणी हलकासा मनुष्य देखील तशा वादळांत सांपडलेला आढळता, तरी त्याला देखील दरवाजा उघडून आंत घेण्याची ती वेळ, असें असतांना त्या चांडाळणींनीं

तुह्मांला नाहींना आंत घरांत येऊं दिलें? आणखी त्यामुळें तुह्मांला त्या तसल्या ओसाड मैदानांत थंडी वाऱ्यांत आणि पावसांत कुडकुडत बसावें लागलें अं? असो. देवा! माझें एवढें तरी मोठेंच भाग्य मी मानतें कीं, तशा स्थितींतूनही तूं बाँबांना नीटपणें संभाळून त्यांना माझ्या दृष्टीस पाडलेंस! नाहीं तर तशा भयंकर प्रसंगांतून बाबा निभावून मला कसचे भेटणार होते?—वैद्यराज! आपण बाबांकडे नीट पहा बरें. बाबा जागे होताहेत. आपण त्यांच्याशीं कांहीं बोला.

रा० वै०—नको बाईसाहेब! आपणच बोला. कांहीं हरकत नाहीं!

मृगां०—बाबा! आपणाला आतां बरें वाटतें ना? आपण सावध आहांना?

अति०—अहाहा! हे स्वर्गदेवते! तूं मला स्वर्गलोकांतून काढून टाकितेस काय? सुंदरी! मजवर दया कर, आणि मला पुनरपि मृत्युलोकींचा वास दाखवूं नको. कारण तेथें मी गेलों, तर माझ्या नेत्रांतून कढत अश्रुजळ वाहत राहून **स्वर्ग्या**च्या विश्वभ्रामक अग्निचक्राशीं मी बांधल्यासारखा होईन!

मृगां०—महाराज! मी कोण आपण मला ओळखिलेंस?

अति०—होय. तूं स्वर्गींची देवता आहेस. तुझ्या आकृतीवरून तुझा कांहीं दिवस मृत्युलोकीं वास झाला असावा असें मला वाटतें. सुंदरी! तुला मर्त्यलोक सोडून किती दिवस झाले?

मृगां०—(वैद्याकडे पाहून) हें काय हो? बाबा अजूनही शुद्धीवर नाहीं आले?

रा० वै०—बाईसाहेब! ते अजून पुरतेसे जागे झाले नाहींत. त्यांना कांहीं वेळ असेच राहूं द्या.

अति०—अरे, इतका वेळ मी होतों तरी कोठें? आणि आतां मी कोठं आहें वरें? अरेरे! माझे नेत्र मला भलतेंच वाटवितात काय? अहाहा! इतक्यांत माझ्यापुढें जी दिव्य देवी मीं पाहिली, ती आणखी एक वेळ जर माझ्या दृष्टीस पडेल, तर त्याच वेळीं मी सुखानें राम ह्मणेन!—अरे, पण मी भ्रांतींत आहे हेंच खचित!—अरे. हे हात माझेच काय? नसतील, पण पाहूं बरें? (नखांनीं आपणास बोचून घेतो.) अरे, मी सावध आहें. भ्रांतींत नाहीं. अहाहा! माझी ही स्थिति खचित कायमची असेल, तर मग मला आणखी अधिक तें काय पाहिजे! (खडबडून मृगांकमालेच्या पायां पडूं लागतो.)

मृगां०—बाबा! तुह्मीं डोळे उघडून मजकडे पहा, आणखी माझ्या मस्तकावर वरदहस्त ठेवा! छे छे—बाबा! मी आपल्या पायां पडायचें तें एकीकडे राहून आपणच उलटे माझ्या पायां पडतां हें काय?

अति०—छे छे, तूं माझी थट्टा करूं नको. माझी साठी उलटून गेली आहे आणि माझ्या बुद्धीला भ्रंश पडल्याचा माझा मलाच संशय वाटतो. तरी पण तूं, आणखी हे गृहस्थ, दोघेंही माझ्या ओळखीचीं असावींत असें मला वाटतें. तरी पण माझी व्हावी तशी खात्री होत नाहीं. कारण मी आपल्याकडून स्मरण व्हावें ह्मणून पुष्कळ विचार करितों, परंतु माझ्या अंगावर हे उंची धड कपडे कोठून आले याचें कांहीं मला स्मरण होत नाहीं, किंवा काल रात्रीं मी कोणच्या टिकाणीं वस्तीस होतों याचीही मला आठवण पडत नाहीं. कसेही असो, मला तर खचित वाटतें कीं ही सुंदरी माझी कन्या **मृगांकमाला**च असावी!

मृगां०—बाबा ! होय हो होय. आपली हतभाग्य कन्या **मृगांकमाला** ती मीच ! (रडूं लागते.)

अति०—अगे, हें काय? तुझे नेत्र पाण्यानें भरलेले दिसतात!—उगी बाळे उगी ! तूं आपलें हें रडणें टाकून दे, आणखी जर तुजपाशीं कांहीं विष असेल तर मला दे, म्हणजे मी तें पिऊन जातों. मुली ! तुझें माझ्यावर प्रेम नाहीं हें मी जाणतों. पण तुला काय सांगूं? तुझ्या त्या दोघीं बहिणींनीं माझा दुष्टावा करूनच कींगे माझी ही स्थिति केली ! तरी पण त्यांनीं तसें करावयाचें त्यांना कांहीं कारण नव्हतें! तुला कारण तरी आहे!

मृगां०—बाबा ! आपण असें बोलून माझ्या काळजाचें विदारण करूं नये ! आपला दुष्टावा करण्याचें मला कांहीं कारण नाहीं.

अति०—बरें, मी यावेळीं आहें तरी कोठें? सौराष्ट्रांत तर नव्हे ?

कांति०—महाराज ! आपण आपल्या स्वतःच्याच राज्यांत आहां !

अति०—अरे, खरेंच माझी थट्टा करूं नको!

रा० वै०—**बाईसाहेब** ! आपण असें कष्टी होऊं नये ! महाराजांना जो अतिशय पित्तप्रकोप झाला होता, त्याचें पूर्ण शमन झालें आहें हें आपणास दिसतेंच आहे. तरी पण त्यांना एकदमच फार बोलावयास लावितां उपयोगी नाहीं. याकारितां त्यांना आंतल्या अंगास नेऊन निजवावें हें बरें असें मला वाटतें. त्यांना आणखी एक चांगली झोंप येऊन गेली पाहिजे, ती गेली म्हणजे त्यांच्या विषयीं माझें मन निर्धास्त होईल.

मृगां०—देवा ! माझ्या बाबांचा प्राणरक्षक तूंच आहेस !—बाबा ! आपली आंत येण्याची मर्जी आहे ?

अति०—बाळे ! तूं आतां आहेस अशीच जर मजजवळ राहशील, तर तूं नेशील तिकडे मी येईन. परंतु मी तुझ्या पायां पडतों, मीं तुझा महान् अपराध केला आहे तेंवढा तूं पोटांत घालून विसरून जा. कारण कसें झालें तरी मी म्हातारा झालों आहें. आणखी मला खूळही लागलें आहे !

मृगां०—बाबा ! भलतेंच, आपण असा विचार कदापि मनांत आणूं नये. चलावें आंत, मी आपणाशींच राहीन. (**कांतिवर्मा** शिवाय करून बाकी सर्व जातात.) (इतक्यांत एक सरदार येतो.)

सर०—कसें काय बोला ? **सुदर्शनरावाला** त्याच्या चाकरानेंच टार मारिलें म्हणून ऐकिलें ही गोष्ट खरी ?

कांति०—अगदींच खरी. त्याविषयीं मुद्दल संदेहच नको.

सर०—ठीक. बरें पण, असें जर आहे तर त्याचें सर्व सैन्य आतां इकडे यावयाचें, त्याचा नेता कोण आहे ?

कांति०—तें मला बरोबर माहित नाहीं. पण **उदासदुर्गचे चंडवर्मजी**, यांचा लेकवळा पुत्र **मरुत्सेन**, त्यानें सेनापत्य घेतलें आहे म्हणून ऐकतों.

सर०—असेल. बरें पण, **चंडवर्मजीं**चा औरसपुत्र **मधुकरराव** याला **सुदर्शनरावां**चे आज्ञेवरून हद्दपार करण्यांत आलें होतें, तो **प्रमलेश्वर**चे सरदार **कांतिवर्मे** यांस मिळण्याकरितां **मरुदेशीं** गेला म्हणून ऐकतों याबद्दलची कांहीं कमजास्ती बातमी ?

कांति०—कांहीं सांगण्यासारखी नाहीं. कदाचित् तुम्हीं ऐकिलेली बातमी खरीही नसेल. कारण ही लढाईची वेळ आहे. चला आतां आपणाला पुष्कळ कामें करावयाचीं आहेत,

त्यांच्या नादास त्वरित लागलें पाहिजे. कारण शत्रूचें सैन्य फार फार तर आणखी प्रहर द्रोन प्रहरांनीं येथें येऊन ठेंपेल असें वाटतें.

सर०—हा संग्राम मोठा तुंबळ होईल असा रंग दिसतो. बरें, आतां घेतों मी रजा.

(निघून जातो.)

कांति०—इतका वेळपर्यंत तर मजल काटली. आतां अखेरची कार्यसिद्धि होणें किंवा कसें याचा निकाल ह्या संग्रामांत जसें यश किंवा अपयश येईल त्याप्रमाणें होईल.

(निघून जातो.)

अंक ५.

प्र० १—करभ्रीनजीक सिंधुसैन्याचा तळ.

(एका तंबूंत मरुत्सेनराव, चंद्रानना व एक सरदार बसलीं आहेत.)

मरु०—(सरदारास) हें पाहिलें का? तुम्हीं आतां या पावलीं जा, आणि **खलदर्शनरावां**च्या मनांत कांहीं चलबिचल नाहींना झाली याचा नीट शोध घेऊन या.—मला आपणास जयप्राप्ति होण्याविषयीं मुळींच संशय वाटत नाहीं, पण **खलदर्शनराव** आज कसेसेच हेंकेखोर आणि तिरसट झाले आहेत. घटकेंत दहादा आपलें मन बदलतात, त्यांच्याबद्दलच कायती काळजी वाटत आहे.

(सरदार जातो.)

चंद्रा०—अक्काचा सेवक मजकडून तुम्हांला पत्र द्यायला म्हणून घेऊन गेला, त्याची काय वाट झाली कांहीं कळत नाहीं. तो वाट तर चुकला नसेल? किंवा शत्रूच्या हातीं तर सांपडला नसेल?

मरु०—मला कांहीं तसें वाटत नाहीं. मग काय असेल तें असो.

चंद्रा०—(उठून तंबूच्या दाराशीं येते, व आसपास कोणी नाहीं असा कानोसा घेऊन) महाराज! माझ्या मनांत आपल्यापाशीं एका गोष्टीबद्दल बोलायचें आहे. गोष्ट फार गुप्त आहे, व आपणाकडून मागें कांहीं न ठेवितां मी विचारतें याचा जवाब मिळाला पाहिजे.

मरु०—बाईसाहेब! खुशाल पाहिजे तें विचारावें. दास सेवेंत सदा तत्पर आहे.

चंद्रा०—फार उत्तम! मला हेंच पाहिजे होतें. आपण बोललां एवढें खरें करा म्हणजे झालें. मी ऐकतें—कदाचित् खोटेंही असेल—पण आपली विचारतें, आपलें मन अक्कावर बसलें आहे हें खरें का?

मरु०—(आश्चर्य वाटल्यासारखें दाखवून) आपला प्रश्न अंमळ चमत्कारिक पडला, त्यामुळें ताबडतोब जबाब देण्यास अडचण वाटते. आपल्या **शशिकलाबाई** आपणाप्रमाणेंच उत्तम स्वभावाच्या आणि सद्गुणी आहेत, एवढ्यावरून पुरुषाचें मन स्त्रियांविषयीं ज्या प्रकारचें असावें त्या प्रकारचें त्यांजविषयीं माझें मन आहे. पण त्यांत काय? कांहीं विशेष आहे असें मला वाटत नाहीं.

चंद्रा०—तें खरें, पण त्या तसल्या प्रकारांत एकादे वेळीं कांहीं अंमळ विशेष होतो, म्हणून आपली विचारितें.

मरु०—बाईसाहेब! आपला गूढ अर्थ मला समजलासें वाटतें, पण तद्गतला कांहीं प्रकार नाहीं.

चंद्रा०—हें खरें ना पण? आणखी एकदा नीटपणें सांगा, म्हणजे मी खरें म्हणून समजेन.—

मरु०—तसें करण्याची कांहीं जरूर नाहीं. मीं एकदा जें म्हटलें तेंच खरें, त्यांत कांहीं कमजास्त नाहीं.

चंद्रा०—मग कांहीं चिंता नाहीं. पण मी अंमळ

चत्मकारिक आहें, याकरितां आपली तुह्मांला सांगून ठेवितें, जर तुह्मांला मजविषयीं कांहीं ह्मणून वाटत असेल, तर मजकरितां आपण तिचें ह्मणून नांव घेऊं नये. घेतलें तर तें मला कसें विखासारखें वाटेल.

मरु०—छेः छेः—मला काय त्याची जरूर ? मी आपला सेवक. आपली इच्छा ती माझी इच्छा.

चंद्रा०—अस्सें अस्सें ! **मरुत्सेनराव** ! तुह्मांला तरी बरेंच दुटप्पी बोलणें समजतें ! असो चिंता नाहीं. तुह्मीं सुज्ञच आहां, तेव्हां तुह्मांला आणीक तें काय सांगावें ? सध्यां हे असे दिवस आले आहेत, तेव्हां यांतून सर्वोपरी माझें रक्षण करा ह्मणजे झालें.

मरु०—(हंसत हंसत) हंः—तें मीही पण समजतों, आणि ह्मणूनच तर इतर मर्यादाशी एकीकडे ठेवून मी आपणाला आपल्या प्रेमपाशांत गोंवून घेण्यास सिद्ध झालों आहें ! (उभयतां एकमेकांस मिठ्या घालितात.)

चंद्रा०—(त्याच्या तोंडाकडे वर पाहून) बरें, पण हा प्रेमपाश आपल्याला असा निरंतरचा पत्करेलना ?—मी आपली अंमळ वेडी आहें ह्मणून मला हें अजून पुरतेंसं खरें वाटत नाहीं, याकरितां एकवेट चुंबन घेऊन आपण या प्रेमाची गांठ दृढ करा ह्मणजे माझें समाधान होईल.

मरु०—(तिचें चुंबन घेतो. इतक्यांत बाहेरून कोणी येत असल्याचा आवाज कानीं पडून निराळा होऊन बसतो, आणि खांकरल्यासारखें करून) अंः—मी काय ह्मणत होतों तें—हं बराबर—आपला हा तो—तो तो **सौराष्ट्रा**चा सेनापति तो—त्याच्या सैन्याची ही अशी स्थिति आहे. (इतक्यांत एका अंगच्या दारानें खलदर्शनराव आणि शाशिकला येतात.)

शाशि०—(आपणाशीं) काय काय? ताई आणली माझे प्रिय **मरुत्सेनराव** या दोघांची अशी एकांतांत गांठ? हें चिन्ह कांहीं नीट दिसत नाहीं. हा संग्राम सांप्रत उभा राहिला आहे, त्यांत आपण हरलों तरी मला पत्करेल, परंतु माझ्या प्राणप्रियाचा आणि माझा ताईमुळें बिघड पडावा हें कांहीं मला खपायचें नाहीं.

खल०—रामराम ! रामराम !—**मरुत्सेनराव** ! तुह्मांला कांहीं नवीन खबर कळली आहे का ? आत्तांच, माझ्याकडे माझा जासूद आला होता, त्याच्या सांगण्यांत **अतिपीड** महाराजांची आणि **मृगांकमाले**ची गांठ पडली आहे, आणखी आमच्या राज्यांतले पुष्कळ सरदार आणि मानकरी, ज्यांना आह्मां उभयतां शालकांची राज्यरीति आवडली नाहीं, तेही त्यांच्या पक्षाकडेच जाऊन मिळाले आहेत. आतां उभयपक्षांची समोरा समोर गांठ पडून तुंबळ युद्ध होणार तें कांहीं कोठें चुकत नाहीं. आणखी **सौराष्ट्र** देशाचा राजा आपल्या **सिंधुदेशा**वर हल्ला करणार यासंबंधानें त्याला टक्कर देण्याचें काम सर्वांचें आहे—व त्याप्रमाणें मीही टक्कर देणारच,—तरी पण आपली राज्यरीति चांगली नव्हती असें मलाही वाटतें. आणखी **सौराष्ट्र**राजा या देशावर चालून आला ही गोट सर्वथा न्याय्यच आहे असेंही पण माझ्या बुद्धीस वाटतें.

मरु०—वाहवा! एकून थोर ते थोर! त्यांची गोष्ट सर्वदा अशीच !

चंद्रा०—अग बाई, पण आतां लढाईला आपण उभें राहिलों आहों, आतां असलें हें मागेपडूपणाचें बोलणें काय कामाचें बाई ?

शशि०—(नवऱ्याकडे पाहून) ऐकिलें का! मी तुह्मांला मघांपासून एकसारखी सांगतेंच आहें. तुह्मीं एवढी वेळ तरी असलें धीर सोडल्याचें बोलणें बोलूं नका. एवढी लढाई आटोपून जाऊं द्या, मग त्यांत कांहीं असलेंच कमजास्ती, तर त्याचा आपण मागाहून विचार करीत बसूं. आतांच कांहीं पुढचें निकडीचें काम सोडून या मागच्या कुरापतीच्या गोष्टी बोलत बसायला नको!

खल०—बरें बरें.—बरें, कसें काय **मरुत्सेनराव**? आतां लढाईला उभें रहायचें त्याची कशी काय तजवीज लावणार? कोणीं कुठें कसें उभें रहायचें याविषयीं आपला अभिप्राय कसा काय पडतो?

मरु०—मी आपला जासूद शत्रूकडची बातमी आणायला पाठविला आहे, तो आतां इतक्यांत येईल. तो आला ह्मणजे मी आपल्याच तंबूंत आपणास येऊन भेटेन.

खल०—फार उत्तम.

चंद्रा०—बरें अक्का! चल आतां आपण आंत जाऊन बसूं.

शशि०—आत्तां कशाला? नको. मग येईन मी.

चंद्रा०—असें ग काय करितेस अक्का? खरेंच किंनई तुझ्याशीं माझें कांहीं काम आहे, तें मी तुला आंत गेल्यावर सांगेन.

शशि०—(आपणाशीं) होय. माझेंही पण काम आहे, तें मीच तुझ्या अगोदर पार पाडणार आहें. (उघडपणें) बरें तर ताई, चल मीही येतें. (सर्वजण जाऊं लागतात, इतक्यांत तंबूच्या बाहेरल्या अंगास मधुकरराव बैराग्याचें सोंग घेतलेला येतो.)

मधु०—(गातो.)

पद.

क्यौं गफलतमें पडा, दिवाने क्यौं० ध्रु०.
आ सन्सार प्रबल समीरन, बादलमें कडकडा. १.
कनक कामिनी नरकुं डुबाती, मार्ग नरकका
बडा. २.
अबिस्वास सब जगां रहत है, जीकूं लेकर
उडा. ३.
जमराजाजी सम्सेर् नंगी, हातमें पकर्के खडा ४.

गरीबका पालनहारा कोई है? कोइ हो तो मेरा आरज सुनो!

खल०—(बाकीच्यांस) तुह्मीं पुढं व्हा. मी आलोंच. (सर्व जातात.)—साधुमहाराज! आगे आव और कहो तुमारा क्या आरज है?

मधु०—महाराजा! राज्यासनको पास आवना गरीबकु उचित नहीं.

खल०—साधुमहाराज! आवनेकु कछु हरकत नहीं. आव और जो कुछ कहना है सो कहो.

मधु०—(जवळ जाऊन) महाराजको **रामजी** सुखी राखो! महाराज! ये पत्रिका मैं आपकू देता हूं, ये संग्रामकु जानेके पेहेले पढो. इसमें जो वार्ता है, सो सब साची है. **रामजी**नें कृपा करके आपको संग्राममें जय दिया, तो इस पत्रिकामें जो मतलब है सो साबीत करनेको मैं गरीब हूं पर ऐसा अदमी लाके हजर करूंगा, के जो सब मजकूरकी साबिती महाराजके सामनें कर देगा. पर महाराजको जयप्राप्ति **रामजी**नें नहीं दियी, तो आपको सब सन्सार-संबंध तुट जाएगा और सब कारस्थानबी मोफत हो जाएगी. **रामजी** आपका भला करें!

खल०—मैं पत्रिका पढताहूं तबलग ठैरो.

मधु०—नहीं जी. माफ करो. मेरे ते वैसा हुकुम

नहीं. जब जरूर परेगी, तब तीन बार नक्का-रेका आवाज करना. आवाज सुनतेही मैं हजर राहूंगा.

खल०—अच्छा.(मधुकरराव निघून जातो)(आपणाशीं) कसें काय असेल तें असो. हें पत्र हातांत पडल्यापासून माझ्या जिवाला एकसारखी हुरहुर लागली आहे.—असो. आतां पत्र फोडावें, ह्मणजे काय असेल तें कळेलच.—

(इतक्यांत मरुत्सेनराव परत येतो.)

मरु०—पहा शत्रूचें सैन्य दिसूं लागलें आहे. याकरितां खरा करून आपल्या सैन्याला काय हुकूम सुटायचे असतील ते सुटूं द्या. या कागदावर शत्रूचें सैन्य कोठें कसें व किती आहे याचा संपूर्ण आराखडा लिहिला आहे. हा घ्या—पण पहा हो आतां तयारीला अगदीं विलंब लागतां उपयोगी नाहीं !

खल०—चिंता नाहीं. हा चाललोंच मी, माझ्या सैन्याची तयारी झालीच ह्मणा.

(निघून जातो.)

मरु०—(आपणाशीं) आतां कसें काय बरें करावें? ह्या दोघीं बहिणींना त्यांजवर माझें प्रेम आहे ह्मणून मीं वाटावयास लाविलें आहे. व ज्याप्रमाणें डोळ्यांत एकादें सल खुपावें त्याप्रमाणें एकमेक ऐकमेकीच्या नेत्रांत खुपत असून दोघीही एकमेकींना पाण्यांत पाहूं लागल्या आहेत. तर आतां आपण स्वीकार कोणाचा बरें करावा ? एकीचा ? का दोघींचा ? का आपणाला दोघीही नकोत ? —खरें पहातां दोघीही जर जिवंत राहिल्या, तर आपणाला सुखानें एकीची सुद्धां प्राप्ति होणार नाहीं. **चंद्राननेचा** नवरा मेला असल्यामुळें ती मजशीं लागू पडण्याची गोष्ट मनांत आल्याबरोबर **शशिकला** तर चरफडूं लागून अगदीं वेडी होऊन जाते; परंतु जोंपर्यंत तिचा नवरा जिवंत आहे तोंपर्यंत तिचा आपल्याला यथेच्छ उपभोग घ्यायला सांपडायचा नाहीं.—तर आतां असें करावें. जोंपर्यंत ही लढाई चालू आहे, तोंपर्यंत या **खलदर्शनरावाला** अंगाबाहेर टाकल्यासारखें दाखवूं नये. एकदा लढाई संपली ह्मणजे मग जिला त्याच्यामुळें अडचण होत असेल, तिनें त्याला वाटेआड करण्याची सुचेल ती युक्ति योजावी. **खलदर्शनरावाच्या** मनांत **अतिपंडिराजा** आणि **मृगांकमाला** यांचे प्राण वांचवायचे आहेत, परंतु या लढाईंत त्यांचा पराजय होऊन जर तीं कैद करायला सांपडलीं, तर त्यांचे प्राण मी कदापि वांचूं देणार नाहीं. बरें, पाहूंद्या तर खरा आतां कसा काय रंग जमतो आहे तो. पुढची गोट पुढें. तूर्त आपण तर हुकुमाचे चाकर बनलों आहों एवढें खरें. (निघून जातो.)

प्र० २—दोन्ही सैन्यांच्या तळांमधील मोकळी जागा.

(पडद्यांत रणवाद्यांचे आवाज होतात. सौराष्ट्रराजाचें सैन्य बाहेर येतें. त्याचे बरोबर अतिपंडिराजा आणि मृगांकमाला हीं दोघेंही येतात. सैन्य एका अंगानें बाहेर पडून दुसऱ्या अंगानें आत निघून जातें. रणवाद्यांचे आवाज चालूच आहेत.)

(मधुकरराव आणि चंडवर्मा येतात.)

मधु०—बाबा! ही अंमळ अडोशाची जागा आहे, व येथें झाडाची सांवलीही आहे. या अंगाला दोन्ही सैन्यांपैकीं कोणीही लोक येणार नाहींत असा माझा अजमास आहे. याकरितां तुम्ही येथें बसून रहा, आणि आपल्या महाराजांकरितां **सौराष्ट्र**राजास यशः-

प्राप्ति व्हावी म्हणून चिंतन करीत असा. मी आतां सैन्यांत लढाई करितां जातों. जर करितां सुदैवानें मी आपणाजवळ पुनरपि परत आलों, तर जन्मभर आपल्या सेवेंत अंतर पडूं देणार नाहीं.

चंड०—जा बाबा. परमेश्वर तुला सुखी राखो.

(मधुकरराव जातो.)

(पडद्यांत उभयपक्षांची लढाई झाल्याचे प्रथमतः आवाज ऐकूं येऊन मागाहून सौराष्ट्र राजाच्या सैन्याची पळापळी झालेली ऐकूं येते. मधुकरराव परत येतो.)

मधु०—अहो म्हातार बाबा! तुम्हीं येथून उठा उठा! चला मी तुमचा हात धरतों! चला, सौराष्ट्रसैन्याचा पराभव होऊन **अतिपीड** राजे **मृगांकमाले**सकट शत्रूंनीं कैद केले आहेत. चला थांबलां कां? माझा हात धरा आणखी लौकर येथून चला कसे.

चंड०—हरहर! आतां मी येथून एक पाऊलभर देखील हलणार नाहीं! मी आतां येथल्या येथेंच कुजून मरणार!

मधु०—भलतेंच! फिरून तेंच! हा संसार आहे. यांतले बरे वाईट भोग कोणास सुटले आहेत! चला चला अगोदर येथून. नशीबापुढें कोणाची धांव चालत नाहीं.

चंड०—तेंही खरेंच. शिवशिव!—चल बाबा चल.

(दोघे निघून जातात.)

प्र० ३—करश्रीनजीक सिंधुसैन्याचा तळ.

(विजयी झालेला मरुत्सेनराव सैन्यासहवर्तमान जयघोष करीत येतो. बरोबर अतिपीड राजा आणि मृगांकमाला हीं कैद झालेलीं येतात.)

मरु०—अरे कोणरे कामदार?—ए.—तुम्हीं चौघे. जण चला ह्या म्हाताऱ्याला आणि त्याच्या पोरीला तुरुंगांत घेऊन. त्यांचा न्याय होणें आहे तो मागाहून होईल.

सेवक—आज्ञा.

मृगां०—बाबा! आज आपणावरच हा पहिल्यानें प्रसंग गुदरला आहे असें नाहीं. याकरितां आपण धीर धरला, तर बाबा, मी कसेंही संकट आलें तरी एवढी देखील डगायची नाहीं.—अरे बाबांनो! तुम्हीं—अरे, मला एकटीला तुम्हीं कैद करून आणलें, परंतु तिकडची वाट काय झाली कुणाला कांहीं कळलें आहे?—बाबा! हें काय? तुमच्या मुद्रेवरून तुम्हीं कष्टी दिसतां असें वाटतें.—आतां हे सेवक आपणाला तुरुंगांत घेऊन जात आहेत, पण तेथें जायच्या अगोदर एकवार अक्का आणि ताई दृष्टीस पडल्या तर बरें नव्हेका?

अति०—छेः छेः छेः छेः! बाळे! तूं त्या कारटयांचें मजपुढें नांव नको काढूं. चलारे आम्हांला चलतांना तुरुंगांत घेऊन? बाळे! मला दुसऱ्या कोणाची जरूर नाहीं. त्या ठिकाणीं तूं आणि मी दोघें असलों म्हणजे आपण खुशाल पिंजऱ्यांतील पक्ष्यांप्रमाणें एकत्र राहूं. तूं मला आपल्या मस्तकावर वरदहस्त ठेवा म्हणून म्हणत जा, आणखी मी तुझ्या पायां पडून अगोदर माझ्या अपराधांबद्दल मला क्षमा कर म्हणून तुला म्हणत जाईन. अशा रीतीनें बाळे! आपण दोघींही तुरुंगांत राहून सदासर्वकाळ एकमेकांशीं आनंदानें बोलत बसूं. मी तुला तुझ्या लहानपणची एकेक गोष्ट आठवून सांगत जाईन, आणखी तूंही तुला आठवतील त्या गोष्टी मला सांग.—एकादेवेळ कांहीं नाहीं आठवलें, तर आपण तुरुंगावरील रखवालदारांशींच गोड गोड बोलून त्यांच्याकडून आंतल्या बाहेरल्या कमजास्ती बातम्या ऐकूं, आणि आपल्या

जिवाला कर्मणूक करून घेऊं.—आतां मल कांहीं या जगांत फार दिवस रहायचें नाहीं तेव्हां राहिलेले थोडे दिवस खुशाल आनंदांत घालवूं ह्मणजे झालें.

मरु०—कायरे गुलामांनो! वाट कोणाची पाहतां' चला या दोघांही चोरांना अगोदर तुरुंग दाखवा !—कायरे ए तुह्मीं—अरे, मघां **सौराष्ट्रराजा** कोठें दिसला नाहीं त्याचा कांहीं पत्त लागला का चौकशी करून या. चला तुह्मीं असे या इकडून जा, आणखी ते चोर कोठें दिसेल तर त्याला एकदम मुसक्या बांधून घेऊन या.

(कांहीं सेवक जातात.)

मृगां०—देवा देवा ! काय हा दुष्ट माझ्या प्राणनाथांबद्दल बोलत आहे ? देवा !—आ—**अंबाबाई** ! मी तर आतां बाबांबरोबर तुरुंगांत जातें, पण तूं तिकडे मात्र सुरक्षितपणें परत राज्यावर नेऊन बशीव ह्मणजे झालें.

अति०—बाळे ! तूं मजबरोबर येतेसना ? अशी, माझ्या गळ्याला घट्ट मिठी घाल अहाहा ! परमेश्वरा ! इतःपर माझा आणि माझ्या बाळेचा परस्पर वियोग होण्याच प्रसंग कृपा करून आणूं नको.—अधमांनो तुह्मीं मजपासून माझ्या बाळेला दूर कर पहातां काय?—बाळे! नको नको! रडूं नको — अहारे दुष्टांनो ! खबरदार आमच्या अंगास हात लावाल तर ! (कांहीं सेवक अतिपीडराज व मृगांकमाला यांस घेऊन जातात.)

मरु०—अरे ए—कोण तूं शिलेदार आहेस नाहीं

१ सेव०—नाहीं सरकार ! मी जासूद आहें.

मरु०—चिंता नाहीं, हें पत्र घे आणि आतां गेले यांच्या मागोमाग तुरुंगांत जा. तूं माझें एवढें काम इमानानें बजाविशील, तर आजपासून तुझा पगार दुप्पट झाला असें समज. आणखी थोडक्याच दिवसांत तुला सैन्यांतली एकादी मोठी असामी देईन, समजलास?

जामू०—जी. (जातो.)

मरु०—(आपणाशीं) झालें. येथपर्यंत तर ठीक जमलें. लढाईंत शौर्य गाजिवलें यामुळें आतां **चंद्राननेशीं** प्रसिद्धपणें व्यवहार करण्यास कांहीं अडचण राहिली नाहीं असें वाटतें. तरी पण **शशिकले**ची वाट काय करावी ही काळजी राहिलीच. आतां काय बरं युक्ति करावी ? आपल्याला दोघींतून एक तर पाहिजेच. एवढेंच नव्हे, तर एकीशींच विवाह लावून सर्व **सिंधु**प्रांताचा राजा बनलें पाहिजे, तरच इतक्या सगळ्या गोष्टी करण्याची शोभा ! नाहीं तर सर्वच व्यर्थ ! **मधुकररावा**ची तशी स्थिति केली, बाबांशीं विश्वासघात करून त्यांच्या नाशासही कारण झालें, स्वतः **उदासदुर्गा**चा मालक होऊन **सुदर्शनरावा**ची आणि **चंद्रानने**ची प्रीति संपादिली, तसेंच तिच्या थोरल्या बहिणीस तिच्या नवऱ्याकडे पोंचवावयास गेलों असतां तिच्या सारख्या चौकस मनासही भुरळ पाडून तिला आपलेंसें केलें, व सरते शेवटीं **चंद्राननेस**ही अंगाखालती घालण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं; इतक्या सगळ्या गोष्टींचें, जर मी स्वतः या प्रांताचा राजा होईन, तरच चीज होणार आहे. असो. आतां **चंद्रानना** आणि **शशिकला** यांच्या गांठी घेऊन पुढील हेतूची सिद्धता कशी व्हावी यांच्या तजविजीला लागलें पाहिजे.

(निघून जातो.)

प्र० ४–स्थळ तेंच.

(मरुत्सेनाचा जासूद येतो.)

जा०–(आनंदानें आपणाशीं) सेनापति साहेबांनीं आज मला तुरुंगांतली कामगिरी सांगितली आहे, आणखी ती पार पडली तर मला बढतीहि देईन म्हणून ते स्वतः बोलले आहेत, तेव्हां आज माझ्यासारखा भाग्यवान् आहे कोण ? अरे, पण हा काय बरें चमत्कार ? मी सेनापति साहेबांना त्यांचें काम पार पाडतों म्हणून वचन दिलेंखरें, पण तें काम कोणचें हें मुळीं विचारायचेंच विसरलों. आतां जर तुरुंगांत गेलों, आणखी तिथल्या पाळेगारानें कोणच्या कामाकरितां आलास म्हणून विचारिलें, तर त्याला काय बरें जबाब द्यावा ? त्याला जर जबाब देतां आला नाहीं, आणखी त्यानें माझ्या हातचें पत्र घेऊन तें काम स्वतःच करून टाकलें, तर मग माझें महत्व तें काय राहिलें? छेः हें असें उपयोगी नाहीं. तुरुंगांत जावयाच्या अगोदरच पत्र उघडून पहावें हें बरें. (पत्र बाहेर काढून उघडूं लागतो.)

(इतक्यांत त्याच्या मागोमाग वेश बदललेले राजवाहनराज आणि कांतिवर्मा येतात.)

राज०–तुमची गांठ अवचित पडली एवढ्यानें बरें झालें. आजच्या लढाईंत आपण तर हरलों, आणखी **अनिपीड** महाराज व माझी प्रिया हीं शत्रूंच्या हातांत सांपडलीं म्हणून आरोळी कानीं पडली, त्याबरोबर त्यांची कांहीं तरी युक्तीनें सुटका करावी या हेतूनें हा पोशाख घेऊन शत्रूच्याच सैन्यांत शिरलों. असो. आतां कसें तरी करून त्यांना ताबडतोब सोडविलें पाहिजे. नाहीं तर **शशिकला** आणि **चंद्रानना** ह्या त्यांचे प्राण घेतल्याशिवाय कदापि रहावयाच्या नाहींत. तर आतां ह्याला काय बरें तजवीज करावी ?

कांति०–ती तजवीज मीं मघांच मनांत आणून ठेविली आहे. मघांराजेसाहेबांचा शोध करीत मी इकडे तिकडे फिरत असतां **मरुत्सेनरावानें** त्यांना आणखी बाईसाहेबांना कैद करून तुरुंगांत पाठवून दिलें म्हणून मला समजलें. इतक्यांत पहातों तों कोणी एक जासुदासारखा दिसणारा मनुष्य **मरुत्सेनरावा**च्या सैन्याच्या तळांतून हातांत कांहीं तरी पत्र किंवा दुसरी कांहीं खूण घेतलेला घाईनें बाहेर पडून तुरुंगाच्या वाटेनेंच जाऊं लागला. तेव्हां त्याला हरयुक्तीनें गांठावें, आणखी जमेल तर त्याच्या खुशीनें आणि न जमल्यास बळजोरीनें, त्याचें तुरुंगाकडे जायचें काय काम आहे हें काढून घ्यावें म्हणून माझ्या मनांत कल्पना आली. व तिजप्रमाणें त्या मनुष्याचे मागोमाग जाण्याच्या विचारांत होतों तोंच आपली गांठ पडली.

राज०–फार उत्तम–तर आतां त्वरा केली पाहिजे. पण तुम्हीं म्हणतां तो मनुष्य आतां आपणाला कसा कोठें सांपडेल ?

कांति०–त्याची आपणाला काळजी करणें नलगे. त्याच्यावर माझा मघांपासून डोळा आहे. तर चला आतां आपण असे या अंगानें चला मी या अंगानें येतों, आणखी त्याला अचानक मधें गांठूं, म्हणजे ताबडतोब कायतो निकाल होईल.

राज०–ठीक आहे. (दोघे दोन वाटांनीं चालूं लागतात.)

कांति०–(जासुदास) रामराम हिंमतबहादर!–कां कसें काय ?

जासू०–(पत्र वाचण्याच्याच नादांत आहे.)

कांति०–(त्याच्या पाठी मागून जाऊन त्याच्या

पाठीवरून उंच मान करून पहातो, व पत्रांतील मजकूर संशयाचा लक्षांत येऊन समोर राजवाहन-राजास खुण करितो.)

कांति०—कां कसें काय ? **हिंमतबहादर** !—आज एवढा आपल्या सैन्यानें पराक्रम केला, आणि आपण विजयी झालों, तेव्हां आतां आजचा दिवस सुट्टी मिळेल, आणखी खुशाल यथेच्छ दारू प्यायला सांपडेल, या हेतूनें मी तुझ्याकडेच यायला निघालों होतों.

जासू०—(पत्राच्याच नादांत) ठीक ठीक ठांगून ! मारावें!!—

कांति०—(त्याच्या पाठीवर थाप मारून पहिल्याप्रमाणें बोलतो.)

जासू०—(घाबरून) आं—काय—कोण ? टांगून मारणार—अं—नाहीं—होय होय.

कांति०—अरे वाहवारे गड्या ! माझ्या—

जासू०—अरे, तूं कोण आहेस हें मला मुळींच ठाऊक नाहीं, असें असतां तूं माझ्याशीं अशीं सलगीचीं भाषणें काय म्हणून करतोस?

कांति—वाहवा ! शाब्बास ! आतां मात्र **हिंमतबहादर**जी ! खूप कमाल केलींत !

जासू०—अरे बाबा, तूं खचित चुकतोस, मी **मरुत्सेनरावां**चा दूत आहें, **हिंमतबहादर** नव्हें.

कांति—वाः—आतां तर तुझी जास्ती जास्तीच कमाल होत चालली आहे. गृहस्था! एकटा दारू प्यालास तर प्यालास, पण वेड्या ! आपण कोण याची देखील ओळख विसरलास हें मोठेंच आश्चर्य !

जासू०—मूर्खा ! दारू प्यालों म्हणून कोणालारे म्हणतोस ?

कांति०—असा रागावूं नको. तूं खरोखरीच दारू प्यायला आहेस, आणखी तुला मुळींच शुद्धि राहिली नाहीं. याकरितां तुला सांगतों, तुझ्याशीं तें पत्र राहिलें बिहिलें तर एकादे वेळीं कोणीकडे गहाळ होईल, म्हणून तें मजपाशीं देऊन ठेव. तूं शुद्धीवर आलास म्हणजे तुझें तुला परत देईन.—

जासू०—वाः रे वाः—ही नसतीच ओळख अंगावर लादण्याची मसलतरे कोणीं तुला शिकविली ? चल मला अडवून धरूं नको. घाईचे काम आहे, मला गेलेंच पाहिजे.

कांति०—(हंसून) तूं दारू प्यालास म्हणजे तुला हंमेशा अशीच घाई होते, पण घरीं गेल्यावर तुझ्याकरितां बायको थोडकीच वाढून ठेविली आहे? गुलामा ! इथून जाशील मात्र तुरतुर करीत, आणखी फांक्या खात बसशील, नाहीं तर बाजार बुणग्यांतल्या एकाद्या कामाठणीच्या नादीं लागशील. दुसरें तुझ्या हातून कांहीं व्हायचें नाहीं. चल आण तें पत्र माझ्या स्वाधीन कर.

जासू०—काय ? पत्र तुझ्या स्वाधीन करूं ? आणखी आपल्या जन्माचें वाभाडें करून घेऊं ? चल मोठा शहाणा आला आहे मला सांगायला !

कांति०—तुझ्या या स्थितींत तर मी तुला खचित एक फाऊलही पुढें जाऊं देणार नाहीं. पत्र घेईन तेव्हांच तुला सोडीन.

जासू०—चोरा! सोडतोस कीं नाहीं, का दाखवूं तुला या तरवारीचा पराक्रम ? मूर्खा ! मला ओळखलें नाहींस वाटतें ? मी सेनापतींचा पठ्ठा दूत आहें तुला ठाऊक नाहीं? (तरवार उपसतो.)

कांति०—मी असा तुझ्या तरवारीला भ्यायचा नाहीं. चल टाक पत्र. (दोघे लढतात. इतक्यांत राजवाहनराज जवळ येऊन दोघांस सोडवूं लागतो.)

फळें ! कां कांहीं आहे का आठवण ? तुमच्या करितां मीं राजांच्या मागण्या परतविल्या हें नाहीं का तुह्मांला ठाऊक ?

हैब०—हो हो. नाहीं ठाऊक ह्मणून कसें चालतें ? दररोज दिवसा रात्रीं मिळून निदान दहा वीस वेळां तरी माझ्या कानीं कपाळीं त्याचा जपच एकसारखा चालला असतो.—बरें पण तें राहूंदे--

ह्माळ०—हो, मी पण बरी राहूं देईन ! मला कांहीं तुह्मीं कच्चा गुरूचीच चेली नका समजूं अगदीं ! मी तुमच्याकडून अगोदर हो ह्मणवीन तेव्हांच तुह्मांला पुढें बोलूं देईन! बोला तुमच्याकरितां मीं राजांच्या दिखित मागण्या परतविल्या हें खरें का खोटें ?

हैब०—अग, मीच कशाला सांगायला पाहिजे ? तूं ह्मणशील तसें.

ह्माळ०—मला हें असलें नेभळें बोलणें समजत नाहीं. होय कीं नाहीं या दोहोंतून मला एक गोष्ट कोणती ती ऐकायला पाहिजे. बोला हो कीं नाहीं ?

हैब०—अग, तूं ह्मणतेस होय तर होय.

ह्माळ०—काय ? मी होय ह्मटलें ह्मणून होय, आणखी मीं नसतें ह्मटलें तर नाहीं ?

हैब०—(गोंधळून) अग, तसें नव्हे, होय हेंच खरें. बरें पण उद्यां तुला **मेरुलिंगा**च्या दर्शनाला जायचें आहे तेव्हां बरोबर कोण कोण न्यायचें ठरलें आहे ?

ह्माळ०—कशून ? या बायका बायकांच्या गोष्टींत तुह्मांला चोंबडेपणा करायला कुणीं सांगितलें आहे ? मला वाटेल त्याला मी बरोबर नेईन किंवा नाहीं न्यायची ! तुह्मीं मधें तोंड नका घालूं. मला वाटेल तें मी करणार. मी उद्यां कुठें नाहीं जायची. मीं उद्यां पुराणिक बोवांना आणखी सोनाराला बोलावलें आहे, ते आले ह्मणजे माझ्या **व्याघ्रांबरी**च्या नवऱ्याला काय काय द्यायचें त्याची मी तजवीज लावणार आहें. मग पुढची गोष्ट पुढें.

मुधो०—(आपणाशीं) काय ! **व्याघ्रांबरी**चा नवरा ? कोण मी कीं **चंद्रराव** ? दोघांतून कोणाचें भाग्य फळफळेल तें फळफळो.

हैब०—बरें पण तूं तजवीज तरी काय करायचें मनांत आणिलें आहेस ?

ह्माळ०—मला पाहिजे ती मी करीन. तुह्मीं कोण मला विचारणार ?

हैब०—अग तसें नव्हे. तुझी मर्जी नसेल तर नको सांगूं. पण ह्मटलें तुझी असलीच मर्जी, तर सहज ऐकायला सांपडेल.

ह्माळ०—मी तुमचा चोंबडेपणा ह्मणतें तो हाच. ऐकिलें का? तुह्मांला हजारदा बजावून सांगितें असेल, आणखी आतांही सांगतें, तुमचा हा असला चोंबडेपणा माझ्या नाहीं कामाला यायचा! आत्तांची वेळ तुह्मांला बजावून सांगितलें, किरून तुमचें हें असलें करणें मला नाहीं आवडायचें.—तरी पण ऐका. माझ्या प्रकृतीला कांहीं कुणाशीं भांडायचें किंवा रिकामें पुष्कळ बडबडायचें आवडत नाहीं, याकरितां आत्तांची वेळ विचारतां ह्मणून सांगतें. मी सरदेशमुखीण, माझें नांव मोठें, कुळ मोठें, एवढ्याकरितां माझा जांवई माझ्याच योग्यतेचा असला पाहिजे. तसंच, असला माझ्या मनाजोगता मला जांवई मिळाला, तर मला शोभेल असेंच त्याला केल सवरलें पाहिजे. दहा वीस हजारांपर्यंत त्याला हुंडा पांडा करायचा तो तर आपण करूंच, परंतु जांवयांना

कंठी ह्मणून, हार ह्मणून, हैंन् तें सटरफटर वीस हजारांपर्यंत त्यांना पोंचाविलेंच पाहिजे.

हैब०—(आश्चर्यानें) अगे, तूं ह्मणते आहेस तरी काय ? तूं दहा हजार, वीस हजारांच्या गोष्टी घेऊन बसली आहेस, पण आपल्या घरांत तितके शिवराई तरी राहिले आहेत का, याचा कांहीं विचार केलास ? त्या मुसंड्या **अविंधां**नीं एवढी सरदेशमुखी, पण तींत एवढें तरी ऋण राहूं दिलें आहे का ? तुझ्यापुढें बोलूं लागलों ह्मणजे 'माझे पाय लटलटां कांपूं लागतात, पण आतां बोललीस हें कांहीं अगदींचे वाहींच विलक्षण, ह्मणून कसें बसें तरी बोलावें लागतें, तर हें बघ—

ह्माळ०—मी नाहीं बघत बसत. मला नाहीं असा तुमच्या सारखा हैवानपणा करितां येत. या हैवानपणानेंच तर अशी दशा करून घेतलीत. आणीकसे असते तर **शिवाजी** महाराजांसारखें शत्रूंना केव्हांच पाणी पाजिते ! पण तितकी अंगांत अक्कल पाहिजेना? ती नाहीं ह्मणून. तर हें असें ! आणखी ह्मणूनच तर ह्मणतें कीं, तुह्मीं एक भागूबाई तर भागूबाई, पण जांवई करायचा तो तरी चांगला शूर तरवार नाचविणारा असला, तर केव्हां नाहीं केव्हां तरी त्या **अविंधां**चा समाचार घेईल !

हैब०—अग, आज तूं काय कसल्या भ्रमांत पडली आहेस मला कांहीं कळत नाहीं. तुझ्या डोक्यांत हें वेड भरविलें तरी कोणीं?

ह्माळ०—काय काय ? वेड ? कांहीं बोलायला तरी वाटतें का जिवाला? मला कांहीं कोणी तुमच्यासारखें शिखवायला नाहीं लागत ! माझें मला समजतें ! परवां रात्रीं आमच्या पुराणिक बोवांना रात्रीं दृष्टांत झाला त्यांत त्यांनीं तरी हेंच पाहिलें ! ते माझ्यापाशीं अगदीं खरें खरें तेवढेंच सांगतात.

हैब०—नशीब ! तो पुराणिक तुला सांगतो, आणखी तूं त्याचें ह्मणणें ऐकतेस ! बरें पण त्याचें ह्मणणें तरी काय आहे ऐकूं दे !

ह्माळ०—त्यांत ऐकायचें आहे काय ? त्यांनीं सांगितलें, तुह्मीं आपली मुलगी मुक्काट्यानें त्या **चंद्रराव फांकड्या**ला द्या, आणखी त्याला चाळीस हजार रुपयांचें जवाहीर द्या, ह्मणजे तो तुह्मांलाच बादशहा करून बसवील.

हैब०—हेंच तें. अग पण तूं ह्मणतेस इतकें जवाहीर आणायचें कुठचें? सगळी सरदेशमुखी विकली तरी देखील इतकें जवाहीर जमेल कीं नाहीं याची भ्रांति आहे ! सरदेशमुखी विकून आणखी देखील कांहीं असलें तरी तें विकलें पाहिजे ! पण तें आणावें कोठून ?

ह्माळ०—पुरे, मला असलें दळूं बाई दळूं ऐकायला नको ! राजे लोकांच्या दिंक्षित मागण्या मागें परतिवलेली **ह्माळसाबाई** सरदेशमुखीण मी, मला काय कमी आहे ? तुह्मीं रिकामटेंकडे ढेलपोटे घरांत राहून तरी तुमचा काय उपयोग आहे ? तुह्मीं **विजापुरा**स जाऊन माझ्या नांवानें त्या **भिसामिल्ल्या**ला ह्मटलें कीं, मी सरदेशमुख, मला जन्मभर कैदेंत ठेवा, पण माझ्या मुलीच्या लग्नाला चाळीस हजार रुपये द्या, तर तो खचित देईल माझी खातरी आहे!

हैब०—कपाळ माझें ! आज तुझें खचित माथें फिरलें आहे !—

ह्माळ०—खबरदार जास्ती बोलाल तर ! माझें माथें कधीं नाहीं फिरायचें. तुह्मांलाच जन्म-

भर कैदेंत रहायचें भय वाटतें आहे, मी पक्कें ओळखून आहें ! पण ऐकिलेंका, माझ्या **व्याघ्रांबरी**ला चांगला नवरा मिळतो आहे, तर तुम्हीं अगदीं मुक्काट्यानें कैदेंत रहायला दिखील कांहीं नाहीं म्हणूं नये ! **चंद्रराव** जांवई झाला म्हणजे तो एक टिचकी वाजवील तर तुम्हांला बंदीशाळेंतून सोडवील !

हैब०—आतां किनई तुझ्यापुढें माझा उपाय अगदा हरला ! मी आतां तुझ्यापुढें एक चकारशब्द सुद्धां काढायचा नाहीं !

झाळ०—सांगतें आहे कोण काढा म्हणून ?—पण कळलें का ? **चंद्रराव**ासारखा जांवई मिळायला बारान् बारा चोवीस वर्षें तप केलें पाहिजे म्हटलें!—त्या **भिसमिल्ल्या**ला गाणें ऐकायचा नाद आहे,त्याच्यापुढें माझा **चंद्रराव** तिकडचें **म्हैसुरा**कडचें कसलेंसं मगळू का फगळू गाणें गाईल, तर तेव्हांच तुमचें काम करून टाकील !

हैब०—त्याच्या हातीं जास्तोंपर्यंत मी राहीन तेव्हां पुढची गोष्ट ! त्याच्या अगोदर तूंच माझें काम करून टाकते आहेस !

झाळ०—पुरे पुरे. आतां अक्कल फार पाघळत चालली ! तुम्हीं इथें स्वस्थ बसा. मी आतां सगळी तजवीज लाविते कीं नाहीं पहा. **चंद्रराव**ासारखा जांवई न् त्याला चाळीस हजार रुपये द्यायची ही रड ? अहाहा, दिवे ओवाळावेत !

मुधो०—**हैबतराव** ! तुम्हीं गप्प रहा कसे.—**झाळसाबाई** ! तुम्हांला वाटेल तसें तुम्हीं करा, पण येथून आतां जा पाहूं.

झाळ०—(अधिक संतापानें) कां आतां तुम्हीं चोंबडेपणा लागलां का करायला ? दोन दिवस घरांत पाहुणे म्हणून ठेवून घेतलें, त्याचे हे उपकार फेडितां वाटतें ! ७०

मुधो०—तुम्हीं अशा उगीच संतापूं नका. मी कांहीं तुम्हांला वावगी गोष्ट सांगत नाहीं, परंतु **हैबतराव**जींना तुम्हीं विनाकारण जाच देतां असें माझ्या बुद्धीला वाटतें. मी वास्तविक या कामीं तिऱ्हाईत आहें, मला बोलण्याचा जरूर नाहीं, परंतु इतका वेळ आपला उभयतांचा जो संवाद झाला तो ऐकून मला फार दुःख वाटते. हें काय ! बोलण्या बोलण्यांत कांहीं पर्याय नाहीं, तर तें बोलणें काय कामाचें ? अशा बोलण्यानें सगळ्या संसाराचा मातेरा मात्र होणार, दुसरें कांहीं नाहीं.

झाळ०—कांहीं झालें तरी तुम्हांला मधें तोंड घालायचें कारण नाहीं. तुमच्यानें आमचें बोलणें ऐकवत नव्हतें, तर तुम्हीं येथून उठून कां नाहीं गेलां ? तुम्हांला कुणीं सांगितलें होतें इथें रहा आणखी आमचें बोलणें ऐका ? ही सरदेशमुखी माझी आहे, तिची मालकीण मी एकटी आहें ! **व्याघ्रांबरी** माझी मुलगी आहे, आणि ही स्वारी माझ्याच घरची आहे, इतक्यांमध्यें आम्हीं वाटेल तें करूं, हवें तें बोलूं. तुम्हीं मधें बोलूं नये. बोललां तर माझ्या कांहीं कामाला येणार नाहीं.

मुधो०—मी कशाला मधें बोलूं म्हणा, पण कसें झालें तरी आपलें आणि यांचें कांहीं तरी नातें मनांत आणावें, आणखी यांच्याशीं नीटपणें वागून हरएक वाजवी गोष्टींत त्यांचा मान राखावा यांतच आपणाला भूषण आहे.

झाळ०—होय, बरें असेल. मी सरदेशमुखीण,

झुंजारराव पोवारांची मुलगी आहें, म कांहीं खऱ्याखुऱ्या भूषणांची वाण नाः इश्श बाई ! हें असलें कोरडें तोंडानें व लायचें भूषण नको ग बाई मला ! नुस ऐकायला दिखील नको ! थूः त्याच्याव याला भूषण म्हणेल कोण ?

मुधो०—**म्हाळसाबाई** ! तें तुम्हांला काय वाटे तें म्हणा, परंतु असें करणें चांगलें नाः तसेंच त्या **मुसलमानां**नीं आपल्या हि प्रजेची चोंहोकडे नासाडी करून सोड आहे; स्वतःची आपली सरदेशमुखी, ति ही पण अशी अवस्था करून टाकली अ असें असतां एकटचा मुलीच्या लग्नाकरि चाळीस हजार रुपये खर्चाचा बोजा यां वर घालूं पहाणें, आणखी ते पैसे मि नाहींत तर प्रत्यक्ष यांना त्यांकरितां तुरुंग रहा म्हणणें म्हणजे काय ? हें आपल्या तर बोवा पसंत पडत नाहीं.

म्हाळ०—न पडेना पसंत ! मी तुमच्या पसंत करितां थोडकीच अडून बसलें आहे पहा तर खरें. काय म्हणतातना तशांत गत. गोठाणच्या गाई माझळभट दान देई मी तुमचें सांगितलेलें ऐकून घेतें कळलें अहाहा—समजलें ? म्हटलें माझी मी मु त्यारीण आहें पाहिजे तें करीन.

मुधो०—खुशाल करा ! पण इतका खर्च क णार, त्या मानानें नवरा तरी चांग गुणी पहा म्हणजे झालें.

म्हाळ०—हां—अस्सें अस्सें ! आत्तां मला थोड थोडा उत्तम पडत चालला ! तरी म्हट माझ्या **व्याघ्रांबरी**च्या लग्नाच्या गोष्टींत य स्वारीचें तोंड मधें कां ? तरीच ! हें अस नव्हतें ग बाई इतका वेळ मला ठाऊक! ब

वरें.—समजलें मी. हें सगळें तंत्र कसें काय आहे याचा अजमास मला आत्तां बरोबर लागला !—तुम्हांला इकुडचो फूस आहे.

हैब०—अग ए—तूं माझें ऐकशील का—

म्हाळ०—मी नाहीं कुणाचें ऐकत बसायची, रांडा मेल्यांची आणीक का फूस असेना, मी ती थोडकीच चालूं देणार आहें !

हैब०—अग, तुला खरोखरीच सांगतों. तुझ्या पायांची शपथ—तूं म्हणतेस तसें नव्हे !

म्हाळ०—पुरे पुरे. आतां झांकूनच नको कांहीं ठेवायला. तुमचीच यांना आंतून फूस आहे-आणखी म्हणूनच हे माझ्याशीं असे भांडायला उठले. पण मी नाहीं हो ऐकायची.—तुम्हीं दोघे मिळून मला पाण्यांत पाहूं लागलां आहां हें मी समजून आहें.—तरी पण मी कांहीं आपला मतलब जाऊं द्यायची नाहीं ! दोघांनीं ह्या एकीकडे वसून खलबतें करून माझी **व्याघ्रांबरी** पळवून न्यायचा केला आहे बेत मी समजलें. "बरें बरें, माझ्याशीं गांठ आहे ! पाहून घेईन ! म्हटलें या सरदेशमुखीची मालकीण एकटी मी आहें. माझी मुलगी असल्या या घाणेरड्या भांडखोर दारूबाजाला मी कध्धीं कध्धीं" द्यायची नाहीं. याच्यापाशीं आहे काय? का पुष्कळ पैका आहे, का आमच्या एवढी वतनवाडी आहे, का कांहीं आहे, कीं तें पाहून ती ह्याला द्यायची ? मी नाहीं ग बाई या असल्या गांजेकसाला माझी बया देणार ! इश्श, थूः असल्या जावयावर.

मुधो०—तुम्हीं मला स्वतःला पाहिजे तितकें बोला, मी तुमच्या योग्यतेची पुरी परीक्षा करून आहें, याकरितां मी तुमच्यासारखा असा शिव्यागाळीला जुमानीत बसणारा

वीर मंत्र जपतांना कांहीं भयंकर संस्कार करावे लागतील, त्या वेळीं तुझ्यानें त्या ठिकाणीं धीर धरून रहावेल ना पण ?"

"आपण त्याविषयीं निर्धास्त असावें."

"महा बरें, तुला धीर एवढा देखील सोडतां कामा नये. चल ये असा माझ्या मागून."

तेव्हां **शिलादित्या**नें 'होय" म्हणून पुटपुटत मनांतल्या मनांत **अर्हंता**ची प्रार्थना केली, आणि **दीक्षितदत्ता**च्या मागून **अंमेला** पुरलें होतें त्या खळग्याजवळ गेला; व मनांतून थोडी भीति वाटत होती तरी त्यानें **वरदकाल** तिचें प्रेत उचलून एका लांबच्या पडक्या देवळांत नेत असतां त्याला मदत केली. मागाहून **दीक्षितदत्त** हातांत कंदील घेऊन आला, व त्या देवळांत सर्व जण शिरल्यावर त्यानें आपणामागें दार लावून घेऊन आंतून कडी लावून घेतली.

शिलादित्य देवळांत शिरून पहातो, तों त्याच्या दृष्टीस जो प्रकार पडला, त्यावरून पुढें होणाऱ्या भयंकर संस्काराची कांहींशी कल्पना त्याच्या मनांत येऊं लागली. ते सर्व जण त्या पडक्या देवळाच्या सभामंडपांत उभे होते, व पुढें गाभाऱ्यांत देवाची मूर्ति वगैरे कोठें दिसत नव्हती. मात्र **दीक्षितदत्ता**च्या कंदिलाचा अस्पष्ट उजेड आंत जोंपर्यंत पोंचत होता, तोंपर्यंत मृत मनुष्यांच्या डोक्यांच्या कवट्या, हाडें, आणि शरीरांचे नासके कांहीं भाग यांशिवाय दुसरें कांहीं दृष्टीस पडण्याजोग नव्हतें. एका कोपऱ्यास पुरलेले कैदी उकरून काढिलेले असून त्यांच्या अंगावरचे घाणेरडे कपडे लोळत पडले होते; व त्यांची घाण इतकी कांहीं सुटली होती कीं, ती प्रथमतः **शिलादित्या**स सहन न होतां त्यास नाकावरून पोतर धरावें लागलें. सभामंडपाच्या मधोमध प्रेतांचे हात पाय वगैरे अवयव तोडून पाडिले असून त्यांचा ढिगारा पडला होता, व त्यावरून शेंदराचे आणि काजळाचे पट्टे ओढिले असून, वरच्या तक्तपोशीपासून मधोमध एक तरवारीसारखें कायसेंसें शस्त्र लोंबत टेविलें होतें. आतां सांगितलेल्या ढिगाऱ्यावर नुकतींच ताजीं टेवलेलीं दोन शिरें पडलीं होतीं, तथापि त्यांचे तोंडाकडचे भाग कांहींसे खालीं जमिनीकडे वळले होते यामुळें तीं शिरें कोणाचीं हें कळण्याजोगें नव्हतें. तथापि त्यांचा जेवढा भाग बाजूच्या अंगानें दिसत होता तेवढ्यावरून मरणकाळीं त्यांच्या मालकांस ज्या यातना किंवा वेदना झाल्या असतील त्यांची कल्पना स्पष्टपणें कळून येण्यास कोणच्याही प्रकारची अडचण नव्हती. **शिलादित्या**नें तीं शिरें पाहिल्याबरोबर त्याचें लक्ष एकसारखें तिकडेच वेधून गेलें, हें पाहून **वरदकाला**नें त्यास, हीं शिरें आदल्या दिवशीं सुळावर जे दोन जतीं चढविले होते त्यांचीं, व सुळावर चढविते वेळीं जतींचीं शिरें त्यांच्या धडांवर शाबीत होतीं परंतु आपल्या गूढ विद्येच्या साधनार्थ आपले गुरुजींनीं कापिलीं, म्हणून सांगितलें. ह्या शिरांपासून बाकीचीं धडें कांहीं अंतरावर अस्ताव्यस्त पडलीं होतीं, व त्यांवर कित्येक जागीं कुजट मातीचे लेप चिकटले असून त्यांतून लहान सहान कृमिकीटकही यथेच्छ संचार करीत होते. अस्तु, आतां सांगितलेल्या प्रकारास दहा पांच पळें लोटल्यावर **दीक्षितदत्ता**नें आपला कंदील त्या शिरांच्या दरम्यान टेविला, त्यावेळीं त्याच्या अंधुक अंधुक प्रकाशांत त्यांवरील रंग कांहीं विलक्षण फिक्कट व भयंकर दिसूं लागून **शिलादित्य** मनांतल्या मनांत अगदीं ओशाळल्यासारखा झाला, व त्यास आपण

येथें कोठचे आलों असें वाटलें.

हीं त्याच्या मनाची स्थिति **दीक्षितदत्ता**नें ओळखून त्यास झटलें:—"अरे बाबा, तुला वाटेल तरे अजूनही निघून जा. माझी परवानगी आहे."

त्याबरोबर **शिलादित्य** शुद्धीवर आल्यासारखा होऊन झणाला:—"छे, तें कांहीं नाहीं. मी आपल्या बरोबर शेवटपर्यंत रहाणार."

"फार उत्तम." असें झणून **दीक्षितदत्ता**नें कंदिलांतील दिवा विजवून टाकिला.

मग काय विचारावें? त्या देवळांत त्या वेळीं सर्वत्र एकच अंधकारमय होऊन गेलें, आणि तशांतून त्याचीं जाड दारें सर्व बंद केलीं असल्यामुळें त्याच्या बाहेरून रात्र किडयाचा नुसता किर्र एवढासुद्धां आवाज ऐकूं येत नव्हता. आंतल्या अंगासही स्तब्धता आणि शांतता पूर्णपणें नांदत होती, मात्र **दीक्षितदत्त** तोंडानें कांहीं मंत्र जपल्यासारखें पुटपुटत होता त्याचा खोल अस्पष्ट आणि मंद असा आवाज मधून मधून कानीं पडत होता. शिवाय दिवा मालविण्याचे अगोदर त्या ठिकाणची ती भयंकर प्रेतस्थिति इत्यादिक प्रकार **शिलादित्या**च्या दृष्टीस प्रत्यक्ष पडले होते. तेव्हां या इतक्या सगळ्या गोष्टी एकवटून त्यांयोगें त्याची वृत्ति भीति, तटस्थता, औदासीन्य, जिज्ञासा आणि जागरूकता इत्यादि निसर्गतःच भिन्नप्रकृति अशा नानाविध प्रकारांहीं कशा प्रकारें क्षुब्ध होऊन गेली असेल याची वाचकांनींच कल्पना करावी. असतु. **दीक्षितदत्ता**चे तें खोल अस्पष्ट आणि मंद मंत्र जपणें कांहीं वेळ तसेंच चालू राहून शेवटीं तो मोठ्या मोठ्यानें मंत्र जपूं लागला, व मधें मधें हरभरे किंवा कांहीं तरी बारीक परिमाणांचे जिन्नस आसपास व त्या शरीरमात्रावस्थित **अंमे**च्या अंगावर फेंकीत असल्याचे आवाज ऐकूं येऊं लागले. कांहीं वेळानें तो अनेक तऱ्हेच्या भूतपिशाचादिकांची नांवें घेऊन त्यांस मोठ्या मोठ्यानें हांका मारूं लागला, व मध्येंच कांहीं वेळ थांबून कोणीकडच्या तरी उत्तरची वाट पहात आहे असा भास होई, तरी त्याप्रमाणें बराच वेळ उत्तर मिळालें नाहीं हें पाहून एका अर्थी **शिलादित्या**च्या अंत:करणास भीति वाटत होती तरी त्याची जिज्ञासा अधिक अधिक बळावत चालली, व दुसऱ्या अर्थी त्याच्या चित्तास त्या प्रयोगाच्या सिद्धीविषयीं निराशाही जाणवूं लागली. इतक्यांत **दीक्षितदत्त** मोठ्यानें ओरडून बोलला:—"झालें. सर्व तयारी झाली. आतां मंत्र सिद्ध होण्यास थोडेंसें रक्त मात्र पाहिजे."

शिलादित्य उत्तर करितो:—"उं:, एवढेंच असेल तर ती अडचण मी आतां नाहींशी करितों." असें बोलून त्यानें आपला निमचा बाहेर काढिला, आणि अंगांतून अंगरखा काढून डाव्या हाताच्या मोकळ्या दंडावर त्यानें त्याचें टोंक आंत बरेंच खूप खुपसलें. त्याबरोबर त्यांतून रक्त बाहेर निघूं लागलें असतां घाबरल्याशिवाय **शिलादित्य** ओरडून झणाला:—"महाराज! आपल्या इच्छेप्रमाणें रक्त सिद्ध आहे."

"ठीक ठीक! तें या प्रेताच्या अंगावर शिंपड झणजे झालें." **दीक्षितदत्त** बोलला.

"आज्ञा. या प्रेताच्या छातीवर हा मी आपला दंड धरिला आहे, व त्यांतून प्रेतावर रक्तस्राव होत आहे."

"फार उत्तम." असें बोलून **दीक्षितदत्त** चांचपूं लागला, व त्याच्या हातास **शिलादित्या**चा हात लागतांच त्यानें त्याच्या हातांत कसलासा एक लहान जिन्नस देऊन झटलें:—

"पुरे पुरे. आतां एवढी ही गोळी जखमेच्या तोंडाशीं धर म्हणजे तुझें रक्त वहाणें बंद होईल."

"आज्ञा." म्हणून **शिलादित्य** प्रेतापासून एकीकडे सरून त्यानें ती गोळी अंगाशीं धरल्याबरोबर रक्तस्राव बंद झाला. इकडे **दीक्षितदत्त** पहिल्याहीपेक्षां मोठ्यानें आणि दरडावल्यासारख्या वाणीनें मंत्र म्हणूं लागला. त्याच्या बरोबर **वरदकाल**ही मंत्र म्हणूं लागला, परंतु इतका मोठा आवाज होत असतांही त्यांतल्या एका अक्षराचा सुद्धां **शिलादित्या**स अर्थ कळला नाहीं.

इतक्यांत काय चमत्कार असेल तो असो, ते तिघे जण उभे होते त्यांच्या डोकीवर एकदम निळी जोत पेटल्यासारखा उजेड उत्पन्न झाला, व तो उजेड हळू हळू खालीं उतरत येऊन त्या प्रेताच्या भुंईवर स्थिर झाला, व त्याच्या योगानें प्रेताचे खोल गेलेले नेत्र, व कळाहीन व अंतकाळींच्या वेदनांनीं विरूप झालेलें त्याचें तोंड, ह्यांची भयंकर स्थिति सर्वांस प्रत्यक्षदृश्य झाली.

हें पाहून **दीक्षितदत्त** मोठ्यानें गर्जना करून म्हणालाः—"अरे पहातोस काय ? झाला माझा मंत्र सिद्ध !"

इतक्यांत **शिलादित्य** विस्मयानें बोलतोः—"महाराज ! पहा पहा ही **अंमा** चळवळ करीत आहे. मला वाटतें ती जिवंत आहे !" असें बोलून तो तिच्या अंगाला हात लावण्याकरितां ओणवा होऊं लागला.

"हां खबरदार ! नीट उभा रहा, नाहीं तर मोठा अनर्थ होईल!" इतकें बोलून **दीक्षितदत्त** पुनरपि मंत्र जपूं लागला.

सरतेशेवटीं एकदम किंकाळी ठोंकल्यासारखा आवाज करून तो म्हणालाः—"**शिलादित्या**! प्रेतास नमस्कार कर पाहूं ! ह्या स्त्रीचा जीवात्मा पिशाचरूपानें तिच्या कुडींत पुनरपि प्रवेश करीत आहे !"

दीक्षितदत्ताच्या तोंडून हे शब्द निघत आहेत नाहींत, इतक्यांत एकाएकीं प्रचंड वाऱ्याचा सोंसाटा यावा त्याप्रमाणें सर्र सर्र आवाज होऊन मोठा भयंकर व नेत्रांस दिपवून टाकणारा असा विलक्षण विद्युल्लतेचा प्रकाश त्या प्रेताच्या सर्वांगावर खेळूं लागून त्याच्या घशांतून खोल कण्हण्याप्रमाणें आवाज ऐकूं आला. **दीक्षितदत्ता**च्या आज्ञेप्रमाणें **शिलादित्या**नें त्या पिशाचास साष्टांग नमस्कार केला, व नंतर उभा राहून मोठ्या श्रमानें त्या प्रेत स्थितिमुक्त कुडीकडे एकसारखा पहात राहिला. इतक्यांत पहातो तों **अंमे**ची कुडी हळू हळू कुशीवर वळून सावकाश उठून बसून ताठ उभीही राहिली. इतका प्रकार झाला तेव्हां **शिलादित्या**च्या विस्मयास पार कोठून असणार ? तें प्रेत जें उभें राहिलें, तें जागच्या जागीं अगदीं स्थिर खिळल्यासारखें राहिलें. त्याचे ते रोड झालेले हात, व जिवंतपणीं अंगावर असलेलें तें रकटें, हीं प्रायशः पूर्ववत्च दिसत असून सर्व देऊळ अतिशय घाणीनें भरून गेलें; व सर्वांगावर खेळत असलेली विद्युल्लता हळू हळू मंददृश्य होऊं लागून सरतेशेवटीं राहतांपैकीं तेवढी निळी जोत मात्र **अंमे**च्या भुंवईवर कायम राहिली. तथापि तेवढ्या त्या जोतीच्या उजेडांत **अंमे**च्या त्या विकृत देहाची भयानकता झांकली गेली नाहीं. एवढेंच नव्हे, तर **शिलादित्या**ची दृष्टि तिच्या मुखचर्येकडे एकसारखी संलग्न होऊन गेली, व तितक्या त्या अल्प अवकाशांत डोळे मिटावे म्हणून हजारदा त्याच्या मनांत इच्छा

झाली, परंतु त्याचे डोळे अगदीं ताठून जाऊन ते कांहीं केल्या मिटेनातच. इकडे **दीक्षितदत्त** आणि **वरदकाल** यांचा मंत्रजप चाललाच होता. सरतेशेवटीं त्या प्रेतानें आपलें तोंड उघडलें, तों आंत दांतखिळी बसलेली कायमच दिसत असून, पुढील ओंठ मात्र कांहीं वेडी वांकडी भयंकर चळवळ करूं लागले. तशा स्थितींत प्रेताच्या तोंडातून गुदमरल्यासारखा खोल आवाज बाहेर पडताना ऐकूं आला:—"कांरे शठा! तूं मला त्रास देऊन परत कशासाठीं बोलाविलेंस?"

दीक्षितदत्त किंचित् दरडाविल्याप्रमाणें व किंचित् नम्रपणें उत्तर करितो:—"अरे पिशाचा! तूं जीवंत स्थितीमध्यें होतेंस, त्या वेळीं तुझ्या अंगीं भविष्य कथन करण्याची शक्ति होती. आतां तूं प्रेत झालें आहेस, या कारणानें तुला भविष्यज्ञान होत असलेंच पाहिजे. याकरितां आह्मांला तुझ्याकडून कांहीं प्रश्नांचे निकाल समजले पाहिजेत."

"विचार, सांगेन." पिशाच उत्तर करितें.

दीक्षितदत्त शिलादित्यास ह्मणतो:—"**शिलादित्या**! तुला काय विचारायचें असेल तें लौकर विचारून घे. ही भुंवईवर निळी जोत शाबूद आहे, तोंपर्यंतच काय तो या पिशाचावर माझा अंमल आहे, पुढें नाहीं."

शिलादित्य प्रेतास विचारितो:—"**अंमा**! यावेळीं तुझा प्रत्यक्ष जीवात्माच जर खरोखरी मजपुढें पिशाचरूपानें आला असेल, आणि आह्मां दीन मानवांना फसवून विनाकारण संकटांत घालावें असा जर त्याचा मनापासून उद्देश नसेल, तर तूं जिवंत असतां ज्या महासमर्थपूर्वक आणि परमपूज्य अशा **अर्हत्प्रभू**ची अंतःकरणपूर्वक सेवा करीत अससं, त्या **अर्हत्प्रभू**चीच शपथ घालून मी तुला विचारितों, त्याचें कृपा करून मला खरें खरें उत्तर दे. हल्लीं मी कांहीं एका गूढ कारस्थानांत पडलों आहें, व त्याचा उद्देश आपल्या नष्टप्राय होऊं पहाणाऱ्या परम पवित्र धर्माची पुनरुन्नति करण्याचा आहे, याकरितां तुला एवढेंच विचारावयाचें आहे कीं, तें कारस्थान सुरळीतपणें पार पडेल किंवा नाहीं?"

प्रेत उत्तर करितें:—"**शिलादित्या**! तूं भ्रमांत आहेस. अरे, तूं ह्मणतोस त्या कारस्थानापासून **अर्हद्धर्मा**चें कदापि हित व्हावयाचें नाहीं!"

"**अंमा**!" **शिलादित्य** परत विचारतो:—"तुझें ह्मणणें खरें असेल, परंतु तें कशावरून हें मी तुला विचारीत बसत नाहीं. परंतु घटकाभर असें समज, तें कारस्थान पार पाडण्यास अतिशय प्रचंड आणि साहसाचे अशाच उपायांची योजना व्हावयाची आहे, तर त्या कारस्थानाचा परिणाम गोड होईल किंवा नाहीं?"

"त्याचा परिणाम मरावें लागेल एवढाच होईल."

"तें खरें. पण मरणार कोण? तो दुष्ट—आमचा छळकर्ता आणि त्याचे ते दुष्ट उपदेष्टे—असेंचना?" **शिलादित्य** विचारितो.

"तसें नव्हे, याकामीं तुमच्याच व्यूहांत गुंतलेल्या लोकांचा नाश होईल!"

"काय काय ह्मटलेंस? आमचा नाश होईल?"

"होय."

दीक्षितदत्त शिलादित्यास बोलतो:—"हं—आटप आटप, तुला आणखी कांहीं विचारून घ्यावयाचें असेल तर ताबडतोब विचारून घे. कारण ही पहा जोत आतां लहान लहान होऊं लागली आहे!"

शिलादित्य प्रेतास पुनरपि विचारितो:—

"बरें **अंमे** ! आमच्या हातून आमच्या या नष्ट-प्राय धर्माचें पुनरुज्जीवन कधीं तरी होऊं शकेल किंवा कसें ?—"

परंतु **शिलादित्या**च्या तोंडांतून हे इतके शब्द निघताहेत नाहींत तोंच त्या प्रेताच्या भुंवईवरील जोत अदृश्य झाली, त्याबरोबर एकदम तें प्रेत धाडकन खालीं कोसळून पडल्याचा कडकड आवाज झाला.

"झालें. सर्व आटोपलें." **दीक्षितदत्ता**नें म्हटलें.

त्याच्या तोंडचे हे शब्द ऐकून **शिलादित्य** अत्यंत निराश होऊन जाऊन त्यास विचारितोः—"तें खरें, परंतु मला अजून दुसरे प्रश्न विचारावयाचे आहेत. याकरितां कृपा करून आपण हिला आणखी एकवार परत बोलावून आणावें."

"भलतेंच !" **दीक्षितदत्त** उत्तर करितोः—"एक वेळ पिशाच गेलें तें गेलें, तें म्हणून आतां परत यावयाचें नाहीं. चला, आतां आपण हें प्रेत परत त्याचे ठिकाणीं नेऊन पुरूं, व त्यास मीठही घालूं, म्हणजे त्याला सद्गति प्राप्त होईल."

त्यावर **शिलादित्य** पुढें बोलतोः—"महाराज ! इतका वेळ जो प्रकार पाहिला, त्याच्या योगानें माझें समाधान न होतां, उलटी या गोष्टीबद्दल आणखी आणखी समजून घेण्याविषयीं माझी अधिक अधिक उत्कंठा होत आहे. व हा प्रकार पुनरपि आणखी एकवेळ घडून येईल तर फार चांगलें."

दीक्षितदत्त शांतपणें उत्तर करितोः—"बाबारे, हें नेहमी असेंच असावयाचें. पिशाचादिकांशीं संसर्ग ठेवणें हें सर्व धर्मांत मोठें पाप मानिलें आहे; कारण जो म्हणून एक वेळ त्यांच्या नादाला लागला, त्याचा तो नाद कदापि नाहींसा न होतां उत्तरोत्तर वाढतच जातो. याकरितां बाबारे, तूं माझें म्हणणें ऐकून त्याप्रमाणें वागशील तरच त्यांत तुझें कल्याण आहे. तुला आतां या **अंमे**च्या पिशाचस्वरूपी आत्म्यानेंही तेंच बजावून सांगितलें आहे. तूं सांप्रत ज्या कारस्थानांत किंवा व्यूहांत खटपट करीत आहेस, त्यांत तुला यश कदापि येणार नाहीं, एवढेंच नव्हे, तर त्यांत तुझा समूळ नाशच होणार आहे."

शिलादित्य बोलतोः—"महाराज ! आपण म्हणतां ही गोष्ट कदाचित् खरी असेल, परंतु ज्या वेळीं मी या व्यूहांत पडलों, त्या वेळीं अतिशय भयंकर अशा आणाभाका झाल्या आहेत, याकरितां इतःपर माझ्यानें मागें पाऊल म्हणून कदापि घेववणार नाहीं. आणखी कदाचित् घेववलें, तरी तें मी घेऊंही इच्छित नाहीं."

"हेंच तें. याचेंच नांव वेडेपणा." **दीक्षितदत्त** बोलतोः—"**शिलादित्या** ! तूं माझें म्हणणें नीटपणें समजून घे. तूं कांहीं भयंकर आणभाकांची गोष्ट बोलतोस, परंतु तूं माझें सामर्थ्य प्रत्यक्ष पाहिलेंच आहेस. याकरितां तुला सांगतों. मी बाह्यतः जरी **हिंदु**धर्मी म्हणून म्हणतों, तरी माझा धर्मपंथ अगदीं निराळा आहे, व प्रत्यक्ष परमेश्वरानें वस्तुमात्राचे ठायीं ज्या सनातत शक्ति स्थापन केल्या आहेत, त्यांचें निरंतर पर्यालोचन व परिशीलन करीत असावें यांतच माझ्या पंथाचें गूढ तत्त्व प्रतीयमान आहे. व या तत्त्वानुसारेंच संतत पर्यालोचनपरिशीलनादिकांहीं माझ्या अंगीं प्रस्तुतची अद्भुत शक्ति व सामर्थ्य हीं उत्पन्न झालीं आहेत. यासाठीं मी तुला खात्रीनें सांगतों कीं, तूं आपल्या आणभाका एका अंगास ठेवून माझ्या सांगण्याप्राणें वागशील, तर मी केवळ आपल्या

अद्भुत सामर्थ्यानेंच तुजवर तुझ्या अर्हत्प्रभूचा रोष न होई असें करीन. "

शिलादित्य नम्रपणें उत्तर करितोः—" महाराज ! आपण महाविद्वान् आणि महासमर्थ आहां आपणापुढें चार शब्द बोलावे अशी माझी योग्यता नाहीं. आपण आतां मला जो उपदेश केलात, त्यापैकीं शेवटला भाग मात्र मी समजलों, परंतु त्याच्या अगोदर आपण जें कांहीं भाषण केलें, त्याचा मला चांगलासा बोध झाला नाहीं. तथापि आपल्या शेवटल्या भाषणाच्या धोरणावरून तो बोध करून घ्यावा असें माझी मनोदेवताच मला सांगत नाहीं. मी बोलून चालून साधा शिपाई आहें. अनेक देशांत आजपर्यंत पर्यटनें केल्यामुळें बऱ्याच जागीं आपणासारख्या विद्वज्जनांच्या संगतीचा मला लाभ झाला आहे, यामुळें मला चार गोष्टी केव्हां केव्हां समजतात एवढेंच कायतें. असो. महाराज ! माझा एक वेळ निश्चय झाला तो झालाच. तो म्हणून फिरावयाचा नाहीं. मग त्यांत प्राण जावो अगर राहो. मीं ज्या कांहीं भयंकर आणाभाका घेतल्या आहेत, त्या माझ्या स्वतःच्या नसून दुसऱ्यांच्या आहेत, याकरितां एक वेळ त्या आणाभाका घेतल्यावर मी या कामीं त्यांच्या इच्छेचा दास झालों आहे. याकरितां तें होऊन जर मला माझ्या शपथांतून मुक्त करितील, तर कदाचित् मी आपल्या वचनांतून मुक्त होऊं शकेन.—तें कांहीं असो. परंतु महाराज ! मी आपणास आपल्या मनाची खरी खरी स्थिति सांगतों. या कामीं आज कित्येक महिनेपर्यंत रात्रंदिवस या गोष्टीचाच माझ्या मनास ध्यास लागून गेल्यामुळें माझ्या मनाचा इतका दृढनिश्चय झाला आहे कीं, इतःपर जरी कदाचित् या कामीं माझ्या सोबत्यांनीं आपले अंग काढून मी यांत एकटाच राहिलों, तरी देखील हें काम मी म्हणून कदापि सोडणार नाहीं ! "

शिलादित्याच्या तोंडून हे शब्द निघतिले, त्याबरोबर त्या प्रेताच्या तोंडांतून खोल कण्ह्ण्यासारखा आवाज बाहेर पडला.

तो ऐकून दीक्षितदत्त त्यास बोलतोः—" पहा बोवा, मी तर आपणाकडून तुला चांगला उपदेश करावयाचा तो केला. इतःपर तुझी मर्जी. परंतु तुला सांगतों, तूं आतां जी गोष्ट बोललास ती गोष्ट या अंमेच्या पिशाचरूपी आम्यासही पसंत पडली नाहीं. व तो अद्यापि तूं या नादांत पडूं नको म्हणून तुला या कण्ह्ण्याच्या रूपानें पुनरपि सचवीत आहे. तें ऐकून तरी तूं अद्यापि सावध हो "

हे शब्द ऐकल्याबरोबर शिलादित्याची एकदम कांहीं विलक्षण स्थिति झाली, व त्याला त्या ठिकाणीं गुदमरल्यासारखें होऊन तो तडक घाईनें दाराकडच्या अंगास वळून दार उघडून बाहेर पडला.

त्या वेळीं आकाश पूर्वीप्रमाणेंच स्वच्छ व निरभ्र असून चांदणेंही पिठासारखें कायम होतें, तथापि त्यांकडे शिलादित्याचें मुद्दलच लक्ष नव्हतें म्हटलें असतांही चालेल. तो जो देवळांतून बाहेर पडला, तो भ्रमिष्टासारखा बाहेर पडून, आश्चर्य, भीति व निराशा अशा त्रिविध मनोवृत्तींच्या गोंत्यांत सांपडून त्या देवळाकडे एकसारखा पहात राहिला. तथापि त्या वेळीं वारा बराच गार वाहूं लागला होता, त्यायोगानें त्याचें तापलेलें मस्तक कांहीं वेळानें गार झालें, तेव्हां तो शुद्धीवर आला. तोंपर्यंत देवळाचें दार त्यानें उघडें टाकिलें होतें तें तसेंच उघडें राहिलें

होतें, व **दीक्षितदत्त** आणि **वरदकाल** हे दोघेही आंतच होते. ही गोष्ट मनांत येतांच त्यास **अंमे**च्या प्रेताचें स्मरण झालें, व तें परत जेथल्या तेथें पुरावयाचें होतें या गोष्टीचीही त्यास आठवण पडली. तेव्हां मात्र तिच्या प्रेताची व्यवस्था करण्याचे कामीं त्या उभयतांस मदत करणें हें आपलें कर्तव्य कर्म समजून तो पुनरपि आंत गेला, व पहातो तों आंत कंदिलांतील दिवा टिकटिक जळत असून **वरदकाला**नें कोठूनशी एक सुमारें पायली वजनाची मिठाची थैली बाहेर काढिली होती. असो; **शिलादित्य** आंत गेल्यावर त्यानें त्या दोघांस करावयाची मदत तीं केली, व अखेर **अंमे**च्या प्रेताची यथास्थित व्यवस्था आटपून तिचा खाडा पूर्ववत् बुजविण्यांत आला. त्यानंतर सर्व जण तेथून बाहेर येण्यास निघाले. त्यावेळीं **दीक्षितदत्ता**नें **शिलादित्या**चा हात आपल्या हातांत घेऊन त्यास झटलें:-"**शिलादित्या** ! जर तूं शहाणा असशील, तर तुला आज रात्रीं तूं या नादांत पडूं नको म्हणून जे दोन चार वेळ दृष्टांत झाले ते लक्षांत आणून तूं अजूनही त्याप्रमाणें वाग.

शिलादित्य उत्तर करितो:-" महाराज ! आतां थोडक्याच वेळांत आपण एका वाटेनें न मी निराळ्या वाटेनें जाण्याची पाळी येईल, परंतु त्याच्या पूर्वी मला आपणास एक गोष्ट विचारावयाची आहे. ती हीच कीं, आतां ज्या कांहीं एका उपायानें आपण भविष्यत् गोष्टींचें ज्ञान संपादण्याविषयीं यत्न केला, त्या उपायाशिवाय तें ज्ञान संपादन करण्याचे आणखी कांहीं निराळे उपाय आपणास ठाऊक आहेत किंवा कसें ? "

" हातू त्याचे. " **दीक्षितदत्त** उत्तर करितो:-" असे एक सोडून हजार उपाय मला माहित आहेत. माझ्यापाशीं एक जादूचें भिंग आहे, त्या भिंगावर कांहीं एक प्रकारचा प्रयोग करावा लागतो तो केला, म्हणजे त्यांतून पुढें होणाऱ्या गोष्टींचीं थेट चित्रें अगोदर एकून एक दृष्टीस पडतात. आतां मी आपल्या मठीकडेच चाललों आहें. तिकडे तूं मजबरोबर येत असलास, तर चल मी तुला तें भिंग दाखवीन. "

हें म्हणणें **शिलादित्या**नें मोठ्या आनंदानें कबूल केलें, व लागलीच ते सर्व जण श्मशानांतून बाहेर पडले.

प्रकरण ८.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें ते तिघे जण जे श्मशानांतून निघाले, ते मध्यें कोठें न थांबतां आडवाटांनीं लपत छपत **दीक्षितदत्ता**च्या मठीपर्यंत आले. ही मठी एका लहानशा टेंकाडाच्या माथ्यावर असून तिच्या आसपास एका हांकेच्या अंतरावरपर्यंत दुसरें घर मुळींच नव्हतें, ही मठी प्राचीन काळीं कोणीं राजानें धर्मशाळा म्हणून बांधिली होती, परंतु त्या धर्मशाळेंत कांहीं भुताटक्या दृष्टीस पडल्यामुळें आलीकडे तींत वस्तीस उतरण्यास कोणीही येत नसे. **दीक्षितदत्त** हा मूळचा **सिंहलद्वीप**चा हें पूर्वी सांगितलेंच आहे. तो अनेक देश हिंडून अनेक जादू संपादन करून फिरत फिरत **पुनमल्ली** शहरीं आला, त्या वेळीं कांहीं दिवसपर्यंत त्याची त्या शहरांत मुळींच डाळ शिजली नाहीं; व तो स्वतः निरिच्छ असल्यामुळें अडाणी लोकांस फसवून त्यांजपासून द्रव्य संपादन करण्याची गोष्ट देखील त्यानें मनांत आणिली नाहीं. तो आपल्या घरचा एकटा

असून त्यास मूलबाळ वगैरे मागें पाश कांहीं नव्हतां, यामुळें तो पडला तेथें पडला, निजला तेथें निजला, अशीच त्याची प्रायशः स्थिति असे. अशा स्थितींत तो एकदा आजारी पडून जगतो का मरतो अशी त्याची अवस्था झाली, त्यावेळीं कर्मधर्मसंयोग त्यास कोणी-एका कुलीन श्रीमंत **मधुमती** नामक जैनधर्मी बाईनें औषधादि उपचार करून बरें केलें. व तेव्हांपासून, **दीक्षितदत्त** स्वतः जरी निरिच्छ असे तरी तो त्या बाईचे उपकार निरंतर स्मरत राहून ती जिवंत असेपर्यंत वर्षांतून दहा पांच वेळ तरी तिला भेटून तिला चार समाधानाच्या गोष्टी सांगत असे. असो. **दीक्षितदत्त** दुखण्यांतून उठल्यानंतर ती बाई सात आठ वर्षेंपर्यंत जगली, व नंतर ती मरावयास टेंकली असतां तिनें **दीक्षितदत्तास** एकांतीं बोलावून आणून त्यास कांहीं एक गोष्ट सांगून ठेविली, व मागून सुमारें दोन घटिकांनीं तिचें प्राणोत्क्रमण झालें. त्या वेळेपासून पुढें **दीक्षितदत्त** त्या बाईचे घरीं कधीं जात नसे, तरी मरणकाळीं त्या बाईनें सांगितलेल्या गोष्टीचें त्यास पक्कें स्मरण राहिलें. ही गोष्ट कोणची, व तिचा आमच्या या कथानकाशीं कशाप्रकारें संबंध होता, याचा विस्तार पुढें यथास्थळीं करण्यांत येईलच ; तथापि प्रकरणस्थळीं इतकेंच सांगणें अवश्य वाटतें कीं, **दीक्षितदत्त** आपणास त्या बाईचा भाऊ असें मानीत असून तिजमागें राहिलेल्या कुटुंबांतील माणसांच्या कल्याणाकडे त्याचें सदा चित्त असे; व जरी त्यानें या गोष्टीची आजपर्यंत त्या कुटुंबापैकीं कोणाही माणसास ओळख दिली नव्हती, तरी तो आडून आडून त्याच्या हातून जेवढा त्या कुटुंबास उपयोग होण्यासारखा होता तेवढा करण्यास मागें पुढें पहात नसे. अस्तु. एके प्रसंगीं असें झालें कीं, त्या शहरच्या राजाची प्रकृति अकस्मात् बिघडून तो अगदीं अत्यवस्थ झाला, त्या वेळीं त्याच्या जिवास स्वास्थ्य आणण्याकरितां अनेक राजवैद्य व मांत्रिक यांनीं उपाय केले, तथापि त्यांचा कांहीं उपयोग न होतां राजावर मरणाचीच पाळी आलीसें वाटूं लागलें. अशा प्रसंगीं दरबारांत सहज कोणीं **दीक्षितदत्ता**च्या मांत्रिक ज्ञानाविषयींची गोष्ट काढिली, त्यावरून त्यास राजवाड्यांत बोलावून नेलें. **दीक्षितदत्ता**नें तेथें गेल्यावर राजाची प्रकृति पाहून त्यास एका महा पिशाचानें पकडलें असून आपण त्याचा निकाल लावूं शकूं म्हणून सांगितलें, व लागलेच कांहीं जादूचे प्रयोग केले त्यायोगें भगवत्कृपेनें त्या राजास चांगला गुण आला. त्यायोगानें राजाचें त्यावर प्रेम जडून त्यानें आपले प्राण वांचविल्याबद्दल कृतज्ञताबुद्धीनें दहा गांव इनाम देण्याचा हुकूम केला असतां **दीक्षितदत्ता**नें आपणास गांवाबिवांची कांहीं जरूर नसून आपणाला अभ्यासाकरितां एक निवांत जागा पाहिजे, याकरितां वर सांगितलेली रिकामी पडलेली धर्मशाळा आपणास रहाण्यास मिळेल तर तेवढ्यानें आपण संतुष्ट असूं म्हणून सांगितलें. राजानें ती गोष्ट मान्य करून ती धर्मशाळा त्यास देवविली, व शिवाय त्याच्या निर्वाहापुरतें कांहीं वर्षासन मोठ्या आग्रहानें त्याजकडून कबूल करून घेऊन त्यास दिलें. तेव्हांपासून **दीक्षितदत्त** नेहमीं त्या धर्मशाळेंत एकटाच राहूं लागला, व तो तेथें असतां काय करितो काय सवरतो याचें कोणासही ज्ञान होऊं देत नसे. असे कांहीं दिवस लोटल्यावर अकस्मात् त्याच्याच गांवचा

विक्रीस तयार. (नाट्यकथाणंव आफिसांत)

डाक्तर व वैद्य प्रहसन (अलाहिदा पातळ कागदावर छापिलेलें फारच स्वस्त) .. .. किं. २ आणे, टं. हं. ६ पै.
अद्भुतठकबाजी .. .. ,, १२ ,, ,, ६ ,,
बोधरत्नावली भाग १ .. .. ,, ६ ,, ,, ६ ,,
हुन्नरसंग्रह भाग २ .. .. ,, ६ ,, ,, ६ ,,
श्री अक्कलकोटस्थ स्वामी महाराजांचें चरित्र, भाग १ ला.
(महाराजांची सांधारण स्थिति आणि त्यांजविषयीं लोकांचे अभिप्राय) .. .. ,, ८ ,, ,, ६ ,,
कित्ता भाग २ रा. (महाराजांनीं दाखविलेले अद्भुत चमत्कार) ,, ८ ,, ,, ६ ,,

नव्या जाहिराती.

THE INDIAN SWEET AND HEALTH-GIVING EFFERVESCENT FRUIT SALINE.

इन्डियन मधुर व आरोग्यरक्षी वनस्पतीचें पाणी घातल्याबराबर उसळून वर येणारें क्षाररूप रसायण.

वनस्पतींचे उपयोग अनेक, व त्यांपासून जालीम औषधें बहुत होतात. आपलें रक्त स्वभावतः खारट आहे. मीठ खाणें हें फार अवश्य आहे, व हें घातलें असतां पदार्थ नासत नाहींत. रोग झाला ह्मणजे रक्त नासतें, व त्यांतील क्षारांमध्यें बिघड होतो, ह्मणूनच कांहीं रोगांमध्यें रक्त अतिशय काळें किंवा घन अथवा पातळ होतें. ह्या औषधाचा उपयोग कोणत्या रोगांवर होतो ? ह्याचें उत्तर एक. "ज्यामध्यें रक्त बिघडतें त्या रोगांवरः—" पित्त, अजीर्ण, कपाळ व पोटशूळ शारीरिक व मानसिक श्रमांपासून अस्वस्थता, दमून आल्यावर संताप, अतिशय जाग्रण व जड अन्न सेवन, मस्तकाची जडता, हवेमध्यें बिघड व अतिशय उष्म्यानें येणारी सकाळीं झांपड; लाल दुःख देणारी व धातुमिश्र लघवी; परमा, तोंडाचा कडूपणा व कोरड; भोजनानंतर ढेंकरा, उचकी, ओकणें, पोटफुगी; मस्तक, नेत्र व तळव्यांची तप्तता; किरीम, नळाचा उपद्रव, कावीळ, कौलू, मूळव्याध, सततप्रवास व वाईट हवा व पाण्यामुळें येणारे ताप, जलद प्रसरणारे रोग (महामारी, ताप; अतिसार इ.); कोठा साफ नसणें, अति तृषा व शारीरिक आग, खरूज, कंडू, हींव, मरवणांत स्वप्नावस्था, मुलांचीं मोठीं पोटें, डबा, स्त्रियांची कंबरदुखी व धुपणी, दुःखदायक स्राव, फेंपरें, ओकारी, अपस्मार, स्थूलशरीर, पोटाची जाड कातडी, जीर्णज्वर, संधिगतरोग, मूत्र व उत्सर्गेन्द्रियें वाईट कृत्यांनीं बिघडून लघवी साफ न होणें, आम्लपित्त, गुरगुरणें, अग्निमांद्य व चक्कर.—रक्त साफ राहील, अन्न बराबर जिरेल, काम करण्यास उमेद येईल, मनास उत्साह होईल. असे गुण कशावरून ? शेळीचें दूध उत्तम कां ह्मटलें आहे ! कारण ती खात नाहीं अशी वनस्पति नाहीं ह्यामध्ये अशाच वनस्पति घालून हें तयार

केलें आहे. हें औषध ज्यास गुणावह नाहीं त्यास विलायती उत्तम पाण्याशिवाय दुसरें औषध आल् राईट् करणार नाहीं. कान्देवाडी मेडिकल हालांत विकत मिळेल. किं. १ रु. बंगी करणावळ २ आणे. माहितीचा कागद आंत आहे. प्रत्येक पेटींत अर्धा रत्तल औषध घातलें आहे.

विठ्ठल विष्णु गोखले एम्. ए., एल् एम्. अँड् एम्.

मुंबई, कांदेवाडी मेडिकल हाल. शस्त्र व नेत्र डाक्तर. 8

NERVOUS EXHAUSTION AND DEBILITY NO MORE !!!

PEARL COATED COMPOUND PHOSPHORUS PILLS.

CONTAINING PHOSPHORUS, QUININE, STRYCHNIÆ IRON.

धातुरक्तकामोत्पादक, वीर्यस्तंभक, धातुपौष्टिक, शक्तिशरीरमनो-त्साहवर्धक, मिश्रफास्फरसाच्या मौक्तिकरससुशोभित उत्तम खातरीच्या गोळ्या.

सर्व धान्यें एकाच जमिनींत कां चागलीं होत नाहींत ! कारण जमिनीमधील व पुंढे होणाऱ्या धान्यामधील द्रव्यें सारखीं असलीं पाहिजेत, कारण धान्याचें पोषण वगर जमिनीवर अवलंबून आहे.—खालील रोगाच्या उत्पत्तीचीं काय कारणें आहेत ! मज्जाकंद अगर मेंदु, व रक्त व पाचनशक्ति हीं बिघडतात.—मज्जाकंदामध्यें मुख्य काय आहे ? फास्फरस, रक्तामध्यें लोह.—पाचनशक्तीवर वस्ताद कोणतीं औषधें आज उत्तम अशीं टरलीं आहेत? बाकीचीं दोन जीं वर लिहिलीं तीं. तर जसे चार आणि चार नऊ कधीं व्हावयाचे नाहींत, त्याप्रमाणें असे गुण ह्या औषधाशिवाय यावयाचे नाहींत. कोणीं गुण व नांव उलटीं करून गोळ्या प्रसिद्ध केल्या आहेत. तर त्या फास्फरसच्या नाहींत. तो आंत घालणें व राखणें फार कठीण आहे. आमची सही हीच खऱ्या गोळ्यांची खूण. आज तीन वर्षांत १२४ उमत्त विद्वान लोकांकडून सर्टिफिकिटें मिळालीं, तर खऱ्या गोळ्यांच्या गुणांविषयीं संशय बाळगणें, हणजे दूध काळें आहे ह्या हणण्याप्रमाणें आहे. असो.—त्याचे गुण काय आहेत ? मेंदूची शक्ति वाढवितें. अतिशयित स्त्रीसंभोगापासून मेंदूस झालेली किंवा शरीरांत येणारी क्षीणता दूर करितें.स्वप्नावस्था दूर होते. निरंतर धातुस्रवणानें हलकें डोकें बरें होतें. स्त्रीमनन वारंवार करून किंवा त्यांच्या दर्शनानें कितीएक लोकांस होणारा स्राव अथवा धातुपतनामुळें जी शरीराची खराबी होते ती एकदम जाते. अतिशयित दारूसेवनामुळें अथवा ऐहिक कोणत्या प्रकारच्या काळजीनें अगर फार दिवसांच्या व्याधीनें किंवा अतिशयित अध्ययन किंवा मानसिक कामकाजानें येणाऱ्या क्षीणतेवर हें औषध रामबाण आहे. न समजतां धातु जाते त्यावर ह्या औषधासारखें दुसरें औषध कोणतेंही नाहीं. चेतना नस-ल्यास ह्याशिवाय दुसऱ्या औषधाची गरज नाहीं. ह्यानें क्षुधा वाढते, बुद्धि व स्मरणशक्ति तीव्र होते. स्नायुशक्ति वाढून संभोगेच्छा होते. क्षय; धातुक्षय, फार दिवसांचें अजीर्ण, व पोटदुखी, मस्तकशूळ, कोलु, पंडु, नपुंसकत्व, व मेंदू व त्वचागत सर्व व्याधींवर हें प्रशस्त आहे. वयांत आलेल्या मुलांकडून अज्ञानामुळें ज्या कांहीं सृष्टिमार्गाविरुद्ध गोष्टी होतात, त्यांमुळें अथवा अभ्यासामुळ आलेली क्षीणता दूर होते. धातु पातळ झाल्यास अगर लघवीबराबर जात असल्यास, चेतना नष्ट झाल्यास, वीर्यात

केल्यानें इंद्रियाच्या शिथिलतेवर, स्वप्नावस्था व स्पर्श होतांच धातु जात असल्यास किंवा गांठी-सारखी जात असल्यास, धातुविकारावर, धातुस्थानी कडकीवर, व धातुस्थान बिघडलें असल्यास, अंगात कडकीवर, डोकें हलकें झाल्यास, अतिशय घाम येण्यावर, अंगास चिरचिर व मुंग्या येण्यावर, लघवी तांबडी व धातुमिश्र व शक्ति कमी होत असल्यास, व केश पांढरे होत असल्यास, ह्यासारखें उत्तम औषध दुसरें नाहीं. वीर्यस्तंभन होतें, व घट्ट होतें. धातु बंद होते. अन्न पचतें, संभोगेच्छा होऊन रतिसुख चांगलें होतें. बुद्धि व स्मरणशक्ति ज्यावर अवलंबून आहे, ह्मणजे मेंदू व मज्जा तंतूस तरतरी येते, क्षीणता पळते, शरीरास समाधान वाटतं. व जे अवेळीं डोळे खोल जाऊन क्षीण होऊन वृद्ध दिसावयास लागतात, त्यांस भरयौवन तेव्हांच आणितें, अस्थि बळकट होऊन स्नायु जोरदार होतात, रक्त बराबर फिरतें, डोळ्याचीं आग जाते व शरीरसौख्य होतें. श्रम जातो. काम करण्यास उल्हास वाटतो. अनुभवाशिवाय गुण कळणें कटीण आहे.

असे गुण कशावरून आहेत असा प्रश्न सहज होतो, तर अनुभव घ्यावा ह्मणजे समजेल. अगर चमत्कार ह्याप्रमाणें पहाः—दरवाजे व खिडक्या बंद करून रात्रीं अगर दिवसा खोलीमध्यें अंधेर पाडावा, एक गोळी फोडावी, उत्तम तेज दृष्टीस पडेल. पुन्हां तीच बहुत वेळीं फोडल्यास त्याप्रमाणें दिसेल. हेंच तेज सर्व गुणाचें कारण होय. हा चमत्कार प्रत्येकानें पहावा. भोजनानंतर एक गोळी सकाळीं, व एक संध्याकाळीं घ्यावी. पाण्याचा किंवा दुधाचा घोंट घ्यावा. गोळी गिळावी. चावूं नये. दर बाटलीस किंमत १४ आणे; व १ पासून ४ बाटल्यांपर्यंत बंगी व पोष्ट खर्च ६ आणे. पैसे आगाऊ 'कांदेवाडी मेडिकल हाल' येथें पाचल्यास औषध मिळेल.

विठ्ठल विष्णु गोखले एम्. ए., एल्. एम्. अँड्. एम्.
मुंबई, कांदेवाडी मेडिकल हाल. शस्त्र व नेत्र डाक्तर.

नवीन पुस्तक.

उदारदामोदर नाटक.—यांत प्रसिद्ध **मंगळवेढ**चे ठाणेदार भगवद्भक्त **दामाजीपंत**, ज्यांनीं त्यांचे वेळीं पडलेल्या दुष्काळाचे प्रसंगीं सरकारी धान्य लुटवून गरिबांचें रक्षण केलें, त्यांचे चरित्र नाटकरूपानें वर्णिलें आहे. यांतील प्रवेशरचना आधुनिक नाटकवाल्यांच्या नाटकांतील प्रवेशरचनेहून सर्वस्वीं भिन्न असून यांत **दामाजीपंता**ची भक्ति, वैराग्य, दयालुता, औदार्य इत्यादि गुणांचे सविस्तर निरूपणार्थ नवीन अनेक प्रसंग कल्पून चमत्कारिक संवाद दाखल केले आहेत. तसेच **दामाजीपंतां**चा हितशत्रु **मुजुमदार** ह्याच्या शत्रुत्वासंबंधानें कांहीं विशेष प्रकार शोधांतीं कळला, तोही यांत सामील केला आहे. हें पुस्तक टाइपांवर छापिलें असून ह्याचीं डेमी द्वादशपत्री सांच्याचीं २५० वर पृष्ठें आहेत. किंमत १। रु. ट. हं. ८—.

सीताराम बाबाजी गुर्जर
कृष्णवाडी, जगन्नाथाची चाळ, मुंबई.

अश्वधाटीप्रबोधिका:—जगन्नाथपंडितकृत अश्वधाटी वृत्तांत अनुप्रासमय लहानसें उपदेशपर काव्य आहे. ह्यांत मूळ श्लोक व खालीं त्यांची साकीछंदोबद्ध महाराष्ट्र टीका दिली आहे. किंमत ८=॥ ट. हं. ८॥.

सीताराम बाबाजी गुर्जर.
फणसवाडी जगन्नाथाची चाळ मुंबई.
10

लघुलेखनपद्धति.

किंवा

अति त्वरेनें मराठी भाषणें लिहिण्याची युक्ति.

वक्त्यांचीं भाषणें तात्काल सांगंत लिहितां यावीं अशा लिपीची आपल्या भाषेंत सांप्रत फारच जरूरी आहे असें जाणून मोठ्या परिश्रमानें ही लिपि तयार केली आहे. हिच्या योगानें वक्त्यांचीं भाषणें सांगंत उतरून घेतां येतात, व हिचा अभ्यास स्वतः करतां येईल. हिची पूर्णता व साध्यता पुणें वक्तृत्वोत्तेजक मंडळी कडून जें या सालीं पूर्ण बक्षीस मिळालें त्यावरून लोकविश्रुत आहेच. ह्या लिपीची रचना करणें किती महत्वाचें व श्रमाचें काम आहे, याचा विचार करून, व अशा प्रकारचीं लोकहिताचीं कामें केवळ लोकाश्रयावरच अवलंबून असतात हें ही लक्षांत आणून, अस्मद्देशीय राजेरजवाडे, संस्थानिक, व जहागिरदार, तसेच इतर लोक आपला उदार आश्रय देतील अशी आशा आहे.

हें पुस्तक येत्या जानेवारीच्या सुमारास छापून तयार होईल. पुस्तकाची किंमत ता. ३० जानेवारी सन १८८१ पावेतों आगाऊ आठ आणे, व मागाहून किंमत बारा आणे. शिवाय ट. हं. एक आणा.

गजानन भाऊ वैद्य.
मुंबई, लव्हारचाळीसमोर, परभू लैनींत घर नंबर २४. 11

जाहिराती.

शालोपयोगी व इतर पुस्तकें.

अंकगणित (मराठी ५ व्या इयत्तेपर्यंत).—कापडानें बांधलेलें किं. ।= आणे; प्याकिंग व ट. ख. ८—॥

मोडी वाचनसार भाग १ ला व २ रा—दर भागास किं. ८= व प्याकिंग व ट. ख ८—

हावर्डच्या इं. १ ल्या पुस्तकांतील मराठींत उच्चारार्थासहित शब्दसंग्रह—(इंग्रजी व्याकरणांतील व अंकगणितांतील मुख्य शब्द, संख्या, त्यांचीं स्थान व कोष्टकें यांसहित) किं. ८—॥ व प्याकिं. व ट. ख. ८—

हावर्डच्या इं. २ ऱ्या पुस्तकांतील मराठींत उच्चारार्थासहितशब्दसंग्रह—(इंग्रजी भूगोलांतील व अंकगणितांतील मुख्य शब्द यांसहित) किं. ८=॥ व प्याकिं. व ट. ख. ८—.

भूगोलाच्या व्याख्या, मराठी १ ल्या व २ ऱ्या पुस्तकांतील कठिण शब्दांचा अर्थ व कवितांचा अन्वययुक्त अर्थ—किं. ८—॥ व प्याकिं. व ट. ख. ८—

एशिया व यूरोपखंडाचें संक्षिप्त वर्णन किं. ८— पार्किंग व ट. ख. ८॥•
आरतीसंग्रह सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी. किं. १ रुपया व ट. आणि पार्कि. ख. ८=
पुस्तकें मुंबईंत खालीं सही करणाराकडे मिळतील. जास्त प्रती घेण्यांत ट. ख. त फायदा आहे.

वासुदेव मोरेश्वर पोतदार.
स्कूलमास्तर गिरगांव प्रायव्हेट स्कूल मुंबई.
ठिकाणा कांदेवाडी शांतारामची चाळ नंबर ४२.

अपूर्व तर्ककौशल्य.

नवीन शोध ! नवीन शोध ! !

धि सेन्टीफोलिओ.

अथवा

एका मूळ प्रतीवरून थोड्याच वेळांत व स्वरेनें कापिईंग प्रेसांत दाबल्याशिवाय १०० प्रती काढून घेतां येण्याचा अति स्वस्त सांचा.

—o—

डाक्तर, वकील, मुत्सद्दी, सावकार, सराफ व इतर सर्व लोकांस उपयोगी पडणारें उपयुक्त व स्वल्प साधन.

—o—

एका फ्रेंच पालिश केलेल्या लांकडाच्या उथळ पेटींत एक जस्ताची उथळ पेटी असून तींत मऊ लवचिक मिश्रणाचा एक पदार्थ आहे. आणि ह्या सांच्यासोबत रसायन क्रियेनें तयार केलेली एका प्रकारची शाई मिळते. त्या शाईनें कोणत्याही कोऱ्या कागदावर पाहिजे तो लेख किंवा चित्र लिहून तें सुकल्यावर तो कागद लिहिलेल्या बाजूनें सांच्यांतील पदार्थावर टाकावा, आणि वरील कोऱ्या बाजूवर तळहात हळू हळू फिरवून तो कागद १ मिनिटपर्यंत त्या सांच्यावर तसाच राहूं द्यावा. नंतर त्या कागदाचा एक कोपरा बोटांत धरून हळू काढावा. ह्मणजे पूर्वी कागदावर सदरील लेखाच्या नकला घेणें असतील ते कागद एका मागून एक सांच्यावर उठलेल्या लेखावर टाकून पूर्ववत तळहातानें हळू चोळून उचलीत जावें, ह्मणजे त्या कागदावर तो लेख उठत जाईल. याप्रमाणें ५० पासून ७५ पर्यंत चांगल्या प्रती उठतात, अशा रीतीनें पाहिजे तितक्या प्रती काढल्यावर सांच्यावरील लेख पाण्यांत भिजविलेल्या स्पंजानें पुसून टाकावा. ह्मणजे तोच सांचा दुसरें काम चालविण्यास उपयोगीं पडतो.

ह्या सांच्यावर इतर प्रेसाप्रमाणें प्रत्येक प्रतीचे वेळीं शाई लावण्याची मुळींच गरज पडत नाहीं. मूळ प्रतीवर लिहिलेला लेख सांच्यावर उठतो त्यावरच ५०।७५ प्रती निघतात. पुन्हां शाई लावण्याचें अगत्य नाहीं. तसेंच यास कापिईंग प्रेसाप्रमाणें दाबण्याच्या प्रेसाचीही जरूरी नसून हा सांचा पाहिजे तेथें कांखेंत घेऊन जाण्याजोगा असून तो लहान मूल देखील चालवूं शकतें.

हा सांचा खासगी पत्रव्यवहार व हरएक प्रकारचें गुप्त व जोखमी लिहिण्याचें काम अनेक प्रतींनिशीं चालवि यास फारच सुलभ व अत्यंत उपयोगाचा आहे. याकरितां याचा प्रत्येक मनुष्यानें अवश्य संग्रह करावा.

सांच्याचे दर.

(शाईची १ बाटली व स्पंज यांसहित)

प्रत	सांचा	किंमत रु.	बंगीखर्च रु. आ. पै.
१	मोठ्या अष्टपत्री सांच्याचा	१०	१
२	मोठ्या चतुष्पत्री सांच्याचा	२०	१—४
३	मोठा फुल्सकॅप सांच्याचा	३५	१—८
४	मोठा डबल फुल्सकॅप सांच्याचा	३५	२
	शाईच्या एका बाटलीची किंमत	१	०—५

याखेरीज पाहिजे तितकें मोठे सांचे तयार करून देण्यांत येतील व त्या मानानें त्यांची किंमत घेतली जाईल.

हे सांचे व शाई '**हुन्नरसंग्रह आफिसांत**' विक्रीस तयार आहेत. त्यांच्या किंमतीबद्दल पैसा मनी आर्डर करून खालीं सही करणाराकडे पाठविल्यास सांचे रवाना करण्यांत येतील. याविषयीं अधिक माहितीचा कागद सांच्याबरोबर पाठविला जाईल.

गोविंद मोरोबा कार्लेकर.

अद्भुतचमत्कार.

अवश्य पहा ! अवश्य पहा ! ! अवश्य पहा ! ! !

ऐंद्रजालिक सर्प.

(अजब चीज.)

हा चमत्कारिक सर्प प्रत्येकानें अवश्य करून पहावा. रसायन क्रियेनें तयार केलेल्या कांड्यांपासून हा सर्प उत्पन्न होतो. एक इंच लांब कांडीचा सुमारें २ हात लांब सर्प होतो आणि त्याचा रंग व आकृति वगैरे खऱ्या सर्पाप्रमाणें होते. ह्याच्या दोन प्रतींच्या डब्या आहेत. पहिल्या प्रतीच्या एका डबीची किंमत ३ रुपये व दुसऱ्या प्रतीच्या एका डबीची किंमत २ रुपये अशून प्रत्येक डबीस बंगीखर्च ५ आणे पडतो. यांच्या किंमतीबद्दल पैसा मनी आर्डर करून खालीं सही करणाराकडे पाठविल्यास डब्या रवाना करण्यांत येतील. सर्प करण्याच्या कृतीविषयीं एकंदर माहितीचा कागद डबीबरोबर पाठविला जाईल.

उपयुक्त सूचना.

व्यवहारोपयोगी हुन्नरसंग्रह

(मासिकपुस्तक.)

चालू वर्षाच्या आगष्ट महिन्यापासून आह्मीं सदर्हू पुस्तक काढण्याची सुरवात केली आहे, त्यात ह्या देशांत व परदेशांत चालणारे अनेक प्रकारचे धंदे, रोजगार, विद्या व कळाकौशल्यें यासंबंधी अनेक प्रकारच्या युक्ति, कल्पना व हुन्नर यांचा संग्रह होत असतो. ह्यांत बागाईत व शेती, सुगंधी व अतारी, रंगारी, वैद्यकी, पाकशास्त्र, कुंभारकाम. कांचकाम, दारूकाम इत्यादि कामांसंबंधी अनेक प्रकारचे उपयुक्त पदार्थ करण्याच्या कृति, कोणत्याही पदार्थावरील सर्व प्रकारचे डाग काढण्याच्या युक्ति, उपद्रवकारक प्राण्यांचा नाश करण्याचे उपाय; लवकर नासणारे पदार्थ पुष्कळ दिवस जसेच्या तसे टेवण्याच्या युक्ति; कोणत्याहि पदार्थावर पाहिजे त्या धातूचा मुलामा चढविण्याच्या कृति; फुटलेले पदार्थ सांधण्याकरितां लुकणें, सुगंधी व औषधोपयोगी तेलें व अर्क; अनेक प्रकारच्या साध्या व रंगीत शाई, आगकाड्या, साबू, मेणबत्त्या, लाख. वार्निशें, सरबतें, टूथपावडर्स, मिल्करोझिस, कोल्डक्रीम्स, पोमेटम्स, फ्रेंचपालिश, टिंक्चर्स. एशन्स, आसिड्स कोल्डवाटर्स इत्यादि सर्वोपयोगी उपयुक्त पदार्थ करण्याच्या कृति, आणि सांकेतिक भाषा, कूटगणित, कूटकविता, कूटप्रश्न आणि अंकचत्कार यांचा संग्रह होत जाईल.

याची किंमत अगाऊ एक वर्षाची २ रुपये व टपालखर्च ६ आणे; किंमत पाठविणें ती मनीआर्डर करून पुस्तककर्त्याकडे खालीं लिहिलेल्या ठिकाणीं पाठवावी. प्रत्येक अंक डेमी अष्टपत्री २० पृष्ठांचा निघतो. आगाऊ वर्गणी आल्याखेरीज पुस्तक सुरू केलें जाणार नाहीं.

ता. ८ आगष्ट सन १८८० इसवी.

गोविंद मोरोबा कार्लेकर.
हुन्नरसंग्रहकर्ते.

पत्ता.—नळावर पंचमुखी मारुतीची गल्ली, घर नंबर २६ मुंबई.

छापत आहे.

गारुडीविद्या

अथवा

गौडबंगाली जादूचे मनोरंजक खेळ.

कित्येक धूर्त व टक लोक कांहीं युक्तीच्या साधनानें अनेक प्रकारचे चमत्कार करून लोकांस ठकवितात, याकरितां अशा लोकांच्या कृतींचें व कसबाचें ज्ञान सर्व लोकांस व्हावें या हेतूनें आह्मीं वरील नांवाचें पुस्तक तयार केलें आहे. त्यांत युरोपियन

तमासगीर व एतद्देशीय जादूगीर मांत्रिक, देवऋषी, पंचाक्षरी, इलमी, सय्यद, भानामती, गारुडी, भुत्ये इत्यादि नांवांनीं प्रसिद्ध असलेले धूर्त, ठक, व ढोंगी लोक, आह्मीं जादू, भूत, प्रेत, पऱ्या, जीन, वेताळ, बीर, ह्यांच्या साह्यानें पाहिजे तें करूं शकतों असें सांगून गूढयुक्ति, हातचलाखी, लोहचुंबकशक्ति, विद्युत्प्रयोग, रसायणप्रयोग आणि वनस्पतींचे चमत्कारिक गुण इत्यादिकांच्या साधनानें अनेक प्रकारचे चमत्कार करून लोकांस कसकसे ठकवितात ह्याचें कृतींसह स्पष्ट रीतीनें दिग्दर्शन केलें आहे. ह्याचीं पृष्ठें डेमी द्वादशपत्री २०० होतील, व त्यांत निरनिराळ्या प्रकारच्या ७० पेक्षां जास्त खेळांची रचना गोष्टीरूपानें केली असून तत्संबंधी अवश्य लागणारीं चित्रें व आकृतिही जागजागीं घातल्या आहेत. याची किंमत तारीख १५ नवेंबर पर्यंत देणारांस फक्त १ रुपया व मागाहून १॥ रुपया पडेल. आगाऊ वर्गणी देणारांचीं नांवें पुस्तकांत छापलीं जातील. किंमतीबद्दल पैसा पाठविणें तो पुस्तककर्त्याकडे खालीं लिहिलेल्या टिकाणीं पाठवावा. पुस्तकें डिसेंबर महिन्यांत छापून तयार होतील. बाहेर गांवचे लोकांस टपाल खर्चाबद्दल २ आणे जास्त पडतील.

ता. २० आगस्ट १८८० इ०.

गोविंद मोरोबा कार्लेकर.

3 **पत्ता.**—नळावर पंचमुखी मारुतीची गल्ली. घर नंबर २६ मुंबई.

वर्गणीदारांस व इतरांस सूचना.

चालू सालाकरितां पुढील गृहस्थांस एजंट नेमिलें आहे त्यांजकडे वर्गणीदारांनीं वर्गणी भरावी

रा. रा. विष्णु गणेश जोशी, घर नं. २७० बुधवार पेंठ ..... पुणें.
" मास्कर दिनकर बाळ, डा. माळचंद्र कृष्ण भाटवडेकर यांचे घरीं, बडोदें.
" चिंतामण रामचंद्र केळकर, प्रमोदसिंधु छापखाना ..... उमरावती.
" बाळाजी अनंत वेलणकर, वैद्य, सदुभाऊ गोरे यांच्या घरीं .. रत्नागिरी.

सूचनाः—वर्गणीदारांकडून मागील वर्षासुद्धां सर्व वसूल एक महिन्याचे आंत आल्यास पुढें एका महिन्यानें मागील सर्व अंक वाचकांस एकदम मिळतील.

" बाळाजी कृष्णनाथ ३
" बाळकृष्ण विठोबा बदले ३
" लक्ष्मण माणिकजी ३
" वासुदेव बी. लोटलीकर ३
मि. एस्. डानियल, डिगी .. .. ३— ६
सेक्रेटरी भिवंडी लायब्ररी .. .. ३— ६
" पुणें ट्रेनिंग कालेज लायब्ररी .. .. ३— ६

चुकीची दुरुस्ती:—आमच्या चालू वर्षाच्या ३ अंकांतील पोंचींत रा. रा. सीताराम बाबाजी वैशंपायन या नांवाच्या ऐवजीं रा. रा. सीताराम रावजी वैशंपायन असें वाचावें.

जाहिरात.

अवश्य अनुभव द्या ! ! ! एकदांच घेऊन खात्री ! ! !

CHILDREN'S ELIXIR.

बालामृत.

[झाडास ज्याप्रमाणें वाढवावें त्याप्रमाणें तें वाढतें.]

हें औषध एतद्देशीय अनेक वनस्पती मिश्र करून केलें आहे. ह्यापासून मुलांस जंताचा उपद्रव कधींही होत नाहीं. अन्न पचन होऊन वारंवार दूध ओकणें बंद होतें. आईच्या दुधाच्या कमताईमुळें किंवा तें मुळींच न मिळाल्यामुळें होणारी क्षीणता व पांडुरकी ह्यांवर हें औषध जालिम आहे. गाईच्या दुधावर वाढविलेल्या मुलांस होणारे सर्व रोग ह्यानें दूर होतात. गर्भाशयांत मुलें असतां म्हणजे गरोदरपणामध्यें अंगांत रक्ताची कमताई असल्यामुळें अगर पुढें अंगावर दूध न मिळाल्यामुळें मुलाच्या अस्थि कांड्यांप्रमाणें होतात त्यांस बळकटी आणणें व ज्यांचीं पोटें फार मोठीं होतात व तीं फार खातात व हगतात व हळुहळु क्षीण होतात ह्यावर हें अद्वितीय आहे. खोकला, गळ्यामध्यें घरघर आवाज, फेपरें, आकडी, पांढरी हग, आंव, अतिसार ह्या रोगांचा हें दिलें असतां संभवसुद्धां रहात नाहीं. पाय लटके पडल्यास हें औषध देऊन अवश्य पहावें. दमा, माती खाण्याची संवय, खरूज, कंडू, डोकींतील फोड, लागलेच दूर होतील. शौचास नियमानें होऊन सर्व इंद्रियें बराबर राहतील म्हणूनच ह्यास बालामृत असें नांव दिलें आहे. दर बाटलीस किंमत रुपया एक. बंगी खर्च आठ आणे. घेण्यास मधु असल्याकारणानें मुलें पाहिजे तितकें घेतील. माहितीचा कागद आंत आहे.

विठ्ठल विष्णु गोखले एम्. ए., एल्. एम्. अँड्. एस्.
शस्त्र व नेत्र डाक्तर.

मुंबई, कांदेवाडी मेडिकल हाल.

नाट्यकथार्णव.

प्रस्तुतकालीं 'नाव्हल्स' व 'नाटकें' यांचे संबंधानें जो लोकांचा भ्रांतिमूलक समज झाला आहे त्याचा निरास होऊन, या अत्यंत अनुपम मनोरंजनसाधनाचें वास्तविक स्वरूप व त्याची वास्तविक योग्यता हीं त्यांचें मनांत पूर्णपणें ठसावींत, व तेणेंकरून सदभिरुचि जागृत होऊन काव्यामृतरसास्वादाविषयीं त्यांच्या अंतःकरणाची साहजिक प्रवृत्ति व्हावी, हा ह्या पुस्तकाचा मुख्य उद्देश असून, यांत संस्कृत व इंग्लिश या भाषांत रचलेल्या उत्तम उत्तम नाट्यकथादिक प्रबंधांच्या आधारें आपल्या महाराष्ट्र वाणीस जुळतील अशा प्रकारचीं अनेक 'नाव्हल्स' व 'नाटकें' यांचा संग्रह यथावकाश होणार आहे, व प्रस्तुतनिरेखीं स्वकपोलकल्पित सदुपदेशपर कथानकें व नीतिबोधाचे चुटके यांचाही समावेश होईल. या पुस्तकांत अश्लीलता नीतिभंगादि दोष न येऊं देतां हें पुस्तक सर्व सभ्य व कुलीन स्त्रियांस वाचण्याजोगें करण्यांत येईल. या पुस्तकाच्या वर्गणीचे दर खालीं लिहिल्याप्रमाणें ठेविले आहेत.-अगाऊ वर्षास २ रु., मागाहून वर्षास रु. ४८८,-व किरकोळ दर प्रतीस ८६. शिवाय टपाल हंडील वर्षाचें अगाऊ ८६.

अगाऊ वर्गणी पुस्तक घेतल्यापासून दोन महिन्यांच्या आंत भरली पाहिजे. पोस्टाचीं तिकिटें पाठविणें झाल्यास अर्धी आण्याचीं असावीं, व रुपयास अर्धा आणा याप्रमाणें वर्तवळा पाठवावा.

या पुस्तकांत नियमितपणें येणाऱ्या" मजकुराशिवाय हरएक प्रकारच्य लोकोपयोगी जाहिराती निराळ्या छापून पुस्तकास जोडण्याचा विचार केल आहे. नियमित मजकुराचे ज्याप्रमाणें प्रत्येक पृष्ठावर दोन रकाने (कालम) करण्यांत येतात, त्याप्रमाणें जाहिरातीचे दोन रकाने करण्यांत येणार नाहींत जाहिरातीचे दर पुढें लिहिल्याप्रमाणें माफक ठेवण्यांत आले आहेत:—

	रु.	आ.
चार ओळींचे आंत	१	०
पुढें प्रत्येक ओळीस	०	४
दुसरे खेपेस प्रत्येक ओळीस ८३ आणे व तिसरीपासून प्रत्येक ओळीस	०	२

मुदतीच्या जाहिराती मक्त्यानें घेतल्या जातील.

भाषांतर करणें असल्यास पहिल्या खेपेस दर ओळीस ० ४

कांदेवाडी, मुंबई.

शंकर मोरो रानडे बी. ए.
नाट्यकथार्णवाचे कर्ते व मालक.

॥ श्री ॥

नाट्यकथार्णव.

त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते ।
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधा ह्येकं समाराधनम् ॥
मालविकाग्निमित्रे श्रीकालिदासः

स्फुरत्कलालापविलासकोमला करोति रागं हृदि कौतुकाधिकम् ।
रसेन शय्यां स्वयमभ्युपागता **कथा** जनस्याभिनवा वधूरिव ॥
कादंबर्यां बाणः

पुस्तक २. भाद्रपद शुद्ध १ शके १८०२. अंक ६.

NÁṬYA-KATHÁRṆAVA,

A MONTHLY MAGAZINE

Comprising a series of Marathi Dramas, Novels &c. &c.

विषय. **अनुक्रमणिका.** पृष्ठ.

अतिपीडचरित नाटक (समाप्त) १०९–१२५
" (मुखपृष्ठ.)
" (उपोद्घात) १–१२

मुंबई.
"इंदुप्रकाश" छापखान्यांत छापिला.
(सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधी सर्व प्रकारचे हक्क मालकांनीं स्वाधीन ठेविले आहेत.)
किंमत ६ आणे.

वर्गणीची पॉच.

		रु.	आ.	पै.
प्रो.	रामकृष्ण गोपाळ भांडारकर	३	१४	
डा.	भिकाजी अमृत	६	८	
डा.	आत्माराम पांडुरंग	३		
रा. रा.	बाबुराव बाळकृष्ण	६		
,,	गणेश रामचंद्र किर्लोसकर	३		
,,	केशवराव महादेव कावळे	३	६	
,,	विनायक बल्लाळ खरे	३	६	
,,	आत्माराम कृष्ण नैगु	३		
,,	राघोबा जगंनाथ	३		
,,	कृष्णाजी लक्ष्मण दातार	३		
,,	शिवशंकर गोपीनाथ	३		
,,	नारायम विश्राम	३		
,,	भाई रामचंद्र	३		
,,	जनार्दन पुरुषोत्तम मंत्री	३		
,,	पांडुरंग भीमराव	३		
,,	नारायण सुंदरजी तळपादे	३		
,,	विनायक विठोबा धैर्यवान	१		
,,	जनार्दन श्रीकृष्ण तळेकर	३	६	
,,	भैरव उद्धव वकील	३	६	
,,	बळवंत नारायण लागवणकर	२		
,,	तात्याजी दामोदर	३	६	
,,	विठ्ठल सीताराम	३		
,,	रामचंद्र महादेव फाटक	६		
,,	बाळकृष्ण गोपाळ खेर	३	६	
,,	कृष्णाजी परशुराम गाडगीळ	३	६	
,,	पांडुरंग एकनाथ धराधर	३	६	
,,	जनार्दन बाळाजी मोडक	३		
,,	विजरंग अण्या मुदलियार	३	६	
,,	गणपतगीर रतनगीर गोंसावी	३	६	
,,	विष्णु अनंत पटवर्धन	६		
,,	दाजी हरी	३		
,,	बाळ मंगेश वागळे	३		
,,	भास्कर नारायण	१		
,,	बाबु येसु मयेकर	३	६	
,,	टी. दादोराव, खामगांव	३	६	

राज०—अरे कायरे? भांडण कसलें चाललें आहे?

जामू०—आमच्या भांडणांत तूं कोण मधें पडणार? चल सोड मला, या लंडीची या क्षणीं कंबख्ती देतों उडवून !

राज०—अरे जरा दम तर खाशील ?—गृहस्था! तुम्हीं दोघे कसल्या पत्राबद्दल बोलत होतां?

जामू०—तूं आपल्या वाटेनें जा. मी प्राण गेले तरी पत्राचा आणि माझा वियोग होऊं देणार नाहीं. कारण त्याच्यावर तर माझ्या सगळ्या ऐश्वर्याची मदार आहे.

राज०—फार चांगलें बोललास. आतां तर तुझें पत्र मी घेणारच. कारण येऊन जाऊन तुला काय तें ऐश्वर्य पाहिजे आहे, त्याची तुझी सोय करायचें काम माझें. (पत्र जुलुमानें त्याच्या जवळून हिसकावून घेतो.)

जामू०—अरेरेरे! दुष्टा ! तुझा जीव घेतों.

राज०—चिप्प रहा. (कांतिवर्म्यास) तुम्हीं याला अंमळ संभाळून धरा. मी हें पत्र वाचून पहातों.—आं काय ? मी शुद्धीवर आहें काय? माझे नेत्र मला फसवीत तर नाहींत ? तो दुष्ट विश्वासघातानें हा हुकूम पाठवून त्यां दोघांना टांगून मारविणार होता काय?

(पत्र फाडून टाकतो)

जामू०—अरेरे ! माझा सर्वस्वी घात केलास ! आज केवढ्या भाग्याच्या शिखरावर जाऊन बसणार ह्मणून मी आपल्या मनांत मांडे खात होतों, तें सर्व त्वां दुष्टानें व्यर्थ करून टाकलें ! आतां मी तुझा तरी प्राण घेईन नाहीं तर आपला तरी प्राण देईन!—मूर्खा ! चल सोड मला ! मी याचा आतां जीव घेणार ! (झटापटी लागतो, इतक्यांत कांतिवर्मा त्यास खालीं पाडून त्याच्या कानांत कांहीं सांगतो, त्याबरोबर संतोषानें) असं काय ? सेनापतीचा हा दुष्टपणा मला माहित नव्हता! मी ह्मटलें कांहीं साधी कामगिरी असेल ! असो. महाराज ! इतःपर मी त्याच्यावर विश्वास ठेवणार नाहीं. मी आपला जन्माचा चाकर झालों आहें. आपण सांगाल त्याप्रमाणें वागण्यास मी सिद्ध आहें. (कांतिवर्मा त्यास सोडितो, व तो उठून राजवाहनराजांच्या पायांवर लोटांगण घालितो.) महाराज ! न जाणतां माझ्या हातून अपराध घडला याची माफी असावी.

राज०—(गहिंवरून) हे सत्पुरुषा ! ऊठ ऊठ ! तूं हुकुमाचा चाकर असल्यामुळें यांत मी तुझ्याकडे कांहीं दोष समजत नाहीं.—इतःपर मी तुला आपला सेवक समजून तुजवर प्रेम ठेवीन, तुला भाग्यास चढवीन, याकरितां एवंढ कर, असाच ताबडतोब तुरुंगांत जा, आणि त्या ठिकाणीं तेथले अधिकारी जर **अतिपीड**महाराजांच्या आणि माझ्या प्रियेच्या जिवाचे हाल करूं पहातील, तर त्यांचें निवारण कर. हें घे तुला बक्षीस. परमेश्वर तुझें कल्याण करो ! आह्मीं मागेमाग आलोंच !

(सर्व जातात.)

प्र० ५—खलदर्शनरावांचा तंबू.

(खलदर्शनराव, शशिकला आणि चंद्रानना बसलीं आहेत.)

(इतक्यांत मरुत्सेनराव येतो.)

मरु०— विजयस्व राजन् !

खल०—यावें. बसावें. आह्मीं आपलीच वाट पहात बसलों होतों. आज आमच्या सैन्याचा जय झाला तो केवळ आपल्याच बाहुबळानें. तसेंच शत्रूकडील लोकही आपणच कैद करून आणिले. अस्तु. आतांत्या लोकांना आपल्या समोर उभे करून ज्यास जें शासन योग्य असेल तें त्यास देण्याचा माझा मानस

आहे. याकरितां सर्व कैदी आतांच्या आतां आणून हजर करावे.

मरु०—**खलदर्शनरावजी** ! आपण इतक्यांतच अशी घाई करण्याचें कांहीं कारण आहे असें मला वाटत नाहीं. आज आपल्या सैन्यास जयप्राप्ति होऊन शत्रूकडील लोक कैद करण्यांत आले, त्यांमध्यें तो वृद्ध हतभाग्य **अतिपीडराजा** व त्याची कनिष्ठ कन्या **मृगांकमाला** हीं दोघेंही आहेत. पैकीं **अतिपीडराजा** याचा पूर्वीचा अधिकार व त्याचें वयोमान हीं दोन्हीं जर कारणीं कोणाच्या दृष्टीस पडतील, तर न जाणों सैन्यांतील सर्व लोक एकादे वेळीं आपणाविरुद्धच उठतील. यासाठीं मी ही गोष्ट पूर्वीच लक्षांत आणून अगोदर त्याच्यावर चांगल्या विश्वासुक लोकांचा पहारा ठेवून त्यास अगदीं गुप्तपणें बंदोबस्तांत ठेविलें आहे. तसेंच त्याच्या बरोबर त्याच्या कन्येसही बंदोबस्तांत ठेविलें आहे, व त्याचें कारणही सदरहूप्रमाणेंच आहे. व आपण उद्यां, परवां किंवा पुढें पाहिजे तेव्हां त्यांची चौकशी करण्याचा विचार ठरवाल, त्या वेळीं मी त्यांना आणून आपणापुढें उभें करीन. लढाईच्या श्रमानें आपण सर्व दमलों आहों, भागलों आहों, व आपल्या अंगांतील घामही अद्यापि पुरता जिरून गेला नाहीं; तसेंच आपल्या सैन्यांत कोठें कोणाचे बाप, कोणाचे लेंक, कोणाचे बंधु, कोणाचे जिवलग मित्र, अशांचा संहार झाला आहे, यैणेंकरून सर्वांचीं मनें अस्वस्थ झालीं आहेत. याकरितां **अतिपीडराजा** आणि **मृगांकमाला** या दोघांचीही चौकशी करण्याची इतक्यांतच घाई करूं नये असें मला वाटतें.

खल०—**मरुत्सेनराव** ! या कामीं माझा मी मुखत्यार आहें. मला तुमचा उपदेश ऐकण्याची जरूरी नाहीं. ज्याप्रमाणें इतर सर्व आमची प्रजा, त्याप्रमाणें तुम्हींही आमची प्रजाच आहां. तुम्हीं लढाईंत होतां एवढ्यावरून तुम्हीं स्वतः माझे प्रजाजन यापेक्षां तुमची योग्यता मी अधिक समजत नाहीं.

चंद्रा०—(खलदर्शनरावास । हें पण काय बोलणें आज निघालें आहे ! माणसाची योग्यता सर्व काळ सारखीच का रहाते ! तींत नाहीं का कुणाला कमजास्ती करितां येत ?

खल०—येवो अगर न येवो, त्याची मला पंचाईत नाहीं. कांहीं असलें तरी **मरुत्सेनराव** माझ्या प्रजाजनांपैकींच एक जण आहे. व त्याची योग्यता वाढवायची किंवा कमी करायची ह्या दोन्ही गोष्टी माझ्या इच्छेच्या आहेत.

चंद्रा०—पुरे पुरे ! मी नाहीं हें असलें बोलणें ऐकायची. झटलें **मरुत्सेराव** प्रजाजनांपैकीं असले तरी हें राज्य समाईकींतलें आहे, त्यावर तुमचा जेवढा हक्क आहे, तेवढाच माझाही पण आहे. मला वाटेल त्याला वाढविण्याला मी मुखत्यारीण आहे. मी आपण होऊन **मरुत्सेनरावां**ना सेनापतीचा अधिकार दिला आहे कळलें ? मी तुमचें बोलणें इतका वेळ ऐकून घेतलें हेंच मोठें आश्चर्य!

शशि०—ताई! पुरे! आतां तोंड आटपून धर ! इतकें रागावूनच नको कांहीं बोलायला. **मरुत्सेनरावां**ची योग्यता वाढवायला तूंच कांहीं नको आहेस. त्यांची योग्यता वाढायला त्यांचे स्वतःचे गुणच पुरे आहेत!

चंद्रा०—अक्का ! तूं तरी अगदीं भांडायलाच लागली आहेस जशी ! तूं म्हणतेस तें मी

समजतें, पण त्याहीपेक्षां जास्ती योग्यता वाढवायचें काम माझ्याच कडे आहे.

शशि०—(मत्सरानें) अस्सें अस्सें ! आतां समजलें. यांची योग्यता वाढवायचें काम तुझ्याकडे का आहे? तेग कसें? ह्यांच्याशीं लगीन बिगीन लाविलंस तर मात्र कुणाला ठाऊक, नाहीं तर तूं ग यांची योग्यता कशी वाढविणार ?

चंद्रा०—पुरे. तुझी थट्टा मी समजलें. पण तुला आहे का ठाऊक ? असल्या थट्टा देखील कधीं कधीं खऱ्या ठरतात !

शशि०—असें काय? हें तुला कोणीं एकाद्या जोशानें सांगितलें असेल नाहीं? पण नाहीं हो? तो जोशी लबाड होता, आणखी त्यानें तुला फसविलें.

चंद्रा०—अक्का ! तुला काय सांगूं ? माझ्या मनांतून तुला उत्तर द्यावें म्हणून कसे अगदीं कढ येताहेत, पण काय असेल तें असो. आज माझी प्रकृति कांहीं नीट नाहीं. त्यामुळें माझ्यानें या वेळीं जास्ती कांहीं बोलवत नाहीं.—तरी पण माझी मी मुखत्यारीण आहें. मी कांहीं कुणाच्या बापाला भ्यायची नाहीं कीं लाजायची नाहीं. तूं माझी थट्टा केलीस खरी, पण तुझ्या पुढे नाक खाजवायकरितांच मी तूं म्हटलेली गोष्ट करून टाकणार, आणखी मुहूर्त असेल तर आजच्या आज मी यांच्याशीं लगीन लावणार !

शशि०—आणखी फळशोभनही पण आजच्या आजच उरकून घेणार असशील नाहीं? बरें, घे हो. तुला आंत पोंचवायच्या वेळेस मीच तुझ्याबरोबर येईन समजलीस ?

चंद्रा०—मी तुझ्याशीं बोलत नाहीं—**मरुत्सेनराव** ! इतःपर तुम्हीं माझे पतिच झालां असें समजा. मी उघड बोलतें, पण मीं कांहीं कुणाचें दोन चव्वल खाल्ले नाहींत, नि कुणापुढें बोलायला मी कांहीं भ्यायची नाहीं!

शशि०—तूं कशाला भिशील ? म्हणूनच मीही पण **मरुत्सेनरावां**ना तुझ्याशीं लगीन करायला सांगतें.—का **मरुत्सेनराव** ! तुम्हांला ताईसारखी बायको आवडेल ना पण ?

मरु०—(त्या गोष्टीस कबूल असल्याविषयीं आपली इच्छा मुद्रेनें दर्शविली.)

खल०—एकून इतक्यांतच वाग्निश्चयसुद्धां होऊं लागला म्हणा! पण ऐकिलेंस काग ए—यांचें वाग्दान करायचा अधिकार तुझ्या हातीं नाहीं समजलीस ?

मरु०—राजश्री ! आपण फार चढून जाऊं नका. तो अधिकार आपल्याही पण हातीं नाहीं.

खल०—अधमा ! आपलें तोंड आटपून धर. हा अधिकार माझा आहे.

चंद्रा०—प्राणनाथ ! पहातां काय ? हे तुमची निंदा करितात तर याना दाखवा. इथल्या इथेंच दोन हात पाहूं.

खल०—हां खबरदार ! मला थोडकें बोलायचें आहे तेवढें सर्व जण अगोदर ऐकून घ्या. **मरुत्सेनराव** ! तुम्हीं राजद्रोह केला आहे, याकरितां तुम्हीं माझे कैदी आहां. तुमची मला पूर्ण चौकशी कर्तव्य आहे, आणि ती बरोबरच ही (शशिकलेकडे बोट दाखवून) मृदुभाष सर्पिणी इचीही चौकशी करावयाची आहे, याकरितां तुम्हीं दोघांनीं ही अटकेत राहिलें पाहिजे. **चंद्राननाबाई** ! यावेळीं मी आपल्या इच्छेच्या आड येतों आहें, परंतु माझ्या त्यापुढें निरुपाय आहे. तुम्हीं **मरुत्सेनरावां**शीं लग्न लावणार, पण त्याच्या

अगोदरच त्यांनीं माझ्या स्वतःच्या बायकोशीं लग्न लावायचें कबूल केलें आहे, याकरितां अगोदर तेवढें लग्न मला पारपाडिलें पाहिजे!

शशि०—हें भांडण आतां या मजलेला का येऊन पोंचलें ?

खल०—**मरुत्सेनराव** ! तुझीं शूर आहां, आणखी तुमचीं तरवारही तुमच्या जवळच आहे, याकरितां आतां मी नगारा वाजवितों, त्याबरोबर तुमचा गुन्हा शाबीत करून देण्याकरितां कोणी मनुष्य न येईल, तर तो शाबीत करून देण्यास मी तुमच्यासमोर तरवारीनिशीं उभा राहीन, आणखी तुमची दुष्ट कृत्यें एकून एक बाहेर उजेडांत आणीन.

चंद्रा०—(विवळते) अग आई ! काय असेल तें असो, यावेळीं माझ्या अंगाचा अधिकच भडका होऊं लागला आहे ! आज मी मरतें खचित.

शशि०—(आपणाशीं) हें तर **ब्रह्मदेवच** बोलला आहे. कारण तसें जर न होईल, तर इतःपर मी औषधांवर म्हणून कधीं विश्वास ठेवणार नाहीं !

मरु०—ठीक ठीक. मला तुमचें म्हणणें कबूल आहे. येऊं द्या कोण येतो आहे तो माझ्या समोर. त्याचे या शस्त्रानें एका क्षणांत दोन तुकडे करून टाकितों. जो अधम नीच मनुष्य माझ्यावर दुष्टत्वाचा आरोप करितो, त्याचे तिळप्राय तुकडे केल्याशिवाय हा बहादर कदापि रहाणार नाहीं !—नगारा खुशाल वाजूं द्या—या वेळीं आपण किंवा आपणासारखे लक्षावधि लोक जरी तुटून पडले, तरी माझें सत्य आणि इमान हींच मला साह्यकारी होऊन शत्रूंचा संहार करण्यास मला सामर्थ्य देतील.

खल०—अरे बाहेर नगारेवाले कोण आहेतरे ?

मरु०—अरे कोण आहे रे तिकडे ? अरे, जा, आणि माझ्या सैन्यांतील मुख्य नगारेवाल्यास इकडे बोलावून घेऊन ये—

खल०—(हंसून) **मरुत्सेनराव** ! तुझीं आतां हा कंठशोष विनाकारण काय म्हणून करितां? नुकत्याच आटपलेल्या लढाईचे प्रसंगीं तुझीं आपल्याबरोबर जें सैन्य म्हणून आणिलें होतें, तें सर्व तुझीं माझ्या नांवानें गोळा केलें होतें, त्याला तुझीं इकडे आलां त्या वेळींच रजा देण्यांत आली.

चंद्रा०—(विवळत) अग आई ! माझ्या सर्व अंगाला अधिक अधिकच विरविर सुटूं लागली आहे !—अं—आतां मी खचित मरतें! अं—

खल०—अरे, कोण आहे रे तिकडे ! दासींन बोलावून आणा. (हांका ऐकून कित्येक दासी येतात त्यास) दासींनो ! **चंद्राननाबाईंना** आंत घेऊन जा, आणखी राजवैद्यांना बोलावणें पाठवा. (दासी चंद्राननेस संभाळून घेऊन जातात. इतक्यांत एक नगारेवाला येतो त्यास) कोणरे ? तंबूच्या तोंडाशीं उभा राहून नगारा वाजीव, आणखी बाहेर माझ्या सैन्यांतील लोक उभे असतील, त्यांना हा एवढा कागद वाचून दाखीव. (त्यास कागद देतो.)

नगा०—जी. हूकूम. (सांगितल्याप्रमाणें नगारा वाजवून कागदांतील मजकूर मोठ्यानें ओरडून वाचतो.)

" तमाम सैन्यांतील लोकांस व सैन्या-
" बरोबर आलेल्या बाजारबुणग्यास कळावें
" कीं, आपणास **उदासदुर्गा**चा सरदार
" म्हणवून घेणारा **मरुत्सेन**, याच्या राजद्रो-
" हाच्या गुन्ह्याचा विचार चालला असून

" तो दांडगेपणानें आपल्या गुन्ह्यास ना-
" कबूल जात आहे. यासाठीं सैन्यापैकीं
" किंवा बाजारबुगग्यापैकीं कोणासही या-
" च्या गुन्ह्यांची शाब्बिती करतां येण्यासार-
" खी असेल, तर त्यानें या नगाऱ्यांचा
" तिसऱ्यानें आवाज ऐकल्याबरोबर हजर
" व्हावें असा **खलदर्शनराव** राजे यांचा
" हुकूम झाला आहे, हो—ओ—"

(पहिल्यानें नगारा वाजतो.)

मरु०—हं, चालूं दे, दुसऱ्यानें नगारा वाजीव.

(तोच मजकूर वाचून पुनरपि नगारा वाजतो.)

मरु०—हं, आणखी एकदा नगारा वाजूं दे.

नगारे०—(तमाम मजकूर तिसऱ्यानें वाचून नगारा वाजवितो, त्याबरोबर हातांत ढाल तरवार घेतलेला व दाढी मिशांनीं तोंड झांकलेला मधुकरराव येतो.)

खल०—नगारेवाला ! हा कोण आला आहे याला विचार, तूं हा नगाऱ्याचा आवाज ऐकून कशाकरितां आलास ?

नगारे०—कोणरे तूं ? तुझें नांव काय ? तुझें कुलशील कोणतें ? आणखी हा नगाऱ्याचा आवाज ऐकिल्याबरोबर तूं इकडे कशाकरितां आलास ?

मधु०—बाबारे, तूं माझें नांव कुळशील वगैरे विचारितोस, परंतु माझ्या कोणा दुस्मानाच्या करणीमुळें तीं सर्व लुप्त झालीं आहेत, तीं या वेळीं मी सांगूं इच्छित नाहीं, तथापि मी तुला इतकेंच सांगतों, ज्या शत्रूशीं लढण्याकरितां मी आलों आहें, त्याच्या इतक्या योग्यतेचें तरी निदान माझें कुळ शील आहे.

खल०—तूं शत्रु कोणाला म्हणतोस ?

मधु०—आतां नगारा वाजला तो **उदासदुर्ग**-चा **मरुत्सेन** याच्या बद्दलचा वाजला, तर त्याच्या तर्फे मजशीं बोलणारा किंवा युद्ध करणारा कोण आहे ?

मरु०—त्याच्याबद्दल लढणारा आणि समोर आलेल्या शत्रूचा निःपात करणारा स्वतःतोच आहे. बोल त्याच्याविषयीं तूं काय म्हणतोस !

मधु०—म्हणायचें मिळून इतकेंच. तूं महा अधम विश्वासघाती पातकी आहेस, हें सिद्ध करून देण्याच्या हेतूनेंच मी ही तरवार घेऊन तुजपुढें या वेळीं आलों आहें. याकरितां तूं खरा शूराचा बच्चा असशील तर अगोदर तरवार घेऊन मजसमोर उभा रहा. तुझें स्वतःचें सामर्थ्य, तुझें वय, योग्यता, महत्व हीं केवढींही असोत; तूं आज जय मिळविला आहेत, व तूं संपत्तीवर नवीनच आरूढ झाला आहेस, आणखी शिवाय आपलीं दुष्कृत्यें झांकण्याकरितां धाडसाचें वर्तन करावयासही चुकणार नाहींस; तथापि यांपैकीं एकाही गोष्टीस न जुमानतां मी उघडपणें सर्वांस कळवितों कीं, तूं विश्वासघातकी असून परमेश्वराच्या दृष्टीनें अत्यंत घोर अन्यायाचरण केलें आहेस, तसेंच प्रत्यक्ष तुझा भाऊ आणि तुझा बाप यांचा सर्वस्वीं नाश तूंच अन्यायानें केला आहेस, एवढेंच नव्हे, तर या सिंहासनावर येथें जी राजमूर्ति विराजत आहे या राजमूर्तीशींही तूं द्रोहाचें वर्तन करावयास चुकला नाहींस. या सर्व कारणांवरून तूं नखशिखांत पातकी बनला आहेस ही गोष्ट प्रत्यक्ष तुझ्या शिरच्छेदरूपानें सिद्ध करून देण्याकरितां मी येथें आलों आहें ! तर चल मजसमोर युद्धास उभा रहा. त्यामध्यें तूं जिवंत राहिलास, तर पुढें दिव्यें करून त्यांच्या योगानें

तुझीं पातकें सिद्ध करून देईन.

मरु०—अरे, जारे, मूर्खा ! असा तुझ्या दिव्यांना मी भोंजतों आहें ? परंतु मी शूराचा बच्चा असून स्वतः शूर आहें, एवढ्याकरितां मी तुजशीं युद्ध करण्यास तयार आहें. वस्तुतः पहातां तूं कोण व तुझें नांव काय हें मला मुळींच ठाऊक नाहीं, याकरितां मी तुझ्याशीं लढूं नये हेंच योग्य. परंतु तुझी बाहेरची आकृति वीराची दिसत असून तूं थोर घराण्यांतील असावास असेंही दिसतें, व त्याप्रमाणें तुझें भाषणही चांगलें व थोर कुळांतलें भासत आहे. एवढ्याकरितां मी सर्व विचार एकीकडे टेवून तुजशीं लढण्यास सिद्ध होत आहें, मूर्खा! तूं मला राजद्वेष्टा, पितृद्वेष्टा, भ्रातृद्वेष्टा म्हणून दूषणें दिलींस, परंतु तीं सर्व मिथ्या असून तूं स्वतःच महा अधम पातकी असून अशा प्रकारचीं अनंत पातकें आचरणारा कोणी तरी आहेस हें निश्चित आहे. व या पातकांकरितांच, व तूं मजवर मिथ्या दोषांचा आरोप केलास याकरितां मी तुझा याक्षणीं अंत करितों. संभाळून ऐस.

(दोघेही लढतात, मरुत्सेन घायाळ होऊन पडतो. मधुकरराव त्याच्या छातीवर पाय ठेवून गळ्याशीं तरवार धरून उभा रहातो.)

खल०—हां, पुरे करा. इतःपर त्याला हात लावूं नका. त्याला स्वस्थ पडूं द्या. प्रत्यक्ष न्यायदेवतेनेंच त्याचा पराभव केला आहे एवढेंच पुरे ! !

शशि०—भलतेंच. अशा तरवारींच्या लटुपुटीच्या लढण्यानें न्यायदेवता येती तर आणीक काय पाहिजे होतें ? **मरुत्सेनराव** ! येथें कांहीं तरी कपट झालें आहे खचित. वीराच्या नियमाप्रमाणें असल्या शिखंडीशीं युद्ध करणें तुह्मांस योग्य नव्हतें, याकरितां झाला प्रकार तेवढ्यावरून तुझीं खरोखरी जिंकलां गेलां असें कधीं होणार नाहीं.

खल०—मूर्खें ! आपलें तोंड आटपून धर! नाहीं तर तुझ्या तोंडांत हें पत्र कोंबून मी तुझें तोंड बंद करीन! **मरुत्सेना** ! हें पत्र घे, आणि आपल्या दुष्कर्माविषयीं आपली खातरी पुरती करून घे. दुष्टे ! हा कागद मी तुला कधीं फाडूं देणार नाहीं. हा कागद तुला माहित्त आहे मी खूप समजतों.

(कागद मरुत्सेनाच्या हातांत देतो.)

शशि०—(हात ओंवाळून) आहा ! मी कांहीं अगदीं गोगल गाय असेन असें नका समजूं. हा कागद मला ठाऊक आहे म्हटलें, तरी त्याबद्दल माझें कोण काय करणार आहे ? हें राज्य माझें आहे, याकरितां या राज्यांत मी वाटेल तें करण्यास मुखत्यार आहें !

खल०—आः दुष्टे ! व्यभिचारिणि ! एकून तुला हा कागद टाऊक आहे अं ?

शशि०—तुह्मीं मला यापेक्षां जास्ती विचारूं नका! विचारिलें तरी मी जास्ती कांहीं सांगायची नाहीं! (रागानें हात पाय हापटीत निघून जाते.)

खल०—हां—कोण आहेत रे चाकर ? जा इच्या मागोमाग आणि तिला संभाळून धरा. ती महा साहसी आहे, प्रसंगीं जीव देण्यासही कमी करणार नाहीं. चला चला.

(कांहीं चाकर मागोमाग निघून जातात.)

मरु०—(विवळत) अरेरेरे ! मला जखम फार जबर लागली आहे, व हिच्या योगानें मी मरणार खचित ! **खलदर्शनराव** ! मी या वेळीं आपल्या कर्मानेंच या स्थितीस येऊन पोंचलों आहें; व या अज्ञातवास

आचरण करणाऱ्या वीरानें ज्या पातकांचा उच्चार केला तीं सर्व पातकें मी करून चुकलों आहें. एवढ्यानेंच सर्व संपलें नाहीं. यांहीपेक्षां भयंकर अशीं पातकें मजकडून घडलीं आहेत. परंतु आतां बोलून कांहीं उपयोग नाहीं. तीं आपोआप जेव्हां बाहेर पडतील तेव्हां पडो. तीं या वेळीं कदाचित् संपलींही असतील, व आतां माझीही संपावयाची वेळ आली आहे! तें कांहीं असो. परंतु हे अज्ञातवासी महावीरा, मजसारख्या योद्ध्यासही समरीं जिंकूं शकणारा असा वीर तूं कोण आहेस? तुझें कुळशील जर चांगलें असेल, तर तुझ्या या वर्तनाबद्दल मी तुला क्षमा करितों.

मधु०—फार उत्तम. तूं क्षमा करितोस तर मीही तुला क्षमा करितों. **मरुत्सेना** ! माझें कुळ तुझ्या कुळापेक्षां कमी योग्यतेचें नाहीं. कदाचित् जारतीच असेल. व तसें असेल तर त्या मानानें तूं मात्र अधिक अन्यायी ठरशील. माझें नांव **मधुकरराव**, व तुझा जो पिता तोच माझाही पिता. परमेश्वर परमसमर्थ आणि परमन्यायी आहे, तो आम्हां मानवांस लीलेनें निरनिराळ्या स्थितींत ठेवितो, व अखेर आपलींच पातकें आपणास भोगावयास लावितो. **मरुत्सेना** ! तुला काय सांगूं ? तुझें जनन होण्यास तुझा पिता कारणीभूत झाला, एवढ्याबद्दल त्या विचाऱ्यास नेत्रहीन व्हावें लागलें !

मरु०—तूं म्हणतोस ही गोष्ट अक्षरशः खरी आहे. आजपर्यंत माझे भाग्याचे दिवस होते, परंतु आतां काळचक्र पूर्णपणें फिरून मी सांप्रत या स्थितीप्रत पावलों आहें.

खल०—(आनंदानें) तरीच ! तुमची मूर्ति पाहिल्याबरोबरच तुमचें कुळशील मोठें असावें अशी माझी बुद्धि झाली होती, व आतां आपली ओळख पटली यांयोगें तर मला विशेषच आनंद होत आहे. **मधुकरराव** ! मी तुमची वास्तविक योग्यता पूर्णपणें जाणतों, याकरितां या वेळीं एकवार मला कडकडून प्रेमालिंगन द्याच. आपण किंवा आपले वडील यांचे विषयीं माझ्या मनांत क्षणभरही द्वेषबुद्धि वसली असेल, तर परमेश्वर माझें कधीं बरें करणार नाहीं!

(उभयतां एकमेकांस मिठ्या घालितात.)

मधु०—हे राजमूर्ते ! आपला हा उदार स्वभाव मी पहिल्यापासूनच ओळखून आहें. व मी पित्याच्या घरांतून बाहेर पडलों, त्यानंतर आपली आणि माझी गांठ पडली त्यावेळींही माझी ही बुद्धि कायमच होती !

खल०—(आश्चर्यानें) काय ! तुम्हीं घराबाहेर पडल्यावर तुमची आणि माझी गांठ पडली होती म्हणतां ?

मधु०—होय. एवढेंच नव्हे, तर माझे बंधु **मरुत्सेनराव** यांनींही मला पाहिलें आहे, पण ओळखलें मात्र नाहीं.

मरु०—हा मोठाच चमत्कार ! प्रत्यक्ष आपण दोघे भाऊ, आणि तुम्हांला मीं ओळखिलें नाहीं?

मधु०—हाच तर चमत्कार !—**खलदर्शन** महाराज ! ज्या पत्राचे कारणावरून माझें **मरुत्सेनरावां**शीं द्वंद्व झालें, तें पत्र आणणारा वैरागी मी स्वतःच बनलों होतों.

खल०—असो. याबद्दल आपण मग निराळे बोलत बसूं. पण हे वीरमणे ! मला एवढी गोष्ट अगोदर सांगा, आपण घरून बाहेर पडल्यावर कोणीकडे छपून राहिलां होतां? व आपल्या पित्याची भयंकर स्थिति झाले-

ली आपणास कशी समजली ?

मधु०—महाराज ! सांगतों ऐकावें ! माझ्या वृद्ध पित्याचे क्लेश मी स्वतः नेत्रानें पहात असून त्यांची तशी स्थिति झाल्यापासून आजपर्यंत त्यांचें संगोपन मींच केलें. सर्व हकीकत फार लांब आहे, याकरितां थोडक्यांत सांगतों. हायहाय ! ही हकीकत सांगतांना माझें हृदयही फुटून जाईल ! महाराज ! ज्या वेळीं मजवर पित्याचा रोष होऊन त्यानें मला पकडण्याकरितां धांवाधांव मांडिली, तेव्हां—अहाहा ! प्राणांवर मनुष्याचें किती तरी प्रेम असतें !—एकदम मरून जाण्यापेक्षां कांहीं वेळ तरी जगावें असें वाटून मी एका भिकाऱ्याचा वेष घेतला, आणि शेण, माती, राख, काळी मस, जें कांहीं सांपडलें तें घेऊन त्याच्या योगानें आपणास विरूप करून टाकिलें; केश अस्ताव्यस्त करून नवीन भलते सलते केश चिकानें व गोंदानें मिशांच्या व दाढीच्या ठिकाणीं चिकटाविले, आणि फाटकें तुटकें घाणेरडें रकटें अंगावेंवती लपेटून माळभर भिक्षा मागत फिरलों. मधें कोठें कांहीं खोपटीं असलीं, आणि तेथें भिक्षेकरितां गेलों, तर मला भिऊन कुतरीं देखील पळून जात असो. अशा स्थितींत माळरानांतून हिंडत असतां माझे परमपूज्य जनक यांचे दोन्ही नेत्र फुटले असून त्यांतून रक्ताचे प्रवाह वहात आहेत, व त्या वेदनेंतच ते मोठ्यानें शोक करीत इकडे तिकडे फिरत आहेत, असे ते माझ्या दृष्टीस पडले. तेव्हांपासून मी त्यांचा वाटाड्या बनून त्यांस चोंहीकडे घेऊन जाऊन त्यांच्या करितां भीकही मागून त्यांचें पोषण केलें, व हजारदा त्यांनीं प्राणत्याग करण्याविषयीं इच्छा धारण केली असतां हरप्रयत्नानें त्यांचें निवारण केलें.—परंतु नुकत्या दोन घटिका झाल्या, तेव्हांपर्यंत एक वेळ देखील—हरहर ! आतां त्याबद्दल वाईट वाटतें, पण बोलून काय उपयोग ?—एक वेळ देखील त्यांना म्यां दुष्टानें ओळख दिली नाहीं ! व ज्या वेळीं ओळख दिली, त्यावेळीं मी हा लढाऊ वेष घेऊन तयार होतों; व या वेळीं जो मला जय मिळाला आहे, तो मिळावा म्हणून जरी मनांतून उत्कट इच्छा होती, तरी तो मिळेलच असा त्यावेळीं मनास भरंवसा नव्हता. याकरितां त्यांच्या चरणीं मस्तक ठेवून त्यांचा आशीर्वाद घेत होतों, आणि त्या समयीं घरून निघाल्यापासून अखेरपर्यंत आपली स्थिति त्यांस कळविली. परंतु हरहर !—महाराज ! त्यायोगानें त्या बिचाऱ्यांना एकदम हर्ष व शोक हे दोन्ही विकार होऊन त्यांचा आवेग त्यांच्या त्या दुःखानें गांजलेल्या हृदयास सहन न झाल्यामुळें एकदम त्यांचा अंत झाला !—

मरु०—हायहाय ! **मधुकरराव** ! इतका वेळ पर्यंत माझ्या स्वतःच्या स्वभावाबद्दल मला कांहीं वाटत नव्हतें परंतु आतां माझा अंतकाल समीप येत चालला आहे, त्यायोगानें माझ्या बुद्धीलाही पालट पडत आहे ! **मधुकरराव** ! तुम्हांला यावेळीं मी 'दादा' या नांवानें हाक मारितों याची माफी करा. तुमच्या तोंडची ही बाबांच्या मृत्यूची हकीकत ऐकून माझ्या अंतरात्म्याला कसें टोंचूं लागलें आहे, व आतां आपला पूर्वीचा दुष्टपणा सर्व विसरून जाऊन मरणापूर्वी कांहीं तरी चांगली गोष्ट माझ्या हातून

होण्याचा संभव आहे. असो. पण तुमचें काय बोलणें असेल तें बोलून द्या. तुमच्या मनांत अद्यापि कांहीं बोलायचें आहेसें दिसतें.

खल०—मधुकरराव ! तुमच्या मुखांतून हा दुःख इक वृत्तांत श्रवण करून मला पोटांतून भडभडून येतें आहे तें सांगतां पुरवत नाहीं, याकरितां आपण याहूनही अधिक दुःखकारक वृत्तांत सांगणार असाल, तर तो आतांच सांगूं नका.

मधु०-खलदर्शनराव ! मनुष्याचें अंतःकरण कोमल असलें ह्मणजे त्याला नेहमी असेंच वाटत असतें. परंतु महाराज ! आतां फार सांगावयाचें उरलें नाहीं, तथापि उरलें आहे तें याहूनही अधिक हृदयद्रावक आहे. महाराज ! माझ्या प्रिय पित्याचा तशा प्रकारें अंत झाला असतां मी दुःखशोकानें बहुतेक मूर्छागत झालों होतों, इतक्यांत त्या ठिकाणीं दोन गृहस्थ माझ्या पित्याचा शोध करीत आले, त्यापैकीं एक जणानें मीं पूर्वी भिकाऱ्याचा वेश घेतला असतां मला पाहिलें होतें, व त्या वेळीं तो त्या स्थितीवरून माझा कंगाळा करीत असे. परंतु या वेळीं मी कोण आहें हे त्यास कळलें, व लागलेंच त्यानें माझा कंठास दृढालिंगन देऊन आकाशपाताळ एक होऊन जाईल अशा दीर्घ स्वरानें रुदन करण्यास आरंभ केला. महाराज ! त्यावेळीं त्याचा शोकावेग किती होता ह्मणून सांगूं ? असो. नंतर त्यानें माझ्या पित्याच्या अंगावर ओणवें पडून त्याला घट्ट आलिंगन दिलें, आणि वारंवार त्याच्या थंडगार झालेल्या मूर्तीकडे पहात राहून **अतिपीडराजा**-चा आणि आपला अत्यंत कष्टकारक हृदयभेदक वृत्तांत मला कथन केला. तो कथन करीत असतां त्याला मूर्छा येऊन आतां त्यांचा अंत होतो काय अशी त्याची स्थिति झाली. इतक्यांत आपला नगारा दुसऱ्यानें वाजलेला ऐकूं आला, तेव्हां त्याला त्या दुसऱ्या गृहस्थाच्या स्वाधीन करून मी तसाच इकडे निघून आलों !

खल०—पण हा असा दुःख करणारा गृहस्थ तरी कोण होता ?

मधु०—महाराज ! तो गृहस्थ दुसरा कोणी नसून ज्याला आपल्या **अतिपीडमहाराजांनीं** हद्दपार केलें होतें तो स्वतः **कांतिवर्माच** होता. त्यानें हद्दपार केल्यानंतर आपला वेश पालटला, व महाराजांची स्वारी आपले घरीं रहात होती तेव्हांपासून अतिशय नीच सेवकासही अनुचित अशी शेवटपर्यंत त्यांची सेवा बजाविली !

खळ०—बरें, आणखी त्याच्याबरोबर दुसरा एक गृहस्थ होता तो कोण ?

(पडद्यांत बायकांच्या रडारडीचा आवाज ऐकूं येतो.)
(सर्व कान देऊन ऐकतात.)
(इतक्यांत हातांत रक्तानें भरलेलें शस्त्र घेऊन राजवैद्य घाबऱ्या घाबऱ्या येतो.)

राजवै०—धांवा धांवा ! हायहाय ! घात झाला ! घात झाला !—धांवा धांवा !

खल०—वैद्यराज ! आंत गलबला कसला चालला आहे ? तुम्हीं असे घाबरलां काय ह्मणून ?

राजवै०—महाराज ! काय सांगूं ? त्यांच्यावर काळाची धाड अकल्पित हो पडली ! हायहाय !

खल०—वैद्यराज ! तुह्मांला वेड तर नाहींना लागलें ? असें काय करितां ? नीट बोला !

राजवै०—आतां काय कपाळ बोलूं ! घात

झाला न् दुसरें काय ?

खल०—वैद्यबुवा ! तुम्हीं अंमळ शुद्धीवर या. काळाची धाड कोणावर पडली ? घात कोणाचा झाला म्हणतां ?

मधु०—आणखी तुमच्या हातांत हें रक्तानें भरलेलें शस्त्र आहे त्याचा अर्थ काय ?

राजवै०—अहो ! पहा हो पहा ! हा जंबिया कसा रक्तानें लाल झाला आहे व त्यांतून अजून कढत कढत वाफा देखील निघत आहेत! हा जंबिया आतांच कींहो मीं अस्सा त्यांच्या छातींतून ओढून बाहेर काढिला! महाराज! आपल्या प्रियपत्नी **शशिकला**बाई त्यांचा कींहो अशा प्रकारें अंत झाला !

खल०—वैद्यबुवा ! तुम्हीं अंमळ स्वस्थ तर व्हा, आणि मला सगळी हकीकत पुरती ऐकूं द्या !

राजवै०—हकीकत काय सांगूं ? महाराज ! **शशिकला**बाईंनीं **चंद्रानना**बाईंना विषप्रयोग केला, आणि आपल्या हातींच या शस्त्रानें आपली अशी दशा करून घेतली! ही गोष्ट प्राणोत्क्रमणाचे वेळीं त्यांनीं आपल्या दासींसमक्ष कबूल देखील केली !

मरु०—अरेरे ! फार वाईट गोष्ट झाली !—असो. पण चिंता नाहीं ! मी या दोघींशींही चोरून विवाह लावण्याचें कबूल केलें होतें. आतां या क्षणीं आह्मां तिघांच्याही मस्तकांस एकदम मंडावळी लागतील !

खल०—अहाहा ! परमेश्वरा ! तूं खरा न्यायी आहेस!—अरे, कोण आहेत रे तिकडे ? तिकडे जा, आणि दासींकरवीं त्या दोघी जिवंत किंवा मेलेल्या कशाही असोत, त्यांना बाहेर आणायला सांगा !—ह्या दुष्ट स्त्रिया आपल्या दुष्ट कृत्यांचींच हीं भयंकर फळें भोगीत आहेत, याकरितां त्यांचा अशा प्रकारें अंत झाला याबद्दल मनाला मुळींच खेद वाटत नाहीं! असो. **अतिपीड** महाराजांच्या दोघीं कन्यांचा तर अंत झालाच, आतां तिसरी मात्र राहिली आहे, ती बिचारी सुखानें नांदो आणि महाराजांच्या जिवाला सतत सुख देवो म्हणजे झालें.—अरे पण हा काय वेडेपणा ?—मी इतका वेळ दुसऱ्याच नादांत ही गोष्ट अगदींच विसरलों होतों !—**मरुत्सेनराव** ! बोला बोला, **अतिपीड** राजे आणि **मृगांमाला** यावेळीं कोठें आहेत ?

(इतक्यांत दासी रडत रडत शशिकला आणि चंद्रानना यांची प्रेतें बाहेर आणितात.)

मरु०—हायहाय! या दोघींचेंही मजवर अकृत्रिम प्रेम होतें ! मीच मात्र दुष्ट त्या दोघींनाही फसविण्यास सिद्ध होतों !—हायहाय ! मज एकट्याकरितांच यांची अवस्था झाली काय ?—धिक्कार असो ! धिक्कार असो !

खल०—दासींनो ! यांची प्रेतें अशींच पडूं द्या! तोंडें मात्र झांकून टाका !

मरु०—अरे अरे ! आतां माझें मरण खचित खचित जवळ आलें आहे !—तरी पण कांहीं थोडा वेळपर्यंत तरी जगावेंसें वाटतें ! **खलदर्शनराव**! मी जातीचा दुष्टच पडलों, त्यामुळें माझ्या कडून आपला महान् अपराध झाला आहे; परंतु त्याबद्दल माझ्या या अंतकाळीं आपण मला क्षमा करावी! पूर्वीचीं माझीं सर्व दुराचरणें विसरून जाऊन अखेर एकवेळ तरी सत्कृत्य करण्याची मला वासना होत आहे ! याकरितां त्वरा करून कोणाला तरी तुरुंगाकडे पाठवून द्या! त्वरा कराल तरच उपयोग आहे, कारण **अतिपीड**राजे आणि **मृगांकमाला** या दोघांना-

ही टांगून ठार मारण्याविषयीं मीं हुकूम पाठविला होता !

खल०—अरे ! धांवा धांवा !—**मधुकरराव** ! कृपा करून तुम्हींच जा !

मधु०—आज्ञा. पण त्यांना केलेली. शिक्षा रद्द झाली असें समजण्याकरितां कांहीं तरी खूण पाहिजे !

मरु०—फार उत्तम. ही माझ्या नांवाची तरवार घेऊन जा, झगजे कदाचित् सबड असली तर माझा पहिला हुकूम रद्द होऊं शकेल !

कांति०—(घाई घाईनें प्रवेश करितो.) **मरुत्सेना**! तुझा हुकूम पोंचावयाचे अगोदरच तो मीं फाडून टाकिला ! आतां त्याची धास्ती बाळगावयाला नको !

खल०—(आश्चर्यानें) वाहवा वाहवा ! अरे, पण हा चमत्कार कसा घडला ?

मधु०—अरे, हेच ते **प्रमलेश्वर**चे सरदार **कांतिवर्मे** !

कांति०—**खलदर्शन**राव! आपण असे आश्चर्यांत पडूं नका ! हा चमत्कार मी आपणास मग उलगडून सांगेन ! पण अगोदर महाराज आणि **मृगांकमाला** बाईसाहेब यांची तुरुंगांतून मुक्तता करावी एवढीच आपणास विनंती आहे !

खल०—**मधुकरराव** ! चला चला ! यावेळीं मनोवेगाहूनही अधिक त्वरेनें तुम्हांस गेलें पाहिजे ! नाहीं तर सर्व व्यर्थ होईल !

(मधुकरराव तरवार घेऊन जातो.)

मरु०—महाराज! माझा हुकूम ज्याअर्थीं मुळींच पोंचला नाहीं, त्या अर्थीं आतां भ्यायचें कारण उरलें नाहीं ! परमेश्वरा ! आतां माझ्या या नष्ट देहाची तूं पाहिजे ती अवस्था कर, परंतु म्यां दुष्टानें बिचाऱ्या त्या दोघांचे प्राण घेण्याचें मनांत आणिलें असतां तो योग तूं वांचविलास, इतक्यानेंच तरी मी अखंड नरकयातनांतून केव्हां तरी सुटेन !—हायहाय ! केवढा मी पातकी !—या वेळीं हे भयंकर **यम**पाश माझ्या गळ्यांभोंवती पडूं लागले आहेत, हे मी कसे सहन करूं ?—आं—हाय—हाय ! हे **यम**दूत हो!—आतां मी तुमचाच अंकित होत आहें, मला तुम्हीं असें छळूं नका ! मीं अघोर पातकें केलीं आहेत, तरी पण सर्वांत निंद्य असें राजवधाचें पातक माझ्या हातून घडलें नाहीं, याचा विचार करा !—छेः—आतां कशाचा विचार ?—अरे—गेलों, मी खालीं—खालीं—रसातळास चाललों !—अंः—अंः—अरेरेरेरे!—पडलों—नरकाचे खाईंत पडलों !—अंः—अरेरेरेरे—माझें सर्व अंग तप्त तेलाच्या कढईंत होरपळून गेलें आहे,—अरे,—अजून माझ्या कपाळीं तो लोहशूळ उरलाच आहे काय ?—ओः—(किंकाळी ठोंकतो.) देवा! देवा! **यमधर्मा**! तूं मज पाप्यावर असा रोष करूं नको! मला क्षमा कर!—अथवा, तूं न्यायी आहेस, तुझ्या हातून मला क्षमा कशी करवेल ?—अंः—अं—अरेरे! पण हें मी काय यहातों आहें ? हा रक्तबंबाळ झालेला क्रोधाविष्ट पुरुष कोण ?—काय हेच माझे पिते **चंडवर्मे** काय?—अरेरेरे ! यांची अशी स्थिति म्यांच दुष्टानें केली ! आतां यांच्या जवळ क्षमा कोणच्या तोंडानें मागूं?—तथापि बाबा !—मला क्ष—(उचकी लागते, त्याबरोबर प्राण निघून जातो.)

खल०—वैद्यराज ! यानें अत्यंत अघोर पातकें केलीं आहेत, तथापि यावेळीं याला मी सर्व अपराधांची क्षमा करितों ! पहा ! याची

नाडी पहा, आणि याला वांचविण्याला अजून कांहीं उपाय चालण्यासारखे असल्यास ते करण्यास कमी करूं नका ! (राजवैद्य मरुत्सेनाची नाडी चांचपतो.)

राज०—भलतेंच ! येथें काय आहे ? यांचें प्राणोत्क्रमण देखील झालें !

(इतक्यांत एका बाजूस मधुकरराव, अतिपीडराजा, मृगांकमाला व तुरुंगावरील अधिकारी शिपाई प्यादे वगैरे येतात.)

अति०—बाळे **मृगांकमाले** ! अशी कष्टी होऊं नको ! आतां आपण **स्वर्गलोकाला** जाण्याच्या पंथाच्या जवळजवळ आलों आहों! हे तुरुंगारील अधिकारी आपणासमागमें आहेत, हे खरोखरी **यमदूतच** आहेत, याकरितां हें नष्ट जगत् सोडून जाण्यास आतां अवकाश फार थोडा उरला आहे, याकरितां धीर सोडूं नको ! मरावयाची पाळी आली, तरी आपण दोघें एकत्र असलों म्हणजे त्यांतच आपणास संतोष आहे.

मृगां०—बाबा! मी त्याबद्दल मुळींच खेद करीत नाहीं!तरीपण माझे प्राणपति कोठें आहेत याचा कांहींच पत्ता नाहीं. यामुळें मनास अंमळ हुरहुर लागली आहे ! एरवीं मरावयाचें पडलें तरी मी आपणासमागमें आनंदानें मरेन !

अति०—ठीक ठीक ! बाळे **मृगांकमाले** ! तुझें मन दोन ठिकाणीं घोंटाळलें आहे, पण आतां मी त्याबद्दल तुला रागें भरणार नाहीं! असो. पण आतां आपण स्वर्गलोकच्या पंथास लागल्यासारखेच आहोंत, व हे **यमदूत**ही आपले समागमें आहेत, तथापि तूं मजजवळ आहेस एवढ्यानेंच मी संतुष्ट आहें.

मधु०—महाराज ! या नम्र दासाची विनंती क्षणमात्र ऐकून घ्यावी ! मी परमेश्वरसाक्ष सांगतों, आह्मीं आपला घात करणाऱ्यांपैकीं नसून आपलीच प्रजा आहों. आपल्या पदरचे **उदासदुर्गचे** सरदार **चंडवर्मे** आपणास आठवत असतील, तर त्यांची स्वामिभक्ति आपण जाणत आहांच ! ते **चंडवर्मे** माझे वडील; व ते ज्याप्रमाणें आपली एकनिष्ठ सेवा करीत होते, त्याप्रमाणें हा दासही सेवा करण्यास सदा तयार आहे. आज्ञा मात्र व्हावी.

अति०—तूं खोटें बोलतोस. **चंडवर्म्या**चा एक पुत्र तर कोणीकडे गेला त्याचा पत्ता नाहीं, आणखी दुसरा लेंकवळा पुत्र तो तर आमचा पुरा द्वेष्टा आहे !

मधु०—नाहीं, सरकार ! आपणास ही भ्रांति आहे खचित ! आपण ह्मणतां तो ज्यानें आपणास या कारागृहांत पाठविलें होते तो **मरुत्सेनराव** ! त्यानेंच आपल्या शत्रुपक्षाचा आश्रय केला होता ! **चंडवर्मजी**चा पुत्र, ज्याचा कोठें पत्ता नव्हता ह्मणून आपण ह्मणालां, तोच मी! माझेंच नांव **मधुकर**! आपण त्या दिवशीं वादळाचे अगोदर **उदासदुर्गा**चे खालीं उतरल्यावर आपली आणि माझी गांठ पडली होती ! त्या मोडक्या देवळांत जो **उंदल्या छू:** ह्मणून भिकारी आपणाला आढळला, तो खरा भिकारी नसून तें माझेंच रूपांतर होतें !

अति०—तुझें ह्मणणें मला पुरतेंसें आठवत नाहीं, तरी पण तुझ्या बोलण्यावरून तूं खोटें बोलत नसावास असें वाटतें !

मधु०—(आपणाशीं) यांना वेड लागलें होतें त्या वेळची यांना आठवण नाहीं हें एक बरेंच आहे!(उघडपणें)चिंता नाहीं. महाराज! आतां या समोरच्या तंबूंत आपण जाणार, त्या ठि-

काणीं सर्व आपल्या स्नेहाचाच प्रकार आपल्या दृष्टीस पडेल, व त्या वेळीं माझ्या म्हणण्याविषयींही आपली खातरी होईल !— सरकार ! हे पहा आपले ज्येष्ठ जामात आपणासमोर येत आहेत ! (सर्व मंडळी अतिपीड राजास सामोरी येते.)

खल०—(अतिपीड राजाच्या चरणीं लोटांगण घेऊन) महाराज ! हा नम्र सेवक आपल्या चरणीं लीन होत आहे. यानें न समजतां आपला महान् अपराध केला आहे, तथापि त्याची क्षमा प्रभूनीं केलीच पाहिजे !

अति०—उठाउठा ! तुम्हीं कोण आहां हें मीं अजून पुरतेसें ओळखलें नाहीं. तरी पण तुम्हीं माझे जामात **खलदर्शन** आहां असें वाटतें !

खल०—होय महाराज! प्रभु म्हणतात तोच आपला जामात मी! मात्र आपली ज्येष्ठ कन्या,जिच्याशीं माझा विवाह झाला होता, ती आपला दुष्टावा करीत असतां तिजपुढें माझें कांहीं चाललें नाहीं व माझ्या हातून तिचें निवारण झालें नाहीं, एवढाच या सेवकाचा अपराध आहे! परंतु त्याबद्दल क्षमा करणार प्रभु समर्थ आहेत !

अति०—(गहिंवरून) **खलदर्शनराव** ! आजपर्यंत माझा इतका छळ झाला, व मला इतकीं दुःखें सोसावीं लागलीं, परंतु त्याबद्दल तुमचा दोष होता असें मला कधींच वाटलें नाहीं, व आतांही वाटत नाहीं, याकरितां आपणाला मी क्षमा करण्याचें कांहीं कारण नाहीं !—उठाउठा. (खलदर्शन त्यास वंदन करून उभा रहातो.) मला इतकीं दुःखें सोसावयाचें कारण त्या दोघी दुष्ट पोरी ! त्या यावेळीं कोठें आहेत ?

खल०—सरकार ! त्या यावेळीं आपल्या पातकांचीं फळें भोगीत या येथेंच पडल्या आहेत! (शशिकला आणि चंद्रानना यांच्या तोंडावरील झांकण काढून दाखवितो.)

अति०—काय ? यां दोघींची अखेर अशीच स्थिति झाली ?—अहाहा परमेश्वरा ! तुझी धन्यता केवढी म्हणून वर्णावी!—परंतु हरहर! काय हा अनर्थ ! काय हा अविचार !— पोरींनो ! अखेर तुमची ही स्थिति पहाणें माझ्या नशीबीं यावेंना ? हायहाय ! पोरींनो! तुम्हीं आपली करणी करून घेतली, व त्या वेळीं मी तुमच्यावर अनंत शापांची वृष्टि केली, त्या शापांचेंच हें फळ झालें काय ?—असें असेल तर देवा ! अजूनही मी आपले शाप परत घेतों ! कृपा करून तूं यांना जिवंत कर ! या इतक्या दुष्ट निघाल्या, तरी यांच्या जननी माझ्या प्रियपत्नी **प्रमति** आणि **वसुमति** ह्या शुद्धबुद्धि होत्या, यास्तव त्यांचे सद्गुण आठवूनच मी या पोरींच्या पातकांची क्षमा करूं शकेन! हरहर ! बाळेहो ! लहानपणीं तुमचें मुख किती सुकुमार आणि मंदस्मितानें विकसित झालेलें भासे? व त्यामुळें मी आपणास किती धन्य मानीत होतों ? आणखी त्या सर्वांचा तुम्हीं असा परिणाम केलात ? असो. देवाची मर्जी !—**खलदर्शनराव** ! यांचा तर अशा रीतीनें परिणाम झालाच, आतां यांच्या अंत्य व्यवस्थेची तयारी होऊं द्या !—बाळे **मृगांकमाले** ! एक वेळ या तुझ्या बहिणींना त्यांच्या अपराधांबद्दल क्षमा कर ! यांच्यामुळेंच तर तूं या राज्यास अंतरलीस!

मृगां०—बाबा! आपण हें काय बोलतां ? यांनीं आपले अपराध केले, यासाठीं आपण यांना क्षमा केली हें बरोबर आहे. परंतु मला

राज्याची मुळींच हौस नव्हती, आणि आतांही नाहीं. यांना स्वतः अधिकार भोगण्याची हौस होती तिचाच हा परिणाम झाला! आपण क्षमा केल्यावर या दोघी जिवंत राहून सुखान राज्याचा उपभोग घेत्या तर त्यांतच मला संतोष होता !

(शशिकला आणि चंद्रानना यांच्या प्रेतांस मिठी मारिते.)

कांति०—अहाहा ! केवढा हा थोरपणा ! धन्य आहेस राजकन्ये ! धन्य आहेस ! —(अतिपीड राजाकडे वळून) राजाधिराज ! हा आपला निरंतरचा दास चरणीं लीन होत आहे !

अति०—कल्याण.—पण तुम्हीं कोण ? मी तुम्हांला ओळखिलें नाहीं.

मधु०—महाराज ! हे आपलेच परम विश्वासु **प्रमलेश्वर**चे सरदार **कांतिवर्मे** !

अति०—काय **कांतिवर्मे** !—**कांतिवर्मन्** ! मीं राज्यावर असतां हद्दपार केले तेच तुम्हीं ?

कांति०—होय, सरकार ! तोच मी आपला दास !

अति०—तुम्हीं आजपर्यंत कोणीकडे होता ? आणि आज इकडे कोणीकडे येणें झालें !

कांति०—राजाधिराज ! हद्दपार होण्याची शिक्षा झाली होती, तरी हा दास ही लढाई संपावयाचे अगोदरपर्यंत निरंतर आपल्याच चरणांजवळ होता ! **शशिकला** बाईसाहेबांचे घरीं आपण असतां जो सेवक आपणाजवळ पुष्कळ दिवस नांव चोरूनच रहात होता, व पुढें आपली स्वारी या बाईसाहेबांकडे राहिली असतां ज्यानें आपलें **वांतिक** अथवा **वांतिकर्मा** हें नांव आपणास सांगितलें, तो सेवक या वेळीं कोणीकडे आहे ?

अति०—तें कांहीं माझ्यानें सांगवत नाहीं. परंतु तो मोठा इमानी असून सांगितलेलें काम विश्वासुकपणें तावडतोब बजावीत असे. तो या लढाईंत केव्हांच कोणीकडे मरून पडला असेल !—पण त्याबद्दल तुम्हीं काय सांगतां ?

कांति०—महाराज ! दुसरें कांहीं नाहीं ! तोच मी, एवढीच चरणांपाशीं विनंती आहे !

अति०—असें काय?—ह्यातारपणामुळें मला नीट न्याहाळत नाहीं, याकरितां मला नीट पाहूं द्या!—अरे होय? तेच तुम्हीं. आतां मी तुम्हांला बरोबर ओळखिलें !—**कांतिवर्मन्** ! मीं आपणास अन्यायानें हद्दपार केलें होतें याबद्दल मनास फार खेद वाटतो, याकरितां एकवार हा अन्याय पोटांत घालून तुम्हींच मला क्षमा करा !

कांति०—छेः छे महाराज ! असें कोठें झालें आहे ? मातेनें लेंकरास ताडन केलें तरी फिरून कडेवर घेऊन त्याचें लालन करण्याचा अधिकार तिचाच आहे !

अति०—चिंता नाहीं ! आजपासून तुम्हीं हा वेश टाकून देऊन आपल्या पूर्व वेशानें निरंतर मजजवळ असावें.

कांति०—आज्ञा ! हा या सेवकावर अनुग्रहच झाला !

खल०—महाराज ! बोलण्याचे नादांत आपण उभेच राहिलां !—याकरितां या आसनावर विराजमान व्हावें !—महाराज! आजपर्यंत मीं या राज्याचा उपभोग केला, परंतु त्याचे पायीं इतके अनर्थ झाले हें पाहून मला त्याचा अंतःकरणपूर्वक वीट आला आहे, याकरितां हें समग्र राज्य मी आपले चरणीं अर्पण करितों ! आपण आमचे धनी, आणि मी आपले पदरचा सरदार एवढीच योग्यता

मला पुरे आहे !

अति०—भलतेंच ! एकवार अर्पण केलेलें राज्य मी परत घेणार नाहीं !—आणखी घेतलें तरी तें मज ह्याताऱ्याचा काय उपयोगीं ?

खल०—महाराज! विनंती करितों क्षमा असावी!—माझ्या हातून स्वामिभक्तीचें आचरण मुळींच घडलें नाहीं ! शिवाय **चंद्राननाबाई** व **सुदर्शनराव** हीं दोघेंही मृत झालीं असून त्यांचे मागें कोणीच वारस उरला नाहीं, यास्तव त्यांच्या वांटणीच्या राज्याची व्यवस्था करण्याचा अधिकार मजकडे मुळींच नाहीं! याकरितां कृपा करून आपण पुनरपि राजासनावर विराजमान व्हावें, आणि पुनरपि एकवार आपल्या प्रजेचें पालन करावें. तथापि असें करण्याची आपली नसेलच मर्जी, तर या बाईसाहेबाच्या श्रमानें आणि पुण्यानेंच आपण तशा संकटांतून निभावलां, आणि हा दिवस आपले दृष्टीस पडला, याकरितां त्यांसच या राज्याच्या स्वामिणी करावें! व यांतच मला संतोष आहे!

कांति०—महाराज ! **खलदर्शनराव** उदारपणें ह्मणतात हेंच खरें, यास्तव यांच्या ह्मण्यास मान मिळावा हें मला योग्य वाटतें.

अति०—आपली इच्छा माझ्यानें मोडवत नाहीं!—परंतु हें राज्य मला मुळींच नको! बाळे ! **मृगांकमाले**! आतां या राज्याची अधिस्वामिणी मी तुलाच करितों !

मृगां०—बाबा ! मला राज्य घेऊन काय करावयाचें आहे ? मला आपला आणि प्राणपतींचा निरंतर सहवास असला ह्मणजे पुरे ! मला आणखी कांहीं नको!—काय हो पण **कांतिवर्मजी**! तुह्मांला तिकडला कांहीं शोध लागला का ?

खल०—मी केवढा मूर्ख ! इतका वेळ बोलत राहिलों! पण **राजवाहनराजा**चा शोध करावयाचें तसेंच विसरलों !

कांति०—मीही पण सांगायला विसरलों ! या **मधुकररावां**च्या प्रियपित्याचा अंत झाला त्याठिकाणीं **राजवाहनराज** आणि मी दोघे होतों.

मधु०—(आश्चर्यानें) काय ? आपणाबरोबर दुसरे गृहस्थ होते तेच **राजवाहनराज**? आआणखी मीं त्यांना ओळखिलें नाहीं! आश्चर्य आहे !

कांति०—आश्चर्य कशाचें ? आह्मीं दोघांनींही वेश घेतले होते. तुह्मीं मला देखील ओळखिलें नसतें, पण मीं तुह्मांला सांगितलें ह्मणून तुमची माझी ओळख पडली. असो. आह्मीं दोघेही तेथून इकडे येण्यास निघालों, तों वाटेंत एका झाडाच्या फांदीला कोणी एक मनुष्य उलटा टांगिला असून मोठ्या करुणस्वरानें आक्रोश करीत होता, तेव्हां त्याची दया येऊन **राजवाहनराज** त्याला सोडवायकरितां थांबले आणि मी इकडे आलों.

खल०—फार उत्तम ! कोण आहेरे तिकडे ?—हे सांगतात त्या झाडाची चौकशी करून **राजवाहनराज** आणि तो मनुष्य दोघांनाही इकडे तावडतोब घेऊन या ! **कांतिवर्मजी** ! तो मनुष्य कोण ? आणि तें झाड कोणीकडे कोठेंसें आहे ?

कांति०—तो मनुष्य दुसरा कोण असणार ? महाराजांचा प्राणमित्र खषमरकऱ्या तोच !—अरे हे बघा, तंबूतून बाहेर पडून असेच समोर जा, ह्मणजे तुह्मांला तें झाड डाव्या अंगालाच लागेल. तेथें गेल्यावर

त्यांना माझें नांव सांगा, ह्मणजे ते ताबड-तोब इकडे येतील ! (कांहीं सेवक त्वरेनें जातात.)

मृगां०—आई **अंबावाई** ! कृपा करून माझ्या प्राणनाथांना परत सुरक्षित आण ! मला दुसरें कांहीं नको !

खल०—(संतोषानें) एकून महाराजांचा खुष-मस्कऱ्या अजून खुशाल असेल असें तुमचें ह्मणणें ?

कांति०—होय. कारण आह्मीं त्याला पाहिलें त्याच्या अगोदर त्याला त्या ठिकाणीं काय तें अर्ध घटिकाच बांधून टेविलें होतें ! तो जिवंत असण्याविषयीं आपण बेफिकीर असा !

(इतक्यांत सेवक राजवाहनराज आणि खुष-मस्कऱ्या यांसहवर्तमान परत येतात.)

राज०—(वेश टाकून देऊन अतिपीड राजास) महाराज ! वंदन करितों ! आज सर्व संक-टांतून आपली मुक्ति झाली ही आपणावर परमेश्वरी कृपाच समजली पाहिजे !

अति०—**राजवाहनराज**! अशा आनंदाचे प्रसंगीं कायबोलावें हें माझें मलाच समजेनासें झालें आहे, व या वेळीं मी कोठें आहे आणि काय करितों याचंच मी क्षणोंक्षणीं भान विसरतों आहे !—असो. **राजवाहनराज** ! इतःपर हें सर्व राज्य आपलें आणि ही आपली प्रिया ही आपणासमागमें याची अधिस्वामिणी झाली असें समजा ! यावद्दल जास्ती बोलावयाचें तें मग सावकाश बोलूं ! अगोदर **मृगांकमाले**ची भेट द्या !

(राजवाहनराज आणि मृगांकमाला एकमेकांस आलिंगन देतात. सर्वांच्या नेत्रांतून आनंदाश्रु वाहतात.)

अति०—असो. आतां मी निश्चिंत झालों. आतां मी जन्मभर बाळे **मृगांकमाले**-जवळ खुशाल **हरिहरि** ह्मणत राहीन !—(खुषमस्कऱ्याकडे पाहून) कां गृहस्था ! मजशीं बोलत नाहींस ! तुला या तुझ्या गडचाची आठवण आहे का नाहीं ?

खुष०—आहे. बरीच आहे ह्मणायची, पण ती अंम-ळ फांदीला उलटी लोंबत राहिली आहे ! ती काढून वर पाणी शिंपडतों ह्मणजे गार होईल !

(सर्व हंसूं लागतात.)

खल०—सरकार ! आपणास तुरुंगवास या **मरु-त्सेना**नें भोगवयास लाविलें, याचा नि:-पात या **मधुकररावां**च्या हातून झाला, त्यामुळें आपला आह्मांस शोध लागला ! नाहीं तर लागला नसता ! यास्तव यांचेंही आपणास स्मरण असावें.

मधु०—(हंसून) मी महाराजांचाच आहें ! मी **उंदल्या छू**: बनलों होतों, तेव्हांच म-हाराजांनीं मला आपणाबरोबरच्या शंभर मानकऱ्यांतली एक असामी दिली होती, तेवढ्या आश्वासनावर मी या चरणांची जन्मभर आनंदानें सेवा करण्यास सिद्ध आहें.

अति०—असो. चला. आतां उशीर होत चा-लला. या वेळीं आपण सर्व आनंदांत आहों, तरी या प्रेतांच्या अंत्यव्यवस्थेचें दु:ख आप-णास कांहीं वेळ अनुभविलें पाहिजे ! चला !

खुष०—ठीक ठीक ! कां राजश्री ! आतां या दोघींना तिरड्यांशीं दोरीनें आवळून टा-कायचें आहे, याकरितां मागें मीं एक गाणें ह्मटलें होतें तेंच आतां ह्मणतों ह्मणजे निराळा मंत्र ह्मणायला नको !

गाणें.

यांच्या गळ्याभोंवती दोरी, बांधूनियां मोठ्या जोरीं,
आपुलीयारे समोरी, फांशीं द्याव्या अगोदरी !
वेडया पिरा वेडया पिरा, वाट माझी पहा जरा.

अति०—गप्प रहा मूर्खा ! मीं आपण होऊन यांना क्षमा केली आहे, याकरितां आतां फिरून असली गोष्ट बोलशील तर खबरदार ! तुला माझ्या चाबकाची आहेना आठवण ?

खुष०—हो हो ! आहे म्हणून काय विचारावें?—खरें पण, तूं या दोघींनाही क्षमा केली आहे म्हणतोस, तर चिंता नाहीं, तूं मला टाकून एकटाच तुरुंगांत गेलास याबद्दल मीही तुला क्षमा करितों.

(पडदा पडतो.)

समाप्त.

पात्रें.

अतिपीडराजा .. .. सिंधुदेशाधिपति.
खलदर्शनराव .. .. जामात, शशिकलेचा पति.
सुदर्शनराव .. .. जामात, चंद्राननेचा पति.
राजवाहनराज (सौराष्ट्राधिपति) .. जामात, मृगांकमालेचा पति.
सुखापीडराव .. .. मगधदेशाधिपति.
कांतिवर्मा .. .. प्रमलेश्वरचा सरदार.
चंडवर्मा .. .. उदासदुर्गचा सरदार.
मधुकरराव .. .. चंडवर्म्याचा औरस पुत्र.
मरुत्सेनराव .. .. चंडवर्म्याचा लेंकवळा पुत्र.
विकर्णराव .. .. चंडवर्म्याच्या पदरचा एक मुत्सद्दी.
अश्वसेन .. .. शशिकलेचा चाकर.
एक ज्ञातारा .. .. चंडवर्म्याचा आश्रित.
राजवैद्य (दोघे) .. .. खलदर्शनराव आणि राजवाहनराज यांच्या पदरचे.
खुषमस्कऱ्या .. .. अतिपीडराजाचा मित्र.
शशिकला, चंद्रानना, मृगांकमाला } .. .. अतिपीडराजाच्या तीन कन्या.
कमलिनी .. .. अश्वसेनाची स्त्री, शशिकलेची दासी.

सरदार, मानकरी, गृहस्थ चाकर, दूत, दासी, इत्यादि.

स्थळः—सिंधुदेश, उदासदुर्ग, पाणथळ, करश्रीबंदर इत्यादि.

॥ श्री ॥

नाट्यकथार्णव मासिक पुस्तकांत छापत असलेलें

अतिपीडचरित नाटक.

हें पुस्तक

शंकर मोरो रानडे बी. ए.

ह्यांनीं मूळ इंग्लिश ग्रंथाधारें केलें,

तें

मुंबईंत

"इंदुप्रकाश" छापखान्यांत छापिलें.

(सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधी सर्व
प्रकारचे हक्क ग्रंथकर्त्यानें स्वाधीन ठेविले अहित.)

शके १८०२.

सन १८८१. इ०.

उपोद्घात.

हें नाटक **इंग्लंद** देशांतील प्रसिद्ध नाटककविमणि **शेक्सपीयर** यानें केलेल्या मूळ "**किंग् लियर**" नामक करुणरसपर्यवसायी नाटकाच्या आधारें **महाराष्ट्र** भाषेंत तयार केलें आहे. ह्या नाटकाचे अगोदर आमचे पुस्तकांत जें "**दौलतराव**" नाटक छापून प्रसिद्ध झालें, तेंही मूळ इंग्रजी भाषेंतूनच घेतलें होतें, हें वाचक जाणतच आहेत; तथापि त्या नाटकाचा कवि **ब्राउन** व त्याचें मूळ **इंग्रजी** "**बार्बारोसा**" नाटक हीं दोन्हींही प्रायशः अप्रसिद्धच आहेत तशांतली गोष्ट सांप्रतच्या "**अतिपीडचरित**" नाटकास मूलाधारभूत जें "**किंग् लियर**" नाटक तें व त्याचा कर्ता कविकुलगुरु **शेक्सपीयर** यांजविषयीं नाहीं. या नाटकाचा कवि **शेक्सपीयर** हा नुसत्या **इंग्लंद**-देशांतच काय, परंतु प्रायशः पृथ्वीवरील प्रत्येक सुधारलेल्या देशांत पुष्कळांस माहित असेल, व त्याबरोबर त्या कवीनें केलेल्या नाटकांपैकीं उत्तम करुणरसपर्यवसायी म्हणून जीं नाटकें मानिलीं आहेत, त्यांपैकीं "**किंग् लियर**" हें नाटक आहे हेंही सर्वांस अवगत असेलच. यास्तव "**बार्बारोसा**" नाटकाचे वेळेस आमच्या **महाराष्ट्र** लेखाची तुलना करावयास आमच्या प्रिय वाचकांस बहुतःकरून सवड नव्हती, परंतु तो प्रकार या नाटकाविषयीं न होतां या नाटकाचे भाषांतरांत मूळ ग्रंथांतील कथानक, व रसपरिपाक हीं कितपत कशीं उतरलीं आहेत हें पाहण्याकडे वाचकांचें सहजच लक्ष पोंचण्यासारखें आहे. व या गोष्टीकडे लक्ष देतां पूर्वीच्या "**बार्बारोसा**" नाटकाचें भाषांतर करण्याच्या श्रमापेक्षां व भीतीपेक्षां या "**किंग् लियर**" नाटकाचें भाषांतर करण्याचे कामीं अधिक श्रम व अधिक भीतिही आहे हें कोणासही सहज समजण्यासारखें आहे. यास्तव हें भाषांतर करीत असतां आह्मांस मूळ कवीची नाटकरचना कितपत उपयोगीं पडली, व तिजमध्यें कोठें कशा प्रकारचा फेरफार करावा लागला, वगैरे प्रकारांचें प्रस्तुतस्थळीं अल्प विवरण करणें अनुचित वाटतें.

मूळ **इंग्लिश** नाटकांतील कथानक **ब्रिटन** देशांत घडलें आहे, त्याबद्दल प्रस्तुतच्या नाटकांत वर्णिलेलें कथानक **सिंधु** देशांत घडलें असें कल्पिलें आहे. हा **सिंधु** देश म्हटला म्हणजे सांप्रतकाळीं आपण ज्यास **सिंध** प्रांत म्हणतों तोच जवळ जवळ असून, त्यांत आलीकडे ज्यास आपण **पंजाब** म्हणतों त्याच्याही कांहीं भागाचा समावेश होत असे. या नाटकांतील नायक **अतिपीडराजा** यानें आपली ज्येष्ठ कन्या **शशिकला** इच्या विवाहाचे वेळीं तिचा पति **सुलदर्शनराव** ह्यास **पंचगांग** प्रदेशापैकीं कांहीं भाग दिल्याचें (पृष्ठ ३ पहा) लिहिलें आहे. हा **पंचगांग** प्रदेश म्हणजे पंच (पांच) **गां**(नद्यां)चे मधील प्रदेश अर्थात् **पंजाब** होय. **चंद्राननेस** जो प्रदेश दिला तो प्रदेश सांप्रतच्या **सिंध** प्रांताचा उत्तर भाग होय; व त्याचाच दक्षिण भाग आपली कनिष्ठ कन्या **मृगांकमाला** हीस देण्याबद्दल **अतिपीडराजाची** उक्ति आहे. याच प्रदेशांत **करश्री** बंदर, ज्यास आलीकडील **कराची** हें नांव दिलें असतांही चालेल, तें असून, शिवाय **सिंधु** नदाचा समु-

द्राशीं संगम, त्याचे आसपास मोठें वाळवंट, वारंवार तुफानें आणि वादळें होण्याची भीति, इत्यादि प्रकार हल्लीं आहेत त्याप्रमाणें पूर्वीही होते. तसेंच याच प्रदेशांत **खलदर्शनराव** आणि **सुदर्शनराव** यांचीं स्वतःचीं विवाहापूर्वीचीं लहानशीं राज्यें होतीं असें पुढील कारणांवरून साहजिक अनुमान निघण्यासारखें आहे:— पृ. ४१ रकाना २ यांतील **कांतिवर्म्या**च्या पहिल्या भाषणांत त्यानें **अश्वसेनास** "निर्लज्जा ! तुझी आणि माझी ओळख चांगली होऊन पुरते चार दिवस देखील झाले नाहींत इ०" म्हटलें आहे. हें म्हणणें ज्या प्रसंगास उद्देशून आहे, तो प्रसंग **कांतिवर्मा** ज्या दिवशीं गुप्त वेशानें **अनिपीड**राजाचे पदरी राहिला, त्याच दिवशीं त्यानें राजभक्तिस्तव **अश्वसेनास** लाथ मारली त्याबद्दलचा होय हें वाचकांस कळविणें नलगे. त्याच दिवशीं **अनिपीड**राजा **शशिकले**च्या घरून बाहेर पडला, व त्यानें **कांतिवर्म्यास चंद्राननेकडे** पाठविलें, व तो तिच्या घरीं जाऊन तेथून **उदासदुर्गास** आला असतां त्याच दिवशीं त्याची आणि **अश्वसेना**ची पहांटेस गांठ पडली; व यापूर्वीं **चंद्रानने**च्या घरून **उदासदुर्गास** येण्यास त्यास फार फार तर एक दिवस लागला असावा. यावरून **खलदर्शनरा-वा**च्या मूळ राज्याचें स्थान दक्षिण प्रदेशांत असून तेथून **उदासदुर्ग** फार लांब तर दोन तीन दिवसांच्या वाटेवर असावा असें सिद्ध होतें. तसेंच पृ. ३५ रकाना २ यांत आरंभीं **विकर्ण** रावाचें भाषण आहें, त्यांत **सुदर्शनराव** "आज रात्रींच्या रात्रींच" **उदासदुर्गास** येणार आहेत म्हणून सांगितलें आहे, यावरून त्याच्या राज्याचें स्थानही **उदासदुर्गा**पासून पुष्कळच जवळ असावें असें अनुमान निघतें. असो; हें अनुमान कबूल केलें असतां विवाहसमारंभ आटपल्यानंतर थोडक्याच दिवसांत **अनिपीड**राजा **शशिकले**चे घरीं आला, व तेथून जासून निघाल्यावर लागलाच **चंद्राननें**चे घरीं जाऊन तेथें तिचा पत्ता नाहीं सबब त्याच रात्रीं तेथून निघून ताबडतोब **उदासदुर्गा**वर आला, वगैरे प्रकारांची संगति वाचकांचे ध्यानांत सहज येईल. आतां शेवटीं सांगितलेला **उदासदुर्ग** हा **करश्री** बंदराहून फार अंतरावर नव्हता असें कल्पिलें आहे, व सांप्रतकालींही **कराची** बंदरापासून बरीच जवळ अशी एक डोंगराची लांबलचक ओळ आहे. असो. या **सिंधु** देशाच्या दक्षिण भागास लागून आलीकडचे **कच्छ** व **काठेवाड** हे दोन प्रांत आहेत; व ते हल्लीं निरनिराळे आहेत तसे पूर्वीं नसून एकच असावे असेंही मानण्यास कारणें नाहींत असें नाहीं. कसेंही असो, या दोन प्रांतांपैकीं निदान **काठेवाड** प्रांतास तरी प्राचीन काळीं **सौराष्ट्र** हें नांव होतें हें निर्विवाद आहे. व या **सौराष्ट्र** देशची आणि **कच्छ** येथील भाषा यांमध्यें हल्लीं सादृश्यही बरेंच आहे, त्याप्रमाणें पूर्वीही असावें. याच कारणामुळें प्रस्तुतच्या नाटकांत **मधुकर**रावानें **अश्वसेनास** मारिलें, त्या वेळीं त्याचें वेशांतर असल्यामुळें त्याच्या तोंडांत **कच्छी** भाषा घातली आहे. तसेंच या **सौराष्ट्र** प्रांतापासून **करश्री** अथवा **कराची** बंदर लांब नाहीं हें निश्चित आहे, व यासाठींच **राजवाहनराजा**चें सैन्य **सिंधु** देशांत येऊन दाखल झालें तें प्रथमतः या बंदरींच उतरलें असें कल्पिलें आहे.

असो; येथपर्यंत मूळ कथाभागांतील स्थळांचीं मात्र नांवें बदलून त्यांची या देशासंबंधानें परस्पर संगति सांगितली. आतां मूळांतील व या नाटकांतील पात्रांची कृति व एकंदरींत कथानक

यांमध्यें कितपत संगति किंवा विरोध आहे याचें अल्प निरूपण करूं.

शेक्सपीयर कवीचें हें नाटक करुणरसपर्यवसायी आहे हें वर सांगितलेंच आहे, त्यावरून मूळ नाटकांतील कथेचा अंत दुःखद असावयाचा हें स्पष्टच आहे. त्याप्रमाणें या नाटकांत बहुतेक ठळक ठळक पात्रांचा संहारच झाला आहे. हीं पात्रें आठ असून त्यांचीं नांवें पुढें लिहिल्याप्रमाणें:—'**किंग् लियर** (**अतिपीडराजा**)', '**कॉर्डिलिया** (**मृगांकमाला**)' '**गानेरिल्** आणि **रीगॅन्** (**शशिकला** व **चंद्रानना**)', '**ड्यूक आफ् कार्नवाल्** (**सुदर्शनराव**)', '**ग्लौस्टर** (**चंडवर्मा**)', '**एड्मंड** (**मरुत्सेनराव**)', व **आस्वाल्ड्** (**अश्वसेन.**) या आठ पात्रांशिवाय ठळक ठळक पात्रें राहिलीं तीं '**आल्बनी (खलदर्शनराव)**', '**केंट** (**कांतिवर्मा**)','**एड्गर्** (**मधुकरराव**), व **लियर** राजाच्या खुषमस्कऱ्या हीं होत. या पात्रांपैकीं शेवटल्या पात्राचा परिणाम काय झाला याचा पत्ताच नाहीं. '**केंट**' हें पात्र जिवंत राहिलें आहे. परंतु **लियर** राजामागें तें फार दिवस राहूं शकेल असा मुळींच संभव नाहीं. तेव्हां राहतांपैकीं **आल्बनी** आणि **एड्गर्** हीं पात्रें शिलक राहिलीं, व अखेर संपूर्ण राज्याचा अधिकार या दोघांकडे राहिला. या सर्व पात्रांशिवाय **फ्रान्स** देशचा राजा (**राजवाहनराज**) हें पात्र प्रधान केलें असतांही चाललें असतें, परंतु कवीनें तें पात्र आरंभीं विवाहसमारंभांचे वेळीं मात्र बाहेर आणिलें आहे, व त्यानंतर त्याची व प्रेक्षकांची मुळीं गांठच पडूं दिली नाहीं. एवढेंच नव्हे, तर नाटकाचे अंतीं जी लढाई झाली, त्या लढाईकरितां देखील हें पात्र **डाव्हर** (**करश्री**) बंदरीं मुळींच आणिलें नाहीं. असो. येथपर्यंत जो मूळ नाटकांतील पात्रांचा हा प्रकार दाखविला, त्याहून आमच्या नाटकांत झालेला प्रकार फारच निराळा आहे, हें चतुर वाचकांस सहज समजेल. आमचे नाटकांत **अतिपीडराजा** व **मृगांकमाला** हीं पात्रें जिवंतच ठेवण्यांत आलीं आहेत. तसेंच **राजवाहना**च्या पात्रास शेक्सपीयर कवीनें जसें अखेरपर्यंत गुप्तच ठेविलें आहे तसें न करितां त्यास आमीं नाटकाचे अखेरचे व त्याचे आलीकडील अंकांत बरेंच प्राधान्य दिलें आहे. एवढेंच नव्हे, तर **अतिपीडराजा**च्या राज्याच्या अंतिम व्यवस्थेंतही फेरफार करून सर्व राज्य **खलदर्शनरावा**च्या संमतीनेंच **राजवाहन**राजास अर्पण केलें आहे. आतां हे जे तीन फरक सांगितले, ते या नाटकांतील कथा व मूळांतील कथा या दोहोंमध्यें जमीन अस्मानचें अंतर करणारे आहेत असें झटल्यास मत्यवाय नाहीं. तथापि या सर्वांमध्यें अतिशय महत्वाचा फेरफार झटला झणजे **अतिपीडराजा** व **मृगांकमाला** यांस जगूं दिलें हा होय. आमच्या आलीकडील विद्वानांपैकीं ज्यांनीं हें मूळ नाटक वाचिलें असेल, व त्याजवरील **जन्हाइनस** नामक **शार्ङ्गण्यदेशीय** समर्थनकाराचे निबंध व **कोल्रिज, श्लेजेल्, बक्निल्** इत्यादिक निबंधकारांच्या टीका पाहिल्या असतील, त्यांस या नाटकाचा अंत या दोन पात्रांच्या मृत्यूहून अन्यथा होणें हें कदाचित् असंभाव्यच वाटेल यांत संशय नाहीं. तथापि कांहीं विशेष कारणांकरितां निदान आम्हांस तरी तद्विपरीतच अंत करणें विशेष प्रशस्त वाटलें. हीं कारणें कोणतीं याचा सविस्तर विचार आमीं करणारच आहों, परंतु तसें करण्यापूर्वी वर ज्या निबंधकारांचीं नांवें सांगित-

लीं, त्यांचे सामान्यतः एतद्विषयक अभिप्राय काय आहेत हें वाचकांस कळविणें अत्यावश्यक जाणून आम्हीं अगोदर त्यांचेंच विवरण करितों.

आतां ज्या निबंधकारांचीं नांवें सांगितलीं, त्यांपैकीं बहुशः सर्वांचें मत "**किंग् लियर्**" नाटकांतील कथानक पूर्णच असल्याविषयीं आहे; व त्या सर्वांचा साधारण कलच असा आहे कीं, **शेक्सपीयर** कवीनें या नाटकांतील कथानायकाचा व त्याबरोबर त्याची सद्गुणी कन्या **मृगांकमाला** हिचा ज्या प्रकारचा अंत केला आहे, त्याहून अन्य प्रकारें अंत होणें शक्यच नाहीं. हा कल असण्याचीं तें कारणें दाखवितात तीं पुढें लिहिल्याप्रमाणें आहेतः— "**अतिपीडराजा** हा स्वभावतः वयोमानानें आसन्नमृत्यु झाला आहे, अशाच स्थितींत त्यास एकामागून एक असा त्याच्या दोघी थोरल्या कन्यांपासून त्रास होऊन त्यायोगें त्याचें अगोदरच वयाच्या कारणानें भ्रंश पावलेलें मन संतापामुळें बहकून जाऊन त्याला अतिशय वेड लागलें, व त्या तसल्या स्थितींतही त्याचो खाण्यापिण्याची तरतूद मुळींच न होतां त्यास उघड्या मैदानांत, भयंकर वादळांत, थंडीच्या कडाक्यांत, पावसानें चिंब भिजून जाऊन, फिरावयाचें पडलें, व त्यामुळें त्याच्या प्रकृतीची स्वाभाविकच दुर्दशा झाली. तेव्हां अशा भयंकर स्थितींत सांपडलेल्या त्या **अतिपीड**राजानें जगावें हें अगदीं असंभवनीय आहे, व याकरितां त्यानें मरावें हेंच अधिक स्वाभाविक होय. व यास्तव ज्या प्रकारच्या मरणानें खरा करुणरस उत्पन्न होईल असें मरण त्यास प्राप्त होण्यास त्याचे दृष्टीसमोर त्याची शेवटीं प्रिय झालेली कन्या **कॉर्डिलिया** हिनें मरावें, व त्या तिच्या मृत्यूबद्दलच्या शोकांतच चूर होऊन गेला असतां त्या स्थितींतच **लियर** राजाचा अंत व्हावा हें योग्य आहे, व याकरितां **कॉर्डिलिये**चा अंत करणें हेंही अवश्य होय. याप्रमाणें या दोन पात्रांचा शेवट अशा प्रकारें होण्याची आवश्यकता तर सिद्ध होतेच आहे; तथापि कदाचित् कोणी असें म्हणेल कीं, "कांहीं चिंता नाहीं, **लियर** राजाला जगूं देऊन त्याला सुख भोगावयास ठेविलें असतें तर कवीचें त्यांत कांहीं वेंचत होतें असें नाहीं, तर मग त्यानें त्या दोघांचा शेवट गोड कां केला नाहीं?", या प्रश्नाचें उत्तर असें आहे कीं, तशी गोष्ट घडूं दिली तर नाटकरचनेचा कवीचा उद्देशच विफळ होऊं पहातो. जे दुष्ट, पातकी चांडाळ असतात त्यांचा नाश व्हावा, व ज्यांचीं पातकें त्यांस अखेर भोगणें पडावें, हा कवीचा हृदयगत उद्देश तर आहेच; व त्याप्रमाणें **लियर**राजाच्या ज्येष्ठ कन्या, व दुसरीं तत्साधर्म्येंकरून वर्तणारीं इतर पात्रें याचा कवीनें अंत केलाही आहे. परंतु तेवढ्यानें अखेर सद्गुणाचा व सत्याचा नेहमी जय व्हावाच हा नियमच या जगांत चालूं शकत नाहीं. कारण सद्गुणाचा व सत्याचा जय होण्यास जीं साधनें लागतात, त्यांची प्राप्ति जेव्हांची तेव्हांच होते असें या जगांत नेमानें घडत नाहीं. उलटें सद्गुणाचा व सत्याचा पाडाव व्हावा एतद्विषयीं दुर्गुण आणि असद्बुद्धि यांचा चोंहीकडून त्यांजवर एकसारखा मारा चालू असतो, व यासाठींच सद्गुण आणि सत्य यांचीं फळें या जगांतच मिळतील अशी आशा करण्यापेक्षां त्यांची सिद्धिमर्यादा परलोकींच आहे असें मानावें हेंच विशेष प्रशस्त होईल असें सांगण्याचा कवीचा उद्देश आहे."

आतां वर लिहिलेल्या ग्रंथकर्त्यांचे सामान्यतः अभिप्राय सांगितले, तें एका अर्थीं अक्ष-

रशः खरे आहेत. व त्यांअन्वयें विचार करून पाहतां येथपर्यंत ज्या दोन प्रधान पात्रांसंबंधानें चर्चा चालू आहे, त्या पात्रांचा नाटकोद्देश-साधनार्थ अंत व्हावा हें उचितच आहे. व अशा तऱ्हेनें नाटकाचा अंत होईल तरच नाटकाच्या खऱ्या करुणरसपर्यवसायितेचें पूर्णत्व रहाणार आहे. वर ज्या **जर्व्हाइनस** नामक **शेक्सपीयर** कवीच्या प्रसिद्ध समर्थनकर्त्याचें नांव सांगितलें, त्यानें करुणरसपर्यवसायी नाटकाचें स्वरूप पुढें लिहिल्याप्रमाणें वर्णिलें आहे. त्यानें नाटकांचे साधारणतः परस्परविरुद्ध असे 'पुराणोपात्त (ईपॉस्)' आणि 'ट्राजेडी (अंतकरुण)' असे दोन भेद केले आहेत. पहिल्या भेदांतील नायकादि पात्रें आभिजात्यादि गुणांनीं युक्त असून तीं परमेश्वराचे जगदुपयुक्त हेतु आणि उद्देश यांच्या अनुरोधानेंच वर्तन करितात; व भवितव्यतेचेच केवळ दास असून देवतादिकांचे प्रियपात्रभूत असतात. अर्थात् त्या सर्वांचे मूळ स्वभाव चांगलेच असून ते अधर्मभीरु, पापभीरु, इत्यादि प्रकारचे असतात; व जरी भवितव्यतेच्या जोरानें त्यांजवर हवीं तेवढीं संकटें येऊन कोसळलीं, तरी अखेर त्यांच्यावर परमेश्वराची किंवा त्याच्याहून कनिष्ठ प्रतीच्या देवतादिकांची कृपादृष्टि असते यामुळें ते तशा संकटांतूनही निभावून पुनरपि सुखोपभोग घेत रहातात. परंतु दुसऱ्या भेदांतील म्हणजे 'ट्राजेडी' किंवा 'अंतकरुण' यांतील पात्रांची तऱ्हा याहून सर्वतोपरी उलटी असते. यामध्यें जीं पात्रें असतात तीं भवितव्यतेचें दासत्व पत्करणारीं नसून उलट तिजशी परिपंथित्व म्हणजे वैर करणारीं अशाच असतात. तसेंच यांतील पात्रें उन्मत्त, उच्छृंखल, व कठोर हृदयाचीं असून तीं परमेश्वरानें व मनुष्यकृतीनें मनुष्यांच्या आचरणांवर जे निर्बंध ठेविले आहेत, त्यांस एकीकडे झुगारून देतात, व त्यायोगें देवतादिकांच्या शासनासही भीत नाहींतसे होतात, व त्या कारणानें त्यांचा पुढें आपोआप नाश होतो. या ठिकाणीं जिला भवितव्यता असें म्हणावयाचें, ती उगीच आपलीकांहीं तरी आपल्या देहांतःशक्तीहून निराळीच आहे व तिजपुढें आपण आपल्या इच्छेविरुद्धही बळी पडतां, असें मुळींच नाहीं; तर प्रत्येक मनुष्याचा स्वतःचा स्वभाव हीच त्याची भवितव्यता, यापलीकडे दुसरें कांहीं नाहीं. तेव्हां ही गोष्ट लक्षांत ठेविली असतां प्रत्येक मनुष्यावर काय जे बरे वाईट प्रसंग येतात, ते त्यांच्या स्वभावाचीं व त्याच्या कृतीचीं फळें म्हणूनच येतात असें सदरहू समर्थनकर्त्याचें मत आहे. परंतु या मताची सत्यता केवळ अंशतःच घेणें वाजवी आहे असें आम्हांस वाटतें. या जगांत मनुष्यांनीं अमुक अमुक रीतीनें वागावें, अमक्याचे अमुकच परिणाम व्हावे, म्हणून इच्छा करणें हा एक स्वतंत्र प्रकार आहे, परंतु जगांत याचा फारसा अनुभव येत नाहीं. या जगांत सदुणी मनुष्यानें सुखांत रहावें, त्याजवर संकट कसें तें येऊं नये, हें प्रत्येक विचारी मनुष्यास इष्ट वाटेल, परंतु त्याप्रमाणें सर्वांशीं कोणास कधीं तरी अनुभव आला आहे काय? प्रत्यक्ष साधुसंत ज निरिच्छ होऊन परमेश्वराच्या ध्यानपूजनादिकांकडेच लक्ष लावून बसले किंवा बसण्यास सिद्ध झाले, त्यांच्याच तोंडून,

जगीं सर्व सुखी असा कोण आहे
विचारी मना तूंचि शोधूनि पाहे

किंवा

सुख पाहतां जवापाडें
दुःख पर्वता एवढें

अशा उक्ति निघाल्याशिवाय राहिल्या आहेत काय ? तेव्हां प्रत्यक्ष साधुसंत, ज्यांची परमेश्वराचे ठायीं एकनिष्ठ भक्ति हीच त्यांच्या ऐहिक सुखास सर्वथा साधनीभूत असावी हें आपणा प्रत्येकास इष्ट वाटेल, त्यांसही पूर्ण सुखाचा अनुभव आला नाहीं, व त्यांजवर अनेक दुःखें, अनेक संकटें कोसळलीच कोसळलीं, व त्यांस

जगीं संग सोडूनि सूखी रहावें.

किंवा

सुखालागिं आरण्य सेवीत जावें

किंवा

तुका ह्मणे उगी रहावें
जें जें होईल तें तें पहावें.

अशा आत्मसमाधानार्थ उक्तिही बोलाव्याच लागल्या. असा जर प्रकार प्रत्यक्ष दृश्य आहे, तर मग प्रत्येक मनुष्याचा स्वभाव हीच त्याची भवितव्यता हें प्रतिपादन कितपतसें निरंतरचें नियामक ठरेल ? या जगामध्यें सुख आहे, दुःख आहे, मनुष्यमात्रांचे निरनिराळे स्वभावधर्म आहेत, त्याचप्रमाणें प्रत्येक वस्तुजाताचे भिन्नभिन्न नैसर्गिक धर्म आहेत; तेव्हां या जगांत ज्या कांहीं बऱ्या वाईट गोष्टी घडून येतात, त्या प्रत्येक व्यक्तीच्या संबंधानें त्याच्या एकट्याच्याच स्वभावाचीं फळें होत असें मानणें हें साहस नव्हे काय ! वस्तुतः या जगांत घडून येणारी हरएक गोष्ट ही अनेकविध परस्परानुकूल किंवा अन्योन्यानुकूल अशा प्रकारांचाच परिणाम होय. अमुक अमुक एवढ्याच नेमक्याच प्रकारांपासून अमुक अमुकच परिणाम व्हावा हें वाजवी आहे, व त्याप्रप्राणें या जगांत हरएक प्रसंगीं अनुभव येतोच येतो. परंतु जर त्याच प्रसंगीं तद्विरुद्ध अनंतविध गोष्टी दृष्ट किंवा अदृष्टपणें आपआपले व्यवसाय करीत असून त्यांचें संघट्टन या पूर्वोक्त प्रकारांशीं झालें, तर भलतेच परिणाम अनुभवास आल्यावांचून कदापि रहात नाहींत. या गोष्टीची सत्यता ताडून पाहण्यास फार लांब जाणें नलगे. मनुष्याचा हात विस्तवावर पडला असतां भाजतो, व फार वेळ विस्तवांत राहिला असतां जळून जातो हे निश्चित परिणाम निरंतर अनुभवाचे आहेत; परंतु ज्या वेळीं या गोष्टी घडून यावयाच्या, त्याच वेळीं अग्नीच्या शक्तीचे प्रतिबाधक असे जर कांहीं प्रकार घडून आले, तर तेच परिणाम त्याच प्रसंगीं टळतात अशा गोष्टी अनुभवास येतात कीं नाहींत ? एखादा सर्प अडचणीच्या वाटेनें एका दिशेस चालला आहे, व त्याच अडचणीच्या वाटेनें एकादा मनुष्य पुढें चालला आहे, तर तो सर्प त्याच वाटेनें गेला असतां एकादे वेळीं त्या मनुष्यास चावण्याचा व कदाचित् त्यायोगें तो मनुष्य मृत्यु पावण्याचाही संभव आहे किंवा नाहीं! परंतु समजा, अशा प्रकारें तो सर्प त्या मनुष्याजवळ जाऊन त्यास चावण्यापूर्वीच दुसऱ्या एका मनुष्याच्या दृष्टीस पडला, व त्या मनुष्यानें आपल्या काठीनें अगोदरच त्या सर्पास मारून टाकिलें, तर तो पूर्वोक्त मनुष्य त्या सर्पाच्या चावण्याच्या परिणामांपासून तरी पार पडला हें खरें ह्मणतां येईल किंवा नाहीं ? किंवा उलटपक्षीं आमच्या या देशांतील एक प्रसिद्ध आनरेबल गृहस्थ, जे या मुंबाद्वीपांतच सिकता-द्वीवरील सिंधुतीरच्या आपल्या सुखावासांत कैक वर्षें बिन घोर नांदत होते, त्यांच्या अंगावर अकल्पित घराची इमारत कोसळून पडल्यामुळें त्यांचा तशा प्रकारचा अत्यंत दुःखदायक अंत झाला किंवा नाहीं ? नुकताच फार थोड्या दिवसांपूर्वीं निहिलिस्ट अथवा राजसत्तोच्छेदक

पक्षाच्या लोकांनीं **रशिया**च्या बादशहांस **"विंटर पालेस"** नामक राजगृहासकट सुरुंगाच्या जोरानें उडवून देण्याचा विचार केला असतां, व अंमळ एक दोन मिनिटांची चुकामूक न होती तर त्यांचा प्राणांतही होण्याचा संभव निश्चित असतां, तेवढ्या एकं दोन मिनिटांच्या चुकामुकीनेंच त्यांचे प्राण त्या संकटांतून बचावले कीं नाहींत? तेव्हां या ठिकाणीं जे तीन प्रकार दाखविले, त्यांवरून ते ते मनुष्य वाचले किंवा मेले या प्रकारांचा त्यांच्या त्यांच्या स्वतःच्या स्वभावाशीं कितपतसा संबंध होता म्हणून समजावयाचें ? एतावता या सर्व प्रकारांवरून आह्मांस वास्तविक प्रकार वाटतो तो एवढाच कीं, या जगांत प्रत्येक व्यक्तिमात्राच्या संबंधानें *ज्या अनंतविध बऱ्या वाईट गोष्टी होतात, त्या* होण्यास जीं अनेक अनुकूळ कारणें असतात, त्यांपैकींच एक त्या त्या व्यक्तीचा स्वभावधर्म हें कारण असून, त्यांचे भावी परिणाम टाळून विरुद्ध परिणाम उत्पन्न करण्याकरितां अनेक प्रतिकूल कारणें आपआपले व्यवसाय तदेकसमयावच्छेदेंकरून करीत असतात; व यामुळें आयत्या वेळेस ज्याप्रमाणें त्या अनुकूल किंवा प्रतिकूल कारणांचा अधिक किंवा कमी जोर चालूं शकेल, त्याप्रमाणें त्यांचे बरे किंवा वाईट परिणाम हे त्या वेळीं आपल्या अनुभवास येतात. तेव्हां एकंदरींत हा विचार मनांत आणिला असतां वरील समर्थनकाराच्या आणि आमच्या स्वतःच्या मतांमध्यें परस्पर महदंतर आहे तें कसें हें वाचकांच्या सहज ध्यानांत येण्यासारखें आहे; व यावरून वाचकांस आमचा उघडपणें असा अभिप्राय कळून येईल कीं, प्रत्येक व्यक्तिमात्राचा वरा अगर वाईट अंत होणें हें केवळ त्या व्यक्तीच्या स्वभावावरच अवलंबून नाहीं, तर तशा प्रकारचा अंत होण्यास बाहेरच्या अनेक अनुकूल किंवा प्रतिकूल कारणांचा व्यापार हा अत्यावश्यक आहे. तेव्हां ह्या दृष्टीनें विचार करून पहातां प्रस्तुतनाटकविषयक कथानकांत **लियर** राजा व त्याची कन्या **कार्डिलिया** यांचे एक अमुक प्रकारचे स्वभाव आहेत, एवढ्यावरून नाटकांतीं त्या उभयतांचा अंत झालाच पाहिजे असें म्हणण्याची काय आवश्यकता आहे ? या जगांतील व्यवहारांस अनुसरून या दोन पात्रांचा अंत होणें जितकें साहजिक आहे तितकेंच तीं पात्रें जिवंत रहाणेंही साहजिक आहे. व यासाठीं नाटकाचा अंत उभयथाही आह्मांस मान्य होण्यास प्रत्यवाय नसाना; एवढेंच नव्हे, तर प्रसंग विशेषीं केवळ सद्बोधग्रहणार्थ वर लिहिलेल्या 'ईपॉसू' व 'ट्राजेडी' या दोन भेदांपैकीं 'ट्राजेडी' हा भेदच आह्मीं विशेष प्रशस्त मानूं. या दृष्टीनें पहातां **"किंग् लियर"** नाटकाचा करुणान्तही आह्मांस ग्राह्य वाटेल, मात्र तसें वाटण्याचें कारण मूळांतील कथानकाची पूर्णता हें नव्हे. आमच्या मतें नाटकग्रंथांतून सद्बोध तर असावाच, परंतु ग्रंथाच्या परिपूर्णतेस्तव कथानकाची परिपूर्ति हा गुणही त्यांत अवश्य असावा. हा दुसरा गुण आमचे मतें मूळ ग्रंथांत पूर्णपणें नाहीं, व जरी घटिकाभर तो गुण त्यांत असेल असें म्हटलें, तरी त्या कथानकाचा शेवटचा भाग ज्या रीतीनें नाटकांत गोंविला आहे, ती रीति साधारणतः संभवाबाहेरची दिसते. ती कशी हें पुढें लिहिलेल्या प्रकारावरून वाचकांस कळून येईलच, यासाठीं प्रकृतस्थळीं इतकेंच कळवावयाचें आहे कीं, नाटककथेपैकीं मुख्य सूत्रें पुरीं करण्याकरितां आह्मांस या कथानकाच्या अंतिम भागांत

थोडी फिरवाफिरव करावी लागली, व त्या फिरवाफिरवीचा परिणाम अखेर **अतिपीडराजा** व **मृगांकमाला** या दोन पात्रांस जिवंत टेविण्यांत झाला आहे. मूळ नाटकांत **मृगांकमाले**चा पति **राजवाहनराज** हा लढाईच्या ठिकाणीं मुळींच न आणितां अंक ४ प्रवेश ३ येथें त्याच्या राज्यांत कांहीं अकल्पित भयाचें कारण उत्पन्न झाल्यामुळें तो लढाईस यावयास निघाला असूनही आपल्या सैन्याची व आपल्या कुटुंबाची वगैरे सर्व व्यवस्था आपल्या सेनापतीच्या स्वाधीन करून आपण परत स्वदेशीं निघून गेल्याचें सांगितलें आहे. परंतु हें अकल्पित भयाचें कारण कोणतें याचा मूळ नाटकांत मुळींच उल्लेख केला नाहीं. एवढेंच नव्हे, तर नाटकाच्या अखेरीस **मृगांकमाले**च्या सैन्याचा पराभव होऊन धराधरी सुरू झाली असतां तिजमध्यें या सेनापतीची वाट काय झाली, किंवा तो जिवंत असलाच तर त्यानें **अतिपीडराजा** आणि **मृगांकमाला** यांस कैदेतून सोडण्याविषयीं काय खटपट केली वगैरेचा मुळींच उल्लेख केला नाहीं. वस्तुतः नाटककथेची परिसमाप्ति होण्यास **राजवाहनराजा**स परत पाठविण्याची मुळींच जरूर नाहीं. एवढेंच नव्हे, तर **शशिकला** व **चंद्रानना** या दोघींच्या पतींनीं ज्याप्रमाणें नाटककथेंत बऱ्याच प्रकारचें प्राधान्य भोगिलें आहे, त्या प्रकारचें प्राधान्य या पात्रासही भोगावयास सांपडणें हें अत्यंत इष्ट होतें. परंतु तसा प्रकार मूळ नाटकांत मुळींच केला नाहीं. व तो न करण्याचें कारण **शेक्सपीयर** कवीच्या सर्वसमर्थनकर्त्या **जव्हाईनसा**नें असें सांगितलें आहे कीं, त्या पात्रास प्राधान्य दिलें असतें तर कदाचित् नाटकांतीं त्या पात्राचा जय झाला असता, व तसें झालें असतें म्हणजे **ब्रिटन** देशावर **फ्रान्स** देशाच्या राजानें स्वारी करून **ब्रिटिश** लोकांस जिंकलें असें कबूल करावें लागलें असतें. परंतु **शेक्सपीयर** कवि हा पूर्ण स्वदेशभक्त होता, या कारणानें त्यास तसें करणें आवडलें नाहीं, व या हेतूनेंच त्यानें नाटकांतीं या पात्रास अग्राधान्य देऊन टाकिलें आहे. असो. **जव्हाईनसा**नें सांगितलेलें हें कारण खरें असेल, तर तें **शेक्सपीयर** कवि हा स्वतः **ब्रिटन**देशीयच असल्यामुळें त्याच्याच संबंधानें तें कदाचित् योग्य होईल; परंतु तें कारण या भाषांतरग्रंथांतील कथानकाच्या सरणीस लागू नाहीं हें उघड आहे. असो. मूळ नाटकांत आतां सांगितल्या प्रकाराचें अनुसरण केलें असून शेवटील प्रवेशांत **मृगांकमाला** व **अतिपीडराजा** यांस तुरुंगांत पाठवून दिलें असतां तेथेंच **मृगांकमाले**ला टांगून मारिलें आहे; व ती मेल्यानंतर तिच्या दुःखानें **अतिपीडराजा** पुनरपि गांजिला होत्साता मोठ्यानें आक्रोश करीत आहे, अशा वेळीं **मद्रसेना**नें आपली तरवार खुणेकरितां देऊन त्या उभयतां पितापुत्रींस सोडविण्याकरितां पाठविलेला **मधुकरराव** तेथें आला, तेव्हां अर्थात्च त्याचें येणें विफल होऊन **अतिपीडराजा** आपल्या कन्येच्या दुःखानेंच गतप्राण झाला. हा **अतिपीड** राजाच्या प्राणांताचा प्रकार कवीनें तुरुंगांतच परस्पर न करवितां, ज्यास वयोमानानें व अत्यंत दुर्विषह अशा दुःखभारानें अवनत केलें, अशा **अतिपीडराजा**स त्याच्या मृत कन्येचें ओझें अंगावर घेऊन **खलदर्शनरावा**च्या गोटांत आणवून तेथें हा दुःखकारक प्रकार घडविला आहे. अशा प्रकारचा दुःखकारक प्रसंग प्रेक्षकांसमोर घडवून आणणें हें रसपरिपाकबुद्धीनें विचार करून

पाहतां कितीही ग्राह्य व इष्ट असलें, तरी तें आतां सांगितलेल्या अडचणीकडे लक्ष देतां खचितच असंभाव्य आहे. व शिवाय ही असंभाव्यता उत्पन्न होण्यास दुसरेंही एक जबरदस्त कारण आहे तें असें कीं, **अतिपीडराजा** हा जरी राज्यविहीन झाला होता, तथापि तो कैदी होता या नात्यानें त्यास नेतील तिकडे जाणें स्वाभाविक होतें असें मानतां येईल, परंतु गोष्ट ही संभवण्यास राजाचें मन कांहीं तरी स्वतःच्या आधीन असण्याची सवड पाहिजे. ही सवड **मृगांकमाला** त्याचे संनिध असून जिवंत असल्याशिवाय मिळण्याचाच संभव नाहीं; यामुळें तो बिचारा वृद्ध हतभाग्य राजा आपल्या कन्येच्या शोकांतच चूर होऊन गेला असतां बसल्या ठिकाणींच त्याचा अंत व्हावा हेंच साहजिक होय. तथापि मूळ कथानकांत काय चमत्कार झाला आहे तो पहा. त्या ठिकाणीं **अतिपीडराजा** मृत झालेल्या **मृगांकमाले**चें ओझें अंगावर बाळगून तुरुंगापासून **खलदर्शनरावां**च्या गोंठापर्यंत चालत येतो, व तो तरी त्यास कोणीं मागाहून बळजोरीनें धक्के मारीत किंवा गचांडी देऊन कसा बसा तरी आणल्यामुळें येतो असा बिलकुल प्रकार नाहीं, तर त्यास संमानपुरःसर घेऊन येण्यास गेलेल्या **मधुकरराव**ाबरोबर तो निमुटपणें येतो! कदाचित् **शेक्सपीयर** कवीला **अतिपीडराजा** सर्व लोकांच्या दृष्टीस पाडणें, व त्याची **खलदर्शनराव, कांतिवर्मा** इत्यादिकांची गांठ पडूं देणें अवश्य वाटून त्यानें हा असा प्रकार कल्पिला असेल म्हणावें, तर त्यास हा प्रकार साधण्याकरितां व्युत्क्रम स्थितीचें अनुसरण करणें हेंच विशेष सोयकर झालें असतें. **खलदर्शनराव** कसा झाला तरी **अतिपीडराजा**चा जांवई, यासाठीं सासऱ्यास तुरुंगांतून सोडवून आणण्याकरितां तो स्वतःच **कांतिवर्मा** वगैरेसह तुरुंगांत गेला असता (व तसें करण्यास **खलदर्शनरावा**नें लाजण्याचेंही कांहीं कारण नाहीं.), तर **अतिपीड** राजाचा आपल्या कन्येचें ओझें अंगावर घेऊन फिरण्याचा त्रास चुकला असता; व तुरुंगासारख्या भयाण स्थळीं अंधारांत **अतिपीड** राजाच्या मृत्यूचा प्रकार घडविला असता, तर तो विशेष खुबीचा व मनास चटका लागण्यासारखा झाला असता. तेव्हां ही गोष्ट लक्षांत आणून मूळ नाटकांत वर्णिलेल्या प्रकाराच्या यथार्थतेविषयीं जर कोणीही यत्किंचित् विचार करील, तर त्यास हा वर्णिलेला प्रकार विसंगत वाटल्याशिवाय राहील असें आह्मांस वाटत नाहीं- शिवाय ह्या विसंगततेच्या प्रकाराशिवाय मूळ नाटकांत दुसरे ही विसंगततेचे प्रकार कित्येक आहेत, त्यांपैकीं कांहीं थोड्याचें मात्र येथें दिग्दर्शन करितों. **अतिपीडराजा चंद्राननेच्या** त्रासानें **उदासदुर्गां**तून बाहेर पडल्यानंतर त्याच्या बरोबर त्याचा खुषमस्कऱ्या पुष्कळ वेळपर्यंत होता. निदान **चंडवर्म्या**नें **अतिपीडराजा**स डोलींत घालून **करश्री** बंदरीं आणून पोंचवीपर्यंत तरी त्याचे बरोबर तो खचित होता; व पुढें **अतिपीडराजा**स त्याच बंदरीं **मृगांकमाले**च्या गोटांत नेल्यावर त्या उभयतांची चुकामूक झाली. ही हकीकत घडल्यावर **अतिपीडराजा** औषधोचारांनीं बरा झाला. पुढें युद्धप्रसंग होऊन त्यास **मृगांकमाले**सुद्धां कैद करण्यांत आलें, व त्याच दिवशीं त्याचा अंत झाला, हा प्रकार घडून येण्यास फार दिवस लागले असतील असें मुळींच संभवत नाहीं. तथापि हा संभव होता असें घटिकाभर मानूनही खुषमस्कऱ्यासारख्या

विपत्काळींही राजाबरोबर अकारण हाल अपेष्टा टाकून देऊन **चंडवर्म्या**ची चौकशी करीत पत्करणाऱ्या मनुष्याच्या संबंधानें कांहीं तरी बसणें हें योग्य दिसत नाहीं.

पुढें चार बरे वाईट शब्द कळणें जरूर होतें असो. येथपर्यंत लिहिलेल्या प्रकारावरून मूळ असें आह्मांस वाटतें. परंतु मूळ नाटकांत कवी- नाटकांतील कथानक व या नाटकांतील कथा- नें या गोष्टीचा मुळींच मागमूससुद्धां लागूं नक यांमध्यें महत्त्वाचे ह्मणून जेवढे फेरफार कर- दिला नाहीं. कांहीं टीकाकारांनीं मात्र **अतिपी-** ण्यांत आले, तेवढ्यांविषयीं विचार झाला. या फेर- **ड**राजा वादळाच्या सपाट्यांत सांपडून त्या फारांशिवाय आणखीही पुष्कळ ठिकाणीं फेरफार पडक्या देवळापाशीं आला असतां, त्यास त्याच्या झाले आहेत. परंतु ते मूळ नाटकाची परदे- तसल्या वेड लागल्याच्या स्थितींतही नैसर्गिक- शास लागू असणारी स्थिति बदलून तिचे ऐव- पणें आपल्या खुषमस्कऱ्याची कींव येऊन जीं या देशांत घडूं शकणारी स्थिति आणण्या- त्यानें त्यासच आपला अगोदर देवळाचे आंत करितांच करावे लागले आहेत, यास्तव त्यांचा ढकलून दिलें होतें, यावरून तो प्रकृतीनें अशक्त याठिकाणीं निराळा उल्लेख करणें नलगे. आतां होता, व त्या योगानेंच तो केव्हां तरी मेला या नाटककथेंत जीं पात्रें प्रधानत्वें करून रंग. असावा असें अनुमान केलें आहे, परंतु हें भूमीवर आलीं आहेत, त्यांच्या स्वभावांचें यत्किंचित् मृत्यूचें अनुमान खरेंच मानण्यास मूळ नाटकांत वर्णन करणें नाटकाच्या पूर्ण समजुतीस अवश्य स्पष्ट गमक नाहीं. शिवाय **कांतिवर्मा** हा वेशांतर असल्यामुळें तेवढें करून हा लेख समाप्त करूं. केलेला शेवटची लढाई होईपर्यंत **मृगांकमाले**- या नाटकाचा नायक **अतिपीडराजा** हा च्या आश्रयासच राहून **अतिपीडराजा**विषयीं स्वभावानें मिजाशी, हेंकेखोर, शीघ्रकोपी व आपल्या चित्तांत निरंतर काळजी वागवीत असे; भोळसर होता. त्याला माणसाच्या खऱ्या गुणांची परंतु ही लढाई होऊन **अतिपीडराजा** कैदेंत मुळींच परीक्षा नसे. मात्र त्याला आपण गेला असतां तो मोकळाच राहून राजास स्वतः राजे, यास्तव आपणांस सर्वांनीं मान द्यावा, सोडविण्याविषयीं यत्किंचित्ही उद्योग न करितां सर्वांनीं आपणावर प्रेम करावें, व सर्वांनीं आपले मुकाट्यानें **चंडवर्म्या**च्या रहात्या ठिकाणीं शब्द झेलावे असें नेहमी वाटत असे, यामुळें जाऊन त्या ठिकाणीं शोक करीत बसतो, व आपला जरा कोणी उपमर्द केलासें त्याला मागाहून बऱ्याच वेळानें राजा **खलदर्शनरावा**- वाटलें, कीं तो कोपाच्या आवेशांत आकाशपाताळ च्या गोटांत असेल अशा समजुतीनें तेथें येऊन एक करून टाकी. हा त्याचा स्वभाव त्याची त्याविषयीं चौकशी करूं लागतो असा प्रकार ज्येष्ठ कन्या **शशिकला** ही पहिल्यापासून पूर्ण- मूळ नाटकग्रंथांत वर्णिला आहे. एका अर्थानें पणें ओळखून होती, व यासाठींच आपल्या पहातां हा मूळांतील प्रकार फारसा अस्वाभाविक हातीं राज्याची वांटणी पडेपर्यंत ती आपला नाहीं. तथापि नाटकास आरंभ झाला तेव्हांपा- दुष्ट स्वभाव पूर्णपणें झांकून होती. ही स्वभावानें सून या पात्राची ज्या प्रकारची राजैक- अत्यंत कपटी असून हिच्या अंगीं दुसऱ्या निष्ठा कवीनें वर्णिली आहे, त्या प्रकाराकडे यत्किं- मनुष्याच्या स्वभावांतील व्यंगें समजून घेऊन चित् दृष्टि देतां त्यानें राजाचा शोध करणें त्यांच्या योगानें आपल्या हितार्थ सावध रहाण्या-

चा गुण पूर्णपणें वास करीत होता. **शशिकले**ची धाकटी बहीण **चंद्रानना** ही स्वभावानें दुष्टतर खरीच, तरीपण तिच्या अंगांत **शशिकले**पेक्षां प्रमळपणा अधिक होता, यामुळें तिच्या हातून स्वतंत्रपणें कोणचेंही दुष्ट कृत्य करणें हें घडत नसे. तथापि तिला कोणाचें पाठबळ मिळालें कीं पुरे, ती आपला दुष्टपणा बाहेर वाढण्यास बहुधां भीत नसे. तिच्या प्रकृतींतील ही गोम **शशिकला** पूर्णपण ओळखून होती, व यासा. ठींच **अतिपीडराजा**ला आपण घरांतून घालवून दिल असतां **चंद्राननें** कसें वागावें याविषयीं तिचा अगोदरपासूनच तिला सांगी असे. याचीं उदाहरणें पाहणें असल्यास, स्वयंवरसमारंभापूर्वीचा या दोघी बहिणींचा संवाद, व पुढें **शशिकले**नें बापास आपले घरांतून घालवून दिल्यावर तिनें ताबडतोब **अश्वसेना**बरोबर **चंद्राननेकडे** पत्र पाठविलें, हे दोन प्रसंग पुरे आहेत. असो; याप्रमाणें **शशिकला** आपणाकडून **चंद्राननेस** शिकविण्यास कमी करीत नसे, तथापि **चंद्राननेच्या** स्वाभाविक प्रेमळ प्रकृतीमुळें तिच्या हातून एकादे वेळीं पुरा निष्ठुरपणा बजाविला जाणार नाहीं याचें तिला भय वाटत असे, व याकरितांच **चंद्राननेकडे अश्वसेनास** पाटवून दिलें असतांही ती त्याचे मागोमाग **चंद्राननेकडे** निघून गेली. असो. **चंद्रानना** ही **शशिकले**पेक्षां आधिक पापभीरु असे, व यामुळेंच तिचा पति जिवंत असेपर्यंत तिच्या मनांत **मरुत्सेना**विषयीं पापवासना आली नव्हती. या गोष्टीकडे लक्ष पुरवितां तिची बहीण **शशिकला** हिच्या स्वभावाची दुष्टता किती भयंकर म्हणून वर्णावी ? या दुष्टेच्या अंगीं महत्वाकांक्षा व हरएक प्रसंगीं आपलें वर्चस्व मिरविण्याची हौस हे दोन मोठे जबरदस्त दुर्गुण होते, व त्यायोगानें ती आपल्या नवऱ्यास मुळींच जुमानीत नसे; एवढेंच नव्हे, तर **मरुत्सेनरावा**चे साहसगुण व त्याचा कपटी स्वभाव हे तिच्या लक्षांत येऊन त्यांचा आपणास आपल्या इच्छेनुरूप उपयोग करून घेतां येईल अशा इराद्यानें ती निर्लज्जपणें त्याच्याशीं व्यभिचार करण्यासही तयार झाली, व एवढ्यावरच थांबतां त्याच्या हातून आपल्या पतीस ठार मारून सर्व **सिंधु**देशाची अधिस्वामिणी होण्यासही ती पहात होती. पुढें ज्या वेळीं तिनें पाहिलें कीं, ज्याप्रमाणें आपलें **मरुत्सेनरावावर** मन आहे, त्याप्रमाणें **चंद्राननेचेंही** आहे, त्या वेळीं आपला सर्व राज्यप्राप्तीच हेतु सिद्धीस जाण्यास तिजकडून अडचण येणार हें जाणून ती **चंद्राननेचें** आणि आपलें बहिणीचें नातें तेंही विसरून गेली, व तिनें तिला विष घालून ठार मारण्यासही मागें पुढें पाहिलें नाहीं. तसेंच तिच्या हातीं राज्य येण्यास तिची कनिष्ठ भगिनी **मृगांकमाला** ही युद्धाच्या तयारीनें **सिंधु**देशीं आल्याकारणानें आणखी निराळी अडचण उत्पन्न झाली होती, व ही लढाईची तयारी होण्यास खुद्द **अतिपीडराजा**चे हाल हेंच कारण झालें असून तोही लढाईचे वेळीं **मृगांकमाले**कडेच होता, एवढ्याकारणानें ती दुष्टपणानें **मरुत्सेनरावां**करवीं पितृहत्या आणि स्वसृहत्या हीं दोन्हीं ही पातकें आपल्या शिरावर घेण्यास एवढीसुद्धां डगमगली नाहीं. असो. या एवढ्या प्रकारांवरून **शशिकले**चे अंगीं दुष्टपणाची किती कमाल होती, याचा कोणासही सहज अजमास होण्याजोगा आहे, व तिच्याशीं तुलना केली असतां **चंद्रानना**ही पुष्कळच सद्गुणी होती हेंही कोणासही सहज समजणार आहे. असो. कसेंही झालें तरी या दोघींचा दुष्टपणांत कमी अधिकपणाचा मात्र

फरक, बाकी एकीस दुर्गुणी ह्मणून दुसरीस तिच्या मानानें सद्गुणी ह्मणणें ह्मणजे सद्गुण या शब्दास विटाळ करणेंच होय. हरहर! या चांडाळणींचीं कर्में किती अघोरच हीं कर्में करण्यापूर्वी त्यांनीं आपल्या पित्यावर आपलें किती प्रकारें ह्मणून प्रेम बोलून दाखविलें होतें? असो; ह्या दोघी बाहिणींचे हे दुष्ट गुण कोणीकडे, आणि त्यांचीच कनिष्ठ भगिनी **मृगांकमाला** इचे सद्गुण कोणीकडे ? वस्तुतः या दाघी बहिणी एका अंगास व दुसऱ्या अंगास **मृगांकमाला** याप्रमाणें ठेवून त्यांची तुलना करूं पहाणें ह्मणजे नरकलोक व स्वर्ग लोकयांचीच तुलना करूं पहाणें होय. बिचारी **मृगांकमाल**–अहाहा !–तिच्या सद्गुणी स्वभावाचें किती ह्मणून वर्णन करावें ? ती बिचारी जात्या अंतःकरणाची शुद्ध असून तिला कपटवर्तन व कपटभाषण यांचा मनापासून कंटाळा होता. फार तर काय, कपटभाषण करावयाचें नाहीं याकरितां ती एवढें थोरलें राज्यही गमाविण्यास सिद्ध झाली! "अक्का आणि ताई आपणावरच (बापावरच) आपलें सर्व प्रेम आहे ह्मणतात, मग त्यांना पति ते कशाला पाहिजेत?" या तिच्या भाषणावरूनच तिची सत्यप्रीति, व तिचा निष्कपट शुद्ध स्वभाव हीं किती हृदयंगमपणें व्यक्त होतात बरें? तसेंच तिचा वृद्ध पिता **उदासद्गु**र्गांतून निघाल्यावर त्याची जी दुःस्थिति झाली ती ऐकून बिचारीला किती दुःख झालें, व जरी तिला स्वभावतःच आपलें अंतर्गत दुःख बाह्यचिन्हांनीं फारसें दाखवितां येत नसे, तथापि तिनें पित्यानें आपणास केलेली अपकृति मनांतही न आणितां उदारपणें आपला अपत्यधर्म जागविला, व **अतिपंडि**राजावर प्राणांतिक दुखण्याचा प्रसंग आला असतां स्वतः त्याजवळ राहून त्यास औषधोपचार करून वरें केलें, व पुढें लढाईच्या वेळीं पराभव पावल्यावर पित्यासहवर्तमान संतोषानें तुरुंगांत राहण्यासही कबूल झाली, ह्यावरून तिच्या मनाचा मोठेपणा व पित्यावरील निष्कपट प्रेम हीं अंतःकरणास किती चटका लावणारीं आहेत!

असो. येथपर्यंत या नाटकांतील प्रधानतम अशा चार पात्रांच्या स्वभावांचें निवरण झालें. आतां बाकी राहिलेल्या पात्रांच्या संबंधानें थोडे चार शब्द लिहून हा भाग आटोपून घेऊं. **अतिपंडि**राजाच्या तीन जांवयांपैकीं थोरला ह्मणजे **खलदर्शनराव** हा स्वभावतः धीर प्रकृति, दृढनिश्चयी आणि न्यायी असे. आतां प्रथमतः त्याचा **शशिकले**शीं विवाह झाला त्यावेळीं कांहीं दिवसपर्यंत त्याचें **शशिकले**पुढें कांहीं चालत नसे ही गोष्ट खरी, परंतु त्याचें कारण त्याला त्यावेळीं **शशिकले**च्या स्वभावाची पुरी परीक्षा झाली नव्हती हें होय. **सुदर्शनराव** हा स्वभावाचा तापट, व हेंकेखोर असून त्याच्या अंगीं संभावितपणाचें लक्षण नव्हतें ह्मटलें असताही चालेल. **राजवाहानराज** हा निरपृह व सत्य गुणातें चाहणारा असा होता. मात्र त्याच्या अंगीं शौर्यगुण फारसा वसत नव्हता. **कांतिवर्मा** व **खुषमस्करया** हे निःसीम राजानिष्ठपणाची उदाहरणेंच आहेत ह्मटलें असतांही चालेल, तथापि त्या दोहोंत वास्तविक विशेष योग्यता ह्मणजे **कांतिवर्म्या**कडेच येईल. ह्या दोन्ही पात्रांचे अंगीं राजनिष्ठेचा गुण पूर्णपणें वसत असून त्यांस तोंडपुजेपणा बिलकूल आवडत नसेएवढेंच नव्हे तर त्याचें नेहमीचें वर्तन अतिशय साधें असे. **चंडवर्मा** हाही पूर्णपणें राजनिष्ठ होता तथापि तो स्वभावानें अगदींच भोळा, व हा भोळेपणाच त्याला अखेरपर्यंत नडत गेला. त्याच्या दोन पुत्रांपैकीं औरस पुत्र **मधु-**

सूचनाः—वर्गणीदारांकडून मागील वर्षासुद्धां सर्व वसूल एक महिन्याचे आंत आल्यास पुढें एका महिन्यानें मागील सर्व अंक वाचकांस एकदम मिळतील.

नव्या जाहिराती.

पत्ता.

DR. VITHAL VISHNU GOKHLE, M. A., L. M. & S.
SURGEON OCULIST,
Kandewadi Medical Hall, Bombay.

डाक्टर विठ्ठल विष्णु गोखले. एम्. ए; एल्. एम्. एन्ड् एस्.
शस्त्र व नेत्र डाक्टर,
कान्देवाडी मेडिकल हाल, मुंबई.

13

FEMALE LIFE-PRESERVING PILLS.

स्त्रियांच्या आरोग्यार्थ व आयुष्यसंरक्षणार्थ रामबाण गोळ्या.

ह्लींच्या काळांतील स्त्रियांची स्थिति वाईट होण्यास कारणें अनेक आहेत. त्यांपैकीं मुख्य हीं आहेतः—व्यायाम नसणें; शरीरसपांत्ति सुधारण्याविषयीं निःकाळजी; वाचणें व लिहिणें; शिकण्याकरितां व्यर्थ श्रम; गच्च लुगडें नेसण्याची संवय; विटाळशीपणामध्यें अथवा बाळंतपणामध्यें निःकाळजीनें वागणें; गर्भपात करणें; अतिशय, किंवा गर्भाशय दूषित असतां, किंवा अवेळीं संभोग. ह्यांपासून रोग काय कसे होतात हें सर्वांस माहीतच आहे. व त्यापासून अनर्थ निरंतर दिसून येत आहेत. लहान पोरी लांबट दिसूं लागतात. त्यांचे पाय बारीक व मान उंच दिसूं लागते. पाय चालतांना भलतेचकडे पडतात, व पायांची व डोळ्यांची आग होते. डोळ्यांला कालिमा येते व ते खोल जातात. पांढरेपणा जास्त वाढत जातो. कपाळशूळ फार उत्पन्न होतो. चित्त, घेऱ्या होऊन ओकारीपासून फार त्रास होतो. घाम व शिथिलता बहुत प्राप्त होते. पडसें खोकला त्यांस सोडीतच नाहीं ताप सर्व शरीर जाळतो. अन्न जात व पचत नाहीं. अशांत पांढरी किंवा तांबडी धुपणी सुरू होते. आणि गर्भाशय चांगल्या स्थितींत नसल्यामुळें रजोदर्शन मुळींच होत नाहीं, किंवा फार स्राव होतो, किंवा तो होते वेळेस कंबरेमध्यें व पोटामध्यें बहुत शूळ उत्पन्न होतो. अशांत गर्भधारण झाल्यास बाळंतपणामध्यें उरलेलें रक्त जाऊन बाकी रक्ताचा मांपळा. तशांत मुलाला अंगावर दूध देऊं लागतात, व हें दूध रक्तापासून येतें, ह्या

स्थितीमध्यें बाळंतरोग आपलें डोकें वर करून शरीर जाळीतच असतो. ह्या प्रकारें, रक्ताचा नाश होत असतांना रक्त उत्पन्न करणारें अन्न बंद होतें. पुढील स्थिति काय ? एकच. ऐहिक सुख एकीकडे राहून त्रास मात्र होतो व होणारें चुकत नाहीं. उगाच श्रम फुकट जातात. यांत आईचें दूषित दूध खाऊन मुलें रोगी होतात. आणि इंद्रियें स्वाधीन नसल्याकारणानें कदाचित् गर्भधारण पुन्हां होतें. पुढें जी भयंकर स्थिति होते ती सर्वांस माहीतच आहे. त्या सर्व स्थितीला बाळंतरोग म्हणतात तें खोटें आहे. खरें कारण रक्तदोष व रक्तहानि हीं आहेत. त्याला औषधें व पथ्यें वैद्य सांगतात, काढे व मात्रा देतात, व भयंकर पथ्य सांगतात, ह्यानें स्त्रिया बहुधा मरून जातात. कारण भात व हुलग्याचें सार देऊन रोग बरे करणारे ढोंगी लोक आहेत. हे पदार्थ खाऊन जिवाची माती मात्र होते. यांत पौष्टिक पदार्थ नाहीं. काढे व मात्राच देऊन रोग दूर करणारे लोकांनीं स्वहितावरच्च लक्ष देऊं नये. औषधें अन्नपचन करणारीं, व रक्त नवें आणणारीं, व ज्यामध्यें असे भयंकर ढोंगी लोकांच्या पथ्याची गरज नाहीं, अशा औषधांची फार गरज असते. जड अन्न मात्र देतां कामा नये, व तेल मात्र वर्ज असावें आणि हें खरें म्हणणारास खरें सिद्ध करण्यास बहुत लोक तयार आहेत. सारांश अविचारानें व ढोंगानें जिवाचा नाश मात्र होतो. हातगुणावर, वैद्याच्या जातीवर, कांहीं नाहीं. सर्व वनस्पतीचा गुण आहे. इतकेंच कीं, रोगाची, शरीररूप यंत्राची, व औषधिगुण क उपचार ह्यांची मात्र माहिती पाहिजे. देणारा कोणी असो. हें सर्व मनांत आणून ह्या गोळ्या तयार केल्या आहेत. अनुभव घेणें लोकांचें काम आहे. औषध म्हणजे जादू नव्हे. कांहीं दिवस घेतलें पाहिजे. ह्यापासून बाळंतरोग, धुपणी, क्षयरोग, पांडुरोग, पित्त पोट व कपाळशूळ, रजोदर्शनाच्या संबंधानें सर्व रोग, अजीर्ण, अंगाचा दाह, शक्ति कमी करणारे सर्व प्रकारचे स्राव बंद होतील. रक्तवृद्धि होऊन सर्व व्याधि दूर होतील. किंमत प्रत्येक पेटीस एक रुपया, बंगी करणावळ व टपाल खर्च ६ आणे. दिवसांतून दोन वेळ प्रत्येक वेळीं दोन गोळ्या पावशेर दुधावरोवर द्याव्या. गोळी गिळावी. चावूं नये. किंवा उगाळून रिकाम्या पोटीं औषध घेऊं नये. जेऊन द्यावें. हें औषध मुंबईंत कान्देवाडी मेडिकल हालांत तयार होतें व विकत मिळतें. 14

क्षयमृत.

वरील रोगावरच्च परंतु फारें मधुर व घेण्यास सुलभ. किं. १ रु. ट. व बं. ख. १० आणे. 15

जाहिराती.

THE INDIAN SWEET AND HEALTH-GIVING
EFFERVESCENT FRUIT SALINE.

इन्डियन मधुर व आरोग्यरक्षी वनस्पतींचें पाणी घातल्याबराबर उसळून वर येणारें क्षाररूप रसायण.

वनस्पतींचे उपयोग अनेक, व त्यांपासून जालीम औषधें बहुत होतात. आपलें रक्त स्वभावतः खारट आहे. मीठ खाणें हें क्षार अवश्य आहे, व हें घातलें असतां पदार्थ नासत नाहींत,

रोग झाला झणजे रक्त नासतें, व त्यांतील क्षारांमध्यें बिघड होतो, झणूनच कांहीं रोगांमध्यें रक्त अतिशय काळें किंवा घन अथवा पातळ होतें. ह्या औषधाचा उपयोग कोणत्या रोगांवर होतो ? ह्याचें उत्तर एक. "ज्यामध्यें रक्त बिघडतें त्या रोगांवर:—" पित्त, अजीर्ण, कपाळ व पोटशूळ शारीरिक व मानसिक श्रमांपासून अस्वस्थता, दमून आल्यावर संताप, अतिशय जाग्रण व जड अन्न सेवन, मस्तकाची जडता, हवेमध्यें बिघड व अतिशय उष्म्यानें येणारी सकाळीं झांपड; लाल, दुःख देणारी व धातुमिश्र लघवी; परमा, तोंडाचा कडूपणा व कोरड; भोजनानंतर ढेंकरा, उचकी, ओकणें, पोटफुगी; मस्तक, नेत्रे व तळव्यांची तप्तता; किरीम, नळाचा उपद्रव, कावीळ, कौलू, मूळव्याध, सततप्रवास व वाईट हवा व पाण्यामुळें येणारे ताप, जलद प्रसरणारे रोग (महामारी, ताप, अतिसार इ.); कोटा साफ नसणें, अति तृषा व शारीरिक आग, खरूज, कंडू, होंव, मरवयांत स्वप्नावस्था, मुलांचीं मोठीं पोटें, डबा, स्त्रियांची कंबरदुखी व धुपणी, दुःखदायक स्राव, केंपरें, ओकारी, अपस्मार, स्थूलशरीर, पोटाची जाड कातडी, जीर्ण-ज्वर, संधिगतेराग, मूत्र व उत्पत्तीन्द्रियें वाईट कृत्यांनीं बिघडून लघवी साफ न होणें, आम्लपित्त, गुरगुरणें, अग्निमांद्य व चक्कर.—रक्त साफ राहील, अन्न बराबर जिरेल, काम करण्यास उमेद येईल, मनास उत्साह होईल. असे गुण कशावरून ? शेळीचें दूध उत्तम कां झटलें आहे ? कारण ती खात नाहीं अशी वनस्पति नाहीं. ह्यामध्यें अशाच वनस्पति घालून हें तयार केलें आहे. हे औषध ज्यास गुणावह नाहीं त्यास विलायती उत्तम पाण्याशिवाय दुसरें औषध आल् राईट् करणार नाहीं. कान्देवाडी मेडिकल हालांत विकत मिळेल. कि. १ रु. वंगी करणावळ २ आणे. माहितीचा कागद आंत आहे. प्रत्येक पेटींत अर्धा रत्तल औषध घातलें आहे.

NERVOUS EXHAUSTION AND DEBILITY NO MORE ! ! !

PEARL COATED COMPOUND PHOSPHORUS PILLS.

CONTAINING PHOSPHORUS, QUININE, STRYCHNIŒ IRON.

धातुरक्तकामोत्पादक, वीर्यस्तंभक, धातुपौष्टिक, शक्तिशरीरमनो-त्साहवर्धक, मिश्रफास्फरसाच्या मौक्तिकरससुशोभित उत्तम खातरीच्या गोळ्या.

सर्व धान्यें एकाच जमिनींत कां चांगलीं होत नाहींत ? कारण जमिनीमधील व पुढें होणाऱ्या धान्यामधील द्रव्यें सारखीं असलीं पाहिजेत, कारण धान्याचें पोषण बगर जमिनीवर अवलंबून आहे.—खालील रोगाच्या उत्पत्तीचीं काय कारणें आहेत ? मज्जाकंद अगर मेंदु, व रक्त व पाचनशक्ति हीं बिघडतात.—मज्जाकंदामध्यें मुख्य काय आहे ? फास्फरस, रक्तामध्यें लोह.—पाचनशक्तीवर खस्ताद कोणतीं औषधें आज उत्तम अशीं टरलीं आहेत? बाकीचीं दोन जीं वर लिहिलीं तीं. तर जसे चार आणि चार नऊ कधीं व्हावयाचे नाहींत, त्याप्रमाणें असे गुण ह्या औषधाशिवाय यावयाचे नाहींत. कोणीं गुण व नांव उलटीं करून गोळ्या प्रसिद्ध केल्या आहेत. तर त्या फास्फरसच्या नाहींत. तो आंत घालणें व राखणें फार कठीण आहे आमची सही हीच खऱ्या गोळ्यांची खूण. आज तीन वर्षांत १३४ उमत्त विद्वान लोकांकडून सर्टिफिकिटें मिळालीं.

तर खऱ्या गोळ्यांच्या गुणांविषयीं संशय बाळगणें, म्हणजे दूध काळें आहे ह्या म्हणण्याप्रमाणें आहे. असो.–त्याचे गुण काय आहेत ? मेंदूची शक्ति वाढवितें. अतिशयित स्त्रीसंभोगापासून मेंदूस झालेली किंवा शरीरांत येणारी क्षीणता दूर करितें.स्वप्नावस्था दूर होते. निरंतर धातुस्रवणानें हलकें डोकें बरें होतें. स्त्रीमनन वारंवार करून किंवा त्यांच्या दर्शनानें कितीएक लोकांस होणारा स्राव अथवा धातुपतनामुळें जी शरीराची खरावी होते ती एकदम जाते. अतिशयित दारूसेवनामुळें अथवा ऐहिक कोणत्या प्रकारच्या काळजीनें अगर फार दिवसांच्या व्याधीनें किंवा अतिशयित अध्ययन किंवा मानसिक कामकाजानें येणाऱ्या क्षीणतेवर हें औषध रामबाण आहे. न समजतां धातु जाते त्यावर ह्या औषधासारखें दुसरें औषधं कोणतेंही नाहीं. चेतना नस-ल्यास ह्याशिवाय दुसऱ्या औषधाची गरज नाहीं. ह्यानें क्षुधा वाढते, बुद्धि व स्मरणशक्ति तीव्र होते. स्नायुशक्ति वाढून संभोगेच्छा होते. क्षय; धातुक्षय, फार दिवसांचें अजीर्ण, व पोटदुखी, मस्तकशूळ, कौलु, पंडु, नपुंसकत्व, व मेंदू व त्वचागत सर्व व्याधींवर हें प्रशस्त आहे. वयांत आलेल्या मुलांकडून अज्ञानामुळें ज्या कांहीं सृष्टिमार्गाविरुद्ध गोष्टी होतात, त्यांमुळें अथवा अभ्यासामुळें आलेली क्षीणता दूर होते. धातु पातळ झाली असल्यास अगर लघवीबराबर जात असल्यास, चेतना नष्ट झाल्यास, वीर्यपात केल्यानें इंद्रियाच्या शिथिलतेवर, स्वप्नावस्था व स्पर्श होतांच धातु जात असल्यास किंवा गांठी-सारखी जात असल्यास, धातुविकारावर, धातुस्थानी कडकीवर, व धातुस्थान बिघडलें असल्यास, अंगांत कडकीवर, डोकें हलकें झाल्यास, अतिशय घाम येण्यावर, अंगास विरविर व मुंग्या येण्यावर, लघवी तांबडी व धातुमिश्र व शक्ति कमी होत असल्यास, व केश पांढरे होत असल्यास, ह्यासारखें उत्तम औषध दुसरें नाहीं. वीर्यस्तंभन होतें, व घट्ट होतें, धातु बंद होते, अन्न पचतें, संभोगेच्छा होऊन रतिसुख चांगलें होतें. बुद्धि व स्मरणशक्ति ज्यावर अवलंबून आहे, म्हणजे मेंदू व मज्जा तंतूस तरतरी येते, क्षीणता पळते, शरीरास समाधान वाटतें. व जे अवेळीं डोळे खोल जाऊन क्षीण होऊन वृद्ध दिसावयास लागतात, त्यांस भरयौवन तेव्हांच आणितें, अस्थि बळकट होऊन स्नायु जोरदार होतात, रक्त बराबर फिरतें, डोळ्याची आग जाते व शरीरसौख्य होतें. श्रम जातो. काम करण्यास उल्हास वाटतो. अनुभवाशिवाय गुण कळणें कठीण आहे.

असे गुण कशावरून आहेत असा प्रश्न सहज होतो, तर अनुभव द्यावा म्हणजे समजेल. अगर चमत्कार ह्याप्रमाणें पहाः–दरवाजे व खिडक्या बंद करून रात्रीं अगर दिवसा खोलीमध्यें अंधेर पाडावा. एक गोळी फोडावी, उत्तम तेज दृष्टीस पडेल. पुन्हां तीच बहुत वेळीं फोडल्यास त्याप्रमाणें दिसेल. हेंच तेज सर्व गुणाचें कारण होय. हा चमत्कार प्रत्येकानें पहावा. भोजनानंतर एक गोळी सकाळीं, व एक संध्याकाळीं द्यावी. पाण्याचा किंवा दुधाचा घोंट द्यावा. गोळी गिळावी. चावूं नये. दर बाटलीस किंमत १४ आणे; व १ पासून ४ वाटल्यांपर्यंत बंगी व पोष्ट खर्च ६ आणे. पैसे भागाऊ 'कांदेवाडी मेडिकल हाल' येथें पाचल्यास औषध मिळेल.

अवश्य अनुभव द्या ! ! ! एकदांच घेऊन खात्री ! ! !
CHILDREN'S ELIXIR.

बालामृत.

[झाडास ज्याप्रमाणें वाढवावें त्याप्रमाणें तें वाढतें.]

हें औषध एतद्देशीय अनेक वनस्पती मिश्र करून केलें आहे. ह्यापासून मुलांस जंताचा उपद्रव कधींही होत नाहीं. अन्न पचन होऊन वारंवार दूध ओकणें बंद होतें. आईच्या दुधाच्या कमताईमुळें किंवा तें मुळींच न मिळाल्यामुळें होणारी क्षीणता व पांढुरकी ह्यांवर हें औषध जालिम आहे. गाईच्या दुधावर वाढविलेल्या मुलांस होणारे सर्व रोग ह्यानें दूर होतात. गर्भाशयांत मुलें असतां ह्मणजे गरोदरपणामध्यें अंगांत रक्ताची कमताई असल्यामुळें अगर पुढें अंगावर दूध न मिळाल्यामुळें मुलाच्या अस्थि कांडयांप्रमाणें होतात त्यांस बळकटी आणणें व ज्यांचीं पोटें फार मोठीं होतात व तीं फार खातात व हगतात व हळुहळु क्षीण होतात ह्यावर हें अद्वितीय आहे. खोकला, गळ्यामध्यें घरघर आवाज, कॅपरें, आकडी, पांढरी हग, आंव, अतिसार ह्या रोगांचा हें दिलें असतां संभवसुद्धां रहात नाहीं. पाय लटके पडल्यास हें औषध देऊन अवश्य पहावें. दमा, माती खाण्याची संवय, खरूज, कंडू, डोकींतील फोड, लागलेच दूर होतील. शौचास नियमानें होऊन सर्व इंद्रियें बराबर राहतील ह्मणूनच ह्यास बालामृत असें नांव दिलें आहे. दर बाटलीस किंमत रुपया एक. बंगी खर्च आठ आणे. घेण्यास मधुर असल्याकारणानें मुलें पाहिजे तितकें घेतील. माहितीचा कागद आंत आहे.

नवीन पुस्तक.

उदारदामोदर नाटक.—यांत प्रसिद्ध **मंगळवेढ**चे ठाणेदार भगवद्भक्त **दामाजीपंत**, ज्यांनीं त्यांचे वेळीं पडलेल्या दुष्काळाचे प्रसंगीं सरकारी धान्य लुटवून गरीबांचें रक्षण केलें, त्यांचें चरित्र नाटकरूपानें वर्णिलें आहे. यांतील प्रवेशरचना आधुनिक नाटकवाल्यांच्या नाटकांतील प्रवेशरचनेहून सर्वस्वीं भिन्न असून यांत **दामाजीपंता**ची भक्ति, वैराग्य, दयालुता, औदार्य इत्यादि गुणाचे सविस्तर निरूपणार्थ नवीन अनेक प्रसंग कल्पून चमत्कारिक संवाद दाखल केले आहेत. तसेच **दामाजीपंतां**चा हितशत्रु **मुजुमदार** ह्याच्या शत्रुत्वासंबंधानें कांहीं विशेष प्रकार शोधाअंतीं कळला, तोही यांत सामील केला आहे. हें पुस्तक टाइपांवर छापिलें असून ह्याचीं डेमी द्वादशपत्री सांच्याचीं २५० वर पृष्ठें आहेत. किंमत १। रु. ट. हं. ८—.

सीताराम बाबाजी गुर्जर
9 जी. आय्. पी. रेल्वे आडिट आफिस अ० फणसवाडी, जगन्नाथाची चाळ, मुंबई.

अश्वधाटीप्रबोधिका:—जगन्नाथपंडितकृत अश्वधाटी वृत्तांत अनुप्रासमय लहानसें पदशेपर काव्य आहे. ह्यांत मूळ श्लोक व खालीं त्यांची साकीछंदोबद्ध महाराष्ट्र टीका दिली आहे. किंमत ८=॥ ट. हं. ८॥. **सीताराम बाबाजी गुर्जर.**
10 जी. आय्. पी. रेल्वे आडिट आफिस अ० फणसवाडी, जगन्नाथाची चाळ, मुंबई.

लघुलेखनपद्धति,

किंवा

अति त्वरेनें मराठी भाषणें लिहिण्याची युक्ति.

वक्त्यांची भाषणें तात्काल सांद्यंत लिहितां यावीं अशा लिपीची आमच्या भाषेंत सांप्रत फारच जरूरी आहे असें जाणून मोठ्या परिश्रमानें ही लिपि तयार केली आहे. हिच्या योगानें वक्त्यांचीं भाषणें सांद्यंत उतरून घेतां येतात, व हिचा अभ्यास स्वतः करतां येईल. हिची पूर्णता व साध्यता पुणें वक्तृत्वोत्तेजक मंडळीकडून जें या सालीं पूर्ण वक्षीस मिळालें त्यावरून लोकविश्रुत आहेच. ह्या लिपीची रचना करणें किती महत्त्वाचें व श्रमाच काम आहे, याचा विचार करून, व अशा प्रकारचीं लोकहिताचीं कामें केवळ लोकाश्रयावरच अवलंबून असतात हेंही लक्षांत आणून, अस्मदेशीय राजेरजवाडे, संस्थानिक, व जहागिर, तसेंच इतर लोक आपला उदार आश्रय देतील अशी आशा आहे.

हें पुस्तक येत्या जानेवारीच्या सुमारास छापून तयार होईल. पुस्तकाची किंमत ता ३० जानेवारी सन १८८१ पावेतों अगाऊ आठ आणे, व मागाहून किंमत बारा आणे. शिवाय ट. हं. एक आणा.

गजानन भाऊ वैद्य.

मुंबई, लव्हारचाळसमोर परभू लैनींत घर नंबर २४. 11

अपूर्व तर्ककौशल्य.

नवीन शोध ! नवीन शोध ! !

धि सेन्टीफोलिओ.

अथवा

एका मूळ प्रतीवरून थोडयाच वेळांत व स्वरेनें कापिइंग प्रेसांत दाबल्याशिवाय १०० प्रती काढून घेतां येण्याचा अति स्वस्त सांचा.

—()—

डाक्तर, वकील, मुत्सद्दी, सावकार, सराफ व इतर सर्व लोकांस उपयोगी पडणारें उपयुक्त व स्वल्प साधन.

—o—

एका फ्रेंच पालिश केलेल्या लांकडाच्या उथळ पेटीत एक जस्ताची उथळ पेटी असून तींत मऊ लवचिक मिश्रणाचा एक पदार्थ आहे. आणि ह्या सांच्यासोबत रसायन क्रियेनें तयार केलेली एका प्रकारची शाई मिळते. त्या शाईनें कोणत्याही कोऱ्या कागदावर पाहिजे तो लेख किंवा चित्र लिहून तें सुकल्यावर तो कागद लिहिलेल्या बाजूनें सांच्यांतील पदार्थावर टाकावा, आणि वरील कोऱ्या बाजूवर तळहात हळू हळू फिरवून तो कागद १ मिनिटपर्यंत त्या सांच्यावर तसाच राहूं द्यावा. नंतर त्या कागदाचा एक कोंपरा बोटांत धरून हळू काढावा. ह्मणजे पूर्वी कागदावर सदरील लेखाच्या नकला घेणें असतील ते कागद

एकामागून एक सांच्यावर उठलेल्या लेखावर टाकून पूर्ववत तळहातानें हळू चोळून उचलेत जावें. ह्मणजे त्या कागदावर तो लेख उठत जाईल. याप्रमाणें ५० पासून ७५ पर्यंत चांगल्या प्रती उठतात, अशा रीतीनें पाहिजे तितक्या प्रती काढल्यावर सांच्यावरील लेख पाण्यांत भिजविलेल्या स्पंजानें पुसून टाकावा. ह्मणजे तोच सांचा दुसरें काम चालविण्यास उपयोगीं पडतो.

ह्या सांच्यावर इतर प्रेसाप्रमाणें प्रत्येक प्रतीचे वेळीं शाई लावण्याची मुळींच गरज पडत नाहीं. मूळ प्रतीवर लिहिलेला लेख सांच्यावर उठतो त्यावरच ५०।७५ प्रती निघतात. पुन्हां शाई लावण्याचें अगत्य नाहीं. तसेंच यास कापिइंग प्रेसाप्रमाणें दाबण्याच्या प्रेसाचीही जरूरी नसून हा सांचा पाहिजे तेथें कांखेंत घेऊन जाण्याजोगा असून तो लहान मूल देखील चालवूं शकेल.

हा सांचा खासगी पत्रव्यवहार व हरएक प्रकारचें गुप्त व जोखमी लिहिण्याचें काम अनेक प्रतींनिशीं चालविण्यास फारच सुलभ व अत्यंत उपयोगाचा आहे. याकरितां याचा प्रत्येक मनुष्यानें अवश्य संग्रह करावा.

सांच्याचे दर.

(शाईची १ बाटली व स्पंज यांसहित)

प्रत	सांचा	किंमत रु.	बंगीखर्च रु. आ. पै.
१	मोठ्या अष्टपत्री सांच्याचा	१०	१
२	मोठ्या चतुष्पत्री सांच्याचा	२०	१—४
३	मोठा फुल्सक्याप सांच्याचा	२५	१—८
४	मोठा डबल फुल्सक्याप सांच्याचा	३५	२
	शाईच्या एका बाटलीची किंमत	१	०—५

याखेरीज पाहिजे तितकें मोठे सांचे तयार करून देण्यांत येतील व त्या मानानें त्यांची किंमत घेतली जाईल.

हे सांचे व शाई '**हुन्नरसंग्रह आफिसांत**' विक्रीस तयार आहेत. त्यांच्या किंमतीबद्दल पैसा मनी आर्डर करून खालीं सही करणाराकडे पाठविल्यास सांचे रवाना करण्यांत येतील. याविषयीं अधिक माहितीचा कागद सांच्याबरोबर पाठविला जाईल.

गोविंद मोरोबा कार्लेकर.

हुन्नरसंग्रह कर्ते.

4

उपयुक्त सूचना.

व्यवहारोपयोगी हुन्नरसंग्रह

(मासिकपुस्तक.)

चालू वर्षाच्या आगष्ट महिन्यापासून आह्मीं सदर्हू पुस्तक काढण्याची सुरवात केली आहे, त्यांत ह्या देशांत व परदेशांत चालणारे अनेक प्रकारचे धंदे, रोजगार, विद्या व

कळाकौशल्यें यासंबंधी अनेक प्रकारच्या युक्ति, कल्पना व हुन्नर यांचा संग्रह होत असतो.

ह्यांत बागाईत व शेती, सुगंधी व आतारी, रंगारी, वैद्यकी, पाकशास्त्र, कुंभारकाम, कांचकाम, दारूकाम इत्यादि कामांसंबंधी अनेक प्रकारचे उपयुक्त पदार्थ करण्याच्या कृति, कोणत्याही पदार्थावरील सर्व प्रकारचे डाग काढण्याच्या युक्ति, उपद्रवकारक प्राण्यांचा नाश करण्याचे उपाय; लवकर नासणारे पदार्थ पुष्कळ दिवस जसेच्या तसे ठेवण्याच्या युक्ति; कोणत्याहि पदार्थावर पाहिजे त्या धातूचा मुलामा चढविण्याच्या कृति; फुटलेले पदार्थ सांधण्याकरितां लुकणें, सुगंधी व औषधोपयोगी तेलें व अर्क; अनेक प्रकारच्या साध्या व रंगीत शाई, आगकाड्या, साबू, मेणबत्त्या, लाख, वार्निशें, सरबतें, हूपपावडर्स, मिल्करोझिस, कोल्डक्रीम्स, प्यामेटम्स, फ्रेंचपालिश, टिंक्चर्स, एशन्स, आसिड्स कोल्डवाटर्स इत्यादि सर्वोपयोगी उपयुक्त पदार्थ करण्याच्या कृति, आणि सांकेतिक भाषा, कूटगणित, कूटकविता, कूटप्रश्न आणि अंकचत्कार यांचा संग्रह होत जाईल.

याची किंमत अगाऊ एक वर्षाची २ रुपये व टपालखर्च ६ आणे; किंमत पाठविणें ती मनीआर्डर करून पुस्तककर्त्याकडे खालीं लिहिलेल्या ठिकाणीं पाठवावी. प्रत्येक अंक डेमी अष्टपत्री २० पृष्ठांचा निघतो. आगाऊ वर्गणी आल्याखेरीज पुस्तक सुरू केलें जाणार नाहीं. ता. ८ आगष्ट सन १८८० इसवी.

गोविंद मोरोबा कार्लेकर.
हुन्नरसंग्रहकर्ते.

2 **पत्ता.**—नळावर पंचमुखी मारुतीची गल्ली, घर नंबर २६ मुंबई.

शालोपयोगी व इतर पुस्तकें.

अंकगणित (मराठी ५ व्या इयत्तेपर्यंत).—कापडानें बांधलेलें कि. ।= आणे; प्याकिंग व ट. ख. ८—॥

मोडी वाचनसार भाग १ ला व २ रा—दर भागास किं. ८≡ व प्याकिंग व ट. ख ८—

हावर्डच्या इं. १ ल्या पुस्तकांतील मराठींत उच्चारार्थासहित शब्दसंग्रह—(इंग्रजी व्याकरणांतील व अंकगणितांतील मुख्य शब्द, संख्या, त्यांचीं स्थान व कोष्टकं यांसहित) किं. ८—॥ व प्याकिं. व ट. ख. ८—

हावर्डच्या इं. २ ऱ्या पुस्तकांतील मराठींत उच्चारार्थासहितशब्दसंग्रह—(इंग्रजी भूगोलांतील व अंकगणितांतील मुख्य शब्द यांसहित) किं. ८=॥ व प्याकिं. व ट. ख. ८—.

भूगोलाच्या व्याख्या, मराठी १ ल्या व २ ऱ्या पुस्तकांतील कठिण शब्दांचा अर्थ व कवितांचा अन्वययुक्त अर्थ-किं. ८—॥। व प्याकिं. व ट. ख. ८—

एशिया व यूरोपखंडाचें संक्षिप्त वर्णन किं. ८— प्याकिंग व ट. ख. ८॥-

आरतीसंग्रह सुधारून वाढविलेली आवृत्ति दुसरी. किं. १ रुपया व ट. आणि प्याकिं. ख. ८=

पुस्तकें मुंबईंत खालीं सही करणाराकडे मिळतील. जास्त प्रती घेण्यांत ट. ख. त फायदा आहे.

वासुदेव मोरेश्वर पोतदार.
स्कूलमास्तर गिरगांव प्रायव्हेट स्कूल मुंबई.
ठिकाणा कांदेवाडी शांतारामची चाळ नंबर ४२.

रा. रा. गोपाळराव नारायण आकोलकर ३
" रावजी बाळाजी कुरंदीकर ६–१२
" रामचंद्र कृष्णराव लाड ३
" भिकाजी बळवंत ३– ६
" विठ्ठल विष्णु पुराणिक ३– ६
सौ. रंगुबाई थत्ते ३– ७–६
मि. सांम्युएल सालोमन ३– ६
सेक्रेटरी देवरुख लायब्ररी ३– ४

बक्षीस ५०० रुपये.

सूत काढण्याचें यंत्र तयार करण्याबद्दल.

आमच्या देशांत कापूस पुष्कळ ठिकाणीं पिकतो, व रहाटावर कातलेल्या सुताचा अद्यापि खपही पुष्कळ होत असल्यामुळें रहाटावर सूत काढण्याचा उद्योग अनेक ठिकाणीं मोठा चालत आहे. अशा स्थितींत आमच्या सूत काढण्याच्या रीतीमध्यें सुधारणा झाली तर गरीब व उद्योगी मनुष्याच्या अधिक उपयोगीं पडण्याचा संभव आहे, तो साध्य व्हावा ह्या हेतूनें सूत काढण्याचें यंत्र तयार करण्याबद्दल ही नोटिस प्रसिद्ध केली आहे. यंत्रांत गुण असावे ते– १. सूत कातण्याच्या यंत्रांत किंवा निराळ्या तऱ्हेनें कापूस साफ करण्याची योजना असावी. २. हल्लीं आमच्या रहाटावर एका मनुष्याच्या हातून सुताची एकच तार निघते त्या ठिकाणीं निदान पांच तारा तरी निघून कामही पांचपट निघावें. ३. यंत्रावर निघणारें सूत एकसारखें असून निदान खादीच्या सुताइतकें तरी बारीक असावें. त्याहून जाड असूं नये. ४. सदर्हू यंत्र मजबूत व सुटसुटीत असून त्याजवर काम अखंड व बिनहरकत चाललें पाहिजे. हें यंत्र नमुन्यादाखल नसून त्याजवर प्रत्यक्ष कामच झालें पाहिजे.

ता. १५ माहे मे सन १८८१ इसवीचे आंत वर लिहिल्याप्रमाणें काम करण्यालायक जर कोणी सूत काढण्याचीं यंत्रें आह्मांकडे तयार करून आणतील, तर त्या सर्वांची जाणत्या लोकांच्या साह्यानें परीक्षा करण्यांत येईल, आणि त्यांमध्यें जें पसंत ठरेल त्या यंत्राचे कर्त्यास (५०० पांचशें रुपये बक्षीस देण्यांत येतील. जें यंत्र पसंत ठरेल त्या मासल्याचीं एकापासून पंचवीसपर्यंत यंत्रें आहीं मागितल्यास योग्य किंमत घेऊन यंत्रकारानें तितकीं तयार करून दिलीं पाहिजेत, व तीं कामास लावल्यावर चार महिन्यांत कांहीं बिघडल्यास दुरुस्त करून देण्याची जबाबदारी पत्करली पाहिजे. यंत्रें तयार करण्याचा जे कोणी यत्न करूं लागतील त्यांनीं नोटिशीचे तारखेपासून दोन महिन्यांचे आंत आह्मांस लेखी सूचना द्यावी.

याविषयीं कोणास कांहीं जास्त खुलासा पाहिजे असल्यास त्यांनीं खालीं सह्या करणारांपैकीं हत्तीबेळगळकर यांस पुण्यांत शुक्रवार पेठेंत त्यांचे घरीं समक्ष येऊन भेटावें, किंवा पोस्टपेड पत्र लिहून विचारावें, म्हणजे कळविण्यांत येईल. मु. पुणें ता. ९ डिसेंबर १८८०.

श्रीनिवास शेषो हत्ती बेळगलकर.
महादेव गोविंद रानडे.

नाट्यकथार्णव.

प्रस्तुतकालीं 'नाव्हल्स' व 'नाटकें' यांचे संबंधानें जो लोकांचा भ्रांतिमूलक समज झाला आहे त्याचा निरास होऊन, या अत्यंत अनुपम मनोरंजनसाधनाचें वास्तविक स्वरूप व त्याची वास्तविक योग्यता हीं त्यांचे मनांत पूर्णपणें ठसावींत, व तेणेंकरून सदभिरुचि जागृत होऊन काव्यामृतरसास्वादाविषयीं त्यांच्या अंतःकरणाची साहजिक प्रवृत्ति व्हावी; या पुस्तकाचा मुख्य उद्देश असून, यांत संस्कृत व इंग्लिश या भाषांत रचलेल्या उत्तम उत्तम नाट्यकथादिक ग्रंथांच्या आधारें आपल्या महाराष्ट्र वाणीस जुळतील अशा प्रकारचीं अनेक 'नाव्हल्स' व 'नाटकें' यांचा संग्रह यथावकाश होणार आहे. व प्रसंगविशेषीं स्वकपोलकल्पित सदुपदेशपर कथानकें व नीतिवादाचे चुटके यांचाही समावेश होईल. या पुस्तकांत अश्लीलता नीतिभंगादि दोष न येऊं देतां हें पुस्तक सर्व सभ्य व कुलीन स्त्रियांस वाचण्याजोगें करण्यांत येईल. या पुस्तकाच्या वर्गणीचे दर खालीं लिहिल्याप्रमाणें ठेविले आहेत.–अगाऊ वर्षास ३ रु., मागाहून वर्षास रु. ४८८, व किरकोळ दर ग्रतीस ८६. शिवाय टपाल हंशील वर्षाचें अगाऊ ८६.

अगाऊ वर्गणी पुस्तक घेतल्यापासून दोन महिन्यांच्या आंत भरली पाहिजे. पोस्टाचीं तिकिटें पाठविणें झाल्यास अर्ध्या आण्याचीं असावीं, व रुपयास अर्धा आणा याप्रमाणें वसूल पाठवावा

या पुस्तकांत नियमितपणें येणाऱ्या मजकुराशिवाय हरएक प्रकारच्या लोकोपयोगी जाहिराती निराळ्या छापून पुस्तकास जोडण्याचा विचार केला आहे. नियमित मजकुराचें ज्यामध्यें प्रत्येक पृष्ठांवर दोन रकाने (कालम) करण्यांत येणार नाहींत, त्यामध्यें जाहिरातीचें दोन रकाने करण्यांत येणार नाहींत. जाहिरातीचे दर पुढें लिहिल्याप्रमाणें माफक ठेवण्यांत आले आहेत:–

	रु.	आ.
चार ओळींचे आंत	१	०
पुढें प्रत्येक ओळीस	०	४

दुसरे खेपेस प्रत्येक ओळीस ८३ आणे व तिसरीपासून प्रत्येक ओळीस ० २ मुदतीच्या जाहिराती मक्त्यानें घेतल्या जातील.

भाषांतर करणें असल्यास पहिल्या खेपेस दर ओळीस ० ४

कांदेवाडी, मुंबई.

शंकर मोरो रानडे बी. ए.
नाट्यकथार्णवाचे कर्ते व मालक.

॥ श्री ॥

नाट्यकथार्णव.

त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते ।
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधा ह्येकं समाराधनम् ॥
मालविकाग्निमित्रे श्रीकालिदासः
स्फुरत्कलालापविलासकोमला करोति रागं हृदि कौतुकाधिकम् ।
रसेन शून्यां स्वयमभ्युपागता कथा जनस्याभिनवा वधूरिव ॥
कादंबर्यां बाणः

पुस्तक २. आश्विन शुद्ध १ शके १८०२. अंक ७.

NÁṬYA-KATHÁRNAVA,

A MONTHLY MAGAZINE

Comprising a series of Marathi Dramas, Novels &c. &c.

विषय. **अनुक्रमणिका.** पृष्ठ.

अनुतापशमन नाटक .. .. ..

वर्गणीची पॉंच.

	रु.	आ.
रा. ब. माधवराव गोविंद रानडे	३	
,, विष्णु मोरेश्वर भिडे	३	६
,, गोपाळराव हरी देशमुख	३	
रा. सा. गोविंद सखाराम कठापुरकर	६	३
प्रो. रामकृष्ण गोपाळ भांडारकर	३	
डा. मोरेश्वर गोपाळ देशमुख	६	
रा. रा. विनायक चिंतामण जोगळेकर	१३	८
,, भाऊ दिनकर सरंजामे	१	८
,, नारायण भिकाजी परांजपे	६	३
,, बाळाजी शिताराम कोटारे	३	
,, गोविंदराव केशवजी	२	
,, पुरणसिंग गंगासिंग	३	६
,, सदाशिव विश्वनाथ धुरंधर	३	
,, भाऊ मोरोबा	२	८
,, नारायण विष्णु धाक्रस	३	६
,, भाऊ कृष्णा	३	
,, दामोदर रघुनाथ टाकूर	३	
,, बाबू शामशेट पांवसकर	२	८
,, यशवंत वासुदेव आठल्ये	३	
,, कृष्णाजी लक्ष्मण दातार	३	
,, बापुजी जगन्नाथजी	३	
,, विनायक पुतोबा कीर्तीकर	३	
,, बळवंत काशीनाथ अग्निहोत्री	३	६
,, राजाराम रामकृष्ण भागवत	३	
,, हरी अनंत वऱ्हाडकर	३	
,, वसंतराव मोरोजी	३	
,, पांडुरंग रामनाथ खोटे	३	
,, विनायक रामचंद्रजी	३	
,, बाबाजी लक्ष्मण वेलिणकर	३	
,, रामचंद्र भगवंत, निफाड	३	६
,, रामचंद्र भास्कर मंत्री	३	

मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे.

अद्भुतशमन नाटक.

अंक १.

प्र० १–तिरसगड.–कचेरींचीं जागा.

(गोविंदपंत कारकून हिशेबाची वही घेऊन बसले आहेत. बाजूला समई जळत आहे.)

गोविंद०–हातचे आले सात. सात न् सात चोदा, चौदा न् तीन सतरा. सतरा–सतरा–सतरा–सतरा– – – –सतरा न् तीन वीस, विसांशीं पूज्य.–हातचे आले दोन. दोन न् चार सहा, सहा–सहा–सहा सहा– – – न् तीन नऊ. नऊ–नऊ–नऊ–नऊ न् एक दहा, दहाचे दहा. दहा हजार तेवीस रुपये पावणे पंधरा आणे. यांतून वजा किती–ते सातशें न् हे सत्तावीसशें दीड आणा–बाकी राहिले–दोन न् एक तीन रेघांशीं तीन् रेघा, एक न् एक दोन, तिहींच्या तीन रेघा, तेवीसांचे तेवीस, चार न् सहा दहा, एक न् तीन चार न् सहा दहा–सहा हजार सहाशें तेवीस रुपये सव्वा तेरा आणे !–काय ? **कोंडपूर, बुरडुक** आणखी **धापडी** तीन गांव मिळून इतका वसूल तुटला म्हणायचा ! भलतेंच–थांबा–फिरून पाहूं या!–अरे होयच. छे–बोवा! या वर्षीं या दुमाल्याची कांहीं धडगत दिसत नाहीं! नुकतीच केव्हांशी याद केली होती, तेव्हां किती (वहीचीं पानें चाळवीत) सत्यांयशी हजार रुपये बारा आण्यांचा वसूल थकला होता ! म्हणजे एकंदर किती थकला बरें? सत्यांयशी न् सहा त्र्याण्णव–अबब !–त्र्यांणव चौऱ्यांणव हजार–जवळ जवळ एक लाख रुपयांची खूट अडीच वर्षांत! आश्चर्य आहे ! दरवडेखोरांच्या भयानें गांवचे गांव पटापट उठूं लागून **सातपुड्याच्या** पार जाऊं लागले आहेत !–आमच्या या प्रांतांत म्हटलें म्हणजे पर्जन्याची आप्ती कधीं तीन पिढ्यांत देखील ऐकली नाहीं, असें असतां आलीकडे तीन वर्षें सर्वच बस्तान बिनसून गेलें आहे ! काय असेल तें असो ! आमच्या दुमालदारांचें लक्ष आलीकडे कामकाजाकडे कसें तें लागत नाहीं ! न् तीन तीन चार चार माहिन्यांत कचेरींत दर्शन देखील घडत नाहीं! अशानें कामाचा निभाव कसा लागेल तो लागो! काम तर तीन सालचें तुंबलें आहे! **सखारामपंत** तर सत्तावीस हजारांचा डल्ला मारून काळें करून गेला त्याची अजून खटराक चाललीच आहे ! **धुमाजी** नाइकांना यजमानांच्या कानांवर हकीकत घाला म्हणून सांगितलें तर तेही अळंटळंच करितात! तेव्हां आतां आपण होऊनच यजमानांना सांगावें एवढाच उपाय राहिला आहे. (इतक्यांत अर्जुना आंत येतो त्यास) कसें काय रे बोवा ? कालच्या गोष्टीचें कसें काय ?

अर्जु०–त्यें कांहीं इचारायची सोय न्हाई ! अक्शी वंगाळ !

गोविं०–म्हणजे ? तूं तें काय आहे म्हणतोस ?

अर्जु०–त्ये मालकी हतं म्वाटच्यानं न्हाईं सांगाया येत ! कुनी परानी ऐकल, तर भलतंच. व्हईल!–पायजे तर तुमच्या कानांमंदी सांगतों (त्याच्या कानांत सांगतो.)

गोविं०—(आश्चर्यानें)काय !काय ह्मणतोस?—अशी गोष्ट कशी होईल !—तुला वेड बीड तर लागलें नाहीं !

अर्जु०—त्यें तुमी लागल त्ये ह्मना, पन—पन—कांइ भुताटकी सल तर ठावी न्हाय,—पन ह्ये कानांनीं म्यां त्यो सबूद खचित खचित वलाकला !

गोविं०—हें मोंठेच आश्चर्य ! ही खचित कांहीं तरी भुताटकी असेल !—पण कुणीं ह्मणावें? माणसें वयांत आल्यावर त्यांचा कुणीं नेम सांगावा ?

अर्जु०—मीबी असंच ह्मंगतों. येत साल तर चल भाईर संगातच जाऊं, ह्मजी तुमास्नीबी ऐकाया गावल !

गोविं०—बेर चल बोवा, ह्याचा निकाल आ-त्तांच्या आत्तां झाला पाहिजे. ही गोष्ट दमावर टाकतां उपयोगी नाहीं !—चल.

(दप्तर आटपतो, व दोघे निघून जातात.)

(पडदा पडतो.)

प्र० २—तिरसगडच्या आसपासचा डोंगराळ प्रदेश.

(दोन चोरटे येतात.)

१ चोर—नाईक ! आतां इथें आपलें बोलणें कोणाला ऐकूं जायचें नाहीं. तेव्हां इथें बोलायला कांहीं हरकत दिसत नाहीं.

२ चोर—होय होय ! तूं माझा दुस्मान आहेस.

१ चोर—कोण मी ? तो कसा काय बोवा !

२ चोर—तूं मला वांचूं दिलेंस, होयना ?

१ चोर—होय. आणखी तें देखील आपला स्वतःचा जीव धोक्यांत घालून ! त्याबद्दल का तुह्मीं रागावलां आहां ?

२ चोर—होय. आणखी त्याकरितांच रात्रंदि-वस तुझा घात करावा ह्मणून मी संधि पहात आहें !

१ चोर—वाः, उपकार फेडण्याची ही नवीनच रीत आपण आज ऐकिली बोवा !

२ चोर—त्या दुमालदाराच्या कोतवालानें आ-पल्याला या डोंगरांतच खालीं गांठलें होतें, याची तुला आठवण आहे कीं नाहीं?

१ चोर—आहे ह्मणजे ! महिना पंधरा दिवसां-तली ती गोष्ट, आन् ती का मी इतक्यांतच विसरेन !

२ चोर—त्या वेळीं आपण त्या कोतवालाची पण पुरीच खातरी केली. पण अखेरीस तुझ्या तरवारींची मूठ मोडली, आणखी मलाही डोकीवर जबर जखम लागली, त्या-मुळें आपण दोघांनींही चोरवाटांनीं पळ काढला ह्मणून निभावलें, पण धांवण्याच्या श्रमानें मी थकून मूर्छित झालों, तेव्हां तूं मला त्या गुहेंत उचलून घेऊन गेलास, आणखी माझी जखम पहायला ह्मणून तूं माझ्या डोकीचे केंस एकीकडे केलेंस !

१ चोर—कबूल. पण त्यांत मीं कांहीं वावगें केलें नाहीं.

२ चोर—नाहीं कसें ? तूं माझे केंस एकीकडे केलेस, आणखी तुझ्या दृष्टीस—

१ चोर—तो त्रिशुळाचा डाग पडला.

२ चोर—मी पक्कें जाणून आहें. मी सावध झालों न् तुझ्याकडे पाहिलें, तों तूं त्या डागाकडे एकसारखें लक्ष लावून पहात बसला होतास !—समजलास ? गुलामा ! तुला माझें गुप्तित कळलें आहे न् तें तूं दुसऱ्या लोकांना सांगितलेंस !

१ चोर—भलतेंच ! माझ्या तोंडून त्याबद्दल एक चकार शब्द बाहेर निघाला असेल

तर **गायत्रीचीच** शपथ !

२ **चोर**–**गायत्री**ला आग लाव ! हरामखोरा ! जातीचा **ब्राह्मण** म्हणवितोस, पण कधीं बापजन्मीं तरी **गायत्री**चा उच्चार झाला असेल तर शपथ !

१ **चोर**–उगीच बोलण्यांत काय अर्थ आहे ? तुम्हींही **ब्राह्मण**च आहां, पण तुम्हीं दररोज कितीशी संध्या करितां ?

२ **चोर**–माझें सोडून दे. पण मला ही शपथ चालायची नाहीं ! **काळकाई**ची शपथ वहा.

१ **चोर**–**काळकाई** शपथ तुमचें गुप्तित नुसांला ठाऊंक कीं मला ठाऊक !

२ **चोर**–खरेंना पण हें ?

१ **चोर**–आतां माझा नाइलाज झाला ! पाहिजे तर तुम्हांला त्रिवार सांगतों–खरें–खरें–खरें–, आतां तरी होते कीं नाहीं तुमची खातरी ?

२ **चोर**–आतां होते. चल आतां तुझी आमची पहिल्याप्रमाणेंच गट्टी !–चल काढ पाहूं तुझी चिलीम !–थंडी वाजते आहे तर दोन झुरके अगोदर पोटांत जाऊं दे !

१ **चोर**–(दूर नजर फेंकून) अहो, झुरक्यांची गोष्ट मग !–अगोदर तें तिकडे पाहिलेंत का काय दिसतें आहे तें ?

२ **चोर**–नाहीं, एकादें वाघरूं बिघरूं आहे वाटतें ?

१ **चोर**–भलतेंच. असें कुठें वाघरूं बोललें आहे ? नीट न्यहाळून पहा. तें बघा एक तट्टूं दिसतें आहे, आन् त्याच्या पाठीवर तें थोरलें ओझें घातलेलें आहे !–चला चला. अगोदर तें घशांत उतरूं आणखी मग चिलमीच्या धुराची गोष्ट!

२ **चोर**–आपण तयार आहों !घोडें एकटेंच दिसतें आहे, तेव्हां आणखी सोबत्या बिबत्यांना हाक मारायची खटपट नको! चल.

(रोखे निघून जातात.)

प्र० ३–तिरसगडावरील दुमालदाराच्या वाड्यांतील खोली.

(मानाजीराव दुमाळदार एकटेच बसले आहेत.)

(समोर एक तसबीर मांडिली आहे.)

माना०– (चिंतातुरपणें चित्राकडे पहात) हाय हाय! काय चमत्कार हा! माझी सद्गुणी प्रिया म्यां दुष्टानें गमाविली, आणि ती परत मिळण्याची आशा राहिली नाहीं यासाठीं या क्षुद्र तसबिरीकडे पाहून मी आपल्या जिवाचें समाधान करून घेत आहें ! अहाहा ! ही तसबीरच काय ती माझी प्राणप्रिया म्हणून मी आपल्या हृदयाला सदोदित बोध करीत आहें ही केवढी आश्चर्याची गोष्ट !–तथापि तो बोध आज सतत चौदा पंधरा वर्षें होत असतांही अद्यापि नवा नवासाच वाटत आहे, व माझी या तसबिरीवर भक्ति बसत नसून ज्या सद्गुणी प्रियतमेचें हें प्रतिबिंब आहे, तीच प्रिया एकसारखी माझ्या हृदयांत जागृत वास करीत आहे, हें केवढें आश्चर्य !–हाय हाय ! प्राणप्रिये! म्यां दुष्टानें व्यर्थ तुझा तिटकारा केला आणि तुला संकटांत घातलें ! आणि तूं मात्र सर्व ऐहिक दुःखें मोठ्या समाधानवृत्तीनें गिळून जाऊन स्वर्गीं देवांगना बनली आहेस ! तूं मात्र निघून गेलीस, आणखी तुझ्या मागें हा तुझा अति अयोग्य दास या जगांत हा त्रासदायक नरकवास सोसण्यास जिवंत राहिला आहे !–हरहर! काय ही माझी स्थिति !–गैर समजुतीमुळें कां होईना, पण केलेल्या अपकृत्याबद्दल

मला किती ह्मणून अनुताप होत आहे ! आतां याचें शमन केव्हां होईल तें होवो!— परंतु हे प्रिये ! तूं या वेळीं खचित स्वर्ग-लोकींची अधिदेवता बनली आहेस असें मी समजतों, यासाठीं हे प्रिये, तूं मजकरितां एवढें करच ! आतां या जगांत फार दिवस जगावें अशी मला बिलकुल इच्छा नाहीं, व थोडक्याच दिवसांत **यमधर्मा**च्या सिंहासनापुढें कृतकर्मांची झडती देण्यासाठीं मी उभा राहीन. यासाठीं हे प्रिये! कृपा करून, आणि तुझा मी तिरस्कार करूं लागण्यापूर्वी तुजवर जें माझें अपरिमित प्रेम होतें तें मनांत आणून, तूं मजबद्दल त्या न्यायमूर्तीपुढें रदबदली कर, ह्मणजे तेवढ्यानें तरी माझी **रौरव** नरकांत जाण्याची पाळी चुकली तर चुकेल ! तो तसला प्रकार झाल्यापासून इतकी वर्षे पर्यंत या नष्ट हृदयाला किती पश्चाताप होत आहे हें तूं दिव्य दृष्टीनें पहातेच आहेस; यासाठीं तूं मजवर एवढी दया करच ! (तसबिरीचें चुंबन घेतो, व तिच्या पायीं मस्तक ठेवितो.) अहाहा ! माझी नष्ट प्रिया **प्रेमळा** तीच या वेळीं या ठिकाणीं प्राप्त होऊन मला दर्शन देत आहे काय! खचित खचित तीच ही ! कारण ज्या वेळीं मीं तिचा विनाकारण परित्याग केला, त्या वेळीं तिच्या नेत्रांतून घळ घळ अश्रु चालत होते; व तिला मनांतून आपल्या प्रेमांत तसा विघड पडल्यामुळें वाईट वाटत होतें, तरी तशा स्थितींत तिची ती अंतःकरणांतील प्रेमातिशयानें अतिशय सौम्यता पावलेली दृष्टि एकसारखी मजवरच स्थिरावली होती; तसेंच माझा अन्याय मला दाखवावा ह्मणून तिच्या मनांतून वारंवार कढ येत असत त्यांयोगानें तिचे ओष्ठ वारंवार थरथरत होते, तरी तिनें मोठ्या प्रयत्नानें आपल्या मनांतील बाकीचे सर्व उद्गार गिळून जाऊन नुसतें " परमेश्वर तुमचें कल्याण करो ! मी येतें. " एवढे मोजके शब्द तोंडावाटे काढिले आणि लागलीच चालती 'झाली, त्यावेळीं तिनें आपल्या शांति आणि करुणावृत्तींचें अनुपमेय अधिष्ठानच काय अशा मुद्रेनें एकवार मजकडे वळून पाहिलें; ह्या सर्व गोष्टी या वेळीं माझ्या प्रत्यक्षवत् अनुभवास येऊन माझ्या हृदयाचें विदारण करीत आहेत!—असो! परमेश्वराची इच्छा! देवा ! कायही माझी स्थिति ! कृपा करून मला या स्थितींतून लौकर सोडीव! इतःपर या स्थितींत रहाण्यास हा पातकी चांडाळ असमर्थ आहे!

(दीर्घ उसासा टाकितो, व बराच वेळ स्तब्ध राहून शेवटीं ती तसबीर पुढें असलेल्या पेटींत ठेवितो.)

(हुजऱ्या आंत येतो.)

माना०—कायरे, तुझें काय काम आहे ! चल निघून जा.

हुज०—व्हयजी, पण त्ये **गोइंदपंत** भाइर आल्याती, आन् मिलाया मंगत्याती.

माना०—जा त्याला सांग आत्तां भेट होत नाहीं, दोन चार दिवसांनीं येऊन भेट !

हुज०—जी.—पन—पन त्ये ह्मंगत्याती काम अक्शी निकडीचें हाये‌नी, न् सरकारची भेट ह्येच खिणीं व्होया पायजे.

माना०—(आपणाशीं) **गोविंदपंत** गुलाम आहे मोठा इमानी, पण त्याचें बोलणं उगीच लांबलचक तें मला आवडत नाहीं.—तरी पण काय असेल तें असो, त्याला आंत येऊं द्याव आणि त्याचें भाषण ऐकावें असें

माझी मनोदेवताच मला सांगत आहे(उघडपणें) गुलामा ! तुला एकदा सांगितलें ना भेट व्हायला सवड नाहीं म्हणून?–बरें जा जा– त्याला पाठवून दे आंत ! पण त्याला नीट बजावून सांग हो आज फार बोलायला फुरसत नाहीं म्हणून !

जा०–जी. (निघून जातो. कांहीं वेळानें गोविंदपंत आंत येतो.)

गोविं०–(मुजरा करितो.)

माना०–कायरे बोवा ! तुझें काय काम असेल तें थोडक्यांत सांग.

गोविं०–जी हुकूम. सरकारची आज्ञा शिरसा वंद्य आहे. मी थोडक्यांतच विनंती करितो, उगीच पाल्हाळ लावीत बसत नाहीं. माफी असावी.

माना०–गुलामा ! तूं थोडक्यांत बोलणार तो असाच का ? नुसतें होय म्हणायचें टाकून देऊन तुला इतके शब्द बोलायला सांगितलें होतें कोणीं ?

गोविं०–चुकी झाली! माफी मागतों. पण सरकार! प्रसंगच तसा आला आहे म्हणून बोलतों.

माना०–बोल बोल !

गोविं०–जी. सरकार! आज मी हिशेबांचे ताळे घेत होतों, न् पाहिलें तर जवळ जवळ एक लाखाचा वसूल कुळांकडून थकला आहे.

माना०–(ऐकून) बरं मग ?

गोविं०–(आपणाशीं आश्चर्यानें) काय इतक्यांतच " बरें मग ? " एकून आज इथें दाद लागायची मारामारच वाटते ! बरें चिंता नाहीं. (उघडपणें) सरकार ! तीन साल पाऊस पडला नाहीं. कुळें भराभर गांवें सोडून निघून गेलीं आहेत, व जाताहेत. किल्ल्याच्या आसपास गांवांतून दरवडे पडल्याचे बोभाट वरचेवर ऐकू येत आहेत !

माना०–पुरे पुरे! इतका पाल्हाळ कुणा लेंकाला पाहिजे आहे ! सगळें झालें, दुष्काळ पडला म्हण. पण पुढें ?

गोविं०–पुढें काय ? याचा बंदोबस्त व्हावा एवढीच विनंती आहे.

माना०–तुला एवढेंच बोलायचें होतें, तर माझ्याकडे कशाला आलास ? धुमाजी नाइकांगाशीं बोलायचें होतेंस कीं नाहीं !

गोविं०–बोललों ! पण आलीकडेस सरकारची तब्बेत नादुरुस्त म्हणून ते आपले जवळ बोलायला भितात !

माना०–तब्बेत नादुरुस्त ! कोणाची !–माझ्या तब्बेतीला काय धाड झाली आहे ?

गोविं०–जास्ती बोलण्याचा माझा अधिकार नाहीं! तरी पण सरकारच्या नजरेंत अंमळ चलबिचल या सेवकाला वाटली, म्हणून–

माना०–अस्सें अस्सें !–(आपणाशीं) एकून चलबिचल मला एकट्यालाच वाटली असें नाहीं! हाय हाय!–प्राणप्रिये! मी केवढा दुष्ट! (मोठ्यानें हुंदका येऊन स्तब्ध बसतो.)

गोविं०–(नम्रपणें) सरकार ! माझ्या बोलण्यानें आपणाला क्लेश होताहेतसें वाटतें! आज्ञा होईल तर रजा–

माना०–(हुंदका आवरून) **गोविंदपंत** ! जाऊं नका. इतका वेळपर्यंत मी तुमच्यावर ओरडलों, आणखी तुम्हांला नुसतें बसा म्हणून देखील म्हटलें नाहीं याबद्दल मला फार खेद वाटतो. परंतु आलीकडे काय कारण असेल तें असो, माझें चित्तच अगदीं उदासीन झालें आहे, व त्यामुळें कामकाजाकडे माझें मन कसें तें लागतच नाहीं यापुढें माझा नाइलाज आहे. तुम्हीं आत्तां काय

ह्मणालां, कुळांकडून वसूल थकला आहे?

गोविं०—होय. जवळ जवळ एक लाखाच थकला आहे.

माना०—चिंता नाहीं. तो वसूल करण्याचीच मुळीं अव्यवस्था झाली आहे, तेव्हां त्यांच कुळांकडे कांहीं दोष ह्मणतां येत नाहीं.

गोविं०—तें खरें. हें काम **सखारामपंता**चें होतें तो तर पळूनच गेला, त्यांच्यापुढें मा त्याच्या जागेवर कोणाची नेमणुक व्हायच पाहिजे होती ती झाली नाहीं.

माना०—तें मला ठाऊक आहे. हल्लीं मा कामकाजाकडे बिलकुल लक्ष लागत नाहीं व एक दोन वेळां **सखारामपंता**च्या अस मीवर तुमचीच नेमणूक करायचें = मनांत देखील आणलें होतें, मण तें तसें आजपर्यंत विसरून गेलों होतों. तरी चिं नाहीं. अजून यत्न होण्यासारखा असेल तो यत्न तुह्मीं करण्यास आळस करूं नक आणि वसुलाच्या व्यवस्थेकडे लक्ष पोंच **धुमाजी** नाइकांना सांगून तुमच्या जागे दुसऱ्या कोणाची तरी नेमणूक होऊं न तुह्मीं **सखारामपंता**चें काम करूं ला जर वसुलाची व्यवस्था नीटशी जम तर **सखारामपंता**कडे जे गांव चालू ह ते मी तुमच्याकडे करून देईन. नाहीं निराळी एकादी पगाराची बाब तुह्मांक लावून देईन काळजी करूं नका.—बरं आतां बोला. मला फार बोलायचा कंटा आहे. तुह्मीं एवढ्याच कामाकरितां आ होतां किंवा दुसरें आणखी कांहीं काम हो

गोविं०—दुसरेंच असा कांहीं प्रकार ना काम यापैकींच होतें. आसपासच्या कारण गांव ओसाड पडूं लागले आहेत. तशांत दरवडेखोरांच्या दंग्यामुळें लोकांना विशेष त्रास पोंचत आहे. त्याबद्दल कांहीं चार शब्द आज्ञा होईल तर कानांवर घालीन ह्मटलें.

माना०—ठीक ठीक ! खुशाल बोला.

गोविं०—आपल्या किल्ल्याच्या पायथ्यापासून तीन कोसांवर एक पडकें देऊळ आहे, त्या ठिकाणीं एक कोणी ह्मातारी बाई रहात असते.

माना०—असते, ती मलाही ठाऊक आहे. ती जन्मापासूनच मुकी आहे असें मीं मागें एकदा ऐकिलें होतें खरें. बरें मग ?

गोविं०—ती मुकी आहे अशी माझींहा समजूत होती, पण आतां तें कांहीं नाहीं. तिला बोलतां येतें, सर्व कांहीं करतां येतें. परंतु ती फारशी कोणाशीं बोलत नाहीं इतकेंच कायतें. तें असो. मला विनंती करायची आहे ती इतकीच कीं, हल्लीं जे दरवडेखोर आपल्या आसपास दंगा करीत फिरत आहेत, ते त्या देवळांत जमत असतात ह्मणून एक गुप्त खबर मला कळली आहे. तेव्हां ही गोष्ट जर खरी असली, तर ती बाई तेथेंच नेहमी रहात असल्यामुळें ती याबद्दल कांहीं कमजास्ती प्रकार सांगू शकेल असें वाटतें. याकरितां कांहीं शिबंदीचे लोक हत्यारबंद तयार करून दरवडेखोरांस पकडण्याकरितां पाठवावेत, आणखी त्या बाईलाही पकडून किल्ल्यांत आणून तिची पक्की चौकशी करावी असें मला वाटतें.

माना०—तुह्मीं ह्मणतां खरें, पण त्या बाईला चोरट्यांबद्दल माहिती असेल असें मला वाटत नाहीं. मग काय असेल तें असो. तरी पण तिला एक वेळ येथपर्यंत आणायला कांहीं हरकत नाहीं.—असो. त्याची

व्यवस्था तुझींच पहा. मात्र त्या बिचारीला विनाकारण त्रास पोंचेल असें होऊं देऊं नका.—बरें आणखी याशिवाय कांहीं काम आहे ?

गोविं०—आणखी एक गोष्ट कानांवर घालण्याची आहे,--पण—पण—बोलायला अंमळ शंका वाटते.

माना०—शंका धरूंनका. काय असेल तें बोला.

गोविं०—बोललेंच पाहिजे. परंतु आपल्याच निकट संबंधांतली गोष्ट आहे म्हणून मन किंचित् कचरतें एवढेंच कायतें.

माना०—कोणाच्या ? माझ्याच संबंधाची? बरें मग ?—माझ्या संबंधाची असली म्हणून तुमचें मन कचरायचें कारण ?

गोविं०—कारण इतकेंच. ती ऐकून आपल्या जिवाला वाईट वाटणार आहे.

माना०—असें कधीं होणार नाहीं. आलीकडे बरेच दिवस माझ्या मनाचीच अशी कांहीं विलक्षण स्थिति झाली आहे, कीं त्या स्थितीपलीकडे मनुष्याला जास्ती वाईट म्हणून वाटायचेंच नाहीं.

गोविं०—बोलतों क्षमा असावी. सांगतों हा मजकूर अगदीं खरा आहे. त्याबद्दल मीं स्वतः आपली खातरी करून घेतली आहे, आणखी तेव्हांच सरकारच्या चरणांपाशीं येण्याचा या दासाला धीर झाला.

माना०—बरं ऐकूं द्या तर खरी तुमची काय गोष्ट आहे ती ?

गोविं०—सरकार ! रातगस्तीच्या शिपायांचा नाईक तो आपला **अर्जुना**—त्याच्या सुनेचें गर्भाधान झालें—

माना०—मग काय म्हणतां ? मला याबद्दल का वाईट वाटणार आहे ?

गोविं०—माझा तसा भाव नव्हता. पण तें गर्भाधान आपल्या या किल्ल्यावरच झालें, तेव्हां त्याकरितां तिच्या माहेरचीं माणसे इथें आलीं होतीं, तीं परवां अवशीच्या सुमारास परत आपल्या गांवीं गेलीं. तेव्हां त्यांना पोंचवायला **अर्जुना** किल्ल्याच्या पायथ्यापर्यंत गेला होता, आणखी अशी प्रहररात्र उलटून गेली होती त्या सुमाराला तो परत किल्ल्यावर आला. तो येत असतां त्याला आपल्या किल्ल्याच्या दक्षिण बुरुजाच्या त्या अंगाला भिंतीच्या जाळींतून आंत दिवा असल्याचा भास झाला.

माना०—(संतापून) काय ? दक्षिण बुरुजांत दिवा ?—**गोविंदपंत** ! तुम्हीं आज गांजाबिंजा तर कसला नाहीं ? त्या बुरुजांत आज किती वर्षें वस्ती देखील नाहीं !

गोविं०—(नम्रपणें) म्हणूनच तर आश्चर्य ! कदाचित् भुताटकीचा प्रकार असला तर कोणास ठाऊक !

माना०—(आपणाशीं) काय ? हा चोर भुताटकीचें नांव घेतो !—अं—हा शब्द ऐकून माझ्या हृदयावर वज्राचेच जसे कांहीं तडाके बसूं लागत आहेत ! हाय हाय ! (उघडपणें) बरें पुढें ?

गोविं०—म्हटलें म्हणजे तो या किल्ल्यांत चाकरीस राहून आज बारा चौदा वर्षें झालीं, इतक्या अवकाशांत या बुरुजाच्या अंगाला कधीं कोणी गेलेलें किंवा त्यामध्यें रात्रीं वस्ती असलेली त्यानें मुळींच पाहिलेली नाहीं, यामुळें त्याला त्या ठिकाणीं दिव्याचा उजेड पाहून आश्चर्य वाटलें, व किंचित् भीतिही वाटली. पाहिल्या प्रथम हा कदाचित् आपणाला उगीच भास झाला असेल असें त्याला वाटलें, तरी मनाची खातरी होईना. सबब

तो त्या जाळीकडे पहात कांहीं वेळ उभा राहिला. पहातो तों त्या ठिकाणीं आंतल्या अंगांला पुष्कळच मंद पण उजेड खचित आहे अशी त्याची खातरी झाली.

माना०—हं हं—बरें बरें ! पुढें काय झालें ?

गोविं०—तेव्हां काय आहे त्याचा स्वतः कानवसा घ्यावा ह्मणून त्यानें मनांत विचार आणिला. परंतु गर्भाधानाचे कारणानें त्यानें दोन दिवसांची रजा घेतली होती, व तो आपल्या घरींच होता यामुळें कदाचित् न जाणों मध्यंतरीं सरकारच्या हुकुमानेंच तिकडे कोणी गेलें असेल असें वाटून तसा कांहीं हुकूम सुटला कीं काय ह्मणून चौकशी करायला तो कचेरींत मजकडे आला आणि मला विचारूं लागला. मी सरकारच्या पदरीं याच किल्ल्यांत सोळा वर्षें कारकुनी कामांत व दप्तरांत घालविलीं, तेव्हां त्याच्याप्रमाणेंच माझीही समजूत असल्यामुळें मलाही त्याजप्रमाणेंच आश्चर्य वाटलें. कारण आपणाकडून खासगी एकदा हुकूम सुटायचा झाला, तर तो **धुमाजी** नाइकांमार्फत सुटतो, तसा नसला तर रीतीप्रमाणें कचेरींतून व्यवस्था होते. परंतु या दोहींपैकीं कोणचाच प्रकार झालेला मला ठाऊक नसल्यामुळें मलाही आश्चर्य वाटलें. व हें काय असावें अशा बुचकळ्यांत पडलों, न् अखेर **अर्जुना**ला बाहेरून एकवार कानोसा घ्यायला सांगितलें.

माना०—कानोसा ! कुठला ? बुरजापासला ?

गोविं०—होय सरकार !

माना०—(आपणाशीं) आः काय करूं रे ? (उघडपणें) बरें कानोसा घ्यायला सांगितलें, पुढें ?

गोविं०—पुढें त्याप्रमाणें त्यानें दुसऱ्या दिवशीं त्याच सुमारास कानोसा घेतला, न् लागलाच माझ्याकडे येऊन कांहीं चमत्कारिक हकीकत सांगूं लागला. तेव्हां मात्र मला अतिशय आश्चर्य वाटलें, व कांहीं वेळपर्यंत त्यानें सांगितलेली हकीकत खरीच वाटेना तेव्हां झटदिशीं आपलें हातचें काम तसंच टेवून त्याला घेऊन किल्ल्याच्या बाहेरच्या अंगानें त्या जाळीच्या जवळ गेलों न् कान देऊन ऐकूं लागलों.

माना०—हं हं—

गोविं०—तों पहिल्या प्रथम कांहीं आंत कोणीतरी माणसें कुजबुजत असलेलीं ऐकूं आलीं, पण तीं काय बोलताहेत याचा मुळींच उमज पडला नाहीं. तरी. तसाच ऐकत राहिलों, न् कांहीं वेळानें ऐकतों तों आंत दोन माणसें असून तीं हळू हळू मोठ्या-मोठ्यानें बोलतांना ऐकूं आलीं, व त्यांच्या आवाजावरून मीं तीं माणसें कोण आहेत हीं ताबडतोब ओळखलीं. कांहीं भुताटकीचा प्रकार असला तर नकळे. पण तीं दोन्हीही आपल्या संबंधाचींच अशी माझ्या मनाची खातरी आहे.

माना०—कसें ह्मटलेंत ? हीं दोन माणसें माझ्या संबंधाचीं आहेत ?

गोविं०—होय सरकार!—त्यांपैकीं एक तर आपण लहानपणापासून पोटच्या मुलाप्रमाणें वागविलेले **धनाजीराव**,—

माना०—आणखी दुसरें—

गोविं०—(स्तब्ध रहातो.)

माना०—**गोविंदपंत** ! ही वेळ लाजायची नव्हे. आणखी तेथें दुसरें कोण होतें?

गोविं०—सरकार ! आपलीच कन्या !

नाहीं. माझ्यापाशीं पैसा असला किंवा नसला, तरी मी मुलीच्या बापाच्या किंवा आईच्या पैशाला भाळणारा मनुष्य नाहीं. मुलगी अगदीं गरीबाची असली, तरी जर ती चांगली सद्गुणी असेल, तर ती मला चालते. तुमच्यासारखीच तुमची मुलगी गुणांनीं असती, तर तिच्याशीं लग्न करायला माझें मन कधींच तयार झालें नसतें. पण तिचा स्वभाव तुमच्यासारखा वाईट नाहीं,—

झाळ०—आणखी माझा मात्र स्वभाव वाईट!—(नवऱ्याकडे पाहून) कांहो, कांहीं कान आहेत का गेले तेही फुटून ? तुमच्या देखत तुमच्या बायकोच्या स्वभावाला हे वाईट म्हणतात, याची कांहीं आहे का लाज ? मी मेली गरीब, माझ्यावर घरांत पाहिजे त्यांनीं चोंहोंकडून अगदीं खसकटायचें मांडलें आहे ! माझा सगळ्यांनीं भंडावडा आरंभिला आहे ! आतां मात्र मी तुमच्या पुढें या दगडावर आपलें कपाळ फोडून घेऊन जीव देतें!—उं—अः—उं—अः—उं—उं—(मोठ्यानें रडूं लागते.)

हैब०—(आपणाशीं) काय चमत्कार आहे ! इतक्यांत मोठ मोठ्यानें रागावून बोलत होती, आणखी इतक्यांत अशी ओक्साबोक्सीं रडूं लागलीं हें कसें ?—अथवा ठीकच आहे. ढगं मोठ्यानें गडगडलीं म्हणजे मागाहून पाऊस सहसा पडल्याखेरीज रहात नाहीं.—असो. आतां इथें काय बरें करावें ? इचें समाधान करायला जावें, तरी माझ्याशीं तुम्हीं बोललां कां म्हणून माझ्या डोक्याचे सगळे केंस मोकळे करील! न जावें तर तिकडूनही टोमणा मारायला कांहीं चुकायची नाहीं! दोहींकडूनही पंचाईत. असो. आपलें गप्प बसावें यासारखें सुख नाहीं. मुधोजीराव कांहीं तिला वांकडें बोलले नाहींत एवढें मला पुरें आहे.

झाळ०—उं—अः—उं—अः—

हैब०—(आपणाशीं) छेः—पण या वेळीं इच्याशीं न बोलणें म्हणजे कसेंसेंच वाटतं. तर आतां बोलावेंच. (उघडपणें) अग—माझें ऐकिलेंस का! असला दंगा इतक्या लोकांदेखत काय बरें करावा ? तुला असें रडायला काय झालें ?

झाळ०—(तोंड वेडें वाकडें करीत) रडायला काय झालें !—कसें ? रडायला काय झालें ? आणखी विचारा " रडायला काय झालें ?" रडायला डोंबल झालें !—थूः तुमच्या जिनगानीवर ! तुमच्या देखत असल्या या रांडा मेल्यांनीं बाहेरून यावें, आणखी तुमच्या बायकोच्या डोक्यावर वडे तळावे न् ते तुम्हीं मुकाटच्यानें पहात रहावे ! थूः—

हैब०—हें बघ ए—तूं माझें अंमळसें नीट ऐकून घे—तूं अशी रागावून बोलूं नको. पाहिजे तर मी तुझ्या पायां पडेन, पण तूं अशी उगीच रडूं नको न् रागावूं नको !

झाळ०—काय काय ? मी उगीच रडतें आणखी उगीच रागावतें नाहीं? तुम्हींच तर घरांतली सगळी डाळ नासून टाकली आहे, आणखी त्यामुळेंच तर घडी घडीला मला बिचारीला हें असें डोळ्यांतून पाणी गाळावें लागतें. पण त्याचें तुम्हांला काय ? रडतां रडतां डोळे फुटले तर माझे! बरें, चिंता नाहीं ! असेच माझे डोळे फुटूं द्या आणखी तुम्हीं आपल्या डोळ्यांचें पारणें फेडून घ्या! आतां मी तुमच्यापाशीं मुळीं बोलायची दिसेल नाहीं ! बोलतां बोलतां

माझें कपाळ दिखील दुखूं लागलें!—आतां मी जातेंहो इथून! मी आपली वेडी, माझें तिकडे अन्न दिखीत निवून गेलें असेल!

(निघून जाते.)

मुधो०—ठीक! वाः रे वाः कांगावा!—असो; पण **हैबतराव**! या वेळीं तुम्हीं खरोखरीच दैववान्, कारण तुमच्या कुटुंबाच्या कीर्ती-वरून तिचें बोलणें इतक्यांतच थांबायचें नाहीं, असें असतां बऱ्याच थोडक्या वेळांत तुम्हांला सोडून घराकडे गेली!

हैब०—(उसासा टाकून) म्हणा बोवा तुम्हांला काय वाटेल तें! पण मला अगोदर एक मोठी काळजी उत्पन्न झाली आहे, तिचें कसें काय होणार कांहीं समजत नाहीं.

मुधो०—ती कसली बोवा?

हैब०—अहो, जायच्या वेळीं ती बोलली तिकडे तुमचें लक्ष नव्हतें वाटतें. जातांना ती आपलें स्वतःचें अन्न निवायचें बोलली, पण माझ्या-बद्दल तिच्या मनांत एवढें देखील कसें तें आलें नाहीं. आज आमची आतां पुरी फजिती आहे, आज आम्हांला यजमान म्हणून, आणखी तुम्हांला तुम्हीं आमचे पाहुणे म्हणून, दोघांनाही उपासमार होणार!

मुधो०—होऊं द्या झाला तर! उद्यां एकादशी ती आजच म्हणूं. फार फार तर आज एकादशी तशी आणखी उद्यांही एकादशी पडली, तर आजच्या पुरते आपण **स्मार्त** ब्राह्मण आणखी उद्यांपुरते **वैष्णव** ब्राह्मण बनूं म्हणजे झालें.

हैब०—वाः समाधान करून घ्यायची ही खाशी युक्ति काढिलीत! पण अज्ञानें पोटांतली चावम्यांव कशी मोडावी?

मुधो०—ती मोडायला तुम्हांला अगोदर बाहेर-ची चांवम्यांव पत्करली पाहिजे!

हैब०—म्हणजे काय बोवा? आपल्याला तुमच्या बोलण्याचा नीट उमज पडला नाहीं!

मुधो०—नसेल! मी सांगतों! चावम्यांव म्हणजे कडकपणा! मी तुम्हांला असें नाहीं सांगत कीं बायकोला अगदीं तरवारीच्या धारेवर धरावी. पण म्हटलें पुरुषाच्या जातीला कांहीं तरी कडकपणा असावा! कारण बायका एकदा शिरजोर झाल्या, म्हणजे मग संसार आटपलाच म्हणायचा! यजमानिनी त्या बनतात, आणखी त्यांच्या पुढें पुरुष हुकूमबंदे मजूर किंवा मोलकरी मात्र होतात!

हैब०—आतां तुमचें म्हणणें मला कुठें थोडें थोडेंसें समजूं लागलें आहे. तरी पण काय असेल तें असो. तिच्यापुढें माझे हे हात देखील कसे अगदीं गळून पडतात!

मुधो०—म्हणजे! हात गळून न पडते, तर तुम्हीं आपल्या कुटुंबाला चौदावें रत्न दाखवि-णार होतां वाटतें!—भलतेंच! हें फार वाईट! वास्तविक म्हटलें म्हणजे बायकांना पुरुषांनीं आपल्या डोळ्याच्या कदरेंत ठेवावें हें उत्तम!

हैब०—अहो, तें खरें. पण ती कदर आणावी कुठून? ती समोर असली म्हणजे माझे डोळे नीट उघडत देखील नाहींत!

मुधो०—बरें असो. आपण याविषयीं मग बोलूं. आपण मघांशीं त्या **चंद्रराव फांकड्या**-बद्दल बोलत होतों, त्याचें कसें काय?

हैब०—दुसरें काय? त्याला **सकवारबाई** द्याय-र्चा म्हणून तिच्या डोक्यांत वेड भरलें आहे, त्यापुढें माझा नाइलाज आहे!

मुधो०—तो असूं द्याहो. त्याबद्दल कोण काय म्हणतं आहे? मी म्हणतों तें हें. तुमच्या

कुटुंबाचें एक तसें ह्मणणें आहे, पण तिचें ह्मणणें **सकवारबाई**ला कितपत कसें काय आवडतें ?

हैब०—तें मला तरी काय ठाऊक ? आमची घरकरीण कांहीं बोलूं लागली ह्मणजे ती पोरगी आपली मुकाट्यानें ऐकून घेते.

मुधो०—बाजवी आहे. पण तुमचें कुटुंब जवळ नसतांना तुह्मीं **सकवारबाई**पाशीं कधीं लग्नाची गोष्ट काढली होती किंवा नाहीं?

हैब०—हो काढली होती.

मुधो०—मग कसें काय ? त्या वेळीं तुमचें ह्मणणें ऐकून नाहीं हो असें कांहीं ती बोलली किंवा कसें ?

हैब०—छेः तसें कांहींच नाहीं. मी बोललों, आणखी तिनें माझें ह्मणणें मुकाट्यानेंच ऐकून घेतल ! त्यावर अक्षरसुद्धां कशी ती बोलली नाहीं.

मुधो०—झालें. आणखी याहून तें काय पाहिजे?— **हैबतराव** ! तुह्मीं आपल्या मुलीला पक्की ओळंखली नाहीं. ती फार खोल आहे. तुह्मीं असे आणि तुमचें कुटुंब तसें, यामुळें नाइलाज होऊन ती कोणापुढेंच कांहीं बोलत नाहीं. यावरून मी खचित समजतों, तिच्या मनास जो आवडेल त्याशींच ती लग्न करील, इतराशीं नाहीं. याकरितां आतां असें करा तुह्मांला एक युक्ति सांगतों.

हैब०—सांगा तर खरी पाहूं.

मुधो०—युक्ति ह्मणजे एवढीच. मी इथें आल्यापासून दोन चार दिवस पहातों तुमची कन्या या बागेच्या त्या तिकडल्या कोपऱ्यांत केळींच्या आड बाजूस जात असते, व तिजकडे मी लक्ष देऊन पहात असतों हें तिला जरी माहित नसेल, तरी तिच्या चर्येवरून तिचें मन या लग्नाविषयींच्याच बुचकळ्यांत पडलें असून ती त्याबद्दल एकांतांत जाऊन विचार करीत बसते असा माझा खचित अजमास आहे. तुह्मांला मी कसा मनुष्य आहें हें माहित आहे. याकरितां तुह्मीं जर परवानगी द्याल, तर मी सहजावृत्या फिरत फिरत त्या ठिकाणीं गेल्यासारखें दाखवीन, आणखी हरयुक्तीनें **व्याघ्रांबरी**चें मजविषयीं कसें काय मन आहे याचा अजमास काढीन. हा अजमास काढीत असतां एकादे वेळ न जाणों तशीच जरूर पडली, तर **व्याघ्रांबरी**शीं मला बोलावेंही लागेल. यासाठीं अशा वेळीं तुह्मीं कांहीं तरी मिषानें तेथें जवळच कोठें तरी आसपास दडून राहून आमचें दोघांचें बोलणें ऐका, आणखी मग आयत्या वेळेस जसा रंग दिसेल त्याप्रमाणें तुह्मीं आपल्या मुलीला चार गोष्टी सांगा अगर सांगूं नका.

हैब०—तुमची युक्ति मला आवडते, आणखी ती करायला कांहीं हरकत आहे असें मला कांहीं वाटत नाहीं. तरी पण आमची कृत्या घरकरीण हिला जर ही गोष्ट कळली, तर खचितच सांगतों, त्याबद्दल किती दिवस लागेपाठ ती मला उपास घालील, आणखी बोलून बोलून मला किती त्रास देईल, याचा अजमास मला आतां कांहीं सांगतां येत नाहीं.

मुधो०—भलतेंच कांहीं तरी. तुह्मीं पुरुषासारखे पुरुष आहां, तुमच्या अंगीं कडकपणा असलाच पाहिजे. नसेल तर तो तुह्मांला मुद्दाम शिकून अंगीं आणिलाच पाहिजे. व त्याचाच तुह्मांला मी सांगतों हा पहिला

धडा आहे असेंच तुम्हीं समजा कसे !

हैब०—(गोंधळून) पहा वोवा ! मी कांहीं तुमच्या इच्छेविरुद्ध नाहीं. पण जर का आपला हा बेत त्या **केकया**बाईला उमगला, आणखी मी तिच्यापुढें घाबरून माझ्या तोंडावाटे तुमचें नांव बिंव जर का बाहेर पडलें, तर मग तुम्हांला मात्र मधल्या मधें विनाकारण त्रास होईल. याखेरीज मला स्वतःला त्रास होईल तो निराळाच !

मुधो०—होऊं द्या हो. मला एकदा पाहूं तर द्या त्रास किती होतो तो. मी तुम्हांला खात्रीनें सांगतों, तुमचें कुटुंब कितीही रागीट असलें तरी माझ्या कांहीं वाटेस जाणार नाहीं आणखी तशांतून जाऊंच लागलें, तर त्याच्याबद्दलची जबाबदारी मी आपणावर घेईन, म्हणजे तर झालें कीं नाहीं ?

हैब०—सगळें खरें. पण पहा वोवा ! तुमचें हें करणें मला कसेसेंच वाटतें.

मुधो०—(हंसून) याचेंच नांव वेड ! अहो मला एवढें सांगा, तुम्हीं मी सांगतों एवढी गोष्ट केली नाहीं, तरी तुमच्या कुटुंबाकडून तुम्हांला कांहीं त्रास व्हायचा नाहीं अशी तुमची खातरी आहे का ?

हैब०—छेः—त्याबद्दल कांहीं पुसूंच नका ! या जिवाला त्रास नाहीं अशी सगळ्या दिवसांतून एक घटका देखील सांपडायची नाहीं!

मुधो०—उंः—मग काय ? जर झालाच त्रास तर तो नेहमीच्याच पैकीं समजा म्हणजे झालें.

हैब०—बरें बोवा तुम्हीं म्हणतां तसेंच. (आपणाशीं) पण मला उपास बिपास पडले, तर कसें होईल ?—असो. पाहूं एकवेळ गंमत करून साधली तर ठीकच, नाहीं तर दहा पांच वेळां पायां अधिक पडलें म्हणजे झालें. इतक्यावरही पहाताहेत.

(इतक्यांत म्हाळसाबाई परत येते.)

म्हाळ०—कां कांहीं शुद्ध झाहे कीं नाहीं ? कांहीं मागची आठवण आहे का गेली ?

हैब०—(घाबरून आपणाशीं) अरे, हिनें ओंड उभें राहून आमचें बोलणें ऐकिलें तर नसेलना?

(तोंड खालीं घालून बसतो.)

म्हाळ०—आज स्वारी कसल्या चैनींत गढून गेली आहे ? आज घरांत कांहीं कुणाला जेवाय खायचें नाहीं वाटतें!मी मेली केव्हांची घरांत वाट पहातें आहें. आत्तां याल,अंमळशानें याल, अशाखालीं **व्याघ्रांबरी** इतका वेळ जेवली सुद्धां नाहीं. नि माझे मेलीचे मधल्या मधें हाल ! अजून माझ्या पोटांत कसें तें एवढें अन्न कीं कांहीं दिसेंल गेलें नाहीं !—ओय्या (ढेंकर देते.)—हं चला, उठतां कीं नाहीं ?

मुधो०—(आपणाशीं) आज काय प्रकार असेल तो असो. पण आज पूर्वेचा सूर्य पश्चिमेस उगवला खचित !

हैब०—(आपणाशीं) एकूण आपलें बोलणें इच्या कानीं पडलें नाहीं! मग चिंता नाहीं. (उघडपणें) हा उठलोंच. —चला **मुधोजीराव** ! उठाच !

(सर्व जातात.)

प्र० २—जटाधारी पुराणिक पुराण सांगत आहे.

(म्हाळसाबाई आणि सकवारबाई ऐकत आहेत.)

म्हाळ०—बेटा **व्याघ्रांबरी**, ये आज अशी जवळ बसून पुराण ऐक. आजच्या पुराणांत मुलीं-

च्या लगीन गोष्टी आहेत. होयना पुराणिक बोवा ?

पुरा०—हें काय विचारावें ? आज **वंचकवंचितेची** कथा आहे, न् ज्याहेत्ते कालाचे ठायीं **वंचक वंचिते**प्रत जोहेत्तो कथन करितोहे कळलें ? हे सुंदरी,—**विवाहारंभकार्याणि शृणु त्वं तनुमध्यमे**—हे **तनुमध्यमे** ! जिचा मध्यभाग ह्मणजे कटि—ही आपली कंबर—ही बारीक आहे असे स्त्रिये! हे मनमोहने! मनाकारणें जेहेत्ते मोह घालणारे,— **विवाहारंभकार्याणि**— विवाहाच्या आरंभीं ह्मणजे जेहेत्ते लग्नाच्या अगोदरचीं कार्यें नाम कृत्यें कळलें? तीं जेहेत्ते हे **चारुसर्वांगि**, हे सुंदरी, जिचें सर्व शरीर सुंदर आहे असे हे शोभने! सुंदर स्त्रिये! काय जेहेत्ते तुला सांगावें?—**वक्षोजजितकुंभयुगुले**!—**वक्षोज** नाम स्तन, त्यांच्यायोगें **कुंभ** ह्मणजे कलश ह्यांनाही जिनें जिंकून टाकिलें आहे; हे **हरिणाक्षि**, हरिणाप्रमाणें चपल आहेत नेत्र जेहेत्ते जीचे; हे **मदिरायतलोचने, कंबुकंठि**, तुझे डोळे कसे मद्याप्रमाणें लखलखताहेत, हा कंठ जोहेत्तो कसा शंखाप्रमाणें स्वच्छ पांढरा जोहेत्तो आहे कळलें ? आणखी हे **गजगमने** ! हत्तीप्रमाणें जिचें चालणें आहे, असे हे **वंचिते** नाम **वंचितानामक** स्त्रिये! मी **वंचक** कसा जोहेत्तो आहें कळलें? वंचना करण्याविषयीं कुशल, जंबुकाप्रमाणें धूर्त, बकरूपी जो महामुनि, त्याच्या प्रमाणें आचरण जेहेत्तें आहे ज्याचें, तो मी तुझी वंचना[1] नाम सेवा करण्यास प्राप्त जोहेत्तो झालों आहें कळलें ? यास्तव त्वां काय जेहेत्तें करावेंस, ह्मटलें? अशा प्रकारचा गुणी, बहुगुणी जो मी, त्या मजशीं सहवर्तमान त्वां इतोनिर्गमने[2] जेहेत्तें करावें. आणखी काय जेहेत्ते करावें? तुझ्या या पित्याच्या अवसथापासून[3] निर्गत जेहेत्ते होऊन ज्या तुझ्या प्रियतमाचे "**यस्य[4] ज्ञानदयासिंधोरगाधस्यानघा गुणाः ॥ सेव्यतामक्षयो धीरः स श्रिये चामृताय च ॥**" तो तुझा प्रियतम कसा आहे[5] ह्मटलें? केवळ ज्ञानाचा आणि दयेचा **उपरोधवान्** ह्मणजे उलटा सागरच आहे; आणखी जो **अगाध** आहे कळलें ?—वंचकाच्या वंचनेचा अंत कोणाला जोहेत्तो कळला आहे ह्मटलें!—कारण काय? तो **अक्षयो धीरः** ह्मणजे निरंतर बुद्धिमान् जोहेत्तो आहे. त्याच्याशीं तूं रत हो ह्मणजे—**स श्रिये चामृताय च**—ह्मणजे तो तुला **श्री** नाम संपत्ति, धन, जोहेत्तो

टीप.—या प्रहसनात पुराणिकबोवांच्या तोंडीं जीं संस्कृत वचनें घातलीं आहेत, तीं पुराणांत मुळींच नसून पुराणांच्या धाटणीवर मात्र आहेत. त्यांपैकीं कांहीं सुभाषित ग्रंथांतून आढळणारीं अहोत, कांहीं स्मृति वाक्यें आहेत, व एक वचन अमरकोशांतून घेतलें असून बाकीचीं पुराणिकबोवांनीं स्वतःच्या मनचींच तयार केलीं आहेत. मनचीं वचनें शिवायकरून बाकीच्यांचा खरा अर्थ एक असून पुराणिकबोवांनीं आपल्या सोईकरितां निराळाच अर्थ केला आहे. तथापि त्यांचा खरा अर्थ वाचकांस कळण्यासाठीं खालीं टिपेंत दिला आहे.

---

१. ठकानें फसविलेलीं.

१. (खरा अर्थ) फसविणें. २. येथून जाणें. ३. घरून. ४. (अमरकोश) विद्वज्जन हो, जो केवळ ज्ञानाचा आणि दयेचा अगाध सागर असून ज्याचे गुण निष्पाप ह्मणजे पवित्र आहेत, व ज्याचा कधीं क्षय व्हावयाचा नाहीं, त्या (अर्हंता)ची तुह्मीं सेवा करा, ह्मणजे तो तुह्मांस श्री देऊन अमर करील.

देईल. आणि **अमृत** नाम **अधरामृत** अर्पण करील, नाम तुझें चूबू (मुका घेतल्याचा तोंडानें भाव दाखवितो.) असें चुंबन जोहेत्तो घेईल ! तेव्हां काय जेहेत्तें तुला सांगावें ? हे सुंदरि! झटलें जेहेत्ते हे सुंदर स्त्रिये! लग्नाच्या अगोदरचीं कृत्यें सगळीं तुला सांगतों, जेहेत्तें श्रवण जेहेत्तें कर झटलें.

झाळ०—पुराणिक बोवा ! तें मग सांगा, पण तो काळचा दृष्टांत तुम्हीं मला अर्धाच सांगितला !

पुरा०—हं हं—ही कथा संपली ! आतां तोच भाग सांगतोंहें कळलें ? **भविष्योत्तर** पुराणांत जेहेत्ते **कृष्णद्वैपायन व्यास** काय जेहेत्ते सांगतात—ज्ञानी ज्ञानवान् प्रत्यक्ष **नारायणाचे** अवतारच ते—त्यांना त्रिकाळज्ञान आहे—झणजे जेहेत्ते कळलें ? पुढें होणारी गोष्ट देखील त्यांना कळते. ते स्वप्नांत माझ्याजवळ आले न् झणाले, हे वत्सा, सांगतों श्रवण कर झटलें जेहेत्ते. तूं उद्यां दोन प्रहरीं स्नानसंध्यादि कर्में उरकून आणखी माझें जेहेत्तें नामस्मरण करून तुझांकडे जा, आणखी तुझांला माझें **भविष्योत्तर** पुराण निवेदन जेहेत्तें कर झटलें कळलें ?

झाळ०—बेटा **व्याघ्रांबरी**! ऐकिलेंस ? गुरुजींना काल तुझ्याचबद्दलचा दृष्टांत पडला होता समजलीस ?

पुरा०—अहाहा ! महाराज ! **व्यासोनारायणच** ते, काय त्यांचें तेज ! **सूर्यकोटिसमप्रभ** झणजे कोटि सूर्याप्रमाणें ज्यांची कांति, त्रिकाळज्ञानी जे ते काय जेहेत्ते बोलते झाले! बा वत्सा झटलें,

नमस्तुंगशिरश्चंद्रबिंबचामरचारवे ॥
त्रैलोक्यनगरारंभमूलस्तंभाय शंभवे ॥

तुंगशिरश्चंद्र—तुंग झणजे उंच आहे शिर ज्याचें, झणजे ज्याचें तोंड उभांटें आहे, असा जो. **चंद्र**—**व्यासोनारायण** झणतात—या शब्देंकरून **चंद्रराव** समजावयाचा कळलें? **चंद्रराव** कसा आहे? तर **बिंबचामरचारवे**—**चारु** झणजें सुंदर—नाम फांकडा, **फांकडे** ज्याचें आडनांव आहे असा जो तो **चंद्रराव फांकडे**, त्याला जेहेत्ते **नमः** झणजे नमस्कार करून आपली मुलगी अर्पण करा ! कारण काय झणाल? तर **व्यासोनारायण** झणताहेत जेहेत्ते— **त्रैलोक्यनगरारंभ**—**त्रैलोक्यनगर** झणजे तीन लोकींचें नगर—ते तीन लोक कोणते? तर **श्रीव्यास** बोलताहेत काय जेहेत्तें कळलें ?—**विजापुर, रायगड** आणि तुमची ही सरदेशमुखी—हेच जेहेत्ते तीन लोक, ह्यांचें जें **नगर** झणजे राजधानी—याचा जो काय **मूलस्तंभच** झणजे पहिला खांब कळलें ?—झणजे काय झणताहेत **श्रीव्यासोनारायण** कळलें महाराज? जेहेत्ते पहिला खांब झणजे पहिल्यानें टेंका देणें—पहिल्यानें स्थापना जेहेत्त करणें—तें करणारा असा हा **चंद्रराव फांकडे** जो हेत्तो आहे कळलें? तेव्हां याला तुम्हीं आपली कन्या ही **व्याघ्रांबरी** डोळे मिटून अर्पण करावी—देऊन टाकावी—झणून **व्यास** जेहेत्ते आज्ञा करतात कळलें ? यांचें कारण काय झणाल? तर **व्यासमुनि** सांगतात. **चंद्रराव**

१ मस्तकावर चामराप्रमाणें उंच ठिकाणीं चंद्रबिंब असल्यामुळें जो सुंदर दिसत आहे, व जो त्रैलोक्यरूप नगराचा आधारभूत खांबच, अशा सांबास नमस्कार असो.

हा **शंभु** म्हणजे **शंकर** अर्थात् कल्याण करणारा जोहेत्तो आहे म्हटलें. कल्याण कोणाचें! तर अर्थात् जो त्यांना **व्याघ्रांबरी** अर्पण करील त्याचें! तेव्हां सांगायचें तात्पर्य काय! **श्रीव्यासमुनि** सांगतात,—**चंद्रराव फांकड्याला** जरकरितां **व्याघ्रांबरी** अर्पण केली, तर तो आपल्या सासऱ्याला आणखी सासूला, म्हणजे **बाई** ! तुम्हांला आणखी तुमच्या यजमानांना बादशहा बादशाहीण करून टाकील, आणखी तुमचें कल्याण जेहेत्तें करील ! याकरितां **श्रीमत्कृष्णद्वैपायन** सांगतात—**नमः**—म्हणजे नमस्कार करून त्यांना तुम्हीं आपली कन्या **व्याघ्रांबरी** अर्पण जीहोत्ती करा कळलें ?

म्हाळ०—(आश्चर्यानें) तुम्हांला **वाशांनीं** इतकें देखील सांगितलें अं!—बाई बाई! यव्हां खरोखरीच आमचें मऊ लोणी इथें ऐकायला पाहिजे होतें. म्हणजे तें एकदम विरघळून दिखील गेलें असतें!—(मोठ्यानें) अग ए तिकडे कोणं आहेग **बटकूर** !—ए **सटवे**—जा तिकडे ओटीवर, आणखी त्यांना सांग तुम्हांला सगळीं कामें टाकून आत्तांच्या आतां पुराण ऐकायला आलें पाहिजे ! (पडद्यांत बटकुरी ओठीवर गेल्याचीं पावलें ऐकूं येतात. कांहीं वेळानें हैबतराव येऊन मुकाट्यानें दूर बसतो.)

म्हाळ०—पुराण ऐकायला मीं तुम्हांला बोलावून कित्ती वेळ झाला न् तुम्हांला आत्तां यायला फावलें, नाहीं ? आज पुराणिक बोवांनीं कसलें **उंची कुंचीचें**—

पुरा०—कसलें ? **वंचकवंचितेचें** !

म्हाळ०—असेल. असलें अवघड नांव मला नाहीं म्हणतां येत!—पण त्यांनीं पुराण सांगितलें, तें ऐकायला तुमच्यानें लौकर येववलें नाहीं, इनका वेळ काय करीत होतां ?

हैब०—कांहीं नाहीं. **चिमा**नें तुझा निरोप सांगितला न् मी लागलाच इकडे आलों !

म्हाळ०—कोणीं ? **चिमा**नें ? ती **चिमी** बटकूर, तिनें ?

हैब०—तूं म्हणशील तसें. पण मी तुझा निरोप ऐकिला आणि लागलाच आलों.

म्हाळ०—हें मला असलें दररोज नाहीं चालायचें. तुम्हांला दररोज बोलावणीं तीं कशाला पाठवायला पाहिजेत ? तुमच्याकरितां मी आपलीं चाकरमाणसें नाहीं खराब करीत बसणार ! उद्यांपासून तुम्हांला, उपासाचा फराळ आटपला म्हणजे दररोज इथें येऊन माझ्यासमोर बसलें पाहिजे पुराण ऐकायला. समजलांत?

हैब०—समजलों. —पण—उद्यांपासून उपासाचा फराळ म्हणजे काय मी समजलों नाहीं !

म्हाळ०—नाहीं समजलां कसे ? आज एक तुम्हांला गय करून घातलें जेवायला, म्हणून म्हणून उद्यां नाहीं हो घालायची ! त्या मुसंड्यांनीं सरदेशमुखी लुटली, न् सगळा गल्ला काढून नेला. आतां तुम्हीं **विजापूर**च्या त्या मुसंडयापासून चाळीस हज्जार रुपये घेऊन या, तर घरांत जेवायला मिळेल, नाहीं तर नुसता पाण्याचा फराळ करीत बसावें लागेल !

हैब०—काय ! मुसंड्यांनी गल्ला नेला ? आणि आणि मला ठाउक नाहीं तो !

म्हाळ०—तुम्हांला काय कधीं ठाऊक असतें ? रुपये **व्याघ्रांबरी**च्या लग्नाला पाहिजेत !

आतां गप्प बसा, आणखी **वांशां**चें पुराण ऐका.

हैब०—(आपणाशीं) हा आज कांहीं निराळाच रंग दिसतो! (उघडपणें) कसलें पुराण? वांशांचे पुराण म्हणजे मी समजलों नाहीं!

म्हाळ०—थांबा अंमळ म्हणजे समजेल.

हैब०—म्हणजे काय तूं मला वांसे घेऊन मारायचा बेत केला आहेस वाटतें!

म्हाळ०—आतां तुमच्यानें गप्प रहावतें आहे कीं नाहीं?—पुराणिक बोवा! तुमचें पुराण चालूं द्या! मला **वांशां**चें पुराण फार आवडतें.

पुरा०—(हंसून) बाई! तुम्हीं चुकतां. पुराण वांशांचें नव्हे, **व्यासां**चें!

म्हाळ०—मला नव्हतें बाई हें ठाऊक! तुला होतें ग बेटा ठाऊक?—हं हं, पुराणिक बोवा! आपल्या त्या **कृष्णा व्यासा**नें का हें पुराण केलें! अग बाई!

पुरा०—बाई, तसें नव्हे. हें पुराण **कृष्णद्वैपायन व्यासां**नीं लिहिलें! तें कांहीं या युगात नाहीं झालेले! त्यांचें युग्म म्हटलें म्हणजे **द्वि-व्यापार**[1]! (हलकेच व्याघ्रांबरीकडे पाहून गालांतल्या गालांत हंसतो.)

म्हाळ०—तें कांहीं मला समजत नाहीं. तुमचें पुराण चालूं द्या. हो—पण मघां तुम्हीं कसलासा श्लोकाचा अर्थ सांगितला तो मला फिरून ऐकूंद्या कसा!

पुरा०—फार उत्तम. म्हटलें **भविष्योत्तर** पुराणांत **श्रीव्यास** जे आहेत ते काय जेहेत्ते सांगते झाले? **नमस्तुंगशिरश्चंद्रबिंबचामरचारवे ॥ त्रैलोक्यनगरारंभमूलस्तंभाय शंभवे ॥**" म्हणजे काय जेहेत्ते **श्रीव्यास** सांगताहेत कळलें? **चंद्र** म्हणजे **चंद्रराव** चारु म्हणजे **फांकडा** आहे कळलें? त्या **चंद्रराव फांकड्या**ला तुम्हीं **नमः** नाम नमस्कार जोहेत्तो करून आपली कन्या **व्याघ्रांबरी** जेहेत्ते अर्पण करा, म्हणजे तो तुम्हांला **त्रैलोक्य नगर** म्हणजे **विजापूर**चा बादशहा जोहेत्तो करून बसवील, आणखी **शंभवे** नाम तुमचें जेहेत्तें कल्याण करील.

हैब०—(आश्चर्यानें) काय? आमच्या **व्याघ्रांबरी**ची गोष्ट पुराणांत सांगितली आहे?

पुरा०—होय. यांस काय संशय? ज्ञानी त्रिकाळज्ञानीच ते, ते सर्व जेहेत्तें कांहीं करायला क्षम आहेत! त्यांनींच मला स्वप्नांत दृष्टांत देऊन हा अर्थ जोहेत्तो कथन जोहेत्तो केला, कळलें? आणखी काय जेहेत्ते म्हणाले—जर कदांचित् **व्याघ्रांबरी**चा पिता **चंद्रराव**ाला ती अर्पण जोहेत्ते करणार नाहीं, तर—**अदंड्यान्दंडयन् राजा** दंडानें म्हणजे काठीनें दंड म्हणजे शासन जोहेत्तो पावेल. कारण काय म्हटलें? तर **मंथरा** सांगते आहे **कैकेयी**ला—**पतिस्त्वं सप्तमे पदे**—पति म्हणजे नवरा जो आहे त्याला **त्वं** नाम तूं, **पदे** म्हणजे पायांवर आणखी **तमे** म्हणजे अंधारांत **सप्** नाम सपकून जेहेत्तें ताडन कर!

हैब०—(आपणाशीं) अरे हारे कोण गुलाम ठक! हा भलतेंच कांहीं तरी सांगून माझ्या बायकोला फसवितो. तरी मी तिला सांगितलें हा पुराणिक लबाड असावा, पण—

---

१. दोघांचा व्यापार. नवऱ्या बायकांचा व्यापार. (बाहेर दाखविण्याचा अर्थ) द्वापारयुग.

१. ज्यांस शासन न व्हावें त्यांस जो राजा शासन करितो. (याज्ञवल्क्य स्मृति.) २. सप्तपदी संपली म्हणजे पतित्व [पूर्ण होतें.] (पराशर स्मृति.)

कररावा, ह्याची **मरुत्सेना**ची फार दिवस गांठ पडली नव्हती यामुळें तो आरंभीं आरंभीं अगदीं भोळसरसा वाटला असेल, परंतु त्याच्या सारखा धूर्त, प्रामाणिक व प्रसंगावधानी मनुष्य दुसरा थोडकाच आढळेल. **मरुत्सेनराव** हा पहिल्या प्रतीचा धूर्त, कपटी वर्तमानीं असून त्याच्या अंगीं महत्वाकांक्षेचा दुर्गुण पूर्णपणें वसत होता, व या महत्वाकांक्षेच्या भरांत तो कोणतें कितीही भयंकर पातक आचरण्याचें पडलें, तरी तें आचरण्यास मागें पुढें पाहात नसे. या महत्वाकांक्षेच्या भरांत या दुष्टानें प्रत्यक्ष आपला पिता व बंधु यांची कशा प्रकारची स्थिति करून टाकिली, व स्वतः **उदासदुर्गा**चा मालक झाल्यावर तेथेंच आपली महत्वाकांक्षा आवरून न धरितां तिचा अधिक फैलावा होऊं दिला, व **सुदर्शनरावा**नें (पृ० ७० येथें) त्यास पुत्रवत् पालन करीन ह्मणून आश्वासन दिलें असतां कपटानें त्याच्याच "कुटुंबाचा वहिवाटदार" अर्थात् त्याची पत्नी **चंद्रानना** इचा उपभोक्ता होण्याचा विचार मनांत आणिला, व त्यानंतर **चंद्रानना** व **शशिकला** या दोघींच्याही अंतःकरणांस भुरळ घालून त्यायोगें सर्व राज्यप्राप्तीची आशा मनांत धरिली, वगैरे प्रकार वाचक जाणत आहेतच. ह्या महत्वाकांक्षेचे पोटीं पितृद्वेष, बंधुद्वेष, हे प्रकार साहजिकच झाले, तथापि त्यांचें उद्दीपक कारण त्याचा मानीपणा ह्मणजे त्यास आपणास "लेकावळा" ह्मणवून घेणें हें आवडत नसे हें होय. असो; सरतेशेवटीं एका पात्रासंबंधानें लिहावयाचें राहिलें असून तें पात्र **अश्वसेन** हें होय. तथपि या पात्राच्या गुणांचें सविस्तर वर्णन **कांतिवर्म्या**नें पृ. ४१ येथें केलेंच आहे त्याशिवाय त्याच्या बद्दल अधिक लिहीण्याची अवश्यकता नाहीं.

वरदकाल मांत्रिक हा त्या शहरीं येऊन कांहीं प्रसंगानें त्याची आणि **दीक्षितदत्ता**ची गांठ पडली, व **वरदकाला**स कांहीं चमत्कारिक जादूचे प्रकार माहित होते ते त्यानें **दीक्षित-दत्ता**स सांगितले, तेव्हांपासून ते दोघेही गुरुशिष्य या नात्यानें एकत्र राहूं लागले; व **दीक्षितदत्ता**वर राजाची बहाल मर्जी होती यामुळें त्यास आपले जादूचे प्रयोग प्रसिद्धपणें करण्यास कोणत्याही गोष्टीचा प्रत्यवाय नव्हता, तरी आपल्या कृतीची विनाकारण लोकांत वाच्यता न व्हावी या हेतूनें ते मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें कांहींही करावयाचें झालें तरी तें लपून छपूनच करीत असत. तथापि अनेक प्रसंगीं त्यांच्या जादूंचे निसुटते प्रकार कर्णोपकर्णीं लोकांस कळून ते त्या धर्मशाळेच्या आसपास आपणास कांहीं दिसेल या आशेनें घिरट्या घालीत, परतु बहुशः त्यांची निराशाच होत असे. मात्र एकादे वेळीं धर्मशाळेच्या खिडक्या किंवा दारें हीं किलकिलीं उघडीं असलीं, तर त्यांतून तांबड्या निळ्या रंगाचा धूर किंवा तशा रंगाच्या ज्वाला वगैरे प्रकार दृष्टीस पडत. एके दिवशीं असा चमत्कार झाला कीं, **दीक्षितदत्ता**च्या धर्मशाळेस बाहेरून एकदम आग लागलेली बाहेरच्या लोकांच्या दृष्टीस पडली, व धर्मशाळेचीं पाखडें जळत असलेलीं धडाधड कोसळून पडूं लागलीं, त्यावेळीं **दीक्षितदत्त** व **वरदकाल** हे दोघे आंतच दिसत होते, हें पाहून कित्येक भितरे धर्मभोळे लोक त्या धर्मशाळेंत जाण्यास कांकूं करूं लागले, परंतु कित्येक अंमळ अधिक धीट होते ते त्या दोघांस सोडविण्याकरितां ह्मणून आंत जाऊं लागले. इतक्यांत **दीक्षितदत्त** आणि **वरदकाल** दोघेही सुरक्षितपणें हंसत हंसत बाहेर पडले, व त्यांनीं कांहीं चमत्कारिक हातवारे केल्याबरोबर ती आग कोणीकडच्या कोणीकडे नाहींशी होऊन ती धर्मशाळा पूर्ववत्च कायम दिसूं लागली. तेव्हां सभोंवती जमलेले सर्व लोक आश्चर्यानें थक्क होऊन गेले. अस्तु.

दीक्षितदत्त व **वरदकाल** हे **शिलादित्या**समागमें मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें श्मशानांतून निघाले ते **दीक्षितदत्ता**च्या नेहमींच्या लपून छपून चालण्याच्या वाटेनें सुमारें दोन घटिकांनीं त्याच्या धर्मशाळेंत येऊन पोंचले. आंत शिरल्यावर **वरदकाला**नें धर्मशाळेचें दार बंद करून तेथून जवळच एक लहानसा धोंडा मांडिला होता त्यावर त्यास कांहीं वेळ बसून रहा ह्मणून सांगितलें, व ते दोघेही गुरुशिष्य तेथून निघून आंतील कोठडींत निघून गेले. त्या वेळीं चंद्राचा प्रकाश मध्यें ढगां आल्याकारणानें बहुतेक लुप्तच होऊन गेला होता, त्यामुळें त्या धर्मशाळेंतील अंगणांत बराच काळोख पडला होता. तेव्हां त्याचें परावर्तन **शिलादित्य** बसला होता त्या ठिकाणीं पडल्याकारणानें तेथें अंधार गुडुप्च झाल्यासारखी स्थिति होती. तथापि **शिलादित्या**चें लक्ष या गोष्टीकडे मुळींच नसून पुढें जो कांहीं चमत्कार दृष्टीस पडावयाचा त्याकडेच त्याचें एकसारखें लक्ष लागलें होतें. या चमत्काराचें स्वरूप कशा प्रकारचें असेल एतद्विषयीं तो आपल्या मनांत विचार करित बसला असतां त्याला पूर्वीच्या श्मशानवृत्तांताची व विशेषतः **अंमे**च्या प्रेतानें त्याला जो कांहीं उपदेश केला त्याची आटवण झाली. व त्या-योगानें त्याचें अंतःकरण केवळ भीतित्रस्त जरी झालें नाहीं, तरी त्यांतून त्या समयीं उत्साह-

बुद्धि निघून गेली होती. असो. या स्थितींत तो सुमारें दोन घटिका एकटाच बसून राहिल्यानंतर कोठंडीचें दार उघडून **वरदकाल** बाहेर आला, आणि **शिलादित्यास** सावध करून त्यास आपणासमागमें आंत घेऊन गेला. आंत कोटडींत गेल्यावर तेथेंच आपणास चमत्कार दिसावयाचा तो दिसेल असें **शिलादित्यास** प्रथमतः वाटलें होतें; परंतु आंत प्रहातो तों त्या खोलींत अर्धी वाट चालून गेल्यावर एक खालीं जाणारा जिना लागला. त्या जिन्यानें खालीं उतरून गेल्यावर उजव्या अंगाला एक भुयार लागलें, व त्या भुयारांतून नागमोडीच्या वाटेनें बरेंच लांबलचक गेल्यावर त्यास एक अगदीं अंधार गुडुप खोली लागली. त्या खोलींत गेल्यावर **वरदकालानें** चकमक झाडून कंदील पेटविला. तो कंदीलही त्या खोलीचा अंधारेपणा नाहींसा न करितां उलटा तो अंधार जास्ती भयानक मात्र वाटवावा अशा प्रकारचा होता. त्याच्या सभोंवतीची कांच सगळी आंतून काजळानें सारविलेली असून तिच्या बाहेरल्या अंगास जागोजाग शेणाचे डाग पडले होते. व त्यायोगानें कंदिलांत कसाबसा तरी दिवा जळतो आहे एवढ्या पलीकडे त्यापासून फारसें ज्ञान होण्याचा संभव नव्हता. एकंदरींत त्या खोलींत स्पष्टपणें असें कांहींच दिसत नव्हतें, व त्या जागेला कधींही सूर्यदर्शन झालें नसल्यामुळें त्या ठिकाणीं कुजट माती व दुसरे कित्येक पदार्थ ठेविले होते त्यांच्या योगानें अतिशय घाण सुटली होती. असो; अशा त्या ठिकाणीं गेल्यावर **वरदकालानें** कंदील भिंतीशीं ठेविला, व **शिलादित्यास** आतां पुढें जावयाचें नाहीं असें सांगितलें. इकडे **दीक्षितदत्तानें** खोलीचे मध्यभागीं एक चौरंग ठेविला होता त्यावरील झांकण काढिलें, त्याबरोबर जणों कांहीं सूर्यच उगवला आहे काय अशा प्रकारचा प्रकाश भपकन सर्व खोलीभर पसरला. हा प्रकाश मागें **दीक्षितदत्तानें** सांगितलेल्या "भिंगा"चा होता. वस्तुतः तें भिंग मुळींच नसून दुसरा कशाचा तरी खडा होता, व त्यांतून बाण सोडल्याप्रमाणें किरणजालांच्या रेषा चोंहीकडे पसरल्या होत्या. ह्या भिंगाचा प्रकाश डोळ्यांवर एकदम पडल्याबरोबर **शिलादित्याचे** नेत्र अगदीं दिपून गेले, व जरी कांहीं वेळपर्यंत त्या प्रकाशांत राहिलों असतां आपणास त्याकडे डोळे उघडून पाहतां येईल असें त्यास वाटलें होतें, तरी कांहीं केल्यानें त्याचे नेत्र नीट उघडेनातच. हा प्रकार कांहीं वेळ चालू राहिल्यावर **वरदकालानें** दुसरा एक पदार्थ एका झांकणाखालून काढून **दीक्षितदत्ताचे** हातीं दिला, व तो पदार्थ त्यानें त्या भिंगाचे पाठीमागें चिकटावून ठेविला. त्याबरोबर त्या भिंगाचा सूर्यतेजासारखा प्रकाश कमी होऊन ज्याप्रमाणें पौर्णिमेच्या चंद्राची प्रभा शांत व नयनसुखदायक असावी, त्याप्रमाणें तो प्रकाश वाटूं लागला. तेव्हां मात्र **शिलादित्यास** डोळे उघडतां आले, व तो हा काय चमत्कार असावा म्हणून गोधळांत पडला आहे अशा स्थितींतच **दीक्षितदत्तानें** त्या कंदिलावर एक काळ्या कडक्याचें आच्छादन घातलें. त्यायोगें त्या खोलींत पुनरपि सर्वच अंधकारमय झालें. इतक्यांत **वरदकालानें** त्वरा करून त्या भिंगाचे पुढें एक शेगडी आणून ठेविली, व फुंकर घालून घालून तींतील विस्तव अंमळ फुलिवला, तेव्हां **दीक्षितदत्तानें** त्यास अंमळ एका अंगास सरण्यास सांगून आपण पुढें येऊन उभा

राहिला, व त्यावरून कांहीं एक तव्यासारखा पदार्थ झांकण घालून तो तापल्यावर त्याजवर प्रथमतः ऊद घातला; व त्याचा भपकारा चौहोंकडे पसरतो आहे, इतक्यांत दुसरा एक पदार्थ त्यांत टाकला, व मागाहून एका पाठीमागून एक असे अनेक पदार्थ त्यांत घालीत राहिला. हा प्रकार सुमारें अर्धी घटिका तरी चालला असेल. व इतक्या अवकाशांत प्रत्येक पदार्थ घातल्यावर एका मागून एक निरनिराळ्या रंगांचे प्रकाश सर्व खोलीभर पसरत; व त्या प्रकाशांबरोबर प्रथमतः कांहीं वेळपर्यंत अतिशय घाण सुटून तो नाक उघडें ठेवण्याचा इलाज नाहीं अशीच स्थिति करून टाकी, परंतु कांहीं वेळानें मात्र त्या पदार्थांच्या योगानें उत्पन्न होणारे किरण विशेष नयनतोषकर निघूं लागून हवेंत सुगंधही बराच पसरूं लागला, व अखेर ते पदार्थ घालावयाचें संपलें, त्या वेळीं नयन आणि नासिका या उभयतांसही सुखकारक अशा प्रकाशाची आणि सुगंधाची **शिलादित्यास** प्रतीति झाली. असो. इतका सगळा प्रकार घडल्यावर **दीक्षितदत्तानें शिलादित्यास** त्या चौरंगापुढें बसावयास सांगितलें, व त्याप्रमाणें तो बसल्यावर **दीक्षितदत्त** त्यास बोलला:— "**शिलादित्या** ! संभाळ ! पहा येथून जर एक केंसभरही इकडे तिकडे करशील तर ताबडतोब प्राणांसच मुकशील ! " इतकें बोलून त्या दोघां गुरुशिष्यांनीं कांहीं मंत्र मोठ्यानें जपण्यास आरंभ केला. कांहीं वेळ गेल्यावर वरच्या अंगानें एकदम मोठ्यानें कळकला व गडगडाट ऐकूं येऊं लागले, व कांहीं वेळ तर त्या खोलीचें छत त्या सर्वांच्या मस्तकावर एकदम कोसळून पडून सर्वांचा त्या खालीं चुराडा होतो कीं काय अशी **शिलादित्याचे** मनास भीति वाटूं लागली. इतक्यांत तो कलकला व गडगडाट हीं बंद झालीं, व मागाहून **गंधर्व** किंवा दुसरे कोणी दिव्य प्राणी मधुर गायन करीत असल्याप्रमाणें आवाज ऐकूं येऊं लागला.

तो ऐकून **दीक्षितदत्त** बोलला:—"आतां एकूण एक तयारी झाली आहे, तर सांग, तुझ्या मनांत आतां काय पहावयाचें आहे ? "

शिलादित्य उत्तर करितो:—" दुसरें कांहीं नाहीं. हल्लीं मी ज्या एका प्रचंड कृत्यांत गुंतलों आहें, त्याचं कसें काय होणार एवढेंच मला कळावयास पाहिजे आहे. "

" मर्जी तुझी ! " असें म्हणून **दीक्षितदत्ता**नें एक वेळ हातवारा केल्याबरोबर त्या भिंगावरचा काळा पडदा एका बाजूस सरला, व त्याबरोबर त्या भिंगांत एक काळ्या आकृतींची गर्दीच गर्दी **शिलादित्याचे** दृष्टीस पडली. ह्या आकृतींकडे **शिलादित्य** लक्षपूर्वक पहात असतां त्यांमध्यें सर्वोपरी त्याच्या सारखीच अशी एक आकृति त्यास दिसली, व त्या आकृतीजवळ एक मोराचें पीस हातीं घेतलेली **जैन** यतीसारखी दुसरी एक आकृति असून ती त्या **शिलादित्या**कडून शपथ वाहून घेत आहे असा भाव दिसत होता.

" तूं या आकृति ओळखतोस ? " **दीक्षितदत्ता**नें विचारिलें.

" होय, या एकूण एक माझ्या ओळखीच्या आहेत. " **शिलादित्या**नें उत्तर केलें.

"ठीक आहे. फिरून पहा." **दीक्षितदत्ता**नें म्हटलें.

दीक्षितदत्त या प्रकारें बोलतो आहे, तों त्या आकृति एकामागून एक अदृश्य होऊं लागून त्या भिंगावर एक नवीनच प्रकार दिसूं लागला. एक अंधार कोठडी असून तींत एका

कोपऱ्यांत एक लामणदिवा टिकटिक जळत टांगला होता, व त्याच्या अस्पष्ट प्रकाशांत कांहीं लहान मोठे लांकडाचे ओंडे निरनिराळ्या प्रकारांनीं रचिले असून त्यांच्या भोंवतीं भिंतीशीं कांहीं जिनसा भरलेले मोठमोठे थैले उभे केले होते.

दीक्षितदत्त विचारितोः—" कायरे, एवढ्यानें तुझी तृप्ति होते कीं नाहीं ? "

शिलादित्य धैर्यानें उत्तर करितोः—" भलतेंच ! आतां ह्या ज्या गोष्टी मीं पाहिल्या ह्या साऱ्या पूर्वी घडलेल्या हकीकतीबद्दलच्याच आहेत, परंतु ह्या गोष्टींचा भावी परिणाम काय आहे तो मला कळावयास पाहिजे. "

" आतां बरीक नशीब तुझें. " **दीक्षितदत्त** म्हणाला, व रागानें पाय भुईवर आदळून त्यानें पुनरपि कांहीं हातवारे केले.

त्यांबरोबर दहा पांच अंक मोजी तोपर्यंत त्या भिंगांचा पृष्ठभाग अगदीं काळवंडून गेला, व तेवढ्या अवकाशांत त्या खोलींत त्या शेगडींतल्या विस्तवाचा किंचित् तांबूस रंग मात्र कायतो दिसत होता. परंतु इतक्यांत पहातो तों तें भिंग अंमळ उजळून त्यांत कैदी लोकांस पुरण्याची मसणवटी दिसूं लागली, व तींत कांहीं कैदींना मिठाशिवायच पुरलें आहे, व कांहींकरितां जमिनींत खड्डे खणीत आहेत असा त्यास भास झाला. इतक्यांत तो मसणवटीचा भाग नाहींसा होऊन त्याचे जागीं भयंकर तुरुंगांतील अंधार कोठड्या असून त्यांत अन्नपाण्यावांचून रोड झालेले व काळजीनें आणि दुःखानें अगदीं सुकून गेलेले असे कांहीं कैदी असून ते त्यांच्याच पायाशीं एक आडवी आकृति पडली होती तिजकडे बोटें दाखवीत आहेत असें दृष्टीस पडलें. ही आकृति कोणाची हें **शिलादित्या**च्या प्रथमतः लक्षांत आलें नाहीं; परंतु अंमळशानें पहातो, तों ती आकृति थेट त्याच्या सारखीच असून तिचे हात आणि पाय चरकांत घालून आवळून धरिले आहेत, व त्यायोगानें होणाऱ्या वेदना न सोसल्यामुळें-ती आकृति विवळत पडली आहे असा प्रकार दिसूं लागला. तो पाहिल्याबरोबर **शिलादित्या**नें एकदम भीतीनें किंकाळी ठोकली, व लागलीच त्या भिंगावर त्या काळ्या पडद्याचें झांकण पूर्ववत् पडलें.

इतका प्रकार झाल्यावर **शिलादित्य** त्या ठिकाणीं सुमारें एक घटकाभर होता, नंतर **दीक्षितदत्ता**चा निरोप घेऊन तो परत आपले बिऱ्हाडीं आला.

प्रकरण ९.

दुसरे दिवशीं सर्व मंडळी निजून उठल्यावर **शिलादित्य** व **जरठकर्ण** जती ह दोघे एकांतांत पुष्कळ वेळपर्यंत बोलत बसले. **शिलादित्या**च्या तोंडून आदल्या दिवसाच्या रात्रीचा सर्व वृत्तांत ऐकून जती अगदीं घाबरल्यासारखा दिसूं लागला, तरी त्यानें बाहेर आल्यावर आपण घाबरलों असें तोंडावाटे बोलून दाखविलें नाहीं. तो बराच वेळ आपणाशींच विचार करीत राहिला, व त्याच्या मुद्रेवरून आतां आपण पुढें काय करावें याविषयीं तो अगदीं मोठ्या फिकिरींत पडल्याचें दिसत होतें. हें त्याचें चिन्ह पाहून **त्रिवेणी**च्या मनासही भीति वाटूं लागली, व सरतेशेवटीं तिनें आपल्या मनाचा धडा करून **जरठकर्णा**स कांहीं नवीन भय उपस्थित होण्याचा संभव आहे किंवा कसें म्हणून विचारिलें.

तें ऐकून **जरठकर्णा**नें म्हटलें:—" वत्से !

मला कशाबद्दल भय वाटत आहे हें माझें मलाच समजत नाहींसें झालें आहे. तरी पण जी कांहीं हकीकत घडून आली आहे, तीवरून आपण या ठिकाणीं फार वेळ सुरक्षित राहूं असें मला मुळींच वाटत नाहीं. याकरितां रात्र झाली कीं आपणास येथून निघून गेलेंच पाहिजे."

हें ऐकून **त्रिवेणी** घाबरून विचारिते:- "कसें झटलेंत, आपण येथें दडून राहिलों आहों हें त्या मेल्यांना कळलें आहे?"

जरठकर्ण उत्तर करितो:—"कोतवालाला आम्हीं येथें दडलों आहों हें कळलें असेल असें कांहीं मला वाटत नाहीं. तरी पण अगदीं सकाळच्या प्रहरीं मी एक मनुष्य बाहेर पाठविला होता, तो आतां इतक्यात परत आला, त्याच्या सांगण्यांत आपण जें समजत होतों कीं कोतवाल **चसतरु** गांवाच्या वाटेनें निघून गेला तें सर्व खोटें तो हल्लीं आपण ज्या भागांत आहों त्या भागांतच खबर घेत फिरत आहे. मला जो कोणी पकडून देईल त्याला मोठें इनाम मिळेल म्हणून त्यानें दवंडीही पिटविली आहे, व आपण **पुनमली** शहराप्रर्यंत आलों खचित ह्याचा त्यास माग लागला असून आपण त्याच्या हातीं लागेपर्यंत आपण प्रत्येक घराचा झाडा घेतल्याशिवाय कध्धीं रहाणार नाहीं, म्हणून तो बोलूनही गेला आहे. तसेंच त्यानें शहरच्या या भागांत नवीन जास्ती हत्यारबंद शिपाई आणिले असून त्याला जेवढीं म्हणून संशायाचीं ठिकाणें वाटतात, तेवढ्यांचा तो हल्लीं एकसारखा झाडा घेत फिरत आहे."

"बाबा!" **त्रिवेणी** जतीस विचारिते. "असें जर तुमचें म्हणणें आहे, तर येथें घटकाभर राहून तरी उपयोग कोणता? चला कसे आपण आत्तांच्या आत्तां येथून निघून जाऊं!"

जती बोलतोः—वत्से! तूं चुकतेस. अशानें कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं तर नाहींच, परंतु उलटें पुढें संकट यावयाचें तें मात्र अगोदरच अंगावर येऊन शेकेल. तो कोतवाल कांहीं अगदीं भोळा नाहीं. त्यानें सर्व शहरांत चोंहीकडे नाकेबंदी करून टाकिली आहे, आणखी प्रत्येक लहान मोठ्या रस्त्याच्या तोंडावर हत्यारबंद शिपाई उभे करून ठेविले आहेत, व त्या शिपायांना जर कोणाचा संशय आला तर त्याची अगोदर पुरतपास्त करितात, तेव्हांच ते त्यांना जाऊं देतात."

"**अर्हत्! अर्हत्!**" **त्रिवेणी** घाबरून उद्गार काढिते.

जती पुढें बोलतोः—"बाळे **त्रिवेणी**! एवढ्यानेंच सर्व झालें असें नाहीं. आणखीही ऐक. कशी काय खटपट झाली असेल ती असो, किंवा काय चमत्कार असेल तो असो, आपल्या **जैनधर्माचे** जे अगदीं मोठे दृढ खांबच, अशा लोकांनीं जे कांहीं हेतु मनांत आणिले आहेत, त्यांबद्दलची माहिती जादूनें म्हण, किंवा पिशाच साधनानें म्हण, त्या दुष्ट **हिंदुधर्म्यांना** कळून आली आहे; आणखी त्या योगानें आपल्या धर्मापैकीं पुष्कळ मोठ मोठ्या लोकांच्या प्राणांवरही येऊन बेतण्याचा आज प्रसंग आला आहे. फारें तर काय सांगूं? मला या वेळीं तुझ्या प्रिय पित्याचाही काय परिणाम होईल याचा कांहीं नेम लागत नाहीं."

हें ऐकून **त्रिवेणी** घाबरून म्हणतेः—"बाबा! बाबा! तुम्हीं म्हणतां आहां तरी काय? तुमचें बोलणें ऐकून मला पहा कसेसेंच होऊं लागलें आहे!"

इतक्यांत **शिलादित्य** आवेशानें बोलतोः—"जती महाराज! माझ्या सर्वांगास जरी चोंहों-

कडून अग्नि लाविला, किंवा माझ्या तोंडून यत्किंचितूही हकीकत कळावी म्हणून मला कोणीं. कितीही वेदना दिल्या, तरी माझ्या तोंडून एवढा एक चकारशब्द सुद्धां बाहेर पडणार नाहीं. "

त्यावर जती उत्तर करितो:—" शिलादित्या! तूं म्हणतोस ती गोष्ट खरी आहे, व त्याप्रमाणें माझाही दृढ निश्चय आहे! त्या दुष्टा असद्धर्म्यांनीं आपल्या पवित्र धर्माचा उच्छेद करण्याची खटपट करितांना अर्हत्प्रभूच्या या नम्रदासाचा कितीही छळ केला, तरी अर्हत्प्रभूच्या सद्धर्मावरील श्रद्धा हीच माझा निश्चय कायम राखील, तींत कधीं अंतर पडूं देणार नाहीं ! व माझ्या तोंडून त्या दुष्टांना यांतली एवढी सुद्धां बातमी कळावयाची नाहीं ! "

त्रिवेणी बोलली:—"बाबा! तुम्हीं म्हणतां तेंच माझेंही म्हणणें आहे, व माझेकडून त्या मेल्यांन तुमच्या बेतांतली एवढीसुद्धां गोष्ट कळायची नाहीं. कारण जरी तुमच्या बोलण्यावरून ज्याच्या योगानें आणखी दुसरे कोणी मयांत गोंवतील असें मला कांहींच कळलें नाहीं, तरी आपल्या या सद्धर्माची पुनरपि संस्थापना करण्याकरितां कांहीं तरी खटपट हल्लीं चालू आहे, आणखी ही खटपट मूळ सुरू करणारा कार्तिकशंभु असावा असेंही मला खात्रीनें वाटतें आहे. "

हे शब्द ऐकिल्याबरोबर जरठकर्णाची अंत:करणवृत्ति अस्वस्थ होऊन जाऊन तो म्हणाला:—" काय ? काय ? वत्से! काय म्हटलंस तूं ? "

त्रिवेणी उत्तर देते:—"बाबा ! तुम्हीं पण इतके घाबरतां काय म्हणून ? मीं तुम्हांला आतांच नाहीं का सांगितलें, कीं यावद्दल त्या मेल्यांनीं मला कितीही छळिलें, तरी माझ्या तोंडून एक शब्दही बाहेर पडायचा नाहीं न् मी तुमचा विश्वासघात करणार नाहीं ? तरी पण ज्या ठिकाणीं मला एकादी गोष्ट तुमच्या कल्याणाची वाटेल, त्या ठिकाणीं तुम्हांला ती सांगितल्याशिवाय मी कधीं रहायची नाहीं. तुम्हीं हल्लीं ज्या कांहीं खटपटींत पडलां आहां, तिच्यापासून तुमच्या जिवालाही कदाचित् अपाय पोंचेल, व ज्या सद्धर्माच्या संस्थापनेकरितां तुम्हीं झटत आहां तिला मात्र विघ्नें अधिक येतील. याकरितां मी बोलतें ऐकून घ्या. तुम्हीं उगीच असे भलत्याच गोष्टीच्या भरीस पडूं नका. अर्हत्प्रभूच्या धर्मांत अहिंसा ही मुख्य मानिली आहे, असें असून तुम्हीं भयंकर हिंसा करण्याच्या खटपटींत पडलां आहां. याकरितां तुमची खटपट अर्हत्प्रभूला आवडायची नाहीं, व त्यामुळें या कामीं तो तुम्हांस मदत करील असें कदापि होणार नाहीं, व यांत तुमचा नाशच निश्चित होईल. "

त्रिवेणीचें हें भाषण ऐकून जरठकर्ण उगाच राहिला, व तो आणि शिलादित्य एका अंगाला चालते झाले. इकडे त्रिवेणी मनांतल्या मनांत दु:ख करीत विचारांत गढून गेली.

इतका प्रकार झाल्यावर फार वेळ झाला नाहीं तोंच खोलीचें दार एकदम उघडलें, व वसुभद्राचार्य एकदम आंत घुसला. त्याच्या मुद्रेवरून त्यास कांहीं तरी भिण्याचें कारण झालें असावें असें दिसत होतें, व तें पाहून त्रिवणान कांहीं तरी संकट अगदीं नजीक येऊन ठेपलें आहे म्हणून अनुमान केलें. वसुभद्राचार्य आंत शिरण्यापूर्वीं ती दु:खानें खालीं भुईवर बसली होती, ती त्यास पाहून उठून उभी राहिली, आणखी तिनें काय झालें आहे म्हणून वसुभद्राचार्यास प्रश्न केला.

मुलांच्या अंगावर घालण्याचे दागिने मोजून माझ्या स्वाधीन केले, व आपण कायसेंसें करीत बसली. इतक्यांत ज्यांच्याकरितां आजच्या मेजवानीचा थाट ते गृहस्थ येत असल्याची वरदी आली, त्यावरोबर **ताराबाई** हातचें काम एका अंगास करून खालीं निघून जाणार, तों दुसरा एक चाकर हलकेच वरती आला, आणि बाहेर कोणी बहुरूपी आला आहे, व आज आपल्या येथें मेजवानीकरितां जमलेल्या गृहस्थांनीं माझें एकवार सोंग पहावेंच असें त्याचें म्हणणें आहे म्हणून सांगूं लागला. **ताराबाईनें** "मला जरूर नाहीं. त्याला निघून जायला सांग" म्हणून सांगून त्याला पाठवून दिलें. कांहीं वेळानें तो चाकर फिरून वर आला, आणखी भीत भीत "तो कांहीं जात न्हाई, आणखी म्हंगतो मी **ज्येनुरीस्न म्हादवा.** च्या पालाला आलों व्हतों, आन् ततन् फिरत फिरत मुद्दाम ह्ये गांवीं आलोंया ! आन् **मंगळाईच्या** जोसप्यास्नी पन् मी गेलों व्हतों" म्हणून सांगूं लागला. चाकराच्या तोंडचे ते शब्द ऐकून काय चमत्कार असेल तो असो— निदान त्या वेळीं तरी मला तो चमत्कार वाटला—**ताराबाईनें** फडताळांतून एक रुपया काढला आणि तो चाकराच्या हातीं देऊन त्याला म्हणाली:—"जा रुपया त्याला नेऊन देऊन त्याला म्हणावें आतां घरांत गडबड आहे, तूं जा, आणखी केव्हां तरी फिरून ये म्हणजे तुझें सोंग पाहूं." तिचें म्हणणें ऐकून चाकर परत निघून गेला, व सुमारें पांच पन्नास अंक मोजी इतका वेळ झाला नाहीं तोंच फिरून परत आला, आणि धड तोंडानें शब्दही उमटत नाहींत इतका भीत भीत तो **ताराबाईस** म्हणाला:— "त्ये भोरपीनं त्यो रुपया घेतला, पन म्हंगतो, ह्यो रुपया माजाच हाये, त्यो मी घ्येतों, पन् ह्ये समद **भाऊसाब नानासाब** जमलयात, त्येंना मी स्वांग तर दावनारच्च! मी कुनाच्या बाचंबी ऐकायचा न्हाय!"

चाकराच्या तोंडचे हे शब्द ऐकून **ताराबाईचें** धाबें दणाणल्यासारखें झालें. तिनें चाकराला निघून जा म्हणून हातानें खूण केली ती समजून तो बिचारा निघून गेला. मागें **ताराबाईचें** ताडगोरेमोरें होऊन इतका वेळ आरशांत पहात राहून नट्टापट्टा केलेल्या तोंडावर दरदरावून घाम आला, व तिच्या तोंडांतून एक अक्षरही निघेनासें झालें. तिची ही स्थिति पाहून मला मोठा चमत्कार वाटला, व हा काय प्रकार आहे याचा उमज न पडल्यामुळें जिवाला कांहीं भीतिही वाटू लागली. **ताराबाई** त्या माडीवर खिडकीच्या आड्या लांकडांना धरून बसली होती. पण तिला तेथून हलण्याचीही शुद्ध नाहींशी झाली, व तिचे डोळे एकसारखे रस्त्याच्या दाराकडे लागलेसें भासत होतें, तरी त्या उघड्या डोळ्यांनींही तिला त्यावेळीं कांहीं दिसत होतें कीं नाहीं याचा मला संशयच वाटतो. असो. तेव्हां अशा स्थितींत मुलांना दागिने घालावयाकरितां वरती आणिलें होतें याच्या शुद्धीचा गोष्ट कशास पाहिजे ! मुलें तर नेहमीच्या सवईप्रमाणें मांड्या कुंड्यांची सांडलवंड करीतच होतीं, व धाकटें बाळ तर माझ्या पाठीला खारीप्रमाणें चिकटून राहिलें असून वरचेवर पुढें ओणवें होऊं पहात होतें. व माझ्या तोंडांतूनही त्यावेळीं एक शब्द देखील निघेना अशी माझी स्थिति होऊन मी नुसती हातांनींच त्याला आवरून धरीत होतें. यावेळीं त्या पोरांनीं माझ्यावर एक मात्र दया केली होती ती हीकीं, त्यांची त्या माडीवर सांडलवंड

जरी चालली होती, तरी त्या सांडीलवंडीच्या आवाजांत त्यांच्या रडण्याचा आवाज मिसळला नव्हता. असो; ही स्थिति सुमारें शंभर दीडशें अंक मोजी तोंपर्यंत चालली असेल नसेल, इतक्यांत ज्या पाहुण्याकारितां म्हणून आजच्या मेजवानीची तयारी झाली होती तो पाहुणा खालीं आल्याची गडबड अंगण्यांतून ऐकूं आली, व ती बंद होते आहे नाहीं तों इतक्यांत खालून एक चाकर सगळ्या मुलांना पाहुण्या गृहस्थांकडे घेऊन जाण्याकारितां वर आला. त्याच्या हातांत तीन खाऊंचे पुडे होते. ते त्यानें मुलांस दाखविले, त्याबरोबर थोरलीं मुलें सांडाय लवंडायचें टाकून देऊन त्यांजकडे धांवलीं, व धाकट्या **जनकूनें**-ही माझ्या पाठीवर ओणवें होण्याचें टाकून देऊन त्याच्याकडेच ओढ घेतली. इतकें झाल्यावर तो चाकर मुलांना घेऊन खालीं गेला, व मी तेथंच राहिलें. त्या वेळचा काय चमत्कार असेल तो असो; **ताराबाईची** ती अवस्था पहात आपण जवळ राहूं नये, व तेथून हलक्याच पायानें काढतें व्यावें म्हणून दोन चार वेळ मनांत गोष्ट आली, परंतु इतका वेळ झाला तरी **ताराबाईचें** हां नाहीं कीं हूं नाहीं, तिचे डोळे मात्र उघडे असून ती बेशुद्ध माणसासारखी एकसारखी रस्त्याच्या दरवाज्याकडे टक लावून पहात राहिली होती. ही गोष्ट माझ्या जिवाला भयंकर वाटली; व त्यामुळें अशा स्थितींत तिला एकटीलाच तेथें टाकून जाणें चांगलें नाहीं असेंही वाटलें. मी प्रथम मुलांना दागिने घालण्याकारितां वर घेऊन आलें, ती पहिल्यानें माडीवर मध्यभागींच उभी होतें, परंतु इतक्यांत **जनकू** खालीं भुईवर बसून माझे आंचे धरून मला खालीं ओढूं लागला, त्यामुळें निरुपाय होऊन मी खालीं बसलें, व पुढें **जनकू** खालीं निघून गेल्यावरही तेथें तशीच बसून होतें. मग तेथून पुढें कशाकरितां उठलें असेन याची मला कांहीं आत्तां आठवण नाहीं, पण इतकें खचित आहे कीं, कांहीं वेळानें मी तेथून उठून खिडकीशीं जाऊन अंगण्याकडे पहात राहिलें. त्या वेळीं अंगण्यांत गांवांतील कित्येक गृहस्थ मेजवानीकारितां बोलाविले होते, त्यांपैकीं कित्येक येतच होते; व एक दोघे यावयाचे राहिले होते त्यांना बोलवायला माणसें पाठविण्याची धांदल चालली होती. अशा वेळीं **ताराबाई** नीट शुद्धीवर असती, तर तिनें सर्व व्यवस्था वरोवर लाविली असती. परंतु ती तर अशी स्थिति होऊन बसली होती यामुळें एकट्या **संभाजीरावां**च्या हातून तें काम तडफडीनें पार पडण्याची अडचण पडूं लागली. ते कांहीं वेळ कोठें चाकर मनुष्यें आहेत कीं नाहींत म्हणून नुसते पहातच राहिले, व सरते शेवटीं एकदा त्यांच्या दृष्टीस चाकरमाणसें पडलीं तेव्हां त्यांनीं त्यांना बोलावण्यांकडे पाटवून दिलें, व आपण स्वतः बहिर्दिशेला निघून गेले. इतक्यांत बाहेरच्या दाराकडे हैस ओरडल्याचा आवाज ऐकूं आला. तो ऐकून जमलेली सर्व मंडळी सहज इकडे तिकडे करिताहेत, तोंच पुनरपि दाराशींच गाढव ओरडल्याचा आवाज कानीं पडला. तेव्हां या गोष्टीचा त्या मंडळीस अमळ विस्मय वाटून ते अंगणाच्या पायरीजवळ येत आहेत, तों त्याच ठिकाणीं घोड्याचें खंकाळणें ऐकूं आलें. या तीन आवाजांपैकीं पहिला आवाज ऐकूं आल्याबरोबर मी सहजावृत्या **ताराबाई**कडे पाहिलें, तों ती किंचित् दचकल्याचा भास झाला, व इतक्यांत पहातें तों

ती पूर्ववत् चित्राप्रमाणें तटस्थ होऊन राहिली. त्यावर दुसऱ्यानें आवाज ऐकूं आला, तेव्हां मी फिरून तिजकडे पाहिलें असतां तोच प्रकार माझ्या दृष्टीस पडला. त्यावरून तिसऱ्या आवाजाच्या वेळेस मात्र मीं मुद्दाम तिजकडे लक्ष देऊन पाहिलें, तों तो आवाज ऐकल्याबरोबर तिचें सर्वांग एकदम थरथरलें, व छाती उडूं लागून पूर्वापेक्षांही तिच्या अंगावर व तोंडावरून अधिक घाम लोटला. तो इतका कीं, जो मोठ्या लफ्त्याचा शालू ती कांहीं वेळापूर्वीं दोन घटिका सख्त टापटीपेनें नेसत होती, तोच शालू त्या घामामुळें पुष्कळच ठिकाणीं भिजून चिंब होऊन गेला. असो. हा इतका प्रकार झाला असतां रस्त्याच्या दाराकडून, एकादा चोर चोरी करण्याकरितां आला असतां त्याच्या अंगावर चोहींकडून कुत्रीं भोंकूं लागावींत व तो चोर घाबरून जाऊन त्यानें किंकाळ्या ठोंकूं लागाव्या, अशासारखे दोन आवाज मिसळलेले ऐकूं आले. हे आवाज ऐकूं आल्याबरोबर मी फिरून ताराबाईकडे पाहिलें तों तिची पूर्वींप्रमाणेंच सर्व स्थिति झाली असून ती एकदम आपलें डोकें खिडकीच्या गजावर टेंकून पडल्यासारखी झाली. हा प्रकार पाहून मात्र मला फार वाईट वाटलें, व ताराबाईच्या जवळ जाऊन तिला सावध करावें म्हणून मनांत आणिलें, तोंच तिनें डोकें पुनरपि वर उचलून परत रस्त्याच्या दाराकडे पहात रहाण्यास आरंभ केला. इतक्यांत खालीं अंगणांत गलबला ऐकूं येऊं लागून मी तिकडे पाहूं लागलें. पहातें तों एक घाबरल्यासारखा दिसत असलेला मनुष्य रस्त्याचें दार जोरानें रेटून आंत घरांत घुसला, आणखी अंगणांत इकडे तिकडे धांवूं लागला, तेव्हां मात्र जमलेल्या मंडळीस हा खरोखरी कोणी चोर असें वाटून ते त्यास धरण्याकारितां पटापट अंगणांत उतरूं लागले. इतक्यांत रस्त्याच्या दरवाजानेंच आणखी चार पांच मनुष्य शिपायासारखे पोशाख केलेले "चोर ! चोर !" म्हणत घरांत घुसले; व ते इकडे तिकडे करिताहेत, तों तो पहिला चोरासारखा वाटलेला मनुष्य उभा राहून व वेड्यावांकड्या वांकोल्या करूं लागून, मोठ्यानें खदखदां हंसला, व त्याबरोबर ते शिपाई वाटलेले मनुष्यही खदखदां हंसले. हा चमत्कार पाहून मेजवानीकरितां जमलेली सर्व मंडळी बुचकळ्यांत पडल्यासारखी झाली. हें पाहून तो पहिला मनुष्य पुढें आला, आणि कांहीं चमत्कारिक वांकोल्या करून त्यांना "आम्हीं सर्वजण बहुरूपी आहों, आमच्यापाशीं कांहीं अजब तमाशा आहे" म्हणून सांगूं लागला. इतक्यांत त्या शिपायांतलाच एकजण पुढें येऊन म्हशीसारखें ओरडला, तों लागलाच दुसऱ्यानें गाढवाचा व तिसऱ्यानें घोड्याचे खंकाळण्याचा असे तोंडावाटे आवाज काढिले; व लागलीच तो पहिला मनुष्य वेड्यावांकड्या किंकाळ्या ठोकूं लागून ते बाकीचे तिघे कुत्र्याप्रमाणें भोंकूं लागले. हा इतका वेळ सांगितलेला प्रकार प्रत्यक्ष अनुभविल्यावर हे बहुरूपी मोठे अजब तमासगीर असावेत असें कोणास बरें वाटणार नाहीं? असो; त्या चौघां बहुरूप्यांच्या त्या नकला पाहून त्या सर्व मंडळीस मोठें कौतुक वाटलें, व ते फार चांगले तमासगीर आहेत अशी त्यांची खातरी झाली. त्यावेळीं आंत घरांत मेजवानीची सर्व तयारी झाली होती, परंतु दोन तीन गृहस्थ यावयाचे राहिले होते, यामुळें ते येत तोंपर्यंत यांचीं एक दोन सोंगें पहायला हरकत नाहीं असा मंडळींत विचार निघाला, व

तो सर्वांस पसंत पडून त्यांनीं त्या बहुरूप्यांस सोंगें तयार करायला किती वेळ लागेल ह्मणून विचारलें, तेव्हां त्यांनीं "वेळ कसचा ? आत्तां सोंगें तयार होतील" ह्मणून सांगितलें. ही गोष्ट मंडळीनीं कबूल केल्यावर त्या तमासगिरांनीं अंगणांत एका कोंपऱ्यांत एक धोतर आंतलें कोणास कांहीं दिसूं नये याकरितां आडवें बांधिलें, व त्याच्याआड ते सर्वजण जाऊन बसले. इतका प्रकार होत असतां मी वरचेवर तारा-बाईकडे पहात होतें. तों तिच्या जिवाची एकच धांदल दृष्टीस पडत होती. असो; त्यावेळीं तिच्या अंतःकरणाची स्थिति कशा प्रकारची झाली असेल हें माझ्यानें नेमकें सांगतां येणें शक्यच नाहीं, तथापि तिच्या बाह्य चिन्हांवरून तिचा आणि त्या बहुरूप्यांचा कांहीं तरी संबंध असावा, व तो संबंध बाहेर सर्व लोकांत फुटूं पहात आहे तो फुटूं नये असें तिच्या मनांत होतें असें खचित वाटायाजोगें होतें. असो; तिची अशा प्रकारची स्थिति झाली असतां सुमारें पाव घटिका लोटली. तों ती मेजवानीची मंडळी आतां कांहीं मोठी मौज दृष्टीस पडेल ह्मणून मोठ्या हौसेनें आपआपसांत कुजबुजत होती. इतक्यांत सोंगें झांकण्याकरितां वर सांगितल्या-प्रमाणें बांधलेलें धोतर अंमळ एका अंगास करून एक सोंग बाहेर पडलें. तें सोंग मुरळीचें होतें, व तिनें बाहेर पडल्यावरोवर आरंभीं कांहीं वडावांकडीं मुरळ्यांचीं गाणीं गायलीं. तीं गाणीं कोणचीं हें माझ्यानें सांगवत नाहीं. तथापि इतकें खचित आठवतेंसे वाटतें कीं, त्या गा-ण्यांत जेजुरीच्या खंडोबाला नमन करण्या-पलीकडे कांहीं निराळा अर्थ नव्हता. हीं गाणीं संपताहेत तों पडदा एका अंगास करून दुसरें एक सोंग बाहेर पडलें, व तें सोंग वाघ्याचें असून तें बाहेर पडल्यावरोवर त्यानेंही खंडोबाचीं एक दोन गाणीं ह्मटलीं, आणखी मग तीं सोंगें एकमेकांशीं बोलूं लागलीं. त्या बोलण्यांत विचकटपणाचा प्रकार पुष्कळच होता, व त्यांच्या मागून जीं सोंगें आलीं त्यां-च्या बोलण्यांतही चावटपणाचे शब्द पुष्कळच होते, पण ते लज्जेस्तव माझ्यानें या ठिकाणीं सांगवत नाहींत, याकरितां तमाशांत त्यांनीं करून किंवा बोलून दाखविलेला भाग समग्र वर्णन करीत न बसतां त्याची गोष्ट मात्र मला जशी आठवते आहे तशी सांगतें. ती गोष्ट अशी. जेजुरी गांवांत एक लहान मुलगी खंडोबास वाहिली होती. ती रूपानें मध्यमच होती, तथापि ती वयांत येऊं लागली तेव्हां तिच्याशीं बायकोपणाचे व्यवहार पुष्कळ वाघ्ये करीत होते; व ती खंडोबास वाहिली असल्यामुळें त्या व्यवहारांत तिच्याकडे लोकसमजुतीप्रमाणें कांहीं दोष येण्याजोगाही नव्हता, तथापि त्या मुलीला तशा प्रकारें रहाणें व त्यांतच सर्व आयुष्य घा-लविणें हें आवडेनासें झालें. असें होण्याचें कारण तिला त्या व्यवहारांची मनापासून चीड होती अशांतलें नव्हे, तर तिच्या स्वभावाला गरीबींत रहाणें आवडत नसे हें होय. असो. जेव्हां ति-च्या मनाची अशी स्थिति झाली, तेव्हां तिनें एकदा ती गोष्ट एका ज्ञात्या वाघ्यापाशीं काढिली, तेव्हां पहिल्या प्रथम त्याला तिच्या ह्मणण्याचें फार आश्चर्य वाटलें. कारण त्याच्या समजुतीप्रमाणें, या जगांत स्त्रियांना यथेच्छ विषयसुख मिळणें, आणखी तेंही यळकोट ह्मणत मल्हारी मार्तंडाच्या सेवेंत राहून, यांतच काय तो परमार्थ होता. तथापि तो वाघ्या पैशाचा अंमळ लोभी होता; व त्या मुलीनें "जर तूं मला कोटें घेऊन जाशील, आणखी तूं चांगला

मराठा असून मी तुझी मुलगी आहें, व माझें लग्न व्हायचें आहे म्हणून सांगून लग्न जुळवून देशील, तर मी तुला दरवर्षी निदान १००।१५० तरी रुपये पोंचवीत जाईन. मात्र लग्न जुळवून देशील तें चांगल्या श्रीमंत घराण्यांतील मराठ्याशीं असलें पाहिजे." त्या मुलीनें सालीना १००।१५० रुपयांची गोष्ट काढल्याबरोबर, ती मुलगी कुरूप होती तरी ती त्या म्हाताऱ्याच्या दृष्टीनें सुंदरच दिसूं लागली. पुढें त्यानें ह्याबद्दलची गोष्ट दुसऱ्या एका तरुण बाह्याशीं काढून आपण दोघे मराठे बापलेक बनले, आणखी या मुलीला बुरखा देऊन ती आपली मुलगी म्हणून सांगण्याचा बेत ठरवून तिजसमागमें बाहेर पडले. बाहेर पडल्यावर महादेवाचें पाल म्हणून एक गांव आहे तेथें आले, आणि तेथें एका ठिकाणीं बिऱ्हाड ठेवून त्याच गांवीं जेवणेकरितां पुष्कळ लोक आले असतां त्या गांवच्या एका कुंटण्यामार्फत त्यांनीं एका श्रीमंत मराठे गृहस्थास गांठलें. हा गृहस्थ जोसपें म्हणून गांव आहे तेथला रहाणवाला होता. त्याचें पहिलें कुटुंब नुकेंच निवर्तलें असून तो दुसरें लग्न करण्यासाठीं उत्सू झाला होता. हें जाणून आतां सांगितलेल्या दोन बाह्यांनीं त्या गृहस्थास गांठून त्यालां मुलगी अशी अशी मोठ्या कुळांतली आहे, देखणी आहे वगैरे ह्या तशा बाता सांगून त्याचें मन भुरळ्यांत पाडलें, व तो गृहस्थही उत्सूच झाला असल्या कारणानें त्यानें फारसा विचार न करितां एकदम त्या मुलीशीं लग्न करण्यास रुकार दिला. पुढें त्या सर्वांचें काय बोलणें चालणें व्हावयाचें तें होऊन त्यानें मुलगी मला पहावयास मिळाली पाहिजे म्हणून म्हटलें असतां त्या दोघां बाह्यांनीं त्या कुंटण्यामार्फत त्याच गांवच्या एका कसबिणीस बुरखा देऊन त्याच्या समोर आणून उभें केलें, तेव्हां तिचें तें सौंदर्य व नखरा पाहून या स्वारीची मर्जी सुप्रसन्न झाली. व त्याच पावलीं त्यानें पूर्वीच्या करारामाणें त्या बाह्याच्या हातांत १,००० रुपयांचा तोडा ठेविला, आणि तुम्हीं जोसपें मुक्कामीं या म्हणजे दोन्ही मंडपांची सर्व सिद्धता करून विवाहसमारंभ आटपून घेऊं म्हणून सांगितलें. रुपयांचा तोडा हातांत पडल्यावर तो म्हातारा बाह्या खुष झाला, परंतु त्यानें मुलीची आई आजारी आहे यास्तव इतक्या लांब येण्यास सवड नाहीं, आणखी तशांतून आपला हा पहिलाच विवाह आहे असें नाहीं, याकरितां विवाह दुसरीकडे कोठें झाला तरी चालेल अशी त्याची समजूत घातली. हें त्याचें बोलणें त्या उत्सू गृहस्थासही मान्य झालें, व सरते शेवटी लग्नविधि पाली मुक्कामींच ताबडतोब आटपून घेण्याचे ठरलें. या गांवीं दोन्ही पक्षांकडील माणसें बहुशः कोणासही फारशीं ठाऊक नव्हतीं, यामुळें त्या विवाहाचा तेथें म्हणण्यासारखा गवगवा झाला नाहीं. आमंत्रणें बेताचींच करण्यांत येऊन लग्नाचा मुहूर्त कोणत्याशा दिवशीं गोरज धरण्यांत आला. वराचें घरीं रुखवत यावें याचें तोंपर्यंत सर्व प्रकार यथास्थित झाला. मात्र रुखवतांत जे जिन्नस आणिले होते त्या जिन्नसांत भांग घालून ते त्या ठकांनीं वरास खाऊं घातले. ते जिन्नस यथेच्छ खाऊन स्वारीचे झोकांडे जाऊं लागले, तेव्हां मूर्ति तशीच उचलून घोड्यावर चढविली; व दोघांनीं दोही बाजूंस संभाळून धरून वाजत गाजत नवऱ्यामुलीच्या घरीं आणली. तेथें आल्यावर पायांवर पाणी वगैरे घालून त्या गृहस्थाला जेमतेम पाटावर

आणून बसविलें, व अखेर लटूपुटू विधि कसे तरी आटोपून त्या मराठ्या गृहस्थाचें त्या मुरळीशीं लग्न लागलें. लग्नाचे वेळीं सावधान वगैरे शब्द पुरे बाहेर पडताहेत नाहींत, तोंच नवरदेवाची स्वारी पाटावर आडवी पडली. मग कसचें काय न् कसचें काय, त्याला जेमतेम उचलून बाहेर एका झोंपाळ्यावर निजविलें. लग्नांत आरंभापासून तों शेवटपर्यंत एकसारखा लबाडीचाच वेत, तेव्हां त्याला जागा करण्याची तरी खटपट कोण करितो? असो; या स्वारीची अशी स्थिति झाली तेव्हां अर्थातूच जेवणाखाणाचा वेत तसाच राहून स्वारीला रात्रभर तसेंच झोंपाळ्यावर निजून रहाण्याची पाळी आली. असे सकाळच्या प्रहरीं मात्र स्वारी चांगली सावध झाली, व उठून बसते आहे तों ते दोघे व्याही मेहुणे येऊन नमस्कार करून बसले, व लघाळपणीं आदल्या रात्रीं घडलेल्या प्रकाराबद्दलच्या गोष्टी काढूं लागलें. तें त्या गृहस्थास सहन झालें नाहीं, व त्यानें त्यांस थोडीशी शिवीगाळ केली. असा जेव्हां प्रकार झाला, तेव्हां त्या वाघ्यांनीं आपलें उग्ररूप प्रकट करून "आह्मांला तुमच्या लग्नाची जरूर नाहीं, तुह्मांला आमचें बोलणें आवडत नसेल तर आपली बायको घेऊन आपले चालते व्हावें," असें बोलून ते दोघे तडफडून उठले, आणि त्यांनीं आंतून त्या मुरळीला बाहेर हांक मारिली. पहिल्यानें ती मुरळी काहीं केल्या बाहेर येईना. सरते शेवटीं त्या गृहस्थानें निक्षून हांक मारिली, तेव्हां ती तोंडावर बुरखा घेऊन मोठ्या मर्यादशीळपणें बाहेर पडली. ती बाहेर पडण्याच्या पूर्वीं त्या गृहस्थांच्या मनांत पुष्कळच राग आला होता, तथापि विवाहाच्या पूर्वीं त्यानें आपल्या भावी स्त्रीचें जें स्वरूप पाहिलें होतें तें त्याच्या ध्यानीं मनीं पूर्णपणें भरलें असून त्याच्या समजुतीप्रमाणें तीच प्रत्यक्ष बाहेर पडल्या बरोबर त्याचा तो राग कोणीकडच्या कोणीकडे नाहींसा झाला. इतका प्रकार होत आहे तों ते दोघेही वाघ्ये तेथून निघून बाहेर पडले. इकडे त्या गृहस्थानें आपल्या नवीन लग्न झालेल्या स्त्रीस आपणाला लग्नाची कांहीं जरूर नाहीं, आपण आत्तांच्या आतांच येथून निघून जाणार ह्मणून सांगितलें. तों ती काय बोलते ! तिनें तोंडावर घेतलेला बुरखा तसाच टेवून एकदम रडण्यास आरंभ केला. तेव्हां या स्वारीला जरा वाईट वाटून त्यानें तिला कां रडतेस ह्मणून प्रश्न केला. तेव्हां तर ती अधिकाधिकच रडूं लागली. इकडे ते दोघे वाघ्ये दाराच्या बाहेर आड राहून आंत चाललेला सर्व प्रकार ऐकत उभे होतेच. असो; बायको अशा प्रकारें अधिकाधिक रडूं लागली हें पाहून त्या गृहस्थाच्या जिवाला परमावधि वाईट वाटूं लागलें; व आपल लग्न होऊन नुकता एकच दिवस झाला होता याचीं आठवण विसरून जाऊन जशी काय ती आपणाशीं पुष्कळ दिवसांपासूनच परिचित आहे अशा प्रकारें तो तिच्या जवळ गेला, आणि तिचे डोळे पुसून तिला उगी करावी अशा हेतूनें त्यानें तिच्या तोंडावरचा बुरखा काढून टाकिला. बुरखा काढायच्या अगोदर त्या गृहस्थानें आपली बायको अशी फक्कड आहे तशी फक्कड आहे ह्मणून मनांतल्या मनांत बराच गाजरांचा आणि मांड्यांचा फराळ चालविला होता; परंतु त्याची खरी योग्यता "झांकली मूठ सवा लाखाची" या ह्मणीप्रमाणें वधूच्या तोंडावरून बुरखा निघाला नव्हता तोंपर्यंतच कायती होती. कारण जोंपर्यंत त्या बुरख्याआड चेहरा को-

णत्या प्रकारचा आहे हें प्रत्यक्ष दिसलें नव्हतें, तोंपर्यंतच आपली बायको सुंदर देखणी आहे अशी त्याची बुद्धि कायम रहाण्याचा संभव होता. असो; आतां सांगितल्याप्रमाणें त्या गृहस्थानें मोठ्या हौसेनें पुढें होऊन आपल्या बायकोच्या तोंडावरचा बुरखा एकाएं अंगास केला, व पहातो तों भलताच प्रकार त्याच्या दृष्टीस पडला. बुरखा काढण्यापूर्वी आपण प्रत्यक्ष रंभेचें तोंड पहाणार अशी त्याची बुद्धि होती. पण ती सर्व एकीकडे राहून त्याच्या दृष्टीस प्रत्यक्ष राक्षसीच किंवा हडळ पडली काय असा भास झाला ! बुरखा तोंडावर असेपर्यंत ती स्त्री आंतून रंडत आहे असें त्यास वाटत होतें, पण तोंड उघडें झाल्यावर पहातो तों त्यावर रडण्याचें कांहींच चिन्ह नसून उलटे तिचे डोळे रागानें लाल झालेले दिसले; एवढेंच नव्हे, तर त्या गृहस्थाला त्या बुरख्याआड जी स्त्री असेल म्हणून वाटत होतें, ती स्त्री मुळींच नसून तिच्या ऐवजीं दुसरीच स्त्री दृष्टीस पडली. असें झालें तेव्हां या ठिकाणीं कांहीं तरी दगा आहे अशी त्या गृहस्थाची खातरी होऊन त्यानें मोठ्यानें आरडा ओरडा करण्यास आरंभ केला. इतक्यांत त्या स्त्रीनें एकेक डोळा पण एवढाला केला, आणि रागाचा आविर्भाव दाखवून व दांत ओंठ खाऊन तिनें त्यांस "तुम्हीं शहाणे असाल तर मुकाट्यानें रहा. तरच त्यांत शोभा आहे" असें सांगितलें. इतक्यांत ते दोघे वाघ्ये बाहेर कान देऊन ऐकत होतेच, ते मोठ्यानें खो खो हंसत आंत आले, आणि "कां बया, तुला आवडतोका हा असला भांगट नवरा? कांग, गप्प का बसलीस ?" म्हणून तिला टोंचून विचारूं लागले, तेव्हां तर तिनें नवऱ्यावर कांहीं विलक्षण कडाका उसळून दिला, आणखी त्यास मन मानेल तशा अभद्र शिव्याही द्यायला कमी केलें नाहीं. हा इतका प्रकार पाहून तो नवरा बिचारा गोंधळांत पडला, व यांत कांहीं तरी मोठेंच कपट झालें आहे अशी त्याची खातरी होऊन तो "ही मुळीं-च माझी बायको नव्हे" म्हणून म्हणाला. ते ऐकून तर त्या दोघा वाघ्यांनीं हंसण्याचा कमाल करून सोडली. ही इतकी हकीकत होते आहे तों दार उघडून दोन चार ब्राह्मण आंत घुसले. हे ब्राह्मण आदल्या दिवशीं लग्न लावण्याकरितां बोलाविल्यापैकीं असून त्यांनीं नवरदेवांची स्वारी भांगेच्या तारेंत झोकांड्या खात असतांच गडबडीनें सावधानमंत्र आटपून घेतले होते. असो. ते आंत आल्यावरोबर त्यांनीं ही त्या वाघ्यांप्रमाणेंच मोठ्यानें खो खो हंसण्यास आरंभ केला. तेव्हां तर त्या गृहस्थाची फारच त्रेधा उडाली, व त्याला हा काय प्रकार आहे व या वेळीं काय बोलावें हें सुद्धां सुचेना अशी त्याची स्थिति झाली. सरते शेवटीं त्या ब्राह्मणांनीं त्या बिचाऱ्या गृहस्थाची चांगली कान-उघाडणी करून त्याला "ही आपली बायको, आपण हिच्याशींच काल रात्रीं लग्न लाविलें, व मंगळाष्टकें आह्मीं स्वतः म्हटलीं, त्या वेळीं आपली स्वारी मात्र आपल्या नेहमींच्या सवईप्रमाणें भांग पिऊन अगदीं तर्र झाली होती" वगैरे प्रकारें त्याला नीट समजाऊन सांगितलें. तें ऐकून त्या गृहस्थास दोहींकडून पंचाईत झाल्यासारखी झाली. एकीकडून लोक आपणास धडधडीत भांगट म्हणूं लागले ही गोष्ट बाहेर लोकांस कळली तर त्यांत आपली अब्रू जाण्याचें भय होतें; व दुसरीकडून झालेला प्रकार सर्व कपटाचा असल्यामुळें तिला आपली बायको म्हणून कशी कबूल करून घ्यावी याच्या तोबुचक-

ळ्यांत पडला. जर हिला बायको ह्मणून कबूल न करावें, तर हे लोक आपली फटफजिती बाहेर सर्व लोकांस सांगण्यास कमी करणार नाहींत, व तसें झालें असतां बायकोपरी बायको भलतीच मिळून लोकांतही विनाकारक हंसेच होणार असें त्यास वाटलें. शिवाय आपली बायको ही मुळींच जातीची **मराठीण** नव्हे असें त्यास माहित नव्हतें, यास्तव आतां कसें तरी करून झालेल्या प्रकारावर पांघरूण घालावें यांतच शहाणपणा आहे अशी त्यानें आपल्या मनाची समजूत करून घेतली. वस्तुतः ह्मटलें असतां, त्यानें अशी समजूत करून घेतलीच पाहिजे होती असा मुळींच प्रकार नव्हता; परंतु तो जातीचा अब्रूवाला मराठा पडला, तेव्हां त्याला आपल्या फजितीची लोकांत रिकामी वाच्यता व्हावी हें आवडलें नाहीं. शिवाय त्यानें सकाळीं जागें झाल्याबरोबर जरी कांहींसा रागाचा आविर्भाव आणिला होता, तरी त्याचा मूळ स्वभावच गरीब व लाजाळू होता, यामुळें कोणचीही धाडसाची गोष्ट करणें अगर बोलून दाखविणें ही गोष्ट त्यास मुळींच साधण्यासारखी नव्हती. अशा दोन कारणांमुळें त्याचा अगदीं नाइलाज होऊन सरतेशेवटीं त्यानें "होय बोवा! हीच बायको माझी!" ह्मणून कबूल केलें, व "आतां कसें तरी करून माझें हें लग्न निभावून आह्मांला येथून गांवाबाहेर पार पाडून द्या" ह्मणून त्यांची विनवणी केली. परंतु एवढ्या विनवणीस ते लोक थोडेच ऐकतात? त्यांनीं "आह्मांला प्रत्येकाला एक एक हजाराचा तोडा रोख मिळाला पाहिजे, तो मिळेल तरच आह्मीं ही गोष्ट बाहेर सांगायचे राहूं, नाहीं तर तुमची या गांवांत पुरीं धिंड काढायला कध्धीं कमी करणार नाहीं!" ह्मणून दहशती घातल्या. त्या ब्राह्मणांच्या तोंडचीं हीं अक्षरें ऐकून त्या बिचाऱ्याला "दे माय धरणी ठाय" असें होऊन गेलें; व कोठून ह्या उल्लूपणांत शिरून हा मूर्खपणा पदरीं बांधून घेतला असें त्यास होऊन गेलें. सरतेशेवटीं त्यानें निरुपाय होऊन त्या ब्राह्मणांना एक एक तोडा रोख काढून दिला, व आपला सासरा व मेहुणा यांस "तुह्मीं आमची रवानगी करून द्या ह्मणजे तुह्मांलाही खुष करितों" असें सांगितलें. ही गोष्ट त्या दोघांनाही नीट वाटली नाहीं, व त्यांनीं आपणाला ही बाकींच्या बरोबर रोख पैसे मिळाले पाहिजेत ह्मणून तकार चालविली. तथापि तेवढ्या वेळीं त्या गृहस्थानें मनाचा हिय्या करून "मी ही गोष्ट कधीं कबूल करणार नाहीं" ह्मणून त्यांस निक्षून सांगितलें, तेव्हां त्या दोघां कपटी बापलेंकांनीं नाइलाज आहे ह्मणून त्याची गोष्ट कबूल केलीसें दाखविलें; व तुमच्या रवानगीची तजवीज करितों ह्मणून सांगून दोघेही बाहेर निघून गेले ते कांहीं वेळानें परत येऊन सर्व तजवीज लाविली आहे ह्मणून सांगूं लागले. इतकें झाल्यावर या नवरदेव गृहस्थाचें ज्या घरीं बिऱ्हाड होतें, त्या घरीं निरोप पाठवून त्याचें काय थोडें थोडकें सामान बरोबर होतें तें सगळें वधूच्या घरीं आणविलें. यासंबंधानें या ठिकाणीं एक गोष्ट सांगणें अवश्य आहे तीं एवढीच कीं, नवरदेवानें ज्या वेळीं लग्न करायचा निश्चय ठरविला, त्या वेळीं बरोबरच्या चाकर माणसांबरोबर आपल्या सर्व सामानसुमानाची रवानगी केली होती, व आपल्या एकट्याच्या बरोबरच असलें असतां चालेल असें कांहीं खासगी सामान व रोकड पैसा एवढें मात्र आपणाजवळ ठेवून आपण एकटा सडाच त्या गांवीं

सूचना:—वर्गणीदारांकडून मागील वर्षासुद्धां सर्व वसूल एक महिन्याचे आंत आल्यास पुढें एका महिन्यानें मागील सर्व अंक वाचकांस एकदम मिळतील.

विक्रीस तयार (नाट्यकथार्णव आफिसांत).

डाक्तर व वैद्य प्रहसन (अलाहिदा पातळ कागदावर छापिलेलें फारच स्वस्त) .. .. किं. २ आणे, ट.हं. ६ पै.

अद्भुतठकबाजी .. .. " १२ " " ६ "

बोधरत्नावली भाग १ .. .. " ६ " " ६ "

हुन्नरसंग्रह भाग २ .. .. " ६ " " ६ "

श्री अक्कलकोटस्थ स्वामी महाराजांचें चरित्र, भाग१ ला. (महाराजांची साधारण स्थिति आणि त्यांजविषयीं लोकांचे अभिप्राय) .. .. " ८ " " ६ "

कित्ता भाग २ रा. (महाराजांनीं दाखविलेले अद्भुत चमत्कार) .. .. " ८ " " ६ "

उदार दामोदर नाटक .. .. " १। रु. " १ "

अश्वधाटी प्रबोधिका .. .. " ८=॥ आणे " ६ "

लघुलेखन पद्धति (अथवा अतित्वरेनें मराटी भाषेंत लिहिण्याची युक्ति.) .. .. " १२ " " १ आणा

नव्या जाहिराती.

मौजेच्या चार घटका.

भाग १. कालिदासाचें अभिज्ञानशाकुंतल नाटक.

हल्लीं "निर्णयसागर" छापखान्यांत छापणें सुरू आहे. याचीं डेमी अष्टपत्री पृष्ठें सुमारें १९२ होतील. कागद व टाईप उत्तम आहेत.

आलीकडे कालिदासाच्या व इतर जुन्या कवींच्या नाटकांची लोकांस अभिरुचि बरीच लागली आहे, याकरितां त्या कवींच्या तसल्या ग्रंथांची अधिक प्रसिद्धि व्हावी व त्यांचें हार्द

चांगलें समजावें, ह्मणून हा प्रयत्न मी करीत आहें. यांत मूळच्या नाटकग्रंथाचें सारें भाषांतर आपल्या शुद्ध मराठी भाषेनें,—ती अगदीं जशी आपण बोलतों तशीच लिहून—तें घातलें आहे; व कवीचा आशय पक्का व अनुभवशीर रीतीनें समजण्याकरितां जागजागीं व्यवहारांतील प्रकार दाखविला आहे. पहिला भाग वर लिहिल्याप्रमाणें तारीख ८ एप्रिल रोजीं तयार होईल; व त्यानंतर मुंबईंत इंदुप्रकाशांत, काळका देवीचे रस्त्यावर विविधज्ञानविस्तार आफिसांत, गोपाळ नारायण व आत्माराम सगुण यांच्या दुकानीं, व गिरगांवांत घर नंबर २३४ यांत माळकापाशीं, व पुणें येथें मेहुणपुऱ्यांत श्री. तात्यासाहेब राजमाचीकर यांचे येथें, व नाशिक येथें रा. जयराम अंबाजी वकील यांचे येथें, मिळेल. किं. रु. १॥ दीड, टपाल खर्च ८=.

महादेव चिमणाजी आपटे. बी. ए. एल. एल. बी.
वकील हायकोर्ट मुंबई.

मुंबई तारीख १ मार्च सन १८८१.

—o—

THE INDIAN PHOSPHODYNE.

किंवा

जीवनार्क.

हा अर्क रुचकर व मधुर असून कोणत्याही ऋतुमध्यें पाहिजे तितको वेळ घेतला असतां अपकार करणार नाहीं. ह्यास सर्व शक्तीवरच्या औषधांचा राजा ह्मटल्यास चालेल. कारण ह्यांत सर्व पौष्टिक औषधांचा समावेश केला आहे. शरीर मजबूत होऊन मेंदूची शक्ति व रक्त ताजीं होतात व वाढतात. हा अर्क पुढील रोगांवर रामबाण आहेः—इंद्रियें मंद पडणें, शक्तिपात, अभ्यास अगर कामकाज करवेनासें होणें, मंद स्मृति अगर दृष्टि, सतत कपाळशूळ, जननेंद्रियाचे रोग, दमा, खोंकला, रक्ताची कमताई, भूक मरणें, अपचन, कांपरं, अतिसंभोग, बलात्कारानें धातुपात, कुमार्गापासून रोग, मधुमेह व रक्तपित्ती (हे दोन रोग पुढें वाढत नाहींत.), दारू पिण्याची खोड व तिचे भयंकर परिणाम, आणि सतत त्रासदायक घाम. ह्यांत चमत्कार इतकाच आहे कीं, शक्ति व उत्साह कायमचीं येतात, व गुण पहिल्या दिवसापासून भासतो. बालकांस हें मानसिक अन्नच आहे. तरुणांना मानसिक श्रम जाणवत नाहीं. व हें स्वभावसिद्ध शक्तिवर्धक होय, वृद्ध मनुष्यें व जिवाभागळे श्रम करणारे यांस हें प्रत्यक्ष जीवनाच्या टिकाणीं होऊन ते दीर्घकाळपर्यंत वांचतात, व या कलिकालातील आयुर्नियमाप्रमाणें संपूर्ण शरीराचे भाग कालमानानें खर्च होत राहून अखेर शरीराचे सर्व व्यापार आपोआप बंद होत तोपर्यंत निर्भयपणें राहतात. प्रत्येक विद्यार्थी, धंदा करणारा मनुष्य, किंवा सर्वकाळ कामकाजांत गुरफाट्या मनुष्यानें हें औषध संग्रहीं ठेवावें. किं. १। रु. बं. करणावळ चार आणे. बंगी नाटपेट जाईल. एक चमचा अर्धा पावशेर दुधामध्यें दिवसांतून तीनदा घ्यावें. दूध पाहिजे तितकें घेतल्यास चिता नाहीं.

वि. स. परांजपे.

कांदेवाडी मेडिकल हाल मुंबई,

क्षयामृत.

रोगी–वैद्यबाबा ! आज तब्येत नीटशी नाहीं. नाडी पाहून कांहीं औषध मिळेल तर बरें.

वैद्य–(रोग्याची नाडी पहात) हं:–नाडी शैत्यावर आहे, तरी पण आंगांत कडकी आहे. धातुस्थान बिघडून धातु पातळ झाली आहे, व ती जाते. वात पित्त, शैत्य, कफ, यांचा क्षोभ होऊन मेंदूस व काळजास झोंबला आहे. बहुधा वांग्याची भाजी किंवा वीसनखी बाधली असावी. प्रकृति उष्ण, अंगांत जीर्णज्वर बहुत दिवसांचा राहिला आहे. पहा बुवा अवस्था कठीण आहे. • माझ्या मात्रेचा एक वळसा पोटांत घ्याल तर मात्र कांहीं तरी आशा.

रोगी–(आश्चर्यानें) काय म्हणतां वैद्यबुवा ! तुम्हांला इतक्या गोष्टी नाडी वरून कळल्या ?

वैद्य–अरे कळल्या म्हणजे कळावयाच्याच ! आम्ही कांहीं लिचे पिचे डाक्तर लागलों नाहीं. अस्मादिक डाक्तरांना उं:--कस्पटाप्रमाणें लेखितात.

रोगी–तें असो. पण ह्या इतक्या गोष्टी तुम्हांला नाडीवरून कशा कळल्या बरें ?

वैद्य–गप्प बस मूर्खा, तुला यांतली अक्कल नाहीं. चल चालता हो. तुझी भावना खचित क्षयावर जाणार.

रोगी–(घाबरून) काय ? क्षयावर ? क्षय म्हणजे काय वैद्यबुवा ? तो होतो तरी कोण्हां कसा हें ऐकूं द्या !.

वैद्य–(आपणाशीं) ह्या लोकांशीं असेंच पाहिजे. क्षयाचें नांव काढल्याबरोबर स्वारी कशी एकदम वठणीवर आली ! (उघडपणें) ऐकून घ्या. कफाचा क्षोभ होऊन तो रक्तांत शिरला म्हणजे झाला क्षय ! आणखी कांहीं जास्ती व्हावयाला नको.

रोगी–घाः वैद्यबुवा ! क्षयाबद्दलचा हा सिद्धांत मीं आपल्या तोंडचा आजच काय तो ऐकिला ! पुस्तकांतून हा सिद्धांत माझ्या पहाण्यांत कोठेंही नाहीं.

वैद्य–जा जा. त्या पुस्तकांना आग लावा, डोक्तरी पुस्तकांत हें असलें असेल तेव्हांना ! आमच्या पुस्तकांत हें सगळें आहे. डाक्तर मूर्ख–त्यांना चिकित्सेचें नांव तरी ठाऊक आहे ? ही माझी एक गोळी घ्या म्हणजे कफ सुटेल, आणखी क्षयही जाईल. कारण शास्त्रांत सांगितलें आहे–काय पहा–तो श्लोक आठवत नाहीं, पण त्याच्या खालचा श्लोक बरीक आठवतो.

समुद्रस्योत्तरे तीरे द्विरदो नाम वानरः
तस्य स्मरणमात्रेण ज्वरो याति दिगंतरं

अर्थ:–समुद्राच्या उत्तरेकडच्या किनाऱ्यावर द्विरद म्हणून वांदर असतो. त्याचें स्मरण मात्र केलें कीं ज्वर पळालाच.

रोगी–(हंसून) आतां मात्र वैद्यबुवा ! आपण कमाल केलीत. द्विरद म्हणजे वानर ! द्विरद आणि मनुष्य एकच असें देखील आपण म्हणाल ! तें असो. पण वानराचें नुसतें स्मरण केलें असतां जर ज्वर जातो, तर त्याच्या नुसत्या दर्शनानें क्षयही कां जाऊं शकणार नाहीं ?–आतां आपण स्वस्थ बसा. आपली गोळी आम्हांला नको. येतों. नमस्कार.

असो; हें औषध तयार केलें आहे. हें जरी यमाच्या तोंडांतून सुटका करणार नाहीं, तरी क्षयावर त्याचा अनुभव व्यावा. खास गुण येईल. दिवसांतून तीनदा दोन चमचे पचेल तितके दुधांत व्यावे. पथ्य तिखट व तेल मात्र वर्ज्य. किंमत १ रु. व बं. ख. ४ आणे.

कांदेवाडी मेडिकल हाल मुंबई, **वि. स. परांजपे.**

मधुमेहावर हटकून औषध.

हें औषध चमत्कारिक गुणाकारी आहे. निदान दोन महिने पचेल तितक्या दुधामध्यें दिवसांतून प्रत्येक वेळीं एक गोळी तीनदां व्यावी. मधुर पदार्थ व स्त्रीसेवन अगदीं वर्ज्य. किं. २। रु. बं. ख. चार बाटल्यांपर्यंत ४ आणे.

कांदेवाडी मेडिकल हाल मुंबई, **वि. स. परांजपे.**

शालोपयोगी व इतर पुस्तकें.

अंकगणित (मराठी ५ व्या इयत्तेपर्यंत).— किं. ।= आणे; व ट. ख. ८—॥

मोडी वाचनसार भाग १ ला व २ रा—दर भागास किं. ८= व प्याकिंग व ट. ख.८—

हार्वर्डच्या इं. १ ल्या व २ ऱ्या पुस्तकांतील मराठींत उच्चारार्थासहित शब्दसंग्रह— किं. अनुक्रमें ८—॥ व ८=॥. शिवाय प्रत्येकीं ट. ख. ८—

भूगोलाच्या व्याख्या, मराठी १ ल्या व २ ऱ्या पुस्तकांतील कठिण शब्दांचा अर्थ व कवितांचा अन्वययुक्त अर्थ—किं. ८—॥ व ट. ख. ८॥

एशिया व युरोपखंडाचें संक्षिप्त वर्णन किं. ८— ट. ख. ८॥-

चित्रबोध अथवा बालकांचें प्रथम प्रिय पुस्तक किं. ८—॥ ट. ख. ८॥-

हिंदुस्थानच्या इतिहासांतील सर्व संक्षिप्त माहितीचें लहानसें पुस्तक—(परीक्षेच्या वेळीं अत्यंत उपयोगीं पडणारें) किं. ८= ट. ख. ८॥-

आरतीसंग्रह (आरती संख्या २१९ दुसरी आवृत्ति) किं १ रु. ट. ख. ८=

पुस्तकें मुंबईंत खालीं सही करणाराकडे मिळतील. जास्त प्रती घेण्यांत ट. ख. त फायदा आहे.

कांदेवाडी शांतारामची चाळ नंबर४२. } **वासुदेव मोरेश्वर पोतदार.** स्कूलमास्तर गिरगांव प्रायव्हेट स्कूल मुंबई.

रंडीबाजीचा वाईट परिणाम

उर्फ

त्रिवेणीप्रमाथ अथवा असतसंगदुष्परिणाम नाटक.

हें पुस्तक विक्रीस तयार झालें आहे. आगाऊ सही देणारांनीं १८९ व नवीन घेऊं इच्छणारांनीं टपालसुद्धां २८१ ठाणे सूर्योदयाचे म्यानेजर यांजकडे मनीआर्डर रूपानें पाठवावे. म्हणजे पुस्तकें रवाना केलीं जातील. **गोपाळ गोविंद दाबक**, म्यानेजर.

जाहिरात.

खालीं सही करणार हे सर्व लोकांस नम्रपणानें कळवितात कीं, ते पुढें दर लिहिल्याप्रमाणें फी दिली असतां सर्व्हे (पहाणी) करण्यास तयार आहेत:—

फीचे दर.

	रु.	आ.	पै.
प्रत्येक इमारतीचा साधारण सर्व्हे	१०	,,	,,
कोर्टात जावें लागल्यास	१०	,,	,,

नवीन इमारती तयार होण्याच्या असतां, किंवा पहिल्याच असलेल्या इमारतींस कांहीं नवीन काम जोडायाचें किंवा कांहीं फेरबदल करावयाचे असतां, म्युनिसिप लिटीचे एक्झिक्युटिव्ह एंजियर यांस त्यांची मजबुती दाखवून त्यांची मंजूरी मिळविण्या रितां प्लान आणि च्छेद (सेक्शन) काढावयाचे असल्यास त्यांबद्दल पुढें लिहिल्याप्रमाणें पैसे घेण्यांत येतील:—

	रु.	आ.	पै.
संडाससुद्धां प्रत्येक इमारत	१५	,,	,,
संडाससिवाय ,, ...	१०	,,	,,

रिकाम्या जमिनींचा सर्व्हे दर १०० चौरस यार्डांस ८ आणे प्रमाणं.

भातांच्या शेतांची	,,	,,	१० ,,
वाड्यां (ओर्ट) ची	,,	,,	१२ ,,
बागांची	,,	,,	१४ ,,
डोंगराळ जमिनींची	,,	,,	१ रु.

मोठाल्या मालमत्तांच्या सर्व्हे; इमारतींचे प्लान, उंची आणि च्छेद; इमारतींच्या निरनिराळ्या भागांचे नकाशे (ड्राइंग); कामांचे नकाशे; रस्त्यांचे नकाशे आणि सपाटीचे च्छेद; इमारतींचे आणि जमिनींचे नमुने; वाढविलेले किंवा लहान केलेले प्लान; प्लानांच्या निराळ्या प्रती; यांबद्दलचें जसें कमी किंवा जास्ती काम असेल त्याप्रमाणें कमी अगर जास्ती फीची आकारणी करण्यांत येईल.

आकृति किंवा नकाशे तयार करणें; अंदाज करणें; स्पेसिफिकेशनें; किंमती ठरविणें; आणि इमारती वगैरे कामांवर देखरेख हीं कामें अंगावर घेऊन करण्यांत येतील.

जीं कामें खालीं सही करणारांचे स्वाधीन करण्यांत येतील, तीं ते लक्षपूर्वक, ताबडतोब, बिनचूक आणि उत्तम रीतीनें पार पाडून देतील.

जास्त माहिती पाहिजे असल्यास खालीं सही करणारांकडे अर्ज करावा.

एम् पी. धुरु,
सर्व्हेयर आणि ड्राफ्टसमन,
मुंबई घर नं. १०२ मुगभाट,
(मोरेश्वरची चाळ)

जाहिराती.

नवीन पुस्तक.

उदारदामोदर नाटक.—यांत प्रसिद्ध **मंगळवेढ**चे ठाणेदार भगवद्भक्त **दामाजीपंत**, ज्यांनीं त्यांचे वेळीं पडलेल्या दुष्काळाचे प्रसंगीं सरकारी धान्य लुटवून गरिबांचें रक्षण केलें, त्यांचें चरित्र नाटकरूपानें वर्णिलें आहे. यांतील प्रवेशरचना आधुनिक नाटकवाल्यांच्या नाटकांतील प्रवेशरचनेहून सर्वस्वीं भिन्न असून यांत **दामाजीपंता**ची भक्ति, वैराग्य, दयालुत्व, औदार्य इत्यादि गुणांचे सविस्तर निरूपणार्थ नवीन अनेक प्रसंग कल्पून चमत्कारिक संवाद दाखल केले आहेत. तसेच **दामाजीपंतां**चा हितशत्रु **मुजुमदार** ह्याच्या शत्रुत्वासंबंधानें कांहीं विशेष प्रकार शोधांअंतीं कळला, तोही यांत सामील केला आहे. हें पुस्तक टाइपांवर छापिलें असून ह्याचीं डेमी द्वादशपत्री सांख्याचीं २५० वर पृष्ठें आहेत. किंमत १। रु. ट. हं. ८—.

सीताराम बाबाजी गुर्जर

जी. आय्. पी. रेल्वे आडिट आफिस अ० फणसवाडी, जगन्नाथाची चाळ, मुंबई.

अश्वधाटीप्रबोधिका:—जगन्नाथपंडितकृत अश्वधाटी वृत्तांत अनुप्रासमय लहासें पदशेपर काव्य आहे. ह्यांत मूळ श्लोक व खालीं त्यांची साकीछंदोबद्ध महाराष्ट्र टीका दिली आहे. किंमत ८=॥ ट. हं. ८॥.

सीताराम बाबाजी गुर्जर

जी. आय्. पी. रेल्वे आडिट आफिस अ० फणसवाडी, जगन्नाथाची चाळ, मुंबई.

उपयुक्त सूचना.

व्यवहारोपयोगी हुन्नरसंग्रह

(मासिकपुस्तक.)

चालू वर्षाच्या आगष्ट महिन्यापासून आह्मीं सदर्हू पुस्तक काढण्याची सुरवात केली आहे, त्यांत ह्या देशांत व परदेशांत चालणारे अनेक प्रकारचे धंदे, रोजगार, विद्या व कळाकौशल्यें यासंबंधी अनेक प्रकारच्या युक्ति, कल्पना व हुन्नर यांचा संग्रह होत असतो. ह्यांत बागाईत व शेती, सुगंधी व अतारी, रंगारी, वैद्यकी, पाकशास्त्र, कुंभारकाम, कांचकाम, दारूकाम इत्यादि कामांसंबंधी अनेक प्रकारचे उपयुक्त पदार्थ करण्याच्या कृति, कोणत्याही पदार्थावरील सर्व प्रकारचे डाग काढण्याच्या युक्ति, उपद्रवकारक प्राण्यांचा नाश करण्याचे उपाय; लवकर नासणारे पदार्थ पुष्कळ दिवस जसेच्या तसे ठेवण्याच्या युक्ति; कोणत्याहि पदार्थावर पाहिजे त्या धातूचा मुलामा चढविण्याच्या कृति; फुटलेले पदार्थ सांधण्याकरितां लुकणें, सुगंधी व औषधोपयोगी तेलें व अर्क; अनेक प्रकारच्या साध्या व रंगीत शाई, आगकाड्या, साबू, मेणबत्त्या, लाख, वार्निशें, सरबतें, ट्रथपावडर्स, मिल्करोझिस, कोल्डक्रीम्स, प्यामेटम्स, फ्रेंचपालिश, टिंक्चर्स, एशन्स, आसिड्स

कोल्डवाटर्स इत्यादि सर्वोपयोगी उपयुक्त पदार्थ करण्याच्या कृति, आणि सांकेतिक भाषा, कूटगणित, कूटकविता, कूटप्रश्न आणि अंकचत्कार यांचा संग्रह होत जाईल.

याची किंमत अगाऊ एक वर्षाची २ रुपये व टपालखर्च ६ आणे; किंमत पाठविणें ती मनीआर्डर करून पुस्तककर्त्याकडे खालीं लिहिलेल्या ठिकाणीं पाठवावी. प्रत्येक अंक डेमी अष्टपत्री २० पृष्ठांचा निघतो. आगाऊ वर्गणी आल्याखेरीज पुस्तक सुरू केलें जाणार नाहीं. ता. ८ आगष्ट सन १८८० इसवी.

गोविंद मोरोबा कार्लेकर.
हुन्नरसंग्रहकर्ते.

पत्ता.—नळावर पंचमुखी मारुतीची गल्ली, घर नंबर २६ मुंबई.

—०—

लघुलेखनपद्धति,

किंवा

अति त्वरेनें मराठी भाषणें लिहिण्याची युक्ति.

वक्त्यांची भाषणें तात्काल सार्थ लिहितां यावीं अशा लिपीची आमच्या भाषेंत सांप्रत फारच जरूरी आहे असें जाणून मोठ्या परिश्रमानें ही लिपि तयार केली आहे. हिच्या योगानें वक्त्यांचीं भाषणें सादंत उतरून घेतां येतात, व हिचा अभ्यास स्वतः करतां येईल. हिची पूर्णता व साध्यता पुणें वक्तृत्वोत्तेजक मंडळीकडून जें या सालीं पूर्ण बक्षीस मिळालें त्यावरून लोकविश्रुत आहेच. ह्या लिपीची रचना करणें किती महत्त्वाचें व श्रमाचें काम आहे, याचा विचार करून, व अशा प्रकारचीं लोकहिताचीं कामें केवळ लोकाश्रयावरच अवलंबून असतात हेंही लक्षांत आणून, श्रीमंत राजेरजवाडे, संस्थानिक, व जहागिरदार तसेंच इतर लोक यांस आपला उदार आश्रय देतील अशी आशा आहे. किं. ४१२, शिवाय. ट. हं. १ आ. पुस्तकें नाट्यकथार्णव आफिसांत रोख पैसे पाठविले असतां रवाना केलीं जातील.

अवश्य अनुभव द्या ! ! ! एकदांच घेऊन खात्री ! ! !

CHILDREN'S ELIXIR.

बालामृत.

[झाडास ज्याप्रमाणें वाढवावें त्याप्रमाणें तें वाढतें.]

हें औषध एतद्देशीय अनेक वनस्पती मिश्र करून केल आहे ह्यापासून मुलांस जंताचा उपद्रव कधींही होत नाहीं. अन्न पचन होऊन वारंवार दूध ओकणें बंद होतें. आईच्या दुधाच्या कमताईमुळें किंवा तें मुळींच न मिळाल्यामुळें होणारी क्षीणता व पांडुरकी ह्यांवर हें औषध जालिम आहे. गाईच्या दुधावर वाढविलेल्या मुलांस होणारे सर्व रोग ह्यानें दूर होतात. गर्भाशयांत मुलें असतां म्हणजे गरोदरपणामध्यें अंगांत रक्ताची कमताई असल्यामुळें अगर पुढें अंगावर दूध न मिळाल्यामुळें मुलाच्या अस्थि कांड्यांप्रमाणें होतात त्यांस बळकटी आणणें व ज्यांचीं पोटें फार मोठीं होतात व तीं फार खातात व हगतात व हळूहळू क्षीण होतात

ह्याव- हें "द्वितीय आहे. खोकला, गळ्यामध्यें घरघर आवाज, फेपरें, आकडी, पांढरी हग, आंव अतिसार ह्या रोगांचा हें दिलें असतां संभवसुद्धां रहात नाहीं. पाय लटके पडल्यास हें औषध देऊन अवश्य पहावें. दमा, माती खाण्याची संवय, खरूज, कंडू, डोक्यांतील फोड, लागलेच दूर होतील. शौचास नियमानें होऊन सर्व इंद्रियें बराबर राहतील ह्मणूनच ह्यास बालामृत असें नांव दिलें आहे. दर बाटलीस किंमत रुपया एक. बंगी खर्च आठ आणे. घेण्यास मधुर असल्याकारणानें मुलें पाहिजे तितकें घेतील. माहितीचा कागद आंत आहे.

वि. स. परांजपे.

कांदेवाडी मेडिकल हाल.

THE INDIAN SWEET AND HEALTH-GIVING EFFERVESCENT FRUIT SALINE.

इन्डियन मधुर व आरोग्यरक्षी वनस्पतींचें पाणी घातल्याबराबर उसळून वर येणारें क्षाररूप रसायण.

वनस्पतींचे उपयोग अनेक, व त्यांपासून जालीम औषधें बहुत होतात. आपलें रक्त स्वभावतः खारट आहे. मीठ खाणें हें क्षार अवश्य आहे, व हें घातलें असतां पदार्थ नासत नाहींत रोग झाला ह्मणजे रक्त नासतें, व त्यांतील क्षारांमध्यें बिघड होतो, ह्मणूनच कांहीं रोगांमध्यें रक्त अतिशय काळें किंवा घन अथवा पातळ होतें. ह्या औषधाचा उपयोग कोणत्या रोगांवर होतो ? ह्याचें उत्तर एक. "ज्यांमध्यें रक्त बिघडतें त्या रोगांवरः—" पित्त, अजीर्ण, कपाळ व पोटशूळ शारीरिक व मानसिक श्रमांपासून अस्वस्थता, दमून आल्यावर संताप, अतिशय जाग्रण व जड अन्न सेवन, मस्तकाची जडता, हवेमध्यें बिघड व अतिशय उकम्यानें येणारी सकाळीं झांपड; लाल, दुःख देणारी व धातुमिश्र लघवी; परमा, तोंडाचा कडूपणा व कोरड; भोजनानंतर ढकरा, उचकी, ओकणें, पोटफुगी; मस्तक, नेत्र व तळव्यांची तप्तता; किरीम, नळाचा उपद्रव, कावीळ, कौळू, मूळव्याध, सततप्रवास व वाईट हवा व पाण्यामुळें येणारे ताप, जलद प्रसरणारे रोग (महामारी, ताप, अतिसार इ.); कोठा साफ नसणें, अति तृषा व शारीरिक आग, खरूज, कंडू, हींव, भरवयांत स्वप्नावस्था, मुलांचीं मोठीं पोटें, डबा, स्त्रियांची कंबरदुखी व धुपणी, दुःखदायक स्राव, फेपरें, ओकारी, अपस्मार, स्थूलशरीर, पोटाची जाड कातडी, जीर्ण-ज्वर, संधिगतेराग, मूत्र व उत्पत्तीन्द्रियें वाईट कृत्यांनीं बिघडून लघवी साफ न होणें, आम्लपित्त, गुरगुरणें, अग्निमांद्य व चक्कर.—रक्त साफ राहील, अन्न बराबर जिरेल, काम करण्यास उमेद येईल, मनास उत्साह होईल. असे गुण कशावरून ? शेळीचें दूध उत्तम कां ह्मटलें आहे ? कारण ती खात नाहीं अशी वनस्पति नाहीं ह्यामध्यें अशाच वनस्पति घालून हें तयार केलें आहे. हें औषध ज्यास गुणावह नाहीं त्यास विलायती उत्तम पाण्याशिवाय दुसरें औषध आल् राईट् करणार नाहीं. कान्देवाडी मेडिकल हालांत विकत मिळेल. कि. १ रु. बंगी करणावळ २ आणे. माहितीचा कागद आंत आहे. प्रत्येक पेटींत अर्धा रत्तल औषध घातलें आहे.

वि. स. परांजपे.

कांदेवाडी मेडिकल हाल.

रा. रा. माधवराव मल्हार ३–६
" श्रीनिवास वामनराव लाखकर १–१२
" गोविंद हरी जोशी (शके १८०३ बदल) ३
" भास्कर श्रीधर जोशी ३–६
" गणपत बाजीराव राव १
" बाळाजी हरी, खारेपाटण ६–१२
" आत्माराम बापुजी, विजापूर ४–१४
" नारायण दत्तात्रय घोलप, चाळीसगांव ६–८
" कृष्णाजी बळवंत मोघे ६–१२
" चिंतामण अनंत परांजपे ६–१२
सेक्रेटरी, कुरुंदवाड लायब्ररी ३–६
" कोल्हापूर लायब्ररी ३–६

वर्गणीदारांस व इतरांस सूचना.

चालू साला करितां पुढील गृहस्थांस एजंट नेमिलें आहे त्यांजकडे वर्गणीदारांनीं वर्गणी भरावी.

रा. रा. विष्णु गणेश जोशी, घर नं. २७० बुधवार पेंठ .. .. .. पुणें.
" भास्कर दिनकर बाळ, डा. माळचंद्र कृष्ण भाटवडेकर यांचे घरीं, बडोदें.
" चिंतामण रामचंद्र केळकर, प्रमोदसिंधु छापखाना .. .. .. उमरावती.
" बाळाजी अनंत वेलणकर, वैद्य, सदुभाऊ गोरे यांच्या घरीं .. रत्नागिरी.

पुस्तकांची आभार पूर्वक पोंच.

त्रिवेणीप्रमाण अथवा असतीसंगदुष्परिणाम–टाणें सूर्योदय छापखान्यांत छापिलेलें.

बोध आणि करमणूक–(विविधज्ञानविस्तारकर्त्यांकडून).–या अल्प पुस्तकांतील उपदेश फार मनोहर आणि चटकदार असून हें पुस्तक प्रत्येक विद्यार्थ्यानें अवश्य वाचण्याजोगें आहे.

लघुलेखनपद्धति–रा. रा. गजानन भाऊ वैद्य यांनीं केलेली. या पुस्तकाचे साह्यानें मराठी भाषेंतील व्याख्यानें अतित्वरेनें जशाचीं तशीं उतरून घेतां येतात हें आह्मीं स्वानुभवावरून सांगूं शकतों. हें पुस्तक प्रत्येक विद्यार्थी व विद्याविलासी जनाच्या आश्रयास पात्र आहे.

नाट्यकथार्णव.

प्रस्तुतकालीं 'नाव्हल्स' व 'नाटकें' यांचे संबंधानें जो लोकांचा भ्रांतिमूलक समज झाला आहे त्याचा निरास होऊन, या अत्यंत अनुपम मनोरंजनसाधनाचें वास्तविक स्वरूप व त्याची वास्तविक योग्यता हीं त्यांचे मनांत पूर्णपणें ठसावींत, व तेणेंकरून सदभिरुचि जागृत होऊन काव्यामृतरसास्वादाविषयीं त्यांच्या अंतःकरणाची साहजिक प्रवृत्ति व्हावी, हा ह्या पुस्तकाचा मुख्य उद्देश असून; यांत संस्कृत व इंग्लिश या भाषांत रचलेल्या उत्तम उत्तम नाट्यकथादिक प्रबंधांच्या आधारें आपल्या महाराष्ट्र वाणीस जुळतील अशा प्रकारचीं अनेक 'नाव्हल्स' व 'नाटकें' यांचा संग्रह यथावकाश होणार आहे, व प्रसंगविशेषीं स्वकपोलकल्पित सदुपदेशपर कथानकें व नीतिवादाचे चुटके यांचाही समावेश होईल. या पुस्तकांत अश्लीलता नीतिभंगादि दोष न येऊं देतां हें पुस्तक सर्व सभ्य व कुलीन स्त्रियांस वाचण्याजोगें करण्यांत येईल. या पुस्तकाच्या वर्गणीचे दर खालीं लिहिल्याप्रमाणें ठेविले आहेत.–अगाऊ वर्षास ३ रु., मागाहून वर्षास रु. ४८८, व किरकोळ दर प्रतीस ८६. शिवाय टपाल हंशील वर्षाचें अगाऊ ८६.

अगाऊ वर्गणी पुस्तक घेतल्यापासून दोन महिन्यांच्या आंत भरली पाहिजे. पोस्टाचीं टिकिटें पाठविणें झाल्यास अर्ध्या आण्याचीं असावीं, व रुपयास अर्धा आणा याप्रमाणें वर्तवळा पाठवावा.

या पुस्तकांत नियमितपणें येणाऱ्या मजकुराशिवाय हरएक प्रकारच्या लोकोपयोगी जाहिराती निराळ्या छापून पुस्तकास जोडण्याचा विचार केला आहे. नियमित मजकुराचे ज्याप्रमाणें प्रत्येक पृष्ठावर दोन रकाने (कालम) करण्यांत येतात, त्याप्रमाणें जाहिरातीचे दोन रकाने करण्यांत येणार नाहींत. जाहिरातीचे दर पुढें लिहिल्याप्रमाणें माफक ठेवण्यांत आले आहेत:–

	रु.	आ.
चार ओळींचे आंत	१	०
पुढें प्रत्येक ओळीस	०	४
दुसरे खेपेस प्रत्येक ओळीस ८३ आणे व तिसरीपासून प्रत्येक ओळीस	०	२
मुदतीच्या जाहिराती मक्त्यानें घेतल्या जातील.		
भाषांतर करणें असल्यास पहिल्या खेपेस दर ओळीस	०	४

कांदेवाडी, मुंबई.

शंकर मोरो रानडे बी. ए.
नाट्यकथार्णवाचे कर्ते व मालक.

॥ श्री ॥

नाट्यकथार्णव.

त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते ।
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधा ह्येकं समाराधनम् ॥
मालविकाग्निमित्रे श्रीकालिदासः
स्फुरत्कलालापविलासकोमला करोति रागं हृदि कौतुकाधिकम् ।
रसेन शय्यां स्वयमभ्युपागता **कथा** जनस्याभिनवा वधूरिव ॥
कादंबर्यां बाणः

पुस्तक २. कार्तिक शुद्ध १ शके १८०२. अंक ८.

NÁṬYA-KATHÁRṆÁVA,

A MONTHLY MAGAZINE

Comprising a series of Marathi Dramas, Novels &c. &c.

विषय. **अनुक्रमणिका.** पृष्ठ.

जगन्नाथरायकृत रतिमन्मथ नाटक ४७
अनुतापशमन नाटक ९
शिलादित्य ९३
मथुरा (आत्मवृत्तकथन) ९३

मुंबई.

"इंदुप्रकाश" छापखान्यांत छापिला.

(सन १८६५ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधी सर्व प्रकारचे हक्क मालकांनीं स्वाधीन ठेविले आहेत.)

किंमत ६ आणे.

*** आणखी दोन महिन्यांनीं मागसलेले सर्व अंक एकदम वांटण्यांत येतील. वर्गणीदारांची वर्गणी त्वरित आली पाहिजे. नाट्यकथार्णव कर्ते.

वर्गणीची पोंच.

रु. आ.

नबाब साहेब, सावनूर, कोल्हापु —१२
रा. रा. गणेश कृष्ण आपटे बी. ए, एल्. सी. ई..... —१२
" के. एच्. रंगाप्पा, सिरसी.. —१२
" पुरुषोत्तम मारुती.. .. .. —१२
" सेक्रेटरी, नेटिव लायब्ररी, ठाणे २— ६
" बाळकृष्ण सदानंद देसाई.. २
" माधवराव पांडुरंग बर्वे ३
" गणु नारायण राणे.. .. .. २—१४
" लिंबाजी सदाशिव पानसी.. २— ६
" सखाराम महादेव नामजोशी.. ३
" रावजी रघुनाथजी (बाकी पूज्य) २— ४
" विष्णु केशव चांफेकर.. .. ३—१२
रा. सा. गोपाळ रावजी टिळक.. ३—१२
रा. रा. रामचंद्र विश्वनाथ, प.व.डि. ३
" गोविंद भिकाजी फाटक.. .. ३
" रामचंद्र विष्णु माडगांवकर.. ३
" सीताराम मोरेश्वर गुर्जर.. ३
" रामकृष्ण सखाराम.. .. .. ३
" भाऊ मोरोबा (बाकीपैकीं).. —८
" रामकृष्ण माणिकजी.. .. .. ३
रा. सा. बाबाजी विनायक प्रधान ३—१२
रा. रा. भाऊ दिनकर सरंजामे.. १— ८
" रघुनाथ भास्करजी.. .. .. ३
मि. आरदेसर नसरवानजी; धारवाड —७
रा. रा. कृष्णराव गोविंद, नागपुर —२—१३
" नारायण गोपाळ राजे.. .. २— ६
" गोविंद गोपाळ शेरे मुकादम.. —३
रा. रा. बाळकृष्ण आत्माराम गुप्ते.. ३
" बाबाजी रघुनाथ ३
" निळकंठ दामोदर डेंगळे.. .. ६—१२
" नारायण केरोबा.. .. .. ३
" माधवराव नारायण फुलमावंदीकर ३
" बिंदुराव गोपाळ भांडारकवठीकर ३
" काशीनाथ नारायण धोत्रे.. ३
" गोविंदराव केशवजी १
" नानाभाई भवानीशंकर कानविंदे ३
" रामचंद्र महादेव वाडठेरकर, सोलापुर .. .. ६—१२
" विष्णु दिवाकर ओव्हरसीयर. ६—१२
" गुरुनाथ बाळकृष्ण फाटक.. ६—१२
" मोरेश्वर सदानंद मानकर .. ३
" बळवंत रघुनाथ पेंढारकर, हरडा ४—१४
" बापुजी लक्ष्मण केळकर (१८०३ चे पहिले ६ अंक अखेर).. .. .. ३— ६
" रामभाऊ मोघे.. .. .. .. ६—१२
" वासुदेव बापुजी कानिटकर.. ६
" महादेव चिमणाजी आपटे .. ३
रा. सा. रामचंद्र भिवप्पा, रोण.. ३— ६
रा. रा. सोकर बापुजी त्रिलोकेकर ६
" शंकर व्यंकटेश टकी .. .. ६—१२
" गोविंद सदाशिव परांजपे.. ६—१२
" वामन महादेव पटवर्धन ३
डा. गणपतराव बाबाजी सप्रे.. ३— ६
रा. रा. महादेव विष्णु काणे.. .. ६—१२

माना०—नीट शुद्धीवर येऊन बोला. काय ! धनाजीरावांशीं एकांतांत माझी मुलगी होती !

गोवि०—होय सरकार ! मला भ्रांति झाली असेल, तर माझे कानही आपण पिळावेत !

माना०—तें मग पाहून घेईन !—बरें पण ही गोष्ट तुमच्या शिवाय आणखी कोणा कोणाला कळली आहे ?

गोवि०—आपण, मी, कीं **अर्जुना**, यांशिवाय बाहेर कोणालाही ही गोष्ट टाऊक नाहीं.

माना०—एकूण ही गोष्ट घट्कणीं तर झालीच !—असो. चिंता नाहीं. पण इतःपर तुम्हीं आपणांकडून ही सगळी गोष्ट गुप्त ठेवा. कोणाला कळवूं नका. **अर्जुना**लाही तसेंच बजावून ठेवा !यांत जर कांहीं कमजास्ती होईल, तर दोघांनाही गडाखालीं लोटून देववीन, आठवण ठेवा !

गोवि०—आज्ञा. परंतु माझ्या बोलण्यानें सरकारची मज गरीबावर इतराजी मात्र न व्हावी.

माना०—यांत इतराजी कशाकरितां ? यांत तुम्हीं आपलें कर्तव्यच बजाविलें.

गोवि०—हं:—सरकारच्या ध्यानांत गोष्ट अशी असली म्हणजे—

माना०—खबरदार ! आतां अधिक बोलाल तर—मला अधिक बोल याचा कंटाळा आहे!

गोवि०—आज्ञा. मी घेतों तर आतां हुकूम—हो. पण मग त्या म्हातारीला किल्ल्यावर बोलावून आणण्याचें ठरलेंना ?

माना०—तें तुम्हांला मघांच हो म्हणून सांगितलें!

गोवि०—तें मीही जाणतों, पण सहज एक गोष्ट सांगायची राहिली म्हणून बोललो. कांहीं फारशी नाहीं, पण ती बाई चेटकें जाणते; आणखी तिला पुष्कळ मंत्र बिंत्र येतात; आणखी ती बिब्बे कोठून आणते कोणास ठाऊक, पण ते फोडून रस्त्यावर पेरून ठेविते; आणखी त्यांवरून कोणीं जाऊं येऊं लागलें म्हणजे त्याला भुताटकी बाधते असें म्हणतात! मग खरें काय असलें तें असो !

माना०—बरें बरें !— त्याचा विचार तिला किल्ल्यावर आणिल्यावर करितां येईल. जा तुम्हीं आतां, आणि सांगितल्याप्रमाणें आपल्या कामाला लागा.

गोवि०—(मजरा करून निघून जातो.)

माना०—(दांत ओंठ खाऊं लागून) काय ? दक्षिण बुरुजांत दिवा ! आणखी तिथें माणसांचे आवाज ऐकूं येतात !—आः—आः—याचा काय वरें अर्थ असावा ? काय ? असें तर नसेलना ?—पण छेः—अशी गोष्ट कधीं तरी होईल ? **कमळे** ! पोरी ! तूं या भिकारड्या **धनाजीवर** आपलें मन ठेवूं नको म्हणून मीं तुला बजावून सांगितलें आहे. असें असतां जर तूं ही माझ्या विमल कुळाला काळिमा आणणारी गोष्ट करशील तर—तर—(अर्धें बोलत बोलतच आवेशानें निघून जातो.)

प्र. ४—तिरसगडचा दक्षिण बुरुज. एका कोपऱ्यांत टिकटिक दिवा जळत आहे.

(धनाजीराव आणि कमला बोलत आहेत.)

कम०—हें काय बर ? खरंच मला आग्रह करूं नका. आपलें बोलणें जर मी अशी रोज रोज इतका वेळ ऐकत राहिलें, तर लोक मला काय बरं म्हणतील ?

धना०—प्रिये!तूं म्हणतेस ती गोष्ट मलाही समजत नाहीं असें नाहीं.—तरी पण काय असेल

तें असो;—मी आपणाकडून पुष्कळ विचार करितों,तरी पण राहून राहून माझें मन अगदीं गोंधळून जातें. तुझा पिता माझ्याशीं इतका निष्ठुरपणानें वागेल असें माझ्या ध्यानीं मनींही आलें नव्हतें ! असो; परमेश्वराची इच्छा ! प्रिये तुला काय सांगू ? तुझा हा मुखचंद्रमा क्षणमात्रही दृष्टीआड झाला असतां या जिवाला जें कांहीं दुःख होतें तें सांगतां पुरवत नाहीं. तथापि प्राप्त प्रसंगापुढें नाइलाज आहे.—बरें तर प्रिये ! आतां धेतों मी निरोप! आणखी उद्यां रात्रीं या वेळेच्या अगोदरच मी येथें येऊन तुझी वाट पहात राहीन ! तुझ्याशीं मला कित्ती कित्ती गोष्टी बोलायच्या आहेत, परंतु त्यांविषयीं आतां बोलून काय उपयोग ?—बरें प्रिये ! उद्यां—

कम०—फिरून आपलें तेंच! **धनाजीराव** ! हें काय बरें? आपलें असलें बोलणें ऐकलें म्हणजे माझीही आपल्याचप्रमाणें स्थिति होऊन जाते ! पण—पण—खरेंच सांगा या कामीं मीं गरीब अबलेनें तरी काय बरें करावें? माणसाची अब्रू ही कांचेसारखी आहे म्हणतात. कांच एक वेळ फुटली म्हणजे ती जशी फिरून सांधत नाहीं, तशी अब्रू एक वेळ गेली तर ती फिरून मिळत नाहीं !—बाबांची आणि माझी आज दुपारीं गुप्तती दृष्टादृष्ट झाली, त्या वेळीं बाबा कांहीं मला बोलले नाहींत, तरी पण त्यांनीं माझ्याकडे रागावून पाहिल्याचा मला भास झाला. आपली आणि माझी या निकाणीं गांठ पडते याबद्दल **गोविंदपंत** कारकुनालाही कांहीं संशय आला आहेसें वाटतें; कारण तो कधीं मजशीं बोलत नाहीं कीं चालत नाहीं, तरी पण आज सकाळीं तो माझ्याकडे पाहून गालांतल्या गालांत हंसला !

धना०—प्रिये ! तूं म्हणतेस या गोष्टी कदाचित् खऱ्या असतील, परंतु ही तुला भ्रांति झाली नसेल कशावरून ? 'मनीं असे तें स्वप्नीं दिसे ' म्हणतात, तशांतली देखील कदाचित्ही गोष्ट असेल ! तुझ्या पित्याचा रागीट स्वभाव मला माहित आहे, यावरून त्याला जर तूं म्हणतेस हा संशय आला असता, तर तो मला नाहीं वाटत इतका वेळ बोलल्याशिवाय रहाता ! यावरून मी म्हणतों.—

कम०—आपण म्हणतां त्या सर्व गोष्टी खऱ्या, तरी पण आपण एक वेळ उद्यां येथें येऊन गेल्यावर पुनरपि येथें येण्याचें करूं नये. त्यापासून आपणा उभयतांसही सुख व्हायचें राहील एकीकडे, पण उलटे क्लेश मात्र होतील.

धना०—अहाहा ! तूं धन्य आहेस ! या वेळचे तुझे शब्द ऐकून माझ्या मनाला जें कांहीं समाधान वाटत आहे, तें एक मला माहित कीं परमेश्वराला माहित ! प्रिये ! तूं पूर्ण सद्गुणी आहेस ह्याविषयीं माझी खातरी आहे, यास्तव तूं कदापि वचनभ्रष्ट व्हावयाची नाहींस असें मी समजतों. प्रिये ! तुला काय सांगूं ? तुझ्याच गळ्याची शपथ, तूं उद्यां एक वेळ मनाचा धडा करून हा किल्ला सोडून मजसमागमें चल, म्हणजे मी खचित सांगतों, मी पुनरपि या किल्ल्याचें तोंड देखील पहावयाचा नाहीं !

कम०—वाहवा ! अर्थाचा अनर्थ बराच करतां येतो ! हें काय बरें ? मी इथून पळून जायची का गोष्ट बोललें?

धना०—तें कांहीं मला समजत नाहीं, परंतु प्रिये ! तुला जर माझी कांहीं कींव ह्मणून येत असेल, तर तूं मजबरोबर येण्यास नाहीं ह्मणूं नको. मी कांहीं तुझ्या सारखा संपन्न नाहीं, तरी नुसत्या संपत्तीवरच निस्त टेवणारी तूं नव्हेस हें मी खचित समजतों. याकरितां तूं जर मजबरोबर येण्यास राजी झालीस, तर जोंपर्यंत या जिवांत जीव आहे तोंपर्यंत मजकडून कधींही तुला अंतर होणार नाहीं. आपण **हिंदुस्थानांत** जाऊं, तेथ आपला विवाह होईल, व त्या ठिकाणीं माझे मोठमोठे स्नेही आहेत, यांच्या मदतीनें आपला सर्व बेतबात जमेल.

कम०—आपण ह्मणतां त्या सर्व गोष्टी मी कबूल करितें; व आपल्या प्रेमाच्या पायीं हे चरण कधीं अंतरूं नयेत असें मलाही वाटतें. पण फिरून मनांत विचार येतो, मी जर आपणाबरोबर निघून गेलें, तर मागें लोक मला काय ह्मणतील, व माझ्या मागें बाबांची काय अवस्था होईल ? आपलें ह्मणणें एकदम कबूल न करितां माझा पाय मागें घोंटाळतो तो एवढ्याकरितांच. एरवीं मी आपणासमागमें असतां मला जन्मभर उपास काढायचे पडले, किंवा घोर भयंकर अरण्यांतही रहावें लागलें, तरी देखील तें मी मोठ्या आनंदानें पत्करीन.

धना०—अहाहा ! प्रिये ! या वेळचें तुझें हें भाषण मला केवळ आनंदसागरांत गटंगळ्याच जणों खावयास लावीत आहे !—प्रिये ! धन्य ! धन्य मी ! अशा दृढ पातिव्रत्याची स्त्री मला मिळाल्यावर मी **नंदन**वनाची अपेक्षा कशासाठीं धरावी ? प्रिये ! तुजसमागमें असल्यावर मला हा भूलोकच स्वर्गसुखापेक्षांही अधिक सुखदायक होईल !

कम०—होय. तें मी देखील नाहीं ह्मणत नाहीं, पण मी आतां बोललें एवढींच कायती मला मोठी अडचण वाटते, आणखी त्यामुळेंच कायतो माझा पाय येथून निघत नाहीं.

धना०—प्रिये ! याठिकाणीं मात्र तूं चुकतेस खचित. तूं लोकापवादाला भितेस, परंतु जन विविध असल्यामुळें ते कोणत्या वेळीं कोणाला काय ह्मणतील याचा काय नेम आहे ? मोठ मोठे योगी, साधुजन, ते देखील या जनापवादापासून सुटले नाहींत, मग आपण तर साधारण मनुष्यें, आपली गोष्ट कशाला पाहिजे ? प्रत्यक्ष **रामचंद्र**पत्नी **सीतादेवी**, तिलासुद्धां या लोकापवादानें सोडिलें नाहीं, व याच्याच पायीं तिला चौदा वर्षें अरण्यांत **वाल्मीकि** मुनीच्या आश्रमांत कुचंबावें लागलें. तूं ज्ञातीच आहेस, तेव्हां तुला ही गोष्ट नव्यानेंच सांगितली पाहिजे असें नाहीं. तशांतून तूं एकादी वाईट गोष्ट करणार असतीस, तर तो प्रकार निराळा होता. परंतु तसें कांहींच नाहीं. तूं बहुश्रुत आहेस, तूं अनेक पुराणें श्रवण केलीं आहेत. तेव्हां तुला **शकुंतला, उर्वशी**, इत्यादिकांच्या कथा ठाऊकच आहेत. तेव्हां तुला अधिक तें काय सांगावें ? तूं आपल्या पित्याची भीति बाळगतेस, परंतु **शकुंतलादि**कांनीं गांधर्वविधीनेंच विवाह केलेले तुला नाहींतका माहीत ? आणखी त्यांचे **गुप्त** प्रकारें विवाह झाल्यानंतर त्यांच्या जनकांनीं त्यांचें अभिनंदनच केलें कीं नाहीं ? तुला तुझ्या पित्याचा तुजवर रोष होईल ह्मणून भय वाटत आहे, पण ते शीघ्रकोपी आहेत इतकेंच कायतें. बाकी त्यांच्या

सारखा प्रेमशाली पुरुष दुसरा अहे कोण? आपण दोघें त्यांचे जवळ राहूनच लग्नाचीं मोठीं झालों हें त्यांच्या प्रेमाचंच फळ नव्हे तर दुसऱ्या कशाचें बरें फळ आहे? त्यांची वृत्ति आज दोन तीन वर्षांपूर्वीपर्यंत फार चांगली होती, परंतु अलीकडेच तींत हा नवीन फरक झाला आहे. परंतु तो त्यांच्या अंगीं असाच चिरकाळ राहील, अशी कल्पना माझी मनोदेवता कांहीं करूं शकत नाहीं. तूं आज एक मजबरोबर निघून गेलीस, तर तुझ्या पित्याला प्रथमतः वाईट वाटून रोषही येईल हें मी कबूल करितों; परंतु त्यांच्या या वयांत त्यांना तुझ्यावांचून प्रेम ठेवायला दुसरें कोण बरं आहे? प्रिये! **कमले**! मी तुला खचित सांगतों, तुझ्यावर पित्याचा जरी रोष झाला तरी तो कांहीं फार वेळ रहावयाचा नाहीं, व अखेर आंतड्यांचें प्रेम आंतड्यांला ओढीलच. याकरितां तूं माझें म्हणणें मोडूं नकोच.

कम०—असें बोलणें म्हणजे बाई सगळाच उपाय हरतो! तरी पण-खरंच मी सांगतें—मला—मला आपण—आग्रह करूं नये!

धना०—झालें, आलें का फिरून येरें माझ्या मागल्यावर?—प्रिये! मी तुला इतका वेळ विनवीत आहें, त्याचें तुला कांहींच वाटत नाहीं अं? प्रिये! या आपल्या प्रियजनाशीं इतकें निष्ठुर वर्तन करणें तुला योग्य वटतें काय?—प्रिये! हें काय बरें? नको नको! असं काय बरं करावं? हे तुझे नयनाश्रु माझ्या धैर्यस्तंभास पहा कसे खचवून टाकीत आहेत.—मी चुकलों, मी तुला निष्ठुर म्हटलें याबद्दल मी क्षमा मागतों!—अहाहा! केवढा हा चमत्कार!—प्रिये! तूं आपल्या नुसत्या शब्दांनीं जरी मजकरितां घर सोडून यावयास तयार नाहीं म्हणून म्हणत आहेस, तरी तुझं हें अनुकंपाप्रेमल अवलोकन, आणि अंतःकरणाच्या वृत्तीचा निरोध केल्यामुळें उत्पन्न झालेला हा उरःकंप, हीं कोठें तुझ्या शब्दांच्या खरेपणाविषयीं साक्ष देत आहेत?—प्रिये! हें काय बरें? तूं इतकी विचारी असून एवढ्याशा अल्प कारणाकरितां मला खरोखरीच निराशेच्या आधीन नको करूं.—बोल बोल!

कम०—प्रिया! आपणच असें बोलल्यावर मी अबलेनें काय बरें करावें? चलं—मी उद्यां रात्रीं यत आपणाबरोबर! आपणाकरितां माझा प्रिय पिता आणि त्याची सर्व संपत्ति हीं मला अंतरली, तरी त्यांची मी इतःपर पर्वा करणार नाहीं! जीं आपली वाट तीच माझी!

धना०—(तिला आलिंगन देतो.) अहाहा! प्रिये! यावेळीं मजसारखा धन्य प्राणी दुसरा कोण आहे? बरं तर मग, प्रिये! उद्यां रात्रींचा बेत ठरीवच! मी आजच्या सारखाच इथें गुप्तपणें येईन, आणि आपण बरोबरच जाऊं. आपण बाहेर पडल्यावर आपला कोणाला संशय वगैरे न यावा, एवढ्याकरितां तूं हा स्त्रीवेष टाकून पुरुषवेष धारण कर! त्या वेषाची मी तुला सर्व तयारी करून देईन! तूं तो वेष घेतलास, म्हणजे पंधरा सोळा वर्षांच्या मुलाएवढी दिसशील; व जरी आंतून तूं सुकुमार स्त्रीच असशील, तरी बाहेरून तरी **तारकासुर** दैत्याचा वध करण्यास **कार्तिकस्वामी** जाऊं लागले असतां ते जसे उत्साहभरित आणि महापराक्रमी

दिसले, तशी तूंही दिसशील.

कम०—हात् त्याचे. एकूण लोकांना आपण पुरुष आहों म्हणून वाटविण इतकें का सोपें आहे?

धना०—अं: ! वरकांतीं पुरुष बनायला कांहीं फारशी खटपट नाहीं लागत ! स्त्रीजातीची स्वाभाविक शालीनतेची मुद्रा विसरून जाऊन अंमळसा दृष्टीचा निर्भीडपणा शिकावा; ओंठावर मिशा नसल्या तरी चिंता नाहीं, पण उगीच मिशांना पीळ घालीत बसण्याचा झोंक दाखवीत जावा; अधिक आगळें हंसावें; दहापांच साध्या शिव्या प्रसंग आलाच तर पाठ केलेल्या असाव्यात; कंबरबंधास लांब तरवार लटकाविलेली असून उगीच वाऱ्यानें झाडाचें पान हाललें किंवा दुसरें कांहीं झालें कीं लागलाच तरवारीच्या मुठीकडे हात गेलासें दाखवावें, जसें कांहीं पहाणारांना सहज वाटावें कीं, काय हो बोवा, एवढ्या लहान वयांत याच्या अंगीं केवढा हा पराक्रम ? —अशा तऱ्हेनें वागलें म्हणजे बनला वरकांतीं पुरुष ! बाकी खुद्द पुरुषजातीमध्यें देखील बाहेरून मात्र शूराचा आव घालणारे, परंतु प्रसंग आला असतां हातपाय लटपटूं लागणारे पुष्कळ लोक असतात! (इतक्यांत बाहेरल्या अंगास गडबड झालेली ऐकूं येते.)

कम०—हां—थांबा—बाबाच इकडे येताहेत वाटतें.

धना०—बरें, तर तूं मजबरोबर खचित येतेस असें मी समजतों तर !

कम०—(हलक्या स्वरानें) तुम्हीं अगोदर येथून जा कसे. मी खचित येतें. कदाचित् नच आलें तर मात्र मी जिवंत नाहीं असेंच समजा.

धना०—एकून हें खचित अं ! बरं तर हा मी चाललों—पण प्रिये! विसरूं नको बरं!—नाहीं—तसं नव्हे.—हा चाललों, बरं पण एक साखरेचा ! (तिचें चुंबन घेऊनु निघून जातो.)

कम०—मला भ्रांति तर नाहींना झाली ?—पण छे:—हीं फिरून पावलें ऐकूं येऊं लागलीं ! (इतक्यांत मानाजीराव येतात त्यांस पाहून) काय ? बाबा !

माना०—कोण ? कमळे ! इथें कायग करतेस?

कम०—कांहीं नाहीं बाबा ! सहज आपली—

माना०—त्या—त्या—भिकारड्या धनाजीरावाला भेटायला आली होतीस, नाहीं ?

कम०—बाबा !—

माना०—गप्प रहा पोरी ! उगीच खोटें बोलून आणखी पापांत पडूं नकोस !—तुला लाज नाहीं वाटत ? आज या बुरुजांत कैक वर्षें दिवा लागलेला, किंवा येथें कोणीं एवढा तरी आवाज काढिलेला, कोणाच्या स्वप्नांत देखील नाहीं. असें असतां इथें आलीकडे दिवा दिसूं लागला, आणखी तिथें माणसंही दुसरीं तिसरींकोणी नसून वयांत आलेलीं अविवाहित दोघ हीं तुम्हीं—कारटे—! माझ्या कुळाला हा तूं कलंक लाविलास !—कारटे ! बोल ! तुला या ठिकाणीं दिवा आणण्याचें काय कारण होतें! आणखी चोरट्यासारखी येऊन भलभलत्या तरुण पुरुषासमागमें गोष्टी बोलत बसलीस, त्याची तुला शरम कशी नाहीं वाटली ?—बोल ! या ठिकाणीं **धनाजीराव** होता का दुसरें कोण होतें ?

कम०—बाबा! दुसरें कोण असणार? या ठिकाणीं **धनाजीराव**च होते, आणखी ते येथून जाणार म्हणून मी त्यांच्याशीं अंमळ बोलत होतें.

माना०—पण पोरी ! तूं त्या **धनाजी**चें तोंड देखील पहात जाऊं नकोस, म्हणून तुला मीं सांगितलें होतें, त तूं सर्व विसरलीस ?

कम०—नाहीं बाबा! पण तें तुम्हीं फारच उशीरां

सांगितलें! अगोदरच सांगितलें असतें, तर कांहीं उपयोग तरी झाला असता !—पण—

माना०—एकूण पोरी ! तूं आपल्या सर्व दोषांचें खापर अखेर माझ्याच डोक्यावर फोडूं पहातेस अं? पोरी! या **धनाजीरावा**ला मीं लहानपणापासून घरीं बाळगलें, व त्याला न् तुला दोघांनाही बाळपणांत एकत्र राहूं दिलें, खेळूं दिलें, त्याबद्दल तूं मलाच दोष देतेस ?

कम०—बाबा ! लहान तोंडीं मोठा घास घेऊं नये, पण आतां आपण निक्षून विचारतांच म्हणून सांगतें. बाबा ! यांत माझ्याकडे तरी काय दोष आहे ? तुम्हीं आत्तां म्हणालां कीं, तुम्हींच आम्हां दोघांना लहानपणीं एकत्र राहूं दिलें, खेळूं दिलें, पण याशिवाय लहानपणापासून तुम्हींच मोठ्या प्रेमानें नव्हतां म्हणत? कीं "**धनाजीराव** ! ही **कमळा** मोठी झाली म्हणजे तुम्हांलाच देईन" म्हणून ? आणखी तुम्हींच मला लाडानें कुरवाळून नव्हतां कां म्हणत कीं "**कमळे** ! तुम्हीं दोघेंही जन्मभर अशींच एकत्र रहा" ? आणखी असें म्हणून लागलीच आम्हीं दोघें खेळूं लागलों असतां, आम्हांला शाबासक्या देऊन खाऊ देखील तुम्हीं नव्हतां देत ? असो; अशा रीतीनें लहानपणापासून तुम्हीं आम्हां दोघांना बागवीत गेलां, आणखी त्यामुळें दोघांच्या प्रेमाची गांठ दृढ पडली, तेव्हां मग तुम्हीं मला **धनाजीरावां**चें नांव घेत जाऊं नको म्हणून सांगितलेंत, तोंपर्यंत सांगितलें नाहीं !

माना०—पोरी ! तूं म्हणतेस तें सर्व खरें, पण ज्या वेळीं मीं तसें म्हटलें त्या वेळीं मला मोठीच भुरळ पडली होती !

कम०—तें कसेंही असो. पण बाबा ! ती भुरळ मला जन्माची घातक झाली याला माझा तरी काय उपाय ?

माना०—बसबस ! **कमळे** ! इतःपर मी तुझे असलें बोलणें ऐकत बसायचा नाहीं ! **धनाजीरावां**चें आणि तुझें एकमेकांवर प्रेम जडावयाजोगें मजकडून वर्तन झालें खरें, तरी पण—दुसरें तिसरें कांहीं असो. मी तुला सांगतों एवढ्यासाठींच माझें म्हणणें तुला ऐकलें पाहिजे ! तुला **धनाजीरावां**वरील आपलें प्रेम विसरलें पाहिजे ! असें करितांना तुझ्या जिवाला जरी क्लेश होतील, तरी तें अपत्यधर्मास जागून वर्तन केलें असतां तूं आपोआप विसरून जाशील; व मीही आजपर्यंतचें तुझें वर्तन सर्व गिळून जाऊन तुला त्याबद्दल चकारशब्दही बोलणार नाहीं !—काय ? पोरी !—पोरी ! मी इतकें सांगतों, तरी तुला माझें म्हणणें ऐकावेंसें वाटत नाहीं ! तूं माझ्या आज्ञेविरुद्ध वर्तन केलें असतां या म्हाताऱ्याच्या जिवाला दुःख होईल तिकडे तुझें लक्ष जात नाहीं ? बरें बरें !—पोरी ! तुला अखेरची एकच गोष्ट सांगतों, जर तूं आपल्या अनावर इच्छेच्या आधीन होऊन माझा आज्ञाभंग करशील, आणि त्या जन्मापासून भिकारडया **धनाजीरावा**वर आपलें मन ठेवशील, किंवा त्याशीं बोलशील चालशील, तर विचार कर—हा **मानाजीराव** तुझ्या जिवाला कदापि चैन पडूं द्यावयाचा नाहीं, व परमेश्वरानें तुझें अकल्याणच करावें म्हणून सदासर्वकाळ चिंतीतच राहील !

(आवेशानें निघून जातो.)

कम०—बाबा ! अंमळ थांबा तरी ! माझें म्हणणें—काय ? बाबा माझें न ऐकतांच निघून गेले ? हाय हाय ! देवा देवा ! आतां मी

काय करूं ? प्रत्यक्ष माझे जनक तेच मजशीं क्रूरपणें वर्तन करितात, तर त्यापुढें मज अबलेचा काय बरें उपाय ?–असो; नशीब माझें !–**धनाजीराव** ! बाबांनीं तर माझा त्याग केला, आतां मी सर्वस्वीं तुमची झालें ! याउपर जर तुम्हीं मला वाईट रीतीनें वागवाल, किंवा निंदाशब्दानें माझी निर्भर्त्सना कराल, किंवा मजकडे क्रोधयुक्त मुद्रेनें पहाल, किंवा माझ्या वर्मीं लागेल अशी कांहीं गोष्ट कराल, तर मात्र–छेः पण, मी हे भलतेच संशय काय मनांत आणितें ! **धनाजीराव** ! आपण सत्यमूर्ति आहांत, हें मी पक्केपणीं जाणतें, याकरितां चुकीनें मी बोललें त्याबद्दल क्षमा करावी !

(स्फुंदत स्फुंदत निघून जाते.)

प्र० ५.–तिरसगडाच्या आसपासचा डोंगराळ प्रदेश.

(मागें सांगितलेले दोन चोर येतात.)

२ चोर–कायरे गड्या! हें वांवडें नीट साधेलसें दिसत नाहीं !

१ चोर–तें कां बरें ? तो ब्राह्मण म्हणून कीं काय ? तो ब्राह्मण–त्याच्या गळ्यांत ब्रह्मसूत्र असलें म्हणून काय झालें ? आमच्या गळ्यांत ब्रह्मसूत्र नाहीं कीं काय ? तो एका गांठीचें ब्रह्मसूत्र बाहेर दाखवूं लागेल, तर आपण दहा गांठीचें ब्रह्मसूत्र बाहेर काढूं !

२ चोर–वाः जी वाः–युक्ति तर खाशी काढलीस ! अशानें तुझा ब्राह्मणपणा राहिला खरा !–बरें तें असो. मी तशाकरितां म्हणत नाहीं, पण काय असेल तें असो, आपला हात या ब्राह्मणावर उचलायचें काम कठीण वाटतें!

१ चोर–नाईक ! तुमच्यानें पहिल्यानें हात नसेल उचलत, तर तें काम मला सांगा ! मी अगोदर या स्वारीला घोड्यावरून खालीं ओढितों न् तुम्हीं त्याच्या खिशाला हात घाला म्हणजे झालें !

२ चोर–बरें पाहूं तर या कसें काय साधतें तें!

(इतक्यांत पडद्यांतून घोड्याला हांकीत असल्याचा किंच किंच आवाज ऐकूं येतो.)

१ चोर–हां नाईक ! संभाळा बरें ! दम सोडूं नका ! आलें–

२ चोर–हं–तूं आरंभ तर कर !

(इतक्यांत एक ब्राह्मण ओढ्यासुद्धां तट्टावर बसलेला बाहेर पडतो.)

ब्राह्मण–(तट्टास) किच् किच् किच् किच् ! आयले रे गबरू ! किच् किच् किच् किच्!

१ चोर–(पुढें होऊन) राम राम बामणबुवा ! राम राम !

ब्राह्म०–(दचकल्यासारखा होऊन) अरे हारे कोण दांडगेपणानें मला बामणबुवा म्हणणारा ? कायरे, कोण तूं ?

१ चोर–मी व्हय ! अमी बामणाच बा, आन् तट्टाच ल्योक !

ब्राह्म०–काय गुलामा! तूं ब्राह्मणाचा बाप आणखी तट्टाचा लेंक! म्हणजे याचा रे काय अर्थ!

१ चोर–अरुथ बिरुथ कांई इचारूं नका. तुमी बामन–तुमच बा अमी, अन् ह्यो तुमचा तट्टू त्यो आमचा बा !

ब्राह्म०–गप्प बस, फाजीलपणा पुरे कर! गाढव नाहीं तर ! चोरा! तुझा बाप तट्टू नव्हे. तुझा बाप गाढव !

चोर–व्हय व्हय. त्यें मातर खरं. आन् अमी तुमच्च बा, म्हून तुमी पन गाढव !

ब्राह्म०–गाढवाच्या लेंका ! तोंड आवर! नाहीं तर तुला या ब्राह्मणाचा प्रताप कसा काय आहे तो दाखवीन !–चोरा ! मी कोण आहें, तूं मला ओळखिलें नाहींस ?

१ चोर—मास्ती न्यारी वळक कशापाय व्होवी ! अमी तुमच ह्या, तवां तुमचं समदं त्ये आमचंच आन् ह्यो तट्टू आमचा वा, तवां त्येच्या पाठीवरचा बोजा त्योबी आमचाच! आमास्ती न्यारी वळक नग !

ब्राह्म०—हं हं असं काय ? एकूण तूं मला आडवून दरवडा घालायला आला आहेस ?

१ चोर—होय. तर इतका वेळ याबद्दलचा आपल्याला संशय वाटत होता एकून ? स्वारी ! तुम्हींच एक ब्राह्मणपणाचा डौल नका दाखवूं, मीही तुमच्यापेक्षां वरकडीचा ब्राह्मण आहें !

ब्राह्म०—अरे, जाः, मूर्खा ! अशी चोरी करून पैसे मिळवितोस काय ? आणखी तीही चोरी दुसऱ्या तिसऱ्याची नाहीं, तर शृंगेरीच्या आचार्यांच्या धर्माधिकाऱ्याची? गुलामा! कमजास्ती दंगा कर तर खरा, तुला श्रीपुढें उभें करून नाक घांसवून प्रायश्चित्त देईन तरच हा नांवाचा **पिलंभट आगलावे** !

२ चोर—(तें ऐकून आपणाशीं) काय ? **पिलंभट आगलावे** तो हाच ! ठीक ठीक ! आतां चिंता नाहीं- मी आज इतके दिवस दरवडेखोरांत मिळून आहें, पण गरीब बायाबापड्या आणि गरीब पोटार्थी विचारे ब्राह्मण यांच्यावर हात घालण्याला मीं कधीं मला दिली नाहीं. तरी पण आजची ही गोष्ट कांहीं निराळी आहे ! अशी संधि माझ्या नशिबानें आज आयतीच जमून आली ह्मणायची ! आज सकाळीं मी **तिरसगडा**वर वेष बदलून गेलों असतां तिथें मला या स्वारीला बोलावणें पाठविल्याची बातमी लागली होती खरी!—चिंता नाहीं. याच्यावर हात हुगारायला पहिल्यानें मन घेत नव्हतें, परंतु आतां पुढचा बेत मनांत येऊन बाहूंस जणों काय स्फुरणच येऊं लागत आहे! तर आतां पुढें जावें. (पुढें येतो.) ओहोहो नमोनमः **पिलंभट आगलावे** ! आज स्वारी इकडे कोणीकडे ?

पिलं०—अरे, तूं रे कोण ? तुझी माझी मुळींच ओळख नसतां मला ओळखिल्यासारखें बोलतोस, आणि माझ्याशीं सलगी दाखवितोस, याचा मला मोठा अचंबा वाटतो!

२ चोर—**पिलंभटजी** ! यांत अचंबा कशाचा? तुम्हीं आमचे दोस्तच बोलून चालून जन्मापासूनचे, असें असून तुम्हीं आमची गरिबाची ओळख विसरतां हें कांहीं नीट नाहीं. तुमचा आमचा लहानपणापासून टरावं, आम्हीं कांहीं एकादी गोष्ट करावी, आणखी तिला मागून कर्मंद्र्यांप्रमाणें तुम्हीं आग लावावी, किंवा दुसऱ्याकडून आग लाववावी !—

पिलं०—कांरे, तूंही या चोरट्याचा साथी बनलास वाटतें ?—बरें, तुझें मला एकवार ह्मणें तर एकूंदे. ह्मणजे तुझी व माझी पूर्वीची ओळख होती किंवा नाहीं याची आठवण तरी करून पहातों झाली तर !

२ चोर—आतां तुह्मांला कशानें आठवण होणार! तुम्हीं बोवा **श्री**च्या मर्जीतले, यथेच्छ घृतकल्या मधुकल्या झोडून अडपझडप पहात बसणारे तुम्हीं. तुह्मांला या अरण्यचराची आठवण झालीच तर ती मोठ्या भाग्याची! असो; तुम्हीं विचारतांच ह्मणून मी तुह्मांला आपलें नांव सांगतों! माझें नांव तुह्मांला खरें सांगूं? मला **'मराखास'** असें ह्मणतात.

पिलं०—काय **'मराखास !'** हें आज बोवा नवीन नांव मी ऐकतों ! कायरे तुझें विचि-

त्र नांव तरी !

मरा०—अरे, विचित्र म्हणून काय विचारतोस ? आमचें नांवचसें काय, सगळेंच येथून तेथपर्यंत विचित्र ! जगाचा आणि आमचा कधीं मेळ असायचा नाहीं ! त्याचें असें तर आमचं त्याच्या उलट.

पिलं०—(आश्चर्यानें आपणाशीं) हें बोलणें नुसत्या चोराचेंच असें कांहीं वाटत नाहीं! खचित यांत कांहीं तरी गूढ अर्थ आहे ! असो; विचारून तर पाहूं. (उघडपणें) म्हणजे ? तुझ्या बोलण्याचा अर्थ काय ?

मरा०—भटजी बोवा ! तुम्हांला अर्थाची वगैरे जास्ती चौकशी करीत बसण्याची जरूर नाहीं. माझ्या बोलण्याचे पुष्कळ अर्थ होतात, पण त्यांपैकीं तुम्हांला एक अर्थ सांगतों. तो तुम्हांला बरोबर समजून घ्यायला पाहिजे असेल तर तुम्हीं मीं मागतों त्या जिन्नसा काढून देण्याचें नाकबूल करा, म्हणजे आपोआप तुम्हांला अर्थ कळून येईल !

पिलं०—तुझें बोलणें कांहीं चमत्कारिकसेंच भासतें. अरे, तूं मला म्हणतो आहेस तरी काय ?

मरा०—मी तुम्हांला दुसरें तिसरें कांहीं म्हणत नाहीं. तुमच्या जवळच्या जिन्नसा मी मागतों त्या मुकाटयानें काढून द्या, नाहीं तर 'मरा खास' एवढेंच म्हणतों.—अरे, पण हो बरी आठवण झाली. कां कसें काय **पिलंभटजी** ! आपली स्वारी आतां या एवढया ढेर पोटाला बरोबर घेऊन चालली आहे कोणीकडे, तें नाहीं तुम्हीं आम्हांला सांगितलें ?

पिलं०—(रागावून) चोरटया ! गुलामा ! तूं मला ढेरपोटया म्हणतोस काय ?—बरें बरें, माझ्या समोर उभा रहा, रामरक्षेचा मंत्र जपून तुला आतां शापून भस्म करून टाकितों. तूं काय समजला आहेस ?

मरा०—(मोठयानें खो खो हंसून) भटजी बोवा ! तुम्हीं त्या तसल्या नादांत कांहीं पडूं नका. तुमची रामरक्षा तुमच्यापाशींच राहूं द्या ! माझें म्हणणें तुम्हांला ऐकायचें नसेल, तर तुम्हीं आतांच राम म्हणा, कीं, अर्ध घटकेच्या आंत तुमची रक्षा येथल्या येथेंच करून टाकतों ! काहीं काळजी करूं नका! (तरवार उगारतो.)

पिलं०—(घाबरून) हा कर्मचांडाळा ! एकून मीं तुझें ऐकलें नाहीं, तर तूं मला ठार मारणार अं ?—बरें बाबा ! चुकलों—माफ कर ! तुला काय पाहिजे असेल तें मागून घे कसा, म्हणजे मी वाटेस लागलों एकदाचा !

मरा०—**पिलंभट** ! अस्से ! असे नीट शुद्धीवर तर या!—भटजी बोवा ! मी चोर तर खराच, पण काय असेल तें असो, तुमच्यावर विनाकारण हात हुगारावा अशी माझी कांहीं बुद्धि नाहीं, याकरितां माझें म्हणणें नीट ऐका, म्हणजे त्यांत तुमचें कल्याण आहे.

पिलं०—बरें बोवा, काय असेल तें बोला पाहूं?

मरा०—तुम्हीं चाललां कोणीकडे ?

पिलं०—(खोकरून) हं अं—वरती गडावर चाललों.

मरा०—असें असें ! बरें, पण काम ?

पिलं०—बाबा ! तेवढें मात्र विचारूं नको, तें फार गुप्त आहे.

मरा०—(फिरून तरवारीकडे हात नेऊन) चिंता नाहीं, तें कितीही गुप्त असलें तरी माझें हें शस्त्र तुमचें हृदय फोडून त्यांतून तें बाहेर

काढील. कधीं सोडणार नाहीं !-हं- मग कसें काय ?

पिलं०—कसें काय ?—मी बो—

मरा०—हं—पाल्हाळ लावूं नका ! काय म्हणणें असेल तें एकदम बोलून जा !

पिलं०—अरे, हो पण बोलतोंच आहेना ?

मरा०—फिरून ! गप्प! नीट एकदम सगळें काय असेल तें सांगून टाका !

पिलं०—बरें ऐकाच तर मग ! वर गडावरचा तो दुमालदार—त्याची विनंती आमच्या **श्रीं**-संनिध आली होती, तींत त्यानें, आपल्या हातून कांहीं अघोर पातक घडलें आहे त्याच्या निष्क्रयाकरितां सर्वप्रायश्चित्त म्हणून जें थोरलें प्रायश्चित्त असतें तें घेण्याचा माझा विचार आहे, याकरितां **श्रीं**ची आज्ञा असावी, म्हणून लिहिलें होतें !

मरा०—(आपणाशीं) हं—हं—पातक घडलें काय ? आणखी तेंही अघोर ! आणखी त्याबद्दल तो प्रायश्चित्त घेणार!—ठीक ठीक ! आः दुरात्म्या—(उघडपणें) बरें, मग ?

पिलं०—मग काय ? **श्रीं**कडून जबाब गेला, त्यांत एवढेंच लिहिलें होतें कीं, हल्लींचा आमच्या पदरचा धर्माधिकारी अमुक अमुक—तो हल्लीं **गोंडवणांत** सेवा वसूल करण्याकरितां फिरतो आहे, तो फिरत फिरत तुमच्याकडे येईल, त्याला तुम्हीं आपला मजकूर समजावून द्या, म्हणजे त्याच्याबद्दल इकडून विचार होणें तो होईल.

मरा०—बरें, तो दुमालदार तुम्हांला ओळखतो ? नाहीं—त्यानें यापूर्वी तुम्हांला कधीं पाहिलें आहे?

पिलं०—मुळींच नाहीं.

मरा०—बरें नसेल, पण त्याच्या नोकरांतून कोणी तुम्हांला ओळखणारे आहेत किंवा कसें?

पिलं०—तशांतलें कांहीं एक नाहीं. मी या प्रांतांत पूर्वी कधींच आलेलों नाहीं. आमची इकडे येण्याची म्हटली म्हणजे ही पहिलीच खेप. मी इकडे येण्यापूर्वी **श्रीं**कडून पत्र घेऊन आलों आहे, तेवढ्यावरून काय ती दुमालदाराची आणि माझी ओळख पडणार.

मरा०—फार उत्तम. तर स्वारी! आतां तुमच्या अंगावरला हा पोशाख उतरा, आणखी तो व तें तुमचें स्वामींकडचें पत्र, आणखी हें तुमचें कंठाळीसकट घोडें, हीं सगळीं माझ्या स्वाधीन करा—

पिलं०—(घाबरतो.) अरे **मराखास** ! हें तूं कांहीं भलतेंच बोलतोस ! तुला मीं आपलें काम सांगितलें म्हणजे तूं मला जाऊं देशील म्हणून मला भरंवसा दिलास, तो गेला वाटतें कोणीकडच्या कोणीकडे गाढवाच्या—?

मरा०—अरे हो हो भटा ! फार गमजा करशील तर खचित मरशील. तर तूं मुकाट्यानें आपलें काय आहे नाहीं तें माझ्या स्वाधीन कर कसा. तुझ्या पैशा आडक्याची कांहीं मला जरूर नाहीं.

१ **चोर**—तेवढें बरोबर खरें. भटजी बोवा ! तुमच्या पैशाची आमच्या नाइकांना कांहीं जरूर नाहीं. त्याची जरूर आमच्यासारख्या त्यांच्या साथीदारांना ! (हंसतो.)

मरा०—गप्प बस मूर्खा ! खबरदार माझ्या हुकुमाशिवाय यांच्या पैशाआडक्याला कोणी हात लावाल तर ! —हं भटजी बोवा ! ऐकत काय बसलां? मीं मागितलेल्या जिन्नसा मला आतांच्या आतां मिळाल्या पाहिजेत. नाहीं तर मी जी आज्ञा करीन ती पाळा-

यला मी शीळ वाजविल्याबरोबर आतां दहा वीस यमदूत या ठिकाणीं नागव्या तरवारींनिशीं उभे रहातील. हं—मग कसें काय ?

पिलं०—(नाखुषीनें) घे बोवा ! करतां काय? जबरदस्ताचें गळ्यांत देखील अडकवून घेतलें पाहिजे.—अरे पण ए—तूं माझें सगळें घेणार तर घे, परंतु तेवढे माझे पैसे आणखी तें **श्री**चें आज्ञापत्र एवढीं मात्र कृपा करून मजपाशीं राहूं दे.

मरा०—भटजी बोवा ! तुम्हीं गप्प बसा. तुम्हांला यांतली कांहीं अक्कल नाहीं.—(त्याच्या अंगावरील सर्व कपडे वगैरे काढून घेतो.) अरे **सद्या** ! या स्वारीला मी आतां कफल्लक करून सोडलें आहे, तर यांना आपल्या थोरल्या गुंहत घेऊन जा, असेल त्यांतून खायला प्यायला मागतील तें दे. उद्यां माझें काम आटपून आपण सगळे परत आलों म्हणजे नंतर यांची सुटका!—ऐकिलेंका भटजी बोवा ! तुम्हीं आजचा दिवस आमचे पाहुणे आहां. चला आतां मुकाट्यानें याच्या पाठीमागून.

पिलं०—जातों बोवा. पण गड्या ए—थंडी वाजते आहे, पांघरायला एकादें धोतर तरी दे.

मरा०—आत्तां कांहीं नाहीं. तुम्हीं गुंहत गेल्यावर तिकडे तुमची यथास्थित तजवीज होईल—(१ चोराच्या कानाशीं लागून त्यास कांहीं सांगतो.) हं हं—नीट समजलासना पण ?

सदोबा—हो हो. म्हणजे काय, अगदीं बरोबर समजलों. (पिलंभटाला घेऊन जातो.)

मरा०—आतां सर्व बेत ठीक जमला. जो सूड घेण्याविषयीं मी आज इतके दिवस खटपटींत पडलों आहें, तो सूड आज रात्रीं पुरा उगविलासा होणार ! अः—या दुष्ट—अधमाला भूतदया म्हणजे कशी असते हें स्वप्नांतसुद्धां ठाऊक नाहीं, त्याशीं असेंच वर्तन केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. त्यानें मला इतर रीतीनें दुखविलें असतें तर त्याची मी इतकी पंचाईत करतोंना, पण—ही गोष्ट—छेः—तें तसें व्हायलाच पाहिजे. आः दुरात्म्या ! आतां संभाळून अस. **मानाजीराव!** हा कृतांत काळच यावेळीं तुझ्या पुढें येऊन उभा राहिला आहे असें समज !—दुष्टा ! तुझ्या मनांत सर्वप्रायश्चित्त द्यायचें आहे, नाहीं ? ठीक ठीक ! तें प्रायश्चित्त तुला मीच देतों ! (जातो.)

अंक २.

प्र० १—एका पडक्या देवळाशीं आंतील वाजू.

वाघोजी—(पडद्यांतून हांका मारतो.) ए आई ग!—आई अ !—(बाहेर येऊन) काय आई ? आई घरांत नाहीं ? बरें चिंता नाहीं. ही पिशवी आतांची वेळ या कोनाड्यांत ठेवितों, न् मग फिरून परत येईन तेव्हां सांगेन तिला सगळें.

(इतक्यांत आई येते.)

आई—मला कोणीं हांक मारली ? बाळा ! तूंच का तो ?

वाघो०—होय आई!—आई! मी आतां चाललों आहें बाहेर कांहीं कामाला, त्यांत मला यश यावें म्हणून तूं मला आशीर्वाद दे. तुझा उपासमारा झालेला माझ्यानें पहावेना म्हणून हें येथें थोडेंसें कांहीं आणून ठेवलें आहे. एवढ्यावर एक महिनाभर तरी गुदरेल.

आई—(कोनाड्यांतली पिशवी पाहून) पण ही पिशवी तुला दिली कोणीं ?

वाघो०—आई ! तूं या वेळीं मला कांहीं विचारीत बसूं नको. या पिशवींत जें कांहीं आहे तें सगळें तुझेंच समजून घे.

आई—बाळा ! तुला समजूं लागलें तेव्हांपासून आजपर्यंत मी तुला शिकवीत आलें, त्याचा तूं असाच का अर्थ समजलास ! बाळा ! ही पिशवी तूं पापाचरणानें मिळविलेली आहेस, ती मी कधीं घेणार नाहीं ! फार कशाला, "ही पिशवी घे, तुला मी सगळी पृथ्वी देतों" म्हणून जरी कोणीं सांगितलें, तरी देखील मी तिला हातसुद्धां लावणार नाहीं !—बाळा ! तूं असा कावराबावरा कां दिसतोस ? मला खरेंच सांग, तुला ही पिशवी कोणाकडून मिळाली ? आणखी आज तीन दिवस तूं एकसारखे बाहेर राहून काढलेस, तर तूं इतका वेळ होतास तरी कोठें ?

वाघो०—आई ! हें काय बरें ? मी तुला एकदांचना सांगितलें कीं तूं मला आतां कांहीं विचारीत बसूं नको म्हणून ?

आई—बाळा ! हें असें बोलणें तुला शोभतें कारे ? बाळा ! मी म्हातारी—मला तुझ्यावांचून दुसरें कोणी तरी आहे कारे ? मग तूं असें कसें बरें बोलतोस ?—बाळा ! खरेंच सांग; तूं आलीकडे अगदीं रात्रींचा बाहेरच रहायला शिकला आहेस, तर इथें या ओसाड मैदानांतरे तुला कोणाची संगत मिळाली ? ते मेले दरवडेखोर चोर इथें आसपास चोऱ्या करीत हिंडतात, त्यांच्या तर नाहींना नादाला लागलास ?

वाघो०—आई ! तू जर असेंच बोलत राहशील तर मी नाहीं ऐकून घ्यायचा.—होय, मी लागलों आहें चोरांच्या नादाला, पण पुढें काय म्हणतेस ?

आई—पुढं काय म्हणायचें ? अरे, असें करणें चांगलें नाहीं एवढेंच म्हणायचें ! बाळा ! इथें आपला उपासमारा होतो म्हणून तुला वाईट वाटत असेल, तर तूं या दुमाल्याच्या बाहेर जाऊन कोठें तरी चाकरी पहा, आणखी आपलें पोट भर. तूं माझ्या पोटाची काळजी करूं नको. मी झालें आहे आतां म्हातारी, माझें काय ? मी आहे न् नाहीं दोहींतलीही जमा ! केव्हां राम म्हणेन याचा नेम नाहीं !

वाघो०—हें काय ग असें वेंडेंवाकडें बोलतेस आई ? मी तुझ्या आज्ञेबाहेर नाहीं म्हणून मीं तुला कित्तीदा बरें सांगितलें ? पण माझें म्हणणें तुला कोठें आवडतें ?

आई—बाळा ! तुझें म्हणणें मी समजलें ! तुझ्या मनांत मीही तुझ्याबरोबर बाहेर यावें, पण माझें ऐकशील तर तूं तेवढा कांहीं हट्ट धरूं नको. हा दुमालाच माझी जन्मभूमि आहे, व आतां माझे दिवसही भरत आले आहेत, तर याकरितां इथं राहूनच मी सुखानें राम म्हणेन ! माझ्या जिवाला बाहेर राहून कधीं सुख होणार नाहीं.

वाघो०—बरें तर मग आई ! तूं इथेंच रहा, आणखी मी इथेंच राहून कोणाची नोकरी पहातों म्हणजे झालें.

आई—तुला वाटेल तर तसें कर. पण तूं माझे म्हातारीचें एवढें ऐकच. तूं या दरवडेखोरांच्या नादीं लागूं नकोस. या लोकांच्या नादीं लागल्यापासून तुला कदाचित् आरंभीं आरंभीं थोडीशी चैन वाटेल,

घण नाहींरे नाहीं. यापासून तुला कधीं सुख मिळणार नाहीं. मेला लोकांवर उपकार करावयाचा तर राहिला एकीकडे, पण उलटचा गरीब गुरीबांच्या हत्या मात्र डोक्यावर बसतात ! प्रसिद्धपणें बाहेर तोंड काढून फिरण्याची. लाज ! दिवाभीतासारखें तोंड छपवून नेहमी रहायचें! जरा कुठें पान हाललें किंवा कांहीं खसबसलें कीं मला कोणी धरायला आलें आहे का असें वाटायचें ! शूरपणा गाजवायचा तो बहुतेक अंधारांत! नाहीं तर चोरून छपून दऱ्यांतून खिडींतून!—

बाघो०—आई ! तूं मला हें असेंच का सांगत बसणार! आतां पुरे करतेस कीं नाहीं ग !

आई—(न थांबता) तसेंच भीतीमुळें कधीं स्वस्थपणें डोळ्याला डोळा लागायचा नाहीं! मन शुद्ध नसल्यामुळें खाल्लेलें अन्नही पचण्याची मारामारच ! अशा स्थितींत राहून जिवाला सुख तें कुठून मिळणार ? तर बाळा ! तुला मी एकच सांगतें, तुला नोकरी करायची असेल तर कर, पण ती असल्या चोरांची न करितां कोणा तरी साधाची कर.

बाघो०—आई ! तें तूं आतां पुरें कर कशी.—थांब—बाहेर कोणाचीं पावलें वाजलींशीं वाटतात, कोणी आपला शोध करीत आलें का न कळे.—बाहेर कोण आहे हो?

आई—हेंच तें. चोरी करायची झटली झणजे जिवाला हाच रात्रंदिवस घोर ! बाळा! माझे कान अजून बरेच धड आहेत. बाहेर कोणी आलें नाहीं.

बाघो०—आई ! पण पहा तर खरी.

आई—पहायचें आहे काय त्यांत ? ही पहातें, इथून काय दिसतें आहे ? नाहीं झणायला दोन चार दिवसांपूर्वी सरकारी अंमलदारांनीं दोन तीन चोरटे इथेंच रानांत फांशीं चढविले ते पहा अजून झाडाला लटकत आहेत !

बाघो०—माझ्यानें नाहीं त्यांच्याकडे पहावत,—आई ! खरेंच सांग, तुझ्यानें पहावतें त्यांच्याकडे ?

आई—हो. न पहावायला काय झालें ? मीं जर कोणाचा घातपात केला असेल, तर कीं नाहीं मला भय वाटायचें ?

बाघो०—आई ! तुला कसें वाटेल तें वाटो, पण अजून माझ्या हातून कांहीं कोणाची हत्या घडली नाहीं, तरी पण माझ्यानें तिकडे पहावत नाहीं !

आई—याचें कारण बाबारे,—चोरी ! तूं अजून लहान आहेस. नुकता कुठें त्यांच्याबरोबर राहून शिकायला लागला आहेस, तेव्हां अजून कदाचित् तुझ्या हातून नसेल हत्या घडली; पण जर असाच आणखी कांहीं दिवस रहाशील, तर तूंही हत्या करशील, आणखी—देवदयेनें तसें न घडो—पण जशी या चोरांची अवस्था झाली, तशी एकादे वेळीं तुझीही अवस्था व्हायला चुकायची नाहीं.

बाघो०—आई ! आतां ! तूं खरोखरी पुरे कर. तुझें इतका वेळ बोलणें ऐकूनच मला भय वाटूं लागलें आहे. आणखी हा चोरट्यांचा धंदा खरोखरच वाईट असें आतां माझ्या बुद्धीला वाटूं लागलें आहे. याकरितां हा धंदा मी खचित सोडीन,—हें बघ उद्यांपासून सोडीन !

आई०—उद्यांपासून ?—तें कां कां बरें ? आज रात्रीं—आत्तांच—सोडायला कोणती हरकत आहे ?

वाघो०—तें कांहीं असो; पण आई ! आज मी वचनांत गुंतलों आहें, तेव्हां आज नाहीं सोडतां येत. (इतक्यांत बाहेर पावलें वाजलेलीं ऐकूं येतात.) ऐकलेंस का आई ! बाहेर खरोखरीच कोणी येतें आहे !

आई—आतां बरीक कोणी येतं आहे खचित.

वाघो०—बरें तर आई ! मी आत्तांची वेळ जातों, उद्यांपासून मी तुझ्या आज्ञेबाहेर कधीं चालायचा नाहीं.

आई—बरें तर.—पण उद्यांपासून तरी खचितना ?

वाघो०—होय अगदीं खचित. (निघून जातो.)

आई—बाहेर कोण आहे तें ? (पुढें जाऊन दार-उघडते.) हा म्हातारा कोण बरें असावा ? या वेळीं वारा कोण घोंगावतो आहे, न् थंडीनें दांत कुडकुड करताहेत, अशा स्थितींत एकटा—आणखी अशा उतारवयांत या ओसाड रानांत—कोणीकडे आलास ? अरे बाबा, या वादळांत आणि थंडींत जर ताप बिप आला तर ओखद दिखील रे मिळायचें नाहीं ! (धुमाजी नाईक काठी टेंकीत टेंकीत आंत येतो.)

धुमाजी—खो—खो—खो ! म्हातारे!—मी किल्ल्यावर दुमाल—खो—खो—खो—दुमालदाराचे पदरीं असतों. म्हातारा झालों आहें, कांहीं काम फार नाहीं होत. तरी—खो—खो—हु—खो—तरी आपला फार दिवसांचा जुना म्हणून अजून ठेवून घेतला आहे.—आमच्या धन्याला होती एक बा—खो—खो हु—खो—हु—हु—खो—होती एक बायको.—भॅं—मीं काय म्हटलें, होती? हायहाय! मला पक्कं ठाऊक नाहीं, कदाचित् अजूनही जिवंत असेल—खो—खो—त्याचा काय नेम ? पण होती. आणखी बया, हें बघ—खो—खो—खो—हु—हु—लोक म्हणतात तुला पिशाचसाधन आहे न् तुला पुढचें होणारें कळतें—खो—खो—खो !

म्हाता०—त्या मेल्यांना बोलायला काय होतें ? मेले पाहिजे तें बडबडतात.

धुमा०—बया ! तूं कांहीं रागावूं नको—पण तुला सांगतों—खो—खो—त्या सुरतच्या वादळांत सांपडलेल्या जगल्या किंवा कसें ?—खो—खो

म्हाता०—तुला सांगून करायचें आहे काय ? तें तूं दुसऱ्यालाच सांगत बसणार कीं नाहीं ?

धुमा०—नाहीं बया. ही गोष्ट माझ्या हातून कधीं होणार नाहीं.

म्हाता०—नाहीं होणार कशी ? होणारच. म्हाताऱ्या माणसांच्या आणखी बायकांच्या तोंडांत कोणचीही गोष्ट रहात नसते !

धुमा०—माझ्या धनिनीच्या पायांशपथ ही गोष्ट मी कोणाशीं बोलणार नाहीं!—खो—खो—खो.

म्हाता०—तुझ्या बोलण्यावरून तूं इमानी असावास असें वाटतें. बरें समज, मीं तुला सांगितलें कीं तुझी धनीन अजून जिवंत आहे, तर कसें ?

धुमा०—तर दिवसांतून तीन वेळ तुझ्या पायांशीं—खो—खो—पायांशीं लोटांगण घेऊन तुला जन्मभर आपल्या घरीं पोशीन.

म्हाता०—आणखी ती रहाते त्या ठिकाणीं मी तुला घेऊन गेलें तर ?

धुमा०—तर तिचें दर्शन घेण्याकरितां तापल्या तव्यावरून चालत जाण्याचें पडलें, तरी तें पत्करून जाईन, खो—खो—

म्हाता०—आणखी समज—ती इथें असेल, ती तिथें असेल, म्हणून तूं वेड्यासारखा भ्रमांत

असतां मी ती तुझ्या दृष्टीस पाडली, तर ?

धुमा०—तर फार काय सांगूं ? जरी मला कोणीं सांगितलें—खो—खो—हु—कीं तिच्याकडे पाहूं नको, पाहिलेंस तर डोळे जातील—तरी देखील—खो—खो—मी पहायला कमी करणार नाहीं,—खो—खो—खो !

झाता०—हें खरें ? अगदीं खरें ?

धुमा०—अगदीं खरें! **गायत्री** शपथ अगदीं खरें!

झाता०—हें जर खरें, तर तूं मजकडे नीट न्याहाळून पहा. तूं झणतोस तीच मी !

धुमा०—मलतेंच कांहीं. खो—खो—तूं माझी थट्टा करतेस.

झाता०—बावारे, मी कधीं कोणाची थट्टा करीत नसतें, आणखी तुझ्या सारख्यांची तर कधीं करणार नाहीं.—असो. तुला तसें वाटतें तर देवाची मर्जी ! माझ्यावर हे दिवस आले तेव्हां मला सर्व अंतरले, सारे जण माझी ओळख विसरले, हें ठीकच आहे. तरी पण **धुमाजी** नाईक माझी ओळख विसरतील असें कांहीं मला वाटलें नव्हतें.

धुमा०—(आश्चर्यानें) अरे, हिला तरं • माझ्या खो—खो—नांवाची पक्की ओळख दिसते! हा काय बरें चमत्कार ? हें—हु—हु—खो—खचित चेटूक असावें. नाहीं—पण नीट पाहूं या खरें. (न्याहाळून पहातो.) अरे, काय, आज मी स्वप्नांत तर नाहींना ? धन्य ! धन्य ! आईसाहेब ! (तिच्या पायां पडतो.)

प्रेमळाबाई—उठा उठा **धुमाजी नाईक**! असा हा अविचार तुह्मांला कसा शोभेल? तुह्मीं कसे झालां तरी तरी माझ्यापेक्षां वीस वर्षांनीं वडील आहां. उठा उठा. (त्यांना उठवितें.)

धुमा०—उठतों आईसाहेब ! पण या सेवकानें आपणाला पहिल्यानें ओळखलें नाहीं याची क्षमा असावी. खो—खो—

प्रेम०—छे छे—**धुमाजी नाईक** ! त्यांत क्षमेचें काय कारण?—वयोमानानें तुमच्या डोळ्यांनीं तुह्मांला दिसेनासें झालें आहे यांत तुमचा तरी काय दोष ?

धुमा०—तें असो. पण आईसाहेब ! मला आपण एवढें सांगा; आपण त्या तुफानांतून कशा निभावलां? तसेंच आमचे धाकटे धनी साहेब—अरेरे !—त्यांची आठवण होऊन छाती दडपून येते—खो—खो—

प्रेम०—**धुमाजी नाईक** ! असे घाबरूं नका. माझा बाळ खुशाल आहे, आणखी चांगला शूर निपजला आहे.

धुमा०—परमेश्वरा ! धन्य ! तुझी लीला अगाध आहे यांत संदेह नाहीं.—आईसाहेब ! आपण त्या वेळीं कसल्या भयंकर प्रसंगांत सांपडलां होतां—खो—खो—आणखी त्या तसल्या प्रसंगांतून—खो—खो—उभयतां कशीं निभावलां?—

प्रेम०—निभावलों झणजे काय, मोठ्या चमत्कारानें निभावलों.—तुह्मांला पहिली हकीकत ठाऊकच आहे, कारण गडावरून मी निघून गेल्यावर तुह्मीं मला गांठून **सुरत**पर्यंत मजबरोबर आलां, आणि तेथें मला माझा बाळ होऊन चार महिने होत तोंपर्यंत तुह्मीं माझी उस्तवारी केली. पुढें माझा माहेरीं जायचा बेत ठरल्यावर तुह्मीं मला बंदरावर नेऊन तारवांत बसविलें, आणि तारूं दिसेनासें होईपर्यंत त्याकडे पहात राहिलां. बंदरांतून तारूं बाहेर निघतें आहे नाहीं तों वारा सोंसाट्यानें वाहूं लागला, तो इतका कीं, हां हां झणतां तारूं झोकांड्या खाऊं लागून आतां

बुडतें कीं काय असें वाटून तारवांतले सर्व लोक भयानें धायधाय रडूं लागले!

धुमा०—हाय हाय! आईसाहेब! काय अघोर प्रसंग हा! खो खो—

प्रेम०—नाईक! आतां त्याबद्दल दुःख कशाला करितां? तो प्रसंग कांहीं आतां राहिला नाहीं. आतां नुसती बोलायची गोष्ट उरली आहे. सारे लोक रडूं लागून दंगा होईपर्यंत मी आपल्या दुःखांतच चूर होतें, त्यामुळें मला प्रथमतः ही गोष्ट कांहींच कळली नाहीं, पण जेव्हां लोक इकडून तिकडे धावूं लागले, त्या वेळीं त्यांपैकीं एकाचा मला धक्का लागून मी सावध झालें, आणि पहातें तों तारवाला अतिशय हेलकावे बसत आहेत! आपल्या या गडासारख्या उंच उंच लाटा येत असून त्यांच्यामध्यें तारूं अडचणून गेलें आहे! कैस म्हणजे कोण! कोणाचें बोलणें कोणास ऐकूं येईना! माझें बाळ भुकेनें विव्हळ होऊन रडत होतें तरी त्याच्या रडण्याचा आवाज ऐकूं येत नसून त्याच्या तोंडावरून व हात पाय हलविण्यावरून मात्र तें रडत आहेसें वाटत होतें.

धुमा०—शिव शिव! खो—खो—आईसाहेब! ही गोष्ट माझ्यानें इतःपर ऐकवत नाहीं.—आपली सुटका कशी झाली, व आपण इतके दिवस मुलांसुद्धां होतां कोठें एवढें सांगा म्हणजे झालें.

प्रेम०—तेंच सांगतें. ही स्थिति पाहून मला अतोनात रडूं कोसळलें, व तशा घाईघाईंत मी मुलाला घेऊन पाजूं लागलें. इकडे पहातें तों तारवावर गलबला व धांदल अधिकाधिक होऊं लागली, इतक्यांत एकदम लाटेचा मोठा हेलकावा बसून "मेलों रे मेलों!" म्हणून एकदम चोंहीकडे आरोळी झाली. तीबरोबर काय असेल तें असो, मी एकदम घेरी येऊन पडलें. पुढें काय झालें तें मला माहीत नाहीं—पण ज्या वेळीं मी सावध झालें, त्यावेळीं पहातें तों मला कोणी तरी मुलासुद्धां एका फळीशीं गच्च बांधिलें असून तारूं नाहीं आणि कांहीं नाहीं, तेवढ्या फळीवर मी आणि माझा बाळ दोघें तरंगतों आहों. या स्थितींत मी किती वेळ होतें हें कांहीं मला स्मरत नाहीं. परंतु वाऱ्याच्या जोरानें ढकलत जात असतां एका व्यापाऱ्याच्या गलबतांतील लोकांच्या दृष्टीस पडून त्यांनीं मला वर उचलून घेतलें.

धुमा०—अहाहा! परमेश्वरा!—

प्रेम०—थांबा, तुम्हीं मधें बोलत राहिल्यानें तुमचा दमा मात्र चाळवतो. असो; तें गलबत जंगबहार[1] म्हणून आहे, तिकडे चाललें होतें. त्या तारवाचा धनी आपल्या इकडचाच कोणी कच्छी होता. तो फार भला असून त्याला माझी ही स्थिति पाहून फार कींव वाटली, आणि त्यानें माझी सर्व हकीकत ऐकून घेऊन मला सांगितलें "बाई! तुम्हीं कांहीं काळजी करूं नका! दैवदयेनें हा प्रसंग सदोदितच राहील असें नाहीं. तुम्हांला मी आपली बहीण समजतों. तुम्हीं खुशाल माझ्या घरीं रहा. मी तुम्हांला आपल्या मुलांमाणसांत सहज पोशीन." असें त्यानें मला सांगितलें, आणखी त्याप्रमाणें त्यानें आपले

१. आफ्रिका खंडातील झांजीबार देश.

ज्यांच्या शस्त्रांधकारा लपवि नभिं तेती हा शशींचा उदेला,
चक्रांलागीं स्वहस्तीं भवंडिति भट ते तोषवीती दृशेला.

(भीतीनें कांपूं लागून) धिक्कार असो. समुद्राच्या पोटांतील पाण्यांत एकादा व्यापारी शिरला असतां त्याची जशी स्थिति व्हावी, तशी स्थिति शत्रुसैन्यांत घुसलेल्या **मन्मथा**ची झाली आहे. तर यांतून तो बाहेर कसा निघेल याविषयीं मला काळजी वाटते.

नार०—वत्सा ! इतकें भिण्याचें कारण नाहीं. सर्व जगतांत एकटा अहंवीर जो **मदन** त्याच्यापुढें हें कांहींच नाहीं. कारण पहा,

श्लोक.

चक्रांहीं छेदितो हा करचरणशिरांलागुनीयां भटांच्या,
प्रासाघातें[2]करूनी खिजवि बहुत हा घोटकातें[3] रिपूच्या,
क्रोधानें दीप्त झाला मदकल करितें त्रासवीतो गदांहीं,
मार्गासाठीं रथांतें झटिति चुरडितो आपुल्या मार्गणांहीं[4].

आर्या.

तो दैतेयचमूंतुनि बाहेरी शंबरारि हा पडला,
व्योमांत जसा भानू विस्तीर्ण पयोदडंबरीं दडला.

पहा पहा ! एका क्षणांत यानें काय स्थिति करून टाकिली आहे ती !

साक्या.

अंगावरती निजशस्त्रांहीं प्रहार करि जे मार,
त्यांच्या योगें हय, गज, दितिसुत झाले भग्नशरीर.
तया शरीरांतुनि बाहेरी स्नाय्वस्थि, वसा, मांस,
मज्जा, मेदो, रुधिर, अंत्रें[5], हीं लागुनि वाहायास,
पहा कशा त्यांपासुन बनल्या अति दुस्तर सरिता या !
दुःसह दुर्गंधी हे सुटुनी चोदे नासाठायां !
घारि, गिधाडें, काक, शृगालहि अनंत त्यांलागूनी
भक्षायास्तव त्यावरि जमुनी धाले त्यां भक्षूनी !
युद्धावेशीं वीर भग्नशिर होतां कबंध[6] त्यांचे
जीवंत जणां वीररसांकित नाचताति हे सांचे !
प्रेत, डाकिनी, पिशाच, यांचे संघ पहा जमताती,
मांसाद्यशनें उन्मद होउनि अट्टहास करिताती !

शिष्य—भगवन् ! आतां मात्र कठिण प्रसंग आला खचित ! कमलबंधु सूर्य मावळून जाऊन आपला कोण व परका कोण हें देखील कळेनासें झालें आहे ! व रात्रीं चोंहीकडे निबिड अंधकार पसरल्यामुळें दैत्य आतां बळावतील !

नार०—हा भित्र्या ! तूं असा घाबरूं नको ! **मन्मथा**च्या शस्त्रानें **शंबरा**च्या चतुरंग सैन्याचा खूपच फडशा उडविला, यामुळें, त्यानें जादूच्या सामर्थ्यानें अंधकारास्त्रांचा प्रयोग केला, त्याचाच हा प्रभाव असें मला वाटतें ! कारण पहा.

श्लोक.

कीं हे अंजनपुंज ? कालशिखिच्या[1] कीं सांद्र धूमावली ?
किंवा नीलदृषन्मयांग[2] उडत्या शैलांचिया मंडली ?
पातालांतुनि देवशत्रुतति ह्या बाहेरि कीं पातती ?
ऐसे हे निबिडांधकार सकला विश्वाप्रती वेष्टिती !

शिष्य—(आश्चर्यानें) भगवन् ! हा काय चमत्कार बरें ? प्रत्यक्ष सर्व जगताच्या संहारकालीं देखील कायते द्वादश सूर्यच एकसारखे प्रकाशतात, असें असून या वेळीं कांहीं कारण नसतां सहस्रावधि सूर्यमंडलें दिसूं लागलीं आहेत हें कसें ?

नार०—वत्सा ! अंधकारास्त्राच्या गर्वाचें खंडन करण्याविषयीं अप्रतिहत ज्याची शक्ति, अशा सूर्यास्त्राचा प्रयोग **मन्मथा**नें केला आहे! त्यामुळें काय प्रकार झाला आहे पहा.

श्लोक.

जेका शैवलिनीसमुद्रसरसीवापीजला[3] शोषिती,
जे कीर्णीं निज सूर्यकांतमणिंच्या कांतींस आलंबिती,
ध्वंसीती तिमिरोच्चय क्षणभरें जे लोकबंधू अहा !
राजीवप्रिय हे असे उगवती सर्वत्र भानू पहा !

१. समुदाय. २. 'प्रास' हें एक प्रकारचें शस्त्र आहे. भाला. त्याच्या आघातानें ह्मणजे मारण्यानें. ३. घोड्यांस. ४. वाणांनीं. ५. आंतडीं. ६. मस्तकहीन देह.

१. शिखी=अग्नि. २. दृषन्मय=शिलामय. ३. शैवलिनी=नदी.

शिष्य—(दुःखानें) भगवन् ! आज ब्रह्मदेवानें सकलसृष्टीचा संहारच मांडिला आहे यांत संशय नाहीं ! कशावरून तर पहा.

श्लोक.

जे धारांप्रकरीं[1] स्वकीय करिती विश्वासि या अम्मयां[2],
मत्तानेकंपबृंहितांस[3] जितिती जे गर्जितीं आपुल्या,
केका उच्चरती शिखी, चमकती योगें जयां[4] हादिनी,
गारांच्या पतनें जनां दुखविती वर्षाब्द ते वर्षुनी[5] !

नार०—वत्सा ! भलतेंच ! त्या दुष्टानें पर्जन्यास्त्राचा प्रयोग केला आहे, परंतु **मन्मथ** हा अस्त्रविद्यानिपुण असल्यामुळें त्यानें पर्जन्यास्त्रास उडवून लावण्यास समर्थ असें वायव्यास्त्र सोडिलें आहे ! पहा पहा !

श्लोक.

वृक्षांतें दिशिदिशि मंक्षु[6] फेंकिताती,
पाथोधी[7] क्षुभित समस्तही करीती,
प्रासादांप्रति निखळूनि पाडिताती,
वेगानें गिरिवर सर्व डोलवीती,
भूलीनें भरिति समस्तही जगातें,
कार्पासापरि उडवीति अंबुदांतें,
कल्पांतक्षण जणुं काय पातळासे,
झंझाख्यें[8] श्वसन वहाति चंड ऐसे.

शिष्य—(थरथर कांपूं लागतो.) भगवंता ! आतां सैन्यदर्शनाविषयींची ही हौस पुरे करावी ! हे पहा, पर्वतांना पंख फुटले असून ते उडत आहेत, व आपणास चोंहीकडून वेष्टून टाकीत आहेत ! आतां यांतून आपणा दोघांला बाहेर निघून जातां येण्याची देखील पंचाईत होईल. तर चला आपण इथूनच दूर निघून जाऊं कसे !

१. धारांच्या समदायांनीं. २. जलमय. ३. मत्त असे जे अनेक ह्म० हत्ती, त्यांचीं बृंहितें ह्म. गर्जना ४. विजा. ५. ताडतोब. ६. समुद्र. अक्षरशः 'पायः' ह्म. पाणी त्यातें धारण करणारे. ७. 'झंझा' नांवाचे श्वसन ह्म. वायु. वादळें.

नार०—अहो, हा दैत्याधम किती तरी दुष्ट आहे ! यानें पर्वतास्त्राचा प्रयोग केला !

साक्या.

करिती पादाक्रांत समस्तहि दिशा आपुल्या देहीं;
स्वर्गावेरी शृंगें पोंचाति जाउनियां ज्यांचीं हीं;
त्या शृंगांतुनि नद्या वाहतां त्यांच्या रेंकूनी[1]
प्रपातभागीं[2] शिळा थोरही जाताति या खणूनी;
दऱ्या गव्हरें पाताळापरि खोल जयांचीं असती;
त्यांमाझारी सर्वहि वायू कोंडुनियां जे धरिती;
ऐसे मोठे प्रचंड अद्री पहा पहा ! भूलोकीं
मोठ्या वेगें संचरताती, त्रस्त जना करिती कीं !

शिष्य—(भयानें) भगवंता ! आतां काय करावें ! हे पहा हत्तीएवढाले मोठे दगड खालीं पडत आहेत ! महाराज ! मी आपल्या आईबापांचा एकटाच आहें ! आईग ! बाबा !—

नार०—(हंसून) वत्सा ! आतां चिंता करूं नको ! कारण उपेंद्रपुत्रानें त्यांचा प्रतीकार करण्याचा उपाय देखील योजिला ! कसा तो पहा.

श्लोक.

वज्राघातें अखिल गिरींचे पंख हे तूटताती,
त्यांजागूनी अमित रुधिरस्राव हे लोटताती !
शृंगें जाती फुटुनि सगळीं, त्यांजयोगें पहा या
क्षोणीभागीं[3] पसरनि शिला कोटिशां जेंवि लाह्या !
निर्घातांहीं[4] बधिर करिती सर्वही भूतलातें;
स्वर्गामाजी वसति सुर जे त्यांसि हर्षासि देते;
ज्यांपासूनी अमित ठिणग्या भूतलीं ऊडताती;
दंभोळी हे अतितर रयें कोंवि संचारताती !

शिष्य—भगवन् ! ही खचित कांहीं तरी भुताटकी आहे ! कारण नुकताच एक अनर्थ मोठ्या प्रयत्नानें दूर झाला, तोंच हा दुसरा

१. रय ह्म. वेग. २. प्रपात=धबधबा. ३. वज्राचे आवाज. ४. वज्रें.

अनर्थ ओढवला ! हे पहा चोंहीकडे

आर्या.

यन्मुखफूत्कारांतुनि दुःसह विषमिश्र जाळ निघताती,
तेणें सकल तरूंतें जाळिति, ऐसे भुजंग फिरनाती.

नार०—वत्सा ! भिऊं नको ! कारण पहा,

आर्या.

उत्पन्न गरूड होउनि, त्यांनीं आपल्या सुतीक्ष्ण चंचूनीं
फोडूनि फणारत्नें, टाकियले सर्व सर्प मारूनी.

शिष्य—हां हां आतां समजलों ! त्या दैत्यानें सर्पास्त्र सोडलें, त्यावर **गरुडध्वज** जो भगवान् **विष्णु** त्याच्या पुत्रानें गरुडास्त्राचा प्रयोग केला ! अस्सें अस्सें !

नार०—शाबास ! असा समजूतदार हो !

शिष्य—भगवन् ! या दैत्याची सर्व अस्त्रविद्या कुंठित झाली, यावरून आतां हा मायायुद्धास आरंभ करील असें मला वाटतें !

नार०—खुशाल करो ! **मन्मथाला महामाया** अवगत आहे, यासाठीं हा दैत्य दोन्ही प्रकारांनीं लढला, तरी त्याचें निवारण **मन्मथ** करील!

शिष्य—भगवंता ! पहा पहा !

श्लोक.

हा कोणी उसपीतसे असिलता, वाटे बहू भीषण,
या पाहूनि[1] मला गमे भय !

नार०—

परी तें होय निष्कारण,
काकीं त्याहुनि उग्र रूप धरिता, कारुण्य ह्याला नसे,
ऐसा व्याघ्र पहा तया स्वनखरीं मारूनि टाकीतसे !

शिष्य—

श्लोक.

हें तों सत्य; परी तदीय हरण्या दर्पासि जो कां क्षम,
ऐसा हा हरिनाथ सर्व हरितो त्याचाचि दर्पभ्रम !

१. सिंह.

नार०—

त्याचा तो परि काय पाड ? बघ ह्या. ब्रह्मांडराजेश्वरें
देऊनि निजदर्शनासि शरमें[1] त्या जिंकियेलें त्वरें !

आणखी पहा.

श्लोक.

एके काळींच दुष्टें कनककशिपुचें[2], नागलोकाधिपाचें[3],
दंडी दुष्टांसि चित्तीं उभवुनि नृप जो त्या सहस्रार्जुनाचें[4],
औस्यांचीपंक्ति मोठी दशमित धरित्या त्या पुलस्त्यात्मजाचें[5]
रूपें ऐशीं अनेकें प्रकटविलिं पहा; तींवि हें तारकाचें[6] !

परंतु लागलींच,

आर्या.

नरहरि, वामन, भार्गव, दाशरथी, कृष्ण, हीं अशीं मदन
घेउनि रूपें बघ हा त्यांचें तत्काल करितसे कंदन !

शिष्य—भगवंता ! हा पण काय चमत्कार ! या समरांगणांत **शंबरासुर** दिसत नाहीं, किंवा त्याच्या सैन्याचा गलबलाही कोठें ऐकूं येत नाहीं, व एकटा **शंबरशत्रु मन्मथ** मात्र दिसत आहे हें कसें?

नार०—वत्सा ! **शंबरासुरा**ची योग्यताच तशी आहे! प्रसिद्ध मायावी **मय, मारीच, मेघनाद** इत्यादिक ते सुद्धां आपली माया याच्यापासूनच शिकले !

शिष्य—भगवन् ! आतां मात्र प्रसंग कठिण आला आहे खरा, कारण एकट्या **शंबरा**नेंच जर **मन्मथा**स भुरळ घातली, तर त्याच्यासारखे हे हजारों दैत्य एक ठिकाणीं

१. हें 'शरमें' यांचें विशेषण आहे. विष्णूंनीं नरसिंहावतारीं हिरण्यकशिपूस मारिलें त्यावेळीं त्यास आपल्या अपूर्व देहाचा व पराक्रमाचा गर्व वाटला असतां, त्यांच्या गर्वाचें शरभानें हरण केलें, यावरून त्यास या ठिकाणीं सकल ब्रह्मांडाचा श्रेष्ठ राजा असें ह्मटलें आहे. २. कनक ह्म. सुवर्ण, त्याचा आहे कशिपु ह्म. देह ज्याचा, असा हिरण्यकशिपु दैत्य. ३. पाताळाचा राजा बलि ४. तोंडाची. ५. रावण. ६. तारकासुर. ७. परशुराम. ८. फड. शा, नाश.

मिळाले असतां मग **मन्मथास** जय मिळण्याची आशा कोठून राहिली ?

नार०—वत्सा! हे जितके दैत्य उत्पन्न झाले आहेत, तितकींच **मन्मथा**चीं प्रतिरूपें उत्पन्न होऊन त्यांनीं आपल्या बाणांनीं त्या सर्वांचा निःपात करून टाकिला आहे; तसेंच, **शंबरा**च्या सर्व माया व्यर्थ जाऊन **मन्मथा**नें त्याचे अश्व आणि सारथि यांचा संहार केला आहे; एकादा सर्प ज्याप्रमाणें फूत्कार टाकीत रहातो, त्याप्रमाणें **शंबरासुर** खिन्न होत्साता निःश्वास टाकीत आहे; त्याच्या हातांत तरवार आणि ढाल एवढींच कायतीं आयुधें शिलक राहिलीं आहेत; व त्यास इतःपर कांहीं सुचेनासें होऊन तो उभा आहे हें पहात नाहींस काय ?

शिष्य—(हर्षानें पंचा उडवितो.) वाहवा वाहवा ! शाबास **मन्मथा**! एवढ्या **शंबरासुरा**च्याही गर्वाचं डंबर तूं हरण केलेंस! शाबास ! शाबास !

(पडद्यांत जयघोष होतो. शंखाचे नाद होतात, व दिव्य वाद्याचे गजर होतात.)

शिष्य—(गडबडीनें) भगवन् ! ज्याप्रमाणें वर्षाकालीं मेघ गडगडावे त्याप्रमाणें, किंवा **मंदराचल** घालून समुद्रमंथन झालें त्या वेळीं त्या समुद्राच्या लाटांचा आवाज झाला त्याप्रमाणें, गंभीर असे हे नगाऱ्याचे ध्वनि कोणीकडून ऐकूं येतात बरें ?

नार०—(हर्षानें) वत्सा ! पहात नाहींस काय?

श्लोक.

हें संमोहन अस्त्र टाकुनि खला श्रीविष्णुचा नंदन
घाली मोह; करी स्वकीय असिनें त्याचें शिरश्छेदन;
पाडी त्यासि रथांतुनी; उचलितो त्यांतूनि ही स्वप्रिया;
बैसे आत्मरथामधीं तिजसवें लाघोनि मोठ्या जया !

व त्याकरितांच संपूर्ण देवांनीं हा महोत्सव आरंभिला आहे.

शिष्य—(पाहून) भगवन् ! पहा पहा ! हे देव आणि महर्षि मोठ्या तारंबळीनें येथें जमले असून ते या त्रैलोक्यविजयी **मन्मथा**वर पुष्पवृष्टि करीत आहेत, अशा थाटानें हा **अमरावती**स जाण्यास निघाला देखील !

नार०—वत्सा ! तर चल. **मन्मथास** विजय प्राप्त झाल्याची बातमी **महेंद्रा**चे दूत घेऊन जातील, त्यांच्या अगोदरच आपण निघून भगवान् **महेंद्र** आणि **उपेंद्र** हे आतांच **श्वेतद्वीपा**हून परत आले आहेत त्यांस हें आनंदाचें वर्तमान कळवूं.

(दोघे जातात.)

अंक ५.

(पडद्यांत नौबदी वाजूं लागून मोठ्यानें शब्द होतो.)

साक्या.

ऐका ऐका पौरजन, देवेंद्राचें हें वचन. ध्रु०
समरचत्वरीं[1] विजय पावुनी येतो कुमार मारे;
त्यातें अभिनंदायासाठीं त्वरें करा संभार. १
उभ्या कराव्या आजि पताका घरोघरीं सर्वांहीं,
तैशा द्वारप्रदेशांतरीं बांधाव्या कदलीही. २
रस्त्यांमध्यें गुढ्या तोरणें सर्वत्र उभारावीं.
कुंकुमकेशरिं सडा घालुनी पुष्पें वरि पेरावीं. ३
मंगलवाद्यें करोत तैसे चौंहीकडेस गजर,
ज्या ऐकोनी श्रोतृजनांचीं होतिल चित्तें गार. ४

(ही चूलिका झाली.)

---

१. चत्वर=अंगण. २. मदत. ३ आगस्वागत करण्यासाठीं. ४. तयारी. ५. अंकारंभाचा एक प्रकार. यासंबंधानें विशेष माहिती उपोद्घातांत येईल.

वसुभद्राचार्य उत्तर करितोः—"कोतवाल आपल्या शिपायांसहवर्तमान खालीं आला आहे, आणखी तो खालती घरच्या यजमानापाशीं चौकशी करीत असून तो सगळ्या घराचा झाडा घेणार आहे. मी येथें अगदीं मोठ्या शरतेनें त्याच्या दृष्टीस न पडतां आला!"

तें ऐकल्याबरोबर **शिलादित्य** तरवार उपसून म्हणालाः—"येऊं द्या त्याला खुशाल येऊं द्या! आपले प्राण जात तोंपर्यंत तर आम्हीं त्याला दाद लागू देणार नाहीं!"

"भलतेंच." **वसुभद्राचार्य** बोलतोः—"अस्ला अविचार करून कांहीं उपयोग व्हायचा नाहीं. कोतवालाशीं तरवारीचा प्रसंग आणून परिणाम कसा लागेल? कारण आपल्या तिप्पट चौपट ते लोक आहेत."

त्रिवेणी विचारितेः—"पण इथून त्यांना न कळतां आपणाला पळून नाहींका जातां येणार?"

वसुभद्राचार्य उत्तर करितोः—"त्यांत कांहीं जीव नाहीं. मला वाटतें ते आतां जिना चढूं लागतील. घरचा मालक बिचारा घाबरून जाऊन त्यानें तूं येथें आहेस म्हणूस त्यांना सांगितलें खचित, आणखी तो त्यांना वर वाट दाखवायला येत आहे."

हें ऐकल्याबरोबर **शिलादित्या**ची मुद्रा एकदम उग्र दिसूं लागली, आणि तो मोठ्यानें ओरडून म्हणालाः—"खबरदार! तुम्हीं सर्वजण एका अंगास व्हा. मी हा अस्सा एकटा या ठिकाणीं दाराशीं उभा रहातों, आणखी एकटाच पण त्या कोतवालाचा पुरा समाचार घेतों. कालपर्वांच स्वारी माझ्या तडाक्यांत सांपडायची, पण थोडक्यांत चुकली. आतां आज पहातां तो कसा काय माझ्या हातून सुटतो तें! आज मी त्याचा बाप होऊन लागलों आहें!"

शिलादित्याच्या तोंडचे हे शब्द ऐकून **जरठकर्ण** जती पुढें आला, आणि त्याला म्हणालाः—"**शिलादित्या**! तूं असा अविचार करूं नको, आणि आपल्या प्राणांवर इतक्यांतच उदार होऊं नको! आपलें सत्कार्य तडीस जाण्यास तुझीच मदत मुख्य आहे, याकरितां तूं इतक्यात मरतां उपयोगीं नाहींस. तूं आमच्याबद्दल यत्किंचित्ही विचार करूं नको, किंवा हा दुष्ट कोतवाल—याचा सूड उगवायचा—त्याचाही पण विचार मनांत आणूं नको. तर तूं एवढेंच कर कीं, ज्या प्रचंड सत्कार्याकरितां आम्हांस तुझ्या जीविताची अपेक्षा वाटते, त्या सत्कार्याकडे नजर पोंचीव. माझें ऐकशील तर त्या खिडकीतून तुला खालीं उडया टाकून जातां येईल. याकरितां त तींतून एकदम पार जा! जा—पळ—पळ—येथ एक क्षणभरही रहूं नको!"

त्रिवेणी बोलते.—"बाबा खरें बोलतात. तुम्हीं खरोखरीच निघून जा! तसेंच तुम्हीं **वसुभद्राचार्य**! तुम्हींही पण जा. तुम्हीं येथें असल्यापासून आम्हांला कोणत्या ही प्रकारें उपयोग व्हायचा नाहीं! हं—जा—जा—ते दुष्ट मेले आत्तां इतक्यांत वर येतील."

वसुभद्राचार्य उत्तर करितोः—"**त्रिवेणी**! अशा संकटांत तुला अशीच सोडन जाणें ही गोष्ट माझ्या हातून कालत्रयींही घडणार नाहीः—तथापि जर या दुष्टांनीं तुला पकडून कैदखान्यांत नेऊन ठेवलें तर तेथून तुझी मी खातरीनें सुटका करूं शकेन, अशी माझ्या जिवाची खातरी आहे, याकरितांच मी तुझें म्हणणें यावेळीं कबूल करितों."

"हं हं—पळा—**शिलादित्या! वसुभद्राचार्य!**

हं—हं—ते दुष्ट आले—हूं हूं ह्मणतां वरती येतील! चला चला !"

हा इतका प्रकार झाला, तरी **शिलादित्या**स बाकीच्या लोकांस त्या ठिकाणीं सोडून जाणें नीट वाटलें नाहीं. तथापि **जरठकर्णा**नें अतिशयच विनवणी केली, तेव्हां निरुपायास्तव त्यानें त्याचें ह्मणणें कबूल केलें, आणि खिडकीवाटे खालीं उडी टाकली. त्याच्या मागोमाग **वसुभद्राचार्या**नेंही उडी टाकिली. त्याचे मागोमाग **त्रिवेणी** खिडकीपर्यंत जाऊन त्यांनीं उडी टाकिलेली कोणीं पाहिली किंवा कसें ह्मणून पाहूं लागली, व सरतेशेवटीं ते घरामागच्या शेतांतून निसटून पलीकडच्या माळरानाच्या बाजूपर्यंत गेले अशी तिची खातरी झाली, तेव्हां तिनें त्यांकडे पहावयाचें टाकून देऊन **जरठकर्णा**कडे वळली. हा इतका प्रकार होतो आहे तों कोतवाल शिपायानिशीं जिना चढून आला, व दार उघडूं लागला. परंतु **वसुभद्राचार्या**नें अगोदरच हुशारी करून दाराला आंतून कुलूप लावून घेतलें होतें, यामुळें कांहीं केल्यानें दार उघडना. तेव्हां सरतेशवटीं खडबड सर्व थांबवून त्यानें तें दारच अजीबात फोडिलें, आणि आलेल्या सर्व शिपायांनिशीं **त्रिवेणी** उभी असलेल्या खोलींत घुसला.

"अरे पहातां काय ? पकडा या गुलामांना!" कोतवाल आंत शिरतां शिरतां आपल्या शिपायांस ओरडून ह्मणाला; परंतु इतक्यांत त्याची दृष्टि खोलींत सभोंवती जाऊन तेथें जती आणि **त्रिवेणी** यांशिवाय दुसरें कोणीं नाहींसें पाहून त्याची निराशा झाली, आणि तो संतापानें दांत आठ खाऊन हात पाय हापटीत पुढें आला आणि ओरडला:—"अरे तो **मराठा** वेरड कोणीकडे नाहींसा झाला ? आणखी तो **वसुभद्राचार्य** कोणीकडे गेला ?—अरे कायरे ए हरामखोरा !" तो जतीची मानगोटी धरून बोलतो, "बोल ! ते दोघे चोरटे कोणीकडे नाहींसे झाले ? सांग, नाहीं तर तुला येथल्या येथेंच लोळवून कबूल करायला लावीन !"

इतक्यांत **त्रिवेणी** कोतवालाला दूर करूं लागून ह्मणाली:—"कोतवाल ! या ह्मातार बाबांना तुह्मीं सोडा कसे. तुह्मीं मला विचारा, मी तुह्मांला सांगतें. तुह्मीं ह्मणतां ते दोघेही पळून गेले !"

त्रिवेणीच्या तोंडचे हे शब्द ऐकल्याबरोबर कोतवाल रागानें लाल झाला, आणि ह्मणाला:—"काय ? पळून गेले ?—बोल बोल ! ते चोर कोणीकडून कसे पळाले ?"

"त्या खिडकींतून उडी टाकून !" **त्रिवेणी**नें उत्तर दिलें.

"अरे ऐकतां काय? जा आत्तांच्या आत्तां पाठलाग करा!" कोतवाल आपल्या शिपायांना सांगतो. "ता **मराठा** शिपाई जिवंत सांपडो कीं मेलेला सांपडो, त्याला पकडल्याखेरीज आज अन्न खायचें नाहीं, ध्यानांत ठेवा !" याप्रमाणें त्यानें हुकूम केल्याबरोबर कांहीं शिपाई ताबडतोब निघून गेले, व इकडे कोतवाल जती आणि **त्रिवेणी** यांकडे वळून ह्मणाला:—"कायरे **जरठकर्ण्या** चोरा ! तूं राजद्वेष केला आहेस, आणखी ए तूं **त्रिवेणी अर्धशाल** ! तूं या चोराला आश्रय देऊन याला साह्यही केलें आहेस, यासाठीं तुह्मां दोघांना कैद करून मी फरासखान्यांत पोंचविणार!—अरे ! चलारे ! पहातां काय ? बांधा या चोरांना आणखी घेऊन चला !

कोतवालाचा हुकूम ऐकतांच ते शिपाई लांडग्यांसारखे त्या दोघां कैदींच्या अंगावर धांवले, आणि आतां त्यांवर तुटून पडणार, इतक्यांत

त्रिवेणीनें आपल्या अंगावर चालून आलेल्या लोकांस ढकलून ती कोतवालास म्हणाली:— "कोतवाल साहेब ! तुम्हांला पाहिजे तर आम्हां दोघांलाही कैद करून न्या, पण आम्हांवर हा असा जुलूम आणि सक्ती करायला तुम्हांला कांहीं तुमच्या राजानें हुकूम नाहीं केला ! असे माजूं नका ! "

त्रिवेणीचे हे शब्द ऐकून कोतवाल किंचित् ओशाळल्यासारखा झाला, आणि तिला कांहीं उत्तर न देतां मुकाट्यानें खोलीबाहेर पडून चालता झाला. मागाहून शिपाई लोक त्रिवेणी आणि जती यांच्या भोंवती गराडा घालून त्यांस घेऊन जाऊं लागले. रस्त्यांतून जातांना त्यांच्या सभोंवती एकसारखी तमासगिरांची गर्दी झाली, व ती हीं सर्वजण तुरुंगाच्या दाराशीं जाऊन पोंचत तोंपर्यंत अगदीं एकसारखी कायम होती. असो; सरते शेवटीं त्या दोघांनाही शिपायांनीं आंत तुरुंगांत नेऊन दोन निरनिराळ्या कोठड्यांत कोंडून ठेविलें.

त्रिवेणीस ज्या कोठडींत कोंडून ठेविलें होतें, ती कोठडी फरासखान्याच्या तिसऱ्या मजल्यावर असून ती आंत नीट उभेंही रहातां येऊं नये इतकी ठेंगणी होती. तींत एक फाटकं मळकेंसें रकटें हांतरण्याकरितां टाकिलें असून एक फाटकीशी घोंगडी पांघरण्याकरितां म्हणून पायथ्याशीं टेविली होती. एका कोपऱ्यांत एक कितीएक वर्षें पर्यंत न घासलेला कटोरा पाण्यानें भरून ठेविला होता. याशिवाय त्या कोठडींत दुसरें सामान शपथेस एवढें सुद्धां नव्हतें, मात्र नाहीं म्हणायला आंत पाऊल बुडे इतका धुराळा होता. खोलींत बहुतेक अंधार असून. न उजेडाकरितां आणि वाऱ्याकरितां दोन लहानसे झरोके राखिले होते. अशा त्या कोठडींत त्रिवेणीस आणून टाकिलें असतां तिच्या मनाची काय स्थिति झाली असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. तिला आंत काढल्यावर ती चोंहीकडे पाहूं लागली, तों प्रथमतः तिला अंधाराशिवाय कांहींच दिसेना. परंतु तशीच कांहीं वेळपर्यंत आंत राहिल्यावर तिचें लक्ष त्या झरोक्यांतून येणाऱ्या उजेडाकडे गेलें, व ती बराच वेळ त्याकडेच पहात राहिली. त्याकडे पहात असतां प्रथमतः कांहीं वेळ तिचें आपल्या गृहस्थितीकडे लक्ष गेलें, व आपण आणि आपला पिता दोघें घरीं असतां आपण ज्या सुखस्थितीचा अनुभव घेत होतों ती स्थिति, आणि हल्लीं तीं सर्व स्थिति एकीकडेच राहून प्राप्त झालेला तुरुंगवास, या दोहोंमध्यें किती अंतर आहे या गोष्टीच्या विचारांत तिचें मन गढल. परंतु तें तेथें फार वेळ न राहतां तिच्या मनांत निराळाच विचार उत्पन्न होऊन त्यांतच ती दंग होऊन गेली; व कांहीं वेळानें त्यांतून सावध होऊन ती शुद्धीवर आली असतां तिच्या मनाची वृत्ति पूर्णपणें उदासीनतेची होऊन जाऊन संसारपर शांत न पडतां जोग घेण्याचा जो तिचा संकल्प होता तो तिच्या मनांत विशेष दृढ होऊं लागला; व अर्हत्प्रभूनें कृपा करून आपणास ती स्थिति द्यावी एतद्विषयीं तिनें त्याची मनोभावानें प्रार्थना केली. ही प्रार्थना करीत असतां तिचें लक्ष अर्हत्प्रभूच्या धर्माचा जो चोंहोकडे उच्छेद करण्याविषयीं प्रयत्न चालला होता त्याकडे जाऊन, कार्तिकशंभु, शिलादित्य इत्यादिकांनीं जीं कांहीं गुप्त कारस्थानें करण्याचें मनांत आणिलं होतें, त्यांविषयीं विचार करण्याकडे तिचें मन यत्किंचित् वळलें. या विचारांच्या लहरींत ती असतां वसुभद्राचार्याचें तें अकृत्रिम प्रेमही तिच्या मनांत आल्यावांचून राहिलें नाहीं.

तथापि अखेर पुनः पुनः तेच तेच विचार तिच्या मनांत घोळत राहून सरतेशेवटीं त्यांचें पर्यवसान जोग घेण्याच्या विचारांतच झालें. इतका प्रकार होत आहे तों बाहेर संध्याकाळ होऊन आंत कोठडींत डोळयांत बोट घातलें असतांही दिसेना अशी स्थिति झाली; तेव्हां कांहीं वेळानें तुरुंगातील एक शिपाई एका चाकराच्या हातीं कांहीं वाळलेलें व बुरसलेलें अन्न घेऊन तेथें आला. आंत आल्यावर त्याच्या हातांत एक दिवा होता तो त्यानें तेथल्या तेथेंच खालीं भुईवर ठेवून **त्रिवेणी**स तें अन्न खाण्यास सांगितलें; परंतु जिला अगोदरपासूनच या संसारपाशाचा कटाळा आला होता, तिला त्या तशा उदासीन प्रसंगीं अन्नपाशाची आठवण कशानें होणार ? तिनें तें अन्न घेऊन आलेल्या मनुष्यास मला भूक नाहीं म्हणून सांगितलें, तें ऐकून तीं दोघें कांहीं अधिक कमी विचारपूस न करितां कोपऱ्यांत प्यायला पाणी ठेविलें आहे म्हणून सांगून निघून गेलीं. तो शिपाई आंत आला तो त्या कोठडीचें कुलूप उघडून आंत आला होता, त्यानें बाहेर पडतांच पूर्ववत् कोठडी बंद करून घेतली. **त्रिवेणी**चें या गोष्टीकडे लक्षही नव्हतें, व ती आपल्याच विचारांत गढून गेली होती. ती कोठडी टगणी होती हें वर सांगितलेंच आहे. त्यामुळें तीस उभें रहातां येईना, व ती अगोदर अन्नपाण्याशिवाय आणि काळजीनें दमली होती यामुळें ती त्या तसल्या रकट्यावरच पडून राहिली. कांहीं वेळानें तिला आपोआप झोंप लागली, व ती सुमारें दोन प्रहरपर्यंत तशीच गाढ निद्रिस्त होती. पहाटेच्या सुमारास ती निजली होती त्याच्या वरल्या अंगाला कांहीं खडबड झाल्याचा भास होऊन ती जागी झाली, व लागलीच उठून बसून डोळे चोळून त्या आवाजाच्या धोरणानें वर डोळे करून पहाते तों वर लांब आकाशांतील चांदण्या दिसत असून त्यांच्या अस्पष्ट उजेडांत माणसाच्या डोक्याच्या परिमाणाची एक आकृति तिच्या दृष्टीस पडला. त्या वेळीं चंद्र मावळून गेला होता, यामुळें तिला तें डोकें कोणाचें असावें यविषयीं तर्क होईना. व तशा त्या स्थितींत तिनें भयाची किंकाळी ठोकण्याचाही संभव होता. परंतु **त्रिवेणी** ही स्वाभाविकच विचारी असल्यामुळें ती एकदम डगमगली नाहीं; व आपण तुरुंगांत असतां तुरुंगाच्या छपराला भोंक पाडलेलें दिसतें आहे यावरून तें पाडणारा मनुष्य तुरुंगावरील अंमलदारांपैकीं कोणी नसून कदाचित् असेल तर तो आपलें हित इच्छिणाऱ्यांपैकींच कोणी तरी असेल असा तिनें स्वाभाविक तर्क केला. व हा तर्क मनांत आल्याबरोबर तिला त्याच दिवसाच्या दोन प्रहरच्या प्रसंगाची आठवण होऊन कदाचित् हा मनुष्य **वसुभद्राचार्य**च असेल असें तिनें साहजिक अनुमान काढिलें. इतक्यांत पहाते तों तिच्याच नांवान **वसुभद्राचार्या**नें हलकेच हांक मारलेली तिच्या कानीं पडली.

"कोण, **वसुभद्राचार्य** ?" तिनें हळूच विचारिलें.

"होय. मीच तो. मोठ्यानें बोलूं नको, किंवा घाबरूं नको. मी तुला सोडविण्याकरितां आलों आहें."

"तें खरें, पण तुम्हांला फरासखान्याच्या छपरावर कोणीकडून यायला सांपडलें ?" तिनें फिरून विचारिलें.

त्यावर **वसुभद्राचार्य** हलकेच जबाब देतोः-"सांपडलें असेंच. फार बोलायला वेळ नाहीं.

राहिला होता; व ही एवढी गोष्ट त्यानें शहाणपणानें अगोदरच करून टाकली होती, एवढ्यानेंच त्याची घरच्या माणसांच्या दृष्टीनें पुष्कळच अब्रू वांचली. असो. नवरदेवाचें सर्व सामान आणविणें झाल्यानंतर त्याचीं गाठोडीं वगैरे बांधून तयार केलीं, व हें नूतन विवाह झालेलें दंपत्य व इतर माणसें ही परसाच्या अंगणांत आलीं. त्या ठिकाणीं घोडीं तयार आणून ठेविलीं आहेत म्हणून त्या खोट्या बापलेंकांनीं अगोदर आपल्या जांवयास सांगितलें होतें; व त्यावेळीं तरी ते खोटें बोलले असावे असें कांहीं त्याच्या बुद्धीनें घेतलें नव्हतें, यामुळें तो आपल्या वधूसह मुकाट्यानें घोड्यावर बसण्याच्या तयारीनें अंगणांत आला, आणि पहातो तों त्याच्या दृष्टीस कांहीं भलताच प्रकार पडला. वधूवरांस बसण्याकरितां दोन घोडीं असावयाचीं, पण त्यांतलें कांहींच नसून त्याचे ऐवजीं नाकांत वेसण अडकविलेला एक रेडा व त्याच्या शेजारीं एक गाढव अशीं दोन जनावरें धरून मोतद्दारांसारखे दिसणारे असे दोन मनुष्य त्या ठिकाणीं होते; व या वधूवरांची स्वारी वर बसावयाच्या तयारीनें तेथें आल्याबरोबर एकीकडून रेडेराव व दुसरीकडून गद्धेराव यांनीं आपली गायनकला प्रकट करण्यास आरंभ केला वधूस हा सगळा बेत आंतून माहितच होता, यास्तव तिला त्याबद्दलचें कांहीं आश्चर्य वाटलें नाहीं; पण तो नवरा बिचारा मात्र अगदीं ओशाळून गेला. इतक्यांत ते बापलेंक दोघे पुढें सरसावले. आणि आमचे पैसे अगोदर रोख आमच्या हातांत टाका म्हणून नेटानें बोलूं लागले. तेव्हां आतां बोलून कांहीं इलाज नाहीं असें जाणून त्या बिचाऱ्यानें त्यांच्याही पदरीं एकेक तोडा बांधला, तेव्हां त्यांनीं तीं जनावरें तेथून काढून नेऊन खरोखरीचीं दोन घोडीं आणून उभीं केलीं, व शेवटीं तीं वधूवरें दोघेंही एकदाचीं घराबाहेर पडलीं. परंतु एवढ्यानें त्या बिचाऱ्यांचा त्रास संपला नाहीं. तीं दोघें घराबाहेर पडलीं मात्र, तों त्यांस घरचा धनी आडवा येऊन उभा राहिला, आणि त्या वरास म्हणालाः—"रावसाहेब! आपण या लुच्यांना मात्र यथेच्छ पैसे चारलेत, आणि आपली अब्रू वचाविलीत. पण माझें कसें काय? तुम्हीं माझ्या घरीं लग्नाचा मांडव घातला, सगळा त्रास मला दिला, आणखी इतकें करून एक पक्कान्नाचें जेवण तरी? आणखी माझ्या चिंगीला उंची जरीकांठी खण म्हणून, माझ्या बायकोला आणि दोघी भावजयांना चांगलीं लुगडीं म्हणून, आणखी हें आणि तें सगळें मिळून पुष्कळ राहिलें पण निदान हजार पांचशेंचा विषय तरी चारावयाचा होता? कोणी तरी उष्टें खातो तें तुपाच्या आशेनें खातो, मग कसें काय म्हणतां रावसाहेब? आम्ही धडधडीत मराठ्याच्या घरी ही खंडोबाला वाहिलेली मुरळी आणून घातली, ती काय आम्हांला पैशाची लालूच नव्हती म्हणून?"

हें त्या घरच्या धन्याचें भाषण ऐकून त्या बिचाऱ्या वराची काय अवस्था झाली असेल याचा विचार वाचकांनींच करावा. इतका वेळपर्यंत त्याला त्या ठकांच्या नुसत्या खाबूपणाबद्दलच कायतें वाटत वाईट होतें, व जरी लग्न सोहळे पुरे आटपले नव्हते तरी, झालेला विवाह हा यथाशास्त्रच होता, व फक्त लग्नानंतरचें ब्राह्मण भोजन व मेजवान्या आटपावयाच्या राहिल्या होत्या अशी त्याची समजूत होती; परंतु आतां ऐकतो तो कांहीं प्रकार विलक्षणच आपले

कुळ चांगलें मराठ्याचें असतां धडधडीत मुरळीला घरांत आणून बसविलें, या गोष्टी-बद्दल त्यास मरणप्राय दुःख झालें. परंतु तें दुःख त्या वेळीं बोलून कांहीं उपयोग नव्हता. त्यावेळीं कांहीं कमजास्ती बोलूं लागावें, तर झालेली फजिती ही कांहींच नाहीं, आणखी भररस्त्यावर विनाकारण जास्ती फजीत व्हावें लागणार, हें मनांत येऊन तो बिचारा घाबऱ्या-ल्यासारखा झाला, व तशा स्थितींतच कांहीं वेळ स्तब्ध राहून तो मोठ्या कष्टानें पुढील शब्द बोलला:—"बाबांनो ! तुम्हीं आज हा काय गोंधळ मांडला आहे मला कांहीं कळत नाहीं. तुम्हीं मला गरीबाला विनाकारण त्रास काय म्हणून देतां ?"

हे शब्द ऐकून तो घरधनी मोठ्यानें हंसून व काहीं विलक्षण हातवारे करूं लागून म्हणाला:—"विनाकारण ? मी तुम्हांला विनाकारणच त्रास देतों एकूण ! बरें बरें ! चला येथून जा तर पाहूं कसे जातां ते ! मुरळी घरांत घालतांना मात्र बरें वाटतें, आणि पैशाची गांठ मात्र सुटत नाहीं ! बरें बरें !"

इतकें बोलून त्यानें मोठ्यानें "यू—यू—यू—च्छुः—!" असा शब्द तोंडावाटे काढिल्याबरोबर घराच्या कोपऱ्याच्या बाजूनें दोन तीन कुतरीं धांवत आलीं. हीं कुतरीं त्या घरधन्याचीं पाळींव होतीं, व त्यास कुतरीं बाळगण्याचा मोठा शोक होता. असो; हीं कुतरीं तो यू—च्छूः शब्द ऐकल्याबरोबर आपल्या धन्याच्या पायांशीं जमलीं, व त्यानें हातानें कांहीं खूण करितांच त्यानीं आपला मोर्चा फिरवून त्या बिचाऱ्या घोडेस्वारांस वेढून त्यांच्या भोंवताली भों भोंः चा गजर चालविला. तो गजर होऊं लागल्याबरोबर मात्र वधू खरोखरीच घाबरली; व घोड्याचा लगाम हातांत धरला होता तो सोडून देऊन आतां खालीं पडते कीं काय अशी भीतिहि वाटूं लागे अशी तिची स्थिति होऊन गेली. तेव्हां ते दोघे बापलेंक वाघ्ये पुढें होऊन त्यांनीं तिला घोड्यावरच सांवरून धरिलें. इकडे कुतऱ्यांचें भोंकणें जोरानें चालू होतेंच. अशी जेव्हां स्थिति झाली, आणि आतां तो आवाज ऐकून आसपासचे लोक जमून उलट जास्त फजितीस मात्र कारण होईल असें उघडपणें दिसूं लागलें, तेव्हां त्या वरानें त्या घरच्या धन्यास नम्रपणें म्हटलें:—"बाबांनो! तुम्हीं सर्वजण मिळून मला असा कां बरें त्रास देतां? तुमचें म्हणणें तरी काय आहे तें मला कळूं द्या !" हें ऐकून घरधनी म्हणालाः—"कां, माझें म्हणणें काय आहे तें मीं तुम्हांला मघांच नाहीं कां सांगितलें ? मी कांहीं असा कच्चा बच्चा नाहीं. मुकाट्यानें एक हजाराचा तोडा माझ्या हातांत टाकाल तर मी तुमची फजिती जास्त होऊं देणार नाहीं, आणि तुम्हांला गांवाबाहेरपर्यंत मुकाट्यानें पोंचवीन, नाहीं तर पहा माझ्याशीं गांठ आहे !" त्याचें हें बोलणें ऐकून बिचारा वर अगदीं घाबरून गेला. जत्रेला येतांना चार पांच हजार रुपये रोख जवळ होते ते त्या वाघ्यांस व लग्न लावणाऱ्या ब्राह्मणांस देण्यांतच संपून जाऊन बाकी १०० एक रुपये शिलक राहिले होते. परंतु ही अडचण त्या घरधन्यास सांगून काय उपयोग ? त्यानें एकच हट्ट घेतला कीं मी पैसे हातावर रोख घेईन तेव्हां तुम्हांला पुढें पाऊल टाकूं देईन ! तेव्हां नाइलाज होऊन बिचाऱ्या वरानें आपल्या अंगावरील एक अलंकार त्यास काढून देण्याचा विचार केला, व घोड्यावरून खालीं उतरून त्यानें घरधन्यास

मराठी ग्रंथसंग्रहालय
मथुरा.

अंमळ एका अंगास बोलाविलें. तें सहजच ताच्या गंजी होत्या, तेथून घोडयाकरितां घरधनी व तो गृहस्थ दोघे घरांत शिरले, वरण आणिलें व विहिरीवरून पाणी आणून व आंत एकमेकांची काय समजूत पाडावयाची आपल्या पोटाच्या तजविजीला लागले. ते ती पाडून परत बाहेर आले. इकडे त्यांच्या दोघे पितापुत्रही त्या गृहस्थाच्या जवळ पण मागें त्या दोघां पितापुत्रांनीं वधूच्या भुईवर मोठया दिमाखानें बसले. इतका सन्नाटा नवऱ्याकडून आपणास दर वर्षी कांहीं थाट झाल्यावर त्या वरानें वधूकडे पाहून झट-इनाम बांधून देण्याविषयीं वधूच्या तोंडून ठराव लेंः—"या आतां अशा लाजणार कोठप-करून घेतला; व त्याबद्दल तिनें बेल भंडार र्यंत ? या अशा येथें समोरच बसा ! " झटल्यावर ते संतुष्ट झाले, व अखेर सरतेशे- हें भाषण ऐकून वधू जास्तीच मुरकली, व वटीं पुढें कांहीं विघ्न न आणितां ते व तो सरते शेवटीं एकदाची आपल्या नवऱ्यासमोर घरधनी मिळून त्यांनीं तें जोडपें एकदाचें फत्या घालून बसली. नंतर त्या गृहस्थानें गांवाबाहेर आणिलें. बोलणें काढिलें त्याचें तात्पर्य इतकेंच होत कीं

गांवाबाहेर पडल्यावर तीं वधूवरें घोडयांवर "गोष्ट होऊं नये ती झाली. मराठ्याच्या कुळांत बसून पुढ चालली, व ते पितापुत्रही तुमची मुरळी शिरली हें कांहीं चांगलें झालें नाहीं. तथापि आमची वाट "सा कोसांवर न्येरी व्हती" म्हणून आतां सर्व जणांनीं झालेल्या गोष्टीबद्दल कानास सांगून त्यांच्या बरोबर चालूं लागले. तीं घोडीं खडा लावून तिजबद्दल वाच्यता कोठेंही करूं भाडयाचीं असल्या कारणान त्यांचे बरोबर नये. ही आमची वधू असली, तरी ती प्रत्यक्ष दोन भाडेकरीही होते. असो. याप्रमाणें हीं आपल्या घरीं व्यावी हें मला कांहीं प्रशस्त वाटत सहाजणें **पालगांव** सोडून एकदाची प्रवासाला नाहीं. याकरितां तुम्हीं हिला वाटेल तिकडे निघालीं, व तो घरधनी आल्या वाटेनें परत घेऊन जा, आणि पाहिजे असल्यास तिचा निघून गेला. इकडे हें प्रवासिमंडळ संध्याका- आणखी कोणाशीं विवाह करून द्या, त्याबद्दल ळच्या सुमारास एका अंबराईंत वस्तीस उतरलें. माझ्याकडून कांहीं तक्रार नाहीं. मात्र तुम्हीं या वेळीं फार तर संध्याकाळचा एक दोन या गोष्टीस कबूल व्हावें एतद्विषयीं तुमची घटिका दिवस उरला होता, व त्या वराच्या काय समजूत काढावयाची असेल ती काढण्या- मनांत पुढील गांव एका कोसावर होतें तेथपर्यंत स भी कबूल आहें." त्या वराच्या तोंडचे हे जाण्याचे पूर्वी आपल्या वरोबरच्या मंडळीशीं शब्द ऐकतांच वधूस व त्या उभयतां पिता- कांहीं एका गोष्टीबद्दल मुद्दाम बोलावयाचें पुत्रांस मोठें आश्चर्य वाटलें. तथापि त्याबद्दल होतें, याकरितां त्यानें तेथेंच उतरण्याचा आग्रह कांहीं वेळ बोलणें होऊन त्यांनीं आपले बक्षि- धरिला. तेव्हां तीं सर्वजण तेथेंच उतरलीं, व शीचे पैसे उपटले आणि त्याचें म्हणणें कबूल गाशा पसरून त्यावर तो गृहस्थ बसला. वधूही केलें. इतक्यांत भाडेकरी गवत चारा घेऊन जवळच कांहीं अंतरावर लाजल्या मुरकल्याचा आले, त्यांना त्यांनीं "आम्हांला येथें कांहीं भाव करून उभी राहिली. भाडेकऱ्यांनीं घोडीं रहावयाचें नाहीं. यांना कांहीं कामाकरितां झाडाशीं बांधून तेथून कांहीं अंतरावर गव- एकीकडे जावयाचें आहे, आणि बाकीच्यांना

दुसरीकडे जावयाचें आहे, आणि तें आत्तांच्या आत्तांच येथून निघालें पाहिजे." ह्मणून सांगितलें, तेव्हां भाडेकरी वैरणचे पैसे त्यांजजळून मागून घेऊन वैरण जागच्या जागीं टाकून निघण्यास तयार झाले. असो. नंतर तें प्रवासिमंडळ निरनिराळ्या मार्गानें निघून गेलें. पुढें त्या मुरळीनें आणि मुरळीच्या साथ्यांनीं दुसऱ्या एका गांवीं (ह्या गावाचें नांव तमाशांत निघालेलें मला स्मरत नाहीं.) गेले. व तेथें दुसऱ्या एका गृहस्थास गांठून जशी काय ही मुरळी खरोखरीच चांगल्या मराठ्या गृहस्थाची मुलगी आहे आशा थाटानें त्यास भुरळ घालून त्याच्याशीं तिचा विवाह लावून दिला. मात्र तिच्या पहिल्या विवाहाच्या वेळीं जो फाजीलपणा व वराची फजिती झाली, तसा प्रकार या लग्नाचे वेळीं कांहीं घडून आला नाहीं. पुढें एवढें मात्र झालें कीं, या लग्नाच्या वेळीं ती मुरळी व तिचे साथीदार यांचें आंतून गुप्तपणें असें ठरलें होतें, कीं, तिचें हें चांगल्या घराण्यांत लग्नाचें जुळवून दिल्याबद्दल तिच्या कडून त्या साथीदारांस वर्षाचे वर्षास कांहीं नियमित वेतन मिळत जावें. ह्याप्रमाणें ठराव होऊन त्या बरहुकूम आचारही बरेच दिवस चालत राहून अखेरीस तो ह्मातारा वाघ्या मरून गेला, व दुसरा तरुण वाघ्या एकटाच आपले वेतनाचे पैसे मागण्यास आला. तेव्हां त्या मुरळीनें आतां आपल्या वर्तनाला एकास दुसरा असा कोणी साक्षीदार उरला नाहीं अशा समजुतीनें त्या तरुण वाघ्यास "तुला कांहीं मिळणार नाहीं, आणि तुझं मी काहीं लागत नाहीं" असें सांगून उडवून दिलें. तो तरुण वाघ्या "बरें याचा नीट विचार कर!" इतकें बोलून निघून गेला. या गोष्टीस एक वर्ष पुरें झाल्यावर तो पुनरपि तिला येऊन गुप्त रूपानें भेटला, त्या वेळींही तिनें तेंच उत्तर दिलें, तेव्हां मात्र त्यानें "कांहीं चिंता नाहीं, याबद्दल तुझा पुरता सूड उगवीन तरच हा नांवाचा वाघ्या आहे" ह्मणून सांगितलें, आणि निघून गेला; व जेजुरीस जाऊन आणखी कांहीं साथीदार मेळवून एकंदर हकीकतीचा खेळच तयार केला, व तो खेळ गांवोगांव फिरवीत फिरवीत तो **पांचवड** गांवीं आला, व त्या ठिकाणीं पहिल्यानेंच **संभाजीरावां**च्या घरीं त्यानें हा खेळ करून दाखविला.

असो. इतका वेळपर्यंत मीं ज्या तमाशाची हकीकत सांगितली तो तमाशा या ठिकाणीं संपला. ह्या तमाशांत वास्तविक पहातां सोंगांची कांहीं मोठीशी गंमत होती असा मुळींच प्रकार नव्हता, तरी ती गोष्टीची जुळणीच कांहीं चमत्कारिकशी असल्यामुळें मेजवानीस जमलेली मंडळी एकसारखी खदखदां हसत होती. या मंडळींत **जयवंतराव**ही होते. त्यांना मात्र ह्या सोंगांची ही कृति मुळींच आवडली नसावी असें त्यांच्या मुद्रेवरून दिसत होतें. असो. या प्रकारें हा तमाशा संपल्याबरोबर प्रथमतः 'चोर! चोर!' ह्मणून धांवत आलेल्या तमासगिरानें सर्व मंडळीस मुजरा केला, आणि कोणी कांहीं पैसे देतील तर ते घेण्याकरितां आपलें ताट पुढें केलें, व त्यांत कोणीं कांहीं कोणीं कांहीं असे पटापट पैसे टाकले. परंतु तेवढ्यानें तो संतुष्ट न होतां ह्मणाला:—"**रावसाब! नानासाब!** औंदा दादाचं दांद वाढतंया! त्ये भटांस्नी आन् त्ये वाग्यांस्नी बी योक योक त्वोडा गावलान् आमा गरीबांस्नी योक रुपया बी न्हाई, असं करूं नका."

हें ऐकून त्या **मंडळींतलाच** एकजण ह्मण-

तोः—"अरे, हा तमाशा तुम्हीं कशावरून करितां? अशी गोष्ट कधीं घडली आहे ?"

"ह्मजी का पुसावं **रावसाब** !" बहुरूपी उत्तर करितोः—"ही ग्वाष्ट आमास्नी ठावी बी हाय न् पायली बी हाय !"

"चमत्कार आहे !" दुसरा कोणी गृहस्थ बोलतोः—"अरे, ए—ही इतकी विचित्र जाई आहे तरी कोटें ? आह्मांला दाखविशील ?"

"व्हय व्हय ! नाय कशापाइं ह्मनावं ?—तिनं बोलून चालून आमच द्वान वरसांच पैस डुबावल्याती, तवां आमास्नी तिची का पच्चाईत? हंग ती बगा तत खिडकीमंदी त्वांड काढून-शी बगतीया !" **ताराबाई**कडे बोट दाखवून बहुरूप्यानें उत्तर दिलें.

वर सांगितलेला तमाशा होत असतां व त्याच्या अगोदरपासून **ताराबाई**ची जी स्थिति झाली होती, व तमाशा अर्धा अधिक होत आला असतां त्यांतील गोष्टींचें जें कांहीं चमत्कारिक धोरण दिसूं लागलें होतें, त्यांवरून या गोष्टींचें एकंदर पर्यवसान अशाच कांहीं तरी थाटावर जाईल असें मला पूर्वीच वाटून चुकलें होतें, व अखेर त्याप्रमाणें प्रकार झालाच. मात्र ज्याप्रमाणें मला वाटलें, त्याप्रमाणेंच खालच्या मंडळीपैकीं कोणास वाटलें किंवा कसें हें माझ्यानें सांगवत नाहीं. तथापि खालीं तमाशा चालू असतां बहुतेक मंडळी हंसण्यांत चूर होऊन गेली होती; व त्यांचें लक्ष तमाशा पहाण्यांतच गुंतलेलें दिसत होतें, यावरून **ताराबाई**ची वर खिडकींत जी अवस्था झाली तिजकडे कोणाचेंही लक्ष गेलें असावें असें वाटत नाहीं. कदाचित् लक्ष गेलेंच असेल तर **जयवंतरावांचें** लक्ष गेलें असेल. असो; बहुरूप्याच्या तोंडचा वर सांगितलेला शेवटला उद्गार ऐकतांच सर्व मंडळी एकदम आश्चर्यानें थक्क होऊन गेली, व सर्वांचे डोळे **ताराबाई**कडे लागले. इकडे **ताराबाई** तर खिडकींतल्या खिडकींत बेशुद्ध झाली होती. हें पहातांच खालच्या मंडळीतून वर काय झालें म्हणून पहाण्यास कांहीं लोक येऊं लागले. इतक्यांत **संभाजीराव** शौचविधि आटोपून परत आले. पहातात तों अंगणांत सगळा एकच गोंधळ होऊन गेला आहे. तेव्हां याचें कारण काय म्हणून त्यांनीं जवळच्या एकदोघांस विचारितां कोणाच्याही तोंडून अक्षर निघेना अशी त्यांची स्थिति झाली. तेव्हां त्यांनीं अंमळसें पुढें येऊन दुसऱ्या लोकांसही तोच प्रश्न केला, व त्यावेळीं त्यांचीही तीच स्थिति झाली. तेव्हां हा काय चमत्कार आहे म्हणून ते आपल्या मनांतल्या मनांत आश्चर्य करिताहेत, तों इतक्यांत तो "चोर! चोर!" म्हणून ओरडणारा बहुरूपी पुढें येऊन त्यानें **संभाजीरावांस** सलाम केला, आणि "रावसाब! माज त्यवढ द्वान वरसाच पैस ह्मायलती त्ये मागाया मी **ह्मादवा**च्या **पालास्न** आलुया !"

बहुरूप्याच्या या भाषणाचा **संभाजीरावांस** कांहींच उमज पडला नाहीं. तेव्हां त्यांनीं तूं कोण, कुटला, तुझा माझा देण्या घेण्याचा संबंध कधीं होता वगैरे प्रश्न केले. तेव्हां त्यानें उत्तर केलेंः—"कसं कसं ह्मटलं सावसाब ! मी त्ये मुरळीचा भाव, आन् त्ये तिच लगन लावूनशी दिलें, आन् तवापास्न आपुन पैस बी दिल, मातर आज द्वान वरसांच पैस ह्मायल्याती !"

संभाजीराव आश्चर्य वाटून बोलतातः—"काय रे तुला वेड बिड तर नाहीं लागलें ? तुझी माझी कधीं गांठ पडली होती ? तूं ह्मणतोस त्या मुरळीचा आणि माझा काय संबंध?

आणि तूं मजजवळ पैसे कशाचे मागतोस ?"

बहुरूपी उत्तर करितोः—"रावसाब ! आपुन शिरिमंत मानुस. आपनाला असं करनं घटत न्हाय. माज त्यवड पैस चुकवूनशी द्या लगी भी जातो. "

"हा तर मोठाच चमत्कार आहे!" **संभाजीराव** विचारतात. "तुला पैसे कशाबद्दल द्यायचे ?"

"कशाबद्दल ! त्ये—त्ये— मुरळीचं लगन झालं त्येबद्दल ! लगनाचं आपनाला समूरन ऱ्हायलं न्हाईं व्हय रावसाब ?"

"अरे स्मरणाची गोष्ट ही तूं काय बोलत आहेस ? ती मुरळी कोण ?"

"मुरळी कोन ? कसं झंटलं, मुरळी कोन? कोन लजी रावसाब ! तुमचीच बायकू !"

त्या बहुरूप्याच्या तोंडून हे शब्द निघण्याचा मात्र अवकाश, लागलीच **संभाजीरावांचें** तोंड एकदम उतरून गेलें, व त्याबरोबर घेरी येऊन ते तेथल्या तेथेंच उन्हांत पडले. मग कसचें काय आणि कसचें काय ? कांहीं मंडळी वर **ताराबाईची** काय हवाल आहे म्हणून पहाण्यास घुसली, व कांहीं **संभाजीरावांजवळ** घोळका करून उभी राहिली. त्या वेळीं मी वरती होतच ती पुढें होऊन **ताराबाईला** सांवरून धरिलें होतें, व **राजाऊ** आणि घरांतील दुसरीं चाकरमाणसें यांस मोठ्यानें ओरडून पाणी आणावयास सांगत होतें, इतक्यांत **संभाजीरावांच्या** घेरीचा हा प्रकार झाला. या संबंधानें जी सगळ्या घरांत एकच धांदल उडून गेली, तिच्यामध्यें जो तो आपल्याच गडबडींत, दुसरा कोण कुठें आहे याचा कोणालाही शुद्ध नाहीं, अशी स्थिति होऊन गेली. त्यामुळें त्या गडबडींत खालीं लहान मुलें मंडळींत होतीं, त्यांपैकीं एक मूल धक्का लागून खालीं पडलें, आणि रडायला लागलें. त्याबरोबर दुसरीं मुलेंही रडूं लागलीं, आणि **ताराबाई** आणि **संभाजीराव** यांच्या या घोळक्यांत आणखी मुलांच्या रडण्याचाही एकच घोळका होऊन गेला. असा जेव्हां प्रकार झाला तेव्हां करावें काय अशी मला पंचाईत होऊन गेली. इतक्यांत **ताराबाईस** सावध करण्यास **राजाऊ** व घरांतील एक दोन दुसरे चाकर आणखी शिवाय दुसरी गृहस्थ मंडळी वर आलीसें पाहून मी **राजाऊस ताराबाईच्या** जवळ ठेवून खालीं मुलांकडे निघून गेलें. जिन्यांतून खालीं उतरून माजघरांत आलें तों तेथें तो **चिंधवलीचा** आचारी अर्धा पंचा नेसलेला पाय पसरून खुशाल तंबाखूच्या चकण्या मारीत बसला होता. त्याच्याकडे मी फारसें लक्ष न देतां तशीच सोप्यांत गेलें, व मुलांस पोटाशीं आंवळून धरिलें. साधारण लहान मुलांची चाल अशी असते कीं, तीं चालतां चालतां कोंठें पडलीं किंवा असाच दुसरा कांहीं प्रकार झाला, आणि त्या वेळीं त्यांचेकडे कोणाचें लक्ष नसलें, म्हणजे तीं फार वेळ न रडतां कांहीं वेळानें आपोआप थांबतात. मात्र तीं रडतांना थांबावयाचे अगोदरच जर त्यांच्या नेहमीच्या संवईचें मनुष्य त्यांजजवळ गेलें, किंवा तें मनुष्य त्यांच्या दृष्टीस पडलें, तर लागलाच त्यांचा पहिल्याहूनही अधिक टाहो पिकतो. हींच स्थिति त्या मुलांची ही झाली; व मी त्यांच्या दृष्टीस पडलें मात्र, त्यांनीं रडून रडून आकाश पाताळ अगदीं दणदणाधून दिल्यासारखें केलें. मी जवळ जाताच तीं सारीं माझ्या अंगास बिलगलीं, आणखी **मन्याबा** व **चिमी** यांनीं तर माझ्या अंगाचे

विचकुरे काढूं लागून "लांडे! मना तूंच माल्लंस अं—अ—अं" असें ह्मणून शिव्यांच्या रूपाचे नेहमीच्याच माझ्या संवईचे प्रेमालाप गाण्यास सुरुवात केली. या प्रेमालापांबद्दल अर्थातूच वाईट वाटून घेऊन परिणाम नव्हता; व एकादे वेळीं होता असें झटलें, तरी तो तशा प्रकारच्या धांदलीच्या समय—त्या समयीं तरी निदान तो मनांत आणणें योग्य नव्हतें. असो. वर सांगितल्याप्रमाणें मी मुलांस कवटाळून धरून त्यांस खाऊ देतें वगैरे प्रकारच्याच समजुतीच्या गोष्टी सांगून त्यांस जेमतेम परसांत घेऊन गेलें, व घरांतून मुलांकरितां कांहीं खावयाचा जिन्नस मागून घेऊन त्यांना वांटून देऊं लागलें. त्यावेळीं ही "तूं मना नहान टुकडा देतेस, न् आपुन् इक्का इक्का खाते" ह्मणून मजवर नवीन दोषारोप ठेवून मुलांनीं रडण्यास आरंभ केला, व **मन्याबानें** तर "लांडे! तूं मना देत नाहींस आन् आपुन् शग्ग एकटीच खाते" ह्मणून ओरडू लागून "थांब, मी आईला तांगतों, न् आई तुला तांगेल जा मनून!" ह्मणून पुढचें भाकीत बोलून सोडलें. असो; हा गोंधळ असाच कांहीं वेळ चालून सरतेशेवटीं एकदांची मुलाची समजूत पडली, व त्यांनीं जिलब्या खाल्ल्यानंतर तीं चांगलीं हुशार होऊन खेळूं लागली तेव्हां माझ्या जिवांत थोडा कुठें जीव आला. व तोंपर्यंत या मुलांच्या गोंधळाखालीं माझें ओटीवर व माडीवर चालत असलेल्या प्रकाराकडे मुळींच लक्ष नव्हतें. असो. मुलें उगीं राहिल्यावर मी त्यांना घेऊन माजघरांत गेलें, आणि पहातें तों **संभाजीरावांस** पाणी बिणी शिंपडून सावध केलें आहे, एकीकडे **जयवंतराव** त्या बहुरूप्याची कशी तरी समजूत काढून त्यांस बाहेर लावून देताहेत; **ताराबाईच्या** चरित्राची पूर्वपीठिका कांहीं विलक्षणच कानीं पडल्यामुळें आपण वाटलों, व इतःपर प्रायश्चित्त घेऊन फिरून **संभाजीरावां**शीं संबंध ठेवावयाचा नाहीं व त्यास वाळीत घालावयाचें वगैरे प्रकारचे बेत कांहीं वृद्ध **मराठे** गृहस्थ आपआपसांत करीत आहेत; कांहीं लोक तर आतां **संभाजीरावा**च्या घरीं अन्न घ्यावयाचें नाहीं अशा इराद्यानें पटापट घरांतून बाहेर पडून जात आहेत; व कांहीं लोक एकीकडे कांपऱ्यांत उभे राहून "या कामीं **संभाजीरावां**चा कांहीं दोष नाहीं. कारण त्यांच्या हातून न समजतां **ताराबाईशीं** विवाहादिक प्रकार घडले" वगैरे प्रकारें आपआपसांत दुःख करीत होते. असो; सरते शेवटीं सांगावयाचें तात्पर्य इतकेंच कीं, त्या दिवशीं इतकी थोरली खटपट करून जो मेजवानीचा बेत ठरला होता, व आतां मंडळी पानावर येऊन बसण्याची मात्र खोटी इतकी तयारी झाली होती. ती सर्व वायां जाऊन लोक भराभर बाहेर निघून गेले, मात्र **जयवंतराव** हे त्या ठिकाणीं पाहुणे आले असल्याकारणानें ते एकदम निघून गेले नाहींत. इकडे माडीवर **ताराबाईला** जेमतेम सावध केलें असून ती बरळत असल्याचे शब्द वरून कानीं पडत होते, तेव्हां तिजकडे जावें ह्मणून मीं मनांत आणिलें. परंतु तेथें मुलांना घेऊन जाण्याची अडचण असल्यामुळें त्यांना परसांतल्या माडीवर माझ्या खोलींत निजवावें ह्मणून बेत करून मी मुलांना तिकडे घेऊन गेलें, व हरयुक्तीनें एकदाचें मुलांस निजाविलें, इतक्यांत **राजाऊ** कुळंबीण आणखी एक दोन चाकर माणसें मोठ्यानें खो खो हंसतच वरती आली, आणि "भल्ली. फजिती झाली" ह्मणून चकाट्या पिटूं लागलीं.

ताराबाईचा मला घरांत एकटीलाच जाच होता असा प्रकार नसून सर्व चाकरमाणसांसही तसाच त्रास असे; यामुळें ताराबाईची फजिती झालेली पाहून त्यांना मोठा आनंद झाला होता; परंतु माझी स्थिति याहून अगदीं निराळी होती. ताराबाईची अशा तऱ्हेची फजिती झाली ही गोष्ट एका अर्थानें जरी न्याय्यच होती, तरी बिचाऱ्या गरीब संभाजीरावांकरितां मला ती फजिती न होती तरी बरें असें वाटलें. व या गोष्टीबद्दल विचार करीत असतां मला साहजिकच ताराबाईच्या त्या दशावतारांतील खेळांतील सोंगांच्या हातवाऱ्यांसारख्या हातवाऱ्यांची आठवण झाली; व जरी ते हातवारे ती पूर्वी कोठ करावयास शिकली असावी म्हणून माझ्या मनास आश्चर्य वाटत असे, तरी आतां तें वाटण्याचें कारण उरलें नाहीं.

असो; पुढें कांहीं वेळानें खालीं येऊन पहातें तों एकटे जयवंतराव खेरीज करून बाकीची बाहेरची सर्व मंडळी निघून गेली होती, व घराचा पुढचा दरवाजा बंद केला असून संभाजीराव ओटीवरच्या बैठकीवर भिंतीत तोंड घालून एका कागदाकडे पहात बसले होते. इकडे वर माडीवर ताराबाईचा ओरडण्याचा व बरळण्याचा दणदणाट चालला होता. तो ऐकून मी पाऊल न वाजवितां, हळूच वर गेलें, आणि आंत जाऊन तिला वारा घालूं लागतें इतक्यांत ताराबाईनें मजकडे टवकारून पाहून मलाच शिव्या देण्यास आरंभ केला. ह्या शिव्या तिच्या नेहमींच्या संवईमुळें तिच्या तोंडून पटापट बाहेर पडत होत्या; परंतु वास्तविक पहातां त्या देतांना ती शुद्धीवर होतीच असें माझ्यान खात्रीनें म्हणवत नाहीं. कांहीं वेळानें संभाजीराव वर आले. त्यावेळीं त्यांच्या तोंडावर निवळ प्रेतकळाच दिसत होती, तथापि मनुष्य मनाचा मोठा धडा करून एकाद्या गोष्टीविषयीं निश्चय करितो असाही कांहीं प्रकार त्यांच्या मुद्रेवरून मला भासला. त्यांस पाहतांच ताराबाईच्या शिव्या माझ्याकडून निघून त्यांच्याकडे वळल्या, तथापि त्यांनीं त्या शिव्यांकडे मुळींच लक्ष न देतां एका चाकरास राजाऊ खेरीज करून बाकी सर्व चाकरमाणसांस वर बोलावून आणण्यास सांगितलें. व त्याप्रमाणें तीं आल्यावर संभाजीरावांनीं एकेकास त्याचा त्या मुदतीपर्यंत झालेला पगाराचा हिशेब सांगून तो चुकवून दिला, व शिवाय प्रत्येकास उक्ते पांच पांच रुपये देऊन दुसरी नौकरी पाहण्यास सांगितलें. नंतर बायकोकडे वळून त्यांनीं तीस शिवी गाळ वगैरे न करितां " बया! फार चांगली कीर्ति केलीस, व आपल्या आणि माझ्या उभय कुळांस चांगला बट्टा आणिलास ! इतःपर तूं माझी कोणी नव्हेस, व मीहीं तुझा कोणी नव्हें ! तुला वाटेल तर आणखी नवीन पांच पन्नास नवरे करून घ्यावयाचे असल्यास खुशाल करून घे, माझी तक्रार नाहीं. " असें सांगितलें. ते शब्द ऐकतांच ताराबाईची मुद्रा एकदम बदलली; व मनुष्य पुष्कळ दिवस भ्रमांत राहून एकदम शुद्धीवर आला असतां तो जसे हातवारे करूं लागतो, तशा प्रकारचे हातवारे करूं लागून ती बोलूं लागली:—"काय ? तुम्ही मला घरांतून घालवून देणार काय? बरें बरें पाहीन पाहीन तुम्ही मला कसें घरांतून बाहेर घालवून देतां तें ! "

हे शब्द ऐकून संभाजीराव म्हणतातः— " तूं यापेक्षां आणखी ओरडत राहिलीस तरी त्याची मला इतःपर पर्वा नाहीं. आजपर्यंत मी

रा. रा. आत्माराम बाप्सोबारेळे .. ३
" विष्णु गोपाळ आपटे ६–१२
" अनंत परशुराम खरे, चिखली ३– ८
" खंडेराव चिमणराव बेदरकर ६
" पांडुरंग गणेश डोंगरें, अमदावाद ६–६–६
" रखमाजी नारायण ६– ६
" नारायण विश्वनाथ जोशी, सक्कर ६– ८
" नारायण गणेश थिटे ३
" घनःशाम निळकंठ नाडकर्णी ३
रा. सा. रामचंद्र गोविंद मंगरूळकर ६–१२
डा. गोपाळ शिवराम ६
रा. रा. भाई जीवनजी ३
" काशीनाथ मेघःशाम ३
" नारायण कृष्ण राइलकर ३
रा. ब. रामचंद्र नारायण पंडित .. ६–१२
" गोपाळ जनार्दन भातखंडे .. ६– ८
रा. सा. लक्ष्मण नरसिंह जोशी .. ६– ७
रा. रा. विनायक बळवंत परळकर ३
" गोविंद सखाराम अधिकारी .. ३
" बाळाजी पांडुरंग ३
" नारायण बाळकृष्ण गोडबोले .. ३
" आत्माराम जगन्नाथ कीर्तीकर .. ३
" रामकृष्ण भिकाजी कुळकर्णी .. ६–४–६
" कृष्णाजी अनंत, नागपुर ४–१४
" डी. आर. तिळवे, बेळगांव .. ६– ४
" वासुदेव विश्वनाथ करमरकर ३
डा. अनंत चंद्रोबा ३
" आत्माराम आपाजी १
रा. रा. आत्माराम नारायणजी .. २
रा. रा. गणपतराव बाजीराव ढाव १
" मोरेश्वर नारायण ओवळेकर .. ३
" हरिश्चंद्र सदाशिव ३
" नारापण हरि जोशी, कऱ्हाड ६
" महादेव केशव बोरकर ३
" नारायण रामचंद्र कोरगांवकर ३
रा. ब. कृष्णाजी रामचंद्र अगाशे कोल्हापुर ६–१२
रा. रा. सखाराम हरि जोग ६–१२
" विनायक गोविंद अघारकर .. ४
रा. सा. गंगाधर अनंत भट ६–१२
रा. ब. नारायण बाळकृष्ण चितळे ६–१२
रा. रा. गणेश रामचंद्र सब एंजि. ६–१२
" शांताराम नारायण ३
" बी. के. रघुनाथजी ४
" बापुजी विठोबा ३
" बाबुलजी जगन्नाथ कंट्राक्टर २
रा. ब. श्रीनिवास बाळाजी ६– ९
रा. सा. रामचंद्र कृष्ण, माढे ३– ६
रा. ब. नारायण बल्लाळ ओक, कोल्हापुर ६–१२
रा. रा. धोंडो मोरेश्वर ओ. सी. आश्वी ६– ६
" मार्तंड वामन श्रोत्री कोल्हापुर ६– ६
" जनार्दन विष्णु, पिंगळी तलाव ६–१२
" रामकृष्ण भिकाजी कुळकर्णी ६–४–६
सेक्रेटरी कोचीन लायब्ररी १–१४
सेक्रेटरी नेटिव्ह लायब्ररी, मुधोळ ७– ६
सेक्रेटरी कलघटगी लायब्ररी .. ३– ६
शेतओळी लायब्ररी ३
सेक्रेटरी सांगली लायब्ररी ३–१२

चुकचिी दुरुस्ती–गेल्या अंकाचे पोंचींत 'रामचंद्र भगवंत, निफाड' असें आहे, त्याचेबद्दल 'रामचंद्र निळकंठ, निफाड' असें समजावें. तसेच त्याच अंकांत विनायक चिंतामण जोगळेकर यांचे नांवावर १२॥ वर्गणी छापली आहे, तिची फोड रा. विनायक चिंतामण जोगळेकर व रामकृष्ण बळवंत जामडा कनाल या प्रत्येक नांवापुढें ६॥ रुपये याप्रमाणें समजावी.

ताराबाईचा मला घरांत एकटीलाच जाच होता असा प्रकार नसून सर्व चाकरमाणसांसही तसाच त्रास असे; यामुळें ताराबाईची फजिती झालेली पाहून त्यांना मोठा आनंद झाला होता; परंतु माझी स्थिति याहून अगदीं निराळी होती. ताराबाईची अशा तऱ्हेची फजिती झाली ही गोष्ट एका अर्थानें जरी न्याय्यच होती, तरी बिचाऱ्या गरीब संभाजीरावांकरितां मला ती फजिती न होती तरी बरें असें वाटलें. व या गोष्टीबद्दल विचार करीत असतां मला साहजिकच ताराबाईच्या त्या दशावतारांतील खेळांतील सोंगांच्या हातवाऱ्यांसारख्या हातवाऱ्यांची आठवण झाली; व जरी ते हातवारे ती पूर्वी कोठे करावयास शिकली असावी म्हणून माझ्या मनास आश्चर्य वाटत असे, तरी आतां तें वाटण्याचें कारण उरलें नाहीं.

असो; पुढें कांहीं वेळानें खालीं येऊन पहातें तों एकटे जयवंतराव खेरीज करून बाकीची बाहेरची सर्व मंडळी निघून गेली होती, व घराचा पुढचा दरवाजा बंद केला असून संभाजीराव ओटीवरच्या बैठकीवर मिंतीत तोंड घालून एका कागदाकडे पहात बसले होते. इकडे वर माडीवर ताराबाईचा ओरडण्याचा व बरळण्याचा दणदणाट चालला होता. तो ऐकून मी पाऊल न वाजवितां, हळूच वर गेलें, आणि आंत जाऊन तिला वारा घालूं लागतें इतक्यांत ताराबाईनें मजकडे टवकारून पाहून मलाच शिव्या देण्यास आरंभ केला. ह्या शिव्या तिच्या नेहमींच्या संवईमुळें तिच्या तोंडून पटापट बाहेर पडत होत्या; परंतु वास्तविक पहातां त्या देतांना ती शुद्धीवर होतीच असें माझ्यान खात्रीनें म्हणवत नाहीं. कांहीं वेळानें संभाजीराव वर आले. त्यावेळीं त्यांच्या तोंडावर निवळ प्रेतकळाच दिसत होती, तथापि मनुष्य मनाचा मोठा धडा करून एकाद्या गोष्टीविषयीं निश्चय करितो असाही कांहीं प्रकार त्यांच्या मुद्रेवरून मला भासला. त्यांस पाहतांच ताराबाईच्या शिव्या माझ्याकडून फेडून त्यांच्याकडे वळल्या, तथापि त्यांनीं त्या शिव्यांकडे मुळींच लक्ष न देतां एका चाकरास राजाऊ खेरीज करून बाकी सर्व चाकरमाणसांस वर बोलावून आणण्यास सांगितलें. व सर्वप्राणी तीं आल्यावर संभाजीरावांनीं एकेकास त्याचा त्या मुदतीपर्यंत झालेला पगाराचा हिशेब सांगून तो चुकवून दिला, व शिवाय प्रत्येकास उक्के पांच पांच रुपये देऊन दुसरी नौकरी पाहण्यास सांगितलें. नंतर बायकोकडे वळून त्यांनीं तीस शिवी गाळ वगैरे न करितां " बया! फार चांगली कीर्ति केलीस, व मापल्या आणि माझ्या उभय कुळांस चांगला ट्टा आणिलास ! इतःपर तूं माझी कोणी न्हेस, व मीहीं तुझा कोणी नव्हें ! तुला टेल तर आणखी नवीन पांच पन्नास नवरे रून घ्यावयाचे असल्यास खुशाल करून , माझी तकार नाहीं. " असें सांगितलें. ते ब्द ऐकतांच ताराबाईची मुद्रा एकदम दलली; व मनुष्य पुष्कळ दिवस भ्रमांत राहून कदम शुद्धीवर आला असतां तो जसे हातवारे रूं लागतो, तशा प्रकारचे हातवारे करूं लागून ती बोलूं लागली:—"काय ? तुम्हीं मला घरांतून घालवून देणार काय? बरें बरें पाहीन ाहीन तुम्हीं मला कसें घरांतून बाहेर घालवून देतां तें ! "

हे शब्द ऐकून संभाजीराव म्हणतातः— तूं यापेक्षां आणखी ओरडत राहिलीस तरी याची मला इतःपर पर्वा नाहीं. आजपर्यंत मी

रा. रा. आत्माराम बाप्सोबारेळे .. ३
" विष्णु गोपाळ आपटे ६–१२
" अनंत परशुराम खरे, चिखली ३– ८
" खंडेराव चिमणराव बेदरकर ६
" पांडुरंग गणेश डोंगरें, अमदाबाद ६–६–६
" रखमाजी नारायण ६– ६
" नारायण विश्वनाथ जोशी, सक्कर ६– ८
" नारायण गणेश थिटे ३
" घनःशाम निळकंठ नाडकर्णी ३
रा. सा. रामचंद्र गोविंद मंगरूळकर ६–१२
डा. गोपाळ शिवराम ६
रा. रा. भाई जीवनजी ३
" काशीनाथ मेघःशाम ३
" नारायण कृष्ण राइलकर ३
रा. ब. रामचंद्र नारायण पंडित .. ६–१२
" गोपाळ जनार्दन भातखंडे .. ६– ८
रा. सा. लक्ष्मण नरसिंह जोशी .. ६– ७
रा. रा. विनायक बळवंत परळकर ३
" गोविंद सखाराम अधिकारी .. ३
" बाळाजी पांडुरंग ३
" नारायण बाळकृष्ण गोडबोले .. ३
" आत्माराम जगन्नाथ कीर्तीकर .. ३
" रामकृष्ण भिकाजी कुळकर्णी .. ६–४–६
" कृष्णाजी अनंत, नागपुर ४–१४
" डी. आर. तिळवे, बेळगांव .. ६– ४
" वासुदेव विश्वनाथ करमरकर ३
डा. अनंत चंद्रोबा ३
" आत्माराम आपाजी १
रा. रा. आत्माराम नारायणजी .. २

रा. रा. गणपतराव बाजीराव ग्राव १
" मोरेश्वर नारायण ओवळेकर .. ३
" हरिश्चंद्र सदाशिव ३
" नारापण हरि जोशी, कऱ्हाड ६
" महादेव केशव बोरकर ३
" नारायण रामचंद्र कोरगांवकर ३
रा. ब. कृष्णाजी रामचंद्र अगाशे कोल्हापुर ६–१२
रा. रा. सखाराम हरि जोग ६–१२
" विनायक गोविंद अघारकर .. ४
रा. सा. गंगाधर अनंत भट ६–१२
रा. ब. नारायण बाळकृष्ण चितळे ६–१२
रा. रा. गणेश रामचंद्र सब एंजि. ६–१२
" शांताराम नारायण ३
" बी. के. रघुनाथजी ४
" बापुजी विठोबा ३
" बाबुलजी जगंनाथ कंट्राक्टर २
रा. ब. श्रीनिवास बाळाजी ६– ९
रा. सा. रामचंद्र कृष्ण, माढे ३– ६
रा. ब. नारायण बल्लाळ ओक, कोल्हापुर ६–१२
रा. रा. धोंडो मोरेश्वर ओ. सी. आश्वी ६– ६
" मार्तंड वामन श्रोत्री कोल्हापुर ६– ६
" जनार्दन विष्णु, पिंगळी तलाव ६–१२
" रामकृष्ण भिकाजी कुळकर्णी ६–४–६
सेक्रेटरी कोचीन लायब्ररी १–१४
सेक्रेटरी नेटिव्ह लायब्ररी, मुधोळ ७– ६
सेक्रेटरी कलघटगी लायब्ररी .. ३– ६
शेतओळी लायब्ररी ३
सेक्रेटरी सांगली लायब्ररी ३–१२

चुकचिी दुरुस्ती–गेल्या अंकाचे पोंचींत 'रामचंद्र भगवंत, निफाड' असें आहे, त्याचेबद्दल 'रामचंद्र निळकंठ, निफाड' असें समजावें. तसेंच त्याच अंकांत विनायक चिंतामण जोगळेकर यांचे नांवावर १३॥ वर्गणी छापली आहे, तिची फोड रा. विनायक चिंतामण जोगळेकर व रामकृष्ण बळवंत जामडा कनाल या प्रत्येक नांवापुढें ६॥ रुपये याप्रमाणें समजावी.

नाट्यकथार्णव.

प्रस्तुतकालीं 'नाव्हल्स' व 'नाटकें' यांचे संबंधानें जो लोकांचा भ्रांतिमूलक समज झाला आहे त्याचा निरास होऊन, या अत्यंत अनुपम मनोरंजनसाधनाचें वास्तविक स्वरूप व त्याची वास्तविक योग्यता हीं त्यांचे मनांत पूर्णपणें ठसावींत, व तेणेंकरून सदभिरुचि जागृत होऊन काव्यामृतरसास्वादाविषयीं त्यांच्या अंतःकरणाची साहजिक प्रवृत्ति व्हावी, हा ह्या पुस्तकाचा मुख्य उद्देश असून, यांत संस्कृत व इंग्लिश या भाषांत रचलेल्या उत्तम उत्तम नाट्यकथादिक प्रबंधांच्या आधारें आपल्या महाराष्ट्र वाणीस जुळतील अशा प्रकारचीं अनेक 'नाव्हल्स' व 'नाटकें' यांचा संग्रह यथावकाश होणार आहे, व प्रसंगविशेषीं स्वकपोलकल्पित सदुपदेशपर कथानकें व नीतिवादाचे चुटके यांचाही समावेश होईल. या पुस्तकांत अश्लीलता नीतिभंगादि दोष न येऊं देतां हें पुस्तक सर्व सभ्य व कुलीन स्त्रियांस वाचण्याजोगें करण्यांत येईल. या पुस्तकाच्या वर्गणीचे दर खालीं लिहिल्याप्रमाणें ठेविले आहेत.–अगाऊ वर्षास ३ रु., मागाहून वर्षास रु. ४८८, व किरकोळ दर प्रतीस ८६. शिवाय टपाल हंशील वर्षाचें अगाऊ ८६.

अगाऊ वर्गणी पुस्तक घेतल्यापासून दोन महिन्यांच्या आंत भरली पाहिजे. पोस्टाचीं तिकिटें पाठविणें झाल्यास अर्ध्या आण्याचीं असावीं, व रुपयास अर्धा आणा याप्रमाणें वर्तवळा पाठवावा.

या पुस्तकांत नियमितपणें येणाऱ्या मजकुराशिवाय हरएक प्रकारच्या लोकोपयोगी जाहिराती निराळ्या छापून पुस्तकास जोडण्याचा विचार केला आहे. नियमित मजकुराचे ज्याप्रमाणें प्रत्येक पृष्ठावर दोन रकाने (कालम) करण्यांत येतात, त्याप्रमाणें जाहिरातीचे दोन रकाने करण्यांत येणार नाहींत. जाहिरातीचे दर पुढें लिहिल्याप्रमाणें माफक ठेवण्यांत आले आहेत:–

	रु.	आ.
चार ओळींचे आंत	१	०
पुढें प्रत्येक ओळीस	०	४

दुसरे खेपेस प्रत्येक ओळीस ८३ आणे व तिसरीपासून प्रत्येक ओळीस ० २

मुदतीच्या जाहिराती मक्त्यानें घेतल्या जातील.

भाषांतर करणें असल्यास पहिल्या खेपेस दर ओळीस ० ४

कांदेवाडी, मुंबई.

शंकर मोरो रानडे बी. ए.
नाट्यकथार्णवाचे कर्ते व मालक.

॥ श्री ॥

नाट्यकथार्णव.

—— ॥ ० ॥ ——

चगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधा [illegible] सारोधनम् ॥

मालविकाग्निमित्रे [illegible] दास

स्फुरत्कलालापविलासकोमला करोति [illegible] हृदि [illegible] ।
रसेन शय्यां स्वयमभ्युपागता कथा जनस्याभिनवा [illegible] ॥

कादंबरी बाण.

पुस्तक २ [illegible] पौष [illegible] १८ २ [illegible] १०

[illegible]

MONTHLY MAGAZINE

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

[illegible]

वर्गणीदारांस सूचना व विज्ञप्ति.

आजपर्यंत या पुस्तकाचे अंक बरेच मागसले आहेत; व ते सर्व काढून टाकण्याविषयी आम्ही सक्त प्रयत्न करीत आहों, हें आज जे तीन अंक एकदम वांटण्यांत येत आहेत, त्यांवरून स्पष्टच आहे. आलीकडे तीन महिन्यांत आम्हांकडून आमच्या वर्गणीदारांचें दर्शन घेवयलें नाहीं, याबद्दल आम्ही अत्यंत खिन्न आहों. तथापि या बाबतींत आमचा बिलकुल दोष नसून, आमचा ज्या कारखान्याशीं आजपर्यंत मुद्रणादिसंबंध होता, त्याचाच होय असें म्हणणें जरी साहसाचें वाटण्याजोगें आहे, तरी तें खरें असून निरूपायास्तव कबूल करणें जरूर आहे. इंद्रायोगाने अर्णवास भरती यावी हा सृष्टिशास्त्रांतील नियम असतां कांहीं दुर्ग्रहाच्या कचाटींत सांपडून अर्णवास ओहटी लागण्यास कारणीभूत होत होता; परंतु आमच्या सुदैवाने तो प्रसंग टळला आहे; व ही गोष्ट आजच्या आमच्या अर्णवाच्या स्वरूपावरून चतुर वाचकांस सहज समजण्याजोगी आहे. असो. इतःपर आमचे मागसल्ले सर्व अंक गोडबंगाल दिवसांत काढून टाकण्याच्या उद्योगांत आम्ही आहों; व वर्गणीदारांची संख्या वाढल्यामुळे कांहीं अंकांची पुनरावृत्ति काढण्याचा व पृष्ठांची संख्या अधिक छापण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहों, यायोगाने आमचा एकंदर आकार वाढणार आहे. यासाठी यावेळी आमचे प्रिय वर्गणीदार आपआपली वर्गणी वेळीं आंतील पत्रांत पाठवून देण्याची मेहेरबानी करितील अशी आशा आहे.

नाट्यकलार्णवकर्ते.

वर्गणीचा पोंच.

	रु	आ.	
श्री रामसे [illegible]			
[illegible]	२	०	०
[illegible]			
[illegible]	६	१२	०
,, [illegible]	१	१२	०
[illegible]			
[illegible]			
[illegible]	३	०	
[illegible]	६	०	०
[illegible]			
[illegible]			
[illegible]	४		
[illegible]	६	१२	

	रु	आ.	
,, पांडुरंग बल्लाळ ..	६	०	०
,, विनायक भाऊराव तांबपाद	१		
,, रामचंद्र परशराम गा[illegible]	२	२	
,, रामजी शिवराम चव्हाण	४	०	
,, भिकाजीपंत गो[illegible]	३	०	
,, बळवंत वासुदेव फाटक	३	०	०
,, पंढरीनाथ नारायण अण्णा			
[illegible]	१०	२	०
महा[illegible]चमणाजी बाप	३		०
,, शिवराम [illegible] साठारकर	३		
,, [illegible]ण [illegible]डाजी गाडे	२		०

[illegible]

मोहविलसित नाटक.

पात्रें.

चंद्रकांत .... सिंहलद्वीपचा राजा.

नंदन .... त्याचा पुत्र.

सत्यव्रत
संतावक
हारीतक
विद्यासागर } .... सिंहलद्वीपचे सरदार.

सुधन्वा .... मद्रदेशचा राजा.

कमलाक्ष .... त्याचा पुत्र.

धनपाल .... मद्रदेशचा सरदार.

कुटिल .... एक तस्कर.

गोपाल .... एक गौळी.

वेड्या .... त्याचा मुलगा.

इन्दुमती .... चंद्रकांताची राणी.

मुक्तावली.... .... चंद्रकांताची कन्या.

यशोदा

गंगा

झालसा

नर्मदा

(सरदार, गृहस्थ, द्वारपाल, रक्षक, गौळी, वगैरे.)

मोहविलसित नाटक.

अंक १.

प्रवेश १. स्थळ—सिंहलद्वीप—राजवाड्यांतील एक खोली.

(सत्यव्रत आणि धनपाळ येतात.)

धन०—खरेंच, **सत्यव्रत**! तुम्हीं जर आमच्या **मद्र** देशात याल, तर मी सांगतों हें खरें कीं नाहीं तें तुम्हांसच कळेल. आमचे महाराज तुमच्या महाराजांच्या भेटीस आले, तसे तुमचे महाराज आमच्या महाराजांच्या भेटीस येतील, तरच हा प्रसंग घडून येणार. नाहीं तर तुम्हीं येथें आणि आम्ही तेथें!

सत्य०—**धनपाल**! त्याचीहो तुम्हीं आतां कशाकरितां फिकीर करितां? येत्या वर्षीं आपल्या महाराजांच्या भेटीस यावें असा **चंद्रकांत** महाराजांचा बेत दिसतो. आम्हीं अर्थात् स्वारीबरोबर असूंच.

धन०—तेव्हां मात्र तुम्हांला कळून येईल कीं मी म्हणतों तें खरें कीं नाहीं. खरेंच, तुमचा आदरसत्कार कांहीं अपूर्वच! काय व्यवस्था आणि काय बेत! आमच्या हातून तुमची इतकी व्यवस्था राहील कीं नाहीं याचा संशयच! पण प्रेमानें दिलेले **सुदामा**चे पोहे जसे **कृष्णा**नें मोठ्या आवडीनें खाल्ले, तसे तुम्हींही आमची भाजीभाकर गोड करून घ्यालच. खरेंच पुसाल तर—

सत्य०—अं:, त्यांत कांहीं नाहीं. पाहुण्यांचा आदरसत्कार करावा हा सर्वांचा धर्मच आहे.

धन०—धर्म तर खराच. पण करण्या करण्यांत फेर आहेना? येथें आमचा जो कांहीं तुम्हीं मान ठेवला तो कांहीं सांगतां पुरवत नाहीं. तोंड देखल्या बोलतों, असें नव्हे हो.—खरेंच! तुम्हीं आमच्या घरीं याल, तेव्हां कांहीं आम्हांस निराळीच योजना करून ठेवावी लागेल. ज्ञानवल्लीचा पेला देऊं एकेकास पाजून, म्हणजे चांगलें म्हटलें नाहीं तरी हरकत नाहीं; पण नांवें तर ठेवायला तुम्हांला सांपडणार नाहीं!

सत्य०—अहो **धनपाल**! आम्हीं केलें हें कांहीं फार नाहीं. पण थोरांची रीतच आहे कीं अल्पांत संतोष मानून घेऊन करणाराची स्तुति करावी.

धन०—तुम्हांला खोटें वाटेल पण मी खरेंच सांगतों. आंत एक आणि बाहेर एक अशा प्रकार नाहीं.

सत्य०—अहो, पण हें पहा! **चंद्रकांत** महाराजांनीं तुमच्या महाराजांचा जो आदरसत्कार केला, तो यथायोग्यच केला. त्यांचा स्नेह आजचा का आहे! बालपणीं त्यांनीं एकत्र क्रीडा केली; एकत्रच ते वाढले; तेव्हां कधीं काळीं आतां गांठ पडली तर एकमेकांनीं एकमेकांचा उत्तम प्रकारें मान ठेवावा, यांत नवल नाहीं. यांचें परस्परांवर प्रेम फार आहे, तें इतकें कीं राज्यकार्यभारामुळें त्यांच्या परस्परांच्या प्रत्यक्ष जरी गांठी पडत नाहींत, तरी प्रतीहारमुखानें वारंवार घडतात. त्यावेळीं नजराणे, प्रीति-

लेख, वगैरे एकमेकांचे एकमेकांस जातात. एतावता ते लांब असूनही जवळच आहेत. एवढा महान् सागर आड आहेना, तो यामुळें यांच्या मानसिक गांठी पडण्याला कांहीं प्रतिबंध येत नाहीं. ईश्वर करो आणि यांचें प्रेम असेंच कायम राहो !

धन०—मला तर नाहीं वाटत कीं त्यांच्या प्रेमांत अंतर पडेल म्हणून. तुमचे महाराज चांगले आहेतच, आणि तुमच्या भाग्योदयानें यांचा पुत्र **नंदन** हाही चांगला निघेल असें वाटतें. **चंद्रकांत** महाराजांच्या पाठीमागें तो तुम्हांला यांचा विसर पाडील. असा सुलक्षण पुत्र मद्दया तर नाहीं बोवा पाहण्यांत आला.

सत्य०—तुम्हीं म्हणतां तसाच तो राजपुत्र आहे. याकडे पाहून सर्व प्रजाजनांस समाधान वाटतें आणि आल्हाद होतो. अगदीं जखवड झालेलेही म्हणतात कीं हा मोठा झालेला आम्हीं केव्हां पाहूं !

धन०—राजपुत्र मोठा झालेला पाहिला म्हणजे त्यांना मृत्यु प्रिय वाटेल, नाहीं बरें ?

सत्य०—होय. हेतु पुरल्यावर मग त्यांना वांचून काय करायचें आहे ?

धन०—काय करायचें आहे ? वाः ! मग त्याचा पुत्र पहावा असें वाटेल ! अहो **सत्यव्रत** ! एक इच्छा परिपूर्ण झाली कीं दुसरी उद्भवतेच. (जातात.)

प्रवेश २:—**स्थळ तेंच. राजवाड्यांतील दिवाणखाना.**

(चंद्रकांत, सुधन्वा, इंदुमती, नंदन, सत्यव्रत, व परिवार येतात).

सुधन्वा—नाहीं, आतां पहा, राहण्याची सवड नाहीं. गेलेंच पाहिजे. कारण,

श्लोक.

झालें सोडुनियां मला दिन किती नी राजधानी मम !
ओढावा गुरु राज्यधूं[1] मजविणें तेथें न कोणी क्षम;
केला आदर आमुचा बहुपरीं झालों कृती तत्परता;
ऐसा लोभ असो निरंतर मनीं यावी अनुज्ञा अतां.

चंद्र०—नाहीं, इतक्यांत कांहीं आम्हीं जाऊं देणार नाहीं.

सुध०—नाहीं नाहीं. मला उद्यां गेलेंच पाहिजे, कारण,

आर्या.

नसतां आम्हीं, राज्यावरि येइल विघ्न कोणतें न कळे.
पश्चात्तापें जैसें, तैसें इतरें न चित्त होरपळे.

तशांत, आम्हीं आपल्या येथें थोडे दिवस राहिलों असें नाहीं. आपणाला त्रास किती द्यावा ?

चंद्र०—असा त्रास होतो आहे कोणाला ? आम्हांला तो पुरवला, मग तर झालेंना !

सुध०—नाहीं. गेलेंच पाहिजे.

चंद्र०—भलतेंच. एक आठवडा तरी राहिलेंच पाहिजे.

सुध०—नाहीं. उद्यां आम्ही जाणारच.

चंद्र०—बरें, आठवडा नाहीं, तर नाहीं. चार दिवस तरी रहा.

सुध०—काय करावें आतां ? नका नका बोवा ! आग्रह करूं. तुमचें आणि मीं ऐकणार नाहीं ! पहा.

श्लोक.

मोडीन शब्द तुमचा न कधीं घडेल;
राहीन, कारण तसेंच जरी असेल.
नाहीं तसें, म्हणुनियां मज राहवेना;
कार्यें मदीय सहती न विलंबनांना[2].

तर मग मला द्याच निरोप.

चंद्र०—(इंदुमतीस उद्देशून) पाहिलें का, जातों

---

१. राज्याचें जोखड. २. विलंबनांस. विलंबनें=विलंब, उशीर.

ह्मणतात? आह्मीं तर बोवा हात टेंकले. सुध०—नाहीं हो, वहिनी! तुमच्याकडून कांहीं होईल तर बघा आतां. इंदु०—मी नाहीं ऐकायची. राहिलेंच पाहिजे. इंदु०—छे! इतक्यांतच काय मला सांगायचें सुध०—खचित जाणारच! तें! त्यांजकडून आधीं शपथ घेवप्रायची इंदु०—खचित! खचित ह्मटल्यानें मी ऐकेन होती कीं मी जाणारच, आणि मग मला वाटतें? भाऊजी! तुह्मीं आणा शपथा. सांगायचें होतें कीं राहतील तर बघ. जरी वाहिल्या, तरी मी कांहीं जाऊं द्या. कसला मेला हा आग्रहाचा कोरडा प्रकार! यची नाहीं. तुह्मीं ह्मणतां खचित जाणा. साफ सांगावें कीं जायचें नाहीं ह्मणून. रच. पण मी ह्मणतें, खचित जायचें नाहीं. ह्मणावें कीं **मद्र** देशांत सर्व यथास्थित आहे. पुरुषाच्या 'खचितांत' जितका अर्थ, तित. कालच नव्हता का आला तिकडून दूत! काच बायकांच्या "खचितांत" आहे, हें इतकें सांगावें ह्मणजे त्यांचें बोलणेंच खुंटलें. लक्षांत ठेवा. भाऊजी! मग जाणार का? चंद्र०—शाबास! कां महाराज! ऐकलेंना! सांगा काय तें, जाणारच असाल, तर इंदु०—मला समजलें तें कां इतकी ओढ घेतात सांगतें द्वारपालला, कीं घरांतून कोणाला तें. आपणाला नाहीं का दिसत काय म. बाहेर जाऊं द्यायचें नाहीं! मग कसें नांतलें कारण असेल तें? येथें आले आ- काय? खुषीनें राहणार कीं सक्तीनें राहणार? हेत एकटे. बाई तेथेंच राहिल्या आहेत. राहणार हें खचितच! **कमलाक्ष**ही तेथेंच आहे. तेव्हां त्यांची सुध०—रहायला लावण रच, तर मग खु. भेट केव्हां घेईन असें झालें आहे. वर करणीं मात्र ह्मणायचें, कीं राज्यकारभार षीनें कां न रहावें? सक्तीनें राहून तुम. करण्याला तेथें कोणी नाहीं ह्मणून. त्यांना चें मनच दुखवायचें कीं नाहीं? तें तरी ह्मणावें "मनातलें खरें कारण सांगा, आणखी मग कशाला पाहिजे? जा, आमच्याकडून ना नाहीं. पण मना- इंदु०—कां मी नव्हतें सांगितलें कीं, तुह्मांला तलें कारण सांगितलें पाहिजे." आणि मग राहिलेंच पाहिजे ह्मणून? आतां राहिलां, ते होऊन जरी ह्मणतील कीं आह्मीं रा- तेव्हां बरें नाहीं का झालें? हतों, तरी आह्मीं त्यांस सांगूं कीं आतां नका सुध०—होय, यांत काय संशय? दादाची. राहूं. पण तें असो.—भाऊजी! रहाना ही आतां मर्जी जाणार नाहीं. दादाचा कां एक आठवडा अधिक! एका आठव- लोभ मजवर किती ह्मणून सांगूं? दा. ड्यानें कांहीं वर्ष होत नाहीं. हें बघा! दाची गांठ पडली ह्मणजे मला बाळपणची इकडलें जेव्हां तिकडे येणें होईल, तेव्हां तुह्मीं आठवण होते. त्यावेळीं आह्मीं कीं नाहीं महिनाभर अधिक ठेवून द्या, मज

श्लोक.

क्रीडासक्त सदा असूं; अवगता चिंता नसे मानसीं;
अज्ञातापकृति[1], प्रमोदसरसीं[2] पोहूं जणो मानसीं[3];

कडून कांहीं ना नाहीं. मग तर झालेंना! मला जरी घरीं करमलें नाहीं, तरी त्याबद्दल तुह्मांला दोष नाहीं लावणार. राहतांना तरमग!

१. अज्ञात आहे अपकृति ह्म० अपकार ज्यांना, असे आह्मीं. २. हर्षरूप सरोवरांत. हें 'मानसीं' यांचें विशेषण. ३. मानस (सरोवर).

निर्व्याज प्रणयें सदैव भरलें संशुद्ध अभ्यंतर;
गेले ते अनिमित्तहासरुदनप्राय क्षपावासर !
निरुपम सुख घेऊं बाललीला करूनी;
असुख किमपि नेणूं प्रेम चित्तीं धरूनी;
परिचित नव्हत्या त्या राज्यचिंता मनासी;
निरवधि वय वाटे तें अह्मां बालकांसी.

चंद्र०—कसें काय ? यांचें मन वळतें कीं नाहीं ?

इंदु०—होय. न वळून काय करतें ?

चंद्र०—(एकीकडे) इच्या ह्मणण्यानें राहिला, आणि माझ्या ह्मणण्यानें रहात नव्हता, अं ! (मोठ्यानें) खरेंच प्रिये! आजचें तुझें भाषण फारच मनोहर असावें.

इंदु०—आजचेंच? ह्मणजे पूर्वीं कधीं नव्हतें, वाटतें!

चंद्र०—नाहीं, चुकलों. एकदा पूर्वीं असें भाषण मनोहर होतें खरें !

इंदु०—तें केव्हां ? खरेंच, बायकांचीं मनें कीं नाहीं अगदीं भोळसर असतात. मला समजत नाहीं वाटतें कीं हें आपलें उगींच चढविणें आहे ? असो. पण "एकदा पूर्वीं" असें ह्मटलें, तो प्रसंग कोणता ?

चंद्र०—काय ? नहीं स्मरत ?

श्लोक.

सभास्थानीं आले बहुत नृप आशा धरुनियां
हरूं कीं तन्वीचें मन विविध चेष्टा करुनियां,
"वरींना मी अन्यां. वरिन" ह्मणसी "सिंहलपति"[3]
कसे ते पीयूषापरि विसरसी शब्द सुदति !

इंदु०—आठवतो तो प्रसंग. वाहवा! एकूण तो आणि हा सारखाच! बरें, तसें कां होईना ?

चंद्र०—(एकीकडे) हें कांहीं ठीक दिसत नाहीं. अतिस्नेह झाला ह्मणजे पापाची शंका मनांत येते ! हायहाय !

श्लोक.

हृदय उडतें, येते ग्लानी, मना भ्रम मोहवी,
करुनि विकलें गात्रें सारीं तनू ज्वर शोषवी;
नयन निववी जी ही पूर्वीं प्रिया मृगलोचना,
मम सलत ती नेत्रांमाजी अजी कुलटांगना !

अरे ! मी असें ह्मणतों खरा, पण इतक्यानेंच काय झाले ! यांत पापबुद्धि आहेच असें कशावरून? मनोहर भाषण हें आदरसत्काराचें एक चिन्ह नव्हे काय?-हं-घरच्यांनीं पाहुण्यांशीं मधुर भाषण करावें हें नीटच आहे. तेव्हां यांत कांहीं काळें बेरें नाहीं.—पण नव्हे. आदरसत्काराची कांहीं मर्यादा आहे कीं नाहीं? आपलें एकमेकाजवळ जावें, नेत्रकटाक्ष प्रेरावे, हंसावें, सांकेतिक खुणा कराव्या, हा का आदरसत्कार ? हें आपल्याला तर नाहींच पाहवत!—(मोठ्यानें) बाळा **नंदना** !—तूं कोणाचा रे?

नंदन—बाबा ! मी तुमचा.

चंद्र०—(एकीकडे) माझाच? हो, खरा हा माझाच आहे.—(मोठ्यानें) बाळा ! हें तुझ्या नाकाला रे काय लागलें आहे ?—(एकीकडे) माझ्यासारखेंच याचें नाक आहे, असें ह्मणतात.—बरें, चिंता नाहीं.—(मोठ्यानें) चल बाळा ! आपण खेळूं.—तूं काय खेळत होतास ? (एकीकडे) पण ही किती खेळ खेळली असेल बरें ? परमेश्वरा ! धिक् माझें जिणें !—(मोठ्यानें) **नंदना** !

नंदन—बाबा !

चंद्र०—(एकीकडे) हा माझाच का **नंदन** ? याचा तोंडवळा माझ्यासारखाच आहे, थेट माझीच प्रतिमा, असें बायका ह्मणतात.—पण बायका पाहिजे तें ह्मणतील ! त्यांच्यावर भरंवसा कोणीं ठेवावा ?—नाहीं, पण हा **नंदन** माझ्यासारखाच आहे, यांत कांहीं

१. कारणाशिवाय जें हंसणें आणि रडणें, त्याहीच भरलेले. २. क्षपा—रात्र, वासर—दिवस. ३ सिंहल देशचा राजा चंद्रकांत.

संशय नाहीं.—(मोठ्यानें) बाळा ! इकडे ये बघूं ! गुलामा ! पळूं नको ! मी कांहीं मारीत नाहीं! बाऊ का आहे मजजवळ ?—(एकीकडे) अरे अरे ! पण याची आई तशी असेल का ?—असेलही—अरे ही प्रीति

श्लोक.

अनावर असे; नसे स्थिर कधींहि एक क्षण;
प्रभाव न कळ इचा. अनृतसें इचें लक्षण.
कधीं न घडती जगीं, घडनिने असे संगम;
विवेक करितो इला प्रतिहतो[1] मुधा[2] हा भ्रम.

सुध०—आज दादाचें मन स्वस्थ दिसत नाहीं.

इंदु०—कोण जाणे बाई काय कारण झालें असेल तें!

सुध०—दादा ! असे उद्विग्न कां दिसतां ? आहां कोठें ?

इंदु०—झालें तरी काय बाई! असें उद्विग्न व्हायला ? सांगणें होईलका पण ?

चंद्र०—छे! कांहीं झालें नाहीं. मी आहें तसाच आहें. काय चमत्कार आहे? बाललीला पाहून थोरांचें सुद्धां चित्त द्रवतें. **नंदना**ला जवळ घेऊन, त्याच्या मुखकमलाकडे पाहूं लागलों, तों याच्या वयाचाच मी होतों तेव्हांची आठवण झाली. त्यावेळीं मीही याचप्रमाणें

श्लोक.

चिमुकुलाच किरीट शिरीं धरीं !
चिमुकुलें धनु ओढितसें करीं !
नृपकुलीं मृगया लटिकी करीं !
सपदि तातविलोचन मोहरी !

बाळा **नंदना** ! कोणीं तुझ्या हातांतून हें कंकण हिसकून घेतलें, तर तूं उगींच बसशील कारे?

नंदन—हो बसतों आहे ! ही नाहीं का माझी धनुकली आणि हा बाण ?

१. परानुत. हें 'इला' याचें विशेषण. २. व्यर्थ.

चंद्र०—हं हं—तूं युद्ध करशील एकूण? शाबास शाबास! खरा क्षत्रिय आहेस.—का भाऊ! तुमचा **कमलाक्ष** एवढाच असेल, नाहीं वरें ? तुम्हीं मजप्रमाणें खेळतां यांशीं ?

सुध०—हें काय विचारावें? माझा **कमलाक्ष** तर

श्लोक.

आनंदबंधु हृदया. मम तो विसांवा,
क्रीडा करी मजसवें. दुर[1] त्या न ठावा.
माझा सखा क्षणिक शत्रुहि होतसे तो,
कोपा दुरी करुनियां मज तोषवीतो.

चंद्र०—हेही बोवा आम्हांला असाच तोष[2] देतात. मी याला घेऊन येथें बसतों. भाऊ! तुमची मर्जी असेल तर उद्यानाची शोभा पहावी. प्रिये ! तूंही यांच्या बरोबर ऐस. याचें कांहीं कमी पडूं देऊं नको वरें. हे माझे बंधु आहेत लक्षांत ठेव.

इंदु०—येथें यायचें नसेल, तर नये येऊं. पण बाळाला मी जातें घेऊन. बागेंत हिंडायची त्याला मोठी हौस आहे.

चंद्र०—नाहीं. राहूं दे त्याला येथेंच.

इंदु०—बागेंत येणें होणार ना ? बसूं का आम्हीं वाट पहात ?

चंद्र०—वाट नको पहायला. वाटलें तर येईन. (एकीकडे) तुम्हांला कोठें ठाऊक आहे कीं हें मीं जाळें पसरलें आहे !—(मोठ्यानें) जा तुम्हीं. (सुधन्वा आणि इंदुमती जाऊं लागतात त्यांकडे पाहून एकीकडे) पहा! ती कशी हंसते आहे ! कशी गुलगुल गोष्टी सांगते आहे ! जशी याची धर्मपत्नीच !. हा चांडाळांनो ! (सुधन्वा आणि इंदुमती जातात.) हाय ! हाय ! माझी फटफजिती झाली ! माझी राणी परपुरुषासक्त झाली !—(मोठ्यानें) बाळा ! जा खेळ. तूं खेळ.

१. भीति. २. नंदन. ३. संतोष.

मी खेळतों. तुझो आईहो—हँ— खेळ खेळते ! अरेरे ! माझ्या विमल कुळाला इनें कलंक लाविला!—अरे जा तूं खेळ.—आजपर्यंत कितीक बरें भोळसर पुरुषांना आपल्या स्त्रिया निरर्थक पतिव्रता वाटल्या असतील !—पूर्वीची गोष्ट कशाला ?—असें वाटणारे पुरुष आतां नसतील का ? नाहींत का ? त्यांना वाटतें आपली पत्नी मोठी साध्वी आहे म्हणून !—पण—भोळे बिचारे ! त्यांना कोठें ठाऊक आहे कीं त्यांची पत्नी जवळच्याच एकाद्या तरुण पुरुषावर आसक्त असेलशी? दहांत एकादी तरी चांगली सांपडेल काय ? हाय ! हाय ! स्त्रियांचा खोटेपणा किती म्हणून वर्णावा ?

श्लोक.

गोड शब्द वदनें वदतील,
प्रेमपूर्ण नयनें हंसतील,
चिंतितील हृदयीं भलत्यातें,
स्त्रीचरित्र न कळे कवणातें !

असें आहे तरी त्यांना भुलून नर फसतात, सुधा म्हणून पितात !—आणि या रोगावर औषध म्हणून मुळींच नाहीं ! हा प्रकार अमुक ठिकाणीं नाहीं, असें कांहीं म्हणतां येणार नाहीं ! या रोगाचा प्रवेश पाहिजे तेथें होतो ! आडकाठी कोठेंही नाहीं ! इतकें असून चमत्कार हा, कीं ज्यांना याची पीडा होते, या बहुतेकांस ती होते हेंच समजत नाहीं!—कसें काय बाळा ?

नंद०—बाबा ! मी तुमच्या सारखा आहे. नाहीं बरें ?

चंद्र०—होय.—यांतच कांहीं समाधान आहे.—कोण आहेरे तिकडे ? **सत्यव्रत** ! तुलीं का आहां ?

सत्य०—होय महाराज !

चंद्र०—बाळा ! तूं जा यांच्याबरोबर खेळायला. कसा शहाणा आहेस, पाहूं. (नंदन परिवारासह जातो.) ऐकिलें कां **सत्यव्रत** ! हे बोवा आणखीं राहणार !

सत्य०—त्यांना राहून घेण्याला महाराजांना कोण प्रयास पडले ! फिरफिरून ते ओढच घेत !

चंद्र०—हें पाहिलेंतना तुलीं ?

सत्य०—महाराजांच्या म्हणण्याला कांहीं हो म्हणतचना. जसजसा आपला आग्रह अधिक होऊं लागला, तसतसें त्याचें काम निकडीचें होत गेलें.

चंद्र०—एकूण तुमच्या लक्षांत हें आलें अं ?—(उसासा टाकून एकीकडे) झालें ! एवढांच सुरू झालें ! इतक्यांतच कुणकुण होऊं लागली ! लागले म्हणायला **चंद्रकांत** महाराज असे आहेत म्हणून ! माझ्या कानावर गोष्ट येईपर्यंत ती कितीकांच्या कानीं जाईल !—(मोठ्यानें) बरें **सत्यव्रत** ! असें होतें, तर मग हेहो कसे राहिले ?

सत्य०—राहिले म्हणजे काय, आईसाहेबांच्या आग्रेहास्तव.

चंद्र०—अस्सें अस्सें !—बरें, झालें तें चांगलें झालें.—पण नाहीं !—बरें, हें तुमच्याच लक्षांत आलें, कीं दुसऱ्यांच्याही लक्षांत आलें ? तुमची तैलबुद्धि आहे. तुम्हांस चटदिशीं समजतें. इतरांच्या लक्षांत नसेल आलें ही गोष्ट ?

सत्य०—कां बरें ? **सुधन्वा** महाराज आणखीं कांहीं दिवस राहणार, म्हणून बहुतेकांनीं ताडिलें आहे.

चंद्र०—हं ?

सत्य०—होय. ते येथें रहाणार.

चंद्र०—पण कां रहाणार याविषयीं सरदार काय ह्मणतात?

सत्य०—महाराजांचें आणि राणीसाहेबांचें मन मोडूं नये ह्मणून! इतकेंच!

चंद्र०—राणीचें मन मोडूं नये, ह्मणून अं! इतके पुरें आहे.—सत्यव्रत!

श्लोक.

विश्वासस्थान केलें विविध हितगुजां सांगुनियां तुह्मातें,
नाहीं अतस्थ कांहीं मजजवळि असे तुमचें हेंच नातें!
मत्कार्यार्थैकसाधो[1] मजसि बहुपरी योग्य तो बोध केला.
वाटे आतां मनातें कुटिलमति तुह्मीं; व्यर्थ विश्वास ठेला.

सत्य०—नाहीं महाराज! असें कसें होईल?

चंद्र०—कसें ह्मणजे काय? मी ह्मणतों हें निःसंशय खरें आहे. तुह्मीं खोटे आहांत, कारण

श्लोक.

साच जरि हो खरें, वदतसां न कां सत्य तें?
तुह्मांस भय कायसया? परिजनास तें शोभतें!

अथवा

प्रमाद घडला जरी, भरवसा मळा आपुला.

किंवा

दिसानि जरि झांकितां नयन, काय भांबावलां?

सत्य०—महाराज! या दासाच्या हातून प्रमाद घडले असतील, मूर्खपणाही झाला असेल, व प्रसंगीं भेंकडपणाही दिसला असेल. व असा प्रकार प्रत्येकाच्या हातून घडतो. या संसारांत अनेक प्रसंग येतात, त्यांत एक-ना एक दोष मनुष्याचा दिसून येणारच आहे. तरी प्रभूंनीं तो पोटांत घातला पाहिजे. कारण

श्लोक.

कार्योंतरीं जरि असे घडला प्रमाद,
मी मूढ सत्य. मजला बहु हो विषाद.
मूढें अजाणुनि जरी अवमान केला,
कीजे क्षमा. प्रभुकृपेंविण हा मुकेला.

आणखीं असें पहा कीं,

श्लोक.

जें वाटलें मजसि साहस, तें कराया
झालों पराङ्मुख; न दूषण ये जनाया;
भीतिप्रमोहवश हो नर जाणताही,
शंका मनीं उपजली न कळे कशी ही?

तेव्हां महाराजांनीं माझ्या खरेपणाविषयीं संशय घेऊं नये. दुसरी प्रभूपाशीं इतकी प्रार्थना आहे, कीं असें संदिग्ध भाषण करूं नये. माझा अपराध कोणता, हें या दासास स्पष्टपणें सांगावें. ह्मणजे घडला असेल तर कबूल करीन, नसेल तर तसें सांगेन.

चंद्र०—अहो सत्यव्रत! मी संदिग्ध बोलत नाहीं. तुह्मांला टाऊक असलेंच पाहिजे, कारण

श्लोक.

तुह्मां न जरि हें दिसे, नयन अंधता पावले!
तुह्मां श्रुत न हें जरी, बधिर कर्ण ते जाहले!
तुह्मां न कळलें, तरी कळतसे वदा काय तें?
अहा! परवशा प्रिया कुटिलता कशी सोविते!

यावरून तुमची तर खातरी होऊन चुकली असेल, आणि मला जर

श्लोक.

सांगाल सत्य, तरि संशय काय राहे?
राजी विलोळे[2] परपूरुषसक्त आहे!
बाळा तुह्मांस बहु जीं दिसलीं प्रमाणें,
नाहीं तरी नयनपंगु तुह्मांस जाणें.

सत्य०—महाराज! राणीसाहेब आमच्या मातुःश्री-त्यांविषयीं इतर कोणीं असें ह्मटलें असतें तर मी असा स्वस्थ बसतोना! भलतेंच! आपण कांहीं तरी मनांत आणितां? दासाला क्षमा असावी! पण असले विपरीत

१. माझा कार्यार्थ—त्यानेंच एकटे साधणारे असे अहो तुह्मी!

१. चंचल. २. अधू डोळ्याचे.

शब्द कधींही महाराजांनीं मुखांतून काढूं नयेत, व[1] आम्हींही ऐकूं नयेत. असले शब्द कोणी परिजन उच्चारील, तर त्याची जीभ झडो!

चंद्र०—काय **सत्यव्रत**! कानाशीं कान लावणें, गालाशीं गाल लावणें, हळूच बोलणें, एकीकडे वघून हंसणें, मध्येंच सुस्कारा टाकणें, एकांतस्थानाची अपेक्षा करणें, युगसम घटिका वाटणें, मध्यरात्र केव्हा होईल ह्मणून उत्सुक होणें, इतरांच्या दृष्टी-आड नीच कर्म करूं पाहणें, हें कांहीं नाहीं काय?—हें कांहीं नसेल तर सारें जग मिथ्या आहे! आणि हा सर्व भास आहे!

श्लोक.

नसे ही धरित्री, नसे ईत कांहीं,
जगा व्यापितें तेंहि आकाश नाहीं;
नसे तो सुधन्वा, न मी चंद्रकांत,
नसे भोज माझी. असो हा कथान्त!

सत्य०—महाराज ही खचितच कुकल्पना आहे, ही आपण लवकर काढून टाका कशी. नाहीं तर इजपासून फार अनर्थ घडतील!

चंद्र०—(हट्टानें) कल्पना खोटी नव्हे, खरी आहे.

सत्य०—छेः असें कधींही होणार नाहीं.

चंद्र०—नाहीं ह्मणजे? मी ह्मणतों खरी आहे आणि तुह्मी ह्मणतां नाहीं ह्मणून? **सत्यव्रत**! तुह्मी खोटें बोलतां! यामुळें तुमचा मला तिटकारा येतो! माझी आतां खातरी झाली तुह्मी अगदीं मंदधी निष्काळजी आहां—नाहीं—तुह्माला सर्व ठाऊक आहे, पण उगीच माहीत नाहींसें दाखवितां! अहो **सत्यव्रत**! सत्य स्मरून वागा! कानांवर हात ठेवतां याला काय ह्मणावें? हें वघा, देवाच्या घरीं क्षमा नसती, तर तिचा केव्हांच अंत झाला असता!

सत्य०—महाराज! आईसाहेब परपुरुषासक्त ह्मणतां, तो परपुरुष कोण?

चंद्र०—कोण ह्मणजे नाहीं ठाऊक? अहो, तो **मद्राधिप सुधन्वा**, ज्याच्या गळ्यांत जाणों ती ताईत बनून राहिली आहे! त्याला—(थांबून) पण माझा परिजन मजशीं इमानी असेल, आपल्या स्वतःच्या हिताकडे जशी त्याची दृष्टि असते, तशी माझ्या कीर्तीकडे असेल,—तर तो असें काम करील, कीं पुढें मग तिकडे पहायालाच नको.—परिजनचसा काय? तुमच्या हातून नाहीं का हें काम घडणार? सुरापात्रांत थोडी पूड टाकिली, कीं मग पुनः शत्रूचें नांव काढायला नको. तुमचा मला भरंवसा आहे. **सत्यव्रत**! या गोष्टीमुळें माझ्या तळपायाची आग मस्तकापर्यंत गेली आहे, तेव्हां माझें काम ऐकालच. असला पेला मला मिळेल, तर ती मला संजीवनी सुधाच वाटेल.

सत्य०—महाराज! आपण हें काय मनांत आणिलें आहे? मला विष देतां येणार नाहीं, अशी गोष्ट नव्हे. आणि मीं विष दिलेंच, तर असलें जलाल विष देणार नाहीं. असें देईन कीं त्याचा परिणाम लवकर जरी दिसून येणार नाहीं, तरी आज नाहीं उद्यां कार्यभाग करायला कधींही चुकणार नाहीं. पण आमच्या राणी साहेबांच्या हातून असें कुकर्म घडलें असेल, अशी कल्पना सुद्धां मला करवत नाहीं.—काय त्यांची योग्यता! काय त्यांची थोरवी!—महाराज! आपल्या चरणांशीं लीन हा दास आजकालचा नाहीं.

१. बायको.

माझें सर्व वय आपल्याच सेवेंत गेलें, तेव्हां माझ्या—

चंद्र०—**सत्यव्रत**! मीं जी गोष्ट तुह्मांला सांगितली, ती खोटी आहे असें पुनः तर ह्मणा!

श्लोक.

वाटे काय तुह्मां असे मति जडा माझी तशी चंचला ?
कीं दूषीन वृथा कुतर्क करुनी अत्यंत्य धौतां[1] कुला ?
कीं निष्कारण शोकशंकुशकला[2] रोपीन मी मानसीं ?
कीं निद्रा सुखकारिणी मज नको ? वाटे मला कालसी[3]!

सत्य०—तुह्मांला वाटतें काय, कीं जो **नंदन** मला मनापासून आवडतो, त्याच्या जननीविषयीं मी—आणि—निराधार कुकल्पना काढीन ? असें संभवतें तरी ? मी इतकाका अधम आहे ?

सत्य०—महाराज ! इतकें आपण निक्षून सांगतां, तेव्हां मला खरें ह्मटलें पाहिजे. आणि त्या कृत्याबद्दल **सुधन्वा** महाराजांस मी दूर करीन. पण माझी एक अट आहे, ती जर महाराजांस कबूल असेल, तर !—**सुधन्वा**च्या वधानंतर राज्ञीचा महाराजांनीं त्याग करूं नये. याचें कारण—एक तर, हा केवळ संशय आहे. दुसरें, **नंदना**विषयीं उगीच भलभलते कोणी कांहीं ह्मणूं नये ह्मणून! नाहीं तर आपल्या आणि इतर राजांच्या दरबारांत व्यर्थ याविषयीं चर्चा होईल.

चंद्र०—माझ्या मनांतील गोष्ट तुह्मीं बोललां ! यापुढें तिला मी मुळींच दूषण ठेवणार नाहीं. ही सर्व गोष्ट विसरेन.

सत्य०—महाराजांनीं आतां स्वस्थ असावें. एव्हां.

१. धुतलेलें. अर्थात् शुद्ध, पवित्र. २. शोकरूप खिळ्याचा तुकडा. ३. रोंवीन. ३. काळासारखी.

पर्यंत जशी प्रसन्न मुद्रा होती, तशीच पुनः धारण करावी. **सुधन्वा** महाराजांस किंवा बाईसाहेबांस याविषयीं संशय घेण्याला कारण ठेवूं नये. मग त्यांचा वध मजकडे लागला. विषानें जर त्यांचा अंत होणार नाहीं, तर माझें नांव बदलून ठेवा, आणि पुनः मला आपल्या पायांजवळ येऊं देऊं नका.

चंद्र०—ह्मालें तर मग! एवढें काम करा, ह्मणजे तुह्मीं माझे दुसरे पंचप्राण व्हाल. नाहीं तर पहा, आपल्या प्राणांस मुकाल!

सत्य०—याविषयीं महाराजांनीं आतां बेफिकीर रहावें.

चंद्र०—तुह्मीं मला सांगितल्याप्रमाणें, आपल्या वर्तनांत अंतर पडलेंसें मी दिसूं देणार नाहीं. (जातो.)

सत्य०—हा राज्ञि ! हा मंदभागिनि ! तुझ्याविषयीं असा खोटा संशय राजाच्या मनांत यावा काय?—माझी पण कोण विकट स्थिति ही !

श्लोक.

प्रभुनिदेश न मी जरि तो करीं,
प्रभु तरी मम जीवित संहरी!
जरि करीं नृपसत्तमघात मी,
तरि पडेन अहा ! कवण्या तमीं ?

पहा आमच्या महाराजांची

श्लोक.

मति कशी फिरली सुहृदावरी
नच विवेक करी तिजला दुरी;
सकल तत्त्वविचार विलोपला,
मज ह्मणे 'विष दे!' प्रभु कोपला !

पण हें ह्मणणें कसें ऐकावें ? असलें काम करून

१. राणी (संबोधन).

श्लोक.

हो प्रसन्न जरि आज नृपाल,
प्राप्त होय जरि वित्त अमोल;
डाग लाविन न मी स्वकुलातें,
देह जाय तरि खेद न मातें.

तेव्हां हें राज्यच सोडून जावें, हें बरें. कारण येथें राहूनही जर मृत्यु येणार आहे, तर मग दुसरीकडे जाण्याची कां भीति बाळगावी? यायोगानें हात तरी विटाळणार नाहींत.—अरे, पण सुधन्वा महाराज आले!

(सुधन्वा येतो.)

सुध०—हें झालें तरी काय? मजशीं बोलूं सुद्धां नये?—कसें काय **सत्यव्रत**! ठीक आहेना?

सत्य०—हो! महाराजांच्या दयेनें सर्व ठीकच आहे!

सुध०—कांहीं नवल विशेष?

सत्य०—हं—विशेष म्हणण्यासारखें कांहीं नाहीं.

सुध०—नाहीं कसें?

श्लोक.

राजाचें मुख दुर्विषण्ण[1] दिसतें गेलें जणों राज्यसें,
बोले एकहि शब्द ना मजसि तो; झालें तरी कायसें?
माते देखुनि ओष्ठ चावुनि रदीं भ्रूभंग केला पहा;
केला मीं अपराध काय न कळे का चेतला कोप हा?

सत्य०—महाराज! मी काय सांगूं? कसें सांगूं?

सुध०—कसें सांगूं? म्हणजे तुम्हांला माहीत आहे एकूण? तुम्हांला ठाऊक असून, सांगवत नाहीं अं? कां पण नाहीं सांगवत? अहो **सत्यव्रत**! तुमच्या या उतरलेल्या चर्येवरून माझी खातरी होते, कीं या प्रकरणांत माझा कांहीं तरी संबंध असला पाहिजे. नाहीं तर मजविषयीं विराग व्हायला कारण काय?

सत्य०—महाराज! विराग व्हायला कारणें अनेक असतात. त्यांपैकीं एक झालें आहे. पण तें मला सांगवत नाहीं. आणि विशेष हा कीं, आपणामुळें झालें आहे, तरी आपलें त्यांत मुळींच अंग नाहीं.

सुध०—मजमुळें झालें आहे? आणि माझें त्यांत अंग नाहीं असें कसें? मण्यारीची सांवली पडली म्हणजे मनुष्य मरतें, तसा तर माझा कांहीं प्रकार नाहींना? कीं ज्यावर माझी सांवली पडावी, त्यांच्या मनामध्यें विकृति व्हावी? अहो, **सत्यव्रत**!

श्लोक.

बुद्धीनें चतुर असां; महान् कुलानें,
बालासे अनुभव तो तुह्मां वयानें,
सांगावे मम हित कोणतें वदाना?
सेवावें न बुधजनीं कदापि मौना

सत्य०—महाराज! माझ्यानें नाहीं सांगवत!—

सुध०—मजकडून कारण घडलें, आणि मला कळूं नये?—नाहीं, सांगितलेंच पाहिजे. हें पहा **सत्यव्रत**! तुह्मांला मी

श्लोक.

आळवीं शपथ घालुनियां अतां.
कास्तव भय यथानथ सांगना?
काय वृत्त घडलें कळवा मला.
स्नेहसागर कसा झणीं आटला?

सत्य०—आतां शपथच घातली, तेव्हां सांगितलें पाहिजे. मी सांगतों तें ऐकावें, आणि त्याप्रमाणें लागलींच करावें. नाहीं तर महाराजांना आणि मला दोघांनाही रामाचें नांव घ्यावें लागेल. मग कसें?

सुध०—कसें कसलें? सांगा.

सत्य०—आपला वध करावा, अशी मला आज्ञा झाली आहे!

सुध०—कोणाची ती?

सत्य०—आमच्या महाराजांची!

सुध०—आणि ती कशाकरितां?

---

१. दुःखी.

सत्य०—यांना वाटतें आहे,—नाहीं,—म्हणतात माझी खातरी झाली आहे—जाणों त्यांनीं प्रत्यक्ष पाहिलें आहे किंवा धरिलें आहे!—म्हणतात आपला आणि राणी साहेबांचा कांहीं संबंध आहे म्हणून!

सुध०—शिव! शिव! त्या साध्वीच्या नखाला तरी कोणी शिवेल काय? असें दुष्कर्म मजकडूनं घडलें असेल, तर मग

श्लोक.

"यजो बुध मला सदा, मम न नाम घेवो मुखें,
जळां मम शरीर हें सतत दाहयोगें सुखें,
पडोत कृमि त्यांत वा बहु सुटोनि दुर्गंधिही,
धरो अधम पातकी न मजसारिखा ही मही!

सत्य०—महाराज! आपण जीव तोडतोडून जरीं सांगितलें, तरी चंद्रकांत महाराजांची शंका दूर होणार आहे काय? त्यांच्या जीवांत जीव आहे, तोंपर्यंत ही राहील. आपण

श्लोक.

अनेक शपथा वहा, भ्रम फिरे न त्यांचा तरी,
अकारण विराग जो विधिहि काय दूरी करी?
महाप्रलयमारुतें जलधि जो असे क्षोभला
तयास शमवा, तरी सफल यत्न हो आपला!

मृध०—पण हें असें झालें कसें?

सत्य०—कसें झालें, हें मी काय सांगूं? आतां कसें झालें याचा विचार करण्यांत हंशील नाहीं. संकट आलें आहे, त्यांतून पार पडण्याचा यत्न केला पाहिजे. महाराज! या जनावर जर विश्वास असेल, तर मी सांगतों त्याप्रमाणे करा. मजविषयीं कांहीं संशय असेल, तर मी आपल्याबरोबर येतों, पण आपण आज रात्रीं येथून निघून चला. आपल्या परिजनास हा बेत हळूच कळवीन, आणि दोन दोन तीन तीन असे निरनिराळ्या वेशींतून नगराबाहेर काढून देईन. आतां मजविषयीं म्हणाल, तर मी आपला चरणांचा दास आहें. मी आपणाला राजाचा गुप्त बेत कळविला, तेव्हां येथें राहून कांहीं आतां उपयोग नाहीं.—आपला निश्चय ढळूं देऊं नका. सत्य स्मरून, आपणाला सांगतों ही गोष्ट खोटी नव्हे. इच्या खरेपणाविषयीं प्रत्यंतर पाहण्याच्या भरीस पडाल, तर प्रत्यंतर मिळणें कठिण! कारण माझ्यानें महाराजांच्या देखत ही गोष्ट कबूल करवणार नाहीं. आणि मग आपला जीव निर्धोक आहे असें समजणें म्हणजे सुळावर चढविलेल्या चोराने आपला जीव निर्धोक आहे, असें समजण्यासारखें आहे.

सुध०—सत्यव्रत! तुझी सांगतां ती गोष्ट खरी आहे. चंद्रकांत राजाच्या आकारावरून, मुद्रेवरून, त्याचें मन कळून येतें. चला! तुम्हीं माझे मित्र आहां! मला या संकटांतून पार पाडून द्या, म्हणजे तुम्हांला कशाचीही काळजी नको! जहागीर, धन, मान सर्व कांहीं तुम्हांला मिळेल. आमचीं जहाजें तयार आहेत; मी परवांच येथून निघणार होतों, आणि आमच्या परिवारानें तशी तयारीही ठेविली होती—पण या दोन दिवसांत काय चमत्कार झाला पहा!

श्लोक.

राज्ञी मंगलधाम,[1] विश्रुत[2] तिचें सौंदर्य लोकत्रयीं;
राजाचा अनुराग तीवरि, तसा अत्यंत तीचा तयीं;
आह्मीं प्रेमनिबद्धचित्त नृपती वाटूं जनां एकसे,
मात्सर्याब्धितरंगविक्लव[3] पहा तच्चित झालें कसें?

या शंकेस आधार म्हणून कांहीं नाहीं,

१. कल्याणाचें घरच काय अशी. २. प्रसिद्ध. ३. मत्सरबुद्धि हाच कोणी एक समुद्र, त्याच्या लाटांनीं क्षुभित झालेलें.

पण तिजमुळें काय अनर्थ झाला आहे पहा. पूर्वी माझे ठायीं

श्लोक.

दयाचा जो होता प्रणय विरला तो अजि पहा !
दृढ द्वेषें झालें अति कलुष त्याचें मन अहा !
कराया मद्धाना बहुविध उपायांस निरखी !
मसे शंका कांहीं. मजसम न कोणीच असुखी!
अो या संकटांतून कसा तरी पार पडेन!
परंतु त्या साध्वीची काय वाट ?

श्लोक.

नेणें काय करील कोपदहनें संदग्धचेता पति !
हा निष्कारण कोप! दुःसह कसा साहील संताप ती !
अा ! कैशी नृपभाज शुद्धहृदया पुण्यव्रता नाडिली !
धोजूं काय उपाय ? दग्ध विधिनें चेष्टा कशी मांडिली?
ईश्वरा ! तिचे कल्याण कर ! मजकडून तिला काय साहाय्य होणार आहे ? उगींच राहून तिला कदाचित् अधिक जाच मात्र होईल ! **सत्यव्रत** ! चला मला नगरांत नेऊन पोंचवा, म्हणजे तुम्हीं मला जीवदान दिलें, असें मी समजेन. येथून जाऊं या कसे.

सत्य०—महाराज ! दिंडीच्या किल्ल्या मज जवळच असतात, तेव्हां नगराबाहेर अडचण काहीं पडणार नाहीं. महाराजांनीं मात्र त्वरा करावी. (जातात.)

अंक २.

२० १. स्थळ.—सिंहलद्वीप.—राजवाडा.

(इंदुमती, नंदन आणि दासी येतात.)

इंदु०—याला नेतां काय कोणी ? यानें कीं नाहीं मला भंडावून सोडिलें आहे !

१ दासी—या बाळासाहेब ! मजबरोबर खेळा. चला चला पाहूं.

नंदन—अं अं ! मी नाहीं तुजबरोबर खेळणार.

१ दासी—कां नाहीं बरें ?

नंदन—घेघे ! आपले तूं माझे मुके घेतेस: तुला वाटतें मी अजून लहानच आहें ! मी नाहीं तुजजवळ येत —(दुसरीत उद्देशून) मला इजजवळ जावेंसे वाटतें.

२ दासी—माझ्याच जवळ येण्याला कां बरें बरें वाटते अमच्या धाकट्या महाराजांना ?

नंदन—कां बरें म्हणजे काय सांगूं ? आपलें यांचे वाटतें.—कायग **उमे** ! तुझ्या या भोंवयांचे केंस कसे काळे भोर आहेत ! बायकांना काळे केंस छानदार दिसतात नाहीं बरें ? या तुझ्या भोंवया कशा माझ्या धनुकलीसारख्या दिसतात.

२ दासी—हें कोणीं शिकविलें आपणाला ?

नंदन—मला कोण शिकवितो ? मला जसें कळतच नाहीं वाटतें. ही बघ माझी धनुकली कशी कमानदार आहे ! कायग **येसू** ! तुझ्या भोंवयांचा ग रंग कसा आहे?

१ दासी—तांबडा महाराज !

नंदन—वाः ! ओठांचा रंग तांबडा पाहिला आहे, पण भोंवया का तांबड्या असतात? मला फसविलेस, नाहीं ?

२ दासी—बाळासाहेब ! मी तुमच्या कानांत एक गोष्ट सांगतें. आतां कीं नाहीं थोड्या दिवसांनीं आपणाला भाऊ होणार आहे. मग आम्हीं नको म्हटलें तरी तुम्हीं त्याशीं खेळण्याकरितां आपोआप याल.

१ दासी—आतां दिवस भरत आले ! देवाच्या दयेनें त्या सुखरूप मोकळ्या होतील !

इंदु०—काय ग याला भलभलतेंच सांगतां आहां ! मोठ्या शाहण्या झाल्या ! बाळा! इकडे ये कसा. ये बैस येथें, आणखी एकादी चांगली गोष्ट सांग पाहूं.

---

१. चित्त ज्याचें जळून गेले आहे असा.

नंदन—कोणची सांगूं ? राक्षसाचो सांगूं कीं भद्र राजाची सांगूं ?

इंदु०—चांगली गोडशी सांग. मग कोणची ही असो.

नंदन—नाहीं, राक्षसाचीच सांगतों.

इंदु०—बरें तो कां होईना? राक्षसाचो सांग. मल ठाऊक आहे, तूं मोठा लबाड आहेस राक्षसाची गोष्ट सांगून तूं मला भिववणार बरें तूं भिववि, पण मी नाहीं हो भ्यायची.

नंदन--सांगूं ? एक होता राजा—

इंदु०—येथें असा बस, आणि मग सांग.

नंदन—झाला होत्या दोन बायका ! आई ! मि हळूंच सांगतों अं ? भितीला सुद्धां ऐक येणार नाहीं.

इंदु०—हं. अगदीं कानांत सांग.

(चंद्रकांत संस्ताषक आणि परिवार येतात.)

चंद्र०—काय तुम्हीं त्याला तेथें पाहिले ? स परिवार त्याच्या बरोबरच होता ? आणि सत्यव्रतही त्याजबरोबरच ?

१ सरदार—नारळीच्या आडून पळून जातां— ना त्याना मीं पाहिलें. काय पण त्यांची ती गर्दी ! ते थेट अपल्या तारवापर्यंत एक· सारखे पळत गेले !

चंद्र०—(एकीकडे) मला वाटलें होतें कीं हा माझा कुतर्क असावा. पण सर्व खरें ! प्राज्ञांच्या अंतः करणाची प्रवृत्ति हीच त्यांस प्रमाण होय ! हरहर !

श्लोक.

कशी शंका माझी अवितथ असे आज ठरली !
कशी अंतर्ज्ञा ही मजसि मति इशें वितरली !
अरेरे ! ह्या अंतर्ज्ञा मतीनें माझ्या सुखाच्या
ताटांत विष कालविलें !

१. खरी.

अहा ! कां मी नाहीं जडमति[1] ? जडा बुद्धि बरवी ;
नको प्रज्ञा दीप्ता, अभिजनवती[2] मान नुरवी !
खरेंच, हे ज्ञान चांगलें नाहीं. अज्ञानात मोठें सुख आहे हेंच खचित ! कारण,

श्लोक

मंडूकावृतभोग पन्नगवरें दुर्दैश केला जरी,
नाहीं पन्नग देखिला, विष न तें त्याचें चढे तोंवरी;
तो का सर्प विलोकितांच नयनीं, दाही शरीरांस तें ;
केला दंश मला भुजंगमवरें ऐसें मला भासतें !

अरे हा दुष्ट **सुधन्वा** खरोखरीच भुजंग आहे ! आणि या भुजंगाला सहाय तो स· त्यव्रत ! अहारे सत्यव्रता ! सत्य व्रताचा खरा तूं पुतळा ! तुला सत्यव्रत म्हणण्यापेक्षां कु· ट्टिनीव्रत हें नांव चांगलें साजेल ! मला विष देऊन दूर करावें. माझें राज्य घ्यावें. असा यांचा दुष्ट हेतु होता ! माझे संशय सर्व खरे झाले ! तो लुच्च—ज्याला मी ते काम करावयास सांगितलें, तोच त्याच्या पक्षाचा ! त्यामुळे हा माझा बेत फसला. म्हणून तो केवढा आनंद मानीत असेल !

(उघडपणें १ सरदारास, बरें दिंडीचीं दारें हो कशीं इतके लौकर उघडतां आलीं ?

१ सर०— महाराज ! त्यांच्या किल्ल्या तर **सत्यव्रता**कडेच असत; आणि त्याही महा· राजांच्याच आज्ञेवरून ! कितीदा त्यांनीं पूर्वीं अशीं दारें उघडविलीं असतील !

चंद्र०—खरेंच. हें मला ठाऊक आहे. (इंदु· मतीस लक्षून) चल, हा **नंदन** इकडे दे. हा माझा आहे ! तुजजवळ राहता नाहीं कामाचा !

१. कुलीन. २. ज्याच्या फणेवर बेडूक बसला आहे असा पन्नगवर म्हणजे सर्पश्रेष्ठ. ३. हा शब्द श्लिष्ट आहे. याचे दोन अर्थ होतात. एक अर्थ 'सर्प.' आणि दुसरा 'जार.'

इंदु०— आज झालें आहे तरी काय असें हें? कोण पण हीं थट्टा?

चंद्र०—घेऊन जा कसे या नंदनाला येथून! दृष्टे त्याला फिरकूं देऊं नका! तिला कर्मणूक हवी असेल, तर आतां होईल त्याजकडून करून घेईल! (नंदनाला सेवक घेऊन जातात.) हा गर्भ माझा नव्हे, त्या दुष्ट सुधन्व्याचा आहे!

इंदु०—हें काय असलें भलभलतें बोलावें? काहीं जिभेला हाड असावें कीं नाहीं! कीं आपली उचलली जीभ आणि लावली टाळयाला! कोणी ऐकलें तर काय ह्मणेल?

चंद्र०—काय ह्मणणार आहेत? एवढेंच कीं नाहीं?

श्लोक.

या राज्ञीचें रतिहुनि असे आगळें रूप साचें,
सर्वांनीही विलसुनि अहा! देहलावण्य नाचे;
या कांतीशीं सदृश असती चारुता मानवाची;
रूपें चित्तें अनुपम कृती वाटती हे विधीची!

अेरेरे! मला हें ह्मणणें बरें कां वाटतें आहे? पण काय करूं?— सत्य अप्रिय असलें तरी बदलेंच पाहिजे! दुष्टे! तूं जारिणी आहेस!

इंदु०—देवारे देवा! दुसऱ्यानें कोणीं असें ह्मटलें असतें, तर त्याच्या अधमपणास पारावार नव्हता! पण आपण हें ह्मणतां तेव्हां बोलणेंच खुंटलें! काय माझें आपण पाहिलें? हा आपणाला भ्रम झाला तरी कसा?

चंद्र०—मला भ्रम! भलतेंच! हा भ्रम माझा नव्हे, तुझा आहे! सुधन्वा हाच चंद्रकांत आहे, असा तुलाग भ्रम झाला!—अरे—पण तुला आतां "अग" कसें ह्मणावें? तूं जारिणी आहेस, इतकेंच नाहीं, तर माझा प्राण अपहरण करावा, असाही तुझा बेत होता! आणि त्या सत्यव्रताचें या कामांत तुला साहाय्य होतें! तुला ठाऊक नाहीं काय कीं आपण दुष्कर्म केलें आणि तें कोणाशीं ह्मणून? लाज वाटावी, पण लाज सर्व गिळून टाकली आहे! अगदीं नीच लोक असतात त्यांना जी लाज असते ती तुला नाहीं! किती दुष्ट आचरण हें! बरें, ते पळून जाण्यालाही मदत तुझीच!

इंदु०—पाहिजे त्याची शपथ घेईन, मला हें ठाऊक नाहीं. हें केवळ कुभाड रचिलें आहे, असें जेव्हां आपणांस कळून येईल, तेव्हां बरें आपणाला किती वाईट वाटेल! त्यावेळीं हे शब्द परत घेतां येतील का? माझी चूक झाली, या ह्मणण्यानें या सर्वांचा परिहार होईल काय?

चंद्र०—माझी? आणि या कामांत, चूक? भलतेंच. पहा!

श्लोक.

पूर्वेचा रवि तो करील उदया अस्ताचलाचे शिरीं?
जे तारे गगनागणीं विलसती येतील ते भूवरी!
मर्यादा न कधीं त्यजी गहन जो सोडील तो वारिशी!
माझी उक्ति जरी गमे अनृतशी, कीं हो निराधार ही!

तुझा वधचे करावा—पण नाहीं! तुला बंदींत टाकतों, ह्मणजे—

इंदु०—असो; मर्जी आपली! हल्लीं माझे ग्रहच फिरले आहेत. तोंपर्यंत निमुटपणें सर्व सहन केलें पाहिजे.—महाराज!

श्लोक.

रुदन ये न मला अणिका परी,
सदय व्हा तरिही हृदयांतरीं!
असुखवन्हि मनीं बहु पेटला,
झणुनि लोचननिर्झर आटला!

मी कांहीं ह्मणत नाहीं, आपणाला कसेंही

वाटो, देवाला डोळे आहेत! असो; प्रभूची मर्जी! आज्ञेबाहेर मी नाहीं!

चंद्र०—आपल्या कारागृहांत इला घेऊन जा, आणि रक्षकाला मीं बोलाविलें आहे म्हणून सांग. (रक्षकास उद्देशून) कोण आहेरे बाहेर! (सरदार येतो.)

सरदार—जी महाराज!

इंदु०—महाराजांनीं मजजवळ दासींना तेवढें राहूं द्यावें. कारण या वेळीं दासींची मला गरज आहे, हें दिसतेंच आहे.—कांग तुलीं का उगींच रडतां? वेड्या नाहीं तर! रडायला नको कांहीं. कारागृहीं टाकिले म्हणून अपराध का केलासें होतें? अपराध घडला असता, तर गोष्ट निराळी होती.—अग! फिरून आपलेंच! उगी! आजचा हा प्रसंग कृपाळु ईश्वरानें माझ्या बऱ्याकरितांच घडवून आणिला आहे असें समजा. महाराज! आपणाला दुःख होऊं नये, म्हणून मी आपणाकडून किती जपत होतें, पण आतां माझा उपाय नाहीं.—दासींनो, चलाग तुम्हांला मजबरोबर येण्याला परवानगी आहे.

चंद्र०—हुं, चला. (इंदुमती आणि दासी जातात.)

सर०—महाराजांनीं कृपा करून आईसाहेबांस कारागृहीं टाकूं नये.

संस्तावक—महाराज! आपण काय करतां आहां याचा दूरवर विचार केला आहेना? नाहीं तर न्याय करितां अन्याय घडेल, आणि तसें झाल्यास आपणाला, राणीसाहेबांना, आणि बाळासाहेबांना तिघांनाही वाईट!

सर०—महाराज! माझी मनोदेवता तर मला सांगते कीं, आईसाहेब अगदीं शुद्ध आहेत. प्रभूंनीं जो दोषारोप केला आहे, तो अकारण आहे.

संस्ता०—सरकार! मी आपणास खचित सांगतों, आईसाहेब जर खोट्या ठरल्या, तर या पृथ्वीत एकही साध्वी स्त्री सांपडणार नाहीं. आणि मग पुरुषांनीं स्त्रियांस अगदीं दृष्टीआड करतां कामा नये! सर्वांस कुलुपांत घालून ठेविलें पाहिजे.

चंद्र०—खबरदार अधिक बोलाल तर! तुम्हांला या कामांत कोणीं बोलायला सांगितलें नाहीं!

संस्ता०—तर मग या पृथ्वीच्या पाठीवर औषधालासुद्धां साध्वी मिळणार नाहीं!—जगाचा प्रलय व्हायला मग कांहीं फार अवधि नको!

चंद्र०—माझ्या वचनावर तुमचा मुळींच विश्वास पटत नाहीं काय?

१ सर०—महाराज! आपल्या वचनावरचा विश्वास उडणें एकपरीं बरें, पण आमच्या वचनावरचा उडूं नये! आपला संशय खरा न होईल, व राणीसाहेब खऱ्या ठरतील, तर आम्हांला केवढें समाधान वाटेल! मग महाराजांनीं आम्हांवर दूषण ठेविलें, तरी पुरवलें!

चंद्र०—तुमच्याशीं मला हुजत घालीत बसायाचें काय काम? माझें मन सांगतें, तें मी करणार! मला उपदेश सांगणें हा तुमचा अधिकार नव्हे! मी ऐकून घेतों, म्हणून, नाहीं तर—तुम्हांला ही गोष्ट कळविली, हा माझा मोठेपणा! तुम्हांला ती खरी वाटत नसेल, किंवा खरी वाटत असून मुद्दाम म्हणत असाल कीं खोटी

आहे म्हणून, तर तुम्हांला एकच गोष्ट सांगतों, मला कांहीं तुमचा उपदेश नको! यांत हित अहित जें कांहीं होईल, त्याचा मालक माझा मी!

संस्ता०—पण महाराज! ही गोष्ट इतकी प्रसिद्ध झाली नसती, आणि आपल्याच मनांत असती, तर बरें झालें असतें!

चंद्र०—पण असें कसें झालें असतें? मला वाटतें, **संस्तावक**! तुमचीं इतकीं वर्षे फुकट गेलीं! नाहीं तर जन्मतःच तुम्हांला ईश्वरानें अप्रबुद्ध केलें! कारण हें पहा,

श्लोक.

तो सत्यव्रत सोडुनी नगर हें गेला पळूनी अहो!
गेला भूप तयासवें न समजे पौरां असें कविहो?
दुसरें आणखी असें पहा कीं, सर्व लोकांनीं
जो संबंध असे तिचा नृपतिशीं तो गाहिला लोचनीं!
निर्मर्याद निरर्गळ प्रसरला दावाग्नि जैसा वनीं!

तरी या कामांत उतावीळपणा करितां कामा नये, म्हणून **श्रीशैलमल्लिकार्जुन** पर्वतावर आमचे कुलगुरु **आनंदनिधि** वास करितात, त्यांचा विचार घेण्याकरितांच **हारीतक** आणि **विद्यासागर** यांस पाठविलें आहे. या ब्राह्मणांचें कडकडीत व्रत सर्वांस माहीतच आहे, असत्याची शंकाही त्याविषयीं मनांत ध्यावयाला नको. कुलगुरूचा ते जो निदेश घेऊन येतील, त्याप्रमाणें पुढें करितां येईल. हें मीं चांगलें केलें ना?

सर०—महाराजांनीं हा उत्तम पक्ष स्वीकारिला.

चंद्र०—माझ्या मनाची खातरी झाली आहे, व मला ज्या गोष्टी ठाऊक आहेत, त्याहून सबल प्रमाण मला नको आहे. पण पौरांची खातरी करण्याकरितां कुलगुरूंचें आज्ञापत्र मागविलें आहे. त्याखेरीज अप्रबुद्ध लोकांची संशयनिवृत्ति होणार नाहीं. तोंपर्यंत तिला आपणापाशीं राहूं न देणें एवढीच व्यवस्था पुरे आहे.—चला! ही गोष्ट ऐकून पौरजनांला फार वाईट वाटेल, तेव्हां त्यांचें समाधान केलें पाहिजे.

संस्ता०—(एकीकडे) आपण सांगितलेल्या गोष्टीनें त्यांचें समाधान होणार नाहीं. केवळ आपली निंदा मात्र होईल. सर्व नगर राणीच्या शुद्धाचरणाविषयीं साक्ष देईल.

(सर्व निघून जातात.)

प्रवेश २. स्थळ—तेंच—कारागृहाच्या जवळची एक खोली.

(यशोदाबाई आणि दोन दासी येतात.)

यशोदा०—जागा! रक्षक आहेत का पहा, आणि असतील तर मीं बोलाविलें आहे म्हणून सांग. (दासी जाते.) देवा! काय या राज्ञीची स्थिति! इंद्राच्या मेनकेला लाजविणारी ती कारागृहीं रहावी काय? (रक्षक आणि दासी येतात.) मी कोण आहें, हें तुला असेल ठाऊक?

रक्षक—हें काय विचारावें! महाराजांच्या धात्रीस आबालवृद्ध ओळखतो.

यशो०—मला बाईसाहेबांची गांठ घ्यायची आहे, तेव्हां या जेथें आहेत तेथें मला घेऊन चल!

रक्ष०—तेवढें मात्र माझ्या हातून व्हायचें नाहीं. महाराजांची मला ताकीद आहे कीं कोणालाही तिकडे जाऊं देऊं नये.

यशो०—देवारे देवा! साध्वीचा असा छळ व्हावाना! तिला कोणी भेटायला आलें तरी भेट होऊं नये! बरें, बाईसाहेबांची

---

१. प्रतिबंधरहित.

नाहीं, त्यांच्या दासींची तर गांठ द्यायला हरकत नाहींना ?—एकीची तरी ? उर्मीची ?

रक्ष०—बाई ! या दासींना एकीकडे जायला सांगा, ह्मणजे उर्मिला घेऊन येतों.

यशो०—बरें तर. घेऊन ये. दासींनो ! तुह्मीं थोड्या बाहेर जा. (दासी जातात.)

रक्ष०—बाई०! पण तुमचें जें कांहीं बोलणें व्हावयाचें, तें मजसमक्ष झालें पाहिजे.

यशो०—कांहीं हरकत नाहीं. तिला घेऊन ये. (रक्षक जातो.) काय खटपट ही खऱ्याला खोटें करण्याची ! देवा ! असा छल कोणाचाही होऊं नये.—

(रक्षक आणि उमो येतात.)

यशो०—कायग उमे ! बाईसाहेब खुशाल आहेतना ?

उर्मी—कसल्या खुशाल ! ज्या स्थितींत रहावें लागतें तींत खुशालच आहेत ! कोण त्यांवरला प्रसंग ! पण बाई ! मनाच्या पक्क्या खऱ्या ! इतकें आभाळ फाटलें आहेना ? पण वरपंगीं कांहीं दाखवीत नाहींत ! मनांतल्या मनांत सर्व दुःख गिळून टाकतात ! काल रात्रीं बाईसाहेब बाळंत झाल्या तुह्मांला समजलें का ?

यशो०—मलाग कोण सांगणार ? मुलगा झालाना ?

उर्मी—नाहीं. मुलगी ! कशी चांगली आहे पण ! बांधाही किती चांगला ! देवाच्या दयेनें तिला शंभर वर्षें आउक्ष असो ! बाईसाहेब तिचे वरचेवर मुके घेतात, आणि ह्मणतात ! "बाळे ! तूं आणि मी सारखीच ! तूं जशी निर्मळ, तशी पण मीही आहें." "

यशो०—यांत कांहीं खोटें नाहीं. पण महाराजांना वेड लागलें आहे, त्यापुढें कोणाची बाई मात्रा चालणार आहे ? पण असें उगीच राहून नाहीं चालायचें ! त्यांना दोन गोष्टी समजाविल्या पाहिजेत ! आणि त्याहीं माझ्यासारखीनेंच ! आतां माझे काय फार दिवस उरले आहेत ? पहातें या ह्मातारीचें कांहीं ऐकतील तर ! त्यांना मीं लहानाचें मोठें केलें, तेव्हां तोंडाची वाफ वांया जाईल, असेंच नाहीं होणार ! पण पहावें. त्यांना निक्षून सांगतें कीं, आपणाला वेड लागलें ह्मणून !—मी कांहीं त्यांना भिणारी नाहीं, भिऊं कां पण मी ? त्यांना डोई खांद्यावर नाचविलें, ती मी दुसऱ्याप्रमाणें भिणार नाहीं.—बरें, उमे ! तूं बाईसाहेबांना जाऊन सांग मीं त्यांना फार फार पुसलें आहें ह्मणून. आणि हें बघ—यांना ह्मण, मुलगी माझ्या जवळ देत असाल, तर पहा. चिमुकल्या बाळाला नेईन राजेसाहेबांपाशीं, आणखी पाहीन त्यांचें मन वळवितां येईल तर ! कोण जाणे त्या बाळाच्या गोंड गोड लीला पाहून, त्यांचें मन द्रवलें तर ! एक वेळ माझे बोलणें वांया जाईल, पण या निष्कपट आणि मुग्ध लीला त्यांच्या अंतःकरणाला पाझर फोडतीलच !

उर्मी—बाई ! तुमचें मन मोठें उदार आहे. तुह्मीं होऊन हें काम अंगावर घेतां, तेव्हां यांत यश मिळेल हें सांगायलाच नको. हें काम करायला तुह्मांसारखी दुसरी कोण सांपडणार ! तुह्मीं या जवळच्या खोलींत बसा. मी इतक्यांत बाईसाहेबांना तुमचा बेत सांगून येतें. बाईसाहेबांच्या मनांत हा विचार सकाळींच आला होता, पण

कोणाला सांगितलें, आणि त्यानें नाः
ह्मटलें, तर आपलें बोलणें वांया जाणा
ह्मणून बाई भ्याल्या !

यशो०—आणखी बाईसाहेबांना असें सांग कीं
देवानें मला तोंड दिलें आहे, तें बोलायल
दिलें आहे त्याप्रमाणें महाराजांना बोलें
न. मला त्यांचें भय तर वाटतच नाहीं
पण या ह्मातारीला चांगलें कोठून बोलत
येणार ? पण पाहीन, आणि देवाच्य
दयेनें काम करून येईन.

उर्मी—ईश्वर तुह्मांला साहाय्य देवो ! म
बाईसाहेबांना जाऊन सांगतें.—तोंपर्य
तुह्मीं या इकडल्या खोलींत बसा.

रक्ष०—राणीसाहेबांनीं जर मूल आपल्या स्व
धीन केलें, तर मीं तुह्मांला तें घेऊन जा
द्यावें कीं नाहीं कोण जाणे ? तसें क
ण्यास महाराजांची आज्ञा पाहिजे.

यशो०—कसली तुला भीति वाटते ही ! अ
बाबा ! एका कारागृहांतून नऊ महिन्या
ज्याची देवानें सुटका केली, त्याला दु
ज्या कारागृहांत कोण वरें टाकणार ? त
बाळानें कांहीं अपराध केला नाहीं ! राजा
राग राणीवर ! त्यावर नाहीं !

रक्ष०—तुह्मीं ह्मणतां तें खरें.

यशो०—तूं कांहीं भिऊं नको. महाराज राग
वलेच, तर मी आहें. तूं कांहीं काळज
करूं नको.

(सर्व जातात.)

प्रवेश ३. स्थळ तेंच—राजवाड्यांतील एक खोली.

(चंद्रकांत, संस्थावक, सरदार आणि परिजन येतात.

चंद्र०—(चिंताक्रांत) काय चमत्कार झाल
पहा !

श्लोक.

अहा ! निद्रा गेली त्यजुनि मजसी ती प्रियसखी !
दिवा रात्री येना ह्मणुनि बहु मी खिन्न असुखी !
पण मी वेडा नाहींका ? इतकें कां मनावर
घ्यावें ?—पण नाहीं, असें कसें होईल ?
धरी जों प्राणांतें भुजगवर तो दुष्ट, मनुज[1]
सुखा पावे कैसा ? त्वदयसुख तें शत्रुवधजें[2] !
ह्मणून माझे शत्रु जोंपर्यंत जीवंत आहेत,
तोंपर्यंत मलाही कसें सुख मिळेल !—एक
शत्रु ती जारिणी ! दुसरा तो तिचा जार !—
तोच माझ्या हातांतून निसटून जाऊन
माझ्या कोपाच्या विषयापलीकडे आहे !
कांहीं हरकत नाहीं ! पण ती तर दूर
गेली नाहींना ! ती एकदा नाहींशी झाली
असें कळलें, ह्मणजे माझी अर्धी चिंता दूर
होईल !—कोण आहेरे तिकडे !

सेव०—(पुढें येऊन) जी महाराज ! मी आहें.

चंद्र०—नंदनाची प्रकृति आतां कशी आहेरे !

सेव०—काल रात्रीं ह्मांना चांगली झोंप लाग-
ली होती ! आतां ताप गेल्यासा वाटतें.

चंद्र०—एवढा लहानना ! पण ह्याला समजतें
किती !! आपल्या आईला असें ह्मटलें,
इतकें कळलें मात्र, तों

श्लोक.

चित्तीं चिंता नंदन वाही, वपु टाकी,
वाटे यातें हा जननीदोष नसे कीं;
टाकी साऱ्या बालपणींच्या तयिं लीला,
सोडी निद्रा, खिन्न विषादें मानें झाला !

किंवा,

श्लोक.

वपु विलुलित झालें, लोचना नीज[3] येना,
असुखदहन[4] जाळी म्लान चेतःप्रसूना.[5] !

---

१. पृ. १२ रकाना २, टीप ३ पहा. २. शत्रु-वधापासून झालेलें. ३. दुःखरूप 'दहन' ह्म. अग्नि. ४. 'चेतः' ह्म. चित्त हेंच 'प्रसून' ह्म. फूल.

मराठी ग्रंथ संग्रहालय
मोहविलसित नाटक

शिशुजनसुलभा त्या टाकिल्या सर्व दोषा
नच निज जननीचा दोष वाटे तयाला ॥

आतां कोणी इकडे येऊं नका. आ आपण पुनः पहा याची प्रकृति कशी आहे ती. (सेवक जातो.) छे ! छे ! याविषयीं विचार करून कांहीं फायदा नाहीं. त्याचें शासन करावें, असें वाटतें. पण काय करूं ? माझा कांहीं इलाज चालत नाहीं. त्याचें बल मोठें ! याला सहायही मोठेंच ! तेव्हां त्याचें नांवच सध्यां घेतां येत नाहीं ! बरें असो ! येईल कधीं तरी प्रसंग, तेव्हां पाहून घेतां येईल ! सध्यां तर तिजवर सूड उगवून घ्यावा ! **सत्यव्रत** आणि **सुधन्वा** हे माझा उपहास करून विनोद करून घेत असतील ! माझें दुःख तीं त्यांना थट्टा अं ! दुष्टांनो ! माझ्या तडाक्यांत असतां, तर तुमची खोडच जिरविली असती ! बरें, ते नाहींत तर नाहींत, ही तर माझ्या ताब्यांत आहे ! इचेंच अगोदर शासन करावें !

(यशोदा मुलीला घेऊन येते.)

सेव०—हां हां ! बाई, आंत नाहीं जायचें !

यशो०—अरे बाबा ! तुम्हीं मला मदत करावी, ती एकीकडेच ! उलटें म्हणतां, आंत नाहीं जायचें ! इतकेरे तुम्हीं महाराजांना काय भितां ? बाईसाहेबांच्या प्राणांपुढें का महाराजांच्या रागाची मातब्बरी आहे ?—गरीब बिचारी मुलगी ! आणि काय तिजवर ही आग पांखडली आहे !

संस्ता०—यशोदाबाई ! पुरे. किती बोलाल तरी ?

सेव०—बाई ! रात्रीं महाराजांना झोंप मुदलींच लागली नाहीं ! म्हणून त्यांनीं सांगितलें आहे, कोणालाही आंत येऊ देऊं नको !

यशो०—इतके माजवर रागावतां कां पण ? कांहीं थोडें शांत व्हा ! अरे बाबांनो ! मी महाराजांना झोंप यावी म्हणून आलें आहें ! झोंप घालविणारे हे तुम्हीं ! त्यांनीं ऊं केलें, कीं लागले सुस्कारा टाकायला ! चूं केलें कीं लागले इकडे तिकडे पळायला ! हें बघा ! मी कीं नाहीं त्यांना हिताच्या चार गोष्टी सांगायला आलें आहे. आणि त्याही खोट्या नाहींत, खऱ्या आहेत. त्या सांगून काय करणार म्हणून पुसाल तर इतकेंच. त्यांच्या डोळ्यांत जें एक वेड भरलें आहे, आणि ज्याच्या योगानें त्यांचा डोळा लागत नाहीं, तें वेड काढून टाकणार !

चंद्र०—कसली गडबड आहेरे तिकडे ?

यशो०—कांहीं नाहीं, महाराज ! विचारीत होतें, महाराजांना काय औषध द्यावें म्हणून !

चंद्र०—कसलें औषध, आणि कसला विचार ! या म्हातारीला बाहेर घालवून द्या कसे ! **संस्तावक** ! मीं तुम्हांला सांगितलें होतेंना, कीं कोणाला आंत येऊं देऊं नका म्हणून ?

संस्ता०—महाराज ! मी त्यांना अगोदरच सांगितलें कीं आंत येऊं नका, नाहीं तर महाराजांची मर्जी जाईल !

चंद्र०—तर मग ही कशी आली ?

यशो०—मीं येईनच म्हटलें, तर माझा हात धरण्याची कोणाची छाती आहे ? त्यांच्याकडे कांहीं दोष नाहीं. दोष असेल तर मजकडे असेल ! महाराज ! मी कशाकरतां आलें हें समजलें का ? मी म्हणतें याकडे नीट लक्ष द्या. मी आपणाला लहानाचें मोठें केलें, आणि आपल्या बाळ्यांतच

१. लहान मुलास स्वाभाविक.

माझा सारा जन्म गेला. तेव्हां मी कांहीं आपणाला वाईट सांगेन, हें मनांत आणूं नका. ही **यशोदा** दुसऱ्यांप्रमाणें तोंड देखल्या बोलणारी नव्हेहो. खऱ्या गोष्टी सांगेल. मग त्या रुचोत किंवा न रुचोत. ऐकतांना ? मी कोणाचा निरोप घेऊन आलें, समजलें का ? बाईसाहेबांकडून !—अहारे ती माउली ! माउली पण माउली !

चंद्र०—माउली ! कोण माउली !

यशो०—आमच्या स्वामिणी, महाराजांची पत्नी **इंदुमती** बाईसाहेब ! खोटी का माउली आहे ती ! खरीच माउली ! कोणीं म्हटलें ती माउली नाहीं म्हणून, तर मी लागलींच त्याचें शासन करीन. इतकेंच, मला दाढी मिशी नाहीं !

चंद्र०—इला द्या कसे बाहेर लावून!

यशो०—पाहतें बरें कोणाची प्राज्ञा आहे स्त्रीच्या अंगाशीं झोंबायला ! मला कोणी बाहेर नको घालवून द्यायला. माझी मीच होऊन जाईन. पण ज्या कामाकरितां मी आलें तें करीन आणि मग जाईन. महाराज ! त्या माउली बाळंत झाल्या आणि त्यांना हें कन्यारत्न झालें. पाहिलेंतका, हें त्यांनीं आपणाला समर्पण केलें आहे. (मुलीला चंद्रकांतापाशीं ठेवते.)

चंद्र०—जातेस कीं नाहीं येथून निघून ! तूं राक्षसी आहेस !—द्या इला बाहेर घालवून निघ येथून ! ए लुच्चे कुट्टिनी !

यशो०—महाराज ! आपण काय बोलतां हें ? कुंटणीचें काम कोणीं केलें ? मी कुंटीण नव्हें. आपणाला मात्र खचित वेड लागलें. वेडे झालां, तेव्हां जें बोल्यल तें शोभतेंच आहे.

चंद्र०—काय ! सर्वच हरामखोर झालां काय ? इला नाहींका कोणाच्यानें बाहेर हांकून देववत ? हें जारिणीचें कारटें आहे. हें द्या कसें तिजजवळ. **संस्तावक** ! तुम्हीं इतके अबलेला काय भितां ? द्या द्या तें तिजजवळ !

यशो०—हें कन्यारत्न तसें नव्हे. महाराजांनीं जो अमंगळ शब्द त्यास लाविला, त्याप्रमाणें तें आहे असें म्हणून त्याला हात लावण्याची कोणाची पुण्याई आहे ती पाहतें ! हात जळून नाहीं जाणार ?

चंद्र०—कायरे तुम्हीं असें स्त्रीला भितां ?

यशो०—स्त्रीचें भय आपणाला असतें, तर आमची माउली कारागृहांत कां असती ! आणि आपण तरी आपल्या पोटच्या पोरांना, आपलीं नव्हेत असें कसें म्हटलें असतें ?

चंद्र०—सारे गुलाम खोटे !

संस्ता०—महाराजांच्या पायांशपथ मी नाहीं खोटा !

यशो०—हे नाहींत खोटे, मीही नाहीं खोटी. येथें एक प्राणी मात्र खोटा आहे! तो कोणता, तर महाराज स्वतःच! खोटे कां नाहीं म्हणूं यांना, कीं जे आपण स्वतःच्या आणि राणीसाहेबांच्या कुळांना व्यर्थ डाग लाविताता ? काय ? नंदन, हें कन्यारत्न, हीं आपलीं नाहींत असे म्हणतांना जीभ गळून कशी नाहीं पडत ! हरहर ! ही जिव्हेची धार तरवारीच्याही धारेहून तीक्ष्ण आहे ! काय म्हणावें तरी काय यांना, कीं जें वेड यांच्या माथ्यांत शिरलें,

तें कांहीं केल्यानें निघत नाहीं ! काय हा दुराग्रह !

चंद्र०—कसें तोंड चाललें आहे पहा या थेरडीचें. सर्व सोडून दिलें, आणि येथें मला आली त्रास द्यायला !—हें कारटें माझें नाहीं, या सुधन्व्याचें आहे. चल, ना येथून याला घेऊन, . आणि त्याला आणि त्याच्या आईला दोघांन्हीही डोहांत नेऊन बुडव कशी !

यशो०—महाराज ! हें कन्यारत्न आपलें आहे ! आणि म्हणतात तसेंना बापाप्रमाणेंच आहे. पाहिलेंतनाहो सरदार ! हें लहान आहे पण बापाची थेट प्रतिमा ! नाक, डोळे, तोंड, कपाळ, ही हनवटी, हे गाल, हे हात, हीं बोटें, नखें, सर्व महाराजांच्या सारखींच. हें पहा हंसणेंही त्यांच्या सारखेंच! देवा ! बाहेरून ही कन्या जशी महाराजांसारखी आहे, तशी आंतून मात्र नसावी अं! नाहीं तर इलाही आमच्या महाराजांप्रमाणें आपल्या पतीविषयीं संशय येईल !

चंद्र०—काय किटकीट लाविली आहे या थेरडीनें ! इचें तोंड नाहीं का कोणी बंद करीत ?

संस्था०—महाराजांच्या सांगण्यानें जी ऐकत नाहीं, ती आमचें ऐकेल काय ?

चंद्र०—पुनः एकदा सांगतों द्या कशी इला घालवून !

यशो०—महाराजांच्या तेवढेंच आहे हातीं ! स्त्रीला घालवून देण्यांत कांहीं पुरुषार्थ नाहीं.

चंद्र०—आतां जा, नाहीं तर तुला सुळावर द्यायला सांगेन.

यशो०—हं सांगा. मी थोडीच भितें आहें ! सुळावर स्त्रीला चढविलें, तर आपणालाच हे काय म्हणतील, याचा विचार करा ! मीं आपणाला नांवें ठेऊं नये. पण आपणच पहा, आमच्या बाईसाहेबांचा कसा छळ करीत आहां तो! त्यांच्या खोटेपणाविषयीं आपणाला काय बरें साक्ष मिळाली आहे ? आपली निराधार कल्पना इतकीच ना ? हें असें करतां, तेव्हां लोक काय म्हणतील याचा विचार करा. हा नाहींका छळ ? हें असें करणें आपणाला शोभतें तरी? पहा हो! सर्व जन राकरितां आपला मनातल्या मनांत तरी धिक्कार करितील, हें पक्कें लक्षांत ठेवा !

चंद्र०—मी सांगतोंना मघांपासून कीं इला बाहेर घालवून द्या म्हणून? काय पीडा माझ्या पाठीमागें लागली पहा ! ही म्हणते मी छळ करित आहें. तिला ठाउक आहे कीं, मी कांहीं बोललें तरी माझ्या केसाला धक्का लागणार नाहीं, म्हणून हें असें तोंड सुटलें आहे.—बाई ! कृपा कर आणि मला आतां सोड कशी !

यशो०—मी जातें. माझ्या अंगाला हात नाहीं लावतां कामाचा कोणीं, समजले ? मी नको असेन तर जातें. महाराज ! या लेंकराकडे कांहीं बघा. हें आपलें आहे ! देवानें प्राणी जन्माला घातला आहे, तेव्हां त्याची तोच काळजी घेईल. आम्हीं कोण घेणार ? इतके तुम्हीं येथें अहांना, पण एकाच्याही हातांतून महाराजांचें बरें करवणार नाहीं. तुम्हां सर्वांमध्यें तोंडपुजेपणा भरला आहे! ठीक आहे. माझी महा-

राजांना कटकट झाली, तेव्हां मी जातें! (जाते.)

चंद्र०—गेली एकदाची कटकट! संस्तावक! इला तुह्मीं सांगितलें इकडे यायला! तुमचे मोठें कोवळें अंतःकरण, नाहीं? घेऊन इला कसें या पोराला आणि मारून टाका! तुह्मींच याला ठार मारिलें पाहिजे! दुसऱ्यानें कोणी नाहीं करतां कामाचें! उचला कसें, आणि घटकेच्या आंत मला सांगायला या कीं काम केलें ह्मणून, आणि कांहीं खूणहा बरोबर घेऊन या! नाहीं तर तुमचा प्राण राहील, असें समजूं नका. तुमच्या मनांत हें काम नसेल करायचें, आणि माझा राग पुरवत असेल, तर बोला तसें! ह्मणजे मीच या कारटीचें त्या फरशीवर डोकें ठेंचतो! चला घेऊन चला! तुह्मींच त्या यशोदाबाईला सांगितले, महाराजांकडे जा ह्मणून!

संस्ता०—महाराज! मीं नाहीं सांगितलें! हेच साक्ष देतील. विचारावें पाहिजे तर महाराजांना!

१ सर०—महाराज! त्या आल्या, त्यांत यांचा कांहीं दोष नाहीं.

चंद्र०—तुह्मी सारे खोटे आहां!

सर०—महाराजांनीं आमचें कांहीं तरी खरें मानावें. महाराजांची सेवा आह्मीं इमानानें करीत आहों. त्या सेवेकडे कांहीं तरी दृष्टि असावी. महाराजांच्या पायां पडतों, आमच्या सेवेकडे महाराजांनीं कांहीं लक्ष द्यावें, आणि हा बेत रहित करावा! महाराज! या अघोर कृत्यापासून कांहीं तरी अनर्थ ओढवेल. महाराजांनीं एवढी विनंती मान्य करावीच!

चंद्र०—वहा! माझी स्थिति कांहींच चमत्कारिक झाली आहे.

श्लोक.

वाटे मला न सहसा शिशुसी वधावें,
वाटे पुन्हां मजसि तें न जगीं रहावें;
ऐसें द्विधा मन करी न विनिश्चयातें,
व्योमीं विभिन्न पन जैसि विरुद्धवातें.

काय हो संस्तावक! तुह्मांला या अर्भकाची मोठी दया येते, नाहीं? तर याला वांचवावें ह्मणून काय कराल?

संस्ता०—महाराज जें सांगतील, आणि जें माझ्या हातून होण्यासारखें असेल तें करीन! फार तर काय? महाराजांनीं ह्मटलें तर मी आपला जीव देईन, आणि या बालास वाचवीन.

चंद्र०—मी सांगेन तें तुमच्या हातून होण्यासारखें आहे! वहा माझ्या पायांची शपथ, की हें काम करीन.

संस्ता०—महाराजांच्या पायांशपथ हें काम करीन.

चंद्र०—पहा बरें. लक्षांत ठेवा. हें आतां केलेंच पाहिजे. नाहीं तर तुमचा प्राण जाईल. इतकेंच नाहीं, तर तुमचें घरदार चीजवस्त, सर्व कांहीं नाहींसें होईल. तुह्मीं असें करा.

श्लोक.

न्यावें बालक हें विदूर सहसा, देशांतरीं टाकिजे,
आलें येथ जसें अतर्कित, तसें तेथें तुह्मीं सोडिजे;
ज्यानें जन्म दिलें करील विधि तो त्याचें न कां रक्षण?
आज्ञाभंग जरी घडेल समजा वांचाल नैकक्षण!

संस्ता०—महाराजांची आज्ञा शिरसा वंद्य आहे. पण यापेक्षां मृत्यूची शिक्षा सदयझाली असती. गरीब बिचारें बाल! निर्जनीं वनीं याचें कोण रक्षण करील? पण शकुंतांनीं जसें मेनकात्मजेचें संरक्षण केलें. तसें याचेंही कोणी करील! कारण,

॥ श्री ॥

नाट्यकथार्णव मासिक पुस्तकांत छापत असलेलें

प्रेमगुटिका नाटक.

(त्र्यंकी.)

हें पुस्तक

शंकर मोरो रानडे बी. ए.

यांनीं

मूळ इंग्लिश ग्रंथाधारें केलें.

तें

मुंबईत

" नेटिव ओपिनियन " छापखान्यांत छापिलें.

(सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधी सर्व प्रकारचे हक्क ग्रंथकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत.)

शके १८०२.

सन १८८१ इ०.

पात्रें.

अंणासाहेब नगरकर .... एक संभावित गृहस्थ.

गोविंदपंत .... खांचे कारकून.

सखोपंत .... एक हेंगो आहे.

सदूभट .... औषधें घोंटणारा.

गंगू .... अंणासाहेबांची भावी बायको.

सखू .... गोविंदपंताची भावी बायको.

स्थल.—मुंबई शहर.

प्रेमगुटिका नाटक.

अंक १.

स्थळ—मुकुंदशेटीची वाडी. सखोपंत वैद्याच्या घरांतील एक दिवाणखाना.

(गंगू घाईघाईनें प्रवेश करिते इतक्यांत समोरुन सखू येते.)

गंगू—अग **सखू! सखू!** तूं मेली इतकावेळ कुठेंग होतीस? मेल्या तुला हांका तरी किती माराव्यात?

सखू—कां पण इतकी घाई कशाची झाली? मीं कांहीं कुठें लांब नव्हतें गेलें. आंतल्या मोरीवरच होतें. पण बाई बाई! ही कोण तरी घाई! तूं हांका मारूं लागलीस तेव्हांपासून मी एक मिनिटभर एकसारखी घड्याळाकडे पहात होतें, तों तुझ्या अगदीं नाहीं तरी पंचवीस तीस तरी हांका झाल्या असतील. असें काम तरी काय होतें?

गंगू—हा मेले, काम कसलें? पण आतां किनई मी आपली सहज खिडकींतून रस्त्याकडे पहात होतें, इतक्यांत बाई! समोरून कोणी गेलें!

सखू—हात् त्याच्या! यांत तें काय मोठें आहे? रस्त्यांतून मेलीं हजारों माणसें जात असतात, त्यांतलेंच कोणी तरी असेल!

गंगू—मेले, असें ग काय तूं जेव्हां जेव्हां करतेस? रस्त्यांतून इतकीं माणसें जातात येतात म्हणून दरेकाबद्दल का मी तुला हांका मारितें? मेली कांहीं तरी बोलतेस!

सखू—असें असें! आज इतके महिने आपल्याला मुंबईस येऊन झाले, पण आजपर्यंत बाई अशी घाई तुला कधींच झाली नाहीं! आणि आजच तें काय नवें झालें आहे?

गंगू—पुरेग मेली तुझी जेव्हां तेव्हां अशीच थट्टा! खरेंच, पण तूं माझें नाहींका ऐकत? जा मेली, नाहीं तर नाहीं जा! आतां फिरून मी तुझ्याशीं कधीं कधीं दिवाळ बोलायची नाहीं! (रुसलीसें दाखविते.)

सखू—(मोठ्यानें हंसून) अहाहा! पुरेपुरे! तें सगळें सोंग मला समजतें! ऐकिलेंका? म्हटलें तुझीनू माझी गांठ कांहीं आजकालची नाहीं! अगदीं नाहीं म्हटलें तरी तूंनि मीं आज तेरा वरसें एकठिकाणीं एका घरांत काढिलीं आहेत! आहेका आठवण?—कां **रुसवाबाई!** तुम्हांला माझ्याशीं बोलायचें आहे का नाहीं! पहा बरें आपला विचार पहा! तूं माझ्याशीं नाहीं बोललीस तर मी पण तुझ्याशीं बोलणें टाकून देईन!—जा मेलें!—(रुसून दुसरीकडे तोंड करून उभी रहाते.)

गंगू—(वांकड्या दृष्टीनें सखूकडे पाहून तिला ऐकूं येई इतक्या मोठ्यानें) जा तर जा. मी आपली इथेंच उभी राहून हीं चित्रें पहातें. (भितीकडे पहात राहिलीसें करून) अग बाई! इथें इतकीं चित्रें आहेत, यांमध्यें—हं—या मेल्या **सदूभटाचें** चित्र तें कुणीं कशाकरितां काढिलें आहे? इश्श—थूः त्याच्या तोंडावर! मेल्याच्या नाकांतून शेंबूड पहा किती बाहेर

निघाला आहे ?—हं हं—तरी झटलें यानें इतका शेंवूड सांठवून कशाकरितां ठेविला आहे ? आतां समजलें, हा सगळा शेंवूड लगीन झालें झणजे आमच्या **सखूबाईंना** आंदण मिळायचा आहे !

संखू—(तें न ऐकिल्येसें करून) काय बाई, एकूण चितारी तरी मोठा कसबी खरा हो ! त्यानें हें इथें त्या थेरड्या **सखोपंता**चें चित्र काढिलें आहे, त्याच्या डोळ-ंला किती हीं चिपडें आलीं आहेत ! नाकांतून गळ पण किती चाललें आहे ! कपाळावरलीं घामगळवें फुटलीं आहेत त्यांतून हा कित्ती पण पू वहातो आहे ! इश्शग बाई! याच्या तोंडाकडे पाहून मला तर बाई ओकारी आली आहे !—ओ य्या—थूः—थूः—आणखी हें असलें घाणेरडें तोंड सगळ्येच्या सगळेंच आमच्या **गंगूबाई**च्या तोंडाला चिकटायचें!! थूः—थू—:—

गंगू—(रागावल्यासारखें दाखवून) कांग ए मेले चहाटळी ! तोंड नाहीं का थांवत ? तूं माझें ग काय झणून नांव घेतेस ?

सखू—तुझें नांव घ्यायला इथें कोणाचें खोळंबलें आहे ? ज्यानें माझें नांव घेतलें असेल, त्याचें मी पण नांव घेतलें असेल. त्याशीं तुला काय करायचें आहे ?

गंगू—मला कांहीं करायचें नाहीं. पण तूं माझें कां नांव घेतलेंस ?

सखू—तुलीं माझें घेतलें, झणून मी तुझें घेतलें. आतां झालींना फिटासफीट ?

गंगू—हो! अशा इतक्यानेंच होती आहे तर!—तूं माझें नांव घेतलेंस तें एक असो, पण खाबरोबर त्या थेरड्याचें नांव घ्यायला कुणीं सांगितलें ? त्याच्याशीं माझें लगीन थोडकेंच व्हायचें आहे !

सखू—झालें, तुझ्याच बोलण्यावरून तर मग ठरलें कीं जर माझें त्या **सदूभटाशीं** लगीन व्हायचें नाहीं, तर मलाही कुणीं असें बोलूं नये ? असें असून तूं तसलें बोलणें कां बोललीस?

गंगू—अग, तें मीं आपलें उगीच थेट्टेनें झटलें.

सखू—झालें तर मग, मीही बोल्लें तें थेट्टेनेंच बोल्लें !

गंगू—तर मग आपण पहिल्यासारख्याच मैत्रिणी आहों हें खरेंना ?

सखू—अग, खरें झणून काय विचारतेस ? तें मीं नाहीं कधीं झटलें होतें ?

गंगू—बरें तर मग तूं नी मी पहिल्यासारख्या गडणो अं ! (एकीमेकींत मिठ्या मारितात.)

सखू—बरें तर **गंगूताई** ! आतां मला सांग मघां तूं कुणाला पाहिलें झणालीस ?

गंगू—(हंसत हंसत) अग, दुसऱ्या कुणाला ? तुला ठाऊक नाहीं का पर्वांच्या दिवशीं आपल्या खिडकीखालनं कोण गेलें तें ?

सखू—हं हं—एकूण तूं **अंणासाहेब नगर**करांना का पाहिलेंस ? आलीकडे आठ पंधरा दिवसांत किनई बाई त्यांच्या आपल्या या घराबरनं दिवसांतून निदान दहा वीस तरी खेपा होतात. पण हें अजून त्या थेरड्या **सखोपंता**च्या लक्षांत कसें आलें नाहीं कांहीं समजत नाहीं. वास्तविक झटलें तर त्याच्या या माडीवर एकसारख्या धिरड्या होत असतात, तेव्हां त्यानें **अंणासाहेबां**ना केव्हां नाहीं केव्हां तरी पहावें !

गंगू—अग दिवसांतून दहा पंधराच खेपा ह्मणतेस, पण मघां एक वाजलाना, तेव्हांपासून तों आतां इतक्यांत दोन वाजेपर्यंतच त्यांच्या माझ्या खिडकीखालून दहा तर खेपा झाल्याच! पण गडे तुला एक सांगायचें आहे तें तूं थट्टेवारी नेणार असलीस तर नाहीं सांगत.

सखू—असेंग काय करतेस? थट्टेची वेळ आतां का आहे? मघ ची गोष्ट मघां.

गंगू—बरें तर सांगते अं—ते माझ्या खिडकीखालून जातांना प्रत्येक वेळीं त्यांची दृष्टि खिडकीकडे कशी अगदीं खिळून राहिली होती; नू गडे तुला काय सांगूं? ते माझ्याकडे अशा कांहीं चमत्कारिक मुद्रेनें पहात होते कीं, माझ्यानें बाई कांहीं खिडकींतून पाय कसा तो काढवला नाहीं!

सखू—अग, असें होतेंच तें. आन् खरें ह्मटलें तर कां बरें नाहीं होऊं! धडधडीत तुझें नि त्यांचें लग्नाचें दिवील ठरलें होते, पण इतक्यांत काका वारले त्यामुळें हा इतका सगला घोटाळा झाला. असो; पण कायग, **अंणासाहेबां**बरोबर त्यांचे ते कारकून होते?

गंगू—नाहीं, पण दुसराच कोणी एकजण होता, त्याला मीं कधीं पूर्वी पाहिलेलें आठवत नाहीं. ते दोघे एकमेकांशीं कांहीं तरी जरूरीच्या कामाचे बोलत होते.

सखू—हें कोण तरी असावें बाई?

गंगू—कोणी का असेना! पण किनई गडे मला एक मात्र मोठें आश्चर्य वाटलें, तें असें कीं तो गृहस्थ त्याच्याशीं बोलत असतां त्यांच्या हातात एक पत्र होतें, तें त्यांनीं कोणाच्या समजुतींत न येई अशा बेतानें मजकडे पाहून वर उचललें, पण त्याला माझा हात पोंचायसारखा नव्हता, तेव्हां माझा कांहीं उपाय चालेना.

सखू—हं—आतां मी सगळें एकूण एक समजलें. तो गृहस्थ कोण तें मला ठाऊक आहे. अग, तेच तें **अंणासाहेबां**चे कारकून.

गंगू—(हंसून) अग त्यांच्या इथें कारकून पुष्कळ आहेत. त्यांतले हे कोण ह्मणून समजावें वाई?

सखू—(हंसून) तूं तरी बरेंच खोदून विचारायला शिकलीस! अग, तर मग मीच तुला विचारतें. तूं 'त्यांच्या इथें' ह्मणून ह्मणालीस तें ग कोण?

गंगू—(रागावल्यासारखें दाखवून) पुरे मेलें? मला असलें नाहीं बोलणें आवडत!—बरें ते कारकून कोण **गोविंदपंत** वाटतें?

सखू—हुं. (खुणेनें होय असें सुचविते.)

गंगू—अग, तुला आलीकडे बरेच तर्क करतां येऊं लागले. हे तर्क तूं कोणाजवळ शिकलीस?

सखू—कुठे नाहीं. आज सकाळीं वामेंत **सदूभटा**ला कुतरें चावलें, तेव्हा मी कशालाशी मागच्या शेरीच्या बाजूला गेलें होतें, तेथें **अंणासाहेबां**ची आणि त्या कारकुनांची भिंतीच्या बाहेरल्या अंगाला गुणगुण चालली होती, ती कांहीं अर्धीमुर्धीशीच मीं ऐकिली. पण इतक्यांत **सदूभटा**चा आरडाओरडा झाला, तेव्हां ते झटदिशीं दोघे दोहींकडे निसटले.

गंगू—असतील. बरें मग पुढें काय ह्मणतेस?

सखू—पुढें कांहीं नाहीं. तें कारकून कांहीं आमच्या शेरड्याच्या ओळखीचे नाहींत,

तेव्हां ते कांहीं तरी मिषानें आपल्या घ
येणार आहेत. तेव्हां मीं तर बेत के
आहे, कीं होतां होईल तितकें कर
त्यांचा बेत सिद्धीला न्यायचा ! कार
या थेरड्या **सखोपंतानें** आपणा दोघींन
ही फसवून इथें आणिलें, त्याबद्दल त्यांच
मनांत त्याला फसवायचें आहे, तेव्
त्याला आपली दोघींचीही मदत झाली
पाहिजे.

गंगू—तुझें म्हणणें मलाही खरें वाटतें. या मेल्य
बाबा मेल्यावर त्यांची मुलगी ती माझी
मुलगी म्हणून हव्यातितक्या गप्पा ठोकल्
बाबांचा आपणावर विश्वास, तेव्हां कां
दिवसांनीं आपणच माझें लग्न जुळल्याप्रमा
लावून देऊं म्हणून सांगून मला न् तु
आपल्या गांवीं न्यायकारितां म्हणू
बाहेर काढिलें. तें कसचें का
न् कसचें काय, मेला आपल्या
मुंबईस घेऊन आला, आणखी तुरुंग
ज्याजपेक्षां बरा, अशा रीतीचा आप
दोघींनाही जाच करीत आहे !

सखू—झालें तर मग, मीं मनांत आणिलेला बे
तुलाही आवडला ! आतां ठीक जमलें
पण हें समजलींसका **गंगूबाई** ! हा नवी
बेत पार पडेपर्यंत तुला न् मला दोघींन
ही अंमळ निर्भिडपणा पत्करला पाहिजे हे

गंगू—बरें, तूं म्हणशील त्याच्या बाहेर कां
मी नाहीं.—पण गडे **सखू** ! तें मघांश
तुला पत्राचें सांगितलें, त्यांत काय लिहि
आहे तें कळायला काय बरें युक्ति करावी

सखू—अग, तें **अंणासाहेबां**चें पत्र, त्यां
काय लिहिलें असायचें तें मला ठाऊ
आहे. अग, त्यांत दुसरें तें काय असायचें
पुरुषांचीं स्त्रियांवर किंवा स्त्रियांची पुरुषांवर मनें बसलीं, म्हणजे तीं एकमेकांना जें लिहितात, तेंच! आणखी काय? तेव्हां जरी तें पत्र मीं वाचलें नाहीं, तरी त्यांतलें एकूण एक अक्षर मला ठाऊक आहे. तर आतां असें कर, हा इथें त्या थेरड्याचा रुमाल पडला आहे, त्यांतला हा कागद न् हें पाकीट घे, न् आत्तांच्या आत्तां उत्तर लिहून तयार ठेव.

गंगू—वाहवाग, पत्र वाचल्याखेरीज ग कसें कसें उत्तर लिहावें ?

सखू—तुला काय ? पत्र लिहून तयार ठेव, आणखी तें पत्र आल्याबरोबर हें पत्र देऊन टाक म्हणजे झालें. तूं असें पहा, आतां आपण माडीवर आहों म्हणून कांहीं नाहीं, पण खालीं आपल्याला इकडे तिकडे हिंडायचा तरी त्या थेरड्यानें किती पण बंदोबस्त केला आहे. तो तुझ्या आहेना ठाऊक ? झालें तर मग त्यांच्या कडचें पत्र येईल, तें तूं वाचशील, नंतर उत्तर लिहिशील, इतक्या गोष्टी व्हायला वेळ किती लागेल याचा कांहीं तुला आहे-का अजमास ? म्हणून आपली तुला सांगतें, तूं आतांच पत्र लिहून ठेवशील तर बरी, म्हणजे तें पत्र आल्याबरोबर हें द्यायला बरें पडेल.

गंगू—तें खरें, पण जर एकादवेळ चुकून त्या थेरड्याला कळलें कीं मी चोरून बाहेर पत्रें पाठवीत असतें, तर मग उगीच रिकामी पंचाईत नाहीं का व्हायची ?

सखू—अग, कसली पंचाईत घेऊन बसली आहेस ?—तरी बरें, तुला तसें भय वाटत असेल तर राहूंदे. मीच पत्र लिहितें म्हणजे

तर झालें कीं नाहीं? एकादे वेळ आलीच पंचाईत, तर आहे अक्षर माझें, तेव्हां त्याबद्दल झाला त्रास तर मला होईल. तूं कांहीं काळजी करूं नको. आतां वेळ नाहीं. तो थेरडा बाहेर गेला आहे तो परत येण्यापर्यंतच काय तें सगळें आटपायला पाहिजे. (कागद घेऊन लिहूं लागते.)

गंगू—अग, तूं ल्याहायला लागलीस खरी, पण—

सखू—आतां थांब. मध्यें बोलून मला उगीच चुकवूं नको.

गंगू—बरें नाहीं चुकवीत.—पण तूं लिहिते आहेस काय, तेवढें तर सांगशील?

सखू—कांहीं सांगायला नको. (लिहीत) अगदीं तुझ्या मनांत आहे तेंच लिहितें आहे.

गंगू—हो, तुला कळतें आहे माझ्या मनांतलें, घे!

सखू—घे तर घे. पण मी मनकवडी आहे ठाऊक असूंदे. (पत्र पुरें करते.)

गंगू—झालें का इतक्यांत लिहून पत्र? आण इकडे मला वाचूं दे खरी.

सखू—आतां वेळ नाहीं. एकदा लिहिलें तें लिहिलें, त्यांत आतां उगीच खोडाखोडी नको. (पत्र बंद करते.) या इकडल्या अंगच्या खिडकींतून पहा—तें बघ तिथें कोण उभें आहे तें. मी आतां जाऊन पत्र देऊन येतें!—अग बाई! पण ही आज नवीनच पंचाईत झाली! त्या मेल्या **सदूभटाला** कुतरें चावल्यापासून त्यानें मेलें त्या अंगालाच जसें कांहीं धरणें घेतलें आहे.—कांहीं चिंता नाहीं.—त्याचींच अंमळशीं आजवें करून पहातें कांहीं उपयोग झाला तर! मेल्यानें घरांतल्या सगळ्या किल्ल्यानं किल्ल्या आपणापाशीं घेऊन ठेवल्या आहेत!—(हांका मारते.) अहो **सदूभट**! अहो **सदूभटजी**!

गू—ए **सखूबाई** ए— तूं त्याला हांका मारिते आहेस, पण त्या थेरड्याने त्या भटाला आपलीं वैद्यक्रियेचीं औषधें तयार करायाला बशिवलें आहे, तेव्हां तूं त्याला हांका मारल्यास, तर तो न् ह्यातारा रागवायचे नाहींत का?

सखू—रागावेनात रागावले तर? तेवढी खोटी झाली, तर औषधें तरी कमी तयार होतील, आणखी लोक विचारे या थेरड्याच्या औषधानें विनाकारण मरतात, ते मरावयाचे नाहींत! तुला नाहीं का आठवत, आपले **काका** त्या थेरड्याच्या औषधानेंच मेले ते?

गू—पुरे गडे, तूं ती आठवण काढून मला वाईट वाटवूं नको. (डोळे पाण्यानें भरून येतात.) इतक्यांत जिन्यांत पावलें वाजलेलीं ऐकूं येतात.)

सखू—(पावलें ऐकून हलक्यानें) हां आतां रडणें पुरें कर! तो मेला भट आतां इतक्यांत वर येईल! (गंगू डोळे पुसते.) तो आला म्हणजे मी त्याची करणार आहें जराशी थट्टा. त्यामध्यें जराशी तूं पण शिर हो! समजलीस?

गू—बरें.

(नक्यांत सदूभट लंगडत लंगडत येतो. त्याच्या डाव्या डोळ्यावरून फडकें लपेटलें आहे, व उजव्या पायालाही फडकें बांधिलें आहे.)

दू०—(रागानें) कायग ए पोरी! मला कशाला हांक मारिलीस? तुझी हांक ऐकून मी असा वळून पाहूं लागलों, त्या घाईत माझा सगळा काढा सांडून गेलाना!

सखू—ह्मणून काय झालें ? आपली वैद्यक्रिया तर मोठी आहे कीं नाहीं ?

गंगू—आणखी आपले गुरु आमचे वैद्यबोवा—त्यांना काय कमी लागलें आहे ? हा काढा सांडला तर आणखी करावयाला सांपडेल !

सदू०—काय करावें ? तुमच्यामुळें माझा सगळा काढा सांडून गेला ! आतां वैद्यबोवा परत आले ह्मणजे मला नवीन काढा करून देतील थोडाच ! हा काढा माझाच पाय शेकण्याकरितां मी तयार करीत होतों. माझा पाय अजून दुखतो आहे, आणखी तो कुत्रा पिसाळला नव्हता अशी अजून कांहीं मला मनाची खातरी होत नाहीं.

सखू—भटजी ! कुत्रा पिसाळला असता, तर त्याच्या विषाचे वेग कुठें इतका वेळ वाटायला राहतील ? भलतेंच कांहीं तरी. मी तुह्मांला खचित सांगतें, तुह्मीं त्या कुत्र्याला मारून बसलां, नाहीं तर तो पिसाळला नाहीं नू कांहीं नाहीं अशी तुमची केव्हांच खातरी होऊन गेली असती!

सदू०—माझा कांहीं उपाय नव्हता. वैद्यबोवांनीं सांगितलें त्याला मार, ह्मणून मीं त्याला मारून टाकिलें.

सखू—वैद्यबोवांनीं योग्यच सांगितलें ! पिसाळलेला कुत्रा चावला असताही मीं मनुष्य बरा केला ह्मणून डौल मारायला त्यांना एवढीं कसें सांपडलें असतें ?

सदू—पोरी ! गप्प बस ! खबरदार माझ्या गुरुजींबद्दल कांहीं वेडेंवाकडें बोलशील तर !

सखू—बरें, नाहीं बोलत. पण मला एक सांगा. तुमचा डोळा दुखत होता तेव्हां त्याला औषध कुणाचें घेतलें ?

सदू०—घरचे औषध असतां बाहेर जातो कोण लेंक ? आमच्या वैद्यबोवांचेंच औषध घेतलें, त्यायोगानें आतां डोळ्यांला तसला विकार ह्मणून कधीं होणार नाहीं.

सखू—असें जर आहे, तर तुह्मीं डोळ्यांवरून फडकें कशाकरितां बांधतां ?

सदू०—कशाकरितां ह्मणजे तुला नाहीं कां ठाऊक ? आंत डोळाच मुद्दल नाहीं तो झांकण्याकरितां हें फडकें बांधावें लागतें !

सखू—एकूण आमच्या वैद्यबोवांनीं तुमचा डोळा बरा केला तो असाच वाटतें !

सदू०—ह्मणून काय झालें ? माझा डावा डोळा दुखूं लागला, तेव्हांच मी वैद्यबोवांना तो दाखविला, तेव्हां त्यांनीं तो पाहून मला सांगितलें कीं, हा डोळा तर जायचाच, पण याच्यामुळें दुसराही आहे तो जाईल, तेव्हां दोन्ही जातील त्याच्या अगोदर हाच काढून टाकला ह्मणजें कटकट चुकली !

गंगू—तेव्हां एकूण आमच्या वैद्यबोवांनीं आपल्या विद्वत्तेच्या जोरावर तुह्मांला **शुक्राचार्यच** बनविलें ह्मणायचें !

सदू—गप्प बस तुला यांतलें काय समजतें आहे ? माझा एक डोळा गेला ह्मणून तूं मला **शुक्राचार्य** ह्मणतेस, पण वैद्यबोवांनीं, हाताशीं पैसे आलेह्मणजे टिरचरच्या दुकानांतून फट क्लास कांचेचा दुसरा डोळा आणून देतों ह्मणून सांगितलें आहे, समजलीस ?

सखू—असें काय ! पण कायहो, भटजी ! समजा, वैद्यबोवांनीं तुह्मांला आतां एक फक्कड डोळा आणून दिला, उद्यां एक चांगलेंसें नाक आणून लावलें, असे करितां

करितां तुह्मीं कांहीं दिवसांनीं मोठे फक्कड दिसूं लागाल, नाहीं?—पण, तुह्मांला खरेच सांगूं का? तुह्मीं पुढें फक्कड व्हा कीं नका होऊं, तुह्मीं आहां तसेच जरी राहिलां, तरी देखील तुह्मीं मला फार आवडतां!

सदू०—काय? मी तुला आवडतों? वाः गवा:! तूं आज बरीच माझी थट्टा करायला लागली आहेस? पण तुला कळलें का? हा **सदूभट** कांहीं अशा बोलण्यानें फसायचा नाहीं! तूं गोड बोलूं लागलीस, तेव्हां तुझें माझ्याशीं कांहीं तरी काम आहे म्हणून असें बोलते आहेस हें मी समजतों आहें पण!

सखू—वाहवाहो भटजी! आतां तुह्मीं बरीक माझी थट्टा करूं लागलां खचित! तुमच्याशीं नूं माझें तें काय काम असणार?

सदू०—अग, काम असणार हें कोणी पांच वर्षांचें पोर देखील सांगेल. काम नसलें तर—तूं? नांव कशाला—ज्याचें नांव तें—तूं माझ्याशीं शिवीगाळीशिवाय बोलशील?—अगे, पण तूं माझ्याकडे अशी काय पहाते आहेस? तुझ्या मनांत मी तुझ्याशीं लगीन करावें वाटतें?

सखू—वाहवाहो भटजी! आतां मात्र तुमचे अधिक अधिक तारे तुटूं लागले!—बरें, पण तें सगळें असूं द्या—माझ्या मनांत तुमच्या पाशीं कांहीं मागावयाचें आहे.

सदू०—हं हं—मी म्हणत होतों मघाशीं तें हेंच!

सखू—पण भटजी! असें काय बरें करावें? तुह्मीं आतांच्या वेळीं जर माझें ऐकाल, तर तुमचें आणि माझें सगळें भांडण काय असेल तें आपण काढून टाकूं कशीं?

सदू०—बरें तर मग, मग तुला काय मागायचें असेल तें. आमच्या वैद्यबोवांना बाईट न वाटतां देण्यासारखें असेल, तर मी तें खचित देईन.

सखू—बाइट तें कशाकरितां वाटेल! तुह्मीं जर त्यांच्यापाशीं बोललां नाहीं, तर त्यांना कधीं बारा नूं बारा चोवीस वर्षांत देखील कळायचें नाहीं!

सदू०—पण तें तसलें कांहीं व्हायचें नाहीं. मी जेवढें कांहीं होईल तेवढें त्यांना एकूण एक सांगत असतों. त्यानीं मला पगार देऊन जें जवळ आपल्या घरीं बाळगलें आहे, तें एवढ्याचकरितां. मी फुकट कोणाचा पगार घेत नसतों.

गंगू—एकूण तुह्मीं जर पैशाचे इतके लोभी आहां, तर हे घ्या मी तुह्मांला पांच रुपये देतें.

सदू०—छत्‌छत्! मी असा पैशाला झटणारा मनुष्य नव्हें हो! मला पाहिजे तें पैशाशिवाय कांहीं निराळेंच आहे!

सखू—हंहं, तें काय आहे तें ऐकूं तर द्या भटजी!

सदू०—हेंच तें काटिण! तूं असें मुद्दाम समजून उमजून वेड कां बरें पांघरतेस? तुला ठाऊक आहे, मला काय पाहिजे आहे तें.

सखू—वाहवाहो! तुह्मीं तरी बरेच आहांहो भटजीं?—बरें असो. तुह्मांला काय मागायचें असेल तें मागा, तें जर वैद्यबोवांना न कळतां देण्यासारखें असेल, तर—

सदू०—(टाळ्या वाजवून) हं—हं—तसेंच कांहीं

असले, तर मग नाहीं हो मी वैद्यबोवांना सांगत बसायचा !

गंगू—भटजी ! तुम्हीं **सखू**पाशीं काय मागत आहांत तें एकदा कळूं तर द्याल ?

सदू०—मी आतांच कांहीं फार मागत नाहीं, पण हिनें माझ्याकडे पाहून असा एक मुरका मारावा ! (आपण मुरका मारून दाखवितो.)

गंगू—शाबास भटजीबोवा ! तुम्हीं बायकांचे चाळे शिकायला कोणच्या शाळेंत गेलां होतां ?

सदू०—अग पोरी ! तुला यांतलें काय समजतें आहे ? भज्यां लाडवांचें दुकान घालण्यापूर्वी चार वर्षें या पठ्यानें नाटकांत काढिलीं, तरी पण कांहीं **सरस्वती**च्यापुढें अध्ययन नाहीं गेलें !

सखू—तें तुमचें पाहिजेल तें असो भटजीबोवा ! पण काय तुम्हांला मी मुरका मारायला पाहिजे ?—बेर तर तुम्हीं माझें काम करा, मग एक सोडून पन्नास मुरके मारीन, मग तर झालें कीं नाहीं ?

सदू०—आपल्याला बोवा असला उधारीचा धंदा करतां येत नाहीं. अगोदर पैसे, तेव्हां पुढें माल द्यायची गोष्ट !

गंगू—बरें तर, हे घ्या पैसे.

सदू०—अंहः--आमचे पैसे असले नव्हेत. आमचे पैसे मासाचे नू चांमड्याचे !

गंगू—तरी चिंता नाहीं. तसले पैसे तुम्हांला पाहिजे असतील, तर एकादिवस त्या वांद्र्याच्या कसाबखान्यांत जाऊन रहा म्हणजे पैसेच पैसे !

सदू०—कागे ए—तूं आतां मात्र फार बहकूं लागलीस ! तूं काय मला कसाब समजलीस होय ? तुला ठाऊक नाहीं हा पठ्या आगदीं अव्वल क्षेत्रस्थ आहे हें ?

गंगू—(आपणाशीं) नुसतें आपलें आपल्याला ब्राह्मण म्हटलें, म्हणजे का कुठें ब्राह्मणपण येत असतें ? मेल्यांनीं मसलती योजून आम्हांला आमच्या घरून काढून इथें आणिलें, तेव्हां हे मेले कसाब्राच्याही पलीकडचे नाहींका झाले ?

सखू—तें राहूंद्याहो भटजी ! हें मेलें रागावणें पुरे झालें आतां.—आतां काय तुम्हांला मुरका पाहिजे ? हा घ्या, आतां तर झालें कीं नाहीं ?

सदू०—थोडेंसें झालें, बरें आतां सांग तुझें काय काम आहे तें ?

सखू—मला थोडका वेळ रस्त्याच्या दरवाज्याची किल्ली पाहिजे.

सदू०—तेवढें बरीक व्हायचें नाहीं.

सखू—तें कां बरें ?

सदू०—त्याला पुष्कळ कारणें आहेत.

सखू—पण त्यांतलें एकादें तरी ऐकूं द्या पाहूं ?

सदू०—पहिलें असे, किल्ली मुळींच मजपाशीं नाहीं. ती वैद्यबोवा जातांना बरोबर घेऊन गेले.

सखू—(रागावून) भटजी ! एवढें मात्र तुम्हीं खोटें बोललां. किल्ली कांहीं वैद्यबोवा नाहीं घेऊन गेले. झालें—हेंच का तुमचें इमान?

सदू०—तुला माझ्या बोलण्याचा राग आला असेल तर आणखी एक मुरका मार पाहूं ?

सखू—जा मेल्या भाकडा ! तोंड काळें कर एकदाचें ! मीं म्हटलें भटजी मुली बाळींशीं कांहीं तरी भलेपणानें वागतील. पण हे भटजी काय !—हलकटांतली असामी !

सदू—तें तुला काय वाटेल तें म्हण. एकदा

बोललीस तें मीं ऐकून घेतलें. आतां फिरून बोल तर खरी, मुरक्याबद्दल मुकाच मागेन—आणखी घेईनही (किल्ली दाखवून मोठ्यानें हंसत हंसत निघून जातो.)

सखू—तळपट होवो तुझें मेल्या ! तुझा सत्यानाश होवो !

गंगू—काय ग गडे **सखू** ! तुझ्या या **गोविंदपंतां**चा—

सखू—आणखी या तुझ्या **अंणासाहेबां**चा !—कां त्यांचें नांव घ्यायला एव्हांपासून का लाजायाला लागलीस ?

गंगू—अग, तुझी जेव्हां तेव्हां अशीच थट्टा, हें काय बरें ? तुला ऐकायचें आहे कीं नाहीं?

सखू—बरें, बोलहो. आतां ऐकतें अं ? तूं काय ह्मणत होतीस ?

गंगू—दुसरें कांहीं ह्मणत नव्हतें. ह्मटलें आजचा हा जसा बेत फसला, तसाच जर **गोविंदपंतां**चाही फसला, तर तो मेला येरडा माझ्याशीं आपलें लग्न करून घेईल, आणखी तुझें त्या **सदूभटा**शीं लावून देईल!

सखू—तर तर ! मी नाहीं कधीं कबूल व्हायचीं! त्यापेक्षां मी विख खायलाही कमी करायची नाहीं.—पण तूं ग ?

गंगू—तुझ्यासारखेंच माझें ! (इतक्यांत सखोपंत येतो.)

सखो०—लुच्चे ! चोर ! पाजी !—हरामखोर ! गुलामांनीं मला ब्राह्मणाला इतक्या दिवस नादाला लावून अखेर असें फसविलें? काय करावें ? या वेळेस जाऊन एकाकाच्या नरडीचा घोंट घ्यावा असा संताप आला आहे !

गंगू—(पुढें होऊन) कां पण इतके रागावलां कशानें ?

सखो०—रागावलां कशानें ! गुलामांनीं—हरामखोरांनीं—पैशापरी पैसा खाल्ला, आंणखी अखेर मला डिग्री का डिक्री काय ह्मणतात ती मिळत नाहीं ह्मणून साफ सांगितलें! त्यांनीं मला बोलावून नेलें, आणखी मला मी कोण काय ह्मणून विचारलें, तेव्हां मी **आयुर्वेदशोधक** मंडळींतला वैद्य आहे ह्मणून आपलें सहज खोटें सांगून दिलें ! वास्तविक ह्मटलें तर त्यांत काहीं मोठें नाहीं ! मी त्यांतला नाहीं न् ते आहेत, तरी वास्तविक कांहीं दोघांत तफावत नाहीं ! दोघांची विद्वत्ता सारखीच !—तिथें कोणी एक बसले होते बूटपाटलेणवाले डाक्तर ! त्यांनीं मला **माधवनिदानां**तले दोन श्लोक विचारले, ते आयत्या वेळीं मला नीट सांगतां येईनात—पण तेवढ्यावरून त्यांनीं माझा असा अपमान करावा ?—पण त्या लेकांना असे कळेना कीं विद्येशीं आणि डिक्रीशीं काय संबंध ? राणीचा मुलगा इथें आला होता, तेव्हां त्याला नाहीं का त्यांनीं फुकटची डिक्री दिली ? त्याची परीक्षा थोडकीच घेत बसले होते ?

गंगू—वैद्यबोवा ! पण तुम्हीं त्यांना आपल्या वैद्यक्रियेचा थोडा तरी मासला सांगायचा होता कीं नाहीं ?

सखो०—होय, त्यालाही मीं कांहीं कमी केलें नाहीं. मीं त्यांना अगदीं साफ सांगितलें, तुमची बुकांतली वैद्यकी ! तुम्हांला अनुभव नाहीं न् तर्क नाहीं ! ह्मटलें, तुम्हीं रोग्याच्या पोटांत अन्न घालायची पाळी आली असतां तें तयार होस्तोंपर्यंत वाट पहातां, पण आमची खरी कोठें तुम्हांला ठाऊक आहे! रोग्याला अगोदरच तांदूळ न चावतां गि-

ळायला सांगावें, न गिळील तर पोट फाडून ते आंत भरावे. आणखी पाणी-विणी पाजल्यावर त्याला लोणाऱ्याच्या भट्टींत घटकाभर ठेवून शेंकून आणावें, म्हणजे तोंपर्यंत रोगी जिवंत असला तर पोटांत आयता भात शिजून तयार! नसलाच जिवंत, तर त्याचा आयुर्दाय संपला म्हणून म्हणावें म्हणजे झालें!

गंगू—(हंसून) शाबास! वैद्यबाबा! आजारी माणूस बरें करायची ही युक्ति मात्र छान सांगितलीत!

सखो०—अग, ही एकच्शी काय, एक सोडून दहा हजार युक्ति माझ्यापाशीं तयार आहेत, पण या लेकांना सांगून करायचें आहे काय? यांना काय समजतें? आणखी आपल्याला तरी वेळ मिळतो आहे कोठें? आतां या एक दोन घटकेंत अगदीं नाहीं तरी पंचवीस घरीं जायचें होतें, पण आतां नाहीं जात. मी पक्कें ओळखून आहें—मी गांवठी वैद्य असून मला यांच्या बरोबरीनें पैसे मिळतात म्हणून हे डाक्तर मला पाण्यांत पाहतात! कांहीं चिंता नाहीं! आपल्याला हे लोक तर कांहीं डिक्री देत नाहींत—आयुर्वेद मंडळींतही कांहीं अर्थ नाहीं—आतां आणखी एक नवीन प्रकारची वैद्यकी गांवांत आली आहे, तिलाच आपण जाऊन मिळावें म्हणजे झालें! म्हणजे नवें आहे तोंपर्यंत पैशाची चंगाळ उडेल! आणखी या डाक्तरांच्याही नाकांत काड्या शिरतील!

सखू—(आश्चर्यानें) काय? नवीन प्रकारची वैद्यकी! म्हणजे ती कसली बाई?

सखो०—ती कशी काय हें अजून मला देखील समजलें नाहीं, पण म्हणतात ती वैद्यकी म्हणजे निवळ जादुगिरी आहे! त्या लोकांपाशीं कायसेसें एक नळीसारखें यंत्र आहे, त्याच्या तोंडावर रंगारंगाच्या गोट्या बसवायच्या, न् देणें नाहीं, घेणें नाहीं, दूरच्या दूर राहून रोग आपाआप बरे होतात. फार तर काय, मनुष्याच्या मनावर देखील त्यांचा अंमल चलतो!

सखू—एकूण आतां तुम्हीं तसली वैद्यकी करूं लागणार म्हणायचे, नाहीं?

सखो०—ते लोक जर शिकवितील तर माझ्याकडून ना नाहीं.—त्यांच्यांतल्या मुख्य गुरूला पत्र पाठवून बराच वेळ झाला. त्याच्या जवाबाचीच मी मघांपासून वाट पहात आहे!

(इतक्यांत सद्भट येतो.)

सद्०—वैद्यबोवा! खालीं कोणी एक नवेसेच वैद्य तुम्हांला भेटायला आले आहेत. ते आपल्याला **धन्वंतरि** म्हणवितात!

सखो०—**धन्वंतरि**! न् माझ्या घरांत मला भेटायला?

सखू—मला वाटतें, तुम्हीं आतां ज्या मुख्य गुरूला पत्र पाठविलें म्हटलें, तोच आला असेल!

सखो०—असेलही. भटजी! त्यांना वरती द्या पाठवून,—ही माझी चंची मजबरोबर आहेच. यांत पानें आहेत का नाहींत पाहूं?—आहेत—आहेत! ठीक! त्या **धन्वंतरी**नाच वरती पाठवून द्या म्हणजे झालें.

सद्०—ठीक. (जातो.) (इतक्यांत धन्वंतरि बनलेले गोविंदपंत येतात.)

गोवि०—नमस्कार वैद्यबोवा! नमस्कार!

सखो०—यावें, नमस्कार ! असें शोपाळपावर बसावें.

गोविं०—आजचा हा नवीनच परिचय. आपलें पत्र सकाळीं पोंचलें न् वाटलें आपलें एकदा दर्शन घ्यावेंच ! आपली कीर्ति थोडी थोडकी नाहीं **रामेश्वरापर्यंत** प्रसिद्ध आहे ! (मनांत) **पुण्यांतल्या** !

सखो०—असेल. हें मला ठाऊक नव्हतें ! पण मला आपलें नांव कळलें नाहीं !

गोविं०—नांव काय ? मीं आपल्या दक्षणी पोशाख केला आहे, तरी त्यावरून तुम्हीं मला दक्षणी समजूं नका. मी मूळचा **दक्षिण हिंदुस्थानांत भूतान** किंवा **भूनस्थान** ह्मणून आहे तिकडचा रहाणवाला! इकडे फार दिवस राहिलों ह्मणून बोली इकडची साफ बोलतां येते इतकेंच !— माझें नांव **भिया गयावळ दत्तशंख पद्मोजारलु बाबू** !

सखो०—अैबबाब ! केवढें लांबलचक नांव हे ?

गोविं०—देशा देशाचा भिन्न प्रकार आहे !

गंगू—(एकीकडे सखूस) अग, मघां तूं सांगितलेस **गोविंदपंत** कारकून ते हेच ग हेंच!

सखू—(एकीकडे गंगूस) होय का ? कोणाचे कारकून हं—हं—नूं ह्मणालीस त्या **अंणासाहेबां**चेच वाटतें !

गंगू—पुरे ग, थट्टा किती तरी करशील ? चल आंतल्या खोलींत जाऊन ऐकत बसूं (दोघी जाऊं लागतात.)

सखो०—(त्यांकडे पाहून) कोठें जातां ग पोरींनो ? जाऊं नका. तुमच्याशीं माझें कांहीं काम आहे.

गोविं०—आपण आमच्या मंडळांत शिरायचें ह्मटलें तें ऐकून फार संतोष वाटतो.

सखो०—एक कसलें नवीन नळीच्या तोंडावर गोळ्या बसवायचें यंत्र निघालें आहे, तें आपणच शोधून काढलें, नव्हे ?

गोविं०—असें खरें.

सखो०—वाहवा ! धन्य आहां ! अशानें आपली कीर्ति फार तर काय, यावच्चंद्रदिवाकरौ होईल यांत संशय नाहीं ! चक् अहाहा ! महाराज ! आपल्या या यंत्राबद्दलची बातमी मला काल समजली, तेव्हांपासून पहा, या डोळ्यांना स्वस्थ झोप कशी ती अजूनपर्यंत माहित नाहीं ! महाराज ! पहिल्याच परिचयाला मीं आग्रह करूं लागलों, तर आपण कदाचित् हंसाल, पण आपली जादू एक वेळ पाहण्याची मला इतकी कांहीं उत्कंठा झाली आहे, कीं कांहीं बोलतां पुरवत नाहीं !

गोविं०—हं हं—एकूण तुम्हांला आमची विद्या मुळींच ठाऊक नाहीं ?

सखो०—असणार कुठून ! ती बोलून चालून नवी !

गोविं०—केवळच अगदीं नवी नाहीं. तिला **लाडमल्लाचार्यां**च्या ग्रंथाचा आधार आहे! असो; तेव्हां ती तुम्हांला मुळींच ठाऊक नाहीं असें ह्मणायचें ! (आपणाशीं) इथें तरी कोणा लेकाला ठाऊक आहे ह्मणा ! (उघडपणें) बरें, तर, वैद्यबोवा ! आतां पहिल्या प्रथम असें पहा—

सखो०—अमळ थांबा ! या पोरींना जराशा बाहेर जाऊंदेत सांगूं ?

गोविं०—कशाला ? ऐकेनात बिचाऱ्या खुशाल! होऊं द्या, मझ्या विद्येचा एक चुटका त्यांना न् तुम्हांला सगळ्यांनाच दाखवितों.

तर वैद्यबोवा ! आतां माझें ह्मणणें तुह्मीं नीट लक्ष लावून ऐका. हें विश्व आहे त्यांतील यावज्जीव पदार्थमात्रांत कांहीं एक प्रकारचा रस आहे.

सखो०—काय ? रस आहे ?

गोविं०—होय—ऐका अगोदर—एक प्रकारचा—रस—रस आहे, ह्मणजे त्याला रस—रस ह्मणायचें ! ह्मणजे याला रस—रस असें ह्मणतात, आणखी तो अत्यंत अतिगामी आहे, समजलांत ?

सखो०—चालूं द्या पुढें. मी ऐकतों आहें.

गोविं०—*ह्मणजे समजलांत ? तो अत्यंत अ-*तिगामी आहे. तो—(भुईकडे पाहून) असा वर चढतो, आणखी—(वर पाहून) असा खालीं उतरतो. त्याचा प्रवेश सर्व कांहीं पदार्थांत होतो.—अत्यंत कठिण अशा धातूपासून तों अत्यंत मृदु अशा स्त्रियांच्या काळजापर्यंत सर्वत्र त्याचा सारखा प्रसार आहे, समजलांत ?

सखो०—नाहीं. नीटसें नाहीं समजलों.

गोविं०—चिंता नाहीं. तें समजायचेंच काय तें कठिण आहे. (आपणाशीं) सांगायचेंही कांहीं सोपें नाहीं !—(उघडपणें) बरें, नाहीं समजलां तर नाहीं समजलां—एक उदाहरण सांगतों, ह्मणजे कदाचित् समजेल.

सखो०—फार उत्तम.

गोविं०—ऐकाच तर मग. हा रस जो आहे तो नदीसदृश आहे. नदीसदृश ह्मणजे समजलांतना पण ?

सखो०—हो हो तेवढे समजलों ह्मणायचें.

गोविं०—आतां चिंता नाहीं.—ह्मटलें तो नदीसदृश आहे, न् तो असा—धांवतो—ह्मणजे ह्मणजे वहातो—सावकाश—असा—वाहतो ! मधें कांहीं आड नसलें ह्मणजे त्याची गति अकुंठ असते !—परंतु जर का त्या नदीला मधें एकादा खडक किंवा कांहीं आडवें आलें, तर मग काय महाराज ! फों—फों—फों—किंवा सों—सों—सों—करीत ती धोंकरन चोंहीकडे फुटून गांव काय, खेडीं काय, घरें पहात नाहीं—झाडें पहात नाहीं—जनावरें पहात नाहीं—गुरें पहात नाहीं—मार आपल्या वेगानें चट सारें, एकूण जें पुढें येईल तें, एकूणएक वाहून नेते ! परंतु समजा, तेच खडक किंवा दुसरे कांहीं *अडथळे मधें नसले, तर तसें कांहीं होतें* का ? कांहीं नाहीं. पाणी संथ कसें साफ—असें—आपलें चाललें असतें. 'एवढ्याला कीं कशाला कसला तो मुळींच एवढा देखील त्रास होत नाहीं, आणखी चैनीनें झाडें वाढतच असतात, शेतेंही छान पिकतात, न् फार कशाला, जिकडून तिकडून आबादानी होऊन जाते! हें जसें—तसेच प्राणिमात्रांच्या अंगीं जो रस आहे त्याला-ही तसेंच लागू पडतें. आणि आह्मीं जी नवीन विद्या काढिली आहे, तिचा प्रभाव या प्राण्याच्या अंगच्या रसावर फार उत्तम चालतो.

सखो०—(मान डोलवून) वाहवा वाहवा ! वाहवा वाहवा ! काय गोष्ट आहे ! पण काय हो आचार्य ! तुह्मीं हा प्रभाव कसा काय चालवितां ?

गोविं०—नुसते असे असे हात हालवून, किंवा जरूरच पडली तर स्पर्श करून !

सखो०—ह्मणजे हें तर मोठेंच आश्चर्य ! आचार्यबोवा ! तुह्मांला माझ्या गळ्याचीच

शपथ आहे. तुम्हीं आपल्या विद्येचा थोडका चुटका आम्हांला दाखवाच !

गोविं०—चिंता नाहीं. त्याला काय ? आतां दाखवितों. हातच्या कांकणाला आरसा कशाला पाहिजे? (खिशांतून एक नळी बाहेर काढितात.) ही पहा एक नळी आहे, न् तिच्या पुढें माणसाच्या काळजाच्या आकाराची ही एक गोटी बसविली आहे. आतां ही नळी—हिच्या अंगीं कांहींशी लोहचुंबकासारखी शक्ति आहे—ती नळी कांहीं एका प्रकारानें धरली, कीं तिचा *अंगुल तुमच्या अंगांतील रक्तांवर चालूं लागेल.* तो इतका कांहीं कीं पहिल्या प्रथम तुमचे एकदम सांधे धरून जाऊन तुम्हांस प्राणांतिक वेदना होतील—त्या किती तरी—आतां अडीच वाजले आहेत, नाहीं?—चार वाजेतोंपर्यंत चालतील. तेवढें झालें कीं मागून आमवाताच्या भावना होऊन, होतां होतां अपस्मार होऊं लागेल—आणखी त्याला कांहीं वेळ झाल्यावर एकदम भडका ताप येऊन तुम्हांला दोन दिवसपर्यंत निजवून ठेवील ! बोला, अशा रीतीचा तुम्हांला अनुभव पाहिजे असला, तर आत्तां पांच मिनिटांच्या आंत तो आणून देतों! (सखोपंतावर प्रयोग करण्याच्या बेतानें नळी धरतो.)

सखो०—हां हां हां आचार्य ! तुमचा प्रयोग माझ्यावर न करितां दुसऱ्या कोणावर तरी करा ! मी आपला डोळ्यांनीं पहाणारा !

गोविं०—बरें, तरी बरें.—आत्तां या घटकेला माझ्या घरीं एकजण आजारी पडला आहे. तो गांवांतले सगळे डाक्टर पाहून आला आहे, पण गुण कसा तो मुळींच नाहीं; उलटें त्यांनीं त्याला असाध्य म्हणून ठरविलें आहे. आतां त्याचें दुखणें जबर आणि काठिण तर खरेंच, पण त्याला मला बरें करायचें आहे. तर तुमची मर्जी असेल, तर तुम्हांला शिकवून त्याला तुमच्या हातूनच बरें करवितों म्हणजे झालें कीं नाहीं ?

सखो०—त्याला या नळीनेंच बरें करायचें ?

गोविं०—अर्थात् !

सखो०—वाहवा ! मग तर माझ्यावर आपले मोठेच उपकार होतील.—पण आचार्य ! त्याला माझ्याच घरीं तें कशाला आणायचा खटपटींत पडतां ? तो रोगी असा आहे तरी कोण ?

गोविं०—चांगला संभावित आहे. तो मूळचा तिकडला पुण्याकडचा रहाणवाला !

रंगू—कायग बाई ! ही मोठी मौज होईलसें दिसतें, नाहीं बरें ? अहो आचार्य! खरेंच तुम्हीं त्यांना इथेंच आणून आमच्या देखत बरें करा !

सखो०—(गोविंदपंतास एकीकडे नेऊन) हें पहा, माझ्या घरांत कोणा परक्याला घेऊन यावें हें मला कांहीं नीट वाटत नाहीं.—कारण काय म्हणाल, तर ती आतां मुलगी बोलली, तिच्याशीं मी लग्न लावणार आहें. मी आहें असा म्हातारा, तेव्हां न जाणो तो गृहस्थ आला न् त्याला पाहून ती भुलली तर ?

गोविं०—असें कोठें झालें आहे ?—अहो, तो बोलून चालून मरणोन्मुख झालेला, त्याच्यावर ती कशाला भाळेल ?

सखो०—तरी पण तुम्हीं त्याला बरें करणार आहां, तेव्हां तो बरा झाल्यावर ती त्याला भाळणार नाहीं कशावरून ?

गोविं०—असें कदाचित् होईल खरे !

(दोघे कुजबुजत रहातात.)

गंगू—(पुढें येऊन) इतकी मेली कुजबुज ती काशाकरितां ? आचार्य ! तुमच्या विद्येचे दुसरे गुण काय आहेत ते मला माहित नाहींत, पण एवढें खरें, मुलीवाळींनीं कांहीं विचारलें सवरलें, तर त्यांना दुखवूं नये हा कांहीं गुण तुमच्या विद्येच्या अंगीं नाहीं !

गोविं०—वेडे मुली ! असें बोलूं नये, मी यांच्यापाशीं कांहीं गोष्टी मुद्दाम बोलतों आहे. अशाकरितां कीं तुह्मांला पुढें त्यांत दल कांहीं वाईट वाटूं नये.

सखू—तें मेलें काय असेल तें मला कांहीं खरें वाटत नाहीं.—पण निदान हल्लीं ज्या आह्मीं दोघी जणी कोडवाड्यांत पडलों आहों, त्या आमचें दुःख कांहीं तुमच्या विद्येनें कमी व्हायसारखे नाहीं !

गोविं०—तेवढें मात्र मी ऐकायचा नाहीं. आतां मी प्रयोग करून दाखविणार आहें, तेवढा पहा तर खरी, ह्मणजे तुझें तुलाच वाटूं लागेल कीं, समुद्रावर पुरुषाच्या हातांत हात घालून फिरत रहाणें; पुरुषानीं गाड्यांत नुसत्या माशा मारीत राहून बायकांनीं गाड्या हांकीत जाणें; नाटकें, तमाशे, रूपकें, संगीतें पहात हिंडणें, यापेक्षां बायकांनीं पुरुषांच्या कैचींत राहून कोंडवाडा पत्करावा हें बरें!

सखू—तें मला सगळें खरें वाटतें. पण बायकांना नाटकें सुद्धां पहायला नेऊं नये हा पण बाई कोण जुलून ?—मी **पुण्यास** होतें, तेव्हां माझें न **गंगू**चें एक दिवस दिखील नाटक कसें तें टळत नव्हतें !

गोविं०—तें सगळें खरें, पण मुली ! तूं अजून लहान बच्चा आहेस, तुला कांहीं कळत नाहीं ! हीं थेटरें नांवाचीं मात्र,—वास्तविक मूर्तिमंत हलकटपणा तो येथें नजरेस पडतो. याकरितां कधीं तिथें प्राण गेल्यानेंही जाऊं नये. माझें वय इतकें झालें आहे, पण इतक्या दिवसांत सारा एक वेळ मी नाटकाला गेलों होतों: तेव्हांपासून कानाला खडा लावून घेतला, फिरून नाटक ह्मणून पहायचे नाहीं !—छेः तिथें हलकटपणा ह्मणजे कोण चालतो ! खचित बायकांनीं तरी तसले खेळ पाहूं नयेत.

सखू—बरें पण आह्मांला सांगाल तर खरें, तुह्मीं कसला खेळ पाहिलात तो ?

गोविं०—त्यांत अर्थ काय ? गुलामांनीं केला फार्स. त्यांत कोणी एका चांगल्या सत्तर वर्षांच्या ह्माताऱ्याचें एका तेरा चौदा वर्षांच्या पोरीवर मन बसलें होतें, नू तें तो त्या सगळ्या समाजापुढें मोठ्या फुशारकीनें बोलून दाखवीत होता.

सखू०—त्यांत काय ? हें कांहीं वावगें ह्मणतां येत नाहीं !

गोविं०—नाहीं. तें चालेल एक परी पण पुढें जरा चमत्कार आहे. दुसरा एक गृहस्थ होता तो तरणा, सुरूप आणि श्रीमंत असा होता, नू त्याच्या मनांत त्या मुलीनें आपल्याला वरावें !

सखू०—अंः—त्यांतही कांहीं वावगें नाहीं.

गोविं०—नाहीं कसें ? ऐका पुढें नक्कल काय झाली ती. त्या गृहस्थानें, आपला एक चाकर होता त्याचा वेश पालटून त्याला या ह्माताऱ्याकडे पाठविलें, आण-

खी त्या चाकरानें ह्याताऱ्याशीं बोलतां बोलतां गोडीगुलाबींत येऊन त्याला अशी मिठी मारली—न्—इतक्यांत ह्याताऱ्याच्या पाठीमागें त्या मुलीची एक मैत्रीण होती, तिच्या हातांत त्यानें एक घरून लिहून आणलेले पत्र दिलें! (सखोपंतास मिठी मारून झखूच्या हातांत एक पत्र देतो. तें घेऊन ती गंगूजवळ देते, आणखी गंगूचें पत्र गोविंदपंतास देत. तें गोविंदपंत आपल्या खिशांत घालतो.)

सखू—अ.णखीं त्या मैत्रिणीनें त्याच्या हातांत दुसरें एक पत्र दिलें!—होय होय. तें नाटक मीं पाहिलें आहे. नाहीं काय, **गंगू**ताई! खरेंच बाई! तें नाटक मला तर बाई फार फार आवडलें!

गोविं०—गप बस पोरी! असें बोलत जाऊं नये! तुलींच सांगा वैद्यबोवा! असलीं नाटकें जर बायकांना दाखविलीं, तर बायका बिघडल्याशिवाय कधीं तरी रहातील?

गंगू—तें जाऊं द्याहो आचार्यबोवा! पण तुम्हीं मला खरेंच सांगा, ही नि मी आज कित्ती दिवस या कोंडवाड्यांत अडकून पडल्या आहोंत! मेलें खालती बागेत जराशी फिरेन म्हटलें तरी चोरी! हा कोण मेला त्रास!

गोविं०—कायहो वैद्यबोवा! या मुलीला इतकें कोंडून रहाणें बाईट कां बरें वाटतें?

सखो०—अहो, त्याचें कारण—मी तिला आवडत नाहीं!

गोविं०—याविषयीं तुमची अगदीं खातरी आहे?

सखो०—होय. असें मला तिच्या कृतीवरून वाटतें खरें.

गंगू०—(आपणाशीं) हें मेलें असेंच चालायचें! मला तर बाई तें पत्र वाचायची घाई झाली आहे! (निघून जाते.)

गोविं०—चिंता नाहीं. तुम्हीं कांहीं काळजी करूं नका. ही नळी तुम्हीं आपल्या हातांत घ्या. तिच्यापुढें मघांची गोटी नको—ही दुसरी गोटी बसवितों.—या गोटीचें नांव **प्रेमगुटिका**!—ही नळी व ही गोटी जोंपर्यंत तुमच्याजवळ आहेत, तोंपर्यंत तिची इच्छा नसली तरी ती तुमच्या अगदीं गळ्यांत मिठ्या मारायच्या बेतांत येईल! पाहिजे असेल तर पहाच चमत्कार!

सखो०—वाहवा! असें झाल्यावर मग आणखी काय पाहिजे?

सखू—हं हं—असें काय? (निघून जाते.)

सखो०—या पोरीनें तुमचें शेवटलें बोलणें ऐकलेंसें वाटतें!

गोविं—भलतेंच. तसें कांहीं नाहीं.—तर तुम्हीं आतां असें करा, मला दुसऱ्या खोलींत घेऊन जा, म्हणजे तुम्हांला मी कांहीं मोठी मौज सांगणार आहें. ती काय हें आतांच कळवायसारखें नाहीं! तें एकदा तुम्हांला सांगितलें, म्हणजे मग मी जाईन आपल्या घरीं, आणखी त्या रोग्याला गाडींत घालून घेऊन येईन!

सखो०—कांहीं चिंता नाहीं. एक वेळ त्या पोरीचें मजवर मन बसलें म्हणजे मी कुणाच्या बापाला सुद्धां भ्यायचा नाहीं! पण तिचें मन माझ्यावर बसेल अशी तुमची खात्री आहेना!

गोविं—होयच. नाहीं तर लोहचुंबक तो कसला!

(दोघे जातात.)

अंक २.

स्थळ.—सखोपंत वैद्याच्या घरांतील दुसरा दिवाणखाना.

(सखू आणि गंगू बसल्या आहेत.)

सखू—तें मी सगळें एकूणएक आडून ऐकलें. तें आले होते आचार्य—यांनीं त्या थेरड्याला तो नळी आंत लोहचुंबक बसविलेली दिली आहे. आणखी थेरडा आतां तुला वश करायला यायचा आहे, तेव्हां तुझ्या मनांत नाहीं, तरी तुला त्याच्यावर प्रेम दाखविलेंच पाहिजे.

गंगू—अग त्यांच्या पत्रांत देखील असेंच लिहिलें आहे. आपल्या थेरड्यानें किनई त्या नव्या वैद्यकवाल्याला पत्र पाठविलें, तें टपालच्या शिपायानें चुकून तिकडे हातांत दिलें ! आणखी कळलें का त्याच्यावरून ही आम्हांची सगळी मसलत त्यांना सुचली !—बरें, पण आतां **गोविंदपंत** कुठें आहेत ?

सखू—अग, ते आतांच त्या थेरड्याला सोडून त्या आजारी गृहस्थांना आणायला गेले आहेत. गडे **गंगू** ! ते गृहस्थ कोण असावेत याबद्दल तुझा कांहीं चालतो का तर्क ! हे गृहस्थ म्हणजे **अंगासाहेबच** बरें का !

गंगू—अगबाई ! मला कांहीं हें समजत नाहीं कसें तेंहो! कारण या थेरड्याची—न् तिकडची ओळख आहे, तेव्हां माझ्या तर बाई बुद्धीला वाटत नाहीं तिकडूनच येणें होईलसे !—बरें तें मग समजेल. पण आतां ही सगळी जी खटपट चालायची—ही नळी त्या थेरड्यानें घेतली,—याचा परिणाम तरी बाई कसा होणार !

सखू—अग, तें सगळें पूर्वी ठरूनसुद्धां चुकलें असेल. तूं तर तूं किनई **गंगूबाई** ! आतां दुसरें कांहीं करूं नको. त्या थेरड्यावर तुझें प्रेम आहे म्हणून बतावणी कर !

गंगू—अग, तगि कशी करूं ? मला खरेंच पुरशील, तर त्या मेल्याचें तोंड काळें का गोरें तें पहायला देखील नको.

सखू—अग, तें सगळें खरें. पण जर तसें व्हायचें नव्हतें, तर हें पत्र आलें; मागाहून हे आचार्यांचें सोंग. आलें; इतकें सगळें कशाकरितां झालें असतें ?—तर तूं कांहीं भिऊं नको. तूं त्या थेरड्यावर आपलें प्रेम दाखवीच. समजलीस ? तूं दाखव, आणखी मीही दाखवीन.

गंगू—काय तूंही प्रेम दाखविणार म्हणतेस !

सखू—अग होयच. त्या थेरड्याजवळ जादू आहे. तिचा अंमल तुझ्या एकटीवरच कां चालावा ? तेव्हां जर तो तुजवर चालतो, तर माझ्यावरही चाललाच पाहिजे. समजलीस?

गंगू—अग, हो—पण तो पहा आला मेला थेरडा !

(सखोपंत नळी घेऊन येतो.)

सखो०—(येतां येतां आपणाशीं) त्या गृहस्थानें मला इतक्या गोष्टी सांगितल्या त्या खऱ्या असतील तर मोठेंच आश्चर्य ! तरी पण आपला कांहीं त्याच्यावर अनुभवावांचून भरंवसा बसायचा नाहीं. असो; आतां कांहीं उशीर नको. हा **सूर्य** आणि हा **जयद्रथ** (दुरून प्रेमदृष्टीनें गंगूकडे पहातो.)

सखू—(गंगूस हलक्यानेंच) अग पाहिलेंस का ? तो थेरडा आतां डोळे भरून कसा तुजकडे पहातो आहे तें ? एकदा त्याच्याकडे प्रेम!

हं—तर आतां आपलें प्रेम सदूभटावर दाखवायला पाहिजे, समजलीस?

गंगू—समजलें, चालूं दे.

सखो०—कां भटजी! कसें काय? बरें आतां वरें आहेना?

सदू०—हो. बरेंच ह्मणायचें! पायाची कळ अजून आहे, ती आहेच, आणखी एक डोळा फुटला आहे, एवढेंच काय तें! बाकी सर्व ठीक आहे!

सखू—अहा! ह्मणून काय झालें! भटजी! तुमचा किनई एक डोळा जरी गेला आहे तरी तुम्हीं आत्तां आहां असेच मला किती गोड दिसतां ह्मणून सांगूं?

सखो०—(टाळ्या वाजवून आपणाशीं) ही जादू चिकटलीरे चिकटली! आतां बरीक माझा लाट आहे!

सदू०—कायग पोरी! तूं माझी किरून थट्टा करूं लागलीस वाटतें!

सखू—छे हो—भटजी! देवाची शपथ, मी आतां तुमची थट्टा करीत असेन तर! मघां मीं तुमची थट्टा केली, त्याचेंच मला किती वाईट वाटतें आहे कांहीं सांगून पुरवत नाहीं! तुमच्या एका डोळ्यावरून झांकण आहे, तरी पण तेवढ्यामुळेंच जो एक डोळा दिसतो आहे तो कसा नक्षत्रासारखा चमकतो आहे! काय सांगूं?—अग गंगूताई! तूं तिकडे पहात काय राहिली आहेस? अग, भटजींकडे एकवेळ पहाशील तर खरी!

गंगू—होय बाई! भटजी किनई या वेळीं शुद्ध बेलबागेंतले विष्णुमूर्ति दिसतात!

सदू०—(हर्षानें टिच्या बडवून नाचूं लागतो.) हः हः हः हः—

सखो०—(आपणाशी) छेः—ही फिरून पहिल्यासारखीच पंचाईत झाली!

सदू—अहो! वैद्यबोवा! अहो वैद्यबोवा! मला वाटतें आज आपणा सगळ्यांनाच पिसाळलेलीं कुतरीं चावलीं आहेत! हः हः हः हः—

सखू—अग गंगूताई! तूं शुद्धीवर तरी आहेस का पण? तूं गृहस्थाची मुलगी, तुझें मन भटजींवर बसलें आहे हें कांहीं बाई चांगलें नाहीं!—मी तुझी चुलत बहीण खरी, तरी माझी बाई गोष्ट निराळी! माझा बाप भिक्षुकच होता. हो—आहे का आठवण? अग, तूं नीट शुद्धीवर ये, आणखी आपली या वैद्यबोवांवर मन ठेव! मी कांहीं तुला आड नाहीं यायची!

गंगू—तूंच त्यांच्यावर ठेवीनास मन? मला चालेल.—मी त्यांच्याकडे ढुंकून सुद्धां पहायची नाहीं!

सखू—मला नकोग बाई! माझा खेटर अडला आहे त्यांच्यावर प्रेम ठेवायला!

सखो०—अरे बापरे! हें कोण बोवा लचांड! एकेक पहावें तों नवें नवेंच सोंग निघतें.

सखू—भटजी! माझें तुमच्यावर प्रेम आहे, तसें तुम्हीं माझ्यावर नाहींका प्रेम ठेवीत?

गंगू—सखू! तूं अशी मधें मधेंग काय करतेस? भटजीबोवांचें माझ्यावर प्रेम आहे, ध्यानांत ठेवहो!

सदू०—(कानांवर हात ठेवून) तें कांहीं बोवा नाहींरे आपल्याला कबूल! आपण तर मघांच सांगितलें आपल्याला ही सखू बायको पाहिजे ह्मणून!

गंगू—(रडूं लागून) अग आई! तर माझा या

मेल्या जीवाची गरगरांगोळी कां होईना एकदाची—! हं हं हं—ऊं—हं हं हं— ऊं—

सखो०—छे बोवा ! ही भानगड नाहीं आपल्याला पत्करायची ! भटजी ! ती नळी इकडे द्या कशी ! (त्याच्या हातून ती हिसकाऊन घेतो.) आन् जा तुम्हीं आपलीं औषधें खलींत बसा !

सदू०—हा चाल्लों ! येतों अं **सखू** ! आज तूं या ब्राह्मणाला पंचपक्वान्नांचेंच जेवण घातलेंस असें मी समजतों !

सखू—होय हेंच खरें ! (त्याच्या तोंडांत मारिते.) मेल्या ! फिरून करशीलका बायकांशीं असें पुढें पुढें !

सदू—(गाल चोळीत) हें ग काय ? तूंच माझ्याशीं अगोदर पुढें पुढें केलेंस !—आणखी वाहवाग !

सखू— मेल्या मुरदाडा ! आतां गप तरी रहा! मेल्या ! तुझी सगळी अक्कल कुणीकडे गेली ? हे तुझे धनी—हे जवळ असतां त्यांना सोडून तुझ्यावर माझें मन जाईल असें तुला तरी कसें वाटलें ? मेल्याच्या लाजमर्यादा गांवींच नाहीं अगदीं !

गंगू—होय हेंच खरें ! तूं—मेल्या!—पाहिजे आहेस कोणाला? तूं—मेल्या ! यांच्या पुढें अगदीं शुद्ध कावळ्यासारखा दिसतोस !

सखो०—ही बोवा उलटी अधिक अधिकच पंचाईत होऊं लागली !—या वेळीं ते **धन्वंतारि** आहेत तरी कोठें ? तेच येऊन जर कांहीं उपाय काढितील तरच निभाव आहे ! (बाहेर दिंडीच्या दाराला मोठ्यानें धक्के दिल्याचे ऐकू येतात.) **सदूभट!** पहा पहा **धन्वंतारिच** आले का कोण तें ? (सदूभट जातो) माझी तर खातरी आहे, ते **धन्वंतरिच** त्या रोग्याला घेऊन आले आहेत ! आतां या रोग्यावर उपाय मी करणार (मिशीला पीळ देतो) आणखी रोगी बरा होणार! वाहवा वाहवा !—अग **गंगू** ! आणखी तूं—ए— **सखू** ! दोघीजणी अंमळशा आंतल्या खोलींत जा पाहूं ?

गंगू—होय. मी जातें. पणू आपण माझ्याबरोबर आलें पाहिजे ! काय असेल तें असो, माझ्यानें कांहीं बाई एकटीच्यानें आपल्याला सोडून जाववत नाहीं !

सखू—मला दिसत बाई असेंच कायसेंसें झालें आहे !

सखो०—बरें बरें निघून जा कशा !—मूर्ख नाहीं तर !

(इतक्यांत सुंदर शृंगारिक पोशाक केलेल्या अंगासाहेबांस हातीं धरून गोविंदपंत येतात.)

गोविं०—वैद्यराज ! हे आपले रोगी घ्या.—हे मोठे नामांकित वैद्य आहेत, न् हे आपणाला हां हां म्हणतां बरे करतील !

सखो०—कांहो धन्वंतारि ! तुमच्या सांगण्यांत तर रोगी अगदीं अत्यावस्थ होता ! पण यांच्या तोंडावर तसें कांहींच दिसत नाहीं ! उलटा तोंडावर उत्कृष्ट तजेला दिसतो आहे !

गोविं०—हेंच तें वाईट ! रोगी कीं नाहीं वाईट दिसत असून बिनधोक असलेला पत्करतो, पण यांच्या सारखे रोगी—बाहेरून दिसण्यांत आजार नाहीं न् कांहीं नाहीं, पण आंतून अगदीं प्राणांतिक अवस्था झाली असते, तेवढें बरीक कठिण!

अंगा०—(आजाऱ्यासारख्या शब्दानें) वैद्यराज—अं—अं—या जिवानें आजपर्यंत—जे—अं—अं—क्लेश—अं—अं—अं काढिले आहेत, ते

दृष्टीनें पहा, आणखी मोठ्यानें उसासा टाक, समजलीस ?

गंगू—बरें बाई ! (मोठ्यानें उसासा टाकते.)

सखो०—(पुढें येऊन गंगूस) सखे सुंदरी ! हें काय बरें ? असा उसासा कां बरें टाकितेस ? तुझ्या जिवाला काय बरें झालें आहे ? तुला फार दिवस कोंडल्यासारखें झालें आहे, यामुळेंच तुला दुःख होत असेल, नाहीं बरें !

गंगू—मीं काय बोलावें ? (पुनरपि उसासा टाकिते.)

सखो०—पुरे पुरे ! प्रिये ! तूं अशी दुःखी होऊं नको. तुला मीं पुष्कळच दिवस कोंडवाड्यांत ठेविलें आहे मी कबूल करतों, आणि तेवढ्यामुळें मी तुला आवडेनासा झालों असल्यास नवल नाहीं !

गंगू—शिव शिव ! हें काय बोलणें हें ! (उसासे टाकते.) आपले मजवर केवढे उपकार !—(पुढें बोलवत नाहींसें दाखवून एका अंगास वळते व डोळे पदरानें झांकते.)

सखो०—(आपणाशीं) वाहवा ! आज मीं केवढा भाग्यवान् ! वाहवा वाहवा ! (उघडपणें) बरें **गंगू**बाई ! तूं ऊठ, आणखी असें दुःख करीत बसणें टाकून दे ! तूं इथें एकटी पडली आहेस हें मला देखील दिसतें आहे, तरी पण थोडक्याच दिवसांत मी तुझें लग्न (गंगू मोठ्या उत्कंठेनें त्याजकडे पाहूं लागलीतें दाखवितें.) कोणी तरी चांगला सुरूप तरुण वर पाहून त्याशीं—(वाईट वाटलेसें दाखवून पदरानें तोंड झांकते व हुंदका आणिते.)

गंगू—देवा ! काय तरी संकट हें ! यापेक्षां जीव गेला तरी बरा ! (फिरून हुंदका आणिते.)

सखो०—**गंगू** ! अग, खरेंच का तुझें माझ्यावर इतकें मन बसलें आहे ?—अहाहा ! धन्य धन्य मी !—प्रिये ! बोल बोल ! जर तूं ह्मणतेस हें खरें असेल, तर तूं आपल्या मुखानें एकदा तेवढें बोलच, आणि माझ्या चातकवत् अंतरात्म्याला मेघोदकाचें पान करीव !

गंगू—काय बाई ! मेली बोलायची देखील लाज !—तरी पण माझा कांहीं उपाय चालत नाहीं !—बोलतेंच !—ऐकलें का ? आपण मला काय ह्मटलेंत ?—माझ्या मनांतून पुष्कळ पुष्कळ येतें कीं तुमचा द्वेषच करावा ! पण कसें काय होतें बाई कोण जाणे ! मेलें प्रेमच येऊन पुढें राहतें ! खरेंच, तुमच्या गळ्याचीच साक्ष ! माझें तुह्मांवर प्रेम आहे !

सखू—माझेंही पण आहे !

सखो०—काय ? तुझेंही पण आहे ?—असें होईलसें मला कांहीं वाटलें नव्हतें !

सखू—तें काय ? आतां बोलून काय उपयोग ? माझें तुह्मांवर प्रेम आहे इतकेंच नाहीं, तर तुमचें दुसरीकडे मन आहेसें पाहून तुमचा मला भारी भारी राग येतो, आणखी एकादवेळ तुह्मांला नखांनीं आपल्या फाडून टाकावें असें देखील वाटूं लागतें.

सखो०—अरे बोवा ! हें लचांडच झालें !

गंगू—अहाहा ! सख्या ! माझ्या अंतःकरणाची जी कांहीं स्थिति होऊन गेली आहे, तिची तुह्मांला कांहींच कींव येत नाहीं अं ? शिव शिव !

सखू—काय ? माझें अंतःकरण आंतून जसें कांहीं पेटून त्याचा सर्वांगीं भडका झाला आहे, तो तुह्मांला नाहीं दिसत ?

गंगू—अहारे निर्दया ! मी आपली इतकी विनवणी करितें, तिचें आपल्याला कांहींच वाटत नाहीं काय ?

सखू—पहा ! आपला नीट विचार करा ! तुम्हीं वऱ्या बोलानें मजवर प्रेम ठेवूं लागा, नाहीं तर पहा मी तुमचा सदोदित द्वेष करूं लागेन—

सखो०—(आपणाशीं) छेः बोवा ! हें नस-तेंच लचांड आपल्या पाठीशीं लागलें !—हो पण यांत इचाही कांहीं इलाज नाहीं ! कारण माझ्या हातांत ही जादूची नळी आहे तिचा दोघींवरही अंमल चाललाच पाहिजे !—तरी पण या **सखी**चें प्रेम बोवा आपल्याला भयच वाटतिजें ! आतां काय घेरें करावें ?—हां हां—ही युक्ति बरी दिसते! या **सदूभटा**ला बोलवावें वरतीं, नू त्याला आपल्यांतला थोडासा मंत्र द्यावा. ह्मणजे तो थोडका वेळ ही नळी आपल्या हातांत धरील, आणखी ह्या **सखी**ला वश करून घेईल ! (दरवाज्याकडे जाऊं लागतो.)

गंगू—(दुःखावेशानें आपल्या कपाळावर मारून घेतलेंसें करुन) देवा ! देवा ! काय? एकूण मला एकटीला अशीच टाकून चाललां ? मी आपल्या इतक्या विनवण्या केल्या, त्या सगळ्या उगीचच अं?—बरें, मेलें जायचेंच असेल, तर माणसाचा कुणाला हात कां धरवतो ?—बरें अं, जाहो तुम्हीं—ही **गंगू** उद्यां कांहीं तुम्हाला जिवंत सांपडायची नाहीं !

सखो०—(तिच्याकडे वळून) अहाहा ! प्राणप्रिये ! जिवलगे ! तुला काय सांगावें ? ह्या अंतःकरणांत इथें जें कांहीं होतें आहे, तें बोलून दाखवायला माझ्यापाशीं पुरेशी जीभ देखीलग नाहीं ! त्याला मी काय करूं ?

सखू—(त्याच्या पायां पडून) पहा पहा ! वैद्यबोवा ! माझी कांहींतरी तुम्हांस्या दया येऊं द्या. मी स्वभावाची मूळची कांहीं खुनशी नाहीं, आणि तुम्हीं मला नीट वागवाल, तर मी मरें तोंपर्यंत तुम्हांवर निरंतर प्रेम ठेवीन ! पण तसें जर न कराल, तर तुमचें नू माझ्या सवतीचें मी काय करीन, तें एक देवाला माहित कीं मला माहित !

सखो०—(आपणाशीं) हा काय चमत्कार असेल तो असो. या **सखी** पोरीचें हें बोलणें ऐकिलें कीं माझे पायच लटलट कांपूं लागतात ! छेः—अशानें परिणाम कधीं लागायचा नाहीं !—इच्या प्रेमाचीच अगोदर दुसरीकडे व्यवस्था लावून टाकिली पाहिजे. (मोठ्यानें) भटजी ! अहो—**सदूभट** !—

(सदूभट येतो.)

सदू०—कोण ? मला कोणीं हांक मारिली ?—

सखो०—भटजी ! हो मींच तुम्हांला हांक मारली होती ! ही नळी घ्या, नू माझ्या निजायच्या खोलींत उशाशीं नेऊन ठेवा.

(त्यास ती जादूची नळी देतो.)

सदू०—बरें,—(जाऊं लागतो.)

सखो०—भटजी! जरा क्षणभर इकडे या पाहूं.

सदू०—माझें काय? एक क्षण सोडून दहा क्षण कां होईनात ? (थांबतो,)

सखो०—(आपणाशीं) आतां पाहूं, या जादूचा कसा काय मासला उडतो तें !

सखू—(एकीकडे हळूच गंगूस) अग, या घेरड्याची मसलत आलीना तुझ्या ध्यानांत ?—

षार्ची मुद्रा व्हावी, तशी त्यांची मुद्रा झाली आहे, व सर्व अवयवही त्याच मुद्रेचें अनुकरण करीत आहेत !

अंणा०—(गंगूकंड पहात राहून ध्यानस्थित वृत्तीनें)

श्लोक.

संभूयेव सुखानि चेतसि परं भूमानमातन्वते,
यत्रालोकपथावतारिणि रतिं प्रस्तौति नेत्रोत्सवः,
यद्वालेंदुकलोच्चयादवचितैः सारैरिवोत्पादितं,
तत्पश्येयमनंगमंगलगृहं भूयोपि तस्या मुखं !

सखो०—अरेरे ! मघांची ती उगीच ओरडत रहायची लहर जाऊन हीं गाण्याची लहर कोणीकडून आली ?

गोविं०—यांना लहानपणापासून संस्कृत नाटकें वाचण्याचा आणि पाठ करण्याचा छंद आहे. यांतलाच हा कुठला तरी श्लोक आहे.

सखो०—बरें, ही लहर टिकायची किती वेळ ?

गोविं०—जर आतां आहे असेंच बोलत राहूं दिलें, आणखी आपण मधें कुणीच कांहीं बोललों नाहीं, तर पांच मिनिटांच्या आंत सगळा निकाल होऊन जाईल, नाहीं तर त्याचा काय नेम ? कदाचित् तास अर्धा तासही लांबेल !

अंणा०—(एकदम जागें झाल्यासारख्या मुद्रेने) एकूण प्रिये ! मी म्हणत होतों तीच तूं काय ? हर हर ! तेव्हांची तूं—आणि ही आतां—यांत किती तरी तफावत पडली आहे? तुझी पूर्वीची—आणि आतांची—दोन्ही स्थिति मनांत येऊन त्या जनकोक्तीचीच कीव आठवण होते ! हाय हाय!

श्लोक.

आसीदियं दशरथस्य गृहे यथा श्रीः,
श्रीरेव वा. किमुपमानपदेन ? सैषा.
कष्टं बतान्यादिव दैववशेन जाता
दुःखात्मकं किमपि भूतमहोविपाकः !

हाय हाय ! प्रिये ! एकूण तूं तेव्हांपासून आतां इतकी दुरवस्थ झाली आहेस अं ! प्रिये ! तुला काय सांगूं ? तुझी घर सुटल्यापासून ज्या प्रकारची स्थिति झाली होती, तिच्या शतपटीनें माझी भयंकर स्थिति झाली आहे ! ती तुला सांगून तुझ्या कोमळ मनाला कशाला दुःख देऊं ? तुला एवढेंच सांगतों, त्या तशा प्रकारचें अघोर दुःख जरी अनुभवीत होतों, तरी "**आशाबंधः सहयति**" या **कालिदास**वचनावर विश्वास ठेवून राहिलों होतों. सदा सर्वकाळ मनांत विचार हा—कीं हे दिवस सदैव कांहीं असेच रहाणार नाहींत; ते केव्हां तरी जातील,आणखी **गिरिराजा**च्या अंकावरून भ्रष्ट झालेले नद आणि नद्या यांचा जसा क्वचित् प्रीतिसंगम घडतो, तसा तुझा आणि माझाही केव्हां तरी संगम घडेल!-- असो ; प्रिये ! मी इतका वेळ तुजशीं

---

१ "जें दृष्टिगोचर झालें असतां अंतःकरणांत सर्व सुखें एकवटून अतिशय वृद्धि पावतात, व नेत्र हर्षानें प्रफुल्ल होऊन अंतकरणांतील अनुराग जणों चमकूंच लागतो; जें उत्पन्न करतेवेळीं बालचंद्राच्या कलांचा रस काढून त्यापासूनच निर्माण केलें आहे काय ?; व जें मदनाचें मंगलधामच. असें जें तें प्रियेचें मुख, तें आज पुनरपि माझ्या दृष्टीस पडो !" मालतीमाधव. अंक ५.

१. "ही (कौशल्या) दशरथाच्या घरीं लक्ष्मीप्रमाणें विराजत होती. अथवा, उपमेच्या पदाचीच काय जरूर आहे? प्रत्यक्ष लक्ष्मी ती हीच. परंतु हरहर ! दुर्दैववशें करून ही दुःखरूप कांहीं निराळ्याच प्राणी बनली आहे ! हायहाय! काय दुष्परिणाम हा!!!" उत्तररामचरित, अंक ४.

२. "आशेचा पाश सोसावयास लावितो." अभिज्ञानशाकुंतल, अंक ४.

बोलतों आहें, तुला पदोपदीनें अळवीत आहें, तरी तूं मला एवढें सुद्धां प्रत्युत्तर देत नाहींस अं? प्रिये! धिक्कार असे मला! एकूण मी तुझ्या कोपाचा विषय झालों आहें काय?—असो; परमेश्वराचं इच्छा!—प्रिये! आणखी एक वेळ तुझं विनवणी करितों! बोल बोल!—का काय? प्रिया मजशीं बोलत नाहीं धिक्कार असो! धिक्कार असो!—प्रिये बोल, तूं असा मजवर किमर्थ कोप करितेस?—काय तेंही सांगत नाहींस? बरं नको सांगूं! तुझी मर्जी! बरें एवढें तरी सांग, तुझा मजवरील अकारण कोप जर दूर होत नाहीं, तर मी प्राणांत करावाना

सखू—अगबाई! हें असें काय करूं लागले हे? खरेच गडे यांचें हें लक्षण कांहीं नीट दिसत नाहीं! हे जे कांहीं बोलताहेत ते तुझ्याचकडे पाहून बोलताहेत असें भासतें, एवढ्याकरितां एक शब्द का होईना, तेवढा परती बोलून जाईनास?

अंणा०—होय होय! प्रिये! तुझ्या गळ्याशपथ मी तुला जास्ती आग्रह करीत नाहीं— तूं एकच शब्द बोलून सोक्ष कीं मोक्ष काय तें मला कळीव!

गोविं०—वैद्यराज! ही मुलगी फार थोर दिसते. हिच्यानें तुमच्या आज्ञेशिवाय त्यांच्याशीं बोलवत नाहीं, तर कृपा करून तिला एकच शब्द का होईना, तेवढा पण त्यांच्याशीं बोलूं द्या. त्यांत आपलें काय जाणार आहे! पहायला तेवढीच गंमत! आणखी रोग्याच्या जिवाला तेवढेंच समाधान!

सखो०—तुम्ही म्हणतां तें खरें—पण—

गोविं०—भलतेंच! नाहीं म्हणायची ही वेळ का आहे? ती पहा तुम्ही कांहीं तरी सांगाल म्हणून तुमच्याकडे पहात राहिली आहे!

सखो०—पण मला हें समजत नाहीं, हिला कशाकरितां बोलूं द्यावें?

गोविं०—फिरून आपलेंच.—अहो, पण तुमच्यापाशीं ती जादूची नळी आहेना? मग तुम्हांला कसची धास्ती आहे?

अंणा०—हाय हाय! प्रिये! तूं किती निष्ठूर आहेस! तुझ्यानें एक शब्द—तो देखील बोलवत नाहीं अं?—हाय हाय! एकूण तुझ्या मनांत मीं आपला प्राणांतच करावा अं?

सखो०—अग बोल बोल—म्हण एकदाची होय!

अंणा०—प्रिये! बोल! तुझें मजवर प्रेम आहेना?

गंगू—होय.

अंणा०—(हर्षयुक्त होत्साता तिचें मनगट धरितो) अहाहा! धन्य धन्य मी!

सखो०—अरे, हा काय मूर्खपणा?—अरे ए गृहस्था सोड सोड तिला.—सोडतोस कीं नाहीं! (जबरदस्तीनें तिला सोडवूं लागतो. अंणासाहेब तिला सोडीत नाहीं. गंगू म्याळीसें करून किंकाळी ठोंकते. सखोपंत व अंणासाहेब यांची झटपट चालते.)

गोविं०—वैद्यबोवा! हा गृहस्थ यावेळीं शुद्धीवर नाहीं, याच्याशीं उगीच झटपट्यापासून फायदा नाहीं. तर आतां असें करा. आंतल्या खोलींत एकादें हांतरूण घालून द्या. तिथपर्यंत याला युक्तीनें आपण नेऊं, आणखी या मुलीलाही सोडवून घेऊं.

काय सागतां पुरवत नाहींत !—अं—अं—ते कळायला देव—पिशाचच अं—अं—पाहिजे! असो ; वैद्यबोवा ! मला—यांनीं—अं—अं—यांनीं आपलें नांव सांगितलें—अं—अं—! जेणेंकरून माझ्या—अं अं—माझ्या या जिवाचें समाधान होईल असें काहीं औषध उंऊं——आपल्या जवळ आहे म्हणून हे मला सांगत होते,—आजपर्यंत दमलों बोवा—औषध—अं:—घेतां घेतां! पहा बोवा! तुमच्या हाताला कांहीं यश आलें तर !—

गोविं०—रावसाहेब ! आपण असे घाबरे होऊं नये ! मणि, मंत्र, आणि औषधि, यांच्या शक्तीचा कुर्धी कोणाला अंत लागला आहे ?—आपला दृढ निश्चय असूं द्या—आपण कांहीं अशा तशा लफंग्या डाक्तरांच्या किंवा वैद्यांच्या घरीं आलां नाहीं. हे वैद्य फार चागले विद्वान आणि अनुभविक आहेत, यांच्या जोडीला मीही आहें.—हुं हुं म्हणतां दुखण्याचा जोर कमी करूं ! काहीं घाबरायचें कांहीं कारण नाहीं !

सखो०—तें सगळें होईल.—पण **धन्वंतरि** महाराज ! कृपा करा आणि कांहीं तरी युक्तीनें या पोरींना इथून बाहेर काढून द्या!

गंगू—होय, मी जातें आहे तर !

सखू—मला पाहूं तर द्या बाहेर कशी काढून देतां ती ?

गोविं०—त्या बाहेर जातीलसें मला कांहीं वाटत नाहीं.—(त्यांच्या नाड्यांला हात लावून) छेः, बाहेर जायचें अगदीं नांव सुद्धां नको. त्या यंत्राची ओढ अशी कांहीं जबरदस्त बसली आहे कीं, तें यंत्रच अजीबात दूर नेल्याशिवाय त्याच्यापुढें **ब्रह्मदेवा**चाही इलाज चालायचा नाहीं !—बरें तें असो; पण कसें काय ? वैद्यबोवा ! या नळीचें आपणाला किती सामर्थ्य आहेसें वाटतें ?

सखो०—छेः बोवा ! त्याचें दुप्पट सामर्थ्य आपल्या नाहीं उपयोगीं. आणखी या **सखी** पोरिवर तर त्यांचा अंमल नाहींच चालतां कामा !

गंगू—(एकीकडे सखूस) कायग गडे ! तिकडे प्रकृति फारच बिघडलीसें दिसतें आहे, नाहीं वरें ? आई **पर्वती** ! त्यांना संभाळणारी तूंच आहेस !

गोविं०—ऊं:—तें अगदीं सोपें आहे. (सखोपंताशीं कुजबुजूं लागतो. इकडे अंणासाहेब गंगूला कांहीं प्रीतिदर्शक खुणा करितात.) हं—आतां मी करतों आहे याकडे नीट लक्ष लावून पहा वरें ?—आतां इचें सगळें प्रेम मजवरती येईल असें करितों !

सखो०—वाः तसें झालें तर मजवर मोठाच उपकार केला असें मी समजेन. (गोविंदपंत फिरून त्यांच्या कानांत कुजबुजूं लागतो.)

अंणा०—(गंगूजवळ जाऊन तिला एकीकडे) मला एकच सांग—जर हा माझा बेत साधला, तर तूं माझ्याशीं लग्न लावायला कबूल आहेसना ?

गंगू—पण अगोदर कसला बेत तो मला कळला असता म्हणजे बरें !—

अंणा०—सारें खरें, पण आतां सांगत बसायला वेळ नाहीं.—पण लग्नाबद्दलचें कसें काय ? कबूल ?

गंगू—होय.

सखो०—(एकीकडे गोविंदपंतास) हं—हं—हें फार—वाहवा !—फार चागले ! सोन्याहून पिवळें—ठीक ठीक ! तर मग कसेंही

करून इच्या तडाक्यांतून मला लौकर सोडवा !

गोवि०—चिंता नाहीं. पण मला तिच्याजवळ गेलें पाहिजे. (सखूजवळ जाऊन तिला कांहीं खुणा करूं लागून हलक्या आवाजानें) **सखू** ! मी तुला आपल्या जन्माची सखी समजतों, तर आतां तुझें मजवर प्रेम आहे असें या लोकांस वाटीव पाहूं !

सखू—(हळूच) अहाहा ! जें खरेंच प्रेम आहे-तें खोट्यासारखें वाटवायला का पाहिजे ?

गोवि०—तसें आहे तर फारच चांगलें ! तें तर अधिक स्वाभाविक वाटेल ! (सखूत्याजकडे प्रेमदृष्टीनें पाहूं लागते.) (सखोपंताकडे येऊन) पाहिलें ना ? आतां मजकडे कशी पाहूं लागली आहे ती ?

सखो०—आतां मात्र तुमच्या विद्वत्तेची खरोखरी धन्य आहे !

गोवि०—पण एवढ्यानेंच काय झालें आहे ? याहूनही मोठा चमत्कार तो अजून मला करून दाखवायचाच आहे !

गंगू—(एकीकडे अंणासाहेबांस) तुम्हीं आलां एवढ्यानें बरें झालें, नाहीं तर तो येरङ मजशीं बलात्कारानें लगीन करणार होता

सखो०—अशी गोष्ट होईल म्हणतां ?

अंणा०—(भान न रहातां मोठ्यानें) काय विशाद आहे अशी गोष्ट होईल ?

सखो०—(आश्चर्यानें अंणासाहेबांकडे वळून पहातो-ती गोष्ट सखूच्या लक्षात येते.)

सखू—अहो ! धांवा धांवा ! इतक्यांत यांनी काय झालें पहा !

गोवि०—कांहीं भ्यायचें कारण नाहीं. अशी त्यांची राहून राहून स्थिति होतेच. (अंणासाहेब विलक्षण हातवारे करूं लागतात.) पण तीं कांहीं नाहीं.—आतां अमळशानें नाहींशी होईल.

अंणा०—अरे चोरट्या गुलामा ! तोंड लपवितोस काय ? दुष्टा ! नजरेस तर पड, तुझे तिळातिळाएवढाले तुकडे करून वाऱ्यावारी फेंकून देतो ! तूं काय समजला आहेस ?

सखो०—अद—द—द—द—द—द—द ! हा अजकडे टवकारून पहातो आहे, न्—न्—न्—म—मला ठ्—ठ्—ठार मा—मा—मारील ! मी—मी—मी आपला जातों प—पलो—पलीकडच्या खो—खोलींत—त्—त्—त्—

गोवि०—वैद्यबोवा ! असे घाबरतां काय म्हणून ? त्यांच्यापाशीं हत्यार पात्यार थोडकेंच आहे !

गंगू—तें खरें, पण **धन्वंतरि**बाबा ! यांचे हातवारे कांहींचे बाहींच भयंकर दिसतात, तेवढे कसेंही करून कमी करा !

सखो०—धन्वंतरिबोवा ! माझेंही म्हणणें हेंच !—व—व—व—व—

गोवि०—हे पहा. ही एक प्रकारची अपस्माराची लहर आहे.—ही एकदम कांहीं सगळीची सगळी जाऊं शकायची नाहीं. ही काढीत काढीत काढली पाहिजे, आणखी त्यांच्या वरळण्याचा रोख बदलला पाहिजे. आता पहा अं—(त्याच्यावर प्रयोग करीत आहेसें दाखवितो.) पहा, त्यांचा चेहरा आतां कसा बदलत चालला आहे ! त्याच्या वरची क्रूरता सर्व निघून जाऊन आतां सौम्यता आणि प्रेमळता या वृत्ति त्यांवर ठसलेल्या दिसत आहेत. हे मघां जसे रागानें अगदीं कोणीकडच्या कोणीकडे बेफाम होऊन गेले होते, तसे आतां नसून अभिमतवस्तुसंगमकाळीं जशी पूर-

अंणा०—अहाहा ! प्रिये ! खचित यावेळीं मी या लोकीं नसून **नंदनवनांतच** आहे असा मला भास होत आहे! अहाहा ! हें चोहीकडे पहा कसे कल्पवृक्ष आपल्या शाखारूप अग्रहस्तांनीं आह्मांसारख्या युवयुवतिजनांस क्रीडार्थच जाणों पाचारण करीत आहेत ! (आनंदातिशयानें बेल मिटून कांहीं वेळ रहातो, नंतर) आ—हा—हा ! प्रियतमे ! तुला काय सांगूं ? या आनंदाच्या प्रसंगीं हें सर्व विश्व कसें मला वसंतऋतूच्या शोभेनें भरलेलें दिसत आहे ! वाहवा ! वाहवा ! हें समोर प्रत्यक्षच पहा **मदनराजाचें** केवढें वैभव आहे तें !—खचित—खचित ! या वैभवावरून साक्षात् **मदनमूर्तिच** आपलें उभयताचें कल्याण करण्याकरितां प्राप्त होणार आहे असें मला वाटत आहे !—अहाहा !

श्लोक[1].

आम्री मंजुलमंजरी वरशरः ; सार्किशुकं यद्धनुः ; ज्या यस्यालिकुलं; कलंकरहितं छत्रं सितांशुः सितं ; मत्तेभो मलयानिलः ; परभृता यद्बंदिनो ; लोकजित् सोयं वो वितरीतरीतु वितनुर्भद्रं वसंतान्वितः !

सखो०—छेः तें कांहीं उपयोगीं नाहीं. याची ही लहर बदलून नवीनच लहर आणाल तर बरें होईल !—

गोविं०—हो.मी त्याचाच विचार करीत होतों.—हां—हां—(हातानें कांहीं खुणा करितो त्याबरोबर अंणासाहेब लाजल्यासारखें करून तिळा सोडून श्रांत होत्साते खालीं बसतात.)

(पडदा पडतो.)

अंक २.

सखोपंत वैद्याचें घर. बागेचा कंपौंड.

(गोविंदपंत आणि सखू बोलत आहेत.)

गोविं०—**सखू** ! अजूनपर्यंत तुझें आणि माझें कांहीं लग्न लागलें नाहीं, तेव्हां तुला अगदीं लाजायलाच पाहिजे असें कांहीं नाहीं. —बोल. अशी लाजूं नको. तुझ्या मनात काय बोलायचें असेल तें बोल.

सखू—काय असेल तें असो बाई ! पण आज कित्ती बोललें, याची बाई माझी मलाच लाज वाटूं लागली आहे !

गोविं०—तूं म्हणतेस तें खरें आहे, पण तुह्मांला दोघींनाही या बंदांतून सुटायला पाहिजे आहे, आणखी त्याकरितांच तर आज सगळीं आपण इतकी खटपट करीत आहों, तेव्हां आज वास्तविक म्हटलें म्हणजे इतकें बोलायला पाहिजेच होतें.

सखू—तें मलाही समजतें. पण बाई ! ही कोण मेली तेव्हा ? बायकांनीं सगळी लाज टाकून सवरून आपलें दहा जणां देखत "तुमच्यावर माझें प्रेम आहे हो" म्हणून बोलत बसावें !

गोविं०—अग, ही तेव्हा चांगली नाहीं हें मला देखील नाहीं का वाटत ? पण तसें जर न करावें, तर तो थेरडा घोटाळ्यांत

---

१. "आम्रवृक्षाची मंजुल मंजरी हाच ज्याचा उत्कृष्ट बाण; उत्तम पलाशपुष्प हेंच ज्याचें धनुष्य; भृंगांचा समुदाय हीच ज्याच्या धनुष्याची मौर्वी, शुभ्रकिरण चंद्र हाच ज्याचें निष्कलंक शुभ्रच्छत्र; मलय पर्वतावरून वहात येणारा वायु हाच ज्याचा आरोहण करण्याचा मत्त हस्ती; कोकिलाच ज्याचे स्तुतिपाठक; असा हा त्रिलोकविजयी अनंग, तो वसंतऋतूशीं युक्त होत्साता तुमचें वारंवार कल्याण करो !" कालिदासकृत ऋतुसंहार, सर्ग ६, वसंतवर्णन.

कसा पडावा ? आणखी आमची व तुमची गांठ तरी कशी पडावी ?

सखू—पण त्याला हीच का तऱ्हा पाहिजे होती? पोलिसांत फिर्याद केली असती तर नसतें का चाललें ?

गोविं०—भलतेंच ! खरें म्हटलें तर अजूनपर्यंत तूं नि **गंगू** माझ्या किंवा **अंणासाहेबां**च्या कोणी नव्हेत. तेव्हां आमच्या नुसत्या सांगण्यानें पोलिस थोडेंच ऐकणार होते ? आणखी तशांतून ऐकलेंच असतें, तरी **सखोपंतानें** तुह्मां दोघींला सालसुरत आणलेलें, त्याचा आणि **काकां**चा चांगला स्नेहसंबंध, तेव्हां त्यानें केलें हें गैरवाजवी, असें आमच्यानें कसें म्हणवतें ? तेव्हां तें नाहीं, न् तुह्मीं आपलें घर सोडल्याला एक वर्ष अधिक दिवस झाले, तेव्हां तुमचें तरी आमच्यावर मन राहिलें आहे कीं नाहीं हें आह्मांला समजायला मार्ग नव्हता, तेव्हां उगीच फिर्यादी करून आपलें हंसेंच करून घ्यावें हें कांहीं आह्मांला नीट वाटलें नाहीं.

सखू—आतां समजलें. तरी पण बाई पुरुषांशीं इतकें चघळपणीं बोलत बसणें म्हणजे कसेसेंच वाटतें ! आमची बायकाबायकांतली गोष्ट निराळी !

गोविं०—अग, फिरून तेंच ! आजची वेळच तशी, तेव्हां तेवढ्याकरितां इतकें हें व्हायला पाहिजेच होतें.

सखू—बरें आजचा दिवस चालूं द्या. पण खरेंच पुसाल, तर मला बाई कंटाळा आला इतकें बोलायचा! आतां हें असेंच आणखी किती वेळ चालायचें ?

गोविं०—चालायचें काय, तुमची सुटका इथून होस्तोंपर्यंत.

सखू—बरें बाई. पण आज **अंणासाहेबां**नीं गंगूचा हात धरला हें चांगलें का केलें?

गोविं०—अग, चांगलें तर नाहींच—पण त्यांनीं जें भ्रमिष्टाचें सोंग घेतलें होतें, त्याची एरवीं पुरती बतावणी कशी झाली असती? असो; झालें तें बरेंच झालें. बरें, आतां खरेंच सांग, **गंगू**चा त्यांनीं हात धरला याबद्दल तिला वाईट का वाटलें ?

सखू—तसें कांहीं खरेंच. वास्तविक तिचें प्रेम **अंणासाहेबां**वर नव्हतें असें कांहीं नाहीं, पण हें अंमळ रीतीला विरुद्ध दिसण्यासारखें होतें इतकेंच!

गोविं०—असो; त्याचें कारण काय तें मीं तुला सांगितलेंच आहे. बरें, इतकें तर झालें, आतां पुढें काय काय गोष्टी करायच्या, त्याबद्दल माझें आणि **अंणासाहे**बांचें बरेंच बोलणें झालें आहे; पण सगळा बेत जमवून आणायला मला एक वेळ आमच्या बिऱ्हाडापर्यंत जाऊन आलें पाहिजे. त्याची तजवीज काय करावी ?

सखू—होय बाई ! ती अडचण खरी आहे. तो मेला **सदू**भट—त्याच्यापाशीं घराच्या एकूण एक किल्ल्या असतात. त्यामुळें घरांत कुणाला यायचें झालें किंवा बाहेर जायचें झालें, तर त्या मेल्याला विचारल्याशिवाय कांहीं चालत नाहीं.

गोविं०—ही मोठीच नड आहे. पण कायग, मला वाटतें त्याला या घरांतून मुद्दाम काढून टाकायची कांहीं तरी युक्ति करावी ! तुला कसें वाटतें ?

सखू—हं हं—मला बाई आतां एक युक्ति सुचली आहे. तिच्यानें काम होईलसें वाटतें.

गोविं०—तीं कशीग, काय आहे ऐकूं तर खरें.

सखू—आजच सकाळीं **सदू**भटाला एक कुतरा चांवला. तो कुतरा कांहीं पिसाळलेला नव्हता, पण आमच्या थेरड्यानें, पिसाळलेला कुतरा चांवला असतां आपण बरा केला ह्मणून फुशारकी मारण्याकरितां, त्याची कुतरा पिसाळलेला आहे ह्मणून समजूत घालून दिली. तर समजा, आपण कांहीं युक्ति केली, न् त्या थेरड्याला कुतरा खरोखरीच पिसाळलेला आहे, असें वाटिवलें.—

(इतक्यांत जादूची नळी हातांत घेऊन सखोपंत बाहेर पडतो.)

सखो०—(येतां येतां दुरूनच) त्याला फिरून आणखी एक मोठी लहर आली होती, आणखी ती कांहीं वेळानें पहातों, तों अपोआप बंद होऊन त्याला आतां चांगली गाढ झोंप लागली आहे.

सखू—(एकीकडे गोविंदपंतास) बरें तर, मी आतां जातेंहो—आणखी परत आल्यावर मी जें जें कांहीं ह्मणेन त्याला तुह्मीं आपले हो ह्मणत चला ह्मणजे झालें. (जाते.)

सखो०—(आश्चर्यानें) काय्हो—हें कसें काय? तुह्मीं तिला जाऊंशी दिलीत?

गोविं०—जाऊं दिली कसची? ती आतां परत येईल. पाणी प्यायला गेली आहे.

सखो०—छे बोवा! धन्वंतरिमहाराज! फार फार प्रेम करीत बसणें ह्मणजे तरी कंटाळाच येतो. इतका वेळ मी प्रेम प्रेम करीत अगदीं वेडा झाल्यासारखा होऊन गेलों होतों. आतां कुठें तुमच्याशीं बोलायला फुरसतशी झाली आहे. अहो! तुमची विद्या तर मोठीच आश्चर्यकारक आहे यांत संशय नाहीं, तरी पण तुह्मीं ती मला उलगडून सांगायला पुष्कळ खटपट केलेली व्यर्थ गेली! खरें पुस्तक, तर तिच्यांतलें मलों अजून एक अक्षरसुद्धां समजलें नाहीं!

गोविं०—कांहीं फिकीर नाहीं. त्याबद्दल तुह्मांला लौकरच चांगली समजूत मिळेल.

(इतक्यांत घाबरी घाबरी झालेली सखू येते. तिच्या पाठीनागून लांबून सदूभट लंगडत धांवत येतो.)

सखू—अहो धांवा! धांवा! मला सो—तोडवा! मी मेलें—

सखो०—कां, काय झालें आहे काय?

सदू०—कायग पोरी, तुला सगळी थट्टाच वाटली असेल, नाहीं? थांव तुला चांगली कुंवलतों.

सखू—(घाबऱ्या घाबऱ्या सखोपंताच्या आणि गोविंदपंताच्या मध्यें शिरते.) अहो, जपून असा. मोऱ्यानें नका बोलूं! तो मेला आतां आपल्या अंगावर येईल!

सखो०—काय? अंगावर येईल?

सखू—(हलक्या आवाजानें) अहो, हां हां!—त्याला वेड लागलें आहे. तो पिसाळला आहे!

सखो०—काय ह्मणतेस?

सखू—अहो, हलक्यानें बोलाहो.—मी आतां तिकडे गेलें होतें, तों भटजी सत्रंजीवर पालथे पडून सत्रंजी चावीत होते. तों इतक्यांत मीं त्यांच्या दृष्टीस पडलें ते मला चावायकरितां हांतरुणावरून धडपडून उठले. (सखोपंत सदूभटाकडे वळून पाहूं लागतो, त्यास) अहो, तुह्मांला देवाची शपथ आहे! तुह्मीं त्याच्याकडे पाहूं नका! तो तुह्मांला चांवेल!

सखो०—भलतेंच कांहीं तरी! तो कुतरा कांहीं पिसाळला नव्हता.

सखू—आजच सकाळीं **सदू**भटाला एक कुतरा चांवला. तो कुतरा कांहीं पिसाळलेला नव्हता, पण आमच्या थेरड्यानें, पिसाळलेला कुतरा चांवला असतां आपण बरा केला ह्मणून फुशारकी मारण्याकरितां, त्याची कुतरा पिसाळलेला आहे ह्मणून समजूत घालून दिली. तर सपजा, आपण कांहीं युक्ति केली, न् त्या थेरड्याला कुतरा खरोखरीच पिसाळलेला आहे, असें वाटिवलें.—

(इतक्यांत जादूची नळी हातांत घेऊन सखोपंत बाहेर पडतो.)

सखो०—(येतां येतां दुरूनच) त्याला फिरून आणखी एक मोठी लहर आली होती, आणखी ती कांहीं वेळानें पहातों, तों अपोआप बंद होऊन त्याला आतां चांगली गाढ झोंप लागली आहे.

सखू—(एकीकडे गोविंदपंतास) बरें तर, मी आतां जातेंहो—आणखी परत आल्यावर मी जें जें कांहीं ह्मणेन त्याला तुह्मीं आपले हो ह्मणत चला ह्मणजे झालें. (जाते.)

सखो०—(आश्चर्यानें) काय्हो—हें कसें काय? तुह्मीं तिला जाऊंशी दिलीत?

गोविं०—जाऊं दिली कसची? ती आतां परत येईल. पाणी प्यायला गेली आहे.

सखो०—छे बोवा! धन्वंतरिमहाराज! फार फार प्रेम करीत बसणें ह्मणजे तरी कंटाळाच येतो. इतका वेळ मी प्रेम प्रेम करीत अगदीं वेडा झाल्यासारखा होऊन गेलों होतों. आतां कुठें तुमच्याशीं बोलायला फुरसतशी झाली आहे. अहो! तुमची विद्या तर मोठीच आश्चर्यकारक आहे यांत संशय नाहीं, तरी पण तुह्मीं ती मला उलगडून सांगायला पुष्कळ खटपट केलेली व्यर्थ गेली! खरें पुसलें, तर तिच्यांतलें मलों अजून एक अक्षरसुद्धां समजलें नाहीं!

गोविं०—कांहीं फिकीर नाहीं. त्याबद्दल तुह्मांला लौकरच चांगली समजूत मिळेल.

(इतक्यांत घाबरी घाबरी झालेली सखू येते. तिच्या पाठीमागून लांबून सदूभट लंगडत धांवत येतो.)

सखू—अहो धांवा! धांवा! मला सो—सोडवा! मी मेलें—

सखो०—कां, काय झालें आहे काय?

सदू०—कायग पोरी, तुला सगळी थट्टाच वाटली असेल, नाहीं? थांव तुला चांगली कुंवलतों.

सखू—(घाबऱ्या घाबऱ्या सखोपंताच्या आणि गोविंदपंताच्या मध्यें शिरते.) अहो, जपून असा. मोऱ्यानें नका वोलूं! तो मेला आतां आपल्या अंगावर येईल!

सखो०—काय? अंगावर येईल?

सखू—(हलक्या आवाजानें) अहो, हां हां!—याला वेड लागलें आहे. तो पिसाळला आहे!

सखो०—काय ह्मणतेस?

सखू—अहो, हलक्यानें बोलाहो.—मी आतां तिकडे गेलें होतें, तों भटजी सत्रंजीवर पालथे पडून सत्रंजी चावीत होते. तों इतक्यांत मी त्यांच्या दृष्टीस पडलें ते मला चावायकरितां हांतरुणावरून धडपडून उठले. (सखोपंत सदूभटाकडे वळून पाहूं लागतो, त्यास) अहो, तुह्मांला देवाची शपथ आहे! तुह्मीं त्याच्याकडे पाहूं नका! तो तुह्मांला चांवेल!

सखो०—भलतेंच कांहीं तरी! तो कुतरा कांहीं पिसाळला नव्हता.

सखू—(धावरून) अहो, असे कसें ह्मणतां? कुतरा खरोखरीच पिसाळला होता!

गोविं०—तें काय असेल तें असो; पण या माणसाच्या अंगांत कांहीं तरी जबरदस्त विषार शिरला असावा असें दिसतें खचित!

सखो०—पण हें असें कसें? मला तसें नाहीं वाटत तें?

सखू—अहो, त्याची प्रचीत पहायला फार लांब जायला नको. हें इथें पंचपात्रींत पाणी आहे. (पाणी सदूभटाच्या अंगावर फेंकिते.)

सदू०—(दांत खाऊं लागतो.) अग, कायग करते आहेस ए पोरी!—आं—आं—आं—(किंकाळी शोंकतो.)

सखू—हेंच पहा, पाणी पाहिलें ह्मणजे कसा दचकतो तें!

गोविं०—वाः! यावरून तर हें अगदीं खचितच आहे. आपल्याला संशय आला तो निःसंशय खराच!

सखो०—एकूण याला बाधलें कुत्र्याचेंच विष अं?

गोविं०—होय तेंच खचित. (सखू सदूभटाच्या अंगावर दुसऱ्यानें पंचपाली भरून फेंकूं लागते. तें याहिल्याबरोबर तो दचकतो.)

सखू—हें पाहिलेंका, नुसतें पाणी पाहिल्याबरोबर दिसेल हा कसा दचकतो आहे तें?

सदू०—(दांत खाऊन) रांडे! माझ्या अंगावर आतां फेंक तर—(तिला मारण्याकरितां पुढें येऊं लागतो.)

सखो०—**सखू!** आतां पुरे कर. त्या बिचाऱ्याला उगीच चिडावियें चांगलें नाहीं.—बरें, कसें कायहो **धन्वंतरि**महाराज! आतां यांवर उपाय काय करावा बरें? आपण याच्या पुढें तुमचें यंत्र धरलें तर कसें काय बरें होईल?

सदू०—छत्! असल्या आजारांवर या यंत्रानें कांहीं कातसुद्धां व्हायचा नाहीं!

सखो०—तर मग याला उपाय?

गोविं०—याला उपाय—याला उपाय ह्मटला तर मला बोवा एक ठाऊक आहे. हा चावायला पहातो याकरितां याचें तोंडच बांधून टाकलें पाहिजे.

सखू—होय खरेंच बाई! असेंच कांहीं तरी करायला पाहिजे असें मलाही पण वाटतें.

सखो०—हुं हुं—बरें, मग येऊन जाऊन हा उपाय जर करायचाच आहे, तर मग उशीर तरी कां करावा?

सदू०—काय? माझें तोंड बांधायचें? वैद्यबावा! दया करा! दया करा! (त्याच्या पायां पडतो) मी गरीब आहें!

सखू०—वैद्यबाबा! जपून असा. नाहीं तर पायांला चावतीलहो.

सखो०—भटजी! घाबरूं नका. सुमारें दहापांच मिनिटांत विषाचा अंमल उतरून निकाल होऊन जाईल.

सदू०—तरी पण तुमच्या पायां पडतों. माझें तोंड बांधूं नका.

सखो०—मूर्ख आहेस. गप्प बस! अशा रीतीनें जिवंत राहून तरी फायदा कोणता?

सखू०—भटजी! तुह्मीं असेंहो काय करितां? वैद्यबोवा तुह्मांला कधीं भलतेंसें सांगणार नाहींत.

सखो०—हा अशानें ऐकेलसें वाटत नाहीं. तर याला आपण तिघेंही जण आवळून धरूं या कसें!

सदू०—रामराम!—अग आईग! मेलों मेलों!

सखू—(त्याला धरण्याकरितां खालीं वांकून त्यास हळूच) भटजी! तुह्मांला जर जिवंत रहा-

यला पाहिजे असेल, तर तुम्हीं इथून आपले पळून जा, ते फिरून परत कांहीं येऊं नका ! (सदूभट किंकाळी ठोंकीत पळून जातो.)

गोवि०—अरे, याला पळून जाऊं देतां उपयोगीं नाहीं. हा बाहेर कुणाला चांवेल बिवेल!—कोण आहे ह्यो ! पकडा० पकडा ! त्याला जाऊं देऊं नका ! (त्याच्या मागून धांवत निघून जातो.)

सखो०—अरे बापरे ! ही पंचाईतच झाली ! आतां काय अनर्थ होतो कोण जाणे ?—बरें गेला तर गेला, आणखी माझ्या सगळ्या किल्ल्याही घेऊन गेला !

सखू—तरी पण नशिबानें दारें तर बहुतेक उघडींच आहेत !

सखो०—अरे, पण हा काय त्रास ? धन्वंतरि बोवा अजूनपर्यंत परत कां येत नाहींत ?

सखू—मला तर वाटतें, ते कांहीं भटजींना कुठें तरी चांगल्या सुरक्षित टिकाणीं अडकवून ठेवल्याशिवाय परत यायचे नाहींत.

(इतक्यांत गंगू येते.)

गंगू—(घाबऱ्यां घाबऱ्यां) अहो वैद्यबोवा ! अहो वैद्यबोवा ! अहो इकडे या, इकडे या ! ते पहा माझ्या पाठोपाठ माझ्या खोलींत शिरतात ! आतां मीं जावें तरी कुठें बाई ! दिसतांना तर अगदीं मृत्यूची कळाच दिसते आहे तोंडावर ! धांपा कोण टाकताहेत ! फार तर आज उद्यांचेच सोबती मला वाटतात !—हे बघा ते इकडे बागेकडेच वळले ! (अंणासाहेब हलक्यानें खडबडत खडबडत बागेंत येतात, व चालवत नाहींसें होऊन मधेंच पडतात.)

सखो०—अरे, हा कोण अविचार ! आतां यांना उचलायला देखील घरांत कोणी माणूस नाहीं ! अग **सखू** ! तिकडे घरांत **सखूबाई** असेल तिला तरी हांका मार, ह्मणजे ती अंमळशी उचलूं तरी लागेल !

सखू—ती आज खरकटीं उष्टीं करून जी देवाला ह्मणून बाहेर पडली, ती अजून आलीं आहे कोठें ?

सखो०—बरें, यांना इथें तर रडूं देतां उपयोगीं नाहीं ! चला, मुलींनो ! तुम्हीं लागा, मीही लागतों, यांना उचलून वळकटिवर नेऊन ठेवूं ! (सारींजण त्याप्रमाणें करितात.)

अंणा०—(कण्हत कण्हत) अं:—वैद्यबोवा !—हें इथें जड लागतें आहे. अं:—तेवढें काढा—अं:—नाहीं तर मरतों अं:—अं:—

सखो०—या वेळीं **धन्वंतरि**बोवा असते, तर बरें झालें असतें.—हें बघा, तुम्हीं असे वळून पडा !—अस्से ! आतां दाखवा कोठेंसें जड लागतें आहे तें ?

अंणा०—अं:—हें बघा इथें लागतें आहे !—(पोटावर हात ठेवून दाखवितात.) अं:—अं:—वैद्यबोवा ! आतां मी खचित घटके दीड घटकेचा सोबती आहें—अं:—अं:—

सखो०—कांहीं घाबरूं नका! लौकरच बरे व्हाल!

(जादूची नळी आडवी उभी त्यांच्या अंगाला लावूं लागतात.)

अंणा०—अं:—अं:—गोळा तिथून सरकला ! अःया (ढेंकर देतो.) अं:—अं:—हें पहा आतां डोकें जड झालें आहें—अं:—अं:—आई आई—आई ! तिडीक फार लागली आहे !—अं:—अं:—तें खालीं तरी आणा-हो !—अं:—अं:—(वैद्यबोवा डोकीला नळी लावितात.) आतां कांहीं बरें वाटतें !—आ—आ—आरेहे ! पण ही छातींत कळ

शिरली, अरेरेरेरे !—छाती—जळूं लागली! —ओ—अरेरेरेरे ! छातीचे तुकडे पडूं लागले !—ओ—ओ—ऽसूं—

सखो०—अरे, अजून **धन्वंतरि** येत नाहींत ?

अंणा०—अरे, इथली कळ दूर करारे !— अरेरेरेरे—टांके तुटलेरे !—अरेरे, दुसरीकडे तरी न्यारे !—(वैद्यबोवा नळी लावितात.) छेः—कसचें काय घेऊन बसलां ?—मेलों— अंधारी येते ऊंः--ऊंः-(घोर लागलासें होऊन कांहीं वेळानें निश्चेष्ट पडतात.)

सखू—अग बाई बाई ! यांना काळानेंच घेरलें वाटतें !

गंगू—अग आई ! आई !—वैद्यबोवा ! आतां-हो कसें होईल ? हे मेले कींहो !

सखो०—काय करावें ? या वेळीं मला अगदीं सुचेनासें झालें आहे !—असो; मुलींनो ! तुम्हीं आतां रिकामी ओरड करूं नका. कराल तर शेजारी पाजारी उगीच येऊन भरतील, आणखी— मी कांहीं तरी नवीन प्रयोग करून पाहूं लागलों नू रोगी मारला, ह्मणतील !

सखू—तुम्हीं ती नळी त्याच्या छातीवर धरली, त्यानें तर असें झालें नसेलना ?

सखो०—असेलही. कोणीं सांगावें ? ते **धन्वंतरि** कायसेंसें रसाबद्दल ह्मणत होते खरें ! तेव्हां भलतीकडचा रस भलतीकडे गेला असेंही झालें असेल.— पण—थांबा. ही मूर्च्छा तर नसेलना आली ! तसें असेल तर अजूनही शुद्धीवर यायची आशा आहे. हो—मीं तें नवीन सरबत तयार केलें आहे तें,—त्याचे दहा पांच थेंब ओंठावरून सोडून बघूं, आला तर येईल गुण !— (किल्लीकरितां जानवेंचांचपूं लागतो)

अरेरेरे !— घात झाला ! त्या **सद्या**जवळ माझ्या पेटीची किल्ली राहिली ! त्या पेटींत माझ्या दोन बाटल्या भरल्या आहेत !

गंगू—ही वेळ कांहीं वाट पहायची नाहीं ! कुलूप तोडून औषध आणायचें होतें !

सखो०—अरे! **धन्वंतरि**बोवा अजून येत नाहींत !— छेः आज चोंहीकडून संक्रांतीचा योग जमला आहे कीं काय समजत नाहीं. मी पहिल्यापासूनच ह्मणत होतों याला घरांत आणूं नका ह्मणून ! माझा डावा डोळा तेव्हांच लवूं लागला होता !— अरे राम राम! राम राम! (जातो.)

अंणा०—जर माझा सगळा बेत सिद्धीस गेला, तर काय लाट उडून जाईल, याची तुह्मांला अजून कल्पना सुद्धां नसेल.— कायग, **गोविंद**पंत कुठें आहेत ?

सखू—त्या **सदूभटा**ला बाहेर कुठें तरी अडकवून ठेवायला ह्मणून गेले आहेत !

अंणा०—तें खरें, पण त्यांना यायला जर फार वेळ लागला, तर माझे सगळे बेत फसून जातील.

सखू—कशाला ? हे आलेच पहा. (गोविंदपंत आंत येतो.)

गोवि०—सुटलों एकदाचा. आतां या भटाची दोन दिवसपर्यंत कांहीं धास्ती उरली नाहीं !

अंणा०—(आपल्या अंगावरील पोशाख उतरून) पंत ! तुमचा पोशाख मला द्या, आणि माझा तो तुह्मीं घ्या, आणखी झटदिशीं मरा कसे !

गोवि०—काय ? मरूं ? ह्मणजे !

अंणा०—आतां वेळ नका घालवूं ! या हंतरूणावर पडून मेल्याचें सोंग घ्या.

सखू–इतक्या वेळ **अंणासाहेबांनीं** तरी तेंच सोंग घेतलें होतें.

गोविं०–हा मात्र मोठा चमत्कार खरा ! बरें होऊं द्या. (पोशाख बदलतात.) पण– (आंथरुणावर पडतो.)

अंणा०–खबरदार एवढं कोठें हलाल किंवा श्वासोच्छ्वास सोडाल तर ! आतांच्या सोंगाची बतावणी जर नीट केली, तरच आपलें कार्य होणार आहे हें लक्षांत असूं द्या. ही तुमच्या या खिशांत रंगाची भुकटी आहे. ती थोडीशी तोंडावर आणि हातांपायांवर टाकली असूं द्या, ह्मणजे ह्याला तुह्मीं ओळखतां येणार नाहीं.

गोविं०–हं–होऊं द्या ! आतां मात्र मी तुमच्या **मृच्छकटिकां**तला **चारुदत्त**च बनलों ह्मणायचा ! जवळ दोहींकडे नागव्या तरवारी घेतलेले मांग एवढेंच काय तें कमी आहे.

अंणा०–बरें, आपले साथीदार कोणीकडे आहेत ?

गोविं०–थोरल्या रस्त्यावर गेलें ह्मणजे जो पाहिलाच पिंवळा बंगला दिसतो, तिथें आहेत. तिघांनींही डाक्तरांसारखे बूट पाटलोण घातले आहेत, आणखी मार डोळ्यांवरून आरशा, खिशांतून त्या थेटिकुपी का कायसें ह्मणतात त्या नळ्या, असा एकंदरींत लखलखीत थाट आहे, त्यांत कांहीं कमी नाहीं.

अंणा०–ठीक आहे. हा मी तिकडेच चाललों.

गोविं०–अहो, तेवढें उपरणें न् त्या मिशा टाका बरें इकडे ! (अंणासाहेब उपरणें व मिशा टाकतात.)

अंणा०–ठीक. आणा तुमची डोकीची शाल इकडे. (शाल डोकीस गुंडाळून) तो थेरडा येतो आहेसें वाटतें. हा चाललों. जपून काम चालूं द्या अं ? (जातात.)

गंगू–देव करो, आणि तुमच्या प्रयत्नाला यश यंवो.

गोविं०–(आंथरुणांत उठून बसून) छेः बांवा ! हें कांहीं आमच्या मूळच्या बेतांत नव्हतें. याचा अर्थ काय हें मला कांहींच कळत नाहीं.

सखू–हां निजून रहा कसे. मेलेलीं माणसें कधीं अशीं उठन का बसतात?

(गोविंदपंत मेल्यासारखा वळकटीवर पडून रहातो.)

(इतक्यांत सखोपंत वैद्य येतो.)

सखो०–कायगा, कांहीं हालचाल किंवा तोंडांतून एकाद दुसरा शब्द तरी ?

सखू–छे बाई ! मेलेलीं माणसें असें का कुठें करीत असतात ?

सखो०–चिंता नाहीं, बरें ही बाटली तर धर त्याच्या नाकापाशीं, आणखी हें त्याच्या कपाळावर आणि तोंडावर शिंपड !

गंगू–छेहो यानें कांहीं सुद्धां होत नाहीं ! हे मेले हेंच खचित.

सखो०–(प्रेताकडे पाहून) कायहो, इतक्या थोडक्या वेळांत यांच्या मुद्रेत केवढा फरक पडला ! मघां तोंड किती उमदें दिसत होतें, आणखी तेंच आतां राखेसारखें दिसत आहे ! शिवशिव ! **सखू** ! तूं त्याच्या छातीवर तरी हात ठेवून पहा आंत कुठें कांहीं तरी खडबडतें कीं नाहीं तें. हा असला अकल्पित प्रकार घरांत एकदम घडल्यानें माझें तर सर्वांग लटलट कांपतें आहे ! माझ्या हातून कांहीं होत नाहीं.

---

१. स्टेथिस्कोप.

सखू—(तसें करून) छः जिकडे तिकडे अ दीं सामसूम आहे !

सखो०—एकूण कुठेंच कांहीं हालचाल नाहं

सखू—राम ! ज्याचें नांव तें ! हे गाल पः कसे कालापेक्षांही गार लागतात !

सखो०—विलक्षण आश्चर्य आहे ! धन्वंत बोवाही अजून येत नाहींत, तेव्हां गळ्यांनीं गुलामांनीं मला बुडवायचा हा नसेलना कट केला ?

सखू—वाः वा ! हें ह्मणणें का कुठें शोभेल हा विचारा मनुष्य इथें मरून पडला अ तो देखील का त्या कटांत होता ह्मणाय

सखो०—अग तसें नव्हे, त्या धन्वंतऱ्या खात्रीच झाली असेलकीं, आतां हा रे कांहीं आपल्या हातून बरा होत ना तेव्हां त्याच्या मृत्यूबद्दलचें अपेश मज ढकलण्याकरितां त्या गुलामानें ही मस योजिली असेल !—भांचोद काय त्रास प गेल्या आठ पंधरा दिवसांत माझ्या हा अगदीं नाहीं तरी बीस रोगी मेले आहे तेवढ्यामुळें ते डाक्तर माझ्यावर जसें का जळत आहेत. त्यांना या रोग्याची ही कीकत कळली, ह्मणजे आयती झाली कीं नाहीं तयारी आह्मांला माजिस्ट्रेटा गचांड्या देत न्यायची !

सखू—हें मात्र काम कठिण झालें खरें ! आ आपल्या घरांत माणूस देखील कोणी नाहीं ! तर आतां हें प्रेत इथून निखळ तरी कसें ?

सखो०—अग, थांब, आणखी एक उपा मला वाटतो आहे. तो अगदीं शेवटचाच— पण आहे ! तर तेवढा एकदा करून हातों.—आतांच्या आतां !—

गंगू—असा काय तो उपाय बाई ?

सखो०—(सखूस) बरें, पण हा मेला आहे हें तरी खचितना ?

सखू—ह्मणजे त्याचा अजून दिवाळ का संशयच ?

सखो०—झालें तर मग, आतां आहे त्यापेक्षां तर त्या उपायापासून, वाईट नाहींना व्हायचें !

सखू—तें बरीक खरें. या जन्मीं तरी हेंच शेवटचें !

सखो०—ठीक आहे, तर—तर—आतां याच्या वर एकदा एक प्रयोग करून पहातों. तो प्रयोग मीं **वेताळपंचविंशति** का कुठेंसा वाचलेला आठवतो. तो अजून मीं करून नाहीं पाहिला. पण आज ही आयतीच चांगली संधि आली आहे ! रोगी मेला आणि तोही वैद्याच्या घरीं ! हा प्रयोग माझ्या म नांत त्या **सदूभटा**वर करून पहायचा होता. पण तो जिवंत होता यामुळें त्याच्यावर हा प्रयोग झाला असता तर तो कदाचित् मेला असता !

सखू—तो कसा काय करायचा बरें ?

सखो०—त्याशीं तुला कांहीं करायचें नाहीं. तूं मुकाट्यानें डोळ्यानें पहात रहा. त्यापासून कांहीं उपयोग होण्याची मला नाहीं आशा वाटत. पण आपलें पहायचें !— आहे, उपाय आहे— आतां असें कर, याचें हें पोट कर मोकळें, आणखी ही खीळ घेऊन दांत उघडतां येतील तर पहा, तोंपर्यंत मी आंत जाऊन सगळें सामान घेऊन येतों. (निघून जातो.)

गोविं०—हं:— मूर्ख नाहीं तर ! तूं परत येईपर्यंत असाच पडून राहीन इतका काहीं

मी गद्धा नाहीं ! **अंणासाहेब** काय वाटेल तें ह्मणोत, पण आपण तर आतां पोंबारा करणार !

सखू—असें काय करावें तें ? तुह्मीं मेल्याचें ना सोंग घेतलें आहे ? मग होऊं द्या अखेरपर्यंत काय होणार आहे तें ? थोडक्याकरितां घाण काय ह्मणून करावी ?

गंगू—**गोविंदपंत** ! खरेंच, थोड्याकरितां घाई नका करूं !

गोविं०—पण तो थेरडा माझ्यावर प्रयोग तरी कसला करणार आहे, तेवढें तर सांग पाहूं ? मला वैद्य किंवा डाक्तर कोणी कसा तो दृष्टीसमोर देखील नको; आणखी आज मी इतक्या वर्षांचा झालों. पण मला समजूं लागल्यापासून मीं कुणाचेंही औषध ह्मणून कसें तें घेतलें नाहीं ! (उठून बसतो.)

गंगू—पण याला वैद्य तरी ह्मणतो कोण ? आजच स्वारीची डाक्तरांनीं दिली आहे फजिती उडवून, आणखी फिरून वैद्यकी कराल तर सरकारांत नेऊन गुदरूं ह्मणून दिखील त्याला त्यांनीं सांगितलें आहे!

गोविं०—ऊंः—एवढें असेल तर मग नाहीं फारशी धास्ती !

सखू—(त्याला पहिल्याप्रमोंण निजविते) हं—आतां गडबड नको ! अगदीं अळीमिळी चीपचिळी ! बतावणी—(इतक्यांत सखोपंत एक उंच तिवई आणखी एक मोठें नरसाळें घेऊन येतो.)

सखू०—जरा इकडे जराशी हात लाव, आणखी आंत मीं तेलाची कढई तापत ठेविली आहे तिकडे जरासें लक्ष असूं दे.

सखू—तुह्मीं करतां आहां खरें, पण दारें आहेत सगळीं उघडीं. कदाचित् कोणी आलें तर ?

सखो०—हो हो. आतां दारें बिरें लावून येतों. मी गेलों आहे भांवावून. शिंचो त्यामुळें आठवण देखील कशी ती रहात नाहीं. (जातो.)

गोविं०—(उठून बसून) अरे, हा काय गोंधळ आणला आहे पाहूं द्या तर खरा.

सखू—डोळ्यांनींच तो कशाला पहायला पाहिजे ? मागून काय आहे तो आपोआप कळणारच आहे!

सखो०—(बाहेरून) कोणरे तुह्मीं ए बेवकूव!—तुह्मांला एकदा सांगितलेंना माझ्या घराचीं दारें उघडायचीं नाहींत ह्मणून ? मी नाहीं ह्मणत असतां; गुलामांनो ! जुलुमानें माझ्या घरांत येऊं ह्मणणारे तुह्मीं कोणरे ?

गंगू—ऐका. दाराशीं गलबला ऐकूं येतो. (बाहेर पाहून)अग बाई! तिकडूनच येणें झालें. आतां बरीक इतक्या श्रमांचें आज सार्थक होणारसें दिसतें बाई ! (गोविंदपंत पूर्ववत् निपचित पडतो.)

(इतक्यांत अंणासाहेब आणि डाक्तरांचे वेष घेतलेले तिघे सार्थादार येतात. अंणासाहेबांनीं आपला पूर्वीचा पोशाख बदलला आहे. मागून सखोपंत येतो.)

अंणा०—मी असल्या पोरचेष्टा नाहीं चालूं द्यायचा ! मला ह्याच घराचा पक्का संशय आहे. कोणी एक लुच्चा ढोंगी मनुष्य आज या घरीं एका रोग्याला घेऊन आला आहे, तो रोगी माझा नातेवाईक असल्यामुळें मी पोलिसाचा हुकूम घेऊन—(हातांत घडी केलेला कागद होता तो दाखवितो)—ल्या रोग्याला न्यायला आलों आहें, आणखी

त्याला तपासायला हे माझ्याबरोबर डाक्तर आले आहेत. बोला ! रोगी कुठें आहे ?

सखो०—(आपणाशीं) शिव शिव ! आतां मात्र सर्वस्वीं घात झाला !

अंणा०—(त्याला दरडावून) कां बोलतां कीं नाहीं ? सांगा तो रोगी कुठें आहे ? तो मला प्रत्यक्ष पाहिला पाहिजे. मला त्याशीं बोलायला पाहिजे.

सखू—आतां कसचें बोलतां ? (प्रेताकडे बोट दाखवून) तो तर हा लोक सोडून परलोकाला केव्हांच पोंचला !

अंणा०—शिव शिव ! हेंच तें ! मघां मीं ह्मटलें तें हेंच !—काय ? हाच तो काय ? हायहाय !—अरे ! मी भ्रमांत तर नाहींना ?—छेः—छेः—यांत भ्रम कोठून येणार ? पहाहो पहा, त्या ढोंग्यानें याला मारून टाकलें खचित !—डाक्तर साहेब ! हा माझा नातलग मेला आहे, आणखी त्याला मारणारा कसाब तो हाच, याबद्दल तुमची मी साक्ष देईन ! (सखोपंताकडे बोट दाखवितो. दोघे डाक्तर प्रेत तपासूं लागतात, व तिसरा चष्मा साफ करीत सखोपंताकडे पहात राहतो.)

१ डा०—(रोग्याच्या छातीवर नळी ठेवून) हा मेला हे खचित आहे. पण याचा पंचनामा व्हायला पाहिजे.

अंणा०—कोण भयंकर हा प्रसंग !—(प्रेताच्या अंगावर डोकें टेंकून) हायरे गड्या ! तूं आणि मी एकत्र वागलों सवरलों, आणि आज तुझी अशी स्थिति पहाणें माझ्या नशिबीं यावें काय ?—हरहर ! गड्या ! एकूण त्या दुष्टानें तुझा असा अंत केला काय ? कांहीं चिंता नाहीं ! याबद्दल त्याचा पुरता सूड उगवीन—कधीं सोडणार नाहीं !

(सखोपंताकडे पाहून) दुष्टा ! ढोंग्या ! तूं या माझ्या नातलगाला समजून उमजून मारिलेंस, याबद्दल तुझ्या पायांत मणामणाच्या बेड्या ठोंकवितों, तूं काय समजला आहेस ?—डाक्तरसाहेब ! आतां घरांतल्या सगळ्या माणसांच्या जबान्या घ्या, इतक्यांत मी बाहेर पोलिसास बरदी देऊन कारोनर साहेबाला आणविण्याची तजवीज करितों !

सखू—(त्यापुढें पदर पसरून) अहो, अहो, तुम्हीं असें करूं नका. हे आमचे धनी—यांची कांहीं तरी कींव येऊं द्या. यांनीं तुम्हीं ह्मणतां त्याप्रमाणें रोगी मारिला खरा, परंतु तुम्हांला खचित सांगतें, त्यांनीं त्याला कांहीं द्वेषबुद्धीनें मारिलें नाहीं !

सखो०—ऊंः—औषधोपचार करितांना असे कैक रोगी मरतात !—डाक्तरांच्या हातूनही मरतात !—पण त्यांत काय मोठेंसें आहे ?

२ डा०—ठीक ठीक ! सरकारांत वैद्यकीबद्दल डिग्री मागत होते तेच गृहस्थना तुम्हीं ?

सखो०—(अंणासाहेबांच्या पायांशीं लागून) बाबा ! मी सर्वस्वीं चुकलों. कृपा करून मला तुम्हीं पोलिसांत नका घालवूं ! मी गरीब ब्राह्मण आहें !

अंणा०—होयहोय ! बरा असशील ब्राह्मण ! पहिल्या प्रतीचा चोर कसाब—याला ब्राह्मण ह्मणावें कोणीं ?—हरामखोरा ! तुला मी पोलिसांत घालवूं नको काय ? तूं मी कोण आहें ओखखिलें नाहींस ?—माझ्याकडे नीट पहा ! **अंणा नगरकर** ह्मणतात तो मी, समजलास ! थेरड्या ! तुला क्षमा मागतांना लाज वाटत नाहीं ? या मुलीचा बाप **काकासाहेब** वारला, तेव्हां माझें इच्छाशीं

लग्नाचें ठरलें असून तूं लबाडीनें तिला पळवून आणून तोंड काळें करून बसलास! पुढें तुझा मला शोध लागून मीं तुला रजिस्टर करून पत्रें पाठविलीं, त्यांचर साफ 'घेत नाहीं' ह्मणून जबाब लिहून दिलास! कांहीं आहे का आठवण?—हरामखोरा! त्याच वेळेस तुझ्यावर फौजदारी करायची, पण आजपर्यंत दम खाल्ला!—चला रावजी! आतां उंबरखाडींतल्या त्या अंधेऱ्या हवाशीर बंगल्यांत क्रीडा करीत वसायला चला!

सखो०—अहो, तुमच्या—च्या—पायां पडतों, तुह्मीं मला गरीबाला सोडून द्या—मी आपला तुमचें लग्न या पोरीशीं लावून देतों. मी तुमचें पत्र वाचायची देखील जरूर ठेवणार नाहीं.

अंणा०—तूं एक लावून देतों ह्मणशील, पण या मुलीनें त्याला कबूल ह्मणून लिहून दिलें पाहिजे!

गंगू—माझा प्राण गेला तरी पत्करेल! पण मी कांहीं तुमच्याशीं लग्न करायला कबूल नाहीं व्हायची!—देवानें माझ्या नशीबीं यांनाच लिहिलें आहे तेवढें मला पुरें आहें.

सखो०—तें खरें. पण **गंगू**! तूं अंमळ मजकडे पहा! मी झालों आहे सत्तर वर्षांचा ह्मातारा! तशांतून कुरूप, हेवेखोर, अंगांत शक्ति नाहीं! **गंगू**! खरेंच मी सांगतों ऐक. मी खरोखरीच ह्मा—

गंगू—अहा! ह्मणून काय झालें? आणखी नसतात का कुणा ह्माताऱ्यांना तरण्या बायका?

सखो०—अग, होय असतात. पण ते ह्मातारे लौकर मरून गेले ह्मणजे मागून त्यांच्या बायकांना वाईट मार्ग लागतो!

गंगू—लोकांना लागत असेल, पण मला नाहीं हो लागायचा! मला काय, तुह्मीं असले ह्मणजे पुरे आहे.

अंणा०—बस बस! मला असलें ऐकत बसण्याची जरूर नाहीं!—मी आपला तुला पोलिसाच्या स्वाधीन करून देतों!

सखो०—माझ्या गळ्याशपथ! असें करूं नका! मी आपला कबूल जबाब लिहून देतों—(मनांत) या जादूच्या नळीनें या पोरीचें मन वळविलें पाहिजे. त्याखेरीज इलाज नाहीं!

अंणा०—मला तुमच्या एकट्याच्या कबूल जबाबाला घेऊन काय चाटायचें आहे? मला या मुलीचाही कबूल जबाब पाहिजे.

सखो०—ती देईल.

गंगू—मी प्राण गेला तरी देणार नाहीं.

सखो०—तुमचा काय मजकूर लिहून आणिला असेल तो इकडे द्या, ह्मणजे त्याच्या खालीं मी आपली सही करितों. तोंपर्यंत एवढें हें धरा पाहूं. (जादूची नळी अंणासाहेबांचे हातीं देऊन आपण सही करितो.)

अंणा०—हें काय आहे? ही नळी कसली?

सखो०—ती कसलीही असो. ती तुमच्याच हातांत असूं द्या. दुसऱ्या कोणाला देऊं नका!

गंगू—अहो, तो कागद माझ्याकडे द्या. मलाही सही करावीशी वाटते.

सखो०—हां तसें व्हायचेंच तें! मला ठाऊकच होतें तें. (गंगू सही करते.) आतां अंणासाहेब! हा घ्या आपला कागद,

आणखी मला सोडून द्या. (त्यांच्या हातांत कागद देतो.)

गोविं०—(उठून बसतो) हा—हा—आतां मी थोडासा कुठें जीवंत झालों! आतां कांहीं थोडें बरें वाटूं लागलें आहे!

सखो०—(दचकून) अरे कायरे, तूं मेला नाहींस?

गोविं०—नाहीं. आतां थोडा थोडा बरा होत चाललों आहे!

सखो०—भले गृहस्थांनो! आतां तेवढा तो कागद तरी फाडून टाका! (गोविंदपंतास) अरे गृहस्था! काय हा मजवर आज गहजब झाला. हा सर्व तुझ्यामुळें—हरे कृष्ण! हरे कृष्ण! राम हरे! राम हरे! (मोठा उसासा टाकितो.)

गोविं०—अरे गृहस्था! तुझ्यावर मात्र गहजब! आणि माझ्यावर कांहींच नाहीं? विचार कर, जरकरितां माझ्या अंगावर आणि तोंडांत तापलेलें तेल ओतायचा तुझा बेत साधला असता, तर—

सखो०—(आश्चर्यानें) अरे, वा:रे गृहस्था! तूं तर मेला होतास, असें असून हें तुला एकायला कसें सांपडलें?

गोविं०—होयच. त्यांत काय माती आहे!—अंणासाहेब! याला ती नळी परत द्या, ह्मणजे पहा कशी गंमत होते ती, या दोघीजणीहि याच्यावर पुन्हां फिदा होतील!

सखो०—(आश्चर्यचकित होऊन गोविंदपंताकडे पहातो, आणि मग अंणासाहेबांना निरखून पहातो, अरे! ही तर पुरी वस्तादगिरी झाली आहे! अरे, आत्तां हे दोघेही मला बरोबर आठवतात!—पण हें कसें बरें झालें? मघां आजारी ही स्वारी होती! आनू आतां ही स्वारी बदलली हें कसें?

गोविं०—पण गृहस्था! इथें मेला होता तो मी!

सखो०—अेरेरे! या चोरांनीं आज माझ्या घरावर सर्वस्वीं दरवडा घातला!—अरे! धांवारे धांवा! अहो—चोर! चोर!—अहो वासुदेवराव!—ए टिळक! पंत! पंत! हो! पंत! धांवा धांवा! चोर! चोर!—(उसासा टाकितो) शिव शिव! कोण हा प्रसंग!

अंणा०—गृहस्था! असा ओरडूं नको! गोट आठवण कर! या मुलीशीं माझें लग्न व्हावयाचें ठरलें असून, आणि तिच्या बापाच्या मृत्युकाळीं तूं त्याप्रमाणें तिचें लग्न लावून देईन ह्मणून कबूल केलें असूनेही, तिच्या इच्छेविरुद्ध तिला अडकवून ठेविलेंस, यावद्दल तुजवर अन्यायाच्या आगळीकीची फिर्याद झाली, तर फुकट दोन वर्षं तुरुंगांत जाशील! याकरितां आपला बऱ्या बोलानें गप्प रहा, उगीच आरडा ओरड करण्यांत कांहीं फायदा नाहीं! मी तरी या कामांत इतकें साहस पत्करिलें, तें केवळ या सुंदरीच्या गुणांस आणि सौंदर्यासच भुलून!—दुसरें कांहीं नाहीं! वस्तुतः इचें जर मजवर मूळपासूनच मन नसतें, तर मलाही या कामीं त्रासच झाला असता!—असो; तेव्हां तात्पर्य काय, इचें मजवर मूळचेंच प्रेम होतें!—खरें प्रेम तें खरें प्रेम! तें जर नसेल, तर या तुझ्या प्रेमगुटिकेसारख्या पन्नास हजार गुटिका जरी लाखों वर्षं झटपटल्या, तरी त्यांपासून कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं!—

(पडदा पडतो.)

दुसऱ्या आवृत्तीबद्दल सूचना.

हें पुस्तक सुरू झाल्यापासून आजपर्यंत एकंदरींत २२ अंक तयार झाले आहेत. इतक्या अंकांच्या अवकाशांत या पुस्तकाच्या पूर्वी छापविलेल्या सर्व प्रती संपून जाऊन तेच अंक नव्यानें छापविण्याची आवश्यकता प्राप्त झाली असून, तदनुरूप शके १८०१ पैकीं पहिले तीन म्हणजे चैत्र, वैशाख व जेष्ठ या तीन महिन्यांबद्दलचे अंक सांप्रत परत छापविण्यांत आले आहेत; व यानंतर **'सवडी सवडीनें'** पुढील अंकही आज मितीपर्यंत सर्व पुनरपि छापण्यांत येणार आहेत. **'सवडी सवडीनें'** असें म्हणण्याचें कारण इतकेंच आहे कीं, पूर्वी आह्मीं जितक्या प्रती छापीत होतों, त्यापेक्षां आतां वर्गणीदारांची संख्या अधिक वाढल्यामुळें जास्त प्रतींची गरज लागू लागली आहे; परंतु ज्या मानानें या जास्त प्रती काढाव्या लागतात, त्या मानानें वर्गणीदारांकडून वर्गणीचा उलगडा होत नसल्या कारणानें सर्वच अंक एकदम छापीत बसलें असतां एक हजारांवर खर्च लागतो, तो तूर्तच करण्यास फार अडचणी आहेत. त्या अडचणी कशा हें वाचकांस लिहूनच कळविले पाहिजे असा बिलकुल प्रकार नाहीं. यास्तव या ठिकाणीं अमचे सर्वांस नम्रतापूर्वक एवढेंच कळविणें आहे कीं **हें पुस्तक सदोदित सुरळीतपणें चालावें अशी ज्यांची अंतःकरणापासून इच्छा असेल, त्यांनी या पुस्तकास उदारपणें आश्रय देण्यास मागें पुढें न पाहतां त्वरित आश्रय द्यावा, व तोहा 'देऊं दिलाऊं' अशावर न टाकितां ताबडतोब द्रव्य पाठविण्याच्या रूपानें द्यावा; म्हणजे "दसका लकडी एकका बोजा" या म्हणीप्रमाणें वर्गणीदारांस प्रत्येकीं थोडें थोडेंच द्यावयाचें पडून आह्मांस मात्र पाहिजे तशी मदत मिळून हिंमत वाढेल, व वाकीचे द्वितीयावृत्तीचे अंक थोड्याच दिवसांत छापून तयार करण्यास बरें पडेल. शिवाय अशा रीतीनें द्रव्याश्रय मिळाल्यास प्रथमावृत्तीचे जे आजपर्यंत अंक मागसले आहेत, तेही लौकरच बाहेर पडण्यास मदत केल्याचें श्रेय वर्गणीदारांस मिळेल. याकरितां ही सूचना मनांत आणून वाचक आपआपला द्रव्याश्रय त्वरित देतील अशी आशा आहे. सुज्ञांस विशेष लिहिणें नलगे.**

शंकर मोरो राजडे बी. ए.

मुंबई, कांदेवाडी माहे जून सन १८८१. नाम्ब कथार्णवाचे कर्ते व मालक.

—o—

विक्रीस तयार (नाट्यकथार्णव आफिसांत.)

	किंमत रु.	आ.	ट. ई.	अ.
नाट्यकथार्णव, वर्ष १ अंक १, २, ३, एकत्र केलेले (द्वितीयावृत्ति).	१	२		१॥
[illegible] (अलाहिदा पातळ कागदावर छापिलेले				
[illegible]	०	२		॥
मौजेच्या चार घटका भाग १. (कालिदासकृत अभिज्ञानशाकुंतल नाटक.)	१	८		२
लघुलेखनपद्धति (अथवा अतित्वरेनें मराठी भाषेंत लिहिण्याची युक्ति.)	०	१२		१
नलदमयंती नाटक (रा. सोकर बापुजी त्रिलोकेकरकृत.)	१	४		२
हरिश्चंद्र नाटक (,,)	०	८		१
अद्भुतठकबाजी	०	१२		॥
बोधरत्नावली भाग १	०	६		॥
हुन्नरसंग्रह भाग २	०	६		॥
श्री अक्कलकोटस्थ स्वामी महाराजांचें चरित्र, भाग १ ला. (महाराजांची साधारण स्थिति आणि त्यांजविषयीं लोकांचे अभिप्राय.)	०	८		॥
कित्ता भाग २ रा. (महाराजांनीं दाखविलेले अद्भुत चमत्कार.)	०	८		॥
उदार दामोदर नाटक	१	४		१
अश्वघाटीप्रबोधिका	०	२॥		॥

—o—

विक्रीस तयार.

मौजेच्या चार घटका भाग १. कालिदासाचें अभिज्ञानशाकुंतल नाटक.

यांत सगळ्या नाटकाचें भाषांतर नवें असून पात्रांची भाषा जशी प्रचारांत बोलतात तशीच घालून छापलेली आहे, व जागोजागीं टीपांसारखे पुस्तककर्त्यानें पदरचे विचार घातलेले आहेत. किं. १॥ ट. ख. २ आणे. पुस्तकें मुंबईंत, **नाट्यकथार्णव** आफिसांत; इंदुप्रकाशांत; विविधज्ञानविस्तार आफिसांत, व गिरगांवांत मालकाचे घरीं; पुण्यांत, तात्यासाहेब राजमाचीकर यांचे घरीं; नाशिकास जयराम भाऊ वकील यांचे घरीं; रत्नागिरीस सत्यशोधक छापखान्यांत; इंदुरास नारायणराव गणपुले यांचे घरीं विकत मिळतील.

महादेव चिमणाजी आपटे बी. ए. एल् एल्. बी.
मुंबई हायकोर्टाचे वकील.

—o—

"नलदमयंती" व "हरिश्चंद्र".

रा. रा. सोकर बापूजी त्रिलोकेकर यांनीं गद्यपद्यात्मक रचून चित्रांसह सुंदर ठशांनीं छापवून प्रसिद्ध केलेलीं वरील नाटकांचीं पुस्तकें **नाट्यकथार्णवाच्या** आफिसांत विकत मिळ-

तील. "नलदमयंती"—रु० १।. व टपालखर्च आणे २, व "हरिश्चंद्र"—रु० ॥· क टपालखर्च आणा १.

—o—

प्रमेहावर रामबाण अनुभविक औषध.

प्रमेह कितीही दिवसांचा असला, तरी या औषधानें १५ दिवसांचे आंत हटकून गुण येतो. औषध मागविणारांनीं मुंबई, अनंत ऋषीची वाडी, घर नं. २६, येथें पत्रें पाठवावीं, अगर स्वतां येऊन भेटावें.

डा. दामोदर रघुनाथ भुसे, एल्. एम्. ॲण्ड एस्.

—o—

THE INDIAN PHOSPHODYNE.

किंवा

जीवनार्क.

हा अर्क रुचकर व मधुर असून कोणत्याही ऋतूमध्यें पाहिजे तितके वेळ घेतला असतां अपकार करणार नाहीं. ह्यास सर्व शक्तीवरच्या औषधांचा राजा म्हटल्यास चालेल. कारण ह्यांत सर्व पौष्टिक औषधांचा समावेश केला आहे. शरीर मजबूत होऊन मेंदूची शक्ति व रक्त ताजीं होतात व वाढतात. हा अर्क पुढील रोगांवर रामबाण आहे:—इंद्रियें मंद पडणें, शक्तिपात, अभ्यास अगर कामकाज करवेनासें होणें, मंद स्मृति अगर दृष्टि, सतत कपाळशूळ, जननेंद्रियाचे रोग, दमा, खोंकला, रक्ताची कमताई, भूक मरणें, अपचन, कांपेर, अतिसंभोग, बलात्कारानें धातुपात, कुमार्गापासून रोग, **मधुमेह व रक्तपित्त** (हे **दोन रोग पुढें वाढत नाहींत.**) दारू पिण्याची खोड व तिचे भयंकर परिणाम, आणि सतत त्रासदायक घाम. ह्यांत चमत्कार इतकाच आहे कीं, शक्ति व उत्साह कायमचीं येतात, व गुण पहिल्या दिवसापासून भासतो. बालकांस हें मानसिक अन्नच आहे. तरुणांना मानसिक श्रम जाणवत नाहीं. व हें स्वभावसिद्ध शक्तिवर्धक होय. वृद्ध मनुष्यें व जिवाआगळे श्रम करणारे यांस हें प्रत्यक्ष जीवनाच्या ठिकाणीं होऊन ते दीर्घकाळपर्यंत वांचतात, व या कलिकालांतील आयुर्नियमाप्रमाणें संपूर्ण शरीराचे भाग कालमानानें खर्च होत राहून अखेर शरीराचे सर्व व्यापार आपोआप बंद होत तोपर्यंत निर्भयपणें राहतात. प्रत्येक विद्यार्थी, धंदा करणारा मनुष्य, किंवा सर्वकाळ कामकाजांत मुरणारा मनुष्य, यानें हें औषध संग्रहीं ठेवावें. किं. १। रु. बंगी करणावळ चार आणे. बंगी नाटपेट जाईल. एक चमचा अर्धा पावशेर दुधामध्यें दिवसांतून तीनदा घ्यावें. दूध पाहिजे तितकें घेतल्यास चिंता नाहीं.

कांदेवाडी मेडिकल हाल मुंबई.

वि. स. परांजपे.

मधुमेहावर हटकून औषध.

हें औषध चमत्कारिक गुणाकारी आहे. निदान दोन महिनें पचेल तितक्या दुधामध्यें दिवसांतून प्रत्येक वेळीं एक गोळी तीनदा द्यावी. मधुर पदार्थ व स्त्रीसेवन अगदीं वर्ज्य. किं. १। रु. ख. चार वाटल्यांपर्यंत ४ आणे.

कांदेवाडी मेडिकल हाल मुंबई. वि. स. परांजपे.

शालोपयोगी व इतर पुस्तकें.

अंकगणित (मराठी ९ व्या इयत्तेपर्यंत).— किं. ६ आणे; व ट. ख. १॥ आणा

मोडी वाचनसार भाग १ ला व २ रा—दर भागास किं. ३ आणे व पार्किंग व ट. ख. १ आणा.

हावर्डच्या इं. १ ल्या व २ ऱ्या पुस्तकांतील मराठींत उच्चारार्थासहित शब्द-संग्रह—किं. अनुक्रमें १॥ व २॥ आणे शिवाय प्रत्येकी ट. ख. १ आणा.

भूगोलाच्या व्याख्या, मराठी १ ल्या व २ ऱ्या पुस्तकांतील कठिण शब्दांचा अर्थ व कवितांचा अन्वययुक्त अर्थ—किं. १॥। आणे व ट. ख. ६ पै.

एशिया व युरोप खंडांचे संक्षिप्त वर्णन—किं. १ आणा ट. ख. ६ पै.

चित्रबोध अथवा बालकांचें प्रथम प्रियपुस्तक—किं. १॥ आणा, ट. ख. ६ पै.

हिंदुस्थानच्या इतिहासांतील सर्व संक्षिप्त माहितीचें लहानसें पुस्तक—(परीक्षे-च्यावेळीं अत्यंत उपयोगीं पडणारें) किं. २ आणे ट. ख. ६ पै.

आरतीसंग्रह (आरती संख्या ३१९ दुसरी आवृत्ति) किं १ रु. ट. ख. २ आणे.

पुस्तकें मुंबईत खालीं सही करणाराकडे मिळतील. जास्त प्रती घेण्यांत ट. ख. तु फायदा आहे.

कांदेवाडी शांतारामची चाळ नंबर ४२. } वासुदेव मोरेश्वर पोतदार.
स्कूलमास्तर गिरगांव प्रायव्हेट स्कूल, मुंबई.

अवश्य अनुभव घ्या ! ! ! एकदाच घेऊन खात्री ! ! !

CHILDREN'S ELIXIR.

बालामृत.

[झाडास ज्याप्रमाणें वाढवावे त्याप्रमाणें तें वाढतें.]

हें औषध एतद्देशीय अनेक वनस्पति मिश्र करून केलें आहे. ह्यापासून मुलांस जंतांचा उपद्रव कधींही होत नाहीं. अन्नपचन होऊन वारंवार दूध ओकणें बंद होतें. आईच्या दुधाच्या कमताईमुळें किंवा तें मुळींच न मिळाल्यामुळें होणारी क्षीणता व पांढुरकी ह्यांवर हें औषध जालिम आहे. गाईच्या दुधावर वाढविलेल्या मुलांस होणारे सर्व रोग ह्यानें दूर होतात. गर्भाशयांत मुलें असतां ह्मणजे गरोदरपणामध्यें अंगांत रक्ताची कमताई असल्यामुळें अगर पुढें अंगावर दूध न मिळाल्यामुळें मुलाच्या अस्थि काड्याप्रमाणें होतात

त्यांस बळकटी आणणें, व ज्यांचीं पोटें फार मोठीं होतात व तीं फार खातात व हळुहळु क्षीण होतात, ह्यावर हें अद्वितीय आहे. खोकला, गळ्यामध्यें घरघर आवाज, फेंपरे, आंकडी, पांढरी हाग, आंव, अतिसार, ह्या रोगांचा हें दिलें असतां संभवसुद्धां रहात नाहीं. पाय लटके पडल्यास हें औषध देऊन अवश्य पहावें. दमा, माती खाण्याची संवय, खरूज, कंडू, डोकींतील फोड, लागलेच दूर होतील. शौचास नियमानें होऊन सर्व इंद्रियें बराबर राहतील, ह्मणूनच ह्यास बालामृत असें नांव दिलें आहे. दर बाटलीस किंमत रुपया एक. बंगी खर्च आठ आणे. घेण्यास मधुर असल्याकारणानें मुलें पाहिजे तितकें घेतील. माहितीचा कागद आंत आहे.

कांदेवाडी मेडिकल हाल. वि. स. परांजपे.

THE INDIAN SWEET AND HEALTH-GIVING EFFERVESCENT FRUIT SALINE.

इंडियन मधुर व आरोग्यरक्षी वनस्पतींचें पाणी घातल्याबराबर उसळून वर येणारें

क्षाररूप रसायण.

वनस्पतींचे उपयोग अनेक, व त्यांपासून जालीम औषधें बहुत होतात. आपलें रक्त स्वभावतः खारट आहे. मीठ खाणें हें फार अवश्य आहे, व हें घातलें असतां पदार्थ नासत नाहींत. रोग झाला ह्मणजे रक्त नासतें, व त्यांतील क्षारांपध्यें बिघड होतो, ह्मणूनच कांहीं रोगामध्यें रक्त अतिशय काळें किंवा घन अथवा पातळ होतें. ह्या औषधाचा उपयोग कोणत्या रोगांवर होतो? ह्याचें उत्तर एक. "ज्यांमध्यें रक्त बिघडतें त्या रोगांवर:—,, पित्त, अजीर्ण, कपाळ व पोटशूळ, शारीरिक व मानसिक श्रमांपासून अस्वस्थता, दमून आल्यावर संताप, अतिशय जाग्रण व जड अन्नसेवन, मस्तकाची जडता, हवेमध्यें बिघड व अतिशय उष्म्यानें येणारी सकाळीं झांपड; लाल, दुःख देणारी व धातुमिश्र लघवी; परमा, तोंडाचा कडूपणा व कोरड; भोजनानंतर ढेंकरा, उचकी, ओकणें, पोटफुगी; मस्तक, नेत्र व तळव्यांची तप्तता; किरीम, नळाचा उपद्रव, कावीळ, कौलू, मूळव्याध, सततप्रवास व वाईट हवा व पाण्यामुळें येणारे ताप, जलद प्रसरणारे रोग (महामारी, ताप, अतिसार इ०); कोठा साफ नसणें, अति तृषा व शारीरिक आग, खरूज, कंडू, हींव, भरवयांत स्त्रीअवस्था, मुलांचीं मोठीं पोटें, स्त्रियांची कंबरदुखी व धुपणी, दुःखदायक स्राव, फेंपरें, ओकारी, अपस्मार, स्थूलशरीर, पोटाची जाड कातडी, जीर्णज्वर, संविगतरोग, मूत्र व उत्पत्तीन्द्रियें वाईट कृत्यांनीं बिघडून लघवी साफ न होणें, आम्लपित्त, गुरगुरणें, अग्निमांद्य व चक्कर.—रक्त साफ राहील, अन्न बराबर जिरेल, काम करण्यास उमेद येईल, मनास उत्साह होईल. असे गुण कशावरून ? शेळीचें दूध उत्तम कां ह्मटलें आहे ? कारण ती खात नाहीं अशी वनस्पति नाहीं. ह्यामध्यें अशाच वनस्पति घालून हें तयार केलें आहे. हें औषध ज्यास गुणावह नाहीं त्यास विलायती उत्तम पाण्याशिवाय दुसरें औषध आल् राईट् करणार नाहीं. कांदेवाडी मेडिकल हालांत विकत मिळेल. किं. १ रु. बंगी करणावळ २ आणे. माहितीचा कागद आंत आहे. प्रत्येक पेटींत अर्धा रत्तल औषध घातलें आहे.

वि. स. परांजपे.

कांदेवाडी मेडिकल हाल.

महाराणी साहेबांची मंजुरी मिळालेली.

ता. २० आगष्ट सन १८७९ रोजीं नामदार महाराणी साहेबांनीं केलेल्या व्यापाराच्या खुणांचा कायदा (३ आणि ३० व्हि. भाग ९१) याअन्वयें रक्षिलेली.

प्रकृति दुरुस्ती, शक्ति, आणि उत्साह.

डा. लेलार यांचें फारफोडाइन.

डा. आर. डी. लेलार. एस् डी. यांनीं शोधून काढिलेलें आणि सन १८६२ त सदर नांव दिलेलें हिंदुस्थान, चीनव इतर वसाहतींच्या जागा येथें रहाणाऱ्यांस हें विश्वसनीय यकृताची सुधारणा करणारें आणि जीवनकला परत आणणारें असल्यामुळें याची योग्यता फारच मोठी आहे.

डा. लेलार यांचें फारफोडाइन.

हा फास्फरसाचा शुद्ध रस असून वासांत व दिसण्यांत आनंदकारक व अतिशय स्वच्छ असून पातळ आहे. यांत वनस्पतींचीं सत्वें मिसळलेलीं असून याचे अंगीं बरे करण्याचे अद्भुत गुण आहेत. हें अर्वाचीन रसायनशास्त्रांतील आश्चर्य. असून त्यांत कोणत्याही प्रकारचे तात्काळ प्राणघातक पदार्थ नाहींत. याची क्रिया अपकार करणारी नसून, वैद्यकांतील अत्यंत विद्वान डाक्तरांनीं शरीराची जीवनकला वाढविण्याचे आणि दृढ करण्याचे कामीं यासारखें दुसरें कोणतेंही औंषध नाहीं असें ह्मटलें आहे. कारण रक्त, मेंदू आणि मज्जातंतु या पदार्थांतील जे आवश्यक घटकावयव ते सर्व यापासून मिळतात; शरीराच्या शक्ति आणि कार्यें हीं जितकीं वाढवितां येण्याजोगीं आहेत, तितकीं यानें वाढवीं जाऊन जीवनास आवश्यक असा शरीरांतील रस वायां जात नाहीं, व शरीर किंवा मन यांच्या शक्तीबाहेर श्रम घडल्यानें जो आयुष्याचा नाश होणार, तो याचे योगानें बंद होतो; आणि जेणेंकरून मन आनंदी, सुखी, खुलासेवार आणि उत्साहभरित होईल अशी जी मेंदू, मज्जातंतु आणि स्नायु यांची रचना यांची उद्दाम वृत्ति कायमची रहाते.

रा. लेलार यांचें फारफोडाइन.

मज्जातंतूच्या आणि रक्तवाहिन्यांच्या रचनांत होणारे विकार तावडतोब व कायमचे बरे करण्याचीं जेवढीं ह्मणून औषधें सांप्रतकाळीं माहित आहेत, या सर्वांपेक्षा हें श्रेष्ठ आहे.

मज्जातंतु निःसत्व होणें, सर्वांगीं अशक्तता, मनाची व शरीराची निरुत्साहता, अभ्यास अगर कामकाज यांविषयीं असमर्थता, मस्तक आणि कान यांत आवाज होणें, उत्साह आणि क्षमा यांचा अवपात, मज्जातंतूंची कोणच्याही स्थितीस पोंचलेली अशक्तता, मेंदू शिथिल होणें, पक्षघात, पाठींतून कळा निघणें, मूत्रवाहिन्यांचे विकार, मूत्राचा सारा इ०, दमा, गंडमाळा, त्वचेचे रोग, स्नायु झुरणें अगर वायां जाणें, अशुद्ध आणि कमी झालेलें रक्त, योग्य कालापूर्वीच येणारी क्षीणता, आणि हरएक कारणामुळें उत्पन्न होणारी अशी जी जीवनकलेच्या शक्तींची कमताई तिजमुळें शरीरांत होणारे सर्व दीर्घकालिक परिणाम.

डा लेलार यांच्या फारफोडाइनची क्रिया.

दुहेरी व रामबाण आहे; हें औषध एका अर्थीं मज्जातंतूंची शक्ति असें ज्या तत्वास ह्मणावयाचें तें तत्व वाढवितें; व दुसऱ्या अर्थीं रक्त आणि मांस उत्पन्न करणारीं ह्मणून जीं औषधें आज मितिला माहित आहेत, त्या सर्वांत हें फार जालीम आहे. व यामुळें कमी झालेली, क्षीणता पावलेली, अगर गळून गेलेली जी शरीरप्रकृति, तिला हें अति अद्भुत प्रकारें ताजी

उत्पन्न करून, जशी कांहीं औषध घेणाराची शक्ति कधींहीं कमी झाली नव्हती, किंवा त्यास अशक्तता आली नव्हती, अशा प्रकारचा उत्साह त्याचे अंगीं उत्पन्न करितें.

भय वाटण्याजोगी गोष्ट.

मेंदूचे रोग, अजीर्ण अथवा विकृत झालेलें यकृत, जीं जंतूंचा रस नाहींसा करून टाकितात, अशांच्या परिणामापासून आज मितीला हिंदुस्थानांतील लक्षावधि लोक मरत आहेत; लक्षावधि बुद्धिमान् आणि उपयोगी लोकांवर या रोगांचे फार भयंकर परिणाम होतात; व जीवनसुखोपभोगी आणि उपयोगी वाटावें तसें व वाटतां उलटें ओझेंच वाटत असतें. सर्व प्रकारचीं अजीर्णें व यकृताच्या विकृति बऱ्या करण्याकरितां आजपर्यंत जीं औषधं शोधून काढण्यांत आलीं आहेत, त्या सर्वांत डा. लेलार यांचें फास्फोडाइन हें उत्तम आहे अशाविषयीं हजारों रोगी साक्ष देत असतां, इकडे लोक कां मरत रहावे याचें चांगलेंसें कारण समजत नाहीं. हें औषध इतकें तावडतोब व खातरीनें बरें करणारें आहे कीं, ज्यावेळीं शरीरांतील जीवनरूपी अग्नि विझूं लागतोसें दिसतें, व मनाचीही शरीराप्रमाणेंच स्थिति होते, त्यावेळीं जीवनकळा परत आणणारें हें प्रबळ औषध थोडकेंसे प्यायलें असतां रोग्यास आपणास निराशेच्या चिखलांतून कोणीं उचलूनच काढिलें आहे असें वाटून शरीर आणि बुद्धि यांची वृद्धि होऊन त्यांच्या शक्तीचा जोम वाढतो.

वीस वर्षेंपर्यंत लोकांस आलेला अनुभव.

ह्यावरून या गोष्टी निःसंशय ठरतात; कारण जगांतील प्रत्येक राष्ट्रांतील व देशांतील प्रसिद्ध कुटुंबें, सुखवस्तु लोक, लष्करी व आरमार खात्यांतील लोक, शास्त्रवेत्ते; धंदे करणारे प्रसिद्ध लोक, ज्यांनीं याच्या उपयोगापासून या ठिकाणीं सांगितलेल्या सर्व उपयोगांचा अनुभव घेतला आहे, अशा लोकांनीं आपण होऊन दिलेल्या हजारों सर्टिफिकिटांवरून ही गोष्ट पूर्णपणें सिद्ध होते.

डा. लेलार यांचें फास्फोडाइन हें जगांतील सर्व ठिकाणचे बाहेर देशीं औषधें पाठविणारे व घाऊक व किरकोळ औषधें विकणारे लोक, यांचेकडे विकत मिळतें. हें दर बाटलीस ४ शि. ६ पे. व ११ शि. (अजमासें २। रु. व ५॥ रु.) या भावानें मिळतें.

महत्त्वाची सूचना:—प्रत्येक बाटलीच्या ग्लासांत 'डा. लेलार यांचें फास्फोडाइन, लंडन, इंग्लंड' हें नांव उठविलें नसेल, तर हें खरें आमचें औषध समजूं नये. प्रत्येक बाटलीवर 'डा. लेलार यांचें फस्फोडाइन, लंडन, इंग्लंड' या शब्दांनिशीं इंग्रज सरकारचा छाप असतो; व तो महाराणी सरकारच्या नामदार कमिशनरांच्या हुकमानें त्यावर खोदिलेला असतो. तसें नसेल, तर तें औषध बनावट असून खऱ्या उत्तम औषधाबद्दल वाईट औषध घालून तुह्मांला फसविलें असें समजावें.

फास्फोडाईनचे एकटेच मालक व मूळ उत्पन्न करणारे

डा. आर. डी. लेलार, वेंहोस, ३२ गेरफर्ड रस्ता, लंडन, दायव्य भाग, इंग्लंड, यांजकडून 'रोगावर फास्फरसाचे उपचार व रोगनिरास' हें पुस्तक टपाल हंशील घेतल्याशिवाय फुकट पाठविण्यांत येतें

एजंट:—ट्रेचर व कंपनी, मुंबई, भायखळा, आणि पुणें (Treacher and Co., Bombay, Byculla, and Poona.), हिंदुस्थान व चीन येथील सर्व प्रसिद्ध रसायन क्रिया करणारे व व्यापारी, आणि लंडन येथील सर्व घाऊक मालाचा व्यापार करणारे.

DR R. D. LALOR.

SCALE OF FEES.

	Rs.	A.	P.
ORDINARY SURVEYS of Buildings, each.....	10	0	0
ATTENDANCE in Court.....	10	0	0

PLANS and SECTIONS of proposed Buildings, or of additions to and alterations in the existing Buildings, prepared in order to obtain sanction from the Executive Engineer, Municipality, to show the stability of the structure, will be charged for, at the following rates :—

Each Building with Privies.....	15	0	0
,, ,, without ,, ...	10	0	0

SURVEYS of Vacant Grounds.@	As. 8	per	100	Square	Yards.	
,, ,, Batty Fields...	,,	As. 10	,,	100	,,	,,
,, ,, Oarts.....	,,	As. 12	,,	100	,,	,,
,, ,, Gardens.....	,,	As. 14	,,	100	,,	,,
,, ,, Hilly Grounds	,,	Re. 1	,,	100	,,	,,

SURVEYS of Large Estates; PLANS, ELEVATIONS and SECTIONS of Buildings; DETAIL-DRAWINGS; WORKING-DRAWINGS; ROAD PROJECTS and LEVEL SECTIONS; MODELS OF BUILDINGS and GROUNDS; PLANS Enlarged or reduced; COPIES of Plans will be charged for, according to the nature of work.

Preparation of DESIGNS, ESTIMATES, SPECIFICATIONS, VALUATIONS, and SUPERVISION of Works, will be undertaken.

Works entrusted will be executed with great care, promptitude, accuracy, and in the best style.

For further particulars apply to the undersigned.

M. P. DHURU,

Surveyor and Draughtsman.

No 102 Moogbhat (Dr. Moreshwars Chawl)

Bomb





॥ श्री ॥

नाट्यकथार्णव.

त्रैगुण्योद्भवमत्र लोकचरितं नानारसं दृश्यते
नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधा ह्येकं समाराधनम् ॥

मालविकाग्निमित्रे श्रीकालिदासः

स्फुरत्कलालापविलासकोमला करोति रागं हृदि कौतुकाधिकम् ।
रसेन शय्यां स्वयमभ्युपागता कथा जनस्याभिनवा वधूरिव ॥

कादंबर्यां बाणः

पुस्तक २. माघ शके १८०२. अंक ११.

NATYA KATARNAVA.

A MONTHLY MAGAZINE

Comprising a series of Marathi Dramas, Novels &c. &c.

अनुक्रमणिका.

विषय.	पृष्ठ.
रतिमन्मथ नाटक.	९१
अनुतापशमन नाटक.	२९
शिलादित्य.	९७
मथुरा (आत्मवृत्तकथन)	१०१

मुंबई.

"नेटिव ओपिनियन" छापखान्यांत छापिला.

(सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधी सर्व प्रकारचे हक्क मालकांनीं स्वाधीन ठेविले आहेत.)

किंमत ६ आणे.

वर्गणीची पोंच.

		रु.	आ.
रा. ब.	नारायण गणेश साठे...	७	२
रा ब.	रामचंद्र चिंतामण डिके.	१०	२
रा. ब.	लक्ष्मण विठ्ठल साठे, गिंदाद, बांद्रे.....	३	६
रा. ब.	विष्णु केशव कुंटे	१०	०
डा.	धर्माजी गणेश	१०	२
रा. सा.	सखाराम मोरेश्वर चितळे...	६	१२
,,	सदाशिव हरि खरे	६	१२
,,	गणपतराव मोरोबा चिंचळें...	३	०
,,	रामचंद्र दिनकर परांजपे ..	६	१२
,,	काशीनाथ बाळकृष्ण मराठे	३	०
,,	विश्वनाथ नारायण मंडलिक...	६	०
,,	केशव बापुजी बाळ	६	१२
,,	हरि गोपाळ पाध्ये	१०	२
,,	श्रीनिवास कोन्हेर रोड ...	१०	०
,,	बळवंत शिताराम नाईक ...	१०	०
,,	रावजी बाळाजी करंदीकर...	३	०
रा. रा.	माधवराव श्रीधर	३	०
,,	रामचंद्र गोविंद राजाध्यक्ष...	१	०
,,	रामचंद्र महादेव हरडीकर...	६	०
,,	बाबाजी लक्ष्मण वेलिणकर...	२	८
,,	केशव बापुजी, पवनी... ...	३	०
,,	पुरुषोत्तम विष्णु गोडबोले ...	६	०
,,	लक्ष्मणराव भांडारे	६	०
,,	रघुनाथ शिवराम दळी ...	३	०
,,	रघुनाथ दामोदर साहाने ...	३	०
,,	गंगाधर विठ्ठल मोग्रे	१	८
,,	विठ्ठल बाळकृष्ण.....	३	०
,,	निळकंड अनंत जोशी ...	३	०
,,	वामन सुंदर पाठक	१	८
,,	डी. आर. तिळवे	३	५
,,	गिरधर महादेव...	६	१२
,,	हरि त्रिंबक आमडेकर ...	३	६

		रु.	आ.
रा. रा.	आत्माराम यशवंत देसाई ...	३	६
,,	मुदुकृष्ण वासुदेव मुदालेयार	३	६
,,	कृष्णराव दामोदर देशपांडे...१२		०
,,	हरि अनंत वऱ्हाडकर..... ...	३	०
,,	बाळकृष्ण केरोबा डी... ...	३	०
,,	श्रीधर बाळकृष्ण आपटे ...	३	६
,,	रघुनाथ बाळकृष्ण तळवळकर	१०	२
,,	सेक्रेटरी बोर्डिंगस्कूल लायब्ररी, अकोले	६	१२
,,	आत्माराम जगन्नाथ कीर्तिकर	३	०
,,	विनायक माधवराव तळपादे	१	८
,,	माधवराव रंगराव चिटणीस	१	०
,,	येसोबा दादाजी.....	३	०
,,	बळवंतराव पांडुरंग इंडुलकर	१०	२
,,	गोपाळ गणेश गडकरी ...	६	१२
,,	बाजी बाळकृष्ण भाटे...	६	०
,,	बाबुलजी जगन्नाथ कंट्राक्टर	१	०
,,	श्रीनिवास गोविंद भानप ...	३	०
,,	अंणाजी बाबुराव अनगळ . .	६	०
,,	जगन्नाथ पांडुरंग...	२	०
,,	विष्णु नरसिंगराव	३	०
,,	रामचंद्र राजुजी काळे... ...	३	०
,,	मुकुंद रामचंद्र सव्हेंयर ...	३	०
,,	बी. के. रघुनाथजी	३	०
,,	दादो सखाराम	६	१२
,,	नारायण वामन चौबळ ...	३	०
,,	घनःशाम खुशाल, वकील, यावल	३	०
,,	काशीनाथ नारायण भानगांवकर	६	१२
,,	शंकर सदाशिव शेंटगे..... ...	६	१२
,,	वामन आबाजी मोडक..	३	०
,,	गोविंद महादेव गद्रे... ...	२	१३
,,	बळवंत नारायण गोखले ...	३	६

(तदनंतर भीतीनें नेत्र मिटलेल्या मायावतीनें दृढ आलिंगिल्यामुळें अंगावर रोमांच उभे राहिलेला मन्मथ येतो.)

मन्म०—(सुखातिशयाचा भाव दाखवून आपणाशीं) अहो ! त्या शंबरानें हिला हरण करून नेलें असताही त्यानें मजवर मोठाच उपकार केला म्हणाव्याचा ! कारण,

श्लोक.

भ्यालेल्या हरिणापरी सुचपलीं हे लोचनीं पाहते;
गाळूनी नयनाश्रु संतत तशी काकुस्वरें बोलते;
मत्कंठाभवती निजे भुजलते लागूनियां वेष्टिते;
ल्यालें वस्त्र सईल होउनि तया भीतीमुळें गाळिते;
वक्षःसंभवयुग्म उन्नत बहू रोंवी शरीरीं मम
वेगानें दृढ. त्यामुळें उपजवी माझ्या मनीं संभ्रम;
ऐशी भावण होउनी मज अहा ! देवोनि आलिंगना,
सौख्याच्या अंतिभूमितें प्रियतमा दावी मदीया मना !
यामुळें माझी काय स्थिति झाली आहे पहा!

श्लोक.

रोमांचें युक्त झाले अवयव; सुटला घर्म साऱ्या तनूला;
गेलें नद्धैर्य अस्ता; निज इतर अशा बुद्धिचा लोप झाला;
हर्षाब्धीच्या तरंगांमनि अजि मन हें सर्व माझें बुडोन
पावे हर्षा विशेषा; स्थिति कवण असे हे विचित्रा कळे न!

(पाहून) काय ही भितरी अजून सावध होत नाहीं ?

श्लोक.

आलें पांडुत्व वक्त्रा; विसकटुनि तसे केश हे सर्व गेले;
निःश्वासीं ऊडती हे स्तन; अधर पहा अश्रुहीं क्षाळियेले;
वायूनें त्रस्त केली जशि, तशि इचि हे पावली कंप काया.
भ्याल्या एणीपरी हे नयन फिरवि; दे शोक चित्ता मदीया!

(उघडपणें) सुंदरि ! सावध हो सावध हो ! तूं या **मन्मथा**च्या रथावर अधिरूढ झाली आहेस, असें असतां तुला अजून कोणापासून पीडा होईल म्हणून शंका वाटते ?

माया०—(सावध होऊन नेत्र उघडते, व मन्मथास पाहून आपणाशीं) त्या दुष्टाच्या हातून माझी सुटका करून माझ्याशीं प्रेमानें बोलत आहे असा हा दयाळु पुरुष कोण बरें असावा ? आणखी वास्तविक म्हटलें म्हणजे मी याला आतांच काय तें पाहतें असें असतां याचा आणि माझा फार दिवसांचा परिचयच जणों आहे अशा प्रकारचें माझ्या मनांत याच्याविषयीं प्रेम वाटत आहे, हा पण कोण बाई चमत्कार ?—अथवा यांत चमत्कार तो कशाचा ? यानें बोलून चालून मला जीवदान दिलें आहे ! (उघडपणें) हे महाभागा ! आपणासारखे पुरुष या जगांत विरळा, असें असतां आपण मज मंदभागिनीकरितां हें साहस करून आपल्याला आयास करून घेतले!

मन्म०—हे मंजुभाषिणि ! काय म्हणतेस ? मीं आपल्याला आयास करून घेतले ? पहा.

आर्या.

असतां पराक्रमी मी तव अपहर्त्यास काय सोडीन ?
ओढी स्वीय सटींतें कोणी, पंचास्य त्यास सोडी न.

माया०—(स्नेहपूर्वक बहुमानानें आपणाशीं बोलते) काय ? हा महाभाग मला आपलीच कोणी तरी समजतो हें कसें बरें ?—अथवा सत्पुरुष जे आहेत ते आपपर मानीतच नाहींत ! (उघडपणें) हे महाभागा ! आपण आपल्या शरीराकडे देखील न पहातां दैत्याच्या बंदांतून मला सोडविलें हे आपले उपकार मी कसे फेडूं ? सर्वस्वीं हा देह

१. मंजुल स्वरान. २. स्तन. ३. अत्यंत सीमा.

१. मानेवरचे केंश. २. सिंह.

आपल्याच स्वाधीन आहे, यांचें आपण पाहिजे तें करावें !

मन्म०—(आनंदानें) अहाहा ! हे उपकार जाणणारे प्रिये ! हें देखील सांगावयास पाहिजे होतें काय ? (तिच्याकडे नीट पाहून मनांत कांहीं तर्क आणून आपणाशीं)

दिंडी.

तीच ठेवण जरि असे शरीराची,
तीच कांती जरि वदनचंद्रम्याची,
तेच बघणें साकूत जरी ईचें,
तेंच भाषण सप्रेम जरी सांचें,
तरी आहे ही तीच दूसरी का[1],
मना संशय हा खिळुनि राहतो कां ?

अथवा हिला त्या असुरापासून पीडा झाल्यामुळें ही कृश झाली आहे, त्यामुळेंच प्रियेच्या रूपाविषयीं माझ्या मनांत विकल्प आला ! वस्तुतःही स्वजनाच्या दर्शनाकरितां उत्सुक झाली आहे, यास्तव हिला हिच्या पित्याच्या घरींच पोंचवितों. (रथ चालवून व आकाशाकडे पाहून) **कोकिलका** ! काय ह्मणतोस भगवती आतांच **राग** महाराजाच्या घरीं गेली आहे, तर तिला व **रती**च्या गुरूस जनांना मी आलों आहें हें कळविण्याकरितां जातों आहें, असें काय ? ठीक ! असेंच कर. मीही तुझ्या पाठोपाठ आलोंच. कारण, जी मजवर कां कारण नसतां प्रीति करणारी भगवती तिला वंदन केलेंच पाहिजे ! (असें ह्मणून कांहीं अंतर चालून मायावतीसहवर्तमान रागाच्या घरांत प्रवेश करितो.)

(तदनंतर आसनावर बसलेली, व रति, तिचीं मातापितरें व सख्या हीं जिची सेवा करीत आहेत अशी, सर्वार्थसाधिका वाशिनी-सहवर्तमान येते.)

१ किंवा.

सर्वा०—(आपणाशीं)

श्लोक.

अन्योन्यांवरि रक्त मन्मथ रती यांचें करूनी मन;
आलें संकट त्यांवरी, —न कळतां त्यांतें —तया वारुन;
लग्नाचा अवशिष्ट एक विधि जो तो आटपूनी अतां,
होऊनी सुकृतार्थ मातृचरणां वंदीन मी तत्वतां.

मन्म०—(सर्वार्थसाधिकेकडे न्याहाळून पाहून बहुमानानें आपणाशीं) अहो भगवतीची महानुभावता ही किती वर्णावी ? कारण, पहा.

आर्या.

भरलें दयारसानें चक्षु; तरी चित्तवृत्ति गंभीर;
मूर्ति अतुल्य; अप्राप्यचि हें तेजस्व्याहि तेज साचार !

(रतीकडे पाहून विस्मयानें) अहो, माझ्या प्रियेसारखीच रूपानें थेट दिसणारी अशी ही भगवतीच्या पार्श्वभागीं कोण बरें बसली आहे ?

श्लोक.

ही कोणी दुसरीच कीं उपजली ? कीं होयहो हीच ती?
कीं अन्योन्यसदृक्ष[2] या असुनियां विश्वाप्रती जिंकिती?—
पावेना जगतीतलावरि तुला कोणी प्रियेची मम!—
सर्वत्र दिसे प्रियाच मजला? हा काय होतो भ्रम !

अथवा, हा भ्रम कसा ह्मणावा ? कारण मी चांगला जागा असून, ही मजपुढें प्रत्यक्ष दिसते आहे !

रति—(मन्मथास पाहून आनंदानें) सुदैवानें हा महाभाग विजयी होऊन सुखरूप परत आला! (मायावतीस पाहून मत्सरबुद्धीनें) ही माझ्याच सारखी दुसरी तरुण स्त्री कोण बरें असावी? कीं जी, मला दुर्लभ, अशा या महाभागाच्या पार्श्वभागीं वास करण्याचें सुख अनुभवित आहे ? (मनांत कांहीं तर्क आणून भ्रांतीनें)

१. कामेश्वराची (सांबाची) स्त्री=पार्वती.
२. सदृक्ष=सारख्या.

साक्या.

पूर्वजन्मिचीं पुण्यें माझीं एकवटूनी सारीं,
जाउनियां मी काय राहिलें उभी प्रिय शेजारीं ?–
किंवा चित्तामध्यें प्रेमा अखंड वागवितांहे,
ऐसा मत्प्रिय संनिध माझ्या उभा ठाकला आहे ?–
परंतु असतां येथें इतुके गुरुजन बसले भंवती,
समक्ष त्याच्या गोष्ट अशी ही होइल कवण्या रीती?
यावरूनी मज वाटतसे कीं हीं तों भिन्नाचे असती,
मत्प्रियसम हा, मत्सम हेही, दोघें आह्मां वघती !

(विस्मयाने स्तब्ध होऊन बसते.)

माया०—(रतीकडे पाहून आपणाशीं) हें कसें बरें झालें ? मी ही आपल्या गुरुजनांच्या जवळ आलें आहे काय? (विचार करून) अहो, मी तर येथल्या येथें उभी असून मला ही उगीच भ्रांति झाली ! कारण हा महाभाग तर माझ्याजवळच आहे ?— बरें पण ही तर मत्सरबुद्धीनें मजकडे पहात आहे, व हिचे नेत्र रागानें लाल झाले आहेत, यावरून आपलाच आपणाला राग आला असें व्हावयाचें नाहीं ! तेव्हां ही कोणी तरी दुसरीच असून हिचें रूप मात्र माझ्यासारखें आहे !

सख्या—(मन्मथास पाहून एकमेकींशीं) अग बाई! चांगलें झालें ! सुदैवानें एकदाचा आमच्या सखीचा जीव थंड झाला ! (मायावतीकडे पाहून) पण हेंग काय बाई ! आमच्या सखीनें कन्याजनास अयोग्य असें काय आचरण मांडलें हें ? गुरुजन इतके जवळ असतांही आपली निर्भीडपणें आपल्या प्रियजनाच्याच जवळ उभी राहिली आहे हें काय बाई !

राग—(मायावतीस व मन्मथास पाहून हर्ष, त्वरा, आणि उत्कंठा यांहीं युक्त होऊन) धन्य ! धन्य ! माझी वत्सा मला प्राप्त झाली, व हा कुमारही विजयी होऊन आला ! धन्य ! धन्य !

मुदिता—(अश्रु नेत्रांत येऊन) अग बाई ! हीच ती माझी वया एकदाची मृत्युमुखांतून सुटून आली ! (राग व मुदिता घाई घाईनें उठूं लागतात.)

राति—अहो बाबा ! अग आई ! हें तुह्मीं काय करितां ? मी तर हो येथेंच आहे ! (मुदिता, राग, व सख्या घोंटाळ्यांत पडतात.)

वशिनी—(आपणाशीं) अहो, यांना **मायावती**च्या उत्पत्तीचा वृत्तांत ठाऊक असून देखील यांना पुनरपि भ्रांति होते आहे !

सर्वा०—(मन्मथाकडे पाहून प्रेमानें आपणाशीं)

आर्या.

शत्रूंसि जिंकितांना केले जे घाय शत्रुकरवाली[1]
वत्सावरि, ते बघुनी खेद,समाधान मन्मना आलीं !

मन्म०—(पुढें पाहून) प्रेमभराच्या योगें विस्तार पावलेल्या नेत्रांनीं जणों कांहीं माझें प्राशनच करीत आहे, अशी ही भगवती माझी वाट पहात आहे, तसेच हे गुरुजनही मजकडे पहात आहेत, तर आतां त्यांच्या समीप जातों. (असें बोलून जवळ जाऊन) भगवति ! हा **मन्मथ** वंदन करीत आहे !

सर्वा०—वत्से ! तुला प्रिय अशा वराशीं तुझा समागम घडो ! (मुदिता आणि राग यांजकडे बोट दाखवून मायावतीस आणि मन्मथास) वत्सांनो ! हीं वत्सेचीं मातापितरें ! यांना वंदन करा ! (दोघेंही त्याप्रमाणें करितात.)

राग—हे कुमारा ! हे कल्याणि ! बाळानों ! चिरकाळ वांचा !

---

१. ' करवाल ' ह्मणजे तरवारी.

मुदि०—उभयतांही सुखी रहा.

सर्वा०—(मुदिता आणि राग यांस उद्देशून महाभागांनो ! वत्से रतीला तो असुराघ्र पळवून नेऊं पहात असतां तिला त्याच्या हातून पळवून नेण्याकरितां मी योगभावेंकरून ही **मायावती** निर्मिली, यास्तव ही तुमची धर्मकन्याच होय !

मन्म०—(आपणाशीं) अहो ! केवढा हा भक्तीचा प्रभाव ! आणि मजवर तरी केवढें प्रेम ! अहाहा !

रती—अहो ! भगवतीचा या जनाविषयीं केवढा पक्षपात हा !

राग—(नम्रपणें) भगवति ! आपण सांगतां निःसंशयच होय. (मायावतीस मांडीवर ऊन तिचे मस्तक हुंगतो.)

मुदि०—माझ्या बयेला जीवित देणारी तूं बाई इकडे ! (तिला मोठ्या प्रेमानें मिठी मारते)

सर्वा०—(रतीस) वत्से ! ही तुझी बहीण बहिला भेट.

रति—(तिचा हात धरून तिला आपणाजवळ बसविते.)

मन्म०—(रति आणि मायावती यांस पाहून आश्चर्यपूर्वक आपणाशीं.)

साक्या.

ऐसा कधिं तरि हो सुदिन,शकेल पाहूं का मदन ?
या दोघींचा एके काळीं होउनि विवाह मजशीं,
मत्सर सोडुनि करितिल दोघी अन्योन्यप्रीतीशी ? १
पुष्पमंचकावरती रात्रीं घेउनियां दोघींतें,
दोन्हि कुशींवरि निजणें माझें येइल साफल्यातें ? २

माया०—(मनांत कांहीं तर्क आणून आपणाशीं) विचारी **शर्मिष्ठा** जशी आपल्या वल्लभास अप्रिय झाली, तशी मी होऊन माझा या महाभागाशीं विवाह होणार नाहीं असें वाटतें.—अथवा ही भगवती दयाळु आहे, ती काय करील तें खरें!

सर्वा०—(मुदिता आणि राग यांस उद्देशून) हे महाभागांनो! या **मायावती**लाही कुमार **मन्मथ**च वर योग्य आहे असें मला वाटतें.

राग—जशी भगवतीची आज्ञा!

मुदि०—(माग डोलवून) जसें प्रियसखीस वाटेल तसेंच!

सर्वा०—(रतीस) वत्से! आतां सर्व कुटुंबाचें ओझें तुज एकटीवरच पडेल, यास्तव ही तुजप्रमाणेंच तुजजवळ राहूं दे !

रति—(इर्ष्येनें मुरडून) भगवति ! माझ्याकडे काय आहे ? मी आपल्याच स्वाधीन आहें.

सख्या—(वाईट वाटून एकानेकींशीं) ही एक गोष्ट मात्र आमच्या प्रियसखीला शल्यवत् झाली यांत संशय नाहीं !

मन्म०—(आनंदाने आपणाशीं) अहो ! भगवतीची अंतर्ज्ञता ही किती वर्णावी ? कारण ती अगदीं माझ्या मनोरथानुरूपच आज्ञा करीत आहे !

माया०—भगवतीनेंच मला निर्माण करून या वेळीं मला धन्य केलें खरें !

मन्म०—(मायावतीचे कारणानें रति आपल्यावर

श्लोक.

वक्त्रेंदू स्मितकांतिहीन सुचवी चित्तीं उदासीनता,
टेकोनी बसली कपोल सखिच्या अंसावरा[1] तत्वतां;
मोडोनी भ्रुकुटी[2], दशा[3] वळवुनी आरक्त किंचित् अशी
पाहाते परक्यापरी मजकडे प्राणप्रिया हे कशी!

---

१. खांद्यावर. २. भुंवया. ३ दांत.

शब्द अखेरपर्यंत खरे केले. मी त्याजजवळ राहून थोडी थोडकीं नाहींत अक्षरा चर्षे काढिलीं, व त्यानें माझ्या बाळास साधारण लिहिण्या पुसण्यांत हुषार केलें. पुढें त्याला अकस्मात् कांहीं वायुविकार होऊन त्यानें देह ठेविला. त्याचा मुलगाही फार सज्जन असे, त्यानें आपला पिता निवर्तल्यावर मीं त्याजपाशींच रहावें म्हणून पुष्कळ प्रकारें आग्रह केला; परंतु त्यावेळीं माझ्याच मनानें कांहीं उचल घेतली कीं, एक वेळ आपल्या जन्मभूमींचें दर्शन घ्यावें, आणि तेथेंच आपल्या आयुष्याचे राहिलेले दिवस कंठावे, यामुळें मीं त्याचें म्हणणें कबूल केलें नाहीं. तेव्हां त्यानें मी नको म्हणत असतांही अति आग्रहानें माझ्या पदरीं तीन चारशें रूपये बांधून माझी रवानगी करून दिली.

धुमा०—अहाहा ! काय हें औदार्य ! धन्य ! धन्य ! धन्य ! वरें आईसाहेब ! खो—खो—आपण निघून पुढें कोणीकडे गेलां ?

प्रेम०—पुढें कोणीकडे नाहीं, जी आलें ती याप्रांतांतच आलें, व मुलासुद्धां मी या पडक्या देवळांतच राहून पुरीं तीन वर्षें काढिलीं. जवळ रूपये होते त्यापैकीं कांहीं वाटखर्चाला गेले, कांहीं या देवळांत असतां चोरांनीं नेले, व बाकी जें कांहीं थोडें बहुत राहिलें होतें त्याजवर जेमतेम आजपर्यंत गुजरण केली.

धुमा०—हरहर ! आईसाहेब ! हजारों दीन जनांच्या पोशिंद्या आपण, त्या आपणावर असा प्रसंग यावा काय ? खो—खो—तस्मात् दैवगति विचित्र आहे !

प्रेम०—तें असो; पण नाईक ! मी गेलें त्या वेळेस, माझी बया **कमळा**—तिला नुस्तें दृष्टीनें पहाणे, तें देखील कसें तें मला करूं दिलें नाहीं—ती तरी पण खुशाल आहेना ? तिचें कोणाशीं लगीन बिगीन तरी झालें कीं नाहीं ?

धुमा०—कमळाताई खुशाल आहेत, आणखी त्यांचें त्या **धनाजीरावांशीं** लग्न व्हावयाचें होतें—खो—खो—परंतु आलीकडे तीन वर्षें काय कारण असेल तें असो, आमच्या धनी साहेबांचें त्यांवर मन नाहीं, यामुळें खो—खो—ताईंचें लग्न अजूनपर्यंत झालें नाहीं !

प्रेम०—या माझ्या बाईला प्रेमानें घट्ट एकवेळ तरी आलिंगन द्यावें, व तिचें बालमुख डोळ्यांनीं पोटभर पाहून घ्यावें, म्हणून आजपर्यंत मनाला कित्तीदा पण वाटलें ! पण उपयोग काय ? नाहींच नशिबीं, तें कोठून प्राप्त होणार ? शिवशिव !

धुमा०—आईसाहेब ! आपण त्याबद्दल व्यर्थ असा खेद करीत बसूं नये ! खो—खो—आपण गेलां त्यावेळीं आमच्या रावांना आपल्याबद्दल—शिव शिव !—खोटा संशय आला होता. म्हणून त्यांनीं आपल्याला मुलीला हात लावूं दिला नाहीं !—पण आतां त्याचें कारण राहिलें नाहीं !—आतां आपण लौकरच येथून परत गडावर जाल !—खो—आई साहेब ! आत्तां मी आलों आहें, तो आपणास गडावर नेण्याकरितांच !

प्रेम०—(आश्चर्यानें) तें कां बरें ?

धुमा०—आलीकडे आसपास दरवडे फार पडूं लागले आहेत, व दरवडेखोर याच देवळांत गुप्तपणें जमतात म्हणून आमच्या

धनीसाहेबांना संशय आला आहे, तेव्हां याबद्दल तुह्मांला कांहीं माहिती असली तर ते तुह्मांला विचारणार आहेत !

प्रेम०—चमत्कार आहे ! (विचार करून) असो; कांहीं चिंता नाहीं. आज माझा बाळ कांहीं रात्रीं परत यायचा नाहीं, याकरितां आजचा दिवस तुमच्याबरोबर येतें, पण मला उद्यां येथें परत आलें पाहिजे.

धुमा०—तें असो. उद्यांची गोष्ट उद्यां ! ती माझ्या स्वाधीन नाहीं, पण आपण चलावे मजबरोबर. आपणाकरितां बाहेर घोडें सामानासुद्धां तयार आहे, त्यामुळें आपणाला बिलकुल तसदी पडणार नाहीं. परमेश्वर आपणास त्वरित सुदिन दाखवो !

प्रेम०—नाईक ! तुह्मीं ह्मणतां तेंच खरें ! आज काय होणार असेल तें समजत नाहीं, पण आज माझी मनोदेवता प्रसन्नशी भासते आहे !—चला, ही मी आलेंच.

धुमा०—खो—खो—परमेश्वरा! ज्याप्रमाणे मूळचा एकच प्रवाह दुभंग होऊन पुढें कांहीं अंतरावर तो फिरून मिळावा, त्याप्रमाणें या उभयतां दंपतींच्या प्रेमप्रवाहांत आजपर्यंत फूट पडली आहे ती नाहींशी कर, एवढेंच तुला मज दीनाचें मागणें आहे! खो—खो—

(दोघें जातात)

प्र० २.—तेरसगडाच्या आसपासचा डोंगराळ प्रदेश.

(पुरुषवेष धारण केलेली कमळा येते.)

कम०—(आपणाशीं) मला घरांतून बाहेर पडून जवळ जवळ एक दिवस होत आला, तरी माझ्या प्रियकराची आणि माझी अजून गांठ पडत नाहीं. हा बाई मोठाच चमत्कार आहे ! ह्मटलें ह्मणजे यांनीं मला वाटेच्या खाणाखुणा अगदीं बरोबर सांगितल्या होत्या, त्याप्रमाणें मी या कांटेरी झाडाच्या वेटाशीं नेमकी आलें, आणि तेथें त्यांची आणि माझी गांठ पडायची होती, मग हें कसें काय बाई झालें असेल तें असो ! त्यांच्या सांगण्याप्रमाणें काल रात्रीं या पाटलाच्या घरीं वस्तीला होतें, पण तेथेंही तो पाटील त्यांजबद्दल कांहींच बोलला नाहीं. पहांटेस मी तेथून निघालें, तेव्हांपासून इतका वेळपर्यंत बसत उठत अन्नपाण्याशिवाय फिरतें आहें, पण आतां बाई माझ्यानें चालवेलसें वाटत नाहीं ! आतां काय बरें करावें ? आतां **धनाजीरावांची** गांठ तरी कशी पडावी ? देवा देवा ! काय संकट हें ? मी घरांतून बाहेर पडलें, त्यावेळीं दोघेंही आह्मीं बाहेर बरोबरच कां नाहीं पडलों ? आतां बाई माझा तर उपाय हरलासा वाटतो ! देवा ! कसेही कर आणि माझी आणि माझ्या प्रियाची गांठ घालून दे ! पित्यानें तर मजा त्याग केला, आतां घरीं परत जायची गोष्ट कशाला पाहिजे ? हायहाय !

(दीर्घ उसासा टाकून कांहीं वेळ स्तब्ध राहते.)

मी आज इतका वेळ रानांतून आणि जंगलांतून एकटी फिरतें आहें, पण अजूनपर्यंत मनुष्यदर्शन ह्मणून कसें तें माहित नाहीं ! नाहीं ह्मणायला एक धनगर आपला कुत्रा बरोबर घेऊन आपल्या घरीं जात होता, तेवढा माझ्या दृष्टीस पडला ! त्यावेळीं मी बिचारी अगदीं दमून वाटेतच बसलें होतें, व माझ्या तोंडचें अगदीं पाणी पळालें होतें, इतक्यांत तो माझ्याशीं

दोन शब्द गोड बोलला, तेवढ्यानें काय तो माझ्या मनास अंमळसा धीर आला !— असो; असें इथेंच बसून परिणाम नाहीं, याकरितां कोठें निवाऱ्याची जागा मिळे-पर्यंत हळू हळू चालूं लागावें हें बरें !— (चालूं लागते, इतक्यांत चार पांच दरवडेखोर येऊन तिला वेढा घालितात, त्यामुळें घाबरून) अरे बाबांनों ! तुम्ही आहां तरी कोण ? तुम्हीं सारे असे माझ्या भोंवतीं काय म्हणून जमलां ?

कुशाबा—मुला ! असा घाबरू नको ! आम्हीं कांहीं तुला मारायला आलों नाहीं ! तूं कोणा तरी थोरा मोठ्याचा मुलगा दिसतोस, याकरितां तुझ्या आंगठ्या, आणखी कंबरेची तेवढी पैशाची पिशवी, एवढी आम्हांला काढून दे, आणि जा आपल्या वाटेनें ! तसें न करशील, आणखी विनाकारण आरडाओरड करशील, तर मात्र येथल्या येथेंच ठार करून टाकूं ! समजलास ? चल, काढ तुझे पैसे कोठे आहेत ते ! (चोर तिच्या कंबरेस हात घालितात. इतक्यांत धनाजीराव येतो.)

धना०—खबरदार दुष्टांनो ! या मुलाला हात लावाल तर ! जर तुमच्या अंगीं कांहीं शौर्य म्हणून असेल, तर तुम्हीं या भीतीमुळें थरथर कांपणाऱ्या मुलाला सोडून माझ्या अंगावर चाल करून या !

कुशा०—असें काय ? एकूण मारामारी केल्या शिवाय येथें इलाज नाहीं ! चिंता नाहीं!— आपण तर कांहीं या मुलाला हातचा जाऊं देणार नाहीं !—पोरा ! खबरदार एवढें हूं कीं चूं करशील तर मग !

(चोरांची आणि धनाजीरावाची मारामारी जुंपते, त्या धांदलींत कांहीं चोर कमळेला वेऊन जातात. धनाजीराव कांहीं वेळ लढत राहून अखेर पडावयाच्या बेतांत येतो, इतक्यांत तिरसगडावरील कांहीं शिपाई येऊन त्यास सोडवितात. चोर पळून जातात, व त्यांची पाठलाग होते.)

१ शिपा०—(धनाजीरावास) चलो ! तुम् हमारे साथ किल्लेपर चलो !

धना०—शिपाईबुवा ! तुम्ही काय बोलतां हें ! या चोरांच्या रहावयाच्या जागेचा शोध करायचें टाकून तुम्हीं असें काय बोलतां ?

२ शिपा०—अच्छा !—तुला आमच्याबरोबर आलेंच पाहिजे ! चोरांच्या मागून लोक गेले आहेत तेवढे पुष्कळ आहेत !

(दोघेजण दोहींकडून त्याचे दंड धरून मुस्क्या बांधूं लागतात.)

धना०—(हिसके घेत) गचाळ नाहीं तर ! मूर्खांनो ! तुम्हीं मला मोकळा करा कसे ! आपणाला तिची सुटका—

१ शिपा०—बसबस—आम्हांला त्याची जरूर नाहीं ! आम्हीं हुकुमाचे चाकर !

धना०—(चरफडत) काय ? जरूर नाहीं ! अः दुष्टांनो ! भित्र्यांनो !

(सर्व शिपाई त्यास ओढीत ओढीत निघून जातात.)

प्र० ३—चोरांची गुहा.

(सदोबा, धर्म्या व इतर दरवडेखोर दृष्टीस पडतात.)

धर्म्या—अर, कायरे, त्रिंब्यांनों ! आज काय काय कुनीं लुटलं त्येचा बसा या तल्लास कराया !

१ चोर—आज आपल्याला तर राव ! काय ग्ये यवढ दागिन, आन ह्ये पैस गावल ! लय भूक लागली व्हती, न् भटानं ह्मटलं, वाइचशी दूधभाकर खा ह्मनून,

पण आपून ह्ये दागिन न् पैस घ्यऊन
तसच सूं निसाटलों बगा ! (दागिने व दे
पुढें टाकितो.)

धर्म्या—(**१** ल्या चोरास) बरें तूं रे काय का
आनल्येया. **येशा** ?

येशा—मी न ह्यो **रावजीबाबा** आन् **बा**
पाटील मिळुनशेनी योक मणभर दाण लुट
ल, आन् ह्या पाटल्यान् ह्या वांकी इक्तंव !

धर्म्या—ठीक ठीक ! बरें तूं **य लखपती** !
काय काय आनलस ?

लख०—आपुन् तर ब्बा कांहीं आनलं न्हाई
योका धनगराची योक शेळी गवसत व्हती
पन आज पडली येकादस, तवां ह्मंट
आज नग !

येशा—ह्यो ल्योक जवां तवां असाच लु
सान ! मर्दाच्या अंगीं पानी ह्मजी क
त्येचं नांवबी न्हाई !

धर्म्या—बरं,—उद्यां तर म्याडूं येकादं घबा
घ्यऊन यऊं नको, ह्मजी चोरा! तुला यो
भाकरीवरच बसवतो, तूं का समजलायास

लख०—बरं ये राहूंद्या राव ! उद्यांची गो
उद्यां ! आज थंड लय लागतीया, ये ज
वाईचसा तमाखुचा धूर तर घ्येऊंद्या, ह
जी झाला गडी हुश्शार ! (चिलमीचा
रका घेतो.) कायव **बाळूपाटिल** ! ही त
माखू असी कांजी करती ? कई मिरच्यां
ब्या तर न्हाईना आमंदी घातल ?

बाळू०—वढ ल्येकाच्या, कांईं लुटूनबी आना
नग, सवराया नग, आन् बसला ल्ये
लय दिमाखाच्या गोष्टी करीत !

लख०—बरं बावा न्हाई करीत ! झालं ?—प
कायव ? ह्ये कसं का ? आज आपल्य
नायकाचा अद्याप कुट पत्ताबू न्हाई ह्ये
कसं कां पर्करण हाये ?

सदो०—आज नाईक त्या भटाचें सोंग घेऊन
गेले आहेत गडावर, आणखी आतां आज
रात्रीं आपणा सर्वांना तिकडेच जायचें
आहे ! बरें, हो बरें आठवलें. **येशा** ! तो
भट्टरडा अजूनपर्यंत० आंत काय करतो
आहे ?

येशा—ये कायराव पुसूं नका ! त्यो हतं आ-
कशी थंडींतून कुडकुडतच आलाव्, न् तवां-
पासून सवास्त इश्राप घेत पडलाया !

सदो०—खुशाल पडूंद्या. आजच्या रात्रीचें काम
झालें ह्मणजे उद्यां त्याला सोडायचें आहे.
तोंपर्यंत मात्र त्याला आंतल्या खोलींतच
कोंडलेला राहूं द्या !

भुजाबा—तें काम माझें ! त्याचीं किल्ली
मजजवळच आहे !

सदो०—बरें, चला, आतां रात्रीं तयारी नीट
असूंद्या. कदाचित् बरीच चकमक झडेल
तेव्हां तरवारी, गुप्ता, जिथल्या तिथें
सगळें सामान नीट तय्यार असूं द्या.

कांहीं चोर—ती सम्दी तैयारी त अवशी लख्ख!

सदो०—बरें, कसें काय **भुजाबा** ! आतां स-
र्वांचीं जेवणें खाणें तर झालींच आहेत,
आणखी हितून निघायला अजून एक घ-
टकेचा अवकाश आहे. तोंपर्यंत जरा
कांहीं लावण्या, पोवाडे तर झडूंद्या.

भुजा०—आपणाकडून तयारी आहे ! कां **ये.**
सबा ! असे मेंग्यासारखे माशा मारीत
काय बसलां आहां? जरासा तो ढोल घे-
ऊन आमच्या बरोबर साथ तर करा !

येशा—ह्येला त आपून तयारच हाऊत ! (ढोलगें
वाजवूं लागतो, व भुजाबा गातो.)

गाणें. *

नमन करा शिवगुरू,
शिकवि जो चोरि परम सद्गुरू. ध्रु०
द्रौणि[1] युगीं भारतीं
करूं म्हणे पांडवनिधनाप्रती,
त्यातें दे अनुमती,
म्हणुनि हा चोरांचा कुलपती. १
त्याचा भक्त दशशिरा[3],—
चोरिली रामस्त्री सुंदरा.
भार्गव[4] भक्त दूसरा,—
तयानें केलि अराजक धरा. २
तिजा भक्त यम्पा[5], तो
शिवाच्या कांतेतें पळवितो.
गुरुदारारत[6] तो
चंद्रमा,—शिव त्या शिरिं वाहतो. ३
क्षमाशील शिव असा,
न ठावा क्रोध तया मानसा.
भक्तमनींची अशा
पूरवी, देव न दुसरा तसा. ४
घात पात चोरि ती
कराया न करा चिंतेप्रती,
वश्य अम्हां पशुपती[7]
संकटीं नेदे वाटूं भिती. ५
स्वयें श्मशानीं घडे
वास त्या; वनांत अमुतें पडे.
गुरु अमुचा नचि रडे,
अम्हां मग अरण्य कां सांकडें? ६

* या व इतर गाण्यातून ज्या ठिकाणां अक्षरावर ⌣ अशी खूण केली आहे, त्याठिकाणीं तें अक्षर ह्रस्व समजावें, व ज्यावर – ही असेल तें दीर्घ समजावें.

१ अश्वत्थामा. २ पांडवांस ठार मारणें (महाभारत सौप्तिक पर्व पहा.) ३. रावण. ४. परशुराम. ५. नृपतिहान. ६. बृहस्पति, त्याची स्त्री तारा. ७. संकट.

स्वतंत्रता भोगितो
श्मशानिं, ती आम्हां उपदेशितो.
रॉव फांकडु बोलतो,
म्हणुनि आम्हिं अरण्य हें सेवितों. ७

(इतक्यांत बाहेर शीळ वाजलेली ऐकूं येते.)

(सर्वजण चपापतात.)

सदो०—अरे, ही कुशाबाची शीळ आहे, चला आपल्याही शिळ्या त्याला ऐकूं द्या.

(सर्वजण शिळ्या वाजवितात) (इतक्यांत कुशाबा व इतर दरवडेखोर कमळेजा घेऊन येतात.)

सर्वजण—(मोठ्यानें ओरडतात.) हर हर महादेव!

सदो०—कुशाबा! बरे वेळेवर आलां. पण हें बरोबर कोण आणलें आहे?

कुशा०—असाच कोणी तरी मुलगा रस्त्यांत सांपडला. त्याच्या अंगावर पण जवाहीर बरेंच सांपडेल.

सदो०—ठीकठीक! ही खाशी शिकार आहे! कायरे पोरा! बोल, तूं कोण? कुणाचा? चाललास होतास कुणीकडे?

कम०—अरे, भले गृहस्थांनो! मी तुम्हांला शरण आहें, मला त्रास देऊं नका! मी तुमच्या पायां पडतों!

कुशा०—सदोबा! तुम्हीं त्याच्या अंगावर उगीच ओरडूं नका! हा मुलगा आमच्या मंडळींत आज नवखा आला आहे; यामुळें जरासा दिपल्यासारखा झाला आहे; आणखी याला आमच्या सारख्या गाजींच्या मंडळींत रहायची संवय नाहीं, त्यामुळें हा किंचित् लाजराही आहे यांत कांहीं मोठेंसें नवल नाहीं.—(कमलेचा पाठ थोपटून) बेटा चंदू! तूं असा घाबरूं नको,

तुला इथें कोणी कांहीं इजा करणार नाहीं. मात्र आमच्या दुय्यम नाइकांना तूं आपली खरी हकीकत सांग ह्मणजे झालें.

कम०—हकीकत ती काय सांगूं? मी कांहीं मोठासा श्रीमंत नाहीं, घरचा मध्यमसा आहें, आणि मी कोणाच्या अध्या मध्यांत पडत नाहीं. यापेक्षां दुसरें कांहीं नाहीं. माझ्या अंगावर मत्ताही कांहीं फार ह्मणण्यासारखी नाहीं, तथापि जी आहे ती तुमचीच समजा. जवळ आणखी असती, तर ती ही मी तुह्मांला देऊन टाकिली असती, परंतु आहे एवढीच त्यापुढें माझा नाइलाज आहे. (कंबरेची थैली व आंगठ्या वगैरे काढून देऊं लागते.)

सदो०—(ते जिन्नस घेत घेत) मुलगा मोठा गरीब दिसतो, आणखी त्याला आमच्या सारख्यांचा आदरसत्कार कसा करावा हें चांगलें समजतें. तर त्याला उगीच त्रास देऊं नये. मुला! तुझ्या अंगावर कपडे तेवढे ठेव, बाकीचे सगळे जिन्नस आमच्या हवालीं कर ह्मणजे झालें.

सदो०—मुला! तुझ्या हातांत ही तरवाररे कशाला पाहिजे? ही एवढी देऊन टाक ह्मणजे झालें!

कुशा०—मुला! तूं क्षत्रियाचा मुलगा असा वासा वाटतोस, तर कांहीं चिंता नाहीं. त्या तेथें कांहीं फराळाचे जिन्नस वाढून ठेविले आहेत, त्यांतले तुला वाटतील तेवढे काढून घेऊन खात बस. तुला कांहीं भिण्याचें कारण नाहीं. कायरे, तुला आह्मीं तुझा दगा करूं ह्मणून भय वाटते, होय?

कम०—मी आजन्मांत कधीं कुणाचें वांकडें केलें नाहीं, तेव्हां मी कशाकरितां भिऊं?

कुशा०—ठीक ठीक! जा खाऊं लाग! (कमळा खाऊं लागते.) बरें, कसें कायरे बेट्यानो! तानबा आणखी सोम्या दोघे भाटांचीं सोंगें घेऊन गडावर गेलेरे?

धर्म्या—व्हय, त्ये आमंदी पोंचूनशीं अमास्नी दार उगडाया मधरातीच्या वखता तैयार हायेती. तत आपुन जाऊन पोचन्याचीच बगा खोटी हाये!—कायर ये पोरा! तूं आपल्या ज्येवनाकडे मन लाव. तुला आमच्याशीं का करायचें हाये? (कमळा घाबरल्यासारखी दिसूं लागते.)—झालं, त्ये तत जात्याला; जिवन बिवन करत्याला, आन् झाला वखत की दक्शनकडच्या बुरुजाचा दरोजा खोलत्याला न् काय? येकदा आपुन आमंदी ग्येलों, म्हजी ततल्ल्या समद्यांच्या पन् चरारा गावत्याल कापाया माना!—अर फिरून फिरून त्येंच! (दरवडेखोर आपसांत कुजबुजूं लागतात.)

भुजाबा—अरे, आपल्याला कांहीं या पोराचा भरंवसा वाटत नाहीं! हा पहा आपलें बोलणें कसें कान देऊन ऐकतो आहे!

येशा—अर, मंग बगतोयास का? घे सपाटा उडवून, ह्मजी सम्दा निकाल चट!

सदो०—असें करावें यांतच आपला बचाव आहें यांत शंका नाहीं!

धर्म्या—ह्मजी लय खासें! ह्यो बिट्या वाघ्या आपनामंदी नव्यानंच आयलाया, तवां ह्ये काम त्येनंच कराया व्होवं! (वाघोजीस खूण करितो.)

बाळू०—व्हय व्हय. असंच! ह्ये पोरानं आमचा सम्दा ब्यात ऐकलाया, तवां असंच!

रावजी—आन ह्यो आमचा विस्वासघात न्हाई करनार म्हून कुनीं न्येम सांगावा!

वाघा०—तुम्ही म्हणतां, पण हें मला कांहीं खरें वाटत नाहीं !

सदो०—कशाला वाटेल ? हा मेला म्हणजे मग त्याचें मुळींच भय राहणार नाहीं !

वाघो०—काय काय ? कसें म्हणतां ?

धर्म्या—बस बस ! तुला त्येची का पच्चईत ! तूं त्येला ठार कर० म्हनी झालं !

वाघो०—काय, याला मीं ठार करूं ?

सदो०—याला तूं काय वाटेल तें नांव दे, पण तुला याचा निकाल लावला पाहिजे !

धर्म्या—हंग, मी म्हनतों ये ह्येच !

वाघो०—तें खरें, पण ह्याला उद्यांपर्यंत कोंडून ठेवलें तर काय होईल ?

सदो०—छेछे ! अरे, त्याचा कांहीं नेम नाहीं. सुटून बिटून कुठें पळाला, तर आपले सगळ्यांचे प्राण त्याच्या मुठींत रहातील. तें कांहीं उपयोगीं नाहीं.

वाघो०—बरें. पण, याला जर मारायलाच पाहिजे आहे,—

भुजा०—म्हणजे काय ? मारलेंच पाहिजे ! (आपणाशीं) हा पोर कांकूं करीलसें वाटतें. हें नीट नाहीं !

धर्म्या—बरं, ये बिच्चानों !—ह्यो करील आतां ह्येचं काम, तोंपरंत चला आपुन डुंगर टिहळुनशीं येऊं ! हं **वाद्या** ! काम हुश्शारीनं कर, समजलास? (भुजाबाखेरीज सर्व चोरटे निघून जातात. भुजाबा लपून रहातो.)

कम० (आपणाशीं) हा पण काय चमत्कार बाई ! हे सगळेजण माझ्याकडे रागावून पाहूं लागले, आणखी एकसारखे कुजबुजत होते ? मला याच्या कुजबुजण्याचा कांहीं अर्थ कळला नाहीं, तरी पण मला त्यांच्या पहाण्याचें भय वाटलें! आणखी स्वतः बोलण्याचीही पण पंचाईत, त्यामुळें तर बाई! मला कसेंसेंच होऊं लागलें आहे !

वाघो०—माझी आई चेटकाळी आहे हेंच खचित! तिनें आजच तिसरे प्रहरीं मला सांगितलें कीं, तूं या चोरांच्या मंडळांत शिरतो आहेस, पण तूं लौकरच गळ्येकांपू निघशील! तो प्रसंग आतां आला खरा ! (कमळेकडे येऊन) कायरे ए मुला! हे सर्वजण तुला आणि मला येथें एकटेच टाकून गेले ते कशाकरितां, तुला कळलें ?

कम०—नाहीं, मला कशानें कळणार ? पण कांहीं—

वाघो०—जास्ती बोलणें नको. त्यांनीं तुझा जीव घ्यायचें काम माझ्याकडे दिलें आहे!

कम०—असेल. पण तूं कांहीं मला मारायचा नाहींस. कारण मीं तुझें कधीं देखील कांहीं वांकडें केलें नाहीं !

वाघो०—नाहीं केलेंस हेंच खरें.

कम०—एवढेंचसें काय ? पण मी दुसऱ्याही कोणाचें वांकडें केलें नाहीं. अगदीं लहान किडे कां असेनात, पण मी मुद्दाम म्हणून कुणालाही दुखवीत नाहीं. कारण लहानपणापासून माझ्या घरची मला शिक्षाच तशी आहे. मी म्हणतों आपण जसे प्राणी, तसेच तेही प्राणी आहेत. तर त्यांना आपण काय म्हणून दुखवावें ? तर मला सांग, तूं माझा जीव काय म्हणून घेशील ? कारण एकवेळ जर तूं मला मारलेंस, तर त्याच्यामागून तुझ्या जिवाला जन्मभर हळहळच लागणार कीं नाहीं ?

वाघो०—बस बस ! मला तुझें पुराण ऐकायची जरूर नाहीं !

कम०—बरें दादा! राहिलें, पण मला एवढेच सांग, एकाद्याचा उगीच जीव घेणें ह्मणजे लहानका कृत्य काहे? तुला बाप असेल, आई असेल, भाऊबहिणी असतील, तर समज तुला कोणीं ठार मारिलेलें त्यांना कळलें तर त्यांना तें ऐकून तुझ्याबद्दल किती बरें वाईट वाटेल? त्याप्रमाणें तूंच पहा, तूं मला मारून टाकिलेंस, तर त्याबद्दल माझ्या मायेच्या मनुष्यांस किती बरें दुःख होईल? बरें, माझी एकवेळ गोष्ट राहूंदे, तूं आपल्या पुरताच विचार कर, तूं असा खून करणारा निघालास ह्मणून समज तुझ्या आईबापांना कळलें, तर त्यांना तुझ्याबद्दल किती बरें वाईट वाटेल? आणखी तुला असें वाटतेंका कीं, असला कुपुत्र आपणाला मिळाला ह्मणून तीं आपल्या कपाळाला हात लावल्याशिवाय रहातील?

वाघो०—(आपणाशीं) काय करावें? याच्या या भाषणानें आपला तर हातच उचलेनासा झाला आहे!—पण—छेः—असला हा ढिलेपणा उपयोगीं नाहीं. (उघडपणें) अरे, तुझ्या या बोलण्याचा इथें कांहीं उपयोग व्हावयाचा नाहीं.—माझ्याकडे काम दिलें आहे, त्याप्रमाणें मी तुला मारणारच!—तर चल आटप, हात बीत धुवून तुला देवाचें किंवा कुणाचें कांहीं नांव विव घ्यायचें असेल, तर घे झटझट! पुढें अवकाश मिळायचा नाहीं!—हं—बोल, घेतलेंस देवाचें नांव?—पहा तुला आतां ठार मारतों.

कम०—भलतेंच बोलतोस दादा! असें कुठें झालें आहे?—

वाघो०—चूप्! तूं मला दादा विदा ह्मणून उगीच चढूं नको. मी कांहीं वळायचा नाहीं. बोल! तूं आपणाला मारून घेण्यास झालास तयार?

कम०—छे रे दादा! मी इतक्यांतच कसा तयार होईन? जीव कोणाला नकोसा का होईल?—मरण—मरण ह्मणजे तुला अगदीं परसांतली भाजी वाढते आहे, होय?

वाघो०—(आपणाशीं) ही बोवा पंचाईतच झाली! (मोठ्यानें) तें कांहीं असो; मी तुला मारणारच! (तरवार बाहेर काढूं लागतो.)

कम०—तर मग तूं मला खचितच मारणार नाहींस! कारण, हा पहा, तरवार बाहेर काढतांनाच तुझा हात कसा लटपटत आहे! आणखी हा पहा तुझ्या तोंडावर कसा दरदरावून घाम आला आहे!

वाघो०—अरे, तुझ्या अशा चिडविण्यानें मी चिडायचा नाहीं!—मी तुला खचित मारणारच!—(दःखानें तोंड एकीकडे करितो.)

कम०—बरें, तुझी मर्जी! तूं मला मारणारच, तर मार! मी कांहीं तुझा हात धरीत नाहीं!—पण तूं असें तोंड कां फिरवितोस? गरीब गाईला कसाव मारीत असतां तो कसा दिसतो हें मला पाहूं तर देशील!—अरे! तूं मोठा शूर तो हाच का?—तुझा थरकांप अजून गेला नाहीं, आणखी तुझें मनच कांहीं तुला मला मारावें ह्मणून सांगत नाहीं! तुझ्या मनांत माझ्याविषयीं दया उत्पन्न झाली आहे, आणखी हे बघ तुझ्या नेत्रांतून कसे घळघळां अश्रु वहात आहेत! तर तुझी अशी स्थिति झाली असून तूं मला मारणार कसा?

वाघो०—(डोळे पुसून) तें कांहीं असो; मी या

चोरट्यांना तुला ठार मारण्याविषयीं वचन दिलें आहे. इतका वेळ माझा हात थरथर कांपत होता, डोळ्यांतून अश्रूंचे प्रवाह चालले होते, पण आतां त्यांचें कांहीं उरलें नाहीं !—चल आतां मी तुला हा अस्सा—(तरवारीनिशीं तिला मारण्याकरितां हात उगारितो.)

कम०—(घाबरून) अरे बाबा ! मला मारूं नको ! मी स्त्री आहे ! माझी कींव—

वाघो०—काय ? स्त्री आहेस ?

कम०—(गोंधळून) आं—मी हें काय भलतें बोललें ? अग आई ! आतां माझी काय दशा होईल ?—अग बाई, हें कळण्यापेक्षां मी मेलें असतें तरी बरें झालें असतें !

वाघो०—(दया येऊन) आतां कांहीं होवो, आपण तर बोवा इचें रक्षण करणारच !

कम०—आणखी बोल दादा ! तुझ्या तोंडात साखर पडेल, आणखी स्त्रीहत्येचें भयंकर पाप तुला लागणार नाहीं !

वाघो०—झालें, तर आतां ठरलें. तूं माझी बुद्धि फिरविलीस खचित !

कम०—एकूण तर तूं आता मला मारणार नाहींस ?

वाघो०—जास्ती तर काय सांगूं ? पण आतां जरी तूं पुरुष निपजलीस, तरी देखील माझ्यानें तुझ्यावर हात उचलवणार नाहीं !—कारण तुझें भाषण ऐकूनच मी बायकोपेक्षां बायको झालों आहे !

कम०—भल्या गृहस्था ! यावेळीं तुझे मजवर किती उपकार झाले म्हणून सांगूं ? ते फेडण्याचें यावेळीं माझे अंगीं सामर्थ्य उरलें नाहीं, याकरितां माझे उपकारभरित प्रेमाश्रु एवढेच तुझ्या हातांवर गाळावे; आणखी, परमेश्वरानें जशी तुला सद्बुद्धि दिली, तसेच तो तुझें निरंतर कल्याण करो, एवढींच त्याची अनन्यभावें करून विनवणी करावी, यापेक्षां माझे हातीं दुसरें कांहीं उरलें नाहीं !

वाघो०—इतकें केल्यावर आणखी मला जास्ती तें काय पाहिजे ?—परंतु आतां उशीर होत चालला. रात्र प्रहराजवळ जवळ झाली आहे, आतां थोडक्याच वेळानें चोरटे परत येतील. याकरितां येथून लौकर निघून जावें हें बरें,—तुझी इच्छा असेल तर मी तुला येथून नेतों. चल मजबरोबर !—खरें पण, मी स्वतः दरवडेखोरांपैकींच एक आहें, यावरून तुझ्या मनाला भय तर नाहींना वाटत ?

कम०—त्याची काहीं काळजी करूं नको. मी तुझ्याबरोबर सर्व पृथ्वीवर फिरावयाचें झटलें तरी येईन !—काय चमत्कार असेल तो असो. यावेळीं माझ्या मनाची तुझ्याकडे किती पण ओढ लागली आहे !

वाघो०—माझीही पण अशीच स्थिति झाली आहे !—कांहीं असो; आजपासून तूं आणि मी दोघें भाऊबहिणींप्रमाणें वागूं, आणखी तुला कोणीकडे जायचें असेल तें मला सांग, म्हणजे देवाशपथ, मी तुला त्या ठिकाणीं घेऊन जाईन !

भुजा०—खबरदार ! येथून एक पाऊलभरही हालाल तर ! (पुढें येतो.)

वाघो०—(आश्चर्यानें) कोण ? भुजाबा !

भुजा०—होय. वाघोजीराव ! मीच भुजाबा !

वाघो०—चला, असे एका बाजूला होऊन आम्हांला जाऊं द्या. ही स्त्री आहे !

भुजा०—पाहिजे तर हिला अप्सरा म्हणा. मग ?

वाघो०—हा तरुण, सुंदर असून स्वभाव अगदीं साधा! किती ह्मणून सांगूं? पहा! तिच्या त्या करुणेनें भरलेल्या डोळ्यांकडे तर एकवेळ पहा. त्यांकडे पाहिल्यावर हिचा घात करावा असें कोणाला तरी वाटेल?

भुजा०—मला हें तें कांहीं समजत नाहीं. मला आपलें कर्तव्यकर्म बजाविलें पाहिजे!

वाघो०—तरी चिंता नाहीं. भीरु अबला-जनाचें रक्षण करणें हा पुरुषांचा धर्मच आहे!—चला—नव्हे पण—तुम्हीं थट्टा करीत आहां असें मला वाटतें. खचित तुमच्या मनांत या स्त्रीनें मरावें असें नसेल!

भुजा०—नसेल कीं असेल याचा आत्तांच अनुभव घे! ही पहा मी आपली तरवार बाहेर काढितों!

वाघो०—पण असें काय वरें करावें, **भुजाबा**? तुम्हीं एकवार तिजकडे पहा तर खरें?

भुजा०—पाहिलें. बरें मग?

वाघो०—अहो, तिचें हें तारुण्य, ही तिची सुकुमार काया, स्वतः अबला असल्यामुळें तिची झालेली ही स्थिति, हीं पाहून तुह्मांला यत्किंचित् देखील—

भुजा०—हळहळ वाटत नाहीं! मी हिला ठार मारणार!

वाघो०—मूर्खा! तूं जनावरापेक्षां जनावर आहेस!

भुजा०—तूं येथून बाहेर पडण्याचा यत्न तर कर, ह्मणजे मी खरोखरींच तसा आहे हें तुला कळून येईल.

वाघो०—झालें तर मग, आतां दुसरा उपायच राहिला नाहीं! चल ही पहा मीं आपली तरवार काढिली!

भुजा०—येऊं दे, माझीही तयार आहे! एकवार या पठ्ठ्याचा सपाटा कसा आहे हें तर पहा! (दोघे लढूं लागतात.)

वाघो०—चिंता नाहीं. येऊन जाऊन रक्तपात जर होणारच, तर तो पुरुषाचा झालेला बरा!

भुजा०—चल•वे लंडी! (दोघे लढतलढत पडद्यात जातात.)

कम०—देवा! **नारायणा**! दीन गाईचें रक्षण करण्याचें तुझें ब्रीद आहे, त्याची परीक्षा होण्याची हीच वेळ आहे!—अगबाई! इतका वेळ तरवारी एकमेकींवर आपटून त्यांचे खणखण आवाज ऐकूं येत होते, पण इतक्यांत हें चोहींकडे गप्पसें काय झालें? कोणी पडलें तर नाहीं? देवा! कृपा करून त्या तरुण वीराचें तूं रक्षण कर!

(इतक्यांत वाघोजी परत येतो.)

वाघो०—हं—चल चल! जलदी कर!

कम०—काय? तूं त्याला ठार केलेंस?

वाघो०—एवढेंच नाहीं, तर त्याचें प्रेत कड्यावरून खालीं लोटूनही दिलें!—त्याच्याबद्दल तूं दुःख वाटवून नको घेऊं. तो दुष्ट होता, त्याला हेंच शासन योग्य होतें! असो; या चोरट्यांनीं आज एका गरीब ब्राह्मणाला बुचाडून कोंडून ठेविलें होतें, त्याची किल्ली ही मला **भुजाबा**च्या अंगावर सापडली, ती घेऊन मीं या ब्राह्मणासही मुक्त केलें आहे! चल, पण आतां आटप! हात धू! आतां इथें बोलत बसायला वेळ नाहीं. (दोघें जातात.)

अंक ३.

प्र० १.—पूर्वोक्त पडके देऊळ.

(वाघोजी कमळेला घेऊन येतो.)

वाघो०—मघां मी एका पडक्या देवळाची तुला गोष्ट सांगत होतों, तें देऊळ हेंच! या ठिकाणीं तूं आजची रात्र रहा, आणखी उद्यां तुला जिकडे जावेंसें वाटेल तिकडे जा !

कम०—(सभोंवती पाहून) तूं या ठिकाणीं एक बाई रहाते ह्मणून सांगितलेंस, ती तुझ्या ओळखीची आहे ?

वाघो०—अशी तशी नाहीं. चांगल्या ओळखीची आहे. ती आतां येथें नाहीं, पण आल्यावर पहाशील, तिच्या सारखी ममताळू बाई दुसरी कोठें मिळणार नाहीं. ती येस्तोंपर्यंत मी येथें राहिलों असतों, परंतु तसें केलें तर माझ्यावर ते चोरटे संशय धरतील यासाठीं ते परत येण्याच्या पूर्वीं मला तिकडे गेलें पाहिजे. येतों आतां. फिरून तुझी आणि माझी गांठ पडेल; पण नच पडली, तर माझें तुला स्मरण मात्र असूं दे.

कम०—मी तुला यावज्जीव विसरणार नाहीं. मी तुला निरंतर आपला भाऊ ह्मणत जाईन !

वाघो०—मीही तुला आपली अक्का किंवा ताई ह्मणत जाईन ! बरें, मी येतों ! (निघूनजातो.)

कम०—(आपणाशीं) माझ्या पित्याच्या किल्ल्यापासून दोन तीन कोसांवर एका पडक्या देवळांत एक दरिद्रानें पीडलेली बाई रहात असते, आणखी ती चेटकें बिटकें करिते ह्मणून मीं ऐकिलें आहे खरें; तेव्हां ती बाई येथेंच रहात असेल असें वाटतें. कारण या देवळाच्या छपराला चोंहीकडून भोंकें पडलीं आहेत, भिंतींना मोठमोठ्या भेगा पडल्या आहेत, व त्या सर्वांतून वारा एकसारखा घोंघावत आहे, तेव्हां अशा भयाण एकीकडच्या पडक्या ठिकाणीं दुसरें कोण राहूं शकणार आहे ? (दारखावून इकडे तिकडे फिरते. इतक्यांत बाहेरून दाराला ठोंके बसलेले ऐकूं येतात.)

सरदार—(बाहेरून) आंत कोण आहे ? दार उघडा दार !

कम०—(चपापून) अग बाई हा शब्द तर माझ्या ओळखीचा दिसतो ! (ऐकत रहाते.)

सर०—(बाहेरून) अरे, कां दार उघडतां कीं नाहींरे ?

कम०—हा माझ्या पित्याच्या पदरचा प्रतापराव आहे ! याने जर मला ओळखलें, तर—

सर०—अरे कायरे उघडतां कीं नाहींरे ?

कम०—आतां कांहीं उपाय नाहीं. आतां होईल तितकें करून आपल्या स्वभावाच्या विरुद्ध मला आचरण केलें पाहिजे, व स्वरही पुरुषासारखा कर्कश काढण्याविषयीं झटलें पाहिजे. तरच कांहीं उपयोग होईल; आणखी ह्या चोरट्यांनीं जो आज रात्रींचा बेत केला आहे, तोही सिद्धीस जाणार नाहीं ! (दार उघडते त्याबरोबर तीन सरदार आंत येतात, त्यांत)काय हो, इतकी दांडगाईशी केलीत ? तुह्मांला हलक्यानें हांका नव्ह्या मारतां येत ?

१ **सर०**—तूं इतक्यांत दार उघडलेंस ह्मणून बरें झालें, नाहीं तर आह्मी दारच फोडून टाकण्याच्या विचारांत होतों !

कम०—मूर्खांनों ! धिक्कार असो तुह्मांला ! अरे, तुह्मीं धडधडीत पुरुषासारखे पुरुष असून अशीं पशूंसारखीं कृत्यें करण्यास तुह्मांला लाजा नाहीं वाटत ? सज्जन लोक होईल तितकें करून अशा देवळांचा जीर्णोद्धार करितात, नाहीं तर तुह्मीं—चालले देवळें पाडायला !

२ सर०—(दरडावून) चूपबे हरामखार.! आह्मांला आमच्या दुमाल्दारांनीं सक्त हुकूम केला आहे कीं, या पडक्या देवळांत जिवंत ह्मणून जेवढा प्राणी सांपडेल तेवढा पुढें घालून गडावर आणावा. त्याप्रमाणें आह्मीं आलों आहों. चलो ! चलो ! हमारा साथ !

कम०—अरे, होय. धन्यानें हुकूम केला असेल ह्मणून त्यानें कारण नसतां असा दंगा करा ह्मणून खचित सांगितलें नसेल !—चला, तुह्मीं मला गडावर नेण्याकरितां आलां असाल, तर चला हा मी तुमच्या बरोबर निघालों ! चला ! (सर्व जातात.)

~~~~~~~~

प्र० ५.—तिरसगडाची बाहेरली बाजू.

(हातांत तीरकमठा घेतलेला, व कंबरेस तरवार लटकाविलेला वाघोजी येतो.)

वाघो०—या स्त्रीला देवळांत सोडून दिल्यानंतर मला विचार करण्याला काय ती ही आतां वेळ सांपडत आहे ! तर आतां या निर्दय चोरट्यांस मिळण्याकरितां परत जावें का कसें करावें ?—आपल्या जिवाचा बचाव करण्याकरितां ह्मटलें ह्मणजे परत गेल्याशिवाय इलाज नाहीं.—पण—तसें जर करावें, तर आजच्या रात्रींच्या दंग्यांत किल्ल्यावर एकूणएक लोकांस ठार मारून टाकण्याचा यांचा विचार सिद्धीस जाईल ! छेः छेः—तो तर जाऊं देतां उपयोगींच नाहीं !—मी कच्छभुजाकडे होतों, त्यावेळीं तिथें मी बाळबोध ल्याहायला शिकलों होतों, त्याचा उपयोग करण्यास ही संधि बरी आली आहे ! मीं एका चिटोऱ्यावर थोडासा मजकूर लिहून आणला आहे, त्यांत आज रात्रींचा सर्व बेत तर सांगितला आहे, परंतु हा बेत कळविण्याबद्दल सर्व चोरट्यांच्या प्राणांचा बचाव तेवढा मागून घेतला आहे. (बाणाच्या शिसाऱ्यास तो कागद बांधून बाण किल्ल्यांत जाऊन पडे अशा बेतानें बाण सोडतो.) आतां चिंता नाहीं !—हा मी विश्वासघात करतों आहें, याबद्दल माझें मन मला खात आहे. पण त्याला इलाज नाहीं ! एक माझ्या सोबत्यांशीं तरी कपट केलें पाहिजे, नाहीं तर परमेश्वराच्या घरीं तरी अन्यायी ठरलें पाहिजे!

(निघूनजातो.)

~~~~~~~~

प्र० ३. उदास दुर्गांतील एक दिवाणखाना.

(मानाजीराव बसला आहे. हवालदार व शिपाई जवळ उभे आहेत.)

माना०—मूर्खांनो ! ती तुमच्या हातीं लागण्यासारखी असून तिला तुह्मीं जाऊं कसें दिलें?

हवाल०—(आपणाशीं) या ठिकाणीं खोटें बोलल्याशिवाय इलाज नाहीं ! (उघडपणें) असें कसें होईल सरकार? आह्मीं सारे सहा सातजण होतों, व ते चोरटे अगदीं नाहीं तरी पंधरांवर असतील !—आणखी शिवाय त्यांच्याजवळ हत्यारांची अगदीं कडेकोट तयारी होती.

ह्या झरोक्यांच्या अंगच्या भिंतीच्या पलीकडल्या बखळींत कोणी ब्रह्मराक्षस असतो अशी तुरुंगांतील अधिकाऱ्यांची समजूत असल्यामुळें त्यांपैकीं दिवसा उजेडीं देखील तिकडे कोणी जात येत नाहीं. यामुळें युक्तीनें त्या अंगाला प्रवेश करून घेऊन मी भिंतींत खिळे ठोंकून वर चढून या ठिकाणीं आलों आहें. व येथून परत खालीं जाण्याकरितां दोरांच्या पायऱ्या करण्याचीही मीं तजवीज केली आहे. याकरितां मी हें छप्परांत पाडिलेलें भोंक तुझें अंग बाहेर निघण्याजोगें मोठें केलें, तर तूं मजबरोबर त्या शिडीवरून उतरून येशील?"

"नकोग बाई! मी आपली इथेंच राहिलेली बरी! कुठें मेला कुणाचा उतरतांना अंमळसा पाय चुकला, तर जिवावर बेतायची! नकोग बाई तें! नुसतें ऐकूनच माझें डोकें फिरूं लागेलसे मला वाटतें.—तें सगळें खरें, पण तुम्हांला या ब्रह्मराक्षसाचें भय वाटलें नाहीं कसें?"

"त्रिवेणी!" वसुभद्राचार्य उत्तर करितोः—"आपण असे बोलत राहिलों, तर न जाणों आपलें बोलणें आसपास कोणाला ऐकूं जाऊन आपला संशय येण्याचें भय आहे. याकरितां तुला एवढेंच सांगतों कीं, जर त्या रात्रीं अंधारांत चांडभुंडीच्या त्या दलदलींतून आणि त्या भुताटकीच्या दिव्यांतून जात असतांना तूं भ्याली नाहींस, तर आजच्या प्रसंगीं कां भितेस मला सांग? विचार कर, तूं जर उद्यांपर्यंत येथें राहिलीस, तर तो दुष्ट कोतवाल आणि त्याचीं माणसें हीं तुझा किती व कशा प्रकारचा छळ करतील?"

"खरेंच बाई!" त्रिवेणी अंगावर शहारे येऊन बोलते. "मी बाई आपली येण्याला तयार आहें. परंतु आपल्या जरठकर्णजींची वाट काय? त्यांना ठेविलें आहे तरी कोठें?"

"त्याचा मीं बरोबर तपास लाविला आहे. त्यांची कोठडी नेमकी तुझ्याच खालती आहे."

"तें खरें, पण त्यांना तुम्हांला सोडवितां येईलना?"

"हो न यायला काय झालें? मात्र त्यांनीं धीर धरून शिडीवाटे खालीं उतरायला तयार झालें पाहिजे. बाकी ब्रह्मराक्षसाच्या दचक्यानें या बखळीच्या अंगानें आपण कोणाच्या दृष्टीस पडण्याची भीति बिलकुल बाळगायला नको." वसुभद्राचार्य सुस्कारा टाकीत उत्तर करितो.

"चिंता नाहीं. तर त्यांना अगोदर खालीं उतरून द्या कसे, म्हणजे माझें कांहीं होणार असलें तरी मी खालीं तुम्हांबरोबर येईन!"

त्रिवेणीच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच वसुभद्राचार्य कांहीं उत्तर न देतां वरच्या वर निघून गेला, व त्रिवेणी आपल्या कोठडींत एकटीच राहून कान देऊन ऐकत राहिली. परंतु बराच वेळपर्यंत तिच्या कानीं अस्पष्ट अशा खरखर शब्दाशिवाय दुसरें कांहीं पडलें नाहीं. सरतेशेवटीं तो आवाज बंद झाला, व पुढें थोडकासा वेळ गेल्यावर फिरून वरच्या छप्परांतून वसुभद्राचार्यानें जती खालीं उतरून गेल्याचें तिला कळवून तिला वर कौलारावर ओढून घेण्याकरितां आंत दोरी सोडिली, व ती तिनें बळकट धरिल्यावर त्यानें तिला मोठ्या बेतानें ओढून घेतलें. वर गेल्यावर बाहेरच्या मोकळ्या वारा अंगास लागल्यामुळें त्रिवेणीस कांहींशीं अधिक हुशारी आली; परंतु सर्वत्र अंधारच पसरला असल्यामुळें, व त्या अंधारांत खालीं पुष्कळच खोल जावयाचें आहे असें

वाटण्याजोगें होतें यामुळे, त्रिवेणी किंचित् घाबरली, व आपल्याच्यानें खालीं जाऊन पोंचेतोंपर्यंत कदाचित् टिकाव धरवणार नाहीं म्हणून तिनें **वसुभद्राचार्यास** सांगितलें. तेव्हां त्यानें येथें तुरुंगवासांत रहाण्यापेक्षां मरणही बरें म्हणून तिला धीर दिला, तरी तिच्या मनाची खातरी न होतां तिचे पाय लटलटां कांपूं लागले. तेव्हां अखेर या पंचाइतीकडे लक्ष द्यावयाचें नाहीं, व तिची तुरुंगांतून सुटका ही करावयाचीच, अशा इराद्यानें **वसुभद्राचार्यानें** तीस उचलून धरिलें, व तीही भीतीमुळें त्याच्या अंगास अगदीं लकटून चिकटली. इतकें झाल्यावर **वसुभद्राचार्य** तिला संभाळून धरून दोराच्या वाटेनें हलके हलके खालीं उतरूं लागला. असें करण्याची एक तर पंचाईत, व त्यापासून एकादे वेळीं प्राणही जावयाची भीति होतीच, तथापि तीस न जुमानितां **वसुभद्राचार्य** जेमतेम अर्धी वाट उतरून गेला, व त्यावेळीं मात्र आपण आपल्या शक्तीचा वाजवीहून जास्ती अजमास केला होता असें त्याचें त्यालाच वाटूं लागलें; व कदाचित् न जाणों **त्रिवेणी** आपल्या हातून निसटून खालींही पडण्याची भीति त्याला वाटूं लागली. तथापि **त्रिवेणी**च्या अंगस्पर्शानें त्याच्या अंगांत कांहींएक प्रकारची निराळी वृत्ति उचंबळत असल्यामुळें तिच्या जोरानें त्यानें तिला बळकट आंकळून धरिलें, व आपला प्राणांतही होईल किंवा कसें याकडे लक्ष न देतां व दोरी वरचेवर बरीच डळमळत असतांही, अखेर एकदाचें तिच्यासकट त्याचें खालीं भुईवर पाऊल टेंकलें.

प्रकरण १०.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें **त्रिवेणीस** संभाळून खालती आणिल्यावर **वसुभद्राचार्य** तिला त्या ब्रह्मराक्षसाच्या आधारांतून ज्या ठिकाणीं **शिलादित्य** व **जरठकर्ण** जती हे दोघेही यांची वाट महात होते त्या ठिकाणीं घेऊन गेला; व याप्रमाणें तीं सर्व चौघेजणें एकत्र मिळाल्यावर त्यांनीं तोंडांतून एक शब्दही न काढिता मुकाट्यानें नदीची वाट धरिली. तेथें जाऊन पोचल्यावर एक लहानसें होडकें झाडांच्या आश्रयानें लपवून अगोदरच बांधून ठेविलें होतें, त्यांत तीं सर्वजण शिरल्यावर **शिलादित्य** व **वसुभद्राचार्य** हे दोघेही वल्हवूं लागून त्यांनीं थोडक्याच वेळानें तुरुंग पुष्कळच मागें टाकिला. सुमारें एक घटकाभर हा क्रम चालू राहून अखेर तें होडकें कांठाच्या जवळ येऊं लागलें.

वसुभद्राचार्य त्रिवेणीस म्हणतो:—"त्रिवेणी! आतां या ठिकाणीं आपणास उतरावयाचें आहे; व येथून तुझ्या पित्याचें घर पाव कोसाच्या टप्प्याच्या आंत आहे. तीं त्या ठिकाणीं एक चोरगुहा आहे, तींत तूं आणि जती कांहीं वेळ रहा. इतक्यांत मी बाहेर पडून तुला तुझ्या घरीं सुरक्षितपणें परत जाण्यास कांहीं प्रत्यवाय आहे किंवा कसें याची चौकशी करून येतों."

त्यावर ती उत्तर करिते:—"तुम्हांला वाटेल तें तुम्हीं करा, त्याला मी कबूल आहें. तरी पण तुम्हीं तिकडे गेल्यानें न जाणों कदाचित् धोक्यांत पडाल याची मला भीति वाटत आहे. यासाठीं तिकडे जाण्यापेक्षा **पवित्रदीर्घिके**स बरा आहेत तिकडे एकदाची मी जाऊन पोंचलें असतें म्हणजे बरें, असें मला

वाटतें. बाबांच्या जवळ मी गोष्टे लपाजे नला दुसरा मनुष्यप्राणि मानवतील किंवा कांहीं याचीच

मला कशाची भीति वाटणार नाहीं."

"तूं म्हणतेस त्याप्रमाणें करण्यास माझ्याकडून मुळींच ना नाहीं." **वसुभद्राचार्य** बोलतो. "परंतु आलीकडे दोन तीन दिवसांत तुझे पुष्कळच हाल झाले आहेत, एवढ्याकरितां तुला चांगलासा विसांवा मिळाल्याखेरीज तुला इतक्या लांबवरच्या ठिकाणीं प्रवास करूं देणें मला कांहीं योग्य वाटत नाहीं. याकरितां आजचा, फार तर उद्यांचा, दिवस तूं येथें रहा, आणखी मग पाहिजे तर तिकडे जा."

त्रिवेणी उत्कंठापूर्वक बोलतेः—"तुम्हीं म्हणतां तें खरें, पण येथें राहून माझ्या मनाला जो घोर लागावयाचा, त्यापुढें माझे वाटेचे श्रम हे कांहींच नाहींत असें मी समजतें. तुम्हीं माझे करितां इतके झटलां, तेव्हां आणखी थोडीशी मला मदत करण्यास मागें पुढें पाहूं नये. तर आतां असें करा, मी आणखी हे आमचे जती, अशा दोघांना तिकडे पोंचवून देण्याची कांहीं तरी तजवीज लावून द्या, म्हणजे मी तुमचे उपकार जन्मोजन्मींही विसरणार नाहीं."

त्यावर **वसुभद्राचार्य** उत्तर करतोः—"**त्रिवेणी**! तूं मला आज्ञा करते आहेस त्याप्रमाणें मी सर्व गोष्टी पार पाडण्यास सिद्ध आहें यांत कांहीं मोठेंसें नाहीं. परंतु जर तुला कबूल असेल, तर तुला तेथपर्यंत पोंचवावयालाही मी तुजबरोबर येईन."

"ही गोष्ट मी देखील मोठ्या आनंदानें पत्करीन." **शिलादित्य** मध्येंच बोलतो.

तो तरुण व्यापारी **त्रिवेणीस** म्हणतोः—"या सर्व गोष्टी खऱ्या, पण इतके कष्ट *मला मोठी काळजी वाटते!"*

त्रिवेणी त्याचें समाधान करितेः—"तुम्हीं म्हणतां खरे, पण तुम्हीं त्याबद्दल एवढी देखील धास्ती कशी ती बाळगूं नका. कदाचित् मी भितरी नाजूक असेन म्हणून तुम्हांला वाटत असेल, पण ती गोष्ट तुम्हीं मनांत नका आणूं. तुमच्या हातून मी म्हणतें ही गोष्ट पार पडण्याजोगी आहे किंवा नाहीं एवढ्याचाच काय तो तुम्हीं विचार करा. तुम्हांला माझ्याबद्दलची कांहीं काळजी करायला नको."

तें पाहून जती आश्चर्यानें म्हणतोः—"बाळे! **त्रिवेणी**! तूं लहानपणापासून मोठ्या धारिष्टाची मुलगी आहेस असें मी समजत होतों, तरी पण तुझें आतांचें धारिष्ट पाहून मला खरोखरीच अत्यंत विस्मय वाटतो!"

आमच्या प्रवासिमंडळाचें हें या प्रकारचें बोलणें संपत आहे तों तें होडकें अगदीं तीराशीं येऊन भिडलें. त्याबरोबर त्या तरुण व्यापाऱ्यानें खडकावर उडी मारून **त्रिवेणी**चा हात धरून तिला व मागून त्या जतीला अशा दोघांनाही तीरावर उतरून घेतलें. सरते शेवटीं **शिलादित्य** होडक्यांतून उतरून त्यानें तें होडकें झाडांच्या आश्रयानें नदीकांठच्या दरडीच्या एका ढोलींत लोटून बांधून टाकिलें; व इतक्यात बाकीचीं तिघेंजणें कांहीं अंतरावर त्याची वाट पहात उभीं होतीं त्यांस तो जाऊन मिळाला. त्या वेळीं अंधार कायमच होता, व तीं ज्या वाटेनें जावयाचीं ती वाटही झाडांतूनच असल्यामुळें मुळींच स्पष्टपणें दिसत नव्हती. यामुळें **वसुभद्राचार्य त्रिवेणी**चा हात धरून जपून बेतानें मार्ग क्रमूं लागला, व त्यामागून **शिलादित्य** व जती दोघेही चा-

लले. इतक्यांत डाव्या अंगास झाडांच्या आडून एकदम भयंकर उजेडाचा शोंत दृष्टीस पडून या सर्वांस परम भीति व आश्चर्यही वाटलें.

"अग बाई! हा खचीत खचीत कोठें तरी घराला आग लागली आहे!" त्रिवेणी ह्मणाली.

"हें घर कशाचें? ही तुझ्या पित्याच्या थोरल्या वाड्यालाच आग लागलेली दिसते आहे!" **वसुभद्राचार्य** सांगतो.

हें ऐकून **शिलादित्य** दांत ओंठ खाऊन ह्मणतो:—"खचित! खचित! हें त्या दुष्ट कोतवालाचेंच कृत्य आहे यांत संशय नाहीं!"

"हाय हाय!—आः—**अर्हत्**! **अर्हत्**! हे सत्यप्रिया **अर्कबंधो**! तुझ्या ज्वाळा या दुष्टांचा अजून कसा समाचार घेत नाहींत?" जती बोलतो.

वसुभद्राचार्याचें बोलणें ऐकून **त्रिवेणी**ला एकदम रडें कोसळलें आणि ती ह्मणाली:—"अग आई आई! इतका वेळपर्यंत मी आपल्याला मोठी धारिष्टाची समजत होतें, पण आतां बाई माझा सगळा धीर खचला!"

याप्रमाणें इकडे बोलणें होत आहे तों तिकडे आग जास्ती जास्तीच भडकत चालली होती. त्यावेळीं ज्वाळांचे मोठमोठे लोट धुराच्या आडून निघत असून त्यांच्यायोगें आकाशभागाचाही कांहीं चमत्कारिक ताम्रपीत रंग होऊन सभोवतीं वऱ्याच अंतरावर उजळल्यासारखें दिसूं लागलें होतें, तेव्हां आणखी कांहीं विशेष प्रकार आहे किंवा काय हें पहाण्याकरितां सर्वजण जवळच एक उंचवटा होता त्यावर चढून पाहूं लागलीं. तेव्हां **अर्थशाला**च्या घराचा समोरचा भाग सर्वच ज्वाळामय झाल्याचें भयंकर स्वरूप त्यांच्या दृष्टीस पडलें.

तें पाहून **त्रिवेणी** निराश होऊन ह्मणाली:—"चला आपण सर्वजण तिकडेसच जाऊं!"

यावर **वसुभद्राचार्य** उत्तर करितो:—"सगळ्यांनीं जाण्याचें कांहीं कारण नाहीं. मी आणि **शिलादित्य** दोघे जाऊन आह्मांकडून होईल तितकी मदत करितों.—परंतु तूं अगोदर या गुहेंत जा कशी!"

वसुभद्राचार्याच्या तोंडून हे शब्द निघाले, पण त्यांकडे **त्रिवेणी**चें लक्ष मुळींच नव्हतें. ती आलेल्या विचाराच्या भरांत गर्क होऊन जाऊन तिला आपण कोठें आहों काय आहों याची सुद्धां शुद्धि नव्हती; तेव्हां अर्थात्च जिवंत असूनही प्रेतवत् अशी तिची स्थिति होऊन **वसुभद्राचार्या**स तिला कशी तरी गुहेंत पोंचवावी लागली. **वसुभद्राचार्य** हा त्या प्रदेशाचा चांगला माहितगार असल्यामुळें त्याला कोठें काय अडचणी आहेत हें सर्व माहित होतें, व यासाठीं त्यानें **त्रिवेणी**स मोठ्या खबरदारीनें संभाळून नेलें. वाटेंत मध्यें मध्यें वेलींचीं कोंडाळीं पसरलेलीं असत, किंवा कोठे कोठें उंच सखल दगडही पडले असत, यामुळें अशा अंधाराच्या प्रसंगीं त्या सर्वांचें धोरण

---

१ जैन लोकांत जे तीर्थंकार ह्मणून अवतारी पुरुष झाले, त्यांपैकीं शाक्यसिंहाचें हें नांव आहे, तथापि अवतारपणत्वें हें बुध्दाचेंच नांव समजण्यास हरकत नाहीं. अक्षरशः अर्थ 'सूर्याचा बंधु ह्मणजे सूर्यप्रमाणें तेजस्वी, दाहकगुणविशिष्ट.

* * * * शाक्यमुनिस्तु यः ।

* * * * * * *

गौतमश्चार्कबंधुश्च मायादेवीसुतश्च सः ॥

अमरकोश, कांड १, स्वर्गवर्ग, श्लोक १५.

राखून निर्जीवप्राय झालेल्या त्रिवेणीस पायीं चालवीत नेत असतां त्यास किती श्रम पडले असतील याची वाचकांनींच कल्पना करावी. असो; सर्व प्रकारच्या अडचणी दूर करून तीं सर्वजण गुहेंत गेल्यावर **वसुभद्राचार्यानें** तिला एका भुसभुशीत दगडी ओट्यावर निजविलें, व तिजजवळ **जरठकर्ण** जतीस बसावयास सांगून आपण **शिलादित्यासहवर्तमान अर्धशालाच्या** वाड्याकडे चालता झाला.

बऱ्याच अंतरावर आल्यावर ते दोघे पहातात तों मुख्य वाड्याशीं आगीचा योग मुळींच झाला नाहीं, मात्र बाहेरल्या अंगास ज्या चाकरांकरितां कोठड्या बांधल्या होत्या, त्यापैकीं एकीस आग लागलेली त्यांच्या दृष्टीस पडली. तेव्हां त्यांचा जीव एकदाचा खालीं पडला; व आतां कांहीं भीतीचें कारण राहिलें नाहीं, व शिवाय ती आग उत्तरोत्तर अधिकाधिक भडकूं लागून सभोंवती लोकांची गर्दीही पुष्कळच जमली होती यामुळें आपल्या शत्रुपक्षापैकीं आपणास ओळखणारे लोक त्यांत असतील, अशा समजुतीनें ते त्या इमारतीकडे अंमळ सावकाशीने येऊ लागले. यावेळीं त्यांच्या सुदैवानें खंदकावर फळ्या आयत्या टाकिलेल्याच होत्या यामुळें ते बेताबातानें आंत शिरले; व आतां पुढें त्या जळत्या कोठड्यांकडे जाणार, इतक्यांत एका अंगास ह्मातारा **हयदक्ष** निराशेनें व्याकुळ होत्साता आक्रोश करीत असतां त्यांच्या नजरेस पडला. तेव्हां **वसुभद्राचार्यानें** तो बेत रहित करून त्याला तावडतोब हांक मारिली.

ती हांक ऐकल्याबरोबर **हयदक्षाचा** चेहेरा त्या तसल्या दुःखाच्या प्रसंगींही उजळला, आणि लागलाच पुढें येऊन त्यानें त्या दोघांसही एका अंगास अंधाराच्या बाजूस नेलें आणि ह्मणाला:—"**वसुभद्राचार्य**! कायहो सांगं? तुह्मांला यायला मोठी वाईट वेळ लागली! हें घर आज किती वर्षांचें आणि त्याजवर आज काय हा कठिण प्रसंग गुदरला आहे! यजमान साहेब घरांतून बाहेर निघून गेले, तेव्हांपासून एक दिवस देखील कसा तो सुखाचा गेला नाहीं! तुह्मींच पहा, ते येथून गेल्याचे मागें कोतवाल आणि त्याचे शिपाई यांनीं घरांत घुसून दंगा केला, त्या धांदलींत **त्रिवेणीताई** कोणीकडे गेली याचा मुळीं पत्ताच कळेनासा झाला! पुढें या चोरांनीं सगळें घर लुटून फस्त केलें, आणखी सरतेशेवटीं ही घराला आग लागली आहे, व आतां हा सगळा वाडा जळून फस्त होऊन जाईल! हायहाय!"

"असें बोलूं नको!" **वसुभद्राचार्य** त्याचें समाधान करितो:—"आग थोरल्या वाड्याला मुळींच लागली नाहीं. मात्र ती पलीकडच्या अंगच्या चाकरांच्या कोठड्यांना लागली आहे. आणखी जर फार उशीर न होतां नीट उपाय योजिले, तर फारसें नुकसान न होतां आग अजूनही विजेल!"

हे त्याचें ह्मणणें त्या ह्माताऱ्यास खरें न वाटून तो दुःखानें उसासा टाकून ह्मणतो:—"ही आग लागली तेव्हां पहिल्यानें माझ्याकडचा यत्न मीं केला, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. आमचें आलीकडे नशीबच फिरलें आहे! तर ज्यांनीं घराला आग लावली, त्यानींच पाहिजे तर विजवावी! मी या इथून आतां एवढासुद्धां कसा तो हलणार नाहीं!"

"बरें, आग लावली कोणीं हें तुला ठाऊक आहे?" **शिलादित्य** विचारितो.

"हो. आहे ठाऊक ह्मणून काय विचा-

रावें ? या कोतवालानें आणि त्याच्या शिपायांनीं ही आग लावली. ते अवशीस इथें आले, आणि आमच्या धनीसाहेबांविरुद्ध राजद्रोहाचे पुरावे गोळा करण्याच्या मिषानें गुलामांनीं अगोदर सगळें घर लुटलें ! सोनें, रुपें जडावाचे दागिने, उंची उंची वस्त्रें, जीं काय मिळालीं तीं सर्व आपल्या घशाखालीं उतरलीं! आणखी सरते शेवटीं सगळ्या चाकर माणसांस खाऱ्या कोठीखान्यांत कोंडून ठेवून पहिल्या प्रथम तबेल्याला व गोठ्याला आग लावून दिली. मी मेठ्या नशिबाचा म्हणून मात्र एकटा त्यांच्या हातांत सांपडलों नाहीं !"

"आः दुष्टांनो !" **वसुभद्राचार्य**-दांत ओंठ खात म्हणाला.

हयदक्ष पुढें बोलतो:--"काय ? नुसतेच दुष्ट ! या चोरांनीं एवढेंच करून रहाण्याचा बेत केला नाहीं ! त्यानीं आणखीही एक भयंकर विचार मनांत आणिला आहे. ते ज्यावेळीं सर्व घराचा झाडा घेऊ लागले, त्यावेळीं मी खालच्या भुयारांत कांहीं अडगळ पडली होती, तिच्या आड लपून बसलों होतों. तेथें ते आले, आणि माझा शोध करूं लागले, इतक्यांत एक गोणता त्यांच्या दृष्टीस पडला !"

"काय! गोणता ? तो कसला!" **वसुभद्राचार्य** आश्चर्यानें विचारितो.

हयदक्ष उत्तर करितो:—"काय तो जिन्नस पहा—शिंचें त्याचें नांव अजून मला पुरतेंसें आठवत नाहीं, पण अगदीं डोळ्यांपुढें आहे!— हो—काय पहा—भाचोद फिरून विसरलो ! हं—हं—अहो, आपले राजेसाहेब त्या **दीक्षितदत्ता**नें बरे केले, त्यावेळीं या **चिनई**-वाल्यानें राजवाड्यापुढें नवीनच जाळला तो काय जिन्नस पहा--हो—आठवलें, त्याला दारूकामच लटलें होतें नाहीं! तो जिन्नस त्या चिनईवाल्याकडून आमच्या यजमान साहेबांनीं विकत घेतला होता, आणखी तोच त्या चोरांच्या दृष्टीस पडला !"

"हं हं?" **शिलादित्य** मध्येंच म्हणतो.

हयदक्ष पुढें सांगतो:—"पुढें काय झालें ऐका. जेव्हां त्यांना तो गोणता सांपडला, तेव्हां त्या कोतवालानें तो पारखून पाहून म्हटलें, 'ही खाशी गोष्ट झाली ! जरकरितां तो थेरडा आपल्याला कोठें न सापडेल, तर अपण त्याला या जुन्या वाड्यासकट एकदमच उडवून देऊं म्हणजे कामच झालें ! स्वारी आयतीच मरते आहे !' इतक्यांत पहा त्यांना कोणीं सांगितलें, कीं मी तबेल्यांत दडून राहिलों आहे म्हणून, तेव्हां ते सर्वजण तसेच निघून तेथून तिकडे गेले. तिथें मी कांहीं सांपडलों नाहीं, तेव्हां तेवढ्या रागानें मला वाटतें त्यांनीं ही घराला आग लावण्याची मसलत काढिली ! "

"हेंच खचित." **वसुभद्राचार्य** बोलतो:—"आणि याबद्दल त्यांना चागलेंच प्रायश्चित मिळेल. कांहीं चिंता नाहीं. मी आतां जातों, आणि दिवाणसाहेबांच्या कानावर ही गोष्ट घालतों !"

"त्यांत कांहीं अर्थ नाहीं." **हयदक्ष** कुरकुरत बोलतो:—"कोतवालाचें आणि दिवाणसाहेबांचें सूत आहे म्हणून सगळा गांव त्यांच्या नावानें खडे फोडतो आहे ! आणखी तशांतून आम्हीं पडलो **जैन**, आमचा पालनकर्ता आजकाल **हिंदु**राज्यांत आहे कोण ?"

इतक्यांत आपणास कांहीं नवीनच कल्पना सुचल्याच्या तऱ्हेनें **शिलादित्य** त्यास विचारितो:—"तुम्हीं म्हणतां तो दारूचा गोणता कोठें आहे ?"

"ते चोर ज्या वेळेस भुयारांतून निघून गेले त्या वेळेस त्यांनीं तो आपणांबरोबर नेला."

ते शब्द ऐकतांच शिलादित्याची मुद्रा कांहींशी व्यग्र झाली, व तो क्रोधानें बोलला :—"आः दुष्टानो! तुम्हीं आग पेटविली आहे, पण संभाळा ही तुमच्या रक्तानेंच विझेल! एरवीं विझणार नाहीं!—अगो; तुम्हीं दोघेही माझ्या मागून या. मला दोघांचीही कदाचित् जरूर लागेल."

इतकें बोलून तो तेथून तडक निघाला आणि थोरल्या इमारतीच्या कोपऱ्याला वळसा घालून जळत्या इमारतीच्या समोर आला. ही जळती इमारत आणि थोरली इमारत यांच्या मध्यें एका मोठ्या चौकाचें अंतर असून, शिवाय ज्या ज्वाळा निघत व ठिणग्या उडत त्यांची गति वारा उलट दिशेनें वाहत असल्या कारणानें भलतीकडेच होती यामुळें, जर चांगल्या प्रकारचा प्रयत्न केला, तर थोरली इमारत अजीबात बचावली जाण्याचा संभव होता. असें होतें तरी आगीसमोर जमलेल्या प्रेक्षकाचा इरादा संपूर्ण इमारत जाळून टाकण्याचा दिसत होता हें पाहून, तबेल्यात जे घोडे होते ते तेथून जिनांसुद्धां काढून मधल्या मैदानांत अगदीं एका अंगास नेऊन झाडांशीं बांधिले होते त्यांजकडे पहा म्हणून **शिलादित्यानें वसुभद्राचार्य** व **हयदक्ष** यांस खुणेनें सुचविलें. ती खूण समजून त्या तरुण व्यापाऱ्यानें **हयदक्षास** अमुक अमुक करावयाचें म्हणून सांगून आपण अगदीं जवळच्या घोड्यावर उडी मारून बसला, आणि दुसऱ्या दोन घोड्यांचे लगाम हातांत धरून त्यांजसुद्धां घोडे भरधांव फेंकिले. हें पाहून **हयदक्षानेही** त्याप्रमाणेंच केलें, व सरतेशेवटीं जाग्यावर काय तो एकच घोडा राहिला. तिकडे आगीचा भडका अधिकाधिक जोरावत असल्यामुळें गर्दी अतिशयच होऊन गलबलाही अतिशयच झाला होता, यामुळें आतां झालेला हा प्रकार कोणाच्याही लक्षांत आला नाहीं.

इकडे **शिलादित्य** सावधपणानें जाऊन वाड्याच्या थोरल्या दरवाज्याच्या आड आश्रयानें उभा राहिला, आणि तो दारूचा गोणता कोठें आहे म्हणून पाहूं लागला. कांहीं वेळ पर्यंत त्यास त्याचा कोठेंच मागमूस लागेना. परंतु सरतेशेवटीं तो उभा होता तेथून समोर बाहेरल्या अंगास एक लहानशी पडवी होती त्या पडवींत कोतवालाच्या शिपायांपैकीं एकजण एका लहानशा गोणत्यावर बसलेला त्याच्या नजरेस पडला, व त्यावरोबर **शिलादित्यानें** तोच हा गोणता म्हणून एकदम अनुमान केलें. या आगीच्या संबंधानें जेवढे म्हणून लोक तिजसभोंवती जमले होते, त्या सर्वांचें लक्ष त्या आगीकडेच एकसारखें लागलें होतें, त्याप्रमाणेंच आतां सांगितलेल्या शिपायाचीही स्थिति झाली होती. यामुळें आपणाजवळ एकादा कोणी शत्रु चालून येतो आहे या गोष्टीचें त्यास यत्किंचित्ही भान नव्हतें. **शिलादित्य** ती संधि मनात आणून मुकाट्यानें पाऊल न वाजवितां त्याच्या मागून गेला, आणि आपल्या हातांतील सोडग्याचा एकच प्रहार त्याच्या मानेवर करून त्याला धाडकन खालीं पाडलें, व त्याच्या तोंडून वेदनासूचक किंकाळी बाहेर पडण्याचे पूर्वीच मोठ्या चपळतेनें दुसरा प्रहार करून त्याला तेथेंच ठार केलें. या त्याच्या कृत्याकडे अर्थात्च कोणाचें लक्ष गेलें नाहीं; व **शिलादित्यानें** त्वरा करून तो गोणता तेथून काढून

दुसरीकडे नेला, आणि त्याचें ताड अंमळीं उघडून आंतील जिन्नस वासावरून दारूच आहे अशी आपली खातरी करून घेतली. इतकें झाल्यावर तो आपल्या मनातील उद्देश पार पडण्यास काय उपाय करावा ह्मणून विचार करीत सभोंवती निरखून पाहूं लागला.

भद्रभणीच्या आवारांत ज्या ठिकाणीं तबेले व चाकरांच्या कोठड्या बांधल्या होत्या, त्याच्या खंदकाकडील बाजूस एक बरीच उंच भिंत होती; व तिजवरच, परंतु खऱ्या आगीपासून कांहीं अंतरावर, कोतवाल कांहीं शिपायांसहवर्तमान चढला असून तेथून आग पहात होता, व मध्ये मध्ये खालील लोकांस कांहीं कमजास्ती हुकूम मोठ्यानें ओरडून सांगत होता. त्या भिंतीला लागूनच, परंतु आग लागलेल्या भागाच्या पलीकडल्या अंगास, एक झाड होतें, त्याजजवळ शिलादित्य मोठ्या खबरदारीनें गोणत्यासुद्धां गेला, व वातावेतानें कोणाच्या नजरेस नपडतां तो त्या झाडावरून चढून भिंतीवर झाडाच्या आड संधि केव्हां येते ह्मणून टपत बसला. त्यानंतर थोडक्याच वेळानें त्या कोतवालाचा काळच जणों त्याला ओढूं लागून, कायसेंसे करण्याकरितां तो शिपायांसह वर्तमान त्या जळत्या छप्परावर उतरला. त्या बरोबर शिलादित्य दारूच्या गोणत्यासकट पुढें सरसावला, आणि आपल्या अंगीं जेवढं ह्मणून जोर होता, तेवढा खर्च करून त्यानें तो दारूचा गोणता आगींत जाऊन पडे अशा बेतानें झुगारून दिला, व लागलीच मागल्य अंगास खंदकांत उडी घेतली. तो दारूच गोणता आगींत जाऊन पडल्याबरोबर मग काय विचारावें? एकदम चोंहीकडे धडाडाड प्रचंड आवाज होऊन, धडाधड, पडापड कडाकड, हीच सर्वत्र स्थिति झाली. आवाज झाला तो एवढ्या मोठ्यानें झाला कीं, शिलादित्य पाण्यांत खोल बुडाला असतांही तो तेथें त्याला ऐकूं आला. दारूच्या धडाक्याचा वेग इतका जबर होता कीं, त्याच्या जोरानें कोतवाल व त्याचे शिपाई हे हवेंत उडून जाऊन खंदकाच्या बाहेरल्या अंगास येऊन पडले. आगीचा तमाशा पहात जे लोक आंत उभे होते, त्यापैकीं पुष्कळ लोक प्राणांस मुकले, व बाकीच्यास थोडी बहुत इजा पण इजा झाली. भिंती सर्व हदळून जाऊन कांहीं तर तत्काळ कोसळून पडल्या, व छप्परें व त्यांचे जळते भाग खंदकाच्या अंगास उडून पडले. या योगानें आगीची पुढें वृद्धि होण्याची भीति अर्थातच तात्रडतोब नाहींशी झाली; व खंदकाचें पाणीही सर्व हदळून जाऊन तापून गेलें असतां त्यातून जेव्हां शिलादित्य बाहेर निघाला, तेव्हां तर आग एकूणएक विझून गेली होती ह्मटल्यास चिंता नाहीं. खंदकाच्या पलीकडे कोतवाल व शिपाई उडून पडले होते, त्यांतून कांहींचीं कण्हेणीं चालूच होतीं, तीं ऐकून शिलादित्य त्या अंगास पोंहून गेला, व पुढें जमिनीवर कांहीं वांशांचे तुकडे जळत पडले होते, त्यांतूनच घुसून त्यानें एक जळतें लांकूड आपल्या हातात घेतलें, व आवाजाच्या धोरणानें त्या जागेकडे जाऊं लागला. त्या ठिकाणीं जीं माणसें पडलीं होतीं, त्यांमध्यें दारूच्या योगानें सर्वांग काळें झालेला व हातपाय मोडून पडलेला एक मनुष्य त्यानें कण्हताना पाहिला. तेव्हां हातांत जळतें लांकूड होतें त्याच्या साहाय्यानें त्यानें तो मनुष्य कोतवालच ह्मणून ओळखला. कोतवालाची प्राणा-

आपल्या अब्रूला भिऊन वागत होतों, यामुळें तुझ्यापासून मला होत असलेला जाच मीं सर्व प्रकारीं सोसला; परंतु आज तुझ्यामुळें माझें सर्व जगांत हंसेंच होऊन गेलें आहे, यास्तव इतःपर तुझ्या बोलण्याला मी कदापि भिणार नाहीं! तुझ्या मनांत माझा सूड उगवून घ्यावयाचा असेल, तर तो खुशाल घे. मला त्याची आतां शरम ह्मणून वाळगण्याचें कारण राहिलें नाहीं. चल जा येथून. इतःपर मला तूं आपलें तोंडही दाखवूं नकोस! तुझ्या पोटचीं हीं मला कारटीं झालीं आहेत, यांना आतां आपल्या राखेच्या पोटचीं ह्मणून मी समजतों; व आजपर्यंत यांच्यावर थोडीबहुत ममता करीत होतों, पण ती इतःपर करणार नाहीं! माझी अब्रू गेली, त्याबरोबर तूं आणि तुझीं पोरें हीं सर्व मेलींच असें मी समजतों!'

संभाजीरावांच्या तोंडचे हे शब्द ऐकून **ताराबाई** वाघिणीसारखी चवताळली, व नव-ऱ्यास अचाबचा शिव्या देऊं लागली; परंतु तिचा त्याग करण्याविषयीं नवऱ्याचा दृढनिश्चय झाला होता, यामुळें त्या शिव्यांचा कांहीं उपयोग झाला नाहीं. मात्र एवढेंच झालें कीं, झाला प्रकार यांत सर्वस्वीं दोष आपल्या बायकोचा आहे अशी **संभाजीरावांची** समजूत होती, व पोरें बिचारीं गरीब—त्यांची आई एक बाईट असली तरी त्याबद्दल त्यांना कांहीं दोष लाविता येत नाहीं हें ते समजत होते, याकरितां त्यांनीं पोरांकरितां ह्मणून **ताराबाई**च्या अंगावर असलेल्या दागिन्यापैकीं अर्धे दागिने तिला द्यावयाचे कबूल केले; व जरी **ताराबाई** मोठ्यानें आक्रोश करूं लागून भुईवर डोकेंही फोडून घेत होती, तरी त्यांनीं त्याकडे बिलकुल लक्ष न देतां जबरदस्तीनें तिच्या अंगावरील अर्धे अलंकार हिसकावून घेतले; व त्याच क्षणीं चाकरांकडून गाड्या करवून आणून **ताराबाई**ची पोरासहित रवानगी करून दिली. या अखेरच्या प्रसंगीं **ताराबाई**नें आपणाकडून पुष्कळ ओढाताण केली, व एक दोन वेळ तर तिनें नवऱ्यास उभ्यांउभ्यांच भिंतीवर ढकलून दिलें; तथापि पुरुषाची जात एक वेळ पेटली ह्मणजे तिजपुढें बायकांचा उपाय कुठला चालायला? असो; एकंदरींत त्यावेळीं घरांत अतिशय गलबला व आरडाओरड होऊन अखेर तिचा परिणाम **ताराबाईस** घराबाहेर ढकलून घालून गाडींत तिला कोंदून बसविण्यापर्यंत झाला. असो.

इतका वेळपर्यंत वर्णिलेला प्रकार घडून येत असतां त्या ठिकाणीं **जयवंतराव** व मी अशीं दोघेंहीजणें होतों, हें मागें सांगितलेंच आहे. आह्मीं त्या ठिकाणीं असतां हा होत असलेला प्रकार पाहून उभयतांच्याही वृत्ति कांहीं चमत्कारिक झाल्या होत्या; व उभयतांपैकीं जरी कोणीही आपलें मनोगत स्पष्ट शब्दांनीं बोलून दाखविलें नाहीं, तरी उभयतांसहीं या प्रकारापासून बरें वाटलें, व अत्यंत दुःखही झालें. **ताराबाई** ही वाईट चालीची असल्यामुळें तिच्या कृत्याबद्दल तिला योग्यच शासन झालें हें पाहून एकपरी आनंदच झाला; परंतु दुसऱ्यापरी **संभाजीरावांसारख्या** संभावित व गरीब वृत्तीच्या मनुष्याच्या संसाराची अशा अनन्वित प्रकारें वाताहत झाली, व तशांत त्यांच्या अब्रूसही धक्का पोंचला, ही गोष्ट त्यांस आमरणांत दुःख वाटविण्यासारखी झाली हें पाहून आह्मांस अत्यंत खेद वाटला. तथापि होत असलेला प्रकार न्याय्यच असल्या-

मुळें कोणाच्यानेंच एक शब्दही बोलवला नाहीं. ताराबाईला घरांतून घालवून दिल्यानंतर संभाजीराव परत ओटीवर येऊन आपल्या जागीं बसले; व कांहीं वेळपर्यंत ते जिवंत आहेत किंवा नाहींत याचीच भ्रांति अशाप्रकारची त्यांची स्थिति झाली होती. बऱ्याच वेळानें ते शुद्धीवर आले, व आगदीं अंतऱ्याच्या अतिशय खोल भागांतूनच जणों कांहीं ओढून काढिलेला अशा प्रकारचा त्यांनीं दीर्घ उसासा टाकिला, व मुकाट्यानें खालीं मान घालून बसले. या स्थितींत ते असतां बराच वेळ लोटला तेव्हां ते कांहींसे शुद्धीवर आले; व जवळ आलीं दोघें होतीं त्या आलांकडे भ्रांतिवट मुद्रेनें पाहूं लागले. पाहतां पाहतां कांहीं नेळानें त्यांना माझी ओळख पटल्यासारखी होऊन त्यांच्या नेत्रांतून घळकरून अश्रु वाहूं लागले, व त्या वेळच्या दुःखावेशांतच ते मला बोलले :—" कोण मुली ! मथुराच ना तूं ?—होय होय. मीं तुला पक्कें ओळखिलें ! मथुरा तीं तूंच ! मथुरे ! आज माझ्या कुटुंबाचा कसा सर्वस्वीं घात झाला, हें तूं अजून लहान आहेस, तरी तुला सांगितलेंच पाहिजे असें नाहीं. तूं चांगली समजुतदार आहेस, व तूं माझ्या घरीं रहावयास आल्यापासून तुझा चांगुलपणा पाहून तुझ्याकडे माझें जितकें मन ओढवत होतें तितकें दुसऱ्या कोणत्याही चाकराकडे ओढवलें नाहीं. आजपर्यंत त्या कृत्येपुढें माझे हातच टेकल्यासारखे झाले होते, त्यामुळें तिजपासून तुझ्या जिवाला अनिवार त्रास पोंचत असतांही माझ्यानें त्याचें निवारण झालें नाहीं, ही गोष्ट आठवली म्हणजे चित्तास अत्यंत खेद होतो ! तसेंच तुझ्या ताब्यांत तीं मुलें असतांना त्यांचा तुला अतिशयच जाच होत असे, तरी देखील तूं त्यांना कंटाळली नाहींस, व रात्रंदिवस जागून तूं आपणाकडून त्यांची उत्तम शुश्रूषा ठेवीत असस, ही गोष्ट मी पक्की जाणून आहें. याकरितां इतर चाकरांस जसें मीं त्यांचे नुसते पगार देऊन वाटेस लाविलें, तसें माझ्यानें तुला लावणें नाहीं. माझ्या सर्व संसाराचा विध्वंस झाला, आतां मला या जगांत राहून कोणत्याही प्रकारचें सुख होण्याची आशा राहिली नाहीं, याकरितां मीं काशीयात्रेस जाऊन तेथेंच महाप्रायश्चित घेण्याचा निश्चय केला आहे. याकरितां तुझ्या पगाराशिवाय हें कांहीं अल्प बक्षीस मी तुला स्वसंतोषानें देतों एवढें घे."

इतकें बोलून त्यांनीं मला देण्याकरितां पिशवींतून सुमारें पन्नास रुपये बाहेर काढिले. परंतु माझा पगार फार फार तर दहा बारा रुपयेपर्यंत फिरत होता, यामुळें माझ्यानें त्यांनीं देऊंकेलेली रक्कम घेववली नाहीं. आतां हें खरें आहे कीं ही रक्कम मी स्वसंतोषानें देत आहें असें संभाजीराव बोलले होते, परंतु ज्यांच्या कुटुंबाची अशा अनन्वित प्रकारें वाताहत झाली, त्यांना स्वसंतोष तो खरोखरी कोठून प्राप्त होणार ? व अशांच्या हातून यथेच्छ द्रव्य घेण्यास केवळ याचकवृत्ति भटांशिवाय दुसऱ्या कोणाचें मन तयार होणार ? हा विचार मनांत येऊन मी त्यांस त्याप्रमाणें सांगितलें. मी आणखी इतकेही बोलले:—" धनीसाहेब ! आपली स्थिति अशी झालेली पाहून आपल्याच अन्नावर वाढलेल्या माझ्यासारख्यांनीं आपल्या स्वतःच्या पगारावरही दृष्टि ठेवूं नये; परंतु तसें जर करावें, तर उद्यांच लोकांच्या दारीं भीक मागण्याची पाळी येणार

एवढ्याकरितां आपण मला नुसता पगार दिला तरी देखील मला पुरे आहे !"

माइया तोंडचे हे शब्द ऐकून **संभाजी-रावांचें** अंतःकरण अधिकच कळकळलें, व ते नेत्रांत अश्रु आणून मला बोलले:—"मी तुला आजपर्यंत चागली मुलगी ह्मणून तर समजत होतोंच, परंतु तुझ्या अंगीं एवढें औदार्य आहे अंसें मला कधीं स्वप्नींही वाटलें नव्हतें! खरोखरी हा तुझा सद्गुण पाहून प्रत्यक्ष पोटच्या मुलांपेक्षांही तुजवर माझें अधिक प्रेम बसतआहे; व एवढ्याकरितां तुला निरंतर आपल्या जवळच बाळगावें असेंही माझ्या बुद्धीस वाटत आहे. तरी पण उपयोग काय? माझी स्थिति-तर अशी झाली आहे; व तूं अद्यापि तरुण आहेस, तुझें अद्यापि लग्न व्हावयाचें आहे, व पुढें संसार थाटून मुलाबाळांचें सौख्य तुला मिळवावयाचें आहे. याकरितां तुला आपल्या जवळ बाळगणें मला योग्य नव्हे. तथापि तूं आजपासून मजपासून निराळी राहूं लागणार, याकरितां इतर कोणत्याही हेतूनें नव्हे, तरी केवळ माझें स्मरण रहाण्याकरितां तूं हे पैसे घेण्यास नाहीं ह्मणूं नको."

संभाजीरावांचें हें शेवटचें भाषण ऐकून माझा नाइलाज झाल्यासारखा झाला; तथापि एका अर्थीं त्यांनीं देऊं केलेले पैसे घेण्याविषयीं माझें मन होईना, आणि दुसऱ्या अर्थीं त्या मायाळू **संभाजीरावांचा** मनोभंग करून त्यांचें दुःख दुणावावें हेंही मला योग्य वाटेना. अशा बुचकळ्यांत मी पडलें असतां ती स्थिति **संभाजीरावांच्या** लक्षात आली, व ते मला ह्मणाले:—"मथु! तुला माइया गळ्याची शपथ आहे, तुला मजकरितां हे पैसे घेतलेच पाहिजेत!" असें बोलून त्यांनीं तितक्या रुपयांची पुरचुंडी माझ्या हातांत जुलुमानें दिली.

हा इतका प्रकार होत असतां माझ्या नेत्रांतून एकसारखे अश्रु वहात होते, व तिकडे **जयवंतरावांचीही** त्याचप्रमाणें स्थिति झाली होती. इतका वेळपर्यंत त्यांच्या तोंडून एक अक्षरही निघालें नव्हतें. ते आतां **संभाजी-रावांच्या** चित्ताचें समाधान करूं लागले. बराच वेळ पर्यंत बोलणें चालल्यावर **संभाजी-राव** कांहींसे स्थितीवर आले; व त्यांनीं "उद्यां सकाळीं कांहीं मी या **पांचवडांत** पुनः आपलें तोंड दाखविण्यास रहावयाचा नाहीं." ह्मणून साफ आपला निश्चय कळविला.

ही इतकी हकीकत होस्तोंपर्यंत जवळ जवळ तिसरा प्रहर होत आला. इतका वेळपर्यंत आह्मां तिघांच्या पोटांत अन्न कसें तें गेलें नव्हतें, तरी त्या दुःखकारक प्रसंगाच्या भरांत असतां भूक कोणासही भासली नाहीं. मेजवानीकरितां पक्कान्नें केलीं होतीं, त्यांतून **ताराबाईनें** व मुलांनीं तीं तयार होत असतांच यथेच्छ खाऊन टाकलीं होतीं; यामुळें भर उन्हाचे वेळीं जरी त्यांची रवानगी केली, तरी तिचा व मुलांचा आंतून तळीराम गारच होता. बाकीच्या चाकरमाणसांचे पगार वांटले, त्यावेळीं त्यांनीं मुकाट्यानें ते घेतले, व लगेच स्वैपाकघरांत जाऊन त्यांनीं आपलीं पोटेंही थंडगार करून घेऊन ते निघून गेले होते. या धांदलींत घरच्या सामानसुमानाला किती वाटा फुटल्या असतील त्याचा अजमास एक देवाला ठाऊक कीं सामान नेणाऱ्यांना ठाऊक! असो; **संभाजीरावांचा** आत्मा अगदीं विरक्त होऊन गेला असल्यामुळें त्यानीं त्याचीं इतकी सुद्धां पंचाईत केली नाहीं. घरांत इतके गोड जिन्नस शिल्लक होते, परंतु त्यांतील एकासही

त्यांनी कसें तें बोट लाविलें नाहीं. दोन चार घांस पोटांत गेले असतील नसतील, इतक्यांतच ते पोट भरलें म्हणून सांगून उठले, त्यांचें जेवण असें झालें, तेव्हां इतरांस तरी भूक कोठून वाटणार? असो; जेमतेम जेवणें झाल्यावर **संभाजीराव** आपल्या वरच्या दिवाणखान्यांत जाऊन निजले; **जयवंतरावांनीं** डोकीवर पागोटें ठेवून बागेचा आणि शेताचा मार्ग धरिला; व मीही उष्टीं काढणें आटपल्यावर आपल्या खोलीकडे गेलें. **जयवंतराव** बाहेर पडले त्यावेळीं त्यांनीं एकवेळ मागें मजकडे वळून पाहिलें; व नेत्रसंकेतानें आपण बागेंत आदल्या दिवशीं नेमिलेल्या ठिकाणीं जात आहों म्हणून सुचविलें; परंतु त्यावेळीं माझें अंत:करण कांहींसें जाग्यावर नव्हतें, यामुळें जरी त्यांचा नेत्रसंकेत मला समजला, तरी माझ्यानें त्यांस परत नेत्रसंकेतानें होय अगर नाहीं कांहींच सुचवलें नाहीं. असो; आतां सांगितल्याप्रमाणें मी वर आपल्या खोलींत गेलें; परंतु तेथें काय मला सर्वच शून्याकार दिसूं लागलें. **ताराबाईला** घरांतून घालवून देण्याचे अगोदर तिचीं मुलें नेहमी मजजवळच असत; यामुळें जरी तीं मुलें गुणांनीं वाईट होतीं, तरी त्यांचा मला लळाच लागल्यासारखा झाला होता. यास्तव खोलींत शिरल्यावर तेथें कोठें आरडा ओरडा ऐकूं येईना, यावरून कांहीं वेळ मी त्या घरांत नसून दुसरीकडे कोठें तरी असेन असाच मला भास झाला. मागाहून जसजशी मी याबद्दल अधिकाधिक विचार करूं लागलें, तसतसा **ताराबाईच्या** संबंधानें झालेला तो सर्व प्रकार हळू हळू माझ्या मनांत पुनरपि जागृत झाला; व कांहीं वेळ त्याच भ्रमांत राहिल्यावर **जयवंतरावांनीं** बागेकडे जातांना केलेली ती खूण माझ्या मनांत आली; व त्यायोगानें माझ्या मनाची कांहीं वेळपर्यंत अगदीं विलक्षण स्थिति होऊन गेली. आतां या ठिकाणीं मी जो प्रकार सांगणार आहें, तो ऐकून आमच्यांतलेच कित्येक समंजस लोक मला निर्भिडपणाचा दोष लावतील, व तो त्यांनीं लावावा हें मीही कबूल करितें, तथापि ज्या उद्देशानें मीं ह्या आत्मवृत्तकथनास आरंभ केला आहे, त्या उद्देशाकडे नजर देतां मला तो सर्व प्रकार यथास्थित निवेदन करणें जरूर आहे. **जानराव**नीं एक दोन दिवसांपूर्वीं मला त्रास देण्यास आरंभ केला असतां त्यांतून माझी सुटका **जयवंतरावांनीं** केली; व इतकें असूनही त्यांनीं आपली उच्च पदवी व माझी त्यांच्या मानानें अगदींच कनिष्ठ स्थिति यांकडे बिलकुल लक्ष न देतां उदारपणें मला आपणावरोबरची असेंच मानून मजशीं भाषण केलें होतें; व तशांतूनही त्यांनीं माझें कल्याण व्हावें एतद्विषयीं आपणास वाटत असलेली कळकळ बोलून दाखविली होती; एवढेंच नव्हे, तर त्यांनीं मजवर जो उपकार केला होता, त्याच्या जोरावर त्यांना माझा वृत्तांत विचारण्याचा पूर्ण हक्क असतांही त्यांनीं तो या रीतीनें न बजावितां तो वृतांत निवेदन करणें अगर न करणे हें कांहींसें माझ्या इच्छेवरच ठेविलें होतें, हे सर्व प्रकार माझ्या मनांत येऊन चुकले; व त्यामुळें आदले दिवशीं त्यांशीं झालेला संकेत पाळावा असा माझ्या मनाचा कल होऊं लागला. शिवाय माझ्या मनांत आणखीही असें आलें कीं, ज्या गृहस्थानें आपल्यावर निरिच्छपणें एवढा महान् उपकार केला, त्यानेंच जर नुसता माझा वृत्तांत ऐकण्याची इच्छा व्यक्त केली, तर त्याच्या इच्छेस तेवढ्यापुरता मान न देणें म्हणजे कांहींसें

कृतघ्नपणाचेंच काम होईल. तेव्हां या दोन गोष्टी, व शिवाय तिसरी गोष्ट ही कीं, जयवंतराव हे सुरेख, देखणे व संभावित तरुण गृहस्थ असूनही त्यांस आपणाबद्दल डौल कसा तो मुळींच वाटत नसे, या तीन गोष्टी मनांत येऊन त्यांच्याशीं झालेला भेटीचा संकेत पाळावा अशी माझ्या मनाची प्रवृत्ति झाली असल्यास तीबद्दल कोणासही आश्चर्य वाटण्याचें कारण आहे असें मला वाटत नाहीं.

परंतु हा फक्त एकपक्षी विचार झाला. दुसऱ्या पक्षीं विचार करितां माझ्या मनास हा झालेला संकेत पाळणें योग्य नाहीं असेंच वाटूं लागलें. असें वाटण्याचीं कारणें अनेक आहेत. एक तर जयवंतरावांनीं जें उदार वर्तन केलें, तसें वर्तन इतर कोणीही गृहस्थ, ज्याच्या अंगीं सद्गुण आणि विचारी बुद्धि यांचा लेशही वसत असेल, अशानें माझी ती अवस्था पाहिली असती, तरी त्यानें केलेंच असतें; व याकरितां माझ्या शक्तीप्रमाणें मी त्यांचे उपकार मानावे एवढींच कायती त्या उपकारांची फेड माझ्या हातून होण्याजोगी असून ती मीं केलीही होती. दुसरें असें कीं, त्यांची उच्च पदवी व मजसारखीची कनिष्ठ गरीबीची स्थिति, या दोहोंकडे लक्ष देतां त्यांशीं व मजशीं स्नेह जुळावा ही गोष्ट मनांत आणणें म्हणजेच मूळ वेडेपणाची गोष्ट होती. तिसरें कारण हें कीं, जयवंतराव तरुण असून त्यांचें लग्नही झालें असेल नसेल, अशी त्यांची स्थिति असल्यामुळें त्यांच्या स्वतःच्यानें मला मोलकरणीपेक्षां अधिक योग्यतेची जागा कोठें तरी देतां यावी ही गोष्ट मुळीं मनांत देखील आणावयास नको होती. व यांशिवाय चौथें कारण हें कीं, ते स्वतः चांगले, सुरूप व देखणे असल्यामुळें त्याशा तो संकेत पाळणें हेंच मुळीं योग्य नव्हतें. असो; आतां सांगितल्याप्रमाणें हे विचार—अथवा यांना पाहिजे तर उलट विचार म्हणा—ते मनांत येऊन पूर्वी तो संकेत पाळावा अशी माझ्या मनाची प्रवृत्ति झाली होती याबद्दल माझा मलाच राग आला; व मी वेडी इतका वेळ उगीच गोंधळांत पडलें म्हणून माझें मलाच आश्चर्यही वाटलें. व सरतेशेवटीं तो संकेत पाळावयाचा नाहीं, व फार तर काय, जयवंतरावांची वस्ती त्या ठिकाणीं असेपर्यंत बागेंत किंवा शेतांत पाऊलही टाकावयाचें नाहीं, असा माझ्या मनानें निश्चय केला.

हां अशा प्रकारचा निश्चय झाला यामुळें माझ्या मनाचें एका अर्थानें समाधान झालें; परंतु दुसऱ्या अर्थानें हे समाधान करून घेणें मला ज्या कारणामुळें भाग पडलें, तें कारण मनांत येऊन मला वाईट वाटल्यावांचून राहिलें नाही. एवढ्यावरून म्हणजे मीं केलेला निश्चयच मला अयोग्य वाटला असें कोणींही समजूं नये. परंतु मी गरीब स्थितींत होतें तशी नसून जर घरची साधारण सधन असतें, व तशा स्थितींत मजवर कांहीं प्रसंग गुदरून जयवंतरावांनीं त्यांतून मला मुक्त केलें असतें, तर त्यांचा स्नेह संपादण्यास मला कांहीं हरकत पडली नसती, एवढ्याबद्दलच काय तें मला वाईट वाटलें.

असो; इतका वेळ सांगितल्या प्रकारचा विचार करीत मी आंथरूणावर पडलें असतां माझ्या मनांत कित्ती कित्ती शोरकट गोष्टी येऊन गेल्या, त्या आतां सविस्तर सांगत बसत नाहीं. मात्र एवढेंच सांगतें कीं, मला माझ्या गृहस्थितीच्या संबंधानें जरी दुःख झालें, तरी

माझ्या मनाने एकवार केलेला निश्चय मी अखेरपर्यंत पाळिला.

त्या दिवशीं सायंकाळीं सर्वांचें जेवण मानसिकच झालें. **संभाजीरावांनीं जगदेवरावांस** मुद्दाम बोलावणें पाठविलें होतें, त्याप्रमाणें ते मध्यरात्रीच्या सुमारास येऊन पोंचले; व त्यानंतर **संभाजीरावांचें** व त्यांचें काय बोलणें व्हावयाचें तें होऊन **संभाजीरावांनीं** आपली बहुतेक मालमत्ता त्यांचे स्वाधीन केली; व सकाळचे प्रहरीं सर्वजण आपआपले वाटेनें निघून चालतीं झालीं. मी आपलें गांठोडें गोळा करून बाहेर पडलें, तीं **जयवंतरावांच्या** दृष्टीस पडलेंच नाहीं. व फक्त आपल्या धन्यांचा शेवटचा निरोप घेऊन जी निघालें, ती मागें पुढें न पहातां तडक **लिंबाच्या** वाटेनें चालती झालें.

प्रकरण ९.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें मी **संभाजीरावांचा** निरोप घेऊन **पांचवडाहून** निघालें, ती बसत उठत दोन प्रहराच्या सुमारास **लिंबास** येऊन पोंचलें. आदल्या दिवशीं **संभाजीरावांच्या** घरीं मेजवानीच्या कारणानें पक्कान्नांची अगदीं रेलचेल झाली होती; व त्यांतून चाकर माणसांनीं चोरी वरीच केली होती, तरी मुख्य मेजवानीचा बेतच अजिबात फिसकटून गेल्यामुळें घरात पक्कान्नें बरींच शिलक राहिलीं होतीं; तथापि मी त्या घरांतून निघतांना त्यापैकीं एवढ्याशा देखील जिनसाला मजपानें कसा तो हात लावला नाहीं. वाटेंत दहा बारा घटका दिवस येण्याच्या सुमारास मला किंचित् भूक वाटूं लागली; व आदले दिवशीं दिवसाचें देखील साधारण जेवणाचें मानसिकच झालें होतें, यामुळें माझ्यानें कांहीं तरी दोन घांस पोटांत मेल्याशिवाय पुढें चालवेचना अशी स्थिति झाली. इतक्यांत समोरून एक कुळंबी डोकीवर एक उंसांचा भारा व कांहीं ओला हरभरा घेऊन येत होता; त्याजपासून मीं एक ऊंस व एक हुरभऱ्याची पेंढी विकत घेतली; व तेवढी सर्व खाऊन जवळच्या एका ओढ्यात जरासें पाणी प्यालें, त्यामुळें मला अंमळशी हुशारी आल्यावर त्याच ओढ्यावर मीं अंग धुतलें; व साडीचोळी वाळल्यावर फिरून मार्ग क्रमूं लागलें. कांहीं वेळानें वर सांगितल्याप्रमाणें **लिंबास** येऊन पोंचलें; व लागलीच **उमाबाईच्या** घरीं माझ्या धाकट्या बहिणी यमुना व जनी होत्या त्या ठिकाणीं गेलें. वास्तविक लटलें म्हणजे फारां दिवसांनीं माझी आणि माझ्या बहिणींची गांठ पडली होती. यामुळें त्या ठिकाणीं पोंचल्यावर मला अतिशय आनंद व्हावा; परंतु मी त्या ठिकाणीं गेलें असतां **यमुनेने** प्रथमतः मजकडे सरासरी पाहिलें न पाहिलेसेंच केलें, त्यामुळें अगदीं काहीं नाहीं लटलें तरी माझा आनंदाचा विरस झाला. परंतु इतक्यांत जनी हंसत मुख करून एकदम मला भेटण्याकरितां पुढें धांवत आली, व माझ्या कंबरेला घट्ट मिठी मारली तेवढ्यानें मी तो विरस विसरून गेलें. उभयतांच्याही नेत्रांतून प्रेमाश्रु वाहूं लागले, व उभयतांनींही एकीमेकींस दृढ आलिंगन दिलें. हा प्रकार पाहून मग उलटें प्रेम आणिल्यासारखें करून **यमुना** मजजवळ आली; तरी पण मीं तिला मिठी मारीपर्यंत कांहीं तिने मला मिठी मारली नाहीं. अशा स्थितींत आम्हीं एकीमेकींशीं बोलूं लागलों, त्यांत ज-

नींचें भाषण मात्र खरोखरी अंतःकरणपूर्वक च प्रेमळ असें होतें, बाकी यमुनेचें. भाषण मुद्दाम ओढून चंद्रबळ आणावें अशांतलेंच होतें, हें पाहून मला फार आश्चर्य वाटलें.

कांहीं वेळपर्यंत मला आपल्या बहिणींकडे निरखून पहाण्यास सांपडलें नाहीं; परंतु तें सांपडलें त्यावेळीं त्या दोघीजणीही पूर्वापेक्षां शरीरप्रकृतीनें पुष्कळच चांगल्या झालेल्या दिसल्या. यमुनेची चण मूळचीच उंचांतली असून

हरिश्चंद्र नाटक. दिसली. जनी

अद्भुतठकवाजी जरी मोठा झाली होती. तरी लहानपणचा तो तिच्या अंगाचा चाटोळेपणा व ठेंगुसपणा हीं दोन्हीं पहिल्याप्रमाणेंच कायम होतीं. त्या वेळीं दोघींचीं वयें अदमासें ११ व ९ वर्षांचीं असून दोघींचे पोशाखही मध्यम श्रीमंतीच्या धाटणीचे होते. ह्मणजे यमुनेची साडी चोळी साधारण मोलकरणींच्या लुगड्या चोळीच्या तोलाने पाहूं जातां पुष्कळच अधिक किंमतीची होती. जनीची परकर चोळीहि चांगल्या प्रकारचीच होती, व दोघींच्याही अंगावर खिडूकमिडूक बरेंच होतें. हें पाहून मला एकापरी आनंदच झाला, तरी दुसऱ्यापरी विचार करितां मला फार दुःख वाटलें. याबद्दल त्यांच्या या स्थितिबद्दल मला मत्सरबुद्धीनें तसें वाटलें असें कोणीं समजूं नये. कारण माझ्या बहिणींची ही भरभराटीची स्थिति कोणच्याही उपायानें कायमची रहाण्यासारखी असती, तर ती तशी होण्याकरितां मी प्रत्यक्ष आपले प्राणही त्याप्रीयर्थ खर्च करण्यास मागेपुढें पाहिलें नसतें; परंतु मला इतक्याबद्दलच वाईट वाटलें कीं, जरी माझ्या बहिणींची ही स्थिति त्या दोघी उमाबाईच्या घरीं असत तोपर्यंत कायम राहण्याचा संभव होता, तरी त्या तेथून सुटल्यावर पुढें त्याच थाटानें वागतां येण्याजोगें त्यांना सामर्थ्य येईल किंवा नाहीं याचा भरंवसा कोणीं द्यावा?

असो; वर सांगितल्याप्रमाणें आह्मीं तिघीजणी बोलत असतां त्या ठिकाणीं उमाबाईची स्वारी आली. उमाबाईची पंनाशी उलटून गेली असून ती शरीरानें अतिशय कृश झाली होती, व अंगावर सुरकुत्याही बऱ्याच पडल्या होत्या. तिच्यापाशीं नवऱ्याचे मागें राहिलेली माया बरीच असून तिला मागें कोणाचाही पाश नसल्यामुळें तिचे देवाधर्माकडे व आल्या गेल्यास दानधर्म करण्याकडे बरेंच लक्ष होतें. तथापि तिची स्वभावतः तापट प्रकृति असल्यामुळें ती अमकयाच वेळीं अमुकच रीतीनें वागेल असा कोणास कधींही भरंवसा सांगतां येत नसे. असो; अशी ती उमाबाई आह्मीं ह्मातों त्या ठिकाणीं आली, आणि मी हल्लीं कोठें असतें काय असतें वगैरे मला कांहीं प्रश्न विचारणें झाल्यावर ती मज उद्देशून बोलली:—"**मथुरे!** तूं मुलगी दृढ मनाची आणि चांगल्या चालीची आहेस; व तूं आजपर्यंत नीट रीतीनें वागलीस तशीच पुढेंही वागशील, तर त्यापासून तुझें खचित कल्याण होईल. तुझें व्यातां वयही बरेंच झालें आहे, व आणखी वर्ष सहा महिन्यात एकदा कोठें तरी सुस्थळीं पडलीस ह्मणजे गंगेंत घोडे न्हाले. मग तुला कोणाच्या दाराशीं जाण्याची गरज पडणार नाहीं. आतां तुझ्या या दोघी बहिणी मजपाशीं आहेत, यांचें मी आपणाकडून होईल तितकें कल्याण करण्यास कधीं चुकणार नाहीं, व या दोघींवरही माझें प्रेम आहे. आतां **यमुना** अंमळ डौली व हेकेखोर आहे, व या आमच्या **जनाबाई** तर

अगदींच अल्लड व खेळाडू आहेत, तरी कांहीं चिंता नाहीं. यांचें वय अंमळ अधिक झालें, ह्मणजे त्यांचें त्यांनाच कसें नीट वागावें हें आपोआप कळूं लागेल, याकरितां तुला यांच्याबद्दल कांहीं काळजी करणें नको. माझ्या मनांत यांचें बरें करावयाचें आहे, तें मी आपल्या इच्छेप्रमाणें वाटेल तेव्हां आणि वाटेल तसें करीन, त्याबद्दल दुसऱ्या कोणाचा एक चकार शब्दही मी ऐकणार नाहीं, समजलीस ? तसेंच त्यांना कोणाशीं किती बोलावें, कसें वागावें हें माझें मी शिकवीन; याकरितां तूं आतां गेलीस, आणखी जर तुझा बेथेंच कोठें आसपास कोणाचे घरीं चाकरीस रहायचा बेत जुळला, तर तूं दोन तीन महिन्यांनीं एकदा पाहिजे तर यांना भेटायला येत जा, परंतु जास्ती वेळ येशील तर कदाचित् तुझ्या संगतीनें माझी रीत या विसरतील. थोडया दिवसांपूर्वी तुझा धाकटा भाऊ कृष्णा इथें आला होता त्यालाही मीं असेंच समजावून सांगितलें आहे; मात्र तुझा थोरला भाऊ गोविंदा इथें यांना भेटायला एक दोनदा आला होता, त्याला फिरून माझ्या घरीं तूं येत जाऊं नकोस ह्मणून भीं बजावून सांगितलें आहे !"

उमाबाईच्या तोंडचे हे शेवटचे शब्द ऐकतांच माझ्या अंतःकरणाचा एकदम थरकांप झाला, व माझ्या मनांत एका भलत्याच गोष्टीची आठवण होऊन मला अतिशय दुःख झालें; व मीं तिला विचारलें:—" काय ? कसें ह्मटलेंत तुह्मीं ? माझ्या भावाच्या हातून एकादी वाईटबिईट गोष्ट तर नाहींना कांहीं झाली ? "

हें ऐकून उमाबाई बोलते:—"हें बघ, मी तुझ्या भावानें अमुक गोष्ट केली, तमुक गोष्ट केली, असें कांहींच ह्मणत नाहीं; पण त्याला आलीकडे संगति वाईट लागली आहे, आणखी त्याच्यानें धड आपलें पोटही भरणें होत नाहीं. शिवाय कांहीं थोड्या दिवसांपूर्वी तो इथें आला होता, तेव्हां माझा तुळशीला पाणी घालायचा रुप्याचा पेला एकदम कोणीकडे कसा तो नाहींसा झाला, त्याचा अजूनपर्यंत पत्ता नाहीं !"

तिच्या तोंडचे हे शब्द ऐकून मला एकदम रडूं कोसळलें, व मीं तिला ह्मटलें:—" काय ह्मणतां उमाबाई ! [redacted] लाडक्या या दोघीं मुलींचा—[redacted] चोर निघाला आहे ?"

माझे शब्द ऐकून त्या वृद्ध बाईनें मला शांतपणें (ह्मणजे तो शांतपणा इतका कीं, तेवढ्याच्या योगानेंच मनुष्यानें उतावीळ होऊन अगदीं वेड्यासारखेंच होऊन जावें) उत्तर केलें:—" अग, तसेंच केवळ नसेल, मीं तरी तुझ्याच भावाला कांहीं चोर ह्मटलें नाहीं. पण आपलें एवढेंच, त्यानें मिळून कांहीं फिरून माझ्या घरीं येतां उपयोगीं नाहीं. पण हें पहा—तें कांहीं असो—तो चोर असो कीं नसो—त्याच्यामुळें तुझ्या या बहिणींबद्दलचें माझें मन कांहीं फिरायाचें नाहीं; आणखी या दोघी जोंपर्यंत मजपाशीं चांगल्या रीतीनें वागत जातील, तोंपर्यंत मी त्यांच्या घरचीं कोणीही माणसें असोत, त्यांच्या गुणांबद्दल यांना दोष देईन असें कधीं घडायचें नाहीं. "

ती तरुणवाईक बाई इतके शब्द बोलली, व जणों कांहीं मी येथें इतका वेळ राहिलें हेंच तिला आवडलें नाहीं अशा तऱ्हेनें तिनें एकवेळ मजकडे टेंवकारून पाहिलें, आणि लागलीच जास्ती एक शब्दही तोंडांतून न काढितां घरांत चालती झाली. तेव्हां अर्थात्

जाहिराती.

विक्रीस तयार (नाट्यकथार्णव आफिसांत.)

	किंमत रु.	आ.	ट.इं. आ.
नाट्यकथार्णव, वर्ष १ अंक १, २, ३; एकत्र केलेले. (द्वितीयावृत्ति).	१	२	१॥
डाक्तर व वैद्य प्रहसन (अलाहिदा पातळ कागदावर छापिलेलें फारच स्वस्त.)....	०	२	॥
मौजेच्या चार घटका भाग १. (कालिदासकृत अभिज्ञानशाकुंतल नाटक.	१	८	२
लघुलेखनपद्धति (अथवा अक्षरेनें मराठी भाषेंत लिहिण्याची युक्ति.)	०	१२	१
नलदमयंती नाटक (रा. सोकर बापुजी त्रिलोकेकरकृत.)	१	४	२
हरिश्चंद्र नाटक. (,,)	०	८	१
अद्भुतठकवाजी	०	१२	॥
बोधरत्नावली भाग १	०	६	॥
हुन्नरसंग्रह भाग २	०	६	॥
श्री अक्कलकोटस्थ स्वामी महाराजांचें चरित्र, भाग १ ला. (महाराजांची साधारण स्थिति आणि त्यांजविषयीं लोकांचे अभिप्राय.	०	८	॥
कित्ता भाग २ रा. (महाराजांनीं दाखविलेले अद्भुत चमत्कार.	०	८	॥
उदार दामोदर नाटक	१	४	१
अश्वघाटीप्रबोधिका	०	२॥	॥

—o—

विक्रीस तयार.

मौजेच्या चार घटका भाग १. कालिदासाचें अभिज्ञानशाकुंतल नाटक.

यांत सगळ्या नाटकाचें भाषांतर नवें असून पात्रांची भाषा जशी प्रचारांत बोलतात तशीच घालून छापलेली आहे, व जागोजागीं टीपांसारखे पुस्तककर्त्यानें पदरचे विचार घातलेले आहेत. किं. १॥ रु. ट. २ आणे. पुस्तकें मुंबईंत, **नाट्यकथार्णव** आफिसांत; इंदुप्रकाशांत; विविधज्ञानविस्तार आफिसांत, व गिरगांवांत मालकाचे घरीं; पुण्यांत, तात्यासाहेब राजमाचीकर यांचे घरीं; नाशिकास जयराम भाऊ वकील यांचें घरीं; रत्नागिरीस सत्यशोधक छापखान्यांत; इंदुरास नारायणराव गणपुले यांचे घरीं विकत मिळतील.

महादेव चिमणाजी आपटे बी. ए. एल. एल. बी.

गुंबई हायकोर्टाचे वकील.

NOTICE.

THE undermentioned begs to inform the Public that he will undertake the work of Surveying, &c. &c., at the following rates :—

	Rs.	A.	P.
ORDINARY SURVEYS of Buildings, each. ...	10	0	0
ATTENDANCE in Court	10	0	0

PLAN and SECTION of proposed Building, or of additions to and alterations in the existing Building, prepared in order to obtain sanction from the Executive Engineer, Municipality, to show the stability of the structure, will be charged for at the following rates :—

Each Building with Privies	15	0	0		
,, ,, without Privies.	10	0	0		
SURVEYS of Vacant Grounds at	As.	8	per	100	sq. yards.
,, of Batty Fields ... at	,,	10	,,	100	,,
,, of Oarts ... ... at	,,	12	,,	100	,,
,, of Gardens.. ... at	,,	14	,,	100	,,
,, of Hilly Grounds. at	Re.	1	,,	100	,,

SURVEYS of Large Estates; PLANS, ELEVATIONS and SECTIONS of Buildings; DETAIL-DRAWINGS; WORKING-DRAWINGS; ROAD PROJECTS and LEVEL SECTIONS; MODELS OF BUILDINGS and GROUNDS; PLANS Enlarged or reduced; COPIES of Plans will be charged for, according to the nature of work.

Preparation of DESIGNS, ESTIMATES, SPECIFICATIONS, VALUATIONS and SUPERVISION of Works, will be undertaken.

Works entrusted will be executed with great care, promptitude, accuracy, and in the best style.

For further particulars, apply to the undersigned.

M. P. DHURU,
Surveyor and Draughtsman,

No 102, Moogbhat (Dr. Moreshwar's Chawl,)
Bombay.

संग्रह करण्या लायक उपयुक्त पुस्तक.

(अनुभविक औषधी संग्रह माला.)

वैद्य कल्पतरु.

भाग १ ला.

मदन कुतूहल.

अथवा

[तरुणांस अवश्य लागणाऱ्या अनुभविक औषधांचा संग्रह.]

सर्व प्रकारच्या रोगांवर आह्मीं फार दिवस अनुभविलेलीं वनस्पतींचीं रामबाण औषधें लोकोपयोगार्थ प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे. त्याचा **मदनकुतूहल** नामक पहिला भाग येत्या आक्टोबरच्या २ ऱ्या तारिखेस (आश्विन, विजयादशमीच्या दिवशीं) छापून सर्व आश्रयदात्यांस दिला जाईल.

ह्या पहिल्या भागांत हल्लींचे अशक्त, निस्तेज, सदारोगी, व उपदंशजन्य [गरमी] रोगानें पीडिलेले तरुण सशक्त व सर्व रोगांपासून मुक्त होऊन आरोग्यस्थितींत तारुण्यावस्थेंतील सर्व क्रिया सुरळीत रीतीनें चालवितां याव्या, अशाच अनुभविक औषधांचा संग्रह केला आहे.

यांत सर्व प्रकारचे दुर्घट प्रमेह (परमे) व धुपणी, चट्टे, वद, विस्फोटक, गरमीनें हातांपायांचे सांधे धरणें, धातुस्थानची कडकी, पिनस, स्वप्नावस्थेंत वगैरे धातुजाणें, नपुंसकत्व, हस्तदंडी, तारुण्यपीटिका, आगरू, अशक्तता, अतिघाम, शरीराची दुर्गंधी व काळिमा इत्यादिकांवर रामबाण औषधें; व रक्तवृद्धि, वीर्यवृद्धि वृद्धिसंकोच, केशवृद्धि, रक्तशुद्धि, नष्टपुष्प प्राप्ति, मुखसुगंधी, तसेंच स्तंभन, कामोद्दीपन वाजीकरण, धातुपुष्टि इत्यादिकांवर उत्तम प्रयोग आणि शक्ति, आरोग्य, वीर्य, तेज, कामोद्दीपन, मनोत्साह व दिव्यदृष्टि उत्पन्न करणारे पाक, अवलेह, गुटिका, घृतें, सुगंधी तेलें, उटणीं, धारोष्ण, चूर्णें इ. तयार करण्याच्या कृतींचा संग्रह केला आहे. सारांश तारुण्यावस्थेत अवश्य लागणाऱ्या सर्व प्रकारच्या अनुभविक औषधांचा संग्रह केला आहे.

ह्यांत निरनिराळ्या ४० प्रकारावर २०० औषधांचा संग्रह केला आहे. प्रत्येक प्रकारावर पांच पांच औषधांचा संग्रह केला आहे. कोणत्याही प्रकृतीचा मनुष्य असो, त्याला ह्या पांचापैकीं एका तरी औषधापासून गुण पडल्याशिवाय राहणार नाहीं. हीं सर्व औषधें आह्मीं फार दिवस अनुभविलेलीं असून खात्रीपूर्वक गुण करणारीं आहेत. तसेंच ह्यांत लिहिलेलीं सर्व औषधें पाहिजे त्यावेळीं मिळण्यासारखीं असून अल्प श्रमांत थोड्या खर्चानें पाहिजे त्यावेळीं सुलभ रीतीनें तयार करितां येतात.

ह्याची किंमत ५ रु. व पुस्तक गहाळ होऊं नये म्हणून रजिष्टर करणेकरितां वगैरे ८ आणे मिळून ५॥ रुपये खालील पत्त्यावर पाठवावे. त्यांतील औषधांच्या मातब्बरीकडे व अत्यावश्यकतेकडे लक्ष्य दिल्यास ही किंमत कांहींच नाहीं अशी खात्री होईल. ज्यांचा आमचा धंदा चालणार, तींच औषधें प्रसिद्ध करणार म्हणून ह्या पुस्तकास सर्वांकडून आश्रय मिळणें योग्य आहे; याकरितां हें पुस्तक घेणारानीं त्यांतील औषधें स्वतः करावीं,

परंतु त्याच्या कृति किंवा पुस्तक दुसऱ्यांस देऊं नये. असें केल्यास आम्हांस चांगला आश्रय मिळेल, याकरितां हें पुस्तक घेणारांनीं सदरील अट मान्य करून पुस्तकें घ्यावीं.

ह्या पुस्तकांत कोणत्याही प्रकारचा बीभत्स अप्रयोजक व चावट प्रकार मुळींच न-सून फक्त औषधांचाच संग्रह केला आहे. पुस्तकें घेणारांनीं किंमतीचा पैसा मनिआर्डर करून ता० २९ सप्तंबरचे आंत खालील पत्त्यावर पाठवावा. आगाऊ आश्रयदात्यांपुर्त्याच प्रती काढल्या जातील. कांहीं शिल्लक राहिल्यास, दर प्रतीस १० रुपये किंमत घेतली जाईल.

हें पुस्तक वैद्य व इतर सर्व लोकांच्या उपयोगी असल्या कारणानें त्यांस सर्वांनी आपला उदार आश्रय अवश्य द्यावा. वरील मुदतींत पुस्तक छापून अवश्य वाटलें जाईल.

"नाट्यकथार्णव कर्तेयांस," ह्या पत्त्यावर ह्या पुस्तकासंबंधी सर्व व्यवहार ठेवावा. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.

मुंबई ता० १ माहे सप्तंबर सन १८८१ इ.

वैद्य हरीप्रसाद दिल्लीवाले.

DR. LALOR'S PHOSPHODYNE.

नकलेचा हक.] **प्रसिद्ध आश्रयाखालीं.**

प्रकृति दुरुस्ती, शक्ति आणि उत्साह.

डा. लेलार यांचें फास्फोडाइन.

व्यापाराची खूण—फास्फोडाइन.

आर. डी. लेलार एम्. डी. यांनीं सन १८६२ त शोधून काढून हें नांव दिलें. चवेस मधूर. अतिशय श्रमानें बिघडलेला मेंदू, चिंता, काळजी, संताप, फार जागणें, अतिशय काम, मज्जातंतु गलित होणें, मज्जातंतूंचें दुखणें, क्षयकारक रोग, खोंकला, क्षय, उदर आणि यकृताचे विकार, कमी झालेलें अन्नपोषण, रक्त कमी होणें, जीवनकळा वाजवी काळापूर्वीच त्यागें, आणि जीवनकळेच्या कमती होण्यावर अवलंबून असणारे शरीरांतील सर्व प्रकारचे रोग, यांवर अपाय न करणारें, तावडतोबीचें आणि विश्वसनीय असें फास्फरसाच्या मिश्रणानें केलेलें असें हेंच एक औषध.

डा. लेलार यांचें फास्फोडाइन.

हें रक्त शुद्धकरून वाढवितें; कातडी साफ करितें; मज्जातंतु व स्नायु यांस पूर्णपणें शक्तिमंत करितें; आयुष्याच्या गळू पाहणाऱ्या कार्यांस संपून गेलेलें असें फास्फरसाचें तत्व नव्यानें देऊन पुनरपि सामर्थ्य देतें; व या योगानें मज्जातंतूच्या संपून गेलेल्या वैद्युत शक्तीस उत्साह आणि नवें जीवित्व देऊन कोणत्याही कारणानें उत्पन्न झालेले, मज्जातंतूंची अशक्तता, पक्षघात, भितरें मन, आणि काळजाचे रोग हे कोणत्याही जातीचे असले तरी त्यांस तावडतोब बरें करितें.

डा. लेलार यांचें फास्फोडाइन.—याचा उपयोग केला असतां अशक्तपणें मोडलेलीं कोणतीही इंद्रियें पूर्ववत् बळकट होऊन आपआपलीं कार्यें करूं लागतात. मज्जा-

तंतूंची अथवा शरीराची अशक्तता, किंवा ह्या क्लेशकारक कारणांचीं जीं शेंकडों रूपें होतात तीं, यांपासून क्लेशपावणाऱ्या रोग्यांनीं असे मनांत खास समजावें कीं, जर या अत्यंत अमोल्य उपायाचा आपण वाजवी उपयोग केला, तर आपण कायमचे आणि तात्पडतोब बरे होऊं.

फास्फरस हाच रक्त, मेंदू, अस्थीचें अन्न, आयुष्याचा प्रत्यक्ष टेंकाच. मेंदूच्या शक्तीचें उत्पत्तिस्थान आहे, असें मोठमोठे प्रामाणिक वैद्यक शास्त्रज्ञ आतां कबूल करतात; व यासाठीं ते मांस्याहार, व फास्फरसयुक्त पदार्थांचा आहार करावा ह्मणून सांगतात.

मज्जातंतूंचे रोग ह्मणजेच मेंदू आणि मज्जातंतूंचें केंद्र यांत फास्फरसाचा अभाव, व ते रोग बरे करणें ह्मणजे हा नसता पदार्थ शरीरांत पुनरपि शिरकाविणें, असा जो डा लेलार यांचा सिद्धांत, त्याची आश्चर्यकारक खरेपणा सन १८६२ पासून **डा. लेलार यांच्या फास्फोडाइन**नें सिद्ध करून दाखविला आहे.

फास्फरसाशीं तात्पडतोब मिसळून त्यायोगें क्षय, अशक्तता, मेंदूंस अतिशय श्रमपडणें, शक्तिपात, उत्साह व जीवनकला यांचा अभाव, हीं फार जलद बरीं करणारें औषध ह्मटलें ह्मणजे **डा. लेलार यांचें फास्फोडाइन** हें एकच आहे.

महाराणी साहेबांनीं नेमिलेले व्यापाराच्या खुर्गांचे रजिस्ट्रार यांनीं सर्टिफिकिट दिलेलें असें या नांवाचें एवढेंच औषध ह्मटलें ह्मणजे **डा. लेलार यांचे फास्फोडाइन** हेंच होय. कित्येक धाडशी ढोंगी लोक **हिंदुस्थान**च्या लोकांस जीं खोटीं फास्फोडाइनें व वाईट अनुकरणें यांस हेंच नांव देऊन विकत देत असतात, त्यांविषयीं खबरदारी घ्या. वैद्यकीचा धंदा करणारे लोक हीं अनुकरणें मुळींच कबूल करीत नाहींत. हीं जुन्या प्रक्रियांस अनुसरून तयार केलीं असल्यामुळें तीं अगदीं अविश्वसनीय, व पुष्कळ प्रसंगीं भयंकरही होत.

डा. लेलार यांचे फास्फोडाइन हें सर्व जगभर घाऊक व किरकोळ विक्री करणारे व परदेशीं पाठविणारे लोक सुमारें २। रु. व ५॥ किंमतींच्या बाटल्यांतून विकतात.

महत्वाची सूचना:—बाटलीच्या प्रत्येक ग्लासांत "डा. लेलार यांचें फास्फोडाइन लंडन, इंग्लंड," हे शब्द उठविले नसतील तर हें औषध अस्सल असें समजूं नये. तसेंच प्रत्येक बाटलीवर 'डा. लेलार यांचें फास्फोडाइन, लंडन, इंग्लंड,' हे शब्द महाराणी साहेबाच्या नामदार कमिशनरांच्या आज्ञेवरून खोदिलेले असतात,; तसे नसतील, तर तें औषध बनावट असून तुह्मीं खोट्या बनावट अनुकरणानें फसलां आहां असें समजावें.

फास्फोडाइनचे एकटेच मालक व उत्पन्न करणारे 'डा. आर. डी. लेलार, बेहौस, ३२ गेल्फर्ड रस्ता, लंडन, वायव्यभाग, इंग्लंड' यांजकडून 'फास्फरसाचे उपचार व रोगनिदान' हें पुस्तक टपालखंर्चाशिवाय फुकट पाठविण्यात येतें.

नियमित एजंट.

ट्रेचर व कंपनी, मुंबई. भायखळा आणि पुणें. (Treacher and Co Bombay, Byculla, and Poona.)

Dr. R. D. LALOR.

फार मनोवेधक

कामकंदला नाटक.

अवश्य घ्या आणि अवश्य वाचा.

किंमत १। रुपाया ट. ख. १ आणा.

हें पुस्तक सुंदर टैपांनीं छापून तयार झालें आहे. ज्यांना हें पाहिजे त्यांनीं कृपा करून ट. ख. सह रोख किंमत पाठविली असतां वरील पुस्तक तात्काडतोब रवाना करण्यांत येईल. ता० १।२।८१.

पत्ता--मिशनस्कुला नजीक जबलपूर } एकनाथ गणेश भांडारे.
ग्रंथकर्ता.

मधुमेहावर हटकून औषध.

हें औषध चमत्कारिक गुणाकारी आहे. निदान दोन महिने पचेल तितक्या दुधामध्यें दिवसांतून प्रत्येक वेळीं एक गोळी तीनदा घ्यावी. मधुर पदार्थ, स्त्रीसेवन अगदीं वर्ज्य, किं. १। रु. ट. ख. चार वाटल्यांपर्यंत ४ आणे.

कांदेवाडी मेडिकलहाल मुंबई. वि. स. परांजपे.

शालोपयोगी व इतर पुस्तकें.

अंकगणित (मराठी ५ व्या इयत्तेपर्यंत.)—किं. ६ आणे; व ट. ख. १॥ आणा.

मोडीवाचनसार भाग १ ला व २ रा—दर भागास किं. ३ आणे व प्याकिंग व टपाल खर्च १ आणा.

हावर्डच्या इं. १ ल्या व २ ऱ्या पुस्तकांतील मराठींत उच्चारार्थासहित शब्दसंग्रह—किं. अनुक्रमें १॥ व २॥ आणे, शिवाय मयेकी ट. ख. १ आणा.

भूगोलाच्या व्याख्या, मराठी १ ल्या व २ ऱ्या पुस्तकांतील कठिण शब्दांचा अर्थ व कवितांचा अन्वययुक्त अर्थ—किं. १॥। आणे व ट. ख. ६ पै.

एशिया व युरोप खंडाचें संक्षिप्त वर्णन—किं. १ आणा ट. ख. ६ पै.

चित्रबोध अथवा बालकांचें प्रथम प्रियपुस्तक—किं. १॥ आणा, ट. ख. ६ पै.

हिंदुस्थानच्या इतिहासांतील सर्व संक्षिप्त माहितीचें लहानसें पुस्तक—(परीक्षेच्यावेळीं अत्यंत उपयोगीं पडणारें) किं. २ आणे ट. ख. ६ पै.

आरतीसंग्रह (आरती संख्या ३१९ दुसरी आवृत्ति) किं. १ रु. ट. ख. २ आणे.

पुस्तकें मुंबईंत खालीं सही करणाराकडे मिळतील. ज्यास्त प्रती घेण्यांत टपाल खर्चांत फायदा आहे.

कांदेवाडी शांतारामाची चाळ नंबर ४२. } वासुदेव मोरेश्वर पोतदार.
स्कूलमास्तर गिरगांव प्रायव्हेट स्कूल, मुंबई.

" नलदमयंती " व " हरिश्चंद्र ";

रा. रा. सोकर बापूजी त्रिलोकेकर यानीं गद्यपद्यात्मक रचून चित्रांसह सुंदर ठशांनीं छापवून प्रसिद्ध केलेलीं वरील नाटकांचीं पुस्तकें **नाट्यकथार्णवा**च्या आफिसांत विकत मिळतील. " नलदमयंती "—रु० १।. व टपालखर्च आणे २, व " हरिश्चंद्र "—रु० .॥. व टपालखर्च आणा १.

—o—

प्रमेहावर रामबाण अनुभविक औषध.

प्रमेह कितीही दिवसांचा असला, तरी या औषधानें १५ दिवसांचे आंत हटकून गुण येतो. औषध मागविणारांनीं मुंबई, अनंत ऋषीची वाडी, घर नंबर २६, येथें पत्रें पाठवावीं, अगर स्वतः येऊन भेटावें.

डा. दामोदर रघुनाथ धुमे, एल्. एम्. ॲण्ड एस्.

—o—

जीवनार्क.

हा अर्क रुचकर व मधुर असून कोणत्याही ऋतूंमध्यें पाहिजे तितके वेळ घेतला असतां अपकार करणार नाहीं. ह्यास सर्व शक्तिवरच्या औषधांचा राजा झटल्यास चालेल. कारण ह्यांत सर्व पौष्टिक औषधांचा समावेश केला आहे. शरीर मजबूत होऊन मेंदूची शक्ति व रक्त ताजीं होतात व वाढतात. हा अर्क पुढील रोगांवर रामबाण आहेः—इंद्रियें मंद पडणें, शक्तिपात, अभ्यास अगर कामकाज करवेनासें होणें, मंद स्मृति अगर दृष्टि, सतत कपाळशूळ, जननेंद्रियाचे रोग, दमा, खोकला, रक्ताची कमताई, भूक मरणें, अपचन, कांपरें, अतिसंभोग, बलात्कारानें धातुपात, कुमार्गापासून रोग, **मधुमेह व रक्तपित्त** (हे **दोन रोग पुढें वाढत नाहींत-**) दारू पिण्याची खोड व तिचे भयंकर परिणाम आणि सतत त्रासदायक घाम. ह्यांत चमत्कार इतकाच आहे कीं, शक्ति व उत्साह कायमचीं येतात, व गुण पहिल्या दिवसांपासून भासतो. बालकांस हें मानसिक अन्नच आहे. तरुणांना मानसिक श्रम जाणवत नाहीं. व हें स्वभावसिद्ध शक्तिवर्धक होय. वृद्ध मनुष्यें व जिवाआगळे श्रम करणारे यांस हें प्रत्यक्ष जीवनाच्या ठिकाणीं होऊन ते दीर्घकाळपर्यंत वांचतात, व या कलिकालांतील आयुर्नियमाप्रमाणें संपूर्ण शरीराचे भाग कालमानानें खर्च होत राहून अखेर शरीराचे सर्व व्यापार आपोआप बंद होत तोंपर्यंत निर्भयपणें राहतात. प्रत्येक विद्यार्थी, धंदा करणारा मनुष्य, किंवा सर्वकाळ कामकाजांत मुरणारा मनुष्य, यानें हे औषध संग्रहीं ठेवावें. १ कि. १। रु. बंगी करणावळ चार आणे. बंगी नाटपेट जाईल. एक चमचा अर्धा पावशेर दुधामध्यें दिवसांतून तीनदा घ्यावें. दूध पाहिजे तितकें घेतल्यास चिंता नाहीं.

कांदेवाडी मेडिकल हाल मुंबई. वि. स. परांजपे.

अवश्य अनुभव घ्या ! ! ! एकदाच घेऊन खात्री ! ! !

CHILDRENS ELIXIR.

बालामृत.

[झाडास ज्याप्रमाणें वाढवावें त्याप्रमाणें तें वाढतें.]

हें औषध एतद्देशीय अनेक वनस्पति मिश्र करून केलें आहे. ह्यापासून मुलांस जंतांचा उपद्रव कधींही होत नाहीं. अन्नपचन होऊन वारंवार दूध ओकणें बंद होतें. आईच्या दुधाच्या कमताईमुळें किंवा तें मुळींच न मिळाल्यामुळें होणारी क्षीणता व पांडुरकी ह्यांवर हें औषध जालिम आहे. गाईच्या दुधावर वाढविलेल्या मुलांस होणारे सर्व रोग ह्यानें दूर होतात. गर्भाशयांत मुलें असतां ह्मणजे गरोदरपणामध्यें अंगांत रक्ताची कमताई असल्यामुळें अगर पुढें अंगावर दूध न मिळाल्यामुळें मुलाच्या अस्थि काड्यांप्रमाणें होतात त्यांस वळकटी आणणें, व ज्यांची पोटें फार मोठीं होतात व तीं फार खातात व हळूहळू क्षीण होतात, ह्यांवर हें अद्वितीय आहे. खोकला, गळ्यामध्यें घरघर आवाज, फेपरें, आंकडी, पांढरी हाग, आंव, अतिसार, ह्या रोगांचा हे दिलें असतां संभवसुद्धां राहत नाहीं. पाय लटके पडल्यास हें औषध देऊन अवश्य पहावें. दमा, माती खाण्याची संवय, खरूज, कंडू, डोकींतील फोड, लागलेच दूर होतील. शौचास नियमानें होऊन सर्व इंद्रियें बराबर राहतील, ह्मणून ह्यास बालामृत असें नांव दिलें आहे. दर बाटलीस किंमत रुपया एक. बंगीखर्च आठ आणे. घेण्यास मधुर असल्याकारणानें मुलें पाहिजे तितकें घेतील. माहितीचा कागद आंत आहे.

कादेवाडी मेडिकलहाल. वि. स. परांजपे.

पौष्टिक, शक्तिवर्धक शरीर मनोत्साह आणणाऱ्या मिश्र फास्फरसाच्या फोडल्यावर अंधेरामध्यें नेज दाखविणाऱ्या मौक्तिकरस सुशोभित उत्तम चमत्कारिक खातरीच्या गोळ्या.

(ह्या ऋतूमध्यें घेण्याजोग्या.)

ह्या गोळ्या शरीरांतील रोगांवर रामबाण आहेत व ह्याविषयीं बहुत सर्टिफिकिटें आह्मांजवळ आहेत. मेंदूची व शारीरिक क्षीणता, हलकें झालेलें डोकें, अतिशय दारू सेवन, ऐहिक काळजी, अध्ययन, किंवा मानसिक कामकाजानें आलेली क्षीणता, क्षय, अजीर्ण, पोटदुखी, मस्तकशूळ, कोड, पंडुरोग, मंद व त्वचागत व्याधी, अतिशय घाम येणें, अंगास चिरचिर व मुंग्या येणें, केश पांढरे अवेळीं होणें, रक्ताची कमताई, जीर्णज्वर, मधुमेह व रक्तपित्ती, अवेळीं क्षीणता येऊन डोळे खोल जाणें व वृद्ध दिसणें इत्यादि प्रकारांवर या औषधाचा फार उपयोग होतो. यानें क्षुधा वाढते, बुद्धि व स्मरणशक्ति तीव्र होते, स्नायुशक्ति वाढते, क्षीणता पळते, शरीरास समाधान वाटतें. मेंदूस व मज्जा तंतूस नरतरी येते, डोळ्यांची आग जाते, शरीर सौख्य होतें, श्रम जातो, काम करण्यास उत्साह वाटतो, अस्थी बळकट होतात व रक्त बराबर फिरतें, अन्न पचून भरपावनाची शरीरांत बळकटी प्राप्त होते. या गोळ्या नेटिव ओपिनियन छापखान्यांत व कान्देवाडी मेडिकलहालांत विकत मिळतील. प्रत्येक बाटलीस १४ आणे व एक पासून चार पर्यंत बंगी व टपाल खर्च ६ आणे. ह्मणून च्यार बाटल्या मागविण्यास सोईवार पडतें (सर्व खर्च २ रु. १४ आणे च्यार बाटल्यास व एकीस १। रु.) एक बाटली आठ दिवस पुरते. साधारणपणें एक महिना औषध घेतलें पाहिजे पैसा मनिआरडरनें पाठवावा. माहितीचा कागद आंत आहे.

विठ्ठल सदाशिवराव परांजपे, कां. हा. मालक.

दिलखुषखबर.

संगीतदर्पण,

अथवा

गायनविद्येच्या ज्ञानाची मार्गोपदेशिका.

राज्यक्रांतीच्या झपाट्यांत लोकप्रीय अशा संगीत (गायन अथवा राग) विद्येचा लोप होऊन सांप्रतकाळीं तिजकडे विद्वान लोकांचें दुर्लक्ष्य झाल्यामुळें, आमच्या लोकांत संगीतविद्येची असावी तशी अभिरुचि नाहीं; परंतु हल्लीं मुंबई व पुणें मुक्कामीं "संगीत नाटककार" मंडळ्या उद्भवून त्यांनीं नाटकद्वारें संगीतविद्येचें वास्तविक मनोवेधक स्वरूप प्रेक्षकांसमोर उभें केल्यामुळें बऱ्याच लोकांस संगिताची गोडी लागून संगीतविद्येची माहिती करून घेऊं लागले आहेत. तर अशा लोकांचे हेतु पूर्ण होऊन त्यांस संगीतविद्येचें वास्तविक ज्ञान व्हावें, अशा उद्देशानें आह्मी कित्येक गवई व वस्ताद ह्यांच्या साह्यानें "**संगीतदर्पण**" नांवाचा एक ग्रंथ तयार करून छापविण्यास सुरवात केली आहे.

ह्या ग्रंथाचे मुख्य दोन भाग केले आहेत. त्यांपैकीं पहिल्या भागाचे तीन विभाग केले आहेत. पहिल्या विभागांत संगीतविद्येचा भरतखंडस्थ व परदेशस्थ संबंधी एकंदर इतिहास; दुसऱ्या विभागांत संगीतसंबंधी एकंदर राग रागिण्यांची विशेष माहिती दिली असून कोणत्या ऋतूंत कोणत्या वेळीं व कोणत्या प्रहरीं कोणता राग गावा ह्याविषयीं एकंदर माहिती दिली आहे; तिसऱ्या विभागांत एतद्देशीय व परदेशीय प्रसिद्ध प्रसिद्ध वाद्यांचीं चित्रें दिलीं आहेत. आणि दुसऱ्या भागांत **ध्रुपद, पद, टप्पा, तिलाणा, ख्याल, दादरा, होरी, गज्जल, रेखता, काहारवा, लावणी, ठुंबरी, झूल, गरबी,** इत्यादि जातींची अनेक प्रकारच्या राग रागिण्यांतील २९० निवडक पद्यें (चिजा) दिलीं आहेत, त्या प्रत्येक पद्या (चिजे) वर त्याचा राग व चाल दाखविली आहे. तेणेंकरून तीं गावयास सुलभ जातील.

ह्याची किंमत ता. ३१ आक्टोंबरचे अंत देणारास मात्र १॥ रुपया व मागाहून २ रुपये पडतील. बाहेरगांवच्या लोकांस टपाल खर्चाबद्दल २ आणे जास्त पडतील.

किंमतीचा पैसा पाठविणें तो "**नाट्यकथार्णव**" मा. पुस्तकाचे मालक यांचे नांवें वरील मुदतींत मनीआर्डर करून पाठवावा. पुस्तकें नोवेंबरच्या १ ल्या तारखेस छापून आश्रय दात्यांस पाठविलीं जातील. ह्या पुस्तकांस सर्व संगीताभिलाषि, गायनप्रीय व इतर सर्व लोकांकडून चांगला आश्रय मिळेल अशी उमेद आहे. पुस्तक डेमी द्वादशपत्रीं २०० पृ. ष्ठांचें होईल असा अजमास आहे.

मुंबई. ता. १ सप्टेंबर १८८१ पुस्तककर्ते.

जाहिरखबर.

हिंदुस्थानांत सरकारानें मिठावर जबर कर बसविला आहे, तो कमी होण्यासाठीं विलायतेंतील कांहीं लोकांशीं पत्रव्यवहार ठेवून हा कर कमी होण्याविषयींची खटपट केसरीपत्रकर्त्यांकडून हल्लीं होत आहे. यासंबंधानें प्रत्येक देशाहितेच्छूनें खालीं लिहिलेल्या गोष्टींबद्दल माहिती घेऊन त्यांजकडे पाठविण्याची तसदी घ्यावी.

१. मिठाचा कर वाढल्यामुळें पूर्वीं खप होत होता, त्यापेक्षां कमी होऊं लागला कीं काय व असेल तर किती ? २. सरकारानें मंजूर केलेल्या ठिकाणाशिवाय मीठ पिकविल्याबद्दल कोणावर खटले झाले असल्यास त्यांची हकीकत व निकाल. ३. पूर्वीं मिठागरें होतीं कितीं, व त्यांपैकीं सरकारानें बंद केलीं किती व याबद्दल किती लोकांचें अदमासें किती नुकसान झालें ? ४. मीठ कमी खावयास मिळाल्यामुळें त्या प्रांतीं कांहीं रोगाची सांथ आली असल्यास ती कधीं आली व त्यापासून अदमासें किती लोक मेले ? ५. या व अशाच गोष्टींपासून मिठाचे करासंबंधानें रयतेवर काय काय जुलूम होत आहेत याची हकीकत.

विशेष सूचना:—सदरहू माहिती खुद आह्मांकडे कोणी लिहून पाठविल्यास ती आह्मांकडून केसरीकर्त्यांकडे रवाना करण्यांत येईल. नाट्यकथार्णवकर्ते.

A REPOSITORY
OF
USEFUL ARTS AND RECEIPTS
(Monthly Magazine.)

उपयुक्त सूचना.

व्यवहारोपयोगी हुन्नरसंग्रह.

(मासिकपुस्तक.)

चालू वर्षाच्या आगष्ट महिन्यापासून आह्मीं सदर्हु पुस्तक काढण्याची सुरुवात केली आहे, त्यांत ह्या देशांत व परदेशांत चालणारे अनेक प्रकारचे धंदे, रोजगार, विद्या व कलाकौशल्यें यासंबंधी अनेक प्रकारच्या युक्ति, कल्पना व हुन्नर यांचा संग्रह होत असतो.

ह्यांत बागाईत व शेती, सुगंधी व आतारी, रंगारी, वैद्यकी, पाकशास्त्र. कुंभारकाम, कांचकाम, दारूकाम इत्यादि कामांसंबंधी अनेक प्रकारचे उपयुक्त पदार्थ करण्याच्या कृति, कोणत्याही पदार्थावरील सर्व प्रकारचे डाग काढण्याच्या युक्ति, उपद्रवकारक प्राण्यांचा नाश करण्याचे उपाय; लवकर नासणारे पदार्थ पुष्कळ दिवस जसेच्या तसे ठेवण्याच्या युक्ति; कोणत्याही पदार्थावर पाहिजे त्या धातूचा मुलामा चढविण्याच्या कृति; फुटलेले पदार्थ साधण्याकरितां लुकणें, सुधंगी व औषधोपयोगी तेलें व अर्क; अनेक प्रकारच्या साध्या व रंगित शाई, आगगाड्या, साबू मेणबत्त्या लाख, वार्निशें, सरबतें, टूथपावडर्स, मिल्करोझिस, कोल्डक्रीम्स, प्यामेटम्स, फेंचपालिश, टिंक्चर्स, एशन्स, आसिड्स, कोल्डवाटर्स इत्यादि सर्वोपयोगी उपयुक्त पदार्थ करण्याच्या कृति, आणि सांकेतिक भाषा, कूटगणित, कुटप्रश्न आणि अंकचमत्कार याचा संग्रह होत जाईल.

याची किंमत आगाऊ एक वर्षाची २ रुपये, टपालखर्च ६ आणे; किंमत पाठविणें ती मनीआर्डर करून पुस्तकर्त्याकडे खालीं लिहिलेल्या ठिकाणीं पाठवावी. प्रत्येक अंक डेमी अष्टपत्री २० पृष्ठांचा निघतो. आगाऊ वर्गणी आल्याखेरीज पुस्तक सुरू केलें जाणार नाहीं.

ता. ८ आगष्ट सन १८८० इसवी. गोविंद मोरोबा कालेकर,
हुन्नरसंग्रहकर्ते.

पत्ता—नळावर पंचमुखी मारुतीची गल्ली, घर नंबर २६ मुंबई.

विज्ञप्ति.

प्रत्येक कुटुंबांत संग्रह करण्यालायक उपयुक्त पुस्तक,

THE BRIDE'S MIRROR.

वधुदर्पण.

वरील नांवाचें पुस्तक **खानबहादूर मौलवी नझीर अहमद** (माजी डेपुटी कलेक्टर व सेटलमेंन्ट आफिसर गोरखपूर व हल्लीं पाठण चेरी येथें उत्तरभागचे सदर तालुकदार) या लोकमान्य व विद्वान ग्रंथकर्त्यानें लिहिलें आहे व तें सरकारानें पसंत करून त्याजबद्दल त्यांस १००० रुपयांचें बक्षीस दिलें आहे.

या पुस्तकाचें भाषांतर गुजराथी, बंगाली, हिंदी, व्रज इत्यादि भाषांत झालेलें असून त्यांपैकीं कित्येकांच्या दोन दोन, तीन तीन आवृत्त्याही झाल्या आहेत, त्यावरून या पुस्तकाची योग्यता किती आहे हें सहज लक्षांत येईल.

सदरहू पुस्तकाचें भाषांतर मराठी भाषेंत मूळ ग्रंथाचा भावार्थ कोठेंही न सोडतां जितकें करवेल तितकें आपल्या महाराष्ट्रीय लोकांच्या चालीस अनुसरून करण्याचा प्रयत्न केला आहे. यांतील सारांश हाच कीं नूतनच लग्न करून दिलेल्या मुलींस सासरीं गेल्यावर तेथें घरसंसारांत कोणकोणतीं दुःखें व संकटें भोगावीं लागतात आणि तीं अनायासें पार उतरून पैलतीरीं जाण्यास त्यांस काय काय तजविजी योजाव्या लागतात याचें हुबेहुब चित्र दाखविलें आहे. त्याचप्रमाणें चांगल्या किंवा वाईट स्वभावाच्या स्त्रियांच्या वर्तणुकेवरून स्वतःला होणारें सुख किंवा दुःख आणि स्त्री जातीला शिक्षण दिल्यापासून होणारे अवर्णनीय फायदे व त्यायोगें गरीब स्थितींतून सधन स्थिति प्राप्त करून घेतल्याचें आश्चर्यकारक वर्णन मोठ्या चित्तवेधक व सदुपदेशपर दृष्टांतांच्या रूपानें जींत दिलें आहे अशी एक संभवनीय गोष्ट त्यांत लिहिली आहे.

हल्लीं, विशेषेंकरून या मुंबईंत व साधारणतः मोठमोठ्या शहरांत, मुलींस लिहितांवाचतां येऊं लागलें आहे ही मोठी आनंदाची गोष्ट होय; परंतु अशा मुलींस सुबोध व नीतिमार्ग प्रवर्तक असे ग्रंथ वाचावयास न मिळतां मनाचा कल कुमार्गाकडे वळेल अशा गोष्टी ज्यांमध्यें असतात तीं वाचायास मिळाल्यानें फार लहान वयांत त्यांचीं मनें बिघडण्याची भीति असते, ती, त्यांचे घरसंसारसंबंधाची एक सुबोध गोष्ट लिहून त्यांचे हातीं दिली तर अंशतः तरी कमी होईल; एवढाच विचार मनांत आणून हें पुस्तक छापून प्रसिद्ध करण्याचा यत्न केला आहे. या पुस्तकाची प्रत्येक कुटुंबामध्यें अत्यंत जरूरी आहे. मग त्या कुटुंबांत स्त्रियांस वाचतां येवो अगर न येवो. ज्या ज्या स्त्रिया हें पुस्तक वाचतील किंवा वाचतांना ऐकतील त्यांचें मनोरंजन होईल इतकेंच नव्हे; तर त्यापासून त्यांस बुद्धि, ज्ञान, चातुर्य, सारासारविचार, दूरदर्शीपणा, घरसंसार चालविण्याची हातोटी, कुटुंबांत एकोपा कसा करावा इत्यादि गुणांचें ज्ञान झाल्यावांचून रहाणार नाहीं. हें पुस्तक किती योग्यतेचें व कुटुंबामध्यें किती उपयोगी पडणारें आहे, हें येथें सांगत लागलें असतां हें पत्रक फार विस्तृत होईल. यास्तव मोठ्या पदवीच्या आणि विद्वान साहेब लोकांकडून जे अभिप्राय मिळाले आहेत त्यांपैकी कांहीं उतारे मासल्याकरितां येथें देतों त्यांवरून या लेखाची सत्यता व ग्रंथाची योग्यता सहज कळून येईल.

वायव्य प्रांताचे डायरेक्टर आफ् पब्लिक इनस्ट्रक्शन **मि. एम्. केंपसन** साहेब बहादूर, यांचें या पुस्तकाविषयीं असें मत आहे:—

हें पुस्तक अतिशय मनोरंजक असून या देशांतील लोकांचे चालीस व स्थितीस अनुसरून आहे; आजपर्यंत अशा कारचें पुस्तक कोणतेंही झालें नाहीं. याची भाषा व वर्णन करण्याची शैली पाहूं जातां हा एतद्देशीय भाषेचा एक उत्तम नमुना ाय. हें पुस्तक दररोज वाचण्यास योग्य व सहजरीत्या समजण्याजोगें असें असून त्याचा अर्थ स्पष्ट व मनावर ठसा उमठण्यागा आहे. यांत अतिशयोक्ति, रिकामा पाल्हाळ, किंवा मोठमोठाले रूपकादि अलंकार, ड्यांचा उपयोग पुस्तकांत केला म्हणजे ापण मोठे विद्वान झालों असें या देशांतील ग्रंथकार समजतात, तसा कांहीं प्रकार नाहीं. आम्ही आशा करितों कीं पुष्कळ ाण ग्रंथ लिहिण्यामध्यें या ग्रंथकर्त्यांचा कित्ता वळवितील.

सरकारी पत्र, नं० ९२९, मुकाम नैनिताल, ता० २२ जुलई सन १८६९ यांत असें म्हटलें आहे:—

हें पुस्तक केवळ स्त्रीजातीचे फायद्याकरितांच लिहिलें आहे. हें सर्व चरित्र बालबोध भाषेनें व लोकांचे नेहमी बोलण्याालण्याचे रूढीस अनुसरून लिहिलें आहे. यांत अशा गोष्टी लिहिल्या आहेत कीं ड्या प्रत्येक स्त्रीस तिचे संसारीं वारंवार नुभवास येत असतात. स्त्रियांची भाषा, त्यांच्या आवडी, त्यांच्या नावडी, मुलांसाठीं त्यांचा पराकाष्टेचा अभिलाष, घरसंसारांत यांचें महत्व, आणि त्यांचें अतिशयित अज्ञान ह्या सर्व गोष्टी या पुस्तकावरून चांगल्याप्रकारें कळून येतात. ग्रंथकर्त्यानें ड्या बरोबर गोष्टी एतद्देशीय लोकांच्या चरित्रांत घडत आहेत त्यांचें चित्र काढून दिलें आहे. आणि नीतीचा जो बोध करणें तो ानें त्या पुस्तकांतील गोष्टींवर सोपविला आहे, म्हणजे तीं गोष्ट वाचून तो होईल. ड्या वेळीं हें पुस्तक प्रसिद्ध होईल त्या वेळीं ंकडों लोक मोठ्या आवडीनें तें वाचतील, आणि स्त्री शिक्षणाचे कामीं त्याचा चांगला उपयोग झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

वायव्य प्रांताचे लेफ्टेनंट गव्हरनर नामदार सर उईलियम म्युर साहेब बहादूर के.सी.एस.आय. या पुस्तकाविषयीं आपला अभिप्राय त्यांचे सेक्रेटरी मि. आर. सिमसन यांचे मार्फत देतात तो असा :—

नामदार साहेब ' मिरातुल अरूस " (वधुदर्पण) हें पुस्तक पाहून फार खुष झाले. हें पुस्तक इतक्या योग्यतेचें आहे । उर्दू भाषेत याची बरोबरी करणारें दुसरें पुस्तक एकही नाहीं असें गव्हरनर मजकुरांस वाटतें. या पुस्तकावरून हेंही ष्ट रीतीनें दिसून येतें कीं भरतखंडांत घर संसाराचे कामांत स्त्रियांचें अंग फार, असतें तेव्हां त्यांस जर बरच्या प्रतीच्या व तिसंबंधी शिक्षणाचा संसर्ग झाला तर निःसंशय त्याजपासून त्यांचे अधिकारास फारच चांगल्याप्रकारचें वळण लागूं शकेल. तद्देशीय लोकांपैकीं कोणीही समंजस मनुष्य जो हें पुस्तक वाचील तो म्हणजे स्त्री शिक्षणापासून होणारे अगणित फायदे मान्य रणार नाहीं अशी कुठींच गोष्ट होणार नाहीं. हें एतद्देशीय स्त्रियांस वाचण्यास अतिउत्तम आहे. निःसंशयपणें या पुस्तकानें ांचें मन रमेल आणि त्याना बोधही होईल. नामदार साहेबांस अशी उमेद आहे कीं पुष्कळ लोक अति त्वरेनें याचा कित्ता ग्यानी संभी दवडणार नाहींत, आणि हिंदु लोकांच्या गृहसंबंधी चरित्राचें असेंच हुबेहुब चित्र प्रदर्शन केलें जाईल. नशीर महमद यांस यावद्दल सरकारांतून भर १००० रुपये बक्षीस मिळावें म्हणून ते आपली इच्छा दर्शवितात. आणि सरकाराचे साठीं । पुस्तकाच्या २००० प्रती विकत घेतल्या जातील. शिवाय अशा विद्या विषयक परिश्रमाचे कामीं योग्य उत्तेजनार्थ म्हणून ाजगी खर्चांतून एक पदक ड्यावर तत्सूचक लेख कोरून बक्षीस देण्यात येईल. नामदार साहेब बोर्ड आफ एग्झामिनर मेस हें पुस्तक परिक्षेस दाखल करण्यास शिफारस करितात. या पुस्तकापासून घर संसारांतील पुष्कळ गोष्टींची माहिती हो-न, ड्यांस लोकांशीं व्यवहार ठेवावा लागतो त्यांस तो व्यवहार कसा ठेवावा हें समजण्यास तें फार उपयोगी पडेल.

याप्रमाणें हा अत्यंत उपयुक्त व मनोरंजक ग्रंथ प्रसिद्ध करण्याचें आम्ही योजिलें आहे. तरी ह्या कामास ामचें विद्यामृतपानेच्छु प्रिय भगिनी व बांधव उदारपणें आश्रय देतील अशी आम्हीं उमेद बाळगितों.

ह्या ग्रंथाचीं द्वादशपत्री सांच्याचीं पृष्ठें सुमारें २६५ होतील. कागद उत्तमप्रकारचा व टाईप ाच्य घालून बांधणीही सुरेख करून मळपृष्ठावर एक सुंदर चित्राचा उडकट घालण्याचें योजिलें ाहे. ग्रंथरचनेस लागलेल्या श्रमाकडे लक्ष न देतां हें पुस्तक सर्वांस घेण्यास सुलभ पडावें म्हणून ाची किंमत फारच स्वस्त म्हणजे येत्या अक्टोबर महिन्याचे अखेर पर्यंत देणारांस दर प्रतीस १ रुपया विली आहे. मागाहून म्हणजे ग्रंथ तयार झाल्यावर घेणारांस जास्त किंमत पडेल. पुणें शिवाय करून र गांवच्या लोकांनीं टपाल व वंगी खर्चाबद्दल दोन आणे निराळे पाठवावे. हा ग्रंथ तयार होऊन येत्या व्हेंबरांत वर्गणीदारांस मिळेल. आगाऊ वर्गणीदारांचीं नावें पुस्तकांत छापिलीं जातील. ह्या संबंधानें णास पैसा पाठविणें झाल्यास त्यांनीं तो मनीआर्डर करून आमच्या खालील पत्त्यावर पाठवावा, थवा दर रुपयास अर्धा आणा वर्ताळ्याप्रमाणें अर्धा आण्याच्या टिकिटा पाठवाव्या. नाटपेड पत्र तलें जाणार नाहीं. जो कोणी १२ वर्गणीदार मिळवून देईल किंवा प्रती घेईल त्यास एक प्रत कमिशन ली जाईल. १३ प्रतींस टपालहांशील १। रु. पडेल.

रीख ३१ जुलई सन १८८१

वधुदर्पण कर्त्ते,

मुंबई येथें गिरगांवांत इंडियन प्रिंटिंग प्रेसचे मालक यांजकडे

विष्णु गणेश जोशी आणि मंडळी,

बुकसेलर्स व कमिशन एजंट्स.

बुधवार पेंठ बुधवारचे हौदा समोर, पुणें.

सर्व लोकांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं आमचे दुकानीं शालोपयोगी व इतर पुस्तकें व स्टेशनरी सामान वगैरे माफक दरानें विकत मिळेल.

कोणास आमचे दुकानीं पुस्तकें, पोथ्या, वगैरे विकरीकरतां ठेवणें असल्यास आह्मीं कमिशन घेऊन ठेऊं. व त्याबद्दलचा हिशेब चोख ठेवण्यांत येऊन पत्रव्यवहाराप्रमाणें जी व्यवस्था ठरेल त्या व्यवस्थेअन्वयें कमिशन वगैरेचा ठराव होईल.

ज्या कोणास पुणें मुक्कामीं आपल्या वर्तमानपत्राचे किंवा मासिक पुस्तकाचे एजंट नेमणें असेल, त्यांणीं आह्माकडेस लिहून कळविल्यास त्यांच्या पत्रव्यवहाराप्रमाणें कमिशनचा ठराव करून सर्व व्यवस्था ठेवण्यांत येईल.

तसेंच बाहेर गांवचे लोकांस पुण्याहून कांहीं जिन्नस वगैरे लागल्यास मागविण्याची अडचण पडते. यास्तव कमिशन घेऊन हरएक प्रकारचा माल आह्मीं पाठविण्याची तजवीज केली आहे. माल कसोशीनें व चांगला पाहून घेऊन बंदोबस्तानें पाठविण्यांत येईल. बाहेर गांवचे लोकांस माल पाठविण्याबद्दल कमिशन खालीं लिहिलेले दराप्रमाणें पडेल.

किरकोळ १० रुपये पर्यंत दर रुपयास एक आणा; पुढें दर शेंकडा ३ रुपये पडतील. शिवाय पोष्टेज पैसा आगाऊ रोख अल्याशिवाय माल रवाना होणार नाहीं, पत्र रजिष्टर न करतां टिकीटें वगैरे पाठविल्यास तीं गाहाळ झाल्यास त्याची जबाबदारी आमचेवर नाहीं. टिकिटें पाठविणें झाल्यास तीं अर्धा आणा दराचींच असून दर रुपयास अर्धा आणा वर्ताळ्यासुद्धां पाठवावींत. नाटेपड पत्र घेतलें जाणार नाहीं.

—o—

Dr. D. E. DUDLEY, M. D.

Office: 33 Meadow Street, Fort.

डा० डी. ई. डड्ली, एम्. डी.

मुंबई कोटांत, मेडोस्ट्रीट घर नं० ६३.

—o—

विक्रीस तयार (नाट्यकथार्णव आफिसांत).

बडोदें सरकारची तैनाती फौज:—येत्या जानेवारी महिन्यांत बडोद्याच्या तरुण गायकवाडांस राज्याभिषेक होणार, त्यावेळीं इंग्रज सरकाराबरोबर दिवाण सर टी. हे कांहीं नवा तहनामा करून सदर तैनाती फौजेवरील गायकवाडांचें स्वामित्व काढून घेणार असून जी सर्वतोमुखीं खबर पसरली आहे, ती खरी ठरल्यास मोठा अन्याय होणार आहे. तो कसा हे यासंबंधाची प्रथम तहापासून घडलेली हकीकत देऊन या ग्रंथांत उत्तम प्रकारें सिद्ध करून दाखविलें आहे. किंमत ६ आणे, व ट. हं. ६ पै. सर्वांनीं अवश्य संग्रह करावा.

नाट्यकथार्णव.

प्रस्तुतकाळीं **नाव्हल्स** व **नाटकें** यांचे संबंधानें जो लोकांचा भ्रांतिमूलक समज झाला आहे त्याचा निरास होऊन, या अत्यंत अनुपम मनोरंजनसाधनाचें वास्तविक स्वरूप व त्याची वास्तविक योग्यता हीं त्यांचे मनांत पूर्णपणें ठसावींत, व तेणेंकरून सदभिरुचि जागृत होऊन काव्यामृतरसास्वादाविषयीं त्यांच्या अंतःकरणाची साहजिक प्रवृत्ति व्हावी, हा ह्या पुस्तकाचा मुख्य उद्देश असून, यांत संस्कृत व इंग्लिश या भाषांत रचलेल्या उत्तम उत्तम नाट्यकथादिक प्रबंधांच्या आधारें आपल्या महाराष्ट्र वाणीस जुळतील अशा प्रकारचीं अनेक **नाव्हल्स** व **नाटकें** यांचा संग्रह यथावकाश होणार आहे, व प्रसंगविशेषीं स्वकपोलकल्पित सदुपदेशपर कथानकें व नीतिवादाचे चुटके यांचाही समावेश होईल. या पुस्तकांत अश्लीलता नीतिभंगादि दोष न येऊं देतां हें पुस्तक सर्व सभ्य व कुलीन स्त्रियांस वाचण्याजोगें करण्यांत येईल. या पुस्तकाच्या **वर्गणीचे दर** खालीं लिहिल्याप्रमाणें ठेविले आहेत.—आगाऊ वर्षास ३ रु., मागाहून वर्षास रु. ४, आ. ८, व किरकोळ दर प्रतीस ६ आणे, शिवाय टपाल हंशील वर्षाचें आगाऊ ६ आणे.

आगाऊ वर्गणी 'पुस्तक घेतल्यापासून दोन महिन्यांच्या आंत भरली पाहिजे. पोस्टाची टिकिटें पाठविणें झाल्यास अर्ध्या आण्याचीं असावीं, व रूपयास अर्धा आणा याप्रमाणें वर्तवळा पाठवावा.

या पुस्तकांत नियमितपणें येणाऱ्या मजकुराशिवाय हरएक प्रकारच्या लोकोपयोगी जाहिराती निराळ्या छापून पुस्तकास जोडण्याचा विचार केला आहे. नियमित मजकुराचे ज्याप्रमाणें प्रत्येक पृष्ठावर दोन रकाने (कालम) करण्यांत येतात, त्याप्रमाणें जाहिरातीचे दोन रकाने करण्यांत येणार नाहींत. जाहिरातीचे दर पुढें लिहिल्याप्रमाणें माफक ठेवण्यांत आले आहेत:—

	रु.	आ.
चार ओळींचे आंत	१	०
पुढें प्रत्येक ओळीस	०	४
दुसरे खेपेस प्रत्येक ओळीस ३ आ. व तिसरीपासून प्रत्येक ओळीस	०	२

मुद्दतीच्या जाहिराती मक्त्यानें घेतल्या जातील.

भाषांतर करणें असल्यास पहिल्या खेपेस दर ओळीस.... .... ० ४

कांदेवाडी, मुंबई.

शंकर मोरो रानडे बी. ए.
नाट्यकथार्णवाचे कर्ते व मालक.





न्तिक अवस्था झाली होती, तरी देखील त्यानें त्या प्रसंगीं **शिलादित्यास** ओंळखिलें; व कांहीं बोलण्याचा यत्न केला, परंतु तो व्यर्थ झाला. कारण कांहीं केल्या त्याची जीभच हालेना, व अशा स्थितींत कांहीं अर्धामुर्धा आवाज बाहेर पाडण्याच्या खटपटांतच त्याचा प्राण निघून गेला.

इकडे **भद्रमणि अर्थशाला**च्या घरचीं चाकरमाणतें सगळीं कोठीखान्यांत कोंडून ठेविलीं होतीं, त्यांच्या कानीं तो दारूच्या योगानें झालेला प्रचंड धडाका पडतांच तीं भीतीमुळें प्राणावर उदार होऊन त्यांनीं आवेशानें झटापट करून कोठीखान्याचें दार निखळलें, व बाहेर पडून हा काय भयंकर प्रकार आहे याची चौकशी करण्याकरितां आगीच्या ठिकाणाकडे सगळींजणें निघून गेलीं. तीं **शिलादित्याचे** दृष्टीस पडतांच त्यानें त्या मेलेल्या व विवळत पडलेल्या त्या माणसांचा नाद सोडून दिला, व जरी त्यांचा तो अखेरचा कण्हण्याचा शब्द ऐकून त्याला वाईट वाटलें, तथापि त्यांचा समाचार हीं नवीन आलेलीं चाकर माणसें घेतील अशा समजुतीनें तो तडक खंदकावर आडव्या टाकलेल्या फळ्यांच्या अंगास गेला; व त्या ठिकाणीं पहातो तों पूर्वी रोखून ठेवलेला घोडा काढणी तोडून पळाला असून त्या फळ्यांजवळच थंडीनें काकडत उभा आहे. हें पाहून त्यानें अंमळ त्याची मान थोंपटली, व लागलीच त्याच्या पाठीवर स्वार होऊन त्यानें गुहेची परत वाट धरिली.

त्या ठिकाणीं जातो तों **तमुभद्राचार्य** व **जरठकर्ण** जती यांची व त्याची गुहेच्या तोंडाशींच गांठ पडली, व ते आगीचें कसें काय वर्तमान आहे ह्मणून मोठ्या उत्कंठेनें विचारूं लागले, तेव्हां **शिलादित्यानें** त्यांस थोडक्यांत हकीकत कळविली.

ती ऐकून **जरठकर्ण** जती बोलतो:—"अहाहा! वत्सा **शिलादित्या**! खचित खचित त्या **अर्हत्प्रभृत** करुणा येऊनच त्यानें या कामीं तुझ्या बाहूंची प्रेरणा केली आहे! याच बाहूंच्या योगानें त्या सद्धर्मद्वेष्ट्या दुष्ट हिंदुराजाचा प्राणनाश होता, तर केवढी मौज झाली असती! असो, आता ही गोष्ट झाली, आतां थोडक्याच दिवसांनीं त्याचीही घाळी येतेच आहे!"

हें ऐकून **शिलादित्य** त्यास दरडावून ह्मणाला:—"**जरठकर्ण**जी! आपण गप्प रहावें!"

हें ऐकून **वसुभद्राचार्य** बोलतो:—"मला कोतवाल मेला यावद्दल कांहीं वाटत नाहीं, परंतु खचित खचित अशा निंद्य कामीं आणि विनाकारण प्राणाचा संहार व्हावा हें आपल्याला ठीक वाटत नाहीं!"

त्यावरोबर जती रागानें त्यास बोलतो:—"भल्या गृहस्था! तुला अजून खरा विचारीपणा तो काय हें मुळींच कळत नाहीं! तूं हें काम निंद्य ह्मणतोस, परंतु सद्धर्माचा खरा पालक व असद्धर्म्यांना शासन करणारा जो शास्ता* त्याला हें अंतःकरणापासून संमत आहे कळलें?"

"असेल. पण मला तसें नाहीं वाटत." **वसुभद्राचार्य** उत्तर करितो. "आणखी खरेखरी जर या त्रिवेणीवर माझें प्रेम ज-

* हे बुद्धाचेंच नांव. "मुनींद्रः श्रीघनः शास्ता." अम० को० का० १ व० १

डलें नसतें, तर मी यापुढें या कामांत पडलोंही नसतों."

हें **वसुभद्राचार्या**चें भाषण जतीस अर्थात्च पसंत पडलें नाहीं व तो त्यास परत खोचून बोलला:—"मर्जी तुझी ! आमचा कांहीं तुला आग्रह नाहीं, तसें तुला योग्य वाटत असेल, तर तूं आह्मांला सोडून खुशाल चालता हो !"

येथपर्यंत सांगितलेलें सर्व भाषण **त्रिवेणी** आडून ऐकतच होती. ती यावेळीं पुढें येऊन जतीस ह्मणाली:—"जती महाराज ! आपणांस हें बोलणें योग्य नाहीं. प्रत्यक्ष तुह्मीं जिवंत आहां, व या मोकळ्या ठिकाणीं तुह्माला यावयाला सांपडलें हे उपकार **वसुभद्राचार्या**चेच तुह्मांवर आहेत !"

हें ऐकून जती शरमल्यासारखा होऊन ह्मणाला:—"बाळे ! तूं खरें बोललीस ! मी आवेशाच्या भरांत बोलूं नये तें बोललों, पण आतां त्याबद्दल क्षमा मागतों !"

"जती महाराज !" **वसुभद्राचार्य** त्यास बोलतो, "आपण त्याबद्दल कांहीं खेद करूं नये." इतकें बोलून तो मागें **हयदक्ष** होता त्याकडे वळून ह्मणाला:—"तूं आतां वाड्यांत खुशाल परत जा. तुला आतां तेथें कोणी त्रास देणार नाहीं! जा, बाकीचीं घरचीं माणसें सर्व तुझीं वाट पहात असतील !"

"तें खरें, पण माझ्या या धनिनीची वाट?" **हयदक्ष** विचारतो.

इतक्यांत **त्रिवेणी** बोलते:—मी **पवित्र** दीर्घिकेस बाबांजवळ रहाण्याकरितां जाणार आहें. व तेथें मी गेल्यावर तेथून तू कसें काय करावेंस हें तुला कळेल."

हे शब्द ऐकून त्या वृद्ध **हयदक्षा**नें **त्रिवेणी**स नम्रतेचा प्रणाम केला आणि ह्मणाला:—"ठीक आहे! **अर्हत्** करो, आणि तुजवर आणखी दुःखाचे प्रसंग न येवोत !"

इतकें झाल्यावर **वसुभद्राचार्या**नें त्रिवेणीचा हात धरून तिला पूर्ववत् घोडीवर चढविलें, व लागलेच इतर सर्वजण घोड्यावर स्वार झाले. आमचें सर्व प्रवासिमंडळ **चसतरु**च्या वाटेस लागलें, व **हयदक्ष** आपल्या धन्याच्या घरीं परत गेला.

प्रकरण ११.

इकडे आमचें प्रवासिमंडळ जें निघालें तें रात्रभर एकसारखें घोडदौडीनें मजल कांटीतच चाललें. मात्र नाहीं ह्मणावयाला वाटेत **नटबुरु** नांवाचें एक लहानसें ओसाड पडलेलें गांव लागलें, या ठिकाणीं तें विश्रांतीकरितां अंमळसें उभें राहिलें. सकाळच्या सुमारास तें **चसतरु** गांवाजवळ आलें. हें गांव लहानच परंतु बरेंच टुमदार होतें, व त्यासभोंवतीं उंच व मजबूद तट होता. गांवांतील अधिकारिमंडळ अर्थात्च **हिंदु**धर्मी होतें, परंतु बाकीची वस्ती ह्मटली ह्मणजे बहुतेक **जैन** अगर **बुद्ध**धर्मीच होती. आमचे प्रवासी गांवाच्या वेशीजवळ जातात, तों इतक्यांत आंतून वेस उघडली, व सर्वजण गांवांत शिरले. व पुढें दोन तीन रस्ते वलांडून गेल्यावर ते **भद्रमणि**च्या बिऱ्हाडाची चौकशी करूं लागणार, इतक्यांत पहातात तों **कार्तिकशंभु**च घोडा भरधांव टाकीत त्यांच्याकडेच येतांना त्यांच्या दृष्टीस पडला. हें पाहून त्या सर्वांस आश्चर्य वाटलें.

कार्तिकशंभु जवळ येतांच त्यानें **त्रिवेणी**कडे हास्यमुद्रेनें पाहिलें आणि ह्मणाला:—

"हां-तरी मला वाटलेंच होतें! त्रिवेणी! तुझ्या बापाचा निरोप तुला कळविण्याकरितां मी आतांच पुनमल्लीस जाण्यास निघालों होतों, पण इतक्यांत सुदैवानें तुझीच येथें गांठ पडली, यामुळें तेथपर्यंत जायची पंचाईत चुकली! असो; बरें, पण तूं इकडे कोणीकडे?" इतक्यांत त्याच्या नजरेस वसुभद्राचार्य पडली, तेव्हां हें कांहीं ठीक नाहीं असें त्यास वाटून तो पुढें बोलला:—"आणखी ही मंडळीही बरोबर आहे हें कसें?"

इतक्यांत जरठकर्ण जती पुढें येऊन त्यानें सगळी हकीकत थोडक्यांत सांगितली, तेव्हां अर्थात्च सर्व संशयांचा उलगडा झाला. ही हकीकत ऐकत असतां कार्तिकशंभूनें बाह्यतः आपणास वाईट वाटून रोषही आलासें दाखविलें; तथापि एकंदरींत तो मजकूर ऐकून त्यास आनंदच होत होता हें जर त्याच्या तोंडाकडे कोणीं टक लावून पाहिलें असतें, तर त्यास सहज कळून आलें असतें.

कार्तिकशंभु जरठकर्णाच्या घोड्याजवळ आला, आणि हलकेच त्याच्या कानांत सांगतो:—"हें ठीक झालें! आतां भद्रमणीला आमच्या पक्षास येऊन मिळालेंच पाहिजे!'

"अर्थात्, आणखी तो मिळेलच!" जरठकर्ण त्याच्या कानांत बोलतो.

इतकें झाल्यावर कार्तिकशंभु पुनरपि त्रिवेणीकडे वळून तिला म्हणाला:—"भद्रमणि पुढें हरतरु गांवीं गेले आहेत, व तेथें त्यांनीं तुला बोलाविलें आहे! तेथें त्यांच्या बरोबर मंडळी पुष्कळ जमली आहे, वर्‍त्यांचा बेत पवित्रदीर्घिकेकडे जाण्याकरितां उदईक निघण्याचा आहे! आतांपर्यंत अगदीं नाहीं तरी तीस पस्तीस लोक जमले आहेत."

"हुंहुं?" त्रिवेणीपुढें विचारते. "बरें, पण हे इतके लोक तरी कोण बाई?"

कार्तिकशंभु उत्तर करितो.-"या सगळ्यांचीं नांवेंही तूं अजून कधीं ऐकिलीं नसशील! तरी पण तुझ्या माहितीपैकीं म्हटलें म्हणजे गीर्णतत्त्व जति, रूक्षामृत, वीणातंक व त्याचा धाकटा भाऊ अरुणांत, तरुश्याम, आणखी—आणखी—अर्हत् तुझें भलें करो—रक्ताक्ष, इतकेच! शिवाय कांहीं बायकाही बरोबर आहेत, पण त्या बहुधा तुझ्या ओळखीच्या नसतील."

"तरी पण त्यांचीं नांवें?"

"नावें काय, मलाही सगळीं ठाऊक नाहींत. तरी पण एक कोण ननांदाबाई आणखी एक कोणशीशी इतक्याच मला ठाऊक आहेत! बरें, पण कसें काय? आतां येथेंच कांहीवेळ विसांवा घेणार? का अशींच एकदम हरतरूकडेच चलणार?"

"माझा हेतुच जर विचाराल, तर बाबांना केव्हां जाऊन पाहीन असें मला झालें आहे. पण रात्रभर एकसारखी वाट चालल्यामुळें हीं जनावरें थकलीं आहेत, याकरितां यांना कांहीं वेळ विसांवा देऊन नंतर पुढें जावे असें मला वाटतें"

इतकें झाल्यावर तीं सर्वजण अंमळ कांहींशीं पुढें गेलीं, व जवळच एक रिकामें घर होतें, त्या घरीं उतरलीं. त्रिवेणी दमली असल्यामुळें तिनें फक्त शीच मुखमार्जन केलें, व अंमळशी टेंकून पडली, तों तिला पडल्या पडल्याच झोंप लागली. बाकी शिलादित्य, कार्तिकशंभु व जती हे सर्वजण पुढच्या अंगणांत एकीकडे जाऊन आपआपसांत विचार व मसलती करीत बसले. तेव्हां अर्थात्च आपण बरोबर असण्याची आतां कोणास जरूर

राहिली नाहीं असें **वसुभद्राचार्यास** वा व शिवाय **कार्तिकशंभू**च्या एकंदरींत अ रणावरून त्याला आपण आवडत न व तो आपणाकडे बेभरंवशाच्या दृष्टीनें पह हेंही त्यानें 'पक्कें जाणलें होतें. खेरीज **कार्तिकशंभू**च्या संबंधानें त्याच्या स्वत मनाचीही त्याचप्रमाणें स्थिति झाली होती. सर्व विचार मनांत आणून त्यानें परत जावयाचा विचार मनांत आणिला, आ कांहीं वेळानें **त्रिवेणी** निजून उठल्यावर निरोप घेण्याकरितां तो तिजजवळ गे अ.णि मोठ्या संकटानें तिला ह्मणाला— "**त्रिवेणी**! आतां माझें कांहीं पुढें राहिलें आहे असें वाटत नाहीं; तसेंच आपल्या बरोबर आलेल्या या गृहस्थांन बरोबर आहे हें ज्याप्रमाणें आवडत ना दिलतें, त्याचप्रमाणें कदाचित् तुझ्या पिस ही आवडणार नाहीं, याकरितां मी तुझी घेतों!

"यावें." **त्रिवेणी** उत्तर करिते. "व **मद्राचार्य**! आपण जायचें ह्मणतां त्या आड मी येत नाहीं. कारण, यद्यपि तुह्मीं अंतरतां हें पाहून मला अतिशय वाटतें आ व वाईट वाटते आहे हे माझ्या नेत्रांतून च लेले हे अश्रुप्रवाह सांगतच आहेत,— त्यापुढें माझा कांहीं उपाय चालण्यासार नाहीं, याकरितां होतें आहे तें बरेंच मी ह्मणतें, झालें!—आपले मजवर जे अ उपकार झाले आहेत, त्यांची फेड मा हातून मीं कितीं केलें तरी व्हायची न असे ते आहेत, याकरितां अशा प्रसंगीं पल्याबद्दल माझ्या हृदयाला जें काय वा आहे, व जें यावज्जीव माझ्या हृदयाला ळून राहणार आहे, तें बोलून न दाखविणें हें मला योग्य होणार नाहीं, याकरितां आतां बोलतेंच! हायहाय! **वसुभद्राचार्य**! काय सांगूं? या वेळेस माझ्या मनाची जी कांहीं स्थिति झाली आहे ती एक मला ठाऊक कीं त्या सर्वज्ञ* सुगताला ठाऊक! "हें बोलत असतां त्रिवेणीच्या नेत्रांतून अश्रूंचा अधिकच लोट येऊं लागला.

तिची अशी स्थिति झालेली पाहून **वसुभद्राचार्या**चीही संपूर्ण वृत्ति कांहीं चमत्कारिक होऊन गेली, व तो एकाद्या क्षुधिताप्रमाणें ती काय बोलते हें ऐकण्याविषयीं आतुर झाला.

त्रिवेणी उत्तर करिते:—"**वसुभद्राचार्य**! माझ्यानें कांहीं जास्ती बोलवत नाहीं! फार काय सांगूं? माझे प्रिय जनक यांच्यावर माझें जितकें प्रेम आहे, त्याच्या खालोखाल प्रेम ह्मटलें ह्मणजे तुमच्या शिवाय दुसऱ्या कोणावर ही नाहीं!"

हे शब्द ऐकून अंतरंगवृत्तीनें क्षुभित होत्साता **वसुभद्राचार्य** थरथर कांपूं लागला, व त्या स्थितींतच तो बोलला:—"काय काय! काय ह्मटलेंस प्रिये **त्रिवेणी**! एकून तुझें मजवर प्रेम—"

त्याची ही स्थिति पाहून **त्रिवेणी**चा चेहेरा एकदम खरकन उतरून गेला, व ती ह्मणाली:— "होय होय! **वसुभद्राचार्य**! आपण मला तो शब्द फिरून बोलायलाच लावितां, याकरितां

* 'सुगत' हें बुद्धाचें नांव असल्याविषयीं पूर्वी टीप आलीच आहे. या ठिकाणीं त्यास जें 'सर्वज्ञ' हें विशेषण दिलें आहे, तें विशेषार्थद्योतक तर आहेच. तथापि 'सर्वज्ञ' हें स्वतंत्रपणेंही बुद्धाचें नांव आहे. 'सर्वज्ञः सुगतो बुद्धः'—अमरकोश, कांड १, वर्ग १.

मराठी ग्रंथ संग्रहालय
शिवाजी पार्क
दादर

सांगतें, आपणावर माझें अपरिमित प्रेम आहे; व हें मी इतक्याच करितां उघड रीतीनें बोलते कीं"—या ठिकाणीं त्रिवेणीच्या तोंडून धड स्पष्ट शब्दही निघेपर्यंत इतकी तिची चमत्कारिक स्थिति झाली होती. "व हें मी इतक्याचकरितां उघड रीतीनें बोलतें कीं, आपला आणि माझा विवाह होण्याचें त्या अर्हतानेंच आपल्या नशीबीं लिहिलें नाहीं, तथापि आपले मजवर अगणित उपकार झाले आहेत, त्याबद्दल मी अनुपकारी झालें असें आपणास वाटूं लागेल तें न वाटावे."

वसुभद्राचार्य दुःखित होत्साता उत्तर करितो:—"प्रिये! **त्रिवेणी**! ज्याच्या योगानें प्रत्यक्ष सौभाग्यालाही अधिकच शोभा यावयाची, असें हें तुझें सुंदर सुकुमार रूप तूं बळेनेंच जोग स्वीकारून शिजवून टाकण्याचा दुस्त्यज निश्चय केला आहेस, त्यापासून तूं परावृत्त व्हावें असें मी तुला सांगत नाहीं. परंतु मला एवढेंच सांग, जर तूं म्हणतेस कीं, तुझें मजवर अपरिमित प्रेम आहे, तर ज्या संकटांत एकवेळ पडलें कीं त्यांतून बाहेर पडण्याची आशा कधींच करावयास नको, अशा संकटांत तूं समजून उमजून मला आणि आपणाला दोघांना काय म्हणून पाडतेस?"

"सांगतें कां तें!" **त्रिवेणी** उत्तर करिते. "मी असें करतें याचें कारण एवढेंच कीं, तुमचा आणि माझा धर्म एक नाहीं, व ज्या धर्मास मी खरा धर्म म्हणून समजत नाहीं, त्या धर्माच्या अनुयायाशीं मी कदापि विवाह करायची नाहीं!"

"हात् त्याच्या! हें तर फारच सोपें आहे!" **जरठकर्ण** जती दोघांच्याही दृष्टी न पडतां आंतआल्या होता तो म्हणतो. "व समुद्राचार्य! एवढेंच जर आहे, तर त्रिवेणीच्या मनरंजनविण्याचा उपाय अगदीं तुमच्या मुठीतच आहे म्हणायला चिंता नाहीं!"

हे शब्द ऐकून **वसुभद्राचार्य** किंचित् दचकला, आणि त्यानें "तो कसा!" म्हणून जतीस प्रश्न केला.

जती उत्तर करितो:—"अहो! कसा म्हणून काय विचारतां? एकवार आमच्या अर्हत्प्रभूचो दीक्षा द्या म्हणजे तुमचें काम झालेंच फत्ते!"

"जतिमहाराज! तुम्हीं सांगतां एवढाच जर त्रिवेणीप्राप्तीचा उपाय असेल, तर हा गोष्ट कांलत्रयींही होणार नाहीं!"

इतक्यांत **त्रिवेणी** बोलते:—"आणखी **वसुभद्राचार्य** कदाचित् तुमचें म्हणणें कबूल करूं लागले, तरी तें मलाही कधीं पसंत पडणार नाहीं!—यापेक्षां आम्हीं उभयतांही जन्मभर आपले दिवस दुःखांत काढलेलेही मला पत्करतील!" इतकें बोलून ती **वसुभद्राचार्या**कडे वळली, व मोठ्या कष्टानें त्यास म्हणाली:—"**वसुभद्राचार्य**! आपण असें कितीही बोलत राहिलों; तरी यापासून सुख प्राप्त होण्याची कोणासच आशा नाहीं, याकरितां आतां येथेंच आपण थांबूं तें बरें असें मला वाटतें! आपली आणि माझी पुनरपि कधीं कोठें गांठ पडली, तर हा असाच प्रकार व्हावयाचा, याकरितां फिरून तसला योग्य आणायचें कधीं करूं नये हें उभयतांसही बरें असें मला वाटतें!"

त्रिवेणीचे हे शेवटले शब्द ऐकल्यावर एवढेंसें उत्तरही न देतां, फार तर काय, आपल्या प्रीतीच्या अधिष्ठानाकडे यत्किंचित् नजरही कशी ती फेंकण्याचें धैर्य न होतां, **वसुभद्राचार्य** मुकाट्यानें तेथून बाहेर पडला,

व घोडयावर स्वार होऊन तडक **पुनमल्ली**च्या अंगानें चालता झाला.

इकडे तो निघून गेल्याबरोबर **जरठकर्ण** जती **त्रिवेणी**स ह्मणाला:—"बाळे **त्रिवेणी**! तुझें या वेळचें धारिष्टाचें व निश्चयाचें वर्तन पाहून मला खरोखरीच अचंबा वाटतो; व तुझें याच्यावर इतकें प्रेम असूनही तूं आपल्या कर्तव्यालाच जागलीस याबद्दल तुझी जितकी स्तुति करावी तितकी थोडीच असेही ह्मणावें लागतें!—तरी पण, माझें तुला एक सांगणें आहे, त्याचा तूं खरोखरीच अव्हेर करूं नको! व आपल्या जिवास वाईटही वाटून घेऊं नको! मी तुला एवढेंच सांगतों. तूं जोग घेण्याचा जो हा विचार मनांत आणिला आहेस, तो टाकून देऊन कोणा तरी चांगल्या सद्धर्मी गृहस्थाशीं विवाह कर!'

"चांगल्या ह्मणजे **कार्तिकशंभू**सारख्याच गृहस्थाशीं, असेंचना?" **त्रिवेणी** मध्येंच बोलते. जती आतां सांगितल्याप्रमाणें बोलत असतां **कार्तिकशंभु** बाहेरच्या अंगास कोपऱ्यांत उभा असून आंत चाललेला प्रकार अगदीं कान देऊन ऐकत होता; व ही गोष्ट त्रिवेणीच्या पूर्णपणें लक्षांत येऊन चुकली, त्यामुळेंच ती आतां सांगितलेले शब्द बोलली.

त्रिवेणीच्या या शब्दांचा भावार्थ जतीच्या तेव्हांच तात्काळतोब लक्षांत आला, परंतु तो आपणास समजला नाहीं असें दाखवून जती पुढें बोलूं लागला:—"होय. **कार्तिकशंभू**शींच! **त्रिवेणी**! तूं नीट विचार करून पहा, तुझ्या योग्य असा पुरुष **कार्तिकशंभू**हून दुसरा कोणीही मिळण्याजोगा नाहीं! सांप्रत काळीं आपल्या या पवित्र सद्धर्माचा पहा कसा सर्वतोपरी दुष्टांच्या हातून उच्छेदच झाल्यासारखा झाला आहे, अशा वेळीं या पडत्या इमारतीस धैर्यानें टेंका देण्यापुरतें सामर्थ्य व मनाचा दृढ निश्चय दुसऱ्या कोणाच्याही अंगीं असेल असें मला वाटत नाहीं. यासाठीं वत्से! तूं माझें ऐक आणि ह्याच्याशीं विवाह करावयास कबूल हो! ह्मणजे तुला जन्मभर पालकाच्या पालक मिळून आपल्या पवित्र धर्माची पुनः संस्थिति होण्यास तितकी आपोआप मदत मिळाल्यासारखी होईल!—बाळे! नीट विचार करून पहा, तुझें वय अद्यापि कोंवळें आहे! इतरांसारखी तूं ह्मातारी कोतारी असतीस, आणखी तुझे सर्व संसारपाश नाहींसे होऊन जाऊन तूं दुःखस्थितींतच एकसारखी पडून राहिली असतीस, तर तूं ह्मणतेस ही गोष्ट बाजवी झाली असती! परंतु तुझे सुखाचे दिवस ते अद्यापि यावयाचेच आहेत, याकरितां आपल्या स्वतःकडे व या पडत्या धर्माच्या जीर्णोद्धाराकडे लक्ष देऊन तूं आतां मनांत आणिलेला हा वेडा विचार टाकून दे! तो टाकून देतांना तुला वाईट वाटेल हे मलाही समजतें, परंतु आपल्या धर्माच्या उन्नतीकडे लक्ष देऊन तुजसारख्या सद्धर्मशील मुलीनें आपल्या स्वतःच्या वाटण्याकडे लक्ष देणें कदापि योग्य होणार नाहीं!—"

त्रिवेणी दृढ निश्चयानें उत्तर करिते:—"जती महाराज! आपण ह्मणतां ही गोष्ट मला समजते, व आपल्या पडत्या धर्माच्या जीर्णोद्धारास मदत करणें हे माझें कर्तव्यकर्म आहे हेंही मी पूर्णपणें जाणतें! व ती मदत मी करण्यास तयारही आहे!—परंतु खरा सद्गुरु आणि खरा मनोधर्म यांच्याशीं विरुद्ध न जातां जें काहीं करणें तें मी करीन! आपण सांगतां ही गोष्ट माझ्या हातून कदापि व्हाव

याची नाहीं, व ती करण्याचीच कोणत्याही प्रकारें आवश्यकता दिसत नाहीं, याकरितां आपण एवढेंच करा, कृपा करून कार्तिकशंभूस हा नसता नाद टाकून देण्याविषयीं चांगला बुद्धिवाद करा!"

त्रिवेणी इतकें बोलली, तेव्हां पुढें बोलणेंच खुंटलें. जगी मुकाट्यानें निघून बाहेर ओटीवर गेला; व पुढें सगळ्या मंडळीचीं जेवणेंखाणें आटपून निवाव्याची तयारी होईपर्यंत याबद्दल एक अक्षरही कोणीं बोललें नाहीं.

सर्व तयारी झाल्याबर आमचें शिलक राहिलेलें प्रवासिमंडळ पुर्ववत् अश्वारूढ झालें. वाटेनें जातांना मार्ग उंच सखल असून मध्यें लवणेंहीं बरींच होतीं, यामुळें घोड्यांच्या पळण्याचा वेग कमजास्ती करीत सर्वजण पुढें चाललीं. सकाळच्या प्रहरीं जो आतां नुकताच सांगितलेला प्रकार घडला होता, त्या योगानें जती, कार्तिकशंभु व त्रिवेणी यांचें परस्पर बोलण्याचें मान कमी झालें होतें, तें अद्यापि कायमच असून, सर्वजण आपआपल्या विचारांतच गर्क होऊन गेलीं होतीं. अशा रीतीनें चालतां चालतां तिसऱ्या प्रहरचा सुमार उलटून गेला, व हीं सर्वजण ज्या ठिकाणीं होतीं, तेथून कांहीं अंतरावर बरीच दाट झाडी दिसत असून त्यांतून दोन तीन देवळांचीं शिखरें बाहेर डोकावून पहात आहेतशीं दिसलीं. तेव्हां मात्र कार्तिकशंभूनें इतका वेळ झालेला अबोलेकपणा टाकून देऊन आपला घोडा त्रिवेणीच्या बाजूस आणला, आणि तिला उद्देशून मोठ्यानें हा टलें:—"हें पाहिलेंस गांव दिसतें आहे तेंच हरनरु गांव! येथेंच तुझे प्रियजनक तुझी वाट पहात असून आपणा सर्वांना तेथेंच जावयाचें आहे!"

हे शब्द ऐकून आपल्या प्रिय जनकाची आतां गांठ पडणार ह्मणून एका अर्थानें त्रिवेणीचें अंतःकरण आनंदानें उचंबळूं लागले, परंतु दुसऱ्या अर्थीं घरची दुःखदायक हकीकत त्यास कळवावी लागणार हें मनांत येऊन ती लागलीच खजीलही झाली. कांहीं वेळ हीं सर्व जणें भद्रमणि ज्या घरांत उरला होता त्या घराजवळ आली, तों घराच्या शेजारच्या बागेंत भद्रमणि आणि दुसरे दोघे गृहस्थ असे तिघेजण हळके हळके बोलत इकडून तिकडे जातांना दृष्टीस पडले. तें पाहून त्रिवेणी लागलीच घोडीवरून उतरून धांवतच बाजूजवळ गेली, व उभयतांच्या तोंडून एकही आश्चर्याचा शब्द बाहेर पडण्यापूर्वीच उभयतांनीं एकमेकांस मिठ्या मारिल्या!

त्रिवेणी अकल्पित रीतीनें दृष्टीस पडल्यामुळें आश्चर्यभरित होऊन प्रथमतः भद्रमणीच्यानें एक शब्दही बोलवला नाहीं; परंतु कांहीं वेळानें अमळ शुद्धीवर आल्यावर तो त्रिवेणीस बोलला:—"बाळे! हा कसा काय प्रकार झाला याचा मला कांहींच उमज पडत नाहीं! तूं आजच्या आजच येथें आलीस हें कसें काय? कार्तिकशंभु माझा निरोप घेऊन आज सकाळीं गेला, त्या मानानें खटलें ह्मणजे तुझी येण्याची वाट उद्यांची, असें असून तूं आजच्या आज कशी आलीस?'

बापाचा हा प्रश्न ऐकून त्रिवेणीनें तो घरून बाहेर पडल्यापासून झालेली सर्व हकीकत त्यास कळविली. ती ऐकून भद्रमणीस अर्थातच दुःख झालें, व सरतेशेवटीं सुस्कारा टाकून तो ह्मणाला:—"असा कांहीं तरी

प्रकार होईल म्हणून मला निघतेवेळीं वाटलेंच होतें ! आलीकडच्या या राज्यकर्त्यांनीं आमच्या धर्मावर हा जुलूम मांडला आहे, हें फार वाईट आहे! यापासून जैन लोकांचीं मनें बिघडून जाऊन प्रसंगीं एकादा अनर्थही ओढवेल! परंतु ही गोष्ट या राज्यकर्त्यांना कळत नाहीं, किंवा कळूनही ते त्याकडे लक्ष देत नाहींत, हें खचितच चांगलें नव्हे!'

इतक्यांत भद्रमणीच्या पाठीमागें एक गृहस्थ होता, तो पुढे होऊन मोठ्या आवेशानें बोलला:— "यांत काय संशय! हे दुष्ट या गोष्टीकडे लक्ष नाहींच देणार! खचित खचित! आमच्या **णिव्वाणलसाअणांत** लिहिलें आहे त्याचें मला या वेळीं हुबेहुब स्वरूप डोळ्यांपुढें दिसूं लागत आहे, व खचितच आमच्या बिचाऱ्या सद्धर्मी बांधवांनीं **अर्हद्भक्ति**ची त्यांत लिहिल्याप्रमाणेच प्रार्थना करण्याची वेळ आली आहे ! त्यांत म्हटलें आहे 'हे **शाश्वता अरिहंता**! हे प्रभो! आम्ही दीनांनीं तुझ्या चरणाशीं किती म्हणून करुणा भाकावी? आमचे हे हाल आम्हीं प्रत्यहीं तुजपुढें गात असतां, हे **सर्वज्ञा** ! ते तुला अद्यापि कसे कळत नाहींत ! अरे, हे दुष्ट विधर्मी लोक आम्हां सद्धर्म्यांचा विनाकारण छळ करीत आहेत, तो तुझ्याने मुकाट्यानें कसा पहावतो ! हे भगवंता ! तूं आपणास धर्मराज, लोकजित् म्हणवीत असतां, तुझ्यानें सद्धर्मरक्षणाकरितां या पाप्यां असद्धर्म्यांस जिंकवत नाहीं काय ? तुझें नांव **समंतभद्र** असतां त्या दुष्टांचे मात्र चोंहोकडून कल्याण व्हावे, आणि या तुझ्या दीन अनाथ दासांचे मात्र अनास्था व्हावी हें तुला कसें योग्य वाटतें ? **अरिहंता ! अरिहंता !**"

हें भाषण ऐकून त्रिवेणी त्या गृहस्थाकडे वळून पहाते, तों तो गृहस्थ जतीचा त्याचा वेष असून तो बहुधा आपल्या ओळखीचा असावा असा तिला एकदम भास झाला. तो दिसण्यांत फारसा उंच नसून अंगानेही किंचित् बारीक होता, व त्याचें वय अजमासें पंन्नासांच्या जवळ जवळ होतें. तोंड फिकट असून त्यावर सुरकुत्या पडलेल्या होत्या, व अंगावरील पेहेरावही गळवळीतच होता. मात्र डोळे काळे भोर असून त्याचें पहाणें इतक्या वयांतही मंदावलें नव्हतें; एवढेंच नव्हे तर त्याच्या पहाणीवरून तो मोठा हुशार व कावेबाज गृहस्थ असावा असें सहज वाटण्याजोगें होतें. असो; या जतीकडे त्रिवेणीनें अंमळसें लक्ष लावून पाहिलें, तेव्हां तिला हा **गर्णितत्त्व** जती असावा असें खातरीनें वाटलें; व या गोष्टीला **कार्तिकशंभू**च्या साफाळ्या सांगण्यावरूनही मेळ पडला.

आतां ज्या जतीचें नांव सांगितलें तो गर्णितत्त्व जती मूळचा **गुजराथ** प्रांतचा रहाणेवाला असून, त्या देशीं प्रिय व त्यावेळीं माहित असलेल्या अशा सर्व शास्त्रांचें त्यानें अध्ययन केलें होतें अशी त्याची ख्याति होती. विशेषतः धर्मसंबंधाच्या ग्रंथांत तर त्याचा हात धरणारा कोणीच नाहीं अशी त्याची सर्वत्र प्रसिद्धि होती. वस्तुतः त्याची ही प्रसिद्धि धर्मविषयज्ञानाच्या संबंधानें किती वाजवी होती ही गोष्ट निराळी; परंतु त्याच्या अंगीं स्वाभाविक विद्वत्तेपेक्षां लोकांचें मनोधारण करणें, व त्या मनोधारणाच्या कामीं अत्यंत उपयोगीं

१. 'हे शास्त अर्हत् !'—'शास्ता' आणि 'अर्हत्', त्याचप्रमाणें 'धर्मराज', 'लोकजित्' व 'समतभद्र' हीं सर्व बुद्धाचींच नावें होत. अम० को० क० १, वर्ग १, श्लो० १३-१४ पहा.

कलहपुरी

अथवा

दैवदुर्विलास नाटक.

उपोद्घात.

पद.

ठाउक नाहीं कोण परेश्वर मानूं या जगतीं ?
तो आहे कीं नाहीं—येथें कुंठित झालि मति ! (ध्रु०)
सदय अदय वा; रक्षक, भक्षक साऱ्या जगताचा;
नयपथवर्ती अथवा अनयें वर्तणारँ सांचा;
सर्वशक्तियुत किंवा बोटा नियमित शक्तींचा;
सगुण, अगुण वा;—अतर्क्य गोष्टी बोलूं व्यर्थ किती ?

(सूत्रधाराचें या प्रकारें गायन चालत आहे इतक्यांत पडदा एकीकडे करून घाबऱ्या घाबऱ्या नटी प्रवेश करिते.)

नटी—हां हां प्राणनाथ ! आज आपण काय हें भलतेंच गायन आरंभिलें आहे ?

सूत्र०—(दचकून) कोण प्रिये ! तूंच का आलीस ! प्रिये ! मी तुला इतक्यांतच पाचारण करण्यास येणार होतों, मग अशी घाई कशाकरितां केलीस बरें!

नटी—प्राणनाथ ! घाई करूं नये तर कसें बरें करावें! आपलें मन आज नित्याप्रमाणें ठिकाणावर नाहीं असें मला वाटलें, ह्मणून मी इतक्या त्वरेनें येथें प्राप्त झालें! प्राणनाथ!—

सूत्र०—(हंसून) प्रिये ! मला वाटतें तुझेंच मन आज असावें तसें ठिकाणावर नाहीं, अगे! आमच्या गायकांच्या चालीप्रमाणें नाटकारंभीं मी गायन करित असतां तूं मध्येंच विघ्न आणिलेंस याचा काय अर्थ!

नटी—प्राणनाथ ! दासीकडून अपराध झाला असेल तर क्षमा असावी ! परंतु महाराज ! आज आपलें गायनच कांहीं भलत्या प्रकारचें झालें !

सूत्र०—तें कसें बरें!

नटी—सांगतें ऐकावें. प्राणनाथ! आपण गायक, सकल नाट्यशास्त्रांत निपुण, असें असून नाट्यारंभीं आपणाकडून मोठाच प्रमाद घडला ! कसा तो पहा.

साकी.

देव, ब्राह्मण, अथवा नृपती इत्यादिक जे, त्यांचे
असती आशीर्वाद जयिं, अशा योग्य गान पद्यांचें
ह्मणती त्या नांदी, पडलां भलत्या कां छंदीं ?
शक्तित्रयधर जो जगदात्मा न्यायदयादि गुणांहीं
भरला ओतप्रोत, तयाच्या विषयीं शंका कां ही ?
नास्तिक कां ठहावे ? परेशा त्या कां टाकावें ?

सूत्र०—प्रिये ! तूं ह्मणतेस तें खरें. परंतु प्रसंग जसा असेल तशी पुरुषांची मनोवृत्ति फिरावी हें आपल्या नाट्यकलेस अनुगुणच असल्यामुळें, मी आज आपला नित्य पद्धति सोडून या नवीन प्रकारास अनुसरलों !

---

१. वाइणारा, धारण करणारा.

नटी—हें नव्हतें बाई मला ठाऊक!—पण असा प्रसंग तरी काय आला आहे बाई!

सूत्र०—सांगतों ऐक.

पद.

कलियुगीं अनय बहु झाला,
जणों का ऊत खळां आला!
वदुं काइ प्रिये वदुं काई?
विसरल सकल करुणेला,
जन त्यजिती निज धर्माला, (वदुं०)
ब्राह्मणवंशीं घेउनि जनुशी,
अनघ धेनुशी
माराया आपुल्या करें
जाहले सिद्ध जे त्वरें,
जणुं खाटिक हेची खरे!
वाटे काऊपुरुष हे आले,
बुडवाया जग तरतरले! वदुं० १

नटी—(अंगावर शहारे येऊन) प्राणनाथ! आपण ह्मणतां असा प्रकार हल्लीं खरोखरीच का होत आहे! का हें आपलें कांहीं तरी रूपक आहे!

सूत्र०—प्रिये! रूपक कशाचें! मी आतां ह्मटलें यापेक्षांही अधिक भयंकर प्रकार आजकाल या लोकीं घडून येत आहेत, त्यांचें नुसतें स्मरण झालें कीं अंगावर रोमांच उभे होतात, मग त्यांचें तोंडानें वर्णन होणें तर दूरच राहिलें! मात्र आश्चर्य एवढेंच वाटतें कीं, अशीं अनन्वित पातकें जगांत घडत असून त्यांकडे न्यायी परमेश्वराची डोळेझांक कशी होते!

नटी०—हं! एकूण प्राणनाथ! आपण गायनारंभीं जो परमेश्वराच्या सामर्थ्याविषयीं संशय बोलून दाखविलात, त्याचें हेंच बीज वाटतें!

सूत्र०—असें खरें.

नटी—प्राणनाथ! आपण असें ह्मणतां परंतु,

अंजनीगीत.

साधुजनांतें रक्षायातें,
दुष्ट जनांतें दंडायातें,
तैसें स्थापुनि सद्धर्मातें,
लोकां सुखवाया,
न्यायी, दयाळ तो भगवंत,
युगोयुगीं अवतारा घेत,
हें तो श्रीभगवद्गीतेंत,
वदले श्रीकृष्ण.

या उक्तीचा अजवरि आला
अनुभव बहुदा वाडिल जनाला,
त्यांची उक्ती मान्य अम्हांला
कां न बरें व्हावी?

श्रीकृष्णाचे शिशुपाळानें,
त्यापरि त्या हो वक्रदंतानें
केले, गिळिले परि त्या विभुनें
सर्वहि अपमान!

परि जैं शतमित अपमानांची
संख्या झाली, तेव्हा त्याची
करुनि नुपेक्षा, भगवंतेंचो
शासन त्यां केलें!

तैसे आजी असण्या काय
असेल सांगा प्रत्यवाय?
मग कां व्यर्थ, अहो पतिराय!
विभुतें निंदावें?

सूत्र०—अहाहा! प्रिये! धन्य आहेस! प्रिये! तुला काय सांगूं? इतका वेळ मी खरोखरीच मोहांधकारानें व्याप्त झालों होतों,

१. जन्मास.

१. बहुतवेळ. २. वक्रदंतानें. रद=दंत.

परंतु यावेळीं प्रत्यक्ष ज्ञानदीपच पुढें धरून तूं त्या अंधकाराचा नाश करून टाकला आहेस! खचित, स्त्री ही पुरुषाचा उत्तम मित्र होय असें जें म्हणतात तें कांहीं खोटें नव्हे! कारण,

पद.

लक्षण हेंचि सुमित्राचें
निगदिलें विबुधांहीं सांचें (ध्रु०)
पापाचरणा सिद्ध झाला
नर; तरि निवारितां त्याला;
समजुन सांगुनि गूढाला,
द्यावी सुहिताचरणाला;
जागुनि संकटकाळाला,
प्रकटवि अपुल्या सुगुणांला;
राखि अशा या आचरणातें–भाजन सुयशाचें,
नांव हो सुमित्राचि त्याचें!

नटी—प्राणनाथ! यांत माझी स्तुति ती कशाला करायला पाहिजे! कुटुंबिनींचें हें कर्तव्यच आहे!—बरें पण, प्राणनाथ! आपण मघां म्हणालांत, मी तुला इतक्यांतच पाचारण करणार होतों म्हणून, तर मला काय आज्ञा करणें असेल ती करावी!

सूत्र०—हो. बरी आठण केलीस! प्रिये! आज या सभाजनांपुढें आपणास नाटकप्रयोग कर्तव्य आहे, याकरितां पात्रवर्गाची यथास्थित व्यवस्था तुला केली पाहिजे!

नटी—आज्ञेप्रमाणें सर्व व्यवस्था करितें! परंतु नाटकप्रयोग कोणता करावयाचा, व आपणापुढें अपरिचित वेश धारण केलेले हे सभाजन कोण हें समजलें, म्हणजे सर्व व्यवस्था लावण्यास ठीक पडेल.

१. सांगितलें.

सूत्र०—फार उत्तम. प्रिये! पश्चिमदेशीं कालसमुद्राच्या[1] पलीकडे **मासिंदन**[2] नांवाचा देश आहे, तेथें **फिलिप** या नांवाचा प्रख्यात राजा होऊन गेला. सागराच्या पोटीं ज्याप्रमाणें रत्न उत्पन्न व्हावें, त्याप्रमाणें त्या राजमूर्तीचे उदरीं सकळ सद्गुणांचें अधिष्ठान, अपरंपार शौर्यौदार्यगुणांहीं युक्त, व सकलजनमहनीय, असें **शिकंदरशाह**नामक पुत्ररत्न उत्पन्न झालें आहे; या शिकंदरशहांची स्वारी दिग्विजय करीत, व आपल्या दुग्धधौत विमल यशाचा सर्वत्र प्रसार करीत, आज या आपल्या **गांधार**[3] देशीं प्राप्त झाली असून, तीच आज रंगदर्शनकौतुहलास्तव या रंगमंडपांत आपणासमोर अत्युच्च स्थानीं विराजमान झाली आहे!

नटी—(बहुमानानें) अहाहा! प्राणनाथ! आज आपण खचितच धन्य आहोंत. कारण भगवान् सहस्ररश्मि **सविता** प्रत्यक्ष उदित होण्याचे पूर्वीच ज्याप्रमाणें त्याची प्रभा दूरवर पसरून त्या तेजोनिधानाचें भावी आगमन सकल चराचरांस विदित करिते, त्याप्रमाणेंच ज्या विख्यात राजमणींची दिगंतसंचारिणी सत्कीर्ति अगोदरच पुढें येऊन तिनें त्यांचें भावी सुभगदर्शन या देशीं सर्वांस पूर्वीच कळवून ठेविलें होतें, तेच राजमणि आपणास व

१ काळासमुद्र. २. ग्राक इतिहासांत प्रसिद्ध असलेला मासिडोनिया नामक देश. ३. कंदाहार व त्याच्या आसपासचा प्रदेश.

आपल्या पात्रवर्गांस आपल्या कृपावलोकनानें अनुगृहीत करणार, तेव्हां आज आपलें केवढें भाग्य!—तरीच, आज प्रातःकाळींच लगबगीनें उठून भावोजी आपल्या सवर्गीयांस जवळ बोलावून या राजमणींचेच स्तुति करीत होते!

सूत्र०—प्रिये! या राजमणींच्या अंगचे गुणच तसे आहेत, याकरितां त्यांची प्रशंसा करावी तेवढी थोडीच, तथापि पुढील कर्तव्याकडे दृष्टि देऊन आतां आपणास आटपतेंच घेतलें पाहिजे. याकरितां थोडक्यांत सांगतों ऐक.

सार्या.

मूर्त शूरता अंगिं वसे परि, निधान करुण्याचें;
अनघअनाथा संकटिं बघुनी द्रवे चित्त बहु यांचे;
अभीष्ट पुरवीतो, संकटमुक्तीनें देतो.
अस्तुनि विधर्मी, परधर्मांचा हेवा हृदयीं नाहीं;
न्यायकठोरा दयामृदुत्वही वृत्तीं यांची पाहीं!
दुर्लभ गुण ऐसे, यांचे प्रियसखि! तूं परिसें.

नटी—बरें, प्राणनाथ! आपण वर्णन केलें अशा या विख्यात राजमूर्तींपुढें कोणचा नाटकप्रयोग करून दाखवायचा?

सूत्र०—(दुःखानें उसासा टाकून) प्रिये! काय सांगूं? आपणासमोर विराजमान झालेल्या या **शिकंदरशहां**नीं जिंकलेल्या प्रदेशांत **कलहपुरी** नांवाचें एक मांडलिक राज्य आहे, तेथील राजा **भद्रकेतु** हा अल्पवयस्क असून त्याचें राज्य सांप्रत त्याचा **लक्ष्मीकांत** नांवाचा सचिव चालवीत आहे. हा सचिव धनमदानें परम उन्मत्त होऊन आपल्या ऐश्वर्याच्या व अधिकाराच्या जोरावर आपल्या विचार्‍या अल्पवयस्क धन्यावरच कांहीं गूढ मायायोग चालवून कृतघ्नपणानें च्या समूळ नाशाच्याही उद्योगांत असावा, अशी कालच रात्रीं दूतानें वातमी आणिली; त्यावेळीं माझा कनीयान् बंधु **नटनाट** हा शहांच्या चरणसन्निध होता, त्याच्याकडे शहांनीं मोठ्या गौरवयुक्त मुद्रेनें अवलोकन करून झटलें:—"हे **नटनाटा**! "दूतानें आतां आणिलेली वातमी खरी "असल्यास फारच भयंकर असून रंगभू-"मीवर नाटकप्रयोगाच्या रूपानें करून "दाखविण्यास योग्य आहे; व असा "प्रयोग एकवार पाहण्याची माझी इ-"च्छाही आहे. यासाठीं दूताजवळून सर्व "हकीकत समजावून घेऊन उदईक मी "आपल्या मंत्रिमंडळासहित सभास्थानीं "वसलों असतां ती आम्हांपुढें अभिनीत "कर." याप्रमाणें आज्ञा होतांच **नटनाटा**नें त्वरा करून त्या दूतापासून संपूर्ण वृत्तांत समजून घेतला, व लागलीच शैलूषमंडळास पाचारण करून व प्रत्येकास काय काय करावयाचें तें नीटपणें सांगून आजच्या प्रयोगाची संपूर्ण सिद्धता केली आहे. मात्र पात्रवर्गीयांचे आगम निर्गम व यथोचित वेशपरिधान या गोष्टींकडे तुलाच पूर्ण लक्ष पोंचविलें पाहिजे!

नटी—जशी प्राणनाथांची आज्ञा! बरें, तर मग, जाऊं या! चला.

(दोघें जातात.)

तसेंच.

श्लोक.

वक्रा भ्रूतें करूनी, स्थिरहि नयनिंच्या राखुनी तारकेतें,
कोणप्रांतासि संकोचुनि,अरुनि तिरोभागिंही रक्तिम्यातें,
ही पार्श्वस्था क्षणोनी बघत तिजकडे मत्सराक्लिष्टचित्ता!
ईर्ष्या सोडी स्त्रियांतेंन कधि,भागिनिही ते सपत्नीत्व घेतां.

तथापि पुढें आपोआप घडणारी विशेष गोष्ट मनांत आणून इची मजवर प्रीति आहे हें उघड होतेंच आहे. कशावरून तर पहा.

श्लोक.

प्रवासाहूनी मी परतुनिहि आलों जरि, तरी
कृशांगी हर्षातें प्रकट मनिंचया हे न च करी ;
तथापी हा तीचा सकल पुलकीं देह भरला,
तयें गूढ प्रेमा मजवरि तिचा सर्व कळला.

सर्वा०—(वशिनीस) वत्से ! जा आणि माझ्या वचनेंकरून भगवान् **महेंद्र** आणि **उपेंद्र** यांना कळीव कीं, कुमार **मन्मथाचा रति** आणि **मायावती** यांच्याशीं पाणिग्रहणाचा मंगल विधि आटपून घेण्यास आजचाच मुहूर्त चांगला आहे असें मौहूर्तिंकांचें सांगणें आहे, तर या बागेंतच कल्पवृक्षांच्या तळाशीं कल्याणमंडपाची संपूर्ण तयारी झाली आहे, याकरितां आपण या ठिकाणीं आपल्या परिवारासहित सत्वर येण्याचें करावें.

वाशि०—जशी भगवतीची आज्ञा. (जाते, आणि पुनः एका पुरुषासहवर्तमान परत येऊन) भगवति ! आपला संदेश ऐकून भगवान् **महेंद्र** आणि **श्रीविष्णु** हे उभयतांही आनंदित झाले; व **श्रीविष्णूंनीं** आपणाकडे हा आप्त पुरुष पाठविला आहे.

पुरु०—(वंदन करून) भगवति ! भगवान् **श्रीविष्णूंचें** आपणास प्रणयपूर्वक एवढेंच सांगणें आहे कीं, याच क्षणीं वत्सा **देवसेना** आणि **इंद्रसेना** यांचा **कार्तिकेयाशीं** विवाह होत आहे, यास्तव आपण **राग** आणि वत्स **मन्मथ** यांसहवर्तमान आतांचे आतां येऊन तेवढा विवाहमहोत्सव अनुभवावा, व लागलीच परत येऊन आपण सर्वजण वत्सा **रति** आणि **मायावती** यांचा पाणिग्रहणविधि आटपूं.

सर्वा०—(आनंदानें मन्मथास) वत्सा ! **तारकासुराचा** वध केला हा **कार्तिकेयाचा** देवेंद्रावर व **श्रीविष्णूंवर** मोठाच उपकार झाला आहे, यास्तव त्यांचें हें करणें फारच योग्य आहे; आणखी शिवाय शिष्टाचारही असाच आहे कीं, अगोदर कन्यादान करावें, आणि मग सून घरांत आणावी. यासाठीं तुझ्या दर्शनाविषयीं फारवेळ उत्सुक झालेल्या गुरुजनांच्या भेटीस जा. (पुरुषाकडे पाहून) अरेबाबा, तूं जाऊन भगवंतास सांग कीं, मी व महाभाग **राग** अशीं उभयतां या दोघो वत्सांच्या विवाहविधीची तयारी करण्यांत गुंतलों आहों, याकरितां आम्हीं येथें राहूनच तिकडचा महोत्सव सर्व ऐकत रहातों!

मन्म०—जशी भगवतीची आज्ञा ! (वंदन करून पुरुषासहवर्तमान निघून जातो.)

रति व मायावती—(उत्कंठित होऊन आपणाशीं) हृदया ! तुझा मनोरथ सिद्ध होण्यास फार तर पांच सहा क्षणांचाच अवकाश आहे, असें असतांही तूं इतकें उत्कंठित होतेंस हें काय बरें ? अथवा म्हणतात ते कांहीं खोटें नव्हें, सगळा सैंपाक तयार होत आला असतांही त्याची वाफ जिरण्याचा

१. सवतपणा. २. रोमांचांनीं. ३. मुहूर्त सांगणारे जोशी.

देखील मनुष्यास उशीर वाटूं लागतो ! (इतक्यांत पडद्यांत दिव्य दुंदुभिध्वनि होऊन पुष्पवृष्टि होते.)

सर्वा०—(ऐकून हर्षानें) हें कल्याणी **देवसेना** आणि **इंद्रसेना** यांचें पाणिग्रहण झालें असें मला वाटतें !

वशि०—(कान देऊन ऐकून आनंदयुक्त त्वरेनें) भगवति ! सर्व दिशा भरून टाकणारा असा हा नानाविध मंगलवाद्यांचा ध्वनि आपल्या गच्चीवर होऊं लागला आहे, यावरून जानवशाचे लोक जवळ आले असें मला वाटतें !

सर्वा०—शुभकार्यांत अशी त्वरा झालेली फारच शोभते ! (मुदिता आणि राग यांस उद्देशून) महाभागानो ! तुह्मींही या दोघी वत्सांसह-वर्तमान विवाहमंगलवेदीकडेस चलावें ! (सर्वार्थसाधिका व वशिनी खेरीज करून बाकी सर्व जातात.)

सर्वा०—(त्यांजकडे पाहून) वाहवा वाहवा ! हे संबधिजन येऊन पोंचले देखील ! (त्वरेनें उठून त्यांस ह्मणते.) यावें ! आपलें स्वागत असो ! ह्या मौल्यवान बिछायती घातल्या आहेत यांजवर बसावें आपण ! (ते सर्वजण आसनावर बसल्यानंतर आपणही आपल्या आसनावर बसते.)

(इतक्यांत पडद्यांत दोघां उपाध्यायांपैकीं एकजण ह्मणतो.)

श्लोक.

स्वस्वस्थानीं महर्षी, अमर सकलही, बैसले जैं सभेंत,
अद्रींद्रें[1] देखतां त्यां तइं निगदियलें[2] आपुले वंशवृत्त;
पाळी मागूनि आली जइं पशुपतिचा स्वान्वयां[3] सांगण्याची,
स्वीकारी मौन आधीं, परि मग वदण्या सिद्ध झाला विरिंची[4].

१. पर्वतराज हिमालयानें. २. सांगितलें. ३. आपला वंश. ४. ब्रह्मदेव.

हें पाहूनी समस्त त्रिदशगण तसे सर्वही ते महर्षि 'आहे ठावें अह्मांला सकल, अह्मि मनीं सर्व आहोंत हर्षी' बोलोनी या प्रकारेंकरूनि अनुमत स्वीय वाङ्निश्चयातें, दती, तो दूर नेवो दुरित पळवुनी, नित्य रक्षो तुह्मांतें !

वशिनी—(आनंदानें) भगवति ! वधू आणि वर यांच्या वाग्दानसंपत्तीचें सूचक हें पद्य आहे !

(इतक्यांत पडद्यांत पुनरपि मंगलवाद्यें वाजल्यानंतर दुसरा उपाध्याय ह्मणतो.)

पद.

देउत कल्याणा मुक्ता[2],
परिणयसमयीं ज्या मुक्ता[3] ! ध्रु०
गिरिवरबाळी, शशिमौळी,
जुळिती उभयहि अंजूळी,
पडतां त्यांत तया काळीं
स्वेदजळकांति[4] जैयां[5] आली ! १
नंतरि मस्तकिं उभयांच्या
टाकितां भंवती चंद्राच्या,
जाणों राशिच तारांच्या
लागल्या वाटाया सांच्या ! २
सकळहि होउनियां मुदित,
विकिरतां[6] भंवति असंख्यात,
कांतीयोगें लखलखत
सुमनःसुमनांपरि[7] गमत ! ३

सर्वा०—(आनंदानें) वाहवा! वत्सांच्या पाणिग्रहणाचा मंगलविधि आटपला !

(इतक्यांत फिरून पडद्यांत.)

भगवति! आमचा आदरसत्कार उत्तम प्रकारें झाला, आतां आह्मांस स्वगृहीं जाण्याची आज्ञा असावी ! हा पहा वधूंसहवर्तमान

१. देवसमुदाय. २. मोतीं. ३. टाकिलेल्या. ४. घर्मोदकाची शोभा. ५. ज्या मोत्यांना. ६. फेंकून देतां. ७. सुमनस्=देव, त्यांचीं सुमनें=पुष्पें. देवांनीं उधळिलेलीं फुलें.

वत्सु मन्मथ 'आपणास वंदन करण्याकरितां येत आहे.

सर्वा०—(संबंधिजनांचा आदर सत्कार करून) यावें ! आपलें आगमन झालें येणेंकरून हें कुळ कृतार्थ झालें ! (तदनंतर विवाहालंकार धारण करणारा मन्मथ वधूवेश धारण करणाऱ्या आपल्या प्रियतमांसहवर्तमान येतो.)

मन्म०—(आनंदानें आपणाशीं) अहो ! दैव अनुकूल असलें झणजे त्याचा परिणाम किती रम्य होतो झणून सांगावा ! पहा !

साक्या.

प्रथम शुभाचा अंकुर बाहिर आल्यावरती, त्यातें
उन्मेषस्थितिमध्यें दुर्ग्रह[1] पाहे नाशायातें.
परंतु त्याचा पुनरपि गेला होउनियां परिहार,
मंगलरवयुत मंगल[3] मज अजि प्राप्तचि हें साचार !

सर्वा०—(वधूसहित मन्मथास पाहून आनंदानें आपणाशीं)

आर्या.

मायावतीरतींच्या मध्यें स्मरवीर धीर शोभतसे,
जाणो चंद्र उभयतां पूर्वोत्तरफल्गुनींमधें विलसे.

मन्म०—(नम्रपणें पुढें जाऊन प्रियासहवर्तमान सर्वार्थसाधिकेचे गाय धरतो.)

सर्वा०—(प्रेमानें त्यांचें अभिनंदन करून)

गाणें.

कुमारा मारा, पावें कल्याणातें,
या सुकुमारा, पावुनि दोन वधूतें ! ध्रु०
जशा सिंधुच्या वेला, तैशा या तूतें
निरंतरी लाधोनी, देउत सौख्यातें !—१
बाईगे रति ! तूं मायावती !
तुझां सुदैवें हा, योग्य मिळाला पती ! २
चिरकाळ रहा एकत्र, नका होऊं सवती,
जाणों गंगायमुना, सुखीत्व आदरिती ! ३.

मन्म०—भगवति ! उपचाराचें बोलणें फार बोलावयासच पाहिजे असें नाहीं ! आह्मीं आपलीं लेकरेंच आहोंत, तेव्हां आमचे ठायीं जें आपलें वात्सल्य त्यास अनुरूपच आपलें वर्तन झालें.

सर्वा०—वत्सा ! देवी सिंहासनेश्वरीची मला अशी आज्ञा झाली आहे कीं, वत्से ! विवाहोत्सव आटपला, झणजे योग्य वेळ पाहून वत्सा मन्मथास मी आपलें दर्शन देऊन कृतार्थ करणार आहें !—

मन्म०—भगवति ! मी धन्य झालों ! आतां मी याशिवाय आणखी दुसऱ्या कशाची इच्छा करावी ?

सर्वा०—वत्सा चल श्रीमातेच्या चरणकमलांचें दर्शन घेऊं. (असें बोलून उठते, व पडद्याकडे पाहून रागमहाराजांस निमंत्रण करून मन्मथ व दोघी स्त्रिया यासह चालत चालत, उंच गोपुरें ज्याची आहेत अशा श्रीपुरास येऊन पुढें पाहून) वत्सा ! हें पहा मातेचें मंदिर ! अत्यंत मौल्यवान् अशा रत्नांच्या योगानें हे किती सुंदर दिसतें आहे ! यांत आतां प्रवेश करूं या. (सर्वजण आत प्रवेश करितात.)

मन्म०—(चोंहीकडे पाहून आश्चर्यानें आपणाशीं)

आर्या.

या मातृमंदिराचें तेजचि सूर्यादिकांस लाजवितें;
आश्चर्य काय मग जरि इतराचें नेत्र पाहतां दिपतें !

(तदनंतर सिंहासनावर बसलेल्या भगवान् कामेश्वराच्या अंकावर बसलेली देवी प्रवेश करिते. बाजूस विभवानुसार परिवारही आहे.)

देवी—(सर्वार्थसाधिकेच्या मागून वधूवरें येत असतां त्यांस पाहून आपणाशीं) या वत्सेनें माझी

१. उमलण्याची अवस्था. २. वाईट ग्रह. अर्थात् संकट. ३. मंगल (वाद्यांच्या) शब्दांनीं युक्त. ४. कल्याण. ५. पूर्वा फाल्गुनी आणि उत्तरा फाल्गुनी हीं दोन नक्षत्रें.

आज्ञा तर पार पाडिली; व या वत्सा कामाची कामनाही परिपूर्ण झाली आहे.

(प्रसन्न होऊन सर्वांस अनुग्रहयुक्त कटाक्षांनीं अवलोकन करिते.)

मन्म०—(जगदंबेस दृष्टीनें पाहून हर्ष, रोमांच आणि त्वरा यांहीं युक्त होऊन)

पद.

धन्य धन्य अजि पुण्यचि माझें, उदयाप्रति आलें
ललितेचें[1] सुललित दर्शन, आजि मला घडलें!—
सर्वांगातुनि हें किरणांचें, सांद्रचि जाळ[2] निघालें,
अखिल दिशा बालार्कपरंजित, जाणों मना गमलें!

अहो! आज मी अत्यंत कृतार्थ झालें यांत संशय नाहीं! कशावरून तर पहा!

श्लोक.

जात्वा जे समुदार[3], शुभ्र कमळा ऐशीच कांती जया
तापाच्या त्रितया निवारिति जगीं ज्यांनाजि ऐशी दया
जे मातें बघतां सुवेहुनि बहु संशीतें[4] वाटती,
हार्द्यस्नेरें[5] अशा स्वकीय नयनीं माता मला पाहती!

(असें बोलून त्वरेनें जवळ जाऊन दोघीं प्रियांसह वर्तमान देवीच्या चरणांवर रत्नें उधळून तिला साष्टांग नमन करितो.)

देवी—वत्सांनो! आनंदी व्हा! तुमचें कल्याण असो!

सर्व०—उठा! वत्सांनो! उठा! जगदंब तुम्हांस प्रसन्न झाली आहे.

मन्म०—(वधू सहवर्तमान उठून उभा रहातो, हात जोडून आनंदानें सद्गदित होऊन)

श्लोक.

त्रिभुवनजननी तूं कामराजोकवर्ती[1],
त्रिपुरानिधनकर्त्री[2] पूर्ण कारुण्यमूर्ती!
जय जय जय माते! वत्सु हा वंदिताहे!
सतत मजसि नेत्रें सुप्रसन्नेंचि पाहें!

पद.

जगदंबा[3] पदकमला,
अतितर विमला, (अतितर विमला)
वंदूं हा जन सजला. ध्रु०
प्रार्थंत महिमा सदनार्य[4],
भक्तकामदुघा सार्थ[5],
नमिति पद केडामनाथ,
सुहृदीकृतमध्यमार्थ[6],
कमलोद्भवप्रभृती[7],
त्रिदिवेशतती[8], (त्रिदिवेशतती)
प्रसादार्थ पदिं लोळती. १
प्रियंक[9]-विपिनवासलोल,
प्रिय अभिनव सतत बोल,
स्वपदनिरतभद्रलोल[10],
ख्याति तुझी नाहिं फोल,
दंडक दुष्टजनांतें,
असशी माते, (असशी माते)
साक्षा आगमें[11] यातें. २

१. ललिता नामक देवीचें. २ अतिशय सुंदर. ३. दाट. ४. जाळें. ५. बालसूर्यकिरणांनीं रक्तवर्ण. ६. अत्यंत उदार. ७. अतिशय शीतळ. ८. हास्य-स्मितयुक्त.

१. कामराज=कामेश्वर=वर आहेलें तंजावरानजीक श्रीपुर येथील सांबाचें नांव. २. मृत्यु. ३ प्रख्यात. ४. साधूंच्या रक्षणाकरितां. ५. भक्तांच्या इच्छा पूर्ण करणारी कामधेनुच जशी. ६. मध्यमपार्थ म्हणजे अर्जुन, तो ज्यानें सुहृद म्ह० मित्र करून घेतला आहे असा भगवान् कृष्ण (अर्थात् विष्णु). या ठिकाणीं 'पार्थ' याचा अर्थ केवळ 'पृथापुत्र' एवढाच न समजतां सामान्यतः 'पांडव' असा समजावा. ७. कमलापासून उत्पन्न झालेला ब्रह्मदेव. ८. त्रिदिवेश=देव, यांच्या तति=समुदाय. ९. 'प्रियक' म्ह० कदंब अथवा कळंबाचा वृक्ष. १०. स्वपदनिरत=आपल्या पायीं रत असे भक्त, त्यांच्या कल्याणाविषयीं लोल म्ह०तत्पर. ११. घेत.

कचभर हा भ्रमरसदृश,
वदन दुजा यामिनीश[1],
बिंबत्दृश[2] अधरदेश,
नेत्र मृगीप्रतीकाश[3],
संशय यांत नसे.
वक्षोज तसे, (वक्षोज तसे)
कुंभ गजाचे जसे ! ३
कंबुपरी[4] कंधरा हि,
बाहु लतासंघद्रोहि,
हरि[5] तुज निज पृष्ठिं वाहि,
भाग्य तुझें ऐसें पाहिं,
अंबरसदृश वलग्न[6],
वर्णिल कोण, (वर्णिल कोण)
वस्त्र सुदीर्घ सुशोण[7]? ४
देवि ! तुझें कनककर्दल[8]-
मदारंभजयनशील,
सुंदरतम ऊरुयुगुल,
जनन तुझें परम विमळ,
कांती तव देहाची,
जिंकिते सांची (जिंकिते सांची)
सूर्यसहस्रमरीची[9] ! ५

पद.

अभिनव यौवन संतत परिचित देवी! तुजला असे;
वामांकस्थित कामेशाच्या तव तनु ही विलसे. ध्रु०
जयाभोंवतीं उंच गोपुरें रत्नकांतिभासितें,
जाणों मेरूचीं हीं शृंगें भासति चित्तातें,
ऐशा श्रीपुरनगरीं चिंतामणिमंडित सद्म तें,
नयना पद्मच्छटामनोहर जें बघतां वाटतें,
अशा मंदिरीं देवी! तूं राहशी,
पंचमूर्तियुत मंचकि तूं पहुडशी,
निजानंद चिर मानसिं अनुभविशी,
ऐश्वर्य तुझ्या ऐसें कोणा त्रैलोक्यींही नसे,
जगज्जननि! तुज दास तुझा हा भावें वंदित असे ! १
अणिमा, गरिमादिक, तव भंवती शक्ति मनोदेवता
संतत वसती नवावृत्तियुक्स्यंदनिं[1] तूं असतां;
त्या शक्ती तुजलागुनि माते! भक्तिभरें वंदितां,
जवळिल मांत्रिणि 'सावध' ह्मणती तुजलागीं तत्वतां !
दंडनाथही[2] नचि तव सेनापती,
संगें तुझिया दंती वाजी किती,
लक्ष्मि सरस्वति तुज पार्श्वीं सेविती,
अविकृत तरि तूं, वंदिति योगीजन ते तुज मानसें,
दंडितभंडे[3] ! भासुरभूषे[4] ! तुजला मी नमितसें ! २

पद.

देवि ! तव ! कृपादृष्टि मजवरी,
खचितचि मोठी !
जसा का महानदीचा पूर,
तसा तव कृपापूर थोर
मजला लोटी! ध्रु०
योगिजनांचा योग भंगिला
केलि लटपटी;
शिव विभु भोगलुब्ध केला,
थोर हतोटी;
शंबर मायावी पातला,
झोडिला पाठीं,
रतिप्रतिकृति[5] मायावतिला
स्वरथीं घेऊनियां चालिला,
तो मीं पराक्रमें मारिला!
भाग्य मी गाठीं ! १
नातरी संख्या अतिलाहन
सुमबाणांची;
जयाची सहज किंज कमान
गोष्ट ही धनुची;
अतिशय शिथिलचि मौर्वीगुण,

१. चंद्र. २. तोंडल्याप्रमाणें सुंदर. ३. 'प्रतीकाश'=सारखें. ४. शंखाप्रमाणें. ५. सिंह. ६. मध्यप्रांत. ७. लाल भडक. ८. 'कदल'=कदली, केळी. (कदलश्च कदल्यासाविति व्याडिः—अमर० कां० २ वनौ० व० श्लो० (२१३ टीका पहा.) ९. 'मरीचि'=किरण.

१. नऊ आवर्तांनीं युक्त अशा रथांत. २. यम. ३. दंडिला आहे भंड नामक दैत्य जिनें अशी (संबो०). ४. भयंकर भूषणें धारण करणारी (संबो०). ५. रतीचें चित्र,

न शंका याची;
स्यंदेन मंद; बल अबलाजन;
सुदैवाग्य तें मात दोन;
कशाला या साममीकरुन
जयाची गोष्टी ? २

दंडक.

शरण तुजसि हा असे दास आला! अविद्येमुळें होउनी मोह याळागें, वेदांतवेद्ये! स्वकीयाहि नेणे हिताला! तयें गर्भवासादि दुःखें सदा सेवितो!
धरित हृदयिं पुत्रभार्यापशुक्षेत्रमित्रादिकीं प्रेम! दग्धोदराच्या प्रपूर्त्यर्थ विद्युच्चला लक्ष्मियोगें प्रमत्त क्षितीशांसि सेवूनि दुःखा परा पावतो!
तदुपरिहि न सोडुनी धीर, देशांतरीं जाय; तेथेंहि विक्षेप शत्रू करीती! अशामाजि, दूर्वाग्रखेलत्तुषारांपरी भंगुर प्राण, हें नोळखी अंबिके!
विफळ गमवितो निजायू अनालोक पंगूपरी! यावरी तू प्रसादा करीं! देवि! निःश्रेयसा देउनी धन्द कीजे! नमस्ते! नमस्ते! समस्तेहितप्रापिके!

गाणें.

कुसुमनिचय शरसंचय जीचा,
पुंड्ररसाल शरासन जयेचा,
ऐसे पुररिपुभार्ये! नंदन
भावें करितो हा तुज वंदन!

श्लोक.

ब्या तुझ्या पदपंकजासि नमिती ब्रह्मादि सारे सुर,
त्यातें सोडुनि, अल्पेंद स्तवुं अहा! मी काय देवांतरें
सुप्रापा असतां जरा मरणही नाशील ऐशी सुधा,

१. रथ (मन्मथाचा)=मद शीतळ मलयवायु. २. 'सुहृत्'=मित्र (वसंत ऋतु). ३. आडथळे, कार्यनाश. ४. आपलें आयुष्य. ५. आलोकहीन, आंधळा. ६. मोक्ष. ७. सर्व ईहितांस (इच्छितास) पोंचविणारी सर्व इच्छा पूर्ण करणारी (संबो०). ८. पुंड्र जातीचा ऊंस. ९. ज्याच्या योगें बाण फेंकावयाचा तें धनुष्य. १०. थोडकें देणारे. ११. इतर देव. १२. सहज मिळण्याजोगी.

वेडाही घन मेंढिचें पय कधीं सेवीलका तो मुंबा?
(याप्रकारें स्तवन करून पुनरपि वंदन करितो.)

देवी—(अनुग्रहपूर्वक) वत्सा! तुझी काय इच्छा आहे कथन कर पाहूं?

मन्म०—मातः! दुसरी काय—(इतकें अर्ध बोलत आहे तोंच अत्यानंदनिमग्न होऊन जातो व बोलतो.)

पद.

इच्छित वस्तू सिद्ध जाहलिस द्यावया मजला जरी,
कासया मागुं दुजें मी तरी? ध्रु०
कुंतलभारीं कोर शशीची; मंद स्मित आननीं;
भरली पूर्ण दया ती मनीं;
तुंग स्तनतट; नितंब पविर; मृदुलें अणि पावनीं
पदाब्जें, चुकविति जीं मृति जनी;
ल्यालिस तैशी सुशोण वसना; हर जणों दिनमणी
ख्याति जें संतत हृदयीं मुनी;
अशा तव सन्निध्याचा मला
लाभ नित्य तो व्हावा, या हेतुला
पुरविजे प्रार्थना हेची तुला.
सर्वमंगले! मंगलरूपिणि! भक्तकामदा खरी!
अनृत नचि वेदांची वैखरी!

देवी—वत्सा! या ठिकाणींच माझ्या मंदिराजवळ जी शृंगारपरिखा आहे, तिजमध्यें वास्तव्य करून तूं आपला अधिकार चालवीत जा!

मन्म०—(नेत्र आनंदाश्रूंनीं युक्त होत्साता) अहाहा! मातुश्री! यावेळीं आपण मला कल्याणांच्या अतिभूमीप्रतच पोंचविलें यांत संशय नाहीं!

१. व्यर्थ. २. शृंगारमंदिर. शब्दशः 'पारिखा'=तटा भोंवतील खंदक. आवरून खंदकानें वेष्टित मंदिर असें समजावयाचे.

देवी—वत्सा! बोल! याहून आणखी तुझें कोणतें प्रिय करूं?

मन्म०—(वंदन करून) माते! याहून मला आणीक प्रिय तें काय असणार?

साक्या.

या बाणांनी विरूपाक्ष विनु माते! म्यां वश केला!
मायाडंबर शंबर तोही रणांगणीं म्यां वधिला!
मागत असतां एक रति, दुजी मायावतिहि मिळाली!
असतां त्वत्सानिध्यीं दुसरी आशा कोठुनि उरली?

तथापि असे असो!

(भरतवाक्य.)

श्लोक.

राजे धार्मिक शत्रुनाश करुनी पावोत ते सन्मुदा!
वर्षोनी घनवर्ष मेघ विपुलें देवोत शस्यें सदा!
धीरोदारसुधीगृहांतरिं करो सद्व्यासि पद्मालया!
चातुर्वर्ण्य रत स्वधर्मि मिळवो सर्वोत्सवा अक्षया!

(सर्व निघून जातात.)

१. दाट वृष्टि करणारे. २. लक्ष्मी.

समाप्त.

॥ श्री ॥

नाट्यकथार्णव मासिक पुस्तकांत छापत असलेलें

रतिमन्मथ नाटक.

हें पुस्तक

शंकर मोरो रानडे बी. ए.

ह्यांनीं

पंडितराय जगन्नाथ यांच्या मूळ संस्कृत ग्रंथाधारें केलें.

तें

मुंबईंत

"इंदुप्रकाश" व "नेटिव ओपिनियन" छापखान्यांत छापिलें.

(सन १८६७ चा आक्ट २५ प्रमाणें या पुस्तकासंबंधी सर्व प्रकारचे हक्क ग्रंथकर्त्यानें स्वाधीन ठेविले आहेत.

शके १८०३.

सन १८८१ इ०.

पात्रें.

सूत्रधार .... नाट्याचार्य.

नटी. .... त्याची स्त्री.

महेंद्र .... देवांचा अधिपति.

वाचस्पति. .... देवगुरु.

राग .... रतिजनक.

मन्मथ .... उपेंद्रपुत्र, नाटकाचा नायक.

विदूषक .... त्याचा मित्र.

नारद .... ब्रह्मदेवपुत्र.

शिष्य .... नारदाचा.

कंचुकी .... मन्मथाचा.

वसंत .... मन्मथाचा मंत्री व मित्र.

द्वौवारिक. .... महेंद्राचा द्वारपाळ.

२ जासूद. .... मन्मथाचा प्रस्थानवृत्तांत सांगणारे.

२ चर. .... मन्मथाचा शंकराकडील वृत्तांत सांगणारे.

प्रतीहार .... महेंद्राचा.

पुरोहित .... रागाचा उपाध्याय.

चारण .... महेंद्राचा वातमी पोंचविणारा.

सारथि .... मन्मथाचा.

कोकिलक .... मन्मथाचा वातमीदार.

शंबर .... दैत्य, रतीचें हरण करणारा.

देवी	श्रीपुरची मुख्य देवता, परदेवता, कामेश्वराची पत्नी.
सर्वार्थसाधिका	परदेवतेची चतुर्थावरण देवता.
मुदिता	रतीची माता.
वशिनी	सर्वार्थसाधिकेची शिष्या.
रति	राग व मुदिता यांची कन्या, नायिका.
मायावती	रतीच्या संरक्षणार्थ सर्वार्थसाधिकेनें निर्माण केलेली रतिप्रतिकृति.
कीरवाणी, कोकिलवाणी	रतीच्या सख्या.
पारिचारिका	मुदितेची दासी.
मयूरिका, सारिका	दोन दासी.

श्लोक.

रक्षी अनाथा जगदेकनाथ,
होईल कैसा वनिं तत्प्रमाथ ?
सद्बुद्धि देवो•प्रभु हिंसकांना,
रक्षोन यातें मृग. कीर मैना!

मीं पूर्व जन्मीं कोणतें पातक केलें होतें, कीं हा प्रसंग मजवर आला आहे! असो; ईश्वराचो मर्जी ! (त्या बाळाला घेऊन निघून जाती.)

चंद्र०—दुसऱ्याचें पोर आपलें म्हणून मी कां वाढवूं ?

१ सेवक—महाराज ! हारीतक आणि विद्यासागर याजकडून दूत आला आहे. त्यानें सांगितलें कीं ते श्रीशैलाहून परतले. एक दोन दिवसांत येथें येऊन दाखल होतील.

१ सर०—महाराज ! इतके लवकर येतील असें नव्हतें वाटलें !

चंद्र०—त्यांना आज जाऊन तेवीस दिवस झाले. तेव्हां लवकर आले, यांत संशय नाहीं. गुरूवर्य आनंदनिधींचा निदेश केव्हां येईल असें मला झालें आहे. गुरूवर्य सर्व संशयाचीं निवृत्ति करितील, आणि तत्व काय आहे तें सांगतील. सरदारहो ! अधिकरणिकांस सांगा, कीं रात्रींच्या अपराधाची चौकशी कर्तव्य आहे, तेव्हां न्यायसभेंत यावें. आमचा आरोप सर्वांस कळला आहे, तेव्हां न्यायही सर्वांसमक्ष होणे विहित आहे. ती जोंपर्यंत जिवंत आहे, तोंपर्यंत माझ्या जिवाला सुख नाहीं. मीं सांगितलें एवढें करा. जा कसे. आणि आंत कोणालाही येऊं देऊं नका. (सर्व जातात.)

१. त्याचा छळ.

अंक ३.

प्रवेश १. स्थळ—सिंहलद्वीपांतील एका नगरींतील रथ्या.

(विद्यासागर आणि हारीतक येतात.)

विद्या०—खरेंच बोवा ! आपण असलें रम्य-स्थळ यापूर्वीं कधींहीं पाहिलें नव्हतें ! काय त्याची शोभा वर्णावी !

श्लोक.

गिरिवरशिखरें तीं भेदिती मेघमाला!
अतरुण तरुराजी शोभवी काननाला !
वितते रव विसर्पें कंदरीं निर्झरांचा!
पवन सुरभि वाहे सांद्र तो केतकीचा!

हारी०—माझे तर

श्लोक.

तृणांहीं काष्ठांहीं विरचित अशी पर्णकुटिका
मुनीची देखनि नयन रमले!—पुण्य घटिका!
अहा! झाली दिव्या तप विचरुनी कांति मुनिची
तयाच्या उत्कर्षें सतत धुति होते अवनिची !

विद्या०—या आनंदनिधींची मूर्ति पाहून माझें मन तर निश्चल झालें ! त्यांच्या पहा

श्लोक.

माथां शोभे भार जिंगां जटांचा
भस्में सारा चर्चिला देह सांचा;
हस्तीं लोला पुण्य रुद्राक्षमाळा ;
कस्तूरीचा तो टिळा भव्य भाळा.

हारी०—गुरुंना महाराजांनीं सांगितलेलें वृत्त कळविलें, आणि त्यांनीं हें आज्ञापत्र दिलें आहे, आणि सांगितलें कीं, हें राजसभेतच महाराजांस द्यावें. यांतील मजकूर. काय असेल कोण जाणें ! तो आमच्या आईसाहेबांना अनुकूल असा ठरावा एव-

१. पसरलेला. २. दाट. ३. रक्षण.

देंच माझें परमेश्वरापाशीं मागणें आहे! त्याप्रमाणें घडून आईसाहेबांवरील आरोप नाहींसा होईल, तर आमच्या या दीर्घ प्रवासाबद्दल आह्मांला एवढा सुद्धां खेद वाटणार नाहीं!

विद्या०—असो; काय गुरुजी करितील तें पहावें! पण खरेंच, महाराजांचें हें करणें मला नाहीं आवडत! व्यर्थ या माउलीचा छळ होत आहे!

हारी०—सोक्ष मोक्ष याचा आतां लवकरच होईल. गुरुजींनीं हें आज्ञापत्र मुद्रित करून दिलें आहे. त्यांचा निदेश असेल त्याप्रमाणें सर्व पुढें घडेल. **आनंदनिधि** त्रिकालज्ञ आहेत, तेव्हां सत्य काय असेल तेंच बाहेर पडेल! ईश्वर करो आणि याचें पर्यवसान राज्ञीस शुभावह होवो! चला आपणाला लवकर गेलें पाहिजे.

(जातात.)

प्रवेश २. स्थळ—सिंहलद्वीप—न्यायसभा.

(चंद्रकांत, सरदार, अधिकरणिक, परिवार आपआपल्या स्थानीं बसले आहेत.)

चंद्र०—अहो न्यायमूर्ति! हा व्यवहार चालवितांना आह्मांला फार वाईट वाटत आहे! कारण, यांत अपराधिनी आमची पत्नी आहे!—ही राजभार्या आणि राजकन्या आहे,—इजवर आमचें प्रेम आजवर फार असे,—इतकेंही असून ज्या अर्थीं आह्मीं हा व्यवहार चालविणार, त्या अर्थीं तसेंच कारण असलें पाहिजे हें आपणालाच दिसून येईल! खरोखर ही निरुपायाची गोष्ट आहे.—राजानें उगीच छळ केला आहे, असा पौरांनीं मजवर दोषारोप करूं नये, ह्मणून या कार्यास मी प्रवृत्त झालें आहें! आपण न्यायमूर्ति आहां, तेव्हां यथान्याय आपण वर्तालच! या व्यवहारांत जें निष्पन्न होईल,—मग त्यांत राज्ञी सदोष ठरो कीं निर्दोष ठरो—तें आह्मांला मान्य आहे! आतां राज्ञीला घेऊन या!

अधि०—जारे वेत्रधरा! राज्ञीला न्यायसभेंत बोलाविलें आहे ह्मणून सांग, आणि त्यांना घेऊन ये.—पौरजनहो! शांत चित्तें असा!

(वेत्रधर जाऊन परत येतो. इंदुमती, रक्षक, यशोदा आणि दासी हीं येतात.)

चंद्र०—अहो! अधिकरणिक! व्यवहारपत्र वाचावयास सांगा!

अधि०—अहो कायस्थ! व्यवहारपत्र वाचा पाहूं.

कायस्थ०—(वाचतो.) "कार्यार्थी **सिंहलद्वीपाधिपति चंद्रकांत** महाराज, यांचा वाद त्यांची पत्नी **इंदुमती** राज्ञी यांच्याशीं. व्यवहार हा कीं, **इंदुमती** राज्ञीनें **मद्रदेशाधिप सुधन्वा** राजा याशीं व्यभिचार केला; महाराजांचा ह्मणजे आपल्या पतीचा प्राण हरण करावा एतदर्थ **सत्यव्रतास** साहाय्य केलें; आणि हा हेतु कांहीं कारणांनीं बाहेर आला, तेव्हां त्यांनीं ह्मणजें **इंदुमती** राज्ञीनीं त्याचें जीवित रक्षावें. या हेतूनें रातोरात त्यास पळून जावें असें सांगून त्याला साहाय्यही केलें; असे तीन आरोप यांजवर आहेत!"

इंदु०—

पद.

का करितां छळहो माझा,
मीं केलें काय अगाई? ध्रु०
वांकडे न पडलें माझें

१, फिर्यादीचा सारांश.

तें पाऊल कधिंही बाई!
परि बोलों व्यर्थ कशाला,
विश्वास न माझे ठाई.
बोलेन जरी मी कांहीं, म्हणतिल हें सत्याचि नाहीं.
मी लीन प्रभूच्या पाईं! १
आहे जरि ईश्वर साक्षी,
जरि आज न लोपे धर्म,
तरि भग्न मनोरथ होती
दुष्टांचे; सांगें वर्म.
सत्याचा लोप न होतो, जागें जागृत ईश असे तो,
तो आज न रक्षिल काई? २
मीं खोटें कर्म कदापि
यापूर्वी केलें नाहीं.
हें असह्य मजला दुःख,
तनु सारी माझी दाही!
मी सिंहलपतिची भाजा, मी कलिंगभूपतनूजा,
बाल नंदनाची आई! ३
नृपसभेंत ओढुनि नेलें
राजानें धरुनी मातें,
हा लहान का अपमान
सांगाहो कुलवनितेनें?
या प्राणांस्तव मी मानीं, परि शीलधनातें हानि-
प्राकारितां जळतें बाई! ४
राजाचे मजवर कैसें
तें निश्चळ भारी प्रेम!
मद्राधिप आला तेव्हां
नच उरलें ह्यावें नाम!
जरि यांत असे मम दोष, मज जाओ देव सरोष.
दृढ भक्ती त्याचे ठाई! ५

चंद्र०—आधीं पाप करायाचें धाडस ज्याच्या हातून होतें, त्याच्या हातून तें केलें नाहीं असें खोटें सांगण्याचें धाडस होणार नाहीं, असें नाहीं. तेव्हां नुसतें नाहीं म्हटल्यानें लोकाना खरें थोडेच वाटणार आहे?

इंदु०—माझें म्हणणें खरें न वाटेल तर न वाटो! दुसऱ्यांचा दाखला मला कांहीं देऊं नये! मीं खरें सांगितलें!

चंद्र०—हें कांहीं खरें नाहीं!

इंदु०—खरें आहे तेंच मीं सांगितलें! मजवर कोणीं अंगीं दोष लावूं लागेल, तर मी कशी लावून घेईन? **सुधन्वा** राजाच्या संबंधानें मजवर बालंट घेतलें आहे, याला काय वेरें आधार आहे? त्यांचें आदरातिथ्य केलें खरें; पण यांत कांहीं दोष आहे काय? आपल्या घरीं कोणी पाहुणा आला तर त्याची व्यवस्था ठेऊं नये का? ही व्यवस्था ठेविली तीही आपल्याच आज्ञेवरून ना? आपणच ना मला सांगितलें होतें कीं, त्यांचें कांहीं कमी पडूं देऊं नको? तसें जर मीं केलें नसतें, तर तिकडूनही मला दोष लाविला असता. कीं, मीं सांगितलेलें ऐकलें नाहीं म्हणून! आणि **सुधन्वा** राजा तरी काय म्हणता? त्याचें आपलें बाळपणापासून प्रेम, आणि तो जर पुष्कळ दिवसांनीं आपल्या भेटीस आला, तर त्याचा समाचार घेतला, हा माझा दोष काय? आपणच विचार करून सांगा, आपण जो मजवर आरोप ठेवितां—शिव शिव, त्या पापाची कल्पना तरी माझ्या मनांत येईल कसें? असें आपणाला वाटलें तरी कसें?—काय हो करूं? मला बोलवत नाहीं!—स्त्री—कुलांगना—आपल्या पतीविषयीं—कीं जो तिचें भूषण,—तिच्या सुखाचा एक हेतु—तिच्या कल्याणाचें धाम—अशाविषयीं असलें निंद्य कर्म मनांत तरी आणील काय?—मग कुलांगनेला असल्या दुर्वाच्य कृत्यांत आणि तो **सत्यव्रत** साहाय्य करील काय? हरहर!

कोणीं तरी दुष्टानें त्याविरुद्ध कांहीं सांगून आपले कान भरले! खरेंच, सत्यव्रता-सारखे खरे दुसरे कोणी सांपडणार नाहींत! आतां ते कोठें दिसत नाहींत हें खरें, तथापि ते कोठें, कसे व काय ह्मणून गेले हें मला तरी काय ठाऊक?

चंद्र०—काय ह्मणतोस, हें तुला ठाऊक नाहीं अं? तूं त्याला पळवून नाहींसना दिलें? तूं काय दुष्ट बेत केला होतास, हेंही नसेल्च तुला ठाऊक? लोक खरें ह्मणतात तें!

श्लोक.

अंभोधी संशयांचा, अविनयनगरी, स्थान हें साहसांचें,
दोषांचा संघ जाणें, कपटशतमय क्षेत्र अप्रत्ययांचें;
ज्याचा कोणा कळेना असुरसुरनरां अंत, मायाकरंड,—
कोणी हे निर्मिली स्त्री अमृतविषमयी, जी करी धर्मखंड?

इंदु०—महाराज! आपण कांहीं ह्मणा. मीं खरें सांगितलें! आपणाला मी नकोशी झालें आहें,—दूर करून टाकावी कशी! भलभलतें मनांत आणून उगीच दुसऱ्याला कांहीं गांजूं नये!

चंद्र०—भलभलतें तें काय? माझ्या मनांत येतें तें खरें होतें. मला वाटलें तूं कुकर्म केलेंस, त्याचें फळ तें कारटें झालें! अगोदरपासूनच लज्जा सोडली, तेव्हां खोट्याला थोडीच भिणारी आहेस? आतां आपल्या हातून झालेली गोष्ट नाहींस कबूल केली, तर नको करूं!—कर अथवा नको करूं, त्यांत कांहीं अर्थ नाहीं, त्या पोराला अरण्यांत टाकून दिलें!—त्याला तेथें माता ना पिता—याचा ही दोष पण तुजकडेसच!—त्याचें जसें शासन केलें, तसें तुझें ही करतों! ही उग्र न्यायदेवता आहे, इच्या हातून क्षमा व्हायची नाहीं! यमधर्माचें आतां स्मरण कर!

इंदु०—महाराज! इतकी मला पण भीति नको दाखवायला! मृत्यु ह्मणजे कांहीं मला वाऊ वाटत नाहीं! आतां मला वांचून तरी काय करायचें आहे? माझें या जगीं काय उरलें आहे?—माझ्या जीविताचें समाधान आणि भूषण जें आपलें प्रेम, त्याचें तर आतां नांवच नको घ्यायला! तें उडालें—नाहींसें झालें, यांत कांहीं संशय नाहीं! कां नाहींसें झालें, याचें मात्र कारण मला ठाऊक नाहीं!—बरें तें असो; माझें दुसरें समाधान माझ्या पोटचा गोळा—नंदन-बाळ—त्याची आणि माझी ताडातोड केली! माझ्या बाऱ्याला त्याला फिरकूं देत नाहीं! तिसरें माझें समाधान—कीं ज्याच्या तोंडाकडे तरी पाहून मीं हे दिवस कसे तरी काढले असते,—तें माझें लहान बाळ—त्यानें तर नव्हताना कोणाचा कांहीं अपराध केला?—तें मुग्ध मुखानें माझें स्तन्य पीत होतें, त्यावेळीं कींहो मनपासून त्याला तोडून नेलें!—आणि हायरे देवा! अरण्यांत टाकून दिलें!!! कशीरे देवा! तुला करुणा येत नाहीं? मी जारिणी ह्मणून प्रत्येक नगरांतून माझा डंका वाजविला! प्रसूत होऊन बारा दिवस झाले न झाले, तों उघड्या हवेंत मला ओढून आणिलें! रंकाचीही स्त्री असली, तरी दोन महिने खोलीबाहेर पडत नाहीं! आणि मज राजपत्नीला कांहीं अंगांत शक्ति आली नाहीं तरी या समेत सर्वांसमक्ष ओढून आणावें ना? महाराज! आपणच पहा कीं, वांचून मला कोणतें

सख आहे कीं, त्याकरितां मी मृत्यूला भ्यावें? तेव्हां आपण जें मनांत योजिलें आहे, तें मला प्रियच आहे! पण माझें एवढें ऐका—जीवाची आशा धरून आपली प्रार्थना करितें असें नाहीं—कारण जीव हा मला तृणप्राय झाला आहे—पण मला अब्रूची चाड आहे! होतां होईल तों आपल्या नांवाला वृथा कलंक लावून घेणार नाहीं! नुसत्या आपल्या कल्पनांनीं हा मजवरचा आरोप सिद्ध होणार नाहीं, तो सिद्ध होण्याला नुसत्या कल्पनेपेक्षां बलवत्तर प्रमाणें पाहिजेत! तीं नसतां, जर म्हणाल कीं, आरोप खरा आहे, तर मग न्याय नव्हे! अन्याय आहे!—अहो न्यायमूर्ति! माझा वाद आनंदानिधी गुरु करितील! त्यांचें जसें उत्तर येईल, त्याप्रमाणें मला सदोष किंवा निर्दोष ठरवा!

१ सर०—आईसाहेबांचें म्हणणें अगदीं वावगें नाहीं. हारीतक आणि विद्यासागर आले असतील, त्यांना अधिकराणिकांनीं बोलवावें.

अधि०—वेत्रधारा! हारीतक आणि विद्यासागर यांना जाऊन सांग कीं, तुम्हांला न्यायसभेंत बोलाविलें आहे.

(वेत्रधर जातो.)

इंदु०—माझा पिता कलिंग देशाचा भूप, तो आज जिवंत असता, आणि आपल्या कन्येची अशी स्थिति पाहता, तर त्याला काय दुःख झालें असतें! पण तो आज नाहीं हें चांगलें आहे, नाहीं तर त्याच्या प्रज्वलित क्रोधाग्नीनें काय काय दग्ध झालें नसतें!

(हारीतक आणि विद्यासागर यांस घेऊन वेत्रधर येतो.)

अधि०—हारीतक! विद्यासागर! आपण न्यायसभेंत आलां आहां. सत्याधिदेवता स्मरून सर्व वृत्तांत सांगावें.

हारी०—अहो न्यायमूर्ति! सत्य निवेदन करितों. महाराजांची आज्ञा घेऊन आह्मीं श्रीशैल पर्वतावर गेलों. तेथें आनंदनिधि गुरूंचें दर्शन घेतलें. महाराजांनीं सांगितलेला मजकूर त्यांना कळविला. त्यांनीं तो ऐकून घेऊन कांहीं वेळ ध्यान केलें. नंतर आंतून जाऊन येऊन आह्मांस हें मुद्रित पत्र दिलें, आणि सांगितलें कीं "हें फोडूं नका, किंवा दुसऱ्या कोणाला दाखवूं नका. न्यायसभेंत राजाला नेऊन द्या." त्याप्रमाणें हें पत्र आणिलें आहे. महाराजांनीं घ्यावें.

अधि०—काय हो विद्यासागर! हा मजकूर खरा आहे?

विद्या०—खरा आहे महाराज!

चंद्र०—पत्र फोडावें आणि वाचावें.

अधि०—(वाचतो.) "स्वस्ति. हारीतक आणि विद्यासागर यांनीं कथित केलेला वृत्तांत श्रुत झाला. आमच्या ज्ञानचक्षूस जें वृत्त दिसतें, तें सांगतों.

श्लोक.

साध्वी इंदुमती अगर्ह्यचरिता; निर्दोष मद्राधिप;
तो सत्यव्रत राजसेवक खरा; तूं बा नृपा निष्कृप;
कन्या जी आवर प्रसूत अनघा आहे तुझी सत्य ती,
लाभे ती जरि शोधिशी, तिजविणें नाहीं तुला संतति."

सर०—गुरु यथार्थद्रष्टे खरे! पण शेवटल्या या वाक्याचा अर्थ काय?

इंदु०—राखिली हो त्यांनीं माझी लाज! (डोळा लवलासें दाखवून) हा बाई दुसरा कांहीं अनर्थ सुचवितो!

चंद्र०—कायहो अधिकराणिक! पत्रांत मजकूर

होता, तोच तुलीं वाचला कीं पदरचा कांहीं जोडला?

अधि०—महाराज! येथें जेवढें आहे तेवढें वाचलें.

चंद्र०—" तिजविणें नाहीं तुला संतति "—ह्मणजे? हें सर्व खोटें आहे. गुरुजींनीं अनृत लिहिलें. तें कांहीं नाहीं. व्यवहार चालवा.

(पटाक्षेप करून सेवक येतो.)

सेवक—(भयानें) महाराज हो महाराज!

चंद्र०—बोल, झालें तरी काय?

सेवक—कसें बोलूं? महाराजांच्या कानांवर कसें घालूं? अहो महाराज! आई साहेबांना इकडे आणिलें हें कळले मात्र, आणि " आई! आतां तुझी गत कशी होईल " असें ह्मणून धाकट्या महाराजांनीं वाट धरिली!

चंद्र०—वाट धरिली ह्मणजे?

सेवक—ह्मणजे प्राण सोडिला!

चंद्र०—ईश्वर मजवर क्षोभला! मीं या सत्पुरुषाला खोटें ह्मटलें! मी खरा अपराधी!

इंदु०—हाय! हाय! (मूर्च्छा पावते.)

चंद्र०—अरे! हा काय दुसरा अनर्थ! आली प्रतीति—" तिजविणें नाहीं मला संतति!"

यशोदा—ही बातमी ऐकल्याबरोबर बाईसाहेबाना घेरी आली!—देवारे देवा! या जातात वाटतें आह्मांला सोडून! पहाहो! बघाहो!

चंद्र०—तिला आंत न्या. दुःख असह्य झाल्यामुळें तिला नुस्ती घेरी आली आहे वाटतें! आतां होईल बरी! अरेरे! मीं आपल्या तर्कावर फार विश्वास ठेविला! तिला एकादी सांगली मात्रा द्या!

(यशोदा आणि दासी इंदुमतीला घेऊन जातात. अधिकारिणी वगैरे सर्व जातात. राजा आणि १ सरदार मात्र राहतात.)

चंद्र०—(आपणाशीं) देवा मी अन्यायी! खरा खरा अन्यायी! क्षमा कर! मी या सत्पुरुषाला खोटें ह्मटलें!—सुधन्वा राजाची मी क्षमा मागेन, आणि त्याशीं पुनः स्नेहभावानें वागेन!

श्लोक.

मद्राच्या नृपतीशीं मी करीन मैत्री;
राज्ञीची मनधरणी करीन रात्रीं;
गेला जो प्रियकर मित्र—आणवीन;
सुज्ञाचे गुण विसरेन मी कधीं न!

काय माझा हा मोह! या मोहांधकारानें माझें मन इतकें लिप्त झालें कीं मला कांहीं दिसेना! वाटलें प्रिय सुहृत् सुधन्वा राजा याचें प्राणापहरण करावें! हें निंद्य कर्म मीं **सत्यव्रतास** करायला सांगितलें! अनुग्रह, निग्रह इत्यादिकेंकरून त्याचें मन वळविण्याचा यत्न केला! विष देशील तर महत् पदास पावशील, असें सांगितलें! न देशील तर प्राणास मुकशील, अशी ही धमकी दिली! पण साधु तो साधु! त्यानें कांहीं माझें ऐकलें नाहीं! तर केलें काय?—

श्लोक.

सदय हृदय ज्याचें, जो कुलीनावतंस
नृपतिस कळवी तो हेतु माझा नृशंस!
त्यजुनि गृहधनातें, मान, वित्तें, तयानें
असुख बहु वरीलें सुप्रसन्नें मनानें!

धन्य या **सत्यव्रता**ची! अथवा ज्यां पाप्यानें हें नांव घेऊन त्यास विटाळ कां लावावा? तो केवढा सत्पुरुष! मी केवढा अधम! कोठें त्याची धर्मावरची रति!

आणि कोठें माझी दुष्ट मति ! !

(यशोदा पुनः येते.)

यशो०—देवारे देवा ! हा काय अनर्थ मांडलास ! कसेरे करूं ! अति झालें !

१ सर०—अहो **यशोदाबाई** ! अहो झालें तरी काय ?

यशो०—महाराज ! कायहो आपला हा मोह ! काय आपलीं हीं कर्तव्यें ! मी बोलतें, म्हणून आपण मला पुनः धमकावणी द्याल कीं सुळावर देतां !—पण महाराज ! आपण कांहीं करा, माझ्यानें बोलल्यावांचून राहवत नाहीं ! आपल्या या मोहापासून काय काय अनर्थ घडलें आहेत पहा ! नुसता मोहच नाहीं, आपण क्रूर निर्दय तरी किती आहां ! आतां घ्या हीं मोहाचीं आणि क्रूरतेचीं फळें ! काय हें कुतर्क आणि काय हे भ्रम ! लहान पोरांना सुद्धां शोभणार नाहींत ! आणि आपल्या या वयाला शोभतात ! पहा पहा बरें ! यापासून काय काय अनर्थ झाले आहेत ते ? म्हणजे काळीजच फाटून जाईल, आणि वेड लागेल ! महाराज ! यापासून जीं जीं कृत्यें पूर्वीं झालीं, तीं आतांच्या पुढें कांहीं हो नाहींत ! ते केवळ पोरखेळ म्हटलें तरी चालेल ! **सुधन्वा** राजा आणि **सत्यव्रत** हे एकदम येथून पळून गेले, यांचें पक्कें जरी कारण मला माहित नाहीं, तरी काय कारण झालें असेल, हें आम्हांला समजतें ! आपल्या जीवाला कांहीं तरी धक्का पोहोंचेल असें वाटल्यावांचून ते गेले नाहींत !—बरें **सुधन्वा** तर आपला बालमित्रना ? पण त्यावर असलें कुभांड रचावें ना ! बरें, तो **सत्यव्रत** पळून गेला !—त्याचा कांहीं अपराध नसतां, त्याचें घरदार सर्व कांहीं जप्त करावें ना ? इतकीं वर्षें इमानानें नोकरी केली, ती सर्व फुकट गेली अं ? आणि त्यावर आणि त्या राजावर भलतेंच तुफान रचावें ?—बरें हें असो, हें कांहींच नाहीं ! त्या तुमच्या धाकट्या सोन्यासारख्या बाळाला दूर अरण्यांत नेऊन टाकून दिलें, तेथें त्याचें रक्षणही कोणी करणार नाहीं ! असें कृत्य राक्षसाच्याही हातून झालें नसतें, त्याच्या सुद्धां अंतःकरणाला पाझर फुटला असता, आणि त्यानें तें बाळ वाचविलें असतें. तेंही असो. बरें आतां नंदन बाळाचा अंत झाला, त्याचें तरी कारण काय बरें ? इतका लहानना, पण समज केवढा ! आपल्या लाडक्या आईचा आपला तातच छळ करीत आहे हें पाहून त्याचें काळीजच फुटलें, आणि त्यानें प्राण सोडला ! समजा, यांतही आपणाकडे फारसा दोष नाहीं ! पण आतांचा हा अनर्थ—हा हो कोणामुळें झाला ? देवारे देवा ! हें तूं सर्व पाहतोस, आण तुला कांहीं करुणा येत नाहीं ना ? आमची माउली मातुश्री बाईसाहेब त्याहो निवर्तल्या !

१ सर०—**यशोदाबाई**! असलें भलतें सलतें बोलूं नका!

यशो०—मी खोटें कां सांगेन?—अहो पाहिजे तर शपथ घेतें! माझ्या बोलण्यावर विश्वास नसला किंवा शपथही खरी वाटत नसेल, तर पाहिजे तर आंत जाऊन आपल्या डोळ्यांनीं बघा! पहा त्यांच्या तोंडावर कशी कळा आली आहे ती! ती जर घालवून द्याल, त्यांच्या ओठांचा रक्तिमा

पुनः आणाल, त्यांच्या डोळ्यांचें पाणी पुनः आणून द्याल, देहाची उष्णता किंवा श्वासोच्छ्वास परत आणाल, तर मी तुम-च्या जन्मोजन्मींची बटीक होईन !—पण अहो महाराज! या आपल्या सर्व पापांचें क्षालन पश्चात्तापानें व्हायचें नाहीं ! आ-ता कितीही चांद्रायणादि पुण्यव्रतें करा, कितीही तपश्चर्या करा, कांहीं व्हायचें नाहीं! ग्रीष्मऋतूंत पंचाग्निसाधन करा, हेमंतांत पाण्यामध्यें बुडून रहा, वर्षाऋ-तूंत वारा पाऊस अंगावर घ्या, पण या हत्येचा दोष जाणार नाहीं!

चंद्र०—बोल! आणखी बोल ! जितकें बोल-शील तितकें थोडेंच आहे! मीं केलेंच आहे असें, कीं सर्वांनीं मजवर कटूक्तींनीं भडिमार करावे!

सर०—यशोदाबाई ! आतां अधिक बोलूं नका! कसेंही असो, तुम्हीं असें बोलणें या वेळीं उचित नाहीं !

यशो०—हो, मलाही आतां वाईट वाटतें कीं, मीं असें बोललें ! कांहीं मीं करतें यावेळेस मला भान राहत नाहीं. पण पुढें मला फार वाईट वाटतें ! आतां मला समजलें कीं, मघाशीं मी नाहीं तसें बोललें ! खरेंच, महाराजांना तें फार लागलें !—असो; गेली गोष्ट ती गेली ! गेल्याचा शोक करून काय फायदा ?—महाराज ! मज ह्यातारीचें काय मनावर घेतां ? काय वेडी मी ? ज्यांचा मीं विसर पाडावा, त्यांची पुनः पुनः आठवण करून देतें ! खरेंच, माझी ही जीभ तो-डून टाकली पाहिजे ! महाराज ! क्षमा करा—मी आपली वेडी भावडी आहें. आ-ह्मांला कों नाहीं आमच्या बाईसाहेब फार आवडत !—पण फिरून मी त्यांचें नांव काढतेंच !—आतां पुनः त्यांचें नांव काढा-यचें नाहीं ! त्यांच्या त्या मोठ्या बाळाचें नांव काढायचें नाहीं ! धाकटें तान्हें बाळ अरण्यांत टाकलें, त्याचेंही नांव काढायचें नाहीं !—आतां इतकेंच, कांहीं धीर धरा ! आपण टाकून दिलेलें बालक पुनरपि प्राप्त होईल ह्मणून गुरुजींनींच आपणाला आश्वासन दिलें आहे तेवढ्यावरच समा-धान करून घ्या!

चंद्र०—मी कांहीं तुजवर रागावलों नाहीं. तूं जें कांहीं ह्मणालीस तें सर्व खरें आहे ! माझें शांतवन केलें असतेंस, त्यापेक्षां हेच तुझे कटु शब्द मला अधिक प्रिय आहेत ! बरें तें असो !—मला एकदा त्यांना पाहूं तरी दे !—त्या नंदनबाळाचें व तिचें एकदा शेवटलें दर्शन घेईन ! अघोर मी पातकी ! त्या दोघांचाही मीच अंत केला ! या जीवांत जीव आहे तोंपर्यंत त्यांचें विस्मरण या जनाला होणार नाहीं !—काय ?—एका घटकेंत नव्हे,—एका क्षणांत असले दोन प्राणी नाहींतसे व्हावेना ! हरहर ! या संसारांत काय अर्थ आहे? आतां माझें कोण राहिलें आहे? ज्यावर माझा सर्व प्राण तो नंदन गेला! जिला मीं व्यर्थ गांजिलें तीही सोडून गेली ! त्या बाळाला म्यां निर्दयपणानें अरण्यांत टाकून द्यायला सांगितलें ! तो संस्थावक-ही आजून आला नाहीं.—ती कन्या तरी मला लाभेल काय?—कसली लाभते.!—पण नाहीं !—गुरुजींनीं त्याच पत्रांत आश्वास-न दिलें आहे कीं "लाभे ती जरि शोधि-

त्रिक अवस्था झाली होती, तरी देखील त्यानें त्या प्रसंगीं **शिलादित्यास** ओळखिलें; व कांहीं बोलण्याचा यत्न केला, परंतु तो व्यर्थ झाला. कारण कांहीं केल्या त्याची जीभच हालेना, व अशा स्थितींत कांहीं अर्धा-मुर्धा आवाज बाहेर पाडण्याच्या खटपटांतच त्याचा प्राण निघून गेला.

इकडे **भद्रमणि अर्धशालाच्या** घरचीं चाकरमाणसें सगळीं कोठीखान्यांत कोंडून ठेविलीं होतीं, त्यांच्या कानीं तो दारूच्या योगानें झालेला प्रचंड धडाका पडतांच तीं भीतीमुळें प्राणावर उदार होऊन त्यांनीं आवेशानें झटापट करून कोठीखान्याचें दार निखळलें, व बाहेर पडून हा काय भयंकर प्रकार आहे याची चौकशी करण्याकरितां आगीच्या ठिकाणाकडे सगळींजणें निघून गेलीं. तीं **शिलादित्याचे** दृष्टीस पडतांच त्यानें त्या मेलेल्या व विवळत पडलेल्या त्या माणसांचा नाद सोडून दिला, व जरी त्याचा तो अखेरचा कण्हण्याचा शब्द ऐकून त्याला वाईट वाटलें, तथापि त्यांचा समाचार हीं नवीन आलेलीं चाकर माणसें घेतील अशा समजुतीनें तो तडक खंदकावर आडव्या टाकलेल्या फळ्यांच्या अंगास गेला; व त्या ठिकाणीं पहातो तों पूर्वीं रोंखून ठेवलेला घोडा काढणी तोडून पळाला असून त्या फळ्यांजवळच थंडीनें कांकडत उभा आहे. हें पाहून त्यानें अंमळ त्याची मान थोंपटली, व लागलीच त्याच्या पाठीवर स्वार होऊन त्यानें गुहेची परत वाट धरिली.

त्या ठिकाणीं जातो तों **वसुभद्राचार्य** व **जरठकर्ण** जती यांची व त्याची गुहेच्या तोंडाशींच गांठ पडली, व ते आगीचें कसें काय वर्तमान आहे ह्मणून मोठ्या उत्कंठेनें विचारूं लागले, तेव्हां **शिलादित्यानें** त्यांस थोडक्यांत हकीकत कळविली.

ती ऐकून **जरठकर्ण** जती बोलतो:—"अहाहा! वत्सा **शिलादित्या**! खचित खचित त्या **अर्हत्प्रभूस** करुणा येऊनच त्यानें या कामीं तुझ्या बाहूंची प्रेरणा केली आहे! याच बाहूच्या योगानें त्या सद्धर्मद्वेष्ट्या दुष्ट हिंदुराजाचा प्राणनाश होता, तर केवढी मौज झाली असती! असो, आतां ही गोष्ट झाली, आतां थोडक्याच दिवसांनीं त्याचीही पाळी येतेच आहे!"

हें ऐकून **शिलादित्य** त्यास दरडावून ह्मणाला:—"जरठकर्णजी! आपण गप्प रहावें!"

हें ऐकून **वसुभद्राचार्य** बोलतो:—"मला कोतवाल मेला याबद्दल कांहीं वाटत नाहीं, परंतु खचित खचित अशा निंद्य कामीं आणि विनाकारण प्राणाचा संहार व्हावा हें आपल्याला ठीक वाटत नाहीं!"

त्याबरोबर जती रागानें त्यास बोलतो:—"भल्या गृहस्था! तुला अजून खरा विचारीपणा तो काय हें मुळींच कळत नाहीं! तूं हें काम निंद्य ह्मणतोस, परंतु सद्धर्माचा खरा पालक व असद्धर्म्यांना शासन करणारा जो **शास्ता*** त्याला हें अंतःकरणापासून संमत आहे कळलें?"

"असेल. पण मला तसें नाहीं वाटत." **वसुभद्राचार्य** उत्तर करितो. "आणखी खरोखरी जर या **त्रिवेणीवर** माझें प्रेम ज-

* हें बुद्धाचेंच नाव. "मुनींद्रः श्रीघनः शास्ता." अम० को० कां० १ व० १.

डले नसतें, तर मी यापुढ या कामांत पडलोंही नसतों."

हें वसुभद्राचार्यांचें भाषण जतीस अर्थातूच पसंत पडलें नाहीं व तो त्यास परत खोचून बोलला:—"मर्जी तुझी ! आमचा काहीं तुला आग्रह नाहीं, तसें तुला योग्य वाटत असेल, तर तूं आह्मांला सोडून खुशाल चालता हो !"

येथपर्यंत सांगितलेलें सर्व भाषण त्रिवेणी आडून ऐकतच होती. ती यावेळीं पुढें येऊन जतीस ह्मणाली:—"जती महाराज ! आपणांस हें बोलणें योग्य नाहीं. प्रत्यक्ष तुह्मीं जिवंत आहां, व या मोकळ्या ठिकाणीं तुह्माला यावयाला सांपडलें हे उपकार वसुभद्राचार्यांचेच तुह्मांवर आहेत !"

हें ऐकून जती शरमल्यासारखा होऊन ह्मणाला:—"बाळे ! तूं खरें बोललीस ! मी आवेशाच्या भरांत बोलूं नये तें बोललों, पण आतां त्याबद्दल क्षमा मागतों !"

"जती महाराज !" वसुभद्राचार्य त्यास बोलतो. "आपण त्याबद्दल कांहीं खेद करूं नये." इतकें बोलून तो मागें हयदक्ष होता त्याकडे वळून ह्मणाला:—"तूं आतां वाड्यांत खुशाल परत जा. तुला आतां तेथें कोणी त्रास देणार नाहीं! जा, बाकीचीं घरचीं माणसें सर्व तुझीं वाट पहात असतील !"

"तें खरें, पण माझ्या या धनिनीची वाट?' हयदक्ष विचारतो.

इतक्यांत त्रिवेणी बोलते:—मी पवित्र दीर्घिकेस बाबांजवळ रहाण्याकरितां जाणार आहें. व तेथें मी गेल्यावर तेथून तूं कसें काय करावेस हें तुला कळेल."

हे शब्द ऐकून त्या वृद्ध हयदक्षानें त्रिवेणीस नम्रतेचा प्रणाम केला आणि ह्मणाला:—"ठीक आहे! अर्हत् करो, आणि तुजवर आणखी दुःखाचे प्रसंग न येवोत !"

इतकें झाल्यावर वसुभद्राचार्यानें त्रिवेणीचा हात धरून तिला पूर्ववत् घोडीवर चढविलें, व लागलेच इतर सर्वजण घोड्यावर स्वार झाले. आमचें सर्व प्रवासिमंडळ चसतरूच्या वाटेस लागलें, व हयदक्ष आपल्या धन्याच्या घरीं परत गेला.

प्रकरण १९.

इकडे आमचें प्रवासिमंडळ जें निघालें तें रात्रभर एकसारखें घोडदौडीनें मजल कांटीतच चालले. मात्र नाहीं ह्मणावयाला वाटेंत नटवुरु नांवाचें एक लहानसें ओसाड पडलेलें गांव लागलें, त्या ठिकाणीं तें विश्रांतीकरितां अंमळसें उभें राहिलें. सकाळच्या सुमारास तें चसतरु गांवाजवळ आलें. हें गांव लहानच परंतु बरेंच टुमदार होतें, व त्यासभोंवतीं उंच व मजबूद तट होता. गांवांतील अधिकारिमंडळ अर्थातूच हिंदुधर्मी होतें, परंतु बाकीची वस्ती ह्मटली ह्मणजे बहुतेक जैन अगर बुद्धधर्मीच होती. आमचे प्रवासी गांवाच्या वेशीजवळ जातात, तो इतक्यांत आंतून वेस उघडली, व सर्वजण गांवांत शिरले. व पुढें दोन तीन रस्ते वलांडून गेल्यावर ते भद्रमणीच्या विव्हाडाची चौकशी करूं लागणार, इतक्यांत पहातात तों कार्तिकशंभुच घोडा भरधांव टाकीत त्यांच्याकडेच येतांना त्यांच्या दृष्टीस पडला. हें पाहून त्या सर्वांस आश्चर्य वाटलें.

कार्तिकशंभु जवळ येतांच त्यानें त्रिवेणीकडे हास्यमुद्रेनें पाहिलें आणि ह्मणाला:—

"हं तरी मला वाटलेंच होतें ! त्रिवेणी ! तुझ्या बापाचा निरोप तुला कळविण्याकरितां मी आतांच पुनमल्लीस जाण्यास निघालों होतों, पण इतक्यांत सुदैवानें तुझीच येथें गांठ पडली, यामुळें तेथपर्यंत जायची पंचाईत चुकली! असो; बरें, पण तूं इकडे कोणीकडे?" इतक्यांत त्याच्या नजरेस **सुभद्राचार्य** पडला, तेव्हां हें कांहीं ठीक नाहीं असें त्यास वाटून तो पुढें बोलिला:—"आणखी ही मंडळीही बरोबर आहे हें कसें?"

इतक्यांत **जरठकर्ण** जती पुढें येऊन त्यानें सगळी हकीकत थोडक्यांत सांगितली, तेव्हां अर्थातच सर्व संशयांचा उलगडा झाला. ही हकीकत ऐकत असतां **कार्तिकशंभू**नें बाह्यतः आपणास वाईट वाटून रोषही आलासें दाखविलें; तथापि एकंदरींत तो मजकूर ऐकून त्यास आनंदच होत होता हें जर त्याच्या तोंडाकडे कोणीं टक लावून पाहिलें असतें, तर त्यास सहज कळून आलें असतें.

कार्तिकशंभु जरठकर्णाच्या घेऱ्याजवळ आला, आणि हलकेच त्याच्या कानांत सांगतो:—"हें ठीक झालें! आतां **भद्रमणी**ला आमच्या पक्षास येऊन मिळालेंच पाहिजे!"

"अर्थात्, आणखी तो मिळेलच!" **जरठकर्ण** त्याच्या कानांत बोलतो.

इतकें झाल्यावर **कार्तिकशंभु** पुनरपि **त्रिवेणी**कडे वळून तिला म्हणालाः—"**भद्रमणि** पुढें **हरतरु** गांवीं गेले आहेत, व तेथें त्यांनीं तुला बोलाविलें आहे! तेथें त्यांच्या बरोबर मंडळी पुष्कळ जमली आहे, व त्यांचा बेत **पवित्र**दीर्घिकेकडे जाण्याकरितां उदईक निघण्याचा आहे! आतांपर्यंत सगळीं नाहीं तरी तीस पस्तीस लोक जमले आहेत."

"हुंहुं?" **त्रिवेणी**पुढें विचारते. "बरें, पण हे इतके लोक तरी कोण बाई?"

कार्तिकशंभु उत्तर करितो.-"या सगळ्यांचीं नांवेंही तूं अजून कधीं ऐकिलीं नसशील! तरी पण तुझ्या माहितीपैकीं झटलें म्हणजे **गीर्णतत्व** जति, **रुक्षामृत, वीणातंक** व त्याचा धाकटा भाऊ **अरुणांत, तरुश्याम**, आणखी—आणखी—**अर्हत्** तुझें भलें करो—**रक्षाक्ष**, इतकेच! शिवाय कांहीं बायकाही बरोबर आहेत, पण त्या बहुधा तुझ्या ओळखीच्या नसतील."

"तरी पण त्यांचीं नांवें!"

"नांवें काय, मलाही सगळीं ठाऊक नाहींत. तरी पण एक कोण **ननांदा**बाई आणखी एक कोणशीशी इतक्याच मला ठाऊक आहेत! बरे, पण कसें काय? आतां येथेंच कांहीवेळ विसांवा घेणारेंत? का अशींच एकदम **हरतरु**कडेच चलणार?"

"माझा हेतुच जर विचाराल, तर बाबांना केव्हां जाऊन पाहीन असें मला झालें आहे. पण रात्रभर एकसारखी वाट चालल्यामुळें हीं जनावरें थकलीं आहेत, याकरितां यांना कांहीं वेळ विसांवा देऊन नंतर पुढें जावें असें मला वाटतें"

इतकें झाल्यावर तीं सर्वजण अंमळ कांहींशीं पुढें गेलीं, व जवळच एका रिकामें घर होतें, त्या घरीं उतरलीं. **त्रिवेणी** दमली असल्यामुळें तिनें फक्त शौच मुखमार्जन केलें, व अंमळशी टेकून पडली, तों तिला पडल्या पडल्याच झोंप लागली. बाकी **शिलादित्य, कार्तिकशंभु** व जती हे सर्वजण पुढच्या आंगणांत एकीकडे जाऊन आपआपसांत विचार व मसलती करीत बसले. तेव्हां अर्थात्च आपण बरोबर असण्याची आतां कोणास जरूर

राहिली नाहीं असे **वसुभद्राचार्या**स वाटले. व शिवाय **कार्तिकशंभू**च्या एकंदरित आचरणावरून त्याला आपण आवडत नाहीं, व तें आपणाकडे बेभरंवशाच्या दृष्टीनें पहातो हेंही त्यानें पक्कें जाणलें होतें. खेरीज खुद्द **कार्तिकशंभू**च्या संबंधानें त्याच्या स्वतःच्या मनाचीही त्याचप्रमाणें स्थिति झाली होती. हे सर्व विचार मनांत आणून त्यानें परत घरीं जावयाचा विचार मनांत आणिला, आणखी कांहीं वेळानें **त्रिवेणी** निजून उठल्यावर तिचा निरोप घेण्याकरितां तो तिजजवळ गेला, अगि मोठ्या संकटानें तिला ह्मणाला:—

"**त्रिवेणी**! आतां माझें कांहीं पुढें काम राहिलें आहे असें वाटत नाहीं; तसेच हल्लीं आपल्या बरोबर आलेल्या या गृहस्थांना मी बरोबर आहें हें ज्याप्रमाणें आवडत नाहींसें दिसतें, त्याचप्रमाणें कदाचित् तुझा पिसाटही आवडणार नाहीं, याकरितां मी तुझी रजा घेतो!

"यावें." **त्रिवेणी** उत्तर करिते. "**वसुभद्राचार्य**! आपण जायचें ह्मणतां त्याच्या आड मी येत नाहीं. कारण, यद्यपि तुम्हीं मला अंतरतां हें पाहून मला अतिशय वाटतें आहे— व वाईट वाटते आहे हे माझ्या नेत्रांतून चालले हे अश्रुप्रवाह सांगतच आहेत,— तरी त्यापुढें माझा कांहीं उपाय चालण्यासारखा नाहीं, याकरितां होतें आहे तें बरेंच असें मी ह्मणतें, झालें!—आपले मजवर जे अत्यंत उपकार झाले आहेत, त्यांची फेड माझ्या हातून मीं कितीं केले तरी व्हायची नाहीं असे तें आहेत, याकरितां अशा प्रसंगीं आपल्याबद्दल माझ्या हृदयाला जें काय वाटत आहे, व जें यावज्जीव माझ्या हृदयाला लिहून राहणार आहे, तें बोलून न दाखविणें हें मला योग्य होणार नाहीं, याकरितां आतां बोलतेंच! हायहाय! **वसुभद्राचार्य**! काय सांगूं? या वेळेस माझ्या मनाची जी कांहीं स्थिति झाली आहे ती एक मला ठाऊक कीं त्या सर्वज्ञ* **सुगता**ला ठाऊक! "हें बोलत असतां त्रिवेणीच्या नेत्रांतून अश्रूंचा अधिकच लोट येऊं लागला.

तिची अशी स्थिति झालेली पाहून **वसुभद्राचार्या**चीही संपूर्ण वृत्ति कांहीं चमत्कारिक होऊन गेली, व तो एकाद्या क्षुधितप्रमाणें ती काय बोलते हें ऐकण्याविषयीं आतुर झाला.

त्रिवेणी उत्तर करिते:—"**वसुभद्राचार्य**! माझ्यानें कांहीं जास्ती बोलवत नाहीं! फार काय सांगूं? माझे प्रिय जनक यांच्यावर माझें जितकें प्रेम आहे, त्याच्या खालोखाल प्रेम ह्मटलें ह्मणजे तुमच्या शिवाय दुसऱ्या कोणावर ही नाहीं!"

हे शब्द ऐकून अंतरंगवृत्तीनें क्षुभित होतांता **वसुभद्राचार्य** थरथर कांपूं लागला, व त्या स्थितींतच तो बोलला:—"काय काय! काय ह्मटलेंस प्रिये **त्रिवेणी**! एकून तुझें मजवर प्रेम—"

त्याची ही स्थिति पाहून **त्रिवेणी**चा चेहेरा एकदम खरकन उतरून गेला, व ती ह्मणाली:—"होय होय! **वसुभद्राचार्य**! आपण मला तो शब्द फिरून बोलायलाच लावितां, याकरितां

* 'सुगत' हें बुद्धाचें नांव असल्याविषयीं पूर्वी टीप आलीच आहे. या ठिकाणीं त्यास जें 'सर्वज्ञ' हें विशेषण दिलें आहे, तें विशेषार्थद्योतक तर आहेच. तथापि 'सर्वज्ञ' हें स्वतंत्रपणेंही बुद्धाचें नांव आहे. 'सर्वज्ञः सुगतो बुद्धः'—अमरकोश, काड १, वर्ग १.

शी"—तेव्हां आतां शोध करणें पाहिजे, आंग' त्या आशेवर काय ते दिवस का' ढिले पाहिजेत!—चल बाई! त्यांना एकदा मला पाहूं दे! शोकानें माझें हृदय कसें निदीर्ण झाले आहे!—चल!—(जातात.)

प्रवेश ३. मद्रदेश, समुद्रकांठचा ओसाड प्रदेश.

(संस्तावक बाळक घेऊन येतो. बरोबर एक कोळी आहे.)

संस्ता०—मग तुझी खातरी आहे तर, कीं आपलें तारूं **मद्र**देशाच्या. किनाऱ्यालाच लागलें?

कोळी—होय, माझी तर बोवा खात्री झाली. पण काय अमंगळ वेळ लागली आपणाला निघायला कोण जाणें. हा वघा वारा सुटला आहे. हें आभाळ पहा कसें ढगांनीं भरून गेलें आहे. मला तर बोवा! वाटतें कीं, आपण जें काम हातीं घेतलें आहे, तें चांगलें नाहीं, म्हणूनच हा असा प्रसंग येऊं पाहतो आहे!

संस्ता०—ईश्वराची मर्जी असेल, तसें होईल! तूं जा तारवावर, आणि खबरदारीनें रहा. मी आलोंच बघ!

कोळी—लवकर आटपा वरें?—फार लांब नका जाऊं. वादळ येऊं म्हणतें आहे. सावजें ही येथें फार आहेत, असें मीं ऐकिलें आहे.

संस्ता०—तूं जा, मी आलोंच पहा.

कोळी—बरें झालें बोवा, आपला नाहीं हात या कामांत. (निघून जातो.)

संस्ता०—चल बाबा! आतां तुझी कशीरे अवस्था होईल! काय चमत्कार पहा! काल रात्रीं मला स्वप्न असें पडलें कीं आमच्या आईसाहेब मजकडे आल्या.—किती पण निकट दिसत होत्या! त्या माउलीनें मजकडे पाहावें, आणि बोलायचा यत्न करावा, पण तोंडांतून शब्दच निघेना! शेवटीं कंठ मोकळा करून कांहीं वेळ रडल्या! अश्रूंनीं न्हाल्या! खरेंच त्यांचें तें दुःख मला पाहवेना. सरतेशेवटीं मोठ्या प्रयत्नानें मला म्हणाल्या:—"अहो संस्तावक! तुमच्या मनांत नव्हतें, तरी तुम्हीं माझें तान्हुलें बांळ वनांत नेऊन टाकीन अशी शपथ घेतली आहे! ती खोटी करा असें मी नाहीं म्हणत! तुम्हीं तरी काय कराल? दैवच मजवर फिरलें, म्हणून महाराजांची बुद्धि फिरली! असो! आतां एवढें तरी करा! जिर्जनीं वनीं जरी बाळाला टाकून द्याल, तरी त्याजजवळ कांहीं रत्नें आणि अमुकाचीं अमुक असा एक लेख लिहून ठेवा! म्हणजे रत्नें पाहून कोणाला दया येऊन माझ्या बाळाचें रक्षण होईल! आणि बाळ जगलें वाचलें तर लेखाच्या योगानें तरी ओळख पटेल!—असें होईल असें नाहीं; पण न जाणो ईश्वराची माया आहे! या लेखावर मंइया बाळाचें नांवही लिहा! या कन्येला टाकून दिलें आहे, म्हणून तिचें नाव मीं **मुक्तावली** ठेविलें आहे! ही **मुक्तावली** पुनः कोठून माझ्या दृष्टीस पडणार!—काय—हो **संस्तावक**! तुम्हांला काय म्हणावें? मातेची आणि बाळाची ताडतोड तुम्हीं केलीं. तुमची आणि तुमच्या मुलांचीही अशीच ताडातोड होईल!"—असें म्हणून नाहींशा झाल्या. त्यावरोवर मी दचकून जागा

झालों. कांहीं नेळ तर मला कांहीं सुचेना. हें स्वप्नच कीं काय हें कांहीं कळेना. आणि मग खातरी करून घेतली कीं, हें स्वप्नच ! पण हें काय बरें असलें चमत्कारिक स्वप्न ? असें संगतवार स्वप्न मला कधीं पडलें नव्हतें! आजपर्यंत स्वप्नांत कांहीं अर्थ नाहीं असें मला वाटत असे. पण काय असेल तें असो; राणी साहेबांनीं स्वप्नांत मला सांगितलें आहे तसें करच असें माझें मनच मला सांगतें.—हरहर ! राणीसाहेबांचा अंत तर नसेलना झाला ? झालाच असावा. कारण आमचे संतप्त महाराज त्यांना इतके दिवस राहूं देतील हें थोडेंच आहे!—बरें, दुसरा हा एक चमत्कार नव्हे कीं माझे तारूं मद्रदेशाच्या किनाऱ्यासच लागलें ? आमच्या महाराजांचा कोप ज्यावर फार आहे, त्याच्याच राज्यांत हें बाळ येऊन पडलें ! यांत खचित कांहीं ईश्वरी सूत्र आहे.—पण आह्मां मानवांना आज काय कळणार? या मुक्तावलीला या शालजोडींत गुंडाळून ठेवितों. ही एक रत्नांची पेटी ठेविली आहे, यांत तो सर्व वृत्तांत लिहिला आहे. कोणी जर येथें आलें तर या बाळाला पाहून त्याला दया येईल, आणि या पेटींतील रत्नांच्या लोभानें तो त्याचें रक्षण करील.—बाळा ! ईश्वर तुझें रक्षण करो.—हें पहा वादळ सुटलेंच! हरहर ! काय या बाळाची ही स्थिति ! राजकन्या असून तिजवर असा प्रसंग यावा ना ! इनें बरें काय अपराध केला आहे ? मुक्तावली! तूं खरीच मुक्ता ! आह्मीं अधन्य कीं या मुक्ताफलास अंतरणार ! इजकडे पाहून माझा जीव तीळ तीळ तुटतो! पण काय करूं? शपथ घेण्याची मला कां त्यावेळीं बुद्धि व्हावी !—असो; मी पातकी खरा!—बाळा ! जातों! वारा अधिकच प्रबळ होऊं लागला ! असलें का गाणें गाऊन वारा तुला निजविणार !—कायहो . काळेंभोर आकाश झालें हें !—हायहाय ! माझें हें कर्मही असेंच काळें आहे.—आं! पण ही डुरकावणी कोणाची !—झटकर तारवावर जाईन तर बरें—अरेरे ! हा वाघ नव्हे, हा काळ आहे. मी कसचा याच्या हातांतून सुटतों. मातुश्री आई ! तुझें वचन खरें होणार ! मुला बाळांची आणि माझी ताडातोड होणार ! तीं मला पुनः कोठून दिसणार ! हा आलाच माझ्या अंगावर चालून ! (वाघ गाठीमागें लागलेला असा पळून जातो.)

(एक वृद्ध गोपाळ येतो.)

गोपाळ—काय या कर्माला करावें! हीं आलीकडचीं पोरें फार उनाड निघालीं ! या असल्या वादळांत कोणी शिकार करायला येईल का ? यानीं पहा माझ्या दोन गाई लपवून पळविल्या ! बिचाऱ्यांची काय गत झाली असेल कोण जाणे. वाघाच्या मुखांत न पडोत म्हणजे झालें. सांपडतील तर या खडकाच्या आड सांपडतील. नाहीं तर गेल्या.—पण हें रे काय! येथें हें कोणीं बरें बाळ आणून टाकलें ?—फारच पण गोजिरवाणें. अं ! कोणा दुष्टाचें बरें हें कृत्य असावें ? कां पण याला टाकलें असावें ?—आईच्या किंवा बापाच्या मुळावर तर नसेलना ही आली ? म्हणून इला टाकून दिलें आहे ? पण कांहीं असो. दे-

वानें आपणाला दिली आपण ऐचलून घ्यावीं?—पण दम खा. वेड्याला विचारावें. तो काय म्हणतो तें तर पहूं?—वेड्या जवळच होता, त्याला हाक मारतों कसा! अरे वेड्या! वेड्या! ए!—(वेड्या येतो.)

वेड्या—ओ! ओ!

गोपाळ—अरे! आलास का? हें पाहिलेंस का? तुला वघ देवानें बहीण दिली!—पण असा भ्यालासा रे कां दिसतोस?—कांहीं तुला झालें कीं काय?

वेड्या—कांहीं नाहीं बाबा! तें वघा! मीं कीं नाहीं दोन मोठे प्रसंग पाहिले!—एक तो समुद्रांत आणि एक जमिनीवर! पण बाबा! समुद्र कसा म्हणूं! हें वरचें आभाळ आणि खालचें पाणी एकच होऊन गेलें बाबा! आणखी काय अंधार गुडूप! डोळ्यांत बोट घातलें तरी दिसेना!

गोपाळ—तर मग तूं काय पाहिलेंस?

वेड्या—काय बाबा! तो समुद्र खवळला! आन् काय ओरडायला लागला! आन् काय खडकावर आदळूं लागला! पण बाबा! ही गोष्ट नव्हतों मी तुम्हांला सांगत! काय बाबा! ते गरीब नावाडी ओरडले, आणखी घायघाय रडले! माझ्या कानांत तो शब्द अजून गुणगुणतो आहे! ते एकदा दिसावे, एकदा दिसूं नयेत! त्यांचें तें तारूं बाबा! अस्तें वर खालीं व्हायला लागलें! एकदा वाटलें जातें आतां वर उडून! पण वघा गटदिशीं पाण्यांत कोंढो बुडून गेलें! आणखी त्याचा माग ना मूस!—हा एक प्रसंग. आणखी दुसरा तो हा जमिनीवरचा. काय पहा बाबा! त्या वाघानें त्याला ओढिलें आणखी तो भयांभयां ओरडूं लागला:—"सोडवारे सोडवा! अरे! मी संस्तावक आहें. मी सरदार आहें. मला सोडवारे सोडवा!"—पण तें तारूं कसें वघा बुडालें! ते लोक कसे ओरडले, आणि समुद्र तरी कसा ओरडला पण!—आणि तो विचारा सरदार कसा ओरडला, आणि वाघ कसा ओरडला! पण वाघ्याचा शब्द त्यापुढें कांहींच नाहीं.

गोपाळ—अरे ही केव्हांची गोष्ट!

वेड्या—बाबा! ही आतांच झाली. अजून तें तारूं बुडालाही गेलें नसेल. आणखी वाघानें त्याला सगळा खाल्लाही नसेल.

गोपाळ—मी असतों तर त्या ज्ञात्र्याला सोडविलें असतें.

वेड्या—नाहीं बाबा! त्या तारवांतील लोक वांचविले असते, तर वरें झालें असतें! एकाला वांचविण्यापेक्षां दहांना वाचविणें बरें!

गोपाळ—खरेंचरें वेड्या! असले प्रसंग फार वाईट! पण हें पाहिलेंस का?—वेड्या! तुला मरतांना लोक आदळले. पण मला पहा जन्मास आलेलें हें मूल सांपडलें. हें पहा!—ही शालजोडी वघ कशी चांगली आहे ती! हें कोणा तरी श्रीमंताचें बाळ आहे! आणि ही वघ पेटी! वघरे वेड्या! तींत काय आहे तें?—मला सांगितलें होतें एका जोशानें, कीं तुला द्रव्य सांपडेल म्हणून! तेंच हें! वघ वघ बरें!

वेड्या—बाबा हो बाबा! आपलें नशीब उघडलें! यांत वघा! मोहरा, पुतळ्या आणि रत्नेंच!

गोपाळ—जोशानें सांगितलें तें खरें. चल! चल! घरीं जाऊं कसे. बोलूं नको आं

ही गोष्ट कोणाजवळ! चल ही पेटी आणली हें बाळ घेऊन घरीं घेऊन जाऊं! त्या गाई कोठें गेल्या आहेत त्यांचा शोध लावला पाहिजे! चल! चल!—

वेड्या—बाबा! तुम्ही एकटेच घरीं जा. मी गाई येतों घेऊन, आणि पाहतों तों वाघ गेला कीं नाहीं तो! तो गेला असेल, आणली त्या सरदाराला सगळें खाल्लें नसेल, तर आपण त्याला मुठ माती देऊं! एकदा वाघाचें पोट भरलें, म्हणजे मग तो कोणाच्या वाटेला जात नाहीं!

गोपाळ—बरें. तूं जा तर, मी घरीं जातों. राहिला असेल त्याचा कांहीं भाग, तर ये सांगायला!

वेड्या—बरें आहे बाबा! असेलच तर आपण दोघे मिळून त्याला मूठ माती देऊं.

गोपाळ—वेड्या! आज आपणाला चांगला दिवस उगवला. तर आपण कांहीं धर्म करूं अं? (जातात.)

अंक ४.

प्रवेश १.—स्थळ—मद्रदेश—गोपाळाची खोपटी.

(गोपाळ येतो.)

गोपाळ—काय चमत्कार पहा! बोलतां बोलतां वेळ कशी निघून जाते ती! ही **मुक्तावली** मला सांपडून पुरीं बारा वर्षें होऊन गेलीं! खरेंच, ही कन्या मोठ्या कष्टांत जन्मली असावी! तिचे तें सौंदर्य पाहून सर्व लोक कसे तिजकडे टकमक पाहतात! या वृद्धापकाळीं मला तिला पाहून मोठें समाधान वाटतें! पोटच्या पोरापेक्षांमाझी ममता तिजवर अधिक आहे! आणखी पोर तरी किती शहाणी कीं तिचें तें शहाणपण पाहून लोक नवलच करितात! मला ही मोठी काळजी लागली आहे कीं हिला चांगला नवरा कसा मिळेल? मी आज पुष्कळ ठिकाणीं शोध करितों आहे, परंतु माझ्या मनाला अजून कोणी येत नाहीं.—पण आपण काळजी कशाला करावी? देवानें कोठें तरी नेमून ठेवलाच असेल!—असो; होणार असेल तें होतेंच, पण मनुष्याला कोठें राहवतें? आलीकडे एक दोन महिने माझ्या घरीं तो **गोविंदा** येतो, तो बरा चांगला दिसतो! कधीं कधीं कामाला हातही लावितो! मला वाटतें तो आमच्या येथें येतो, याचें कारण हीच **मुक्तावली**! आणखी खरेंच या **मुक्तावली**चा आणि त्याचा चांगला जोडा जमेल! उद्यां आमच्या **वेड्या**नें जवळच्या गोळ्यांना बोलाविलें आहे. आणखी ते कांहीं तरी खेळ करणार आहेत. मला म्हाताऱ्याला आतां काय करायचें आहे? खेळतना एकादे दिवशीं! आज या **वेड्या**ची कोंग धांदल उडाली आहे! झाडांना दोऱ्या बांधतो आहे, टिपऱ्याच जमा करितो आहे, आंब्याचीं पानें आणून तीं दारालाच लावतो आहे, आपला एक लहानसा मांडव तयार करितो आहे! माझी सून म्हातारी.—तिचीही खटपट सुरू आहे! आणखी **मुक्तावली**ला तरी किती आनंद झाला आहे! **वेड्या**चें तिजवर केवढें प्रेम! आणखी तिचेही पण कमी नाहीं. एकदा हिचें प्रेम झालें, म्हणजे मग माझा

कोठेही जीव गुंतणार नाहीं. पण देवाची मर्जी असेल तसें होईल ! —(जातो).

प्र० २ स्थळ—मद्रदेश, सुधन्व्याच्या राजवाड्यांतील एक खोली.

(सुधन्वा आणि सत्यव्रत येतात.)

सुध०—सत्यव्रत ! एवढें मात्र मी तुमचें ऐकणार नाहीं. याखेरीज पाहिजे तें मागा. मी नाहीं म्हणणार नाहीं. मात्र हा आग्रह सोडून द्या. तुम्हांला ना म्हणणें कसें जीवावर येतें, पण ना म्हटलें नाहीं तर माझी काय अवस्था होईल, हें माझ्या जीवालाच ठाऊक !

सत्य०—महाराज! सिंहलद्वीप सोडल्याला आज मला बारा वर्षें झालीं. आजपर्यंत मी राहिलों खरा, पण आतां वाटूं लागलें आहे कीं, हीं हाडें आपल्या जन्मभूमींत जाऊन पडावीं. दुसरें—**चंद्रकांत** महाराजांचें मन आतां फिरलें आहे. त्यांना मोठा पश्चात्ताप झाला आहे. त्यांचीं किती वेळ आजपर्यंत पत्रें आलीं असतील कीं तूं परत ये म्हणून? "कुटुंब नितर्तलें, **नंदन** निवर्तला, माझें समाधान करण्याला कोणी नाहीं," असें त्यांनीं लिहिलें आहे. पुष्कळदा आपली अशा मागितली, पण आपण मरा जाऊंच देत नाहीं. केव्हांही मीं विचारिलें, तरी 'इतक्यांत नाहीं' असें सांगतां, तेव्हां आतां काय करावें? खरेंच, आतां मरा जाऊंद्याच!

सुध०—माझ्या इच्छेस्तव इतके दिवस राहिलां, तसे आणखी कांहीं दिवस रहा ! आतां जाऊन माझे सर्व उपकार मला विसरायला नका लावूं ! खरेंच, तुम्हांला जाऊं द्यावें, असें माझें मन घेतच नाहीं. आणखी असें कां म्हणून विचाराल, तर पहा ! आजपर्यंत तुमच्या सारखा मला कोणी मंत्री मिळाला नव्हता. तुम्हीं आज त्रेपन्न वर्षें माझें राज्य सुरळीत चालविलें. आतां आम्हांला सोडावें, हें मला कसें बरें वाटेल ? यापेक्षां तुम्हीं मला मुळींच लाभलां नसतां, तर बरें होतें. पण दुष्प्राप्य रत्न एकदा हातीं आल्यावर कोण अभागी त्याचा त्याग करील ?—तें कांहीं नाहीं! **सत्यव्रत !** तुम्हीं जीं कामें अंगावर घेतलीं आहेत, तीं इतरांना झेपण्यासारखीं नाहींत. तुमचीं—तुम्हींच तीं केलीं पाहिजेत; आणि आजपर्यंत मी तुमचा पुष्कळ ऋणी आहें; तसा आणखीही होईन. खरेंच, तुमचे मजवर उपकार अनंत आहेत, ते मी जन्मोजन्मीं विसरणार नाहीं. फेडायची तर आशाच नको.—आतां त्या **सिंहलद्वीपाचें** तर नांवच काढूं नका. त्याचें नांव निघालें कीं आमच्या दादाची आठवण होते. खरेच ते माझे दादा ! त्यांना केल्या कृत्याचा पश्चात्ताप झाला, आणि मी त्यांजपेक्षां धाकटा असूनही त्यांनीं माझी क्षमा कीं हो मागितली ! हर हर ! त्यची अशी स्थिति व्हावीना ! साध्वी विचारी ! छळ तिला सोसवला नाहीं, आणि त्यामुळे तिचा आणि त्या बाळा नंदनचा अंत झाला! हर हर ! मीच या अनर्थाला कारण झालों! मी जर तेथें गेलोंच नसतों, तर आज सर्व कुटुंब कसें सुखांत निजलें असतें ! देवा रे देवा ! केवढा मी पातकी ! पण कांहीं असो. **चंद्रकांत** महाराजांनीं आमच्या बहिणींचा साकाळीं जरी छळ केला, तरी

त्यांवर त्यांचें प्रेम किती होतें, हें आतां दिसून येतें! त्यांचे सरदार त्यांना पुष्कळ आग्रह करितात कीं, "महाराज! आपण विवाह करावा." पण त्यांचें एकच उत्तर "मला तशी आतां पुनः मिळणार नाहीं!" असें निःसीम प्रेम आपण नव्हतें पाहिलें! आमच्या दादांना काय तो एक आशा-तंतु राहिला आहे! त्यांच्या कुलगुरूंनीं त्यांना सांगितलें आहे कीं, जी कन्या नष्ट झाली आहे ती प्राप्त होईल. आणि कां नाहीं हें खरें होणार? साधूंची उक्ति कधींही अनृत होत नाहीं. पण तें असो.——आलीकडे **कमलाक्ष** एक दोन दिवसांत मला दिसला नाहीं. तुमची आणि त्याची गांठ पडली होती का? खरेंच, तो कसा निघेल याविषयीं मला मोठी चिंता आहे! कारण,

श्लोक.

निपुत्रिकातें बहु दुःख होतें,
तैसेंच होतें मृतपुत्रकातें.
त्याहीपरी दुःख विशेष होतें
कुपुत्रकाच्या जनकास हो नें.

सूर्य०—मीही दोन दिवसांत त्यांना पाहिलें नाहीं. ते काय करीत असतात हेंही मला ठाऊक नाहीं. इतकें मात्र माझ्या लक्षांत आलें आहे कीं, आतांशीं ते फारसे दरबारांत येत नाहींत, व पूर्वीच्या व्यवसायांतही त्यांचें लक्ष नाहीं!

सुध०—माझ्याही लक्षांत ही गोष्ट आली, आणि त्यामुळें मला मोठी चिंता उत्पन्न झाली आहे. तो कोणीकडे जातो, याचा शोध लावण्याकरितां मीं गुप्त चार पाठविले होते. चार हे आह्मा राजांचे चक्षु होत. कोठें काय होत, याचें इत्थंभूत वर्तमान ते आह्मांला सांगतात. या चारांकडून मला अशी खबर कळली आहे कीं, आमचा **कमलाक्ष** येथून तीन चार कोसावर एक खेडें आहे, तेथें एका गौळ्याच्या घरीं अक्षयीं असतो. ह्मणतात हा गौळी पूर्वी निर्धन होता, पण आतां मोठा सधन झाला आहे. आणखी याच्याजवळ ही संपत्ति कोठून आली, हें कोणाला ठाऊक नाहीं!

सत्य०—महाराज! मींही या गौळ्याविषयीं असेंच ऐकिलें आहे. आणखी असेंही ह्मणतात कीं, याला एक कन्या आहे, तिचें लावण्य कांहीं अलौकिक आहे. अशा ठिकाणीं असलें रत्न संभवेल, असें नाहीं! पण कोणाला ठाऊक!

सुध०—हेंही मला चारांनीं सांगितलें आहे. तेव्हां गोष्ट पटली. याच कन्येला लुब्ध होऊन **कमलाक्ष** तिकडे जात असेल. तिजवर याचें प्रेम जडलें नसो ह्मणजे झालें. नाहीं तर अनर्थाला कारण होईल. माझ्या मनांत असें आलें आहे कीं, आपण जाऊन डोळ्यानें हें बघावें. तुह्मींही मजबरोबर चल! आपण असें वेषांतर करूं कीं, आपणाला कोणींही ओळखणार नाहीं; आणखी तेथें जाऊन या गौळ्याला विचारूं. गौळी भोळे असतात, तेव्हां आपला **कमलाक्ष** तेथें कां जातो, याचें कारण आपणाला सहज काढून घेतां येईल. या कामांत मला तुमचें साहाय्य असलें पाहिजे. समजलां?—आतां सिंहलद्वीपाचें पुनः नांव काढूं नका.

सत्य०—मी महाराजांबरोबर मोठ्या आनंदानें

येईन. पण स्वदेशीं जाण्याची इच्छा महाराजांनीं पुरवावीच!

सुध०—त्याचें मग पाहतां येईल. उदईक आपणाला या गौळ्याच्या घरीं गेलेंच पाहिजे. वेषांतर करून जायाचें आं! लक्षांत असूं द्या! (जातात.)

प्र० ३. स्थळ—तेंच. गोपाळाच्या खोपटीजवळील एक रस्ता.

(कुटिल गात गात येतो.)

कुटि०—

पद.

चल सखि! जाऊं कुंजवनीं ध्रु०
माधव मंत्रा घेउनि म· ·य, अवतरला अवनीं. १
अनिलसमीरित वनराजीची, शोभा आण मनीं. २
चित्रविचित्रा सकला भूमी, शोभे ही सुमनीं. ३
सहकारांना पल्लव फुटले, मधुकर करिति ध्वनी. ४
कुसुममनोहर मारुत वाहे, उत्तव होय जनीं. ५
शुक,पिक,मैना सुस्वर गाती, वाढे मोद मनीं. ६
आलाफातें घेउनि कोकिल, रंजवि मधुर स्वनीं. ७
पूर्ति करूं या विलोचनाची, काय असे सदनीं? ८

राजपुत्र **कमलाक्ष** यांचा मी एकदा नोकर होतों. त्यावेळीं माझी काय चैन होती! उंच उंच पोशाख! खायला गोड गोड! पण आतां तें सर्व वारें फिरलें! भाकरीचा तुकडा मिळण्याची पंचाईत झाली आहे! पण ही स्वारी थोडीच माझा मारीत बसणारी आहे! एक मार्ग नाहीं, तर दुसरा! येथें हो काय कमी! लोकांजवळ कांहीं खायला असलें कीं तें आमचेंच! आह्मीं चोर मोठया उदार बुद्धीचे! आपपर आह्मांला माहित नाहीं! रात्र, आणि त्यांत आंवस, आह्मांला मोठी प्रिय! चंद्र आह्मांला मुळींच आवडत नाहीं, आणखी तो आमच्या कुटाचा शत्रु!—आमचा धंदा असातसा लहानसान नाहीं, फार मोठ्या योग्यतेचा! कोठें कोणाचें भांडें घरावरेर पडो, कीं तें कांहीं त्याच्या पुनः दृष्टीत पडायचें नाहीं! कोठें धर्मशाळेंत कोणी आपली वस्त्र विसरो, कीं तीवर हक्क आमचा! कोठें एकादा बाईनें लुगडें वाळत घातलें, कीं तें या स्वारीनें नेलेंच! वा! केवढे आह्मीं हुशार! मग आमचा हा रोजगार चालतोच कीं नाहीं! कोणावर चालतो ह्मणाल तर गाफल लोकांवर! आह्मीं मोठे ठक! कांहीं तरी युक्ति लढवून आपलें कार्य साधून घेणार! हा आमचा उद्योग आजकालचा नाहीं! बाळपणींच या स्वारीचा पराक्रम लोकांना दिसून आला होता! तेव्हांच "कुटिल" हें नांव मिळविलें! हें लहान का बक्षीस! आमचे दुसरे भाऊबंद आहेत, ते वाटा मारितात. पण त्यांचा माझा प्रत्यक्ष संबंध नाहीं. त्यांचें चालतें तोंपर्यंत बरें आहे. पण जर का एकदा ते सोटेवाल्यांच्या तावडींत सांपडतील, तर मग सुळावींच गांठ! दगा न कोणाचा सगा! नकोरे बाबा! आपणाला तो घातपात आणि तो सूळ! आह्मीं सांपडलोंच तर दोन चार दिवसांचा खोडा मिळेल!—आतां आह्मी हें करतों हें पाप किंवा पुण्य याचा आपला विचारच करूं नये कसा! कारण हा वेडा विचार चोरांना कांहीं कामाचा नाहीं. माझी पण काय शिथापी! घटकेंत माझें सोंग निराळें! आणि मग मला कोण ओळखतो?—ही पहा आमची एक शिकार आली!

(वेड्या येतो.)

वेड्या—घ्या बरें.—चार दिला त्या! तेव्हां त्याचे दोन रुपये! होण्याचा रुपया हा! घटकाभर सटव्याचे चार आणे ते! किती झाले! दोन रुपये, एक रुपया, आणि एक पावली! पण ती रकमच विसरलों—

कुटिल—(एकीकडे) हा लाग साधला तर मग आमची चंगळच!

वेड्या—नाहीं, आपणाला खडे घेतले पाहिजेत.—आमच्या ताईनें उद्यांकरितां काय बरें मला आणायला सांगितलें?—तीन शेर गूळ—हरभऱ्याची डाळ—तांदूळ.—पण आम्हांला तांदूळ कशाला पाहिजेत?—पण आपणाला ही कोणीं पंचाईत सांगितली? बाबांनीं सांगितलें कीं, ताई सांगेल तें आणून दे. उद्यांची सर्व तयारी ती करणार आहे. तिनें बाकीची सर्व तयारी केली आहे!—पण मला थोडी रांगोळी आणली पाहिजे. इतकी मंडळी येणार, आणखी रांगोळी नको! आणखी थोडा गुलालही पाहिजे. पण मीं सगळेंच विसरलों. पानें आणतां येतील, पण तंबाखू! ती तर पुष्कळ पाहिजे!—ताईनें सांगितलेलें राहिलें—लवंगा, मोहोऱ्या, आणि हिंग. हें सर्व आणलें पाहिजे. काय याला लागेल कोणाला ठाऊक?

कुटिल—(जमिनीवर पडून) देवारे देवा! कोणी मला हात देईल कारे!

वेड्या—अरे, काय आहे रे?

कुटिल—अरे बाबा! थोडा मला हात दे रे.

वेड्या—अरे, झालें काय पण?

कुटिल—अहो त्यानें मला मार मार मारिलें. माझा पैसा छिनाऊन घेतला! माझे कपडे चांगले होते, तेंही घेतले! आणखी हे पहा कसले घाणेरडे कपडे मला दिले!

वेड्या—बरें पण, तुला कोणीं मारिलें?—भामट्या होता! का चोर होता?

कुटिल—चोर हे होता, आणखी भामट्या ही पण होता.

वेड्या—भामट्याच खरा. असले घाणेरडे कपडे दुसरे कोणाजवळ सांपडतील? चल, उठ, हा मी तुला हात देतों.

कुटिल—हळूबरे बाबा हळूच!

वेड्या—अरेरे! इतकें का तुला त्यानें मारिलें?

कुटिल—हळूच! हळूच! ही पहा माझी कंबरच मोडली! आणखी हात लचकला! अग आई! अग बया बया!

वेड्या—राहवतें ना उभें?

कुटिल—हळूच! हळूच! (त्याचा खिसा कातरतो.) बाबा! तुजें देव बरें करो!

वेड्या—तुला कांही पैसे पाहिजेत रे! पाहिजे असतील तर देतों.

कुटिल—नको रे बाबा! मला नकोत पैसे. पैसे घेऊन आणखी कोठें उपकार फेडूं? या पलीकडच्या खेड्यात माझा मामा रहातो, तिकडे मी चाललों होतों. तेथें गेलों म्हणजे मग मला कांहीं कमी नाहीं. तुमचे नकोत मला पैसे. छे! छे! लोकांचा पैसा कशाला मला पाहिजे?

वेड्या—तुला ठाऊक आहे का, कोणीं तुला लुटलें तें?

कुटिल—हो हो! ठाऊक आहे तर! तो गुलाम इकडून तिकडे भटकत फिरतो, आणखी एकटे दुकटे पाहिलें कीं सोडीतच नाहीं!

तो त्या राजपुत्राच्या तैनातींत होता, आणि मग त्यानें कोणते गुण उधळले कोणाला ठाऊक? पण त्याला गचांडी देऊन लाथा बुक्क्या मारून राजवाड्यांतून हांकून दिलें !

वेड्या—गुण तसेच असतील, म्हणून हांकून दिलें ! नशिबीं असलें पाहिजेना ! फुकट कोण कुणाला हांकून देईल ?

कुटिल—तो मला चांगला माहित आहे.—कांहीं दिवस गारुडी बनला होता. मग पुढें लोहाराचे हाताखालीं राहिला. तेथून निघाला तो हे दशावतारी येतात कीं नाहीं यांच्या टोळींत मिसळला. आणि आतां आपला पक्का भामट्या बनला आहे.—त्याला कायसें "कुटिल कुटिल" म्हणतात. नांव तरी मोठें विलक्षणच ! मला अजून या नांवाचें राहून राहून हंसूं येतें.

वेड्या—हातट्याच्यारे ! त्याला का तूं भ्यालास? तो भामट्या खराच!—यात्रेत जातो. देवळांत जातो, आणखी कांहीं हाताला लागलें तर बघतो. याचें नांव मीं ऐकलें आहे, पण त्याला अजून डेळ्यांनीं कधीं तें बघितलें नाहीं.

कुटिल—तोच तो लुच्चा ! त्यानेंच मला लुटलें आणि मारलें !

वेड्या—अरे ! काय मर्दा ! त्याला का तूं भ्यालास? असला भेंकड तर आपल्या इकडे कोणी नाहीं. थोडें यंत्र केलें असतेंस तर तो पळून गेला असता ! छत् मर्दा! अशाला का कोणी भितो ?

कुटिल—मला कोठें पण ठाऊक होतें कीं तो भेंकड आहे ? आणखी खरेंच पुसाल तर मला कीं नाहीं तें कांहीं ठाऊक नाहीं. मी ही आपला भेंकडच आहें. आणि तें त्याला ठाऊक होतें वाटतें.

वेड्या—आतां पण तुला बरें वाटतेंना? चालतां येईल का ?

कुटिल—हो, आतां येईल. तुम्हीं जा आपल्या कामाला. मी आतां हळू हळू आपल्या चुलत्याकडे जातों !

वेड्या—मी येऊं का तुजबरोबर ?

कुटिल—नको नको ! तुम्हीं जा !

वेड्या—बरें तर मग. उद्यां आमच्या येथें बारसें आहे, त्याकरितां मला सामान घ्यायला जायचें आहे, तिकडे मी जातों. नीट जपून जा बरें !

कुटिल—बरें बाबा ! (वेड्या जातो.) सामान घ्यायला जातोस, पण विशांत काय आहे !—बरें आहे हें एक दुसरें संधान लागलें. उद्यां यांच्या येथें मंडळी जमेल, तेथें आपणाला गेलेंच पाहिजे.—जाईन, आणखी तेथें जर नाहीं लाग लागला, तर नांवचु बदलून ठेवीन!

प्रवेश ४. स्थळ—गोपाळाचें घर.

(कमलाक्ष आणि मुक्तावली येतात.)

कम०—सुंदरी !

श्लोक.

वसन हें तुजला बहु शोभवी,
नमळ रत्न कसें वद गोप वी[1]?
अवतरे विधु अंबर सोडुनी,
झळकतो वदनीं गमतें मनीं !

आणखी आज खंडोबाची काठी भिरवि-

---

१. उत्पन्न करी.

प्याकरितां हे जे गोप आले आहेत, ते मला गोप वाटत नाहींत ! तर—

श्लोक.

स्वर्गीं असे दुर्लभ अप्सरांना
हें जाणुनी गर्व नसे जयाना
वाटे सुराचे गण ते अमूप[1],
आले पहावास तुझें सुरूप.

मुक्ता०—भलतेंच कांहीं तरी बोलायचें ! पण आपणाला कसें नांव ठेवावें ? माझी तशी योग्यता नाहीं. पण हें असलें काय मेलें करावें ? मला ही भरगच्ची शालू आणखी जरीकांठी चोळी आणून दिली, आणखी हट्ट घेतला कीं तूं नेसच ! आणखी आपण मात्र एकाद्या साधारण गौळ्याचा वेश घेतला, याला काय म्हणावें ? आपली योग्यता कोठें आणि हा वेष कोठें?—आणखी मला उंच वस्त्रें शोभत नसून हीं दिलीं ! हें काय बरें ? आज मला लोक काय बरें म्हणतील !—बरें पण, आपण मात्र असल्याच वेषानें इतर मंडळींत येणार ! वाहवा ! मी नाहीं ऐकायची ! आपण यापेक्षां चांगला पोशाक केला पाहिजे!—खरेंच, आपला हा असला पोशाक पाहून मला कसेंसेंच वाटतें !

कम०—पण मला आवडतोना ? तुला कां वाईट वाटावें ? पण तें असो. मला तर असें वाटतें कीं, त्या दिवशीं मृगाने मला येथें आणिलें नाहीं, तर माझ्या सुकृतानेंच! कारण, प्रिये !

श्लोक.

मधुर असती या भूलोकीं पदार्थ अनेकसे;
नयनाविषयीं येतां चेतःप्रसादहि होतसे,

१. पुष्कळ. २. डोळ्यांसमोर. ३. चित्ताची प्रसन्नता.

तरि नयानें ही वामांगी म्यां जयीं अवलोकिली,
सुकृतघाटिका तीं या जन्मीं गमे मज एकली !

मुक्ता०—मला बाई ! हें सुचिन्ह दिसत नाहीं. आपली योग्यता कोठें ? आपण जो विचार मनांत आणिला आहे, तो मला नाहीं वाटत घडून येईलसा ! आपणाला नाहीं कसली भीति ! पण मला तर आहे ना ! हें बघा, आपण जसे अकस्मात् येथें आलां, तसेच महाराज येथें आले तर मग ?—मला कीं नाहीं वरी गत दिसत नाहीं. ते आले म्हणजे आपणाला काय म्हणतील ? मला काय म्हणतील ?—आणखी ही असली शालू—कीं जी मला शोभत नाहीं—ती नेसून मला मान तरी वर करवेल बरें !—खरेंच, हा नाद आपण सोडून द्या कसा !

कम०—काय ? वेडी तर नाहींस ! असलें भलतें सलतें नको मनांत आणूं गडे ! यापासून आपलें चांगलेंच होईल. हा गोपाचा वेष तुला आवडत नाहीं, होय ? बरें तर. याचें काम झालें म्हणजे टाकून देईन. तुझ्या बाबाचें वचन घेई तोंपर्यंत काय तो याचा स्वीकार केला आहे. तेवढें कार्य झालें म्हणजे मग मी राजपुत्र आहें, असें सांगायला कांहीं हरकत नाहीं. स्त्री मिळविण्याकरितां युक्ति प्रयुक्ति कराव्या लागतात. **सुभद्रे**चें हरण करण्याकरितां **अर्जुना**नें नव्हता का यतीचा वेष धारण केला ! त्या पेक्षां तर हा वेष बरा ना ? **कृष्णा**नें नाहीं का युक्तीनें **कुंडिनपुरां**तून **रुक्मिणी**चें हरण केलें ? तसें पण मी तुझें हरण नाहीं करणार! तुझ्या पित्याचा

१. पुण्याची घटिका.

रुकार घेईन, आणि मग तुझा आणि माझा विवाह होईल !

मुक्ता०—विवाहाचें कशाला नांव काढतां ? आपल्या मनांतून जरी असलें, तरी महाराजांना ती गोष्ट कशी रुचेल? गोळ्याच्या पोरीशीं ते आपणाला लग्न कसें लावूं देतील ? त्यांनीं नाहीं म्हटलें, म्हणजे आपलें कांहीं चालणार नाहीं, आणि मग आपणाला माझा नाद सोडून द्यावा लागेल ! असें झालें म्हणजे मग मी आपणालाही मुकलें आणखी जीवालाही मुकलें. एवढ्याकरितां अगोदरच सांगतें कीं हा नाद सोडून द्या.

कम०—प्रिये ! भलत्याच शंका मनांत आणून आजचा सुदिन दुर्दिन नको गडे करूं ! काय सांगूं ?

श्लोक.

हा दास सुंदरि ! तुझा; न अलीक[1] जाणें;
ये अंतराय[2] जरि तात तया न भेणें[3].
ये विघ्नसंघ जरि, हो प्रतिकूल दैव,
राहीळ हा मदनुराग[4] असा सदैव !

तुला माझ्या तातांची भीति वाटते, पण हें बघ!

श्लोक.

मत्प्रिया जरि मिळेल न मातें,
काज काय मजला मग तातें ?
जोंवरी मन असे मदधीन,
तों धरो तव गुणीं रति कां न ?

एवढ्याकरितां म्हणतों कीं, असल्या भलत्याच कल्पना मनांत आणून विरस करूं नको ! हे पहा बोलावलेले गोप येऊं लागले ! अशा वेळीं हें असलें खिन्न वदन नाहीं कामाचें ! प्रिये ! यावेळीं असेंच कां बरें समजेनास, कीं,

श्लोक.

मोठी आस धरूनियां दिवस जो येवो असें इच्छितों,
अर्पी कंकणयुक्त हस्त तव हा जेव्हां उपाध्याय तो,
जेव्हां मंगल वेदमंत्र पठती उच्च स्वरें ब्राह्मण, —
होशी राजवधू जयीं नृपकुळीं, तो आज पुण्यक्षण !

मुक्ता०—अंबाबाई करील, तर असा सुदिन येईल आपणाला !

(गोपाल, गोपांचा वेष घेतलेले सुधन्वा आणि सत्यव्रत, वेड्या, म्हाळसा, आणि इतर गोप व गोपी येतात.)

कम०—हे पहा गोप आलेच. तुझ्या घरीं आले आहेत, तेव्हां यांचा चांगला आदर सत्कार करं, आणि आज जिकडे तिकडे आनंदच आनंद होऊं दे!

गोपाल—हें काय ग असें मुक्तावली ! मुली ! बरें, आपल्या येथें कोणी चोर चोंघे आले, तर त्यांची व्यवस्था नाहीं का तुम्हीं ठेवूं ? तुम्हीं आतांच्या पोरी अयदीं झालां! ती होती, तेव्हां सर्व काम करीत होती, झाडीत होती, सारवीत होती, भांडीं घांशीत होती, स्वयंपाक करीत होती, गाढीत होती, पाय धुवायला पाणा देत होती, कोणी पई पाहुणा आला तर या बसा म्हणत होती,—नाहीं तर तुम्हीं ! जशा कांहीं राजाच्या पट्टराण्या ! हें काय असें ! चला. हे पहा आपल्या येथें अनोळखी गृहस्थ आले आहेत, यांचा आदर सत्कार करा ! काय रे वेड्या ! तूंही जिकडे जातोस तिकडेच! आतां तुम्हीं जर नाहीं पाहिलें, तर मी म्हाताऱ्यानें

१. मिथ्या. २ अडथळा. ३. भिणें. ४. माझी प्रीति.

कारे पहावें! अरे! तुमचे हे दिवस आहेत. माझ्या काय गेल्या गोंत्र्या नदीवर! चला, या सर्वांचा आदर सत्कार करा! कांठीची पूजा करायची आहेना— तर द्या यांना फुलें. मनापासून पूजा करा बरें, ह्मणजे **खंडोबा** तुमचें कल्याण करील. ऐकलें कारे ए? समजलांतना नीट? नाहीं तर पहा आपले अळंटळं कराल, तें चांगलें नाहीं.

वेड्या—(सुधन्व्यास) आपण बसावें येथें. आणखी (सत्यव्रतास) आपणही पण बसावें. आमचे बाबा आतां वृद्ध झाले आहेत, तेव्हां आमचा हा पोरवडा आपणासारख्या वृद्धांना आवडेल कीं नाहीं कोण जाणें? ताई! तूं मधांशीं फुलें ठेवलीं आहेत तीं दे ग यांना!

मुक्ता०—हीं घ्यावीं जुईचीं आणि पारिजातकाचीं फुलें. हीं कीं नाहीं मोठीं सुकुमार आहेत! लौकर कोमेजतात!

सुध०—मुली! आमच्या वयाला अनुरूप अशींच तूं आह्मांला हीं पांढरीं पुष्पें दिलीं! यांचें सौंदर्य जसें क्षणिक आहे, तसेंच आमचें जीवितही क्षणिकच आहे!

मुक्ता०—आपणाला रंगी बेरंगी फुलें आवडणार नाहींत, ह्मणून हीं पांढरीं फुलें दिलीं आणली खरें पुसाल तर मलाही पण हीं असलीं रंगी बेरंगी फुलें आवडत नाहींत!

सुध०—हं—पण असें कां बरें मुली?

मुक्ता०—कारण या असल्या फुलांचा वरकांती रंगच पाहून घ्यावा! त्यांना फारसा सुगंध नसतो!

सुध०—(एकीकडे) एकूण वरकांतीच्या गुणांस ही लुब्ध होत नाहीं! अंतर्गुणांच्या योगें हिचें मानस रममाण होतें! चमत्कार खरा, कीं गोपाची कन्या आणि इतकी शहाणी!

मुक्ता०—हीं मोगऱ्याचीं आणि शेवतीचीं फुलें आपण घ्यावीं! (सत्यव्रतास उद्देशून) हींही आपल्या वयाला अनुरूप आहेत! पाहिजे तर हीं निशिगंधाचीं घ्या! नाहीं तर बकुलीचीं घ्या!

सत्य०—पहिलीं दिलीं तितकीं पुरत. अधिक नकोत. (एकीकडे) खरेंच, ही लावण्याची खाणी या कुळांत कशी निपजावी? उगींच नाहीं आमच्या धाकट्या महाराजांचें चित्त येथें रमलें!

मुक्ता०—(कमलाक्षास उद्देशून) आपणाला बरें कोणतीं फुलें द्यावीं? आपणाला देण्यासाठीं आज मज्जवळ नाहींतच! हा वसंतकाळ असता तर आपणाला योग्य अशींच सुमनें दिलीं असतीं.—

कम०—मला फारशीं सुमनें नकोत! एकच दिलें ह्मणजे पुरे आहे!

मुक्ता०—(हळूच) आणि तें कोणतें?

कम०—(हळूच) तें असें उपवनांत होत नाहीं, तें तुझ्या हृदयारामांत विकास पावतें.

मुक्ता०—(हळूच) हें काय बाई बोलणें! तें सुमन आतां मज्जवळ राहिलें आहे कोठें? तें तर केव्हांच नेलें!

कम०—(हळूच) नेलें कीं दिलें?

मुक्ता०—(हळूच) काहीं का ह्मणाना? मज्जवळ नाहीं हें खरें!

कम०—(हळूच) बरें तर मग, हा बकुलीच्या सुमनांचा हार त्वां केला आहे तोंच तोंपर्यंत मी आपल्या गळ्यांत घालतों.

मुक्ता०—(हळूच) तोंपर्यंत ह्मणजे?

माना०—बरें बरें ! चालते व्हा, आणखी त्या धनाजीरावाला आंत घेऊन या !

चाक०—जी. (जाऊन धनाजीरावास घेऊन येतात.)

माना०—यावें, सद्गृहस्थ ! आपण आमच्यावर मोठाच उपकार करायचा बेत केला होता, पण तो बेत आपणाला साधला नाहीं ! आणखी त्या योगानें आपण आमच्यां कुळाची अब्रूही वाढविणार होतां तें पण कांहीं जमलें नाहीं !

धना०—सरकार पाहिजेल तें बोलायला मुखत्यार आहेत, परंतु आतांच्या आपल्या बोलण्यांवरून आपणाला आपल्या कन्येवरच्या संकटाचें कांहींचं वाईट वाटत नाहीं असें दिसतें !

माना०—कांहीं असो, तुमचें याबद्दल काय म्हणणें आहे !

धना०—नाहीं, म्हटलें आपली कन्या यावेळीं चोरटयांच्या हातीं सापडली आहे त्याबद्दल आपणाला कांहींच दुःख वाटत नाहीं ?

माना०—होयच ! माझ्या कारटीला चोरांनीं नेली, किंवा तुम्हीं उपटली तरी दोहींचा अर्थ एकच ! कारण दोघांनींही माझें अनुमत मुळींच घेतलें नव्हतें !—तेव्हां मी याबद्दल आपल्या जिवाला जास्ती वाईट काय म्हणून वाटवून घ्यावें ? तुम्हीं प्रत्यक्ष माझ्या प्रजाजनांपैकींच असून तिला पळवून नेतांना माझें अनुमत थोडकेंच घेतलें होतें !

धना०—मी आपला प्रजाजन ही गोष्ट खरी आहे, आणली माझ्या शरीरावर ज्या बेड्यावांकड्या तरवारींच्या घायांच्या खुणा आहेत, त्यांवरून मी प्रजाजन या नात्यानें आपली नोकरी बजाविली किंवा नाहीं हेंही आपण जाणत आहांच ! फार कशाला, नुकती तीन वर्षांपूर्वी पलीकडच्या डोंगर कटारीला भिल्लांची आणि आपली लढाई झाली, त्यावेळीं खुद आपल्या जिवावरच बेतली होती, परंतु त्यावेळीं मी जवळ होतों आणि आपला बचाव केला, ही गोष्ट आपणास आठवत असेलच !

माना०—बस बस ! मला जास्ती ऐकत बसण्याची जरूर नाहीं ! तूं धडधडीत माझा पगारच खात होतास, तेव्हां याबद्दल तुला प्रौढीच मिरवायला पाहिजे असें तूं समजूं नको.

धना०—सरकार ! मी प्रौढी मिरविण्याचे उद्देशानें मुळींच बोलत नाहीं,—पण ज्यावेळीं हा प्रकार घडला, त्यावेळीं आपण मजवर प्रसन्न झालां, व आपल्याच मुखानें मी आपला प्राण वांचविल्याबद्दल आपण माझी प्रशंसा केली, तेवढ्यामुळें मीं आपलें गरीब कुळांत झालेलें जनन विसरून लागून जास्ती योग्यता संपादन करण्याची उमेद धरली ! त्यावेळीं खुद आपणही माझा तिरस्कार न करितां माझें उलटें प्रोत्साहनच करीत चाललां; व लहानपणापासून मी आणि आपली कन्या जरी एकत्रच वाढलों सवरलों होतों, तरी मी तिच्या योग्यतेस साजण्यासारखा आहें अशी बुद्धि आपणच माझ्या मनांत भरवून दिली; एवढेंच नव्हे, तर ज्यावेळीं आपण आपल्या थोरल्या चौकांत चोंहीकडे उंच लोखंडी सर उभे करून त्यांचे आंत आपल्या सेवकांची आणि आपण नवीनच धरून आणलेल्या वाघाची झटपट लावली; त्यावेळेस मी एकटाच

पुढें होऊन त्याच्याशीं लढलों, आणि त्याला घायाळ करून यमसदनास पोंचविलें ! हें पाहून जेव्हां आपल्या कन्येच्या नेत्रांतून प्रेमाश्रु वाहूं लागले, तेव्हां आपण जवळ असून तिला प्रेमानें आलिंगन देऊन तिचें समाधान केलें, आणि माझें नांव घेऊन तिला 'बेटा ! काळजी करूं नको ! तुझा इच्छेप्रमाणेंच मी तुझा निवाह लावीन' ह्मणून ह्मटलें, यांचें आपणास इतक्यांतच विस्मरण झालें काय ?

माना०—मला तें ऐकायची कांहीं जरूर नाहीं!—तुह्मीं ह्मणतां त्याप्रमाणें त्या प्रसंगाच्या भरांत मी बोललों होतों, तथापि मागाहून तिनें तुमच्यावर प्रेम करूं नये ह्मणून मीं तिला निक्षून बजाविलें होतें !

धना०—तें खरें, पण त्याचें कारण ?

माना०—कारण कारण ह्मणून काय विचारितोस ? तुझें नीच कुलीं जन्म एवढें कारण बस्स आहे!

धना०—महाराज ! आपण आमचे धनी साहेब, व आह्मीं आपल्या प्रजा, तेव्हां आपण ह्मणाल त्या गोष्टी आह्मांला मुकाट्यानें ऐकून घेणें जरूर आहे. परंतु आपणच विचार करा ! अमुकच कुळीं जन्म घ्यावयाचें हा निश्चय कोणाचा कधीं तरी सिद्धीस गेला आहे काय ? किंवा असा निश्चय तरी कोणास कधीं करितां आला आहे काय ? एवढे मोठे **पांडव**, ज्याची बाहुशौर्यविषयीं दिगंत ख्याति, ते नांवाला मात्र **सोम**वंशीं झाले, परंतु त्याची खरी उत्पत्ति पाहूं गेल्यास कितीशी श्लाघ्य आहे ? एवढा भगवान् **कृष्ण**, त्याची प्रत्यक्ष मातोश्री **देवकी** इचें कुळ काय होतें ? भगवद्भक्त **प्रल्हाद**—ज्याची योग्यता केवढी कीं, त्याच्या रक्षणाकरितां प्रत्यक्ष शेषशायी **नारायणाला नृसिंहावतार** धारण करावा लागला, त्याची वास्तविक जाति असुरांचीच होती कीं नाहीं ? तेव्हां तात्पर्य काय ? जातीशीं आणि मनुष्याच्या गुणाशीं कांहीं मेळ नाहीं. मनुष्य चांगल्या जातींत जन्मला ह्मणजे त्याचीं कृत्यें चांगलीं असतातच असा नेम कोण सांगूं शकेल ? एवढा चौदा चौकड्यांचें राज्य एकटाच चालविणारा **रावण**, ज्याचा पराक्रम केवढा कीं त्याच्या भक्तीस्तव त्यास प्रत्यक्ष **कैलासगिरिही** जागेवरून हालविण्याची शक्ति आली, त्याचें जनन उत्तम ब्राह्मणकुलांत झालें असूनही तो अखेर परदाराहरणरूप पातक आचरण्यास चुकला काय ! तेव्हां यावरून काय समजावयाचें कीं, आमचा कुळांत जन्म होणें अगर न होणें या गोष्टी मानवाधीन नसून दैवाधीन आहेत ! याकरितां मनुष्याच्या गुणाची परीक्षा करितांना बाप एक गरीब कुळांत असला ह्मणजे मुलानेंही सदोदित त्याच स्थितींत रहावें असा नियम कशाकरितां ? महाराज !—

माना०—बस्सबस्स ! मला हे तुझें लांब चव्हाट ऐकण्याची जरूर नाहीं! मला ठाऊक आहे, तूं या पुराणिकासारखी पंडितगिरी संपादिली आहेस, पण तिच्या जोरावर तूं माझ्याशीं या असल्या गोष्टी सांगत बसतोस काय ?

धना०—महाराज ! क्षमा असावी ! आपण असा विनाकारण कोप करूं नये ! मूळ आपणाकडूनच गोष्ट गेली त्याला मीं काय करावें ? आपणच कांहीं जरूर नसतां

मला माझ्या नीच जननाबद्दल दोष लाविलात ही गोष्ट—पण तें सगळें असो! महाराज! तुह्मीं मला नीचजन्मा ह्मणा किंवा पाहिजे तें ह्मणा! त्याबद्दलचा विचार आतांच नको! कारण या क्षणीं नुसत्या माझ्या निंदेपेक्षां आपणास विशेष महत्वाच्या एका गोष्टीकडे लक्ष देणें जरूर आहे!—महाराज! बोलतों इकडे लक्ष असावें! आपली कन्या दरवडेखोरांच्या हातांत सांपडली आहे, तर आपण कृपा करून मजबरोबर वीस हत्यारबंद शिपाई द्या, ह्मणजे या क्षणीं जाऊन त्या दुष्टांचा समाचार घेतों, व आपली प्रिय कन्या थोडक्याच वेळांत आणून आपले स्वाधीन करितों! आपणाला कदाचित् इतके लोक मजबरोबर देणें अवघड वाटत असेल तर त्यांचे बदलीं दहा—पांच—लोक दिले तरी मला चालेल!—फार कशाला? मी ह्मणतों याप्रमाणें करण्याची नसेलच आपली मर्जी, तर कृपा करून आपण मला एकट्यालाच हत्यारांनिशीं किल्ल्याबाहेर पडण्याची परवानगी द्यावी, ह्मणजे मी एकटाच पहातों त्या दुष्टांचा कसा काय समाचार आहे तो!

माना०—(धिक्कार पूर्वक हंसून) पुरे पुरे! **धनाजीराव!** मी इतक्यातच बोळ्यानें दूध पिऊं लागेन असें समजूं नकोस! तुझा पराक्रम आणि प्रामाणिकपणा मी पक्का आळखून आहें! तुझ्या अंगीं हे दोन्हीही गुण नाहींत, ह्मणूनचना चोरट्यासारखी माझी पोरगी पळवून नेण्याची मसलत काढलीस? (इतक्यांत एक सेवक येतो.)

सेव०—(मुजरा करून) सरकार! आपल्या **संकराचार्यांच्या** ततल्ल्या मठास्नी त्यो वामणबुवा आयलाया!

माना०—ठीक! मी त्यांचीच वाट पहात होतों!—जा त्यांना घेऊन ये! (सेवक जातो) हवालदार! तुह्मीं सर्वजण या कैद्याला घेऊन जा आणि चांगल्या बंदोबस्तांत ठेवा!

धना०—(दुःखानें) हे दीनदयाळ भक्तवत्सला परमेश्वरा! त्या हतभाग्य तरुणीची आतां तुलाच करुणा आली पाहिजे. (हवालदार व शिपाई त्यात बंदोबस्तानें घेऊन जातात.)

माना०—(दुःखानें आपणाशीं) हायहाय! हे नष्ट हृदया! आतांची वेळ तुला कसा तरी धीर धरिलाच पाहिजे! हे नष्ट जिव्हे! आतांची वेळ तूं धीट होच कशी!—हायहाय!—परमेश्वरा! काय हा मज पातक्यावर दारुण प्रसंग! (इतक्यांत पिलंभटाचें सोंग घेतलेला मराखास चाकरांसहवर्तमान येतो.)

माना०—(चाकरांस) जारे! चला चालते व्हा! आणखी इकडे कोणाला येऊं देऊं नका! (चाकर वंदन करून निघून जातात.) यावें भटजी!—यावें! आपलें नांव पिलंभटच नव्हे?

मरा०—होय! **पिलंभट** तो मीच! आचार्यांच्या आज्ञेवरून आपणासंनिध आलों आहें!—(एकीकडे आपणाशीं) बरे झालें, यानें आपण होऊनच **पिलंभटाचें** नांव घेतलें. नाहीं तर पुढें सूड घेण्याच्या व्यग्रतेमुळें मी तें नांवच विसरून गेलों होतों.

माना०—यावें! बसावें!—आज मजकरितां, आपल्याला तसदी फार पडली!

मरा०—महाराज! आपण काय बोलतां हें आह्मीं बोलून चालून जगद्गुरु आचार्य

धर्मशिष्य, त्यांची आज्ञा आह्मांला शिरसा वंद्य आहे ! त्यांच्या अधिकाराचे आह्मीं चाकर, याकरितां त्यांची सेवा करणें हाच आमचा धर्म ! यासाठीं, आपण मजसारख्याला तसदी पडली याबद्दल खेद न मानितां, आपण सद्गुरूंना जें पत्र लिहिलें, त्याचा खुलासा तेवढा कळवावा, ह्मणजे त्याबद्दलचा विचार आपणाला कळवायला ठीक पडेल!

माना०—ठीक आहे ! परंतु आपण नुकतेच दमले भागले आलां आहां, याकरितां इतक्यांतच घाई न करितां अगोदर जेवणखाण आटपून घ्यावें, व नंतर माझी सर्व हकीकत मी आपणास निवेदन करीन !

मरा०—(आपणाशीं) छेः बोवा ! हें लचांड होऊं पहातें ! जर करिता मी याच्या जेवणाखाणाला हो ह्मणेंन, तर मला सर्वांगीं उघडें व्हावें लागेल, व तसें केलें असतां माझ्या मस्तकावरील तें चिन्ह याच्या दृष्टीस पडून हा माझें कपट तेव्हांच ओळखील ! तेव्हां आतां असें बोलावें ! (उघडपणें) **मानाजीराव** ! आपलें ह्मणणें योग्य आहे, परंतु जगद्गुरूंना अतर्ज्ञानानें आपली सर्व हकीकत कळली आहे, व त्यांच्या अंतःकरणांत आपले स्थितीविषयीं अनुकंपा उत्पन्न झाली असून त्यांनीं मला अनुज्ञा देतांना मुद्दाम असें बजावून लिहिलें आहे कीं, ' किल्ल्यांत गेल्यावर या पुरुषाच्या मानसिक आधि दूर करण्याचा उपाय त्यास ज्ञापित करण्यापूर्वीं तुह्मीं '—ह्मणजे मी—' अन्नसेवन न करणें '—याकरितां मला श्रीच्या आज्ञेबाहेर जातां येत नाहीं ! शिवाय किल्ल्यावर चढूं लागण्यापूर्वीच मी आपलें नैमित्तिक आन्हिक आटोपून घेऊन फराळही यथेच्छ केला आहे, तेव्हां इतक्यांतच भुकेची पंचाईत कोण करतो ? याकरितां अगोदर आपलीच हकीकत ऐकण्यास मला कांहीं प्रत्यवाय नाहीं.

मुना०—फार उत्तम !—(आपणाशीं) मना ! या वेळेपुरता तरी धीर धर ! नाहीं तर व्यर्थ व्यर्थ पस्ताव्यांत पडशील ! (दीर्घ सुस्कारा टाकून खालीं मान घालितो.)

मरा०—**मानाजीराव** ! श्रीचे चरणीं आपण आपली सर्व हकीकत सादर केली आहेच! तथापि ती श्रीकडून मला अद्यापि पुरतीशी कळली नाहीं, याकरितां एकवार मनाचा धडा करून तीं बोलून जावींच आपण !

माना०—बोलतों ! हायहाय !—भटजीबोवा ! मला सर्वप्रायश्चित्त घ्यावयाचें ह्मणून मीं श्रीचरणीं विज्ञापना केलेली आपणाला ठाऊक असेलच !

मरा०—होय. यांत काय संशय ?—परंतु **मानाजीराव** ! आपण जी गोष्ट बोललांत, तिचा अगोदर पूर्णपणें विचार केला पाहिजे !—प्रायश्चित्तें अनेक प्रकारचीं आहेत, व तीं शास्त्रकारांनीं पातकांच्या मानानेंच कमी जास्ती अशीं सांगितलीं आहेत; याकरितां प्रायश्चित्त कोणतें घ्यावें याचा निर्णय करण्यापूर्वीं पातक कोणतें हें अगोदर कळलेंच पाहिजे !

माना०—तें खरें, परंतु सर्वप्रायश्चित्ताची गणना महाप्रायश्चितांत केली आहे असें मी ऐकितों, याकरितां माझें कांहीं पातक असलें, तरी त्याची निष्कृति या

प्रायश्चितानें होण्यास कांहीं प्रत्यवाय आहे!

मरा०—प्रत्यवायाबद्दल माझें फारसें ह्मणणें नाहीं, परंतु हा नियम सर्वच पातकाबद्दल करितां येत नाहीं ! कारण, कांहीं पातकें अशीं आहेत कीं, त्यांची निष्कृति प्रत्यक्ष आत्मविनाश केल्यानेंही होत नाहीं, व अनेक जन्मांतरें घ्यावीं लागतात, तेव्हां तुम्हीं ह्मणतां तें पातक अगोदर कोणतें तें कळलें, ह्मणजे त्याच्या प्रतिक्रियेचा उपाय योजणें हें विशेष योग्य होईल !

माना०—भटजी ! आपण या ठिकाणीं मला प्रत्यक्ष आचार्यांचे ठिकाणीं आहां! आपण-

मरा०—छेः छेः—हें व्यर्थ बोलणें! ह्मणतातना कोठें इंद्राचा ऐरावत आणि कोठें **शाम-भटा**ची तटाणी! तशांतली आमची गोष्ट आहे ! आचार्य प्रत्यक्ष **शंकरमूर्ति**, त्यांची योग्यता आह्मां गरीबांला कशाला?—तरी पण त्यांचा आह्मांवर प्रसाद एवढी बरीक गोष्ट खरी! तर बोलावें आपण !

माना०—बोलतोंच. तरी आपण असे अडचणल्यासारखें बसणें मला नीट वाटत नाहीं ! इच्छा असेल तर अंगावरचा हा पोशाख उतरून अंमळसें या बारीच्या तोंडाशीं बसावें, ह्मणजे या शीतल वायूच्या योगानें आपल्या जीवास आराम वाटेल !

मरा०—(आपणाशीं) हा आग्रह फारच करूं लागला हें नीट नाहीं ! याला येथल्या येथेंच झाडून टाकिलें पाहिजे ! (उघडपणें) **मानाजीराव** ! मीं तुह्मांला एक वेळ सांगितलेंच आहे कीं, तुमची गुप्त हकीकत ऐकून घेऊन आपलें चित्त स्वस्थ करावें एतदर्थ श्रीकडून मुद्दाम माझी योजना झाली आहे, याकरितां इकडे येण्याचा माझा हेतु परिपूर्ण झाला ह्मणजे मग मी स्वतःच्या आरामाची केली तर करीन पंचाईत ! तोंपर्यंत मला कांहीं नको !—आणखी दुसरें, तोंपर्यंत आपणही मजबद्दल फारशी पंचाईत करूं नये!—तुमचें मन अत्यंत खेदानें व पश्चात्तापानें व्याप्त होऊन गेलें आहे, तथापि तुह्मांला आपली गुप्त गोष्ट बोलून दाखविण्याचा धीर होत नाहीं, हें मीं पक्केपणीं ओळखलें आहे, व यामुळेंच दुसऱ्या कांहीं तरी गोष्टी तुह्मीं काढीत आहां असें मला वाटतें !—का मी ह्मणतों तें खोटें का खरें ?

माना०—(लाजल्या सारखा होऊन) होय होय! भटजी बोवा ! आपण खरेखर ओळखिलें !—असो ! आतां बोलतोंच !—हायहाय ! भटजी बोवा ! मज सारखा अधम पातकी या जगांत कोणी नसेल ! हा आपणासमोर बसला आहे, हा अत्यंत अघोर स्त्रीघातरूपी पातकानें विटाळला आहे, याकरितां याला या जगांत कांहीं प्रायश्चित्त होण्यासारखें असल्यास मला कळवावें !

मरा०—**मानाजीराव**! स्त्रीहत्या, बालहत्या इत्यादि अनेक अघोर पातकें आहेत, व त्यांच्या निष्कृत्यर्थ सामान्यतः आत्मविनाशाचाच उपाय शास्त्रकर्त्यांनीं सांगितला आहे. तथापि त्यांत त्यांनीं अगदींच सवड ठेविली नाहीं अशांतलाच कांहीं प्रकार नाहीं ! आपण नित्य या भूमितलावर संचार करितों, तेव्हां आपल्या पायांखालीं चालतांना कोट्यावधि जीव प्रत्यहीं चिर-

डून जातात, पण त्याची इतकीशी महती शास्त्रानें ठेविली नाहीं ! या जीवांत कित्येक पुंव्यक्तिक, कित्येक स्त्रीव्यक्तिक असतात ! उभयव्यक्तीतही बालकें आहेतच ! तसेंच स्त्रीव्यक्तीतही कित्येक गर्भिणी असतात ! तेव्हां अशांच्या ह-त्यांची गणना कल्प लागलें असतां मनु-ष्यास मुक्तिमार्ग मुळींच कसा-तो उरणार नाहीं ! म्हणूनच शास्त्रकारांनीं हत्यांचे ज्ञात आणि अज्ञात असे दोन प्रकार सां गितले आहेत, व त्यांपैकीं अज्ञातांबद्दल फारच अल्प प्रायश्चित्त सांगितलें आहे. म्हणून विचारतों, तुमचें पातक समजून उमजून झालें आहे, किंवा न समजून झालें आहे ?

माना०—झालें त्यावेळीं समजूनच झालें म्हणा यचें, पण मागून मात्र माझी चुकी मला कळून आली !

०—हा मोठाच चमत्कार ! तुम्हीं आतां चुकीचें कायसें म्हणालांत त्याचा काय अर्थ ?

माना०—अर्थ निघून इतकाच, ज्या वेळीं तिचा मृत्यु होण्याचा उपाय मजकडून योजण्यांत आला म्हणायचा, त्यावेळीं ती व्यभिचारिणी अशी माझी समजूत होती, पण मागाहून ती तशी नव्हती अ शाविषयीं माझी खातरी झाली !

मरा०—एकूण ती खरोखरी निर्दोष असतां तिला आपण दोषी समजलां होतां असें तुमचें म्हणणें ?

माना०—होय.

मरा०—बरें; पण तुम्हीं आतां बोललां, 'तिचा मृत्यु होण्याचा उपाय योजण्यांत आला म्हणायचा,' तर यांत 'म्हणायचा' शब्दाचा अर्थ काय ? सरोवरीं तुम्हीं कांहीं उपाय योजिला नाहीं असें तुमचें म्हणणें ?

माना०—माझीं दोन्हींही म्हणणीं आहेत—

मरा०—म्हणजे ?

माना०—सांगतों ऐकावें महाराज ! त्या सा-ठोवर भलताच आरोप ठेवून ज्यावेळीं तिला घराबाहेर घालविलें, त्याचवेळीं ति-च्या होणाऱ्या प्राणांताचा उपाय मी यो-जिल्यासारखा झाला. तरी खरें पुसाल, तर त्यावेळेस कांहीं माझी चुकी होती असें माझ्यानें म्हणवत नाहीं !

मरा०—मानाजीराव ! तुमच्या सांगण्यांत किंचित् विसंगतपणा असल्याचा मला भास होतो, याकरितां असें करा! तुमची सग-ळीच्यासगळी हकीकत मला नीट ऐकूंद्या, म्हणजे मग जरूर राहिली तर माझें संशय-यी तुम्हांला विचारून घेईन !

माना०—(आपणाशीं) हदया ! यावेळीं असें धर्म सोडून काय होणार ? जिव्हे ! तुला अशी अडखळूं!—(उघडपणें) ऐकावें भट-नी ! महाराज ! मी या तिरसगडाचा, व त्याच्या आसपास जेवढा प्रदेश दिसतो तेवढ्या सर्वांचा, अधिपति आहें हें आप-णास ठाऊक असेलच !

मरा०—हो. मी असें ऐकिलें आहे खरें !

माना०—महाराज ! दक्षिणदेशीं कोणी झुं-झारराव नामक मोठे सरदार होते, त्यांचें कुळशील फार पुरातन आणि मोठें—त्यांची दिल्लीपासून रामेश्वरापर्यंत प्रसिद्धि—असो; त्याशीं मला कांहीं करावयाचें नाहीं ! थोडक्यांत सांगतों—त्यांना एक अप्रतिम

रूपसुंदरी व अत्यंत सद्गुणी अशी कन्या होती, तिच्याशीं माझा विवाह झाला!—

मरा०—ठीकच! बरें, तुमचें लग्न झाल्यावर तुह्मीं उभयतां कशा प्रकारें नांदलां?

माना०—हें काय विचारावें? महाराज! आह्मां उभयतांचा विवाह झाल्यावर कित्येक वर्षेपर्यंत प्रत्यक्ष लक्ष्मीनारायणांचें जोडपें एकीकडे, आणि आह्मीं एककिडे, अशा प्रकारचा सुखानुभव आह्मीं घेतला. स्त्री पुरुषांच्या परस्पर प्रेमाचें मूर्तिमंत आविष्करण जें अपत्यरत्न—तेंही प्राप्त झालें. अशा आनंदाच्या स्थितींत आह्मांस न कळतां आमचे दिवस जात असतां एकाएकीं महाराज! पंच पक्वान्नांनीं भरलेल्या ताटांत आळी किंवा अन्य कीटक दृष्टीस पडून ज्याप्रमाणें सर्व अन्नाची घाण व्हावी, त्याप्रमाणेंच आमच्या सुखाची दशा होऊन गेली, व ती होण्याला कारण म्हणाल तर अति प्रेमामुळें माझ्या मनांत उत्पन्न झालेली मत्सरबुद्धि, याशिवाय दुसरें कांहीं नव्हें! हा मत्सर उत्पन्न झाला, तेव्हांपासून माझ्या संसाराची धळधाण झाली! माझी सद्गुणी स्त्री, जिला मी आपले जीव कीं प्राण याप्रमाणें समजत होतों, ती अन्य पुरुषांशीं रत झाली असावी असा माझ्या मनांत संशय उत्पन्न झाला, व मी या विवंचनेंत पडलो आहे इतक्यात कोणातरी अनोळखी मनुष्यानें लिहिलेलें पत्र माझ्या दृष्टीस पडलें! तें मी उघडून पहातों, तों त्यांत दुसरा तिसरा कांहीं मजकूर नसून फक्त "आपल्या बायकोवर नीट नजर असूं दे!" एवढेच कायते शब्द होते!

मरा०—खचित! कोणा तरी दुष्टा—

माना०—ऐकावें महाराज! अगोदर सर्व हकीकत सांगतों, आणि नंतर आपणाला कसें काय वाटतें तें मला सांगा!—हें पत्र आल्यावर थोड्याच दिवसांनीं दुसरें एक पत्र आलें, त्यांत तर ठाव, ठिकाणा, वेळ, इत्यादिकांविषयीं इत्थंभूत मजकूर लिहिला असून प्रत्यक्ष माझ्या स्त्रीनें व्यभिचारकर्म केल्याचेंही लिहिलें होतें; एवढेंच नव्हे, तर अमुक वेळेस अमुक ठिकाणीं मीं जावें म्हणजे त्या ठिकाणीं माझी स्त्री पर पुरुषाशीं बोलत असलेली माझ्या दृष्टीस पडेल इतका सुद्धां मजकूर लिहिला होता! तेव्हां काय विचारतां? अगोदरच संशय, आणि तशांतून हें पत्र, तेव्हां माझी स्त्री व्यभिचारिणी म्हणून माझ्या मनानें एकदम निश्चय केला, आणि त्याच पावलीं तडक गेलों, आणि पहातों तों सगळा प्रकार खराच! माझी स्त्री दक्षिण बुरुजावरील एका खोलींत दुसऱ्या एका पुरुषाशीं बोलत होती खरीच!

मरा०—तो पुरुष कोण असावा बरें?

माना०—ज्यावेळीं हा प्रकार झाला, त्यावेळीं त्या ठिकाणीं साधारणसा अंधार होता, म्हणून अंमळ दिवे आणण्याविषयीं मीं आरडा ओरड केली, त्यामुळें त्याचें तोंड मला पहायला मिळालें नाहीं; व दिवेबिवे घेऊन चाकर आल्यावर पहातों तों तो निघूनही गेला होता! असो, नंतर त्या ठिकाणीं माझी स्त्री एकटीच होती, तिची मी अनेक प्रकारें निर्भर्त्सना केली, आणि त्यावेळीं ती गर्भवती असल्यामुळें तिच्या जिवाला मात्र कांहीं अपाय न करितां तिला घरातून घालवून दिलें! व तिला माझ्या राज्याच्या

हदींतही राहतां येऊं नये, एवढ्याकरित आमच्या वाड्यांतले मुख्य कारभारी **धुमा जीनार्दक** यांना तिजबरोबर दिलें. ते तिला सुरतेस घेऊन गेले, व तेथें ती आपल्या माहेरीं जाण्याकरितां म्हणून गलबतां व बसली असतां एकाएकीं तुफान होऊन तें गलबत बुडून जाऊन यांतच तिचा अंत झाला!

मरा०—एकंदरींत तिचा परिणाम दुःखदायक झाला हें तर आहेच, परंतु यांत तुमचा कोणता अपराध झाला?—तुमच्या सांगण्यावरून तर तुमच्या स्त्रीचें वर्तन निष्कळंक नव्हतेंसें दिसतें!

माना०—छे—छे—अगदींच खोटें!—एक तर ती परपुरुषाशीं बोलत होती तथापि त्या गडबडींत त्यांचे शब्द माझ्या कानीं मुळींच कसे ते पडले नाहींत!—व दुसरें असें कीं ती निघून गेल्यावर, ज्या दुष्टानें पहिलीं दोन पत्रें पाठविलीं होतीं, त्याच्याच हातचें तिसरें एक पत्र आलें, त्यांत त्यानें स्पष्ट लिहिलें होतें कीं "तुझी स्त्री निष्कलंक पतिव्रता होती! परंतु मी मीं तुझ्यावर सूड उगविला! तथापि पुरा सूड तो अजून घेणें राहिलाच आहे"!—हरहर! हे शब्द तेव्हांपासून माझ्या हृदयाला कसे अगदीं खिळून गेले आहेत एवढेंच नव्हे, तर त्यांबद्दल माझ्या जिवाला एकसारखा चटका लागून राहिला आहे!

मरा०—कसें? कसें म्हटलें? पुरा सूड तो अजून घेणें राहिलाच आहे? एकूण तुमच्या हातून कधीं कोणाचा अपमान किंवा कांहीं मोठें नुकसान करण्यांत आलें होतें असा कांहीं प्रकार होता?

माना०—तुम्हीं म्हणतां असा माझ्याही मनाला अर्थ वाटतो, परंतु हा० सूड कशाकरितां व.तो घेणारा कोण, याचें या क्षणापर्यंत मला ज्ञान कसें तें नाहीं!

मरा०—हें तर मोठेंच आश्चर्य!—कायहो? पण त्याबद्दल तुमचा कांहीं देखील तर्क नाहीं चालला?

माना०—छेः—ईश्वरसाक्ष ज्याचें नांव तें!

मरा०—मोठा चमत्कार आहे! पहा बरें नीट आठवण करून पहा, तुमच्या हातून कधीं काळीं कोणाच्या हृदयांस चटका लावणारा असा अपमान झाला असेल, किंवा तुम्हीं कांहीं कुणाला बोललां असाल, किंवा कुणाचें कांहीं तसेंच नुकसान केलें असेल, किंवा कुणावर शस्त्रप्रहार केला असेल,—अशांतला कांहीं प्रकार झाला असेल तर पहा बरें आठवण करून! तुम्हीं सांगतां हकीकत, यावरून अशा पैकीं कांहीं तरी प्रकार खचित झाला असावा!

माना०—छे हो! असा प्रकार कधींच घडला नाहीं!

मरा०—(आपणाशीं) दुष्टा! थांब, तुला आतां थोडक्याच वेळांत सगळ्याची आठवण करून देतों!

माना०—नाहीं म्हणायला एका मनुष्यावर मीं वार केला होता, पण त्याला फार वर्षें झालीं, आणखी ती गोष्ट झाल्यावर या मनुष्याची मीं चांगली समजूतही काढिली, व पुढें त्यानें आपल्या मनांतील सर्व वैर काढून टाकून तो माझ्या चाकरीसही राहिला होता!

तिला खरें वाटेल तेव्हांची गोष्ट !

झाळ०—(नवऱ्याकडे पाहून) कां पुटपुट्ट कसली चालली आहे ?—पुराणिकबोवा ! चालूं द्या पुराण !

पुरा०—(आपणाशीं) माझा कार्यभाग पूर्णपणें साधण्यास मला जीं गाणीं करायला पाहिजे आहेत, तीं करायला मला अजून वेळ सांपडली नाहीं. याकरितां आतांची वेळ आटपतेंच घ्यावें हें बरें ! (उघडपणें) बाई ! मघां जें आख्यान लाविलें होतें तें संपलें. पुढचें **पलायितांगनेचें** आख्यान आहे. परंतु तें फार लांब असल्यामुळें तें उद्यांच सांगेन !

झाळ०—बरे आहे ! आटपा तर मग ! माझेंही आज घरच्या भांड्यानें—(नवऱ्याकडे रागानें पाहून) किंचित् कपाळ दुखतें आहे, याकरितां घटकाभर पडून पहातें झोंप लागली तर ! (पुराणिक पुराण आटपतो.) (नवऱ्याकडे पाहून) कां आतां स्वारी कोणीकडे जाऊन बसणार माशा मारायला ?—चला निघा बागेंत, आणखी मजुरांकडून तेवढें काम आजच्या आज आटपून घ्या ! मी संपलें का नाहीं संध्याकाळीं येईन पहायला !—कां समजलें कीं नाहीं ?

हैब०—समजलों. पण हें इतकें काम आजच्या आज संपणार कसें ? मजूर सारे पंधराच आज कामावर आहेत, तेवढ्यांनीं झटलें झणजे सगळें काम आटपायला उद्यां दुपारपर्यंत तरी लागेल !

झाळ०—मला हें न् तें कांहीं समजत नाहीं ! आजच्या आज जर तें काम आटपलें नाहीं, तर आज रात्रीं तुह्मांला घरांत जेवायला कांहीं मिळायचें नाहीं ! ध्यानांत असूंद्या !—हो बरें आठवलें !—पुराणिकबोवा ! आमच्या व्याघ्रांबरीचें आतां **चंद्रराव** फांकड्यांशीं पुढच्या महिन्यांत लग्न व्हावयाचें आहे, पण त्याच्या अगोदर तिला **मेरुलिंगा**च्या दर्शनाला नेऊन आणीन झणून मीं नवस केला आहे, तर त्याला चांगलासा मुहूर्त सांगा बरें ?

पुरा०—(पंचांग उघडून बोटें चाळूं लागतो.) आतां मिथुन राशिवर चंद्र यावयाचा तो—हं—एक—दोन—हं—दिवसांनीं झणजे आज कोण तिथि ?—संघट्टिनी द्वितीया—तेव्हां चतुर्थी पंचमीस कन्याराशिवर जाईल—तेव्हां पंचमीचा दिवस उत्तम ! त्यावेळीं आश्लेषासंयोग असून अमृतसिद्धियोग आहे, तेव्हां तीच वेळ प्रशस्त !—ठीकठीक !—बाई ! तुह्मीं पंचमीच्या दिवशीं जायचा बेतकरा !—हें वधूसंक्रमाचें कार्य आहे, याकरितां पंचमी दिवशीं **स्थाणु**लिंगदर्शन व्हावें हेंच योग्य ! हं तर मग ठरलें बाई ! तोच बेत !—बरें, आतां येतों मी !

(सर्व निघून जातात.)

प्र० ३.—पिछाडीच्या बागेचा एक भाग.

(सकवारबाई एकटीच प्रवेश करिते.)

सक०—(इकडे तिकडे फिरत आपणाशीं) काय करावें बाई ! या वेळीं माझें मन अगदीं बुचकळ्यांत पडल्यासारखें झालें आहे ! एकीकडे आड न् एकीकडे विहीर ! आईची प्रकृति त्या तऱ्हेची न् बाबांची या तऱ्हेची ! दोघांचे स्वभाव तर तसे, आणखी दोघांचीं सांगणींही निरनिराळीं ! तेव्हां कसें काय वागावें हें माझें मलाच समजेना-

हद्दींतही राहतां येऊं नये, एवढ्याकरितां आमच्या वाड्यांतले मुख्य कारभारी **धुमाजीनाईक** यांना तिजबरोबर दिलें. ते तिला सुरतेस घेऊन गेले, व तेथें ती आपल्या माहेरीं जाण्याकरितां म्हणून गलबतांत बसली असतां एकाएकीं तुफान होऊन तें गलबत बुडून जाऊन यांतच तिचा अंत झाला!

मरा०—एकंदरींत तिचा परिणाम दुःखदायक झाला हें तर आहेच, परंतु यांत तुमचा कोणता अपराध झाला?—तुमच्या सांगण्यावरून तर तुमच्या स्त्रीचें वर्तन निष्कळंक नव्हतेंसें दिसतें!

माना०—छे—छे—अगदींच खोटें!—एक तर, ती परपुरुषाशीं बोलत होती तथापि त्या गडबडींत त्यांचे शब्द माझ्या कानीं मुळींच कसे ते पडले नाहींत!—व दुसरें असें कीं, ती निघून गेल्यावर, ज्या दुष्टानें पहिलीं दोन पत्रें पाठविलीं होतीं, त्याच्याच हातचें तिसरें एक पत्र आलें, यांत त्यानें स्पष्ट लिहिलें होतें कीं "तुझी स्त्री निष्कलंक पतिव्रता होती! परंतु हा मीं तुझ्यावर सूड उगविला! तथापि पुरा सूड तो अजून घेणें राहिलाच आहे"!—हरहर! हे शब्द तेव्हांपासून माझ्या हृदयाला कसे अगदीं खिळून गेले आहेत, एवढेंच नव्हे, तर यांबद्दल माझ्या जिवाला एकसारखा चटका लागून राहिला आहे!

मरा०—कसें? कसें म्हटलें? पुरा सूड तो अजून घेणें राहिलाच आहे? एकूण तुमच्या हातून कधीं कोणाचा अपमान, किंवा कांहीं मोठें नुकसान करण्यांत आलें होतें असा कांहीं प्रकार होता!

माना०—तुम्हीं म्हणतां असा माझ्याही मनाला अर्थ वाटतो, परंतु हा सूड कशाकरितां व तो घेणारा कोण, याचें या क्षणापर्यंत मला ज्ञान कसें तें नाहीं!

मरा०—हें तर मोठेंच आश्चर्य!—कायहो? पण त्याबद्दल तुमचा कांहीं देखील तर्क नाहीं चालला?

माना०—छेः—ईश्वरसाक्ष ज्याचें नांव तें!

मरा०—मोठा चमत्कार आहे! पहा बरें नीट आठवण करून पहा, तुमच्या हातून कधीं काळीं कोणाच्या हृदयास चटका लावणारा असा अपमान झाला असेल, किंवा तुम्हीं कांहीं कुणाला बोललां असाल, किंवा कुणाचें कांहीं तसेंच नुकसान केलें असेल, किंवा कुणावर शस्त्रप्रहार केला असेल,—अशांतला कांहीं प्रकार झाला असेल तर पहा बरें आठवण करून! तुम्हीं सांगतां हकीकत, यावरून अशा पैकीं कांहीं तरी प्रकार खचित झाला असावा!

माना०—छे.हो! असा प्रकार कधींच घडला नाहीं!

मरा०—(आपणाशीं) दुष्टा! थांब, तुला आतां थोडक्याच वेळांत सगळ्याची आठवण करून देतों!

माना०—नाहीं म्हणायला एका मनुष्यावर मीं वार केला होता, पण त्याला फार वर्षें झालीं, आणखी ती गोष्ट झाल्यावर त्या मनुष्याची मीं चांगली समजूतही काढिली, व पुढें त्यानें आपल्या मनांतील सर्व वैर काढून टाकून तो माझ्या चाकरीसही राहिला होता!

तिला खरें वाटेल तेव्हांचा गोष्ट !

झाळ०—(नवऱ्याकडे पाहून) कां पुटपुट्ट कसली चालली आहे ?—पुराणिकबोवा ! चालूं द्या पुराण !

पुरा०—(आपणाशीं) माझा कार्यभाग पूर्णपणें साधण्यास मला जीं गाणीं करायला पाहिजे आहेत, तीं करायला मला अजून वेळ सांपडली नाहीं. याकरितां आतांची वेळ आटपतेंच घ्यावें हें बरें ! (उघडपणें) बाई ! मघां जें आख्यान लाविलें होतें तें संपलें. पुढचें **पलायिनांगनेचें** आख्यान आहे. परंतु तें फार लांब असल्यामुळें तें उद्यांच सांगेन !

झाळ०—बरें आहे ! आटपा तर मग ! माझेंही आज घरच्या भांड्यानें—(नवऱ्याकडे रागानें पाहून) किंचित् कपाळ दुखतें आहे, याकरितां घटकाभर पडून पहातें झोप लागली तर ! (पुराणिक पुराण आटपतो.) (नवऱ्याकडे पाहून) कां आतां स्वारी कोणीकडे जाऊन बसणार माशा मारायला !—चला निघा बागेंत, आणखी मजुरांकडून तेवढें काम आजच्या आज आटपून घ्या ! मी संपलें का नाहीं संध्याकाळीं येईन पहायला !—कां समजलें कीं नाहीं ?

हैब०—समजलों. पण हें इतकें काम आजच्या आज संपणार कसें ? मजूर सारे पंधराच आज कामावर आहेत, तेवढ्यांनीं झटलें झणजे सगळें काम आटपायला उद्यां दुपारपर्यंत तरी लागेल !

झाळ०—मला हें न् तें कांहीं समजत नाहीं ! आजच्या आज जर तें काम आटपलें नाहीं, तर आज रात्रीं तुह्मांला घरांत जेवायला कांहीं मिळायचें नाहीं ! ध्यानांत असूंद्या !—हो बरें आठवलें !—पुराणिकबोवा ! आमच्या **व्याघ्रांबरीचें** आतां **चंद्रराव फांकड्यांशीं** पुढच्या महिन्यांत लग्न व्हावयाचें आहे, पण त्याच्या अगोदर तिला **मेरुलिंगाच्या** दर्शनाला नेऊन आणीन झणून मीं नवस केला आहे, तर त्याला चांगल्यासा मुहूर्त सांगा बरें ?

पुरा०—(पंचांग उघडून बोटें चाळूं लागतो) आतां मिथुन राशिवर चंद्र यावयाचा तो—हं—एक—दोन—हं—दिवसांनीं झणजे आज कोण तिथि ?—संघट्टिनी द्वितीया—तेव्हां चतुर्थी पंचमीस कन्याराशिवर जाईल—तेव्हां पंचमीचा दिवस उत्तम ! त्यावेळीं आश्लेषासंयोग असून अमृतसिद्धियोग आहे, तेव्हां तीच वेळ प्रशस्त !—ठीकठीक !—बाई ! तुह्मीं पंचमीच्या दिवशीं जायचा बेतकरा !—हें वधूसंक्रमाचें कार्य आहे, याकरितां पंचमी दिवशीं **स्थाणुलिंगदर्शन** व्हावें हेंच योग्य ! हं तर मग ठरलें बाई ! तोच बेत !—बरें, आतां येतों मी !

(सर्व निघून जातात.)

प्र० ३.—पिछाडीच्या बागेचा एक भाग.

(सकवारबाई एकटीच प्रवेश करिते.)

सक०—(इकडे तिकडे फिरत आपणाशीं) काय करावें बाई ! या वेळीं माझें मन अगदीं बुचकळ्यांत पडल्यासारखें झालें आहे ! एकीकडे आड न् एकीकडे विहीर ! आईची प्रकृति त्या तऱ्हेची न् बाबांची या तऱ्हेची ! दोघाचे स्वभाव तर तसे, आणखी दोघांचीं सांगणीही निरनिराळीं ! तेव्हां कसें काय वागावें हें माझें मलाच समजेना-

सें झालें आहे ! ऐकावें तर दोघांचेंही ऐकावें, नाहीं तर कोणाचेंच कांहीं ऐकूं नये, अशी कांहीं माझी चमत्कारिक स्थिति झाली आहे !—माझ्याशीं विवाह करावा ह्मणून दोघे वर दोहींकडून झटपटत आहेत, त्यांतून कुणाला पसंत करावें हे माझें मला च कळत नाहीं !—आई तर त्या **चंद्रराव फांकड्या**च्याच भरीस पडली आहे, आणि त्या पुराणिकाकडून मला भलत्या भलत्याच गोष्टी सांगिवते, तरी पण मला त्याचें तें सगळें सांगणें आवडतेंच असें ह्मणतां येत नाहीं.इकडे बाबांचें सांगणें मीं **मुधोजीरावां**ला करावें ह्मणून आहे, पण आईपुढें बाबांचा नुसता डोळा देखील कसा तो उघडत नाहीं, त्याला मीं तरी काय करावें ?—अशा अडचणींत बाई खरेंच जर ह्मटलें, तर मीं आई आणखी बाबा दोघानाहीं एका अंगाला ठेवावें, आणखी आपल्या इच्छेप्रमाणें लग्न करून घ्यावें याशिवाय दुसरी कांहीं तोडच दिसत नाहीं ; तरी पण मेलें थोडें तरी लौकिकाला भ्यावें लागतें, यामुळें एकदमच तसें कांहीं करवत नाहीं !—(विचाराच्या नादांत स्तब्ध रहातें, व हळूहळू आपणाशींच मोठ्यानें बोलूं लागतें.) हो बाई ! मी ह्मणतें या सगळ्या गोष्टी खऱ्या, पण अजून माझा माझ्या मनानेंच तरी कोठें निश्चय केला आहे ? घटकाभर नुसता **चंद्रराव** आणखी **मुधोजीराव** यांच्याबद्दलचाच विचार करावयाचें ह्मटलें, तरी त्या दोघांचे गुण एकमेकांशीं अगदी उलटे आहेत, तेव्हां यांतून कोणाला ह्मणून मान द्यावा बरें ! **चंद्रराव** हे आपल्या आडनांवाप्रमाणेंच फक्कड आहेत, आणखी त्यांचा सगळा वेळ नटण्या मुरडण्यांखालींच जातो ! इकडे **मुधोजीराव** हे अगदीं साध्या वृत्तीचे गृहस्थ आहेत, त्यांना अंगीं डौल कसा तो आवडत नाहीं ! तेव्हां हे दोघांचे गुण दोहींकडून अगदीं उलटे आहेत, तरी त्यांपैकीं कशालाच वाईट ह्मणण्याची पंचाईत आहे !—**चंद्रराव** श्रीमंत आहेत, तेव्हां त्यांनीं जर नटूं नये, मुरडूं नये, तर त्यांना आपल्या संपत्तीचा उपयोग तो काय व्हावा ?—तेव्हां त्याबद्दल त्यांना वाईट काय ह्मणून ह्मणावें ?—इकडे **मुधोजीराव**—यांचाही साधेपणा खराच आहे !—आजकाल **मराठेशाई**ची पुण्कळच धूळधाण झाली आहे !—तेव्हां आतां **चंद्रराव** आणखी **मुधोजीराव** यांतून कोणाला माळ घालावी बरें ?

(इतक्यांत मुधोजीराव त्या ठिकाणीं सहजगत्या आल्याप्रमाणें येतात.)

मुधो०—मुली ! खरें जर पुसशील, तर तूं **मुधोजीरावांस**च माळ घालावीस हें बरें !

सक०—(चपापून) काय ? इतका वेळ मी बोलत होतें, तें सगळें बोलणें तुम्हीं आडून ऐकिलें ?

मुधो०—ऐकिलें असेल. त्याचें काय ? पण **सकवार**बाई ! तूं आपला मनोदय सहज बोलून गेलीस, त्याबद्दल तुला लाज का वाटते ?

सक०—कसें ह्मणतां ?—माझा मनोदय ?—त्याबद्दल मला लाज काय ह्मणून वाटावी ! तरी पण मी तुम्हांला विचारतें, तुमची आणि माझी अद्यापि नीट ओळखही झाली नसतां तुम्हीं एकदम माझ्याशीं बोलूं लागलां ! तर मला सांगा, मी जें कांहीं

बोललें, त्यांत तुम्हीं मला पाहिजे असें तुम्हीं कशाविरून समजलांत ?

मुधो०—तें कांहीं असो; तरी पण तुझ्या बोल-ण्यावरून मला असा कांहीं भास झाला खरा, आणि म्हणूनच तर मला इतकें पुढें सरून बोलण्यास उमेद वाटली !

सक०—पुरे पुरे ! याकरूनच तुमच्या अकलेची मीं केली परीक्षा ! चला आतां चालते व्हा ! तुमच्यापेक्षां मला ते चंद्रराव च सहस्रपटीनें अधिक वाटतात !—त्यांचें बोलणें किती खुबीदार, चालचलणूक तरी किती रंगेल !—

मुधो०—सकवारबाई ! मी केवळ आपल्या बद्दलच बोलतों असें समजूं नको ! चंद्रराव एक असेल चांगला, मी नाहीं म्हणत नाहीं. परंतु त्याच्या सारखेच दुसरे चांगले लोक नसतील हें म्हणणें मात्र खोटें !

सक०—असें असें !—एकूण चंद्ररावांसारखेच तुम्हींही चांगले आहां असें तुमचें म्हणणें ? पण तुम्हाला आहेका ठाऊक त्यांनीं विद्या किती संपादन केली आहे तो ? ते जातीचे मराठे असूनही ते एकाद्या विद्वान् ब्राह्मणाप्रमाणें सगळीं पुराणें घडघड पाठ म्हणतात, आणखी माझ्या देखत बोलूं लागले, म्हणजे त्यांच्या बोलण्यांत संस्कृत श्लोक येतात, आणखी बोलतात तरी किती, जसे कांहीं पंडितच ! पुष्कळ वेळां मीं त्यांचें बोलणें ऐकिलें, पण त्यांत उपमा का काय से सें म्हणतात ना ? त्यांची कित्ती कित्ती गर्दीच एकसारखी लागली होती !

मुधो०—त्यांची नेहमीचीच ती अघळपघळ बोलण्याची चाल आहे, आहे ठाऊक ! त्यांत कांहीं अर्थ नाहीं !

सक०—मला ठाऊकच तुम्हीं त्यांना वाईट म्हणणार हें ! ते माझ्याविषयीं काय काय बोलत असतात, तें मीं सांगावें हें कांहीं चांगलें नाहीं, तरी पण ओघ आला म्हणून सांगतें ! ते माझ्या आईशीं बोलूं लागले, म्हणजे ते जशी मी प्रतिअप्सराच आहें, असें कांहीं चमत्कारिक वर्णन करीत असतात; त्यांना कविता करण्याचाही नाद आहे, त्यांनीं मजवर दहा पांच तर गाणीं रचलेलीं माझ्या आईला म्हणून दाखविलीं !—तीं किती गोड म्हणून सांगूं ?—पण जाऊं द्या मेलें. तो गुणच तुमच्या अंगीं नाहीं, तेव्हां तुम्हांला इतकें सांगून तरी काय करायचें आहें ?

मुधो०—सकवारबाई ! ते तूं काय पाहिजे तसें म्हण. त्या वर वर सारवण घालावयाच्या कविता निराळ्या; आणखी अंतःकरतील खरेखुरें प्रेम बोलून दाखवायच्या त्या कविता निराळ्या !

सक०—कसें म्हणतां ? त्यांच्याप्रमाणें तुम्हींही कविता करितां ?

मुधो०—तें सांगत बसण्याची मला कांहीं जरूरी नाहीं, तरी पण तुझी मर्जी असेल तर तुजवर माझें जें प्रेम बसले आहे. त्याविषयीं मीं सहज एक कविता केली आहे ती तुला म्हणून दाखवितों !—पण जर ती कविता तुला आवडली, तर पुढें कसें काय करायचें तें मला सांग पाहूं !

सक०—पुढचें पुढें ! तें मी आतांच कांहीं सांगत नाहीं ! तुम्हीं आपले म्हणा.

मुधो०—बरें तुझी मर्जी! तर मग ऐकच अं?

पद.

ऐक सखे तूं प्रेमा,
हृदयीं, अकपट चिर, वाढत राहे, ऐक०(ध्रु.)
प्रेमपाश हा सुखकर भारी,
शाश्वत एकचि राहे संसारीं,
यासम अन्य न कांहीं,
तों तूं जिवलगे मजप्रति देईं, ऐक० १
दुःखसुखांचा भेदचि नाहीं,
संसारातें व्यापुनि राही,
चित्ता विश्रम[1] देतो,
वृद्धत्वींही स्थिरचि रहातो, ऐक० २
प्रेमाभावीं नरनारींची,
केवळ पशुसम हो स्थिति सांची,
नीरस संसृति[2] सारी,
तीतें न कधीं गे तूं अनुकारी, ऐक० ३
नाथ दिसाचा आणि कमलिनी,
कीं रजनीपति अणि ते नलिनी,
योग्य उदाहरणें गे,
तुजला **रावमुधोजि** हा सांगे, ऐक० ४

कां **सकवारबाई**! तुला हें गाणें आवडतें कीं नाहीं?

सक०—इश्श मेलें, आहे काय त्यांत? असलीं गाणीं आमच्यायेथें भराडी, गोंधळी, ढिलील पुष्कळ ह्मणतात, त्यांत जास्ती तें काय आहे?

मुधो०—जास्तीबद्दल मी कांहीं ह्मणत नाहीं, पण हें गाणें तुला आवडलें कीं नाहीं एवढें मला ऐकूंदे.

सक०—गाण्यांत तें आवडायचें न न आवडायचें काय आहे? ह्मणणारा चांगला असला तर गाणें न आवडायला काय झालें?

१. विश्राति. २. संसार.

मुधो०—झालें. मला हेंच ऐकायला पाहिजे. होतें. तर आतां सांग तूं कबूल आहेस कीं नाहींस?

सक०—काय? कबूल? ती कुशाला?

मुधो०—माझ्याशीं लग्न लावायला? **सकवारबाई**! तूं मनांत पुरता विचार कर ह्मणजे तुझें तुलाच समजून येईल, कीं मी कांहीं त्या **चंद्रराव**सारखा उगीच बडबडणारा गृहस्थ नाहीं! मनांत एक गोष्ट, ऋणखी बाहेर दाखवायची दुसरी, हें मला मुळींच आवडत नाहीं!

सक०—एकूण **चंद्रराव**ांची वृत्ति स्थिर नाहीं असें तुमचें ह्मणणें?

मुधो०—मी **चंद्रराव**ाचीच गोष्ट सांगतों असें नको समजूं. पण जो मनुष्य नेहमीं नटण्या मुरडण्यांतच वेळ घालवितो, त्याचें मन त्या नटण्या मुरडण्या शिवाय दुसऱ्या गोष्टीवर चांगलेंसें कधीं लागायचें नाहीं!

सक०—तर मग तुमचें ह्मणणें मी **तुह्मांवर** प्रेम करूं लागून तुमच्याकरितां **मनांतल्या** मनांत झुरूं लागावें? वाहवा! **बरेच** दिसतां!

मुधो०—मी तुला यांत वावगें तें काय बोललों?

सक०—माझें वावग्याबद्दल कीं गैरवावग्याबद्दल कांहीं ह्मणणें नाहीं; पण मी तुह्मांला सांगतें, जर तुमच्या मनांत माझें तुह्मावर प्रेम बसावें असें आहे, तर तुह्मीं मला प्रतिअप्सरा, प्रतिरंभा, **चंद्रमुखी**, **रति**, **चंपककालिका**, असें ह्मणत गेलें पाहिजे!

मुधो०—या नुसत्या पोंकळ ह्मणण्यांतच काय आहे? आपल्याला तूं ह्मणतेस तसें मुळींच बोलतां येत नाहीं! आपल्याला

प्रेम झटलें झणजे साधें आवडतें. साधें प्रेम जसें सदोदित टिकेल, तसें मुद्दाम जोडिलेलें कृत्रिम प्रेम कधीं टिकावयाचें नाहीं!

सक०—तें तुमचें काय असेल तें असो!—पण मीं तर चंद्ररावांच्या तोंडून असें किती दा ऐकिलें आहे कीं, स्त्रीपुरुषांचीं प्रेमाचीं बोलणीं झटलीं झणजे अशींच पाहिजेत. याकरितां जर तुमच्या मनांत मी तुमची व्हावें असें असेल, तर तुह्मांला माझ्याकरितां असलें बोलायला शिकलेंच पाहिजे.

मुधो०—तूं झणतेस खरी, पण जें मनुष्य स्तुति केली असतां भाळतें, त्याच्या मनाला थोरपणा हा शब्द कधीं लागणार नाहीं! तर हें पहा, तूं एवढ्या वयांतच अशी स्तुतीला भुलूं लागलीस, तर मोठेपणीं तुझी अवस्था काय होईल? नवऱ्याच्या मागें संसाराचीं हजारों लचांडें असायचीं, त्यामुळें एकादे वेळीं त्यावर संकट किंवा कांहीं येऊन त्याच्यानें तुझी स्तुति करवली नाहीं, तर तूं आपली त्याच्याशीं भांडूंच लागणार! अशानें तुला संसारांत सुख तरी कसें लागेल! तेव्हां माझें झणणें ऐक, आणि साधेपणांतच कायतें भूषण मानूं लाग! मी जी बायको करीन ती अशीच असली पाहिजे. तशी नसली तर फार तर काय सांगूं! मी सर्व जन्मभर देखील सडा रहाण्यास कबूल होईन. मग कसें काय? तुला माझ्या मनाची खरी खरी स्थिति काय आहे ती मीं सांगितली, याउपर तुझी मर्जी! या पृथ्वीवर इतक्या स्त्रिया मीं पाहिल्या, परंतु काय चमत्कार असेल तो असो, तुजवर माझें जसें प्रेम बसलें आहे, तसें अन्यत्र कोणावर बसत नाहीं, व बसावयाचेंही नाहीं. तर तूं माझें ऐक, आणि माझ्या या सप्रेम अंतःकरणाची निराशा करूं नको!

सक०—अहा! यांत ती कसली निराशा आली आहे? पुरुषांना काय, बायका मिळण्याचा तोटा का आहे?

मुधो०—खऱ्या प्रेमाकडेच पाहिलें तर तोटा हेंच खरें!—मग कसें काय झणतेस? तूं माझ्या प्रेमाची निराशाच कां करणार?

सक०—समजा, करणार!—मग तुह्मीं काय कराल?

मुधो०—काय करीन तें आतांच काय सांगूं? पग तुला इतकेंच सांगतों कीं, तूं जर मला मिळाली नाहींस, तर यावज्जीव माझ्या जिवाला सुख झणून कसें तें मिळणार नाहीं; याकरितां लढाईंत कोठें तरी जाऊन धारातीर्थीं मरण संपादीन!

सक०—(हंसून) वाहवा! हें बरेंच बोलणें आहे!—एकाद्याच्या गळ्यांत पडून मागणें मागण्याची ही मसलत!—ही नाहींग कधीं मला कधीं खरी वाटायची!—बरें तर मग पाहूंच द्या मला, मी तुह्मांला नाहींचें वरीत, आतां तुह्मांला कुठें जायचें असेल तिकडे जा!

मुधो०—सक्कबारबाई! ही थट्टा करण्याची वेळ नाहीं, मी तुला खऱ्या भावानें विचारतों, तर तूंही मला खऱ्या भावानेंच सांग. बोल, तूं माझी खरोखरी निराशाच का करणार?

सक०—होयच. बरें पण तुह्मीं आतां खरेंच का लढाईकडे जाणार?

मुधो०—पी एकवार जी गोष्ट बोललों, तीपासून परत होणें हें माझ्या हातून कदापि व्हावयाचें नाहीं !—बरें तर येऊं मी ?

सक०—खुशाल या बरें ?

मुधो०—(उसासा टाकून) शिवशिव !—**सकवारबाई**! हा चाललों!—(दुःख करीत निघून जातो.)

सक०—ह:ह:ह:ह:—घरांत आईच्या न् बापाच्या वागण्यांत मेळ नसला ह्मणजे असेंच व्हायचें !—चिंता नाहीं !—आतांची वेळ मीं **मुधोजीरावां**ची तर परीक्षा केलीच, आता ही **चंद्ररावां**ची स्वारी इकडून येत आहे, तर तिचीही जराशी गंमत करून पाहतें परीक्षा !—मग पुढचें पुढें !

(इतक्यांत चंद्रराव फांकडे येतो.)

चंद्र०—(सकवारबाई अकस्मात्च दृष्टीस पडली असें दाखवून मोठ्यानें) हां—तरी ह्मटलें माझे पाय या बागेकडेच कां वळले! **व्याघ्रांबरि**! तुझें प्रियंकर दर्शन व्हावें एतदर्थ मी तुझ्या आईकडे ह्मणून गेलों होतों, पण तुम्हीं दोघीही दारें लावून निजलां आहां ह्मणून मला एका चाकरानें सांगितलें, तेव्हां ह्मटलें आळशासारखें ओटीवरच माशा मारीत काय बसावें, ह्मणून इकडे बागेंत आलों. याचें कारण आतां समजलों. माझे पाय ओटोला खिळून न राहतां इकडेच वळले—याचें कारण तुझी मनोहर मूर्ति बागेंत हो—ती हेंच !

सक०—मला बाई तुमच्या या बोलण्याचा चमत्कार वाटतो !—मी इथें आहें हें तुह्मांला ठाऊक नसून तुमचे पाय इकडेच कसे वळले?

चंद्र०—प्रिये **व्याघ्रांबरि** ! मला वाटतें तूं समजून उमजून वेड पांघरलें आहेस! पण तूं असा विचार कर, लोहचुंबक अदृश्य असला, तरी त्याची ओढ लोखंडास लागल्याशिवाय कधीं तरी रहाते काय? किंवा प्रत्यक्ष चंद्रमा ढगांच्या आड जाऊन जरी लपला असला, तरी त्याच्या योगानें समुद्रास भरती येत नाहीं असें कधीं घडतें काय? '**नवोदये पूर इवेंदुदर्शनात्**' हें कविराजाचें वाक्य मीं तुला पुष्कळ ह्मेळ ऐकिवलें आहे. त्याचा विचार मनांत आणिलास, ह्मणजे तुला माझें ह्मणणें कळायला! विलंब लागणार नाहीं!

सक०—तें खरें, पण तुम्हीं ह्मणतां अशा गोष्टी आपोआप कां घडाव्या हेंच मला कळत नाहीं !

चंद्र०—उघड आहे. नाहींच कळणार ! गुलाबाची कळी श्वेतताम्रच कां असावी; किंवा सूर्य नभोमंडळांत असेपर्यंतच सूर्यविकासी कमलानें कां उघडावें, व तो अस्तास गेल्यावरोबर त्यानें एकदम कां मिटून जावें; किंवा वृक्षलतादिकांनीं भूमीच्या वरवरच कां वाढत रहावें; इत्यादि गोष्टींचीं कारणें कधीं कोणास सांगतां आलीं आहेत काय ! प्रिये ! तुला काय सांगूं! ह्या गोष्टी व्हायच्याच ! त्यांनीं किती जरी न होण्याविषयीं मनांत विचार आणिला, तरी होणारापुढें त्यांचा उपाय चालावयाचा नाहीं ! '**यद्भावि न तद्भावि भावि चेन्न तदन्यथा**' ह्मणजे जें व्हायचें तें व्हायचेंच, व जें नाहीं व्हायचें तें कधीं होणारच नाहीं, हें वाक्य कांहीं खोटें नाहीं. तद्वत्च ही गोष्ट आहे ! माझें मन हाच कोणीएक समुद्र, त्याचा कल नेहमी

तुझ्या मुखचंद्रम्याकडेच वळला, तर यांत आश्चर्य तें कशाचें ? त्यानें तिकडे वळूं नये असें म्हटलें, तरी तें वळल्याशिवाय नाहींच रहाणार !

सक०—तुमचें म्हणणें मी समजतें. पण मला एक मोठें आश्चर्य वाटतें, तें हें कीं, या पृथ्वीवर. माझाच एक मुखचंद्रमा आहे असें मुळींच नाहीं, असें असून तुमचें मजवरच मन कां बसावें ? दुसऱ्या स्त्रिया पुष्कळ आहेत, त्यांवर कां बसूं नये ?

चंद्र०—प्रिये ! फार योग्य भाषण केलेंस ! वृक्ष तेथून सगळे एकसारखेच, असें असतां कोकिला आम्रवृक्षासच लुब्ध होऊन कां रहाते? **मंगळ, बुध, बृहस्पति**, इत्यादि दुसरे पुष्कळ ग्रह नाहींत असें नाहीं, तथापि ते सर्व टाकून ग्रहणकाळीं **राहु**केतूंचा ओढा **सूर्यचंद्रां**कडेच काय म्हणून असतो ? अथवा तुला **राहुकेतूं**ची उपमा न रुचेल, तर तुला दुसरें सांगतों. या जगतीतलावर असंख्य सुवासिक घरें आहेत, पण तीं सर्व एकीकडे राहून भ्रमराची केतकीच्या म्हणजे केवड्याच्या पानावरच विशेष प्रीति कां बरें असावी ? तेव्हां तात्पर्य काय, '**व्यतिषजति पदार्थानांतरः कोपि हेतुर्न खलु बहिरुपाधीन्प्रीतयः संश्रयंते.**' ह्या सर्व लाग्याबांध्याच्या गोष्टी आहेत, त्यांचें कारण कधींच कोणास सांगतां येणार नाहीं.

सक०—तुमचें म्हणणें मला नीट समजत नाहीं तें इथेच ! तुम्हीं आतां केवड्याच्या पानाची गोष्ट सांगितलीत, पण भुंगे एकट्या केवड्यावरच असतात असा नेम कोठें आहे ? ते इतर झाडांवरूनही असतात असें नाहीं का आपण पहात ?

चंद्र०—प्रियतमे **व्याघ्रांबरि** ! तुझ्या बोलण्याचा रोख मीं ओळखला, पण तूं असा विचार कर, जवळ केतकी नसेलच तर एक गोष्ट निराळी, पण ती विद्यमान असतां तिला सोडून भ्रमर दुसरीकडे जाऊं शकतो काय ? तसेंच, तूं मुळींच या जगांत नसतीस, किंवा असूनही माझ्या दृष्टीस नच पडतीस, तर माझें मन कोणीकडे गेलें असतें हें सांगण्यांत काय अर्थ आहे ? तूं माझ्या दृष्टीस पडलीस ही गोष्ट सत्य आहे; तेव्हां माझें मन तुजकडे वळलें हें साहजिकच होय !

सक०—यावर बरीक बाई मला काय उत्तर द्यावें हें सुचत नाहीं!

चंद्र०—सत्य आहे, नाहींच सुचणार ! प्रिये! आज मी जितकें बोललों तितकें मी पूर्वी कधींच बोललों नाहीं! अहाहा! प्रियतमे! तुला काय सांगूं? सरळ इक्षुदंड एकीकडे, आणि तुझी ही शरीरयष्टि एकीकडे! या जगांत इतके मधुर पदार्थ आहेत, पण त्यांपैकीं एकाला देखील तुझ्या माधुर्याची सर यायची नाहीं! तुझ्या या हस्तकमलापुढें प्रत्यक्ष **कमला** म्हणजे **लक्ष्मी**, तिचें कमळही तुच्छ आहे! तुझा हा श्वासोच्छ्वास चालला आहे त्यापुढें या जगांतील एकूणएक सुगंधी पदार्थ रद्द असें मी समजतो!—अहाहा! प्रिये! तुझ्या प्रत्येक अवयवाचें किंवा कृतीचे वर्णन किती म्हणून करावें? तिला उपमा देण्याला मी अगदीं असमर्थ आहें! '**रामरावणयोर्युद्धं रामरावणयोरिव**' तशांतली ही स्थिति झाली आहे!—

प्रिये! तुला देण्याजोगी उपमा या जगांत नाहीं, त्याला माझा काय उपाय आहे?- तथापि उपमा द्यायचीच, तर तुला मांग तों, तूं केवळ प्रतिअप्सराच आहेस !

सक०—अहाहा ! हेंच तें ! आतां तुह्मां बोललां ही गोष्ट मी आज दोन महिने ऐकतेंच आहें ! यांत तुह्मीं मला नवें काय सांगितलें ?

चंद्र०—नवीनाबद्दल मी कांहीं ह्मणत नाहीं !—परंतु तुझ्याबद्दल आजपर्यंत मी जेवढें बोललों असेन, तें प्रत्यक्ष तुझ्याशीं कधींच नसून मी तुझ्या आईशीं बोललों आहें !—परंतु माझ्या सुदैवानें प्रत्यक्ष तुझ्याशींच भाषण करण्याचा सुखकारक प्रसंग काय तो ब्रह्मदेवानें आजच घडवून आणिला ! यांबद्दल त्याचे उपकार किती मानूं व त्याचा उतराई तरी कसा होऊं ?—अहाहा ! धन्य ! धन्य ! प्रिये आंज माझ्यासारखा धन्य आहे कोण ?—हे सुंदरि ! माझें मन हेंच कोणी सुक्षेत्र ह्मणजे उत्तम शेत असें समज, तें स्वतःजरी प्रेमरसानें भरलें आहे, तरी त्यामध्ये तुझ्या प्राप्तिरूप वृक्षाचें अद्यापि बीजारोपण झालें नाहीं, तेवढें कर, ह्मणजे या क्षेत्राचें सार्थक झालें असें मी समजेन !

सक०—ह्मणजे या बोलण्याचा काय अर्थ बाई आतां तुह्मीं शेवटीं बोललां याचा अर्थ मी नाहीं समजलें !

चंद्र०—चिंता नाहीं ! तो तुला उघड करून सांगतों!—माझें प्रेम तुजवर आहे, तसेंच तुझें मजवर असेल असें मी समजतों, तर कसेंहि करून त्या प्रेमाचा उपयोग तुझ्या मजशीं विवाहाच्या रूपानें होऊं दे ह्मणजे झालें

सक०—हाका याचा अर्थ ! आतां समजलें ! पण तुह्मीं जें आतां ह्मणालां कीं माझें प्रेम आपणावर असेल असें तुह्मीं समजतां, तें कशावरून !

चंद्र०—तें कशावरून ?—उघडच आहे !—**'सतां हि संदेहपदेषु वस्तुषु प्रमाणमंतःकरणप्रवृत्तय:'**, ह्मणजे थोर लोक जे आहेत, ते आपल्या मनावरून दुसऱ्याचें मन ओळखतात !—माझें तुजवर अपरिमित प्रेम आहे, त्याप्रमाणे तुझें मजवर प्रेम असलेंच पाहिजे ! तुजकरितां मीं मदनाच्या बाणांनीं सर्वांगीं विद्ध झालों आहें, त्याप्रमाणें तूंही मजकरितां विद्ध व्हावेंस असें ह्मटल्यास हरकत ती काय असावी ?

सक०—साऱ्या गोष्टी खऱ्या, पण समज आज मी तुह्मांला वरण्यास कबूल झालें, आणखी पुढे लग्न झाल्यावर तुह्मांला माझा विसर पडला, किंवा तुह्मीं माझी हेळसांड करूं लागलां, तर मग पुढें कसें ?

चंद्र०—भलतेंच ! अशी गोष्ट तूं मनांत आणतेस तरी कशी ? सूर्य निरंतर पूर्वेस उगवावयाचा तो पश्चिमेस उगवला; किंवा एकादा वृक्ष भुईवर वाढावयाचा तो भुईतच वाढला, आणि त्याचीं मुळें मात्र वरती वाढत चाललीं; किंवा वृक्षावरून एकादें फळ आपोआप सुटलें असतां तें खालीं न पडतां आकाशांतच वरवर उडत चाललें अशा गोष्टी घडलेल्या तूं कधीं कोठें ऐकिल्या आहेस काय? झालें तर मग, या जशा गोष्टी कधीं बदलावयाच्या नाहींत, त्याप्रमाणेंच माझें हें प्रेम कदापि फिरावयाचें नाहीं, याविषयीं तूं निःसंशय अस !

सक०—अग बाई ! इतकें बोलल्यावर माणसानें उलट ह्मणून तरी कसें बोलावें ?

चंद्र०—काय ह्मणतेस ? उलट बोलावें ?—प्रिये ! असें काय बरें करावें ? माझें तुजवर इतकें प्रेम असतां तें निष्फळ करणें तुला कसें बरें होईल ?—प्रिये ! ह्या बागेंतील हीं झाडें जशीं कळ्यांनीं भरून गेलीं आहेत, तद्वत्च माझें मन हें तुजविषयींच्या प्रेमानें भरून गेलें आहे !—सखे ! तुला काय सांगूं ? तूं या माझ्या अंतःकरणरूप बागेला प्रति सूर्याप्रमाणेंच आहेस; याकरितां तूं जर आपल्या विवाहरूप किरणांनीं माझ्या प्रेमाच्या कळ्या उमलविणार नाहींस, तर पहा त्या कळ्या सर्व कुजून जाऊन त्याऐवजीं निराशारूपी विषवृक्षच माझ्या अंतःकरणांत रोविलासें होईल.

सक०—ह्मणजे या ह्मण्याचा काय अर्थ?

चंद्र०—अर्थ काय, उघड आहे ! तूं जर माझा तिरस्कार करशील, तर मला या संसाराचा, द्रव्याचा, घरदाराचा, सगळ्यांचा त्याग करून जीवच दिला पाहिजे !

सक०—काय ? एकूण मीं तुमच्याशीं लग्न केलें नाहीं, तर तुम्हीं भागूबाईसारखे जीव देणार ?

चंद्र०—(रागावून) तूं मला भागूबाई ह्मणतेस काय ?—पोरी ! तुला वेड तर नाहीं लागलें? या जगांत प्राणांपेक्षां प्रिय दुसरी कोणती वस्तु आहे ? तिचाही मी त्याग करावयास सिद्ध झालों, तर त्यापेक्षां शूरपणा ते जगांत कोठून आणावा?

सक०—झालें, तर तुमच्याच तोंडून ठरलें, कीं प्राणांपेक्षां दुसरी कोणतीच वस्तु प्रिय नाहीं ! असें आहे, तर तुम्हीं मला आल्या प्राणांपेक्षां खचितच कमी प्रिय समजणार ? मग याबद्दल इतका वेळ सांगितलेल्या प्रेमाच्या गोष्टी ह्या निवळ गप्पाच असें नाहीं का ठरत ? इश्शग बाई ! तुमचें प्रेम प्रेम ह्मटलेलें तें इतकें अप्पलपोटेपणाचें होतें हें मला नव्हतें बाई ठाऊक !

चंद्र०—सक्कूबाई ! उगीच जास्ती बोलत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं, तूं मजवर प्रेम करिशील या आशेनें मीं तुजवर कांहीं गाणीं केलीं आहेत, तेवढीं ऐकशील तर खचित तुझें माझ्याविषयीं मन फिरेल ! तर कृपा करून तेवढीं ऐकच !

सक०—आग लावा त्या गाण्यांना ! मनुष्याचें कृत्रिमी प्रेम एकवेळ कळल्यावर आणखी गाण्यांनीं तें आळ्वायला कशाला पाहिजे! आळवूनच ध्यायचें, तर आमच्या दारासीं गोंधळी मराडी थोडके का येतात ? आणखी त्यांच्या गाण्यांत थोडकें कां आळविलें असतें ?—पण त्यांत अर्थ काय ? त्या आळविण्याला भुलून का कुठें संसाराचा परिणाम लागतो ? मला नकोग बाई त्यांतला एक शब्द दिखील ऐकायला !

चंद्र०—पोरी ! आतां मात्र तूं जास्ती जास्ती फाजील होत चाललीस ! तूं अजूनपर्यंत आपल्या आईच्या ताब्यांत आहेस, याची इतक्यांतच आठवण विसरूं नको !—तुझी आई कालेच त्या पुराणिकाचा नव्हती का साक्षात्कार सांगत ? आणखी त्यांत तुझें माझ्याशींच लग्न व्हावें असाच कीं दुसरा कांहीं अर्थ होता ?

सक०—मला त्याची जरूर नाहीं, न् तुमचीपण नाहीं!—तो मेला पुराणिक भलती न्

सलती बडबड करीत असतो, पण मत्
त्यांतलें एवढेसुद्धां आवडत नाहीं! इश्
थूः त्या पुराणावर!—काय ह्मणे, पुराणां
सकवारबाईची नू तुमची कथा सांगितल
आहे! आगलावा त्या पुराणाला, आणख
त्यां भांगट पुराणिकाला!—मेल्यानें बोकड
सारख्या दाढी मिशा नू जटा वाढविल्
आहेत, आणखी चाळे पहावे तर थेट त
गणपतीपुढें नायकिणी गातात त्यांच्या म
गच्या साजिंद्यांचे!—आई बिचारी क
समजून त्या मेल्याच्या भरीस पडली अस
ती असो; पण मला तर बाई! त्या मेल्या
दर्शन दिखील कसें तें नको!

चंद्र०—(आपणाशीं) काय करावें! भांचो
नशीबें खोटें! इतके दिवस जमवू
आणलेला घाट आज बिघडणार अ
दिसतें! काहीं चिंता नाहीं! हिच
आईकडे जाऊन इची चांगलीच खोड
जिरविली पाहिजे! त्याशिवाय इला
नाहीं! (उघडपणें) पोरी! तूं माझ्या
रोवर त्या बिचाऱ्या भाविक पुराणिकाल
शिव्या काय ह्मणून देतेस?—तुला जें कां
बोलायचें असेल तें माझाविषयीं बोल!—
तुला अखेरची एक गोष्ट विचारितों,
इतका वेळ बोललीस हें खरोखरीच क
आपलें उगीच थट्टेनें बोललीस?

सक०—असल्या कामांत मला थट्टा करायल
तुमची नू माझी कांहीं पूर्वीची ओळ
नाहीं कांहीं नाहीं, नू तुम्हीं यापुढे आत
माझ्याशीं बोलायच्या भरीस पडूंही नका
चला निघून चाल्ते व्हा कसे!

चंद्र०—हा चाललों!—पण मला एवढें ऐ
दे, तूं माझ्याशीं लग्न लावायला कबूल
होतेस कीं नाहीं!

सक०—नाहीं! तुम्हीं चालते व्हा!

चंद्र०—हा चाललों!—पण ध्यानांत असूं दे,
तूं मेरुलिंगाच्या दर्शनाला जाणार,
तेव्हां तुझ्या आईनें मला आपल्या बरोबर
न्यायला बोलाविलें आहे!—तेव्हां समजेल
काय असेल तें.

सक०—तेव्हांचें तेव्हां!—पण तुम्हीं आतां
मला ही गोष्ट सांगितली हें एका अर्थीं
चांगलेंच केलें. अतां आई जाण्याची गोष्ट
तर काढूं द्या, कीं मी तिला निक्षून सांगेन
कीं तुम्हीं बरोबर येणार असलां तर मी
घरांतून बाहेर पाय दिखील कशीती काढ-
णार नाहीं!

चंद्र०—बरें बरें—आतां अक्कल फार पाघळत
चालली! (रागानें पाय आपटीत निघून जातो.)

सक०—बरी एकदाची ०याध निघून गेली!
इतका वेळ बाई माझें मन दोन ठिकाणीं
गुंतल्यासारखें झालें होतें, पण आता एका
कांचांतून सुटलें, असें मला च वाटूं
लागलें आहे!—मेला पुरुषासारखा पुरुष,
जातीचा मराठा ह्मणवितो, आणखी भा.
गूबाई सारखा जीव देईन ह्मणतो!
यापेक्षां ते मुधोजीराव मला शल-
पटीनें चांगले वाटतात! आणखी जर
मला या दोघांतूनच कोणाशीं लगीन कर-
ण्याची पाळी आली, तर मी त्या मुधो-
जीरावांशीं मोठ्या आनंदानें लग्न करीन!—
(काहीं वेळ थांबून पूर्ववत्) हो, बरें आठवलें!
मेल्याला मी नाहीं ह्मटल्याबरोबर मला
हलकटासारख्या शिव्या द्यायला लाग-
ला!—नाहीं तर ते बिचारे मुधोजीराव!—

किती शांत वृत्तीचे !—मी इतकें बोलल्ें तरी एवढे देखील रागावले नाहींत !—आणि शूराप्रमाणें प्राण देण्यासाठीं तयार झाले !—खचित ! आतां माझ्या मनाची खातरी झाली, लगीन करावें तर अशाशींच करावें !—तरच त्यापासून संसाराचें सुख मिळायची आशा !—असो ! (दुःखाचा सुस्कारा टाकून) आतां बोलून उपयोग काय ? मघां मीं यांचा विनाकारण उपमर्द केला, ही फार वाईट गोष्ट झाली !—आतां ते परतून मजकडे कशाचे येतात आणखी मला तरी त्यांच्याशीं बोलायला कुठचें सांपडणार ? (डोळ्यांत आसवें आणून स्तब्ध राहते.)

(इतक्यांत हैबतराव येतो.)

हैब०—कोण ? बेटा **सकवार** ! तूंच का एकटी एकीकडे येऊन बसली आहेस ?

सक०—(शांतपणें) होय बाबा !

हैब०—हां—अग—मोठ्यानें बोलूं नको !—मी तुझ्याशीं काहीं बोलावयाकरितां आलों आहें,—पण इकडे ती कृत्या तर यायची नाहींना ?

सक०—आई आज कपाळ दुखतें आहे म्हणून सांगून जाऊन निजली, तेव्हां ती इतक्यांतच इकडे येईलसें वाटत नाहीं !

हैब०—किंवा आलीच, तरी वाटेंत ते मजूर काम करीत आहेत, तेव्हां त्यांना शिव्या देण्यांत तिचा बराच वेळ जाईल, तेव्हां ती लौकर येईल अशीच कांहीं धास्ती नको बाळगायला !—ठीक आहे ! मला हेच पाहिजे होतें ! माझें बोलणें ऐकायला ती जवळ नको !—बरें बेटा, मला कांहीं बोलायचें आहे !

सक०—तें कशाबद्दल बाबा ?—हं—परवां का तेरवां तुम्हीं बोललां होतां तेंच तर नव्हे ?

हैब०—तेंच. काय ग, इकडे मुधोजीराव आले होते का ?

सक०—होय. येऊन दिखोत गेले. पण कोण त्यांची फजिती ! मी कांहीं त्यांचें म्हणणे कबूल केलें नाहीं, तेव्हां चिमणीसारखें एवढेंसें तोंड करून ते इथून गेले ! —आणखी जातांना इतकें सुद्धां बोलले, कीं तूं माझ्याशीं निष्ठुरपणा करितेस, तर आतां कोठें तरी लढाईंत जाऊन तुझा निष्ठुरपणा आणि माझा जीव या दोघांना बरोबरच संपवितों ! मला वाटतें ते एवढ्यांना निघून दिखील गेले असतील !

हैब०—काय ? निघूनही गेले असतील म्हणतेस ?

सक०—मी घटघडीत त्यांच्याशीं निष्ठुर झालें, तेव्हां त्यांनीं येथून जाऊं नये, तर दुसरें काय करावें ?

हैब०—पोरी ! तुला आतां काय म्हणावें ? तुला वेडबिड तर नाहीं लागलें ? पोरी ! तूं माझें सांगणें मुळींच कसें तें ऐकत नाहींस, तेव्हां आतां तुझ्यापुढें रडावें का काय करावें ? तूं ज्या त्या गोष्टींत माझें न ऐकतां तिचेंच ऐकतेस !—काल संध्याकाळीं देवाला गेलों होतो, तिथें प्रदक्षिणेच्या वाटेवर मला पाहून ज्याच्या त्याच्या तोंडांत तुझ्याबद्दल नू तिच्याबद्दल हीच कुजबुज !—पण काय करावें ! आपलेच दांत आणि आपलेच ओठ, सगळें मुकाट्यानें गिळून गेलों; आन् गुपचूप आपला परत आलों !

सक०—मग यांत वाईट तें काय झालें ? सगळ्या गांवांत मोठीं माणसें म्हटलीं म्हणजे

आमच्याहून दुसरीं कोण आहेत ! तेव्हां त्यांनीं आमच्याबद्दल बोलूं नये, तर दुसऱ्या कोणाबद्दल बोलावें !

हैब०—वाः ग पोरी ! तूं तरी मला भलतीच शेहागी दिसते आहेस ! लोकांनीं आपल्याकडे पाहून हंसावें, आपल्याकडे बोटें दाखवावींत, कुजबुजत रहावें, हा असला थेरपणा माझ्या नाहीं कामाचा ! आता फिरून तर अशी गोष्ट झालेली मला कळूं दे, ह्मणजे पहा काय करतों तें !—

सक०—बाबा ! तें सगळें खरें. पण तुह्मीं या गोष्टी मला सांगून काय उपयोग ! तुह्माला कांहीं सांगायचें असलें, तर तें तुह्मीं आईलाच जाऊन कां सांगत नाहीं ! तुह्मींच तिला मोकळी सोडून देतां, तो करील तसें करील, तुह्मीं तिच्याविरुद्ध एवढे देखील कसे तें बोलत नाहीं किंवा वागत नाहीं, तेव्हां ती डोस्कीवर चढली तर आश्चर्य तें कसचें ? ही सगळी तुमचीच चुकी आहे ! तुमच्यानें तिच्यापुढें एवढें देखील बोलवत नाहीं, त्या—

हैब०—काय ? माझ्यानें तिच्यापुढें बोलवत नाहीं अं !—बरें बरें !—

सक०—बाबा ! तुह्मीं असे रागावूंच नका कांहीं !—पण मीं तरी काय करावें ? घरांत सगळी मुखत्यारीण काय ती आई, तेव्हां तिनें काहीं सांगितलें, तर मला तें मुकाट्यानें ऐकून घ्यावें लागतें !

हैब०—पण पोरी ! तूं माझ्याचना पोटची ? मग तुला माझें म्हणणें कां ऐकायला ?

सक०—होय. त्याला मी तरी कधीं नाहीं ह्मणतें आहें ?—पण तुह्मींच तशा तऱ्हेनें वागत नाहीं, ह्मणून तर सगळे हें असें !—तुह्मींच चांगल्या बेतानें वागायला लागा, न मग मीं तुमचें ऐकलें नाहीं, तर मला बोला !

हैब०—पण तोंपर्यंत तूं कांहीं मुधोजीरावांशीं लग्न करायला कबूल नाहींस असेंच तुझें ह्मणणें ?

सक०—मीं कसें कबूल करावें हें तुह्मींच मला सांगा, ह्मणजे करितें कबूल.

हैब०—एकूण तोंपर्यंत तूं तिच्या ह्मणण्याप्रमाणेंच चालणार ?

सक०—त्याला माझा तरी काय बरें उपाय ? आईपुढें का माझें कांहीं चालतें ?

हैब०—बरें बरें ! त्याचा विचार आतां मीच पहातों !—आतां ती आपल्या स्वतःच्या इच्छेप्रमाणेंच कशी वागते ती पाहूं तर दे मला !—आतां तिला माझ्या इच्छेच्या आड येऊं तर दे खरी, कीं—

ह्माळ०—(प्रवेश करून) मग ह्मणतां काय? ही आलेच आड, आतां काय करतां तें करा पाहूं!

हैब०—(चपापून) अग, पण तूं इकडे कशी आलीस ? तुझें कपाळना दुखत होतें आन् तूं निजलीना होतीस ?

ह्माळ०—पुरे पुरे ! मला असला चोंबडबुचकेपणा करितां येत नाहीं ! रांडा मेल्यीं मला चोंहोंकडून भंडावायलाच निघालीं आहेत जशीं! अशानें माझें कपाळ तें कसचें बरें होतें आहे ?—कायहो ! तुह्मांला त्या मजुरांकडून काम करून घ्यायला सांगितलें असतां तुह्मीं तिकडून उठून इकडे काय ह्मणून आलां! बरें आलां तर आलां, आणखी इकडे येऊन माझ्या पोरीला फितवायला लागलां !

हैब०—(आगबर शहारे येऊन) अग, तूं हें बो-

जाहिराती.

☞ महत्त्वाची सूचना.

आमच्या बडोदें येथील एजन्सींत कांहीं अव्यवस्था झाली होती, परंतु हल्लीं तीं नाहींशी करण्यांत आली असून तेथील एजन्सी मुळींच काढून टाकण्यांत आली आहे, व इंतःपर तेथील वर्गणीदारांशीं आम्हीं साक्षात् संबंध पूर्ववत् ठेवणार आहों. इकडे **वर्गणीदारांनीं लक्ष पोंचवून वर्गणी वगैरे पाठविणें तीं खुद्द आम्हांकडेच पाठवावी.** तसें न होतां दुसऱ्या कोणाकडे पैसे भरल्यास त्याबद्दलची जबाबदारी आम्हांवर नाहीं.

शंकर मोरो रानडे बी. ए.

नाम्यकथार्णवकर्ते,

उघड आहे. यासाठीं ज्यांनीं यास आश्रय दिला आहे त्यांचे आभार मानून इतरांस या अतिस्वस्त ज्ञानसाधनापासून फायदा करून घेण्याविषयीं विनंति करीत आहों.

वामन शिवराम आपटे एम. ए.	विष्णु कृष्ण चिपळूणकर बी, ए.
गोपाळ गणेश आगरकर एम. ए.	बाळ गंगाधर टिळक बी.ए.एल.एल.बी.
महादेव बल्लाळ नामजोशी.	गजेश कृष्ण गर्दे एल.एम. आणि एस.

निंबाचे पानक.

अथवा

सर्व सरबतांमध्यें अत्यंत उत्तम सरबत.

मनास शांति आणणारें, हिंमत उपजविणारें, ताजेतवानें करणारें, रुचिकर, मधुर, शीतळ आणि सुवासिक, पित्तज्वर, अजीर्ण, थकवा, मानसिकश्रम, तृषा, क्षुधाभाव, उष्णता, कपाळदुखी, मस्तक जड होणें, नेत्रांची जळजळ, मद्यपानासक्ति, व शौंप न येणें हे विकार दूर करितें. शरीरप्रकृति तेव्हांच ताळ्यावर आणितें. ह्याच्या सारखें पानक विरळाच आढळतें. किंमत १४ आणे, बंगी रु. ४ आणे. ग्लासामध्यें पाडिजे तितकें ओतून आंत तितकेंच किंवा जरा जास्त पाणी घालून प्यावें.

हें फक्त मुंबईत "नाम्यकथार्णव" आफिसांत मिळेल.

आमच्याहून दुसरीं कोण आहेत ! तेव्हां त्यांनीं आमच्याबद्दल बोलूं नये, तर दुस-

तुह्मींच चांगल्या बेतानें वागायला लागा, न् मग मीं तुमचें ऐकलें नाहीं, तर मला

चुकीची दुरुस्ती.

वर्ष २ अंक ११ यांत अनुतापशमन नाटकाच्या ३६ पृष्ठावर प्र. ३ च्या ओळीस 'उदासदुर्गांतील' हा शब्द हस्तदोषानें पडला आहे, त्याचे बदलीं 'तिरसगडांतील' असें वाचावें.

आभार पूर्वक पोंची.

श्रीमहिषासुरमथनी देवी व अष्टसिद्धीसहित श्रीगणपति यांच्या अति सुंदर व रंगित तसबिरी, पुणें चित्रशाळेचे मालक यांजकडून. किंमत व टपाल खर्च प्रत्येकीं १२ आणे व १ आ. ६ पै.

बडोदें येथील तैनाती फौज (आर्यभूषण छापखाना.)

एवढे देखील कसे ते बोलत नाहीं किंवा वागत नाहीं, तेव्हां ती डोस्कीवर चढली तर आश्चर्य तें कसचें ? ही सगळी तुमचीच चुकी आहे ! तुमच्यानें तिच्यापुढें एवढें देखील बोलवत नाहीं, त्या—

हैब०—काय ? माझ्यानें तिच्यापुढें बोलवत नाहीं अं !—बरें बरें !—

सक०—बाबा ! तुह्मीं असे रागावूंच नका कांहीं !—पण मीं तरी काय करावें ? घरांत सगळी मुखत्यारीण काय ती आई, तेव्हां तिनें कांहीं सांगितलें, तर मला तें मुकाट्यानें ऐकून घ्यावें लागतें !

हैब०—पण पोरी ! तूं माझ्याचना पोटची ? मग तुला माझें नकोका ऐकायला ?

सक०—होय. त्याला मी तरी कधीं नाहीं ह्मणतें आहें ?—पण तुह्मींच तशा तऱ्हेनें वागत नाहीं, ह्मणून तर सगळें हें असें !—

आड येऊं तर दे खरी, कीं—

ह्माळ०—(प्रवेश करून) मग ह्मणतां काय? ही आलेंच आड, आतां काय करतां तें करा पाहूं?

हैब०—(चपापून) अग, पण तूं इकडे कशी आलीस ? तुझें कपाळना दुखत होतें आन् तूं निजलीना होतीस ?

ह्माळ०—पुरे पुरे ! मला असला चोंबडबुचकेपणा करितां येत नाहीं ! रांडा मेलीं मला चोंहोंकडून भंडावायलाच निघालीं आहेत जशीं! अशानें माझें कपाळ तें कसचें बरें होतें आहे ?—कायहो ! तुह्मांला त्या मजुरांकडून काम करून घ्यायला सांगितलें असतां तुह्मीं तिकडून उठून इकडे काय ह्मणून आलां! बरें आलां तर आलां, आणखी इकडे येऊन माझ्या पोरीला फितवायला लागलां !

हैब०—(आंगवर शहारे येऊन) अग, तूं हें बो-

जाहिराती.

केसरी (अतिस्वस्त मराठी वर्तमानपत्र.)

वर्गणीचे दर.

सालिना आगाऊ १ रु०. फुटकळ अंकास ६ पै. मुंबईंतील लोकांस १ रु०, ट० ह० ४ आणे.

वर्गणी आल्याखेरीज अंक रवाना केला जाणार नाहीं. एका प्रतीस १ रु० १० आणे टपालहंशील पडेल; व ६ प्रतींपर्यंत तितकेंच पडेल.

व्यापार, व्यवहार आणि राज्यव्यवस्था या विषयांवर निदान तीन तरी निबंध प्रांजलपणें, निर्भीडपणें, व विचारपूर्वक ज्यांत लिहिले जात आहेत असें "केसरी" नांवाचें, 'इंदुप्रकाश, किंवा 'नेटिव्ह ओपिनिअन' च्या अर्ध्या राज्याचें वर्तमानपत्र लोकांमध्यें ज्ञान, देशाभिमान' आणि देशप्रीति यांचा प्रसार होण्यासाठीं एका रुपयांत आहीं कित्येक महिनेपर्यंत काढीत आहों. आतां हें दशहिताचें काम अव्याहत निरंतर चालविण्यास जसजसा लोकाश्रय अधिकाधिक मिळत जाईल तसतसा अधिक हुरूप येत जाईल हें उघड आहे. यासाठीं ज्यांनीं यास आश्रय दिला आहे त्यांचें आभार मानून इतरांस या अतिस्वस्त ज्ञानसाधनापासून फायदा करून घेण्याविषयीं विनंति करीत आहों.

वामन शिवराम आपटे एम. ए.	विष्णु कृष्ण चिपळूणकर बी, ए.
गोपाळ गणेश भागरकर एम. ए.	बाळ गंगाधर टिळक बी.ए.एल.एल.बी.
महादेव बल्लाळ नामजोशी.	गजेश कृष्ण गर्दे एल.एम. आणि एस.

निंबाचे पानक.

अथवा

सर्व सरबतांमध्यें अत्यंत उत्तम सरबत.

मनास शांति आणणारें, हिंमत उपजविणारें, ताजेतवानें करणारें, रुचिकर, मधुर, शीतळ आणि सुवासिक, पित्तज्वर, अजीर्ण, थकवा, मानसिकश्रम, तृषा, क्षुधाभाव, उष्णता, कपाळदुखी, मस्तक जड होणें, नेत्रांची जळजळ, मद्यपानासक्ति, व झोंप न येणें हे विकार दूर करितें. शरीरप्रकृति तेव्हांच ताळ्यावर आणितें. ह्याच्या तोडचें पानक विरळाच आढळतें. किंमत १४ आणे, बंगी क. ४ आणे. ग्लासामध्यें पाहिजे तितकें ओतून आंत तितकेंच किंवा जरा जास्त पाणी घालून प्यावें.

हें फक्त मुंबईत "नारायणभार्गव" आफिसांत मिळेल.

अबलियाप्रासादिक.

ब्रह्मचारिदेवाकृत अमृतबल्लवी अर्क.

विक्रीस तयार आहे.

सदरील अर्क काश्मीर, हिमालय, व इकडील प्रांतांतील अनेक वनस्पति एकत्र करून त्याजपासून यंत्रसाह्यानें तयार केला आहे. ह्या अर्काबद्दल ग्रंथांतरीं प्रयोग सांगितला नसून हा अबलियाप्रसादाचा आहे. या अर्काच्या सेवनानें बारीकसारीक रोग तर जातातच; परंतु मोठाले भयंकर रोग म्हणजे रक्तपित्त, अर्धांगवायु, क्षय, उरःक्षत, उदरादि आठ प्रकारचे रोग, भगंदर, अंतरगळ, मेद, आगंतुक, नपुंसकत्व, उपदंश, पटुता, प्रमेह, इत्यादि; व स्त्रियांचे विटाळादि. दोष, हस्तिपद वगैरे प्रकारच्या रोगांवर या अर्कानें उत्तम तऱ्हेचा गुण दिल्याचा खात्रीचा अनुभव आहे. अनुपानाचा कागद वगैरे औषधासोबत मिळेल. तात्पर्य, हा अर्क पाहिजे त्या रोगावर चालतो. या अर्कांत विशेष हा गुण आहे कीं, याला पथ्य करण्याची जरूरी नाहीं.

किंमत दर मोठे बाटलीस रु. २॥; लहान बाटलीस १॥; प्याकिंग चार्ज थोरलीस ६ आणे, व धाकटीस ४ आणेप्रमाणें रोख नाट्यकथार्णव आफिसांत पाठविल्यास बंगी नाटपेड रवाना केली जाईल.

—o—

विष्णु गणेश जोशी आणि मंडळी,

बुकसेलर्स व कमिशन एजंट्स.

बुधवार पेंठ बुधवारचे हौदासमोर, पुणें.

सर्व लोकांस विनयपूर्वक कळविण्यांत येतें कीं आमचे दुकानीं शालेपयोगी व इतर पुस्तकें व स्टेशनरी सामान वगैरे माफक दरानें विकत मिळेल.

कोणास आमचे दुकानीं पुस्तकें, पोथ्या, वगैरे विकरीकरितां ठेवणें असल्यास आह्मीं कमिशन घेऊन ठेवूं. व त्याबद्दलचा हिशेब चोख ठेवण्यांत येऊन पत्रव्यवहाराप्रमाणें जी व्यवस्था ठरेल त्या व्यवस्थेअन्वयें कमिशन वगैरेचा ठराव होईल.

ज्या कोणास पुणें मुक्कामीं आपल्या वर्तमानपत्राचे किंवा मासिक पुस्तकाचे एजंट नेमणें असेल, त्यांणीं आह्मांकडे लिहून कळविल्यास त्यांच्या पत्रव्यवहाराप्रमाणें कमिशनचा ठराव करून सर्व व्यवस्था ठेवण्यांत येईल.

तसेंच बाहेरगांवचे लोकांस पुण्याहून कांहीं जिन्नस वगैरे लागल्यास मागविण्याची अडचण पडते. यास्तव कमिशन घेऊन हरएक प्रकारचा माल आह्मीं पाठविण्याची तजवीज केली आहे. माल कसोशीनें व चांगला पाहून घेऊन बंदोबस्तानें पाठविण्यांत येईल.

किरकोळ १० रुपयेपर्यंत दर रुपयास एक आणा; पुढें दर शेंकडा ३ रुपये पडतील. शिवाय पोस्टेज पैसा आगाऊ रोख आल्याशिवाय माल रवाना होणार नाहीं,

पत्र रजिस्टर न.करतां टिकिटें वैगेरे पाठविल्यास तीं गाहाळ झाल्यास त्याची जबाबदारी आमचेवर नाहीं. टिकिटें पाठवणें झाल्यास तीं अर्धी आणा दराचींच असून दर रुपयास अर्धा आणा वर्ताळ्यासुद्धां पाठवावींत. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.

—o—

जीवनार्क.

हा अर्क रुचकर व मधुर असून कोणत्याही ऋतुमध्यें पाहिजे तितके वेळ घेतला असतां अपकार करणार नाहीं. ह्यांत सर्व शक्तिवरच्या औषधांचा राजा झटल्यास चालेल. कारण ह्यांत सर्व पौष्टिक औषधांचा समावेश केला आहे. शरीर मजबूत होऊन मेंदूची शक्ति व रक्त ताजीं होतात व वाढतात. हा अर्क पुढील रोगांवर रामबाण आहे:—इंद्रियें मंद पडणें, शक्तिपात, अभ्यास अगर कामकाज करवेनासें होणें, मंद स्मृति अगर दृष्टि, सतत कपाळशूळ, जननेंद्रियाचे रोग, दमा, खोकला, रक्ताची कमताई, भूक मरणें, अपचन, कांवरें, अतिसंभोग, बलात्कारानें धातुपात, कुमार्गापासून रोग, **मधुमेह व रक्तपित्ती** (हे दोन रोग पुढें वाढत नाहींत.) दारू पिण्याची खोड व तिचे भयंकर परिणाम आणि सतत दासदायक घाम. ह्यांत चमत्कार इतकाच आहे कीं, शक्ति व उत्साह कायमचीं येतात, व गुण पहिल्या दिवसांपासून भासतो. बालकांस हें मानसिक अन्नच आहे. तरुणांना मानसिक श्रम जाणवत नाहीं. व हें स्वभावसिद्ध शक्तिवर्धक होय. वृद्ध मनुष्यें व जिवाआगळे श्रम करणारे यांस हें प्रत्यक्ष जीवनाच्या ठिकाणीं होऊन ते दीर्घकाळपर्यंत कांचतात, व या कलिकालातील आयुर्नियमाप्रमाणें संपूर्ण शरीराचें भाग कालमानानें खर्च होत राहून अखेर शरीराचे सर्व व्यापार आपोआप बंद होत तोंपर्यंत निर्भयपणें राहतात. प्रत्येक विद्यार्थी, धंदा करणारा मनुष्य, किंवा सर्वकाळ कामकाजांत गुरफणारा, मनुष्य यानें हें औषध संग्रहीं ठेवावें. किं. १। रु. बंगी करणावळ चार आणे. बंगी नाटपेड जाईल. एक चमचा अर्धा पावशेर दुधामध्यें दिवसांतून तीनदा घ्यावें. दूध पाहिजे. तिखट घेतल्यास चिंता नाहीं.

कांदेवाडी मेडिकल हाल मुंबई. वि. स. परांजपे.

—o—

अवश्य अनुभव घ्या ! ! ! एकदाच घेऊन खात्री ! ! !

CHILDREN'S ELIXIR.

बालामृत.

[झाडास ज्याप्रमाणे वाढवावें त्याप्रमाणें तें वाढतें]

हें औषध एतद्देशीय अनेक वनस्पति मिश्र करून केलें आहे. ह्यापासून मुलांस जंतांचा उपद्रव कधींही होत नाहीं. अजीर्ण होऊन वारंवार दूध ओकणें बंद होतें,

आईच्या दुधाच्या कमताईमुळें किंवा तें मुळींच न मिळाल्यामुळें होणारी क्षीणता व पांढूर हीं ह्यांवर हें औषध जालिम आहे. गाईच्या दुधावर वाढविलेल्या मुलांत होणारे सर्व रोग ह्यानें दूर होतात. गर्भाशयांत मुलें असतां ह्मणजे गरोदरपणामध्यें अंगांत रक्ताची कमताई असल्यामुळें अगर पुढें अंगावर दूध न मिळाल्यामुळें मुलाच्या अस्थि कांड्यांप्रमाणें होतात त्यांस बळकटी आणणें, व ज्यांचीं पोटें फार मोठीं होतात व तीं फार खातात व हळूहळू क्षीण होतात, ह्यांवर हें अद्वितीय आहे. खोकला, गळ्यामध्यें घरघर आवाज, फेफरे, आंकडी, पांढरी हागवण, आंव, अतिसार, ह्या रोगांचा हें दिलें असतां संभव सुद्धां रहात नाहीं. पाय लटके पडल्यास हें औषध देऊन अवश्य पहावें. दमा, माशी खाण्याची संवय, खरूज. कंडू, डोकींतील फोड, लागलेच दूर होतील. शौचास नियमानें होऊन सर्व इंद्रियें बराबर राहतील, ह्मणून ह्यास बलामृत असें नांव दिलें आहे. दर बाटलीस किंमत रुपया एक. वंगीखर्च आठ आणे. घेण्यास मजुर असल्याकारणानें मुलें पाहिजे तितकें घेतील. माहितीचा कागद आंत आहे.

फांदेवाडी मेडिकल हाल. वि. स. परांजपे.

पौष्टिक, शक्तिवर्धक शरीर मनोत्साह आणणाऱ्या मिश्र फास्फरसाच्या फोडल्यावर अंधेरागर्धे तेज दाखविणाऱ्या मौक्तिकरस सुशोभित उत्तम चमत्कारिक खानरीच्या गोळ्या.

(ह्या ऋतूमध्यें घेण्याजोग्या.)

ह्या गोळ्या शरीरांतील रोगांवर रामबाण आहेत व ह्याविषयीं बहुत सर्टिफिकेटें आलीअसलें आहेत. मेंदूची व शारीरिक क्षीणता, हळके झालेलें डोकें, अतिशय दारू सेवन, ऐहिक काळजी, अध्ययन किंवा मानासिक कामकाजानें आलेली क्षीणता, क्षय, अजीर्ण, पोटदुखी मस्तकशूळ, कोडु, पंडुरोग मेंदु व त्वचागत व्याधी आतशय पासून येणें, अंगास शिरशिरि व मुंग्या येणें, केश पांढरे अवेळीं होणें, रक्ताची कमताई, जीर्णज्वर, मधुमेह, व रक्तक्षीणी, अवेळीं क्षीणता येऊन डोळे खोल जाणें व वृद्ध दिसणें इत्यादि प्रकारांवर या औषधाचा फार उपयोग होतो याने क्षुधा वाढते, बुद्धि व स्मरणशक्ति तीव्र होते, स्नायुशक्ति वाढो, क्षीणता पळते, शरीरास समान वाढतें. मेंदूस व मज्जातंतूस तरतरी येते, डोळ्यांची आग जाते, शरीर सौख्य होतें, श्रम जातो काम करण्यास उत्साह वाटतो, अस्थी बळकट होतात, व रक्त बरोबर फिरतें, अन्न पचून भरपोषनाची शरीरात बळकटी प्राप्त होते. या गोळ्या नेटिव ओपनियन छापखान्यांत व कान्देवाडी मेडिकलहालांत विकत मिळतील प्रत्येक बाटलीस १४ आणे व एक पासून चार पर्यंत वंगीव टपाल खर्च ६ आणे. ह्मणून च्यार बाटल्या मागविण्यास सोईवार पडतें. (सर्व खर्च ३ रु. १४ आणे च्यार बाटल्यास व एकीस १। रु.) एक बाटली आठ दिवस पुरते साधारणपणें एक महिना औषध घेतलें पाहिजे. पैका मनिआर्डरनें पाठावा. माहितीचा कागद आंत आहे.

विठ्ठल सदाशिव परांजपे, कां. हा. मा.

वधूदर्पण.

गेल्या अंकीं सूचना दिल्याप्रमाणें हें पुस्तक छापून तयार होत आलें असून तें लवकरच बांधून जानेवारीच्या १ ल्या तारखेस वर्गणीदारांकडे खास रवाना करण्यांत येईल. ह्मणून ज्या लोकांनीं अगाऊ सह्या दिल्या आहेत त्यांस व नवीन होणाऱ्या वर्गणीदारांस कळविण्यांत येतें कीं, त्यांनीं आपआपली वर्गणी दर प्रतीस १ रुपया व टपालखर्च २ आ. मिळून १ रु. २ आ. मनीआर्डर किंवा दर रुपयास एक आणा वर्तवळ्यासुद्धां अर्ध आणा दराच्या पोष्टाच्या टिकिटांच्या रूपानें २५ डिसेंबर पर्यंत मुंबईत कांदेवाडींत "नाट्यकथार्णवाचे मालक" यांजकडे पाठवावीं. सदर मुदतीनंतर घेणारांस १॥ रु. किंमत पडेल. पूर्वीं अनुमान केल्यापेक्षां पृष्ठें अधिक वाढल्यामुळें पुस्तक वेळेवर बाहेर पडण्यास विलंब लागला.

हें पुस्तक नव्या टैपांनीं चांगल्या जाड व घोटीव कागदावर छापलें असून याचीं ३०० पृष्ठें झालीं आहेत व आंत बाहेर मिळून एक फारच सुंदर व उत्तम चित्रांचा उडकट घातला आहे. यास्तव घेणारांनीं त्वरा करावी.

वधूदर्पण कर्ते.

मुंबई, ता. १५ माहे डिसेंबर सन १८८१.

मौजेच्या चार घटका भाग १. कालिदासाचें अभिज्ञानशाकुंतल नाटक-

यांत सगळ्या नाटकाचें भाषांतर नवें असून पात्रांची भाषा जशी प्रचारांत बोलतात तशीच घालून छापलेली आहे, व जागोजागीं टीपांसारखे पुस्तककर्त्यानें पदरचे विचार घातलेले आहेत. किं. १॥ रु. ट. २ आणे. पुस्तकें मुंबईंत, नाट्यकथार्णव आफिसांत; इंदुप्रकाशांत; विविधज्ञानविस्तार आफिसांत, व गिरगांवांत मालकाचे घरीं; पुण्यांत, तात्यासाहेब राजमाचीकर यांचे घरीं; नाशिकास जयराम भाऊ वकील यांचे घरीं; रत्नागिरीस सत्यशोधक छापखान्यांत; इंदुरास नारायणराव गणपुले यांचे घरीं विकत मिळतील.

महादेव चिमणाजी आपटे बी. ए. एल. एल. बी.
मुंबई हायकोर्टाचे वकील.

दिलखुषखबर.

संगीतदर्पण.

अथवा

गायनविद्येच्या ज्ञानाची मार्गोपदेशिका.

राज्यक्रांतीच्या झपाट्यांत लोकप्रिय अशा संगीत (गायन व राग) विद्येचा लोप होऊन सांप्रतकाळीं तिजकडे विद्वान लोकांचें दुर्लक्ष झाल्यामुळें, आमच्या लोकांत संगीत

विद्येची असावी तशी अभिरुचि नाहीं, परंतु हल्लीं मुंबई व पुणें मुक्कामीं "संगीत नाटककार" मंडळया उद्भवून त्यांनीं नाटकद्वारें संगीतविद्येचें वास्तविक मनोवेधक स्वरूप प्रेक्षकांसमोर उभें केल्यामुळें बऱ्याच लोकांत संगीताची गोडी लागून संगीतविद्येची माहिती करून घेऊं लागले आहेत. तर अशा लोकांचे हेतु पूर्ण होऊन त्यांस संगीतविद्येचें वास्तविक ज्ञान व्हावें अशा उद्देशानें आम्ही कित्येक गवई व वस्ताद ह्यांच्या साह्यानें "**संगीतदर्पण**" नांवाचा एक ग्रंथ तयार करून छापविण्यास सुरुवात केली आहे.

या ग्रंथाचे मुख्य दोन भाग केले आहेत. त्यांपैकीं पहिल्या भागाचे तीन विभाग केले आहेत. पहिल्या विभागांत संगीतविद्येचा भरतखंडस्थ व परदेशस्थ संबंधी एकंदर इतिहास; दुसऱ्या विभागांत संगीतसंबंधी एकंदर राग रागिण्यांची विशेष माहिती दिली असून कोणत्या ऋतूंत कोणत्या वेळीं व कोणत्या प्रहरीं कोणता राग गावा ह्याविषयीं एकंदर माहिती दिली आहे; तिसऱ्या विभागांत एतद्देशीय व परदेशीय प्रसिद्ध प्रसिद्ध वाद्यांचीं चित्रें दिलीं आहेत. आणि दुसऱ्या भागांत **ध्रुपद, पद, ठुमरी, तिलाणा, ख्याल, दादरा, होरी, गजल, रेखता, कव्वाली, लावणी, प्रबंध ठुंबरी, झूल, गरबी,** इत्यादि जातींची अनेक प्रकारच्या राग रागिण्यांतील २९० निवडक पदें (चिजा) दिलीं आहेत, त्या प्रत्येक पदा (चिजे) वर त्याचा राग व चाल दाखविली आहे. तेणेंकरून तीं गाववास सुलभ जातील.

ह्याची किंमत तारीख ३१ जानेवारीच्या आंत देणारांस १॥ रुपया व मागाहून २ रुपये पडतील. बाहेरगांवच्या लोकांस टपाल खर्चाबद्दल २ आणे जास्त पडतील.

किंमतीचा पैसा पाठविणें तो "**नाट्यकथार्णव**" मा. पुस्तकाचे मालक यांचे नांवें वरील मुदतींत मनीआर्डर करून पाठवावा. पुस्तकें फेब्रुवारी महिन्याचे अखेरीस आश्रय दात्यांस पाठविलीं जातील. ह्या पुस्तकास सर्व संगीताभिलाषि, गायनप्रिय व इतर सर्व लोकांकडून चांगला आश्रय मिळेल अशी उमेद आहे. पुस्तक डेमी द्वादशपत्रीं २०० पृष्ठांचें होईल असा अंदाज आहे.

मुंबई ता० १ सप्टेंबर १८८१

पुस्तककर्ते.

DR. LALOR'S PHOSPHODYNE.

[सर्व हक्क.] **प्रसिद्ध आश्रयाखालीं.**

प्रकृति दुरुस्ती, शक्ति आणि उत्साह.

डा. लेलार यांचें फास्फोडाइन.

व्यापाराची खूण—फास्फोडाइन.

आर. डी. लेलार एम. डी. यांनीं सन १८६२ त शोधून काढून हें नांव दिलें. त्वचेस मधुर, अतिशय श्रमानें बिघडलेला मेंदु, चिंता, काळजी, संताप, फार जागरें, अतिशय काम, मज्जातंतु गलित होणें, मज्जातंतूंचें दुखणें, क्षयकारक रोग, खोकला, क्षय, उदर आणि यकृताचे विकार, कमी झालेलें अन्नपोषण, रक्त कमी होणें, अविनकळा वाजवी काळापूर्वीच जाणें, आणि जीवनकळेच्या कमती होण्यावर अवलंबून

असणारे शरीरांतील सर्व प्रकारचे रोग, यांवर अपाय न करणारें, आणि तावडतोबीचें आणि विश्वसनीय असें फास्फरसाच्या मिश्रणानें केलेलें असें हेंच एक औषध,

डा. लेलार यांचे फास्फोडाइन.

हें रक्त शुद्धकरून वाढवितें; कांतडी साफ करते; मज्जातंतु व स्नायु यांस पूर्णपणें शक्तिमंत करितें; आयुष्याच्या गळू पाहणाऱ्या कार्यांस संपून गेलेलें असें फास्फरसाचे तत्व नव्यानें देऊन पुनरपि सामर्थ्य देतें; व या योगानें मज्जातंतूंच्या संपून गेलेल्या वैद्युत शक्तीस उत्साह आणि नवें जीवित्व देऊन कोणत्याहि कारणानें उत्पन्न झालेले, मज्जातंतूंचा अशक्तता, पक्षघात, मितरे मन, आणि काळजाचे रोग हे कोणत्याही जातीचे असले तरी त्वरित तावडतोब बरे करितें.

डा. लेलार यांचें फास्फोडाइन.—याचा उपयोग केला असतां अशक्ततेस पोंचलेली कोणतीही इंद्रियें पूर्ववत् बळकट होऊन आपआपलीं कार्यें करूं लागतात. मज्जातंतूंची अथवा शरीराची अशक्तता, किंवा ह्या क्लेशकारक कारणांचीं जीं शेंकडों रूपें होतात तीं, यांपासून कोणत्याही पावणाऱ्या रोग्यांनीं असें मनांत खास समजावें कीं, जर या अत्यंत अमोल्य उपायाचा आपण वाजवी उपयोग केला, तर आपण कायमचे आणि तावडतोब बरे होऊं.

फास्फरस हाच रक्त, मेंदु, अस्थींचें अन्न, आयुष्याचा प्रत्यक्ष टेंका. मेंदुच्या शक्तीचें उत्पत्तिस्थान आहे, असें मोठमोठे प्रामाणिक वैद्यक शास्त्रज्ञ आतां कबूल करतात; व यासाठीं ते मत्स्याहार, व फास्फरसयुक्त पदार्थांचा आहार करावा म्हणून सांगतात.

मज्जातंतूंचे रोग म्हणजेच मेंदू आणि मज्जातंतूंचें केंद्र यांत फास्फरसाचा अभाव, व ते रोग बरे करणें म्हणजे हा नसता पदार्थ शरीरांत पुनरपि शिरकविणें, असा जो डा. लेलार यांचा सिद्धांत, त्याचा आश्चर्यकारक खरेपणा सन १८६२ पासून **डा. लेलार** याच्या **फास्फोडाइन**नें सिद्ध करून दाखविला आहे.

फास्फरसाशीं तावडतोब मिसळून त्यायोगें क्षय, अशक्तता, मेंदूस अतिशय श्रमपडणें, शक्तिपात, उत्साह व जीवनकला यांचा अभाव, हीं फार जलद बरीं करणारें औषध म्हटलें म्हणजे **डा. लेलार यांचें फास्फोडाइन** हें एकच आहे.

महाराणी साहेबांनीं नेमिलेले व्यापाराच्या खुर्चांचे रजिस्ट्रार यांनीं सर्टिफिकीट दिलेलें असें या नांवाचें एवढेंच औषध म्हटलें म्हणजे **डा. लेलार यांचे फास्फोडाइन** हेंच होय. कित्येक धाडशी ढोंगी लोक हिंदुस्थानच्या लोकांस जीं खोटीं फास्फोडाइनें व वाईट अनुकरणें यांस हेंच नांव देऊन विकत देत असतात, त्यांपासून खबरदारी घ्या. वैद्यकीचा धंदा करणारे लोक हीं अनुकरणें मुळींच कबूल करीत नाहींत. हीं जुन्या प्रक्रियांस अनुसरून तयार केलीं असल्यामुळे तीं अगदीं अविश्वसनीय, व प्रसंगीं भयंकरही होत.

डा. लेलार यांचें फास्फोडाइन हें सर्व जगभर घाऊक व किरकोळ विक्री

प्राप्ति, मुखसुगंधी, तसेंच स्तंभन, कामोद्दीपन वाजीकरण, धातुपुष्टि इत्यादिकांवर उत्तम प्रयो आणि शक्ति, आरोग्य, वीर्य, तेज, कामोद्दीपन. मनोत्साह व दिव्यदृष्टि उत्पन्न करण पाक, अवलेह, गुटिका, घृतें, सुगंधी तेलें, उटणीं, धारोष्ण, चूर्णें इ. तयार करण्याच कृतींचा व दुसऱ्याही सर्व साधारण रोगांवरील बऱ्याच औषधांचा संग्रह केला आहे.० सारां तारुण्यावस्थेत अवश्य लागणाऱ्या सर्व प्रकारच्या अनुभवैक औषधांचा संग्रह केला आहे.

ह्यांत निरनिराळ्या ४० प्रकारांवर २०० औषधांचा संग्रह केला आहे. प्रत्ये प्रकारावर पांच पांच औषधांचा संग्रह केला आहे. कोणत्याही प्रकृतीचा मनुष्य असो त्याला ह्या पांचापैकीं एका तरी औषधापासून गुण पडल्याशिवाय राहणार नाहीं. हीं स औषधें आम्हीं फार दिवस अनुभविलेलीं असून खातीपूर्वक गुण करणारीं आहेत. तसेंच ह्यांत लिहिलेलीं सर्व औषधें पाहिजे त्यावेळीं मिळण्यासारखीं असून अल्प श्रमांत थोड्या खर्चानें पाहिजे त्यावेळीं सुलभ रीतीनें तयार करितां येतात.

ह्याची किंमत १० रु.* व पुस्तक गहाळ होऊं नये ह्मणून रजिष्टर करणावळ वगैरे ८ आणे मिळून १९॥ रुपये खालील पत्त्यावर पाठवावे. त्यांतील औषधांच्या मातब्बरीकडे व अत्यावश्यकतेकडे लक्ष्य दिल्यास ही किंमत कांहींच नाहीं अशी खात्री होईल. ज्याचा धंदा चालणार, तींच औषधें प्रसिद्ध करणार ह्मणून ह्या पुस्तकास सर्वांकडून आश्रय मिळणें योग्य आहे; याकरितां हे पुस्तक वैद्यांनीं त्यांतील औषधें स्वतः करावीं, परंतु त्याच्या कृति किंवा पुस्तक दुसऱ्यांस देऊं नये. असें केल्यास आह्मांस चांगला आश्रय मिळेल. याकरितां हे पुस्तक वैद्यांनीं सदरील अट मान्य करून पुस्तकें घ्यावीं.

ह्या पुस्तकांत कोणत्याही प्रकारचा बीभित्स अप्रयोजक व चावट प्रकार मुळींच न-सून फक्त औषधांचाच संग्रह केला आहे.

हें पुस्तक वैद्य व इतर सर्व लोकांच्या उपयोगी असल्या कारणानें ह्यास सर्वांनीं आपला उदार आश्रय अवश्य द्यावा.

"नाट्यकथार्णव" मासिक पुस्तकाचे मालक यांचे नांवें ह्या पुस्तकासंबंधी सर्व व्यवहार ठेवावा. नाटपेड पत्र घेतलें जाणार नाहीं.

मुंबई ता० २९ माहे डिसेंबर सन १८८१ इ.

वैद्य हरीप्रसाद दिक्षितवाले.

—०—

* ता० १ फेब्रुवारी सन १८८२ च्या आंत जे कोणी हें पुस्तक घेतील त्यांस तें आगाऊ दराप्रमाणेंच ह्मणजे मुंबईतील लोकांस ५ रु. व बाहेरगांवच्यांस टपाल व बंगी खर्चासह ५॥. साडेपांच रुपयांत पाठविलें जाईल. पुढें प्रति शिल्लक राहिल्यास वर लि-हिल्याप्रमाणें ह्मणजे १० रु. किंमत घेतली जाईल.

फार मनोवेधक

कामकंदला नाटक.

अवश्य घ्या आणि अवश्य वाचा.

किंमत १। रुपया ट. ख. १ आणा.

हें पुस्तक सुंदर टैपांनीं छापून तयार झालें आहे. ज्यांना हें पाहिजे त्यांनीं कृपा करून ट. ख. सह रोख किंमत पाठविली असतां वरील पुस्तक तात्काळ रवाना करण्यांत येईल. ता० १।९।८१.

पत्ता—मिशनस्कुला नजीक जबलपूर. } एकनाथ गणेश भांडारे. ग्रंथकर्ता.

—o—

बालोपयोगी व इतर पुस्तकें.

अंकगणित (मराठी ५ व्या इयत्तेपर्यंत.)—किं. ६ आणे; व.ट. ख. १॥ आणा.

मोडीवाचनसार भाग १ ला व २ रा—दर भागास किं. ३ आणे व पाकिंग व टपाल खर्च १ आणा.

हायस्कूलच्या इं. १ ल्या व २ ऱ्या पुस्तकांतील मराठींत उच्चारार्थासहित शब्दसंग्रह—किं. अनुक्रमें १॥ व २॥ आणे, शिवाय प्रत्येकीं ट. ख. १ आणा.

भूगोलाच्या व्याख्या, मराठी १ ल्या व २ ऱ्या पुस्तकांतील कठिण शब्दांचा अर्थ व कवितांचा अन्वययुक्त अर्थ—किं. १॥। आणे व ट. ख. ६ पै.

एशिया व युरोप खंडाचें संक्षिप्त वर्णन—किं. १ आणा ट. ख. ६ पै.

चित्रबोध अथवा बालकांचें प्रथम प्रियपुस्तक—किं. १॥ आणा, ट. ख. ६ पै.

हिंदुस्थानच्या इतिहासांतील सर्व संक्षिप्त माहितीचें लहानसें पुस्तक—(परीक्षेच्याविद्यार्थ्यांस अत्यंत उपयोगीं पडणारें) किं. २ आणे ट. ख. ६ पै.

आरतीसंग्रह (आरती संख्या ३१९ दुसरी आवृत्ति) किं. १ रु. ट. ख. २ आणे.

पुस्तकें मुंबईत खालीं सही करणाराकडे मिळतील. जास्त प्रती घेण्यांत टपाल खर्चांत फायदा आहे.

कोदेवाडी शांतारामाची चाळ नंबर ४२. } वासुदेव मोरेश्वर पोतदार. स्कूलमास्तर गिरगांव प्रायव्हेट स्कूल, मुंबई.

—o—

"नलदमयंती" व "हरिश्चंद्र".

रा. रा. सोकर बापूजी त्रिलोकेकर यांनीं गद्यपद्यात्मक रचून चित्रांसह सुंदर ठशांनीं छापवून प्रसिद्ध केलेलीं वरील नाटकांचीं पुस्तकें **नाट्यकथार्णवा**च्या आफिसांत विकत मिळतील. "नलदमयंती"—रु० १।. व टपालखर्च आणे २, व "हरिश्चंद्र"—रु० ।॥. व टपालखर्च आणा १.

करणारे व परदेशीं पाठविणारे लोक सुमारें २। रु. व ५॥ किंमतीच्या बाटल्यांतून विकतात.

महत्त्वाची सूचना:—बाटलीच्या प्रत्येक ग्लासांत "डा. लेलार यांचें फास्फोडाइन लंडन, इंग्लंड," हे शब्द उठविले नसतील तर हें औषध अस्सल असें समजूं नये. तसेंच प्रत्येक बाटलीवर 'डा. लेलार यांचें फास्फोडाइन, लंडन, इंग्लंड,' हे शब्द महाराणी साहेबांच्या नामदार कमिशनरांच्या आज्ञेवरून खोदिलेले असतात; तसे नसतील, तर तें औषध बनावट असून तुम्हीं खोट्या बनावट अनुकरणानें फसलां आहां असें समजावें.

फास्फोड्राइनचे एकटेच मालक व उत्पन्न करणारे 'डा. आर. डी लेलार, वेहरीस, "३२ गॅरफर्ड रस्ता, लंडन, वायव्यभाग, इंग्लंड' यांजकडून 'फास्फरसाचे उपचार व रोगनिरास' हें पुस्तक टपालखंर्चाशिवाय फुकट पाठविण्यांत येतें.

नियमित एजंट.

ट्रेचर व कंपनी, मुंबई, भायखळा आणि पुणें. (Treacher and Co Bombay, Byculla, and Poona.)

DR. R. D. LALOR.

—o—

A REPOSITORY
OF
USEFUL ARTS AND RECEIPTS
(Monthly Magazine.)

उपयुक्त सूचना.

व्यवहारोपयोगी हुन्नरसंग्रह.

(मासिकपुस्तक.)

चालू वर्षाच्या आगष्ट महिन्यापासून आम्ही सदर्हु पुस्तक काढण्याची सुरुवात केली आहे, त्यांत ह्या देशांत व परदेशांत चालणारे अनेक प्रकारचे धंदे, रोजगार विद्या व कलाकौशल्यें यासंबंधी अनेक प्रकारच्या युक्ति, कल्पना व हुन्नर यांचा संग्रह होत असतो.

ह्यांत बागईत व शेती, सुगंधी व अतारी, रंगारी, वैद्यकी, पाकशास्त्र, कुंभारकाम, कांचकाम, दारूकाम इत्यादि कामासंबंधी अनेक प्रकारचे उपयुक्त पदार्थ करण्याच्या कृति, कोणत्याही पदार्थांवरील सर्व प्रकारचे डाग काढण्याच्या युक्ति; उपद्रवकारक प्राण्याचा नाश करण्याचे उपाय; लवकरु नासणारे पदार्थ पुष्कळ दिवस जसेच्या तसे ठेवण्याच्या युक्ति; कोणत्याही पदार्थावर पाडिजे त्या धातूचा मुलामा चढविण्याच्या कृति; फुटलेले पदार्थ साधण्याकरितां लुकणें; सुगंधी व औषधोपयोगी तेलें व अर्क; अनेक प्रकारच्या साध्या व रंगीत शाई, आगगाड्या, सालू मेणबत्या लाख, वार्निशें, सरबतें, टूथपावडर्स, मिश्क-

रोझिस, कोल्डक्रीम्स, ब्यामेटम्स, फ्रेंचपालिश, टिंक्चर्स, एशन्स, आसिड्स, कोल्डवाटर्स इत्यादि सर्वोपयोगी उपयुक्त पदार्थ करण्याच्या कृति, आणि सांकेतिक भाषा, कूटगणित, कूटप्रश्न आणि अंकचमत्कार, याचा संग्रह होत जाईल.

यांची किंमत आगाऊ एक वर्षाची दोन रुपये, टपाल खर्च ६ आणे; किंमत पाठविणें ती मनीआर्डर करून पुस्तककर्त्याकडे खालीं लिहिलेल्या ठिकाणीं पाठवावी. प्रत्येक अंक डेमी अष्टपत्री २० पृष्ठांचा निघतो. आगाऊ वर्गणी आल्याखेरीज पुस्तक सुरू केलें जाणार नाहीं.

ता. ८ आगष्ट सन १८८१ इसवी.

गोविंद मोरेश्वर कालेकर.
हुन्नरसंग्रहकर्ते.

पत्ता.—नळावर पंचमुखी मारुतीची गल्ली, घर नंबर २६ मुंबई.

———o———

नाट्यकथार्णव आफिसांत

विक्रीस तयार.

संग्रह करण्यालायक उपयुक्त पुस्तक.

(अनुभविक औषधी संग्रह माला.)

वैद्यकल्पतरु.

भाग १ ला.

मदन कुतूहल.

अथवा

[तरुणांस अवश्य लागणाऱ्या अनुभविक औषधांचा संग्रह.]

सर्व प्रकारच्या रोगांवर आह्मीं फार दिवस अनुभविलेलीं वनस्पतींचीं रामबाण औषधें लोकोपयोगार्थ प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे. त्याचा **मदनकुतूहल** नामक पहिला भाग छापून तयार केला आहे.

ह्या पहिल्या भागांत हर्ल्लींचे अशक्त, निस्तेज, सदारोगी, व उपदंशजन्य [गरमी] रोगानें पीडिलेले तरुण सशक्त व सर्व रोगांपासून मुक्त होऊन आरोग्यस्थितींत तारुण्यावस्थेतील सर्व क्रिया सुरळीत रीतीनें चालविता याव्या, अशाच अनुभविक औषधांचा संग्रह केला आहे.

यांत सर्व प्रकारचे दुर्घट प्रमेह (परमे) व धुपणी, चट्टे, वद, विस्फोटक, गरमीनें हातापायांचे साधे धरणे, धातुस्थानची कडकी, पिनस, स्तंभावस्थेत वगैरे धातुजाणें, नपुंसकत्व, हस्तदंडी, तारुण्यपीटिका, आगरु, अशक्तता, अतिघाम, शरीराची दुर्गंधी व क्लांतिमा इत्यादिकांवर रामबाण औषधें; व रक्तवृद्धि, वीर्यवृद्धि वृद्धिसंकोच, केशवृद्धि, रक्तशुद्धि, नष्टपुत्र

प्राप्ति, मुखसुगंधी, तसेंच स्तंभन, कामोद्दीपन वाजीकरण, धातुपुष्टि इत्यादिकांवर उत्तम प्रयोग आणि शक्ति, आरोग्य, वीर्य, तेज, कामोद्दीपन. मनोत्साह व दिव्यदृष्टि उत्पन्न करणारे पाक, अवलेह, गुटिका, घृतें, सुगंधी तेलें, उटणीं, धारोष्ण, चूर्णें इ. तयार करण्याच्या कृतींचा व दुसऱ्याही सर्व साधारण रोगांवरील बऱ्याच औषधांचा संग्रह केला आहे. सारांश तारुण्यावस्थेत अवश्य लागणाऱ्या सर्व प्रकारच्या अनुभवैक औषधांचा संग्रह केला आहे.

ह्यांत निरनिराळ्या ४० प्रकारांवर २०० औषधांचा संग्रह केला आहे. प्रत्येक प्रकारावर पांच पांच औषधांचा संग्रह केला आहे. कोणत्याही प्रकृतीचा मनुष्य असो, त्याला ह्या पांचापैकीं एका तरी औषधापासून गुण पडल्याशिवाय राहणार नाहीं. हीं सर्व औषधें आम्हीं फार दिवस अनुभविलेलीं असून खातीपूर्वक गुण करणारीं आहेत. तसेंच ह्यांत लिहिलेलीं सर्व औषधें पाहिजे त्यावेळीं मिळण्यासारखीं असून अल्प श्रमांत थोड्या खर्चानें पाहिजे त्यावेळीं सुलभ रीतीनें तयार करितां येतात.

ह्याची किंमत १० रु.* व पुस्तक महाग्य खर्च नसे मनीआर्डरनें कळविल्यास कमीत कमी ८ आणे मिळून १०॥ रुपये खालील पत्त्यावर पाठवावे. त्यांतील औषधांच्या मातब्बरीकडे व अत्यावश्यकतेकडे लक्ष्य दिल्यास ही किंमत कांहींच नाहीं अशी खात्री होईल. ज्यावर आमचा धंदा चालणार, तींच औषधें प्रसिद्ध करणार म्हणून ह्या पुस्तकास सर्वांकडून आश्रय मिळणें योग्य आहे; याकरिता हे पुस्तक धंदेवाल्यांनीं त्यांतील औषधें स्वतः करावीं, परंतु त्याच्या कृति किंवा पुस्तक दुसऱ्यांस देऊं नये. असें केल्यास आम्हांस चांगला आश्रय मिळेल. याकरितां हे पुस्तक घेणारांनीं सदरील अट मान्य करून पुस्तकें घ्यावीं.

ह्या पुस्तकांत कोणत्याही प्रकारचा बीभत्स अप्रयोजक व चावट प्रकार मुळींच न घालून फक्त औषधांचाच संग्रह केला आहे.

हें पुस्तक वैद्य व इतर सर्व लोकांच्या उपयोगी असल्या कारणानें ह्यांस सर्वांनीं आपला उदार आश्रय अवश्य द्यावा.

"नाट्यकथार्णव" मासिक पुस्तकाचे मालक यांचे नांवें ह्या पुस्तकासंबंधी सर्व व्यवहार ठेवावा. नाटपेढ पत्र घेतलें जाणार नाहीं.

मुंबई ता० २५ माहे डिसेंबर सन १८८१ इ.

वैद्य हरीप्रसाद दिल्लीवाले.

—o—

* ता० १ फेब्रुवारी सन १८८२ च्या आंत जे कोणी हें पुस्तक घेतील त्यांस तें आगाऊ दरप्रमाणेंच म्हणजे मुंबईतील लोकांस ९ रु. व बाहेरगांवच्यांस टपाल व रंगी खर्चासह ९॥. साडेनांव रुपयांत पाठविलें जाईल. पुढें प्रति शिल्लक राहिल्यास वर लिहिल्याप्रमाणें म्हणजे १० रु. किंमत घेतली जाईल.

फार मनोवेधक

कामकंदला नाटक.

अवश्य घ्या आणि अवश्य वाचा.

किंमत १। रुपया ट. ख. १ आणा.

हें पुस्तक सुंदर टैपांनीं छापून तयार झालें आहे. ज्यांना हें पाहिजे त्यांनीं कूपन करून ट. ख. सह रोख किंमत पाठविल्यें असतां वरील पुस्तक ताबडतोब रवाना करण्यांत येईल. ता० १।९।८१.

पत्ता—मिशनस्कुल नजीक जबलपूर. } एकनाथ गणेश भांडारे. ग्रंथकर्ता.

बालबोधपुस्तकांच्या व इतर पुस्तकांच्या.

अंकगणित (मराठी ५ व्या इयत्तेपर्यंत.)—कि. ६ आणे; व.ट. ख. १॥ आणा.

मोडीवाचनसार भाग १ ला व २ रा—दर भागास कि. २ आणे व पाकिंग व टपाच खर्च १ आणा.

हार्वर्डच्या इं. १ ल्या व २ ऱ्या पुस्तकांतील मराठींत उच्चारार्थासहित शब्दसंग्रह—कि. अनुक्रमें १॥ व २॥ आणे, शिवाय प्रत्येकीं ट. ख. १ आणा.

भूगोलाच्या व्याख्या, मराठी १ ल्या व २ ऱ्या पुस्तकांतील कठिण शब्दांचा अर्थ व कवितांचा अन्वययुक्त अर्थ—कि. १॥। आणे व ट. ख. ६ पै.

एशिया व युरोप खंडाचें संक्षिप्त वर्णन—कि. १ आणा ट. ख. ६ पै.

चित्रबोध अथवा बालकांचें प्रथम प्रियपुस्तक—कि. १॥ आणा, ट. ख. ६ पै.

हिंदुस्थानच्या इतिहासांतील सर्व संक्षिप्त माहितीचें लहानसें पुस्तक—(परीक्षेच्याचेळीं अत्यंत उपयोगीं पडणारें) कि. २ आणे ट. ख. ६ पै.

आरतीसंग्रह (आरती संख्या ३१९ दुसरी आवृत्ति) कि. १ रु. ट. ख. २ आणे.

पुस्तकें मुंबईंत खालीं सही करणाराकडे मिळतील. जास्त प्रती घेण्यांत टपाल खर्चांत फायदा आहे.

कादेवाडी शांतारामाची चाळ नंबर ४२. } वासुदेव मोरेश्वर पोतदार. स्कूलमास्तर गिरगांव प्रायव्हेट स्कूल, मुंबई.

"नलदमयंती" व "हरिश्चंद्र".

रा. रा. सोकर बापूजी त्रिलोकेकर यांनीं गद्यपद्यात्मक रचून चित्रांसह सुंदर ठशांनीं छापवून प्रसिद्ध केलेलीं खालील नाटकांचीं पुस्तकें **नाट्यकथार्णवा**च्या आफिसांत विकत मिळतील. "नलदमयंती"—रु० १।. व टपालखर्च आणे २, व "हरिश्चंद्र"—रु० .॥ व टपालखर्च आणा १.

NOTICE.

THE undersigned begs to inform the Public that he will undertake the work of Surveying, &c. &c. at the following rates :—

	Rs.	A.	P.
ORDINARY SURVEYS of Buildings, each... ...	10	0	0
ATTENDANCE in Court.	10	0	0

PLAN and SECTION of proposed Building, or of additions to and alterations in the existing Building, prepared in order to obtain sanction from the Executive Engineer, Municipality, to show the stability of the structure, will be charged for at the following rates :—

Each Building with Privies.	15	0	0
,, ,, without Privies	10	0	0

SURVEYS of Vacant Grounds at As. 8 per 100 square yards.

,,	of Batty Fields	... at	,,	10	,,	100	,, ,,
,,	of Oarts...	... at	,,	12	,,	100	,, ,,
,,	of Gardens.	... at	,,	14	,,	100	,, ,,
,,	of Hilly Grounds.	at Re.	1	,,	100	,,	,,

SURVEYS of Large Estates; PLANS, ELEVATIONS and SECTIONS of Buildings; DETAIL-DRAWINGS; WORKING-DRAWINGS; ROAD PROJECTS and LEVEL SECTIONS; MODELS OF BUILDINGS and GROUNDS; PLANS enlarged or reduced; COPIES of Plans, will be charged for, according to the nature of work.

Preparation of DESIGNS, ESTIMATES, SPECIFICATIONS, VALUATIONS and SUPERVISION of Works, will be undertaken.

Works entrusted will be executed with great care, promptitude, accuracy, and in the best style.

For further particulars, apply to the undersigned.

M. P. DHURU,
Surveyor and Draughtsman.
No. 102, Moogbhat (Dr. Moreshwar's Chawl,) Bombay.



TREACHER AND COMPANY, LIMITED.

ट्रेचर आणि कंपनी, लिमिटेड,

रसायनें तयार करणारे,

औषधि द्रव्यांचा घाउक व्यापार करणारे

व

शस्त्रक्रियेचीं शस्त्रें आणविणारे.

या कंपनीचा व्यापार मोठा असून कामें अधिक अधिक वाढत चालली आहेत; व शिवाय कंपनीचें भांडवल फार मोठें असून, तिजतर्फे लंडन शहरीं एक एजंट आहेत. त्याचा सर्व वेळ या कंपनीच्या कामाकडेच मोडत राहून त्यांच्या दरजाचा आणि मदतीचा उपयोग या [illegible] प्रत्यहीं होत आहे; यामुळें उत्तम व्यापाराच्या ठिकाणाहून, वेळच्या [illegible], व उत्तम सोईच्या भावांनीं, या कंपनीस घाउक जिन्नस विकत घेण्यास सांपडतात. [illegible] हितकारक गोष्टी हिंदुस्थानांतील इतर कोणत्याही कंपनीस अनुकूल नाहींत.

एतद्देशीय संस्थानें,

म्युनिसिपालिट्यांनीं स्थापिलेलीं [illegible] सरकारी हास्पिटलें,

धर्मार्थ दवाखाने,

सिव्हिल सर्जन, खाजगी [illegible] चालविणारे,

[illegible] मालक, [illegible] कंपन्या,

कंत्राटदार आणि लागवडी करणारे

यांस.

औषधि द्रव्यें, रसायन क्रियेचे जिन्नस,

[illegible] नामक [illegible] वैद्यशास्त्राच्या रीतीनें तयार केलेलीं औषधें,

शस्त्र क्रियेस लागणारीं शस्त्रें,

वैद्य क्रियेस अवश्य असणारीं साधनें

औषधें तयार करणारांस लागणारें [illegible] सामान, इत्यादि

घाउक दरानें देण्यांत येतील.

[illegible] लिहिलेली मुद्दाम तयार केलेली यादी मागितली असता मिळे.

TREACHER AND COMPANY, Ld.

ट्रेचर आणि कंपनी, लिमिटेड.

मुंबई, भायखळा आणि पुणें.